तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• स म ग्र वा ङ् म य •

खंड-१२

संस्कृत - मराठी
प्रबंध व चरित्रसंग्रह

संपादक
डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

खंड - १२

संस्कृत - मराठी प्रबंध व चरित्रसंग्रह

संपादक

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

सन २०२४

वाय १८४-१

पुस्तकाचे नाव : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - १२ संस्कृत - मराठी प्रबंध व चरित्रसंग्रह

संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे

आयएसबीएन : ९७८-८१-९६८२६८-१-९

प्रथमावृत्ती - २०२४

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

© प्रकाशकाधीन :

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

मुखपृष्ठ : गौरीश सोनार

किंमत : रुपये २७०/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकांची व लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध विषयांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी

देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासूंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

संपादकीय

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संस्कृत पंडित होते. प्राज्ञपाठशाळा, वाई येथे त्यांनी न्याय, वेद, व्याकरण, अलंकारशास्त्र इ. चा संस्कृतमध्ये अभ्यास केल्यानंतर ते संस्कृतमधील उच्च विद्या शिकण्यासाठी म्हणून काशीस गेले. तिथे शिक्षण पूर्ण करून त्यांनी सन १९२३ मध्ये शासकीय संस्कृत महाविद्यालय, कलकत्ता येथून 'तर्कतीर्थ' पदवी संपादिली. ही पदवी प्राप्त करून ते परत प्राज्ञपाठशाळा, वाई येथे अध्यापक म्हणून रुजू झाले आणि न्याय, वेदान्त, व्याकरण शिकवू लागले. सन १९२३ पासूनच ते धर्म नि संस्कृत पंडितांच्या सभा, परिषदांमध्ये भाग घेऊ लागले. भाषणे, वादविवाद, खंडन-मंडन असे या सहभागाचे स्वरूप होते. नंतर त्यांनी आपले गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या बरोबर धर्मसुधारणा, मीमांसा कोश, धर्मकोश इ. उपक्रम नि निर्मितीत सहभाग घ्यायला सुरुवात केली व ते संस्कृत पंडित, शास्त्री म्हणून ओळखले जाऊ लागले.

सन १९२५-२६ च्या दरम्यान (माघ शुद्ध, शके १८४७) सोनगीर, (जि.धुळे) येथे संतोजी महाराज व केशवदत्त महाराज यांच्या पुढाकारातून एक धर्म परिषद संपन्न झाली. तीत स्वामी केवलानंद सरस्वती व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सहभागी झाले होते. या परिषदेतील धर्म प्रश्नांसंबंधी मागवल्या गेलेल्या संस्कृत निबंधांच्या आधारे अनंत कृष्णशास्त्री यांनी 'धर्मप्रदीप' नावाचा ग्रंथ संपादित करून प्रकाशित केला होता. त्यात 'शुद्धितत्त्व प्रकाश' शीर्षक भागातील त्रुटी निदर्शनास आणून धर्मपरिवर्तन व धर्मभ्रष्ट झालेल्यांची शुद्धी प्रायश्चित्त घेतल्यानंतर होऊ शकते, असा प्रागतिक युक्तिवाद मांडत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९२८ मध्ये 'शुद्धिसर्वस्वम्' हा संस्कृत प्रबंध लिहिला. ते तर्कतीर्थलिखित व प्रकाशित बहुधा पहिले संस्कृत साहित्य असावे. पुढे सन १९३३ मध्ये त्यांचा दुसरा संस्कृत प्रबंध 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्' प्रकाशित झाला. मूलतः हा प्राच्यविद्या परिषद, बडोदा

(गुजरात) येथील अधिवेशनात वाचलेला संस्कृत निबंध. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भारतीय इतिहास लेखन पद्धती असलेल्या ऐतिहासिक पद्धती आणि मीमांसा पद्धती यांचा तुलनात्मक अभ्यास करून विचार मांडले आहेत.

'अस्पृश्यत्व-मीमांसा' हा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीलिखित तिसरा संस्कृत प्रबंध होय. औंध संस्थानचे अधिपती भवानराव श्रीनिवासराव ऊर्फ बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधी यांच्या संस्थानाधिपती पदाच्या रौप्यमहोत्सवी कारकीर्दीच्या (४ नोव्हेंबर १९०९ ते ३ नोव्हेंबर १९३४) गौरवार्थ सन १९३४ मध्ये 'श्री भवानराव गौरव ग्रंथ' (भाग -१) प्रकाशित करण्यात आला होता. त्यास नारायण गोविंद चापेकर (अध्यक्ष, गौरव ग्रंथ मंडळ, औंध) यांची प्रस्तावना असून त्याचे संपादन सर्वश्री प्रो.रा. द. रानडे, अनंत वि. पटवर्धन, पंडित श्री. दा. सातवळेकर व शं. वा. किर्लोस्कर यांनी केले होते. यात तर्कतीर्थांचा हा निबंध संग्रहित आहे. या निबंधलेखनास महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या अस्पृश्यता निर्मूलन विचारविमर्शाची पार्श्वभूमी आहे. सन १९३२ च्या कायदेभंग चळवळीच्या दरम्यान म. गांधी येरवडा तुरुंगात होते. सन १९३२ आणि १९३३ मध्ये महात्मा गांधींनी २१ दिवसांचा उपवास सुरू केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राखीव मतदारसंघासंबंधी समंजस भूमिका स्वीकारल्यानेच महात्मा गांधींचे उपोषण संपले नि प्राण वाचले होते. या दरम्यानच १० डिसेंबर, १९३२ रोजी महात्मा गांधींच्या निमंत्रणावरून सर्वश्री महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक, कै. चिंतामणराव वैद्य, विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रभृती मंडळी महात्मा गांधींना भेटली. नंतर स्वामी केवलानंद सरस्वती, बाबू भगवानदास, आचार्य आनंद शंकर ध्रुव प्रभृती मंडळीही या चर्चेत वेळोवेळी सहभागी झाली. चर्चेचा विषय होता, 'अस्पृश्यता निवारण.' महात्मा गांधींनी या विषयावर सनातनी आणि वरील पुरोगामी धर्म पंडितांशी चर्चा करून एकमताचा जाहीरनामा करू पाहत होते. या सर्व चर्चा आणि विचारविनिमयातून तर्कतीर्थांनी लिहिलेला हा संस्कृत निबंध होय. या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थांची भाषणे, मुलाखती, लेख वृत्तात आहेत. ते या प्रकल्पातील विविध खंडात समाविष्ट आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांचे १ मार्च १९५५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानंतर त्यांच्या स्मरणार्थ 'केवलानंद स्मारक मंदिर' उभारण्याचा संकल्प करण्यात आला. त्यानुसार स्मारक मंदिराची पायाभरणी तत्कालीन अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते ११ ऑक्टोबर १९५९ रोजी संपन्न झाली. या केवलानंद स्मारक मंदिराची उभारणी अल्पावधीत पूर्ण होऊन १३ फेब्रुवारी १९६० रोजी या स्मारकाचे उद्घाटन भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी 'श्री ब्रह्मीभूत केवलानंदसरस्वती स्मारक - मंदिर का

समारोह - पुण्यस्मरण पुस्तिका' प्रकाशित करण्यात आली होती. ती संस्कृत-हिंदी भाषेतील गुरुस्तोत्र, प्रार्थना, प्रशस्ति, भाषण, लेख इ. नी समृद्ध होती. त्या पुण्यस्मरण पुस्तिकेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'श्रीकेवलानंदयतेश्चरित्रसार' : संस्कृतमध्ये लिहिले होते, ते येथे मराठी भाषांतरासह दिले आहे. तर्कतीर्थांनी स्वामी केवलानंद सरस्वतींचे असेच आणखी एक संक्षिप्त मराठी चरित्र लिहून 'श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (अमृत महोत्सव)- १९५२' मध्ये प्रकाशित केले आहे, तेही येथे देण्यात आले आहे.

वरील संस्कृत प्रबंध व चरित्राशिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठीत प्रबंध व चरित्र लेखन केले आहे. 'आनंदमीमांसा' (१९२८) आणि 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद' (१९४१) हे दोन महत्त्वपूर्ण मराठी प्रबंध होत. या प्रबंधातून आपणास विचारप्रधान, विश्लेषक लेखन क्षमतेची प्रचिती येते. सन १९९० आणि १९९१ ही दोन वर्षे हे भारतीय समाजसुधारकांच्या, सामाजिक सुधारणांच्या कृतज्ञतापूर्ण स्मरणाची होती. सन १९९० हे वर्ष सत्यशोधक महात्मा जिोतराव फुले यांचे स्मृती शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात होते, तर १९९१ हे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. या वर्षी भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मरणोत्तर 'भारतरत्न' बहुमानाने सन्मानित केले. या उभय समाजसुधारकांनी अस्पृश्य, बहुजनादी वंचितांच्या विकासाचे जे महत्कार्य केले ते लक्षात घेऊन सन १९९० मध्येच भारतीय पुस्तक न्यासाने (नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना महात्मा फुले यांचे चरित्र लिहिण्याची विनंती केली होती. त्यानुसार तर्कतीर्थांनी 'जोतिचरित्र' लिहिले. ते १९९२ मध्ये मराठीत, सन १९९६ मध्ये इंग्रजीत, तर सन २००६ मध्ये हिंदीत प्रकाशित झाले आहे. इथे मराठी 'जोतिचरित्र' संग्रहित आहे. यापूर्वी सन १९४७ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'जोति-निबंध' चे प्रकाशन झाले होते. ते छोटे पुस्तक म्हणजे सत्यशोधक समाज, वाईच्या ब्राह्म समाज, वाई तर्फे साजरे करण्यात आलेल्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेतील सत्यशोधक समाज व महात्मा फुले या विषयावरील तर्कतीर्थांचे भाषण होय. ते १८ जून १९४६ ला झाले होते. या छोट्या पुस्तिकेस सत्यशोधक कार्यकर्ते रा.ना. चव्हाण यांची छोटी प्रस्तावना आहे. कारण ते भाषण त्यांनीच योजले होते. मूळ 'जोतिचरित्र' मध्ये भाग - २ अंतर्गत 'जोतिनिबंध' अंतर्भूत आहे. तो या प्रकल्पातील खंड क्र. २ (भाषण संग्रह - व्यक्ती आणि विचार) मध्ये समाविष्ट करण्यात आला असल्याने द्विरूक्ती टाळण्याच्या उद्देशाने इथे 'जोति चरित्र' मध्ये वगळण्यात आला आहे, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त लेखनाव्यतिरिक्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सन १९५२ मध्ये 'स्वामी केवलानंद सरस्वती अमृत महोत्सव ग्रंथ' आणि सन १९६२ मध्ये 'यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ'चे संपादन केले होते. हा ही त्यांच्या समग्र वाङ्मयाचाच भाग होय. विस्तार भयापोटी हे दोन ग्रंथ या प्रकल्पात 'राजवाडे लेखसंग्रह' आणि 'टिळक लेखसंग्रह' प्रमाणे अंतर्भूत केले नसले, तरी त्यांची इथे नोंद घेणे आवश्यक आहे.

या खंडातील सर्व संस्कृत प्रबंध व चरित्र यांचे मराठी भाषांतर संस्कृत विदुषी प्रा. डॉ. सौ. आशाताई रवींद्र गुर्जर यांनी अत्यंत मनःपूर्वक सहयोग देऊन केले आहे. त्यांच्या या सहकार्याबद्दल संपादक म्हणून मी कृतज्ञता व्यक्त करतो व मनःपूर्वक आभार मानतो. त्यांचा परिचय ग्रंथसखा श्याम जोशी यांच्यामुळे झाला व हे अवघड कार्य सुलभ झाले. मी त्यांचाही ऋणी आहे. श्याम जोशी यांच्यामुळे मला या प्रकल्पासाठीचे अनेक संदर्भ प्राप्त झाले. त्याचीही नोंद करणे माझे कर्तव्य आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकल्पातील हा १२ वा खंड संस्कृत व मराठी प्रबंध व चरित्र संग्रह म्हणून सादर करताना मला आनंद होत आहे.

दि. ११ एप्रिल २०२२ **- डॉ. सुनीलकुमार लवटे**
महात्मा फुले जयंती संपादक

अनुक्रमणिका

❍ **अध्यक्षीय मनोगत** तीन

❍ **संपादकीय** पाच

❍ **प्रस्तावना : साक्षेपी प्रबंध व चरित्र लेखनाचा आदर्श** अकरा

(अ) संस्कृत प्रबंध व चरित्र

१) शुद्धिसर्वस्वम् १

२) भारतीयधर्मेतिहासतत्त्वम् ११३

३) अस्पृश्यत्व-मीमांसा १५७

४) श्रीकेवलानंदयतेश्चरित्रसार: १८७

(ब) मराठी प्रबंध व चरित्र

१) आनंदमीमांसा २११

२) जडवाद अर्थात अनीश्वरवाद २७१

३) केवलानंद संक्षिप्त चरित्र ३४१

४) जोतिचरित्र ३८७

❍ **प्रबंध व चरित्रांची संदर्भ सूची** ४७३

परिशिष्टे :

१) ऋणनिर्देश ४७७

२) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परिचय ४८१

३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ सूची ४८५

४) डॉ. सुनीलकुमार लवटे : परिचय ४९५

प्रस्तावना
साक्षेपी प्रबंध व चरित्र लेखनाचा आदर्श

निबंधाचे दीर्घ रूप प्रबंध होय निबंध ललित असतात तसे वैचारिक, तत्त्वप्रधान, संशोधनात्मकतेही. आपला स्वतंत्र विचार विस्ताराने सांगण्याच्या गरजेतून दीर्घ निबंध लिहिले गेले. त्याच्या विस्तारातून प्रबंधांची रचना सुरू झाली. प्रबंध स्वतंत्र विचार असतो, तसाच पूर्व विचार, तत्त्व, सूत्र, तत्त्वज्ञानाचे विश्लेषण, तुलनाही. मूलतः ही सारी नवज्ञान निर्मिती, पूर्वज्ञान विस्तार संदर्भातील ज्ञानविकास प्रक्रिया होय. पदवीसाठी सादर केल्या गेलेल्या प्रबंधात नि स्वतंत्रपणे मांडणी, विस्तार, विश्लेषण, तुलना, चिकित्सा, मीमांसा, समीक्षा, संशोधनार्थ केले गेलेले लेखन हे आपण वेदवाङ्मय, इतिहास, विज्ञान, तत्त्वज्ञान इ. सर्व ज्ञान-विज्ञान क्षेत्रात परंपरेने प्राचीन काळापासून पाहात आलो आहोत. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, इंग्रजी इ. वैश्विक भाषा नि संस्कृतीत प्रबंध लेखनाची परंपरा ज्ञान-विस्तार, संशोधन, विश्लेषण, तुलना, समीक्षा इ. अंगांनी दिसून येते. हा विकास प्राचीन काळात संस्कृत, ग्रीक, लॅटिन, स्पॅनिश भाषांत दिसतो. तर आधुनिक काळात इंग्रजीमध्ये आढळतो.

प्रबंध (Thesis / Dissertation) शब्दाचा अर्थच मुळी नवं सांगणं, सादर करणं, नव्याचं प्रस्तुतीकरण असं आहे. यात बौद्धिक कसरत, कौशल्य अपेक्षित असते. ॲरिस्टॉटल (इ.स.पू. ३८४ ते इ.स.पू. ३३२) या ग्रीक तत्त्वज्ञाने प्रथम हा शब्द व्याख्यायित केला. पूर्वप्रस्थापित विचार खंडन-मंडनार्थ केलेलं विवेचन प्रबंधात अपेक्षित असते. त्याच्या शीर्षकातूनच विवेचन विषय आपल्या लक्षात येतो. विवेचन, विश्लेषण, निष्कर्ष अशा त्रिपदीतून प्रबंध साकारतो. पारदर्शिता नि स्पष्टता असलेला प्रबंध वाचक पसंत करतो. जे सांगायचे ते सप्रमाण अशी प्रबंध लेखनाची पूर्वशर्त असते. भूतकाळ, वर्तमानकाळ नि भविष्याची सांगड घालत केलेले प्रबंध लेखन अधिक उपयुक्त असते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संस्कृत आणि मराठी भाषेत असे अनेक प्रबंध लिहिले आहेत. संस्कृतमध्ये

'शुदद्धिसर्वस्वम्' (१९२८), 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्' (१९३३), 'अस्पृश्यतामीमांसा' (१९३४) आणि मराठीत 'आनंदमीमांसा' (१९२८), 'जडवाद अर्थात अनीश्वरवाद' (१९४१) हे प्रबंध या खंडात विचारार्थ अंतर्भूत केले आहेत.

उपरोक्त प्रबंध लेखनाबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्यांनी संस्कृत व मराठीमध्ये महात्मा जोतीराव फुले व स्वामी केवलानंद सरस्वती यांच्यावर छोटी-मोठी प्रत्येकी दोन चरित्रे लिहिली. चरित्र असते एखाद्या व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतचा जीवन वृत्तांत. व्यक्ती जेव्हा स्वत: असा आपला जीवन वृत्तांत लिहितो, तेव्हा तेच आत्मचरित्र बनते. चरित्र असते वस्तुनिष्ठ लेखन. ते सांगोवांगीवर आधारित आत्मनिष्ठ लिहिले जाते, तसे क्रमागततेने, पुराव्याधारितही लिहिले जाते. ते इतिहास म्हणून लिहिले जाते नि कादंबरी म्हणूनही. पण वास्तवाधारित ललित शैलीने लिहिलेले चरित्र वाचनीय ठरते. अंत:साक्ष्याधारित लेखन व बाह्यसाक्ष्याधारित लेखन असे चरित्राचे दोन प्रकार संभवतात. समकालीनांनी लिहिलेली चरित्र अंत:साक्ष्य होत. परवर्तिकालीनांनी इतिहास, पुरावे, ग्रंथ इ. आधारे लेखलेले चरित्र बाह्यसाक्ष्य. अंत:साक्ष्य अधिक प्रामाणिक. पण ते वस्तुनिष्ठ लिहिलेले असणे महत्त्वाचे. अगदी रुक्ष चरित्र इतिहास आलेख असतो. चरित्र आणि इतिहासाचे उद्देश एकच. शिक्षण, प्रेरणा, माहिती देणे. चरित्र वाचून प्रेरणा मिळून वाचकांनी तसे बनण्याचा प्रयत्न केला तर ते चरित्र लेखनाचे सामर्थ्य, सार्थक्य समजावं.

तर्कतीर्थांनी महात्मा फुले आणि स्वामी केवलानंद यांची लिहिलेली चरित्रे, मग ती संस्कृतमधली असोत वा मराठीतील, ती केवळ व्यक्तिकेंद्रित राहत नाहीत. समकालीन परिदृश्य चित्रित करत लक्ष्य व्यक्तीचे जीवन सांगण्यामागे तर्कतीर्थांचा हेतू व्यक्तिपूजेपेक्षा कालभान देऊन व्यक्ती योगदान अधोरेखित करण्याचे असते. महात्मा जोतीराव फुले चित्रित करताना तत्काल (भूतकाळ) कसा विपरीत होता, ते विशद करत महात्मा फुले यांच्या कार्याचे सामाजिक महत्त्व तर्कतीर्थ समजावतात, तर स्वामी केवलानंद सरस्वतींच्या चरित्राद्वारे पूर्वकाळ कसा धर्मांध, शब्दप्रमाण होता हे समजावत. गुरू स्वामींची सुधारणा वृत्ती अधोरेखित करत राहतात. तर्कतीर्थांचे लेखन कधीच पंतोजी पद्धतीचे राहिले नाही परिवर्तन, पुरोगामिता या निकषावर ते नेहमी चिंतन, मनन, वाचन, लेखन, व्याख्यान, संपादन, समीक्षा करत आलेले दिसतात.

तीच गोष्ट त्यांनी 'मीमांसाकोश' आणि 'धर्मकोश'ला लिहिलेल्या संस्कृत प्रस्तावना व प्रकाशकीय निवेदनांमधूनही स्पष्ट होते. 'मीमांसाकोश'च्या १ ते ७ खंडांचे संपादक स्वामी केवलानंद सरस्वती असले तरी प्राज्ञपाठशाळा मंडळाचे अध्यक्ष म्हणून प्रकाशक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच राहिले आहेत. 'धर्मकोश' निर्मिताचा प्रारंभ स्वामी केवलानंद सरस्वती यांनी केला असला तरी त्याचे संपादक मात्र तर्कतीर्थ राहिले आहेत 'मीमांसाकोश' आणि 'धर्मकोश'च्या सर्व निर्मिती, संपादन, प्रकाशन प्रक्रियेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

जोशी यांचा संबंध असल्याने या खंडांची निवेदने, प्रस्तावना, योजनांसंबंधी टिपणे, परिचय पुस्तिकांमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे लेखन संस्कृत व इंग्रजीमध्ये झालेले दिसते. यातील 'धर्मकोश'च्या उपनिषत खंड-२, भाग-१ ला लिहिलेली 'मंत्रब्राह्मणोपनिषत्' ही दीर्घ संस्कृत व इंग्रजी प्रस्तावना हा लिहिलेला प्रबंधच म्हणावा लागेल.

या प्रबंधातून लक्षात येते की, वेद (ऋग्वेद यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद) आणि वेदान्त (१०८ उपनिषदे) यांत काळाचे मोठे अंतर आहे. या कोशातून या वाङ्मयाचे तत्त्वज्ञान समजावण्याचा प्रयत्न आहे. शिवाय प्राचीन वाङ्मयांची कालाविसंगती दूर करून सुसंगत तत्त्वविवेचनाच्या उद्देशाने हा कोश रचल्याचे या प्रस्तावनारूपी प्रबंधातून स्पष्ट होते. पुरुष, प्राण व आत्मन् (ब्रह्म) या तीन संकल्पनांचा ऊहापोह या प्रबंधाद्वारे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या कोशात अध्यात्मदर्शन मांडण्यात आले आहे, ते संहिता व ब्राह्मण ग्रंथांद्वारे. वेद साहित्य समीक्षेच्या एवढ्या प्रदीर्घ परंपरेत असा प्रयत्न प्रथमच होत असल्याचे या प्रबंधातून स्पष्ट होते. हिंदु धर्म व संस्कृतीसंबंधी जी साधने (वेद, उपनिषद, पुराण, श्रुती, स्मृती, ब्राह्मण ग्रंथ इ.) आहेत, ती कालानुक्रमे (Chronological) मांडून त्याआधारे विसंगतीमुक्त व प्रक्षिप्तमुक्त धर्म, संस्कृतीचे आकलन करणे, ती शुद्ध रूपात मुद्रित करून वाचकांना उपलब्ध करून देणे हे कार्य या धर्मकोशाद्वारे झाल्याचे या प्रबंधातून लक्षात येते. यासर्वांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची धर्म व संस्कृतीसंबंधी जी धारणा होती, त्यावर प्रकाश पडतो.

(अ) संस्कृत प्रबंध व चरित्र

(१) संस्कृत प्रबंध

१) शुद्धिसर्वस्वम् (१९२८)

यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्मशुद्धी, इतिहास लेखनपद्धती व अस्पृश्यता निवारण या धर्म, इतिहास व समाजरचनासंबंधी 'शुद्धिसर्वस्वम्' (१९२८), 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम् (१९३३) आणि 'अस्पृश्यतामीमांसा (१९३४) हे तीन संस्कृत प्रबंध रचले आहेत. त्याला भारतातील धर्म व समाज सुधारणांची पार्श्वभूमी आहे. एकोणीसाव्या शतकातील भारतात इंग्रज आगमन, संपर्क, राज्यकारभार, व्यापार, पर्यटन इ. मुळे धर्म व समाजसुधारणांची जाणीव झाली. विसाव्या शतकाचा पूर्वार्ध अशा सुधारणांना गती मिळण्याचा काळ होता. धर्म व समाज क्षेत्रात ज्या अनिष्ट चालीरीती नि रूढी होत्या त्यांचे मूळ धर्मात आहे. धर्मसुधारणांशिवाय समाजपरिवर्तन अशक्य आहे, याची जाणीव होऊन सुधारक अग्रणी राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथाबंदी, एकेश्वर ईश्वर प्रस्थापनेसाठी ब्राह्मो समाज स्थापनासारख्या कार्यातून जागृती घडवून आणली. आर्य

समाज, प्रार्थना समाज सत्यशोधक समाज, चळवळीतून अशा सुधारणांना बळ मिळाले. जातिभेद निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, विधवा विवाह समर्थन, स्त्री शिक्षण प्रसार यातून हे कार्य होत राहिले. त्या काळात धर्मांतर व धर्मभ्रष्ट केलेल्यांच्या शुद्धीचा प्रश्न टिळक युगाच्या अस्तानंतर ऐरणीवर आला. त्या काळात ज्या धर्म परिषदा होत, तिथे सनातन धर्मपंडित व धर्मसुधारक पंडित यांच्यात वादविवाद होत. असे वादविवाद सोनगीर धर्मपरिषद् (१९२६, ब्राह्मण परिषद, अकोले (१९२७), महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणसंबंधी सनातनी व धर्मसुधारक पंडितांशी केलेली चर्चा (१९३३), हिंदू धर्म परिषद अधिवेशन, हैदराबाद (१९२७), ब्राह्मण महासंमेलन, बनारस (१९२८) धर्मनिर्णयमंडळ स्थापना, वाई (१९३५) इ. प्रसंग, सभा, संमेलनांमधून होत. त्यातून धर्मभ्रष्टता, धर्मांतर, धर्मपातकता, शुद्धी, प्रायश्चित्त इ. वर चर्चा होत राही. यात 'धर्मशुद्धी' व्यवहार (आचार, विचार) विषयकेंद्री असे. त्यावर लिहिलेला प्रबंध म्हणजे 'शुद्धिसर्वस्वम्'. शीर्षकाप्रमाणे शुद्धी विषयावर यात सर्वांगीण विचार दिसून येतो. शिवाय प्रागतिक सुधारणांचे सूचनही यात आढळते

या प्रबंधलेखनाची पूर्वपीठिका खंड-१० च्या प्रस्तावनेत यापूर्वी करण्यात आली आहे. येथे प्रस्तुत प्रबंधाच्या विषय - आशयाचा ऊहापोह करण्यात येत आहे. सनातन हिंदू धर्मातून एखादी व्यक्ती बाहेर पडली म्हणजे धर्मांतरित वा धर्मभ्रष्ट झाली तर तिचे शुद्धिकरण (पूर्वधर्मात होणे वा पातकमुक्त करणे इ.) करता येते की नाही, करता येत असेल तर कसे याबाबत तत्कालीन धर्मपंडितांमध्ये मतभेद आढळत होते. हे जे आस्तिकमूर्धन्य होते ते श्रुती, स्मृती, पुराण, ब्राह्मण ग्रंथ इ. चे अभ्यासू असूनही त्यांच्यात संभ्रम होता, ऐक्यमत नव्हते. धर्मभ्रष्टांना पुन्हा सनातन हिंदू धर्मात स्थानच नाही, अशी टोकाची भूमिका घेणारेही धर्मपंडित त्याकाळी (विसाव्या शतकाचा पूर्वार्ध) होते. अशा परिस्थितीत सुधारक धर्मपंडितांची भूमिका मात्र उदार, मानवतावादी होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशांपैकी एक होत.

त्या काळात इस्लाम, ख्रिश्चन इ. धर्मात प्रवेश करणाऱ्यांना नास्तिकतेचा दोष लागत असे. त्यांना धर्मभ्रष्ट, पापी मानत असत. या भ्रष्टता वा पापनिरासासाठी (मुक्ती) मनु, याज्ञवल्क्य यांनी 'चांद्रायण' नावाचे प्रायश्चित्त प्राचीन वाङ्मयात सांगितले आहे. त्याकाळी धर्मभ्रष्टता अनेक प्रकारांची मानली जायची- १) म्लेंच्छाबरोबर अन्न सेवन करणे, २) म्लेच्छ स्त्रियांबरोबर संबंध ठेवणे, ३) निंद्य माणसाचे अन्न सेवन करणे, ४) हीन स्त्रीचा उपभोग घेणे, ५) अयोग्य स्त्रीकडे जाणे, वयाने मोठ्या मैत्रिणीकडे जाणे, ६) गुरू सखी (पत्नी)शी संबंध ठेवणे, ७) अशांच्या संततींनाही हा दोष लागत असे. या सर्व प्रकारच्या पातकांतून प्रायश्चित्ते धर्मग्रंथात (श्रुती, स्मृती, पुराण सांगितली असली तरी त्यांचे स्वरूप 'भीक नको पण कुत्रे आवर' अशी होती.) प्रायश्चित्त घेण्यापेक्षा पातक जीवन पत्करले असे लोक मानत ही जरी सारी प्रायश्चिते सांगितली गेली आहेत, ती कठोर आहेत तशीच मवाळ वा स्वरूपाने सह्यही. याबाबतही मेधातिथी, आपस्तंब, 'उज्वला'कार, वसिष्ठ, बौधायन, अत्री

इ. ऋषि-मुनींनी वेगवेगळी सह्य-असह्य प्रायश्चिते सांगितली आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या 'शुद्धिसर्वस्वम्' प्रबंधात यातील प्रायश्चित्तांमधील सह्यांचा स्वीकार करत पातकाश्रित व पातकांसाठी पूर्वसूचित प्रायश्चितांमध्ये ५०% ते १/३ सवलत सुचविली आहेत हेतू हा की शुद्धी सह्य होऊन धर्मभ्रष्ट व धर्मांतरित पातक मुक्त होऊन त्यांना मानवी सुख व प्रतिष्ठेचे जीवन लाभावे.

या प्रबंधात अन्य धर्मात प्रवेश केल्यानंतर घ्यावयाच्या प्रायश्चित्ताचा विचार आहे. प्रकृतप्रमेयाचे निरूपण आहे. म्हणजे म्लेंच्छांबरोबर एका भांड्यात जेवण करणे, त्यांच्या कन्यांशी संबंध ठेवणे, त्यांच्याशी शय्यासोबत करणे इ. व्यवहारांतून घडणाऱ्या पातक व त्यासंबंधींच्या प्रायश्चित्त विधानांचा विचार आहे. म्लेंच्छ शब्द व्युत्पत्तीची चर्चा हा या प्रबंधांचा विशेष होय. म्लेंच्छांच्या विविध स्वरूप, प्रकारांची चर्चा आहे. प्रबंधाचा मोठा हिस्सा या चर्चेवर खर्च झालेला आहे. त्यात म्लेंच्छ कोणास समजावे, म्लेंच्छ व्यवहार प्रकार कोणते, त्यातून घडणारी पातके कोणती, कोणत्या पातकावर कुणी कुणी काय काय प्रायश्चित्ते सुचविली आहेत, त्यात उदारमतवादाने काय बदल करता येऊ शकतात, शुद्धी कशी सुकर होऊ शकते याची सविस्तर चर्चा असून तो धर्म-कर्मासंबंधीचा सुधारवादी दृष्टिकोन होय. या धर्मभ्रष्टतेचा संसर्ग इतरेजन व धर्मभ्रष्टांची अपत्ये यांवर कसा होतो, ते पूर्णपणे निर्दोष असताना अपत्यांवर पाप सनातनी कसे लादतात याचा ऊहापोह या प्रबंधात आहे. शिवाय किफायती प्रायश्चित्त वा प्रायश्चित्तात सवलत असा एक सुधारवादी विचार आहे. सदर प्रबंधात तर्कतीर्थांनी 'पतन' म्हणजे ते स्पष्ट करून पतन, पातकसंबंधी विविध ऋषींच्या मतांची चर्चा केली आहे. शिवाय संसर्ग, त्याचे नियमादीही विशद केले आहेत. स्वेच्छेने वा अनिच्छेने झालेल्या पापांचे/ पातकांचे विवेचन करून यासंबंधींच्या प्रायश्चित्तांचे विविध मार्ग यात वर्णिले आहेत. पतितांच्या संततीस लागणाऱ्या पातकांची व त्यांस घ्याव्या लागणाऱ्या प्रायश्चित्तांचे सविस्तर विवेचन तर्कतीर्थांनी प्रस्तुत प्रबंधात केले आहेत. पालक व शुद्धी प्रमाण चर्चा या प्रबंधाचा अविभाज्य भाग आहे. व्रात्यांच्या शुद्धीचा विचार, म्लेंच्छांचे अधिकार, अन्त्यजांचा अस्पृश्यदोष या बाबींचा विचारही हा प्रबंध करतो. म्हणून तो शुद्धीसर्वस्वम् (समग्र | श्रेष्ठ) होय. प्राचीन काळातील धर्मपातक व प्रायश्चित्ते यांवर विचार करणारा हा प्रबंध धर्मसुधारणेचा मार्ग सुचवतो.

२) भारतीयधर्मेतिहासतत्त्वम् (१९३३)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वेद वाङ्मय, हिंदू धर्म, वैदिक संस्कृती इ. विषयांबरोबर 'इतिहास लेखन पद्धती : परंपरा व स्वरूप' विषयाचे ज्ञाते होते, हे त्यांच्या दोन प्रबंधांवरून स्पष्ट होते. सन १९३३ साली लिहिलेला संस्कृत प्रबंध 'भारतीयधर्मेतिहासतत्वम्' हा तर्कतीर्थांनी बडोद्याच्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनात वाचला होता. (त्याचा स्थळ, काळ, संदर्भ अनुपलब्ध). पण निबंध प्रकाशनाचा काळ अनेक संदर्भ सूत्रात (सन १९३३)

आढळतो. यात भारतीय इतिहासलेखन हे इंग्रजी इतिहास लेखनावर, त्यांच्या युगनिर्धारण पद्धतीवर आधारलेले असल्याने त्यात अनेक उणिवा दिसून येतात. शिवाय भारतीय इतिहासकारांमध्ये युग निर्धारणसंबंधी काल, प्रसंग, घटना, चरित्रे इ. बाबत विविधता आढळत असल्याने युग कालनिर्धारण विसंगती आढळते, याकडे तर्कतीर्थांनी लक्ष वेधले आहे. या प्रबंधाचा संबंध प्रामुख्याने धर्म इतिहास लेखनाशी आहे, हे शीर्षक व विषय विवेचनातून स्पष्ट होते.

असाच विचार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राजकीय इतिहास लेखनासंबंधी व्यक्त केला आहे.[१] भारतीय संस्कृती काळाचे अनेक आघात सोसूनही नामशेष न होता जिवंत आहे. तिचा आधार धर्म आहे. तो पारलौकिक नसून कर्माधारित आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांवर हिंदू धर्म व संस्कृती उभी आहे. इथल्या धर्मसंकल्पनेत वर्ण व आश्रम यांचे आचार, व्यवहार, प्रायश्चिते, देवोपासना मार्ग, व्रते, पूजाप्रकार, कुळाचार व कुलधर्म, दान-दंड व्यवस्था सर्व आहे. ते सर्व धर्म नि संस्कृती निधान, वेद, उपनिषद, श्रुती, स्मृती, पुराणे, ब्राह्मण ग्रंथ, अरण्यके इत्यादींवर आधारित आहे. याबाबत मेधातिथी, विश्वरूप, विज्ञानेश्वर इत्यादींनी वेळोवेळी लिहिलेले आहे. भारतीय धर्म इतिहास लेखनाच्या दोन पद्धती दिसून येतात- १) मीमांसा पद्धत, २) इतिहास पद्धत. मीमांसा पद्धतीचा वापर विश्वरूप, भारुची, मेधातिथी, विज्ञानेश्वर इ. करतात, तर ऐतिहासिक पद्धतीचा वापर पाश्चात्त्य विद्याविभूषित विद्वान पां.वा. काणे, डॉ. के. ल. दप्तरी यांच्यासारखे विद्वान करताना दिसतात. परंतु तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या प्रबंधात केवळ प्राचीन इतिहासकारांच्या मर्यादेतच आपल्या मीमांसा पद्धत व इतिहास पद्धत विवेचना आणि त्यांचा तुलनात्मक अभ्यास ठेवला आहे. आधुनिक इतिहासकारांच्या बुद्धिवादी विवेचन व निरूपणाकडे ते येत नाहीत. पूर्वाचार्यांच्या परिघातच त्यांनी आपला प्रबंध निरूपित केला आहे. देश, काल, स्थान, पद्धतीच वैचित्र्यामुळे भारताच्या धार्मिक इतिहासलेखनात ऐक्यमताचा अभाव असल्याचे निरीक्षण तर्कतीर्थांनी 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्' या प्रबंधात नोंदवले आहे.

या मतभेदामुळे सामान्य वाचकाचे मन दोलायमान होते. मतभिन्नतेची सप्रमाण, सोदाहरण चर्चा या निबंधाचा विशेष आहे. ही विसंगती टाळणे शक्य आहे का या विचार नि विवंचनेत या प्रबंधाचे लेखन झाले आहे. कर्मयोग सांगणारी 'उपनिषदे' आणि कर्मसंन्यासाचे प्रतिपादन करणारी 'बृहदारण्यकश्रुति' यांचा ताळमेळ कसा बसवायचा? सृष्टी निर्मितीची तीन तत्त्वे (तेज, आप, अन्न) 'छांदोग्यउपनिषद' आणि पाच भौतिकत्व (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) सांगणारे 'तैत्तिरीयउपनिषद'- यांच्यात समन्वय कुठून येणार? मीमांसक समन्वयवादी लेखक आहेत, तर ऐतिहासिक पद्धतीचे लेखक विरोधक आहेत. सर्व भारतीय धर्मेतिहास समन्वयवादी आहे; पण तो ऐतिहासिक पद्धतीच्या कसोटीवर (वस्तुनिष्ठता) उतरत नाही. याबाबतच्या अनंत जिज्ञासा, उदाहरणांनी हा प्रबंध भरलेला आहे. यात एकवाक्यता

आणण्याचे उपाय तर्कतीर्थ सुचवतात. जसे की संप्रदाय विभिन्नतेत एकता शोधणे हा एक पर्याय होय. सौर, शाक्त, पाशुपत, पांचरात्र, वैष्णव, शैवागम हे सर्व संप्रदाय परस्परांचे पक्के विरोधक खरे; पण त्यांना ग्रंथकार एक मानतात. असे काही करता येईल का? अशा सद्हेतूने झालेले हे लेखन होय. उपसंहार करत तर्कतीर्थ म्हणतात, "सगळ्या जगाला व्याकुळ करून टाकणारी मतभिन्नता ही वस्तुस्थिती योग्य नव्हे. मूळ तत्त्व लक्षात घेऊन वरवर दिसणारे, बाह्य उपाधींमुळे आलेले वैचित्र्य, भिन्नता लक्षात घेऊनच धर्मनिष्ठांनी प्राचीनांचा सनातन समन्वय अनुसरायला हवा."[२] हे सारे जरी खरे असले तरी वैज्ञानिक निकष, तर्क, बुद्धी यांच्या कसोटीवर हे सारे खरे उतरणे महत्वाचं नाही का?

३) अस्पृश्यत्व-मीमांसा (१९३४)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'अस्पृश्यत्वमीमांसा' शीर्षकाचा संस्कृत प्रबंध लिहिला असून तो औंध संस्थान (जि. सांगली) चे अधिपती भवानराव श्रीनिवासरान ऊर्फ बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधी यांच्या संस्थानाधिपती कारकीर्दीस २५ वर्षे पूर्ण झाल्याप्रीत्यर्थ (४ नोव्हेंबर, १९०९ ते ३ नोव्हेंबर १९३४) प्रकाशित 'श्री भवानराव गौरव ग्रंथ' (१५ नोव्हेंबर १९३४) मध्ये तो प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथास सदर गौरव ग्रंथ मंडळाचे अध्यक्ष ना. गो. चापेकर यांची प्रस्तावना असून तो सर्वश्री प्रो.रा.र रानडे (अलाहाबाद विद्यापीठ), अनंत पटवर्धन (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी), पंडित श्री. द. सातवळेकर, शं.वा. किर्लोस्कर यांनी संपादित केला आहे.

या प्रबंधात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अस्पृश्यत्व मानल्या गेलेल्या समाजात व काळात तत्कालीन पुरोहित वर्गाने वर्णवर्चस्व अबाधित राखण्यासाठी प्राचीन वाङ्मयात (वेद, श्रुती, स्मृती, पुराण, अरण्यक, ब्राह्मण ग्रंथ इ.) उपलब्ध अस्पृश्यता न पाळणे, ज्यांना चांडाळ म्हणून तत्कालीन समाजाने अस्पृश्य ठेवले ते तत्कालीन धर्मग्रंथातील उपलब्ध प्रमाणांविरुद्ध कसे होते हे सप्रमाण दाखवून दिले आहे. या प्रबंध लेखनामागची पार्श्वभूमी प्रबंध लेखनातील संदर्भ नि आशय जाणून घेण्याइतकीच महत्त्वाची आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय राजकारणास सन १९३० च्या कायदेभंग आंदोलनामुळे गती आली. ब्रिटिश सरकारने स्थानिक राज्यकारभारात भारतीयांना सहभागी करून घेण्याच्या धोरणानुसार ज्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या होत्या, त्यातील मतदारसंघ रचना व मतदार हक्क यावरून महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. महात्मा गांधी या प्रश्नाकडे सामाजिक दृष्टीने पाहत होते, तर दलितांचे हक्क हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय प्रश्न मानत. त्यांची अशी धारणा होती, की भारतीय राजकारणात दलितांचे हक्क त्यांचे प्रतिनिधी जितक्या तीव्रपणे मांडतील तितके अन्य नाही. म्हणून त्यांच्यासाठी राखीव मतदारसंघ असावेत, जेणे करून त्यांचे प्रतिनिधी

विधिमंडळ व लोकसभेत जाऊ शकतील. या प्रश्नी विरोध करत महात्मा गांधींनी आमरण उपोषण आरंभले होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेत ब्रिटिश सरकारने अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र मतदारसंघांना मान्यता दिली होती. महात्मा गांधींनी या निर्णयास विरोध करत प्राणाची बाजी लावली होती. महात्मा गांधींची प्रकृती अस्वस्थ झाल्याने बहुसंख्य देश चिंतित होते. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये 'पुणे करार' (२४ सप्टेंबर १९३२) होऊन प्रश्न संपला खरा, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या हक्क नि प्रश्नांबाबत जी राजकीय व सामाजिक जागृती घडवून आणली, तिच्यामुळे महात्मा गांधीही अंतर्मुख झाले व अस्पृश्यता निवारण ही काळाची गरज असल्याचे त्यांना मनोमन पटले होते; पण त्यांच्या सनातनी मनास यास हिंदू धर्मग्रंथांमध्ये काही प्रमाण मिळते का ते पाहायचे होते. म्हणून त्यांनी हिंदू सनातन व सुधारक धर्म पंडितांशी येरवडा कारागृहात चर्चा, विचार-विमर्श सुरू केला. याबाबतचा सविस्तर वृत्तांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतील एक पर्व : येरवड्यातील धर्मपरिषद'[३] शीर्षक लेखात लिहिला आहे. शिवाय डिसेंबर १९३२ मध्ये सनातनी आणि सुधारक अशा सुमारे १०० धर्मशास्त्री, पंडित इ. शी महात्मा गांधी यांनी साधकबाधक चर्चा करून अस्पृश्यता निवारणास धर्मशास्त्र व धर्मग्रंथात काय काय आधार आहेत, हे समजावून घेतल्याच्या नोंदी या महात्मा गांधी जीवनविशद दैनंदिनीमध्ये आढळतात.[४] स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक, चिंतामणराव वैद्य, विद्वद्रत्न डॉ. के. ल.दप्तरी, भगवानदास, आनंदशंकर ध्रुव, इंदिरारमणशास्त्री, पी.एच.पुरंदरे, महामहोपाध्याय प्रमथनाथ तर्कभूषण, श्रीकृष्ण तन्सुख मिश्र, श्री. नरसिंहाचार प्रभृती सुधारक धर्मपंडितांनी महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारण, हरिजन मंदिर प्रवेश इ. संबंधी धर्मशास्त्रीय आधार उपलब्ध करून दिले. त्या आधारे महात्मा गांधींनी वरील मान्यवरांचे एक प्रातिनिधिक 'अस्पृश्यता निवारण निवेदन' आपल्या 'हरिजन'या इंग्रजी साप्ताहिकाच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध केले होते.[५] त्यात तीन प्रकारची अस्पृश्यता नमूद करून स्पष्ट करण्यात आले होते की, "Thus it is that rights common to the four varnas, e.g. of entry into temples, educational institutions, of use of public wells, ghats, tanks, rivers and should equally secure to the untouchables so called; and it is wrong to deprive of such common rights. This is provable from texts, fundamental principles and the spirit of Dharma Shastra."

वरील निवेदनातील धर्मशास्त्र प्रमाण चर्चा म्हणजे 'अस्पृश्यत्वमीमांसा' होय. उपरोक्त निवेदनात आणि चर्चित प्रबंधातून हे स्पष्ट होते की, हिंदू धर्मशास्त्रानुसार तीन प्रकारचे अस्पृश्य वर्णिले गेले आहेत -

१) शूद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्यापासून जन्मलेली संतती जन्मतःच अस्पृश्य समजली जाते.

२) पंचमहापातके (ब्रह्महत्या, मद्यपान, चोरी, गुरुपत्नीशी व्यभिचार व अशी पापे) करणाऱ्यांशी संबंध करणारे किंवा शास्त्रनिषिद्ध कृत्य करणारे.

३) अशुद्ध दशेत राहणारे.

आज ज्यांना अस्पृश्य मानले जाते त्यांच्या संबंधाने वरीलपैकी क्र. १ ची स्थिती वर्तमानात दिसून येत नाही. तसे सांगायला आज कोणताही आधार वा प्रमाण वर्तमानात नाही. म्हणून प्रथम क्रमांकात निर्दिष्ट अस्पृश्यांवरील बहिष्कार वा निषेधाचे नियम सध्याच्या कोणत्याही अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींवर लागू होऊ शकत नाहीत. पहिल्या श्रेणीतील अस्पृश्य कोणत्याही संप्रदायात गेले म्हणून अस्पृश्य मानले गेले तरी त्यांची शुद्धी, मुक्ती होऊ शकते व ते चातुर्वर्ण्यातील लोकांप्रमाणे सर्व हक्क, अधिकार भोगण्यास पात्र आहेत.

दुसऱ्या प्रकारची अस्पृश्यताही आज कोणत्याही जाती ना वर्णाला लागू होऊ शकत नाही असे दोष प्रत्येक जातीतील व वर्णातील लोकांत दिसतात. आजच्या अस्पृश्यांची अस्पृश्यता अशांतून आलेली नाही. त्यामुळे त्यांना पतितांची संतती मानता येणार नाही. शिवाय सर्व प्रकारच्या पातकांना शुद्धीची प्रायश्चित्ते धर्मशास्त्रात वा धर्मग्रंथांत विपुल आहेत.

तिसऱ्या प्रकारचे अस्पृश्य म्हणजे अस्वच्छ राहणारे लोक सर्व जाती वा वर्णात असू शकतात.

म्हणून आज, वरीलपैकी कोणत्याही निकषावर कोणासही अस्पृश्य मानता येणार नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या 'अस्पृश्यत्वमीमांसा' प्रबंधात या विषयीची सप्रमाण मीमांसा केली आहे. ती मुळातूनच वाचली की हे सर्व स्पष्ट होईल.

* संस्कृत चरित्र

४) श्री केवलानंदयतेश्चरित्रसारः (१९६०)

हे संस्कृत संक्षिप्त चरित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिले असून ते 'श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक-मंदिर का समारोह : पुण्यस्मरण पुस्तिका' या शीर्षकाने १३ डिसेंबर १९६० मध्ये प्रसिद्ध झाले आहे. इथे त्याचे मराठी भाषांतरही देण्यात आले आहे. प्रा. डॉ. सौ. आशाताई रवींद्र गुर्जर, पुणे यांनी केले आहे. या चरित्रानुसार गुरू केवलानंद स्वामी यांचा जन्म ८ डिसेंबर १८७७ रोजी कुलाबा जिल्ह्यातील सुडकोली गावी झाला (शके १७९९, मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थी). प्राथमिक शिक्षण घरीच झाले. नंतर सद्गुरू परमहंस प्रज्ञानंद स्वामींना त्यांनी आपले गुरू म्हणून स्वीकारले. स्वामी केवलानंद यांनी गुरूंना समर्पित प्राज्ञपाठशाळा, वाईसाठी जीवन बेचले. नंतर संन्यास ग्रहण केला (१९३१).

त्यांनी 'धर्मकोश' आणि 'मीमांसाकोश' (सात खंड) रचले. अन्यही विपुल लेखन केले. धर्म शिक्षणसंबंधी त्यांचा दृष्टिकोन सुधारवादी आणि आधुनिक होता. त्यांनी धर्मसुधारणेकरिता 'धर्मनिर्णय मंडळ' सन १९३४ मध्ये स्थापन केले होते. त्यांनी अन्यही विपुल संस्कृत लेखन केले आहे. १ मार्च १९५५ रोजी त्यांचे वृद्धापकाळामुळे निधन झाले. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे चरित्र धर्मपरायण होते.

* संस्कृत लेखनाची मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित उपरोक्त संस्कृत, प्रबंध प्रस्तावना व चरित्र लेखन हा तत्कालीन सामाजिक, धार्मिक नि राष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात घेतलेली पुरोगामी भूमिका व कृतिशील सहभाग होय. विसाव्या शतकाच्या प्रारंभिक काळात समाजमनावर धार्मिक भावना, ग्रंथ, परंपरांचा मोठा प्रभाव होता. लोकांची मने रूढीग्रस्त होती. त्यांना धक्के देणे, मनोदशा बदलणे, त्यांना सुधारणावादी दृष्टिकोन अंगीकारायला प्रवृत्त करणे हे प्रवाहाविरुद्ध पोहणेच होते. ते धाडस या लेखन व प्रबोधनातून तर्कतीर्थांनी दाखवले. ज्यांनी धर्मांतर केले होते अशांना मूळ हिंदू धर्मात आणण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती यांनी तर त्या काळी शुद्धी मोहीमच हाती घेतली होती. धर्मांतरित मुसलमान न ख्रिश्चनांना मूळ सनातन वैदिक धर्मात परत आणण्याचा हा प्रयत्न होता. याला केवळ धार्मिक चळवळ न म्हणता समाज शिक्षण व मानवी प्रयत्न म्हणायला हवेत. धर्मांतरामागील तत्कालीन कारणे, गरिबी, अज्ञान, दारिद्र्य, दुर्बलता, जबरदस्ती, मजबुरी अशी अनेक असत. त्या कारणांचे निराकरण करून धर्म शुद्धीकरण ही मानवतावादी कृतीच म्हणायला हवी अशी ती परिस्थिती होती. हे कार्य परत परंपरेच्या चौकटीत म्हणजे प्रायश्चित्त इ. द्वारे व्हायचे. अशा वेळी प्राचीन धर्मग्रंथांतील ऋचा, श्लोक, मंत्रे इ. चा पारदर्शी अर्थ व संदर्भाद्वारे समाजापुढे आपल्या लेखनातून मांडणे हे प्रबोधनच होते. ते 'शुद्धिसर्वस्वम्' सारख्या प्रबंधातून तर्कतीर्थांनी केलेले दिसून येते.

'अस्पृश्यता व तिचे मूळ' शीर्षकाचा एक प्रबंध अलीकडे डॉ. तु. वि. गेडाम यांनी लिहिला असून त्यास सुविख्यात विचारक सुरेश द्वादशीवार यांनी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रबंधातून स्पष्ट होते की, वेदकाळात (श्रुति) अस्पृश्यता नव्हती. मध्ययुगात तिचा प्रभाव वाढला. अस्पृश्यतेचे मूळ शोधण्याचा प्रयत्न महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पण केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व लेखनही आपणासमोर आहे. पण मुळात ज्या अज्ञानातून अस्पृश्यता पसरवली गेली व स्थिर केली, तिचे निराकरण मूळ संस्कृत साहित्यातील स्वयंस्पष्ट ऋचा, श्लोकादिकातून करण्याचे कार्य या 'अस्पृश्यत्वमीमांसा' सारख्या प्रबंधातून झाले आहे, हे लक्षात घ्यायला हवे. या संदर्भात सुरेश द्वादशीवार चर्चित ग्रंथाच्या प्रस्तावनेत स्पष्ट करतात की, "अस्पृश्यतेचा आरंभ दृढीकरण धर्मसूत्रांच्या काळातले आहे. ही सूत्रे दैवी वा ऋषींनी रचलेली नसून सामान्य पुरुषांनी लिहिलेली आहेत."[७] पण तर्कतीर्थ आपल्या

प्रबंधातून मनु, अत्रि, अगस्त्य, हेमाद्रि, विश्वेश्वर, याज्ञवल्क्य, सायण इत्यादींच्या रचनांमधून तसेच 'मनुस्मृती', 'स्कंदपुराणे', 'भागवत', 'देवीपुराणे', 'निर्णयसिंधु', 'पद्मपुराण', 'शिवपुराण' इत्यादींचा हवाला देऊन अस्पृश्य ठरविल्या गेलेल्या वर्णालाही धर्माधिकार कसे होते ते दाखवतात व त्याआधारे अस्पृश्यता स्थिर करण्याचा धर्मापराध पूर्वकाळात मतलबापोटी झाला हेही सिद्ध करतात.

'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम' द्वारे इतिहासलेखनाचे आधार तपासत इष्ट काय नि अनिष्ट काय याचा शोध घेत वस्तुनिष्ठ इतिहास लेखनपद्धती अधोरेखित करतात. भारताच्या सार्थ इतिहासाचे स्वरूप डॉ. सुमंत मुरंजन यांनी आपल्या 'पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास' मध्ये केले आहे. ते म्हणतात, "भारताचा ज्ञात इतिहास वर्गकलह, धर्मकलह व राष्ट्रकलह अशा तीन स्वरूपाच्या कलहांनी शापित आहे.. त्यांचा प्रतिकार करण्यास भारतीय जनतेकडे सार्वत्रिक असा धर्माभिमान वा राष्ट्राभिमान दोन्हीही नव्हते."[८] या विधानात भारतीय सामाजिक, ऐतिहासिक प्रश्नांचे मूळ दिसून येते. प्रश्न अस्पृश्यतेचा असो वा इतिहासलेखनाचा, आपण भारतीयांनी परंपरामुक्त होऊन बुद्धिवादाने आणि विवेकाने आपल्या प्रश्न - समस्यांकडे पाहिले नाही. 'बाबा वाक्यं प्रमाणम्' मधील स्थितिशीलता ही भारतीय समाजाची खरी समस्या असल्याने आपण गतिशील होऊ शकलो नाही. उपरोक्त दोन्ही प्रबंध याचेच सूचन होय. स्वतंत्र विचारांचा अभाव हे आपल्या 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' वृतीचे रहस्य होय. 'कायदा पाळा गतीचा, थांबला तो संपला' चा मथितार्थ हा आमचा कर्मयोग होऊ न शकल्याने आम्ही पुरोहितशाही, सामंतशाही, राजेशाहीमध्ये अडकून नाही, तर रममाण झालो. गुलामीची जाणीव करून दिली नाही हे जितके खरे तितकेच स्वतःच्या विचाराने वागण्याच्या संस्काराचा सामाजिक अभाव हेही या साऱ्या अनर्थाचे मूळ होते हे लक्षात घेतले पाहिजे.

ब) मराठी प्रबंध व चरित्रे

१) आनंदमीमांसा (१९२८)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रथम दीर्घ लेखन म्हणून 'आनंदमीमांसा' या मराठी प्रबंधाचे असाधारण महत्त्व आहे. हा निबंध 'प्राज्ञपाठशाळा पुस्तकमाला' मध्ये सहावे पुष्प म्हणून सन १९२८ मध्ये प्रसिद्ध झाला होता. प्रपंचविषयक दुःखवाद आणि आनंदवाद यांचे ऐतिहासिक व तात्त्विक विवेचन यात आहे, हे प्रबंधाच्या उपशीर्षकातून प्रारंभीच स्पष्ट करण्यात आले आहे. साहित्य सृजनारंभ वा साहित्य सृजनाची गंगोत्री म्हणून या प्रबंधाकडे पाहावे लागेल. हा प्रबंध तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्या चरणी 'आचार्य देवो भव' म्हणत समर्पित करून त्यांच्या तप नि स्वाध्याय निरततेचा गौरव केला आहे. सुमारे ७० पृष्ठांचा या प्रबंधात आनंदाचे महत्त्व विशद करत

म्हटले आहे की, या जगात सर्वव्यापी आनंद नसता तर विश्व नुसते श्वसन करत राहिले असते. श्वासोच्छवास वा चयापचय यांच्या पलीकडे सृष्टीस सार्थकता लाभते ती हर्ष, शोक, विस्मय, ग्लानी, घृणा, लज्जा इ. भावांमुळे! यातून मिळणाऱ्या ज्ञानामुळे.

या प्रबंधात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्पष्ट केले आहे की, तत्त्वज्ञान हे ज्ञानसंपादनाचे फलित होय, तत्त्वज्ञानाचा संबंध इतिहास, सामाजिक विकासाशी असतो. यांचा परस्पर संबंध जसा असतो तसे ते परस्परांना प्रभावी व परिवर्तितही करत असतात. जगात विविध शास्त्रे असून त्यांचे नियम, सिद्धांत आहेत. त्यांच्या साकल्याने विचार करण्यातून तत्त्वज्ञान जन्मते. तत्त्वज्ञान सुखवादी असते, तसेच दुःखवादी असते. ते प्रवर्तक असते नि निवर्तकही. प्रवर्तक तत्त्वज्ञान सर्जक तर निवर्तक मारक असते. भारतीय साहित्य, संस्कृतीत दोन्ही प्रकारची दर्शने वा तत्त्वज्ञाने आढळतात. या तत्त्वज्ञान सिद्धांतांच्या परीक्षणाच्या तीन रीती आहेत - १) प्रमाणरीती, २) मानसिक रीती, ३) नैतिक रीती. या रीतीमधून वेगवेगळ्या उपपत्ती तयार झाल्या असून त्यातून विविध वाद (विकासवाद अज्ञेयवाद इ.) निर्माण झालेत. आनंदवाद त्यापैकी एक असून त्याची मीमांसा वरीलपैकी दुसऱ्या व तिसऱ्या रीतीने यात करण्यात आली आहे.

सृष्टीतील प्रत्येक विचार हा शरीर, समाज, जीवसृष्टी व विश्वातून तयार होतो. वेद विचार तसाच आर्ष (ऋषी) प्रतिभेतून तयार झालेला आहे. वेदवाङ्मय, वेदान्त (उपनिषद्) इ., विश्वविचार आहे. म्हणजे प्राण, ज्योती, सत्, चित, आनंद आदी विचार वेदांत आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या 'आनंदमीमांसा' प्रबंधात या सर्व तत्त्वांची विस्तृत विवेचना केली आहे. आनंदसिद्धांचे मूळ वेदवाङ्मयात आहे. संस्कृत भाषेत दर्शनावर अनेक ग्रंथ सापडतात. पैकी सांख्य दर्शनात दुःखवाद आहे. न्यायदर्शनात मोक्षशास्त्राचे जे १२ विचारणीय विषय आहेत, त्यात दुःख एक आहे. न्यायदर्शनाप्रमाणे वैशेषिक दर्शनात मात्र दुःखवाद नाही योगदर्शनात दुःखवाद आहे. शंकराचार्य बुद्धमतानुवादी असून ते दुःख समर्थक होत. मध्वरामानुजवादी ब्रह्ममीमांसेचे जे भाष्यकार आहेत, ते प्रपंच दुःखमय असल्याचे सांगतात. बौद्धदर्शनातही दुःखवाद आढळतो. त्यात 'दुःखं दुःखं, स्वलक्षणं स्वलक्षणं, क्षणिकं क्षणिकं, शून्यं शून्यं' ही चतुःसूत्री दुःखवादाचे स्पष्ट समर्थन करणारी ठरते. आर्यसत्ये तेच सांगतात. बुद्धोत्तरकालीन बहुतेक भारतीय वाङ्मय दुःखवादाने भरलेले व भारलेले दिसून येते. ऐहिक दुःखवादाचा पुरस्कार जैन दर्शनात आहे, तसा तो संतवाङ्मयातहि प्रतिबिंबित आहे. संत नामदेव, संत तुकाराम यांच्या अभंगांत तो दिसतो. 'सुख पाहता जवापाडे ॥ दुःख पर्वताएवढे॥' सारख्या ओळीतून ते स्पष्ट होते. सांख्यांच्या दुःखवादाचा प्रभाव 'महाभारत' वर झालेला आहे, असे तर्कतीर्थ या प्रबंधात संप्रमाण दाखवून देतात. आपल्या या प्रबंधात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दुःखमीमांसा ही भारतीय वाङ्मयात कशी मांडली आहे व का मांडली आहे, याचे विवेचन स्थालीपुलाकन्यायाने म्हणजे शितावरून

भाताची परीक्षा करत थोडक्यात विशद केली आहे. ही मीमांसा आनंदमीमांसेची पूर्वपीठिका होय. ती लक्षात घेतल्याशिवाय आनंदमीमांसा महात्म्य समजणार नाही अशी प्रबंधकारांची भूमिका असल्याचे लक्षात येते. सुख-दुःख, हर्ष-शोक इ. भावना प्रपंचाचा अविभाज्य भाग आहे, पण सकारात्मकता येते ती विधायक, आशादायी विचारांतूनच.

आनंदमीमांसेचे उगमस्थान वेदान्तात अर्थात् उपनिषदात आहे. संहिताग्रंथात तसेच ब्राह्मणग्रंथात आनंदमय परब्रह्माची चर्चा आहे. ऐहिक व्यवहार, शरीर, कुटुंब व समाजही शुद्ध, बलशाली व आनंदमय व्हावी याकरिता वेदवेदांत ऋषी प्रत्नशील दिसतात. वैदिक ऋषित जयिष्णु समाजाच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित आहेत. वैदिक वाङ्मयात आनंदाची कारंजी आहेत. ती आनंदमीमांसेच्या पीठिका होय. शरीर हे लाळ, थुंकी, मळ यांचे घर अशी कल्पना वेदान्तात दिसत नाही. छांदोग्य उपनिषदात सत्य व सुखाची उपासना वर्णिली आहे. त्याची अनेक उदाहरणे तर्कतीर्थांनी या प्रबंधात उद्धृत केली आहेत. शिवसंकल्पसूत्रातूनही ते स्पष्ट केले आहे. सत्य श्रद्धा सकारात्मक होय हे ते स्पष्ट करतात षड्रीपुंना जिंकून मनुष्य सुखी व आनंदी होतो. वैदिक आर्य संस्कृतीत जो गृहस्थाश्रम वर्णिला आहे, तो आनंदनिधान आहे. वैदिक धर्माचा तो मुख्य आधार होय. गौतमधर्मसूत्रात गृहस्थाश्रम हाच मुख्य आश्रम आहे असे मांडलेले आहे. वैदिक आर्यांच्या समाजविषयक संकल्पनेत आनंदधारणा महत्त्वाची मानली आहे. संस्कृती स्थापनेच्या आणि समाजस्थापनेच्या काळात ऐहिक सुखे आणि प्रपंच त्याज्य अशी भावना बुद्धिमान व कर्तृत्वशाली लोकांत रूढ झाली असती तर निर्मिती अशक्य होती. आक्रमणशील व महत्त्वाकांक्षी लोकच विजयी वसाहती स्थापन करतात गतिशील समाजाचेच हे लक्षण होय. सुखवाद गतिशील समाजातच असतो. तिथेच तो रूढ होऊ शकतो.

यजुर्वेदातील पुरुषमेध जो पुरुषसूक्ताचा अभिप्राय म्हणून पाहता येतो, त्यात ज्ञानविषयक, व्यापारविषयक, राजकारणविषयक, औद्योगिक कलाविषयक, नाट्यादिकलाविषयक प्रयत्न करणाऱ्या सर्व समाजातील जाती सवितृदेवतेस अर्पण करणे हे पुरुषमेधाचे खरे रूप होय. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र तेजस्वी व्हावे व त्यांच्या तेजाने माझे तेज वाढावे ही शुक्ल यजुर्वेदातील अपेक्षा म्हणजे सर्वात्मभाव नाही का? ज्या समाजात कोणत्याही व्यक्तीची उपासमार होत नाही तोच पुण्यलोक होय असे मानणारे हे वाङ्मय आधुनिक समाजवादी विचारांचे मूळ नव्हे का? 'आनंदमीमांसा' प्रबंधात कर्तव्याचरणाचे महत्त्व आहे. त्यामुळे हा विचार कर्मयोगाकडे नेणारा ठरतो.

वैदिक आर्यांच्या देव आणि धर्मविषयक विचारातही आनंदासिद्धांत आहे. इथे 'धर्म' शब्द 'उपासना कर्म' या अर्थाने वापरण्यात आला आहे. सुप्रजा, सुपुत्र समृद्धीसाठी गृहस्थाश्रमी आर्य प्रयत्नशील होते. अग्निहोत्र इ. नित्यापासनेच्या प्रार्थनेत सामर्थ्य निवेदन विनीत असे. वेगवेगळ्या इप्सितांसाठी वेगवेगळ्या देव-देवतांची पूजा-अर्चना विधान

प्राचीन वाङ्मयात दिसून येते. सोमाने राज्य, वरुणाने साम्राज्य, सूर्याने क्षात्र तेज, इंद्राने बल, बृहस्पतीने ज्ञान व शील, सवित्याने पोषणसामर्थ्य व त्वष्ट्याने सौंदर्य निर्माण करण्याची शक्ती घेतल्याचे निर्देशित करून त्या त्या फलांसाठी त्या त्या देव-देवतांची आराधना, उपासना प्रार्थना करावी असे निर्देश प्राचीन ग्रंथात आहेत. अनेकदेववाद आणि एकदेववाद यांच्यातील झगड्यास वैदिक वाङ्मयात वाव नाही.

उपनिषद् अर्थात् वेदान्तात आनंदमीमांसेचे स्वरूप लक्षात येते. वैदिक विचार हेच आनंदमीमांसेचे उगमस्थान होय. तैतरीय उपनिषदात प्राणिमात्राचे जीवन आनंदावर चालले असा सिद्धांत आहे. याच्या दोन बाजू आहेत. एक तात्त्विक तर दुसरी व्यावहारिक कोS ह्येवान्यात्क: प्राण्याद्यदेप आकाश आनन्दो न स्यात्' अर्थात आनंद नसता तर कोणाचेच जीवन चालले नसते हा एक विचार. सुखसंपादन कराण्याचा प्रयत्नही जीवाला आनंद देत असतो. जगात साध्य आणि साधन दोहोंनी मनुष्य, कलाकार, संशोधक, साधक, मूर्तिकार, शेतकरी, योद्धा इ. सर्व क्षेत्रांतील लोकांना आनंद लाभ होत असतो. जितके कष्टसाध्य यश तितका आनंद मोठा. मोक्षाकडे डोळे लावून बसणाऱ्यांना इहलोक स्मशान वाटले तर त्यात आश्चर्य काय? इहलोकी नंदनवन, ब्रह्मानंद शोधू लागाल तर 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोही कडे' अशी स्थिती होऊन जाते. नीती प्रवृत्तीमय असल्याने तीपासून दु:ख नाही, सुख, आनंदच लाभत असतो.

दु:खवादाने हिंदुस्थानाची गेल्या दोन हजार वर्षांत अनास्थाच झाली. परमार्थ, मोक्ष हे दु:खाकडे नेतात, इहलोकी जीवन आनंदमय असते. बौद्ध, जैन, संन्यासी, साधू, संत इ.नी दु:खवाद जोपासला. सुखवादाने समाज जयुष्णू होतो हे त्यांच्या लक्षातच आले नाही. रसनिष्पत्ती आनंदमय असते.

सर्व आनंद एकरूप असू शकतो. मत्सररहित, स्पर्धारहित, प्रयत्नशील, पराक्रमी, ज्ञानी लोकांच्या समाजातच सुख नि आनंदाचा निवास असतो. बृहदारण्यकोपनिषदात रस प्रेम मीमांसा आहे. ती प्रेमविद्या, मधुविद्या, आनंदविद्याच होय. आत्मानंद व इतर आनंदातील एकरूपता सिद्ध होते. ऐहिक आनंद हा परमानंद विरोधी नाही, हे इथे लक्षात घेतले पाहिजे. तैतरीय उपनिषदातही आनंदविद्येचा महिमा सांगितला गेला आहे. भगवद्गीतेतील सुखवाद जो सात्त्विक गुणयुक्त आहे, तोही आनंदच होय. सुखात्मक सत्परिणाम ही जी सत्कर्माची कसोटी वर्णिली गेली आहे, ती समाजास विधायक (रचनात्मक) आनंदाकडे नेणारी आहे. शुद्धबुद्धीचेही असेच आहे. ती पण सत्कर्म कसोटीच होय. शांती व सुखाने घडून येणारा लोकसंग्रह लाभकारी ठरतो, ते सकारात्मकतेमुळेच. सुखमीमांसा हा सनातन धर्माचा पाया म्हणून पाहता येतो. 'सुखं वाञ्छन्ति सर्वे हि तच्च धर्मसमुद्भवम् | तस्माद् धर्म: सदा कार्य: सर्ववर्णै: प्रयत्नत:||' धर्मावलंब सुखासाठी असतो. हे या श्लोकातून स्वयंस्पष्ट होते. अर्थप्राप्ती व कामनापूर्ती करणारा धर्म आचरला की सुख प्राप्ती होते, ही शिकवण आनंदमीमांसा होय.

सुखवादास सर्व प्रवृत्तींचा आधार मानले गेले आहे. व्यक्ती वा समाजाच्या ऐहिक सुखाशी धर्मशास्त्र सुसंबद्ध नसेल तर धर्माचा कार्यभाग संपला असेच मानले गेले पाहिजे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की सनातन धर्मशास्त्र हे मूलतः व्यक्ती व समाज सुखासाठी निर्माण झाले आहे. सनातन धर्मशास्त्र हे समाज उत्कर्षशास्त्र होय. सनातन धर्माचा उदय वैदिक वाङ्मयात आहे. त्याचा विकास वैदिककालीन आर्यांनी केला आहे. वैदिक आर्य आनंदवादी होते. धर्मशास्त्राच्या मुळाशी एकान्तिक दुःखवाद नव्हता, तर धृत्युत्साहसमन्वित असा आनंद वादच होता. मूळ आनंदी धर्मशास्त्र नंतरच्या दुःखवादी व दैववादी लोकांनी मलिन केले. परलोकवादी लोकांनी मूळ धर्मशास्त्राची कार्यक्षमता नष्ट केली. हे सर्व विसरल्यामुळे धर्मात चांगल्या-वाईटाची सरमिसळ, सरभेसळ झाली. आधिभौतिक व आध्यात्मिक सुखवाद हा मूळ धर्माचा पाया होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं हे प्रथम दीर्घ लेखन! तेही सकारात्मक!! यातून त्यांची जीवनाकडे पाहण्याची आनंद वृत्ती दिसून येते. पारंपरिक वाङ्मय, तेही धर्म-कर्मसंबंधी - हे निराशा, दुःख, उदासीनतेकडे नेणारे वाटल्यावरून त्यानंतरच्या म्हणजे वेदोत्तर वाङ्मयात पूर्वीच्या तुलनेने जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक भाव तर्कतीर्थांना आकर्षित करीत होता. आध्यात्मिक की आधिभौतिक यांत नेहमी त्यांनी आधिभौतिकाची तळी उचलली. त्याचे कारणही त्यांची वैचारिक घडण नि कल हा ऐहिक राहिला आहे हेच होय. आत्मा - परमात्मा, पृथ्वी-स्वर्ग यात जे अनुभवजन्य, दृश्य परंतु वास्तव त्याचाच तर्कतीर्थांनी स्वीकार केला. भौतिक विश्व त्यांनी सर्वोपरी मानले. 'आनंदमीमांसा' प्रबंधाची प्रेरणा तर्कतीर्थांच्या जीवन दृष्टिकोनात शोधता येते. या नंतर लिहिलेला 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद' (१९४१) या निष्कर्षावर शिक्कामोर्तबच करतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी अर्थ नि काम त्यांना भौतिकाकडे नेतो. कार्ल मार्क्सच्या, 'सर्व सामाजिक इतिहासाची प्रवर्तक मूलभूत शक्ती अर्थोत्पादनशक्ती मानली आहे' हा विचार ते शिरोधार्य मानतात. 'आनंदमीमांसा' प्रबंध समाजहितकारी असल्यामुळेच त्याचे समर्थन करत या प्रबंधाची समीक्षा करणाऱ्या प्रो. देविदास दत्तात्रेय वाडेकरांनी म्हटले आहे की, 'विजिगीषु समाजास इष्ट असणारे तत्त्वज्ञान या दृष्टीने हे विचार निःसंशय तेजस्वी व धीर देणारे असेच आहेत व समाजात त्यांचा प्रसार अवश्य व्हावयास पाहिजे''[१४]

सांख्यदर्शन, न्यायदर्शन, वैशेषिकदर्शन योगदर्शन इ. मध्ये दुःखवादाचे समर्थन आहे, तसे ते शंकराचार्य विचार, बौद्धमत, जैन दर्शन, मध्ययुगीन संत यांच्या वाङ्मयातही आहे. दुःखवाद हा निराशावाद, उदासबोध, निवृत्तिवाद, मोक्षवाद, संन्यस्तवाद आहे. ते एका अर्थाने जीवनाकडे पाठ फिरविणारे आहे. याचा प्रतिवाद वा विरोध साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी 'आनंदमीमांसा' प्रबंध वाचल्यानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे. ते म्हणतात, ''खरा आनंद एकांतिक प्रवृत्तीत नाही किंवा

एकांतिक निवृत्तीतही नाही, तर दोहोंच्या सांधमोडीत आहे. मला स्वतःला एकांतिक प्रवृत्तीत किंवा एकांतिक निवृत्तीतही आनंद मानणारा एक वेळ पटलो. दोहोंच्या योग्य मिश्रणात आनंद मानणारा त्याहून अर्थात् श्रेष्ठ."[१५] हा विचार माझ्या मते तर्कतीर्थ मीमांसित आनंदाचे वर्धन असून ते समाजहिताच्या दृष्टीने अधिक प्रस्तुत होय.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या 'आनंदमीमांसा' प्रबंधात विविध वादांच्या परिप्रेक्षात आनंदवाद पाहून तुलनात्मक रीतीने त्याची सकारात्मकता आणि योगदान अधोरेखित केले आहे आधिभौतिकता, अध्यात्म, चित्, सत् इ. तत्त्वांच्या संदर्भातही ते सुखवाद अर्थात् आनंदसिद्धांत तपासून त्याची चिकित्सा करतात. जडवाद, चिद् वाद, मायावाद यांचाही हे या प्रबंधात परामर्ष घेतात' आणि मग आनंदवादाचा स्वीकार करतात. ही प्रक्रिया त्यांच्या दीर्घ तुलनात्मक चिंतन, मननाचे फलित होय याकडे लक्षवेधत शि.स.अंतरकरांनी स्पष्ट केलं आहे की, " 'आनंदमीमांसा' या निबंधात शास्त्रीजींच्या पुढे चिद्वाद विरुद्ध जडवाद, आधिभौतिक सुखवाद विरुद्ध आध्यात्मिक सुखवाद अशा प्रकारचे पर्याय नव्हते. त्यांच्यापुढे विचारार्थ दोनच पर्याय होते-आनंदसिद्धांत प्रतिपादन करणारा प्रवर्तक वेदान्त आणि ऐहिक दु:खवाद प्रतिपादन करणारा निवर्तक वेदान्त. आनंद सिद्धांत आणि दुःखवाद यांची मीमांसा करून धर्मास, नीतीस व मानवी प्रगतीस पोषक अशा प्रवर्तक वेदान्ताचा त्यांनी पुरस्कार केला."[१६]

आनंदसिद्धांतावर मानसशास्त्रातही विचार केला गेला आहे. आनंदसिद्धांत (Pleasure Principle) मानतो की, आनंदप्राप्ती ही मानवी सहजात वृत्ती आहे. दुःख टाळण्याकडे या वृत्तीचा कल असतो. आनंद मानवाची जैविक व मानसिक गरज असते. आनंद वृत्ती ही सिग्मंड फ्राइडने मानवी व्यक्तित्वाचे अभिन्न तत्त्व मानले असून ती अचेतन स्थितीत प्रेरक वा उत्प्रेरकाचे कार्य करते असे दाखवून दिले आहे. धर्म, कर्म, मर्म सर्वास आनंद आवश्यक असते. तो मानवी जीवनास सर्वांगांनी लाभकारी असतो. जीवन अधिक उन्नत नि उज्ज्वल बनायचे तर तुम्ही काया, वाचा, मने आनंदी राहायला हवे. दुःख ओढवून घेतलेले अरिष्ट तर सुख हे लाभलेले वरदान मानले तर जीवन अधिक संपन्नच होणार ना?

२) जडवाद अर्थात अनीश्वरवाद (१९४१)

यावादाबद्दलचा प्राथमिक विचार खंड क्र.१० मध्ये या ग्रंथाच्या प्रस्तावनेच्या अनुषंगाने संदर्भित खंड प्रस्तावनेत करण्यात आला आहे. इथे आशयाच्या अनुरोधाने आपण विचार करणार आहोत.

(अ) जडवाद -

पूर्व नि पश्चिम धारेतील विविध तत्वज्ञानांमध्ये भूत (Mater), आत्मा (Soul), ईश्वर (God), विश्व (Universe) इत्यादी तत्त्वांचा मौलिक (Basic / Fundamental) अभ्यास

जसा होत आला आहे, तसाच तो परस्परपूरक संबंध, परस्परविरुद्ध स्थितीचाही होत आला आहे. या शिवाय या तत्त्वाची तुलना, साम्य-वैषम्याचा अभ्यासही पूर्वापार आहे. वैदिक, ग्रीक, बाबिलोनियन, सिरियन, इजिप्तशियन इत्यादी संस्कृतींचा धांडोळा दर्शन अंगांनी (Philosophy) घेताना हे लक्षात आल्यावाचून राहत नाही. यातून कालौघात अनेक वाद-विचार उदयाला आले नि काही काळाच्या उरात गडपही झालेत. आस्तिकतावाद (Theism), नास्तिकतावाद (Atheism), जडवाद (Ontology), आधिभौतिकतावाद/ ब्रह्मांड शास्त्र (Cosmology), अध्यात्मवाद (Metaphisism/Spiritualism संदेहवाद (Skeptism), अस्तित्ववाद (Exstentialism) इ. चटकन लक्षात येणारे वाद हे विश्व नि त्यातील घटकांचा तात्त्विक अभ्यास करणारी दर्शन, वाद, विचार, विज्ञान म्हणून पाहता येतात.

या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद' (१९४१) प्रबंध रचतात, तेव्हा एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, तत्पूर्वी त्यांनी सत्, चित्, आनंद, भूत, आत्मा, परमात्मा, विश्व यांच्या द्वैत-अद्वैत संबंधांचा अभ्यास पूर्ण केलेला होता. त्यांना द्वैतवाद, अद्वैतवाद, शुद्धाद्वैतवाद, मायावाद, अज्ञेयवाद माहीत होता, तसाच राष्ट्रवाद, मार्क्सवाद, रॉयवाद, गांधीवाद माहीत होता नि नंतरच्या काळात तर ते नवमानवतावादापर्यंत जाऊन पोहोचलेले दिसतात. सन १९४० पर्यंत हिंसा, अहिंसा, सत्ता, क्रांती इ. तत्त्वांचा त्याचा अभ्यास झालेला होता.

या प्रबंध लेखनाच्या काळात ते आध्यात्मिक सनातनी प्रभावातून (पौर्वात्य) मुक्त होऊन गांधीवाद्विरोधी अशा रॉयवाद नि मार्क्सवादाच्या वळचणीत येऊन त्या विचारांचे खंदे समर्थक असल्याच्या काळातले हे लेखन होय. सन १९४० ला मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'Materialism' प्रबंधानंतरचे हे लेखन म्हणजे मराठी भाषिकांसाठी उपलब्ध करून दिलेले पाश्चात्त्य दर्शनच होय. या संदर्भात आणखी एका गोष्टीची नोंद घेतली पाहिजे की याच काळात त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' व्याख्यानमाला गुंफत ग्रथित केलेला विचार हा मार्क्सवाद प्रभावित धर्मसमीक्षा होती.

मूलत: अनीश्वरवाद लिहिण्याच्या कल्पनेतून जडवाद लेखन झाले आहे. कारण जडवाद समजून घेतल्याशिवाय अनीश्वरवाद नीट लक्षात येत नाही अशी तर्कतीर्थांची धारणा होती. ती त्यांनी या प्रबंध प्रस्तावनेच्या प्रारंभीच स्पष्ट केली आहे. हे दोन्ही वाद म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू ते मानत. अभावात्मक भाव ही भावात्मकतेची प्रतिक्रिया म्हणून पाहता येते. जडवादाची विधायकता अनीश्वरवादाच्या पार्श्वभूमीवर प्रभावी पद्धतीने समजते हा तर्क जडवाद लेखनामागे आहे. जडवाद हा भौतिक तत्त्वकेंद्रित विचार असल्याने त्यात आत्मा, ईश्वर. इ. तत्त्वांना थारा नाही. जडवाद प्रबंध लेखन शास्त्रीय आहे. पौर्वात्य नि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील ज्ञानमीमांसा आणि प्रमाण मीमांसा (Epistemology and Logic) चा अभ्यास करून केलेले हे लेखन होय. यास 'तात्त्विक जडवादाची प्रस्तावना' म्हणत आपण

केलेले प्रस्तावनेत हे सारसंक्षिप्त लेखन (Precis Writing) असल्याचे स्पष्ट करतात. यात त्यांनी जड (Matter- Energy), जीव (Life) आणि चेतन (Mind and Soul) यांचे परस्परांशी असलेले संबंध स्पष्ट केलेत. बौद्धिक जाड्य जडवाद समजून घेतल्याशिवाय दूर होणार नाही, याची त्यांना खात्री पटलेली होती (सर्ववादसमीक्षा व सर्वधर्मसमीक्षा अभ्यासामुळे !). अंधता व मंदता मग ती बौद्धिक असो वा कार्मिक, दूर व्हायची तर जडवादाला पर्याय नाही, या निष्कर्षाप्रत पोहोचल्यानंतरचं हे लेखन असल्याने त्यास एक प्रतिबद्ध बैठक आपोआपच प्राप्त झालेली आहे. मानवी अन्यायनिवारण व दास्यमुक्तीच्या हेतूने झालेले हे लेखन आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या या 'जडवाद' प्रबंधात या वादास तत्त्वज्ञानाच्या रूपात सादर केले आहे. तत्त्वज्ञान हे जीव-जगत संबंधांची चर्चा करते. जडवाद भौतिकतत्त्व व विश्वसंबंधावर प्रकाश टाकतो. अध्यात्मात हीच चर्चा असते, पण ती परमार्थ, सत्य अंगाने केली जाते. जडवाद विज्ञानप्रेरक व विज्ञान प्रगती सहायक विचार असल्याने तो भूत / भौतिकापलीकडे कोणतेही तत्त्व सत्य मानत नाही. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर जडवाद वैज्ञानिक तत्त्वज्ञान असून भौतिकतेच्या पायावर ते उभे आहे. जगातील सर्व तत्त्वज्ञाने (पौर्वात्य / पाश्चात्त्य) ज्ञान-ज्ञेय, संवित्ती व संवेद्य, विषय-विषयी चर्चेचा विस्तार होय व्यक्ती - समाज, व्यक्ती-व्यवस्था संबंध भूत-विश्व संबंधांवर पारखले गेले तरच ते वस्तुनिष्ठ निकषापर्यंत विज्ञानवत पोहोचू शकतात. बाह्य अनुभूती जगत सत्य अंतर्गत मानसिक, भावनिक, भासमान श्रद्धा, भाव विज्ञानाच्या कसोटीवर उतरत नसल्याने वा परतत्त्व सिद्ध होत नसल्याने ते अस्वीकार्य ही जडवादाची मूळ भूमिका आहे. 'जगत् सत्य आहे'. ही जडवादाची धारणा आहे. अर्थातच 'ब्रह्म सत्य, जगत् मिथ्या' या विचाराचा तो व्यत्यास म्हणून पाहावा लागतो.

जडवाद विरोधी तत्त्वज्ञाने जगात आहेत. ती आत्मा-परमात्मा, जीव-जगत् संबंध चर्चा करत अलौकिक शक्तीचे अस्तित्व स्वीकारतात. बौद्ध आचार्य, बर्कले, ह्यूम, कांट, हेगेल इत्यादिकांचे विचार समजून घेत असताना ते लक्षात येते. पण बौद्धमत वा अज्ञेयवाद यांतील विचार जडवाद मान्य करीत नाही. कारण ज्ञान/संवेदनेची अनुभूती ही वैज्ञानिक कसोटीवर उतरत नाही. वस्तुनिष्ठ सत्य (Objective Reality) हे जडवादाचे मूलतत्त्व आहे. ज्ञेय जगच सत्य होय, बाकी सर्व वदतोव्याघात, वितंडवाद होय. बाह्य जगाचा मायामय संसार व असंवेद्य वस्तु यांचा स्वीकार जडवाद करीत नाही. मनुष्याचे कोणतेही ज्ञान कायमचे पूर्ण सत्य नसते. अल्प सत्याकडून महान वा विस्तृत सत्याकडे ज्ञानाचा प्रवास असतो. जगात प्रगती होते, ती या प्रक्रियेतून आज अज्ञात असलेले जग उद्या ज्ञेय होऊ शकते यावर जडवाद विश्वास ठेवते सत्य शोधाची निरंतरता हाच अंतिम सत्यशोधनाचा उपाय होय. आजमितीस अंतिम सत्य (Absolute Trust) असे काही नाही. सापेक्ष सत्यसशोधाचे प्रतिपादन विज्ञान करते, जडवादही तेच करते.

सापेक्ष सत्यात भर पडत असल्याने ते विकसनशील असते. वेदांत व हेगेल वर्णीत ब्रह्मसत्य ही केवळ कल्पना आहे. वास्तव केवळ भूत तत्त्व आहे. पूर्ण सत्य प्राप्तीचा दावा खोटा ठरतो. ज्यांना ते लाभले असा जे दावा करतात ते निष्कर्म झाले असेच म्हणावे लागते. पण जग तर अजून बदलते आहे. नवनवे शोध व अनुभव वा तंत्र (उदा. संगणक, आंतरजाल) नव जगत् प्रवासच ना? मग पूर्ण सत्याचे काय? असा प्रश्न येतोच. उपनिषदांनी आणि शंकरार्यांनीच म्हणून ठेवले आहे की, 'संपूर्ण सत्य सापडल्यावर सर्व कर्मे विराम पावतात'. वर्तमान अनुभव ती विधाने खोटी ठरवतात. 'ज्ञान वस्तु-तंत्र आहे' असे 'ब्रह्मसूत्रभाष्य' मध्ये शंकराचार्यांनी म्हटले आहे. प्रत्यक्ष ज्ञान हेच खरे असा त्याचा अर्थ होतो. मग ज्ञान संवेदना परतंत्र राहत नाही. 'प्रत्यक्ष प्रत्यय' या कसोटीवर अन्य सत्ता खऱ्या उतरत नसल्याने भौतिक जगत् हेच खरे मानावे लागते. प्रत्यक्ष प्रत्ययासारखे श्रेष्ठ ज्ञान वा अनुभव दुसरा कोणता असूच शकत नाही हा जडवादाचा सिद्धांत आहे. ज्ञानप्रामाण्याची कसोटी प्रचीती मानली तर ती सिद्ध करता आली पाहिजे. ती वजन, आकारमान, रूप, रंग, गती, स्थिती निकषावर जोखता आली पाहिजे, तर ती सत्य, प्रत्यक्ष, प्रयोग, प्रत्यय या विज्ञानाच्या कसोट्या जडवादाची पूर्वअट म्हणून पाहता येतात.

ज्ञान व वस्तु यांची अविभाज्यता (Unity) असते व ती मानवी प्रयत्नांतूनच सिद्ध होते. यासाठी अन्य अलौकिक शक्तीची आवश्यकता नसते. अशी काही शक्तीही नसते. शक्ती जी या जगात असते तिची कार्यकारण संबंधीय सिद्ध शक्ती आहे. त्या कसोटीवर उतरणाऱ्या शक्ती (वाफ, अग्नी, अणू, वीज इ.) खऱ्या, भौतिक ज्ञानाचा वस्तुशी असलेला मेळा, संबंध ज्या रीतीने सिद्ध होतो, त्याच रितीने मानवी आत्मविद्या संबंध सिद्ध होतो. आत्मा म्हणजे मानवी चैतन्य शक्ती, दैवी नव्हे, व्यक्तीच्या अथवा वस्तुच्या आत्मविद्या / शक्तीचा असा आढावा घेता येतो, तसा तो सामाजिक संस्था स्वरूपावरून समाजातील आत्मविद्या शक्तीचाही घेता येतो. समाजरचना, बदल इ. गोष्टी उत्पादकता व उत्पादन पद्धतीवर अवलंबून असतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी या 'जडवाद' प्रबंधात परोपरीने स्पष्ट केले आहे की, मूर्त (Concrete) वस्तु हेच, अनुभव आणि मानवी व्यवहाराचे क्षेत्र होय. व्यक्त वस्तु, प्रत्यक्ष अनुभव आणि व्यवहार या त्रयींशी जुळणारी तात्त्विक विचारसरणीच मानवी समाज व जीवन व्यवहाराचे सशक्त साधन आहे; अन्य नाही. अनुभवजन्य ज्ञान हेच सामाजिक प्रयत्नांचे फलित असते, जडवाद प्रयत्नजन्य अनुभवास किंवा प्रयोगांना आपल्या प्रयोगशास्त्रात स्थान देतो. कांट वणीत अज्ञेय, परमार्थ वस्तु वा स्वरूपाला जडवादात स्थान नाही. कार्ल मार्क्सने सांगितलेली कसोटी ही की, 'सर्व प्रश्नांचा प्रत्यक्ष मानवी व्यवहाराशी म्हणजेच भौतिक जगताशी संबंध हवा'. हे तत्त्व जडवाद प्रमाण मानते. सत्य (Objective Truth) महत्त्वाचे. डेकार्ट, कांट, रसेल इ. तत्त्वज्ञ सत्यास बौद्धिक कल्पनासत्यात शोधतात, तर जडवाद तो

शोध केवळ आणि केवळ भौतिकात घेतो व भौतिक कसोटीवर स्वीकारतो. ज्ञान दोन रूपात असते - १) प्रत्यक्ष अनुभव, २) तार्किक बुद्धीने येणारी प्रचिती, पैकी प्रत्यक्ष सिद्ध करता येणारा अनुभवच खरा. पाश्चात्त्य तर्कशास्त्रातील तादात्म्य नियम/ साक्षात्कार (Law of Identity) संबंधी देकार्त, लिब्नीट्झ, कांट, हेगेल प्रभृती मान्यवरांनी जी विवेचने केली आहेत, ते तर्क, अनुभव वर्णिले आहेत, ते जडवादाच्या चौकटीत बसणारे नाहीत. त्यामुळे ते कितीही श्रेष्ठ असले तर बिनतोड वा वैज्ञानिक ठरत नाहीत. जडवाद, जो ज्ञानसिद्धांत सांगतो तो मानसिक नसून मानवी व प्रत्यक्ष अनुभवजन्य आहे. तो पूर्वसिद्ध वा स्वयंसिद्ध नाही. त्याचे कारण सांगता येते. तो प्रश्नमुक्त नाही.

जडवादाचे स्वतःचे काही सिद्धांत आहेत. ते व्याख्या कसोटीस उतरणारे आहेत.

१) जड म्हणजे ज्ञानरूप नसलेली वा संवेदना, जाणीव नसलेली वस्तु. तिचे स्वतंत्र अस्तित्व असते. ती चैतन्यरूप नसते.

२) द्रव्याच्या जड, जीव व चेतन अशा तीन श्रेणी होत. अगोदर अचेतन व अजीव असलेले द्रव्यच जीव व चेतन बनते ते कार्यकारण संबंधाने. चमत्काराने नाही. जीव म्हणजे स्वयंचलनशील. चयापचय क्रियायुक्त तेच चेतन रूप धारण करते ते परिणत व उच्च रचनेमुळे. ही क्रिया वैज्ञानिक असते, दैवी नाही.

ज्यास शरीर मानले जाते, तेच आत्मा किंवा मन असते. त्याचे स्वतंत्र अस्तित्व नसते. शरीर-मन (जीव) एक होय. जीव वा चेतना शरीराचीच क्रिया आहे. मनोधर्म नि शरीरधर्म एकच एक असून ते परस्परावलंबित असतात. शरीरनाश म्हणजे आत्मा-मनही संपणे. जन्म पूर्वजन्माचे फलित नाही वा पुनर्जन्म कर्मफल नाही. जन्माबरोबर येते ते मृत्यूबरोबर संपते. पुण्य-पाप या कल्पना असून त्या मिथ्या आहेत 'अत्त दीप भव' म्हणत मानव जीवन स्वयंप्रेरित असते. सजीव देहपिंड हेच सृष्टीचे सत्य होय. थायरॉईड, हार्मोन्स, पिट्युटरी इ. ग्रंथींतून मानवी जीव क्रिया, चेतनता सक्रिय असते. ती विज्ञानानेच आकलनीय असते. एकपेशी ते बहुपेशी जीवन विकास सृष्टी विज्ञानाधारित उत्क्रांती होय. ती क्रमाक्रमाने नि क्रिया - प्रतिक्रियेने, कार्यकारण संबंधाने झालेली आहे. तिचा इतिहास आहे. भविष्यवेध प्रयत्न प्रयोगसाध्य गोष्ट होय. सृष्टी विभिन्न साधक बाधक द्रव्ये, क्रिया, प्रक्रिया, प्रतिसाद, प्रतिक्रिया इ.चा परिणाम होय. यात द्रव्ये, खनिजे, हवामान, नैसर्गिक चक्र, आपत्ती, वरदान सर्व असते. त्यांचा अभ्यास, संशोधन गम्य व बोधक असतो. त्यात शाप, चमत्कार नसतो. शरीर व सृष्टी क्रिया-प्रतिक्रिया बोधांच्या, संबोधांच्या पलीकडे नाही. आज जे अबोध वाटते, उद्या प्रयत्नाने, प्रयोगाने शक्य, संभव होते; पण अनाकलीय असले तरी ते दैवी, अलौकिक, चमत्कारिक नसते.

प्रत्येक जीपपिंड द्रव्य, उत्पत्ती, विकास व जाणीव वर्धन करणारा; परंतु कार्यकारणजन्य असतो. तो बोधगम्य असतो. जन्म, विकास, अंत या अवस्था निसर्गाच्याच आहेत, म्हणून जीवांना लागू आहेत. त्यात हस्तक्षेप करता येतो, पण तो कारण, कसोटी, प्रयोग इ. ने सांगता

येतो, सिद्ध करता येतो, सुधारता येतो व नवे रूप देता, शोधता येणे शक्य असते. हे सर्व विज्ञानाच्या मूलभूत संकल्पना व कसोट्यांवर आधारित असते. त्याची कारणे सांगता येतात तशी शोधताही येतात. आज जे अगम्य असेल, उद्या ते गम्य होणे प्रयोग, प्रयत्नांमुळे शक्य असते. तेच विकास तत्त्व होय.

जडवाद म्हणजे केवळ अचेतनाचा विचार नाही. सचेतन जीव व गतिशील, परिवर्तनशील सृष्टी, ब्रह्मांड त्याची परिधी आहे. अवकाशापलीकडचेही त्यांच्या परिघात असते पण ते भूत तत्त्व म्हणूनच. सचेत जीवसृष्टी वा वस्तु यांची मूलतत्त्वे, बीजमणिमाला (Chromosomes), बिजमणी (Genes) (नवा शोध!), डी. एन्. ए. इ. गोष्टी त्याचे लक्ष्य असले, तरी ते उत्परिवर्तन (Mutation) इ. क्रियांच्या अधीन बोधगम्य असते. Being - जीव, मी, आत्म सारे भौतिक कसोटीवर जडवाद स्वीकारतो वा नाकारतो हे लक्षात ठेवले पाहिजे. जडवादी सिद्धांतानुसार देहात्म प्रत्यय सार्वजनिक म्हणजे सर्वांना एकाच प्रकारचा अनुभव देणारा असतो, असायला हवा. त्यात जैविक वैविध्यामुळे फरक असू शकतो; पण तो गम्य, कारणसिद्ध असतो. देहात्म प्रत्ययाची चर्चा अध्यात्मातही आहे; पण त्यांच्या परी प्रकार भिन्न होत. आत्मा देहाहून भिन्न असल्याचे अध्यात्मात सांगितले जाते. त्यासाठी ते तार्किक प्रमाण व शब्दप्रमाण सांगतात. पण ते विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाहीत. याशिवायही अशा अनेक गोष्टी प्राचीन वाङ्मयात आहेत, की त्यांची वैज्ञानिक तर्कसंगती लागत नाही. जडवाद त्या सर्व नाकारतो. उदाहरणार्थ अमर, आत्मा, ईश्वर इ. कल्पना. त्या सिद्ध होत नाही म्हणून त्यांचा अस्वीकार केला आहे.

या जडवाद प्रबंधात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्राचीन वाङ्मय (अलौकिकाची चर्चा व समर्थन करणारे!) याची चर्चा करत 'शब्दप्रामाण्य' तत्त्वाचा ऊहापोह केला आहे. स्वयंसिद्ध व स्वप्रमाण हे कारणमुक्त असूच शकत नाही. विज्ञानाचा उगमच मुळात जिज्ञासा, चिकित्सा वृत्तीतून झालेला आहे. त्यामुळे ज्याला कसोट्या, लक्षणे, प्रमाणे नाही, ते मिथ्या अशी जडवादाची विवेकी भूमिका असून ती प्रमाण मानत जडवाद आकारला आहे. विश्वस्वरूप वा रचनेसंबंधी जडवादाचे चार सिद्धांत आहेत- १) ज्ञाता व ज्ञेय नित्य परिवर्तनशील आहे. २) सदवस्तु विनाशकारी नाही व ती संपूर्ण अभावातून निर्माण होत नाही. ३) प्रत्येक वस्तुत स्वभावसिद्ध गतिशक्ती असते व ती परिवर्तन शक्तीही असते. ४) रचना, योजना, नियमबद्धता, सुसंगती हा वस्तुचा मूळ स्वभाव वा धर्म असतो. यावर भौतिक जग सक्रिय असते.

(ब) अनीश्वरवाद

जगाच्या उत्पत्ती, विकास वा लयास ईश्वराची गरज नसल्याचे जडवाद मानतो. भौतिक जग त्याच्याच क्रम, गतीने चालते. ईश्वर ही अचिन्त्य, विलक्षण शक्ती असल्याचे काही लोक मानतात, पण त्यांना पुराव्याने ते सिद्ध करता येत नाही. ईश्वरवादी त्यास जगताहून

भिन्न मानतात. त्याच्या स्वरूपाबद्दल ईश्वरवाद्यांमध्ये एकमत नाही. तो चित्मय आहे, याबाबत सर्वांचे एकमत दिसते. भौतिक वस्तुंचा अनुभव येतो, तसा तो ईश्वराचा नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ईश्वरवादी लोकांच्या ईश्वरीय रचना, स्वरूप, कार्य, विधी इ. बद्दल एक एक तत्त्व घेऊन चर्चा करून ईश्वर तत्त्व विज्ञान नि विवेकाच्या कसोटीवर कसे खरे उतरत नाही, हे सप्रमाण दाखवून दिले आहे. एकेक मुद्दे घेऊन ईश्वर समर्थकांचे मुद्दे 'अनीश्वरवाद' मध्ये खोडून ईश्वर नाही, हे परोपरीने सांगितले आहे. जड हेच जग आहे असे त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे.

१) ईश्वर विश्वाहून मूलत: निराळा असून तो या विश्वाचा प्रेरक आहे. २) ईश्वराने हे जग जादूगारासारखे (चमत्काराने निर्मिले आहे. ३) ईश्वराने जग स्वतःहून (स्वयंप्रेरणेने) निर्माण केले आहे. ४) व्यक्त व दृश्य जग अव्यक्त व अदृश्य द्रव्याने (ईश्वर) बनले आहे. ५) ईश्वरसत्ताच पूर्ण सत्य आहे. ६) विश्व म्हणजे परमेश्वरविचार होत. ७) ईश्वरी तत्त्वावरच जगाची सत्ता अवलंबून आहे. ही नि अशी जी मते आहेत. ती निराधार असल्याने तर्कतीर्थ नाकारतात.

ईश्वर हा सामान्यांच्या सहज अनुभूतीचा विषय न मानणे यातच त्याचे सार्वजनिकपण हरवणे आहे. ईश्वररूप वैविध्यही नाकारण्याचे कारण होय. ईश्वर मानण्याची जी प्रमाणे ईश्वरवादी प्रस्तुत करतात, ती सर्व तर्कतीर्थांनी सप्रमाण खोटी ठरवली आहेत -१) व्यवस्था व नियमबद्धता, २) प्रेरणेला प्रेरकाची गरज, ३) उद्देश, संकल्प व हेतू, ४) गोचरता (दिसणे असणे), ५) ईश्वर सौंदर्यरूप आहे, ६) नीतिनिर्धारणार्थ नियंत्याची गरज, ७) धार्मिक अनुभव हाच ईश्वर असल्याचा पुरावा ८) साधू-ऋषीचे अलौकिक अनुभव. ही सर्व प्रमाणे आधारहीन व तथ्यहीन असल्याचे तकतीर्थांनी विस्तृत विवेचन करत प्रबंधात मांडले आहे. ईश्वरवाद्यांच्या तर्कातील दोषही तर्कतीर्थ आपल्या या प्रबंधात विस्ताराने मांडतात. धार्मिक मूल्यचर्चेत त्यांच्या मर्यादा तर्कतीर्थांनी दाखवल्या आहेत.

अलीकडे काही पाश्चात्त्य विचारक ईश्वरीसत्ता मानून त्यांचे समर्थन करताना दिसतात. त्यामुळे जडवादाचा आधार/पाया गडगडू/ढासळू लागला आहे, असे ईश्वरवाद्यांना वाटते. पण वस्तुस्थिती भिन्न आहे. यात काही वैज्ञानिकही दिसतात. यात गैरसमज अधिक आहेत. विज्ञानात वस्तुविचाराच्या तीन श्रेणी वर्णिल्या आहेत - १) अनुभव व प्रयोगाने सिद्ध केलेल्या वस्तु, २) प्रयोग व अनुभवाने सिद्ध न झालेल्या वस्तु / गोष्टी, ३) संभाव्य कल्पना. वरील तीनही प्रकारात ईश्वरीय संकल्पना बसत नाही. कार्यकारणभाव व तार्किकता यातील अंतर लक्षात आले की भौतिक कसोटीस ईश्वर उतरत नाही, हे स्पष्ट होते. मॅक्स, प्लँक्स, आइन्स्टाइन इ. सर्वांचे विचार लक्षात घेऊन एडिंटन याने सांगितले आहे की, "अणूंच्या गतीस प्रेरणा देणारी एक स्वतंत्र इच्छाशक्ती असली पाहिजे." हे मत वैज्ञानिक निकषावर खरे ठरत नाही, म्हणून प्रबंधाचा समारोप करत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले

आहे की, "मनुष्याच्या शुद्ध चारित्र्यास व वर्तनास ईश्वराच्या कल्पनेची आवश्यकता नाही, हे त्याच्या पवित्र चारित्र्याने व उदात्त विचारसरणीने आपोआप सिद्ध झाले आहे. ईश्वरी कल्पनेचा उपयोग करून मनुष्यजातीला अधोगतीला नेणाऱ्या स्वार्थी लोकांची जगात व जगाच्या इतिहासात मुळीच वाण नाही. मनुष्याच्या सामाजिक व वैयक्तिक उन्नतीला पारलौकिक, अलौकिक व गूढ अशा ईश्वरविषयक कल्पनांची यापुढे मदत होणार नाही, तर अडथळाच होणार आहे."

अनीश्वरवाद (Atheism) ही विचारसरणी जगाचे नियंत्रण करणाऱ्या ईश्वरीय तत्त्व व सत्तेस नाकारणारी विचारधारा असून ती भौतिक जगतासच सत्य मानते. या विचारास ईश्वर तत्त्व व सत्ता अमान्य आहे. ईश्वर ही वैज्ञानिक पुराव्यांवर सिद्ध होणारी गोष्ट नाही. ती केवळ कल्पना भ्रम व श्रद्धा असून धार्मिक आस्थेतून ती जन्मते. ती माणसास विचार, बुद्धी, विवेकापासून दूर नेणारी गोष्ट असून निष्क्रिय, निराश, निरुद्योगी करणारी धारणा आहे. वेदप्रणीत ही धारणा विज्ञानाच्या कसोटीवर खरी न ठरणारी असल्याने केवळ काल्पनिक, तार्किक गोष्ट होय.

३) श्री गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती : संक्षिप्त चरित्र

नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना गुरुस्थानी होते. तर्कतीर्थांनी आपल्या गुरूंचे ५० पानांचे संक्षिप्त चरित्र लिहिले असून ते गुरूंच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सन १९५२ साली 'श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ' मध्ये अंतर्भूत आहे. 'आधुनिक कालातील प्राचीन आचार्याचा आदर्श' या उपशीर्षकातून चरित्र बीज लक्षात येते. स्वामींच्या प्रथम दर्शनापासून (१९१४) ते अमृत महोत्सव (१९५२) असा सुमारे चार दशकांचा या चरित्राचा कालखंड आहे. या चरित्रातून स्वामी केवलानंद यांचे जीवन, कार्य आणि विचार यांवर प्रकाश पडतो.

स्वामी केवलानंद सरस्वती हे सद्गुरु ब्रह्मीभूत स्वामी परमानंद सरस्वती यांचे शिष्य होत. स्वामी केवलानंदांनी त्यांच्याकडून शिक्षा-दीक्षा घेतली. ते तपस्वी गृहस्थ होते. त्यांनी प्राज्ञपठात शिक्षण पूर्ण करून अध्यापन सुरू केले. त्यांचा दिनक्रम निश्चित होता. पहाटेस उठत. प्रात:स्मरण होई. कृष्णेत प्रातःस्नान करीत. नंतर प्रातःसंध्या असे. सूर्योदयाच्या वेळी ते जप, ध्यान करीत. शुभ वस्त्रे परिधान करीत. संन्यास ग्रहण केल्यानंतर भगवी वस्त्रे वापरत. अध्यापनाची पूर्वतयारी ते नियमितपणे करीत. अध्यापनानंतर पाच घरी माधुकरी मागत. हा क्रम त्यांनी आयुष्यभर पाळला. भोजनोत्तर विहातीनंतर पुन्हा अध्यापन करीत. ते मिताहारी व मितभाषी होते. सायंकाळी स्तोत्र - पाठ होई. जप, भजन, गायन चाले. भजन- संकीर्तनाची त्यांना आवड होती. रात्री व पहाटे स्वाध्याय करीत. सर्व गोष्टी नियमित करण्याचा त्यांचा रिवाज होता.

त्यांनी आजीवन ब्रह्मचर्यव्रत पाळले. त्यांचा जन्म ८ डिसेंबर १८७७ला सुडकोली, ता. रोहे जि. कुलाबा येथे झाला. वडिलांचे नाव सदाशिवपंत. ते मूळचे कोकणातील पडेल

गावचे. आईचे नाव पार्वती. ती पडेल जवळील वाडेगावची. घरी छोटी शेती. पाच मुलगे व एका मुलीचे हे कुटूंब. प्राथमिक शिक्षण घरी झाल्यानंतर नारायण अलिबाग इथे शिकला. नंतर नागाव येथे पुढील शिक्षण झाले. काही काळ मिरज येथे शिकून नारायण वाई येथे सन १८९८ला आले. इथे अनेक गुरू, पंडितांकडून धडे घेतले.

आपले शिक्षण पूर्ण करून नारायणशास्त्री मराठे यांनी १९०१ मध्ये अध्यापनास प्रारंभ केला. प्रथम तीन-चार विद्यार्थी होते. नंतर संख्या वाढून प्राज्ञपाठशाळा झाली स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण अशा चतु:सूत्रीमुळे सन १९१० मध्ये समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थी-शिक्षकांमुळे प्राज्ञपाठशाळा राष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र बनली. विद्यार्थी-शिक्षक स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय झाले. पुढे गुरुजींनी १९१४, १५ व १६ मध्ये आजी-माजी विद्यार्थी संमेलने घडवून आणली. माजी विद्यार्थ्यांनी नंतर अन्य संस्कृत पाठशाळा सुरू केल्या. सन १९१६ मध्ये प्राज्ञपाठशाळेची अधिकृत स्थापना झाली. तिचे अभ्यासक्रम निश्चित होऊन जाहीर झाले. सन १९१६ला विद्यार्थी संख्या ६० वर गेली. याच वर्षी लोकमान्य टिळक यांनी पाठशाळेस भेट देऊन गौरव केला. सन १९२०ला प्राज्ञपाठशाळा मंडळ संस्था नोंदणीकृत झाली याच वर्षी महात्मा गांधींनी शाळेस भेट देऊन प्रशंसा केली. सन १९४२ पासून सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देणे सुरू झाले. पुढे शाळा टिळक विद्यापीठाला जोडली गेली. शाळेत वेदपठनाबरोबर कृषी कर्म, वैद्यकर्म, खेळ इ. शिकवले जात असे. सन १९२२ ते १९३० शाळेत माध्यमिक विभाग सुरू करण्यात आला होता. शाळेची प्रशंसा करणारे अनेक अभिप्राय प्राप्त झाले.

नारायणशास्त्री मराठे यांनी सन १९२५ ला 'धर्मकोश' संपादनाचे कार्य सुरू केले. सन १९३४ मध्ये 'धर्म निर्णय मंडळ' स्थापले. सन १९२६ च्या सोनगीर धर्म परिषदेत त्यांनी भाग घेतला. सन १९२७ ला अकोले येथे संपन्न ब्राह्मण परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले. सन १९३३ मध्ये येरवडा तुरुंगात महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निवारण कार्य चर्चा आरंभली. त्यात ते सहभागी झाले. २२ ऑक्टोबर १९३१ मध्ये ते संन्यास घेऊन स्वामी केवलानंद सरस्वती झाले. नंतर त्यांनी वाचन, लेखन, संपादनास स्वत:स समर्पित करून घेतले. अनेक ग्रंथ, कोश रचले.

अशा त्यागी, समर्पित स्वामींचा अमृत महोत्सव सन १९५२ ला संपन्न झाला. तेव्हा भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्वांनी त्यांना उदंड आयुष्य चिंतिले !

४) जोतिचरित्र (१९९२)

महात्मा जोतीराव फुले यांचे जीवन, कार्य आणि विचारांबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मनात आस्था होती, त्याचे कारण त्यांनी केलेले बहुजन समाज जागृती व

शिक्षण कार्य, तसेच शोषित, पीडित स्त्रिया व शेतकरी वर्गासाठी केलेले समाजकार्य व लेखन होय. महात्मा फुले यांच्या कार्याची नोंद घेणाऱ्या आरंभिक लेखकांत तर्कतीर्थांचा अंतर्भाव करावा लागेल. सन १९४७ साली प्रकाशित 'ज्योति निबंध' पुस्तिका तर्कतीर्थांनी वाई ब्राह्मो समाजातर्फे आयोजित वाई सत्यशोधक समाज रौप्य महोत्सव व्याख्यानमालेतील दि. १८ जून १९४६ रोजी दिलेले 'सत्यशोधक समाज व महात्मा फुले' विषयावर दिलेल्या भाषणाची लिखित संहिता होय. तिला सुविख्यात सत्यशोधक कार्यकर्ते, 'दलित मित्र' रा.ना. चव्हाण यांची छोटी प्रस्तावना आहे. ही पुस्तिका रा.ना चव्हाण यांच्या प्रयत्नांमुळे प्रकाशित झाली होती. महात्मा फुले यांच्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी चर्चित व्याख्यानापूर्वी व नंतर अनुक्रमे पुणे व बेळगाव येथे भाषणे दिल्याचे दिसते. ती या प्रकल्पातील भाषणसंग्रहात संग्रहित आहेत. 'ज्योति निबंध' भाषणाचे इंग्रजी भाषांतर होऊन ते रॅडिकल पक्षाच्या मुखपत्रात प्रसिद्ध झाले असल्याची नोंद रा. ना. चहाण यांनी तर्कतीर्थांसंबंधी लिहिलेल्या आठवणीत आहे.[१७] ते मुखपत्र म्हणजे 'इंडिपेंडंट इंडिया' असावे. 'ज्योतिनिबंधा'चा परिणाम व्यापक ठरला. महात्मा फुले यांच्यावर त्यानंतर इतर अनेक विद्वान लिहू लागले. या पुस्तकातील उतारे घेऊन फुले यांच्या कार्याचे विवेचन अनेकजण करू लागले.'' असेही या आठवणीत रा. ना. चव्हाण यांनी आवर्जून नोंदले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय'(संपादक- धनंजय कीर व डॉ. स.गं. मालशे) ग्रंथास जी प्रस्तावना लिहिली आहे, त्यांत महात्मा फुले यांचा गौरव 'भारतीय परंपरागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष' अशा शब्दात केला आहे. तीच भावना व तोच आदर तर्कतीर्थ लिखित 'ज्योतिचरित्र' मध्ये दिसून येतो.

यापूर्वी प्रस्तुत खंडाच्या 'संपादकीय'मध्ये नमूद केल्यानुसार हे चरित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'महात्मा फुले स्मृतिशताब्दी वर्ष' (१९९०) आणि 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष' (१९९१) असे औचित्य साधून लिहिले असून ते भारतीय पुस्तक न्यास, नवी दिल्ली (एनबीटी) यांनी सन १९९२मध्ये प्रसिद्ध केले आहे. यात 'ज्योतिनिबंध' ही अंतर्भूत आहे. 'ज्योतिचरित्र'ची इंग्रजी व हिंदी भाषांतरे झाली आहेत. पैकी इंग्रजी भाषांतर दया अग्रवाल यांनी केले (१९९६) आहे, तर हिंदी प्रशांत पांडे (२००६) यांनी. दोन्ही भाषांतरे भारतीय पुस्तक न्यासाने प्रकाशित केली आहेत. 'ज्योतिचरित्र' ८० पृष्ठांचे संक्षिप्त चरित्र होय. डॉ. धनंजय कीरकृत 'महात्मा जोतीराव फुले' (चरित्र) आणि 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय' (संशोधित आवृत्ती - संपा. य. दि. फडके) या दोन ग्रंथांवर आधारून लिहिल्याचे तर्कतीर्थांनी या चरित्राच्या प्रास्ताविक 'निवेदन' मध्ये स्पष्ट केले आहे.

जोतीराव फुले भारतीय आधुनिक मानवतावादी संस्कृतीचे आद्य प्रवर्तक होते. शेटीबा फुले घराण्याचे मूळ ज्ञात पुरुष. पेशवाईत ते भाजीपाल्याचा व्यवसाय करीत. त्यांना राणोजी,

गोविंदा व कृष्णा अशी तीन मुले होती. यातील गोविंद हे महात्मा फुले यांचे वडील. त्यांचा विवाह चिमणाबाईंशी झाला होता. गोविंदरावांनी पेशवाईचा उत्कर्ष व लय पाहिला होता. गोविंदरावांनी चिरंजीव जोतीरावाचा सांभाळ केला. कारण आई चिमणाबाईचे जोतीच्या जन्मानंतर (१८२७) लवकर निधन झाले होते. या चरित्रात तर्कतीर्थांनी जोतीरावांच्या जन्माच्या वेळच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक वातावरणांचे विस्तृत वर्णन केले आहे. त्यावरून बहुजन कुटुंबे व त्यांच्यापुढील आव्हानांची कल्पना येते. प्राथमिक शिक्षण उत्तम झाल्याने जोतीरावांना वाचनाचा नाद लागला. मित्रांच्या सोबती, संगतीने ते मर्दानी खेळातही भाग घेऊ लागले. ख्रिस्ती मिशनरींची समाज विकास धडपड ते न्याहाळत. जोतीरावांनी १८४७ मध्ये इंग्रजी शाळेचा अभ्यास पूर्ण केला. त्यांनी वंशपरंपरागत फुलमाळ्याचा व्यवसाय सुरू केला.

प्रारंभी राजकीय क्षेत्राची ओढ एका विवाह प्रसंगाने बदलून सामाजिक झाली. ते जातीय विषमता व अन्यायाबद्दल विचार करते झाले. स्त्रिया व शूद्रांच्या शिक्षणविषयक प्रश्नांनी त्यांना अस्वस्थ केले. त्यावेळचा प्रगत ब्राह्मण समाजही स्त्री शिक्षणविरोधी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. सन १८४८ मध्ये हे लक्षात घेऊन त्यांनी मुलींची शाळा सुरू केली. मग त्यांनी तत्कालीन अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. दोन-तीन वर्षांतच त्यांच्या शाळांचा लौकिक समाजात पसरला व विरोधकच त्यांचे खंदे पाठीराखे बनले. स्त्री शिक्षण चळवळीने नंतर प्रसाराचे रूप धारण केले. यात पत्नी क्रांतिदेवी सावित्रीबाई फुले यांचा वाटा तितकाच मोठा आहे. तत्कालीन ब्राह्मण समाज वर्चस्वाच्या भ्रमातून जागा झाला तो बहुजन समाजातील आणि स्त्री, शूद्रांच्या शिक्षण प्रसारामुळे. अस्पृश्यता, धर्मांतर, शुद्धी, प्रायश्चित्त इ. प्रश्नांवर महात्मा फुले यांनी जातीय व धार्मिक सलोख्याचा उतारा दिला. पतित परिवर्तन भावनेपासून जोतीराव फुले यांनी स्वतःस दूर ठेवले. एकाच कुटुंबात हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम, यहुदी धर्मधारी असले तरी काही बिघडत नाही, असा आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विचार महात्मा फुले यांनी समाजाच्या गळी उतरवला.

नंतरच्या काळात महात्मा फुले यांनी आपला मोर्चा शिक्षणाकडून समाजसुधारणा, लेखन, प्रबोधन, जागृतीकडे वळवला. विधवा विवाह, पुनर्विवाहाचे ते समर्थक बनले. सन १८६५ ला त्यांनी 'जातिभेद विवेकसार' लिहिले. सन १८७३ला बालहत्या प्रतिबंधकगृहातील ब्राह्मण विधवेच्या मुलास आपला मुलगा मानले. त्यांचे कार्य पाहून लालशंकर उमियाशंकर त्रिवेदी यांनी सन १८७५ ला पंढरपूर येथे बालहत्याप्रतिबंध गृह सुरू केले. पुढे ते प्रार्थना समाजाने चालवले. अस्पृश्यता निवारण कार्य हाती घेऊन त्यांनी आपल्या घराजवळील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. महात्मा फुले ख्रिस्ती झाले अशी अफवा पसरूनही ते आपल्या समाजसुधारणा कार्यापासून तसुभरही ढळले नाही किंवा मन विचलित होऊ दिले नाही. त्यांनी ब्राह्मण्यविरोधी जागृती केली. शेती व कामगारांसाठी लढे उभारले.

इंटर कमिशनला निवेदन दिले. 'शेतकऱ्याचा असूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' इ. ग्रंथ रचले. सत्यशोधक समाज स्थापून पुरोहितशाही, कर्मकांड इ. ना फाटा दिला. 'निर्मिक' संकल्पना रुजवली. अर्धांगवायूने २८ नोव्हेंबर १८९० रोजी त्यांचे निधन झाले.

मराठी प्रबंध आणि चरित्रांची मीमांसा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी रचलेले दोन प्रबंध आणि लिहिलेली दोन चरित्रे ही त्यांची समज दृष्टी दाखवून देतात. 'आनंदमीमांसा' प्रबंधातून वैदिक, बौद्ध, जैन धर्मकालीन दुःखवाद, मोक्ष यांना छेद देत समाज सकारात्मक बनवण्याचा प्रयत्न म्हणून आनंद सिद्धांताकडे पाहायला हवे. आनंद ही माणसाची भावनिक व मानसिक स्थिती आहे. तिच्यामुळे मनुष्य ऊर्जास्रोत बनतो. असे असताना आपल्या प्राचीन ऋषी, मुनी आणि धर्मगुरूंनी जीवनाप्रती एक नकारात्मक दृष्टिकोन स्वीकारून जगास मायावी, संन्यस्त, उदासमना, मोक्षवादी, पीडामय व्यवहारात गुंतवले. मानव निसर्गतः आनंदयात्री आहे नि आनंदशोधकही. त्याला दमन, संयम इ. कृत्रिम वृत्तीचे शिक्षण देऊन निग्रही, नकारात्मक बनवले. 'आनंदमीमांसा'द्वारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी समाजास सक्रियता, सर्जन, सद्भाव शिकवत कर्मयोगाकडे नेले.

तीच गोष्ट 'जडवाद अर्थात अनीश्वरवाद'ची. ईश्वर तत्त्व हे दैववाद, चमत्कार, अवतार, अलौकिकतेकडे नेणारे. केवळ कल्पना नि तर्काचे ते अपत्य. त्यातून निर्माण होणारी पराधीनतेची वृत्ती, अंधश्रद्धेस खतपाणी घालण्याचा उद्योग अध्यात्मवादी, चमत्काराश्रित विचाराने धर्माच्या नावावर चालविला होता. त्यास शह देण्याच्या उद्देशाने सत्, चित्, चैतन्य, प्रेम, भक्ती, कर्मकांडापासून मुक्ती देणाऱ्या विज्ञान व विवेकावर उभारलेल्या जडवादाची मांडणी करून ईश्वर, अध्यात्म, अवतार, चमत्कार, दैव, भविष्य इ. गोष्टी सत्य या कसोटीवर न टिकणाऱ्या कशा हे सप्रमाण दाखवून दिले. भौतिकवाद, मार्क्सवाद, मानवतावाद हेच खरे मानवहितरक्षक विचार असून जे भूत तत्त्व नि विश्वाबाहेर स्वतंत्र आहे ते नाकारण्याचे बळ समाजास जडवाद आणि अनीश्वरवाद मांडून दिले. या प्रागतिक व मानवी कर्तव्याबद्दल तर्कतीर्थांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडे. वेदव्यासंगी माणसाने भौतिकवाद सांगणे हीच मुळात क्रांतिकारी गोष्ट होती. ते धाडस त्यांनी करून दाखवले.

हीच गोष्ट तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठी चरित्र लेखनाद्वारे केली. स्वामी केवलानंद सरस्वती मूलतः वेद अध्यासक नि न्याय, षड्दर्शने शिकविणारे आचार्य त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाची कास धरावी, पाठशाळेत आधुनिक ज्ञानविज्ञाने शिकवावी, याचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. माधुकरी मागून जीवन जगणारा एक नि:संग योगी पुरुष महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा सल्लागार बनतो. पुढे सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा करून ते मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करतो. त्यासाठी ब्रह्मवृंदाचा बहिष्कार सहन करतो, ते उपजत सुधारणावादी वृत्तीमुळेच. म्हणून स्वामी केवलानंद सरस्वती प्रा.वि.गो विजापूरकर

यांच्या समर्थ विद्यालयावर ब्रिटिशांनी टाच आणली म्हणून तेथील शिक्षकांसह विद्यार्थ्यांना आपल्या प्राज्ञपाठशाळेत सामावून घेतात. हे कार्य ब्रिटिशांचा रोष ओढवून घेणारेच होते. पण केवळ ते राष्ट्रीय आहे म्हणून स्वीकारणे यात राष्ट्रवाद होता तसा आधुनिकताही होती. धर्मनिर्णय मंडळाचे स्वामींचे कार्य हे धर्मांतर, शुद्धी, प्रायश्चित्त इ. कर्मकांडातून समाजास मुक्ती देत युक्ती सांगणारे ठरले. 'धर्मकोश' निर्मिती व अन्य ग्रंथरचना या स्वामी केवलानंद सरस्वतींच्या सुधारक स्वामीची प्रचिती होय.

चरित्र लेखनासाठी नायक म्हणून महात्मा जोतीराव फुले यांना निवडण्यात ब्राह्मण्यविरोधी व्यवहाराची ती प्रतिबद्धता होती, तसेच ते पुरोहित वर्गाचे वर्चस्व झुगारण्याच्या कृतसंकल्प म्हणूनही पाहता येते. ईश्वराजागी निर्मिक मानणारे, स्त्री-शूद्रांना शिकविणारे, विधवा-परित्यक्तांना अभय देणारे महात्मा फुले नि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचा त्याग, तळमळ नि समर्पण समाजाने त्यांचे चिरऋणाईत राहण्यासारखेच होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' ची रचना आणि सत्यशोधक समाज स्थापना या दोन्ही गोष्टी धर्मांध समाजास कर्मकांडमुक्त करणाऱ्या ठरल्या. शेतकरी व कामगार यांचे शोषण संपावे म्हणून 'शेतकऱ्याचा असूड', 'गुलामगिरी', 'सत्सार', 'इशारा' सारखे ग्रंथ रचून त्यांनी जे प्रबोधन कार्य केले, ते त्यांद्वारे त्यांच्या पश्चातही चालू आहे. ही असते एखाद्या समाजकार्याची व कार्यकर्त्याची दृष्टी.

दि. १५ मे, २०२२ **- डॉ. सुनीलकुमार लवटे**

जागतिक कुटुंब दिन **संपादक**

संदर्भ सूची

१) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **भारताचा इतिहास आणि इतिहास तत्त्व** - भारतेतिहास संशोधन मंडळ, पुणे संस्थेच्या वर्षदिनानिमित्त १२ जुलै १९५३ रोजी दिलेले भाषण. प्रसिद्धी-'अलका', दीपावली अंक, १९४९, पृ. ७ ते ११

२) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्** - पृ १६.

३) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री: **अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतील एक पर्व : येरवड्यातील धर्मपरिषद -** साप्ताहिक मौज, मुंबई, दि ३० जानेवारी १९४९, पृ. ११, १२, २३ ते २६ (या प्रकल्पातील खंड-९ (संकीर्ण मध्ये अंतर्भूत).

४) **The Collected works of Mahatma Gandhi, Vol - 58** (16 November 1932 to 14 January 1933), Pages 323 to 330.

5) **HARIJAN** - Editor R.V.Sastri; 11th February 1933, pg - 6. Weekly

६) गेडाम, तु. वि.: **अस्पृश्यता व तिचे मूळ** - कल्याण शिक्षण संस्था, १०३, टिकेकर मार्ग, धंतोली, नागपूर -४४००१२. रु.२५२/- पृ. ४००

७) द्वादशीवार, सुरेश: **'अस्पृश्यता व तिचे मूळ' ची प्रस्तावना** - साप्ताहिक साधना, पुणे/ १८ मे २०१३

८) मुरंजन, सुमंत: **पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास** - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९०, पृ. १७६.
९) जोशी, लक्ष्मणशास्त्री दप्तरी, के. ल. दिवेकर, महादेवशास्त्री चव्हाण, रा. ना रेगे, मे पुं. मराठे, ना. बा. (संपा.): **प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा -** प्रका. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. (१९९६). पृ. २२४ वरून उद्धृत
१० तत्रैव
११ तत्रैव, पृ. २३०
१२ तत्रैव, पृ. २३३
१३ तत्रैव, पृ. २३४
१४ वाडेकर, प्रो. देविदास दत्तात्रेय: **आनंदमीमांसा (ग्रंथ समीक्षण)** - लोकशिक्षण, डिसेंबर १९२८, पृ.७९८.
१५) केळकर, न.चिं.: **आनंदमीमांसा (अभिप्राय)** - पत्र, सिमला, दि. २६-९-१९२८.
१६) अंतरकर, शि. स: **आनंदमीमांसा - एक समीक्षा** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार, संपा. वसंत पळशीकर, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९६, पृ. १००.
१७) चव्हाण, रा. ना.: **तर्कतीर्थांच्या आठवणी** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार, संपा. वसंत पळशीकर, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. १९९६, पृ. २५
१८) तत्रैव

○○○

संस्कृत : प्रबंध व चरित्र

शुद्धिसर्वस्वम्

(संस्कृत)

ॐ

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ।

शुद्धिसर्वस्वम् ॥

सनातनधर्मप्रदीपस्थशुद्धिप्रकाशविमर्शसहितम् ।

सम्पादकः

श्रीमत्सकलविद्यावदाततपोनिधूतकल्मषान्तःकरणमराठेइत्युपाह्वनारायणशास्त्रिचरणानुगृहीतः

जोशीत्युपाह्वः लक्ष्मणशास्त्री

तर्कतीर्थः न्यायमार्तण्डः महाराष्ट्रसनातनधर्ममहासभामहोपदेशकः

प्राज्ञपाठशालीयनव्यन्यायवेदान्तधर्मशास्त्राद्यध्यापकः ।

वाईपुरीम्

शाके १८५०तमे वत्सरे

मुद्रकः—वासुदेव गोपाळ परांजपे, 'आर्यसंस्कृति-मुद्रणालय', चिमणबाग, टिळकरोड, पुणे
प्रकाशकः—लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई

अनुक्रमणिका ।

	विषयाः	पृष्ठानि ।
	भूमिका ।	१–४
१	विषयप्रवेशः ।	१
२	सनातनधर्मेतरमतप्रवेशमात्रप्रायश्चित्तविचारः ।	२
३	प्रकृतप्रमेयनिरूपणम् ।	४
४	म्लेच्छपदार्थनिरूपणम् ।	४
५	म्लेच्छसंसर्गे पातित्यविचारः ।	६
६	पतनपदार्थ : ।	६
७	संसर्गस्वरूपम् ।	७
८	संसर्गपातित्ये कालसंसर्गविशेषादिनियमविचारः ।	८
९	कामाकामकृतप्रायश्चित्तव्यवस्था ।	१२
१०	संसर्गपतितप्रायश्चित्तविचारः ।	१३
११	पतितसंततिविचारः ।	२५
१२	शिष्टाचारः प्रमाणं शुद्धौ ।	२७
१३	नास्यशुद्धिविचारः ।	२८
१४	म्लेच्छादीनां सनातनधर्माधिकारविचारः ।	३३
१५	अन्त्यजास्पृश्यतादोषविचारः ।	३४–३७

भूमिका

अस्ति हि महान्यामोहश्चेतसि केषांचिद्विदुषामास्तिकधौरेयाणां समालोचितश्रुतिस्मृतिनिबन्धादिप्रमाणजातानामपि यत्सनातनधर्मपथाद्विभ्रष्टानां न पुनस्तन्मार्गपुनरावर्तनोपायः कश्चिच्छास्त्रसंमतः, ये सनातनधर्ममहामन्दिराद्विनिःसृष्टा न तेषां पुनः संप्रवेशोपाय इति । तदिदं शास्त्रानालोचननिबन्धनमिति सुनिरूप्य पठितेऽस्माकीनेऽस्मिन्निबन्धे निर्णीतं भविष्यति । मात्सर्यं दूरत उत्सार्य समालोच्यतामयं निबन्ध इति मान्यान्विप्रान्प्रणम्य, भूयोभूयः सविनयं विनिवेदयामः ।

मोहमदादिमतस्वीकारमात्रे हि नास्तिक्यदोषापातोऽसच्छास्त्राधिगमाख्यदुरितसंपर्को वा, तन्निरासार्थं च मनुयाज्ञवल्क्याद्युक्तं चान्द्रायणाख्यमुपपातकप्रायश्चित्तमवगम्यते । म्लेच्छादिभिः सहभोजने तत्स्त्रीभिः संसर्गे च यद्यपि पातित्यं तथापि म्लेच्छान्नभोजनस्य 'निन्दितान्नादनं तथा' इति याज्ञवल्क्यवचनेनोपपातकरूपत्वेन, 'हीनयोनिनिषेवणं' इति याज्ञवल्क्यवचनेन 'अथोपपातकानि अगम्यागमनं गुर्वीसखीं गुरुसखीमपपात्रां च गत्वा' इति बौधायनवचनेन च म्लेच्छस्त्रीगमनस्य चोपपातकरूपत्वेन, तयोरज्ञानत आचरणे कृच्छ्रं, ज्ञानतश्चान्द्रायणं प्राप्तं भवति,

उपपातकशुद्धिः स्यादेवं चान्द्रायणेन तु ' इति वचनात् ।
पतितान्स्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा ॥ '

इत्यङ्गिरोवचनात् ।

अन्त्यानां भुक्तशेषं तु भक्षयित्वा द्विजातयः ।
चान्द्रं कृच्छ्रं तदर्धं च ब्रह्मक्षत्रविशां विधिः ॥

इत्यापस्तम्बवचनाच्च । अन्त्यशब्दस्य च मेधातिथ्याद्यनुसारेण म्लेच्छ इत्यर्थो निर्णीयते । म्लेच्छान्नभक्षणस्य ब्रह्मभ्यासे सुरापानसमत्वेन म्लेच्छस्त्रीगमनस्य च ब्रह्मभ्यासे गुरुतल्पसमत्वेनातिदेशिकं सुरापानस्य गुरुतल्पस्य चार्धं प्रायश्चित्तं निर्णीयते । साम्यातिदेशेऽर्धमिति बहुनिबन्धकारादृतन्यायानुसारात् । सुरापाने गुरुतल्पे च व्यब्दव्रतमाम्नातं भगवताऽऽपस्तम्बेन—

वाय १८४-४

> **इतरं कृत्वा सुरां पीत्वा गुरुदारं च गत्वा ब्रह्महत्यामकृत्वा चतुर्थ-कालामितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पं स्थानासनाभ्यां विहरन्त एते विभिर्वैपरेप पापं नुदन्ते ॥**

इति, एतच्च सार्धैकवर्षकृच्छ्रसमं तदर्धं च म्लेच्छान्नभोजनतत्स्त्रीगमनयोः, तच्च नव-मासकृच्छ्रं, तस्य प्रायाम्नायद्वय्यं तत्तदेशरीत्योह्यम् । न च म्लेच्छान्नभोजनतत्स्त्री-गमनयोः कथं सुरापानगुरुतल्पसमत्वमिति वाच्यम् ।

> **गर्हितानद्ययोर्जग्धिः सुरापानसमानि षट् ।**
> **रेतः सेकः स्वयोनीषु कुमारीष्वन्त्यजासु च ।**
> **सख्युः पुत्रस्य च स्त्रीषु गुरुतल्पसमं विदुः ॥**

इति वचनद्वयात्तयोस्तत्समत्वसिद्धेः । समत्वोक्तिश्चार्थप्रायश्चित्तसाम्यार्थेति बहु-निबन्धकाराहताः पन्थाः । अभ्यासतारतम्यानुसारेण प्रायश्चित्तविधायकानि बहूनि वचनानि समुद्धृतान्यस्माभिर्निबन्धे । तत्र चात्यन्ताभ्यासे भगवद्दापस्तम्बोक्तं प्रायश्चित्तमेव निर्देश्यं तथथा—

> **'अधर्माहृतान्भोगाननुज्ञाय न वयं चाधर्मश्चेत्यभिव्याहृत्याधोना-भ्युपरि जानुबाह्वन्तरे शिरो निधाय त्रिषवणमुदकमुपस्पृशन्नक्षीराक्षारलवणं भुञ्जानो द्वादशवर्षाणि नागारं प्रविशेत् । ततः सिद्धिः । अथ संप्र-योगः स्याद्दार्यैः । एतदेवान्येषामपि पतनीयानाम् ।'**

अत्रोक्तं द्वादशाब्दं षडब्दकृच्छ्रसमम् । तच्च अशीत्युत्तरगोशतदानसमम् । एतच्च

> **'चण्डालान्त्यास्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।**
> **पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति ॥'**

इत्यस्यापवादार्थमित्याह्योव्यबलाकारः । अन्त्यस्त्रीगमनभोजनादौ बहूनां तारतम्येन प्रायश्चित्तविधायकवचनानामुपलम्भेः । एतन्मनुवचनं प्रायश्चित्तगौरवज्ञापनार्थ-मेवेति मन्तव्यम् । यत्तु कृतप्रायश्चित्तानामपि पतितानां न पूर्वतनजातिसमावेशो न वा पूर्वजातौ विवाहादि गुरुतरः संसर्ग इति मत्स्यपीपदञ्चनन्तकृष्णशास्त्रि-चरणाः सनातनधर्मप्रदीपे तदत्यन्तमप्रामाणिकम् । मनुयाज्ञवल्क्यगीतमा-दिभिः पतितस्य प्रायश्चित्ताचरणानन्तरं समावेशनविधेस्तत्र तत्र प्रतिपादनात्, 'सर्वाणि ज्ञातिकार्याणि यथापूर्वं समाचरेत्' इत्यादौ । अधस्तनापस्तम्बीयेऽपि 'ततः सिद्धिः, अथ संप्रयोगः स्याद्दार्यैः' इत्याहृत्यैव निष्टङ्कनाच्च । वर्षादूर्ध्वं वर्ष-चतुष्टयाद्ऽनन्तरं म्लेच्छसंसर्गिणां न प्रायश्चित्तपूर्वकं पूर्वजातिसमावेश इति कश्चित्तदपि निर्मूलम् । यद्यपि देवलस्मृतौ वर्षचतुष्टयादूर्ध्वं 'प्रायश्चित्तं न विद्यते' इत्युक्तं तदपि प्रायश्चित्तगौरवज्ञापनार्थमेव । देवलरीत्या चान्द्रायणपराक-

चतुष्टययोरेव वत्सरचतुष्टये प्राप्तेर्द्वादशाब्दापेक्षयाऽधिकप्रायश्चित्तप्राप्तावेव मरणान्तप्रायश्चित्तपर्यवसाने प्रायश्चित्ताभावकथनोपपत्त्या प्रकृते च त्र्यब्दकृच्छ्रस्याप्यप्राप्त्या तद्वचनस्य निष्कृतिगौरवपरत्वेनैव नेयत्वात् । तथा च बहुवत्सरातिक्रमेऽपि संसर्गलाघवगौरवं निश्चित्य, अन्ततो गत्वा पापात्यन्तगौरवेऽपि आपस्तम्बोक्तं प्रायश्चित्तं विनिर्दिश्य पतितस्य समावेशने न शास्त्रं विरुणद्धीति निष्कर्षः।

पतितकन्यायास्तु न पातित्यं, **'पतितपुत्रः पतितो भवत्यन्यत्र स्त्रियः'** इति वसिष्ठानुसारादिति सर्वमतसिद्ध एव पतितकन्यायाः पूर्वजातिसमावेशः। पतितपुत्रस्यापि पतितप्रायश्चित्तं विधाय पूर्वजातिसंप्रवेशं न शास्त्रं बाधते । तथा च **बौधायनो**ऽकृतप्रायश्चित्तान्मरणान्तिकप्रायश्चित्ताद्धांश्च पतितानुपक्रम्याह—

> **'अथ पतिताः समवसाय धर्मांश्चरेयुरितरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुः विप्रव्रजतास्मभ्यः एवमार्यान्संप्रतिपत्स्यथ' इति।**

अत्र हि पुत्रोपदेशविधाने आर्यसमावेश उद्देश्यत्वेन कथितः, अनन्तरं च बौधायनेनैव हारीतमतेन पतितपुत्रस्य पातित्यं व्यवस्थाप्य—

> **' अशुचिशुक्लोत्पन्नानां तेषामिच्छतां प्रायश्चित्तिः पतनीयानां तृतीयोंऽशः।'**

इत्यनेन पतितपुत्रं प्रति पतनीयप्रायश्चित्तस्य स्वयमेवोक्तस्य त्र्यब्दव्रतस्य तृतीयोंऽशो विहितः। तच्च प्रायश्चित्तं पतितपुत्रस्य संव्यवहार्यतासंपादकं भविष्यति । अन्यप्रयोजनाभावात् । तथा च पित्रादिपरम्परया पातित्येऽपि पतितप्रायश्चित्तं चरित्वा पितृतो मातृतो वा संकराभावे भवति पतितसंततेः पूर्वतनजातिसंप्रवेशः।

येषां तु पितृतो मातृतो वा संकर एव मतान्तरप्रवेशानन्तरं समभूत्तेऽपि सनातनधर्मेऽधिक्रियन्ते । तेषां च शैववैष्णवादिदीक्षाद्वारा भवति सनातनधर्मप्राप्तिः ।

येषां पुनर्द्विजानां बहुपरम्परया नोपनयनादिसंस्कारस्तेषामपि सावित्रीपतितानां श्रौतसूत्रोक्तव्रात्यस्तोममिष्ट्वा संभवति द्विजातिकर्माधिकारः। व्रात्यत्वस्यैव तत्राधिकारितावच्छेदकत्वात्सङ्कोचे प्रमाणाभावात् ।

अन्त्यजानां स्पर्शविषयेऽपि सुनिरूपितं प्रमाणम् । अन्त्यजाद्यपेक्षयाऽपि जात्या कर्मणा च जघन्यानां म्लेच्छानां यदि संस्पर्शो न परिहार्यते तर्हि किमन्त्यजदर्शनेन । सार्वजनीनसभास्थानदेवालयजलाशयादौ तु स्पर्शदोषापवादकानि शास्त्रवचनान्येवोपलभ्यन्ते । यथाऽत्रिः —

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृश्यास्पृश्यैर्न विद्यते ॥

न चैतत्सूतकाशौचस्पर्शपरमिति वाच्यम् । प्रकरणविरोधात् । तत्र हि न सूतकाशौचप्रकरणं किन्त्वन्त्यजादिस्पर्शप्रकरणम् । अन्यानि च वचनानि निबन्धकारैरस्पृश्यस्पर्शापवादकत्वेनोपनिबद्धानि निबन्धे प्रपञ्चितानि ।

सर्वथा तु सामाजिककुशलाकुशलविचारपरामर्शेनैव धर्माधर्मविचिकित्साऽऽदरणीया न केवलं वचनबलेन लोकसंग्रहविरोधात् लोकानुग्रहार्थं च शास्त्रप्रवृत्तिरिति । तथा च महाभारतम्—

धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रं तु तृतीयो लोकसंग्रहः ॥

इति लोकसंग्रहशास्त्रयोः समन्वयं कृत्वा शास्त्राज्ञानुशासने न शास्त्रप्रामाण्यं विप्लवेत, न च समाजसेतुरुच्छिद्येतेति संचिन्त्य भारतीयानामापदमनुमन्यतामयं विचार इति मुहुर्मुहुः प्रार्थ्यन्ते पण्डितप्रवराः करुणावरुणालयाः॥

॥ शुद्धिसर्वस्वम् ॥

[विषयप्रवेशः]

विदितमिदं प्रज्ञावतां—आसीत्किलायं भारतवर्षो भुवनत्रयललामभूतः सकलजगतो गुरुर्धर्मे, षट्शास्त्रतत्त्वदार्शिनां जननस्थानं, स्वधर्मतेजसा विजितसुरलोकद्युतिः, जगतीतलवर्तिनानाद्वीपवासिभूपतिमौलिमालालालितचरणयुगलैर्विक्रमैकरसैश्चातुर्वर्ण्यरक्षणबद्धदीक्षैः पितृनिर्विशेषं प्रजां पालयद्भिर्नलनहुषययातिभरतभगीरथदशरथप्रभृतिभिरनुशासितः, शान्तैर्दान्तैर्निगृहीतेन्द्रियैर्ऋजुभिः क्षमाशीलैश्चतुर्विधपुरुषार्थोपदेशिभिश्च मुनिजनैः संसेवितः। शनैःशनैश्चापसृते तस्मिन्माथमिके काले, प्रवृत्ते च बद्धकवच इव सनातनधर्मोन्मूलने कलिकाले वैदेशिकैर्जजरीकृता भारतवर्षीयाः। निजधर्मपिशाचिकाकवलितान्तरैर्माहंमदीयैः करालतरकरवालबलाद्विविधप्रलोभनाच्च स्वधर्मतः प्रच्याविता आर्याः शूद्रा अन्त्यावसायिनश्च जीवनधर्मं परमं मन्यमानाः, अग्निसात्कृता धर्मग्रन्थाः, निर्मूलितं दर्शनजालम्। प्रलुप्तो विज्ञानशास्त्रनिकुरम्बः, पराहतानि इतिहासपुराणानि, संवृत्तं च चातुर्वर्ण्यं विकर्मस्थम्। समापतिते दुस्तरतमे एतादृश्यवसरे, निमग्ने चाशेषे भारतवर्षेऽन्धतमसि, प्रत्यहमपचीयते विशुद्धभारतीयानां संख्या, उपचीयन्ते सनातनधर्मद्वेष्टारः, वृत्र इव प्रवर्धन्ते वैदिकधर्मविध्वंसकाः, विजयन्ते च श्रुतिस्मृतिपुराणेतिहासागमपरिपन्थिनः। अद्यत्वेऽपि हि एते मिथ्याभिनिवेशिनो म्लेच्छा बलात्कारेण स्वमतं प्रवेशयन्त्यज्ञान्समक्षमार्याणाम्। परंतु अद्ययावद्व्यतीते समधिकसंवत्सरसहस्रके प्रगाढनिद्रां प्रसुप्ताः पण्डिताः। अनालोच्यैव शास्त्रमविचार्यैव परिस्थितिं, विस्मृत्य स्वकं कर्तव्यमविमृश्यापद्धर्मं, 'निषिद्धा पतितशुद्धि' रित्युद्घोषितं तैः, अविगणय्य भारतीयं संस्कृतिहासमविभाव्य च 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डित' इति न्यायम्। सप्तकोटिसंख्याका माहंमदीयाः पूर्वं सनातनधर्मीया एवासन्निति हि जोघुष्यत इतिहासविद्भिः। एककोटिसंख्याका भारतीयकृस्ताः स्वीया एवेति नः प्रत्यक्षमेतत्। प्रतिवर्षं च एकलक्षसंख्याकाः प्रविशन्ति खिस्तमतं भारतीया इति प्रसिद्धतमं राजकीयसंख्यानपट्टिकायाम्। तदिदं विभाव्य भारतीयं पतनं, साक्षात्कृत्वा च भारतधर्मविध्वंसनं, दन्दह्यन्ते

हृदयाणि साधूनां, दूयन्ते चेतांसि मनीषिणामिति । तदिदं मनसि निधाय शास्त्रश्रद्धालूनां परिस्थितिविज्ञानामापद्धर्ममुख्यधर्मतारतम्यकुशलधिषणानां कृते पतितप्रायश्चित्तविषयकशास्त्रालोचनार्थं प्रयत्यते । पतितश्चात्र म्लेच्छादिसंसर्ग-पतितो विवक्षितः इति ।

इदं चेहावधेयमस्माभिः किल नोपलब्ध एकोऽपि वचनाङ्कुरः संसर्ग-पतितशुद्धिविरुद्धः ।

[अथ सनातनधर्मेतरमतप्रवेशमात्रप्रायश्चित्तविचारः ॥]

वैदिकेतरमतप्रवेशमात्रं पातित्यकरं न वेति विचार्यमाणे न पातित्यकर-मित्येव निर्णयः तस्य पतनीयेषु काप्यगणनात् । अपि तु दुरदृष्टसम्पादकमात्रं तत् ।

अनाहिताग्नितास्तेयमृणानामनपक्रिया ।
असच्छास्त्राधिगमनं कौशीलव्यस्य च क्रिया ॥ मनु.
धान्यकुप्यपशुस्तेयं मद्यपस्त्रीनिषेवणम् ।
स्त्रीशूद्रविट्क्षत्रवधो नास्तिक्यं चोपपातकम् ॥ या.

इत्यादिषु मनुयाज्ञवल्क्यवचनेषु असच्छास्त्राधिगमनरूपमतान्तरप्रवेशस्य उपपातकरूपत्वात् । स्वल्पप्रायश्चित्तापनोद्यत्वं च तस्य—

एतदेव व्रतं कुर्युरुपपातकिनो द्विजाः ।
अवकीर्णिव्रजं शुद्ध्यर्थं चान्द्रायणमथापि वा ॥ मनु.
उपपातकशुद्धिः स्यादेवं चान्द्रायणेन तु ।
पयसा वापि मासेन परार्कमथवा पुनः ॥ याज्ञवल्क्यः

इति मनुयाज्ञवल्क्यवचनाभ्यां चान्द्रायणादेरुपदेशात् । चान्द्रायणस्य च गोदानत्रयं प्रत्याम्नायो द्वादशाणकावधिनिष्क्रयद्रव्यं वा । ननु गौतमेन नास्तिक्यस्य पतनीयेष्वनुक्रमणात्कथं न पतितप्रायश्चित्तार्हतेति चेन्न । गौतमीयना-स्तिक्यपदस्य वैदिकधर्मद्वेषरूपात्यन्तनास्तिक्यपरत्वात् । असच्छास्त्राधिग-मनस्य उक्तवचनयोर्नास्तिक्यातिरिक्तत्वेन पाठाच्च मतान्तरप्रवेशस्य नास्तिक्यरूप-त्वेन पतनीयत्वेऽपि अल्पप्रायश्चित्तापनोद्यदुरितत्वमेवोपपातकत्वेन 'नास्तिक्यं चोप-पातक' मिति मन्वादिवाक्य उक्तत्वात् । तथा च **वासिष्ठो**ऽपि 'नास्तिकः कृच्छ्रं द्वादशरात्रं चरित्वा विरमेन्नास्तिक्या**न्नास्तिक्यवृत्ति**श्चातिकृच्छ्रादिति । न च पतितानां द्वादशवार्षिकप्रायश्चित्तादिनैव दुरितव्युदासो न स्वल्पप्रायश्चित्तेनेति वाच्यम् ।

(१) कामतोऽविक्रेयविक्रयादेः पातित्यप्रयोजकत्वेऽपि उक्तवचनविरो-धात्कृच्छ्रत्रयादिना दोषव्यपोहाम्नानाच्च तादृशनियमे प्रमाणाभावात् ।

तथा चाङ्गिराः—पालनं विक्रयश्चैव तद्वृत्त्या उपजीवनम् ।
पतितस्तु भवेद्विप्रस्त्रिभिः कृच्छ्रैर्व्यपोहति ॥
संवर्तः— कुर्यात्कृच्छ्रं समानं तत्षण्मासांस्तदनन्तरम् ।
पतनीयेष्वप्ययं दृष्टः प्रायश्चित्तविधिः शुभः ॥
शंखलिखितौः—तिलतैलदधिक्षौद्रलवणद्राक्षामद्यमांसकृतान्नस्त्रीपुरुषहस्त्य
श्ववृषगन्धरसक्षौमकृष्णाजिनसोमोदकनीलीविक्रयात्सद्यः पतति ब्रा-
ह्मण इत्युपक्रम्य वत्सरं तप्तकृच्छ्रमाचरेदिति ।
हारीतोऽपि—लाक्षालवणमधुमांसतैलक्षीरदधिघृतगन्धान्यतमविक्रये चा-
न्द्रायणम् ।
पराशरः— विक्रीय कन्यकां गां च कृच्छ्रं सांतपनं चरेत् ।
चतुर्विंशतिमतेः— नारीणां विक्रयं कृत्वा चरेच्चान्द्रायणं व्रतम् ।
द्विगुणं पुरुषस्यैवं व्रतमाहुर्मनीषिणः ॥

(२) पुरुषवधस्यापस्तम्बेन पतनीये परिगणनेऽपि
वैश्यं शूद्रं क्रियासक्तं विकर्मस्थं द्विजोत्तमम् ।
हत्वा चान्द्रायणं तस्य त्रिंशद्गाश्चैव दक्षिणाः ॥
इति पराशरोक्तेरल्प प्रायश्चित्तप्रतीतेः ।
क्षत्रियस्य वधं कृत्वा चरेच्चान्द्रायणत्रयम् ।
वैश्यस्य तु द्वयं कुर्याच्छूद्रस्यैन्दवमेव तु ॥

इत्यपि वचनमेतदेवोपोद्बलयति । अस्मिन्नेव विषये मनूक्तानि त्रैमासिक-
द्वैमासिकमासिकान्युपपातकप्रायश्चित्तान्यूह्यानि । अकामतस्तु याज्ञवल्कीय-
त्रिरात्रोपवाससहितमृषभैकादशगोदानं द्रष्टव्यम् ॥

देवलोऽपि— चौरः श्वपाकश्चाण्डालो विप्रेणाभिहतो यदि ।
अहोरात्रोषितो भूत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥

(३) अभक्ष्येषु पलाण्डुगृञ्जनादीनां भक्षणे पातित्यमुक्तं मनुना ।
छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डुं गृञ्जनं चैव मत्या जग्ध्वा पतेन्नरः ॥
तत्र प्रायश्चित्तिस्तु अज्ञानतः सकृद्भुक्ते यमः—
लशुनं कवकं चैव पलाण्डुं गृञ्जनं तथा ।
चत्वार्यज्ञानतो जग्ध्वा तप्तकृच्छ्रं चरेद्द्विजः ॥
ज्ञानतस्तु याज्ञवल्क्यः—
पलाण्डुं विड्वराहं च छत्राकं ग्रामकुक्कुटम् ।
लशुनं गृञ्जनं चैव जग्ध्वा चान्द्रायणं चरेत् ॥

अन्यत्र च कामतोऽभ्यासे पुनःसंस्कारोऽपि विहितः । पुनःसंस्कार उपनयनम् । तेन विना द्विजातिकर्मानधिकारात् । अत एव महापातकादिनापि पतितानां बौधायनापस्तम्बादिविहितत्रैवार्षिकप्रायश्चित्तोपपत्तिः । एवमेव 'यौनस्त्रीवमुख्यैः सद्यः पतती' ति विष्णुवचनात्पतितस्त्रीसंगस्य पातित्यावहत्वेऽपि

पतितान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा ॥

इति **यम**वचनमुपपद्यते । तथा च पातित्यप्रयोजकानां द्वादशाब्दापेक्षयाऽत्यन्तन्यूनप्रायश्चित्तवचनानि परःशतान्युपलभ्यन्ते शास्त्र इति उपपन्ना खैस्तमोहंमदादिमतप्रविष्टानां मतान्तरप्रवेशप्रयुक्तस्य नास्तिक्याचारप्रयुक्तस्य वा दुरितस्य निष्कृतिश्चान्द्रायणादिनैवाल्पप्रायश्चित्तेन ।

[अथ प्रकृतप्रमेयनिरूपणम् ।]

ये खलु म्लेच्छैः सहैकामत्रेऽन्नभोजनेन तत्कन्यासंबन्धकरणेन तैः साकं शयनाशनादिव्यवहारप्रवर्तनेन च स्वधर्माप्रच्युताः, संसर्गपतिताख्यानां तेषां प्रायश्चित्तविचारः संव्यवहार्यताविचारश्च कर्तव्यः संप्रति । तेषु केचिदल्पसंख्याका कामतः परिभ्रष्टाः । बहवस्तु तदात्वे कराले काले म्लेच्छाधिराजनिदेशातिक्रमे सद्य एव सकलस्वान्वयनाशं निश्चित्य प्राणत्राणमेव कर्तव्यं मन्यमाना ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रा म्लेच्छीभूताः पुत्रपौत्रादिपरम्परया प्रसूताश्च । अपरे च स्वयमेव प्रलोभनादिना बलात्कारेण वा म्लेच्छेषु प्रविष्टाः शास्त्रविहितप्रायश्चित्ताज्ञानात्पूर्वतनजातीयैरस्वीकाराच्च बहुवत्सरपर्यन्तं पतितावस्थायामेवावस्थिताः । त एते सर्वे यदि स्वां नास्तिकतामवधार्य प्रायश्चित्ताचरणेन नरकतरणोपायं वारंवारं प्रणिपत्य प्रार्थयेरन्, तर्हि ते कथंचिदपि नास्तिक्यतो मुक्तिं स्वोचिताचारोपदेशं, तत्तज्जातीयमातृपितृजानां च पूर्वतनजातिप्रवेशं, पूर्वतनजातीयैः साकं विवाहादिगुरुतरसंसर्गं चार्हन्ति न वा ? जन्मतः प्रभृत्याश्रितनास्तिक्यदोषमोषकं च तेषां कीदृशं प्रायश्चित्तम् ? इत्यादिकं बहुतरं विचारणीयम् ।

[अथ म्लेच्छपदार्थनिरूपणम् ।]

तत्र तावत्के म्लेच्छा इति विचार्यम्। मन्वते हि बहवः 'न संभवत्यस्माकं धर्मशास्त्रे म्लेच्छविषयकः परामर्शः, आधुनिक एव हि संनिकर्षस्तैः सह भारतीयानां, ततः पूर्वतनस्मृतिशास्त्रे कथं नाम म्लेच्छविषयक उल्लेखो घटेत?' तदेतदज्ञाननिबन्धनम् । तथा च **स्मृतितत्त्वे**

बौधायनः—गोमांसखादको यस्तु विरुद्धं बहु भाषते ।
सर्वाचारविहीनश्च म्लेच्छ इत्यभिधीयते ॥
हरिवंशे— सगरस्तां प्रतिज्ञां च गुरोर्वाक्यं निशम्य च ।
धर्मं जघान तेषां वै वेषान्यत्वं चकार ह ॥
अर्धं शकानां शिरसो मुण्डयित्वा व्यसर्जयत् ।
यवनानां शिरः सर्वं काम्बोजानां तथैव च ॥
पारदा मुक्तकेशाश्च पह्लवाः श्मश्रुधारिणः ।
निःस्वाध्यायवषट्काराः कृतास्तेन महात्मना ।
शका यवनकाम्बोजाः पारदाः पह्लवास्तथा ।
कोलिसर्पाः समहिषा दर्वाश्चोलाः सकेरलाः ॥

अथ शकाः शकदेशोद्भवाः क्षत्रियास्तथा जवनादयोऽपि ।

विष्णुपुराणे—ते चात्मधर्मपरित्यागान्म्लेच्छत्वं ययुरिति ।
मनुश्च— शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥
पौण्ड्रकाश्चौड्रद्रविडाः काम्बोजा यवनाः शकाः ।
पारदाः पह्लवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥
मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।
म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ॥

एतेषां च 'दस्यु' इत्यपरनामधेयानां म्लेच्छानां धर्मा राजधर्मे पञ्चषष्टितमाध्याय आम्नाताः । **ब्रह्मोत्तरखण्डे** च शिवपञ्चाक्षरं प्रक्रम्य—

न कालनियमश्चात्र जप्यः सर्वैरयं मनुः ।
वैश्यैः शूद्रैर्भक्तियुक्तैर्म्लेच्छैरन्यैश्च मानवैरिति ॥

अन्त्यशब्देन च म्लेच्छा अपि व्यवह्रियन्ते निबन्धकारैः । अत एव 'चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा' इत्यादौ **मेधातिथिकुल्लूकादयः** षट् टीकाकाराः— **'म्लेच्छा दिगन्तवासिनः अन्त्याः'** इति प्रतिपादयन्ति । वृषलपदादपि म्लेच्छग्रहणमिति मन्तव्यं, **'वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ।'** इति मानवदर्शनात् । तथा च अन्त्यवृषलदस्युम्लेच्छशब्दैर्यवनादयो भारतवर्षबहिष्ठाः सर्वे शिखानष्टाः शिखाविशिष्टा वा चीनादयो गृह्यन्ते । म्लेच्छत्वं च श्रुतिस्मृतिपुराणतन्त्रादिसदागमप्रतिपाद्यधर्महीनत्वे सति गोमांसभक्षकत्वे सति पितृमातृपरम्परया असच्छास्त्रानुयायित्वम् । उक्तबौधायनवचनेनोक्तार्थस्यैवोन्नयनात् ।

भारतवर्षीया म्लेच्छाः खल्वपपात्रा एव, सापिण्डयादिनिर्णयमनुरुध्य विवाहाद्यभावात् । पतितब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रस्त्रीपुरुषाणां तन्मतप्रविष्टानाम-

शुद्धिसर्वस्वम् ।

निर्बन्धं वहोः कालादारभ्य विवाहादिना संकरपरम्परायाः प्रवर्तमानत्वात् । चण्डालपुक्कसादिभिश्च स्वीकृततदीयागमैरनवरतं संकराच्च । एते च न महापातकित्वेन परिगणनीयास्तादृशदोषादर्शनात् । केषांचित्तथात्वेऽपि समुदायशोऽतथात्वात् ।

[अथ म्लेच्छसंसर्गे पातित्यविचारः ।]

ननु म्लेच्छैः साकं संसर्गे पातित्यं कुत्र विधीयते, न तावत्—

'संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्यौनान्न तु यानासनाशनात् ।'

इत्यत्र **मानवे** । तत्र पतितपदस्य प्रथमचतुर्विधमहापातकिपरत्वात् । नापि **'तैश्चाब्दं समाचरन्' इति गौतमीये** तदव्यवहितपूर्वपठितपतितेषु म्लेच्छानामगणनात् । नापि 'असंयोगसंयोग' इत्याप**स्तम्बीये** । असंयोगपदार्थनिर्णयादिति चेन्न । **आपस्तम्बधर्मसूत्रे** तावत् **'न पतितैः संव्यवहारो विद्यते तथाऽपपात्रैः'** इत्यभिधायाव्यवहितोत्तरं च पतनीयान्यनुक्रम्य **'असंयोगसंयोग'** इत्यनेन संयोगानर्हाणां सर्वेषां पतितानामपपात्राणां म्लेच्छानां चासंयोगपदप्रतिपाद्यत्वेन ग्रहणात् । पतितपदस्य च सर्वधर्मबहिष्कृतवाचकत्वेन म्लेच्छानां चानुपदोक्तवचननिकुरम्बे सर्वधर्मपरित्यागप्रयुक्तदस्युभावाभिधानेन पतितपदजन्यबोधविषयत्वानपायाच्च । न च पतितपदस्य केवलचतुर्विधमहापातकिमात्रपरत्वमिति साम्प्रतम् । अन्येषामपि पतितानां भूयसां स्मृतिशास्त्र उपलब्धेः । पतितपदप्रतिपाद्यत्वाभावेऽपि च म्लेच्छानां संवत्सरेण पततीत्याद्युक्तवाक्यविषयत्वं नापैति, पतितसमानधर्मत्वात्तेषाम् । तथा च **याज्ञवल्क्यः**

'चण्डालपुक्कसम्लेच्छभिल्लपारसिकादिकान् ।
महापातकिनश्चैव स्पृष्ट्वा स्नायात्सचेलकः ॥'

इति पतितैः समानत्वमवगमयति । किं चातो यदि पतितत्वं यदि वा पतितसमानत्वं म्लेच्छानां ? शृणु, पतितविषये यत्तदप्यसति बाधके म्लेच्छसंसर्गिण्यपि प्राप्नोति ।

तथा चोशनाः— बहूनामेकधर्माणामेकस्यापि यदुच्यते ।
सर्वेषां तद्भवेत्कार्यमेकरूपा हि ते स्मृताः ॥

[अथ पतनपदार्थः ।]

ननु किमत्र पतनं नाम, न तावत्प्रायश्चित्तविवेककृदुक्तं द्वादशवार्षिकप्रायश्चित्तापनेयं पापं पतनम् । पलाण्डुभक्षणशूद्रादिवधनील्यादिविक्रयादिष्व-

व्याप्तेः । नापि द्विजातिकर्मानधिकारापादकं पातकं पतनम् । शूद्रादिपतने तदोषतादवस्थ्यात् । नापि महापातकानपकृष्टं पातकं पतनमविक्रेयविक्रयस्य तथात्वे प्रमाणाभावादिति चेन्न । 'द्विजातिकर्मभ्यो हानिः पतनं परत्र चासिद्धिः' इति **गौतम**वचनानुरोधेन स्वजातीयकर्मानधिकारप्रयोजकतावच्छेदकदुरितत्वव्याप्यजातिमत्त्वं पतनत्वमिति लक्षणस्य निष्कृष्टत्वेन स्वीकारे सर्वदोषप्रसंगात् । नापि शूद्रपतनेऽव्याप्तिस्तत्रापि समन्वयात् ।

[अथ संसर्गस्वरूपम् ।]

संसर्गः कतिविधः कश्च पातित्यापादक इत्यादिकमिदानीं विवेचनीयम् । तत्र

बृहस्पतिः – **एकशय्यासनं पङ्क्तिर्भाण्डपङ्क्त्यन्नमिश्रणम् ।**
याजनाध्यापने योनिस्तथा च सहभोजनम् ।
नवधा संकरः प्रोक्तो न कर्तव्योऽधमैः सह ॥

'योनिः पातकिने कन्यादानं तत्कन्यापरिणयनं वा' इति **विज्ञानेश्वरादयः**

पराशरः— **आसनाच्छयनाद्यानाद्भाषणात्सहभोजनात् ।**
संक्रामन्ति हि पापानि तैलबिन्दुरिवाम्भसि ॥

देवलः— **संलापस्पर्शनिःश्वाससहशय्यासनाशनात् ।**
याजनाध्यापनाद्यौनात्पापं संक्रमते नृणाम् ॥

छागलेयोऽपिः – **आलापाद्गात्रसंस्पर्शान्निःश्वासात्सहभोजनात् ।**
सहशय्यासनाध्यायात्पापं संक्रमते नृणाम् ॥

अयं हि संसर्ग उत्तमो मध्यमः कनीयांश्च । तत्राद्यश्चतुर्धा—यौनसौवमुख्यैकपात्रभोजनभेदात् । अत्र यौनो विवाहसंबन्धः, सौवो याजनसंबन्धः, मुख्यश्चाध्यापनसंबन्धः ॥ मध्योऽपि चतुर्धा एकयानासनशय्यैकपङ्क्तिभोजनभेदात् । अन्त्यस्तु–संलापस्पर्शनिःश्वासैकभाण्डतत्स्पृष्टतदीयान्नभोजनतत्प्रतिग्रहादिभेदादनेकप्रकारः । एषु संसर्गेषु प्रथमो गुरुः, द्वितीयो मध्यमः, तृतीयो लघुरिति हि निबन्धकारा आशेरते । पुनश्चायं द्विविधः, ब्रह्महत्यासुरापानगुरुतल्पगमनस्वर्णस्तेयात्मकचतुर्विधमहापातकिभिस्तादितरपतितैश्च । तत्र प्रथमो महापातकमेव ।

तथा च मनुः – **ब्रह्महत्यासुरापानं स्तेयं गुर्वङ्गनागमः ।**
महान्ति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह ॥

याज्ञवल्क्येऽपि—**ब्रह्महा मद्यपः स्तेनस्तथैव गुरुतल्पगः ।**
एते महापातकिनो यश्च तैः सह संवसेत् ॥

द्वितीयस्तु उपपातकमेव । मत्याऽत्यन्ताभ्यासे तु महापातकसमप्रायश्चित्तार्हः । न चोपपातकत्वे कथं पातित्यावहत्वमिति सांप्रतम् । अधस्तादेव पतितेषू-

शुद्धिसर्वस्वम् ।

पपातकित्वेनोक्तानां नास्तिकानामविक्रेयविक्रयिणां निन्दितान्नाद्यानां क्षत्रियविट्-शूद्रादिमनुष्यहन्तॄणां वृषलीनिषेविणां च परिगणनस्य विस्तरश उपपादितत्वात् । इदं त्वत्रावधेयं—यत् उपपातकेन पतितानां संसर्गे महापातकत्वकथनमत्यन्तमप्रामाणिकमिति ।

[अथ संसर्गेपातित्ये कालसंसर्गविशेषादिनिगमविचारः ।]

तत्र तावत्पतितसंसर्गे पातित्यमाह**ापस्तम्बः**-'न पतितैः संव्यवहारो विद्यते तथाऽपपात्रैः । अथ पतनीयानि । स्तेयमभिशस्यं पुरुषवधो ब्रह्मोज्झं गर्भशातनं मातुः पितुरिति योनिसंबन्धे सहापत्ये स्त्रीगमनं सुरापानम**संयोगसंयोगः** गुर्वीसखीं गुरुसखीं गत्वाऽन्यांश्च परतल्पान्गुरुतल्पं पततीत्येके । अधर्माणां तु सततमाचार' इति । **गौतमः**-'ब्रह्महसुरापगुरुतल्पगमातृपितृयोनिसंबन्धगस्तेननास्तिकनिन्दितकर्माभ्यासिपतितात्याग्यपतितत्यागिनः पतिताः । पातकसंयोजकाश्च । तैश्चाब्दं समाचरन् । त्रीणि प्रथमान्यनिर्देश्यानीति **मनुरिति** । कालमर्यादा चोक्ता तत्रतत्र मन्वादिभिः । यथा **प्रायश्चित्तविवेके**

मनुर्विष्णुश्च – संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्योनाच्च तु यानासनाशनात् ॥
पैठीनसिः—संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्योनाच्च त्वेवं शयनासनात् ॥
हारीतः— संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्योनादेकशय्यैकभोजनात् ॥
बृहस्पतिः—षण्मासिके तु संसर्गे याजनाध्यापनादिना ।
एकत्राशनशय्याभिः प्रायश्चित्तार्धमाचरेत् ॥
संवत्सरेण संसर्गे योनियुक्ते विशेषतः ।
पूर्वोक्तेन विधानेन पतितव्रतमाचरेत् ॥

कल्पतरौ सुमन्तुः – यश्च तैर्यौनमौख्यस्त्रौवाणां संबन्धानामन्यतमेव सह संपर्कमियात्तस्याप्येतदेव प्रायश्चित्तम् ॥
विष्णुः— संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् । एकयानभोजनासनशयनैः । यौनस्त्रौवमुख्यैस्तु सद्य एव ।
देवलः – याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम् ।
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः ॥
कौर्मे— याजनं योनिसंबन्धं तथैवाध्यापनं द्विजः ।
कृत्वा सद्यः पतेज्ज्ञानम्सहभोजनमेव च ॥

शुद्धिसर्वस्वम् ।

अज्ञानादथवा मोहात्कुर्यादध्यापनं द्विजः ।
संवत्सरेण पतति सहाध्ययनमेव च ॥

प्रायश्चित्तमयूखे बौधायनः—संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्योनात्सद्यो न शयनादिति ॥

कौर्मे— संवत्सरं तु पतितैः संसर्गं कुरुते तु यः ।
यानशय्याशनैर्नित्यं जानन्वै पतितो भवेत् ॥

देवलः— पतितेन सहोषित्वा जानन्संवत्सरं द्विजः ।
मिश्रितस्तेन सोऽब्दान्ते स्वयं च पतितो भवेत् ॥
संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
भोजनासनशय्याभिः कुर्वाणः सार्वकालिकम् ॥

शूलपाणौ संवर्तः— एभिः संसर्गमायाति यः कश्चित्काममोहितः ।
षण्मासानब्दमेकं वा ब्रह्महत्यावतं चरेत् ॥

व्यासः— यो येन संपिबेद्धर्मं सोऽपि तत्समतामियात् ।
पादन्यूनं चरेत्सोऽपि तस्य तस्य व्रतं द्विजः ॥

एतद्धि वचनजातं परस्परविरुद्धमर्थमभिदधत्संदेहमुपजनयति, विप्रतिपद्यन्ते च व्याख्यातारः । तत्र एकत्र यानभोजनासनशय्यादिसंबन्धी त्रिविधो विरोधः । मनुपैठीनसिवचनयोः सरलार्थग्रहणे एकत्र भोजनादिकं न पातित्यप्रत्यवायजनकं वर्षपर्यन्तमनुष्ठानेऽपि, अपि तु याजनाध्यापनादिकमेवेत्यर्थः प्रतिभाति। हारीतबृहस्पतिविष्णुकौर्मदेवलवचनेषु तु संवत्सरं भोजनादिसंसर्गे पातित्यमभिहितम् ।

याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम् ।
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः ॥

इत्यस्मिन्देवलवचने च सहभोजनमपि सद्यः पातित्याधायकं प्रतीयते । एवं यौनयाजनाध्यापनादिविषयेऽपि वाक्यद्वैधं दृश्यते । मनुपैठीनसिवाक्ययोर्यथाश्रुतार्थग्रहणे हारीतबृहस्पतिसुमन्तुवचनेषु च संवत्सरं यौनादिसंबन्धात्पातित्यं बुध्यते। विष्णुदेवलकौर्मवाक्ये च यौनादिसंबन्धेभ्यः सद्यःपतनमवगम्यते । सैषा परस्परपराहतिः कथं निर्णयपदं यास्यति । तत्र **जिनकादय** एवं व्यवस्थापयन्ति । समुच्चितानामेव यौनयाजनाध्यापनानां सद्यःपातित्यहेतुत्वं, प्रत्येकहेतुत्वं तु संवत्सरसंसर्गे। भोजनादिविषये मनुपैठीनसिवचनं व्युत्क्रमेणान्वयमुपगम्य याजनाध्यापनाद्योनान्न तु संवत्सरेण किन्तु सद्य इत्यर्थे नेयम् । तथा हि — यदि प्रत्येकं विभक्तिनिर्देशाद्याजनं कृत्वा पतति, योनिसंबन्धं कृत्वा पततीत्येवमभिधीयेत तदा कृत्वा पततीत्यन्वयावृत्तितात्पर्यावृत्तिभ्यां वाक्यभेदः, चत्वारि च वाक्यानि स्युः । अतः कृत्वेति पदेन तन्त्रेण याजनादिकर्मचतुष्टयमुपादाय

पततीति संबन्धे बोधिते नञो वाक्यभेद आपद्येत । स्वस्वपदेन पृथगुपनीतानामपि कृत्वेति पदेन तन्त्रेणोपनयात् । दर्शपौर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेतेत्यत्राग्नेयादियागषट्कानामिव । अत एव वाक्यानुरोधाद्याजनादीनां समुचितानां सद्यःपातित्यहेतुत्वम् । पूर्वोक्तसुमन्त्वादिवचनादेकैकेषां संवत्सरेण ।

विज्ञानेश्वरशूलपाणिप्रायश्चित्तमयूखकारादयश्चैवं वर्णयन्ति — ' गुरुणि गुरु लघुनि लघु ' इति गौतमस्मरणात्सर्वत्रैतमेव न्यायमनुसृत्य व्यवस्था स्वीकार्या । गुरुलघुभेदेन द्विविधं याजनादिकं भवति । तत्र गुरुणा ज्ञानकृतेन याजनादिना एकैकेन सद्यःपातः । तेनैवाज्ञानकृतेन वारद्वयाभ्यासात् । 'स्यात्त्वकामकृते यत्तु द्विगुणं बुद्धिपूर्वके' इति शास्त्रात् । लघुनि याजनाद्यज्ञानकृते वत्सरेण पातः । एतस्मिन्नेवं ज्ञानकृते वत्सरार्धेनेति व्यवस्था । तथा हि, याजनं योनिसंबन्धमित्यत्र देवलवचने पतितेन सहोपित्वा जानन्निति पूर्ववचनस्थजानान्नितिपदसंबन्धाज्ज्ञानकृतत्वं दर्शितम् । गुरुत्वं च देवलेनैव याजनाध्यापनपदयोर्गुरुयाजनाध्यापनयोरुपसंहारादर्शितम् ।

यथा देवलः— **आचार्याङ्गतनियमशुश्रूषादिभिस्त्रयीविद्योपादानमध्ययनम् । तस्याचारान्वयोपक्रमसामर्थ्यभक्तिशीलशुश्रूषोपनताय शिष्याय प्रदानमध्यापनम् । पशुक्षीराज्यपुरोडाशसोमौषधिचरुप्रभृतिभिर्हविर्भिः खदिरपलाशाश्वत्थन्यग्रोधोदुम्बरप्रभृतिभिः समिद्भिः स्रुक्स्रुवोलूखलमुसलकुठारखनित्रयूपदारुचर्मदर्भप्रायपवित्रभाजनादिभिर्द्रव्योपकरणैरुद्गातृहोत्रध्वर्युब्रह्मादिभिर्ऋत्विग्भिः काम्यनैमित्तिकानां पक्षादिपूर्वकाणां यथोक्तदक्षिणानां यज्ञानां समापनं यजनम् । एतेन याजनं व्याख्यातम् ॥**

अत्रोपक्रम उद्यमः । अतः उपनयनपूर्वकमध्यापनं ज्योतिष्टोमादियज्ञानां च याजनं गुरु । तत्साहचर्याद्यौनं परिणयनरूपं गुरु मन्त्रहोमादिसाध्यत्वात् । स्तेयादिना पतितान्यब्राह्मण्यां गमनं वा ब्राह्मणस्य तदपेक्षया पतितस्वब्राह्मणीगमनपतितशूद्रागमनयोर्लघुत्वात् सहभोजनं पतितान्नस्य पतितेन सहैकपात्रे भोजनं गुरु । उपनयनं विना वेदाध्ययनं, अष्टकादियज्ञयाजनं, पतितस्वब्राह्मणीगमनं, पतितशूद्रागमनं, अपतितान्नस्य पतितेन सहैकपात्रे भोजनं पतितोच्छिष्टभोजनं वा पूर्वोक्तयाजनादिभ्यो लघु । देवलवचने ज्ञानतो गुरुणा याजनादिना सद्यःपतनम् । मन्वादिवचनेनाज्ञाते लघुना याजनादिना संवत्सरेण पतनमिति गम्यते । ज्ञानतः सकृत्कृतेन येन पतनं तेनाज्ञातेन वारद्वयाभ्यासेन । अज्ञानतो वत्सरेण येन पतनं तेन ज्ञानतः षड्भिर्मासैरिति वचनद्वैधसामञ्जस्यम् ।

तदेतन्न मनोरमं विज्ञानाम् । भोजनादिविषयस्य त्रिविधविरोधस्यै-भिरपरिहारात् । वयं तु लघुगुरुभावस्य त्रैविध्यमुपगच्छामः । तथा हि—अध्ययने त्रैविध्यं तावदुपनयनपूर्वकवेदाध्ययनतदपूर्वकवेदाध्ययनाङ्गाध्ययनभेदात् । यजनमपि त्रिप्रकारं, श्रौतस्मार्ततान्त्रिकभेदात् । यौनमपि त्रिवर्गं, पतितस्त्रीपरिणयन-पूर्वकगमन - पतितान्यब्राह्मणीगमन - परिणयानन्तरपतितस्वब्राह्मणीगमनादिभेदात् । भोजनं च चतुर्धा व्यवतिष्ठते, पतितान्नस्य पतितेन सहैकामत्रे भोजनं, अपतितान्नस्य पतितेन सहैकामत्रे भोजनं, पतितादिपङ्क्तिभोजनं, पतितस्वामिकान्नभोजनं चेति भेदात् । एतेन कामतः संसर्गे **सुमन्तुवचनं**–

पञ्चाहे तु चरेत्कृच्छ्रं दशाहे तप्तकृच्छ्रकम् ।
पराकस्त्वर्धमासे स्यान्मासे चान्द्रायणं चरेत् ॥
मासत्रये प्रकुर्वीत कृच्छ्रं चान्द्रायणोत्तरम् ।
षाण्मासिके तु संसर्गे कृच्छ्रं त्वब्दार्धमाचरेत् ॥
संसर्गे त्वाब्दिके कुर्यादब्दं चान्द्रायणं नरः ॥ इति

अत्राब्दसंसर्गस्य किंचिन्न्यूनकालसंसर्गपरत्वं माधवविज्ञानेश्वरादिभिरुक्तमन्यत्राब्दसंसर्गस्य पातित्यप्रयोजकत्वोक्तेरित्यादिकं समाहितम् । अब्दसंसर्गेति तृतीयप्रकारत्वस्य चतुर्थप्रकारत्वस्य वाऽभ्युपगमे विरोधपरिहारात् ।

इदं त्ववधेयम् । पातित्यं हि संवत्सरपर्यन्तं भोजनयानासनशयनचतुष्टयात्मकसंसर्गेणैव न तु केवलेन भोजनव्यतिरिक्तेन यानासनस्पर्शसंभाषादिना इति मिताक्षराकाराणामाशयः सम्यगेव । वयं तु तदपि ज्ञानतः कृतेऽभ्युपगच्छामः ।

संवत्सरं तु पतितैः संसर्गं कुरुते तु यः ।
यानशय्यासनैर्नित्यं जानन्पै पतितो भवेत् ॥

इति कौर्मवचनानुसारात् । अज्ञानतो बलात्कारादिना वा नैकवत्सरेण पातः । अज्ञानतो भोजनादिसंसर्गे वत्सरद्वयेन । बलात्कारादिना तु न पातः अपि तु प्रत्यवायमात्रमिति विवेक्तव्यम् ।

ननु उक्तवचनसमुदाये म्लेच्छादिभिः कियता कीदृशेन वा संसर्गेण पात इति न निर्णीतमिति चेन्न । म्लेच्छादीनां पतितपदप्रतिपाद्यत्वस्य पूर्वमुपपादितत्वात् । रघुनन्दनभट्टाचार्यैः प्रायश्चित्ततत्त्वे तथैव स्वीकाराच्च । पतितपदस्य सर्वधर्मबहिष्कृतवाचकत्वं पूर्वमेव साधितं तच्च तेष्वपि । किं च पतितपदमत्रोपलक्षणम् । न च तथात्वे प्रमाणाभाव इति वाच्यम् । पराशरवचनात्तथाऽवगतेः ।

तथा च पराशरः—**संसर्गमाचरन्विप्रः पतितादिष्वकामतः ।**
पञ्चाहं वा दशाहं वा द्वादशाहमथापि वा ॥

मासार्धं मासमेकं वा मासत्रयमथापि वा ।
अब्दार्धमब्दमेकं वा भवेदूर्ध्वं तु तत्समः ॥
त्रिरात्रं प्रथमे पक्षे द्वितीये कृच्छ्रमाचरेत् ।
चरेत्सान्तपनं कृच्छ्रं तृतीये पक्ष एव तु ॥
चतुर्थे दशरात्रं स्यात्पराकः पञ्चमे ततः ।
षष्ठे चान्द्रायणं कुर्यात्सप्तमे चैन्दवद्वयम् ॥
अष्टमे च तथा पक्षे षण्मासान्कृच्छ्रमाचरेत् ॥

अत्र हि पतितादीत्यत्रादिपदान्म्लेच्छादय एव तत्समानधर्माणो द्रष्टव्याः । किं च म्लेच्छादिसंसर्गे कालादिनिर्णयः प्रायश्चित्तविचारावसरे स्पष्टमुपपादयिष्यामः ।

[अथ कामाकामकृतप्रायश्चित्तव्यवस्था ।]

अथ **'अकामतः कृते पापे प्रायश्चित्तं न कामतः'** इत्यङ्गिरोवचनात् कामतः पतितम्लेच्छादिभिः संसर्गे न प्रायश्चित्तमिति गम्यते इति चेन्न। **'स्यात्त्वकामकृते यत्तु द्विगुणं बुद्धिपूर्वके'** इत्यग्रिमवाक्यसंदर्भादकामकृतपापनिवारकप्रायश्चित्तेन न कामकृतस्यापनोद इत्यर्थप्रतीतेः । पातकं हि त्रिधा, बलात्कृतं, अज्ञानमात्रकृतं, ज्ञानतः कृतं चेति। ज्ञानकृतत्वं चेच्छाद्वारा । ज्ञानस्येच्छामद्वारीकृत्याप्रवर्तकत्वात् । **'सर्वान्बलकृतानर्थानकृतान्मनुरब्रवीत्'** इति मनुवचनाद्बलात्कृतस्यात्यन्तं न्यूनप्रत्यवायजनकत्वमज्ञानकृतापेक्षयाऽपि । बलात्कारेण कृते कर्मणि न पातित्यं किन्तु प्रत्यवायमात्रमित्यभ्युपगन्तव्यम् । तत्र च गायत्रीजपाधेवाल्पं प्रायश्चित्तम् । इति सुधीभिर्भाव्यम् ॥ तथा च **मनुः**

अकामतः कृते पापे प्रायश्चित्तं विदुर्बुधाः ।
कामकारकृतेऽप्याहुरेके श्रुतिनिदर्शनात् ॥
अकामतः कृतं पापं वेदाभ्यासेन शुध्यति ।
कामतस्तु कृतं मोहात्प्रायश्चित्तैः पृथक्पृथक् ॥

ननु **प्रायश्चित्तैरपैत्येनो यदज्ञानकृतं भवेत् ।**
कामतो व्यवहार्यस्तु वचनादिह जायते ॥

इत्यस्माद्याज्ञवल्क्यवचनात्पातित्यप्रयोजकैनोनिबर्हणं कामतः कृते स्वीकर्तुमनुचितम् । तत्र कामतः करणे व्यवहारानर्हत्वस्य प्रतिपादनादिति चेन्न। उक्तवचने व्यवहार्य इति पदच्छेदे दोषाभावात् । एवं च कामतः पातित्येऽव्यवहार्यताप्रयोजकं दुरितं निवर्तते न नरकनिष्पादकमित्यर्थः संपद्यते । विज्ञानेश्वरादयोऽप्येवमेवानुमन्यन्ते । अव्यवहार्यपदच्छेदेऽपि गौतमेनानिर्देश्यत्वेनोक्तपाथमिकमहापातकत्रयपरत्वे उपपत्तेः । **'प्रथमानि त्रीण्यनिर्देश्यानीति मनुः'** इति' गौतमस्मरणात् । अथवा शंकराचार्यप्रभृतिमतमनुसृत्य

बालघ्नांश्च कृतघ्नांञ्च विशुद्धानपि धर्मतः।
शरणागतहन्तॄंश्च स्त्रीहन्तॄंश्च न संवसेत्॥

इत्यादिवचनैस्तस्योपसंहारकल्पनान्न कृतप्रायश्चित्तसंसर्गपतितसंव्यवहार्यतां बाधते। किं च

चरितव्रत आयाते निनयेरन्नवं घटम्।
जुगुप्सेरन्न चाप्येनं संवसेयुश्च सर्वशः॥

इत्यग्रिमयाज्ञवल्क्यवचने कृतप्रायश्चित्तस्य पतितस्य सर्वथा संव्यवहार्यतोक्तेः कामतो व्यवहार्यास्त्वित्यादिवचनस्य व्यवहार्य इति अकारप्रश्लेषं विनैवार्थकरणे व्याघातपरिहारसंभवात्। अकारप्रश्लेषेऽपि बालघ्नादिपरत्वमेव तस्य। तथा च नैतद्वाक्यं पतितशुद्धिं प्रतिरोद्धुमीष्टे।

[अथ संसर्गपतितप्रायश्चित्तविचारः।]

मनु - **यो येन पतितेनैषां संसर्गं याति मानवः।**
स तस्यैव व्रतं कुर्यात्तत्संसर्गविशुद्धये॥

तथा चातिदेशेऽर्धं प्रायश्चित्तमिति स्मार्तो न्याय इति प्रायश्चित्तमयूखकाराद्यूक्तेः येन पतितेन सह पातित्यप्रयोजकसंसर्गोऽनुष्ठितस्तस्य यावत्प्रायश्चित्तं तदर्धं तत्संसर्गपतितस्येति विवेक्तव्यम्। ननु म्लेच्छसंसर्गविचारस्यास्मिन्नवसरे प्रमुखत्वान्म्लेच्छानां कृते प्रायश्चित्तस्याविधानात्तत्संसर्गप्रायश्चित्तं कथमुक्तवाक्यादुन्नेयमिति चेत्सत्यम्। वाक्यान्तरसद्भावान्न काचित्क्षतिः। मिताक्षरायां

बौधायनः- **अगम्यानां गमने कृच्छ्रातिकृच्छौ चान्द्रायणमिति प्रायश्चित्तिः**
एतेन चाण्डालीव्यवायो व्याख्यातः।

गौतमः- **अमत्या द्वादशरात्रम्।**

अङ्गिराः- **चण्डालपतितादीनामुच्छिष्टान्नस्य भक्षणे।**
द्विजः शुध्येत्पराकेण शूद्रः कृच्छ्रेण शुध्यति।

आपस्तम्बः - **अन्त्यानां भुक्तशेषं तु भक्षयित्वा द्विजादयः।**
चान्द्रं कृच्छ्रं तदर्धं तु ब्रह्मक्षत्रविशां विधिः॥

अन्त्या म्लेच्छादय इति पूर्वमेव निर्णीतम्।

बृहद्यमः - **चाण्डालीं पुक्कसीं म्लेच्छीं स्नुषां च भगिनीं सखीम्।**
मातापित्रोः स्वसारं च निक्षिप्तां शरणागताम्॥
मातुलानीं प्रव्रजितां सगोत्रां नृपयोषितम्।
शिष्यभार्यां गुरोर्भार्यां गत्वा चान्द्रायणं चरेत्॥

अङ्गिरा :- **पतितान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च।**
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा॥

वाय १८४-५

वसिष्ठः- पतितसंप्रयोगं ब्राह्मेण वा यौनेन वा यास्तेभ्यः सकाशान्मात्रा उपलब्धास्तासां परित्यागस्तैश्च न संवसेदुदीचीं दिशं गत्वाऽन श्नन्संहितामधीयानः पूतो भवतीति विज्ञायते।

एतंच्चाधीतवेदद्विजविषयम् । एतस्मिन्वचनकदम्बेऽन्त्यजम्लेच्छादीनामन्नभक्षणत-त्स्त्रीगमनविषयकप्रायश्चित्तस्याम्नानान्न काचिदनुपपत्तिः । म्लेच्छोच्छिष्टभोजनम्लेच्छ-स्त्रीगमनयोरुपपातकत्वं ब्राह्मणार्थं चान्द्रायणविधानादुन्नीयते । 'शूद्रप्रेष्यंहीनसख्यं हीनयोनिनिषेवण' मिति याज्ञवल्कीये हीनयोनिनिषेवणपदेन, 'आत्मार्थं च क्रियारम्भो निन्दितान्नादनं तथा।' इति मानवे च निन्दितान्नादनपदेन च म्लेच्छस्त्रीगमनतदीयान्नभोजन-योरुपपातकत्वेनोपनिबन्धाच्च तयोरुपपातकत्वं निश्चीयते।

एवं बौधायनोऽपि - अथोपपातकानि। अगम्यागमनं गुर्वीसखीं गुरुसखीमपपात्रां च गत्वा भेषजकरणं ग्रामयाजनं रङ्गोपजीवनं नाट्याचार्यता गोमहिषीरक्षणं अथ यच्चाप्यन्यदप्येवं युक्तं कन्यादूषणम्।

इत्यस्मिन्वाक्यसंदर्भेऽपपात्रागमनान्तर्भूतस्य तत्समस्य वा म्लेच्छीगमनस्योपपातकत्वं प्रतीयते।

न च तयोरुपपातकत्वे कथं पतनीयत्वं संजाघटीतीतिवाच्यम् । उपपातकानां पतनावहत्वस्यासकृदुक्तत्वात् । किं च 'गोवधो व्रात्यता स्तेयमृणानामनपक्रिया' इत्यत्र व्रात्यताया: पतनीयाया:, अनाहिताग्निताऽपण्यविक्रयः परिवेदनमित्यत्र बौधायनीये पतनीयत्वेन परिगणितस्य परिवेदनस्यापण्यविक्रयस्य च, 'नास्तिक्यं व्रतलोपश्च सुतानां चैव विक्रयः।' इत्यत्र नास्तिक्यस्य गौतमसूत्रे पतनकरत्वेनोक्तस्येतरेषां च बहूनां पतनीयानां याज्ञवल्क्यमनुवाक्येषूपपातकत्वेनोपनिबन्धान्न काचिच्छङ्का पदमादधाति । एतेषां चोपपातकानाभभ्यासे पातित्यमाह गौतमो निन्दितकर्माभ्यासीति पदेन।

ननु म्लेच्छस्त्रीगमनम्लेच्छसहभोजनयोरन्त्यन्ताभ्यासे किं प्रायश्चित्तम्। मत्याऽष्टाचत्वारिं-शदधिकभोजनगमनानां संभवे द्वादशवार्षिकप्रायश्चित्तप्राप्तेः, चान्द्रायणस्य मत्या एकदा भोजने गमने वा प्राप्तत्वेनाष्टाचत्वारिंशच्चान्द्रायणानां च द्वादशवार्षिकव्रततुल्यत्वेन प्रतिनिमित्तं नैमित्तिकावृत्तिरिति न्यायेन षडधिकनवतिवारभोजने गमने वा चतुर्विंशतिवार्षिकप्रायश्चित्ता-पत्तेः मरणान्तिकप्रायश्चित्तपर्यवसानं गम्यत इति चेन्न । एतयोरत्यन्ताभ्यासस्य गुरुतल्पसुरा-पानसमत्वेनातिदेशिकार्धप्रायश्चित्तप्राप्तेः । तच्चाग्रे साधयिष्यते । आतिदेशिकं प्रायश्चित्तं च सुरापानगुर्वङ्गनागमनिष्कृतिवचनाल्लभ्यते तच्च वचनमा**पस्तम्बे अथाप्युदाहरन्ति स्तेयं कृत्वा सुरां पीत्वा गुरुद्वारं च गत्वा ब्रह्महत्यामकृत्वा**

चतुर्थकालमितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पम्।
स्थानासनाभ्यां विहरन्त एते त्रिभिर्वर्षैरपपापं नुदन्त इति॥

अत्र विहितप्रायश्चित्तार्धमत्यन्ताभ्यस्तम्लेच्छीगमनम्लेच्छान्नसहभोजनयोः क्रमेण गुरुतल्पसमसुरापानसमयोर्निष्कृत्यर्थप्राप्तं,साम्यातिदेशेऽर्धंप्रायश्चित्तमितिनिबन्धकारसमयात्। उक्तवचनाम्नातो हि द्वादशवार्षिकव्रतस्य चतुर्थांशः, द्वादशवार्षिक च षडब्दकृच्छ्रपरिमितम्, यथाऽङ्गिरः-

गते तु द्वादशे वर्षे ब्रह्महा पूयते नरः ।
षड्भिर्वर्षैः कृच्छ्रचारी ब्रह्महा तु विमुच्यते ॥
मासि मासि पराकेण त्रिभिर्वर्षैःर्यपोहति ।
अर्धमासेन भुञ्जानो द्विवर्षाभ्यां विमुच्यते ॥
संवत्सरेण मासाशी पूयते नात्र संशयः ।

यत्तु-द्वादशवार्षिकमहाव्रतं द्वादशवार्षिकप्राजापत्यसमं, समत्वं च ब्रह्मचर्यवन-वासजटाधारणादेः कष्टत्वादितिकर्तव्यताबाहुल्याच्च द्वादशाब्दे प्राजापत्ये चोपवासत्रयेऽपि गृहावस्थानादितिकर्तव्यताबाहुल्याभावाच्च । अतः क्लेशसाम्याद्वादशाब्दस्य द्वादशाब्दकायसमता द्वादशाब्दकायैः सषष्टिशतत्रयकायानि भवन्ति तत्र च सषष्टिधेनुशतत्रयं प्रत्याम्नायस्तस्य च निष्क्रयद्रव्यमन्ततो नवतिरूप्यकपरिमितं महाराष्ट्ररूढ्येति तन्न । द्वादशाब्दकायस्य द्वादशाब्दव्रतापनेयदुरितनिवारकत्वं सेत्स्यतीत्यत्र वचनं नास्ति । न च शब्दैकगम्येऽर्थेऽन्यत्प्रमाणं प्रभवति प्रत्युत षड्वार्षिकप्राजापत्यप्रतिपादकं प्रत्यक्षमङ्गिरोवचनम् । तत्र हि उत्तरोत्तरमत्यन्तकष्टाधिकोपवासघटितपराकादीनां पठनमनुकल्पत्वेन नोपपत्तिमासादयतीति स्वयमूह्यम् । तथा च द्वादशाब्दस्य चतुर्थोऽश आपस्तम्बीयवचनोक्तः, द्वादशाब्दे षडब्दप्राजापत्यान्तर्भावेण साशीतिधेनुशतदानं प्रत्याम्नायस्तस्य चतुर्थोऽशः पञ्चचत्वारिंशद्गोदानं प्रत्याम्नायः सार्धैकवर्षकृच्छ्रतुल्यत्वात् । तस्य द्वितीयोऽशो गुरुतल्पसमसुरापानसमम्लेच्छीगमनम्लेच्छभोजनयोर्निष्कृत्यर्थमतिदेशेन प्राप्तः। नवमासकृच्छ्रस्य च प्रत्याम्नायो निष्क्रयद्रव्यं दशाणकाधिकपञ्चरूप्यकपरिमितमशक्तौ । म्लेच्छस्त्रीगमनतदुच्छिष्टभोजनाभ्यासे नवमासिकमभिसंधाय 'गमने तु व्रतं यत्स्याद्गर्भे तु द्विगुणं भवेत्' इत्युशनउक्तन्यायं चानुसंधायाहापस्तम्बः 'चण्डाल्यां गर्भमारोप्य गुरुतल्पव्रतं चरेत्' । तच्चातिदेशिकं नवमासकायं प्राप्येत । तन्निर सार्थमाह 'वृषल्यामभिप्रजातस्तु त्रीणि वर्षाणि चतुर्थकालसमये नक्तं भुञ्जीते' ति। एतद्य कामतोऽत्यन्ताभ्यासेन गर्भोत्पत्तावित्याह प्रायश्चित्तमयूखकारः । चतुर्विंशतिमतेऽपि 'वृषल्यामभिप्रजातस्तु त्रीणि वर्षाणि चतुर्थकालसमये नक्तं भुञ्जीते'ति । म्लेच्छानां च वृषलत्वं प्रागेव साधितम् । गर्भानुत्पत्तौ चात्यन्ताभ्यासे आह-

बौधायनः – 'अथोपपातकानि अगम्यागमनं, गुरुसखीमपपात्रां पतितां च गत्वा,

भेषजकरणं, ग्रामयाजनं, रङ्गोपजीवनं, नाट्याचार्यता, गोमहिषीरक्षणं यच्चाप्यन्यदप्येवं युक्तं कन्यादूषणमिति तेषां तु निवैशः पतितवृत्तिर्द्वौ संवत्सरौ।'

इति । अत्र हि अगम्यागमनरूपस्यापपात्रागमनरूपस्य वा म्लेच्छीगमनस्य 'यच्चाप्यन्यदप्येवं युक्त' मित्यनेन म्लेच्छसहभोजनस्य च वत्सरद्वयं पतितप्रायश्चित्तं विहितम्। तच्च पतितप्रायश्चित्तमापस्तम्बवत्त्र्यब्दव्रतरूपमेव। तदाह

बौधायनः – चतुर्थकालमितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पम्।
स्थानासनाभ्यां विहरन्त एते त्रिभिर्वर्षैरप पापं नुदन्ते॥

एतच्च पतितसामान्यप्रायश्चित्तम्। बहुवारं गर्भोत्पत्तौ अत्यन्ताभ्यासे च तत्सहभोजनाभ्यासे च प्रायश्चित्तमाह

भगवानापस्तम्बः - अधर्माहृतान्भोगाननुज्ञाय न वयं चाधर्मश्चेत्यभिव्याहत्याधो नाभ्युपरिजान्वाच्छाद्य त्रिषवणमुदकमुपस्पृशन्नक्षीराक्षारलवणं भुञ्जानो द्वादशवर्षाणि नागारं प्रविशेत्ततः सिद्धिः, अथ संप्रयोगः स्यादार्यैरेतदेवान्येषामपि पतनीयानाम्।

एतदाम्नात प्रायश्चित्तं ब्रह्महार्थोपदिष्टद्वादशापेक्षया स्वल्पक्लेशम् । उज्ज्वलाकारोऽप्यस्मदनुकूलमेवामु ग्रन्थं व्याचख्यौ। तद्यथा-अधर्माहृतानिति ब्राह्मणस्वहरणं,

चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वो च प्रतिगृह्य च।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति॥

इत्यादिकं चोदाहरणमधर्माहृतभोगस्य। ये त्वधर्माहृता भोगास्तान भ्यनुज्ञाय परित्यज्य न वयं चाधर्मश्चेति प्रैषं ब्रूयात्। तस्यार्थ- वयं चाधर्मश्च न सह वर्तामहे नात्रार्धशाणपक्षः भिक्षार्चय वा ब्रह्महव्रतवत्। ततः सिद्धिरिति द्वादशवार्षिकान्ते सिद्धिः शुद्धिर्भवतीति। अथ संप्रयोगादार्यैः प्रायश्चित्तोपदेशात्सिद्ध्युपदेशाच्च। सिद्धेः पुनर्वचनं च' ज्ञानात्साम्यं तु गच्छति इति मनुवचनस्यापवादार्थम्। तदेतदुज्ज्वलाकारव्याख्यानमस्मदंभिप्राय्मुपोद्बस्मलयति। एकदाऽन्त्यस्त्रीगमने न पातित्यमित्यापस्तम्बस्याभिप्रायो लक्ष्यते पतनियानां परिगणनावसरेऽपपात्रागमनमगणयित्वाऽशुचिकराणां मध्ये तत्पठितम् 'शूद्रोच्छिष्टमपपात्रागमन चार्याणामिति। एतान्यपि पतनीयानीत्येके' इति च परमतेन प्रदर्शितम्। तच्चाभ्यासे समन्वेयम्। तथा च निर्दिष्टसकलवचनविहितप्रायश्चित्तपर्यालोचनेऽयमर्थो निष्कृष्यते। अमत्या एकदा म्लेच्छादिस्त्रीगमने म्लेच्छानाममत्या एकदोच्छिष्टभक्षणे वा कृच्छ्रं, मत्या एकदा गमने भोजने वाऽतिकृच्छ्रं, मत्याऽधिकवारभोजने गमने वा चान्द्रायणमिति।

'अगम्यानां गमने कुच्छ्रातिकृच्छ्रौ चान्द्रायणमिति, एतेन चाण्डालीव्यवायो व्याख्यातः' इति मिताक्षरोक्तबौधायनानुसारात् । अभ्यासाधिक्ये चोक्तवचनकदम्बानुसारान्नवमासैकाब्दसार्धैकाब्दत्र्यब्दषडब्दपर्यन्तप्रायश्चित्तान्यूह्यानि । म्लेच्छैः सहैकपङ्क्तौ मत्या षष्ट्यधिकशतत्रयभोजनैरेव पातित्यं तावता च सुरापानसमत्वम्।

'संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन्।
यानशय्याशनैर्नित्यं जानन्वै पतितो भवेत्॥'

इति कौर्मानुसारात् । तत्र च सुरापानसमत्वेनातिदेशिकं नवमासप्राजापत्यं ततोऽधिकवारमभ्यासे गणनाया अभावेऽपि द्वादशाब्दव्रतसमषड्ब्दकृच्छ्रादेव पातित्यसंतरणमिति विचार्यम्।

विपश्चिदपश्चिमैरनन्तकृष्णशास्त्रिचरणैर्यदभ्यधायि मोहंमदादिमतप्रविष्टानागष्टाचखारिंशदधिकभोजनाभावे सहासनादिमात्रे संवत्सरेण स्वपूर्वजातिप्रवेशयोग्यतेति तत्र न प्रमाणं किंचित्प्रतीयते। संवत्सरपर्यन्तं भोजनेन पातित्येऽपि प्रायश्चित्ताम्नानदर्शनात् । तारतम्येन प्रायश्चित्तविधायकानामुक्तवचनानां व्यवस्थानुपपत्तेश्च । न च संवत्सरं भोजनादिसंसर्गेण पातित्याभिधानारास्य च महापातकत्वाद्वादशवार्षिकव्रतस्य प्राप्त्या प्रतिनिमित्तं नैमित्तिकावृत्तिरिति न्यायेन द्वित्र्यादिवत्सरपर्यन्तं तथा संसर्गे चतुर्विंशत्यब्दषडधिकत्रिंशदब्दादिप्राप्तेः सप्ताधिकसंवत्सराभ्यासे तु मरणान्तप्रायश्चित्तपर्यवसानमिति कथं बहुसंवत्सराभ्यस्तपापानां शुद्धिरिति वाच्यम् म्लेच्छसंसर्गस्य पातित्यप्रयोजकत्वेऽपि महापातकत्वाभावाद्वादशाब्दाप्राप्तेः। चतुर्विधमहापातकिसंसृष्टे पतितस्यैव महापातकित्वमित्यादि पूर्वमालोचितम् । न चाप्ययं नियमो यन्महापातकिनो द्वादशाब्दिकमेवेति । त्र्यब्दस्यापस्तम्बबौधायनाद्याम्नातस्योपर्युपन्यस्तत्वात्तदर्धं चातिदेशेन । सन्ति च लाघवगौरवेण म्लेच्छान्त्यस्त्रीगमनभोजनादौ प्रवर्तमानानि बहून्यागमचांसि । तान्येव समन्वेयानि, न तत्र कल्पनीया काचिद्व्यवस्था, बहूनां वचनाना बोधकानां सत्वेऽनुमानस्यानर्थक्यात् । उपपातकानामत्यन्ताभ्यासे ब्रह्महार्थोपदिष्टद्वादशाब्दप्रायश्चितकल्पनायां मरणान्तिकप्रायश्चित्तकल्पनायां वा प्रमाणाभावात्। अत एव गौतमेन निन्दितकर्माभ्यासिनं पतितेष्वनुक्रम्य **प्रथमानि त्रीण्यनिर्देशानीति मनु**रित्यभिहितम्। तत्र--

'प्रायश्चित्तमनिर्देश्यं मरणान्तिकमिति स्थितिः'

इत्यनिर्देश्यं मरणान्तिकमिति पर्यायः । प्रथमानि च ब्रम्हहत्यासुरापानं गुर्वङ्गनागम इति त्रीणि। एवं च निन्दितकर्माभ्यासिनां म्लेच्छसंसर्गपतितानां नानिर्देश्यपर्यन्तं गतिरिति गम्यते। म्लेच्छानां पतितपदप्रतिपाद्यत्वे च —

'यो येन पतितेनैषां संसर्गं याति मानवः ।
स तस्यैव व्रतं कुर्यात्तत्संसर्गविशुद्धये' ॥

इत्यत्र व्रतस्यैवातिदेशान्न संसर्गपतितानां मरणान्तिकपर्यन्तं गतिः । न च प्रतिनिमित्तं नैमित्तिकावृत्तिरिति न्यायान्मरणान्तिकपर्यवसानमिति वाच्यम् । दत्तोत्तरत्वात् सति लाघवेन गौरवेण च प्रायश्चित्तविधायके वचनकलापे तथा कल्पनायां प्रमाणाभावादिति । अन्यथा षोडशवर्षपर्यन्तानुपनयनेन व्रात्यत्वे तदूर्ध्वमुपयनयोग्यतासिद्ध्यर्थमेकर्तुप्रायश्चित्तमाम्नातं तथा चाभ्यासेऽहर्गुणावृत्तिरिति न्यायस्य प्रसरे वृद्धव्रात्यस्य प्रायश्चित्तानर्हत्वप्रसङ्गात् एवं ---

'ऐन्द्राग्नं पुनरुत्सृष्टमालभेत य आतृतीयात्पुरुषात्सोमं न पिबेत्'

इत्यत्राम्नातो दुर्ब्राह्मणस्य सोमपानेच्छायां तद्दुरितनिवर्तकः ऐन्द्राग्नश्चतुरादिपुरुषं दौर्ब्राह्मण्ये नोपयुक्तः स्यादित्यापद्येत ।

चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति ॥

इत्यनेन ज्ञानतोऽन्त्यस्त्रीगमनेऽन्त्यसाम्यमुक्तं कथं संघटेत यतोऽन्त्यसाम्योक्तिर्मरणान्तिकप्रायश्चित्तीयतामेव व्यनक्तीति चेन्न । अमत्याऽन्त्यस्त्रीगमने द्वादशरात्रादीनां गौतमादिभिर्विधानाज्ञानतश्च तत्स्त्रीगमने चान्द्रायणकृच्छ्रान्दादेरधस्तनोल्लिखितप्रमाणैर्बोधनात्पापनिन्दापरत्वस्यैवोक्तवचनस्याभ्युपगमात् । निन्दापरत्वं चाधिकप्रायश्चित्तनिवर्त्यतामत्यन्ताभ्यासे दुरितनाशस्यानुमापयति । एषैव रीतिः----

'त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात् ।'
'योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् ।
स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥'
'शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ।
जनयित्वा सुतं तस्यां ब्राह्मण्यादेव हीयते ॥'
'शूद्रसमस्तावद्यावद्वेदेन जायते ।'

इत्यादिवचनानां विप्रस्यापि शूद्रभाव वदतां निन्दातिशयद्योतनपरत्वमनुसरद्भिर्निबन्धकारैः स्वीकृता ।

सनातनधर्मप्रदीपं प्रज्वलयद्भिरनन्तकृष्णशास्त्रिपूज्यपादैरपि -- एकपङ्क्तौ ये षष्ट्यधिकशतत्रयम्लेच्छसहभोजनानि न निर्वर्तितानि तेषां प्रायश्चित्तपूर्वकं स्वपूर्वतनजातौ संग्रहणं कर्तव्यं षष्ट्यधिकशतत्रयदिवससमुदायरूपसंवत्सरत्वव्यापक भोजनादिक्रियाया एव पातित्यप्रयोजकत्वात् । अत्र च व्यापकत्वं प्रतियोगिवैयधिकरण्यघटितमेव ग्राह्यम् । अन्यथा

प्रतिक्षणं भोजनादिक्रियाया असंभवेन तादृशसमुदायत्वसमानाधिकरणात्यन्ताभावप्रतियोगित्वेन तावत्संख्याकभोजनेषु कृतेन्वपि संवत्सरत्वव्यापकत्वाभावापत्तेः । तथा च येषां तादृक्संख्याया निर्णयो न भवति तेषां बहुवत्सरपर्यन्तं म्लेच्छमतप्रवेशेऽपि प्रायश्चित्तं प्रदाय पूर्वतनजातिप्रवेशे न दोषः । एवमेवाष्टाचत्वारिंशत्संख्याकैकपात्रभोजनेष्वपि न निर्णयस्तत्र बहुवत्सरातिक्रमेऽपि शुद्धिः संभवतीत्यादिकमनुमन्तव्यम् । यत्तु सनातनधर्मप्रदीपकारैः कृतप्रायश्चित्तानामपि पतितानां स्वपूर्वतनजातीयैः सह विवाहादिगुरुतरः संसर्गो न प्रवर्तनीयः ।

ब्रह्महसुरापगुरुतल्पगमातृपितृसंबन्धगस्तेननास्तिकनिन्दितकर्माभ्यासपतितात्याग्यपतित्यागिनः पतिताः । पातकसंयोजकाश्च तैश्चाब्दं समाचरन् ॥

इत्यन्तेन गौतमवाक्येन कृतप्रायश्चित्तानामेव संसर्गस्य निषेधात्।

अथ पतिताः समवसाय धर्मांश्चरेयुरितरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः ॥

इत्यनेन बोधायनवचनेन कृतनिर्णेजनानामेव परस्परं विवाहादिसंसर्गमभ्यनुज्ञाय अपतितैः सह विवाहादिगुरुतरसंसर्गप्रतिषेधाच्च । प्रायश्चित्तादिना नरकनिपातहेतुपातकनिवृत्तावपि व्यवहारप्रतिरोधकस्य शक्तयुच्छेदाभावाभ्युपगमात्।

'कामतो व्यवहार्यस्तु वचनादिह जावते'

इति योगियाज्ञवल्क्यवचनादप्यव्यवहार्यतावगमाच्चेत्यभ्यधायि । तन्न मनोज्ञं विज्ञानाम् । बहुप्रमाणविरोधात् । तथा हि-गौतमवाक्ये कृतेऽपि प्रायश्चित्ते न व्यवहार्यता इत्यर्थकं पदं नोपलभ्यते । पूर्व पतितप्रायश्चित्तानुक्तेः । नापि कल्पनाऽऽत्मानं लभते । किं च गौतमवाक्ये तथाभिप्रायोन्नयने पतितगणनाध्यायाव्यवहितपूर्वाध्याये त्यजेत्पितरं राजघातकमित्याद्युपक्रम्य पतितत्यागविधिं वर्णयित्वा 'यस्य तु मरणान्तिकं प्रायश्चित्तं स मृतः शुध्येदेतदेव शान्त्युदकं सर्वेषूपपातकेषु' इत्यन्तेन पतितस्वीकरणविधिर्निरूपितः स कथं संघटेत । उक्तबौधायनवचनमपि न कृतप्रायश्चित्तान्पतितान्विषयीकरोति । तथात्वे प्रमाणाभावात्। याज्ञवल्क्ये हि महापातकादिभिः पतितस्य प्रायश्चित्तमुक्त्वा यस्त्वौद्धत्यादेतन्न चिकीर्षति तस्य किं कार्यमित्यत्र तस्य पतितस्य बहिष्कारविधिर्निरूपितः–

'दासी कुम्भं बहिर्ग्रामान्निनयेरन्स्वबान्धवाः।
पतितस्य बहिः कुर्युः सर्वकार्येषु चैव तम् ॥'

इत्यनेन। यदा तु बन्धुत्यागादन्यथा जातवैराग्यः प्रायश्चित्तं कृतवांस्तदा तस्य किं कार्यमित्यत आह -

चरितव्रतं आयाते निनयेरन्नवं घटम्।
जुगुप्सेरन्न चाप्येनं संवसेयुश्च सर्वशः ॥

इत्यस्मिन्वचने सर्वथा संव्यवहार्यत्वं याज्ञवल्क्येन निरूपितम्। तथैव भगवान्मनुरपि - जीवत एव पतितस्य प्रायश्चित्तमनिच्छतो मृतस्येव घटोदकदानं कर्तव्यमुक्त्वा

'दासी घटमपां पूर्णं पर्यस्येत्प्रेतवत्तदा।
अहोरात्रमुपासीरन्नशौचं बान्धवैः सह॥

इत्यनेन चाशौचविधि विधाय-

'निवर्तेरंश्च तस्मात्तु संभाषणसहासने।
दायाद्यस्य प्रदानं च यात्रा चैव हि लौकिकी॥'

इत्यनेन तस्य पतितस्य सर्वथाऽसंव्यवहार्यत्वं कथितम्। चरिते तु प्रायश्चित्ते

'स त्वप्सु तं घटं प्रास्य प्रविश्य भवनं स्वकम्।
सर्वाणि ज्ञातिकार्याणि यथापूर्व समाचरेत्।'

इत्यनेन सर्वथा संव्यवहार्यत्वं विहितम्। यथापूर्व संभोजनादीनि ज्ञातिकर्माणि प्रवर्तयेयुरिति **मेधातिथिः**। तदव्यवहितोत्तरमेव च-

'एनस्विभिरनिर्णिक्तैर्नार्थं किंचित्समाचरेत्।
कृतनिर्णेजनांश्चैव न जुगुप्सेत कर्हिचित्॥'

इति पुनरुक्तमेवार्थमनूदितवान्।

शंखोऽपि - तस्य तद्गुरोर्बान्धवानां राज्ञश्च समक्षं दोषं विख्याप्य पुनः पुनराचारं लभस्वेति स यद्येवमप्यनवस्थितमतिः स्यात्पात्रं विपर्यस्येत्।

इति पतितस्य प्रायश्चित्ताकरणे एव बहिष्कारमाह। तथा चोक्तवचनेभ्यः कृतनिर्णेजनस्य पतितस्य सर्वविधज्ञातिव्यवहारः स्वीयकुटुम्बकप्रवेशश्च विस्पष्टमवगम्यते। न च बौधायनवाक्ये विहितं परस्पराध्ययनयजनविवाहादिकमकृतप्रायश्चित्तानां पतितानां कथमुपपद्येतेति वाच्यम्। यथा सावित्रीपतितानां परस्परं विवाहादिकं पौराणतान्त्रिककर्माध्ययनाचरणादिकं च तथेतरेषामपि पतितानामित्यत्रानुपपत्तिविरहात्। अत एवापस्तम्बेनोक्तं सम्यगुपपद्यते। तेन हि—भ्रूणहनमुपक्रम्य—

'अथ भ्रूणहा श्वाजिनं खराजिनं वा बहिर्लोम परिधाय पुरुषशिरः प्रतीपानार्थमादाय खट्वाङ्गं दण्डार्थे कर्मनामधेयं प्रब्रुवाणश्चंक्रमेत्को भ्रूणघ्ने भिक्षामिति ग्रामे प्राणवृत्तिं प्रतिलभ्य शून्यागारं वृक्षमूलं वाऽभ्युपश्रयेन्न हि मे आर्यैः संप्रयोगो विद्यते, एतेनैवोत्तमादुच्छवासाच्चरेन्नास्यास्मिँल्लोके प्रत्यापत्तिर्विद्यते कल्मषं तु निर्हण्यते॥

इति मरणान्तिकव्रतात्मकं प्रायश्चित्तममिहितम्। भ्रूणो नाम षडङ्गस्य वेदस्याध्येता

तदर्थवित्प्रयोगशास्त्रस्य च व्याख्यानस्यार्थवित्कर्मणामनुष्ठाताऽनुष्ठापयिता च । तस्य हनने महान्दोष इति तस्य न विना मरणान्तिकव्रतेन शुद्धिर्नापि संव्यवहार्यता । एतान्सगुणब्राह्मणहन्तॄनुद्दिश्य चोक्तम् :

अथाभिशस्ता समवसाय चरेयुर्धार्म्यमिति सांशित्येतरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः ।

एतेऽभिशस्ता हि न सामान्यब्राह्मणहन्तारो द्वादशवार्षिकप्रायश्चित्तार्हाः कृतप्रायश्चित्ताः । अपि तु येषां मरणान्तिकेनैव एनोनिबर्हणं ते एव श्रोत्रियगुरुभ्रूणहनः| सामान्यब्राह्मणवधे हि द्वादशाब्दं व्रतं विधायाभिहितम्-'द्वादशवर्षाणि व्रतमेतच्चरित्वा सिद्धः सद्भिः सप्रयोगः ।' सद्भिरार्यैः संप्रयोगः संव्यवहारः । अकृतप्रायश्चित्तानां पतितानां पतितानुक्रमणारम्भे एव न पतितैः संव्यवहारो विद्यते इति संव्यवहारः प्रतिषिद्धः| तस्य चापवादः 'सिद्धः सद्भिः संप्रयोग' इत्यनेन कृतः कृतप्रायश्चित्तानां कृते । येषां च नानुमतः संव्यवहारो मरणपूर्व प्रायश्चित्तापरिसमाप्तेः कारणात् तानुद्दिश्योक्तं-

नास्यास्मिँल्लोके प्रत्यापत्तिर्विद्यते कल्मषं तु निर्हण्यते इति ।

प्रत्यापत्तिः शुद्धिः संव्यवहारो वेत्यर्थः । म्लेच्छादिस्त्रीगमनभोजनादिना गुरुतरेण संसर्गेण ये पतितास्तेषां प्रत्यवायापनुत्तये प्रायश्चित्तं 'अघर्माहृतान्भोगाननुज्ञाय' इत्यादिना विधाय प्रायश्चित्तसमाप्तौ आहत्योक्तं **'ततः सिद्धिः अथ संप्रयोगः स्यादार्यैः** । एतदेव प्रायश्चित्तमन्येषां पतनीयानामपि' । इति ।

एतावता प्रबन्धेन - ये खलु मत्याऽमत्या बलात्कारेण वा म्लेच्छस्त्रीगमनभोजनेन, म्लेच्छैरे कामत्रभोजनेन वा पतितास्तेषां बहुभिरपि वर्षैर्भवति शुद्धिः पूर्वतनजातिप्रवेशश्चेति सिद्धम् । न च बहुवत्सराभ्यस्ते शुद्धिः कथं युक्तिसहेतिमन्तव्यम् । तत्र तारतम्येन प्रायश्चित्तविधेः पूर्वं संपादितत्वात् । किं चाभ्यासेहर्गुणा वृद्धिरिति न्यायो न निरङ्कुशं प्रसरति । तस्य पूर्वापरसंदर्भपर्यालोचनया निर्णये प्रकृतार्थाविरोधात्| मिताक्षरायां हि मत्याऽभ्यासे प्रतिनिमित्तं नैमित्तिकावृत्तिरिति न्यायेन प्रतिनिमित्तं नैमित्तिकावृत्तौ प्रसक्तायां **लौगाक्षिणा** विशेष

उक्तः - **अभ्यासेऽहर्गुणा वृद्धिर्मासादर्वाग्विधीयते ।**
ततो मासगुणा वृद्धिर्यावत्संवत्सरं भवेत् ॥
ततः संवत्सरगुणा यावत्पापं समाचरेत् ।

इदं मतिपूर्वविषये प्रवर्णितम् । एतेन हि वचनेन एकसंवत्सरातिक्रमे म्लेच्छभोजमस्य पातित्यप्रयोजकत्वेऽपि तदनन्तरमेकैकवत्सरेणैकदिवसभोजन जन्यप्रत्यवाय समप्रत्यवायोत्पत्तेर्न मरणान्तिकप्रायश्चित्तपर्यवसानमिति सुधीभिः सूक्ष्मया धिया विभावनीयम्|

अस्मिन्विषये देवलस्मृतिरपि प्रमाणम्। तत्र प्रथममानन्दाश्रमे मुद्रिता देवलस्मृतिः प्रमाणं न वेत्यत्र विप्रतिपत्तिः प्रदर्शिताऽऽसीदनन्तकृष्णशास्त्रिचरणैः स्वीये सनातनधर्मप्रदीपे, अधुना तु तैरेव तस्याः प्रामाण्यं कियताचिदंशेनोरीकृतमिति न तत्प्रामाण्यसमर्थनकदर्थनं क्रियते। अस्माभिर्हि बहुषु धर्मनिबन्धेषु प्रकृतदेवलस्मृतिस्थानि बहूनि वचनान्युपलधानि। तान्यनुपन्यस्यैव प्रकृतविषयपरामर्शीनि यानि वचनानि **रघुनन्दन**भट्टाचार्यैः प्रायश्चित्ततत्त्वे **शूलपाणि**भट्टाचार्यैः प्रायश्चित्तविवेके साक्षात्, स्मृत्यर्थसारे चानुवादरूपेणोपन्यस्तानि तेषां विशेषतो विचारः करिष्यते। अत्रानन्तकृष्णशास्त्रिणामेतावानेवाग्रहो यद्यावन्ति वचनानि निबन्धेष्वनूदितानि तावन्त्येव प्रमाणानि नेतराणीति। तत्र त्वेवमेवास्माकं वक्तव्यं यस्य ग्रन्थस्य बहूनां वचनानामन्यत्रोपालम्भस्तत्र बहूनामनुसारेणान्येषामपि प्रामाण्यस्वीकारे न संकोचः कार्य इति। अथापि तन्मतमनुरुध्यैव विचार्यते। शूलपाणिरघुनन्दनभट्टाचार्याणामयमाशयः--

दासीकृतो बलान्म्लेच्छैश्चाण्डालाद्यैश्च दस्युभिः।
अशुभं कारिताः कर्म गवादिप्राणिहिंसनम्॥
उच्छिष्टमार्जनं चैव तथा तस्यैव भक्षणम्।
खरोष्ट्रविड्वराहाणामामिषस्य च भक्षणम्॥
तत्स्त्रीणां च तथा संगस्ताभिश्च सह भोजनम्।
मासोषिते द्विजातौ च प्रायश्चित्तं विशोधनम्॥
चान्द्रायणं त्वाहिताग्नेः पराकस्त्वथवा भवेत्।
चान्द्रायणं पराकं वा चरेत्संवत्सरोषितः॥
संवत्सरोषितः शूद्रो मासार्धं यावकं पिवेत्।
मासं विप्रोषितः शूद्रः कृच्छ्रपादेन शुध्यति॥
ऊर्ध्वं संवत्सरात्कल्प्यं प्रायश्चित्तं द्विजोत्तमैः।
संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावं सोऽधिगच्छति।
ह्रासो न विद्यते तस्य प्रायश्चित्तैर्दुरात्मनः।

तदिह म्लेच्छचण्डालाद्यैर्दस्युभिर्यदाऽनाहिताग्निर्द्विजातिरुच्छिष्टभक्षणखरोष्ट्रविड्वराहमांसभक्षणम्लेच्छस्त्रीसंसर्गतदीयस्त्रीसहभोजनादिकुत्सितं कर्म एकमासं बलात्कारितस्तदा तेन प्राजापत्यम्। साग्निना तु चान्द्रायणं कार्यम्। क्षत्रियवैश्याभ्यां पराकम्। अनग्निना ब्राह्मणेन तु संवत्सरं तादृशाचरणे चान्द्रायणं कार्यम्, इतराभ्यां पराकः। शूद्रेण मासैकदास्यकरणे कृच्छ्रपादं संवत्सरैक दास्यकरणे मासार्धं यावकपानम्। संवत्सरादूर्ध्वं वत्सरचतुष्टयं यावद्भागहारेण प्रायश्चित्तमूहनीयम्। तदूर्ध्वं तत्समत्वेन पतितत्वात्प्रायश्चित्ताभावान्मरणमिति।

स्मृत्यर्थसारे च -- पुंश्चल्यभिशस्तम्लेच्छचाण्डालदस्युभिर्बलाद्दासीकृतानां
गवादिहिंसने तदुच्छिष्टमार्जने भोजने खरोष्ट्रादिविड्वराहभक्षणे
तत्स्त्रीभिः संगमे भोजने च मासोषितद्विजानां कायम्।
आहिताग्ने श्चान्द्रं पराको वा। संवत्सरोपितस्य चान्द्रं पराकश्च।

तत्रैवं विचार्यम्- एतद्धि शूलपाणिरघुनन्दनभट्टाचार्याभिमतं यद्द्वादशवार्षिकव्रताधिकव्रतप्राप्तौ मरणान्तिकप्रायश्चितं तथा च न सव्यवहार्यतेति। न च संवत्सरचतुष्टयेन द्वादशवार्षिकस्य प्राप्तिः। एकवत्सरं संसर्गे चान्द्रायणपराकाम्नानात्संवत्सरचतुष्टये चतुर्गुणप्रायश्चित्तस्यैव प्राप्तेः। तच्च न त्र्यब्दसमतामप्येति दूरत एव द्वादशाब्दव्रततुल्यता। इत्यापस्ताम्बाद्युक्तत्रैवार्षिकादिगुरुप्रायश्चित्तविधानार्थमेव

'संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावं सोऽधिमच्छति।'

इत्याद्युक्तमिति मन्तव्यम्।

द्विजस्त्रीणां शूद्रस्त्रीणां च कामतो बलात्कारेण वा म्लेच्छैः सह मैथुने भोजने वा प्रायश्चित्तमाह **देवल :-**

म्लेच्छान्नं म्लेच्छसंस्पर्शौ म्लेच्छेन सह संस्थितिः।
वत्सरं वत्सरादूर्ध्वं त्रिरात्रेण विशुध्यति॥
योषा गर्भ विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः।
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा वर्णेतरा च या॥
अभक्ष्यभक्षणं कुर्यात् तस्याः शुद्धिः कथं भवेत्।
कृच्छ्रं सांतपनं शुद्धिर्धृतैर्योनेश्च पाचनम्॥
असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते।
अशुद्धा सा भवेन्नारी यावच्छल्यं न मुञ्चति॥
विनिःसृते ततः शल्ये रजसो वाऽपि दर्शने।
तदा सा शुध्यते नारी विमलं काञ्चनं यथा॥
स गर्भो दीयतेऽन्यस्मै स्वयं ग्राह्यो न कर्हिचित्। इति।

तदिदं स्पष्टार्थं न पुनर्विव्रियते।

सिंहावलोकनन्यायेन सोऽयं निष्कर्ष - संवत्सराधिकाकालं कामतो म्लेच्छैः सहैकपङ्क्तिभोजनादिसंसर्गे नवमासकृच्छ्रमतिदेशप्राप्तम्। तत्र त्विदमवधार्यं षष्ट्यधिकशतत्रयसहभोजनैरेव। पातित्येन तावतां भोजनानामेकवत्सरमध्ये संभवस्य क्वचित्कत्वेन यदि तावत्संख्याकभोजनानां बहुवत्सरातिक्रमेऽपि न निर्णयस्तदा तन्मतप्रविष्टेनोपर्युक्तमेव प्रायश्चित्तं विधेयमिति अनवरतं बहुवत्सरपर्यन्तं

तत्स्त्रीसङ्गभोजनादिभिः संसर्गे आपस्तम्बोक्तं द्वादशवार्षिकव्रतसमषड्वार्षिककृच्छ्रं निर्देश्यम्| तच्च साशीतिगोशतदानसमम्।

एतच्च विप्राणामेव न त्वीतरेषाम्। क्षत्रिये ब्राह्मणापेक्षयाऽर्धं, वैश्ये तृतीयोऽश, शूद्रे चतुर्थोंऽश। तथा च **कश्यप :**

विप्रार्धं क्षत्रियस्योक्तं तदर्धं वैश्यजातिषु
तदर्धमेव शूद्राणां प्रायश्चित्तं विदुर्बुध :॥

एतच्च बहुन्यूनविधायकम्। उक्तानुरोधेन चाह वृद्धविष्णुः -

विप्रे तु सकलं देयं पादोनं क्षत्रिये स्मृतम्॥
वैश्येऽर्धमेकपादस्तु शूद्रजातिषु शस्यते॥

चतुर्विंशतिमते--प्रायश्चित्तं यदाम्नातं ब्राह्मणस्य महर्षिभिः।
पादोनं क्षत्रिये कुर्यादर्धं वैश्यः समाचरेत्॥
शूद्रः समाचरेत्पादमशेषेष्वपि पाप्मसु।

एतच्च यो दोषश्चातुर्वर्ण्यमधिकृत्योक्तस्तत्र चरितार्थम्। संसर्गदोषश्च सकलमानवार्थे विहितः, संसर्गं याति मानव इत्याविशेषोक्तेः। तदिदमवधार्य संसर्गदोषप्रायश्चित्तं शूद्राणामुपदेष्टव्यम्। तथा च शूद्रस्य संवत्सराधिकगुरुतरसंसर्गिणो द्विमा सादिकृच्छ्रस्यैव प्राप्तिः अनन्तकृष्णमतस्वीकारेऽपि द्व्यधिकसनवतिशतैकोच्छिष्टभोजनेष्वेव द्वादशवार्षिकस्य शूद्रादौ प्राप्तिः, तावत्संख्याकभोजनानिर्णये न कृतप्रायश्चित्तशूद्रस्य बहिष्कार्यता।

अथातिदेशेऽर्धं प्रायश्चित्तमिति योऽयं न्यायो बहुवारमुपरिनिर्दिष्टस्तत्र किं प्रमाणमिति चेदित्थम्। अतिदेशो हि त्रिविधः। वाचनिकातिदेशस्ताद्रूप्यातिदेशः साम्यातिदेशश्च। तत्र वाचनिकातिदेशमाह **याज्ञवल्क्यः-**

यागस्थक्षत्रविड्घाती चरेद्ब्रह्महणि व्रतम्।

ताद्रूप्यातिदेशमाह स एव --

पितुः स्वसारं मातुश्च मातुलानीं स्नुषामपि।
मातुः सपत्नीं भगिनीमाचार्यतनयां तथा॥
आचार्यपत्नीं स्वसुतां गच्छंस्तु गुरुतल्पगः।

साम्यातिदेशमप्याह स एव--

गुरुणामध्यधिक्षेपो वेदनिन्दा सुहृद्वधः।
ब्रह्महत्यासमं ज्ञेयमधीतस्य च नाशनम्॥

अत्र साम्यातिदेशेऽर्धं, ताद्रूप्यवाचनिकातिदेशे पादोनमिति प्रायश्चित्तमयूखकारदियः। अतिदेशस्थले एतादृशकल्पनायां प्रमाणं च पातकार्थवाद एव तथा च

अङ्गिराः- पातके तु सहस्रं स्यान्महत्सु द्विगुणं भवेत्।
उपपापे तुरीयं स्यान्नरकं वर्षसंख्यया॥

विष्णुरपि - अतिपातकिनः पच्यन्ते कल्पं मन्वन्तरं महापापिनः।
अनुपातकिनश्चतुर्युगमिति॥

म्लेच्छस्त्रीगमनस्याभ्यासे गुरुतल्पसमत्वेन, म्लेच्छान्नभक्षणस्य चाभ्यासे सुरापान-समत्वेन, तयोः साम्यातिदेशेनार्धं प्रायश्चित्तम्। अतिदेशेऽपि पूर्णप्रायश्चित्तकल्पने, उत्कर्षे मिथ्योक्तौ अधीतस्य विस्मरणे च द्वादशाब्दापत्तिरिति महदसमञ्जसं स्यादिति।

[अथ पतितसंततिविचारः।]

अनन्तकृष्णशास्त्रिण - पतितपुत्रस्य पूर्वतनुजातौ प्रवेशं पूर्वतनजातीयैश्च सव्यवहारं नेच्छन्ति।

पतितपुत्रः पतितो भवत्यन्यत्र स्त्रियः, सा हि परगामिनी तामरिक्थामुपेयात्।

इति वसिष्ठस्मरणात्।

कन्यां समुद्वहदेषां सोपवासामकिंचनाम्।

इति **याज्ञवल्क्य**वचनाच्च। अस्य याज्ञवल्कीयस्यायमाशयः- एषां पतितानांकन्यां पतितावस्थायामुत्पन्नां सोपवासामकिंचनामगृहीतवस्त्रालंकारादिपितृधनामुद्वहेत्। कन्यां समुद्वहेदिति वदन्स्वयमेव कन्यां त्यक्तपतितसंसर्गां समुद्वहेन्न पुनः पतितहस्तात्प्रतिगृह्णीयात्। एवं च पतितयौनसंसर्गप्रतिषेधविरोधोऽपि परिहृतो भवति। अयं चार्थो **वृद्धहारीतेन** स्पष्टीकृतः।

पतितस्य तु कुमारीं विवस्त्रामहोरात्रोपोषितां प्रातः शुक्लेनाहतेन
वाससाऽऽच्छादितां नाहमेतेषां न ममैते त्रिरुच्चैरभिदधानां स्वगृहे वोद्वहेत्।

तथैषां कन्यां समुद्वहेदिति वचनात्स्त्रीव्यतिरिक्ततदीयापत्यस्य संसर्गानर्हतां दर्शयति। अत्र विज्ञानेश्वरस्य सोपवासामिति पदस्य कृतसंसर्गकालोचितप्रायश्चित्तामिति व्याख्यानं न शोभनम्। कृतसंसर्गकालोचितप्रायश्चित्तत्वेनोपवासाभिधाने हारीतस्याहोरात्रोपोषितामिति पदानुपपत्तिः संसर्गकालोचितप्रायश्चित्तस्याहोरात्रोपोषणमात्रत्वस्यासंभवादधिकस्य कच्छ्रदिरूपस्यान्यत्रोक्तत्वात्। एवं च सिद्धं पतितपुत्र्येवाधिकरोति संव्यवहारमिति।

तत्र प्रतिविधीयते-द्वैधं हि दृश्यते स्मृतिशास्त्रेऽस्मिन्विषये। अकृतप्रायश्चित्तान्मरणान्तिक प्रायश्चित्तार्हांश्च पतितानुपक्रम्याह

बौधायनः - अथ पतिताः समवसाय धर्मोंश्चरेयुरितरेतरयाजका इतरेतराध्यापका
मिथो विवहमानाः पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मभ्यमेवमार्यान्संप्र-

तिपत्स्यथेति। अथापि न सेन्द्रियः पतति तदेतेन वेदितव्यमङ्गहीनो हि साङ्गं जनयेन्मिध्यैतदिति हारीतो दधिधानीस धर्माःस्त्रियःस्युर्यो हि दधिधान्यामप्रयतं पय आतच्य मन्थति न तच्छिष्टा धर्मकृत्येषूपयोजयन्ति एव मशुचि शुक्लं यन्निर्वर्तते न तेन संप्रयोगो विद्यते।

अत्र हि प्रथमं पतितपुत्राणामार्यैः संव्यवहारार्थं पतितैस्त्यागः कर्तव्य इति विधाय हारीतमतं विरुद्धमुपक्षिप्तम्। एवमेवा**पस्तम्बे**ऽपि अभिशस्तान्मरणान्तिकप्रायश्चित्तार्हानृपक्रम्य-

पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मदेवं ह्यस्मत्स्वार्याः संप्रत्यपत्स्यथेति।

इत्यादिकं बौधायनवद्धारीतमतमुपन्यस्योपदिष्टम्। तथा च द्वैधं प्राप्तम्। तत्र किं निर्णेयं पतितपुत्रः पतति न वेति। एतत्तु केवलवचनसमधिगम्यं, न च सिद्धे विकल्पः किन्तु क्रियायामित्येकान्तोऽनुसर्तव्य। वसिष्ठहारीतानुसारेण पतितपुत्रस्य पातित्यमुपगम्य तस्य संव्यवहारानुपगमे उक्तापस्तम्बबौधायनवविरोधः। ननु सेन्द्रियः पततीति पूर्वपक्षः सिद्धान्तश्च हारीतानुसारेणेति चेत्सत्यं तथापि 'संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मभ्यमेवमार्यान्संप्रतिपत्स्यथे' त्यनुपपन्नम्। तदर्थं पतितप्रायश्चित्तं चरित्वा तेषामार्यैः संव्यवहारोपदेशसार्थक्यमुपपादनीयम्। न च पतितपुत्रस्य जन्मतः पातित्यात्किं तेषां प्रायश्चित्तमिति वाच्यम्। अनुपदमेव तेषां संव्यवहार्यतासिद्धयै प्रायश्चित्ताभिधानात्। तथा च **बौधायनः-**

अशुचिशुक्लोत्पन्नानां तेषामिच्छतां प्रायश्चित्तिः पतनीयानां तृतीयोंऽशः स्त्रीणामंशस्तृतीयः।

तेषां पुत्राणामित्यर्थः। बौधायनेन तस्मिन्नेवाध्याये पतनीयप्रायश्चित्तं त्रैवार्षिक व्रतमुक्तम्। तस्य तृतीयोंऽश एकवार्षिकव्रतं पुत्रस्येति। कृतप्रायश्चित्तानां पतिपुत्राणां संव्यवहार्यता सिध्यति। पतितपौत्रस्यापि संव्यवहार्यताऽविरुद्धा अनिषेधात्। पतितपुत्रत्वाविशेषादेतदेव प्रायश्चित्तमिति बहुपरम्पराव्यतिक्रमेऽपि पतितकुलोत्पन्नानां विजातीयस्त्रीपुरुषान्यतरसंकराभावे कृतप्रायश्चित्तानां पूर्वजातीयैः सह गुरुतरविवाहादिसंसर्गो न दोषावह इति सिद्धं शास्त्रवचनबलादिति। तथा च मरणान्तिकप्रायश्चित्तार्हाणामसंव्यवहारेऽपि तत्पुत्राणां पतितप्रायश्चित्तं कृत्वा पुत्रीणां चाकृत्वा पतितप्रायश्चित्तं पूर्वतनजातिप्रवेशमार्गो निष्कण्टकः प्रतीयते॥

[अथ शिष्टाचारप्रमाणम्]

श्रूयते किल भारतवर्षीयेतिहासे, कुतर्कविप्लावितश्रुतिप्रामाण्यान्बहून्सौगताब्जैनांश्च प्रच्याव्य सौगतार्हतमतात्स्वीये राद्धान्ते श्रद्दधापयञ्श्रीमच्छंकरभगवत्पूज्यपादा अन्ये चाचार्याः। बौद्धविवसनादिमतप्रविष्टाश्च पतिता एवेत्यत्र न काऽपि विप्रतिपत्तिरवकाशं लभेत। तथा च शास्त्रमप्येतदेवोपष्टम्भयति पतितसमानधर्मत्वं ख्यापयन्-

षट्त्रिंशन्मते- बौद्धान्पाशुपतांश्चैव लोकायतिकनास्तिकान्।
विकर्मस्थान्द्विजान्स्पृष्ट्वा सचैलं जलमाविशेदिति।

तानेतान्बौध्दात्रजैनांश्च पितृपितामहादिपरम्परया पतितानपि सम्यगुपदेशप्रदानेन भगवत्पादाः स्वमतं प्रापयन्निति। तैश्चाचरितमासीद्दुरितं पतनीयं नास्तिक्यं, सत्यपि द्विजत्वे शूद्रत्वे वा नानुष्ठितं च शास्त्रविहितं नित्यं नैमित्तिकं च कर्म तथापि ते प्रापुः सनातनधर्मीयत्वम्। न च विहिताकरणमात्रं न पतनीयमिति युक्तमुत्पश्यामः। नास्तिक्यस्य गौतमीये पतनीये परिगणनाद्विहिताकरणस्यातथात्वेऽपि तेषां पतितत्वे क्षत्यभावात्। विहिताननुष्ठानस्यापि पतनीयत्वाच्च। तथा च शास्त्रं **मनोः**

विहितस्याननुष्ठानान्निन्दितस्य च सेवनात्।
अनिग्रहाच्चेन्द्रियाणां नरः पतनमृच्छति॥

एवं प्रायश्चित्तमयूखे एकवर्षनित्यक्रियातिपाते

विष्णुपुराणम्- संवत्सरक्रियाहानिर्यस्य पुंसः प्रजायते
तस्यावलोकनात्सूर्यो निरीक्ष्यः साधुभिः सदा॥
स्पृष्टे स्नानं सचैले तु शुद्धिहेतुर्महामते।
पुंसो भवति तस्योक्ता न शुद्धिः पापकर्मणः
देवर्षिपितृभूतानि तस्य निःश्वस्य वेश्मनः
प्रयान्त्यनार्चिता यत्र कस्तस्मात्पापकृत्तमः॥
देवादिनिः श्वासहतं शरीरं यस्य वेश्मनः।
न तेन संकरः कार्यः सहासनपरिच्छदैः॥

अत्र शूलपाणिमहामहोपाध्यायाः आब्दिकनित्यक्रियातिपाते महापातकातिदेशं वदन्ति प्रायश्चित्तविशेषाश्रुतेः। तथा च बहुवर्षं नित्यस्याननुष्ठाने किं प्रायश्चित्तमिति सद्भिरेव विवेचनीयम्। एतेनानन्तकृष्णशास्त्रिचरणैर्यदभ्यधायि प्रदीपप्रस्तावे-विहिताकरणमात्रं सौगतधर्मावलम्बने, न विरुद्धसेवनं, मोहंमदादिमतावलम्बने तु तदुभयमपि, धर्मशास्त्राणि तु विहितस्याननुष्ठानान्निन्दितस्य च सेवनात्। अनिग्रहाच्चेन्द्रियाणां नरः पतनमृच्छतीति समुच्चितेन यथा पातित्यं शासते न तथैकेन। एतावता विवक्षितः सारांशोऽयमेव-विहिताकरणेन पापमात्रं, निन्दितकर्माभ्यासेन तु पतनमिति सौगतमतावलम्बिनो विहिताकरणमात्रेण पापान्सम्यगुपदेशेन भगवत्पादाः स्वमतं प्रापयन्निति युक्तमेतदिति तच्छास्त्रविद्भिर्नादरणीयम्| उक्तयुक्तेः। विहिताननुष्ठानस्यापि केवलस्य वचनबलेन पातित्यप्रयोजकत्वात्। किं च सौगतमतावलम्बिनां गौतमोक्तं नास्तिक्यं कथं न पातित्यकरमिति तैरेव विचार्यमित्यलं महद्भिरधिगतपरमार्थैः कलहेन।

*[अथ व्रात्यताशुद्धिविचारः।]

अथ म्लेच्छसंसर्गजन्यदुरितनिवारणेऽपि तन्मतस्वीकारनिबन्धनानुपनयनजन्यसावित्री-पतनरूपव्रात्यतायाः कथं प्रतीकारः। अप्रतीकारे च कथं तेषां संग्रहः। तथा च **मनुः**

आषोडशाद्ब्राह्मणस्य सावित्री न निवर्तते।
आद्वाविंशात्क्षत्रबन्धोराचतुर्विंशतेर्विशः॥
अत ऊर्ध्वं त्रयोऽप्येते यथाकालमसंस्कृताः।
सावित्रीपतिता व्रात्या भवन्त्यार्यविगर्हिताः॥
नैतैरपूतैर्विधिवदापद्यपि हि कर्हिचित्।
ब्राह्मान्यौनांश्च संबन्धानाचरेद्ब्राह्मणैः सह॥

एवमाश्वलायनः - नैतानुपनयेन्नाध्यापयेन्न याजयेन्नैभिर्व्यवहरेयुरिति।

न च 'गोवधो व्रात्यतास्तेयमृणाना मनपक्रिया।' इत्यादिनोपपापेषु व्रात्यताया याज्ञवल्क्येना-नुक्रमणात्तत्र 'उपपातकशुद्धिः स्यादेवं चान्द्रायणेन वा।' इत्यनेनोपपातकसामान्यप्रायश्चित्तं प्राप्तम्। तथैव-

मनुः **येषां द्विजानां सावित्री नानूच्येत यथाविधि।**
तांश्चारयित्वा त्रीन्कृच्छ्रान्यथाविध्युपनाययेत्॥

आश्वलायनोऽपि - गवां दानेन भूम्या वा प्राजापत्यत्रयेण वा।
चान्द्रायणेन वा शुद्धास्ते भवन्तीह सत्तमा इति॥

तथा च कुतः प्रायश्चित्तानुपपत्तिरिति वाच्यम्। पितृपितामहादिपरम्परयाऽनुपनीतानां प्रायश्चित्तानिर्णयात्। न च परम्परयाऽनुपनीतत्वे व्रात्यत्वं कुत इति वाच्यम्।

त्रिषु वर्णेषु सादृश्याद्व्रतो जनयेत्सुतान्।
तान्सावित्रीपरिभ्रष्टान्व्रात्यानार्हुर्मनीषिणः॥

---

* अत्रेदमवधेयम्। भारतबहिष्टा ये यवनचीनयूरोपादिद्वीपवासितुरुष्कादयो म्लेच्छास्ते सर्वेऽपि व्रात्यक्षत्रिया एवेति निर्णीयते मनुस्मृतिमहाभारतहरिवंशादिप्रमाणेभ्यः तदिदं चिन्ति-तमस्मामिर्म्लेच्छपदार्थनिर्णयावसरे इति तेऽपि व्रात्यस्तोमेनेष्ट्रा व्रात्यभावाद्विमुच्येरन् शुद्धं क्षत्रियभावं च भजेरन्निति॥

इति बोधायनानुसारात्तेषामपि व्रात्यपदप्रतिपाद्यत्वात्। तेषां च प्रायश्चित्तविध्यनुपपत्तिरिति चेन्न। बहुप्रमाणलाभात्। तथा हि समस्ति हि श्रौतसूत्रवचनसंदोहो व्रात्यस्तोमप्रतिपादनपरः प्रत्यक्षश्रुत्यनुवादी सकलव्रात्यताकल्मषप्रक्षालनार्थं प्रवृत्तः। छन्दोगानां लाट्यायनीयं श्रौत्रसूत्रं यथा-

व्रात्यस्तोमैर्यक्ष्यमाणाः पृथगग्नीनाधाय यज्ञोपकरणानि चेष्ट्वा य एषामध्ययनेऽभिक्रान्ततमः स्यादभिजनेन वा तद्भावेऽपि भोगलाभेन तस्य गार्हपत्ये दीक्षेरन्भक्षाँश्चानुभक्षयेयुः १ ये के च व्रात्याः संपादयेयुस्ते प्रथमेन यजेरन् २ ब्राह्मणेनैत उक्ताः ३ स्थाविरादपेत प्रजनना ये ते शमनी चामेद्राः ४ यनिरुक्तं निधनमुपेयुरितीन्द्रेति द्यौताने निधनं निराहुस्तस्य प्रतिषेधः ५ यथाम्नायमेवोपेयुः ६ उष्णीषं च प्रतोदं चेत्युष्णीषं यत्तिर्यङ्नद्धं भवति व्रात्यानाम् ७ धनुष्केणानिषुणा व्रात्याः प्रसेधमाना यन्ति सज्याह्वोडः ८ विपथश्च फलकास्तीर्ण इति प्राच्यरथो नास्तीर्णो विपथः ९ कम्प्रमिश्राभ्यामश्वाश्वतराभ्यां युक्तः स्यादिति शाण्डिल्यः १० याभ्यां काभ्यां चाश्वाभ्यामश्वतराभ्यां वेति धानञ्जप्यः ११ कृष्णशं वास इति कृष्णङ्कहमिश्रमिति शाण्डिल्यः १२ शुक्लं कृष्णदशमिति गौतमः १३ कृष्णमित्येव मन्य इति धानञ्जप्यः १४ यावविकौ द्वाभ्यामविभ्यामेकैकः क्रीतः स्यात्तयोः पार्श्वसँहिते कृष्णवलक्षे अजिने स्याताम् १५ वलक्षमिति श्वेताख्या १६ राजतो निष्कः १७ तदृहपतेरित्येतत्सर्से गृहपतिराहरेत्त्रयस्त्रिँशतं च १८ द्वित्रयस्त्रिँशतमिति शाण्डिल्यः १९ वलूकान्तानि दामतूषाणीतरेषामित्याविकानि लोहितप्रवाणानि वसनानि स्युः २० दामतूषाणीति दामदशानि स्युर्दशाख्या तूषामिति २१ द्वे द्वे दामनी इति द्वे द्वे एकैकस्य वसनस्य दशे स्याताम् २२ द्वे द्वे उपानहाविति कृष्णाः कर्णिन्य इति शाण्डिल्यः २३ याः काश्चेति धानञ्जप्यः २४ द्विषँहि तान्यजिनानीति पूर्वाभ्यामजिनाभ्यां व्याख्यातानि २५ तच्चेतरेषामेकैक आहरेत्त्रयस्त्रिँशच्च त्रयस्त्रिँशता गृहपतिमभिसमायन्तीति ह्याह २६ ते त्रयस्त्रिँशत ऋत्विग्भ्यो दद्युः २७ व्रात्येभ्यो व्रात्यधनानि ये व्रात्यचर्यया अविरताः स्युर्ब्रह्मबन्धवे वा मागधदेशीयाय यस्मा एतद्ददति तस्मिन्नेव मृजानायन्तीति ह्याह २८ व्रात्यस्तोमैरिष्ट्वा त्रैविद्यवृत्तिँसमातिष्ठेयुः २९ तेषां तत ऊर्ध्वं भुञ्जीतापि चैनान्कामं याजयेदिति ३० इति।

तथा कात्यायनश्रौतसूत्रे एकविंशत्यध्याये -

"वात्यस्तोमाश्चत्वारा। द्व्राावितीय उक्थ्यः | व्रात्ययणस्य से संपाद येयुस्ते प्रथमेन यजेरन्। द्वितीयेन निन्दिता नृशँसाः। तृतीयेन कनिष्ठाः। ज्येष्ठाश्चतुर्थेन| अपेतप्रजननाः स्थविरास्तदाख्यास्तेषां यो नृशँसतमः स्याद्द्रव्यवत्तमो वाऽनूचानतमो वा तस्य गार्हपत्ये दीक्षेरन्। तस्य भक्षमनुभक्षयन्त आसीरन्। व्रात्यधनानि भवन्ति। तिर्यङ्नद्धमुष्णीषम्। ज्याह्रडोऽयोग्यं धनुस्तदाख्यम्। वासः कृष्णशं कद्रु। अकृष्णं कृष्णदर्श वा तदाख्यम्। फलकास्तीर्णो विपथः। अश्वाश्वतराभ्यां कम्प्राभ्यां युक्तः स्यादित्येके। निष्को राजतः। अजिने पार्श्वसहिते कृष्णवलक्षे आविके। तद्गृहपतेः। एवमेवाजिनानीतरेषाम्।

१ दामतूपाणि वलूकान्तानि द्विचूडान्याविकानिवासाँसि लोहितान्तानि कृष्णान्तानि वा तदाख्यानि। द्वे द्वे दामनी उपानहौ च कर्णिन्यौ कृष्णे स्यातामित्येके। मागधदेशीयाय ब्रह्मबन्धवे दक्षिणाकाले व्रात्यधनानि द्द्युः। अविरतेभ्यो वा व्रात्याचरणात्| तेष्वेव मृजानायन्तीति श्रुतेः। त्रयस्त्रिँशतं त्रयस्त्रिँशतं दक्षिणा दद्युः। द्विगुणा गृहपतिरित्येके। व्रात्यस्तोमेनेष्ट्वा व्रात्यभावाद्विरमेयुः। व्यवहार्या भवन्ति।

इतरेष्वपि श्रौतसूत्रेषु चत्वारो व्रात्यस्तोमा एत एव पठिताः। तत्र प्रथमो व्रात्यस्तोमोऽविशेषेण सर्वान्व्रात्यानधिकृत्य पठितः। अन्ये तु द्वितीयादयो विशिष्टविषया उक्ताः। एते च सर्वे व्रात्या**स्ताण्ड्यमहाब्राह्मणे** आम्नाताः।—

> **'हीना वा एते हीयन्ते ये व्रात्यां प्रवसन्ति न हि ब्रह्मचर्यं चरन्ति न कृषिं न वाणिज्यमिति।' 'गरगिरा वा एते ये ब्रह्माद्यमन्नमदन्त्यदुरुक्तवाक्यं दुरुक्तमाहुरदण्ड्यं दण्डेन घ्नन्तश्चरन्त्यदीक्षिता दीक्षितवाचं वदन्ति।'**

इत्यादिवाक्यैः। ते च संक्षेपत उक्तकात्यायनवाक्ये प्रदर्शिताः। तथा च साक्षाच्छ्रुतित एव व्रात्यतापरिहाराय स्तोमस्य विहितत्वात्सर्वेऽपि व्रात्या व्रात्यस्तोमेनेष्ट्वा व्यवहार्या भवन्तीत्यत्र न किमपि विरुद्धं प्रमाणम्। तथा च **याज्ञवल्क्यः—**

> **अत ऊर्ध्वं पतन्त्येते सर्वधर्मबहिष्कृताः।**
> **सावित्रीपतिता वात्या व्रात्यस्तोमादृते क्रतोः॥**

अनेन याज्ञवल्क्यवचनेनोपनीतपितृजन्यस्य यथाकालमनुपनीतत्वे व्रात्यस्तोमः कथितः। **पारस्करश्च—**

'आषोडशाद्वर्षाद् ब्राह्मणस्य नातीतः कालो भवत्याद्वाविंशाद्राजन्यस्याचतुर्विंशाद्वैश्यस्यात ऊर्ध्वं पतितसावित्रीका भवन्ति नैतानुपनये-

युर्नाध्यापयेयुर्न याजयेयुर्न चैभिर्व्यवहरेयुः । कालातिक्रमे नियतवस्त्रिपुरुषं पतितसावित्किणामपत्येऽ संस्कारो नाध्यापनं च तेषां संस्कारेप्सुर्व्रात्यस्तोमनेष्टा काममधीयीरन्व्यवहार्या भवन्तीन्ति वचनात्

इति। अत्र हि बालकस्य स्वस्य कालतिपाते नियंतवन्नित्यवत्प्रायश्चित्तमाह पारस्करः। तच्च प्राजापत्यादिरूपम्। त्रिपुरुषं पतितसावित्रीकाणामपत्ये हि न प्राजापत्यमात्रेण दुरितनिवारणमपि तु व्रात्यस्तोमस्यापरिहार्यतां मनुते। व्रात्यस्तोमेन विनाऽसंस्कारो नाध्यापनं चेत्याहः। कृते तु व्रात्यस्तोमेऽध्याप्या व्यवहार्याश्च भवन्ति। भगवानापस्तम्बस्तु पित्रादीनामनुपनीतत्वे प्रायश्चित्ताधिक्यमेव प्रतिपर्यायमाचष्टे। तथा **चापस्तम्बधर्मसूत्रम्-**

अतिक्रान्ते सावित्र्याः काले ऋतुं त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेत् अथोपनयनम्। ततः संवत्सर मुदकोपस्पर्शनम् अथाध्याप्यः। अथ यस्य पिता पितामह इत्यनुपेतौ स्यातां ते ब्रह्महसंस्तुताः तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति च वर्जयेत्। तेषामिच्छतां प्रायश्चित्तम् यथा प्रथमेऽतिक्रम ऋतुरेवं संवत्सरः अथोपनयनम्। तत उदकोपस्पर्शनम् प्रतिपूरुषं संख्याय संवत्सरान्यावन्तोऽनुपेताः स्युः। सप्तभिः पावमानीभिर्यदन्ति यच्च दूरक इत्येताभिर्यजुष्पवित्रेण सामपवित्रेणाङ्गिरसेनेति २ अपि वा व्याहृतिभिरेव ३ अथाध्याप्यः अथ यस्य प्रपितामहादि नानुस्मर्यते उपनयनं ते श्मशानसंस्तुताः। तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति च वर्जयेत्तेषामिच्छतां प्रायश्चित्तं द्वादशवर्षाणि त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेदथोपनयनं तत उदकोपस्पर्शनं पावमान्यादिभिः। अथ गृहमेधोपदेशनम् नाध्यापनम्। ततो यो निर्वतते तस्य संस्कारो यथा प्रथमेऽतिक्रमे। तत ऊर्ध्वं प्रकृतिवत्।

अत्र ऋतुः द्वौ मासौ | त्रैविद्यकं त्र्यवयवा विद्या त्रिविद्या तामधीयते त्रैविद्यास्तेषामिदं त्रैविद्यकम्। एवंभूतं ब्रह्मचर्यमग्निपरिचर्यामध्ययनं शुश्रूषामिति त्रयं परिहाय सकलं ब्रह्मचारिधर्मं चरेत्। **वसिष्ठश्च** पतितसावित्रीके उद्दालकव्रतमाह। **तथा च वसिष्ठः —**

'पतितसावित्रीक उद्दालकव्रतं चरेद् द्वौ मासौ यावकेन वर्तयेन्मासं पयसाऽर्धमासमामिक्षयाऽष्टरात्रं घृतेन षड्रात्रमयाचितेन त्रिरात्रमब्भक्षोऽहोरात्रमुपवासश्चेति।'

उक्तापस्तम्बे पितुरनुपनीतत्वे संवत्सरं व्रतमुक्तम्। पितामहस्य पितुश्चानुपनीतत्वे द्वौ वत्सरौ प्राप्तौ। 'प्रतिपूरुषं संख्याय संवत्सरान्यावन्तोऽनुपेताः स्यु'रिति वचनात्। केचित्तु यथाकालं स्वस्य पितुः पितामहस्य चानुपनीतत्वे वत्सरत्रितयं प्राप्तमित्याहुः। तथा च **वीरमित्रोदयः**- 'यदि पितैवानुपेतस्तदा संवत्सरमेकमथ पितामहोऽपि तदा संवत्सरौ अथ स्वयमपि यथाकालमनुपनीतस्तदा संवत्सरान्', तच्च न नः प्रतिकूलम्। विप्रतिपत्तिविषयस्तु अथ यस्य

प्रपितामहादीति वाक्यं, तत्र तावत्पाठभेदो दृश्यते। एक: -अथ यस्य प्रपितामहादि नानुस्मर्यते उपनयनं ते श्मशानसंस्तुताः । द्वितीयश्च-अथ यस्य प्रपितामहादेर्नानुस्मर्यते इत्यादि । प्रथम उज्ज्वलायां द्वितीयो वीरमित्रोदये । उभयमभ्युपगम्य विचार्यते । तत्रादिपदेनोपरितनानां प्राचां प्रपितामहपित्रादीनामपि ग्रहणमुतार्वाचामेव पितामहादीनामिति । उपरितनानां प्राचां प्रपितामहपित्रादीनामग्रहणे त्रिपुरुषाणामूर्ध्वं व्रात्यानां प्रायश्चित्तमुपनयनं च न प्राप्नं भवेत् । तथा च बहुपुरुषपर्यन्तं पतितानामपि संग्रह इत्यस्माकं प्रतिज्ञा हीयेत । ननु तदेवास्माकमिष्टमिति चेन्न । प्रमाणाभावात् । प्रपितामहपित्रादीनामग्रहणे न किमपि प्रमाणं पश्याम:। उज्ज्वलावीरमित्रोदयादिप्रबन्धास्तु नादिपदेन प्राचां ग्रहणमनुमन्वते। परंतु तत्प्रमाणविरोधाभावान्नं स्वीकुर्मः । अपरार्कमदनरत्नप्रभृतयस्तु अस्माकमर्थमनुजानते । तत्र **मदनरत्नं** यथा - यस्य प्रपितामहादेरुपनयनं नास्ति तथाऽर्वाचामपि पुरुषाणामुपनयनाभावस्ते सर्वे श्ममशानसंस्तुता इति । **अपरार्को** यथा - यस्य तु प्रपितामहादेरुपनयनं न स्मर्यते तत्र अर्थादेतेषां पुरुषाणामुपनेयत्वं ते सर्वे श्मशानवदशुचय इति । मदनरत्ने तथापदप्रयोगादपरार्के च अर्थादितिपदप्रयोगादादिपदात्प्राचामेव ग्रहणं प्रतीयते । तथा च यत्रानुपनीतत्वेन पूर्वपूर्वतनाः पुरुषाः स्मर्यन्ते तत्र तावतः संवत्सरान्संख्याय प्रायश्चित्तं निर्देश्यम् । परंतु यत्र प्रपितामहादिमारभ्य नैव स्मर्यत उपनयनं न च संख्यापरिगणनं संभवति तत्र द्वादशवार्षिकं प्रायश्चित्तं विधायोपनयनं कार्यमित्यर्थ आपस्तम्बस्य लक्ष्यते। स एव च 'न स्मर्यते' इति स्मृधातुस्वारस्याल्लभ्यते । अन्यश्चार्थो यद्यवलम्ब्येत तर्हि अस्मरणपदस्वारस्यमुपरुध्येत। एष एव च दोषः श्रीमदनन्तकृष्णशास्त्रिस्वीकृतसरण्याम् । अन्यां च सरणिमवलम्ब्य महाराजजयसिंहकारितव्रात्यताशुद्धिसंग्रहेऽपि बहुपुरुषपरम्पराया अनुपपनीतत्वेऽपि प्रायश्चित्तेनोपनयनयोग्यता संपादिता संग्रहसंपादकैः पण्डितप्रवरैः । सा च विस्तारभयान्नेहोपन्यस्यते । एतच्चापस्तम्बधर्मसूत्रवचनं स्वयं स्पष्टार्थमपि व्याख्याकारैर्बहुविप्रतिपत्तिविषयतां नीतमिति न तत्त्वनिर्णयाय पर्याप्तमित्युक्तश्रौतसूत्रवचनेभ्य एव सामान्यतः सर्वान् व्रात्यानधिकृत्य प्रवृत्तो व्रात्यस्तोमोऽशेषं कालुष्यमपनेष्यति व्रात्यानामिति न तत्राधिकं प्रपञ्चते। तथा च तत्रैव वचनं **'व्रात्यस्तोमैरिष्ट्वा, त्रैविद्यवृत्तिं समातिष्ठेयुः, तेषां तत ऊर्ध्वं भुञ्जीतापि च'** इति। **'त्रैविद्यवृत्तिद्विजानामध्ययनमिज्या दानम्'** इति। **कातीय**वचनमपि **'व्यवहार्या भवन्ति'** इति।

(अथ म्लेच्छादीनां सनातनधर्माधिकारविचार:)

येषां म्लेच्छीभूतानां बहुपरम्परातिक्रमेण न मातृपितृजातिनिर्णयस्तेषामन्येषां च म्लेच्छानां सर्वेषां मानवानां वा सनातनधर्मप्रवेशाधिकारो वर्तते न वेति चिन्ता प्रवर्तते । शास्त्रं च नात्र प्रतिकूलं किंत्वनुकूलमेव । न च 'वर्णानां सान्तरालानां' इति पापठ्यते स्मृतिशास्त्रप्रस्तावे

तत्र तत्रेति, कथं चातुर्वर्ण्यबहिष्ठानमन्तरालातिरिक्तानां वा सनातनधर्माधिकार इति वाच्यम्। सनातनधर्मशास्त्रस्य मनुष्यमात्रमधिकृत्य प्रवृत्तत्वात्। साधारणधर्मेषु सर्वेषामधिकृतत्वात्। अहिंसासत्याक्रोधदायानुपालनपुत्रदाराभरणशौचादिधर्माणां देवलादिभिः सर्वानधिकृत्य विहितत्वात्। तथा च **महाभागवतम्**

किरातहूणान्ध्रपुलिन्दपुक्कसा आभीरकङ्का यवनाः खशादयः।
येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाः शुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः॥

तथाऽऽ**गस्त्यसंहितायाम्**—

शुचिव्रततमाः शूद्रा धार्मिका द्विजसेवकाः।
स्त्रियः पतिव्रताश्चान्ये प्रतिलोमानुलोमजाः॥
लोकाश्चण्डालपर्यन्तं सर्वेऽप्यत्राधिकारिणः।

एवं **ब्रह्मोत्तरखण्डे** शिवपञ्चाक्षरं प्रक्रम्य --

महापातकदावाग्निः सोऽयं मन्त्रः षडक्षरः।
प्रणवेन विना मन्त्रः सोऽयं पञ्चाक्षरो मतः॥
स्त्रीभिः शूद्रैश्च संकीर्णैर्धार्यते मुक्तिकाङ्क्षिभिः।
नास्ति दीक्षा न होमश्च न संस्कारो न तर्पणम्॥
न कालनियमाश्चात्र जप्यः सर्वैरयं मनुः।
वैश्यैः शूद्रैर्भक्तियुक्तैर्म्लेच्छैरन्यैश्च मानवैः॥

तथा **वृद्धहारीत**स्मृतौ षष्टाध्याये ॐ नमो नारायणायेत्यष्टाक्षरं प्रक्रम्य --

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्यास्त्रियः शूद्रास्तथेतराः।
तस्याधिकारिणः सर्वे... ॥

इत्युक्तम्। एवं **स्कन्द**पुराणे—

विष्णुभक्तिसमायुक्तो मिथ्याचारोऽप्यनाश्रमी
पुनाति सकलाँल्लोकान्सहस्रांशुरिवोदितः॥
ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा यदि वेतरः॥
विष्णुभक्तिसमायुक्तो ज्ञेयः सर्वोत्तमोत्तमः॥
निर्दोषं विद्धि तं जन्तुं प्रभवात्परमात्मनः।

तथा **राजधर्मेषु** पञ्चषष्ठितमाध्याये—

'यवनाः किराता गान्धाराश्चीनाः शबरबर्बरः।
शकास्तुषाराः कङ्काश्च पहवाश्चान्ध्रमद्रकाः ॥
पौण्ड्राः पुलिन्दा रमठाः काम्बोजाश्चैव सर्वशः।
ब्रह्मक्षत्रप्रसूताश्च वैश्याः शूद्राश्च मानवाः ॥
कथं धर्माश्चरिष्यन्ति सर्वे विषयवासिनः
मद्विधैश्च कथं स्थाप्याः सर्वे ते दस्युजीविनः ।
एतदिच्छाम्यहं श्रोतुं भगवंस्तद् ब्रवीहि मे ।
त्वं बन्धुभूतो ह्यस्माकं क्षत्रियाणां सुरेश्वर ॥

इति मान्धातुरिन्द्रं प्रति प्रश्न--

मातापित्रोर्हि शुश्रूषा कर्तव्या सर्वदस्युभिः ।
आचार्यगुरुशुश्रूषा तथैवाश्रमवासिनाम् ॥
भूमिपानां च शुश्रूषा कर्तव्या सर्वदस्युभिः ।
वेदधर्मक्रियाश्चैव तेषां धर्मो विधीयते ॥
पितृयज्ञास्तथा कूपाः प्रपाश्च शयनानि च ।
दानानि तु यथाकालं द्विजेभ्यो विसृजेत्सदा ॥
अहिंसा सत्यमक्रोधो वृत्तिर्दायानुपालनम् ॥
भरणं पुत्रदाराणां शौचमद्रोह एव च ॥
दक्षिणाः सर्वयज्ञानां दातव्या भूतिमिच्छता ।
पाकयज्ञा महार्हाश्च दातव्या सर्वदस्युभिः ॥
एतान्येवंप्रकाराणि विहितानि पुराऽनघ ।
सर्वलोकस्य कर्माणि कर्तव्यानीह पार्थिव ॥

इतीन्द्रस्योत्तरम् । एतत्सर्वं समालोक्य सर्वेऽपि जगतीतलवर्तिनो मानवाः शैव-वैष्णवादिधर्मदीक्षाधिकारिणः सनातनधर्मं परिपाल्यैव मुच्येरन्स्वर्गतिं च प्राप्येरन्नित्यतिरोहितं शास्त्रतत्त्वं विदुषाम् ॥

[अथ अन्त्यजास्पृश्यतादोषविचारः ।]

सोऽयं शास्त्रव्यवहारयोर्जटिलो हृदयस्पृक्प्रश्नोऽन्त्यजस्पृष्टिविषयकः । अन्त्यजाः खलु भारतवर्षे षट्कोटिसंख्याका इति केचित् । आसन्नकोटिद्वया इत्यपरे । एते ह्यद्ययावदज्ञानावस्थायामवस्थिता अवनतेः परां काष्ठमनुभवन्तीति सर्वविदितम् । न च तैः कदापि मोहंमदीयैरिवार्यजनविद्वेषेणार्यमर्यादां समुच्छेत्तुं प्रयतितम् । न हि कदापि

सनातनधर्मविध्वंसनदुर्विचारस्तेषां मनांसि मनागप्यस्पृशन्म्लेच्छानामिव । नापि यवनानामिवार्यजनापमानकारि दुर्मात्सर्यं तेषां हृदयं प्राविशत्स्वप्नेऽपि। तैर्ह्यद्ययावज्जघन्यतमं भावमप्यास्थाय विषोढः सर्वसमाजबहिष्कारः, दारिद्र्यमपि सारिष्ठमिव विभाव्य नीतः कालः, उच्छिष्टमपि कृषिकीटावपन्नमपि कदन्नममृतमिव मत्वा निर्वाहिता शरीरयात्रा, जीर्णान्यपि चीवराणि शीतातपवारणार्थं वराणि मत्वा दस्युभ्योऽरक्षन्प्रामान्क्षेत्राणि चार्याणां, ग्रामाद्बहिः श्मशानवासमपि नन्दनवनमिवाभिनन्द्यार्यमलापाकरणं धर्म्यमिति विचार्य स्वनुष्ठितम्। तेषां विनघ्राणामज्ञानां सर्वतोऽपकृष्टानामन्त्यजानां स्पर्शास्पर्शविषयो विचारभूमिमधिरोहति। यैः खलु म्लेच्छैर्व्यतीते सार्धसहस्रसंवत्सरे काले शतश उद्ध्वस्तानि देवतायनानि, समाक्रान्तानि तीर्थक्षेत्राणि, करालकरवालैश्छिन्नानि वेदविदामास्तिकधौरेयाणां शिरांसि, दूषितं शिवंकरं शान्तं शास्त्रप्रमाणजातं, तेषां स्पर्शे नोत्तिष्ठति संशयलेशोऽपि चेतस्यास्तिकप्रवराणामपि, न लज्जते तेषां दास्यकरणे इतरसंव्यवहारे च चेतो धार्मिकमन्यानां, तैः साकं च विरूढः स्पर्शव्यवहारोऽद्यावधि न विप्रतिपत्तिपदं गच्छति, प्रत्युत समर्थयन्ति च तेषां वरिष्ठत्वं जात्याऽन्त्यजापेक्षया यथा हि निदर्शनं **सनातनधर्मप्रदीपे**— "अत्र चाण्डालम्लेच्छयोरयं विशेषः यन्म्लेच्छा मोहंमदादयः कर्मणा पतिताः न तु जातितः, म्लेच्छानां प्रतिलोमसंकरत्वाभावात्। अतो **महाभाष्यं** 'शूद्राणामनिरवसितानामि' ति सूत्रे ग्रामादनिरवसितत्वान्म्लेच्छयवनमिति प्रयोगसाधुतोपपादितोपपद्यते। एतेन मोहंमदादीनां ग्रामे प्रवेश चाण्डालानां कथं न प्रवेश इति अधुनातनानामाक्षेपोऽपि परास्तः। पतितस्य ग्रामतोऽपि निष्कासनं हि त्रेतायुगविषयम्। तदुक्तं त्रेतायां ग्राममुत्सृजेदिति। कलौ हि न म्लेच्छानां पतितानां ग्रामपरित्यागः प्रतिषिद्धः। व्यक्तं चैतत्पूर्वमेव विवेचितम्, यत् पराशराचार्यैश्चण्डालविषये संभाषणस्यापि निषेधात्, चण्डालादिजातिपातिस्ये न न्यूनताकल्पनं तत्संमतमिति। एवं च 'कर्तारं तु कलौ युगे' इति वदन्त एव पराशराचार्याश्चण्डालदर्शनादावपि प्रायश्चित्तविधानेन धर्मपतितानां विषय एव दोषन्यूनताकल्पनंसंभवतीति मन्यन्ते, न जातिपतितविषय इति स्पष्टमेव सूचयन्तीति व्यर्थमेवेदमान्दोलनं मोहम्मदादिदृष्टान्तेन चण्डालादिस्पृश्यतोपपादनार्थम्।" इति। तदि दमविवेकनिबन्धनं, किं न जानन्ति पण्डिता यन्मोहम्मदीयेषु सर्वेषामेव मुखबाहू-रुपज्जानामविविच्यैव संकर इति। किं नावगच्छन्ति विदुषोऽन्त्यजानामपि मोहंमदीयेषु समावेश इति। किं वा न जानते मनीषिणो मोहंमदीयेषु विवाहभोजनादिसंसर्गोऽनर्गलो वरीवर्तीति। किं नैते भारतीया मोहंमदीया अन्त्यजादितोऽपि हीनतरा जातितो वृत्तितो वृत्ततश्चेति। तथा च **मनुः**

ते चापि बाह्यान्सुवहूस्ततोऽप्यधिकदूषितान्।
परस्परस्य दारेषु जनयन्ति विगर्हितान्॥

यथैव शूद्रो ब्राह्मण्यां बाह्यं जन्तुं प्रसूयते।
तथा बाह्यतरं बाह्यश्चातुर्वर्ण्ये प्रसूयते॥
प्रतिकूलं वर्तमाना बाह्या बाह्यतरान्पुनः।
हीनाहीनान्प्रसूयन्ते वर्णान्पञ्चदशैव तु॥

इति तथा च पूर्वतनैरघुनातनैश्च स्पृश्यहिन्दुभिर्बहुसंख्याकैर्म्लेच्छान।मन्त्यजाद्यपेक्षयाऽप्यपकृष्टानां संस्पर्शो यदि सोढस्तर्हि किमपराद्धमन्त्यजैः । म्लेच्छसंस्पर्शमप्रतिकूलं गणयतां स्पृश्यहिन्दूनामुपरि अन्त्यजस्पृष्टिपरिहारमात्रेण किं नु कुशलादृष्टसुवृष्टिर्भविष्यति ?। ये खलु म्लेच्छपर्शं सहन्ते तेऽन्त्यजस्पर्शपरिहारमात्रेण किमदृष्टफलं लभेरन्निति विवेचयन्तु धर्माधर्मकुशलाः । यद्येतेषामन्त्यजानां सनातनधर्माभिमानिनां संस्पर्शो दोषायाधुनाऽपि परिगण्येतस्माभिस्तर्हि सनातनधर्मीयत्वमुत्सृज्याचिरादेव मोंहमदख्रैस्तांदिमतमवलम्बेरन्। ये खलु मित्रपक्षपातिन आसंस्ते दुरुच्छेदं शात्रयमेव भजेरन्नित्यापद्धर्मतया देशकालौ विचिन्त्य तेषां स्पर्शो न दोषत्वेन परिहार्य इति विवेक्तव्यम्। तथा च —

महाभारते - अधर्मो यत्र धर्माख्यो धर्मोऽधर्मो भवत्युत।
कारणाद्देशकालस्य देशः कालः स तादृशः

इति भीष्मवचनं विचार्य अन्त्यजस्पर्शापेक्षयाऽपि जघन्यो म्लेच्छसंस्पर्शो यैरस्माभिः सनातनधर्मीयैः सोढस्तैरन्त्यजस्पर्शो नाहत्य परिहार्यः । वैयक्तिकार्थकामप्रयुक्तैः रागद्वेषकलुषितैः सनातनधर्मीयैर्द्विज्जकुलोद्भूतैरपि म्लेच्छराज्यनिवासो म्लेच्छराजसेवा च न परित्यज्यते किन्त्वापद्धर्मत्वेन कथमपि नेत्रे निमील्य निर्वाह्यते न तच्चर्चास्पर्शोऽपि सह्यते। अन्त्यजस्पर्शस्तु सामाजिको विषयः, सामाजिकानां कुशलाकुशलसंबद्धो न तथाऽधर्माय भवेद्यथा म्लेच्छराजसेवादि । अस्माभिः खलु बहुभिः सनातनधर्मीयैर्द्विजकुलोद्भूतैर्वृत्यर्थं बहूनि पतनीयान्यपि कर्माणि निषेव्यन्ते यथा सिद्धान्नविक्रयः (हॉटेल-खाणावळी), लवणक्षीरतिलगन्धक्षौमोर्णादिविक्रयः, स्वर्णकारक्रिया, श्ववृत्तिरित्यादीनि सद्यःपतनीयानि । म्लेच्छादिभिरव्ययनाध्यापनादिसंबन्धोऽपि विधीयते सद्यःपातित्यकरः। बहुवर्षपर्यन्तं नित्यनैमित्तिककर्मवर्जनेन पतितानामनवरतं संकरोस्मासु सर्वप्रत्यक्षगम्योऽपि न चिन्त्यते । आपातत एवालोचिते धर्मशास्त्रनिषिद्धानि कर्माणि प्रकाशं प्रवर्तमानानि सामाजिकानामैहिकामुष्मिकनिपातहेतूनि परिदृश्यमानान्यपि न परित्यज्यन्ते किं वराकेणापतनीयेन केवलेनान्त्यजस्पर्शेनापराद्धमस्माकम्। तथा च शास्त्रे द्रव्यशुद्धिविचारे अनुबन्धादि विज्ञाय शौचं प्रकल्पयेदित्युक्तम्।

देवलः -- जातिशक्तिगुणापेक्षं सकृद्बुद्धिकृतं तथा।
अनुबन्धादि विज्ञाय प्रायश्चित्तं प्रकल्पयेत्॥

याज्ञवल्क्यः- देशं कालं वयः शक्तिं पापं चावेक्ष्य यत्नतः
प्रायश्चित्तं प्रकल्प्य स्याद्यत्र चोक्ता न निष्कृतिः ॥
देवलः-- प्रायश्चित्तं यथोद्दिष्टमशक्यं दुर्बलादिभिः ।
कार्यो ह्यनुग्रहस्तेषां लोकसंग्रहकारणात् ॥

इत्यादिवचनानुसारेण देशकालौ विचिन्त्य लोकसंग्रहं च, अस्पृश्यस्पर्शो न दोषत्वेनाहत्य परिहार्य इति निर्णेयम्।

सार्वजनीनोत्सवजलाशयसभागृहादौ तु शास्त्रमेव स्पर्शदोषापवादं वदति

अत्रिः -- देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

ने चैतत्सूतकाद्यशौचस्पृष्टिविषयमिति वाच्यम् । प्रकरणविरोधात् । प्रकरणं हि अन्त्यजस्पर्शविषयम्।

आदित्येऽस्तमिते रात्रावस्पृश्यं स्पृशते यदि ।
भगवन्केन शुद्धिः स्यात्ततो ब्रूहि तपोधन ॥

इत्यत्र उत्तरप्रवाहे एतद्वचंन पठितम्। (द्रष्टव्यमानन्दाश्रममुद्रितात्रिसंहितायाम्।) तथैव--

तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे राष्ट्रविप्लवे।
आपद्यपि च काष्ठायां स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

इत्यपि वचनमत्र प्रमाणम् । न चैतत्सूतकाशौचस्पर्शविषयत्वेन निबन्धकारैर्व्यवस्थापितत्वान्न प्रकृतविषयमुपष्टभ्नातीति वाच्यम्। **स्मृतितत्त्वे प्रायश्चित्तविवेके** चास्य चण्डालादिस्पर्शविषयत्वेनापि व्यवस्थापितत्वात्। **स्मृत्यर्थसारेऽ**पि सामान्यस्पर्शास्पर्शविचारोपसंहारेऽस्यानुवादाच्च। तथा हि

संग्रामे हट्टमार्गे च यात्रादेवगृहेषु च ।
अग्न्युत्पाते महापत्सु स्पृष्टास्पृष्टिर्न दुष्यति ॥

तथा वीरमित्रोदये आह्निकप्रकाशे :-

वृद्धशातातपः-- अन्त्यैरपि कृते कूपे सेतौ वाप्यादिके तथा ।
तत्र स्नात्वा च पीत्वा च प्रायश्चित्तं न विद्यते ॥
तथाऽऽपस्तम्बः- म्लेच्छादीनां जलं पीत्वा पुष्करिण्यांह्रदेडपिवा ।
जानूर्ध्वं तु शुचि ज्ञेयमधस्तादशुचि स्मृतम् ॥

तथा च जलाशये सभायां देवालयेषु अन्त्यजस्पर्शो न शास्त्रतोऽपि प्रत्यवायकर इति सुधीरमुद्घोषयामः सामाजिककुशलाकुशलविवेकानुसारेणत्यलं गहनशास्त्रचर्चया ॥

शुद्धिसर्वस्वम्

(मराठी भाषांतर)

प्रा. डॉ. सौ. आशा रवींद्र गुर्जर

ॐ

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा

॥ शुद्धिसर्वस्वम् ॥

सनातन-धर्म-प्रदीपातील शुद्धिप्रकाशाच्या विमर्शासह

संपादक

श्रीमत्सकलविद्यावदात-तपोनिर्धूत-कल्मषान्त:करण अशा
मराठे नारायण मराठे - शास्त्रींचा अनुगृहीत

जोशी लक्ष्मणशास्त्री

तर्कतीर्थ, न्यायमार्तंड, महाराष्ट्र-सनातन धर्ममहासभेचे महोपदेशक,
प्राज्ञपाठशाळेत नव्यन्याय, वेदान्त, धर्मशास्त्रादींचे अध्यापक

वाई,
शके १८५० (१९२८ इ.स.)

मुद्रक - वासुदेव गोपाळ परांजपे, आर्यसंस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे

प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई

अनुक्रमणिका

विषय	
भूमिका /	५३
१) विषयप्रवेश /	५९
२) सनातन धर्मापेक्षा इतर मतांमध्ये फक्त प्रवेश केल्यावर प्रायश्चित्ताचा विचार /	६०
३) प्रकृतप्रमेयाचे निरूपण /	६३
४) म्लेच्छ शब्दाचा अर्थ, म्लेच्छ संबंधाने पातित्याचा विचार /	६४
५) पतन शब्दाचा अर्थ /	६७
६) संसर्गाचे स्वरूप /	६७
७) संसर्गाने पतित झाल्याबद्दलचा, संसर्गाने पतीत झाल्याबद्दलचा विचार /	६९
८) स्वेच्छेने वा अनिच्छेने केलेल्या पापाबद्दलच्या प्रायश्चित्ताचा विचार /	७५
९) संसर्गाने पतित झालेल्यांच्या प्रायश्चित्ताचा विचार /	७७
१०) पतिताच्या संततीचा विचार /	९३
११) शुद्धीमध्ये शिष्टाचाराचे प्रमाण /	९६
१२) व्रात्याच्या शुद्धीचा विचार /	९७
१३) म्लेच्छादी लोकांना सनातन धर्मात प्रवेश देण्याचा अधिकार /	१०४
१४) अन्त्यजांच्या अस्पृश्यतादोषाचा विचार /	१०७

भूमिका

जे लोक सनातनधर्म-मंदिरातून एकदा का काही कारणाने बाहेर पडले त्यांना पुन्हा त्या मंदिरात प्रवेश करता येईल किंवा नाही याबद्दल धर्मवेत्तेही संभ्रमात असतात. या आस्तिकमूर्धन्यांनी श्रुती, स्मृती, निबंध इ. सर्व प्रमाणांचा अभ्यास करूनही त्यांच्या मनात मोठाच संशय असतो, की धर्मभ्रष्टांना पुन्हा सनातन धर्मात येण्याचा शास्त्रसंमत मार्ग नाहीच. हे मत शास्त्र न पाहिल्यामुळेच आहे, हे आमचा निबंध व्यवस्थित वाचल्यावरच निश्चित होईल. मत्सर दूर ठेवून या निबंधाचा अभ्यास करावा असे मान्यवर ब्राह्मणांना नमस्कार करून पुन:पुनः विनयपूर्वक निवेदन करतो.

इस्लाम इत्यादी इतर धर्मांचा स्वीकार केल्यावर लगेच नास्तिकतेचा दोष लागतो, अयोग्य शास्त्राच्या स्वीकारामुळे पापसंबंध होतो. त्याच्या निरासासाठी, मनु, याज्ञवल्क्य इत्यादींनी 'चान्द्रायण' नावाचे उपपातकांना सांगितलेले प्रायश्चित्त घेता येईल. म्लेच्छांबरोबर भोजन घेतल्यास किंवा त्यांच्यातील स्त्रियांबरोबर संबंध ठेवल्यास पतित व्हायला होते हे खरे, तथापि म्लेच्छान्नभोजनाचा समावेश **'निन्दितान्नादनं तथा** - निन्द्य माणसाचे अन्न खाणे' या याज्ञवल्क्यच्या वचनाधारे उपपातक म्हणून मानता येईल. **'हीनयोनिनिषेवणं** - हीन स्त्रीचा उपभोग हे याज्ञवल्क्याचे वचन आणि **'अथोपपातकानि - अगम्यागमनं, गुर्वीसखीं, गुरुसखीं अपपात्रां च गत्वा'** या बोधायनच्या वचनाप्रमाणे - अयोग्य स्त्रीकडे, वयाने मोठ्या असलेल्या मैत्रिणीकडे, गुरुच्या सखीकडे किंवा अयोग्य म्हणून दूर ठेवलेल्या व्यक्तीसह संबंध ठेवणे हे उपपातक आहे. या दोन्हींचा आधार घेऊन म्लेच्छ स्त्री-गमनाला उपपातक मानता येईल. त्याचे अज्ञानाने आचरण झाले असेल तर कृच्छ्र प्रायश्चित्त घ्यावे लागेल. जाणीवपूर्वक गमन केल्यास 'चान्द्रायण' प्रायश्चित्त घेणे योग्य होईल. त्याला आधार असा - **उपपातकशुद्धिः स्यादेवं चान्द्रायणेन तु'** हे वचन चान्द्रायणाने उपपातकाची शुद्धी होते हे सांगते.

वाय १८४-७

पतितान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा ॥ (अङ्गिरस)

अन्य स्त्रीकडे गेल्यामुळे, तिथे जेवल्यामुळे, दान स्वीकारल्यामुळे जो पतित होतो तो महिनाभर उपवास केल्यामुळे किंवा चांद्रायण प्रायश्चित्त घेतल्यामुळे त्या पातकातून मुक्त होतो, असे अङ्गिरस सांगतो.

अन्त्यानां भुक्तशेषं तु भक्षयित्वा द्विजातयः ।
चान्द्रं कृच्छ्रं तदर्धं च ब्रह्मक्षत्रविशां विधिः ॥ (आपस्तंब)

अन्त्यजांनी खाल्ल्यावर उरलेल अन्न खाल्ल्यास त्रैवर्णिक द्विजांना चांद्र किंवा कृच्छ्र किंवा त्याच्या अर्धे प्रायश्चित्त घ्यावे लागेल हा विधी आहे, असे आपस्तंबाचे सांगणे आहे. अन्त्यजशब्दाचा मेधातिथी इत्यादींच्या म्हणण्यावरून म्लेच्छ असा अर्थ घेता येतो. म्लेच्छादींचे अन्न फार काळ खाल्ल्यास त्याची तुलना सुरापानाशी आणि म्लेच्छस्त्रीगमन वारंवार-फार काळ केल्यास, गुरुपत्नीशी समागमाच्या पातकासारखे मानून त्या पातकासाठी सांगितलेल्या प्रायश्चित्तांचा अतिदेश मानून सुरापान आणि गुरुतल्पगमन या पापांना सांगितलेल्या प्रायश्चित्ताच्या अर्धे प्रायश्चित्त घ्यावे असा निर्णय आहे. सुरापान आणि गुरुतल्प गमनासाठी भगवान आपस्तंबांनी ३ वर्षांचे प्रायश्चित्त सांगितले आहे. ते असे म्हणतात की

स्तेयं कृत्वा सुरां पीत्वा गुरुदारं च गत्वा ब्रह्महत्यामकृत्वा चतुर्थकालामितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पं स्थानासनाभ्यां विहरन्त एते त्रिभिर्वर्षैरप पापं नुदन्ते ।।
- म्हणजे चोरी करून, मद्य पिऊन, गुरुपत्नीकडे जाऊन, ब्रह्महत्या न करता ३ वेळा उपवास, चवथ्या वेळी अमर्याद भोजन करणारे, फक्त पाणी सवनाचे वेळीच पिऊन, उठाबशा काढीत राहून तीन वर्षांनी पापातून मुक्त होतात.

हे म्हणजे १।। वर्ष कृच्छ्रासारखे आहे आणि त्याच्या अर्थ म्लेच्छान्नभोजन आणि अन्त्यज स्त्री गमनासाठी, आहे त्याच्या अर्धे म्हणजे नऊ महिन्यांचे कृच्छ्रव्रत. त्याच्या दंडाची रक्कम ज्या त्या त्या देशाप्रमाणे असावी. म्लेच्छान्नभोजन आणि त्याच्या पत्नीकडे जाणे याची सुरापानाशी आणि गुरुपत्नीसमागमाशी तुल्यता कशी काय असे विचारू नये.

गर्हितानद्ययोर्जग्धिः सुरापानसमानि षट् ।
रेतः सेकः स्वयोनीषु कुमारीष्वन्त्यजासु च ।
सख्युः पुत्रस्य च स्त्रीषु गुरुतल्पसमं विदुः ॥

निन्दित माणसाकडचे अन्नभक्षण आणि सुरापान याच्याशी तुल्य (पाप) असलेल्या सहा गोष्टी म्हणजे रेतस्खलन, कुमारी, अंत्यजा, मित्राची किंवा पुत्राची पत्नी आणि गुरुपत्नी यांच्याशी समागम करणे या होत.

या दोन वचनांनी त्यांचा सारखेपणा सिद्ध आहे. यांची तुल्यता आणि अर्ध प्रायश्चित्ताची कल्पना हा निबंधकारांनी आदर दाखवलेला मार्ग आहे. एखादी गर्ह्य गोष्ट पुन्हा पुन्हा

करणे याबाबत निर्णय तारतम्याने करणारी अनेक प्रायश्चित्ताची विधाने आम्ही या निबंधात उद्धृत केली आहेत. या बाबतीत खूप अभ्यासानंतर भगवान आपस्तंबांनी सांगितलेल्या प्रायश्चित्ताचाच निर्देश करायला हवा. तो असा आहे - **'अधर्माहृतान्भोगाननुज्ञाय न वयं चाधर्मश्चेत्यभिव्याहृत्याधोनाभ्युपरि जान्वाच्छाद्य त्रिषवणमुदकमुपस्पृशन्नक्षीराक्षारलवणं भुञ्जानो द्वादशवर्षाणि नागारं प्रविशेत् । ततः सिद्धिः । अथ संप्रयोगः स्यादार्यैः । एतदेवान्येषामपि पतनीयानाम् ।'**

अधर्माने उपभोगलेल्या विषयांना आमची संमती नाही, अनुज्ञा नाही. मी अधर्म केला आहे, गुडघे झाकून तीन वेळा दिवसात पाण्याचा स्पर्श करून दूध, मीठ इ. क्षार यांच्याशिवाय भोजन करीत १२ वर्षे घरात प्रवेश करू नये. याने प्रायश्चित्त सिद्ध होते. मग आर्यांशी संबंध येऊ शकतो. हेच प्रायश्चित्त अन्य पतितांसाठीही समजावे.

येथे सांगितलेले १२ वर्षांचे प्रायश्चित्त सहा वर्षांच्या कृच्छ्र प्रायश्चित्ताच्या बरोबरीचे आहे. त्याची बरोबरी १८० गायींच्या दानाशी होऊ शकते. शिवाय हे -

'चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति ॥'

चण्डाल किंवा अन्त्यज स्त्रीकडे जाऊन, जेवून तिच्याशी विवाह केल्यास अज्ञानाने केल्यास पतित होतो, जाणीवपूर्वक केल्यास पूर्णपणे पतित (चाण्डालच) होतो, या प्रायश्चित्ताचा अपवाद सांगण्यासाठी वरील विधान आहे असे उज्ज्वलाकार म्हणतो. अन्त्यस्त्रीकडे जाणे, भोजन आदी बाबतीत तारतम्याने प्रायश्चित्त सांगणारी अनेक वचने उपलब्ध असल्यामुळे मनुचे हे वचन प्रायश्चित्ताचे श्रेष्ठत्व-महत्त्व जाणवून देण्यासाठीच आहे. प्रायश्चित्त घेतलेल्या पतितांचा आपल्या पूर्वीच्या (जन्माने मिळणाऱ्या) जातीत प्रवेश नाही किंवा पूर्वीच्या जातिबांधवांसह विवाहादी निकटचा संबंध होऊ शकत नाही हे पंडित अनंत कृष्ण शास्त्रींनी 'सनातनधर्मप्रदीपा'त मांडलेले मत प्रमाणहीन आहे. मनू, याज्ञवल्क्य, गौतम आदींनी पतिताच्या प्रायश्चित्तानंतरच्या समाविष्ट करून घेणे या गोष्टींचा वारंवार उल्लेख केला आहे, तो अशा शब्दांत - **'सर्वाणि ज्ञातिकर्माणि यथापूर्वं समाचरेत्'** - पूर्वीप्रमाणेच स्वत:च्या जातीची सर्व कर्मे आचरावीत. आपस्तंबीय विधानाने ही **'तत: सिद्धिः अथ संप्रयोग: स्यादार्यै:'** प्रायश्चित्त सिद्धी झाल्यावर आर्यांशी संबंध होतो, असे निर्णयात्मक मत दिले आहे. एका वर्षाहून अधिक किंवा चार वर्षांहून अधिक ज्यांना म्लेच्छांच्या संसर्ग सहवासाचा दोष लागलेला आहे, त्यांना प्रायश्चित्त करूनही पूर्वजातीत परत येता येत नाही हे मतही निराधार आहे. देवलस्मृतीत चार वर्षानंतर प्रायश्चित करता येत नाही, असे जे म्हटले आहे, तेही प्रायश्चित्ताची थोरवी सांगण्यासाठीच आहे. देवलाच्या म्हणण्याप्रमाणे चान्द्रायण आणि पराक ही दोन प्रायश्चित्ते ४ वर्षांहून अधिक काळ गेल्यावर घ्यावयाची म्हटल्यास १२ वर्षांपेक्षा जास्त काळ जाईल. मरणान्त प्रायश्चित्ताची वेळ येईल. त्यापेक्षा 'प्रायश्चित्त नाही'

असे सांगितले. तीन वर्षे प्रायश्चित्त कृच्छ्र प्रायश्चित्तही घेणे योग्य होणार नाही म्हणून अनेक वर्षांचा अतिक्रम बाजूला ठेवून संसर्गातील, संपर्कातील कमीजास्तपणाचा निर्णय करून शेवटी पाप कितीही मोठे असले तरी आपस्तंबाने सांगितलेले प्रायश्चित्त करायला सांगून पतिताच्या स्वजातीत पुन: प्रवेशाला शास्त्राचा विरोध नाही.

'पतितपुत्रः पतितो भवत्यन्यत्र स्त्रियः' या वसिष्ठवचनाप्रमाणे पतिताची कन्या पतित होत नाही, तिला पतितत्वाचा दोष नाही. हे सर्वांच्या मताने सिद्ध आहे. त्यामुळे पतिताच्या कन्येचा स्वजातीत समावेश होतो. पतिताच्या पुत्रालासुद्धा पतितासाठी सांगितलेले प्रायश्चित्त करून पूर्वजातीत प्रवेश करायला शास्त्र अडवत नाही. ज्यांनी प्रायश्चित्त घेतले नाही त्यांना मरणकाळी प्रायश्चित्ताला योग्य मानून बौधायन सांगतात - **'अथ पतिताः समवसाय धर्माश्चरेयुरितरेतरयाजका इतरेताध्यापकामिथो विवहमानाः पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुः विप्रव्रजता स्मभ्यः एवमार्यान्संप्रतिपत्स्यथ'** इति।

आता पतितांनी ठरवून धर्माचे आचरण करण्यासाठी याजक, एकमेकांचे उपाध्याय, परस्परांच्या कुटुंबामधील मुलामुलींशी विवाह, मुले निर्माण करून आमच्यापासून दूर जावे, अशा प्रकारे आर्यांना जाऊन मिळावे. येथे पुत्राला उपदेश करण्याचा विधानात आर्यांमध्ये समावेश उद्देश म्हणून सांगितला आहे. नंतर बौधायनानेच हरितमताने पतित पुत्राच्या पतितत्वाची व्यवस्था अशी लावली -

'अशुचिशुक्लोत्पन्नानां तेषामिच्छतां प्रायश्चित्तिः पतनीयानां तृतीयोंऽशः ।'

ज्या पतितांच्या शुद्ध स्त्रीपासून झालेल्या पुत्रांना प्रायश्चित्त हवे असेल ते त्यांना पतिताच्या १/३ प्रायश्चित्त द्यावे. याने पतिताच्या पुत्राला स्वत:च आधी पतिताला सांगितलेल्या तीन वर्षांच्या काळापैकी व्रतातील तृतीयांश (म्हणजे एक वर्ष) सांगितला आहे. त्या प्रायश्चित्तामुळे पतिताच्या मुलाला सर्व व्यवहाराला समर्थ करणारे ठरेल. त्याचे दुसरे काही प्रयोजन नाही. त्यामुळे पित्याच्या परंपरेने पातित्य असूनसुद्धा पतितासाठी सांगितलेले प्रायश्चित्त घेतल्यामुळे पित्याकडून वा मातेकडून संकर न झाल्यामुळे पतिताच्या मुलांना पूर्वजातीत पूर्णपणे प्रवेश मिळतो.

ज्यांना अन्य संप्रदायात/धर्मात प्रवेश केल्यानंतर माता किंवा पित्याकडून संकर झाला, त्यांनाही सनातन धर्मात प्रवेश करण्याचा अधिकार आहे. त्यांना शैव किंवा वैष्णव दीक्षेने सनातनधर्माची प्राप्ती होते.

ज्या द्विजांचा-त्रैवर्णिकांचा खूप काळापासून उपनयनादिसंस्कार झालेला नाही त्या सावित्रीपतितांना सावित्री मंत्रापासून वंचित राहिलेल्यांना, श्रौतसूत्रांनी सांगितलेल्या व्रात्यस्तोमाच्या अनुष्ठानाने पुन्हा द्विजांच्या कर्माचा अधिकार प्राप्त होतो. व्रात्यस्तोमाचा अधिकार व्रात्यत्वावर आधारलेला असल्यामुळे व्रात्यत्वाचा संकोच करावयाला प्रमाण नाही (अनेक प्रकारचे 'व्रात्य' यात सामील होऊ शकतात.)

अन्त्यजांच्या स्पर्शाबद्दल प्रमाण निश्चित्त झालेले आहे. अन्त्यजांच्या तुलनेने जन्माने आणि कर्माने हीन असलेल्या म्लेच्छांचा स्पर्श जर टाळला जात नसेल, चालत असेल, तर अन्त्यजांचा द्वेष कशासाठी? सार्वजनिक, सभास्थाने, देवालये, पाणवठे इ. ठिकाणी स्पर्शदोषाचा अपवाद करणारी, स्पर्शदोष मानू नये असे सांगणारी शास्त्रवचने उपलब्ध आहेतच. अत्रि ऋषि म्हणतात -

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

देवांच्या यात्रा, विवाह, यज्ञकार्य, सर्व उत्सव यात स्पृश्यास्पृश्यता मानू नये. हा संदर्भ सूतकातल्या अशौचाच्या अस्पर्शाच्या संदर्भातला नाही. तिथे प्रकरणाशी विरोध येईल. ते सांगताना प्रकरण सूतकाशौचाचे नसून अन्त्यजादींच्या स्पर्शाबद्दल आहे. निबंधकारांनी अस्पृश्यांच्या स्पर्शाचे अपवाद म्हणून सांगितलेली वचने येथे निबंधात चर्चिली आहेत.

धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रं तु तृतीयो लोकसंग्रहः ॥

धर्माबद्दल जाणून घेण्याची इच्छा असलेल्यांसाठी श्रेष्ठ प्रमाण वेद, मग धर्मशास्त्र आणि नंतर लोकव्यवहार ही तीन प्रमाणे आहेत. म्हणून शास्त्र लोकाचार यांचा समन्वय करून शास्त्राज्ञेचे पालन व्हावे, शास्त्रप्रामाण्य लोप पावू नये आणि समाजाचा सेतूही मोडू नये, असा हा विचार करुणासागर विद्वानांनी भारतीयत्वाला वाचवण्यासाठी मान्य करावा.

शुद्धिसर्वस्वम्

विषयप्रवेश

ही गोष्ट विद्वानांना माहीतच आहे की, भारतवर्ष त्रिभुवनाला भूषणभूत होते. धर्मात हा देश जगाचा गुरू होता. सहा शास्त्रांच्या तत्त्वज्ञांचे हे जन्मस्थान. स्वत:च्या तेजाने स्वर्गलोकालाही जिंकणारा हा देश. जगातल्या नाना द्विपांमधील राजांच्या डोक्यांवरील माळांनी त्यांचे चरणयुगल स्पर्शिले जात. पराक्रम गाजवण्यात रस असलेल्या, चातुर्वर्ण्याचे रक्षण करण्याची दीक्षा घेतलेल्या, पित्याप्रमाणे प्रजेचे पालन करणाऱ्या, नल, नहुष, ययाती, भरत, भगीरथ, दशरथ अशा राजांनी या भारतवर्षावर राज्य केले. शांत, दान्त, विजितेन्द्रिय, ऋजु, क्षमाशील अशा चारही पुरुषार्थांचा उपदेश देणाऱ्या मुनिजनांनी यांची सेवा केली आहे.

तो प्राचीन काळ हळूहळू मागे पडल्यावर, सनातनधर्माचा विनाश करण्यासाठी कटिबद्ध झालेला कलिकाल सुरू झाला. परकीयांनी भारताला अनेक प्रकारे जर्जर केले. स्वधर्मरूपी राक्षसीने ग्रासलेल्या अंत:करणाच्या मुसलमानांनी तीक्ष्ण तलवारीच्या बळावर, नाना प्रलोभने दाखवून, बलात्काराने अनेक आर्यांना शूद्र केले. अन्त्यजांना धर्मातून बाहेर काढले. त्यांना जगणे हाच त्यावेळी परमश्रेष्ठ धर्म वाटला. त्यांनी धर्मग्रंथ जाळले, दर्शनांचे जाळे समूळ उखडून टाकले. विज्ञानशास्त्रराशी नष्ट झाली. इतिहासपुराणे निष्प्रभ झाली. चातुर्वर्ण्यव्यवस्था मोडीत निघाली. हा असा दुस्तरतम काळ आला असताना अखिल भारतवर्ष अज्ञानांधकारात बुडल्यावर, विशुद्ध हिंदुंची संख्या दिवसेंदिवस घटायला लागली. सनातनधर्माचा द्वेष करणारे वाढू लागले.

वृत्रासारखे वैदिक धर्माचा विध्वंस करणारे मातले. श्रुती-स्मृती-पुराणइतिहास-आगमादींचे विरोधक वाढु लागले. आजसुद्धा खोट्या अभिनिवेशाने आर्य पाहत असतानासुद्धा अज्ञ लोकांच्या मनात जबरदस्तीने स्वत:चा धर्म लादण्याचा प्रयत्न म्लेच्छ करीतच आहेत. परंतु आजपर्यंत हजारांहून अधिक वर्षे पंडित लोक गाढ निद्रेत आहेत - झोपी गेलेले आहेत. परिस्थितीचा विचार न करता, शास्त्रांचा अभ्यास न करता, स्वत:चे कर्तव्य विसरून,

आपद्धर्म न उमजून 'पतिताची शुद्धि निषिद्ध, वर्ज्य' असा उद्घोष पंडितांनी केला. त्यावेळी त्यांना होणारा भारतीय संस्कृतीचा ऱ्हास दिसला नाही आणि 'सर्वनाश ओढवला तर शहाणा माणूस अर्ध्याचा त्याग करून अर्धे राखतो' हा न्यायही लक्षात राहिला नाही. आजचे सात कोटी मुस्लिम पूर्वीचे सनातनधर्मीयच होते, असे इतिहासतज्ज्ञ मानतात, कंठरवाने सांगतात. एक कोटी भारतीय ख्रिस्त आपलेच होते, हे प्रत्यक्ष आहे. दरवर्षी एक लाख भारतीय ख्रिस्त धर्मात प्रवेश करतात, असे जनगणनेच्या अहवालात नमूद केलेले आढळते. हे भारतीयांचे पतन, भारतधर्माचा विध्वंस पाहून सज्जनांचे मन कळवळते, विद्वानांची मने खिन्न होतात. हे लक्षात घेऊन शास्त्रावर श्रद्धा असणाऱ्यांसाठी, परिस्थितीचे सम्यकज्ञान, आपद्धर्म आणि मुख्य धर्म यातील तारतम्य जाणण्यात कुशल बुद्धिमंतांसाठी, पतितांना प्रायश्चित्त देण्याबद्दलचा शास्त्रांचा अभिप्राय जाणण्याचा प्रयत्न करू या. पतित म्हणजे येथे म्लेच्छादींच्या संबंधाने पतित असा अर्थ घ्यावा. हे इथे लक्षात ठेवायला हवे की आम्हाला एकही वचन असे मिळाले नाही की जे संसर्गामुळे पतित झालेल्याच्या शुद्धीकरणाला विरोध करते!

सनातनधर्मापेक्षा वेगळ्या धर्मात प्रवेश केल्यानंतर लगेच करायच्या प्रायश्चित्ताचा विचार

केवळ वैदिकांपेक्षा वेगळ्या मतात प्रवेश केल्या केल्या पतितत्व येते की नाही, याचा निर्णय 'नाही' असा आहे. कारण तशा प्रवेशाचा पतनीय कारणांमध्ये समावेश केलेला नाही. ते फक्त घुसडले आहे.

अनाहिताग्नितास्तेयमृणानामनप्रक्रिया ।
असच्छास्त्राधिगमनं कौशीलव्यस्य च क्रिया ॥ मनु.
धान्यकुप्यपशुस्तेयं मद्यपस्त्रीनिषेवणम् ।
स्त्रीशूद्रविट्क्षत्रवधो नास्तिक्यं चोपपातकम् ॥ याज्ञवल्क्य

अग्निहोत्र न करणे, चोरी, ऋण परत न करणे, असत्-सनातनधर्माव्यतिरिक्त धर्मात प्रवेश करणे, नाटकात काम करणे, धान्य, सोने, पशू यांची चोरी, मद्यपान, स्त्रीचा उपभोग, स्त्री, शूद्र, वैश्य, क्षत्रिय यांची हत्या, नास्तिक्य ही उपपातके आहेत. या मनु, याज्ञवल्क्यवचनांमध्ये असत्-मिथ्या शास्त्रज्ञानरूप इतर मतांमध्ये प्रवेशालाच उपपातक म्हटले आहे. ते पातक थोड्याशा प्रयत्नाने दूर होऊ शकते.

एतदेवं व्रतं कुर्युरुपपातकिनो द्विजाः ।
अवकीर्णिवर्जं शुद्ध्यर्थं चान्द्रायणमथापि वा ॥ मनु.
उपपातकशुद्धिः स्यादेवं चान्द्रायणेन तु ।
पयसा वापि मासेन पराकमथवा पुनः ॥ याज्ञवल्क्यः

उपपातकी द्विजांनी समागम करणारे सोडून शुद्ध होण्यासाठी चांद्रायणव्रत करावे. चांद्रायणाने, महिनाभर दूध/पाणी पिऊन अथवा 'पराक' प्रायश्चित्त करून उपपातकातून मुक्ती मिळते. मनु, याज्ञवल्क्य यांच्या वचनांनुसार चांद्रायणाचा उपदेश आहे. चांद्रायण न करता तीन गाई देणे (दान), किंवा १२ आणेपर्यंत-निष्क्रय म्हणजे त्या ऐवजी (दंडासारखे) द्यावेत. आता गौतमाने नास्तिकाचा समावेश पतनीयांमध्ये केला असल्यामुळे पतिताला सांगितलेल्या प्रायश्चित्ताला तो पात्र नाही, असे म्हणणे योग्य नाही. गौतमाच्या नास्तिकपदाचा अर्थ वैदिक धर्माचा द्वेष करणे या स्वरूपाचा अत्यंत नास्तिकपणा हा आहे. असच्छास्त्राच्या स्वीकारापेक्षा वेगळा नास्तिक्याचा उल्लेख, वेगळ्या धर्मात प्रवेश करण्याचे पाप, नास्तिकत्वरूप पतनीयत्व असल्याने, अल्प प्रायश्चित्ताने दूर करण्यासारखे असते. ते उपपातक असल्यामुळे 'नास्तिक्यम् उपपातकम्' (नास्तिकपणा हे उपपातक) असे मनूने म्हटले आहे. तसेच वसिष्ठ म्हणतात - 'नास्तिक १२ रात्रींचे कृच्छ्र आचरण करून, नास्तिकता सोडून देईल. अतिकृच्छ्राने नास्तिकपणे वागणारा शुद्ध होतो.' बारा वर्षांच्या प्रायश्चित्तानेच पतित पापमुक्त होतो, लहान प्रायश्चित्ताने होत नाही, असे म्हणू नये. स्वेच्छेने अविक्रेय म्हणजे न विकण्यासारखी गोष्ट विकल्यास ती गोष्ट पतितत्वाला कारण होऊ शकते, असे असूनही उक्त वचनाशी विरोध येत असल्यामुळे तीन कृच्छ्र प्रायश्चित्तांनी दोष नष्ट होतो असे सांगितले, तशा नियमाना प्रमाण सापडत नाही.

तथा चाङ्गिराः - पालनं विक्रयश्चैव तद्वृत्त्या उपजीवनम् ।
पतितस्तु भवेद्विप्रस्त्रिभिः कृच्छ्रैर्यपोहति ॥

अंगिरस म्हणतो प्राणी पाळून आणि विक्री करून, त्यावर उपजीविका करून ब्राह्मण पतित होतो. तीन कृच्छ्र प्रायश्चित्ते करून त्यातून मुक्त होतो.

संवर्तः - कुर्यात्कृच्छ्रं समानं तत्षण्मासांस्तदनन्तरम् ।
पतनीयेष्वप्ययं दृष्टः प्रायश्चित्तविधिः शुभः ॥

संवर्त म्हणतो (उपपातक्यांनी) सहा महिनेपर्यंत कृच्छ्र करावे. (त्यानंतर सामान्य आचार व्यवहार करावा.) पतित होणाऱ्यांसाठीही हाच प्रायश्चित्त विधी शुभ आहे.

शंखलिखितौ - तिलतैलदधिक्षौद्रलवणद्राक्षामद्यमांसकृतान्न- स्त्रीपुरुषहस्त्यश्ववृषगन्धरसक्षौमकृष्णाजिनसोमोदकनीलीविक्रयात्सद्यः पतित ब्राह्मणः इत्युपक्रम्य वत्सरं तप्तकृच्छ्रमाचरेदिति।

शंखलिखित म्हणतात, की तीळ, तेल, दही, मध, मीठ, दारू, मद्य, मांस, शिजवलेले अन्न, स्त्री, पुरुष, हस्ती, घोडा, बैल, गंध, रस, रेशमी वस्त्र, कृष्णाजिन, सोम, उदक, नीलि यांच्या विक्रीने ब्राह्मण लगेच पतित होतो, अशी सुरुवात करून वर्षभर 'तप्तकृच्छ्र' प्रायश्चित्त घ्यावे.

हारीतोऽपि-लाक्षालवणमधुमांसतैलक्षीरदधिघृतगन्धान्यतमविक्रये चान्द्रायणम् ।

हारितही म्हणतो, की लाख, मीठ, मध, मांस, तेल, दूध, दही, तूप, गंध यापैकी काही विकले तर चान्द्रायण प्रायश्चित्त घ्यावे.

पराशरः - विक्रीय कन्यकां गां च कृच्छ्रं सांतपनं चरेत् ।

पराशर म्हणतो, की कन्या किंवा गाईला विकल्यास सांतपन कृच्छ्र हे प्रायश्चित्त घ्यावे.

चतुर्विंशतिमतेः - नारीणां विक्रयं कृत्वा चरेच्चान्द्रायणं व्रतम् ।
द्विगुणं पुरुषस्यैवं व्रतमाहुर्मनीषिणः ॥
वैश्यं शूद्रं क्रियासक्तं विकर्मस्थं द्विजोत्तमम् ।
हत्वा चान्द्रायणं तस्य त्रिंशद्गाश्चैव दक्षिणाः ॥

चतुर्विंशतीचे मत असे आहे की. नारींचा विक्रय करून चान्द्रायणव्रत करावे. पुरुषाचा विक्रय करून दुप्पट व्रताचरण करावे असे शहाणे लोक म्हणतात. आपस्तंब पुरुषवधाला पतित होण्याचे कारण मानून सांगतो की काम करणाऱ्या वैश्य किंवा शूद्राला आणि वाईट कर्मात गुंतलेल्या ब्राह्मणाला मारल्यास चांद्रायण प्रायश्चित्त घ्यावे आणि ३० गाई दक्षिणा म्हणून द्याव्यात. पराशराचे पुढील वचन कमी प्रायश्चित्त सांगणारे वाटते -

क्षत्रियस्य वधं कृत्वा चरेच्चान्द्रायणत्रयम् ।
वैश्यस्य तु द्वयं कुर्याच्छूद्रस्यैन्दवमेव तु ॥

हे वचनही याला समर्थन-बळकटी देते-ती अशी- क्षत्रियाचा वध केल्यास तीन वेळा चांद्रायण करावे, वैश्याचा वध केल्यास दोन चांद्रायणे आणि शूद्राचा वध केल्यास एकदा चांद्रायण प्रायश्चित्त करावे. याच बाबतीत मनूने सांगितलेली तीन, दोन वा एक महिन्याची प्रायश्चित्ते उपपातकांसाठी विचारात घ्यावीत. जाणूनबुजून वध केला नसल्यास याज्ञवल्क्याने सांगितलेले तीन रात्री उपवास, एक बैल आणि दहा गाईंचे दान हे प्रायश्चित्त करावे.

देवलोऽपि - चौरः श्वपाकश्चाण्डालो विप्रेणाभिहतो यदि ।
अहोरात्रोषितो भूत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥

देवल सुद्धा म्हणतो, की चोर, मांसभक्षक, चांडाल यांना ब्राह्मणाने मारले तर एक दिवस-रात्र उपवास करून तूप पिऊन तो शुद्ध होतो. अभक्ष्य गोष्टींमध्ये कांदा, गाजर इ. खाल्ल्यामुळे मनूने पतितत्व सांगितले आहे -

छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डूं गृञ्जनं चैव मत्या जग्ध्वा पतेन्नरः ॥

भूछत्र, डुक्कर, लसूण, ग्रामकोंबडा, कांदा, गाजर या गोष्टी स्वेच्छेने खाल्ल्यामुळे माणूस पतित होतो. नकळत चुकून एकदा खाल्ल्यास यम प्रायश्चित्त सांगतो -

लशुनं कवकं चैव पलाण्डुं गृञ्जनं तथा ।
चत्वार्यज्ञानतो जग्ध्वा तप्तकृच्छ्रं चरेद्द्विजः ॥

चुकून, अजाणता लसूण, भूछत्र, कांदा किंवा गाजर या चार गोष्टी खाल्ल्यास माणसाने तप्तकृच्छ्र हे प्रायश्चित्त घ्यावे. स्वेच्छेने जाणुनबुजून खाल्ल्यास याज्ञवल्क्य सांगतो -

पलाण्डुं विड्वराहं च च्छत्राकं ग्रामकुक्कुटम् ।
लशुनं गृञ्जनं चैव जग्ध्वा चान्द्रायणं चरेत् ॥

कांदा, डुक्कर, भूछत्र, ग्रामकोंबडा, लसूण, गाजर खाल्ल्यास चांद्रायण प्रायश्चित्त घ्यावे. इतरत्र स्वेच्छेने या गोष्टी पुन:पुन्हा केल्यास पुन्हा संस्कारसुद्धा शास्त्रांनी सांगितला आहे - पुन्हा संस्कार म्हणजे पुन्हा उपनयन. तो झाल्याशिवाय ब्राह्मणाची विहित कर्मे करता येत नाहीत. महापातकांमुळे पतित झालेल्यांना म्हणूनच बौधायन, आपस्तंब आदींनी सांगितलेल्या तीन वर्षांच्या प्रायश्चित्ताची संगती लागते. अशाच प्रकारे **'यौनस्त्रौवमुख्यैः सद्यः पतति'** योनीत स्राव (वीर्याचा) इ. पातकांमुळे लगेच पतित होतो. या विष्णुवचनामुळे पतित स्त्रीच्या संबंधामुळे पतितत्व येतेच तरीही यमाचे पुढील वचन सुसंगत ठरते -

पतत्यन्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा ॥

अन्त्यज स्त्रीकडे जाऊन, तिथे जेवून किंवा दान स्वीकारल्यास प्रायश्चित्त म्हणून महिनाभर उपवास करावा किंवा चान्द्रायणव्रत करावे. तसेच पातित्य निर्माण करणाऱ्यांना बारा वर्षांच्या प्रायश्चित्तापेक्षा कमी त्रासाची शंभराहून अनेक वचने शास्त्रात उपलब्ध आहेत. म्हणून मुस्लिम, ख्रिस्त धर्मात प्रवेश केलेल्यांसाठी वेगळ्या धर्मात प्रवेश करणाऱ्या किंवा नास्तिकांचे आचरण करणाऱ्यांसाठी, त्यातून बाहेर पडण्यासाठी, त्या पापाला उतारा म्हणून चांद्रायणादी लहान प्रायश्चित्ते घ्यावीत.

प्रकृत प्रमेयाचे निरूपण

म्लेच्छांबरोबर एका भांड्यात जेवण करण्याने, त्यांच्या कन्यांशी संबंध ठेवल्यामुळे, त्यांच्यासह झोपणे, खाणे इ. व्यवहार केल्यामुळे जे लोक स्वत:च्या धर्मातून भ्रष्ट होतात, त्यांना संसर्गाने पतित झालेले असे म्हणतात. त्यांना द्यावयाचे प्रायश्चित्त आणि त्यांच्यासह सर्व व्यवहार पूर्ववत् करणे, यावर येथे विचार करावयाचा आहे. या लोकांमध्ये काही लोकच स्वेच्छेने स्वधर्मातून भ्रष्ट होतात - तो सोडतात. त्या भयंकर काळात राजाज्ञा पाळून म्लेच्छधर्म स्वीकारला नाही तर लगेच धनमाल, मुलेबाळे यांचा लगेच नाश होईल म्हणून केवळ प्राणरक्षणाच्या इच्छेने तेच कर्तव्य मानून जबरदस्तीने अनेक हिंदू, मुसलमान झाले आणि त्यांची मुलेही म्लेच्छ ठरली - त्यात धर्मांतर करण्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र सारेच

होते. अन्य जे काही कसल्या तरी लोभाने, बळजबरीने त्या धर्मात प्रविष्ट झाले होते, त्यांना शास्त्राने सांगितलेल्या प्रायश्चित्ताचे ज्ञान नव्हते, त्यामुळे स्वजातीयांनी स्वीकार न केल्यामुळे अनेक वर्षांपर्यंत पतित अवस्थेतच राहिले. जर त्या सर्वांनीच स्वत:ची नास्तिकता लक्षात घेऊन, नरकातून तरण्याचा उपाय म्हणून प्रायश्चित्त घेण्याची तयारी दाखवून नमस्कारपूर्वक प्रार्थना विनंती केली तर त्यांना कदाचित् नास्तिकपणा सोडून, त्यांना स्वत:ला योग्य अशा आचाराची अनुज्ञा आणि उपदेश, आपापल्या आईवडिलांच्या मूळ जातीत प्रवेश, पूर्वीच्याच जातीमधील लोकांबरोबर विवाहादिजवळचा संबंध प्राप्त व्हायला हवेत की नाही? त्यांचा तो अधिकार आहे की नाही? त्याला ते लायक आहेत की नाही? जन्मापासून मिळालेले नास्तिकत्व, तो दोष टाळण्यासाठी कोणते प्रायश्चित्त, यासारख्या बऱ्याच गोष्टींचा विचारनिर्णय करायचा आहे, करायला हवा आहे.

म्लेच्छ' शब्दाचा अर्थ

प्रथम म्लेच्छ म्हणजे कोण हे पाहिले पाहिजे. बऱ्याच जणांना वाटते, 'आपल्या प्राचीन धर्माशास्त्रांमध्ये म्लेच्छविषयक विचार-संदर्भ नसेल. भारतीयांचा त्यांच्याबरोबर संबंध अलीकडेच आला आहे, पूर्वीच्या स्मृतिशास्त्रांमध्ये कसा काय म्लेच्छांचा उल्लेख असेल?' पण हे मत अज्ञानावर आधारलेले आहे.

स्मृतितत्त्वात पाहा -

बौधायन: - गोमांसखादको यस्तु विरुद्धं बहु भाषते ।
सर्वाचारविहीनश्च म्लेच्छ इत्यभिधीयते ॥

हरिवंश - सगरस्तां प्रतिज्ञां च गुरोर्वाक्यं निशम्य च ।
धर्मं जघान तेषां वै वेषान्यत्वं चकार ह ॥
अर्धं शकानां शिरसो मुण्डयित्वा व्यसर्जयत् ।
यवनानां शिर: सर्वं काम्बोजानां तथैव च ॥
पारदा मुक्तकेशाश्च पह्लवा: श्मश्रुधारिण: ।
नि:स्वाध्यायवषट्कारा: कृतास्तेन महात्मना ।
शका यवनकाम्बोजा: पारदा: पह्लवास्तथा ।
कोलिसर्प: समहिषा दर्वाश्चोला: सकेरला: ॥

बौधायन - जो गोमांस खातो, (वैदिक धर्माच्या) खूप विरुद्ध बोलतो, जो कोणतेही धर्माचार पाळीत नाही, त्याला म्लेंच्छ म्हणतात.

हरिवंश - सगराने ती प्रतिज्ञा आणि पित्याचे वचन ऐकून त्यांचा धर्म नष्ट केला आणि त्यांचा वेष बदलून टाकला. शकांचे अर्धे शिर भादरले. (त्याचे केस काढून टाकले). यवनांचे पूर्ण शरीर केशविरहित केले. काम्बोजाचे पण तसेच करून त्यांना सोडून दिले. पारदांचे

केस मोकळे सोडले, पह्लवांना दाढीधारी केले. त्या महात्मा सगराने सर्वांना स्वाध्याय आणि पितरांचे कार्य यापासून दूर ठेवले. शक, यवन, कांबोज, पारद, पह्लव, कोलिसर्प, समहिष, दर्व, चोल, केरल (सर्व म्लेच्छ?) शक म्हणजे शकदेशात जन्मलेले क्षत्रिय तसेच यवनादीही (म्लेच्छ) होत.

विष्णुपुराणे - ते चात्मधर्मपरित्यागाम्लेच्छत्वं ययुरिति ।

मनुश्च - शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥
पौण्ड्रकाश्चौंड्रद्रविडाः काम्बोजा यवनाः शकाः ।
पारदाः पह्लवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥
मुखबाहूरुपज्जानां या लोके जातयो बहिः ।
म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ॥

विष्णुपुराणात म्हटलंय - ते स्वत:चा धर्म टाकल्यामुळे म्लेच्छ झाले.

मनु म्हणतो - हळूहळू ब्राह्मणांचे दर्शनही न झाल्याने सर्व धर्मकर्मांचा लोप होऊन क्षत्रिय जाती वृषलत्वाला प्राप्त झाल्या. पौण्ड्रक, चौण्ड्र, द्रविड, कम्बोज, यवन, शक, पारद, पह्लव, चीन, किरात, दरद, खश आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्याशी झालेल्या संकरातून निर्माण झालेले ते सर्व म्लेच्छ, दस्यूच मानावेत.

दस्यू हे दुसरे नाव असलेल्या म्लेच्छांचे धर्म राजधर्माच्या ६५ या अध्यायात सांगितले आहेत. ब्रह्मोत्तरखण्डात शिवपञ्चाक्षर मंत्राबद्दल सांगतात.

न कालनियमाश्चात्र जप्यः सर्वैरयं मनुः।
वैश्यैः शूद्रैर्भक्तियुक्तैम्लेच्छैरन्यैश्च मानवैरिति ।

या मंत्राच्या जपाला काळाचे नियम/बंधन नाही. वैश्य, शूद्र, म्लेच्छ आणि इतर सर्व भक्तिमान माणसांनी (ॐ नमः शिवाय) या मंत्राचा जप करावा.

अन्त्यजशब्दाने म्लेच्छाचाही उल्लेख-संदर्भ निबंधकार करतात. म्हणूनच 'चाण्डालान्त्यस्त्रियो गत्वा' – चांडाल, अन्त्यज स्त्रियांकडे गेल्यास या श्लोकावरील टीकेत मेधातिथि कुल्लुक आदी सहा टीकाकार म्लेच्छ म्हणजे गावाच्या टोकाला राहणारे अन्त्य असे प्रतिपादन करतात. (म्लेच्छा दिगन्तवासिनः अन्त्याः) 'वृषल' शब्दही म्लेच्छचा वाचक मानावा. **'वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च'** - ब्राह्मणाचे दर्शन न झाल्यामुळे (काहीही धर्मकर्म न केल्यामुळे) जगात काही लोक वृषल झाले असे मानवसूत्रात (स्मृतीत) म्हटले आहे. म्हणूनच अन्त्य, वृषल, दस्यू आणि म्लेच्छ या शब्दांनी यवनादी जे हिंदुस्थानाबाहेरचे शेंडी न ठेवणारे, वेगळी शेंडीवाले, चिनी इत्यादींचा निर्देश होतो. म्लेच्छत्व म्हणजे श्रुतिस्मृतिपुराण, तंत्र इ. चांगल्या शास्त्रांमध्ये विहित म्हणून

सांगितलेल्या धर्माचे पालन न करणे, गोमांसादी खाणे, (निषिद्ध कर्म), मातापित्यांच्या परंपरेने असच्छास्त्रांचे अनुकरण करणे, त्यांचे अनुयायी होणे होय. वरील बौधायन वचनाने हेच स्पष्ट होत आहे. भारतातील म्लेच्छ सामावून घेण्यासारखे नाहीत. ते सपिंडत्व इ. गोष्टी प्रमाण मानून विवाहादींसाठी निषेध्य आहेत. आपल्या पंथात आलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र स्त्रीपुरुषांच्या फार काळापासून विवाहादींमध्ये संकराची परंपरा चालू ठेवली आहे. चांडाल, पुक्कस इत्यादींकडून त्यांचे त्यांचे ग्रंथ असूनही सतत संकर करतात. यांना महापातकी म्हणू नये, तसा दोष त्यांच्यात दिसत नाही. काही माणसे तशी (पतित ?) असूनही समुदायात तसे नसतात (समुदाय पतित नसतो).

म्लेच्छसंबंधामुळे येणाऱ्या पतितत्वाचा विचार

म्लेच्छांशी संबंध आल्यास पतितत्व प्राप्त होते असे विधान कुठे आहे असे पाहू गेल्यास ते -

संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
यजनाध्यापनाद्यौनान्न तु यानासनाशनात् ॥

यज्ञ करणे, अध्यापन आणि योनीशी संबंध आल्यामुळे, पतिताशी एक वर्षभर सहवासाने, व्यवहार केल्याने पतित होतो. जाणे, बरोबर बसणे, खाणे यामुळे पतित होत नाही, या मानववचनामुळे ते समजत नाही. तेथे पतित शब्द पहिल्या चार महापातकींशी त्याचा संबंध आहे. 'तैश्चाब्दं समाचरन्' त्यांच्यासह एक वर्ष व्यवहार केल्यास येथेही गौतमाच्या वचनाच्या त्याच्या लगेच पूर्वीच्या वचनात तसा उल्लेख नाही. आधी लगेच म्लेच्छ शब्द आलेला नसल्यामुळे म्लेच्छासंबंधासाठी हे विधान काही सांगू शकणार नाही.

आपस्तंबाचे **'असंयोगसंयोग'** या सूत्रानेही म्लेच्छसंबंध सांगता येत नाही. आपस्तंब धर्मसूत्रात **'न पतितैः संव्यवहारो विद्यते यथाऽपपात्रैः'** 'पतितांसह कोणताही व्यवहार करावयाचा नाही जसा अपपात्रासह' (ज्यांची भांडी वेगळी ठेवली जातात.) असे सांगून पुढे लगेच पतनीयांना पतित करणाऱ्या गोष्टींची गणना आपस्तंब करतो. त्या असंयोगसंयोग - ज्यांच्याबरोबर जाणे योग्य नाही अशांबरोबर संबंध ठेवणे - हे एक कारण तो पतित होण्यासाठी सांगतो. संयोगाला पात्र नसलेल्या सर्व पतितांचा, ज्यांची भांडी इतर कोणीही वापरत नाही असे अपपात्र, म्लेच्छ या सर्वांचा उल्लेख तिथे आहे. पतित शब्द सर्वधर्मांतून वगळलेल्याचा सूचक आहे. म्लेच्छ याचा उल्लेख मागोमाग आलेल्या वचनसमूहात सर्वधर्मांचा परित्याग करणाऱ्यासाठी प्रयुक्त शब्द दस्यू हा पतित सूचक आहे. पतित शब्द केवळ चार महापातके करणाऱ्यांपुरता वापरणे, मानणे योग्य नाही. अन्य अनेक पतितांचा इतर स्मृतिशास्त्रांमध्ये उल्लेख आहे. पतितपद म्लेच्छाला लावले नसले तरी 'संवत्सरेण पतति' यात सांगितल्याप्रमाणे त्याच्या सहवासात १ वर्ष राहिला तर पतित होतो, हे वाक्य निरर्थक

होत नाही, कारण म्लेच्छांचे गुणधर्म-वर्तन पतितांसारखेच असते. म्हणून याज्ञवल्क्यवचन असे आहे -

'चण्डालपुक्कसम्लेच्छभिल्लपारसिकादिकान् ।
महापातकिनश्चैव स्पृष्टा स्नायात्सचेलकः ॥'

चाण्डाल, पुक्कस, म्लेच्छ, भिल्ल पारसिक इत्यादी आणि महापातकी यांना स्पर्श केल्यावर अंगावरील कपड्यांसह स्नान करावे. यातून म्लेच्छांचे पतितांबरोबर समानत्व सांगितले आहे. म्लेच्छ पतित असले काय किंवा पतितासारखे असले काय, त्याने काय होईल ? ऐका. जे पतिताविषयी तेच, काही अडथळा नसताना, म्लेच्छाच्या संबंधात असलेल्याशीही मानावे लागेल. त्याबद्दल उशनस् सांगतो -

बहूनामेकधर्माणामेकस्यापि यदुच्यते ।
सर्वेषां तद्भवेत्कार्यमेकरूपा हि ते स्मृताः ॥

एकाच प्रकारचे गुणधर्म असलेल्यांपैकी एकासाठी जे कार्य सांगितले जाते ते त्या एकरूप असलेल्या सर्वांसाठीही समानरूपाने असते.

पतन शब्दाचा अर्थ

पतन म्हणजे काय ? प्रायश्चित्तविवेककर्त्याने सांगितलेले १२ वर्षांचे प्रायश्चित्त ज्यासाठी सांगितले आहे, ते घेतल्यावर दूर होणारे पाप नव्हे. कांदा खाणे, शूद्रादींची हत्या, नीली आदी विकणे इत्यादींचा त्यात समावेश होणार नाही. द्विजातीना विहित असलेली कर्मे करता न येणे म्हणजे पतन का? शूद्रादींच्या पतनामध्ये तो दोष तसाच राहील. विक्री करू नये अशा वस्तुंचा विक्रय हे महापातकांपेक्षा कमी वाईट पातक आहे, ते म्हणजे पतन असे म्हणणे योग्य होणार नाही. द्विजातींच्या कर्मांचा अधिकार न मिळणे आणि परलोकाची अप्राप्ती म्हणजे 'पतन' या गौतमवचनाप्रमाणे स्वत:च्या जातीला विहित असे करायला न मिळणे याने लक्षित झालेले आणि पापात जमा होणारे ही ज्याची जाती आहे अशा लक्षणाच्या निकृष्ट स्वीकाराने सर्व दोष नष्ट होतात. शूद्राच्या पतनाबद्दल विचार-समावेश होत असल्याने समन्वय साधला आहे.

संसर्गाचे स्वरूप

संसर्ग - संबंध - किती प्रकारचा असतो, पतितत्व कशामुळे येते, इत्यादी गोष्टींचा विचार आता करावयाचा आहे.

बृहस्पतिः - एकशय्यासनं पङ्क्तिभर्भाण्डपङ्क्त्यन्नमिश्रणम् ।
याजनाध्यापने योनिस्तथा च सहभोजनम् ।
नवधा संकरः प्रोक्तो न कर्तव्योऽधमैः सह ॥

बृहस्पती - एका शय्येवर बसणे, एकत्र भोजन, भांडी आणि एकाच पंक्तीत बसणे, अन्न मिसळणे (उष्टे खाणे), यजन, अध्यापन, लग्नसंबंध (योनी या शब्दाने येथे पतिताला कन्यादान किंवा त्याची कन्या स्वीकारणे असे विज्ञानेश्वर म्हणतो.) तसेच सहभोजन या नऊ प्रकारांनी संकर होतो (म्हणून) अधमांसह संबंध ठेवू नये.

पराशरः - आसनाच्छयनाद्यानाद्भाषणात्सहभोजनात् ।
संक्रामन्ति हि पापानि तैलबिन्दुरिवाम्भासि ॥

पराशर - आसन, शयन, जाणे, भाषण, सहभोजन यांनी पाण्यावर तेलाचा थेंब पसरावा त्याप्रमाणे पाप पसरत जाते.

देवलः - संलापस्पर्शनिःश्वाससहशय्यासनाशनात् ।
याजनाध्यापनाद्यौनात्पापं संक्रमते नृणाम् ॥

देवल – संभाषण, स्पर्श, नि:श्वास, समान शय्या आणि बसणे, सहभोजन, यज्ञ करणे, अध्यापन, (म्लेच्छांसह) लग्नसंबंध यामुळे पाप संक्रमित होते.

छागलेयोऽपि - आलापाद्गात्रसंस्पर्शान्निःश्वासात्सहभोजनात् ।
सहशय्यासनाध्यायात्पापं संक्रमते नृणाम् ॥

छागलेय - संवाद, अवयवांना हात लावणे, नि:श्वास, सहभोजन, बरोबर निजणे, बसणे, शिकणे यामुळे माणसांचे पाप वाढते.

हा संसर्ग उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ असा तीन प्रकारचा. त्यातला पहिला चार प्रकारचा - योनी संबंध, यज्ञसंबंध, मुख्य म्हणजे अध्यापनाने आणि एकपात्रात भोजन. येथे यौव म्हणजे विवाहाने संबंध, सौव म्हणजे यज्ञकर्म करण्याने संबंध, मुख्य म्हणजे अध्यापनाने घडलेला संबंध, मध्यसंबंधही चार प्रकारचा - एकत्र प्रवास, बसणे, झोपणे आणि एका पंक्ती जेवणे. शेवटचा संबंध - भाषण, स्पर्श, नि:श्वास, एकाच भांड्यात स्पर्श केलेले अन्न खाणे, त्याच्याकडून भेटी घेणे इ. अनेक प्रकारे होतो. या संबंधांपैकी पहिला सर्वात मोठा, मधला, मध्यम आणि तिसरा कनिष्ठ असतो, असे निबंधकार म्हणतात. पुन्हा या संबंधाचे दोन भाग पडतात. पहिला म्हणजे ब्रह्महत्या, सुरापान, गुरुपत्नीशी संबंध, सोन्याची चोरी या चार प्रकारच्या महापातक्यांशी संबंध आणि इतर प्रकारच्या पतितांशी आलेला संबंध. त्यातला पहिला म्हणजे महापातकच.

तथा च मनुः - ब्रह्महत्यासुरापानं स्तेयं गुर्वङ्गनागमः ।
महान्ति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह ॥ (मनु.)
याज्ञवल्क्येऽपि - ब्रह्महा मद्यपः स्तेनस्तथैव गुरुतल्पगः ।
एते महापातकिनो यश्च तैः सह संवसेत् ॥ (याज्ञ.)

दुसरा म्हणजे उपपातक. जाणीवपूर्वक त्याच गोष्टी वारंवार केल्यास महापातकाइतक्याच प्रायश्चित्ताला पात्र होणारा. उपपातक कसे पातित्य निर्माण करणारे होईल असे म्हणू नये. नंतर लगेच पतितांमध्ये उपपातकी म्हणून सांगितलेल्या नास्तिकांच्या विक्री करू नये ते विकणे, निंदितांचे अन्न खाणे, क्षत्रिय, वैश्य, शूद्रादींच्या हत्या, शूद्रस्त्रीसमागम इ. गोष्टी उपपातके म्हणून मोजून सांगितल्या आहेत. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. उपपातकींच्या संसर्गाने महापातकी निर्माण होईल हे म्हणणे प्रमाणरहित आहे, अयोग्य आहे.

संसर्गाने पतीत झाल्याबद्दलचा विचार

आपस्तंब पतितांच्या संसर्गामुळे होणाऱ्या पातित्याबद्दल सांगतो - पतितांसह किंवा ज्यांची भांडी वेगळी ठेवली जातात अशा पतितांबरोबर व्यवहार करू नये. आता पतित करणाऱ्या गोष्टी सांगतो - चोरी, चोरीचा आळ, पुरुषवध, वेदनिंदा, भ्रूणहत्या, आईबाबांशी संबंध असलेल्यांशी, त्यांच्या मुलांशी, स्त्रीसंबंध, मद्यपान, ज्यांच्याशी संबंध ठेवू नये त्यांच्याशी संबंध ठेवल्यामुळे पतित होतो. गुरुसखी, गुरुपत्नी, परस्त्री, अल्पवयीनांशी संबंध केल्यास पतित होतो. अधर्माचा सतत आचार केल्यामुळेही पतित होतो. गौतम म्हणतो ब्रह्महत्या, सुरापान, गुरुपत्नीशी समागम, मातापिता यांच्याशी संबंध असणाऱ्यांशी संबंध, चोरी, नास्तिकपणा, निंदित कर्मे, पतिताचा त्याग न करणे, अपतिताचा उगाच त्याग इ. गोष्टी करणारा पापी पतित होतो. अशांबरोबर एक वर्ष राहिल्याने पातक-संयोजक होतो. यातील पहिले तीन निर्देश योग्य नाहीत. (महापातके असल्याने) मनु इत्यादींनी कालमर्यादेचा निर्देश केला आहे. प्रायश्चित्तविवेक ग्रंथात -

मनुर्विष्णुश्च - संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्यौनान्न तु यानासनाशनात् ।।

एक वर्षभर पतित व्यक्तीसह यज्ञ, अध्यापन, यौनसंबंध ठेवल्यास माणूस पतित होतो, प्रवास, बसणे, खाणे यामुळे नाही.

पैठीनसी: - संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्यौनान्न त्वेवं शयनासनात् ।।

पतितासह वर्षभर आचरण/व्यवहार यज्ञ, अध्यापन आणि समागम या प्रकारे करून माणूस पतित होतो. झोपण्याने किंवा बसण्याने नाही.

हारीत: - संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्यौनादेकशय्यैकभोजनात् ।।

यज्ञ, अध्यापन, समागम, एकशय्या, एकत्र भोजन या कारणांनी एक वर्षभर पतितासह आचरण केल्यास माणूस पतित होतो.

वाय १८४-८

बृहस्पतिः - षाण्मासिके तु संसर्गे याजनाध्यापनादिना ।
एकत्राशनशय्याभिः प्रायश्चित्तार्धमाचरेत् ॥
संवत्सरेण संसर्गे योनियुक्ते विशेषतः।
पूर्वोक्तेन विधानेन पतितव्रतमाचरेत् ॥

यज्ञ करणे, अध्यापन, एकत्र खानपान, झोपणे हे पतिताबरोबर सहा महिने केल्यास अर्धे प्रायश्चित्त घ्यावे. वर्षभर यौनसंबंध आल्यास विशेष करून पूर्वी सांगितलेल्या विधानाप्रमाणे पतितव्रताचे - प्रायश्चित्ताचे आचरण करावे.

कल्पतरौ सुमन्तुः – यश्च तैर्यौनमौख्यस्त्रौवाणां संबन्धानामन्यतमेव सहसंपर्कमियात्तस्याप्येतदेव प्रायश्चित्तम् ॥

ज्याचा त्या पतितांसह शरीरसंबंध, अध्यापन वा धार्मिक-याजनादी कारणांपैकी एखाद्या कारणानेही संबंध येईल त्यालाही हेच प्रायश्चित्त जाणावे.

विष्णुः - संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
एकयानभोजनासनशयनैः। यौनस्त्रौवमुख्यैस्तु सद्य एव।

एक वर्षपर्यंत पतिताबरोबर एकाच वाहनातून जाणे, एकत्र भोजन, बसणे, झोपणे इ. करण्यामुळे माणूस पतित होतो. याजन, अध्यापन आणि समागमादी (पापे) झाल्यास लगेच व्यक्ती पतित होते.

देवलः - याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम् ।
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः॥

यज्ञ करवून घेणे, लैंगिक संबंध ठेवणे, अध्ययन-अध्यापन करणे, सहभोजन इ. गोष्टी पतितासह करणारा लगेच पतित होतो.

कौर्मे - याजनं योनिसंबन्धं तथैवाध्यापनं द्विजः ।
कृत्वा सद्यः पतेज्जानन्सहभोजनमेव च ॥
अज्ञानादथवा मोहात्कुर्यादध्यापनं द्विजः ।
संवत्सरेण पतति सहाध्ययनमेव च ॥

अध्यापन, शरीरसंबंध, अध्यापन आणि सहभोजन इ. गोष्टी पतितासह जाणूनबुजून करणारा ताबडतोब पतित होतो. अज्ञानाने किंवा मोहामुळे ब्राह्मणाने पतिताला शिकवले किंवा त्याच्याबरोबर अध्ययन केले तर वर्षभराने तो पतित होतो.

प्रायश्चित्तमयूखे बौधायनः - संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
याजनाध्यापनाद्यौनात्सद्यो न शयनादिति ॥

प्रायश्चित्तमयूखात बौधायन - शयनामुळे नाही पण यज्ञ करून घेणे, अध्यापन करणे, समागम असा पतिताबरोबर वर्षभर संबंध आल्यास माणूस पतित होतो.

कौर्मे - संवत्सरं तु पतितैः संसर्गं कुरुते तु यः ।
यानशय्याशनैर्नित्यं जानन्वै पतितो भवेत् ॥

जाणतेपणी जो पतितांशी वर्षभर नेहमी जो प्रवास, बसणे, झोपणे, खाणे (बरोबर राहणे) या गोष्टी करतो, तो पतित होतो.

देवलः - पतितेन सहोषित्वा जानन्संवत्सरं द्विजः ।
मिश्रितस्तेन सोऽब्दान्ते स्वयं च पतितो भवेत् ॥
संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
भोजनासनशय्याभिः कुर्वाणः सार्वकालिकम् ॥

ब्राह्मण जर कळून सवरून पतिताबरोबर राहील, सर्व काळ त्याच्यासह ऊठबस जेवणखाण करीत मिसळून जाईल तर वर्षाने तो स्वत:च पतित होईल.

शूलपाणौ संवर्तः - एभिः संसर्गमायाति यः कश्चित्काममोहितः ।
षण्मासानब्दमेकं वा ब्रह्महत्याव्रतं चरेत् ॥

जो कोणी कसला तरी मोह वाटून सहा महिने किंवा एक वर्षभर पतितांच्या संगतीत राहील त्याने ब्रह्महत्येला सांगितलेले प्रायश्चित्त घ्यावे.

व्यासः - यो येन संपिबेद्वर्षं सोऽपि तत्समतामियात् ।
पादन्यूनं चरेत्सोऽपि तस्य तस्य व्रतं द्विजः ॥

जो ज्याच्याबरोबर वर्षभर समान खानपान करील तो त्या पातकनिवृत्तीसाठी असलेल्या प्रायश्चित्ताच्या ३ चरणांचे आचरण करील, ३/४ व्रत करील.

ही सर्व वचने परस्परविरुद्ध अर्थ सांगत संदेह निर्माण करीत आहेत. व्याख्यानकर्त्यांमध्येही विरोध आहे. या वचनांमध्ये एकत्र जाणे, भोजन, बसणे, झोपणे या संबंधाने ३ प्रकारची मते आहेत. मनु व पैठीनसी यांच्या मताप्रमाणे वर्षभर एकत्र भोजनादी गोष्टी केल्या तरी त्यामुळे पतितता निर्माण होत नाही. त्यांच्या मते यज्ञादी धार्मिक कृत्ये करून घेणे, अध्यापन इ. गोष्टीच पतितत्वाला कारणीभूत आहेत. हारित, बृहस्पती, विष्णू, कूर्मपुराण आणि देवल यांनी तर वर्षभर भोजनादिसंबंध आला तर पतितत्व सांगितले आहे.

याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम् ।
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः ॥

यावर उद्धृत केलेल्या देवलाच्या म्हणण्यानुसार सहभोजनही लगेच पातित्य निर्माण करणारे ठरते. तसेच शरीरसंबंध, यज्ञ करणे, अध्यापनादी गोष्टींमध्ये दुमत आहेच. मनु

आणि पैठीनसी यांची वचने जशीच्या तशी घेतल्यास आणि हारित, बृहस्पती, सुमन्तु यांच्या वचनांमधूनही वर्षभर शरीरसंबंध इ. मुळे पतितत्व येते. या इतक्या परस्परविरोधी विधानांमधून निर्णय कसा करता येईल? याबाबतीत जिनकादी लोक अशी व्यवस्था लावतात. समागम, याजन आणि अध्यापन या तीनही गोष्टी करण्याने ताबडतोब पतित होतो. प्रत्येक कारणाने पतितत्व वर्षभर संसर्गाने होते. मनु, पैठीनसी यांचे वचन भोजनादी विषयातील व्युत्क्रमाने - वेगळा अन्वय करून पाहिल्यास याजन, अध्यापन, शरीरसंबंध यांनी लगेच पतितत्व अशा अर्थाने घ्यावे, संवत्सराने नव्हे. तसेच एकेका कारणाकडे वेगळा विभक्तीनिर्देश करून पाहिले तर याजन करून, योनिसंबंध करून पतित होतो असे म्हटले तर **'कृत्वा पतति'** या अन्वय आणि तात्पर्य वृत्तींमुळे वेगळी चार वाक्ये तयार होतील. म्हणून 'कृत्वा' या पदाने 'याजन' इ. चार कर्मे घेऊन 'पतति' बरोबर संबंध साधून 'नञ' बरोबर वाक्यभेद दुसरे वाक्य होईल. प्रत्येक पदाने वेगळेपणाने एकत्र आणलेल्या पदांनी कृत्वाशी संबंध जोडता येईल.

'दर्शपूर्णमासाभ्यां स्वर्गकामो यजेत्' – दर्श आणि पूर्णमास याग स्वर्गाची इच्छा करणाऱ्याने करावेत. या वाक्यावरून आग्नेयादी सहा यज्ञ करावे लागतात. पूर्वोक्त सुमन्तादींच्या वाक्यात एकेका अयोग्य आचरणासाठी एकेका वर्षाने पतितत्व व एकेक प्रायश्चित्त सांगितले आहे.

विज्ञानेश्वर, शूलपाणी प्रायश्चित्तमयूखकारादी असे म्हणतात - मोठ्यास (अपराधाला) मोठं आणि छोट्याला लहान अशी गौतमाच्या स्मृतीची व्यवस्था असल्याने त्या न्यायाला अनुसरून निर्णय करायला हवा. मोठे आणि लहान (अकार्य) या भेदानुसार याजनादी दोन प्रकारचे आहे. त्यात बुद्धिपूर्वक केलेल्या एकेका याजनादींमुळे ताबडतोब पतितत्व येते. तेच जर एखाद्याने अज्ञानाने केले असेल तर दोनदा अपराध-अयोग्य वर्तन घडल्यास प्रायश्चित्त कारण 'अनिच्छेने/अज्ञानाने झालेल्या पापाच्या दुप्पट दंड जाणीवपूर्वक पाप केल्यास' या न्यायाने निर्णय करावा. लहान सहान याजनादिक अज्ञानाने केले तर एक वर्षाने पतितत्व, न जाणता केले तर अर्ध्या वर्षाचेच प्रायश्चित्त. तसेच याजन आणि योनिसंबंध या बाबतीत देवलवचनात पतिताबरोबर राहणे 'जाणून' हे पद पूर्ववचनातील 'जानन्' इति हे पद लक्षात घेऊन ज्ञानपूर्वक कृती हे सांगितले आहे. पापाचे गुरुत्व देवलाने याजन, अध्यापनाचे गुरुत्व उपसंहाराने सांगितले आहे.

यथा देवलः - आचार्यव्रतनियमशुश्रूषादिभिस्त्रयीविद्योपादानमध्ययनम्। तस्याचारान्वयोपक्रमसामर्थ्यभक्तिशीलशुश्रूषोपनताय शिष्याय प्रदानमध्यापनम्। पशुक्षीराज्यपुरोडाशसोमौषधिचरुप्रभृतिभिर्हविर्भिः खदिरपलाशाश्वत्थन्यग्रोधोदुम्बरप्रभृतिभिः समिद्भिः स्रुक्स्रुवोलूखलमुसलकुठारखनित्रयूपदारुचर्मदर्भग्रावपवित्र भाजनादिभिर्द्रव्योपकरणैरुद्गातृहोत्रध्वर्युब्रह्मादिभिर्ऋत्विरिभः काम्यनैमित्तिकानां पक्षादिपूर्वकाणां यथोक्तदक्षिणानां यज्ञानां समापनं यजनम्। एतेन याजनं व्याख्यातम्॥

देवल म्हणतो - आचार्यांकडून व्रत, नियम शुश्रूषांनी त्रयीविद्या मिळवणे म्हणजे अध्ययन. आचारासह उपक्रमासाठी सामर्थ्य, भक्ती, शील, शुश्रूषा यांचेसह आलेल्या शिष्याला ते अध्ययन - विद्या देणे म्हणजे अध्यापन. पशू, दूध, तूप, पुरोडाश, सोम, वनस्पती, चरु इत्यादी हविर्द्रव्यांनी, खैर, पळस, पिंपळ, वड, औदुंबर इत्यादींच्या समिधांनी, स्रुक्-स्रुवा, उसळ मुखल, कुऱ्हाड, कुदळ, यज्ञस्तंभ, लाकूड, चर्म, दर्भ, दगड (पाटा वरवंटा) पवित्र पात्रे इ. द्रव्ये आणि उपकरणे यांनी, उद्गाता, होता, अध्वर्यु, ब्रह्मादी ऋत्विजांच्या मदतीने, काम्य, नैमित्तिक पक्षादिपूर्वक, योग्य दक्षिणा देऊन केलेले यज्ञांचे उद्यापन - परिपूर्ति म्हणजे यजन. याने याजन सांगितले.

येथे उपक्रम म्हणजे उद्योग. म्हणून उपनयनानंतर अध्यापन, ज्योतिष्टोमादी यज्ञांचे याजन श्रेष्ठ, त्याच्या बरोबरीने विवाहपूर्वक शरीरसंबंध श्रेष्ठ, कारण तो मंत्रहोम इ. विधींनी तो केला जातो म्हणून. ब्राह्मण (जर) गुपचूप (स्तेय ?) पतित ब्राह्मणीकडे जाईल त्यापेक्षा पतित अशा स्वत:च्या पत्नीकडे जाणे पतितशूद्रस्त्रीकडे जाण्यापेक्षा कमी वाईट पातक आहे. सहभोजनाबद्दल अधिक वाईट काय ? पतिताचे अन्न, पतितासह एकाच भांड्यात खाणे हे अधिक मोठे पाप. उपनयनाशिवाय वेदाध्ययन, अष्टक आदी यज्ञ करवणे, पतित अशा स्वत:च्या पत्नीकडे जाणे, पतित शूद्रस्त्रीकडे जाणे, अपतिताचे अन्न पतितासह एका पात्रात जेवणे, पतिताचे उष्टे खाणे, ही पातके पूर्वीच्या सांगितलेल्या याजनापेक्षा कमी स्वरूपाचे पातक. देवलाच्या म्हणण्याप्रमाणे जाणीवपूर्वक गुरुने याजनादी केल्यास तत्काळ पतन. मनुच्या वचनाने अज्ञानात केलेल्या लहान याजनाने एका वर्षाने पतन होते. माहीत असून एकदा केल्यास पतन तर अज्ञानाने ती गोष्ट दोनदा घडल्यास पतन. अज्ञानात ज्यामुळे वर्षाने पतन होते ती गोष्ट बुद्ध्या केल्यास सहा महिन्यात पतन, हे दोन वचनांचे एक फलित.

हे सर्व शास्त्रज्ञान पटण्यासारखे नाही. भोजनाबद्दल म्हणायचे तर त्या वचनांनी तीन प्रकारच्या विरोधाचा परिहार होऊ शकत नाही. आम्ही पापातल्या कमी- अधिकपणात तीन भाग करतो. त्याप्रमाणे अध्ययनातील त्रैविध्यउपनयनपूर्वक वेदाध्ययन, उपनयनाशिवाय वेदाध्ययन आणि (वेदाच्या) अंगाचे अध्ययन. याजनही तीन प्रकारचे - श्रौत, स्मार्त आणि तांत्रिक. यौनही तीन प्रकारे पतित स्त्रीशी विवाह करून गमन, पतित स्वस्त्रीकडे जाणे, अशा अन्य पतित ब्राह्मणीकडे जाणे. भोजनाचे चार प्रकार संभवतात. पतिताचे अन्न पतितासह एका पात्रात भोजन, अपतिताचे अन्न पतितासह एका पात्रात भोजन, पतिताच्या पंक्तीत भोजन. या गोष्टी इच्छापूर्वक केल्यास त्याला सुमन्तुचे विधान असे आहे -

पञ्चाहे तु चरेत्कृच्छ्रं दशाहे तप्तकृच्छ्रकम् ।
पराकस्त्वर्धमासे स्यान्मासे चान्द्रायणं चरेत् ॥
मासत्रये प्रकुर्वीत कृच्छ्रं चान्द्रायणोत्तरम् ।
षाण्मासिके तु संसर्गे कृच्छ्रं त्वब्दार्धमाचरेत् ॥
संसर्गे त्वाब्दिके कुर्यादब्दं चान्द्रायणं नरः ॥ इति

पाच दिवस (पतिताचरण) केल्यास कृच्छ्र, दहा दिवसांसाठी तप्त कृच्छ्र, अर्ध्या महिन्यासाठी पराक, महिनाभरासाठी मात्र चांद्रायणव्रत करावे. तीन महिन्यासाठी केल्यास चान्द्रायणानंतर कृच्छ्र करावे. सहा महिने पतिताचा संसर्ग झाल्यास सहा महिने कृच्छ्र करावे आणि वर्षभर संसर्ग केला असेल तर एक वर्षभर माणसाने चांद्रायण करावे.

येथे एका वर्षाच्या संसर्गाबद्दल सांगताना वर्षाला काही कमी काळ संसर्गात असल्यास माधव, विज्ञानेश्वर इत्यादींनी इतरत्र वर्षभराच्या संसर्गासाठी, पतित करणारी जी कारणे त्यांच्याशी संबंध जोडून समाधान केले आहे. अब्द संसर्गात तृतीय आणि चतुर्थ प्रकारच्या मांडणीतील विरोध टाळता येईल.

हे येथे लक्षात घ्यावे - वर्षपर्यंतचा पतिताबरोबरचा भोजन-प्रवास, बसणे, झोपणे या चार प्रकारांनीच पातित्य, भोजन सोडून केवळ जाणे बसणे, स्पर्श, संभाषण इत्यादींनी नव्हे हे मिताक्षराकारांचे म्हणणे योग्यच आहे. आम्ही तेही जाणुनबुजून केलेले असे मानतो. त्या कूर्मपुराणाचा आधार असा -

संवत्सरं तु पतितैः संसर्गं कुरुते तु यः।
यानशय्याशनैर्नित्यं जानन्वै पतितो भवेत् ।।

जाणे-येणे, राहणे जेवणखाण यासह जो पतिताच्या संपर्कात इच्छापूर्वक वर्षभर राहतो तो पतित होतो. अज्ञानाने वा बलात्काराने एका वर्षाने पतन होत नाही. अज्ञानामुळे भोजनादी प्रकारचा संसर्ग झाल्यास दोन वर्षांनी पतन होते. जबरदस्तीने केल्यास पतन नसावे, तो केवळ एक दोष - अपवाद मानावा तसा विवेक धरावा.

सांगितलेल्या वचनसमुदायात म्लेच्छांबरोबर कशा आणि कितीशा संसर्गाने पतन हे सांगितलेच नाही असे म्हणू नका. म्लेच्छ म्हणजे पतित हे आधीच स्पष्ट करून झालंय. रघुनंदन भट्टांनी प्रायश्चित्ततत्त्वात त्याचा स्वीकारही केला आहे. पतित शब्दाचा अर्थ सर्वधर्मकृत्ये करण्यास जो अपात्र आहे, त्यातून ज्याला बाहेर काढले आहे असा, हे पूर्वी सिद्ध केलेय. तेच म्लेच्छांनाही लागू आहेच. पतितपद हा शब्द येथे उपलक्षण आहे. त्याला प्रमाण नाही असे म्हणू नका. पराशरवचनातून तसे पतितत्व कळत आहे -

संसर्गमाचरन्विप्रः पतितादिष्वकामतः ।
पञ्चाहं वा दशाहं वा द्वादशाहमथापि वा ॥
मासार्धं मासमेकं वा मासत्रयमथापि वा ।
अब्दार्धमब्दमेकं वा भवेदूर्ध्वे तु तत्समः ॥
त्रिरात्रं प्रथमे पक्षे द्वितीये कृच्छ्रमाचरेत् ।
चरेत्सान्तपनं कृच्छ्रं तृतीये पक्ष एव तु ।।
चतुर्थे दशरात्रं स्यात्पराकः पञ्चमे ततः ।
षष्ठे चान्द्रायणं कुर्यात्सप्तमे चैन्दवद्वयम् ।।
अष्टमे च तथा पक्षे षण्मासान्कृच्छ्रमाचरेत् ॥

ब्राह्मणाने जर चुकून पाच, दहा वा बारा दिवस किंवा अर्धा महिना, एक महिना, तीन महिने, अर्धे वर्ष किंवा एक वर्ष पतिताशी संबंध ठेवला तर एकेका मुदतीसाठी-कालमर्यादेसाठी क्रमश: तीन रात्री व्रत, कृच्छ्र, सांतपन कृच्छ्र आचरावे. अर्ध्या महिन्यासाठी दहा रात्री, एका महिन्यासाठी पराक, तीन महिन्यांसाठी चांद्रायण, सहा महिन्यांसाठी चांद्रायणाची दोनदा आवृत्ती करावी आणि वर्षभरासाठी (अयोग्य वागून) सहा महिने कृच्छ्र प्रायश्चित्त करावे.

इथे पतितादी यातील आदिशब्दाने म्लेच्छादी यांच्यासारख्या गुणधर्माचे गृहीत धरावेत. म्लेच्छादींच्या बाबतचे प्रायश्चित्त, त्याचा कालावधी याचा स्पष्टपणे विचार पुढे केला जाईल.

स्वेच्छेने वा अनिच्छेने केलेल्या पापाबद्दलचा प्रायश्चित विचार

अकामतः कृते पापे प्रायश्चित्तं न कामतः ।
स्यात्त्वकामकृते यत्तु द्विगुणं बुद्धिपूर्वकम् ॥

हे अंगिरसाचे वचन आहे. फक्त पहिली ओळच वाचली तर इच्छापूर्वक पतिताशी संपर्क केल्यास, प्रायश्चित्त नाही असा अर्थ वाटू शकतो! दुसऱ्या ओळीत अजाणता केलेल्या पापालाही जे प्रायश्चित्त त्याच्या दुप्पट, बुद्धिपूर्वक केलेल्या पतितांसहच्या वर्तनाबद्दल करावे असे सांगितलेले दिसते. पातक तीन प्रकारचे असते - बळजबरीने केलेले, केवळ अज्ञानातून झालेले आणि समजून-उमजून केलेले! ज्ञानकृत म्हणजे इच्छाद्वारा केलेले. इच्छेच्या प्रवेशाशिवाय ज्ञान प्रवृत्त होत नाही.

सर्वान्बलकृतानर्थानकृतान्मनुरब्रवीत् ।

सर्व बलाने करून घेतलेली कर्मे केलीच नाहीत, झाली नाहीत असे समजावे असे मनु म्हणतो. या वचनामुळे बळजबरीने केलेल्या पापाला अगदी नगण्य पतितत्व असते. त्याहून बराच जास्त दोष अज्ञानातून केलेल्या वर्तनाला आहे. बलात्काराने केलेल्या कर्मामुळे पतितत्व नाही तर किंचितसा अडथळा, दोष असे जाणावे. त्याला गायत्री जप एवढेच अल्प प्रायश्चित्त, एवढे शहाण्यांनी समजून घ्यावे. त्यावर मनु म्हणतो -

अकामतः कृते पापे प्रायश्चित्तं विदुर्बुधाः ।
कामकारकृतेऽप्याहुरेके श्रुतिनिदर्शनात् ।।
अकामतः कृतं पापं वेदाभ्यासेन शुध्यति ।
कामतस्तु कृतं मोहात्प्रायश्चित्तैः पृथक्पृथक् ।।
ननु-प्रायश्चित्तैरपैत्येनो यदज्ञानकृतं भवेत् ।
कामतो व्यवहार्यस्तु वचनादिह जायते ॥

स्वेच्छेशिवाय केलेल्या (ही) पापाला प्रायश्चित्त असते, असे शहाणे लोक म्हणतात. स्वेच्छेने केलेल्या पापालाही श्रुतींच्या आधारे प्रायश्चित्त सांगितले आहे. अनिच्छेने केलेले

(म्हणजे झालेले) पाप वेदाभ्यासाने शून्य होते, शुद्ध होते. मोहामुळे इच्छापूर्वक केलेल्या पापाचरणाला वेगवेगळी प्रायश्चित्ते आहेत. प्रायश्चित्तांनी पाप नष्ट होते, जर ते अज्ञानातून झालेले असेल, जर स्वेच्छेने केलेले असेल तर वचनांवरून प्रायश्चित्त घेऊन माणूस व्यवहाराला-आपल्या वर्णाश्रमधर्मानुसार असलेल्या कार्याला योग्य होऊ शकतो. (पापमुक्ती नाहीच!)

या याज्ञवल्क्य वचनाप्रमाणे पातित्याला कारण होणाऱ्या पापाचे निर्मूलन कामत: म्हणजे इच्छेने केले असल्यास उपाय स्वीकारणे अनुचितच होईल. स्वेच्छेने (पाप) केले असल्यामुळे ते पुन्हा व्यवहाराला लायक नाहीत असे प्रतिपादन केलेले आहे, म्हणाल तर ते योग्य नाही. सांगितलेल्या वचनात 'व्यवहार्यः' या पदच्छेदामुळे दोष नष्ट होतो. अशा प्रकारे स्वेच्छेने केलेल्या दुराचारामुळे निर्माण झालेले पातित्य, अव्यवहार्यता निर्माण करणारे पाप प्रायश्चित्ताने नष्ट होते, पण नरक मिळवून देणारे पाप हे नष्ट करू शकत नाही. विज्ञानेश्वरादी लोकही असेच मानतात. अव्यवहार्य हा पदच्छेदातसुद्धा गौतमाने अनिर्दिष्टपणे सांगितलेल्या प्राथमिक महापातकत्रयाच्या उपपत्तीमुळे शक्य आहे.

'प्रथमानि त्रीणि अनिर्देश्यानीति मनु:' पहिल्या तीन महापातकांचा निर्देश करू नये असे मनु म्हणतो इति गौतम. अथवा शंकराचार्य आदींच्या मताला अनुसरून -

बालघ्नांश्च कृतघ्नांश्च विशुद्धानपि धर्मतः ।
शरणागतहन्तॄंश्च स्त्रीहन्तॄंश्च न संवसेत् ॥

बालकांना मारणारे, कृतघ्न, शरणागतांना मारणारे, स्त्रियांना मारणारे यांना धर्मशास्त्राने शुद्ध करून घेतले असले तरी त्यांच्याबरोबर राहू नये, इत्यादी वचनांनी त्याचा उपसंहार योजला असल्यामुळे, संसर्गाने पतित झालेल्यांनी प्रायश्चित्ताने स्वत:ला शुद्ध केले तरी ते व्यवहाराला पात्र नाहीत. शिवाय -

चरितव्रत आयाते निनयेरन्नवं घटम् ।
जुगुत्सेरन्न चाप्येनं संवसेयुश्च सर्वशः ॥

जेव्हा प्रायश्चित्त केल्यावर माणूस घरी आल्यास त्यासाठी नवीन घडा आणावा. त्याच्याशी तुच्छतेने वागू नये. सर्व प्रकारचा व्यवहार सुरू करावा. बरोबर राहावे. या याज्ञवल्क्याच्या पुढील वाक्यात प्रायश्चित्त घेतलेल्या (पूर्व) पणीताशी सर्व व्यवहाराला संमती दिल्यामुळे 'कामतो व्यवहार्यस्त्वित्या दिवचनस्य व्यवहार्य' जाणिवपूर्वक पतितसंबंधरूप अनाचार केल्यास प्रायश्चित्ताने शुद्धिव्यवहार्यता येते असा अर्थ केल्यास अकारप्रश्लेषासह 'कामतोऽव्यवहार्य' याचा संबंध बालघ्नांशी जोडावा. या वाक्याचा पतितशुद्धीशी संबंध लावावा असे नाही.

संसर्गाने पतीत झालेल्यांच्या प्रायश्चित्ताचा विचार

यो येन पतितनैषां संसर्गं याति मानवः ।
स तस्यैव व्रतं कुर्यात्तत्संसर्गविशुद्धये ।। (मनु.११.१८२)

मनु - जो माणूस ज्या पतिताशी संपर्क आल्यामुळे पापांशी जोडला जातो, त्याने पतिताने आचारावयाचे प्रायश्चित्त संसर्गातून शुद्ध होण्यासाठी करावे - आदेशाचा अतिदेश असताना अर्धेच प्रायश्चित्त घ्यावे असा स्मृतींचा न्याय आहे, असे प्रायश्चित्तमयूखकारादींनी म्हटले आहे. पतितत्व निर्माण करणारा संपर्क ज्या पतितामुळे आला त्या पतिताला शुद्धीसाठी जे आणि जेवढे प्रायश्चित्त, त्याच्या अर्धे संसर्गामुळे पतिताला आचारायला हवे, असा विवेक करायला हवा. आत्ता म्लेच्छांच्या संसर्गाचा विचार चालू असताना, म्लेच्छांचाच विचार प्रामुख्याने असताना त्यांच्या संसर्गाबद्दलचे प्रायश्चित्त न सांगता, त्या त्या पतितांच्या संसर्गाचे प्रायश्चित्त सांगितलेल्या वाक्यांतून कसे काढावयाचे, असे म्हणाल तर खरे आहे. दुसरे अन्य वचनही असल्यामुळे काही बिघडत नाही. मिताक्षरा बौधायनाच्या आधाराने सांगते -

बौधायनः - अगम्यानां गमने कृच्छ्रातिकृच्छौ । चान्द्रायणमिति प्रायश्चित्तिः एतेन चाण्डालीव्यवायो व्याख्यातः ।।

बौधायन - ज्याच्याशी शरीरसंबंध करू नये त्यांच्याशी केल्यास कृच्छ्र अतिकृच्छ्र आणि चांद्रायणव्रत प्रायश्चित्त म्हणून करावे. याने चांडाळ स्त्री बरोबरच्या संबंधाबद्दल सांगून झाले.

गौतमः - अमत्या द्वादशरात्रम् ।

गौतम - बुद्धिपूर्वक संबंध नसेल तर बारा रात्री (व्रत करावे.)

अङ्गिराः - चण्डालपतितादीनामुच्छिष्टान्नस्य भक्षणे ।
द्विजः शुध्येत्पराकेण शूद्रः कृच्छ्रेण शुध्यति ।

अंगिरस - चांडाल पतित इत्यादींचे उष्टे अन्न खाल्ल्यास, ब्राह्मण 'पराक' प्रायश्चित्ताने तर शूद्र, कृच्छ्राने शुद्ध होतो.

आपस्तम्बः - अन्त्यानां भुक्तशेषं तु भक्षयित्वा द्विजादयः ।
चान्द्रं कृच्छ्रं तदर्धं तु ब्रह्मक्षत्रविशां विधिः ।

आपस्तंब - शूद्रादींनी खाऊन उरलेले त्रैवर्णिक द्विजांनी खाल्ले तर ब्राह्मणाने चान्द्र, क्षत्रियाने कृच्छ्र आणि वैश्याने अर्धकृच्छ्र करावे. अन्त्य म्हणजे म्लेंच्छादी हे आधीच सांगितले आहे.

बृहद्यमः - चाण्डालीं पुक्कसीं म्लेंच्छी स्नुषां च भगिनीं सखीम् ।
मातापित्रोः स्वसारं च निक्षिप्तां शरणागताम् ।।
मातुलानीं प्रव्रजितां सगोत्रां नृपयोषितम् ।

शिष्यभार्यां गुरोभार्यां गत्वा चान्द्रायणं चरेत् ॥

बृहद्यम- चांडाल स्त्री, पुक्कसी, म्लेंच्छी, सून, बहीण, मैत्रीण, आत्त्या, मावशी सांभाळायला दिलेली, शरण आलेली स्त्री, मामी, संन्यासिनी, सगोत्रातील स्त्री, राणी, शिष्याची पत्नी किंवा गुरुपत्नी यांच्याशी शरीरसंबंध केल्यास चांद्रायणव्रत प्रायश्चित्त म्हणून करावे.

अंगिरस: - पतितान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
मासोपवासं कुर्वीत चान्द्रायणमथापि वा ॥

अंगिरस - पतित अशा शूद्र स्त्रीकडे गेल्यास, भोजन केल्यास किंवा तिच्याकडून दान घेतल्यास महिनाभर उपवास करावा किंवा चांद्रायणव्रत करावे.

वसिष्ठ: – पतितसंप्रयोगं ब्राह्मेण वा यौनेन वा यास्तेभ्य: सकाशान्मात्रा उपलब्धा स्तासां परित्यागस्तैश्च न संवसेदुदीचीं दिशं गत्वाऽनश्नन्संहितामधीयान: पूतो भवतीति विज्ञायते ।

वसिष्ठ - पतिताबरोबर अध्यापन (याजन) व शरीरसंबंध ठेवल्यास त्याच्याकडून जेवढे धन मिळाले असेल तर परत करून नंतर त्यांच्याशी संबंध ठेवू नये. उत्तर दिशेला जाऊन उपास करून संहिता म्हणणारा पवित्र होतो असे समजते. हे वेद शिकलेल्याबद्दल मानावे. या वचनसमुदायात म्लेच्छ, अन्त्यज इत्यादींचे अन्न खाणे, त्यांच्या बायकांशी संबंध ठेवणे यासाठी प्रायश्चित्ते सांगितली आहेत, ते योग्यच आहे. म्लेंच्छाने उष्टावलेले भोजन, म्लेच्छ स्त्रीचा उपभोग या दोन्हींना उपपातक म्हणून त्याचे परिमार्जन ब्राह्मणाला चांद्रायण प्रायश्चित्तानं सांगितले आहे. शूद्राचा नोकर होणे, हीनांबरोबर मैत्री, हीन स्त्रीशी संबंध या याज्ञवल्क्याच्या वचनात हीनयोनिनिषेवण शब्दाने, 'स्वत:साठी क्रिया करणे, निंदित अन्न खाणे' या मानवाच्या म्हणण्याप्रमाणे म्लेंच्छ स्त्रीचा उपभोग, तिचे अन्न खाणे या गोष्टींचा उपपातकात समावेश केला आहे, म्हणून त्या गोष्टी उपपातकेच आहेत.

एवं बौधायनोऽपि - अथोपपातकानि । अगम्यागमनं गुर्वीसखीं गुरुसखीमपपात्रां च गत्वा भेषजकरणं ग्रामयाजनं रङ्गोपजीवनं नाट्याचार्यता गोमहिषीरक्षणं अथ यच्चाप्यन्यदप्येवं युक्तं कन्यादूषणम् ।

बोधायन उपपातके सांगतो - जी उपभोग्य नाही तिचा उपभोग घेणे, गर्भवती (की गुरूपत्नीची मैत्रीण) गुरूसखी, बहिष्कृत स्त्री यांचा उपभोग घेणे, औषधनिर्माण, गावासाठी यज्ञ, मनोविनोदनाने उपजीविका, नाट्याचार्य होणे, गाई- म्हशी पाळणे, शिवाय अन्य जे सांगितले ते कन्या दूषण - मुलीला दोषी ठरवणे, करणे. या वाक्याच्या संदर्भाने अपपात्रागमन म्हणजेच ज्यांची भांडी वेगळी ठेवली जातात असे बहिष्कृत लोक यांचा समावेश केल्यामुळे त्याच्यासारख्या म्लेंच्छाच्या स्त्रीचा उपभोग घेणेही उपपातकात मोडते.

ही उपपातके असतील तर त्यांनी पतितत्व कसे सिद्ध होते असे म्हणू नका. उपपातकांचे

पातनीयत्व अनेक वेळा सांगितले आहे. शिवाय 'गोवध, व्रात्यपणा, चोरी, कर्जाची परतफेड न करणे' या गोष्टी पतन करणाऱ्या आहेत. अहिताग्नी नसणे, करू नये त्याची विक्री करणे, परिवेदन (मोठ्या भावापूर्वी लहान भावाचे लग्न) या गोष्टी बोधायनाने पतनीय म्हणून गणल्या आहेत. नास्तिकपणा, व्रताचा लोप, मुलांना विकणे यात गौतमसूत्राने नास्तिकपणा हा पतनीयांमध्ये गणला आहे आणि इतर अनेक गोष्टींनीही 'पतन' होत असल्यामुळे याज्ञवल्क्य, मनु यांच्या वचनांमध्ये त्यांचा उपपातक म्हणून उल्लेख केलेला असल्यामुळे शंका घेण्याचे काही कारणच नाही. या उपपातकांची पुनरावृत्ती होत असल्यास गौतमाच्या मताप्रमाणे पातित्य तसेच राहते.

म्लेंच्छ स्त्रीगमन, तिच्यासह भोजन यांची वारंवारिता वाढल्यास जाणूनबुजून ४८ वेळांपेक्षा अधिक वेळा गमन व भोजन झाल्यास १२ वर्षांचे प्रायश्चित्त घ्यावे लागते. जाणून एकदा भोजन किंवा गमन केल्यास चांद्रायण करावे लागते. ४८ चांद्रायणे १२ वर्षांच्या व्रताच्या बरोबरीची असतात. प्रत्येक पातित्य कारणासाठी प्रायश्चित्ताची आवृत्ती - ते दोनदा घ्यायचे असे म्हटल्यास ९६ वेळा भोजन वा गमन केल्यास २४ वर्षे प्रायश्चित्त घ्यायची वेळ येईल, म्हणजेच जवळजवळ मरेपर्यंतच प्रायश्चित्त घेत राहावे लागेल, पण तसे म्हणणे बरोबर नाही. अयोग्य गोष्टी, महापापे वारंवार करणे ही गुरुस्त्री-गमन आणि सुरापान ही दोन्ही तुल्यबल असल्याने, प्रायश्चित्ताचे क्षेत्र व्यापक करून म्हणजेच अतिदेशाने अर्ध प्रायश्चित्तही सुचवले जाऊ शकते. त्याचा विचार पुढे करू. अतिदेशिक प्रायश्चित्त सुरापान, गुरुस्त्रीगमन, आगम इत्यादींसाठी आपस्तम्बाच्या पुढील वचनाने प्राप्त होते -

अथाप्युदाहरन्ति स्तेयं कृत्वा सुरां पीत्वा गुरुदारं च गत्वा ब्रह्महत्यामकृत्वा चतुर्थकालमितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पम् ।
स्थानासनाभ्यां विहरन्त एते त्रिभिर्वर्षैरपपापं नुदन्त इति ॥

चोरी करून, मद्य पिऊन, गुरूपत्नीकडे जाणे, (पण) ब्रह्महत्या केली नसेल तर प्रायश्चित्त म्हणून ३ भोजन वेळा सोडून चौथ्या वेळी मोजकं-थोडं खाणे करावे, सवना इतकेच कमी पाणी पिणे, स्थानआसन-उठाबशा काढीत चालणारा तर तीन वर्षांनी पापमुक्त होतो.

वारंवार म्लेंच्छीगमन किंवा म्लेंच्छाचे व म्लेंच्छाबरोबर भोजन केल्यास सांगितलेल्या प्रायश्चित्ताच्या अर्धे प्रायश्चित्त घ्यावे. क्रमाने गुरुपत्नीसंग किंवा सुरापानासारख्या पापांच्या भरपाईसाठी 'साम्य सांगून प्रायश्चित्ताची व्याप्ती वाढवली असल्यास = अतिदेश, अर्धे प्रायश्चित्त या निबंधकरांच्या वचनानुसार तेच योग्य आहे.'

गते तु द्वादशे वर्षे ब्रह्महा पूयते नरः ।
षड्भिर्वर्षैः कृच्छ्रचारी ब्रह्महा तु विमुच्यते ॥
मासि मासि पराकेण त्रिर्भिवर्षैंव्यपोहति ।
अर्धमासेन भुञ्जानो द्विवर्षाभ्यां विमुच्यते ॥

संवत्सरेण मासाशी पूयते नात्र संशयः ।

बारा वर्षे (महाव्रतात) गेल्यावर ब्रह्मघातक शुद्ध होतो. सहा वर्षे कृच्छ्र प्रायश्चित्त घेतल्यास ब्रह्महत्येच्या पापातून मुक्ती मिळते. तीन वर्षे सतत दर महिन्यात 'पराक' व्रत करून मुक्त होतो. १५ दिवसानंतर एकदा जेवणारा दोन वर्षात पापमुक्त, तर एक महिन्याने जेवणारा एका वर्षात पापमुक्त होतो.

या वचनानुसार १२ वर्षांचे महाव्रत हे १२ वर्षांच्या प्राजापत्यव्रतासारखे असते. ब्रह्मचर्य, वनवास, केस वाढवणे याबाबतीत हा सारखेपणा आहे. त्यामुळे ते कष्टकर असते. तसेच व्रतकाळात करण्याच्या गोष्टी फार असल्यानेही महाव्रत कष्टप्रद आहे. त्यापेक्षा बारा वर्षांच्या प्राजापत्यामध्ये तीन उपवास असूनही घरात राहत असल्यामुळे कराव्या लागणाऱ्या गोष्टी कमी झाल्यामुळे तेच बरे. कष्टांमध्ये सारखेपणा असल्याने १२ वर्षांच्या या दोन व्रतांमध्ये समत्व आहे.

३६० काय म्हणजे वर्षाचे दिवस होतात. त्या बाबतीत ३६० गायी हा प्रत्याम्नाय म्हणजे तितक्याच मूल्याचा मोबदला/बदली आहे. त्या ३६० गायींचे मूल्य किंवा प्रतिस्थापन/बदली ऐवजी महाराष्ट्रात ९० रुपये इतके आहे असे म्हणावे, तर तसे नाही. १२ वर्षे केलेल्या व्रताने पूर्वी आचरलेल्या पापाचे निवारण होते, याला आधारभूत वचन उपलब्ध नाही. वेद अथवा स्मृतींनी सांगितलेल्या गोष्टीबाबतीत इतर कोणत्या प्रमाणाची आवश्यकता नसते. सहा वर्षे करण्याचे प्राजापत्य व्रत प्रत्यक्ष अंगिरसांनी सांगितले आहे. त्यात उत्तरोत्तर अधिकाधिक कष्टप्रद असे उपवास ज्यात केले जातात, असे पराक वगैरे उपवासांचे प्रकार आहेत, परंतु त्यांना कोणताही आधार सांगता येत नाही हेही स्वत:च लक्षात घ्यावे.

तसेच १२ वर्षे करण्याच्या महाव्रताचा चौथा भाग आपस्तम्बाने सांगितल्याप्रमाणे आहे. षड्वर्षीय प्राजापत्याचा द्वादशाब्दव्रतात समावेश केल्याने १८० गायींचे दान सांगितले आहे. चौथ्या भागाऐवजी ४५ गायींचे दान सांगितले आहे. कारण ४५ गायींचे दान हे दीड वर्षे एवढ्या कालावधीत केलेल्या कृच्छ्राच्या तोडीचे आहे.

गुरुतल्पगमन हे म्लेच्छीगमनासारखे, तर सुरापान म्लेच्छाबरोबर भोजनासारखे आहे. त्याचे प्रायश्चित्त म्हणून दुसरा भाग सांगितला आहे. नऊ महिन्यांचे कृच्छ्रव्रत करू न शकणाऱ्यांसाठी पर्याय सांगितला तो असा - पाच रुपये दहा आणे हे निष्क्रयद्रव्य.

म्लेच्छ स्त्रीकडे जाणे, तिचे उष्टे खाणे या गोष्टी वारंवार केल्यास नऊ महिने प्रायश्चित्त सांगितले. पुढे उशना म्हणतो - म्लेंच्छ स्त्रीकडे जाऊन तिला गर्भ राहिल्यास दुप्पट काळ व्रताचरण करावे. आपस्तंब एके ठिकाणी सांगतो - चाण्डालीमध्ये गर्भ ठेवून गुरुस्त्रीगमनाला जे प्रायश्चित्त ते करावे, पण हे अतिदेशयुक्त प्रायश्चित्त असल्यामुळे पुन्हा ९ महिनेच प्रायश्चित्त अधिक पापालाही घेऊन पुरेल, तसे न व्हावे म्हणून **'वृषल्यामभिप्रजातस्तु त्रीणि वर्षाणि चतुर्थकालसमये नक्तं भुञ्जीत'** म्हणजेच वृषलीमध्ये पुत्र/अपत्य निर्मिल्यास तीन वर्षे,

तीन जेवणे वगळून चौथ्या जेवणाच्या वेळी फक्त रात्री जेवावे. हे मत स्वेच्छापूर्व वारंवार जाऊन गर्भोत्पत्ती झाल्यास ग्राह्य धरावे असे प्रायश्चित्तमयूखकार सांगतो. चतुर्विंशतीचे मतही तसेच आहे. म्लेंच्छ म्हणजे वृषल हे आधीच सांगितले. वारंवार जात असूनही गर्भोत्पत्ती झाली नसल्यास प्रायश्चित्त सांगतात -

बौधायनः - 'अथोपपातकानि अगम्यागमनं गुरुसखीमपपात्रां पतितां च गत्वा, भेषजकरणं, ग्रामयाजनं, रङ्गोपजीवनं, नाट्याचार्यता, गोमहिषीरक्षणं यच्चाप्यन्यदप्येवं युक्तं कन्यादूषणमिति तेषां तु निर्वेशः पतितवृत्तिद्वौ संवत्सरौ ।'

गरूपत्नी वा अन्य वाळीत टाकलेल्या वा पतित अयोग्य स्त्रीकडे जाणे, औषध निर्माण, गावाकडून यज्ञ करून घेणे, नाटकात काम करणे, नाटक शिकवणे, गुरे राखणे, कन्येची निंदा करणे या उपपातकांना दोन वर्षांचे प्रायश्चित्त पतिताप्रमाणे. न जाण्याजोग्या बाईकडे जाणे किंवा ज्यांची भांडी बाजूला ठेवली जातात अशा स्त्रियांकडे जाणे हे म्लेच्छीगमनासारखे आणि इतर जे काही यासारखे उपपातक, त्याला आणि म्लेच्छाबरोबरच्या भोजनाला दोन वर्षांचे पतिताला विहित असलेले प्रायश्चित्त घ्यावयाचे आहे. त्याचे स्वरूप आपस्तंबाने तीन वर्षांसाठी सांगितलेल्या प्रायश्चित्तासारखेच आहे.

बौधायनः - चतुर्थकालमितभोजिनः स्युरपोऽभ्युपेयुः सवनानुकल्पम् ।
स्थानासनाभ्यां विहरन्त एते त्रिभिर्वर्षैरप पापं नुदन्ते ॥

तीन जेवणे सोडून चौथ्या वेळी मोजके जेवायचे. सवनातलेच पाणी प्यावे. स्थान, आसन उठाबशा काढत वावरणाऱ्यांनी तीन वर्षे प्रायश्चित्त घेऊन पतित हा पापमुक्त होतो. हा सामान्यतः पतित असलेल्याचे प्रायश्चित्त आहे. अनेक वेळा गर्भोत्पत्ती झाली किंवा अधर्म्य गोष्टींचा आचार भोजनादी वारंवार केल्यास प्रायश्चित्त सांगतात.

भगवानापस्तम्बः - अधर्माहृतान्भोगाननुज्ञाय न वयं चाधर्मश्चेत्याभिव्याहृत्याधोनाभ्युपरिजान्वाच्छाद्य त्रिषवणमुदकमुपस्पृशन्नक्षीराक्षारलवर्णं भुञ्जानो द्वादशवर्षाणि नागारं प्रविशेत्ततः सिद्धिः, अथ संप्रयोगः स्यादार्यैरेतदेवान्येषामपि पतनीयानाम् ।

भगवान आपस्तंब म्हणतात - अधर्माने मिळालेल्या भोगांना अनुज्ञा न देता हा अधर्म आहे असा निषेध करून नाभीच्या खाली आणि गुडघ्याच्या वर अच्छादन करून, तीन वेळा (तीन सवनांच्या वेळी) पाण्याने स्पर्श करून, दूध, क्षार आणि मीठ वर्ज्य करून भोजन करीत १२ वर्षे बाहेर राहून नंतर नगरात प्रवेश करावा, म्हणजे प्रायश्चित्त पूर्ण होऊन आर्यांसह व्यवहार करता येईल. असेच प्रायश्चित्त अन्य पतितानाही चालू शकेल. हे जे प्रायश्चित्त सांगितले आहे ते ब्रह्महत्या करणाऱ्याला सांगितलेल्या १२ वर्षांच्या प्रायश्चित्तापेक्षा कमी कष्टांचे आहे. उज्ज्वलाकारही आम्हाला अनुकूल अशीच या ग्रंथांची व्याख्या करतात. अधर्माहृत म्हणजे ब्राह्मणाचे धन चोरणे.

चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च ।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति ॥

चांडाल, अन्त्यज स्त्रीकडे जाणे, जेवणे, त्याच्याकडून दक्षिणा, भेट घेणे हे अजाणतेपणे केले तर ब्राह्मण पतित होतो आणि जाणून केल्यास तो त्यांच्यासारखाच - चांडालादी ठरतो. ही उदाहरणे अधर्माने घेतलेल्या भोगाची आहेत. जे अधर्माने भोगलेले भोग त्यांना परवानगी न देता तो टाकून द्यायला हवा. आम्ही आणि अधर्म एकत्र राहू शकत नाही. अर्धवट स्वीकार येथे संभवत नाही. अधर्माचा परिहार प्रायश्चित्तानेच शक्य आहे. बारा वर्षांच्या प्रायश्चित्ताने शुद्धी आणि समाजात वावरायला मोकळीक मिळणार. आर्यांबरोबर संबंध आल्यावर, प्रायश्चित्त घेऊन झाल्यावर सिद्धीचा उपदेश केला आहे. 'ज्ञानात्साम्यं तु गच्छति' या मनुवचनाचा अपवाद करावा यासाठी सिद्धीचा पुनरुच्चार केलाय. उज्ज्वलाकारांचे वचन आमच्या मनाला बळकटी देणारे आहे. एकदा अन्त्य स्त्रीकडे गेल्यामुळे 'पातित्य' पतितत्व येत नाही असा आपस्तंबाचा अभिप्राय असावा. पतनीयांची मोजदाद करताना अपपात्रगमन (अशुद्ध मानले गेलेले) अयोग्य व्यक्तीकडे जाणे ही गोष्ट तेथे लक्षात घेतलेली नाही. त्याचे परिगणन 'अशुचिकर' = अशुद्ध करणाऱ्या गोष्टींमध्ये केले आहे. शूद्रोच्छिष्ट, अपात्र, अशुद्ध, हीन व्यक्तीकडे जाणे इ. गोष्टी पतनीय म्हणून काहींनी मानल्या आहेत, असे दुसऱ्यांचे मत म्हणून सांगितले. पुन्हा पुन्हा त्या गोष्टींच्या अभ्यासासाठी हे जोडावे.

आतापर्यंत निर्दिष्ट केलेल्या सर्व वचनांनी सांगितलेल्या प्रायश्चित्तांचा विचार केल्यास हा निष्कर्ष काढता येईल. अजाणता एकदा म्लेच्छ स्त्रीकडे गेल्यास किंवा अजाणता म्लेंच्छासह भोजन केल्यास कृच्छ्र प्रायश्चित्त करावे. जाणूनबुजून एकदा (म्लेंच्छ स्त्रीकडे) गेल्यास वा जेवल्यास अतिकृच्छ्र करावे. जाणीवपूर्वक, स्वेच्छेने अनेक वेळा गमन केल्यास कृच्छ्र, अतिकृच्छ्र किंवा चांद्रायण प्रायश्चित्त करावे, त्याने चांडालीकडे जाण्याचा प्रश्न मिटला. हा बौधायनाचा मिताक्षरेने केलेला अनुवाद निर्णायक आहे. या अधर्म्य गोष्टींमध्ये वारंवारिता असेल तर अनेक वचनांचा विचार घेता नऊ महिने, एक वर्ष, दीड वर्ष, सहा वर्षांपर्यंत प्रायश्चित्ते घ्यावीत. म्लेच्छांबरोबर एका पंक्तीत जाणीवपूर्वक ३६० वेळा भोजन केल्यास किंवा सुरापान केल्यास पतितत्व येते.

'संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन् ।
यानशय्याशनैर्नित्यं जानन्वै पतितो भवेत् ॥'

जाणेयेणे, ऊठबस, झोपणे, खाणेपिणे या गोष्टी पतिताबरोबर वर्षभर केल्यास - जाणीवपूर्वक केल्यास (द्विज) पतित होतो हे कूर्मपुराणगत मत आहे. तेथे सुरापानाबरोबर समकक्ष सांगितल्यामुळे त्याला अतिदेशाने ९ महिन्यांचे प्राजापत्य प्रायश्चित्त करावे. अधिक वेळा जाणे होत असेल तर प्रत्यक्ष मोजदाद न करता १२ वर्षांच्या निम्मी वर्षे म्हणजे सहा वर्षे कृच्छ्र प्रायश्चित्त घेऊन पातित्यातून तरून जायला होते, असा विचार शक्य आहे. इस्लाम धर्मात प्रवेश केल्यानंतर ४८ भोजनेही झाली नसतील (२४ दिवस उलटले नसतील),=

बरोबर फक्त ऊठबस झाली असेल तर एक वर्षपर्यंतच (व्रतस्थ राहून) स्वत:च्या पूर्वीच्या जातीत (धर्मात) प्रवेश करता येईल. या पंडितप्रवर अनंतकृष्णशास्त्रींच्या मताला कोणतेही प्रमाण आढळत नाही. कारण एक वर्षभर केवळ (म्लेच्छादींबरोबर) भोजनाने येणाऱ्या पातित्याला प्रायश्चित्त सांगितले आहे आणि पातकांचा कमी-अधिकपणा लक्षात घेऊन प्रायश्चित्त सांगणाऱ्या विधानांची संगती लागणार नाही. ती प्रायश्चित्तांची व्यवस्था अयोग्य ठरेल. म्लेच्छादींशी वर्षभर भोजनादी संपर्क ठेवल्यास त्यामुळे पतितत्व येऊन १२ वर्षांचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. प्रत्येक निमित्तानुसार त्या त्या कारणामुळे येणाऱ्या प्रायश्चित्ताची आवृत्ती करायची असे मान्य केल्यास दोन-तीन वर्षे असा भोजनादी गोष्टींनी संबंध झाला तर २४ वर्षे, ३६ वर्षे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. सातहून जास्त वर्षे असा संबंध झाल्यास (८४ वर्षे) मरेपर्यंत प्रायश्चित्त घेत राहावे लागेल, असे म्हणू नये (असा अर्थ काढू नये). म्लेच्छसंसर्गामुळे पतितत्व येत असले तरी ते महापातक नसल्यामुळे बारा वर्षे प्रायश्चित्त घेण्याची गरज नाही. चार प्रकारच्या महापातके केलेल्यासह संबंध आल्यास पतितही महापातकी ठरतो हे पूर्वीच पाहिले आहे. महापातक्याला बारा वर्षांचेच प्रायश्चित्त असा काही नियम नाही. तीन वर्षांच्या आपस्तंब, बौधायन इत्यादींनी सांगितलेल्या प्रायश्चित्ताच्या निम्मे प्रायश्चित्त अतिदेशाने निर्देशिलेल्या ठिकाणी घेणे अपेक्षित आहे. म्लेच्छ, अन्त्यज स्त्रीकडे जाणे, भोजन यांच्या कमीजास्त प्रमाणाचा विचार करून अनेक प्रायश्चित्ते वेगवेगळ्या स्मृतींमध्ये सांगितलेली आहेत. त्याचाच समन्वय केला पाहिजे. त्याशिवाय वेगळी काही कल्पना करण्याची गरज नाही. अनेक उपयुक्त वचने उपलब्ध असल्यामुळे अनुमानाची गरज नाही. उपपातकांत मोडणाऱ्या गोष्टी वारंवार केल्या गेल्यास ब्रह्मघात्याला सांगितलेल्या बारा वर्षांच्या प्रायश्चित्त कल्पनेला किंवा मरणान्तिक प्रायश्चित्त कल्पनेला काही प्रमाण नाही. म्हणूनच गौतमाने निंदित कर्मे वारंवार करणाऱ्याला पतितांमध्ये घालून पहिला तिन्हींचा निर्देश करू नये असे मनु म्हणतो, असे सांगितले आहे.

'प्रायश्चित्तमनिर्देश्यं मरणान्तिकमिति स्थिति:' म्हणजे मरणापर्यंत प्रायश्चित्त सांगू नये. ब्रह्महत्या, सुरापान आणि गुरुपत्नीगमन ही तीन पहिली पातके मरणान्त प्रायश्चित्त सांगण्याला योग्य नाहीत. निंद्य कर्म वारंवार करणारे आणि म्लेंच्छांच्या संगतीने पतित होणाऱ्यांसाठी प्रायश्चित्त सांगितलेले नाही, त्याची गती काय, असे म्लेंच्छांमुळे पतितत्व आल्यास -

'यो येन पतितेनैषां संसर्गं याति मानव: ।
स तस्यैव व्रतं कुर्यात्तत्संसर्गविशुद्धये ॥'

जो माणूस ज्याच्या संगतीत आल्यामुळे पतित होतो, तो त्या त्या पतिताप्रमाणेच प्रायश्चित्त घेऊन त्या संसर्गापासून मुक्त होतो.

येथे प्रायश्चित्ताचा अतिदेश सांगितलेला असल्यामुळे संसर्गाने पतित झालेल्यांना

मरणापर्यंत वाट पाहावी लागत नाही. प्रत्येक चुकीसाठी वेगवेगळी प्रायश्चित्ते पुन्हा पुन्हा मरणापर्यंत घेत राहायचे असं म्हणू नये. लहान- मोठ्या पातकांना सांगितलेल्या प्रायश्चित्त सांगणाऱ्या वचनांमध्ये याला प्रमाण नाही. १६ वर्षांपर्यंत उपनयनशिवाय राहिल्यास 'व्रात्यत्व' येणार, मग ते दूर करण्यासाठी उपनयनाची तयारी म्हणून एका ऋतूचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल असे विधान आहे. शिवाय अयोग्य आचरण पुन्हा पुन्हा झाल्यास (वर्षांऐवजी) दिवसांनी प्रायश्चित्त घ्यावे, असा न्याय असल्याने वृद्ध अशा व्रात्याला 'प्रायश्चित्त' घ्यायलाच लागणार नाही.

'ऐन्द्राग्नं पुनरुत्सृष्टमालभेत य आतृतीयात्पुरुषात्सोमं न पिबेत्'।

वाईट दुर्वर्तनी ब्राह्मणाला सोमपानाची - सोमयाग करण्याची इच्छा झाली तर आपले आधीचे पतितत्व निवारण करण्यासाठी इंद्र व अग्नीसंबंधी इष्टी करावी. चौथ्या पुरुषापर्यंत दुर्वर्तनी ब्राह्मणाच्या चार पिढ्यात सोमयाग करू नये.

चण्डालान्त्यस्त्रियो गत्वा भुक्त्वा च प्रतिगृह्य च।
पतत्यज्ञानतो विप्रो ज्ञानात्साम्यं तु गच्छति॥

चांडाळाच्या किंवा अन्त्यजाच्या स्त्रीकडे जाणे, खाणे, दक्षिणा घेणे इ. गोष्टी ब्राह्मणाने अजाणता केल्यास, तो पतित होतो. तेच जाणीवपूर्वक केल्यास तो चांडाळ किंवा अन्त्यजच होतो. याप्रमाणे जाणीवपूर्वक अन्त्य स्त्रीकडे जाण्यामुळे अन्त्यत्व प्राप्त होते. म्हणावे तर त्यामुळे आमरण प्रायश्चित्तच सांगितलेले मानावे लागेल; पण तसे नाही. न जाणता अन्त्य स्त्रीकडे गेल्यास द्वादश (१२) रात्रींचे प्रायश्चित्त घ्यायला सांगितले आहे. तसेच जाणीवपूर्वक केल्यास चांद्रायण कृच्छ्र व्रत करायला गौतमादींनी सांगितले आहे. त्यामुळे 'अन्त्य सात्म्य' असे सांगण्याचा हेतू फक्त पापाची निंदा करणे एवढाच आहे. वारंवारच्या पापाचा नाश, अधिक प्रायश्चित्ताच्या आचरणाने होते असेही अनुमान त्यातून करता येते.

'त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात्।
योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम्।
स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः॥
शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम्।
जनयित्वा सुतं तस्यां ब्राह्मण्यादेव हीयते॥
शूद्रसमस्तावद्यावद्वेदेन जायते।'

दूध विकल्यामुळे ३ दिवसात ब्राह्मण शूद्र होतो. जो ब्राह्मण वेद न शिकता अन्यत्र श्रम करतो तो जिवंत असतानाच आपल्या वंशजांसह लगेच शूद्र होतो. शूद्र स्त्रीशी समागम करून ब्राह्मण अधोगतीला जातो. तिच्यापासून पुत्र निर्माण केल्यास तो ब्राह्मण्यातूनच उठतो. तो शूद्रासारखा होतो आणि पुन्हा वेदाने ब्राह्मण होतो. यासारखी निबंधकारांची वचने ब्राह्मणाची शूद्रत्वप्राप्ती सांगतात. त्यांचा उद्देश अयोग्य गोष्टींची निंदा हाच आहे.

सनातन धर्माचा प्रदीप उजळणाऱ्या माननीय अनंतकृष्णशास्त्रींनी ३६० दिवस वर्षभर म्लेच्छांसह भोजने निषेधिली वा थांबवली नाहीत - कधीतरी घडणाऱ्या या वर्तनाला प्रायश्चित्त सांगून स्वतःच्या पूर्व जातींमधील व्यवहाराला मोकळीक दिली आहे. सतत वर्षभर सहभोजन केल्यास पतितत्व येतेच. येथे 'वर्षभर' इत्यादी मुदतीचा विचार तुलनात्मकपणेच करावयाचा आहे. वर्षभर सतत प्रतिक्षणी भोजन करणे अशक्य असल्यामुळे मोठ्या संख्येने-बऱ्याच वेळा म्लेंच्छासह भोजनही 'वर्षभर' असे म्हणता येणार नाही. शिवाय ज्यांच्या बाबतीत अशा निश्चित संख्येचा बोध निश्चय करता येत नाही, त्यांच्यासाठी, खूप दिवस म्लेच्छ मतात राहन सुद्धा प्रायश्चित्त देऊन स्वतःच्या पूर्वीच्या जातीतील प्रवेशात दोष नाही. अशाच प्रकारे ४८ वेळा एका पात्रात भोजने करूनही निर्णय दिलेला नसताना खूप दिवस गैरवर्तन झाले तरी शुद्धी संभवते इत्यादी अनुमान काढायला हरकत नाही. सनातन धर्मप्रदीपकारांचे असे म्हणणे आहे की, प्रायश्चित्त केलेल्यांनीही स्वतःच्या पूर्वीच्या जातीमध्ये विवाह इत्यादी मोठे दृढ संबंध निर्माण करू नयेत.

ब्रह्महसुरापगुरुतल्पगमातृपितृसंबन्धगस्तेननास्तिकनिन्दितकर्माभ्यासिपतितात्या-ग्यपतितत्यागिनः पतिताः । पातकसंयोजकाश्च तैश्चाब्दं समाचरन् ।

ब्रह्महत्यारा, मद्यपी, गुरुपत्नीशी आणि मातापित्यांच्या संबंधितांशी संबंध ठेवणारा, चोर, नास्तिक, निंद्य कर्म सतत करणारा, पतितेचा त्याग न करणारा, अपतिताचा त्याग करणारा हे सर्व पतित आहेत. त्यांच्या संपर्कामुळे पाप लागते - त्यांच्याबरोबर वर्षभर संबंध ठेवल्यास. या गौतमाच्या वचनावरून प्रायश्चित्त घेतलेल्यांबरोबरच्याच संबंधांचा निषेध सांगितला आहे.

अथ पतिताः समवसाय धर्मांश्चरेयुरितरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः ॥ पतितांनी एकत्र येऊन, ठरवून धर्माचरण करावे. परस्परांसाठी यज्ञ करावा, परस्परांना शिकवावे आणि आपापसात विवाह करावेत, या बौधायन वचनामुळे प्रायश्चित्तशुद्धी घेतलेल्यांचाच परस्पर संबंध, विवाहादिसंबंध संमत मानला आहे. पण अपतितांबरोबर त्यांचा विवाहादी दृढ संबंध प्रतिषेधितच आहे. प्रायश्चित्त घेतल्यामुळे 'नरकात पडणे' घडणाऱ्या पातकापासून सुटका होत असली तरी सामाजिक व्यवहाराला आवश्यक सामर्थ्य निर्माण होत नाही, त्या व्यवहाराला विरोध करणाऱ्या सामर्थ्याचा निरास होत नाही.

'कामतो व्यवहार्यस्तु वचनादिह जायते ।'

प्रायश्चित्त वचनामुळे स्वेच्छेने समाजात सर्व व्यवहार चालतो. या योगी याज्ञवल्क्याच्या वचनामुळेही सर्व व्यवहार संभवत नाहीत असाच अभिप्राय आहे. पण ते जाणकारांना योग्य वाटत नाही, कारण अनेक विरुद्ध प्रमाण वचनेही आढळतात. कारण गौतमाच्या विधानात

वाय १८४-९

प्रायश्चित्त घेतल्यावरही 'व्यवहाराला प्रतिबंध' असे स्पष्टपणे सांगणारा शब्द आढळत नाही - पूर्वी पतिताला प्रायश्चित्त तेथे सांगितलेले नाही, शिवाय कल्पनेलाही तिथे वाव नाही. गौतम वाक्याचा तसा अर्थ घेणे योग्य ठरणार नाही.

पतितांची गणना करणाऱ्या अध्यायाच्या आधीच्या अध्यायात **'त्यजेत् पितरं राजघातकम्'** राजाचा घात करणाऱ्या पित्याचा त्याग करावा अशी सुरुवात करून पतिताच्या त्यागाचा विधी सांगितला. **'यस्य तु मरणान्तिकं प्रायश्चित्तं स मृतः शुध्येदेतदेव शान्त्युदकं सर्वेषूपपातकेषु'**. या पातकाला आमरण प्रायश्चित्त सांगितले आहे, तो मरून शुद्ध होतो. हेच शान्ति-उदक सर्व उपपातकांना लागू आहे' असे म्हणून पतिताला (शुद्ध करून) स्वीकारण्याचा विधी सांगितला आहे. त्याची संगती कशी लावायची? वरील बौधायन वचनही प्रायश्चित्त घेतलेल्या पतितांना उद्देशून नाही, कारण तसे मानायला प्रमाण नाही. याज्ञवल्क्याने मात्र महापातक्यांनाही प्रायश्चित्त सांगून जे पतित उद्धटपणे ते प्रायश्चित्त घेणार नाहीत त्यांचे काय करायचे, तर त्या पतितांचा बहिष्कार कसा करावा ते सांगतात -

'दासी कुम्भं बहिर्ग्रामान्निनयेरन्स्वबान्धवाः ।
पतितस्य बहिः कुर्युः सर्वकार्येषु चैव तम् ॥'

दासीकडून घट फोडून पतिताच्या स्वतःच्या नातेवाईकांनी त्याला गावाबाहेर (वेशीबाहेर) घालवावा आणि सर्व कार्यांच्या बाबतीत त्याच्यावर बहिष्कार टाकावा - त्याला कुलकृत्यांमध्ये सहभाग देऊ नये. पण जर बांधवांनी त्याग केल्यामुळे किंवा वाईट वर्तनाबद्दल तिटकारा निर्माण झाल्यामुळे त्याने प्रायश्चित्त घेतले तर मात्र नंतर काय करावे?

'चरितव्रतं आयाते निनयेरन्नवं घटम् ।
जुगुप्सेरन्न चाप्येनं संवसेयुश्च सर्वशः ॥'

प्रायश्चित्त घेऊन परत आल्यावर त्याला नवीन घडा देऊन स्वीकार करावा. त्याच्याशी तुच्छतेने वागू नये. त्याबरोबर सर्व व्यवहार (पूर्ववत्) करावेत. या वचनाने याज्ञवल्क्याने सर्वतोपरी पतिताचे व्यवहारयुक्तत्व सांगितले आहेत. तसेच भगवान मनु म्हणतात - पतित व्यक्ती प्रायश्चित्त घ्यायला तयार नसेल तर त्याला तो जणू मेलाच असे मानून घट, पाणी यांचे दान द्यावे.

'दासी घटमपां पूर्णं पर्यस्येत्प्रेतवत्तदा ।
अहोरात्रमुपासीरन्नशौचं बान्धवैः सह ॥'

दासीने पाण्याने भरलेला घडा मृतासाठी फोडतात तसा फोडावा. एक अहोरात्र-दिवसभर उपास करून सुतक पाळावं. हा अशौच-सुतकाचा विधी सांगून पुढे म्हणतात -

'निवर्तेरश्च तस्मात्तु संभाषणसहासने ।
दायाद्यस्य प्रदानं च यात्रा चैव हि लौकिकी ॥'

पतितांशी बसणे, उठणे, संभाषण करू नये. त्याला पैतृक संपत्तीचा वाटा देऊ नये वा कोणताही लौकिक व्यवहार करू नये. अशा प्रकारे सर्वथा पतिताबरोबरचा व्यवहार टाळावा असे सांगितले. पण पुढे त्याने प्रायश्चित्त घेतले तर कसे वागावे ते सांगतात -

'स त्वप्सु तं घटं प्रास्य प्रविश्य भवनं स्वकम् ।
सर्वाणि ज्ञातिकार्याणि यथापूर्वं समाचरेत् ॥'

(वेगळेपणा निर्माण करणारा) तो घट पाण्यात फेकून देऊन स्वतःच्या घरात प्रवेश करावा. आपल्या समाजाला-जातीला अपेक्षित असलेली कार्ये पूर्वीप्रमाणेच आचरावीत. या वचनांनी त्यांचे व्यवहार्यत्व साधिले. पूर्वीप्रमाणे ज्ञातींबरोबर सहभोजनादी कर्मे करावीत असे मेधातिथी म्हणतो. त्याच्या लगेच पुढच्या श्लोकात या अर्थाचा पुनरुच्चार केला आहे.

"एनस्विभिरनिर्णिक्तैर्नार्थं किंचित्समाचरेत् ।
कृतनिर्णेजनांश्चैव न जुगुप्सेत कर्हिचित् ॥'

ज्यांनी प्रायश्चित्त घेतलेले नाही, त्यांच्याबरोबर कोणताही व्यवहार करू नये. पण त्यांनी जर प्रायश्चित्त घेतले तर मात्र त्यांची हेटाळणी/निंदा करू नये. (हे पूर्वीही सांगितले आहेच.)

शंखोऽपि - तस्य तद्गुरोर्बान्धवानां राज्ञश्च समक्षं दोषं विख्याप्य पुनः पुनराचारं लभस्वेति स यद्येवमप्यनवस्थितमतिः स्यात्पात्रं विपर्यस्येत् ।

शंखही म्हणतो - गुरु, बांधव आणि राजा यांच्यासमोर त्याचे पाप सांगून 'तू प्रायश्चित्त घे', असे वारंवार सांगूनही तो पतित प्रायश्चित्त घ्यायला तयार नसेल तर भांडी बदलावीत/त्याला वेगळे काढावे. पतिताने प्रायश्चित्त घेतले नाही तर बहिष्कार टाकावा. त्याचप्रमाणे ज्याने प्रायश्चित्त घेतले आहे, त्याबरोबर ज्ञातीतले सर्व व्यवहार चालू करावेत. स्वतःच्या कुटुंबात प्रवेश द्यावा, हे वरील वचनांवरून स्पष्ट आहे. पूर्वी बौधायनाने सांगितलेले प्रायश्चित्त घेतल्यावरही पूर्वपतितांनी परस्परांमध्येच यजन, अध्यापन, दान विवाहादी कर्मे प्रायश्चित्त न घेता कसे योग्य ठरेल असे म्हणू नये. ज्यांचा उपनयन संस्कार झालेला नाही त्यांच्याबाबतीत ज्याप्रमाणे पौराणिक मंत्रांनी कर्म, अध्ययन इत्यादी केले जाते, त्याप्रमाणे इतर पतितांच्या बाबतीत करण्यात काही गैर नाही. म्हणूनच आपस्तंबाने सांगितलेले योग्यच आहे. भ्रूणहत्येविषयी तिथे विधान आहे -

'अथ भ्रूणहा श्वाजिनं खराजिनं वा बहिर्लोम परिधाय पुरुषशिरः प्रतीपानार्थमादाय खट्वाङ्गं दण्डार्थे कर्मनामधेयं प्रब्रुवाणथंक्रमेत्को भ्रूणघ्ने भिक्षामिति ग्रामे प्राणवृत्तिं प्रतिलभ्य शून्यागारं वृक्षमूलं वाऽभ्युपश्रयेन्न हि मे आर्यैः संप्रयोगो विद्यते, एतेनैवोत्तमादुच्छवासाच्चरेन्नाय्यास्मिँल्लोके प्रत्यापत्तिर्विद्यते कल्मषं तु निर्हण्यते ॥'

भ्रूणहत्या (वेद जाणणाऱ्या ब्राह्मणाची हत्या) केल्याने, कुत्र्याचे वा गाढवाचे कातडे पांघरून केस बाहेर येईल अशा प्रकारे घेऊन, पाणी पिण्यासाठी माणसाची कवटी घेऊन,

पलंगाचा पाय काठी म्हणन हातात घेऊन, स्वतःच्या दुष्कर्माचा उल्लेख करून 'भ्रूणघ्नाला कोण भिक्षा देणार?' (तुम्ही द्या) अशी गावात भिक्षा मागून त्यावर जीव जगवून, ओसाड जागी वृक्षाखाली राहावे. माझा शिष्ट लोकांशी काही संबंध नाही. शेवटच्या श्वासापर्यंत त्याने असेच राहावे. त्याचा समाजाशी संबंध येत नाही, पण पाप मात्र धुतले जाते, हे आमरण प्रायश्चित्त सांगितले आहे. भ्रूण म्हणजे सहा वेदांगांसह वेदाचे अध्ययन केलेला, त्याचा अर्थ व प्रयोगशास्त्राचे व्याख्यान जाणून त्याप्रमाणे कर्म करणारा व करवून घेणारा-ब्राह्मण. त्याला मारणे हा महादोष असल्यामुळे त्याचा घातक मरणापर्यंत प्रायश्चित्त घेऊनच शुद्ध होतो. पण समाजात व्यवहाराला अपात्रच. गुणवान ब्राह्मणांना मारणाऱ्यांसाठी पुढील विधान आहे -

अथाभिशस्ता समवयास चरेयुर्धार्म्यमिति सांशित्येतरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः ।

पातकी लोकांनी एकत्र येऊन परस्परांसाठी यज्ञ, अध्यापन आणि विवाह इत्यादी गोष्टी कराव्यात. हे पातकी म्हणजे सामान्य ब्राह्मणाची हत्या करणारे पापी नव्हेत, तसे पापी १२ वर्षांचे प्रायश्चित्त करून पापमुक्त होऊ शकतात. जो श्रोत्रिय विद्वानाचा घात करतो. त्याला मात्र मृत्यूपर्यंतच प्रायश्चित्त घ्यावे लागते, तेव्हा कुठे पापनिवृत्ती होते. सामान्य ब्राह्मणवधाचे प्रायश्चित्त १२ वर्षे आचरून तो आर्यांसह सामान्य व्यवहाराला योग्य ठरतो, असे विधान आहे. येथे सद्भिः म्हणजे सज्जन-आर्यांसह व्यवहार शक्य होतो. ज्यांनी प्रायश्चित्त घेतले नाही अशा पतितांचा पतित होणाऱ्या गोष्टी सुरू केल्यानंतर लगेच पतितांबरोबर व्यवहार संभवत नसल्याने सर्व व्यवहारांचा निषेध केला आहे. त्याचा अपवाद म्हणजे प्रायश्चित्त घेतल्यावरच सज्जनाशी आर्यांशी व्यवहार हा आहे. त्यांना व्यवहाराला अनुमती नाही, कारण मरणापर्यंत त्यांचे प्रायश्चित्त पूर्णच होत नाही याबद्दल सांगतात -

नास्यास्मिँल्लोके प्रत्यापत्तिर्विद्यते कल्मषं तु निर्हण्यते इति ।

त्याची या लोकात पुनरावर्तनाची शक्यता नाही. प्रायश्चित्ताने पाप फक्त नष्ट होते, व्यवहार करता येत नाहीत. येथे प्रत्यापत्ती म्हणजे शुद्धी किंवा व्यवहार. म्लेंच्छादी स्त्रीकडे जाणे, तिथे भोजन यासारख्या मोठ्या संपर्कामुळे जे पतित होतात, त्यांचे पतितत्व दूर करण्यासाठी 'अधर्माने स्वीकारलेल्या भोगांना परवानगी नाही' असे सांगून प्रायश्चित्त सांगितले आहेत. ते घेऊन झाल्यावर **'ततः सिद्धिः अथ संप्रयोगः स्यादार्यैः'** - मग शुद्धी सिद्ध होऊन आर्यांसह व्यवहाराला अनुज्ञा मिळते. असेच प्रायश्चित्त अन्य पतनीयांसाठीही पतितांसाठी जाणावे.

आतापर्यंतच्या चर्चेचा सारांश असा सांगता येईल - जे जाणता किंवा अजाणता किंवा बळजबरीनेही, म्लेंच्छ स्त्रीगमन, सहभोजन, म्लेंच्छांसह एका पात्रात जेवण केल्यामुळे जे पतित होतात. त्यांची खूप वर्षांनी का होईना शुद्धी होते आणि पूर्वीच्या जातीत पुन्हा प्रवेश मिळतो, हे सिद्ध आहे. 'खूप वर्षांनी शुद्धी' ही गोष्ट तर्कसंगत आहे का असे मानू

नये, कारण प्रायश्चित्तांमध्ये तारतम्याने विचार झालेला आहे. शिवाय एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करण्यामुळे पाप वा प्रायश्चित्त- त्याचा काळ वाढतो. हा नियम अनिर्बंधपणे वापरला जात नाही. प्रायश्चित्ताचा निर्णय करताना पुढचा- मागचा संदर्भ लक्षात घेऊन प्रस्तुत अयोग्य वर्तनाचा विचार केला जातो. मिताक्षरेत जाणीवपूर्वक, पुन्हा पुन्हा अयोग्य वर्तन केल्यास त्या त्या निमित्तानुसार प्रायश्चित्त पुन्हा आचरावे लागेल. या न्यायाने प्रायश्चित्त वारंवार घ्यावे लागेल अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर लौगाक्षी म्हणतात -

अभ्यासेऽहर्गुणा वृद्धिर्मासादग्विधीयते ।
ततो मासगुणा वृद्धिर्यावत्संवत्सरं भवेत् ।।
ततः संवत्सरगुणा यावत्पापं समाचरेत् ।

पापाचरण पुन्हा पुन्हा झाले तर प्रायश्चित्त दिनप्रमाणात महिन्यानंतर वाढवावे. वर्षापर्यंत महिन्याचे प्रमाणात वाढ करावी. नंतर जोपर्यंत पापाचरण करीत राहील, तोपर्यंत वर्षांच्या प्रमाणाने प्रायश्चित्त सांगावे. हे प्रायश्चित्त जाणून केलेल्या पापासाठी आहे. या वचनाप्रमाणे प्रायश्चित्ताचा काळ एक वर्षाहून जास्त असेल तर त्यानंतर एका दिवसाने पतिताचे प्रायश्चित्त दिवसाच्या प्रमाणात सांगण्यात प्रत्यवाय नाही. मरणानंतरच पापमुक्ती करवणारे प्रायश्चित्त शक्यतो सांगू नये, असे सुबुद्ध विचारवंतांनी लक्षात घ्यावे. या विषयात देवलस्मृतीही प्रमाण आहे. आनंदाश्रमाने प्रकाशित केलेल्या देवलस्मृतीला पंडित अनंत कृष्णशास्त्री (सनातनधर्मप्रदीपप्रणेते) आधी प्रमाण मानत नव्हते. पण नंतर त्यातील काही भाग 'प्रमाण' मानायला हरकत नाही, असे त्यांचे मत झाले आहे. म्हणून ती स्मृती प्रमाण आहेच. धर्मावरील अनेक निबंधग्रंथांमध्ये आम्हाला देवलस्मृतीतील वचने उद्धृत केलेली आढळली आहेत. ती आम्ही इथे विचारात घेत नाही. **'प्रायश्चित्ततत्व'** ग्रंथात रघुनाथभट्टांनी आणि **'प्रायश्चित्तविवेक'** ग्रंथात शूलपाणिभट्टांनी प्रत्यक्ष उद्धृत केलेली किंवा स्मृतींचा अर्थ करताना अनुवाद रूपाने स्वीकारलेली उद्धरणे येथे विचारात घेतली आहेत. अनंत कृष्णशास्त्रीचा आग्रह आहे की निबंधग्रंथामध्ये उद्धृत केलेली वचने तेवढीच प्रमाण मानावीत, इतर प्रमाण नाहीत. आमच्या मते इतरत्र आढळणारी वचनेही प्रमाण मानायला हरकत नाही. तरीही त्यांच्या मताचा आदर करूनच येथे विचार केला आहे. शूलपाणि आणि रघुनंदन भट्टांच्या म्हणण्याचा आशय असा आहे -

दासीकृतो बलान्म्लेच्छैश्चाण्डालाद्यैश्च दस्युभिः ।
अशुभं कारिताः कर्म गवादिप्राणिहिंसनम् ।।
उच्छिष्टमार्जनं चैव तथा तस्यैव भक्षणम् ।
खरोष्ट्रविड्वराहाणामामिषस्य च भक्षणम् ।।
तत्स्त्रीणां च तथा संगस्ताभिश्च सह भोजनम् ।
मासोषिते द्विजातौ च प्रायश्चित्तं विशोधनम् ।।

चान्द्रायणं त्वाहिताग्नेः पराकस्त्वथवा भवेत् ।
चान्द्रायणं पराकं वा चरेत्संवत्सरोषितः ।।
संवत्सरोषितः शूद्रो मासार्धं यावकं पिबेत् ।
मासं विप्रोषितः शूद्रः कृच्छ्रपादेन शुध्यति ।।
ऊर्ध्वं संवत्सरात्कल्प्यं प्रायश्चित्तं द्विजोत्तमैः ।
संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावं सोऽधिगच्छति ।
ह्रासो न विद्यते तस्य प्रायश्चित्तैर्दुरात्मनः ।

म्लेच्छ, चांडाळ, दस्यू यांनी बळजबरीने एखाद्याला दास बनवले, त्याच्याकडून गाय इत्यादी प्राण्यांची हिंसा अशा प्रकारे अशुभ कर्म करविले, त्यांची उष्टी भांडी घासायला लावली, उष्टें खायला लावले. गाढव, उंट, डुक्कर यांचे मांस खायला लावले, त्यांच्या स्त्रियांबरोबर संग वा भोजन करायला लावले, हे एखाद्या ब्राह्मणाला महिनाभर करायला लागले आणि तो जर अहिताग्नी असेल तर त्याने चांद्रायण किंवा पराक प्रायश्चित्त घेतले तर तो शुद्ध होतो. शूद्र जर एक वर्षभर अशा लोकांमध्ये राहिला तर त्याने १५ दिवस यावक प्यावे. महिनाभर शूद्र असा बाधित झाला असेल, तर कृच्छ्र प्रायश्चित्ताच्या एका चरणाने तो शुद्ध होतो. वर्षापेक्षा अधिक काळ तसे अधर्माचरण घडल्यास घ्यावयाच्या प्रायश्चित्ताचा श्रेष्ठ ब्राह्मणांनी विचार करावा. चार वर्षे त्या अधार्मिक लोकांमध्ये राहिल्यास तो त्यांच्यासारखाच होतो. प्रायश्चित्ताने दुष्टाचे पाप नष्ट होत नाही. येथे सांगितल्याप्रमाणे म्लेंच्छाचांडाळादींनी अग्निहोत्र न करणाऱ्या ब्राह्मणाला उष्टे खाणे, गाढव, उंट, डुक्कर यांचे मांस खाणे, म्लेच्छ स्त्रीसंग किंवा तिच्याबरोबर जेवणे इत्यादी दुष्कर्म एका महिन्यापर्यंत बळजबरीने करून घेतले तर त्याने 'प्राजापत्य' हे प्रायश्चित्त घ्यावे. जर तो अहिताग्नी असेल तर त्याने 'चांद्रायण' करावे. क्षत्रिय आणि वैश्य यांनी 'पराक' प्रायश्चित्त करावे. अग्निहोत्र नसलेल्या ब्राह्मणाने वर्षभर तसे दुराचरण केले तर त्याने चांद्रायण' करावे, इतरांनी मात्र 'पराक' करावे. शूद्राने महिनाभर तसे दासकर्म केल्यास कृच्छ्राचा एकच पाद आणि वर्षभर केल्यास १५ दिवसपर्यंत यावकपान करावे. वर्षाहून जास्त काळ गेला असेल तर त्याच्या प्रायश्चित्ताचा विचार करावा. त्याहून जास्त काळ झाल्यास म्लेंच्छच झाल्यामुळे प्रायश्चित्ताशिवायच मरण येते.

स्मृत्यर्थसारे च - पुंश्चल्यभिशस्तम्लेच्छचाण्डालदस्युभिर्बलादासीकृतानां गवादिहिंसने तदुच्छिष्टमार्जने भोजने खरोष्ट्रादिविड्वराहभक्षणे तत्स्त्रीभिः संगमे भोजने च मासोषितद्विजानां कायम् । अहिताग्नेश्चान्द्रं पराको वा । संवत्सरोपितस्य चान्द्रं पराकश्च ।

वेश्येकडे जाण्याचा आरोप असलेला म्लेच्छ, चांडाल दस्यू आदींनी जबरदस्तीने दास केलेल्या, गाईंना मारायला लावलेल्या, त्यांची उष्टी भांडी धुणे, उष्टे खाणे, गाढव, उंट, उंदीर,

डुक्कर यांचे मांस खाणे, म्लेच्छ स्त्रीशी संग, तिच्याबरोबर जेवण या गोष्टी महिनाभर केल्यास 'काय' प्रायश्चित्त घेणे. तो आहिताग्नी असेल तर त्याने चांद्र किंवा पराक प्रायश्चित्त करावे. अशा ठिकाणी वर्षभर राहिल्यास चांद्र किंवा पराक प्रायश्चित्त घ्यावे.

याबाबतीत हा विचार करायला हवा - हे शूलपाणि आणि रघुनंदन भट्टांचं मत आहे की, बारा वर्षांपेक्षा जास्त काळ प्रायश्चित्त घ्यायची वेळ आली तर ते मरणापर्यंतचे प्रायश्चित्त ठरते, त्यात व्यवहार्यता नाही. चार वर्षांच्या अधर्माचरणासाठी १२ वर्षांचे प्रायश्चित्त योग्य नाही. एक वर्षभर संसर्ग झाल्यास चांद्रायण वा पराक प्रायश्चित्त सांगितले असेल तर चार वर्षे अधर्माचरणाला त्याच्या चार पट प्रायश्चित्तच घेणे योग्य ठरेल. त्या चौपट प्रायश्चित्ताचा काळ तीन वर्षे एवढाच असू शकेल, बारा वर्षे ही फारच दूरची गोष्ट. आपस्तम्बादींनी सांगितलेल्या तीन वर्षांच्या मोठ्या प्रायश्चित्तासाठीच 'संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावं सोऽधिगच्छति!' चार वर्षे अधर्माचरण झाल्यास तो त्यांच्यासारखाच होतो, असे सांगितले आहे असे मानावे.

ब्राह्मण स्त्रिया किंवा शूद्र स्त्रिया यांचा स्वेच्छेने वा बलात्काराने म्लेंच्छाशी संबंध आल्यास वा भोजन केल्यास देवल प्रायश्चित्त सांगतात -

म्लेच्छान्नं म्लेच्छसंस्पर्शौ म्लेच्छेन सह संस्थितिः ।
वत्सरं वत्सरादूर्ध्वं त्रिरात्रेण विशुध्यति ।
योषा गर्भं विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः ।
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा वर्णेतरा च या ॥
अभक्ष्यभक्षणं कुर्यात् तस्याः शुद्धिः कथं भवेत् ।
कृच्छ्र सांतपनं शुद्धिर्धृतैर्योनेश्च पाचनम् ॥
असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते ।
अशुद्धा सा भवेन्नारी यावच्छल्यं न मुञ्चति ॥
विनिःसृते ततः शल्ये रजसो वाऽपि दर्शने ।
तदा सा शुध्यते नारी विमलं काञ्चनं यथा ॥
स गर्भो दीयतेऽन्यस्मै स्वयं ग्राह्यो न कर्हिचित् । इति।

म्लेच्छांचे अन्न, त्यांचा स्पर्श, त्यांच्याबरोबर राहणे, हे एक वर्षापर्यंत वा त्याहून अधिक काळ झाल्यास तीन रात्री प्रायश्चित्त घेऊन मुक्त होतो. म्लेच्छापासून स्वेच्छेने वा अनिच्छेने कोणत्याही वर्णाच्या स्त्रीला गर्भ राहिल्यास, तिने अभक्ष्य भक्षण केल्यास, तिची शुद्धी कशी होईल? कृच्छ्र, सांतपन यांनी शुद्धी होते. गरम तूप योनीत घालून ती भाजावी?

असवर्ण पुरुषाने स्त्रीयोनीत गर्भ ठेवला तर त्यामुळे स्त्री अशुद्ध होते - पोटातला गर्भ पडून जात नाही, तोपर्यंत ती अशुद्धच राहते. गर्भ काढून टाकल्यावर किंवा रजोदर्शन झाल्यावर शुद्ध सोन्याप्रमाणे स्त्री शुद्ध होते. तो गर्भ इतरांना द्यावा, स्वतः कधीच घेऊ नये (?) हे सर्व स्पष्ट असल्यामुळे त्याचे विवरण केले नाही.

सिंहावलोकन न्यायाने हा निष्कर्ष निघतो तो असा - एका वर्षाहून अधिक काळ अधर्माचरण झाल्यास मग ते स्वेच्छेने असो वा बळजबरीने -

नऊ महिने कृच्छ्र प्रायश्चित्त अतिदेश व्यवस्थेप्रमाणे घ्यावे. इथे हे लक्षात घ्यावे, की ३६० दिवस सहभोजन झाल्यासच पतितत्व येते. तेवढी भोजने एका वर्षाच्या काळात शक्य आहेत. क्वचित जर तेवढ्या संख्येच्या भोजनांचा खूप काळ/दिवस मधे जाऊनही प्रायश्चित्ताचा निर्णय झाला नाही तर त्याच्या मताचा आदर करून आधी सांगितलेले प्रायश्चित्त घ्यावे. सतत अनेक वर्षे म्लेच्छ स्त्रीचा संग, भोजन इत्यादी प्रकारे संसर्ग आला असता आपस्तंबाने सांगितलेले - १२ वर्षांच्या व्रताला समांतर असे सहा वर्षांचे प्रायश्चित्त घ्यावे. ते १८० गायींच्या दानाच्या बरोबरीचे असते.

हे फक्त ब्राह्मणांच्या बाबतीतच आहे, इतर वर्णीयांसाठी नव्हे. क्षत्रियाला ब्राह्मणाच्यापेक्षा अर्धे, वैश्याला १/३ आणि शूद्राला १/४ प्रायश्चित्त अपेक्षित आहे. कश्यपाचे मत आहे -

विप्रार्धं क्षत्रियस्योक्तं तदर्धं वैश्यजातिषु ।
तदर्धमेव शूद्राणां प्रायश्चित्तं विदुर्बुधः ॥
विप्रे तु सकलं देयं पादोनं क्षत्रिये स्मृतम् ।
वैश्येऽर्धमेकपादस्तु शूद्रजातिषु शस्यते ॥

चतुर्विंशतिमते - प्रायश्चित्तं यदाम्नातं ब्राह्मणस्य महर्षिभिः ।
पादोनं क्षत्रिये कुर्यादर्धं वैश्यः समाचरेत् ॥
शूद्रः समाचरेत्पादमशेषेष्वपि पाप्मसु ।

ब्राह्मणाला जेवढे प्रायश्चित्त सांगितले असेल त्याच्या अर्धे क्षत्रियाला, त्याच्या निम्मेच वैश्याला आणि त्याच्याही अर्धे प्रायश्चित्त शूद्राने घ्यावे असे शहाणे, जाणते लोक म्हणतात. हे खूपच कमी प्रायश्चित्त सांगणारे विधान आहे. वृद्धविष्णू म्हणतो - ब्राह्मणाला पूर्ण प्रायश्चित्त, त्यात एक पाद कमी (३/४) क्षत्रियाला, वैश्याला अर्धे आणि शूद्राला १/४ प्रायश्चित्त योग्य आहे. **'चतुविंशतिमत'** ग्रंथात सर्वच पापांच्या बाबतीत ब्राह्मणाला महर्षींनी जे प्रायश्चित्त सांगितले, त्यापैकी एक पाद कमी क्षत्रियाला, अर्धे वैश्याला आणि शूद्राने १ पाद (१/४) प्रायश्चित्तच स्वीकारावे. चातुर्वर्ण्यावर आधारित हा जो दोष सांगितला त्यात तथ्य आहे. संसर्गाचा दोष सर्वच मानवांना लागू शकतो. **'संसर्ग याति मानवः'** - कोणाही माणसाला संसर्ग होऊ शकतो ही उक्ती कोणा विशेष वर्णासाठी नाही, असे वचन आहे. हे लक्षात घेऊनच शूद्रांनाही प्रायश्चित्त सांगितले आहे. शूद्राला जर एका वर्षाहून अधिक काळ पापसंसर्ग झाला तर दोन महिन्यांचे कृच्छ्र प्रायश्चित्त घ्यावे लागेल. अनंत कृष्णांचे मत स्वीकारूनही १९२ दिवस उच्छिष्ट भोजने झाल्यासच बारा वर्षे प्रायश्चित्त शूद्राला घ्यावे लागेल. तेवढ्या संख्येने भोजनांबद्दल निर्णय न झाल्यास प्रायश्चित्त घेतलेल्या शूद्राला वाळीत टाकता येणार नाही.

अतिदेशाने-नियमाची व्याप्ती वाढवून केलेला निर्देश - अर्ध प्रायश्चित्त इ. वर जो अनेक

वेळा उल्लेख आहे त्यातील तर्क, प्रामाण्य काय?

अतिदेश तीन प्रकारे होतो - वचनावरून, सरूपतेमुळे आणि साम्यातून. याज्ञवल्क्य वचनाचा अतिदेश असा करतो - **यागस्थक्षत्रविड्घाती चरेद्ब्रह्महणि व्रतम् ।** यज्ञ करीत असलेल्या क्षत्रिय, वैश्य यांचा वध करणाऱ्याला ब्रह्मघ्नाचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. तद्भूतायुक्त अतिदेश असा आणि पुढे साम्यामुळे सांगितलेला अतिदेश असा जाणावा -

पितुः स्वसारं मातुश्च मातुलानीं स्नुषामपि ।
मातुः सपत्नीं भगिनीमाचार्यतनयां तथा ।
आचार्यपत्नी स्वसुतां गच्छंतु गुरुतल्पगः ।
गुरूणामध्यधिक्षेपो वेदनिन्दा सुहृद्वधः ।
ब्रह्महत्यासमं ज्ञेयमधीतस्य च नाशनम् ॥

जो कोणी पित्याची वा आईची बहीण, मामी, सून, आईची सवत, बहीण, आचार्यांची कन्या, आचार्यांची पत्नी किंवा स्वत:ची मुलगी यांच्याशी संग करणारा 'गुरूपत्नीशी संग करणाऱ्यासारखाच' पापी मानावा.

साम्यामुळेच अतिदेश असा-गुरूचा अपमान, वेदनिंदा, मित्रवध यांना ब्रह्महत्येप्रमाणे जाणावे. त्याचे ज्ञानही त्यामुळे नष्ट होते.

येथे साम्याने अतिदेश असेल तर अर्धे आणि तादृप्य किंवा वाचनिक अतिदेश असेल तिथे एक चरण कमी म्हणजे ३/४ प्रायश्चित्त घ्यावे, असे प्रायश्चित्तमयूखकारादि म्हणतात. अतिदेशांच्या ठिकाणी अशा कल्पनांचे प्रमाण पातकांबद्दलचा अर्थवाद हेच आहे. (पातकांची निंदाच अपेक्षित आहे.)

अंगिरसः - **पातके तु सहस्रं स्यान्महत्सु द्विगुणं भवेत् ।**
उपपापे तुरीयं स्यान्नरकं वर्षसंख्यया ॥
विष्णुरपि - **अतिपातकिनः पच्यन्ते कल्पं मन्वन्तरं महापापिनः ।**
अनुपातकिनश्चतुर्युगमिति ॥

अंगिरस म्हणतात - पातक केल्यास हजार वर्षे नरकात राहावे लागेल. मोठ्या पापाला त्याच्या दुप्पट वर्षे, उपपातकासाठी त्याच्या एकचतुर्थांश वर्षे नरकात राहावे लागेल.

विष्णूही म्हणतो - अतिपातकी नरकात एक कल्पपर्यंत तर महापातकी मन्वंतरापर्यंत आणि उपपातकी चार युगे नरकात ताप भोगतात. म्लेच्छ स्त्रीकडे जाणे हे गुरुपत्नीकडे जाण्यासारखे, म्लेच्छान्नभक्षणाची पुनरुक्ती ही मद्यपानासारखी. या साम्ययुक्त अतिदेशामुळे अर्धे प्रायश्चित्त घेऊन पुरते. अतिदेशातही पूर्ण प्रायश्चित्त घेणे, खोटी गुरुनिंदा, अध्ययनाचे विस्मरण, बारा वर्षे प्रायश्चित्ताची प्राप्ती या गोष्टी खूपच तर्कविसंगत ठरतील.

पतितांच्या संततीचा विचार

अनंतकृष्णशास्त्री यांना पतिताच्या पुत्राचा पित्याच्या मूळ जातीत प्रवेश त्या जातीतील

लोकांशी सर्व प्रकारचा व्यवहार मान्य नाही.

पतितपुत्रः पतितो भवत्यन्यत्र स्त्रियः, सा हि परगामिनी तामरिक्थामुपेयात्। या विधानाने वसिष्ठ म्हणतात - पतिताचा मुलगा पतित होतो – मुली सोडून. मुलगी दुसऱ्याकडे जायची असते. तिचे पैतृक संपत्तीचा वाटा न देता लग्न करून द्यावे. त्यावर याज्ञवल्क्यांचे वचन आहे. **कन्यां समुद्वहेदेषां सोपवासामकिञ्चनाम।** यांच्या उपवास करणाऱ्या, निष्कांचन मुलाशी विवाह करावा.

या याज्ञवल्क्यवचनाचा अर्थ असा - पतितावस्थेत उत्पन्न झालेल्या पतितांच्या मुलीने जर प्रायश्चित्त म्हणून उपवास केला आणि पित्याकडून वस्त्र- अलंकार- धन इ. काही स्वीकारले नाही तर तिच्याशी लग्न करावे. पतिताशी संबंध न ठेवणाऱ्या मुलीशी **'कन्यां समुद्वहेत्'** म्हणजे स्वतः विवाह करावा. पतित व्यक्तीकडून कन्येचे दान घेऊ नये. यातून पतितांशी योनीसंबंधाला प्रतिषेध करणारा विरोधही टाळता येतो. हाच आशय वृद्धहारीताने असा स्पष्ट केलाय.

पतितस्य तु कुमारी विवस्त्रामहोरात्रोपोषितां प्रातः शुक्लेनाहतेन वाससाऽऽच्छादितां नाहमेतेषां न ममैते त्रिरुच्चैरभिदधानां स्वगृहे वोद्वहेत्।

पतिताच्या कुमारी कन्येला विवस्त्रावस्थेत एक दिवस रात्र उपवास करून सकाळी धुतलेल्या शुभ्र वस्त्राने गुंडाळून तिने 'हे माझे नाहीत, मी यांची नाही' असे तीन वेळा म्हटल्यावर तिला स्वत:चे घरी आणून तिच्याशी लग्न करावे. .... **'एषां कन्यां समुद्वहेत्'** यांच्या मुलाशी लग्न करावे म्हणजे मुलगी सोडून पतिताच्या इतर अपत्यांशी संबंध ठेवण्याचा प्रतिबंधच सुचवला आहे. येथे विज्ञानेश्वराचे 'सोपवासाम्' या शब्दाचे संसर्गाला अनुरूप काळापर्यंत प्रायश्चित्त घेतल्यावर' हे व्याख्यान योग्य नाही. तसे म्हटले तर हरिताच्या **'अहोरात्रोपोषिताम्'** - १ दिवसरात्र उपवास केलेल्या या पदाचा अर्थ लागणार नाही. संसर्गकालोचित प्रायश्चित्त हे केवळ 'अहोरात्रोपोषण' एवढेच असणे अशक्य आहे. त्याहून अधिक प्रायश्चित्त - कृच्छ्रादींचा इतर संबंधात उल्लेख केला आहे. यातून हे सिद्ध होते की, पतिताची मुलगी सर्वप्रकारच्या व्यवहाराला अधिकारी होऊ शकते.

याचे प्रतिविधान असे आहे - या विषयात स्मृतिशास्त्रात दोन प्रकार आढळतात - प्रायश्चित्त न घेणाऱ्यांना व आमरण प्रायश्चित्त घेणाऱ्यांना उद्देशून बौधायन म्हणतात -

बौधायनः - अथ पतिताः समवयास धर्माँश्चरेयुरितरेतरयाजका इतरेतराध्यापका मिथो विवहमानाः पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मभ्यमेवमार्यान्संप्रतिपत्स्यथेति। अथापि न सेन्द्रियः पतति तदेतेन वेदितव्यमङ्गहीनो हि साङ्गं जनयेन्मिथ्यैतदिति हारीतो दधिधानीसधर्माः स्त्रियः स्युर्यो हि दधिधान्यामप्रयतं पय आतच्य मन्थति न तच्छिष्टा धर्मकृत्येषूपयोजयन्ति, एवमशुचि शुक्लं यन्निवर्तते न तेन संप्रयोगो विद्यते।

पतितांनी एकत्र येऊन ठरवून धर्माचरण करावे, परस्परांकडे जाऊन यज्ञ, अध्ययन,

अध्यापन, परस्पर विवाह करावेत. पुत्रांना निर्माण करून म्हणावे -

येथे प्रथम पतितांच्या पुत्रांचा आर्यांसह सर्वप्रकारे व्यवहार होण्यासाठी प्रथम पतितांनी स्वपुत्रांचा त्याग केला पाहिजे, असे म्हणून हारीतमताशी विरोधी मत मांडले आहे. आपस्तम्बानेही दोषी-पापी असतील त्यांना आमरण प्रायश्चित्त घेण्यास पात्र असलेल्यांना उद्देशून म्हटले – **पुत्रान्संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मदेवं ह्यस्मत्स्वार्याः संप्रत्यपत्स्यथेति ।**' पुत्रांना निर्माण करून त्यांना विप्रांकडे पाठवून आर्य करून घ्यायची विनंती करावी. इत्यादी प्रकारे बौधायनाप्रमाणे हारीतमत मांडून उपदेश केला आहे. त्यात दोन मते दिसतात - काय निर्णय करायचा - पतिताचा पुत्र पतित होतो की नाही? हे केवळ वचनाने साधण्यासारखे नाही. पतितत्व सिद्ध होण्याचा पर्याय नाही, तर प्रत्यक्ष आचरणात काय ते सिद्धांत म्हणून सांगायला हवे. वसिष्ठ आणि हारित यांच्या मतानुसार पतिताच्या पुत्राच्या पातित्यामुळे तो आर्यांशी व्यवहाराला अयोग्य ठरत असेल तर आपस्तंब आणि बौधायन वचनाशी विरोध येतो. वयात आलेला माणूस पतित होतो हा पूर्वपक्ष किंवा सिद्धांत हारिताच्या मताप्रमाणे म्हणता येईल. ते ठीक आहे म्हटले तर **'संनिष्पाद्य ब्रूयुर्विप्रव्रजतास्मभ्यमेवमार्यान्संप्रतिपत्स्यथे'** इत्यादी वचन योग्य ठरत नाही. त्यासाठी पतिताला सांगितलेले प्रायश्चित्त घेऊन त्या पुत्रांचा आर्यांसह सर्व व्यवहाराच्या उपदेशाची सार्थकता पटवावी. पतिताचा पुत्र जन्मत:च पतित असल्यामुळे त्यांना कोणते प्रायश्चित्त/कशाला प्रायश्चित्त असे म्हणू नये, कारण लगेचच पुढे व्यवहार करता यावेत यासाठी प्रायश्चित्ताचे विधान केलेले आहे.

बौधायन म्हणतो - अशुचिशुक्लोत्पन्नानां तेषामिच्छतां प्रायश्चित्तिः पतनीयानां तृतीयोंऽशः स्त्रीणामंशस्तृतीयः ।

अर्थात पतित आणि शुद्ध अशांच्या अपत्यांना प्रायश्चित्त घ्यायची इच्छा असेल तर पतनीयांसाठी सांगितलेल्या प्रायश्चित्ताच्या १/३ (एक तृतीयांश) पतित पुत्राला व स्त्रीला प्रायश्चित्त सांगावे - त्यांच्या पुत्रांसाठी बौधायनाने त्याच अध्यायात पतिताला ३ वर्षे प्रायश्चित्त सांगितले आहे. त्याचा १/३ म्हणजे मुलाला १ वर्ष प्रायश्चित्त पुरेल. प्रायश्चित्त घेतलेले पुत्र सर्व व्यवहाराला पात्र ठरतात.

पतित पौत्राची (नातवाची) सर्व व्यवहाराला पात्रता, निषेध न केल्यामुळे सिद्ध आहे. पतिताच्या पुत्राबद्दल (वर्ण इ. भेद न मानता) हेच प्रायश्चित्त असे अनेक परंपरांच्या विरोधात जाऊनही योग्य ठरते. पतिताच्या कुळात जन्माला आलेल्यांचा विजातीय स्त्रीपुरुषांपैकी कुणाशी संकर न झाल्यास प्रायश्चित्त केल्यावर आपल्या पूर्वजातीतील लोकांसह विवाहासारखा घनिष्ठ संबंधही दोषास्पद नाही हे शास्त्राधारेच सिद्ध आहे. शिवाय ज्यांनी आमरण प्रायश्चित्त घ्यावयाचे आहे, त्यांच्या पूर्वजातीशी संबंध, व्यवहार संभवतच नाही. पण त्यांच्या पुत्रांना प्रायश्चित्त घेऊन आणि मुलींना प्रायश्चित्त न घेताच पूर्वीच्या जातीतील प्रवेशाला काही आडकाठी/हरकत नाही असे वाटते.

शुद्धीमध्ये शिष्टाचाराचे प्रमाण

भारतवर्षाच्या इतिहासात जैन, बौद्ध यांचे कुतर्काधिष्ठित, श्रुतिप्रामाण्य न मानणारे अपसिद्धांत दूर सारून श्रीमच्छंकराचार्य आणि इतर आचार्य यांनी आपल्या वेदप्रणीत सिद्धांतांबद्दल श्रद्धा निर्माण केली. बौद्ध आणि जैन पंथात प्रवेश केलेले हे पतितच याबद्दल शंकेला जराही वाव नाही. शास्त्रही त्यांच्या पतितसमत्वावरच शिक्कामोर्तब करते -

षट्त्रिंशन्मते - बौद्धान्पाशुपतांश्चैव लोकायतिकनास्तिकान् ।
विकर्मस्थान्द्विजान्स्पृष्ट्वा सचैलं जलमाविशेदिति ॥

बौद्ध, पाशुपत, चार्वाक, नास्तिक आणि अयोग्य कर्म करणारे द्विज (त्रैवर्णिक) यांना स्पर्श करून अंगावरील कपड्यांसह स्नान करावे. वडील, आजोबा या कुलपरंपरेने बौद्ध, जैन इत्यादी संप्रदायात प्रवेश केलेल्या पतितांनाही व्यवस्थित उपदेश करून स्वत:च्या वेदप्रामाण्यांच्या मतात परत घेऊन आले. त्या धर्मात जाणाऱ्यांनी पतित करणारे पाप, नास्तिकता स्वीकारली होती. द्विज वा शूद्र असूनही शास्त्राने विहित नित्य वा नैमित्तिक कर्मे ते करीत नव्हते तरीही ते सनातनधर्मीय ठरले - शिवाय विहित गोष्टी फक्त न करणेच पतनाला कारण होत नाही, हे युक्त वाटत नाही. गौतमस्मृतीत नास्तिक्याचा पतनीय गोष्टींमध्ये समावेश असल्यामुळे केवळ विहित गोष्टी न करण्यामुळेच नव्हे तर याही गोष्टीमुळे पतितत्वात फरक येत नाही - शिवाय विहित गोष्टी न करण्याने पतितत्व येतेच. त्याबद्दल मनूचे शास्त्र असे आहे.

विहितस्याननुष्ठानान्निन्दितस्य च सेवनात् ।
अनिग्रहाच्चेन्द्रियाणां नरः पतनमृच्छति ॥ (मनु.)

विहित गोष्टी केल्या नाहीत आणि निंद्य गोष्टी केल्या, इंद्रियांवर ताबा ठेवला नाही तर माणूस पतित होतो. शिवाय प्रायश्चित्तमयूखात एक वर्षपर्यंत नित्यकर्म न केल्यास काय परिणाम होतो हे विष्णुपुराणाची साक्ष काढून सांगितले आहे -

विष्णुपुराणम् - संवत्सरक्रियाहानिर्यस्य पुंसः प्रजायते ।
तस्यावलोकनात्सूर्यो निरीक्ष्यः साधुभिः सदा ।।
स्पृष्टे स्नानं सचैलं तु शुद्धिहेतुर्महामते ।
पुंसो भवति तस्योक्ता न शुद्धिः पापकर्मणः ॥
देवर्षिपितृभूतानि तस्य निःश्वस्य वेश्मनः ।
प्रयान्त्यनर्चिता यत्र कस्तस्मात्पापकृत्तमः ॥
देवादिनिःश्वासहतं शरीरं यस्य वेश्मनः ।
न तेन संकरः कार्यः सहासनपरिच्छदैः ॥

ज्या माणसाकडून वर्षभर नित्यकर्माचा ऱ्हास/लोप झाल्यास सज्जनांनी त्याचे दर्शन

झाल्यास सूर्यदर्शन करावे. हे बुद्धिमंता, त्या ब्राह्मणाला स्पर्श केल्यास कपड्यांसह स्नान करावे. त्या माणसाच्या पापाला शुद्धी नाहीच. ज्याच्या घरापासून देव, ऋषी आणि पितर निःश्वास टाकून पूजा न मिळताच परत जातात त्याच्यापेक्षा अधिक पापी कोण ? ज्याच्या घराचे शरीर म्हणजे घर देवादींच्या नि:श्वासानी युक्त असते त्यांच्या बरोबर बसणे, उठणे, वस्तु वापरणे असा संबंध येऊ देऊ नये.

येथे शूलपाणि महामहोपाध्याय म्हणतात - एक वर्षभर नित्यकर्मात खंड पडला तर तेथे ज्याला प्रायश्चित्त सांगितलेले नाही असा महापातकाचा अतिदेश म्हणजे ते महापातक असे समजावे. जर खूप वर्षे नित्यकर्म घडत नसेल तर त्याला काय प्रायश्चित्त ते विद्वानांनीच ठरवावे. प्रदीप प्रस्तावात अनंतकृष्णशास्त्री म्हणतात - बौद्ध धर्माच्या स्वीकारात फक्त विहित गोष्टी न करणे हा दोष आहे पण विरुद्धसेवन नाही. इस्लामादिधर्माच्या स्वीकारात दोन्ही प्रकारचा दोष आहे - विहित नित्यकर्मे न करणे आणि निंदित कर्मे करणे. इंद्रियांवर ताबा नसल्यामुळे माणूस पतित होतो. या तीनही गोष्टी एकत्र येऊन पतित व्हायला होते, तसे एकेका गोष्टीने होत नाही. या सर्वांचा सारांश असा - विहित कर्मे न केल्यास फक्त पाप, निंदितकर्म वारंवार केल्यास पतितत्व, बौद्धमताचे अनुकरण करणाऱ्यांनी (हिंदू धर्मातील) विहित कर्मे न केल्यामुळे पापी ठरलेल्यांना उत्तम उपदेश करून शंकराचार्यांनी आपल्या धर्मात परत घेतले हे शास्त्राच्या जाणकारांना योग्य वाटत नाही, हे आधी सांगितलेल्या वचनांवरून लक्षात घ्यावे - विहित कर्मे न केल्यामुळेही पतितत्व येऊ शकते असे वचन आहे. शिवाय बौद्धमतांना स्वीकार करणारे, गौतमाने सांगितलेले 'नास्तिक्य' हा पतनाचे कारण असणारे पतित ठरतात. (हा विचार शहाण्यांनी करावा पण) परमार्थाचे ज्ञान झालेल्या महान शंकराचार्यांशी विवाद करणे बरोबर नाही.

व्रात्यांच्या शुद्धीचा विचार

(* भारताबाहेरील देशात यवन, चीन, युरोपादी ठिकाणी राहणारे तुरुष्कादी लोक - ते म्लेच्छ. त्यांना व्रात्य क्षत्रिय मानावे - याला मनुस्मृती, महाभारत, हरिवंशादी ग्रंथ प्रमाण आहेत. म्लेच्छ शब्दाचा अर्थ ठरवताना आम्ही याचा विचार केला आहे. म्हणून तेहि व्रात्यस्तोमाने यज्ञ करून व्रात्यत्वातून मुक्त होऊन क्षत्रियत्वाला प्राप्त होतील.)

म्लेच्छांच्या संबंधामुळे आलेल्या पापाचे निराकरण करणे प्रायश्चित्तांनी शक्य आहे पण त्यांचे मत स्वीकारल्यामुळे उपनयन न झाल्यामुळे सावित्रीच्या बाबतीत पतित होऊन आलेल्या व्रात्यत्वाचा कसा प्रतिकार करावा. प्रतिकार न झाल्यास त्यांची काय व्यवस्था याबद्दल मनु म्हणतो -

आषोडशाद्ब्राह्मणस्य सावित्री न निवर्तते ।
आद्वाविंशात्क्षत्रबन्धोराचतुर्विंशतेर्विशः ॥
अत ऊर्ध्वं त्रयोऽप्येते यथाकालमसंस्कृताः।

सावित्रीपतिता व्रात्या भवन्त्यार्यविगर्हिताः ॥
नैतैरपूतैर्विधिवदापद्यपि हि कर्हिचित् ।
ब्राह्मान्यौनांश्च संबन्धानाचरेद्ब्राह्मणैः सह ॥

१६ वर्षांपर्यंत ब्राह्मणाचे, २२ वर्षांपर्यंत क्षत्रियाचे आणि २४ वर्षांपर्यंत वैश्याचे जर उपनयन झाले नाही तर योग्यवेळी संस्कार न झालेले 'सावित्रीपतित', व्रात्य आर्यांकडून निंदेला पात्र ठरतात. या अपवित्र लोकांबरोबर आपत्कालातही ज्ञान आणि योनी याबद्दलचा कोणताही व्यवहार ब्राह्मणांनी करू नये. आश्वलायन म्हणतात - यांचे उपनयन करू नये, त्यांना शिकवू नये, यज्ञ करू नयेत, इतर व्यवहारही करू नयेत. 'गोवध, व्रात्यत्व, चोरी, कर्ज परत न करणे' या वचनाने याज्ञवल्क्याने 'व्रात्यत्व' हे उपपातकांमध्ये गणले आहे. 'उपपातकांची शुद्धी चांद्रायणाने होते' या उपपातकासाठीचे सामान्य प्रायश्चित्त मान्य होईल. (हे योग्य नाही, असे आश्वलायनाला वाटते.)

मनुः - **येषां द्विजानां सावित्री नानूच्येत यथाविधि ।**
तांश्चारयित्वा त्रीन्कृच्छ्रान्यथाविध्युपनाययेत् ॥
आश्वलायनोऽपि - गवां दानेन भूम्या वा प्राजापत्यत्रयेण वा ।
चान्द्रायणेन वा शुद्धास्ते भवन्तीह सत्तमा इति ॥

मनू म्हणतो - ज्या द्विजांचे (त्रैवर्णिकांचे) विधिवत् सावित्रीचा उपदेश - उपनयन झालेले नाही, त्यांना तीन कृच्छ्र प्रायश्चित्त करवून घेऊन त्यांचे उपनयन करावे.

आश्वलायनही म्हणतात – गायीच्या वा भूमीच्या दानाने किंवा प्राजापत्य तीन वेळा आचरून किंवा चांद्रायणाने ते पूर्णपणे शुद्ध होतात. शिवाय प्रायश्चित्त का असू नये असे म्हणू नये. पिता-पितामह यांच्या परंपरेने उपनयन न झालेल्यांना प्रायश्चित्ताचा निश्चय सांगितलेला नाही. परंपरेने उपनयन झालेच नसेल तर व्रात्यत्व कसे असे म्हणू नये.

त्रिषु वर्णेषु सादृश्यादव्रतो जनयेत्सुतान् ।
तान्सावित्रीपरिभ्रष्टान्व्रात्यानार्हुमनीषिणः ॥

तीनही वर्णांमध्ये सादृश्य असल्यामुळे व्रत न केलेल्याने जर सुतांना जन्म दिला, तर त्या सावित्रीपरिभ्रष्टांना सूज्ञ लोक व्रात्य म्हणतात, असे बौधायन म्हणत असल्याने त्यांनाही व्रात्यच म्हणावे. त्यांना प्रायश्चित्त विधी सांगितलेला नाही असे म्हणू नये. कारण अनेक प्रमाणे आहेत. व्रात्यस्तोम प्रतिपादन करणारा श्रौतवचनांचा समूह प्रत्यक्ष श्रुतींचा अनुवाद करतो, त्याने पूर्ण व्रात्यता दोषाचा परिहार होतो. सामवेदाचे लाट्यायनीय श्रौतसूत्र म्हणते -

व्रात्यस्तोमैर्यक्ष्यमाणाः पृथगग्नीनाधाय यज्ञोपकरणानि चेष्ट्वा य एषामध्ययनेऽतिक्रान्ततमः स्यादभिजनेन वा तद्भावेऽपि भोगलाभेन तस्य गार्हपत्ये दीक्षेरन्भक्षाँश्चानुभक्षयेयुः १ ये के च व्रात्याः संपादयेयुस्ते प्रथमेन यजेरन् २ ब्राह्मणेनैत

उक्ता: ३ स्थाविरादपेत प्रजनना ये ते शमनी चामेद्रा: ४ यन्निरुक्तं निधनमुपेयुरितीन्द्रेति द्यौताने निधनं निराहुस्तस्य प्रतिषेधः ५ यथाम्नायमेवोपेयुः ६ उष्णौष च प्रतोदं चेत्युष्णीषं यत्तिर्यङ्नद्धं भवति व्रात्यानम् ७ धनुष्केणानिषुणा व्रात्या: प्रसेधमाना यन्ति सज्याह्नोड: ८ विपथश्च फलकास्तीर्ण इति प्राच्यरथो नास्तीर्णो विपथ: ९ कम्प्रमिश्राभ्यामश्वाश्वतराभ्यां युक्तः स्यादिति शाण्डिल्य: १० याभ्यां काभ्यां चाश्वाभ्यामश्वतराभ्यां वेति धानञ्जप्यः ११ कृष्णदशं वास इति कृष्णङ्कहमिश्रमिति शाण्डिल्य: १२ शुक्लं कृष्णदशमिति गौतम: १३ कृष्णमित्येव मन्य इति धानञ्जप्य: १४ यावविकौ द्वाभ्यामविभ्यामेकैक: क्रीतः स्यात्तयोः पार्श्वसँहिते कृष्णवलक्षे अजिने स्याताम् १५ वलक्षमिति श्वेताख्या १६ राजतो निष्कः १७ तद्गृहपतेरित्येतत्सर्वं गृहपतिराहोत्त्रयस्त्रिँशतं च १८ द्वित्रयस्त्रिँशतमिति शाण्डिल्य: १९ वलूकान्तानि दामतूषाणीतरेषामित्याविकानि लोहितप्रवाणानि वसनानि स्युः २० दामतूषाणीति दामदशानि स्युर्दशाख्या तूषामिति २१ द्वे द्वे दामनी इति द्वे द्वे एकैकस्य वसनस्य दशे स्याताम् २२ द्वे द्वे उपानहाविति कृष्णाः कर्णिन्य इति शाण्डिल्य: २३ याः काश्चेति धानञ्जप्यः २४ द्विषँहि तान्यजिनानीति पूर्वाभ्यामजिनाभ्यां व्याख्यातानि २५ तच्चेतरेषामेकैक आहरेत्त्रयस्त्रिँशच्च त्रयस्त्रिँशता गृहपतिमभिसमायन्तीति ह्याह २६ ते त्रयस्त्रिँशत ऋत्विरभ्यो दद्यु: २७ व्रातेभ्यो व्रात्यधनानि ये व्रात्यचर्यया अविरताः स्युर्ब्रह्मबन्धवे वा मागधदेशीयाय यस्मा एतद्ददति तस्मिन्नेव मृजानायन्तीति ह्याह २८ व्रात्यस्तोमैरिष्ट्वा तैविद्यवृत्तिँसमातिष्ठेयुः २९ तेषां तत् ऊर्ध्वं भुञ्जीतापि चैनान्कामं याजयेदिति ३० इति ।

व्रात्यस्तोमांनी यज्ञ करू इच्छिणाऱ्यांनी वेगळ्या अग्नींची स्थापना करावी. यज्ञीय उपकरणे मिळवावीत. व्रात्यांमधील जो वेदाध्ययनाला उत्सुक असेल वा नातेवाईकांनी बाजूला ठेवला असेल त्याला भोगाचा लाभ व्हावा म्हणून गार्हपत्य दीक्षा द्यावी. त्याच्यानंतर भक्ष्य (यज्ञशिष्ट) भक्षण करावे. १. संपन्न व्रात्यांनी प्रथम स्तोम करावा. २. ब्राह्मणाने ते सांगितले आहेत. ३. म्हातारपणामुळे जे अपत्यजननाला अक्षम आहेत ते शांत, निरीन्द्रिय. ४. जे असे स्पष्ट केले आहे - इंद्राला ते शरण जातात - द्यौताने त्यांचे निधन सांगितले आहे. त्याचा प्रतिषेध. ५. वेदात सांगितल्याप्रमाणे यज्ञ करावा. ६. तिरकं बांधलेलं पागोटं व चाबुक ही व्रात्यांची (दक्षिणा). ७. धनुष्याला लावलेला बाण व ज्याह्नोडदोरीसह देऊन (याग पूर्ण करतात). ८. आसने असलेला प्राच्यरथ किंवा आसने नसलेला विपथरथ (दक्षिणा) द्यावा. ९. त्या रथाला कापणारे घोडे वा खेचरे जोडलेली असावीत, असे शाण्डिल्य म्हणतो. १०. कोणतेही घोडे किंवा खेचरे यांनी युक्त असे धानञ्जप्य म्हणतो. ११. काळ्या दशांचे वस्त्र किंवा काळेपांढरे असे शाण्डिल्य म्हणतो. १२. पांढरे काळ्या दशावाले असे गौतम म्हणतो. १३. काळेच असे धानञ्जप्य म्हणतो. १४. जे दोन बोकड दोघांकडून घेतले असतील त्यांचे

कातडे काळेपांढरे असावे. १५ 'वलक्ष' हे पांढऱ्याचे नाव. १६. साखळी चांदीची. १७. गृहपती झालेल्या व्रात्याने या सर्व गोष्टी ३३ आणाव्यात (द्याव्यात). १८. ३३ च्या दुप्पट म्हणजे ६६ द्याव्यात असे शाण्डिल्य म्हणतो. १९. बोकडाच्या कातडीची वस्त्रे त्यांना दशांना गोडे लावलेली लाल रंगाची असावीत. २०. दशेला दोरी लावलेली. तूषा हे दशेचे नाव. २१. एकेका वस्त्राला दोन दोन दोऱ्या टोकाला असाव्यात. २२. काळे आणि कानाच्या आकाराचे दोन दोन जोडे असे शाण्डिल्य म्हणतो. २३. कोणतेही असे धानञ्जप्य. २४. द्विष अशी ती अजिने आधी सांगितली आहेत. २५. त्यातील एक एक प्रत्येकाला द्यावे. गृहपतीकडे ३३ येतात. २६. ३३ ऋत्विगांना ती द्यावीत. २७. व्रात्याचे धन व्रात्यांना, ज्यांनी व्रात्यता घालवली नाही, त्यांनी ब्रह्मबंधूंना वा मागधदेशीयांना देऊनच पापमुक्त होतो. २८. व्रात्यस्तोमाने शुद्ध झाल्यावर त्याने त्रैविद्यांची म्हणजे तीन वेद जाणणाऱ्या ब्राह्मणांची उपजीविका सुरू करावी. २९. त्यांच्यासह भोजनही करावे. त्यांच्यासाठी यज्ञही करावा-करवावा.

कात्यायन श्रौतसूत्रात एकविसाव्या अध्यायात असे म्हटले आहे.

"व्रात्यस्तोमाश्चत्वारः। द्वितीय उक्थ्यः । व्रात्ययणस्य ये संपादयेयुस्ते प्रथमेन यजेरन्। द्वितीयेन निन्दिता नृशँसाः। तृतीयेन कनिष्ठाः। ज्येष्ठाश्चतुर्थेन। अपेतप्रजननाः स्थविरास्तदाख्यास्तेषां यो नृशँसतमः स्याद्द्रव्यवत्तमो वाऽनूचानतमो वा तस्य गार्हपत्ये दीक्षेरन्। तस्य भक्षमनुभक्षयन्त आसीरन्। व्रात्यधनानि भवन्ति। तिर्यङ्नद्धमुष्णीषम्। ज्याह्रोडोऽयोग्यं धनुस्तदाख्यम्। वासः कृष्णशं कद्रु। अकृष्णं कृष्णदशं वा तदाख्यम्। फलकास्तीर्णो विपथः। अश्वाश्वतराभ्यां कम्प्राभ्यां युक्तः स्यादित्येके। निष्को राजतः। अजिने पार्श्वसहिते कृष्णवलक्षे आविके। तद्गृहपतेः। एवमेवाजिनानीतरेषाम्। १ दामतूषाणि वलूकान्तानि द्विचूडान्याविकानि वासाँसि लोहितान्तानि कृष्णान्तानि वा तदाख्यानि। द्वे द्वे दामनी उपानहौ च कर्णिन्यौ कृष्णे स्यातामित्येके। मागधदेशीयाय ब्रह्मबन्धवे दक्षिणाकाले व्रात्यधनानि दद्युः। अविरतेभ्यो वा व्रात्याचरणात्। तेष्वेव मृजानायन्तीति श्रुतेः। त्रयस्त्रिँशतं त्रयस्त्रिँशतं दक्षिणा दद्युः। द्विगुणा गृहपतिरित्येके। व्रात्यस्तोमेनेष्ट्वा व्रात्यभावाद्विरमेयुः। व्यवहार्यां भवन्ति।"

व्रात्यस्तोम चार आहेत. दुसरा उक्थ्याने संपतो. जे व्रात्यांची व्यवस्था लावत आहेत, त्यांनी पहिला याग करावा. निंदितांनी दुसरा व्रात्यस्तोम करावा, लहानांनी तिसरा तर वृद्धांनी चौथा प्रकार करावा. ज्यांना मुले होणे शक्य नाही; पण धनवान आहेत किंवा वेदवेत्ते आहेत त्यांना 'गृहपती' होण्याची दीक्षा द्यावी. त्याने भक्षण केल्यावर इतरांनी उरलेला सोमभाग घ्यावा. व्रात्यस्तोमातली दक्षिणा व्रात्याचे धन असते. तिरके पागोटे-एक दक्षिणा. ज्याह्रोड नावाची धनुष्याची दोरी न जोडलेली काठी-ही अजून एक दक्षिणा. कद्रु नावाचे काळे धागे

असलेले वस्त्र - ही पण दक्षिणा किंवा काळे नसलेले पण काळ्या दशा असलेले वस्त्र. आसने असलेला रथ. त्याला खेचर किंवा घोडे कापणारे असावेत असे काही आचार्य मानतात. चांदीची साखळी द्यावी. दोन बाजू सुस्थितीत असलेली अजाजिने-ती काळी पांढरी हवीत. हे सर्व त्या गृहपतीच्या मालकीचे असावे. अजाजिने इतर व्रात्यांच्या मालकीचीही असावीत. लाल वा काळ्या दशा, गोडे असलेली कृष्णजिने, अजाच्या कातडीची वस्त्रे, कानाच्या आकाराचे जोडे, ते काळे असावेत. मागधीय ब्राह्मणाला दक्षिणाकाळी व्रात्याच्या मालकीच्या वस्तु द्याव्यात किंवा जे आता व्रात्य नाहीत, त्यांना दक्षिणा द्यावी. ज्यांनी व्रात्यता सोडलेली नाही त्यांना ते द्यावे. त्यामुळेच ते पवित्र होतील असे श्रुती सांगते. ३३/३३ गायी दान द्याव्यात. गृहपतीने त्याच्या दुप्पट ६६ गायी द्याव्यात, असे काहीजण म्हणतात. व्रात्यस्तोमानंतर व्रात्यांनी व्रतहीनता सोडून द्यावी. मग ते सर्व सामाजिक व्यवहारांना पात्र होतात. इतर श्रौतसूत्रांमध्येही हे चार व्रात्यस्तोमच सांगितले आहेत. त्यात पहिला व्रात्यस्तोम सर्वच व्रात्यांसाठी आहे - त्यांच्यात बाह्यभेद न करता, दुसरा वगैरे पुढचे विशिष्ट कारणांसाठी आहेत.

हे सर्व व्रात्यस्तोम ताण्ड्यमहाब्राह्मणात सांगितले आहेत.

'हीना वा एते हीयन्ते ये व्रात्यां प्रवसन्ति न हि ब्रह्मचर्यं चरन्ति न कृषिं न वाणिज्यमिति। गरगिरा वा एते ये ब्रह्माद्यमन्नमदन्त्यदुरक्तवाक्यं दुरुक्तमाहुरदण्ड्यं दण्डेन घ्नन्तश्चरन्त्यदीक्षिता दीक्षितवाचं वदन्ति।'

आधीच हीन असलेले व्रात्य व्रात्याच्या मुलीशी संबंध ठेवून अधिकच हीन होतात. ते ब्रह्मचर्याचे पालन करीत नाहीत. (अध्ययन नाही) शेती करीत नाहीत, व्यापार करीत नाहीत, ते जणू विषच खातात. जे यज्ञीय वस्तु यज्ञ न करता अन्न खातात, अयोग्य नसलेल्या वाणीला अयोग्य मानतात. जो दंडास पात्र नाही, त्याला दंड देतात आणि दीक्षा घेतलेली नसताना दीक्षितांची वाणी बोलतात, इत्यादी वाक्यांनी सांगितले ते संक्षेपाने कात्यायनाच्या विधानांमध्ये प्रदर्शित केले आहे. तसेच साक्षात श्रुतीनेच व्रात्यपणा घालवण्यासाठी व्रात्यस्तोमाचे विधान केलेले असल्यामुळे सर्व व्रात्य व्रात्यस्तोम करून व्यवहाराला लायक होतात, याच्याविरुद्ध काहीही प्रमाण नाही. याज्ञवल्क्य म्हणतात -

'अत ऊर्ध्वं पतन्त्येते सर्वधर्मबहिष्कृताः।
सावित्रीपतिता व्रात्या व्रात्यस्तोमादृते क्रतोः ॥'

सावित्रीपतित म्हणजे उपनयन वेळेत न झाल्यामुळे पतित झालेले व्रात्य त्यांनी जर व्रात्यस्तोम यज्ञ केला नाही, तर (सर्व कर्तव्यांपासून दूर ठेवले जातात). या याज्ञवल्क्याच्या वचनाप्रमाणे उपनयन झालेल्या पित्याच्या पुत्राचे वेळेवर उपनयन न झाल्यास व्रात्यस्तोम करायला सांगितला आहे. पारस्कर म्हणतो -

वाय १८४-१०

'आषोडशाद्वर्षाद् ब्राह्मणस्य नातीतः कालो भवत्याद्वाविंशाद्राजन्यस्याचतुर्विंशाद्वैश्यस्यात ऊर्ध्वं पतितसावित्रीका भवन्ति नैतानुपनयेयुर्नाध्यापयेयुर्न याजयेयुर्न चैभिर्व्यवहरेयुः। कालातिक्रमे नियतवत्त्रिपुरुषं पतितसावित्रीकाणामपत्येऽसंस्कारो नाध्यापनं च तेषां संस्कारेप्सुर्व्रात्यस्तोमेनेष्ट्वा काममधीयीरन्व्यवहार्या भवन्तीन्ति वचनात्।'

सोळा वर्षांपर्यंत ब्राह्मणाचा, बावीस वर्षांपर्यंत क्षत्रियाचा किंवा २४ वर्षांपर्यंत वैश्याचा उपनयन संस्कार होऊ शकतो. तोपर्यंत न झाल्यास ते पतितसावित्रीक होतात. त्याचे उपनयन करू नये, त्यांना शिकवू नये, त्यांच्याकडे यज्ञ वा इतर व्यवहार त्यांच्याबरोबर करू नयेत. हा काल उलटून गेल्यावर तीन पिढ्यांपर्यंत उपनयन संस्कार झाला नसल्यास त्यांच्या अपत्यांचा उपनयन संस्कार, अध्यापन करू नये. जर त्यांना संस्कार करून घ्यायची इच्छा असेल तर व्रात्यस्तोम करून त्यांना खुशाल शिकवावे. इतर व्यवहारही करावेत. येथे जर लहान मुलाचा मुंजीचा काळ उलटून गेला असेल तर नेहमीप्रमाणे नियत ठराविक प्रायश्चित्त - प्राजापत्यासारखे पारस्कर सांगतात. तीन पिढ्यांपर्यंत उपनयन न झाल्यामुळे तो पतित असेल तर फक्त प्रायश्चित्ताने शुद्धी होत नाही. तिथे व्रात्यस्तोम अपरिहार्यपणे करावा लागतो, असे पारस्कर मानतो. व्रात्यस्तोमाशिवाय ना संस्कार ना अध्यापन. व्रात्यस्तोम केल्यावर अध्यापन व इतर व्यवहार करावेत. भगवान् आपस्तंब पिता इत्यादींचे उपनयन झाले नसल्यास प्रत्येक पर्यायाला अधिक प्रायश्चित्त सांगतो. पहा आपस्तम्बसूत्र -

'अतिक्रान्ते सावित्र्याः काले ऋतुं त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेत्। अथोपनयनम्। ततः संवत्सरमुदकोपस्पर्शनम्। अथाध्याप्यः। अथ यस्य पिता पितामह इत्यनुपेतौ स्यातां ते ब्रह्महसंस्तुताः। तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति च वर्जयेत्। तेषामिच्छातां प्रायश्चित्तम्। यथा प्रथमेऽतिक्रम ऋतुरेवं संवत्सरः। अथोपनयनम्। तत उदकोपस्पर्शनम्। प्रतिपूरूषं संख्याय संवत्सराप्यावन्तोऽनुपेताः स्युः। सप्तमिः पावमानीभिर्यदन्ति यच्च दूरक इत्येताभिर्यजुष्पवित्रेण सामपवित्रेणाङ्गिरसेनेति २ अपि वा व्याहृतिभिरेव ३ अथाध्याप्यः। अथ यस्य प्रपितामहादि नानुस्मर्यते उपनयनं ते श्मशानसंस्तुताः। तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति च वर्जयेत्तेषामिच्छतं प्रायश्चित्तं द्वादशवर्षाणि त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेदथोपनयनं तत उदकोपस्पर्शनं पावमानयादिभिः। अथ गृहमेधोपदेशनम् नाध्यापनम्। ततो यो निर्वतते तस्य संस्कारो यथा प्रथमेऽतिक्रमे। तत ऊर्ध्वं प्रकृतिवत्।'

सावित्री उपदेशाचा काळ टळून गेला असल्यास एक ऋतु 'त्रैविद्यक' ब्रह्मचर्य पाळावे. मग उपनयन करावे. मग एक वर्षभर 'उदकस्पर्शन' संकल्प करावे. मग तो अध्ययनास योग्य होईल. त्याला शिकवते. शिवाय ज्याचा पिता व आजोबा यांचे उपनयन झाले नसेल ते

ब्रह्महत्या करणारे मानावेत, त्यांच्याकडे जाणे, जेवण, भोजन इ. गोष्टी करू नयेत. त्यांची इच्छा असल्यास प्रायश्चित्त करावे. उपनयनाची वेळ टळल्याबद्दल एक वर्ष एका ऋतूसारखे व्रतस्थ राहावे. मग उपनयन करावे. मग व्रताचा संकल्प किंवा प्रत्येक अवयवाला पाण्याने स्पर्श करावा. मग व्रताचा संकल्प किंवा प्रत्येक अवयवाला पाण्याने स्पर्श करावा. कुळातील जेवढ्या पुरुषांचे उपनयन झालेले नाही, तेवढ्या पुरुषांच्या संख्येएवढी वर्षे 'उदकस्पर्शन' करावे. **'यदन्ति यच्च दूरक'** या सात पवमानी ऋचांनी, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेदातील मंत्रांचा व्याहृतींचा उपदेश करावा. शिवाय ज्यांच्या 'पणजोबा'चे उपनयन झाल्याचे माहीत नाही, मृतवत् मानावेत. त्यांच्याकडे जाणे, भोजन, विवाहादी गोष्टी वर्ज्य कराव्यात. त्यांची इच्छा असेल तर १२ वर्षांचे प्रायश्चित्त-त्रिविद्यांसह ब्रह्मचर्य, मग उपनयन, नंतर पावमानी ऋचांसह सर्व अवयवांना 'उदक स्पर्शनम्', मग गृहमेध - गृहयज्ञाचा उपदेश, अध्यापन नाही. प्रथम उपनयन न झालेल्याचा करावा तसा संस्कार, मग सर्व पूर्वीप्रमाणे करावे.

इथे ऋतु म्हणजेच दोन महिने. त्रैविद्यकम् म्हणजेच तीन अवयवांची विद्या. त्रिविद्या तिचे अध्ययन करणारे ते त्रैविद्य त्यांचे कर्म म्हणजेच त्रैविद्यकम्. ब्रह्मचर्य, यातील अग्निसेवा, अध्ययन आणि शुश्रूषा या तीन गोष्टी सोडून बाकीचा ब्रह्मचारीधर्म पाळावा. ज्याची वेळीच मुंज झाली नाही त्यासाठी वसिष्ठ उद्दालकव्रत सांगतात -

'पतितसावित्रीक उद्दालकव्रतं चरेद् द्वौ मासौ यावकेन वर्तयेन्मासं पयसाऽर्धमासमामिक्षयाऽष्टरात्रं घृतेन षड्रात्रमयाचितेन त्रिरात्रमब्भक्षोऽहोरात्रमुपवासश्चेति।'

योग्य वेळी उपनयन न झालेल्याने उद्दालकव्रत करावे. दोन महिने यवावर काढावेत, महिनाभर दुधावर, अर्धा महिना दुधात घातलेल्या दह्यावर राहावे.

आठ रात्री तुपावर काढाव्यात. सहा रात्री अयाचितपणे जे मिळेल त्यावर गुजराण करावी. तीन रात्री पाणी पिऊन घालवाव्यात. एक दिवस- रात्र उपवास करावा.

आपस्तम्बाने पित्याचे उपनयन झाले नसल्यास एक वर्ष व्रत करायला सांगितले आहे. पिता आणि आजोबा दोघांचेही उपनयन झाले नसल्यास दोन वर्षे व्रतस्थ राहावे लागेल. **'प्रतिपुरुषम्'** ---- या वरील विधानाप्रमाणे मागील जेवढे पुरुष उपनयनाशिवाय असतील तेवढी वर्षे मोजून व्रत करावे. काहीजण म्हणतात की स्वत:चे, पित्याचे आणि आजोबांचेही, तर २ वर्षे आणि स्वत:ही जर योग्य वेळी उपनीत झाला नसेल तर तीन वर्षे हा नियम आमच्या प्रतिपादनाशी विरोधी नाही. विरोधाचा विषय **'यस्य प्रपितामहादि'** या वाक्यात आहे. तिथे पाठभेद आहे. पहिला (उज्ज्वला टीका) **यस्य प्रपितामहादि नानुस्मर्यते उपनयनं ते स्मशानसंस्तुता:** - ज्याच्या पणजोबांचे उपनयन झाल्याचे स्मरत नाही ते अशुद्ध समजावेत. दुसरा पाठभेद **(वीरमित्रोदय) यस्य प्रपितामहादेर्नानुस्मर्यते** - ज्याचे पणजोबाचे स्मरत नाही. त्यातील आदिपदाने होऊन गेलेले की अस्तित्वात असलेले पणजोबा इ. अपेक्षित आहेत?

तीन पूर्वपुरुषांपेक्षा मागच्या पूर्वजांच्या बाबतीत ते व्रात्य असले तरी प्रायश्चित्त वा उपनयन संभवत नाही. अनेक पुरुषांपर्यंत पतित असलेले ही आमची प्रतिज्ञा बाधित होते. प्रमाणाचा अभाव असल्याने तेच आम्हाला हवे आहे म्हणाल तर तसे नाही. पणजोबा अभाव असल्याने तेच आम्हाला हवे आहे म्हणाल तर तसे नाही. पणजोबा वडील इत्यादींचा उल्लेख नसल्याला काही प्रमाण नाही - उज्ज्वला वीरमित्रोदय या प्रबंधांमध्ये 'नादिपदेन' न आदि या शब्दामुळे प्राचांच्या स्वीकाराला अनुमती देत नाहीत. पण ते प्रमाणाच्या विरोधाचा अभाव असल्यामुळे आम्ही स्वीकारत नाही. अपरार्क, मदनरत्न इ. आमचा अर्थ मानतात. मदनरत्नात म्हटलंय - ज्याच्या पणजोबापासून उपनयन झालेले नाही आणि अलीकडच्यांचेही उपनयनाचा अभाव आहे. ते सर्व स्मशानवत् अपवित्र मानावेत. अपरार्कही म्हणतो - ज्याचे पणजोबांपासून उपनयन केल्याचे स्मरत नाही, ते सर्व स्मशानाप्रमाणे अशुद्ध मानावेत. मदनरत्नात 'तथा' शब्द वापरून तर अपरार्कात् 'अर्थात्' शब्द प्रयोगाने आदिपदाने प्राचांचेच ग्रहण संभवते. तसेच जेथे उपनयन न झालेल्या पूर्व पूर्वतर पुरुषांचे स्मरण होते तेथे पुरुषांची संख्या मोजून तेवढ्या वर्षांचे प्रायश्चित्त सांगावे. परंतु जेथे पणजोबांपासून सुरूवात करून उपनयनाचे स्मरण नाही, तेथे संख्या मोजून प्रायश्चित्त घेऊन उपनयन करावे, असा आपस्तंबाचा अभिप्राय दिसतो. हा अर्थ 'न स्मर्यते' या स्मृधातूच्या स्वारस्यामुळे मिळतो. जर दुसरा अर्थ स्वीकारला तर अस्मरण पदाचा अर्थ बाधित होईल. हाच दोष अनंतकृष्णशास्त्रींनी स्वीकारलेल्या पद्धतीत येतो. महाराज जयसिंहानी दुसरी पद्धत अवलंबून आपल्या व्रात्यताशुद्धिसंग्रह ग्रंथात अनेक पुरुषांचे परंपरेने उपनयन झालेले नसले तरी प्रायश्चित्त घेऊन उपनयन करण्याची योग्यता विद्वान संग्रहसंपादकांनी प्राप्त करून दिली आहे. ग्रंथ मोठा होईल या भीतीने तो भाग येथे विस्ताराने घेतलेला नाही. आपस्तम्ब धर्मसूत्रातील वचनाचा अर्थ स्पष्ट होता तरी व्याख्याकारांनी त्यात अनेक प्रकारे विरोध केल्यामुळे तत्त्वनिर्णयाला त्यांचा उपयोग होत नाही, म्हणून मूळच्या श्रौत-सूत्रवचनांचा आधार घेऊनच सामान्यतः सर्व व्रात्यांना उद्देशून सांगितलेला व्रात्यस्तोमच व्रात्यांचे दूषण दूर करील, म्हणून याचा अधिक विस्तार केलेला नाही. तिथेच वचन आहे -

'व्रात्यस्तोमैरिष्ट्वा, त्रैविद्यवृत्तिं समातिष्ठेयुः, तेषां तत ऊर्ध्वं भुञ्जीतापि च' इति। 'त्रैविद्यवृत्तिर्द्विजानामध्ययनमिज्या दानम्' इति। कातीयवचनमपि व्यवहार्यं भवन्ति' इति।

व्रात्यस्तोमाने यज्ञ करून, त्रैविद्यांचे आचरण करावे, त्यानंतर त्यांच्याकडे जेवायलाही हरकत नाही. ब्राह्मणांची त्रैविद्यवृत्ती म्हणजे अध्ययन, यज्ञ आणि दान. कातीयाच्या वचनाप्रमाणे - व्यवहाराला पात्र होतात.

म्लेच्छांना सनातन धर्मात प्रवेश देण्याचा अधिकार

जे लोक अनेक वर्षांच्या काळात म्लेच्छ म्हणून वावरत आहेत अशांचे आईवडिलांच्या जातीचाही निर्णय झालेला नाही, अशांना आता म्लेच्छांना, सर्व मानवांना सनातन हिंदू धर्मात प्रवेश आहे की नाही अशी चिंता निर्माण होते. शास्त्र याबाबत प्रतिकूल नाही उलट अनुकूल आहे. स्मृतिशास्त्र प्रस्तावात **'वर्णांना सान्तरालानाम्'** असे वारंवार म्हटले जाते, तर चातुर्वर्ण्याबाहेरील संकरनिर्मित लोकांना सनातन धर्मात प्रवेश कसा मिळेल असे म्हणू नये. कारण सनातनधर्मशास्त्र हे मनुष्यमात्रासाठी प्रवृत्त झाले आहे. साधारण समानधर्मांना सर्वच अधिकारी आहेत. अहिंसा, सत्य, अक्रोध, दयेचे अनुपालन, पुत्र, पत्नी वगैरेंचे भरणपोषण, शुचिता इ. धर्म हे देवलादींनी सर्वांसाठी म्हणून सांगितले आहेत. तसे सांगणारे महाभागवत -

किरातहूणान्ध्रपुलिन्दपुक्कसा आभीरकङ्का यवनाः खशादयः ।
येऽन्ये च पापा यदुपाश्रयाश्रयाः शुध्यन्ति तस्मै प्रभविष्णवे नमः।।
शुचिव्रततमाः शूद्रा धार्मिका द्विजसेवकाः ।

शिवाय

आगस्त्यसंहिता - स्त्रियः पतिव्रताश्चान्ये प्रतिलोमानुलोमजाः ॥
लोकाश्चण्डालपर्यन्तं सर्वेऽप्यत्राधिकारिणः ।

किरात, हूण, आन्ध्र, पुलिंद, पुक्कस, अभीर, कंक, खश आदी जे यवन आणि अन्य जे पापी ते ज्याला आश्रयाला आल्यावर शुद्ध होतात, त्या प्रभावशाली विष्णूला नमस्कार असो. शिवाय अगस्त्यसंहिता सांगते - अत्यंत शुद्ध व्रत आचरणारे धार्मिक, ब्राह्मणसेवक शूद्र, पतिव्रता स्त्रिया, प्रतिलोमाने किंवा अनुलोमाने निर्माण झालेले चांडालापर्यंतचे सर्व येथे - वैष्णव संप्रदायात अधिकारी आहेत - कुणीही वैष्णव होऊ शकतो.

पुढे ब्रह्मोत्तरखंडात शिवपञ्चाक्षर मंत्राचा प्रारंभ करून म्हटलंय -

महापातकदावाग्निः सोऽयं मन्त्रः षडक्षरः ।
प्रणवेन विना मन्त्रः सोऽयं पञ्चाक्षरो मतः ॥
स्त्रीभिः शूद्रैश्च संकीर्णैर्धार्यते मुक्तिकङ्क्षिभिः ।
नास्ति दीक्षा न होमश्च न संस्कारो न तर्पणम् ॥
न कालनियमाश्चात्र जप्यः सर्वैरयं मनुः ।
वैश्यैः शूद्रैर्भक्तियुक्तैर्म्लेच्छैरन्यैश्च मानवैः ।

ॐ नमः शिवाय हा सहा अक्षरी मंत्र म्हणजे महापातकांच्या अरण्यातील वणवा आहे. ॐकाराशिवाय हा मंत्र पंचाक्षरी आहे. मुक्तीची इच्छा असणाऱ्या स्त्रिया, शूद्र आणि संकीर्ण जन यांनी धारण करावा. त्यासाठी दीक्षा, होम, संस्कार, तर्पण कशाची गरज नाही.

जपासाठी कोणताही विशिष्ट काळाचा नियम नाही. हा मंत्र वैश्य, शूद्र, म्लेच्छ आणि अन्य मानवांनी भक्तियुक्त होऊन जपावा. शिवाय वृद्धहारीत स्मृतीच्या सहाव्या अध्यायात 'ॐ नमो नारायणाय' असा अष्टाक्षरी मंत्र सांगून म्हटलंय -

ब्राह्मणः क्षत्रिया वैश्यास्त्रियः शूद्रास्तथेतराः ।
तस्याधिकारारिणः सर्वे ..... ॥
स्कंदपुराणे -
विष्णुभक्तिसमायुक्तो मिथ्याचारोऽप्यनाश्रमी ।
पुनाति सकलाँल्लोकान्सहस्रांशुरिवोदितः ॥
ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा यदि वेतरः ॥
विष्णुभक्तिसमायुक्तो ज्ञेयः सर्वोत्तमोत्तमः ॥
निर्दोषं विद्धि तं जन्तुं प्रभवात्परमात्मनः ।

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया, शूद्र आणि इतर सर्व त्याचे अधिकारी आहेत. शिवाय स्कन्दपुराणात म्हटलंय -

असत्याचरणी, आश्रमहीन असला तरी जो विष्णुभक्तीने भारलेला आहे तो उगवलेल्या सूर्याप्रमाणे सर्व जगाला पावन करतो. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वा इतर कोणीही जो विष्णुभक्तीत बुडलेला असेल तो सर्वोत्तमांमधला उत्तम जाणावा. परमात्म्याच्या प्रभावामुळे (परमात्म्यापासून निर्माण झालेला) तो जंतू पापमुक्त समजावा. पासष्टाव्या अध्यायात राजधर्मात सांगतात -

'यवनाः किराता गान्धाराश्चीनाः शबरबर्बराः ।
शकास्तुषाराः कङ्काश्च पह्लवाश्चान्ध्रमद्रकाः ॥
पौण्ड्राः पुलिन्दा रमठाः काम्बोजाश्चैव सर्वशः ।
ब्रह्मक्षत्रप्रसूताश्च वैश्यः शूद्राश्च मानवाः ॥
कथं धर्मांश्चरिष्यन्ति सर्वे विषयवासिनः ।
मद्विधैश्च कथं स्थाप्याः सर्वे ते दस्युजीविनः ॥
एतदिच्छाम्यहं श्रोतुं भगवंस्तद् ब्रवीहि मे।
त्वं बन्धुभूतो ह्यस्माकं क्षत्रियाणां सुरेश्वर ॥'

मांधाता इंद्राला विचारतो – हे देवश्रेष्ठा इंद्रा, तूच आम्हा क्षत्रियांचा बंधू आहेस. तूच मला सांग, की माझ्यासारख्या राजाने राज्यातल्या दस्यू इत्यादींना कसे ठेवावे. मला तुझे म्हणणे ऐकून त्याप्रमाणे करण्याची इच्छा आहे. यवन, किरात, गांधार, चीन, शबर, बर्बर, शक, तुषार, कंक, पह्लव, आंध्र, मद्रक, पौंड्र, पुलिंद, रमठ, काम्बोज आणि ब्राह्मण क्षत्रिय यांची प्रजा, वैश्य, शूद्र इ. सर्व मानव माझ्या अधिकार क्षेत्रात राहतात. त्यांनी धर्माचरण कसे करावे?

मांधात्याच्या प्रश्नाला इंद्राचे उत्तर असे आहे -

'मातापित्रोर्हि शुश्रूषा कर्तव्या सर्वदस्युभिः ।
आचार्यगुरुशुश्रूषा तथैवाश्रमवासिनाम् ।।
भूमिपानां च शुश्रूषा कर्तव्या सर्वदस्युभिः ।
वेदधर्मक्रियाश्चैव तेषां धर्मो विधीयते ॥
पितृयज्ञास्तथा कूपाः प्रपाश्च शयनानि च ।
दानानि तु यथाकालं द्विजेभ्यो विसृजेत्सदा ॥
अहिंसा सत्यमक्रोधो वृत्तिर्दायानुपालनम् ।
भरणं पुत्रदाराणां शौचमद्रोह एव च ॥
दक्षिणाः सर्वयज्ञानां दातव्या भूतिमिच्छता ।
पाकयज्ञा महार्हाश्च दातव्या सर्वदस्युभिः ॥
एतान्येवंप्रकाराणि विहितानि पुराऽनघ ।
सर्वलोकस्य कर्माणि कर्तव्यानीह पार्थिव ॥'

सर्व दस्यूंनी आईवडील, आचार्य गुरु आणि अन्य आश्रमात असलेल्यांची सेवा करावीच. राजांची सेवाही त्यांनी केली पाहिजे. वेद आणि धर्म यातील क्रिया हा त्यांचा धर्म आहेच. त्यांनी पितरांची पूजा करावी (श्राद्ध तर्पण करावे.) विहिरी, पाणपोया, विश्रांतीच्या जागा कराव्यात. ब्राह्मणांना योग्य वेळी दाने द्यावीत. वैभव मिळवू इच्छिणाऱ्यांनी सर्व यज्ञांच्या दक्षिणा द्याव्यात. अहिंसा, सत्य, राग न धरणे, उद्योग, कुटुंबधनाचे रक्षण, पत्नी मुलांचे पोषण, शुद्धता, द्रोह न करणे या गोष्टी आवश्यक आहेत. व्यवस्थित खर्च करून घरच्या अग्नीत यज्ञ करावेत. दान द्यावे. सर्व लोकांसाठी अशा प्रकारची कर्मे पूर्वकालापासून नेमून दिली आहेत. हे राजा, ती सर्वांनी अवश्य करावीतच. हे पाहता जगातील सर्व मानव शैव-वैष्णव धर्माच्या दीक्षांचे अधिकारी आहेत. सनातनधर्माचे पालन करूनच ते स्वर्ग मिळवतील वा मुक्त होतील, हे विद्वानांनी सांगितलेले उघड/प्रकट शास्त्रतात्पर्य आहे.

अन्त्यजाच्या अस्पृश्यता दोषाचा विचार

शास्त्र आणि लोकव्यवहार यात अत्यंत कठीण, हृदयाला भिडणारा हा अन्त्यजाच्या स्पर्शाचा विचार आहे. भारतात सहा कोटी अन्त्यज आहेत असे काहीजण मानतात. काहीजणांना तो आकडा जवळजवळ २ कोटी वाटतो (हा आकडा आज अर्थातच खूप जास्त आहे). ते आजही अडाणीच राहिले. त्यांनी अवनतीची अत्यंत खालची पायरी गाठली हे सर्वांनाच माहीत आहे. इस्लामधर्मीयांप्रमाणे त्यांनी कधी आर्यांच्या मर्यादांचे द्वेषाने छेदन करण्याचा प्रयत्न केला नाही. म्लेंच्छांप्रमाणे सनातन धर्माचा विध्वंस करण्याचा वाईट विचार त्यांच्या मनात जरासुद्धा आला नाही. यवनांप्रमाणे आर्यांचा अपमान करण्याच्या मत्सराने

त्यांच्या मनाने स्वप्नातही प्रवेश केला नाही. त्यांनी आजपर्यंत हीन भाव धारण करून सर्व समाजाने केलेला बहिष्कार सहन केला, दारिद्र्य हीच उत्तम गोष्ट असल्याप्रमाणे त्यांनी काळ कंठला. उष्टे, किडेमकोडे मिसळलेले कदन्न अमृताप्रमाणे मानून शरीर जगवले. फाटके तुटके कपडेही ऊन-थंडीपासून संरक्षण करणारे म्हणून श्रेष्ठ मानले. लुटारूंपासून आर्यांची उच्च वर्णीयांची घरे-शेते यांचे रक्षण केले. गावाबाहेर स्मशानातला निवासही स्वर्गाप्रमाणे मानून उच्चवर्णीयांचा मैलाही धर्म समजून वाहिला. त्या नग्न, अज्ञ, सर्वथा हीन मानल्या गेलेल्या अन्त्यजांच्या स्पर्शास्पर्श विषयाचा विचार महत्त्वाचा वाटतो.

गेल्या दीड हजार वर्षांत म्लेंच्छांनी शेकडो देवालये उद्ध्वस्त केली. तीर्थक्षेत्रे आक्रमिली, तीक्ष्ण तलवारींनी आस्तिकमूर्धन्यांची डोकी उडवली, कल्याणकार, शांत, शास्त्रप्रामाण्य प्रदूषित केले. त्यांच्या स्पर्शाबद्दल अत्यंत आस्तिक असलेल्यांच्या मनात थोडाही संशय कसा निर्माण होत नाही? धार्मिक म्हणवणारे त्यांचे दास्य करतात, त्यांच्याशी होणाऱ्या स्पर्शाचा कुणी विरोध करीत नाही - अजूनही उलट जन्माने अन्त्यजांच्या तुलनेने आलेल्या वरिष्ठत्वाचे ते समर्थन करतात. सनातन धर्मप्रदीपातील मत पाहण्यासारखे आहे. चांडाल आणि म्लेंच्छ यात हा फरक आहे. इस्लामधर्मीय म्लेच्छ हे कर्माने पतित आहेत, जन्माने नाहीत, त्यांच्या प्रतिलोम संकर नसतोच. 'शूद्राणामनिरवसितानाम्' या सूत्राच्या भाष्यात गावातून बाहेर घालवलेले नसल्यामुळे म्लेच्छयवनम् असा प्रयोग योग्य ठरतो. 'जर इस्लामधर्मीयांना गावात प्रवेश तर चांडालांना का नको' हा आधुनिकांचा आक्षेपही टिकू शकत नाही. त्रेतायुगात पतिताला गावाबाहेर शिक्षा म्हणून घालवले जाई - त्याबद्दल वचन आहे. **त्रेतायां ग्राममुत्सृजेत्**-त्रेतायुगात पतिताने गाव सोडून जावे.

कलियुगात म्लेच्छ पतितांच्या ग्रामपरित्यागाचा प्रतिषेध-निषेध केलेला नाही. याचे पूर्वीच स्पष्टपणे विवेचन केले आहे-पराशराचार्यांनी चांडालाबरोबर संभाषणाचा निषेध असल्यामुळे जातीने-जन्माने पतित झालेल्यांमध्ये कमी दोष मानणे त्यांना मान्य नाही. **'कर्तारं तु कलौ युगे'** कलियुगात कर्त्याला दोष लागतो, असे मानणारे पराशराचार्य चांडालाच्या दर्शनालाही प्रायश्चित्त सांगून धर्माने पतित झालेल्यांमध्ये कमी दोष संभवतो असे मानतात. जातिपतितत्व जास्त दोषास्पद असे ते मानत असल्यामुळे इस्लामीयांच्या उदाहरणाने चाण्डालादींच्या स्पर्शाचे समर्थन करणारे आंदोलन व्यर्थच आहे. हा सर्व विचार अविवेकावर आधारलेला आहे. विद्वानांना हे माहीत नाही का, की मुसलमानांमध्ये मुख, बाहू (ब्राह्मण क्षत्रिय) असा भेद न करता संकर होतो? अन्त्यजांचा समावेश इस्लामीयांमध्ये होतो, हे शहाण्यांना कळत नाही का? मुसलमानांमध्ये विवाह, भोजन, याबाबतीत अनिर्बंध संसर्ग होतच असतो? काय हे भारतीय मुसलमान जातीने, वृत्तीने आणि वर्तनाने अन्त्यजांपेक्षाही हीन नाहीत का? मनु म्हणतो -

ते चापि बाह्यान्सुबहूंस्ततोऽप्यधिदूषितान् ।
परस्परस्य दारेषु जनयन्ति विगर्हितान् ॥
यथैव शूद्रो ब्राह्मण्यां बाह्यं जन्तुं प्रसूयते ।
तथा बाह्यतरं बाह्यश्चातुर्वर्ण्ये प्रसूयते ॥
प्रतिकूलं वर्तमाना बाह्या बाह्यतरान्पुनः ।
हीनाहीनान्प्रसूयन्ते वर्णान्पञ्चदशैव तु ॥

तेही बाहेरच्या अनेकांना, अधिक दोषी असलेल्यांना, निंद्य जनांना परस्परांच्या पत्नींपासून जन्म देतात. ब्राह्मणीपासून शूद्र पुरुष (चातुर्वर्ण्यभिन्न) बाह्याला जन्म देतो. तसेच चातुर्वर्ण्यात बाह्यतराला जन्म मिळतो. बाह्यातून बाह्यतरातून पुन्हा प्रतिकूल असलेले, हीन अहीनांपासून १५ वर्णीय निर्माण होतात.

प्राचीन आणि आधुनिक अशा बहुसंख्य स्पृश्य हिंदूंनी जर अन्त्यजांहून निकृष्ट अशा म्लेच्छांचा स्पर्श सहन केला तर त्यांना अन्त्यजांचा स्पर्श का चालू नये, त्यांचा काय अपराध ? 'म्लेच्छांचा स्पर्श अयोग्य नाही' असे मानणाऱ्या स्पृश्य हिंदूंच्या डोक्यावर केवळ अन्त्यजांचा स्पर्श टाळल्यामुळे काय क्षेमकर पुण्याचा उदंड वर्षाव होणार आहे का? धर्म-अधर्म उत्तम प्रकारे जाणणाऱ्यांनी अवश्य सांगावे - जे म्लेच्छस्पर्श सहन करतात, त्यांना केवळ अन्त्यजाचा स्पर्श होऊ न दिल्यामुळे असे कोणते पुण्यफल मिळणार आहे? जर अन्त्यजांचा स्पर्श सनातन धर्माभिमान्यांमध्ये दोष निर्माण करणारा असेल असे आजही आपण मानत असू तर ते सनातन धर्म सोडून निश्चितच इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करतील. जे खरोखर मित्रांची बाजू घेणारे असतील ते न तोडता येण्याजोगे, शत्रुत्वच स्वीकारतील, (अन्त्यज शत्रू होतील तसे होऊ नये म्हणून) आपद्धर्म म्हणून देश आणि काल यांचा विचार करून त्यांचा स्पर्श टाळू नये, त्यात दोष पाहू नये असाच विचार विवेक करायला हवा.

महाभारते - अधर्मो यत्र धर्माख्यो धर्मोऽधर्मो भवत्युत ।
कारणाद्देशकालस्य देशः कालः स तादृशः ॥

महाभारतात म्हंटलंय - तसा देश आणि तसा काळ पुढे आला तर त्या देशकालांमुळे अधर्म धर्म ठरतो आणि धर्म हाच अधर्म ठरतो. या भीष्मवचनाचा विचार करून अन्त्यजस्पर्शापेक्षाही हीनतर असा म्लेच्छस्पर्श जर आम्ही सहन केला आहे तर आता अन्त्यजस्पर्शाला टाळायला नकोच. वैयक्तिक अर्थ, काम यांनी प्रेरित होऊन, प्रेम आणि क्रोध यांनी कलुषित झालेल्या ब्राह्मण कुळांत जन्माला आलेल्या सनातनधर्मीयांनी म्लेच्छांच्या राज्यात निवास किंवा त्यांची सेवा सोडलेली नाही. आपद्धर्म म्हणून डोळे मिटून ते सर्व निभावून नेतात, त्याबद्दल चर्चा केलेलीही त्यांना खपत नाही. अन्त्यजाचा स्पर्श हा सामाजिक विषय आहे. समाजातील लोकांच्या क्षेमकुशलाशी तो संबद्ध आहे.

म्लेच्छसेवा इ. गोष्टी मात्र त्यांच्यापेक्षा अधार्मिक आहेत. आम्ही अनेक सनातनधर्मीय ब्राह्मणकुळात जन्मलेले लोकही लगेच पतन घडवून आणणारी अनेक कर्मे उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारतो. उदाहरणार्थ - शिजवलेल्या अन्नाची विक्री (खाणावळ इ.), मीठ, दूध, तीळ, गंध, रेशीम, लोकर यांचा विक्रय, सोनाराचे काम, सेवा इ.इ. म्लेच्छादींबरोबर अध्ययन अध्यापन संबंधानेही लगेच पतित व्हायला होते. खूप वर्षांपर्यंत नित्य नैमित्तिक क्रियांचा लोप केल्यामुळे पतितांचा नेहमीच संकर आपल्या समाजात प्रत्यक्ष अनुभवाला येत असूनही त्याबद्दल विचार होत नाही. वरवर पाहता धर्मशास्त्राने निषिद्ध केलेली कर्मे वारंवार घडत असलेली दिसत असूनही, ऐहिक आणि पारलौकिकदृष्ट्या पतन घडवणारी असूनही त्यांचा त्याग करणे समाजाला शक्य होत नाही. मग जो पतनाला कारणीभूत होत नाही त्या अन्त्यजस्पर्शानेच असा काय अपराध केलाय ? शिवाय शास्त्राने द्रव्यशुद्धीबद्दल विचार मांडताना सर्व संबंधांचा विचार करूनच शुद्धी करावी असे सांगितले आहे.

देवल: - **जातिशक्तिगुणापेक्षं सकृद्बुद्धिकृतं तथा ।**
अनुबन्धादि विज्ञाय प्रायश्चित्तं प्रकल्पयेत् ॥

देवल- जाति, शक्ती, गुण यांचा विचार करून, संबंधाचा विचार करून, एकदाच बुद्धिपूर्वक प्रायश्चित्त ठरवावे.

याज्ञवल्क्य: -देशं कालं वय: शक्तिं पापं चावेक्ष्य यत्नत: ।
प्रायश्चित्तं प्रकल्प्यं स्याद्यत्र चोक्ता न निष्कृति: ॥

याज्ञवल्क्य - देश, काल, वय, बळ, प्रयत्नपूर्वक पाप जाणून प्रायश्चित्त ठरवावे, त्याला पर्याय/अपवाद असू नये.

देवल: - **प्रायश्चित्तं यथोद्दिष्टमशक्यं दुर्बलादिभि: ।**
कार्यो ह्यनुग्रहस्तेषां लोकसंग्रहकारणात् ॥

देवल - दुर्बल व्यक्तींना शास्त्राने सांगितलेले प्रायश्चित्त घेणे अशक्य असेल तर लोकसंग्रहासाठी त्यांच्यावर कृपा करावी (त्यांचे प्रायश्चित्त कमी कडक करावे). इत्यादी वचनांना अनुसरून देशकाल आणि लोकसंग्रहाचा विचार करून अस्पृश्य स्पर्श दोषास्पद न मानता स्वीकारावा. अस्पृश्यांचा स्पर्श टाळू नये.

सार्वजनिक उत्सव, जलाशय, सभागृह इत्यादी ठिकाणी शास्त्रच स्पर्शदोषाचा अपवाद सांगते.

अत्रि: - **देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च।**
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ।

अत्री: - देवांच्या यात्रा, विवाह, यज्ञसमारंभ, उत्सव इत्यादी ठिकाणी स्पर्श-अस्पर्श असा निर्बंध नसावा. हा नियम प्रसूतिकाळातील स्पर्श करण्यासाठी आहे असे मानू नये,

कारण ते प्रकरण वेगळे आहे - हे अन्त्यजस्पर्शाविषयी आहे.

आदित्येऽस्तमिते रात्रावस्पृश्यं स्पृशते यदि ।
भगवन्केन शुद्धिः स्यात्तते ब्रूहि तपोधन ॥

सूर्य मावळल्यावर अस्पृश्याला स्पर्श केला तर तो कशाने शुद्ध होतो. हे तपोधना, भगवंता तुम्ही सांगा. येथे उत्तरादाखल वरील वचन अत्रीने सांगितले. (आनंदाश्रम मुद्रित अत्रिसंहिता पाहावी.)

तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे राष्ट्रविप्लवे ।
आपद्यपि च काष्ठायां स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

तीर्थ, विवाह, यात्रा, युद्ध, राष्ट्रावरील आपत्ती यांची पराकाष्ठा झाली असता स्पृश्यास्पृश्यता बाळगू नये, हे वचन येथे प्रमाण मानावे. हे प्रसूतिकालीन अशौच म्हणून निबंधकारांनी त्याची वेगळी व्यवस्था केलेली असल्याने प्रस्तुत विषयाशी त्याचा विरोध येत नाही.

स्मृतितत्त्वग्रंथात, प्रायश्चित्तविवेक प्रकरणात याचा चांडालादींच्या स्पर्शाशी संबंध आहे. स्मृत्यर्थसारातही सामान्य स्पर्श-अस्पर्श विचाराच्या उपसंहारात याचा अनुवाद केला आहे. तसेच -

संग्रामे हट्टमार्गे च यात्रादेवगृहेषु च ॥
अग्न्युत्पाते महापत्सु स्पृष्टास्पृष्टिर्न दुष्यति॥

युद्धात, राजमार्गात, यात्रा, देवमंदिर, आग लागणे, मोठ्या आपत्ती या बाबतीत स्पर्शास्पर्श दोष लागत नाही.

वीरमित्रोदयाच्या आह्निकप्रकाशात म्हंटलंय -

वृद्धशातातपः - **अन्त्यैरपि कृते कूपे सेतौ वाप्यादिके तथा ।**
तत्र स्नात्वा च पीत्वा च प्रायश्चित्तं न विद्यते ॥
तथाऽऽपस्तम्बः - **म्लेच्छादीनां जलं पीत्वा पुष्करिण्यां ह्रदेऽपि वा।**
जानूर्ध्वं तु शुचि ज्ञेयमधस्तादशुचि स्मृतम्॥

वृद्धशातातप - अन्त्यांनी कूप, वाणी किंवा सेतू निर्माण केला तरी तिथे स्नान करून, पाणी पिऊन प्रायश्चित्त घ्यावे लागत नाही. शिवाय आपस्तम्ब म्हणतो - म्लेच्छादींचे पुष्करिणी किंवा ह्रदातील जल पिऊन, गुडघ्यांच्या वर शुद्ध जाणावे, त्याखाली अशुद्ध समजावे.

तसेच जलाशयात, सभेत, देवालयात अन्त्यजांचा स्पर्श बाधक ठरत नाही हे सामाजिक क्षेमकुलाचा विचार करून उद्घोषित करूया. आता ही गहनशास्त्रचर्चा पुरे !

भारतीयधर्मेतिहासतत्वम्

(संस्कृत)

बडोदानगर्यां प्राच्यविद्यापरिषदः पुरस्तात्
पठनार्थं निबद्धः

भारतीयधर्मेतिहासतत्वम्

(ऐतिहासिकपद्धतेर्मीमांसापद्धतेश्चैकमेवफलितं तत्वम्)

जोशी: भा
१५ ५२
१८९२



लेखकः

तर्कतीर्थः लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रधानसंपादकः धर्मकोशः, वाई

प्रधानाचार्यः प्राज्ञपाठशाला, वाई

जि. सातारा ।

भारतीयधर्मेतिहासतत्वम्

(ऐतिहासिकपद्धतेमीमांसापद्धतेश्च फलितमेकं तत्वम्)

भारतभूर्धर्मजननीति प्रथितं यशोस्या बहोःकालादारभ्य भूमंडले । विद्यमानसंस्कृतिषु प्राचीनतमासंस्कृतिर्भारतीयानामितिसंप्रतिपद्यंतेइतिहासविदः।अतिप्राचीनतयाऽपरिसंख्येय-संप्रदायमूलतया सांख्यप्रकृतिवदनियतापरिमितरूपधारितया सुदीर्घतमकरालकालाघातेनापि अविनश्यदवस्थामधितिष्ठंती प्रख्यातप्रज्ञैः सुनिपुणैर्विभाव्यापि अनिर्धारितप्रारंभसमयेयं संस्कृतिः सनातनधर्मेतिपदं धत्ते। अत्र धर्मशब्देन च न केवलं पारलौकिकं कर्मानुष्ठानमौपासनं वाभिधीयते, किंतु यत्किंच पुरुषार्थचतुष्टयसाधनीभूतं वैयक्तिकेष्टसाधनत्वेन वा समाजोपकारकत्वेन वा भूतहितानुरोधित्वेन वा परलोकपरत्वेन वा समादरणीयं क्रियाजातं समाविज्ञान (Sociology) प्रतिपाद्यं, तत्सर्वं धर्मपदेन प्रतिपाद्यते। वर्णाश्रमाचाराः,व्यवहारः, प्रायश्चित्तानि, देवतोपासनाः, व्रतानि, अर्चाप्रकाराः, देशजातिकुलधर्माः, मांगलिका अभिचारिकाश्च क्रियाः, इष्टापूर्तदानानि, दण्डनीतिः, सत्याहिंसादयः परमधर्माः, तीर्थयात्राः, मोक्षघर्माश्च धर्मपदजन्य-धी- विषयभावं भजंते । एतत्सर्वं क्रियाजातं मंत्रब्राह्मणात्मकेषु विविधशाखाभिन्नेषु वेदेषु, उपनिषत्सु, श्रौतस्मार्त गृह्यसूत्रात्मके कल्पे, मन्वाद्युपनिबद्धस्मृतिषु, पुराणेष्वुपपुराणेषु च, पांचरात्रपाशुपतशाक्ताद्यागमेषु, असहायमेधातिथिविश्वरूपविज्ञानेश्वरा-द्युपनिबद्धनिबंधेषु प्राकृतभाषाग्रंथेषु च निरूप्यते ।

अस्य सनातनधर्मशास्त्रस्याध्ययनरीतेर्द्वैविध्यं परिदृश्यते । मीमांसापद्धतिरैति-हासिकपद्धतिश्चेति । पूर्वमीमांसाकारासहायविश्वरूपभारुचिमेधातिथिविज्ञानेश्वराद-यो धर्मनिबंधकाराश्च मीमांसापद्धतिमध्यासते । आधुनिकाःपाश्चात्यवैदुषीविभूषिता विद्वांसश्चैतिहासिकसरणिमनुसरंति । तयोश्च पर्यालोचनपरिपाटिमूलसिद्धांतयोर्विरोध एव स्फुटमनुभूयते|

परतंत्रप्रज्ञानां श्रद्धालूनां धर्ममनुतिष्ठासूनां साधारणजनानां मध्ये धर्मप्रतिष्ठोद्देशेन धर्मशास्त्रव्याख्याने प्रवृत्ताः प्राचीनाचार्या मीमांसापरिपाटेरुपष्टंभकानिमान् प्रधान सिद्धांतानाचक्षते ।

(क) तेहि मंत्रब्राह्मणोपनिषद्रूपस्य वेदस्यापौरुषेयत्वमनादित्वं स्वतः प्रामाण्यमनधिगतावाधितार्थावेदकत्वं पुरुषार्थपर्यवसायित्वं च साधयंति।

(ख) कल्पसूत्राणां धर्मसूत्राणां स्मृतीनां विधिनिषेधात्मकेतिहासपुराणवाक्यानामागमानां धर्मबुध्यानुष्ठीयमानानां परंपराप्राप्तशिष्टाचाराणां च वेदमूलकत्वं वेदवत्प्रामाण्यं च मन्वते।

(ग) संप्रत्युपलब्धवेदशाखास्वनुपलब्धानां स्मृतिपुराणागमोक्तविधिप्रतिषेधानामलौकिकपदार्थानां चोच्छिन्नो वा प्रच्छन्नो वा विप्रकीर्णो वा वेदो मूलमितिकल्पयंति।

(घ) सर्वेषां वेदवाक्यानां परस्परं विरोधः, स्मृतिसूत्रपुराणागमानां वा

परस्परं विरोधो न पारमार्थिकः, आपाततः स भासमानोऽपि वा मीमांसान्यायविवेकेन विभाव्य परिहर्तुं शक्यः, इत्याहत्य कथयंति। एकवाक्यतैव सर्वस्यास्य शब्दप्रमाणसंदोहस्य परमार्थतोऽन्वेष्यमाणोपपद्यते इति घंटाघोषमुद्घुष्यंति । एकवाक्यतारीतिं त्वेवं प्रदर्शयंति तुल्यबलविरोधे विकल्पः, विकल्पश्च शाखाभेदेन देशकाललाघवगौरवादिविषयभेदेन वा व्यवस्थापनीयः । अव्यवस्थितो वा पुरुषेच्छातंत्रो भवति । वेदस्मृत्योर्विरोधे स्मृतीनां न वास्तवमप्रामाण्यं किंत्वननुष्ठानमनुकल्पत्वं वाभ्युपगम्यते। वस्तुतस्तु 'आनर्थक्यप्रतिहतानां विपरितं बलाबलमितिन्यायमनुरुंधाना निबंधकाराः स्मृतीनां विशेषविषये व्यवस्थामभ्युपयंति। अविरोधे तु प्रकरणसाम्ये गुणोपसंहारन्यायेन सर्वशाखाप्रत्ययन्यायेन सर्ववेदांत प्रत्ययन्यायेन वाऽन्यया वा विधया समुच्चयमभिप्रयंति। सर्वत्र पूर्वोत्तरमीमांसयोः समन्वयतत्वमधिष्ठाय धर्माचार्यैर्धर्मशास्त्रवाक्यकदंबतात्पर्यं निरणायिषत।

आधुनिकाश्चेतिहासिकाः पुरुषबुध्यैकशरणा नैतां परिपाटिमनुरुंधते। न वा वेदानामपौरुषेयत्वमबाधितानधिगतार्थावदेकत्वं वा मृष्यंते। तेच मन्वते — पुरुषमतिप्रभवाणि सर्वाणि धर्मशास्त्राणि देशकालपरिस्थितिपुरुषमतिवैश्वरूप्येण वैविध्यं विरोधं न्यूनाधिकभावं च भजंते नैकवाक्यताम् । तत्तद्देशकालपरिस्थितिपुरुषमतिवैचित्र्यमनुसृत्यैव निखिला वेदाः, सर्वाणि सूत्राणि, विभिन्नाः स्मृतयः, अष्टादश पुराणानि, आगमप्रस्थानभेदाः समुद्भवंतिस्म। विभिन्नदेशकालीनैः पुरुषैः परस्परानपेक्षेणापि विरोधेनापि प्रवर्त्तिता धर्ममार्गाः, इति का कथा एकवाक्यतायाः।

इत्येवं विधामैतिहासिकानां मीमांसापरिपाटिमनुरुंधतां पूर्वाचार्याणां च विप्रतिपत्तिमालोच्य, संदेहदोलामधिरोहति चेतो जिज्ञासूनाम् । विविधविद्यावदातचेतसां

प्राचीननवीनविदुषां मध्ये वैदिकसनातनधर्मशास्त्रपर्यालोचनप्रवृत्त्योर्विरुद्धदिक्क्रियतया कंचिदप्यंशमनुरुध्यैकमैदंपर्यं समधिगम्येत न वेति शंकते चेतः । तामेतां शकां निरसितुं, विरुद्धयोः परस्परप्रतिद्वंद्विनोरपि ऐतिहासिकमीमांसकपरिपाठ्योरेकमेवफलितं तत्वं गवेषयितुं च प्रयतामहे ।

पूर्वमीमांसकैर्धर्मशास्त्रविचारमूलतयाऽऽवेदितं समन्वयतत्वमैतिहासिकैरसमंजसमित्यतत्वमिति परित्यज्यते । ते हि प्रत्यवतिष्ठंते——विचित्रमतिप्रभवाणि भिन्नदेश कालपरिस्थित्यनुबंधीनि हि शात्रण्येकवाक्यभावमनुभवितुं नार्हंति । तथाच निदर्शनम्—कर्मयोगपरेशोपनिषदः कर्मसंन्यासपरबृहदारण्यकश्रुत्या समन्वयो न घटते । तेजोबन्नत्रयात्मसृष्टिप्रतिपादिकायाः छांदोग्यश्रुतेः पांचभौतिकत्वप्रतिपादकया तैत्तिरीयश्रुत्याऽविरोधः कथं संगंस्यते । न च पशुयागप्रधानस्य यजुर्वेदस्य पशुयागदोषमुपदिशतां भागवतादिपुराणानां च परस्परं विरोधो न समुन्मिषतीति वक्तुं युक्तम् । न वा नियोगविधिमुपदिशतो गौतमसूत्रस्य तन्निषेधं ब्रुवत्या मनुस्मृत्या सहैकवाक्यतां संपादयंतो निबंधकारास्तत्वपक्षपातिन इति श्रद्धेयम् । शैवाद्यागमानां तामसत्वं निरयपर्यवसायित्वं च वदतो वैष्णवशास्त्रस्य शैवागमैरेकवाक्यतैवेति वदंतः सत्यानुगाभिन इति भावयितुं कथं केनापि प्रेक्षवता पार्येत इत्यादिविधया विचारप्रणाल्या आधुनिकैर्मीमांसापद्धतिर्दूष्यते । मीमांसाकाः खलु धर्मग्रंथानां समन्वयं साधयितुमैतिहासिकाश्च विरोधं निर्णेतुं प्रयतंते ।

तत्र तावदैतिहासिकसरणिमनुगम्यैवात्र विचार्यते मीमांसादर्शनं खलू ख्रिस्ताब्दात् पूर्वत एव प्राप्तप्रगल्भभावमास्ते । ''तुल्यबलविरोधे विकल्पः अविरोधेच समुच्चयः, अतुल्यबलयोश्च न्यूनाधिकबलत्वेन मुख्यकल्पत्वानुकल्पत्वे'' इत्यादिरूपं समन्वयतत्वं गौतमापस्तंवादयः ख्रिस्ताब्दात् पूर्वतना एव धर्मसूत्रकाराः समर्थयंति स्म । भगवान् जैमिनिरेव स्वतोऽपि प्राचीनतरान् बादरिप्रभृतीन् बहुन् मीमांसकान् नाम्ना निरदिशत । तथा चानेकसहस्रसंवत्सरात्मककालाभोगव्यापि मीमांसादर्शनं भारतीयेतिहासविद्भिः कथमुपेक्षणीयम् । तस्यापि दर्शनस्य धर्मेतिहासघटनायां महान् प्रभाव आसीदिति ऐतिहासिकैश्चिंतनीयम् । यद्यपि वेदानामपौरुषेयत्वमनधिगताबाधितार्थग्राहकत्वं, त्रैवर्णिकपरिगृहीतस्मृतिपुराणागमानां वेदैकमूलकत्वं वेदानुवादकत्वं च न युक्तिसहमितिहासतत्वप्रतिषिद्धं चेति तत्परित्यज्यताम् । तथापि सर्वमिदं वेदापौरुषेयत्वादि सिद्धांतजातं यदर्थमुररीक्रियते

मीमांसकमूर्धन्यैः, तत् समन्वयतत्वं भारतेतिहासकारकसामग्रीनान्तरीयकमेवेतीतिहासतत्व-विद्भिर्दृष्टिपथान्नापाकरणीयम् । सर्वोप्ययं भारतीय धर्मेतिहासः समन्वयप्रवृत्तिप्रधान एव । यद्यपि यया विधया यया मर्यादया येन परिष्कारेण यैरंगैः समुपहितं समुपबृंहितं च समन्वयतत्वं मीमांसकैः, तत्तथाविधमेवेतिहासतत्वनिर्णयाय न पर्याप्तमिति मीमांसकमर्यादामतिक्रम्य, मीमांसकादृतसमन्वयेतिकर्तव्यतां च विहाय समन्वयप्रवृत्तिरेव कथं भारतीयधर्मेतिहासघटनाय प्राभवत् तदत्रैतिहासिकसरण्या विचार्यते ।

भारतीयसंस्कृतेरिदमेव महद्वैलक्षण्यं विद्यमानभारतीयेतरधर्मसंप्रदायेभ्यः संलक्ष्यते यत् समन्वयप्रवृत्तिर्नामेति । झरथुष्ट्रोत्तरं सुगतबुद्धमारभ्य वा ये धर्मसंप्रदायाः ख्रिस्तमाहंम-दादयोऽस्मिन्हीमंडले प्रावर्त्तंत; अभारतीयमानवसंदोहस्य परमार्थमार्गदर्शकाश्चाभूवन्; यैश्च सर्वं सांप्रतिकं हिंद्वितरं मानवमंडलं समाक्रांतम्, तेषां झरथुष्ट्रबुद्धकालमारभ्य संततानां संप्रदायानां स्वाम्नायेतरागमनिषेधमालंब्यैव स्वेतरसंप्रदायजघन्यत्वख्यापनेनैव प्रवृत्तिः । इतरमार्गनिषेधप्रवणाश्चैते स्वाम्नायस्वाचारस्वाचार्यमार्गेषु इतराणां संग्रहे च प्रवर्त्तते । बौद्धेतरभारतीयसंप्रदायेषु विद्यमानापीतरनिषेधप्रवृत्तिर्न प्रधानभावमध्यगच्छत् । वैदिककालमारभ्याद्य यावत् सर्वेषां चतुर्वर्णपरिगृहीतानां संप्रदायानां समकक्षतया विषमकक्षतया वाऽविरोधस्थापना यैव प्रयतितं भारतीयैरिति कथा प्रथिता सनातनधर्मेतिहासस्य । शाक्यार्हतानामपि गुरवो ऋषभदेवबुद्धादयो भगवदंशत्वेनानुमता भागवतादिषु पुराणेषु । तथा चात्र भारतीयधर्मेतिहासोपयुक्तसमन्वयसरणेः स्वरूपं सोदाहरणं विधापंचकेन प्रविभज्य ऐतिहासिकदृष्ट्यैव निरूप्यते न मीमांसकरीत्या

(१) स्वातंत्र्येण परस्परनैरपेक्ष्येण समुत्पन्नानां संप्रदायानां समुच्चयः, आंशिक-विरोधपरिहारश्चेति प्रथमः प्रकारः । तत्रोदाहरणानि यथा सोमयागप्रधानो ऋग्वेदः पशुयागप्रधानो यजुर्वेदः सत्रप्रधानश्च सामवेदः, ऋग्वेदे हि पशुयागाम्नानं क्वाचित्कमेवोपलभ्यते । तत्र तत्र सोमयागप्रतिपादकानां यागसामान्यसंबंधिनां वा ऋचां बाहुल्येन श्रूयमाणत्वात् । "ऋचि साम गीयते" (जै. उ. ब्रा.) इति साम्नः साक्षादृगधिष्ठानत्वेन ऋक्सामयोः प्रतिपाद्यमानैकैव संस्कृतिरित्यभ्युपगंतव्यम् । सामगानां पंचविंशब्राह्मणे च सत्राण्येव प्राधान्येन विधीयंते इति सोमयागसत्रविषयकौ ऋक्सामौ एकः संप्रदायः प्रतीयते । पशुयागश्च प्रधानतया समुपवर्ण्यते

यजुर्वेदे । तथाच पाशुकप्रधानयागपुरस्कारेणोपदिष्टो याजुर्वैदिको धर्मः सोमयागप्राधान्येन विहितो ऋग्वेदधर्मश्चेतिसंप्रदायपृथक्त्वं वेदत्रयीसंमेलनप्राक्कालीनमित्यघ्यवसेयम् । अधुना समुपलभ्यमानाश्च ऋग्वेदसामवेदसंहिता ब्राह्मणानि च सोमयागप्रधानानां पाशुकप्रधानानां च विभिन्नप्रस्थानानां कालवशात्संसर्गेणात्यंतं संनिकर्षेण च समुपजातसौहृदानामैक्यस्थापनोत्त्-रकालीना एव । सोमयागप्रधानयाज्ञिकसंप्रदायस्य ऋग्वेदोपबृंहितस्य, यजुर्वेदोपस्कृतस्य पाशुकसंप्रदायस्य च त्रैवर्णिकशिष्टपरिग्रहरूपप्रामाण्यकारणतौल्यात् समकक्षतया त्रेताग्निसाध्यकर्मसमवायित्वं संपादितमिति विद्यात्रितयसमुच्चयः प्रथममभूदिति 'त्रैविद्य' इति संज्ञा निरूढिमगमत् । विद्यात्रयसंमेलनपूर्व तु याजुर्वैदिकं हौत्रं पृथगेवासीत्, तच्चाद्यत्वेप्युपलभ्यते यजुर्वेदे एव । अद्य यावच्च याजुषहौत्रवादो जागर्ति महाराष्ट्रे ।

तत्रचाश्वलायनः—तद्ये के च छांदोग्ये वाध्वर्यवे वा हौत्रामर्शाः समाम्नाता न तान् कुर्यादकृत्स्नत्वाद्धौत्रस्य । (आश्व. श्रौ . ८/१३) ऋग्वेद-नैरपेक्ष्येणैव हौत्रं निर्वर्तनीयमित्यत एव पृथघ्घौत्रं यजुर्वेदे समाम्नातमासीत् त्रयीसंमेलनानंतरं च पृथघ्घौत्रस्यानवकाश इति वेदभेदेन हौत्रमाध्वर्यवमौद्गात्रं च व्यवस्थापयन् त्रयीविदः सर्वेषामैक्यसंपादनाय । त्रैविद्यानामाजानसिद्धैक्ये तु यजुर्वेदाम्नतः पृथघ्घौत्रोपदेशो वैयर्थ्यमापद्यते । अत एव चाद्यत्वेऽपि त्रैविद्यानां न देशैक्यमुपलभ्यते । कश्चित् प्रांतो बाहुल्येन ऋग्वेदिब्राह्मणाधिष्ठितः, कश्चित् यजुर्वेदिब्राह्मणबहुलः, कश्चित् सामवेदिप्रधानइति त्रैविद्यानां समवायो न सामंजस्येन दृश्यते कस्मिन्नपि प्रांते । त्रैविद्यानामाथर्वणिकेभ्यः पृथग्भावलिंगानि चाद्यत्वेपि त्रय्यां स्फुटतया प्रतियमानानि आथर्वणिकमार्गस्य त्रयीबाह्यत्वमनुप्रापयंति । बहुषु स्थलेषु त्रयीग्रंथेषु अथर्ववेदं वेदोत्पत्तिपरिगणनाद्यवसरे न सममिव्याहरंति (श. ब्रा. ११-५-८-३। १०-४-२-२५ । ९-३-३-१४ । १-१-४-३ । कौषीतकि. ६-१२ । जै. ऊ. १-१९-२ । ऐ. ब्रा. ५-३२ । तै. ब्रा. ३-१२-९-१ । १-२-१-२६ तै. सं. ६-५-१०-३ । "वेदैरशून्यस्त्रिभिरेतिसूर्यः" (तै. ब्रा. ३-१२-९-१) "त्रयो वेदा अजायंत" (ऐ. ब्रा. ५ - ३२) अन्यच्च त्रेताग्निसाध्यकर्मणि यथा त्रय्याः समवायित्वमुपपादयितुं शक्यते न तथाथर्वणिकवेदस्य । अतएव सत्याषाढादयः श्रौतसूत्रकारा, नाथर्ववेदापेक्षां कथयंति यज्ञे । "यज्ञंव्याख्यास्यामः । सत्रिभिर्वेदैर्विधीयते ।" (सत्या. श्रौ. १-१) नच ब्रह्मत्वमथर्ववेदाधीनमिति मंतव्यम् । "अथ

केन ब्रह्मत्वमिति त्रय्या विद्ययेतिब्रुयात्" इत्यैतरेयब्राह्मणश्रवणात् । अतश्चतुर्णां होत्रादीनामृत्विजामपेक्षितस्य क्रियाकलापस्य त्रय्यैव सिद्धिर्न चतुर्थस्याथर्ववेद-स्याकांक्षास्तीति । आथर्वणिकब्राह्मणसंनिकर्षोत्तरकाले तु त्रैविद्यवृद्धैः स्वीयत्रेता-ग्निसाध्ययज्ञसंस्थायां समावेशिता आथर्वणिकाः । अथर्ववेदप्रतिपादितो हि कर्मकलाप आभिचारिकपौष्टिकमणिमंत्रौषधिसाध्यचिकित्सासंस्कारसमुदायः साधारणजनाभिलषित इति सोपि त्रयीतुल्यां प्रामाण्यपदवीं समारुहत् ।

वेदचतुष्टयसंकलनोत्तरकाले वैदिकेषु शिष्टत्रैवर्णिकेषु चतुर्वर्णेषु वा समारूढाना माचाराणां संग्रहार्थं गृह्यसूत्राणि धर्मसूत्राणि च प्राणायिषत। बहव्यः स्मृतय आचार दर्शनोत्तरकालप्रवृत्तएव। तत्र केचिदाचारा अंशतो वेदे समाम्नाताः पार्थक्येन सविस्तरमुपापादयिषत, केचित् शिष्टैः परिषत्सु समयं कृत्वा निरणायिषत, केचिच्च लोकेष्वेव धर्मबुध्यानुष्ठीयमानाः परंपराप्राप्ताः शास्त्रेषु निरबध्यंत ।

(अ.) स्मृतीनां वेदानुवादकत्वं यथा -

"वेदार्थोपनिबंधृत्वात् प्राधान्यं हि मनोःस्मृतम् ।

(बृहस्पतिः.)

वी. मि. प. प्र. पृ. २७

(आ.) वेदाभावे सामयिकाचारोपदेशकत्वं यथा---

"सामयिकाचारिकान् धर्मान् वक्ष्यामः । धर्मज्ञसमयः प्रमाणं । वेदाश्च ।"

(आपस्तंब धर्म-१-१)

इदं श्रेय इदं ब्रह्ममिदं हितमनुत्तमम् ।

लोकान् संचिंत्य मनसा ततःशास्त्रं प्रचक्रिरे ॥ (म. भा. १२।२४३)

नैतच्छ्रुत्वागमादेव तव धर्मानुशासनम्

प्रज्ञासमभिहारोयं कविभिः संभृतं मधु ॥ (म. भा. १२/१४७)

सामयिकेत्याद्यापस्तंबवचनं च हरदत्त एवं व्याचख्यौ । "पौरुषेयी व्यवस्था समयः, समयमूला ह्याचाराः समयाचाराः, एवं भूतान् धर्मान्" । परिषन्निर्णयरूपः समयश्च प्रमाणमित्यत्र संवदंति स्मृतिप्रणेतारः ।

अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादितिचेद्भवेत् ।

यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्मः स्यादशंकितः । (मनुः - १२ । १०८)

दशावरा वा परिषद्यं धर्मं परिकल्पयेत् ।

त्र्यवरावापि वृत्तस्था तं धर्मं न बिचालयेत् ॥ (मनुः १२ । ११०)

(८)

अन्यदतः परिषत्सु । (आपस्तंबधर्म १।३।११।३७) श्रुतिमूलं च—

श्वेतकेतुर्हारुणेयः पांचालानां परिषदमाजगाम । (बृः उ. **६-२)**

तथा च मेधातिथिः

अद्यत्वे य एवं विधैर्गुणैर्युक्त ईट्टशेनैव हेतुना ग्रंथमुपनिबध्नीयात् । स उत्तरेषां मन्वादिवत् प्रमाणं स्यात् । (मनुभाष्यम्. २।६) ।

(इ) त्रैवर्णिकरूढाचारानुवादकत्वं च स्मृतीनां यथा—

सर्वागमानामाचारः प्रथमं परिकल्पते ।

आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः । (म. भ.)

"देशजातिकुलधर्मान् श्रुत्यभावेब्रवीन्मनुः ।"

(वसिष्ट स्मृ. १।१७)

"तद्विदांच स्मृतिशीले ।" (गौ. ध. सू. १।२)

अत्र स्मृतिशब्दः स्मरणपर्यायः ।

"यंत्वार्याः क्रियमाणं प्रशंसंति स धर्मः । यं विगर्हंते सोऽधर्मः

(आप. १।७)

इति धर्मसामान्यलक्षणमुवाचापस्तंबः ।

"स्त्रीभ्यः सर्ववर्णेभ्यश्च धर्मशेषान् प्रतीयात् इत्येके ।"

(आ. प. २।२९)

इत्युक्त्वा आर्येषु रूढानामाचाराणां परिगणनमशक्यमितिमत्वा धर्मसामान्यलक्षण-मुक्तवानापस्तंबः 'तेषां वृत्तसादृश्यं भजेतेति । तेषां शिष्टानामित्यर्थः ।

शिष्टाचारोपनिबंद्धृत्वं स्मृतीनां मात्स्ये उक्तं—

तस्मात्स्मार्तः स्मृतो धर्मः शिष्टाचारः स उच्यते: ।

पूर्वैः पूर्वैर्मतत्वाच्च शिष्टाचारः स शाश्वत: । (मात्स्ये अ. १४५)

व्यवहारकांडस्थस्मृतिवचनानि च लोकसिद्धनियमानामेवानुवादको -- नीतिधर्म-निबंधकाराणां विज्ञानेश्वरमाधवादीनामपिसंमतम् - तथाच मिताक्षरायां - लोकसिद्ध-स्यैवानुवादकान्येव प्रायोस्मिन् प्रकरणे वचनानि । (या. २।११८)

(२) स एव संप्रदायः पुरुषमतिवैचित्र्यप्रभावेण देशकालपरिस्थितिवैलक्षण्यसामर्थ्येन वा कियताचिदंशेनान्यथान्यथाभावमधिगच्छति, तेन च संप्रदायभेदा भवंति, तेषां भेदानां संगतिस्थापनार्थं यत्नः क्रियते प्राचीनैः स द्वितीयः प्रकारः

तत्र निदर्शनानि यथा एकैव बह्वचां पद्धतिरैतरेयसांख्यायनादिशाखाभेदमधिगतवती । अनुमीयते च भेदकारणं, भिन्नदेशाधिष्ठितब्राह्मणैरध्येतृभिः प्रकारान्तरेणानुष्ठितमिति । एकैव याजुर्वेदिकसरणिः शुक्लकृष्णभेदेन प्रकारभेदमगमत् । तत्र मतभेदो वा कारणं स्यात् । सामान्यतस्तु कर्मैक्यं शुक्लकृष्णयोरनुभूयते । अंशतस्तु भेदा उपलभ्यंते तथाहि संमार्गदर्भा न दाह्या उत्करे तथैवावस्थापनीया इति शातपथीयं मतं "दाह्या " इति तैत्रिरीयकम् । "पत्न्या योक्त्रं ग्रंथिरहितं वेष्टनीयमिति शातपथीया आमनंति " ग्रंथिबद्धमेवकर्तव्यमिति " तैत्रिरीयाः पठंति "यज्जातीयकाष्ठ निष्पन्नो इध्मा संगृह्यते तज्जातीयकाष्ठानामेव परिधय कर्तव्या" इति तैत्तिरीया मन्यन्ते तद्विपरीतं माध्यंदिनीयाः श्रावयंति । चातुर्मास्ययागेपितृयज्ञाहे पितृदैवत्यो निर्वापः गार्हपत्यस्य दक्षिणां दिशमधिष्टानानुष्ठेय इति शतपथे विधीयते तद्विपरीतं 'उत्तरस्यामेव निर्वपंतीति' तैत्तिरीयैः पट्यंते । उदितानुदितहोमनिषेधविधयश्च विद्वद्भिर्ज्ञायंते एव । एतेषां शाखाभेदानामविरोधपूर्वकं समकक्षप्रामाण्यसमर्थनार्थं पूर्वाचार्यैमीमांसकैश्च बहुधा यतितम् । सर्वशाखाप्रत्ययन्यायसर्ववेदांतप्रत्ययन्यायगुणोपसंहारन्यायाश्च सर्वेषामविरोधं निर्वाहयितुमैव प्राणायिषत ।

पूर्वं कुमारिलपर्यंतं स्मृतीनां प्रामाण्यमपि गृह्यसूत्रवदेव शाखाभेदेनैवासीत् । तथाच तंत्रवार्तिकेऽभिहितम्—पुराणमानवेतिहासव्यतिरिक्तगौतमवसिष्ठशंखलिखित-हारीतापस्तंबबौधायनानां हि प्रणीतधर्मशास्त्राणां गृह्यग्रंथानां च प्राप्तिशाख्यलक्षणवत् प्रतिचरणं पाठव्यवस्थोपलभ्यते । तद्यथा गौतमगोभिलीये छंदोगैरेव परिगृहीते, वासिष्ठं बहूवृचैरेव, शंखलिखितोक्तं च वाजसनेयिभिः, आपस्तंबबौधायनीये तैत्तिरीयैरेव प्रतिपन्ने एवं तत्र तत्र गृह्यव्यवस्थाभ्युपगमादि दर्शयित्वा विचारयितव्यं, किं तानि तेषामेव प्रमाणान्युत सर्वेषाम् । (पू. मी. वा १।३।७)

अद्यत्वेऽपिच पारस्करगृह्यसूत्रं वाजसनेयिभिरेव प्रमाणीक्रियते, आपस्तंबबौधा-यनसत्याषाढगृह्यसूत्राणि कृष्णयजुर्वेदिभिरेव, न सर्वे सर्वाणि समं प्रमाणत्वेनाद्रियंते । मीमांसकैस्तु गृह्यसूत्राणां धर्मसूत्राणां च प्रतिशाखं प्रामाण्यं निरस्य सर्वचरणसाधारणं व्यवस्थापितम् । तथा च भट्टः—'तस्मात्सर्वाधिकारन्यायत्वाद्विधानस्य व्यवस्थितदेशाचारगृह्यधर्मसूत्रनिबद्धधर्माणां सर्वधर्मत्वम् ।' (१।३।७) स्मृतिचंद्रिकायां-धर्मसूत्राणांच सर्वचरणसाधारणप्रमाणत्वं सर्वे मेधातिथिविज्ञानेश्वरविश्वरूपादयो निबंध-

कारा पक्षप्रतिपक्षा प्रविमृश्यैव निःसदेहमंगीचक्रुः | गृह्यसूत्रविषये च प्रामाण्यं तथैव प्रतिशाखं व्यवस्थितं तिष्ठति न साधारणम् । तथा च कात्यायनोऽपि बह्वल्पं वा स्वगृह्योक्तं यस्य यावत्प्रकीर्तितम् । तस्य तावतिशास्त्रार्थे कृते सर्वं कृत भवेत् । (स्मृ.चं.)

(३) परस्परविरोधेन समुद्भूतानां संप्रदायानां वैकल्पिकत्वेनानुकल्पत्वेन वा संग्रहः कृतः, इति तृतीयः प्रकारो एकवाक्यतायाः । तत्र चेतिहासपुराणागमा एवं प्रधानं निदर्शनम् । इतिहासपुराणागमा हि वैदिककर्मकांडविरोधेन भक्तिमार्गतांत्रिकमार्गप्रचारार्थमेवावतीर्णानी ति न तिरोहितं विदुषाम् । तथाच हेमाद्रिः नारदपुराणस्थश्लोकानुदाहरति -

यन्न दृष्टं हि वेदेषु तत्दृष्टं स्मृतिभिःकिल ।

उभाभ्यां यत्र न दृष्टं तत्पुराणेषु गीयते ॥

व्रतपूजाप्रतिष्ठापुरश्चरणतीर्थयात्रादयोधर्माः पुराणागमेषु प्रतिपाद्यमाना न श्रुतावुपलभ्यंते । पशुयज्ञं च जुप्संते इतिहासाःपुराणानि च----

यथा पंकेन पंकांभः सुरया वा सुराकृतम् ।

भूतहत्यां तथैवैकां न यज्ञैर्माष्टुं मर्हति ॥ (भागवतम् १।८।६२)

भारते मोक्षधर्मे पितापुत्रसंवादे -

तातैतद्बहुशोभ्यस्तजन्मजन्मान्तरेष्वपि ।

त्रयीधर्ममधर्माढ्यं न सम्यक् प्रतिभाति मे ॥

विचख्युवचने च—

अव्यवस्थितमर्यादैर्विमूढैर्नास्तिकैः परैः ।

संशयात्मभिरव्यक्तैर्हिंसा स मनुवर्णिता ॥

कामकाराद्विहिंसंति बहिर्वेद्यां पशून्यथा । (म. भा. १२|२६५)

विष्णुमेवाभिजानंति सर्वयागेषु ब्राह्मणाः ।

पायसैः सुमनोभिश्च तस्यापियजनं स्मृतम् ॥

इति हिंसायुक्तयज्ञं निंदित्वा पौराणयज्ञं स्तुवंति च । "तस्माद्धिंसा न यज्ञिया" (म. भा. मोक्षधर्मे १२।२७२) इति च । व्यासस्मृतौ च तद्विपरीतमुक्तम्

अतः स परमो धर्मः यो वेदादवगम्यते ।

अवरः स तु विज्ञेयो यः पुराणादिषु स्मृतः । (वी. मि.)

पांचरात्रसांख्ययोगपाशुपतानामागमाः प्रथमं वैदिकमार्गविरुद्धमार्गप्रवर्तकाः त्रैवर्णिकशिष्टपरिग्रहसमनंतरं स्वीयं वेदसारत्वं ख्यापयंति स्म । तथा च विष्णुधर्मोत्तरे— (वी.. मि.)

निर्मितं हि मया पूर्व व्रतं पाशुपतं शुभम् ।

गुह्यादुह्यतरं सूक्ष्मं वेदसारं विमुक्तये ।

सौरशाक्तपाशुपतपांचरात्रवैष्णवशैवागमाः वस्तुतः परस्परप्रतिद्वंद्विन एवं धर्मनिबंधकारैः सांप्रतं तुल्यकक्षप्रामाण्येनादृताः । भट्टकुमारिलपर्यंतं च सांख्ययोगपांचरात्राद्यागमप्रामाण्यं शंकितमेवासीत्, तथा च दर्शिता विप्रतिपत्तिर्भट्टेन -

यान्येतानि त्रयीविद्भिर्न परिगृहीतानि लोकोपसंग्रहलाभपूजाख्यातिप्रयोजनपराणि सांख्ययोगपांचरात्रपाशुपतशाक्यग्रंथपरिगृहीतधर्माधर्मनिबंधनानि श्रुतिविरोधहेतुदर्शनाभ्यामनपेक्षणीयत्वं प्रतिपद्यते । (पू. मी. वा. १।३।२।४)

तथा च कौर्मे-

यानि शास्त्राणि दृश्यंते लोकेस्मिन्विविधानि तु ।

श्रुतिस्मृतिविरुद्धानि निष्ठा तेषां तु तामसी ।

इत्युपक्रम्याभिहितम्---

कापालं पांचरात्रं च यामलं वाममार्हतम्

एवं विधानि चान्यानि मोहनार्थानि तानि तु । (वी. मी. प. प्र.)

पत्यधिकरणे च शंकरभगवत्पादैर्वेदविरुद्धत्वमेव पांचरात्राद्यागमानामभ्यधायि-वेदविप्रषेधश्च भवति, चतुर्षु वेदेषु परं श्रेयोऽ लब्ध्वा शांडिल्यः इदंशास्त्रमधिगतवान् इत्यादिवेदनिंदादर्शनात् (उ. मी. २।२।४५)

शैववैष्णवाद्यागमाः परस्परनिंदापराः सप्रगल्भं साटोपं च परस्परागमानामश्रेयस्करत्वं निरयपरत्वं च प्रजल्पंति । तथा च पाद्मोत्तरखंडे-

मात्स्यं कौर्म तथा लैंगं शैवं स्कांदं तथैवच ।

आग्नेयं च षडेतानि तामसानि निबोधत ।

वैष्णवं नारदीयं च तथा भागवतं शुभम् ।

गारुडं च तथा पाद्मं वाराहं शुभदर्शने ।

सात्विकानि पुराणानि विज्ञेयानि शुभानि वै ।

(१२)

सात्विका मोक्षदा प्रोक्ता राजसा स्वर्गदा शुभाः ।

तथैव तामसा देवि निरय-प्राप्ति-हेतवः ।

पाद्म. उत्तर खं. ४३ अ.

पुराणगमा हि वैदिकेष्वेव त्रैवर्णिकेषु सुप्रचारं प्राप्ताः वैदिकमार्ग प्रलोपयंतिस्म । अधुना वैदिकानुष्टानं च विरलप्रचारं महता प्रयासेन क्वचिदेवोपलभ्यते। सर्वत्र च पौराणागममिकाचाराः पूजामंदिरप्रतिष्ठातीर्थयागा व्रतपुरश्चरणनामसंकीर्तनदानादिरूपाएव विजयंते । अनुष्ठाने तु पुराणागमा एव परमां प्रामाण्यपदवीमुपभुंजंति। वाङ्मात्रेण च वेदप्रामाण्यमर्चयंति त्रैवर्णिकाः। तथा चैतां प्रवृत्तिं समर्थयति वृद्धयाज्ञवल्क्यः-

सांख्यं योगः पंचरात्रं वेदाः पाशुपतं तथा ।

अतिप्रमाण्येतानि हेतुभिर्न विरोधयेत् । (वी. मि. प. प्र. पूर्वंतु स्त्री.)

शूद्रदासपतितादिभिरेवादरणीयानि तंत्राणि पुराणानि चासन् । ते एव तत्राधिक्रियंतेस्म । तथा च भागवते -

तेनोक्तं सात्वतं तंत्रं यत्ज्ञात्वा मोक्षभाग्भवेत् ।

यत्र स्त्रीशूद्रदासानां संस्कारो वैष्णवः स्मृतः ।

स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा ।

इतिभारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥

पांचरात्रभागवतसंप्रदायमुद्दिश्योक्तं कौर्मे-

स नारदस्य वचनाद्वासुदेवार्चने रतः ।

शास्त्रं प्रवर्तयामास कुंडगोलादिभिः श्रितम् ।

परस्परविरुद्धानामेतेषामागमानासमकक्षत्वेन वैकल्पिकत्वेन प्रामाण्यं समपीपदन् त्रैवर्णिकशिष्टाः ।

(४) शिष्टैर्लोकैश्च इष्टनिष्टोपपत्तिमहिंसांसत्यादि परमधर्मं लोकयात्रां च विचिंत्य पूर्वतनाशास्त्रप्राप्ता अप्याचाराः परिवर्त्यंते, नवीनाश्चाचारा विधीयंते, तेषांच प्रामाण्यं स्वीकृतं पूर्वाचार्यैर्युगभेदव्यवस्थामवलंब्येति चतुर्थी विधा एकवाक्यतायाः ।

तथा च महाभारते -

न हि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्त्तते ।

येनैवान्यः प्रभवति सोऽपरं बाधते पुनः (शां. अ. २६८)

यत्राधर्मो धर्मरूपाणि धत्ते धर्मः कृत्स्नो दृश्यतेऽधर्मरूपः ।
बिभ्रद्धर्मोऽधर्मरूपं तथा च विद्वांसस्तत्प्रपश्यंति बुध्या ॥

(उद्योगपर्व अ. २८)

न धर्मः परिपाठेन शक्यो भारत वेदितुम् ।
अन्यो धर्मः समस्थस्य विषमस्थस्य चापरः ।
आपदस्तु कथं शक्या परिपाठेन वेदितुम् ।
वेदवादाश्चानुयुगं ऱ्हसंतीतीह नः श्रुतम् । (म. भा. १२/१६०)

मनुरपि असुखोदर्कं धर्मं त्यजेदित्याह —

परित्यजेदर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ ।
धर्ममप्यसुखोदर्कं लोकविक्रुष्टमेव च ॥

लोकहितमनुसंधायैव पूर्वं शिष्टैराचाराः परिवर्तिता इत्यत्र स्थालीपुलाकन्यायेन कानिचिन्निदर्शनान्युदाह्रीयतेत्र ।

"अपत्यलिप्सुर्देवरात, पिंडगोत्रर्षिसंबंधिभ्यः" (गौतमधर्मसू. १।२)

इति गौतमबौधायनवासिष्ठादिसंमतो नियोगः

"अयंद्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः ।" (मनुः ९ । ६६)

इति नान्वमंसत साधवः ।

या पूर्वं पतिं वित्वाथान्यं विंदते पतिम् ।
पंचौदनं च तावजं ददातो न वियोषतः ।
समानलोको भवति पुनर्भुवाऽपरःपतिः । .
वासो हिरण्यं दत्वा ते यांति दिवमुत्तमाम् । अथर्व ९ । ९
पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता ।
साचेदक्षतयोनिःस्यात् पुनः संस्कारमर्हति (वसिष्ठः)

इति वेदस्मृत्यनुमतो विधवाविवाहः प्रतिषिद्धः "तां गृहीत्वा न प्रजां न धर्मं विंदेत् इति बौधायनदिभिः ।

भार्याश्चतस्त्रो विप्रस्येति गौतमादिमतं - यदुच्यते द्विजातीनां शूद्राद्यारोपसंग्रहः । नैतन्ममतमित्यादिना याज्ञवल्क्येन शूद्रापरिणयः प्रतिषिध्यते । गोमेधाश्वमेधमधुपर्कादिषु वेदस्मृतिसंमतोऽपि गोवधः ।

'गोत्रान्मातृसपिंडाद्वा विवाहो गोवधस्तथा ।
नराश्वमेधौ मद्यं च कलौ वर्ज्यं द्विजातिभिः ।'

(१४)

इति कल्पतरुधृतब्रह्मपुराणवचनानुसारान्निषेध्यते।

पितॄणां मासिकं श्राद्धमन्वाहार्यं विदुर्बुधाः।
तदामिषेण कर्तव्यं प्रशस्तेन प्रयत्नतः। (मनुः ५।१२३)

इति मन्वादिविहितं मांसश्राद्धं **"पतत्यज्ञानतः सोपि मांसेन श्राद्धकृत्तथा।"** इति बृहत्पराशरीये प्रतिविधीयते। (मांसतत्वविवेकोधृतम्)

तथा च भागवतेऽपि -

"नहृद्यादामिषं श्राद्धे न चाद्याद्धर्मतत्ववित्।"

मन्वादिभिरनुमता द्वादशपुत्राः ज्येष्ठोद्धारश्च शिष्टविगर्हितत्वेनाधुना न कर्तव्या इति मतं मेधातिथिरवोचत्। पूर्वतनैराचार्यैस्तत्तत्कालविशेषेषु सुविचार्य परिवर्तितान् धर्मान् परिगणय्यादित्यपुराणे परिगणनावसानेऽभिहितम्-

एतानि लोकगुप्त्यर्थं कलेरादौमहात्मभिः।
निवर्त्तितानि कर्माणि व्यवस्थापूर्वकं बुधैः।
समयश्चापि साधूनां प्रमाणं वेदवद्भवेत्। (स्मृतिचंद्रिका संस्कार कांड)

शुक्रनीतौराजनियुक्तस्य पंडितस्य कर्तव्यं विधीयते—

वर्तमानाश्च प्राचीना धर्माः के लोकसंश्रिताः।
शास्त्रेषु के समुद्दिष्टा विरुध्यंते च केऽधुना।
लोकशास्त्र विरुद्धा ये पंडितस्तान् विचिंतयेत्।
नृपं संबोधयेत्तत्र परत्रेहसुखप्रदैः। (११।९९, १००)

(५) शास्त्रेष्वनिबद्धानां देशजातिकुलादीनां पाषंडादीनां चाचाराः शास्त्रविरुद्धा अपि तेषां प्रमाणं, ते तथैव तैः पालनीया राज्ञा च तत्र हस्तक्षेपो न कार्यः इति स्मृतिकारैर्निबंधकारैश्चानुमन्यतेस्मेत्येषा पंचमी विधा समन्वयसरणेः।

नारदस्मृतेरसहायभाष्ये समभिहितं —

देशे देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः।
स शास्त्रार्थबलान्नैव लंघनीयः कदाचन। (१।४०)

स्मृतिचंद्रिकायां सुमंतुः—

यत्र शास्त्रगतिर्भिन्ना सर्वकर्मसु भारत।
तत्र कुलक्रमायातमाचारमाश्रयेद् बुधः।
स गरीयान् महाबाहो सर्वशास्त्रोदितादपि॥ (स्मृ. च. सं. कां. पृ. ९)

कुमारिलभट्टोवृतापस्तंबवचनं च

येषां परंपराप्राप्ताः पूर्वजैरप्यनुष्ठिताः ।

त एव तैर्न दुष्येयुराचारैर्नेतरे जनाः । (तं. वा. १ । ३ । ३)

यस्मिन् देशे य आचारः पारंपर्यकुलस्थितिः ।

तथैव परिपाल्योऽसौ यदा वशमुपागतः ॥ (याज्ञं. १ । ३४२)

तथा च विष्णुस्मृतिः —

"परदेशावाप्तौ तद्देशधर्मान्नोच्छिन्द्यात् ।"

श्रेणीनैगमपाखंडिगणानामप्ययं विधिः ।

भेदं चैषां नृपोरक्षेत् पूर्ववृत्तिं च पालयेत् । (याज्ञ. २| १९२)

पाखंडिनो ये वेदस्य प्रमाण्यं नेच्छंति । नग्नाः सौगतादयश्च । एतेषां भेदं धर्मव्यवस्थापनं नृपो रक्षेत् । इति विज्ञानेश्वरः ।

पाखंडिनैगमादीनां स्थितिः समयउच्यते ।

समयस्यानपाकर्म तद्विवादपदं स्मृतम् ।

पाखंडनैगमश्रेणिपूगव्रातगणादिषु ।

संरक्षेत् समयं राजा दुर्गे जनपदे तथा ।

यो धर्मः कर्म यच्चैषामुपस्थानविधिश्च यः ।

यच्चषां वृत्त्युपादानमनुमन्येत तत्तथा । (नारदस्मृति.)

नारदश्च समयानपाकर्माख्यं स्वतंत्रं व्यवहारविवादपदं अवैदिकानां परधर्मीयानां धर्मरक्षणकांक्षया तेषामार्थिकवृत्त्युपायस्वातंत्र्यरक्षणेच्छया च उपदिशतिस्म । यत्र खलु आधुनिकः लीग ऑफ नेशन्स् सर्वराष्ट्रसंघोपि प्रयत्नावधिं गतोऽपि न साफल्यं गछति ।

अपरिगणितानां विविधानां दीर्घकालप्रवृत्तानां ज्ञानकर्मभक्त्याचारसंप्रदायानां समन्वयाविरोधौ समुच्चित्य वा वैकल्पिकत्वेन वाऽनुकल्पत्वेन समसूचिषातां निरणायिषातां च भूयोभिरास्तिकधौरयैर्दार्शनिकप्रकांडै:, सेयं समन्वयप्रवृत्तिरेकवाक्यतापक्षपातो वा न केवलं मीमांसकसंप्रदायाचार्याणां स्वबुद्धिविलसितमात्रम् । किंतु मंत्रब्राह्मणोपनिषदितिहासपुराणागमस्मृतिशिष्टाचारलोकाचारेषु निरंतरमनुगतं कुसुमेषु सूत्रमिव वैदिककालमारभ्याद्ययावत् भारतीयधर्मेतिहासकथायामन्वेति । एतादृशसमन्वयस्य परमार्थभूतं रहस्यं ऋग्वेदादयः प्रमाणमूर्धन्या एवाविश्चक्रुः । विश्वात्मक एक एव विभुः

सर्वैर्जीवैर्विविधैरूपैर्नानाविधैः साधनैरनेकप्रकारैरुपासनैरास्तिकैर्नास्तिकैर्वा सर्वदैवाराध्यते । एकमेव सत्यं देशकालाद्युपाधिभिर्विविधैर्भावैराविर्भूतं विश्वरूपेण नटते ।

"तदुनात्येति कश्चन, तदु नात्येति किंचन" (छां.)

सर्वेषामाराध्यानामाराधनसधनानां साधकानां चैकरूप्यं मंत्रवर्णे ब्राह्मणेषु वर्ण्यते—

इद्रं मित्रं वरुणमग्निमाहु रथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।

एकं सद्विप्रा बहुधा वदंत्यग्नि यमं मातरिश्वानमाहुः । (ऋग्वेद-१।१६४।६४)

एक एवाग्निर्बहुधा समिद्धः एकः सूर्योविश्वमनुप्रभूतः ।

एकैवोषा सर्वमिदं विभात्येकं वेदं विबभूव सर्वम्ः ॥ (ऋ. ८/५/८२)

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः ।

तदेवशुक्रं तद्ब्रह्म स्ता आपः स प्रजापतिः । (शु. य. ३२।१)

"स वा एष इंद्र वैमृध उद्यन् भवति, सवितोदितोभवति,

मित्रः संगवकाले, इंद्रो वैकुंठो मध्यंदिने, समावर्तमानः

शर्व उग्रो देवो लोहितायन्, प्रजापतिरेवसंवेशेऽस्तमितः (४।१ जै. उ. ब्रा.)

तमेतमग्निरित्यध्वर्यव उपासते, सामेतिछंदोगाः एतस्मिन् हीदं सर्व समानं, उक्थमिति बहुवृचा. एष इदं सर्वमुत्थापयति, यातुरिति यातुविदः विषमितिसर्पाः, सर्प इतिसर्पविदः, ऊर्गिति देवा, रयिरिति मनुष्या, मायेत्युसुराः, स्वधेति पितरो, देवजन इति देवजनविदो, रूपामतिगंधर्वा, गंध इत्यप्सरासस्तं यथायाथोपासते तथैव भवति । तद्धैतद्भूत्वावति तस्मादेतमेवंवित्सर्वैरेवैतैरुपासीत सर्व हैतद्भवति । सर्वं हैनत्भूत्वावति ।" (शतपथ १९/५/२/२३)

सकललोकव्याकुलीभावजनकं वैमत्यं न वस्तुतत्वमधिकृत्य किंत्वापाततः प्रतीमान बहिर्भूतौपाधिकवैचित्र्यमालंब्यैवेति धर्मविद्भिरनुसंधेयः पूर्वतननां सनातनः पंथाः ।

इति शम्

प्रकाशक– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई, जि. सातारा.

मुद्रक– एम्. एन्. कुळकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.

भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्

(मराठी भाषांतर)

प्रा. डॉ. सौ. आशा रवींद्र गुर्जर

वाय १८४-१२

बडोदा येथे झालेल्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनात
वाचलेला निबंध

भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्

(ऐतिहासिक पद्धती आणि मीमांसापद्धती यांच्या
तौलनिक अभ्यासाचे फलित तत्त्व)

: लेखक :

तर्कतीर्थ - लक्ष्मणशास्त्री जोशी
प्रधान संपादक : धर्मकोश, वाई
प्रधानाचार्य : प्राज्ञपाठशाळा, वाई, जि. सातारा

बडोदा येथे झालेल्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनात वाचलेला निबंध

भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्

(ऐतिहासिक पद्धती आणि मीमांसा पद्धती यांच्या तौलनिक अभ्यासाचे फलित तत्त्व)

प्राचीन काळापासून भारत ही धर्माची जन्मभूमी आहे, ही गोष्ट पृथ्वीतलावर प्रसिद्ध आहे. आज असलेल्या संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृती सर्वांत प्राचीन आहे, असे इतिहासकारांचे प्रतिपादन आहे. अत्यंत प्राचीन असल्यामुळे, असंख्य संप्रदाय मुळाशी असल्याने, फार काळ भीषण काळाचे अनेक आघात सोसूनही नामशेष न झालेली, सांख्यांच्या प्रकृतीप्रमाणे अनियंत्रित, अपरिमित रूपे धारण करणारा तिचा आरंभकाळ, बुद्धिमान म्हणून प्रसिद्ध असलेल्यांना खूप विचारविनिमय, चिंतन-मनन करूनसुद्धा, ठरवता आलेला नाही. या संस्कृतीला 'सनातन धर्म' अशी पदवी प्राप्त झालेली आहे. येथे धर्मशब्दाने केवळ पारलौकिक कर्मानुष्ठानुरूप उपासना सांगितलेली नाही. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चारही पुरुषार्थांच्या प्राप्तीला जे उपकारक होईल, वैयक्तिक आशा आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी, समाजाच्या उन्नतीसाठी उपकारक, सर्वभूतांची हिताची काळजी घेण्यासाठी अथवा परलोक प्राप्तीसाठी ज्या ज्या समाजशास्त्रदृष्ट्या स्वीकारणीय गोष्टी, त्या सर्वांचा समावेश धर्मकल्पनेत- धर्मशब्दांत होतो. वर्ण आणि आश्रम यांचे आचार, व्यवहार, प्रायश्चित्ते, देवोपासनामार्ग, व्रते, पूजाप्रकार, त्या त्या प्रांत, जाती, कुळे यांचे परंपरागत कुलधर्म, शिव आणि अभिचारासारख्या क्रिया, इष्टापूर्त-समाजोपयोगी गोष्टींची निर्मिती दाने, अपराध्याला शासन-दंडव्यवस्था, सत्य, अहिंसा यासारखे श्रेष्ठ गुणधर्म, तीर्थयात्रा, मोक्षधर्म इ. अनेक गोष्टी धर्म-शब्दाच्या विषयपरिघात बुद्धीला जाणवतात. या सर्व क्रियाकलापांचे निरूपण वेदांपासून त्यांच्या अनेक शाखा, मंत्र, ब्राह्मणे, उपनिषदे, श्रौतसूत्रे, गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे, मनु इत्यादींनी लिहिलेल्या अनेक स्मृती, १८ पुराणे, १८ उपपुराणे, पांचरात्र, पाशुपत, शाक्त आदी आगम ग्रंथ, प्राकृत ग्रंथ तसेच असहाय, मेधातिथी, विश्वरूप, विज्ञानेश्वर इत्यादींनी लिहिलेल्या 'निबंध'-टीका इ. ग्रंथांमधून मिळते.

या सनातन धर्मशास्त्राच्या अध्ययनाच्या दोन पद्धती आहेत.

मीमांसा पद्धत आणि ऐतिहासिक पद्धत. यापैकी मीमांसा पद्धतीचा अवलंब पूर्वमीमांसाकार असहाय, विश्वरूप, भारुची, मेधातिथी, विज्ञानेश्वर इ. धर्मनिबंधकार करतात. आधुनिक पाश्चात्य विद्याभूषित विद्वान ऐतिहासिक पद्धतीचा आधार घेतात. या पद्धतींमधील त्यांच्या विचारप्रक्रियेतील फरक स्पष्ट दिसून येतो.

सर्वसामान्य माणसे विद्वानांच्या मताने आपले धर्माचरण करण्यात तत्पर असतात. अशा जनांसाठी प्राचीन विद्वान धर्माला प्रतिष्ठित करण्याच्या उद्देशाने धर्मशास्त्राचे स्पष्टीकरण करताना मीमांसा पद्धतीला पुष्टी देणारे प्रमुख सिद्धांत सांगतात.

क) प्राचीन विद्वान संहिता (मंत्र), ब्राह्मण, उपनिषदे या सर्वच वेदवाङ्मयाला अपौरुषेय, अनादि, स्वत:प्रामाण्यातून न कळलेल्या, अबाधित अर्थ कळवून देण्यास समर्थ असे वेदांना मानतात. पुरुषार्थप्राप्ती त्यातून प्राप्त होईल असे मानतात.

ख) कल्पसूत्र, धर्मसूत्र, स्मृती या ग्रंथांमधील विधिनिषेधात्मक वाक्ये इतिहास-पुराणांतील वचने, आगमाचे धर्म म्हणून आचरण केल्या जाणाऱ्या परंपरागत शिष्टाचारांचे वेदमूलकत्व आणि वेदाप्रमाणेच प्रामाण्य मानतात.

ग) सध्या उपलब्ध असलेल्या वेदशाखांमध्ये न मिळणाऱ्या स्मृतिपुराणआगमोक्तविधी किंवा प्रतिषेधांचे मूळ न सापडणाऱ्या वाक्यांचे मूळ ते हरवलेल्या, न सापडलेल्या (लपलेल्या) विखुरलेल्या वेदात असणार असे ते मानतात.

घ) सर्व वेदवाक्यांचा परस्परविरोध, स्मृती, पुराण, आगमादींमधील दिसणारा विरोध हा खरा-पारमार्थिक नव्हे, वरवर दिसून येत असला तरी मीमांसा, न्याय यांच्या विवेकातून त्याचा परिहार शक्य आहे असे एकूण सांगतात. सर्व शब्दप्रमाण संग्रहाची एकवाक्यता परमार्थतेने शोधली तर व्यवस्थितपणे लक्षात येते असे उच्चरवाने सांगतात. एकवाक्यता ते अशा रीतीने स्पष्ट करतात - तुल्यप्रमाणात विरोध असेल तर पर्याय (विकल्प) सांगतात. विकल्प शाखांमधील भेद, देश आणि कालादि सामीप्य वा दारता (लाघव, गौरव) या प्रकरणांच्या आधारावर ठरवता येतो.

अव्यवस्थित विकल्पात व्यक्तीच्या इच्छेला वाव राहतो. वेद आणि स्मृती यात विरोध आला असता स्मृती खरोखर अप्रमाण नाहीत पण अनुष्ठान (त्या त्या) कर्माचे होत नसल्यामुळे किंवा कल्पसूत्रांनी त्याला अनुसरले नाही असे कारण दाखवले जाते - स्पष्टीकरण दिले जाते. वस्तुत: 'आनर्थक्यप्रतिहतानां विपरीतं बलाबलम्' या न्यायाने निबंधकार स्मृतींची विशेष विषयांमध्ये व्यवस्था मानतात. जेव्हा श्रुतिस्मृतींमध्ये विरोध नसतो तेव्हा समान प्रकरणांमध्ये गौण गोष्टींना एकत्र आणण्याप्रमाणे, सर्व शाखांमध्ये प्रमाण मिळत असल्यामुळे, सर्व वेदांतामध्ये एकवाक्यता आढळत असल्यामुळे या ना त्या प्रकारे समुच्चयाचा अंगीकार करतात. सर्वत्र पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा यांचा समन्वय साधून धर्माचार्यांनी धर्मशास्त्रवचनांच्या समुच्चयांचे तात्पर्य निश्चित करतात.

आधुनिक इतिहासकार माणसाच्या बुद्धीचाच आश्रय करतात, तिलाच आधार मानतात. ते प्राचीनांच्या पद्धतीला मान देत नाहीत. ते वेदांचे अपौरुषेयत्व; त्यांचे पुढे येणाऱ्या । होणाऱ्या घटनांचे अर्थ लावून एकत्व दाखवण्याचे सामर्थ्य मानत नाहीत. ते म्हणतात - सर्व धर्मशास्त्रे मानवाच्या बुद्धीतूनच निर्माण झालेली आहेत. देश, काळ, परिस्थिती आणि माणसाच्या बुद्धीचे विश्वरूपत्व या सर्व भिन्नतांमुळे विविधता, विरोध, कमीजास्तपणा हा धर्मशास्त्रांमध्ये असणे हे एकवाक्यतेहून अधिक स्वाभाविक आहे. तो तो देश, काल, परिस्थिती आणि मानवी बुद्धीच्या वैचित्र्यामुळे, त्या वैविध्याला अनुसरूनच सर्व वेद, सर्व प्रकारची सूत्रं (म्हणजेच सूत्रग्रंथ), अनेक स्मृती, अठरा पुराणे, आगमप्रस्थान भेदांचे ग्रंथ निर्माण झाले.

वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या वेळी एकमेकांच्या परिचयाशिवाय स्वतंत्रपणी, विरोधासाठीही लिहिलेल्या धर्ममार्गांच्या ग्रंथांत एकवाक्यता-एकमत कोठून यायला?

ऐतिहासिक पद्धतीने अभ्यास करणारे आणि मीमांसापरंपरेने जाणारे पूर्वाचार्य यांच्यात बराच विरोध असलेला पाहून धर्माबद्दल जिज्ञासा असलेल्यांचे मन संभ्रमामुळे दोलायमान होते. विविध विद्यांच्या अभ्यासाने प्रगल्भ चित्त झालेल्या प्राचीन आणि नवीन विद्वानांमध्ये वैदिक सनातन धर्मशास्त्राचा अभ्यास दोन अगदी वेगळ्या, विरुद्ध पद्धतींनी होत असल्यामुळे एखादा तरी मुद्दा घेऊन 'हे असेच आहे' असं काही सापडू शकेल की नाही याबद्दल शंकाच वाटते. त्या शंकेचे निराकरण करण्यासाठी या विरोधी अभ्यासकांच्याही पद्धतींमधून एखादे निष्कर्षरूप तत्त्व शोधण्याचा प्रयत्न करणार आहोत. पूर्वमीमांसकांनी धर्मशास्त्र-विचाराचं मूळ म्हणून स्वीकारलेलं समन्वयतत्त्व ऐतिहासिकदृष्टीने पाहणाऱ्यांना असमंजस त्याज्य तत्त्व (!) वाटतं. त्यांचा असा दावा आहे, की वेगवेगळ्या माणसांच्या बुद्धीतून निघालेली, भिन्न-भिन्न देश-काल-परिस्थिती यांच्याशी संबंध असलेली शास्त्रवचने एकवाक्यतासूत्राने बांधताच येणार नाहीत. त्यासाठी ते उदाहरण देतात-कर्मयोग सांगणारी उपनिषदे आणि कर्म-संन्यासाचे प्रतिपादन करणाऱ्या बृहदारण्यकश्रुतीचा समन्वय योग्य नाही. छांदोग्यश्रुतीप्रमाणे सृष्टी तेज, आप, अन्न यांनी बनली आहे तर तैत्तिरीय उपनिषदात सृष्टीचे पांचभौतिकत्व सांगितले आहे. हा विरोध कसा टाळता येईल? पशुयागाचे विधान करणारा तो मुख्य मानणारा यजुर्वेद आणि पशुयागातील दोष दाखवणारी भागवतादिपुराणे यात विरोध उद्भवतच नाही असं कसं म्हणता येईल? नियोगविधी सांगणारे गौतमसूत्र आणि त्याचा निषेध करणारी मनुस्मृती या दोहोंमध्ये एकवाक्यता आहे असे मानणारे निबंधकार पक्षपाती नाहीत अशी श्रद्धा बाळगावी कशी? शैवागमाचे तामसत्व, त्याने नरकप्राप्ती असे सांगणारे वैष्णवमत शैवागमाशी सुसंगत आहे असे म्हणणारे सत्याची पाठराखण करीत आहेत असं कोणत्या शहाण्या माणसाला वाटेल? अशा प्रकारच्या विचारपद्धतीने आधुनिक विद्वान मीमांसापद्धतीला सदोष ठरवतात. मीमांसकांना समन्वय धर्मग्रंथाचा साधावयाचाच आहे

आणि आधुनिक लोक धर्मवचनांमधला विरोध निर्णायकपणे मांडू इच्छितात.

या बाबतीत ऐतिहासिक विचारसरणीचा आधार घेऊन विचार करू या. मीमांसादर्शन ख्रिस्तपूर्व काळापासूनच प्रौढत्वाला प्राप्त झाले आहे. विरोध समान बळाचा असेल तर पर्याय सांगणे, विरोध नसेल समुच्चय, वचनांमध्ये तुल्यबलता नसेल तर अधिक- उणेपणा पाहून, मुख्य कार्य आणि गौण कार्य अशा मार्गांनी ख्रिस्तपूर्वकाळातील गौतम, आपस्तंब आदी धर्मसूत्रकार समन्वयतत्त्वाचे समर्थन करीत असत. भगवान जैमिनीनेही आपल्याहून प्राचीन काळातल्या बादरी इ. अनेक मीमांसकांचा नावासह उल्लेख केला आहे. अनेक हजार वर्षांचा कालपरीघ व्यापून असलेल्या मीमांसादर्शनाची भारतीय इतिहासज्ञ कशी उपेक्षा करू शकतील? त्या दर्शनाचा धर्मेतिहासाच्या जडणघडणीत मोठा प्रभाव-वाटा होता हेही ऐतिहासिकांनी लक्षात घ्यायलाच हवे. वेदांचे अपौरुषेयत्व, त्रैवर्णिकांनी स्वीकारलेल्या स्मृति, पुराण आणि आगमग्रंथांचे वेदमूलत्व-वेदातूनच त्याची निर्मिती आणि ते वेदांचाच अनुवाद करतात या सर्व गोष्टी तर्कसंगत नाहीत, त्यांचा इतिहासतत्त्वाने प्रतिषेध केल्यामुळे त्या गोष्टी सोडून द्याव्यात. तरीही वेदांचे अपौरुषेय आदी सिद्धांत समुदाय स्वीकारला जातोय ते समन्वयतत्त्व भारताच्या इतिहासाच्या सामग्रीला बाध आणणारे नाही हे आधुनिक अभ्यासकांनी नजरेआड होऊ देऊ नये. पुरा भारतीय धर्मेतिहास समन्वयप्रवृत्तिप्रधानच आहे. आत्तापर्यंत मीमांसकांनी ज्या प्रकारे, ज्या मर्यादेत, जे संस्कार करून, समन्वयतत्त्वाला बळ दिलं, त्यांची व्याप्ती वाढवली, त्याच प्रकारे तसेच्या तसे ते इतिहासतत्त्वनिर्णयाला पुरेसे ठरणार नाही. म्हणून मीमांसकांची मर्यादा न तोडता, त्याला बाधा न आणता, समन्वय हीच इतिकर्तव्यता न मानता समन्वयप्रवृत्तीच भारतीय धर्मेतिहास रचनेला कशी उपयुक्त ठरली ते ऐतिहासिक पद्धतीनेच जाणून घ्यायचा प्रयत्न करूया.

इतर संस्कृती, धर्मसंप्रदाय यांच्यापेक्षा भारतीय संस्कृतीचा अगदी वेगळा विशेष म्हणजे समन्वय-प्रवृत्ती. झरथ्रुष्ट्रानंतर, बुद्ध, ख्रिस्त, इस्लाम इ. जे संप्रदाय या पृथ्वीवर अवतरले, जे अहिंदू लोकांचे-मोठ्या वर्गाचे मार्गदर्शक आहेत, त्यांनी अहिंदू लोकांच्या मोठ्या जनसमुदायाला आपल्या संप्रदायात याहून वेगळ्या संप्रदायांचा, त्यातील आचारांचा विरोध, निषेध, कमीपणा दाखवूनच त्यांनी स्वधर्मप्रचार केला आहे. इतर संप्रदायांचा निषेध करूनच स्वत:च्या संप्रदायाचा आचार, त्यांच्या आचार्यांनी सांगितलेला मार्ग यात इतर संप्रदायातील लोकांना ओढून घेण्याचा प्रयत्न झाला आहे. बौद्ध संप्रदाय सोडून इतर भारतीय संप्रदायांमध्ये इतरांच्या निषेधाची प्रवृत्ती थोड्याफार प्रमाणातच आहे - तो निषेध कधी प्रमुख मुद्दा झाला नाही. वैदिक काळापासून चातुर्वर्ण्य स्वीकारलेल्या संप्रदायांनी समांतर किंवा निम्नस्तरावरील गोष्टींमध्ये अविरोध-सामंजस्य प्रस्थापित करण्याचाच प्रयत्न केला. हीच सनातन धर्मेतिहासाची प्रसिद्ध कथा आहे. भागवत इ. पुराणांमध्ये बुद्ध, महावीर यांचे गुरु ऋषभदेव, बुद्ध यांनाही भगवंताचे अंश (अंशावतार) म्हणून मान्यता देण्यात आली.

म्हणून येथे भारतीयांच्या धर्मेतिहासाला उपयुक्त अशा समन्वयपद्धतीचे स्वरूप ५ प्रकारात विभागून उदाहरणांसह ऐतिहासिक प्रकाराने स्पष्ट करण्यात येत आहे.

१) स्वतंत्रपणे परस्परांवर आधारित नसलेल्या, नव्याने प्रस्थापित झालेल्या संप्रदायांचे एकत्रीकरण आणि त्यांच्यातील विरोध अंशतः तरी दूर करणे हा पहिला प्रकार. ऋग्वेदात प्रामुख्याने सोमयाग सांगितलेला आहे. यजुर्वेदात पशुयागाचे प्राधान्य आहे, तर सामवेदात सत्रांचे प्रस्थ आहे. ऋग्वेदात क्वचितच पशुयागाचा उल्लेख आहे. बाकी बहुतेक ठिकाणी सामान्य यज्ञ आणि सोमयाग या संबंधानेच ऋचांचे आधिक्य आहे. 'ऋचि साम गीयते' (जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण) = ऋचेवर साम गाइले जाते असे सामाचे ऋचेवर आधारित असणे स्पष्ट असल्यामुळे ऋग्वेद आणि सामवेद यांनी प्रतिपादित केलेली संस्कृती एकरूप आहे, एक आहे, अशी कल्पना करावी. सामवेदाच्या पंचविंशब्राह्मणात प्राधान्याने सत्रेच विहित आहेत. म्हणून सोमयागसत्र हा विषय असलेले ऋग्वेद आणि सामवेद यांचा एकच संप्रदाय मानायला हवा. पशुयागाला प्राधान्य देणारा यजुर्वेद आणि सोमयागाचा पुरस्कार करणारा तो ऋग्वेद-सामवेदांच्या संहिता, ब्राह्मण ग्रंथ हे सोमयागप्रधान आणि पशुयाग मानणाऱ्या भिन्न संप्रदायांचे कालानुरूप, परस्परांशी जवळचा संबंध आल्यामुळे, दोन्ही पंथांमध्ये सख्य निर्माण झाल्यावर, ऐक्य प्रस्थापित केल्यानंतरच्या काळातले आहेत. ऋग्वेदाने परिवृद्ध केलेल्या सोमयाग ज्यात प्रमुख अशा याज्ञिकांच्या संप्रदायाचा आणि यजुर्वेदाने आधार देऊन वाढवलेल्या पशुयागसंबंधी संप्रदायाचा त्रैवर्णिकांतील शिष्टांनी स्वीकार केल्यामुळे त्यांना प्रामाण्य प्राप्त झाले. त्यांच्यामध्ये तुल्यबलता निर्माण झाल्यामुळे त्रैताग्नींनी करावयाच्या कर्माचे ते कारण बनले. तीन विद्यांचा समुदाय प्रथमच झाला आणि त्याला 'त्रैविद्य' ही संज्ञा रूढ झाली. तीन विद्या एकत्र येण्यापूर्वी यजुर्वेदीय हौत्र वेगळेच होते, ते यजुर्वेदात आजही उपलब्ध आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात यजुर्वेदाचा होत्रवाद गाजत आहे.

या बाबतीत आश्वलायन म्हणतात - जे छांदोग्यात वा अध्वर्यू (वेदात?) जे हौत्रामर्श सांगितले आहेत ते करू नयेत, कारण हौत्र अपूर्ण आहे (आश्व. श्रौतसूत्र ८.१३). ऋग्वेदाला बाजूला ठेवून यज्ञ करायचा म्हणून वेगळा यज्ञ यजुर्वेदात सांगितला होता. तीन वेदांच्या एकीकरणानंतर वेगवेगळ्या हौत्रांना वाव राहू नये/राहणार नाही, वेदत्रयीला जाणणाऱ्यांनी वेदभेदाप्रमाणे होत्याचे, अध्वर्युचे आणि उद्गात्याचे कार्य ऐक्यसंपादनासाठी नेमून दिले. त्रैविद्यांचे- वेदांचे ऐक्यच सिद्ध झाल्यावर यजुर्वेदाचे पृथक हौत्राचे विधान व्यर्थ ठरते. त्यामुळेच आजही तीनही वेद असलेले लोक एकाच भागात-प्रांतात आढळत नाहीत. एखाद्या प्रांतात ऋग्वेदी ब्राह्मण जास्त असतात. कुठेतरी यजुर्वेदी जास्त असतात. एखाद्या ठिकाणी सामवेदी प्राधान्याने दिसतात, म्हणजेच कुठल्याही प्रांतात सामंजस्याने वेदत्रयीचे एकीकरणही होताना दिसत नाही. आजही वेदत्रयीचे अथर्ववेदापेक्षा वेगळेपण

दाखवून देणारी भिन्न लक्षणे त्याचा वेगळेपणा स्पष्ट करतात. वेदत्रयीमध्ये जेथे वेदांच्या उत्पत्तीसंबंधी वर्णन येते, तेथे अथर्ववेदाचा उल्लेख वा समावेश केलेला नाही. **(शतपथ ब्राह्मण - ११.५.८.३/ १०.४.२.२५/९.३.३.१४/१.१.४.३), कौषीतकी ब्राह्मण, ६.१२ जैमिनीय उप. १.१९.२/ऐ.बा.५.३२/तै.ब्रा. ३.१२.९.१, १.२.१.२६। तै.सं. ६.५.१०.३ वेदैरशून्यस्त्रिभिरेति सूर्यः । (तै.ब्रा. ३.१२.९.१)** तिन्ही पूर्ण वेदांनी (वेदांमुळे) सूर्य येतो (उगवतो). **त्रयो वेदा अजायन्त (ऐ.ब्रा.५.३२)** तीनही वेद जन्माला आले (निर्माण झाले.) शिवाय त्रेताग्नींनी साध्य करावयाच्या कर्मांमध्ये त्रयीच कारण होऊ शकते, पण त्यात अथर्ववेदाला स्थान नाही. म्हणूनच सत्याषाढादि श्रौतसूत्रकार अथर्ववेदाची यज्ञात अपेक्षा करीत नाहीत. **"यज्ञं व्याख्यास्यामः। स त्रिभिवैदर्विधीयते" (सत्याषाढ-श्रौतसूत्र १.१)** यज्ञाची व्याख्या करू-तो तीन वेदांनी केला जातो. ब्रह्मत्व (ब्रह्मा हा ऋत्विग?) अथर्ववेदावर अवलंबून आहे, असे मानू नये, कारण ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे – **'अथ केन ब्रह्मत्वमिति त्रय्या विद्यया इति ब्रूयात् !'** - त्रयी विद्येने ब्रह्मात्व घ्यावे. म्हणून चारी होत्यांकडून करावयाच्या क्रियासमुदायाची सिद्धी वेदत्रयीनेच होते. चवथ्या अथर्ववेदाची आवश्यकता विद्येतील जाणकारांनी त्रेताग्नींनी संपन्न होणाऱ्या यज्ञसंस्थेत अथर्ववेदाच्या ब्राह्मणग्रंथाशी संबंध आल्यानंतरच अथर्ववेदीयांना स्थान दिले. अथर्ववेदात सांगितलेला अभिचार, पुष्टि, मंत्र मणि आणि औषध यांनी करावयाची रोगचिकित्सा, इ. संस्कारसमुच्चय हा कार्यकलाप सर्वसामान्य जनांना अपेक्षित असल्यामुळे अथर्ववेद वेदत्रयीच्या प्रामाण्यपदवीला पोहोचला - अथर्ववेदाला उत्तरकालीच त्रयीप्रमाणे वेदत्व- प्रमाणत्व-प्राप्त झाले. चार वेदांचं संकलन झाल्यानंतरच्या काळात वैदिकांमध्ये, शिष्टत्रैवर्णिक वा चारही वर्णांमधील आचारांचा संग्रह (एकत्रीकरण, सुसूत्रीकरण) करण्यासाठी गृह्यसूत्रांची आणि धर्मसूत्रांची रचना केली गेली. अनेक स्मृती या (सर्व) आचार पाहूनच रचल्या गेल्या आहेत. यातील काही आचार अंशरूपाने वेदामध्ये सांगितले आहेत. त्याचा विभागपूर्वक विस्तार स्मृतींमध्ये केलेला दिसतो. काही आचारांबाबत निर्णय शिष्टांनी परिषदांतून निश्चित केला आहे, तर काही धर्मबुद्धीने, परंपरेने समाजात रूढ असलेल्या आचारांना शास्त्राची चौकट दिली, शास्त्रसीमेत समाविष्ट केले आहे.

अ) स्मृतींचे वेदांचा-वेदार्थाचा-अनुवाद करण्याचे प्रमाण -

'वेदार्थोपनिबंधृत्वान् प्राधान्यं हि मनोः स्मृतम् (बृहस्पति) वीरमित्रोदय ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात पृ.२७ येथे बृहस्पती स्मृतीचा हवाला देऊन असे म्हटले आहे की, वेदार्थच ग्रंथित करीत असल्यामुळे मनुस्मृती प्रधान-जास्त महत्त्वाची आहे.'

आ) वेदांच्या अनुपस्थितीत, निर्बंधपूर्वक आचारांचा आदेश -

निर्बंधपूर्वक आलेल्या आचारधर्मांना सांगतो. धर्मनिर्बंध कुलातली रूढी, हे प्रमाण आहे. शिवाय वेद प्रमाण आहेतच. (आपस्तम्ब धर्मसूत्र १.१)

इदं श्रेयः इदं ब्रह्मिदं हितमनुत्तमम् ।

लोकान् संचिन्त्य मनसा ततः शास्त्रं प्रचक्रिरे । महाभारत १२.२४३

लोकांचा - जनांचा आणि स्थलकालपरिस्थितीचा मनाने चांगल्या प्रकारे विचार करून नंतर जे शास्त्र निर्माण केले गेले, तेच कल्याणकारक, तेच ब्रह्म आणि तेच अत्यंत हितकारक आहे.

नैतच्छ्रुत्वागमादेव तव धर्मानुशासनम् ।

प्रज्ञासमभिहारोऽयं कविभिः संभृतं मधु ।। महाभारत १२.१४७

तुझी धर्माज्ञा केवळ वेदांच्या श्रवणाने आलेली नाही. विद्वानांच्या प्रतिभेतून एकत्र झालेला हा मध आहे.

'सामायिक' - या आपस्तंब वचनाची व्याख्या हरदत्ताने अशी केली आहे - "परंपरा-पिढ्यान्पिढ्या चालत आलेला कुलाचार याला 'समय' म्हणतात. त्या परंपरेचा आधार असलेले आचार म्हणजेच समयाचार. ते आचरण हाच धर्म." परिषद (धर्माचार्य परिषद) सदस्यांच्या निर्णयाला समय म्हणतात. समयाचार हाही प्रमाण आहे यात स्मृतिकारांचे एकमत आहे. -

अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद् भवेत् ।

यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्म स्यादशंकित :।। (मनु.१२.१०८)

जे धर्म वेदात सांगितलेले नाहीत त्याबद्दल काय करावं असा प्रश्न पडल्यास शिष्ट - प्रतिष्ठित ब्राह्मण जो सांगतील तो धर्म-धर्माचार मनात शंका न घेता स्वीकारावा.

दशावरा वा परिषद्यं धर्मं परिकल्पेयत् ।

त्र्यवरावापि वृत्तस्था तं धर्मं न विचालयेत् ॥ (मनु. १२.११०)

दहा श्रेष्ठ ब्राह्मणांच्या परिषदेने स्वीकारलेला तो धर्म मानावा. तीन पिढ्या जो धर्माचार पाळला जात असेल तो टाळू नये. आचरणात आणावा.

यापेक्षा जास्त सभांमधून (धर्माबद्दल कळते) किंवा श्रुतींमध्ये मूळ आढळते. (आपस्तंब धर्मसूत्र १.३.११.३७)

श्वेतकेतुर्हारुणेयः पांचालानां परिषदमाजगाम । (बृहद् .. उप.६.२)

आरुणीचा पुत्र श्वेतकेतू पांचालांच्या सभेत गेला. शिवाय मेधातिथी म्हणतो - जो आज अशा गुणांनी युक्त ग्रंथ (प्रमाण व्हावा) या हेतुने रचेल तो पुढील लोकांना मनुप्रमाणे प्रमाण ठरेल (मनुभाष्य २.६ वर)

इ) त्रैवर्णिकांमध्ये रूढ असलेल्या आचारधर्मांचे संकलन - पुनरुच्चार स्मृतींमध्ये सापडतो तो असा -

सर्वागमानामाचारः प्रथमं परिकल्पते ।

आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुतच्युतः ॥

सर्व आगमांचा ग्रंथाचा प्रत्यक्ष प्रयोग आचार महत्त्वाचा असतो. आचारातून धर्म निर्माण होतो, धर्माचा स्वामी विष्णू आहे.

देशजातिकुलधर्मान् श्रुत्यभावेऽब्रवीन्मनुः (वसिष्ठस्मृति. १.१७)

जेथे वेद काही सांगत नाही तेथे देश, जाति आणि कुल यांचे धर्म आचरावेत असे मनू म्हणतो.

तद्विदां च स्मृतिशीले। (गौतम धर्मसूत्र १।२)

ते जाणणाऱ्यांचे स्मरण आणि आचरण हाच धर्म. येथे स्मृती शब्द स्मरण या अर्थाने घ्यावा - स्मरणाचा पर्याय शब्द.

'यं त्वार्याः क्रियमाणं प्रशंसन्ति स धर्मः।
यं विगर्हन्ति सोऽधर्मः।' (आपस्तंब धर्मसूत्र १.७)

ज्या केल्या जात असलेल्या कर्मांची आर्य लोक प्रशंसा करतात तो धर्म आणि तेच आर्य ज्या कर्माची निंदा करतात तो अधर्म. हे धर्माचे सर्वसाधारण लक्षण आपस्तंबांनी सांगितले आहे.

'स्त्रीभ्यः सर्ववर्णेभ्यश्च धर्मशेषान् प्रतीयात् इत्येके। (आप २.२९)

'स्त्रियांकडून आणि सर्व वर्णियांकडून इतर धर्मनियम जाणून घ्यावेत!

(२) असे काहीजण म्हणतात/मानतात,' असे म्हणून आर्यांमध्ये प्रचलित असलेल्या आचारांची मोजदाद शक्य नसल्याने धर्माचे सामान्य - सर्वसाधारण लक्षण सांगून 'त्यांच्यासारखे वागा' असे सुचवतात. त्यांच्यासारखे म्हणजे शिष्टांप्रमाणे. स्मृती शिष्टाचाराशी कशा संबद्ध आहेत, शिष्टाचार स्मृतीत कसा ग्रथित केला आहे ते मत्स्य पुराणात सांगितले आहे.

तस्मात्स्मार्तः स्मृतो धर्मः शिष्टाचारः स उच्यते।
पूर्वैः पूर्वैः मतत्वाच्च शिष्टाचारः स शाश्वतः ।। (मात्स्य पु.अ.१४५)

म्हणून स्मृतीतून-स्मरणातून-स्मृतिग्रंथात समाविष्ट केलेल्या धर्माला शिष्टाचार असे म्हणतात. तो प्राचीन, अतिप्राचीन काळातील शिष्टांना मान्य असल्यामुळे शिष्टाचार हा शाश्वत-चिरकाल टिकणारा धर्म आहे.

व्यवहारकांडातील स्मृतिवचने ही जगात सिद्ध-प्रयोगात असलेल्या- नियमांचाच अनुवाद-पुनरुच्चारण आहे. हे मत नीती आणि धर्म यावरील निबंधकार विज्ञानेश्वर आणि माधव इत्यादींनाही मान्य आहे. म्हणूनच मिताक्षरा टीकेमध्ये लोकात रूढ असलेल्या गोष्टीचा आधार घेणारी वचने आढळतात. (याज्ञवल्क्यस्मृति मिताक्षरा-२.११८)

एकच संप्रदाय त्या संप्रदायातल्या प्रभावी व्यक्तींच्या बुद्धिवैविध्याच्या प्रभावामुळे किंवा देश-काल-परिस्थिती यांच्यातील वैविध्याच्या शक्तीमुळे कांही बाबतीत अंशतः वेगळा वाटू-वागू लागतो. त्यातून संप्रदायभेद तयार होतात. त्या संप्रदायांमधील वरवरचे भेद दूर

ठेवून त्यांच्या मूळ सूत्राचे भान जागृत करून त्यांच्यात ऐकमत्य स्थापन करण्याचा प्रयत्न प्राचीन शास्त्रकारांनी केला. हा समन्वय साधण्याचा दुसरा प्रकार. याची अनेक उदाहरणे आहेत. ऋग्वेदियांची एक अनुष्ठानपद्धती ऐतरेय, सां (शां?) खायन या शाखांमधील भेदामुळे वेगवेगळी झाली. वेगवेगळ्या प्रदेशात राहून अध्ययन व प्रयोग करणाऱ्यांमुळे ही भिन्नता आली असेल असा अंदाज करता येईल. एकच यजुर्वेदीय पद्धती शुक्ल आणि कृष्ण या भेदामध्ये विभागली गेली. तेथे मतभेद हे कारण संभवते. सामान्यतः कृष्ण आणि शुक्ल यजुर्वेदात अनुष्ठानपद्धती सारखीच असते. पण काही ठिकाणी अंशत: वेगळेपण अनुभवाला येते. उदा. संमार्गदर्भांना जाळू नये ते तिथेच उत्करात ठेवून द्यावेत असे मत शतपथकार मांडतात. उलट 'जाळावेत' असे तैत्तिरीयकारांना वाटते. 'पत्नीने योक्त्र गाठीशिवाय गुंडाळावे,' असे शतपथब्राह्मण म्हणते, तर 'गाठी बांधूनच वेष्टण करावे' असे तैत्तिरीय म्हणतात.

'ज्या जातीच्या झाडाच्या 'समिधा' (इंधन!) केल्या असतील त्याच प्रकारच्या लाकडाच्या 'परिधि' (संरक्षक काठ्या) कराव्यात' असे तैत्तिरियांचे मत आहे. त्याच्या ठीक विरुद्ध माध्यंदिन शाखावाल्यांचे मत आहे. 'चातुर्मास्य यागात पितृयज्ञाच्या दिवशी पितरांना उद्देशून असलेला बळी गार्हपत्याच्या दक्षिण दिशेला बसून करावा' असा तैत्तिरीय शाखेचा निर्णय आहे. उदेति जुहोति/अनुदिते जुहोति. सूर्य उगवण्यापूर्वी की उगवल्यानंतर (होम करावा) यासारखे वाद विद्वानांमध्ये प्रसिद्धच आहेत. या शाखांमधील भेदांचा विरोध दूर करून समांतर प्रामाण्य सिद्ध करण्यासाठी, ते अबाधित राखण्यासाठी, पूर्वीच्या मीमांसाचार्यांनी खूप, विविध प्रकारे प्रयत्न केला. सर्व शाखा प्रत्ययन्याय, सर्व वेदांतप्रत्ययन्याय आणि गुणोपसंहारन्याय या ग्रंथांची रचना सर्वांच्या विरोधाचा निर्वाह करण्यासाठीच झाली आहे.

पूर्वी कुमारिलभट्टापर्यंत स्मृतींचे प्रामाण्यही गृह्यसूत्रांप्रमाणे शाखाभेदांवर आधारलेले होते. तन्त्रवार्तिकात म्हटले आहे - प्राचीन मानवांचा इतिहास बाजूला ठेवल्यास पुढे गौतम, वसिष्ठ, शंख, लिखित, हारित, आपस्तंब आणि बौधायन यांनी रचलेल्या धर्मशास्त्रांची (धर्मसूत्रांची/स्मृतींची) आणि गृह्यसूत्र ग्रंथांची प्रातिशाख्यांच्या लक्षणाप्रमाणे, प्रतिचरणाला वेगळी पाठव्यवस्था आढळते. सामवेदी गौतम आणि गोभिल यांचे ग्रंथ प्रमाण मानतात. ऋग्वेदींसाठी वासिष्ठधर्मसूत्र प्रमाण, वाजसनेयी शाखावाले शंखलिखितांना स्वीकारतात. तैत्तिरीयशाखेचे लोक आपस्तंब आणि बौधायनांचे प्रामाण्य मानतात. म्हणून त्या त्या कृत्यांमध्ये गृह्यसूत्रांनी सांगितलेली व्यवस्था, गृहीतके दाखवून असा विचार केला पाहिजे की ती सूत्रे फक्त त्यांच्यासाठीच प्रमाणभूत होती की सर्वांसाठी? (पूर्वमीमांसा वार्तिक १।३।७)

आजही पारस्करगृह्यसूत्र वाजसनेयी शाखियांना प्रमाण मानावेसे वाटते. कृष्णयजुर्वेदीय लोक मात्र आपस्तंब, बौधायन, सत्याषाढ यांचीच गृह्यसूत्रे प्रमाण मानतात. सर्वजण

सर्वसूत्रांना सारखा आदर देत नाहीत. मीमांसक मात्र प्रामाण्याचे खंडन करून सर्व शाखांना समान सर्वसाधारण प्रामाण्य प्रस्थापित करतात. भट्ट त्यानुसार म्हणतात -

तस्मात्सर्वाधिकारन्यायत्वात् विधानस्य व्यवस्थित-देशाचार-गृह्यधर्मसूत्रनिबद्धधर्माणां सर्वधर्मत्वम्। (१।३।७)

धर्मसूत्रांमधील, गृह्यसूत्रांमधील विधानांवर सर्वांचा अधिकार आहे. गृह्य आणि धर्मसूत्रांमध्ये त्या त्या देशांमधील आचारांची व्यवस्था सांगितल्यामुळे ते आचार सर्वांना समानपणे धर्म्य आहेत. मेधातिथी, विज्ञानेश्वर, विश्वरूपादी निबंधकार स्मृतिचंद्रकेमध्ये धर्मसूत्रांचे सर्व शाखा, चरण यांचेसाठी साधारण - सर्वसामान्यपणे प्रामाण्य, पक्ष-विपक्ष यांचा व्यवस्थित विचार करून नि:संदेहपणे स्वीकारतात. गृह्यसूत्रांबद्दल मात्र त्या त्या वेदशाखेनुसार प्रामाण्य मर्यादित केले आहे, ते ते विधी सर्वांसाठी नाहीत, याला कात्यायन पुष्टी देतो. जे आपापल्या गृह्यसूत्रात कमी- अधिक जे जसे सांगितले असेल ते तसे शास्त्राप्रमाणे केले की सर्व व्यवस्थित केले असे होईल (हा संदर्भ स्मृतिचंद्रिकेत येतो).

२) परस्परांमधील विरोधातून निर्माण झालेल्या संप्रदायांचा पर्याय म्हणून किंवा काळानुरूप आलेला बदल म्हणून स्वीकार करणे हा एकवाक्यता निर्माण करण्याचा तिसरा प्रकार. या बाबतीत इतिहास आणि पुराण आणि आगम हीच उदाहरणे. वैदिक कर्मकांडाला विरोध करण्यासाठी भक्तिमार्ग, तंत्रमार्ग यांच्या प्रचारासाठीच इतिहास, पुराणे आणि आगमग्रंथाची निर्मिती झाली हे विद्वानांपासून लपून राहिलेले नाही, हे उघड सत्य आहे. हेमाद्रि नारदपुराणातील पुढील श्लोक उद्धृत करतो -

यन्न दृष्टं हि वेदेषु तद्दृष्टं स्मृतिभिः किल।
उभाभ्यां यत्र न दृष्टं तत्पुराणेषु गीयते।

जे वेदात आढळत नाही ते स्मृतींमध्ये दिसते. या दोहोंमध्येही दिसत नाही ते पुराणांमध्ये गाइले जाते.

व्रत, पूजा, (मूर्ती) प्रतिष्ठा, पुरश्चरण, तीर्थयात्रा इ. धार्मिक गोष्टी पुराणात व आगमग्रंथात आढळणाऱ्या वेदात सापडत नाहीत. पशुयज्ञाची इतिहास पुराणे निंदा करतात.

यथा पङ्केन पंकाभः सुरया वा सुराकृतम्।
भूतहत्यां तथैवैकां न यज्ञैर्माष्टुमर्हति॥ (भागवत १।८।६२)

ज्याप्रमाणे चिखलाने चिखलाचा डाग, सुरेने सुरेचा परिणाम नष्ट करता येत नाही त्याप्रमाणे भूत म्हणजे प्राणिमात्राच्या हत्येचे पाप यज्ञांनी धुऊन काढता येत नाही.

महाभारतात मोक्षधर्मात पितापुत्रांचा संवाद असा आहे -

तातैतद्बहुशोभ्यस्तजन्मजन्मान्तरेष्वपि।
त्रयीधर्ममधर्माढ्यं न सम्यक् प्रतिभाति मे॥

त्रयीमध्ये सांगितलेला धर्म अनेक जन्मांमध्ये आचाराला गेला असूनही मला तो

अधर्मानेच युक्त वाटतो, मला तो ठीक/योग्य वाटत नाही.

विचख्युवचने च -

अव्यवस्थितमर्यादैर्विमूढैर्नास्तिकैः परैः।
संशयात्मभिरव्यक्तैर्हिंसा सा मनुवर्णिता ।।
कामकाराद्विहिंसंति बहिर्वेद्यां पशून्यथा ।(म.भा.१२।२६५)
विष्णुमेवाभिजानन्ति सर्वयागेषु ब्राह्मणाः ।
पायसैः सुमनोभिश्च तस्यापि यजनं स्मृतम् ।।

ज्यांची मर्यादा नियमित केलेली अशा अत्यंत मूढ, संशयग्रस्त व्यक्तींच्या क्रियेला मनूने हिंसा म्हटले आहे. कारण ते केवळ स्वत:च्या इच्छेमुळे वेदीबाहेर (यज्ञाखेरीज) पशुंची हिंसा करतात. सर्व यागांमध्ये ब्राह्मण दुधादींनी आणि फुलांनी विष्णुची पूजा करतात. ते त्यातून विष्णूला जाणतात.

अशाप्रकारे हिंसायुक्त यज्ञाची निंदा करून पुराणातील यज्ञाची स्तुती करतात. 'तस्माद्हिंसा न यज्ञिया' यज्ञातील हिंसा ही हिंसा नसते. (महाभारत मोक्ष धर्मात १२.२७२)

व्यासस्मृतीत मात्र त्याविरुद्ध लिहिलं आहे -

अतः स परमो धर्मः यो वेदादवगम्यते ।
अवरः स तु विज्ञेयो यः पुराणादिषु स्मृतः । (वीरमित्रोदय)

जो वेदात सांगितला आहे तोच खरा धर्म. पुराणादिमध्ये सांगितलेला धर्म त्यापेक्षा कमी प्रतीचा असतो.

पांचरात्र, सांख्य, योग, पाशुपत यांचे आगम ग्रंथ प्रथम वैदिक मार्गाविरुद्ध अशा मार्गाचे प्रवर्तक आहेत. त्रैवर्णिकांच्या शिष्टसंमत आचाराचा स्वीकार केल्यावर ते स्वत:च 'आम्ही वेदांचे तात्पर्य आहोत' असा उद्घोष करतात -

निर्मितं हि मया पूर्वं व्रतं पाशुपतं शुभम् ।
गुह्याद्गुह्यतरं सूक्ष्मं वेदसारं विमुक्तये ॥

रहस्यांचे रहस्य असे सूक्ष्म पाशुपत व्रत मी पूर्वी निर्माण केले. ते वेदांचे तात्पर्य मोक्षदायक आहे. (विष्णुधर्मोत्तरपुराण, संदर्भ - वीरमित्रोदयातून)

सौर, शाक्त, पाशुपत, पांचरात्र, वैष्णव, शैवागम हे संप्रदाय परस्परांचे पक्के विरोधक आहेत. तरीसुद्धा धर्मांचे निबंध ग्रंथित करणाऱ्यांनी त्या सर्वांना एका पातळीवर प्रमाण मानले आहे. कुमारिलभट्टापर्यंत सांख्य, योग, पांचरात्र इ. आगमांचे प्रामाण्य शंकास्पदच होते. हा विरोध-आपत्ती कुमारिल भट्टांनी धर्म अधर्म-विधिनिषेध वाक्ये, लोकोपसंग्रह, पंथ वाढवणे, पूजा श्रेष्ठत्व प्रतिपादन इत्यादी हेतूंनी निर्मित आहेत, त्यांचा स्वीकार वेदत्रयीला प्रमाण मानणाऱ्या वेदवेत्त्यांनी केलेला नाही म्हणून श्रुतिविरोध आणि अन्य हेतू या कारणांमुळे ती प्रमाण म्हणून विचार करण्याजोगी नाहीत. (पूर्व मीमांसावार्तिक १।३।२।४)

कूर्म पुराणात -

यानि शास्त्राणि दृश्यंते लोकेस्मिन्विविधानि तु ।
श्रुतिस्मृतिविरुद्धानि निष्ठा तेषां तु तामसी ॥

जी श्रुती आणि स्मृती यांच्याशी विरोध असलेली विविध शास्त्रे या जगात दिसतात, त्यांचे अधिष्ठान तामस आहे - ती तामसी वृत्तीची आहेत, अशी सुरवात करून पुढे म्हटलंय -

कापालं पांचरात्रं च यामलं वाममार्हतम् ।
एवं विधानि चान्यानि मोहनार्थानि तानि तु । (वी.मि.प.प्र.)

पत्याधिकरणात आद्य शंकराचार्यांनी पांचरात्रादी आगमांचे वेदविरुद्धत्वच सांगितले आहे - 'वेदांचा विरोध/अपमान होत आहे. चारी वेदांमध्ये परमश्रेयाची प्राप्ती न झालेल्या शाण्डिल्याला हे शास्त्र मिळाले, इ. वेदांची निंदा दिसून येत आहे.' शैव आणि वैष्णव आदी आगम परस्परांची निंदा करीत असतात.

प्रौढपणे आणि हट्टाग्रहाने परस्परांच्या पंथांमधील अहितकरत्व आणि नरकप्राप्तीबद्दल बडबडतात. पद्मपुराणाच्या उत्तरखंडात -

मात्स्यं कौर्मं तथा लैंग शैवं स्कांदं तथैव च ।
आग्नेयं च षडेतानि तामसानि निबोधत ।
वैष्णवं नारदीयं च तथा भागवतं शुभम् ।
गारुडं च तथा पाद्मं वाराहं शुभदर्शने ।
सात्त्विकानि पुराणानि विज्ञेयानि शुभानि वै ।
सात्त्विका मोक्षदा प्रोक्ता राजसा स्वर्गदा शुभाः ।
तथैव तामसा देवि निरय-प्राप्ति-हेतवः । (पाद्म, उत्तरखंड, ४३ अ).

मत्स्य, कूर्म, लिंग, शैव, स्कंद आणि अग्नी ही सहा पुराणे तामस आहेत असे जाण. विष्णू, नारद, भागवत, गरुड, पद्म, वाराह ही शुभ, पवित्र, सात्त्विक आहेत. ही सात्त्विक पुराणे तसेच राजस पुराणेही स्वर्ग वा मोक्ष देणारी आहेत. उलट तामस पुराणे ही देवी, नरकाची प्राप्ती करून देणारी आहेत.

त्रैवर्णिक वैदिकांमध्येच अत्यंत प्रचलित झालेले पुराण आगम आदी मार्ग वैदिक संप्रदायाचा लोप-विनाश करीत होते. आजकाल वैदिक अनुष्ठान क्वचितच कुठेतरी मोठ्या प्रयत्नाने आचरले जाते. सर्वत्र पुराणे, आगम ग्रंथ यात सांगितलेले आचार म्हणजे पूजा, मंदिर बांधणे, तीर्थयात्रा, व्रते, पुरश्चरणे, नामसंकीर्तन, दान इ. सर्वत्र गौरवाने चालतात. यांच्या अनुष्ठानात पुराणे, आगम ग्रंथच अत्यंत श्रद्धेने प्रमाण मानले जातात. त्रैवर्णिक केवळ नावापुरते वेदप्रामाण्य मानतात. शिवाय या प्रवृत्तीचे समर्थन वृद्धयाज्ञवल्क्य करतात -

सांख्य योगः पंचरात्रं वेदाः पाशुपतं तथा ।
अतिप्रमाण्यमेतानि हेतुभिर्न विरोधयेत् । (वी.मि.प.प्र.पूर्वंतु स्त्री.)

सांख्य, योग, पंचरात्र, वेद, पाशुपत ही तंत्रे आता अत्यंत प्रमाण ठरली आहेत. त्यांचा हेतू लक्षात घेऊन त्यांना विरोध करू नये. (त्यांना विरोधासाठी विरोध नको.)

शूद्र, दास, पतित यांनीच आदराने स्वीकारावीत यासाठी पुराणतंत्रे होती. त्यांचाच पुराणादींवर अधिकार - प्रवेश होता. त्याबद्दल भागवतपुराण सांगते -

तेनोक्तं सात्वतं तंत्रं यज्ज्ञात्वा मोक्षभाग्भवेत् ।
यत्र स्त्रीशुद्रदासानां संस्कारो वैष्णवः स्मृतः ।
स्त्रीशूद्रद्विजबंधूनां त्रयी न श्रुतिगोचरा ।
इति भारतमाख्यानं कृपया मुनिना कृतम् ॥

सात्वत तंत्रात स्त्री शूद्र दास यांच्यावर वैष्णव संस्कार केला जातो, ते तंत्र जाणून त्यांना मोक्ष मिळावा म्हणून हा मार्ग सांगितला आहे.

स्त्री, शूद्र आणि केवळ जन्मामुळे ब्राह्मण (बाकी आचार-अध्ययन दृष्ट्या शूद्रच) अशांना श्रुती ऐकण्याचा अधिकार नाही. म्हणून व्यासमुनींनी दया येऊन त्यांच्यासाठीच महाभारत-भारतआख्यानाची रचना केली.

पंचरात्र, भागवत इ. संप्रदायांना उद्देशून कूर्मपुराण सांगते -

स नारदस्य वचनाद्वासुदेवार्चने रतः ।
शास्त्रं प्रवर्तयामास कुंडगोलादिभिः श्रितम् ॥

वासुदेव कृष्णाच्या पूजनात दंग असलेल्या त्याने नारदाच्या सांगण्यावरून कुंड, मंडलांवर, आधारलेले शास्त्र प्रवृत्त केले.

तीन वर्णांमधील शिष्टांनी परस्परविरुद्ध आचारविचार असलेल्या आगमांचे प्रामाण्य वेगळ्या (खालच्या) पातळीवर आणि पर्याय म्हणूनच स्वीकारले आहे.

३) एकवाक्यता साधण्याचा चौथा प्रकार असा-शिष्ट-सभ्य जनांनी इष्ट काय अनिष्ट काय याचा विचार करून अहिंसा, सत्य या श्रेष्ठ धर्मांना मानून लोकजीवनाचा विचार करून पूर्वीच्या शास्त्रांनी न स्वीकारलेले आचारही बदलले, नवीन आचार, तेथे घातले. त्यांचे प्रामाण्य मानले, कारण बदलत्या युगाप्रमाणे बदल करणे त्यांना अपरिहार्य वाटले. महाभारतात म्हटलंय -

न हि सर्वहितः कश्चिदाचारः संप्रवर्तते ।
येनैवान्यः प्रभवति सोऽपरं बाधते पुनः (शांतिपर्व अ.२६८)

सर्वांच्या हिताचा एकच कोणताही आचार असत नाही. त्यामुळे दुसरा आचार उत्पन्न होतो, तो दुसऱ्या कोणत्यातरी व्यक्तीला त्रासदायक ठरतो.

यत्राधर्मो धर्मरूपाणि धत्ते धर्मःकृत्स्नो दृश्यतेऽधर्मरूपः ।
बिभ्रद्धर्मोऽधर्मरूपं तथा च विद्वांसस्तत्प्रपश्यन्ति बुद्ध्या ॥
(उद्योगपर्व अ.२८)

वाय १८४-१३

जेथे जेव्हा अधर्मधर्माची रूपे धारण करतो आणि पूर्ण धर्म अधर्मासारखा दिसतो तेव्हा अधर्मरूप धारण करणाऱ्याला धर्माला विद्वान लोक (ते ते) बुद्धीने व्यवस्थितपणे पाहतात.

न धर्मः परिपाठेन शक्यो भारत वेदितुम् ।
अन्यो धर्मः समस्थस्य विषमस्थस्य चापरः ।
आपदस्तु कथं शक्या परिपाठेन वेदितुम् ।
वेदवादाश्चानुयुगं ऱ्हंसन्तीतिह नः श्रुतम् । (म.भा.१२।१६०)

हे भारता, केवळ पद्धत, शिस्त म्हणून धर्माला जाणणे शक्य नाही. समभूमीवर उभ्या असलेल्याचा धर्म वेगळा, असमतल जागेवरच्याचा धर्मकर्तव्य वेगळे असते. सवयीने/आधीच्या अनुभवाने आपत्तींना जाणणे कसे शक्य आहे? वेदवचने-वेदार्थ प्रत्येक युगात खालावतो-कमी महत्त्वाचा होतो, असे आम्ही ऐकून आहोत.

मनुनेही सुख न देणारा धर्म टाकावा असे सांगितले आहे -

परित्यजेदर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ ।
धर्ममप्यसुखोदर्कं लोकविक्रुष्ठमेव च ॥

ज्यात धर्म नाही असे अर्थ आणि काम यांचा त्याग करावा. लोक ज्याचा द्वेष करतात आणि दुःखात परिणाम पावणाऱ्या धर्माचाही त्याग करावा.

लोकांचे हित लक्षात घेऊन पूर्वी शिष्टांनी आचार बदलले. या बाबत शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने काही उदाहरणे येथे देतो.

अपत्यलिप्सुर्देवरात्, पिंडगोत्रर्षिसंबंधिभ्यः । (गौतमधर्मसूत्र १।२)

अपत्यप्राप्तीची इच्छा असेल तर दिराकडून किंवा सपिंड, सगोत्र अशा कोणा संबंधितांकडून (पुत्र-अपत्यप्राप्ती करून घ्यावी.)

अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः । (मनु. ९.६६)

हा नियोगविधि विद्वान ब्राह्मणांनी पशुधर्म म्हणून निंदित-निंदिलेला आहे, म्हणून सज्जनांनी त्याला संमती दिली नाही.

या पूर्वं पतिं वित्वाथान्यं विंदते पतिम् ।
पंचौदनं च तावजं ददातो न वियोषतः ।
समानलोको भवति पुनर्भुवाऽपरः पतिः ।
वासो हिरण्यं दत्वा ते यांति दिवमुत्तमाम् ।
(अथर्व ९।९)
पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता ।
सा चेदक्षतयोनिः स्यात् पुनः संस्कारमर्हति । (वसिष्ठः)

जी स्त्री एका पतीला सोडून टाकून दुसऱ्या पतीला वरते, ती चांगली मानली जात नाही. एखाद्या स्त्रीचे लग्न-मंत्रसंस्कार झाल्याबरोबर तिचा पती मरून गेला आणि ती अजून

कुमारिकाच असेल तर तिचा पुन्हा विवाहसंस्कार होऊ शकतो, असे वसिष्ठधर्मसूत्र सांगते. मात्र हा वेद-स्मृती यांनी संमती दिलेला विधवा- विवाह बौधायनादींनी अमान्य केला आहे. **'तां गृहित्वा न प्रजां न धर्मं विन्देत्'** - (विधवेला) तिला स्वीकारून प्रजानिर्माण किंवा धर्मकृत्य करू शकणार नाही, असे विधान आहे.

ब्राह्मणाच्या चार पत्नी होऊ शकतात हे जे गौतमादींचे मत आहे, त्यानुसार ब्राह्मण शूद्र स्त्रीला पत्नी म्हणून स्वीकारू शकतो. 'हे माझे मत नाही,' असे म्हणून याज्ञवल्क्य शूद्र स्त्रीबरोबरच्या विवाहाचा विरोध करतो. गोमेध, अश्वमेध, मधुपर्क इत्यादींमध्ये वेदस्मृती यांना गोवध मान्य आहे.

गोत्रान्मातृसपिंडाद्वा विवाहो गोवधस्तथा ।
नराश्वमेधौ मद्यं च कलौ वर्यं द्विजातिभिः ॥

स्वत:चे गोत्र आणि आईकडील सपिंड यांच्याशी विवाह, गोवध, नरमेध, अश्वमेध आणि मद्य या गोष्टी कलियुगात ब्राह्मणांसाठी वर्ज आहेत, असा कल्पतरूमध्ये उद्धृत केलेल्या ब्रह्मपुराणातील वचनानुसार गोवधाचा निषेध सांगितला आहे.

पितृणां मासिकं श्राद्धमन्वाहार्यं विदुर्बुधाः ।
तदामिषेण कर्तव्यं प्रशस्तेन प्रयत्नतः ॥ (मनु. ५.१२३)

पितरांचे मासिक श्राद्ध म्हणजे अन्वाहार्य श्राद्ध, असे शहाणे म्हणतात. ते उत्तम प्रकारे मांसासह प्रयत्नपूर्वक करावे. हे मनू इत्यादींनी मांसासह श्राद्ध करायला सांगितले आहे, त्याला बृहत्पराशरीयस्मृतीत विरोध केला आहे - **'पतत्यज्ञानतः सोऽपि मांसेन श्राद्धकृत्तथा।'** अज्ञानामुळे मांसासह श्राद्ध करणारा पतित होतो. (मांसतत्त्व-विवेकातून उद्धृत)' भागवतातही म्हंटलेय -

"न दद्यादामिषं श्राद्धे न चाद्याद्धर्मतत्त्ववित् ।"

धर्मतत्त्व जाणणाऱ्याने श्राद्धांत मांस देऊ नये तसेच खाऊही नये. मनू इत्यादींनी संमती दर्शवलेले १२ पुत्र आणि ज्येष्ठाला विशेष अधिकार या गोष्टी शिष्टांनी निंदनीय मानल्यामुळे आता करू नयेत असे मेधातिथीने म्हटले आहे. प्राचीन आचार्यांनी त्या त्या काळांमध्ये गंभीर विचार करून बदललेल्या धर्मांना - धर्माचरणांना मोजून आदित्य पुराणात त्यांची गणना सांगून झाल्यावर म्हटले -

एतानि लोकगुप्त्यर्थं कलेरादौ महात्ममिः ।
निवर्तितानि कर्माणि व्यवस्थापूर्वकं बुधैः ।

ही कर्मे लोकांच्या रक्षणासाठी कलियुगाच्या प्रारंभी व्यवस्थापूर्वक शहाण्या महात्म्यांनी काही कर्मे दूर केली, बाजूला सारली.

समयश्चापि साधूनां प्रमाणं वेदवद्भवेत् । (स्मृतिचंद्रकासंस्कार कांड)

साधुंनी निर्माण केलेल्या संकेतांना वेदांप्रमाणे प्रमाण मानावे. शुक्रनीतिमध्ये राजाने

नेमलेल्या पंडितांचे कर्तव्य असे सांगितले आहे -

वर्तमानाश्च प्राचीना धर्माः के लोकसंश्रिताः ।
शास्त्रेषु के समुद्दिष्टा विरुध्यन्ते च केऽधुना ।
लोकशास्त्रविरुद्धा ये पंडितस्तान् विचिन्तयेत्।
नृपं संबोधयेत्तत्र परत्रेहसुखप्रदैः । (११।९९, १००)

लोकांमध्ये प्रचलित असलेले वर्तमान काळातील आणि प्राचीन (आचार) धर्मशास्त्राप्रमाणे काय आहेत आणि आताच्या काळात त्यातील कोणते लोक विरुद्ध आणि शास्त्रविरुद्ध आहेत त्यांचा विचार ऐहिक आणि पारलौकिक हिताचा विचार करून पंडिताने राजाला सांगावेत.

४) शास्त्रांमध्ये न सांगितलेले देश, जाती, कुल आदींचे पाखंडी लोकांचे आचार शास्त्राविरुद्ध असले तरी ते त्यांना प्रमाण असतात. त्यांनी त्या आचारांचे पालन करावेच. राजाने त्यात हस्तक्षेप, आडकाठी करू नये. स्मृतिकार, निबंधकार यांची त्यांना अनुमती हा समन्वय पद्धतीचा पाचवा प्रकार.

नारदस्मृतीच्या असहायभाष्यात म्हटले आहे -

देशे देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ।
स शास्त्रार्थबलान्नैव लङ्घनीयः कदाचन । (१।४०)

त्या त्या देशात जो धर्माचार परंपरेने चालत आलेला असेल त्याला शास्त्राधाराने, जबरदस्तीने ओलांडू नये-त्याचे पालन व्हावे. स्मृतिचंद्रकेत सुमन्तु म्हणतो -

यत्र शास्त्रगतिर्भिन्ना सर्वकर्मसु भारत ।
तत्र कुलक्रमायातमाचारमाश्रयेद् बुधः ।
स गरीयान् महाबाहो सर्वशास्त्रोदितादपि ॥ (स्मृ.च.सं.कां.पृ.९)

हे भारता, ज्या सर्व कर्मांमध्ये शास्त्रांचे मत वेगवेगळे असते तेथे कुलपरंपरेने आलेला आचारच शहाण्याने आचरावा. हे महाबाहो, तोच सर्व शास्त्रांनी सांगितलेल्या आचारधर्मापेक्षाहून श्रेष्ठ होय.

शिवाय कुमारिलभट्टांनी उद्धृत केलेले आपस्तंबवचन असं आहे -

येषां परंपराप्राप्ताः पूर्वजैरप्यनुष्ठिताः ।।
त एव तैर्न दुष्येयुराचारैर्नेतरे जनाः । (तंत्र वार्तिक १।३।३)

जे आचार त्या त्या कुळात चालत आलेले असतील आणि पूर्वजांनी आचरणात आणलेले असतील, त्या आचारांच्या आचरणाने फक्त त्या कुळातील लोक दूषित होत नाहीत. (इतर होतात) इतरांनी ते आचार अमलात आणू नयेत, त्यांना दोष लागेल.

यस्मिन् देशे य आचारः पारंपर्यकुलस्थितिः ।
तथैव परिपाल्योऽसौ यदा वशमुपागतः ॥ (याज्ञ. १।३४२)

ज्या देशात जो आचार परंपरागत असून कुळात स्थिर झाला आहे (तो तुमच्यापर्यंत आल्यावर) त्याचे तसेच व्यवस्थित पालन करावे.

तसेच विष्णुस्मृती सांगते - परदेशावाप्तौ तद्देशधर्मान्नोच्छिन्द्यात्। पर मुलखात गेल्यावर तेथील आचारधर्मांचा उच्छेद, नाश करू नये.

श्रेणीनैगमपाखंडिगणानामप्ययं विधिः।
भेदं चैषां नृपो रक्षेत् पूर्ववृत्तिं च पालयेत्। (याज्ञ. २।१९२)

व्यापारी, निगमपंथी या पाखंडी समूहांचे बाबतीत राजाने त्यांच्या भेदाचे रक्षण करून पूर्वीपासून चालत आलेल्या आचाराचे पालन करवावे.

वेदांचे प्रामाण्य न मानणारे ते पाखंडी. नग्न म्हणजे जैन धर्मीयादी लोक. त्यांचा वेगळेपणा राजाने राखावा, असे विज्ञानेश्वर म्हणतो.

पाखंडिनैगमादीनां स्थितिः समय उच्यते।
समयस्यानपाकर्म तद्विवादपदं स्मृतम्।
पाखंडनैगमश्रेणिपूगब्रातगणादिषु।
संरक्षेत् समयं राजा दुर्गे जनपदे तथा।
यो धर्मः कर्म यच्चैषामुपस्थानविधिश्च यः।
यच्चैषां वृत्त्युपादानमनुमन्येत तत्तथा। (नारदस्मृती.)

पाखंडी, निगमपंथी यांची आचारपद्धती 'समय' नावाने ओळखली जाते. 'समय' न पाळणे हे विवादपद - व्यवहारात न्यायासाठी येणारी गोष्ट - होते. पाखंड, नैगम, व्यापारी समूह, व्रात यांच्या समूहातील समयांचे रक्षण राजाने दुर्ग आणि जनवस्तीत करावे.

जो ज्याचा धर्म, कर्म आणि उपासनापद्धती असेल अथवा उपजीविकीचे साधन असेल त्यांना अनुमती द्यावी, बंधन घालू नये. (नारदस्मृती)

प्राचीन काळातला नारद समय न पाळणे हे स्वतंत्र न्याय देण्यासारखे कृत्य, विवाद्य घटना मानतो. अवैदिकांच्या परधर्मीयांच्या धर्मरक्षणाची इच्छा करतो. त्याच्या आर्थिक स्थितीची उपजीविकेची, त्या बाबतीतील स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी नियम करतो. पण आधुनिक काळातील 'लीग ऑफ नेशन्स' सर्व राष्ट्रांचा संघही प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही अशी काळजी घ्यायला, समर्थ ठरला नाही, असफल झाला.

असंख्य, विविध, फार काळ अस्तित्वात-आचरणात असलेले ज्ञान, कर्म, भक्ती इ. अनेक आचाराधिष्ठित संप्रदाय आहेत. त्यांच्यातील समन्वय व विरोध वैकल्पिक म्हणून, अनुसरण रूपाने अनेक आस्तिक दार्शनिकांनी, प्रकांड पंडितांनी सुचवले. ही समन्वयाची किंवा एकवाक्यतेची प्रवृत्ती धडपड, फक्त मीमांसा सांप्रदायिकांच्या बुद्धीची कसरत नव्हती - बुद्धिविलास नव्हता. फुलांच्या हारामधील सूत्राप्रमाणे ही समन्वयभूमिका मंत्र-ब्राह्मण-उपनिषद- इतिहास-पुराण-आगम-स्मृती-शिष्टाचार-लोकाचार या सर्वांमधून सतत भारतीय

धर्मेतिहासकथेत कायम गुंफलेली आहे. अशा समन्वयाचे परमसत्य, रहस्य ऋग्वेदासारख्या प्रमाणाच्या शीर्षस्थानी असलेल्या ग्रंथात प्रकट झाले आहे. विश्वात्मक एकाच सर्वव्यापी परमेश्वराचे पूजन सर्व जीव, विविध रूपांनी, विविध साधनांनी, नाना उपासनामार्गांनी, आस्तिकांकडून आणि नास्तिकांकडून सदैव केले जाते. एकच सत्य, देश, कालादी उपाधींनी विविध भावांनी प्रकट होऊन विश्वरूपाने आविष्कृत होते.

'तदुनात्येति कश्चन तदु नात्येति किंचन' (छांदोग्य)

सर्वांचे आराध्यदैवत, आराधना साधना आणि साधक या सर्वांचेच एकरूपत्व मंत्रवर्ण ब्राह्मणात वर्णन केले आहे -

इदं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्नीं यमं मातरिश्वानमाहुः ।

(ऋग्वेद १।१६४/६४)

तो (परमात्मा, परमेश्वर) एकच असून त्याला ब्राह्मण वेगवेगळ्या नावांनी संबोधतात. इंद्र, मित्र, वरुण, अग्नी, यम आणि वायू इत्यादी.

एक एवाग्निर्बहुधा समिद्धः एकः सूर्यो विश्वमनुप्रभूतः ।
एकैवोषा सर्वमिदं विभात्येकं वेदं विबभूव सर्वम् । (ऋग्वेद ८।५।८२)

एकच अग्नी अनेकांकडून, अनेक प्रकारे प्रज्वलित केला जातो, एकच सूर्य सर्व विश्वात प्रकाशतो. एकच उषा सर्व उजळून टाकते. जे सर्व झाले ते सर्व एकच आहे.

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म स्ता आपः स प्रजापतिः । (शु.य. ३२।१)

तेच अग्नी, तेच आदित्य, तेच वायू, तेच चंद्र, तेच शुक्र, तेच ब्रह्म, तेच जलतत्त्व आणि प्रजापतीही !

स वा एष इंद्र वैमृध उद्यन् भवति, सवितोदितो भवति,
मित्रः संगवकाले, इंद्रो वैकुंठो मध्यंदिने, समावर्तमानः
शर्व उग्रो देवो लोहितायन्, प्रजापतिरेव संवेशेऽस्तमितः (४।१ जै.उ.बा.)

तो इंद्र उगवतांना स्वच्छ प्रभायुक्त होतो, सूर्य उदय पावतो, सायंकाळी/ सकाळी (गोदोहनकाळी) तो मित्र, मध्यान्ही वैकुंठात तो इंद्र होतो. (सायंकाळी) निरोप घेणारा तो लाल रंगाचा, उग्र देव, शर्व (शिव) होतो. रात्रीच्या वेळी तो प्रजापती होतो.

यजुर्वेदी त्याच अग्नीची उपासना करतात. सामवेदी यातच हे सर्व उक्थ आहे (अशी उपासना करतात) असे मानतात. ऋग्वेदी हाच सर्व वृद्धिंगत करतो (असे मानून उपासना करतात.), यातु जाणणारे त्याला 'यातु' म्हणतात. विष असे सर्प, सर्प (विद्या) जाणणारे त्याला सर्प म्हणतात. ऊर्जा असे देव म्हणतात. रै-संपत्ती असे मनुष्य म्हणतात. माया असे असुर संबोधतात. स्वधा असे पितर मानतात. देवजन (संगीत) असे म्हणून देवजन जाणणारे

उपासतात. रूप म्हणून गंधर्व तर गंधरूपात अप्सरा मानून उपासना करतात. जे जसजशी पूजा करतात, त्याच्याजवळ जातात, तसे ते होते. ते, ते होऊन रक्षण करते. म्हणून त्याला तसे जाणणारा या सर्व साधनांनी उपासना करो. ते सर्वच होते, सर्व होऊन ते सर्वांचे रक्षण करते. (शतपथ ब्राह्मण १९।५।२।२३)

सगळ्या जगाला व्याकूळ करून टाकणारी मतभिन्नता ही वस्तुस्थिती योग्य नव्हे. मूळतत्त्व लक्षात घेऊन वरवर दिसणारे, बाह्य उपाधींमुळे आलेले वैचित्र्य, भिन्नता लक्षात घेऊनच धर्मनिष्ठांनी प्राचीनांचा सनातन समन्वय पंथच अनुसरायला हवा.

अस्पृश्यत्व-मीमांसा

(संस्कृत)

अस्पृश्यत्व-मीमांसा

श्री. पं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई

‘‘ अस्पृश्यत्व-मीमांसा । ’’

शास्त्रे द्विविधमस्पृश्यत्वमाम्नायते। आजानिकं नैमित्तिकं चेति । तन्न प्रथमम-सत्तमसंकराभिव्यक्तजातिनिष्ठम् । असत्तमसंकरश्चात्यंतनिषिद्धः स्त्रीपुरुषसंभोगः । न च “ सा जातिः असत्तमसंकरानाश्रय- व्यक्तिपु अपिसंभवति ” इति वाच्यम् । मनुयाज्ञवल्क्यादिभिः वर्णजातिविवेकप्रकरणे तादृशसंकरस्यैव तादृशजात्यभिव्यंजकवि-धयोक्तस्वात् । अभिव्यंजकप्रयुक्ता च जाति: अभिव्यंजकमर्यादां नातिवर्तते, यथा गोत्वं सास्नात्रिकोणादिधर्मसमुदायम्। न च “तृणारणिमणिन्यायेन अन्यदपि उन्नीयते”। इति वाच्यम्। जातिविवेकप्रकरणे मन्वादिभिरभिव्यंजकान्तरस्यानाम्नानात्। न च “शिष्टव्यवहारस्तादृशो-ऽभिव्यंजकः” इति वाच्यम्। व्यवहारो हि शास्त्रोक्तव्यंजकसापेक्षः, कथं स्वयं व्यंजकभावं भजेत । शिष्टशब्दव्यवहाराश्च अर्थादर्थांतरं संचरन्ति देशकालभेदेन, न शास्त्रनियताः, यथा पुक्कसश्वपचनिपादशब्दाः स्मृतौ विभिन्नाथां अपि, शिष्टसंमतामरकोशे । पर्याया: । शात्र्यव्यतिक्रामिणश्च शिष्टव्यवहाराः प्रतिपादिता बौधायनेन। एवं च वर्तमानास्पृश्यात्वाभ्युप-गतजातिषु तादृशसंकरगमकं किमिति वक्तव्यम्॥ तच्च प्रत्यक्षमनुमानमितिहासो वा भवेत्। तत्र न प्रत्यक्षं प्रसरति । नापि तादृशसंकरजार्भकानां समावेशन - रीतिरपि तास्वनुवर्तते येन तथात्वमनुमीयेता । नापीतिहासः, इतिहासो हि द्विधांसंभवेत्, तत्तज्जातिपु पित्रादिपरंपरया तथा प्रसिद्धिः, ततजातिसंनिधजातंत्यंरस्य कुलक्रमागतस्तथाभ्युपगमो वा, नैतदुभयमपि सांप्रतिकास्पृपृश्यत्वेनाभ्युपगतेपु संगच्छते। न च “वायवे चंडालम” इत्यादि वेदवाक्ये चंडालजाति। भूयते, सा च वेदवदनादिसिद्धा वक्तव्या, वैदिकशब्द स्याऽनादित्वेनं तदर्थस्याप्यनादित्वात् ” इति वाच्यम् । कल्पादो प्रलये वा व्रीहिगवाश्वतारादीनामर्थानाम भावेऽपि व्रीहित्वगोस्वादि जातींना निस्यत्वेन न वेदप्रामाण्यं विहन्यते तथा अधुना सर्गादौ वा चंडालादीनामभावेऽपि चंडालत्वजातेर्नित्यत्वेन न तद्बोधकवेदाप्रामाण्यं प्रसज्यते । व्यक्तिसंघातनाशेऽपि जातेर्नित्यत्वाभ्युपगमात् । तथा च वेदोदिता चंडालत्वजातिः स्मृत्युत्कसंकरे एवाविर्भवति, नान्यत्र प्रमाणाभावात्। एवं व वर्तमानास्पृश्यत्वेनाभ्युपगताना साक्षात् परंपरया वा तादृशसंकरजत्वे प्रसाणाभावाच्यास्त्यस्पृश्यत्वं तेषामिति।

अथ के एते वर्तमानास्पृश्या इति चेत् शूद्रा इति वक्तव्यम्। “चतुर्थ एकजातिस्तु” इत्यत्र मनुना पित्रांदिपरंपरया सर्वदा उपनयनाभावस्य शुद्रलक्षणस्योक्तत्वात् । द्विविधान् शूद्रान्

पाणिनिराह । निरवसिता अनिरवसिताश्चेति । निरवसिता नाम दूरवर्तिनः ग्रामसीमायां स्थिताः । ते च निंदिताचारस्यागात् शौचावलंबाद्वा सच्छूद्रतामश्नुवंति ।

यथा यथा हि सद्वृत्तमातिष्ठत्यनसूयकः । तथा तथेमं चामुं च लोकं प्राप्नोत्यनिंदितः ॥
(मनुः १०|१२७)

शौचं चाहात्रिः —

अभक्ष्य - परिहारश्च संसर्गश्चाप्यनिंदतैः । आचारेषु व्यवस्थानं शौचमित्यभिधीयते ॥

तासां तथात्वाभ्युपगमे यद्यपि संति परःशतामि वाक्यानि चंडालादीनामस्पृश्यस्वा-संभ्यवहार्यताबोधकानि तथापि शौचसंस्यादिवृत्तेन शैवभागवतादिधर्माचरणेन च तेषां जन्मसिद्धमप्यस्पृश्यत्वं नश्यति । ग च "जन्मसिद्धं जन्मान्तरेण विना कथमन्यथा भवेदिति" वाच्यम् । उभयत्र वचनप्रामाण्यात्, यथा अस्पृश्यत्वं जन्मसिद्धं वचनप्रामाण्यात् तथा तस्मिनेष जन्मनि तदपगमो, वचनादेव । 'किं हि वचनं न कुर्यात्, नहि वचनस्यातिभारो नाम' इत्याह श्रीशंकराचार्यः ।

यथा 'वायवे चांडालमालभेत' इत्यनेन स्मार्तः चंडालस्पर्शनिषेधः बाध्यते ।

ननु 'शूद्राज्जातस्तु चंडालः सर्वधर्मबहिष्कृतः' 'प्रतिलोमा धर्महीनाः' इति याज्ञवल्क्य गौतमादिवचनानुसारेण न चंडलादीनां शैवभागवतादिधर्माधिकारः इति कथं तज्जन्या शुद्धिरिति क्षेत्र । स्वजातिनियतधर्मातिरिक्तधर्मानधिकार इति वा तदर्थात्, अन्यथा वचनांतरानवकाशप्रसंगात् स्वजातिसंशोधनं, व्यवहारशुद्धिः, अपरावमानं, स्वभृत्यपोपणं, स्वकर्मानुष्ठानमिति चंडालधर्माः' 'शूद्राणां तु सधर्माणां सर्वेऽपध्वंसजाः स्मृताः' इति मनुदेवलवचनाप्रामाण्यापत्तेः । गीतासु च 'मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः' इत्यत्र पापयोनिशब्देन चंडालादीनां ग्रहणात् । भागवते त्रिंशल्लक्षणवान् परमो धर्मश्च सर्वमानवसाधारण उक्तस्तत्र चंडालादयोऽधिकुर्वंति । 'वक्ष्ये सनातनं धर्म नारायणमुखात् इस्तम् ।' इत्युपक्रम्य—

सत्यं दयातपः शौचं तितिक्षेक्षा शमो दमः । अहिंसाब्रह्मचर्येच त्यागःस्वाध्याय आर्जवं ।
संतोषः समदृक्सेवा प्राम्येहोपरमः शनैः नृणां विपर्ययेहेक्षा मौनमात्मविमर्शनम् ॥
अन्नाद्यादेः संविभागो भूतेभ्यश्च यथार्हतः । तेप्वात्मदेवताबुद्धिः सुतरां नृषु पांडव ।
श्रवणं कीर्तनं चास्य स्मरणं महतां गतेः। सवेज्यावनतिर्दास्यं सख्यमात्मसमर्पणम् ।
नृणामयं परो धर्मः सर्वेषां समुदाहृतः । त्रिंशल्लक्षणवान् राजन् सर्वात्मा येन तुष्यति ॥
(भाग ० ७ /११)

इति सनातनं परमं धर्म प्रथमं विरूप्य वर्णाश्रमजातिधर्माः पश्चादुक्ताः । एकादशस्कंधे (भ. १ २।४)—

वैश्याः शूद्राः स्त्रियोन्त्यजाः ॥

इति अंत्यज्ञानामधिकारः भागवतधर्मेऽभिहितः ।

स्त्रियःपतिव्रताश्चान्ये प्रतिलोमानुलोमजाः । लोकाश्चंडालपर्येताः सर्वेप्यत्राधिकारिणः ॥
(अगस्त्यसंहिता शूद्रकमलाकरे)

पंचाक्षरः परित्राणं पतितस्यात्यंजस्य च । अस्य मंत्रस्यप जात्यादीननपेक्ष्य प्रघर्तमात् ॥ सदाचार- विहीनस्य पतितस्यांत्यजस्य च । पंचाक्षरात्परं नास्ति परित्राणं कलौ युगे ॥ (शिवपुराणे उ० २)

अंत्यजा अपि तद्राष्ट्रे शंखचक्रांकधारिणः । संप्राप्य वैष्णवीं दीक्षां दीक्षिता इव संयभु ॥ (काशीखंडे)

हेमाद्रौ व्रतखंडे (पृ० ९९१) वाराहपुराणे एकादशीजागरणोपोषणगायनमाहात्म्ये चंडालकथायांः—

श्वपाकश्चापि सुश्रोणि मम चैवोपगोयनात्। कृत्वा सुविमलं कर्म सोऽपि ब्रह्मास्वमागतः ॥ इति भगवद्वचनम् ।

अंत्यजो वाऽधमो वापि मूर्खो वा पंडितोऽपि वा। पंचाक्षरजपे निष्ठो मुच्यते पापपंजरात्। (शिवपु० उ० ११)

रामनाम जपेद्यो वै मुच्यते सर्वकिल्बिषैः । चातुर्मास्ये विशेषेण तत्पुण्यं दशधोंत्तरम् । हीनजातिप्रजातानां महद्द्दति पातकम् ॥ पुनाति जन्मान्तरपातकानि स्थूलानि सूक्ष्माणि क्षणाच्च दग्ध्वा ॥ (स्कं० पु० चातुर्मास्यमाहाम्पे -२४)

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो घा यदि वेतरः। विष्णुभक्तिसमायुक्तो ज्ञेयः सर्वोत्तमोत्तमः । दुराचारोऽपि सर्वाशी कृतघ्नो नास्तिक: पुरा । समाश्रयेदादिदेवं श्रद्धया शरणं हि यः । निर्दोषं विद्धि तं जंतुं प्रभवात् परमात्मनः । (स्कंद पुराणे)

यन्नामधेयश्रवणाभिधानात्, यत्प्रहणात् यत्स्मरणादपि क्वचित् । श्वादोऽपि सद्यः सवनाय कल्पते कुतः पुनस्ते भगवन्तु दर्शनात् ॥ अहो वत श्वपचोऽतो गरीयान्, यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् । (भागवतम्)

नच "अस्तु तेषां भक्तौ मंत्रजपे वाधिकारः, न तेषां दर्शनपूजनाद्यधिकार" इति वाच्यम् । भक्तेर्नवविधाया अर्चनगर्भत्वात् । सेवेज्यावनतिर्दास्यं सख्यमात्मसमर्पणम् । नृणामयं परो धर्म: सर्वेषां समुदाहृत:" इति इज्याशब्देन विष्णुपूजनाधिकारः सकलमानवसाधारणो धर्म: । किं च शिवपुराणे—

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्य:शूद्रो वा प्रतिलोमज: । पूजयेत्सततं लिंगं तत्तन्मन्त्रेण सादरम् । (वी० मि० स्कं० पु०) (विश्वेश्वरसंहिता २१।३९)

लगवा संपूजयेत् यस्तु मैत्र्यादि गुणसंहिताः । ब्रह्मचर्यरतो भक्त्या मत्सादृश्यमवाप्नुयात् ॥ किमत्र बहुनोक्तेन भक्ता: सर्वेऽ धिकारिण: । .....

तस्मादनेन मन्त्रेण मनोवाक्कायभेदत: । आवयोरर्चनं कुर्याज्जपहोमादिकं तथा । यदा कदापि वा भक्त्या यत्र कुत्रापि वा कृता येन केनांपि वा देविं पूजा मुक्तिंनयिष्यति । (शि० पु० उ० १२)

यो दुर्गां पूजयेन्नित्यं श्वपचो वा जितेन्द्रिय: ।भावेन च समायुक्तो सोऽपि याति परां गतिम्। (२९ देवीपुराणे)

ब्राह्मणा: क्षत्रिया वैश्या: स्त्रिय: शूद्रान्त्यंजातय: ॥ संपूज्य तं सुरश्रेष्ठं भक्त्या सिंहवपुर्धरम्। मुच्यंते चाशुभैर्दु:खैर्जन्मकोटिसमुद्भवै: ॥ (वी० मि० पू० प्र० नारासिंहपुराणम्)

एतसां शास्त्रवेत्ता च देवपूजाविधौ शुभ: । मातृमंडलवेत्ता च ब्राह्मण: क्षत्रिऽयोपि वा ॥ प्रतिचारोऽ (शूद्रा:) थ वैश्यो वाप्यन्यो वा तन्त्रविद्यदि । पूजाविधौ भवेछ्रेष्ठो नापटुर्न कुशीलष: ॥ (वी० मि० देवीपुराणे) भैरवोऽपि चतुर्वर्णैरन्त्यजानां तथा मत: । मातर: सर्वलोकैस्तु स्थाणा: पूज्या: सुरोत्तमा: । (देवीपुराणे) (निर्णयसिंधु:) सर्ववर्णैस्तु संपूज्या: प्रतिमा: सर्वदेवता: । (निर्णयसिंधौ वाराहे शूद्रकमलाकरे)

न च 'चांडालो न वर्णातर्गत:' इति वाच्यम् ।

मनुना 'वर्णान् पंचदशैव तु' इत्यत्र चंडालस्यापि वर्णेऽतर्भावकरणात् । नच 'चंडालानां भैरवस्य प्रतिष्ठापूजादावधिकार' इति वाच्यम् । भवधारणाश्रवणात् । पूर्वाक्तदेविनृसिंहशिव-लिंगार्चनपरवचन - विरोधाच ।

यो यै मानुषमाश्रित्य सुखसंतानकामुकः ।
तेन पूज्यों महादेवः सर्वकामार्थसाधकः। (शि० पु० उ० म० ७)

इति मनुष्यत्यस्यैव पुजाधिकारप्रयोजकस्व:त् । शूद्रकमलाकरे हेमाद्रौ भविष्ये विंध्यवासिनीदेवीपूजायामधिकारः सर्वमानवानां दर्शितः । यथा—

वैश्यै: शूद्रैर्भक्त्रियुतैम्लेंच्छैरन्यैश्च मानवैः । एवं नानाम्लेच्छगणै: पूज्यते सर्वदस्युभिः॥

(दास्यव: चंडालादय: 'चंडालावैश्च दस्युभिः' इति मनुवचनात्) एवं च देवप्रतिमापूजाधिकारणे देवालय प्रवेशदंर्भनाधिकार अर्थात् प्राप्तः । अत्र एतानि साक्षात् विधायकवचनान्यनुसंधेयानि । यथा पद्मपुराणे भक्तिं प्रति नारदवचनम्-स्वदन्विताश्च ये जीवा भविष्यंति कलाविह। पापिनोऽपि गमिष्यंति निर्भयं कृष्णमंदिरम् ॥

शिव पुराणे ऽन्त्यजानां ज्योतिर्लिंगदर्शनं विहितम्–

लिंगानि ज्योतिषां चात्र विद्यंते मनुसत्तमाः । तान्यहं कथयाम्यद्य श्रुत्वा पापं व्यपोहति । सौराष्ट्रे सोमनाथं च श्री - शैले मल्लिकार्जुनम् वज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरें । केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम्। वाराणस्यां च विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे । वैद्यनाथं चिताभूमौ नागेशं दारुकावने । सेतुबंधं च रामेशं घुश्मेशं च शिवालये । हीनयोनौ यदा जातो ज्योतिर्लिंगं च पश्यति । तस्य जन्म भयेतत्र विमले सत्कुले तथा ।

स्पर्शनपुजेनाधिकारश्च वचनान्तरादवगम्यते । यथा —

येऽर्चयन्ति शिवं नित्यं लिङ्गरूपिणमेव च । स्त्रियो वाप्यथवा शूद्राः श्वपचा ह्यन्त्यवासिनः । तें शिवं प्राप्नुवन्त्येव सर्वदुःखोपनाशनम् ॥ (केदारखण्डं अ० ८) ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा प्रतिलोमजः । पूजयेत्सततं लिङ्गं तत्तन्मंत्रेण सादरम् ॥ (विद्येश्वरसंहिता २१/३९)

तस्मादनेन मन्त्रेण मनोवाक्कायभेदतः । आवयोरर्चनं कुर्याज्जंपहोमादिकं तथा ॥

यदा कदापि धा भक्त्या यत्र कुत्रापि वा कृता। येन केनापि वा देवि पूजा मुक्तिं नयिष्यति॥
(शि० पु० उ०)

अनादिभूतभूतेशमहिमा वागगोचरः। महापीठे तवार्चायामस्पृश्यस्पर्शदूषणम्। विद्यते सुव्रते नैतल्लिंगरूपधरे हरे॥ (महानिर्वाणतंत्रे)

किं च देवमंदिरं प्रति देवतादर्शनार्थमगमने प्रत्यवायः सर्वजनसाधारणः श्रूयते।

यत्र कुत्रापि प्रतिमां वेदधर्मसमन्विताम्।
न पश्यंति जना गत्वा ते दंड्या यमकिंकरैः॥ (विष्णुधर्मोत्तरे)

मनु चंडालादीनां मंदिरप्रवेशे शुद्धिविधायकागमवचनानां का गतिरिति चेन्न। तेषां भावरहितचंडालपरत्वात्, दर्शनानुद्देशेन प्रविष्टं चंडालपरस्वाद्वा नास्तिकसहपाठात्। अदीक्षितचंडालादिपरत्वमिति तर्कभूषणप्रमथनाथाः। किंच पांचरात्राद्यागमानामप्राण्य-मेवोक्तं मीमांसकधुर्येण कुमारिलेन लाभपूजाख्यातिकामकारमूलकत्वं वदता। एतावता संदर्भेण शैवभागवतादिधर्माधिकारः भगवतः सर्वप्रतिमादर्शनपूजनाधिकारश्च चंडालादीनामंत्य जानां सिध्यति।

तथा च 'अपि वा यश्चंडाल:शिव इति वाचं वदेत् तेन सह संवदेत् तेन सह संवसेत्' इति (अप्पयदीक्षितकृतश्रीकंठमाध्यटीकायां) श्रुत्या अन्यत्र स्मृतौ निषिद्धस्य चंडालसंभाषणसहसंवासादेः' पुल्कसःश्वपचो वापि ये चान्येम्लेच्छजातयः तेऽपि वंद्या महाभागा हरिपादैकसेवकाः। (पद्मपु० १/५०/१०)

अनेन अन्यत्र निषिद्धस्य वंदनस्य -

वैष्णवो वर्णबाह्योपि पुनाति भुवनत्रयम्।
न शूद्रा भगवद्भक्तास्ते तु भागवता नराः॥ (पद्मपु० माघमाहात्म्ये)

जपंति वैष्णवान्मन्त्राक्षरास्ते लोकपावनाः (इति हरिभक्तिविलासधृतागमवचनम्)

अनेन बाह्यानां चंडालादीनां अन्यन्नोक्तं दर्शनस्पर्शनादिसंव्यहारकृतदूपकत्वं निरस्य-पावकत्वस्य–

स्मृतः संभावितो वापि पूजितो वा द्विजोत्तम। पुनाति भगवद्भक्तः चंडालोऽपि यदृच्छया॥
शूद्रं वा भगवद्भक्तं निषादं श्वपचं तथा। वीक्षते जातिसामान्यात् स याति नरकं ध्रुवम्।
(इतिहाससमुच्चयवचनम्)

अनेन चंड़ालत्वरूपजातिसामान्यप्रयुक्तादर्शनीयत्वास्पृश्यत्वाद्यसंव्यवहार्यत्वं निरस्य सत्कार्यस्वपूज्यत्वादेः –

न मे भक्तश्चतुर्वेदी मद्भक्तः श्वपचः प्रियः। तस्मै देयं ततो ग्राह्यं स च पूज्यो यथा ह्यहम्।
(जीवगोस्वामिधृतं भगवद्वचनम्)

भक्तिरष्टविधा ह्येपा यस्मिन् म्लेच्छोऽपि वर्तते। स विप्रेन्द्रो मुनिश्रेष्ठ स ज्ञानी स च पंडितः। तस्मै देयं ततो ग्राह्यं स च पूज्यो यथा हरिः। (गरुड पुराणे)

अनेन अन्यत्र निषिद्धदानप्रतिग्रहरूपसंव्यवहारस्य च प्रतिप्रसवः गम्यते।

वस्तुतः भागवतशिवपुराणादिभक्तिशास्त्रानुसारेण केवळ जातिचंडालत्वं न प्रत्यवायापादकं किंतु, अशौचमनृतं स्तेयः नास्तिक्यं शुष्कविग्रहः । कामः क्रोधश्च तर्पश्च स्वभावोऽन्तेवसायिनाम् । (भाग ११-१) इतिभागवतो क्ताशुचित्वस्तेयादिदोपविशिष्टचंडालत्वमेव । न च ''स्मृतिवचनानां का गतिरिति'' वाच्यम् । उक्त पुराणवचनोपसंहारेण विशिष्टचंडालपरत्वस्य स्मृतिवचनानां स्वीकारात् । वृत्तस्थानां स्वध्यवसायपराणां शुचित्वबोधक्तवक्ष्यमाणवचनान्तर वाधापत्ते:।

वृत्तस्थो योऽपि चंडालस्तं देवा ब्राह्मणं विदुः । (पद्मपुराणे, मूकचांडालकथायाम्)

शुद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत् । ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात्प्रस्यवरो भवेत् ॥ (भा० शां० १९१)

सत्यं दानं क्षमाशीलमानृशंस्यं तपो घृणा। दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥ (भा० वन० १८०)

यस्तु शूद्रो दमे सत्ये धर्मे च सततोऽत्थितः । तं ब्राह्मणमहं मन्ये वृत्तेन हि भवेद्विजः ॥ (वन०७५)

अत एव छांदोग्योपनिषदि सत्यकामजाबालस्य सत्यभाषणरूपवृत्तेन ब्राह्मण्यमनुमाय तस्य उपनयनं तं प्रति विद्योपदेशश्चोपपद्यते ।

अत एव च अंत्यजस्य शठकोपमुनेः आरुढपतितापस्यानां निवृतिज्ञानेश्वरसोपानदेवादीनां च तत्कालीनैः शिष्टैः पादोपसंग्रहणपूजनसेवाशिष्यत्वादि कृतसुपपद्यते। भगवदुपासनया च जातिनिष्ठं निकृष्टत्वमस्मिश्चेव जन्मन्यपगच्छति इत्यत्र प्रमाणान्तरमपि, शिवपुराणे–

क्षत्रियः पंचलक्षेण क्षत्रत्वमपनेष्यति । पुनश्च पंचलक्षेण क्षत्रियो ब्राह्मणो भवेत् । वैश्यस्तु पंचलक्षेण वैश्यत्वमपनेष्यति । पुनश्च पंचलक्षेण मंत्रक्षत्रिय उच्यते । पुनश्च पंचलक्षेण क्षत्रत्वमपनेष्यति । पुनश्च पंचलक्षेण मंत्रब्राह्मण उच्यते । शूद्रश्चैव नमोन्तेन पंचविशतिलक्षतः । मंत्रविप्रत्वमासाद्य पश्चाच्छुद्धों भवेद् द्विजः। (विश्वेश्वरसंहिता, शिवपुराणम् १५)

अनयैव विधया–

अंतजानां जास्युष्कर्षो भवेत् । तथा चावमेवार्थः भंग्यंन्तरेण स्मृतिषु निरूप्यते । वर्णान्तरग मनमुत्कर्षापकर्षाभ्यां सप्तमे पंचमेवाऽचार्याः । (गौतमः १।४।१८)

जत्युत्कर्षो युगे शेयः सप्तमे पंचमेऽपि षा । कर्मणां व्यत्ययं साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरम् (याज्ञ०१)तपोग्रीजप्रभावैस्तु ते गच्छंति युगे युगे । उत्कर्ष त्रापकर्षे च मनुष्येष्विह जन्मतः ॥ (मनुः १०) आर्याकार्ययोः कर्मणः व्यतिक्षेपे साम्यम् । (गोतमः २।३।६९) यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यंजक्रम्) यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत्. (माम० स्कं० ७)

महाभारते पुराणेषु च अस्मिश्चेव जन्मनि साक्षात पुरुषपरंपरया वा वास्यंवरप्राप्तिवचनानी-.....तिहासा: इममेवाभिप्रायं.... न च हीनजातीनामुच्चजातीयकर्मानधिकारात् कथमुत्कर्षः, प्रत्युक्त पतनमेवाच्चते शास्त्रे' इति वाच्यम् । उच्चजातीयकर्मणा उपजीविकानिषेधात् । अन्यथा उपनिषदि क्षत्रियैः कृतः ब्रह्मविद्योपदेशः भीष्मादिकृतोपदेशस्थ कषमुपपद्येत । तथा

चायं निष्कर्ष:

सद्वृत्तेन भागवतादिधर्मानुष्ठानेन वा जातिकृताऽशुद्धिरस्मिन्नेव जन्मन्यपगच्छति।

वर्तमानास्पृश्यानां जन्मसिद्धास्पृश्यत्वानिरासनाभ्युपगमेऽपि, सार्वजनीनदेवालय-जलाशयसभाशालादिपु अस्पृश्यत्वदोपाभावबोधकानि संति वचनान्तराणि। यथा–

संग्रामे हट्टमार्गे व यात्रादेवगृहेषु च॥ उत्सवक्रतुतीर्थेषु विप्लवे ग्रामदेशयोः। अग्न्युत्पाते महापात्सु स्पृष्टास्पृष्टिर्न दुष्यति॥ (स्मृत्यर्थसारे)

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च। उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पुष्टिर्न विद्यते। (अत्रिः)

तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे देशविप्लवे। नगरप्रामदाहे च स्पर्शदोषो न विद्यते॥

(याज्ञवल्क्ययः)

कुंडे मंचे शिलापृष्ठे मौकायां च गजे तथा। संग्रामे संकटे चैव स्पर्शदोषो न विद्यते।

(आचारपल्लवे स्मृतिः)

वापीकूपतडागानि सरांसि सरितस्तथा। असंवृतान्यदोषाणिमनुः स्वायंभुवोऽब्रवीत्॥

(शुद्धिचंद्रालोके उशनाः)

अन्त्यैरपि कृते कूपे सेवौ घाप्यादिके तथा। तत्र स्नात्वा च पीत्वा च प्रायश्चित्तं न विद्यते॥

(वी० मि० पराशरः आ० प्र०)

ननु चंडालस्वीकृत कूपगतजळपाने प्रायश्चित्तं स्मर्यंते इति कथमनेन तत्स्पृष्टकूपजलानुमतिः इति चेन्न । तानि वचनानि चंडालस्वामिककूपपराणि न सर्वप्राण्युपजीवनार्थमुत्सृष्टकूपादि-जलाशयपराणि।

श्वपाकचाण्डालपरिग्रहेषु पोत्वा जलं पंचगव्येन शद्धिः॥

अस्मिन् वाक्ये परिग्रहशब्देन स्वत्वमुच्यते।

अतएव 'प्रदद्यात्सर्यभूतेभ्यो जलपूर्णं जलाशयम्।' इतिमत्स्यपुराणवचनं ''सामान्यं सर्वभूतेभ्यो मया दत्तमिदं जलम्॥ रमन्तु सर्वभुतानि स्नानपानावगाहनैः॥

इति मंत्रश्चोपपद्यते।

शबरस्वामिप्रदर्शितस्मृतिमीमांसारीत्या अस्पृश्यत्वबोधकस्मार्तवाक्यव्याख्याने तु तानि वचनानि अंत्यजानां प्रेतवस्त्रधारणमलसंसर्गाद्यशुचिस्वमूलकानि न वेदमूलकानि, तादृशप्रत्यक्वेदानुपलंभात् संभवति दृष्टमूलकत्वे, अदृष्टवेदकल्पनाथा अन्याय्यस्वात्, यथा शिखाकर्मप्रपाप्रवर्तनादिस्मृतिः। न च 'कपूयधारणा' इत्यादि छांदोग्यश्रुतिः, 'न जनमियात्' इत्यादि बृहदारण्यकश्रुतिश्च मूलमिति वाच्यम्।

छांदोग्यश्रुतौ अस्पृश्यत्वबोधकस्वाभावात् कपूययोनिपदं च पापयोनिपर्यायं कर्मफलं दरिद्र्यादिदुःखमवगमयति, कर्मविपाकप्रकरणात बृहदारण्यकश्रुतिश्च श्रीशंकराचार्यमते जनशब्देन वैदिकजनविरोधिजनमभिधत्ते, तादृशश्च न चंडालः; वस्तुतः तत्र जनशब्देन आसंगलक्षणपाप्मसंसृष्टः विषयलंपटां उच्यते प्रकरणानुसारात्। न च लोकेपु रूढ आचारः कथं वाचनीय इति वाच्यम्। तस्य शास्त्रमूलकत्वे प्रमाणाभावेन परिवर्तनार्हत्वात्।

'कारणाद्धर्ममन्विच्छेन्न लोकचरितं चरेत् ॥' (भार० १२ | २६२)

कारणं च लोकसंस्थाधारणमित्युक्तं महाभारते जाजलिसंवादे । न च अयं शिष्टाचारः परंपराप्राप्तः, शिष्टाचारश्च प्रमाणमुक्तः स्मृतौ इति वाच्यम् ।

''सर्वभूतदयावन्तस्ते शिष्टाः शिष्टसंमताः'' (भार० वन० २११)

ईदृशशिष्टसंमताचारत्वस्य रूढाचारे नियतस्वाभावात् ।

नैमित्तिकं च विविधम् । पतनीयपापजमशुचिद्रव्यस्पर्शजं जननमरणपर्वादिजं च । तत्र न प्रथमः कल्पः विवादविषयजातिपु प्रसज्यते । वैय्यक्तिकत्वेन जातिसामान्ये ऽसंभवात् । तथाभ्युपगमे वा प्रायश्चित्तेन तदपनीयते । मन्वापस्तंवादिभिः पतितप्रायश्चित्ताम्नानात् ॥

एनस्विभिरनिर्णिन्कैर्नार्थे किंचित्समाचरेत् ।

कृतनिर्णेजनांश्चैव न जुगुप्सेत कर्हिचित् । (मनुः ११/१९०)

नांपि ते पतित-संततयः, प्रमाणाभावात् । तथात्वेपि तेषां स्वाभाविकं शुद्धत्वमिति आपस्तंब मनुते । 'न सेंद्रियः पतति' । अशुद्धत्वाभ्युपगमे च बौधायनः प्रायश्चितमाह । अशुचिशुक्रोत्पन्नानां तेषां प्रायश्चित्तिः, पतनीयानां तृतीयोंशः' इति । पतितपुत्रस्तुसर्वमते अजानशुद्धा एव द्वितीयस्तु कल्पः तदंतर्गतेपु केपुचित् संभवति स्मशानवस्त्रादिधारणात् प्रेतस्पर्शानंतरं स्नानाकरणाद्वा । स्नानेन शुचिवस्त्रधारणेन च तदपगच्छति । तृतीयस्य कल्पस्यानवसर एव ।

अंत्यजानां यज्ञधर्माधिकारं च साक्षात् श्रुतिरेव निरूपयाते । यज्ञशब्दश्च पूजायाम् । (यज् दान पूजासंगतिकरणेषु)

मित्राय पंच येमिरे जना अभिष्टिशवसे। स देवान् विश्वान् विभर्ति ॥ (ऋ.३।४।६।८)

पंचजनाः निषादपंचमाश्रत्वारो वर्णा अभिष्टिशवसे बलयुक्ताय मित्राय येमिरे हवींप्युद्यछंदि (पूजयंति) । सायणः ॥

यत्पांचजन्यया विशेन्द्रे घोषा असृक्षय । (ऋ. ६।४।४३।७)

निषादपंचमाश्चत्वारो वर्णाः । (सायणः)

निषादस्तु चांडाल:। कोशात् एतदेव मतं वादरिणाऽचार्येण निरूपिठम्

निमित्तार्पेन वादरिस्तस्मात्सर्वाधिकपेस्यात् (पू. मीमांसासूत्रे)

ooo

अस्पृश्यत्व-मीमांसा

(मराठी भाषांतर)

प्रा. डॉ. सौ. आशा रवींद्र गुर्जर

अस्पृश्यत्व-मीमांसा

शास्त्रात दोन प्रकारची अस्पृश्यता सांगितली आहे. एक जन्मतः येणारी आणि दुसरी काही कारणाने निर्माण झालेली. अत्यंत वाईट संकरातून निर्माण झांलेला स्त्रीपुरुषसंभोग निषिद्ध आहे. त्यातली पहिली अस्पृश्यता, अत्यंत नीचांच्या संकरातून निर्माण झालेल्या जातीशी संबद्ध असते. 'ती जाती अत्यंत वाईट संकराचा आश्रय न झालेल्या व्यक्तींमध्येही संभवते' असे म्हणू नये. वर्णजातिविवेक प्रकरणात मनु, याज्ञवल्क्य इत्यादींनीही संकराचेच तशा जातीच्या अभिव्यंजकरीतीचा उल्लेख केला आहे. लक्षणाने युक्त जाति लक्षणमर्यादेचे उल्लंघन करीत नाही असे गोत्व (गायपण?) पोळी, त्रिकोण आदि (गुण) धर्मसमुदायाला सोडून रहात नाही. 'तृण-अरणि-मणि' न्यायाने इतरांचाही अंतर्भाव करावा, असे म्हणू नये. कारण जातिविवेकप्रकरणात मन्वादींनी लक्षणे न सांगितलेल्याचा अंतर्भाव सांगितलेला नाही. 'शिष्टव्यवहारातून त्याचे सूचन होईल' असे म्हणू नये कारण शिष्टांच्या व्यवहाराचा आधार शास्त्राने सांगितलेल्या लक्षणांनुसार चालतो-तोच कसा परिभाषा करणारा ठरेल? शिष्टबद्ध आणि शिष्टव्यवहार या शब्दांचा अर्थही देशकालानुसार बदलतो शास्त्राप्रमाणे ते असतातच असे नाही. पुक्कस, श्वपच, निषाद हे शब्द स्मृतीत वेगवेगळ्या अर्थांचे वाचक असूनही शिष्टांना मान्य असलेल्या अमरकोषात पर्यायशब्द म्हणून येतात. शास्त्राला बाजूला ठेवून शिष्टांचे होणारे काही व्यवहार बौधायनाने सांगितले आहेत. अशा परिस्थितीत वर्तमानातील अस्पृश्यत्व प्राप्त झालेल्या जातींमध्ये तशा संकराचे लक्षण काय ते सांगितले पाहिजे. ते प्रत्यक्ष, अनुमान किंवा इतिहास असू शकते. पण येथे प्रत्यक्षाला वाव नाही. संकराने झालेल्या मुलांचा समावेश करण्याची पद्धतही स्मृतींमध्ये सांगितलेली नाही, त्यामुळे तुलना, अनुमान शक्य नाही. इतिहासही उपयोगाचा ठरत नाही. दोन प्रकारचा इतिहास. त्या त्या जातींमध्ये पिता इ. परंपरेने तशी प्रसिद्धी किंवा त्या त्या जातीजवळच्या अन्य जातींमधील कुलक्रमाने आलेली अस्पृश्यता. आजकालच्या अस्पृश्यतेशी या दोन्ही गोष्टी

जुळत नाहीत.' **'वायवे चण्डालम'** इत्यादि वेदवाक्यामध्ये चाण्डाल जातीचा उल्लेख आहे. वेद, वेदातले शब्द अनादि आहेत. म्हणून ती जातीही अनादी आहे असे म्हणू नका. कल्पाच्या पूर्वी किंवा प्रलयात तांदूळ, गाय, खेचर इत्यादि अर्थ म्हणजे वस्तु नष्ट झाल्या तरी व्रीहित्व, गोत्व इत्यादि जातींच्या (सामान्यांच्या) नित्यत्वामुळे वेद प्रामाण्याला बाधा येत नाही. तसेच आता किंवा सृष्टिनिर्मितीपूर्वी चांडाळांचा अभाव असला तरी चाण्डालत्व ही जाती (सामान्य व्यक्ती) नित्य-सदावर्तमान असल्यामुळे ती सांगणारे वेद अप्रमाण ठरत नाहीत, कारण व्यक्तींच्या समुदायाचा नाश झाला तरी जाति नित्य असते, असा सिद्धांत आहे. शिवाय वेदात उल्लेखिलेली चाण्डालत्वजाति स्मृतींनी सांगितलेल्या संकरातूनच निर्माण झाली आहे. इतरत्र त्याला प्रमाण नाही. अशाप्रकारे वर्तमानकाळात अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्यांना (चाण्डाळांना) प्रत्यक्ष किंवा परंपरेने त्यांची संकरातून निर्मिती झाली असे प्रमाण प्राप्त होत नसल्याने अस्पृश्यत्व नाही. (प्रमाणाभावाने वर्तमानकाळात चांडाळ अस्पृश्य नाहीत.)

आजकालचे अस्पृश्य कोण तर शूद्र, असं म्हणावं लागेल. **'चतुर्थः एकजातिस्तु'** चवथ्या वर्णाचा एकदाच जन्म. इथे मनूने पिता-पितामह इ. परंपरेने नेहमीच उपनयनाचा-द्विजत्वाचा अभाव हे शूद्राचे लक्षण सांगितले आहे. पाणिनीने निरवसित (वाळीत टाकलेले) आणि अनिरवसित असे दोन प्रकारचे शूद्र उल्लेखिले आहेत. निरवसित म्हणजे गावाच्या सीमेवर, दूर रहाणारे. तो निंद्य आचरणाच्या त्यागाने, शौचाचा आधार घेऊन/आश्रय करून चांगला शूद्र होऊ शकतो.

यथा यथा हि सद्वृत्तमातिष्ठत्यनसूयकः ।

तथा तथेमं चामुं च लोकं प्राप्नोत्यनिंदितः ॥ (मनु १०.१२७)

असूयारहित होऊन तो जसजसं चांगलं आचरण करील तसा तसा तो अनिन्द्य होऊन या श्रेष्ठ लोकात प्रवेश मिळवतो.

शौचाची व्याख्या अत्रि सांगतो-

अभक्ष्य - परिहारश्च संसर्गश्चाप्यनिंदितैः ।

आचारेषु व्यवस्थानं शौचमित्यभिधीयते ॥

अभक्ष्यभक्षण टाळणे, निंदित लोकांबरोबर संपर्क टाळणे, आचारात व्यवस्था, व्यवस्थितपणा या सर्वाला शौच, शुद्धी म्हणतात. अशी कल्पना असूनही जरी शंभराहून अधिक वचने चांडालांबरोबर अस्पृश्यता पाळावी असे सांगणारी असली तरी शुद्धता-सत्ययुक्त आचरणाने, शैव-भागवत आदी धर्मांप्रमाणे आचरण केल्यामुळे जन्माने प्राप्त झालेले अस्पृश्यत्व नष्ट होते. जे जन्मसिद्ध ते दुसरा जन्म मिळाल्याशिवाय कसे नष्ट होईल असा आक्षप घेऊ नये कारण अस्पृश्यत्वाच्या जन्मसिद्धत्वाला कारण वचनांचे प्रामाण्य

हे आहे तसेच वचनांच्या आधारामुळेच ते नष्टही होऊ शकते. याच जन्मात दोन्ही बाजूंना वचनांचाच आधार आहे. शंकराचार्य म्हणतात. वचनांना अत्यंत कठीण असं काही नाही. वचन काय करू शकणार नाही ? **'वायवे चाण्डालमालभेत'** याने स्मृतीत विहित असलेला चांडाळाच्या स्पर्शाचा निषेध बाधित होतो.

आता **'शूद्राज्जातस्तु चण्डाल: सर्वधर्मबहिष्कृतः' 'प्रतिलोमा: धर्महीना:'** शूद्रापासून झालेला चांडाळ सर्वधर्मांपासून बाजूला ठेवलेला-धर्माचरणाला निषिद्ध किंवा प्रतिलोम संतती धर्महीन मानावी या याज्ञवाल्क्य-गौतम यांच्या वचनांप्रमाणे चांडालादींना शैवभागवतधर्मांचा आचरणाचाच अधिकार नाही तर त्या आचरणाप्रमाणे होणारी शुद्धी कशी होईल असे म्हणू नये. स्वत:च्या जातीला नेमून दिलेल्या धर्मांच्या पलीकडील धर्मांच्या बाबतीत अधिकार नाही हा त्याचा अर्थ घ्यावा नाहीतर त्या बाजूने केलेली वचने अनवकाश, निरोपयोगी ठरतील - त्यांना स्थान उरणार नाही. शिवाय 'स्वजाति संशोधन - स्वत:च्या जातीची शुद्धी, व्यवहारशुद्धी - व्यवहारात शुद्धता पाळणे, अपरावमानदुसऱ्यांचा/शत्रूंचा अपमान, स्वभृत्यपोषणं-स्वत:च्या नोकरांचे पोषण, स्वकर्मानुष्ठान-स्वत:च्या कर्माचा निर्वाह, इति चाण्डालधर्माः हे चाण्डालाचे धर्म, **'शूद्रणां तु सधर्माणां सर्वेऽपध्वंसजाः स्मृताः'** 'समान धर्म असलेले सर्व शूद्र' **'अपध्वंसज'** मानले जातात.' इ. मनु देवल यांची वचने अप्रमाण ठरण्याची आपत्ती येईल. गीतेमध्ये **'मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः'** माझा आश्रय करुन जे कोणी पाप-वाईट योनीतील असतील ते' हा संदर्भ-पापयोनी हा शब्द चाण्डालादींचा समावेश करतो. भागवतात ३० लक्षणांनी युक्त असा धर्म सर्व माणसांना साधारण, सारखा म्हणून सांगितला आहे त्यात चाण्डालांचाही अंतर्भाव आहेच. नारायणाच्या मुखातून ऐकलेला सनातनधर्म सांगतो -

सत्यं दया तपः शौचं तितिक्षेक्षा शमो दमः ।
अहिंसा ब्रह्मचर्यं च त्यागः स्वाध्याय आर्जवं ।
संतोषः समदृक्सेवा ग्राम्येहोपरमः शनैः ।
नृणां विपर्ययेहेक्षा मौनमात्मविमर्शनम् ।
अन्नाद्यादेः संविभागो भूतेभ्यश्च यथार्हतः ।
तेष्वात्मदेवताबुद्धिः सुतरां नृषु पाण्डव ।
श्रवणं कीर्तनं चास्य स्मरणं महतां गतेः।
सेवेज्यावनतिर्दास्यं सख्यमात्मसमर्पणम् ।
नृणामयं परो धर्मः सर्वेषां समुदाहृतः ।
त्रिंशल्लक्षणवान् राजन् सर्वात्मा येन तुष्यति ।

सत्य, दया, तप, शुद्धता, सहनशीलता, शम, दम, अहिंसा, ब्रह्मचर्य, त्याग, स्वाध्याय, ऋजुता, संतोष, समता, सेवा, ग्राम्य गोष्टींपासून दूर रहाणे, मौन, आत्म्याचा विचार, अन्नदान, समता, (देवाचे) श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा, पूजा, नम्रता, दास्य, सख्य आत्मसमर्पणम् या तीस लक्षणांनी युक्त असा माणसांचा श्रेष्ठ धर्म सांगितला आहे. (त्याच्या आचरणाने) हे राजा, सर्वात्मा त्यामुळे तुष्ट होतो. अशाप्रकारे प्रथम सनातन श्रेष्ठ धर्माचं निरूपण करून नंतर वर्ण, आश्रम, जाती यांचे धर्म सांगितले आहेत. (भाग. ११.१२.४) **वैश्याः शूद्रः स्त्रियाऽन्त्यजाः** असे म्हणून अंत्यजांचा भागवतधर्मामध्ये समावेश/ अधिकार स्पष्ट केला आहे.

स्त्रियः पतिव्रताश्चान्ये प्रतिलोमानुलोमजाः ।

लोकाश्चण्डालपर्यन्ताः सर्वेप्यत्राधिकारिणः ।

(अगस्त्यसंहिता शूद्रकमलाकारे)

पंचाक्षरः परित्राणं पतितस्यात्यंजस्य च ।

अस्य मंत्रस्य जात्यादीननपेक्ष्य प्रवर्तनात् ।।

सदाचार-विहीनस्य पतितस्यांत्यजस्य च ।

पंचाक्षरात्परं नास्ति परित्राणं कलौ युगै ॥ (शिवपुराणे उ. २)

अंत्यजा अपि तद्राष्ट्रे शंखचक्रांकधारिणः ।

संप्राप्य वैष्णवीं दीक्षा दीक्षिता इव संबभुः ॥ (काशीखंडे)

(नमः शिवाय) हा पाच अक्षरयुक्त मंत्र पतितांचे आणि अत्यंजांचे रक्षण करणारा आहे. त्याचे विधान जाती इत्यादींच्या अपेक्षेशिवाय केले आहे. सदाचरण न करणाऱ्या, पतित, अत्यंज याना कलियुगात 'नमः शिवाय' या मंत्राखेरीज दुसरे श्रेष्ठ रक्षण- कवच नाही. (शिवपुराण). त्या राष्ट्रात अत्यंज शंखचक्रादी चिन्हे धारण करणाऱ्या विष्णूची वैष्णवी दीक्षा मिळवून दीक्षितासारखे होतात. (काशीखंड)

हेमाद्रीच्या व्रतखंडात (पृ. ९९१) वराहपुराणातील एकादशीचे जागरण, उपवास, गायन यांच्या माहात्म्यात चाण्डालकथा आली आहे.

श्वपाकश्चापि सुश्रोणि मम चैवोपगायनात् ।

कृत्वा सुविमलं कर्म सोऽपि ब्रह्मत्वमागतः ॥ (इति भगवद्वचनम्)

हे सुंदरी, चाण्डालही माझे गुणगान हे सत्त्विक, शुद्ध कर्म करून ब्रह्मत्वाला प्राप्त होतो. (ब्रह्मस्वरूप होतो). (भागवत)

अंत्यजो वाऽधमो वापि मूर्खो वा पंडितोऽपि वा

पंचाक्षरजपे निष्ठो मुच्यते पापपंजरात् । (शिव पु. उ. ११)

अन्त्यज किंवा अधम, मूर्ख किंवा शहाणा, जो पञ्चाक्षरी मंत्राचा (नमः शिवाय) चा जप करतो - सतत जपतो, तो पापाच्या पिंजऱ्यातून सुटतो - त्याचे पाप नष्ट होते. (शिवपुराण)

रामनाम जपेद्यो वै मुच्यते सर्वकिल्बिषैः ।
चातुर्मास्ये विशेषणे तत्पुण्यं दशधोत्तरम् ।
हीनजातिप्रजातानां महद्दहति पातकम् ॥
पुनाति जन्मान्तरपातकानि स्थूलानि सूक्ष्माणि क्षणाच्च दग्ध्वा ॥
(स्कं.पु. चातुर्मास्यमाहात्म्ये-२४)

जो रामनामाचा जप करतो तो सर्व पापांपासून मुक्त होतो. चातुर्मास्यात रामनामजपाचे महत्त्व दसपटीहून जास्त होते. (रामनाम) हीनजातींमध्ये जन्मलेल्यांचे महापातक ते जाळून टाकते अन्य जन्मांमधील मोठ्या आणि लहान पापांना क्षणात जाळून टाकून त्याला पवित्र, शुद्ध करते.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा यदि वेतरः ।
विष्णुभक्तिसमायुक्तो ज्ञेयः सर्वोत्तमोत्तमः ।
दुराचारोऽपि सर्वाशी कृतघ्नो नास्तिकः पुरा ।
समाश्रयेदादिदेवं श्रद्धया शरणं हि यः ।
निर्दोषं विद्धि तं जंतु प्रभावात् परमात्मनः । (स्कंदपुराणे)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अन्य जो कोणी विष्णुभक्तीने युक्त होतो तो सर्वोत्तमांमधला उत्तम जाणावा. पूर्वी दुराचारी असलेला, सर्वभक्षक, कृतघ्न, नास्तिक असलेलाही जो श्रद्धेने आदिदेवाला शरण जातो त्या जंतुला परमात्म्याच्या प्रभावामुळे पापमुक्त, दोषशून्य समजावे.

यन्नामधेयश्रवणाभिधानात्, यत्प्रह्वणात् यत्स्मरणादपि क्वचित् ।
श्वादोऽपि सद्यः सवनाय कल्पते कुतः पुनस्ते भगवन्तु दर्शनात् ॥
अहो बत श्वपचोऽतो गरीयान्, यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् । (भागवतम्)

भगवंता, तुझे नाव ऐकल्यामुळे, घेतल्यामुळे, नमनामुळे, स्मरण केल्यामुळे ही क्वचितच्, कुत्रा खाणारा चांडाळही यज्ञाला अधिकारी होतो मग तुझ्या दर्शनाबद्दल काय बोलावे, तो चांडाळ (तुझ्याहून) मोठा ज्याच्या जिभेवर तुझे नाव असते. (भागवत)

'असूं दे त्यांचा भक्तीत अथवा मंत्रजपात अधिकार पण त्यांना दर्शन पूजनादींचा अधिकार नाहीच' असं म्हणू नका, कारण नवविधा भक्तीमध्ये अर्चन समाविष्ट आहे. सेवा, पूजा, वाकून नमस्कार, दासत्व, मैत्री, आत्मसमर्पण हा सर्व माणसांना विहित असा श्रेष्ठ धर्म आहे,

यात इज्या शब्दाने पूजेचा अधिकार हा सर्व मानवांना समानरूपाने असणारा धर्म आहे.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा प्रतिलोमजः ।

पूजयेत्सततं लिंगं तत्तन्मन्त्रेण सादरम् ।

(वी.मि.स्कं.पु.) (विश्वेश्वरसंहिता २१।३९)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि प्रतिलोमातून निर्माण झालेला यांनी त्या त्या मंत्राने आदरपूर्वक सतत लिंगाची पूजा करावी.

लब्ध्वा संपूजयेत् यस्तु मैत्र्यादिगुणसंहितः ।

ब्रह्मचर्यरतो भक्त्या मत्सादृश्यमवाप्नुयात् ।।

किमत्र बहुनोक्तेन भक्ताः सर्वेऽधिकारिणः । .....

मैत्री इ. गुणांनी युक्त होऊन जो पूजा करतो. ब्रह्मचारित्व पाळून, भक्तीने (पूजा करणारा) माझ्यासारखा होतो. अधिक काय सांगायचं सर्वच भक्त पूजेचे अधिकारी आहेत.

तस्मादनेन मन्त्रेण मनोवाक्कायभेदतः।

आवयोरर्चनं कुर्याज्जपहोमादिकं तथा ।

यदा कदापि वा भक्त्या यत्र कुत्रापि वा कृता ।

येनकेनापि वा देवि पूजा मुक्तिं नयिष्यति । (शि.पु.उ. १२)

म्हणून या मन्त्राने मन, वाणी, शरीराने आमची पूजा करील, अथवा जप होमादी करील, जेव्हा केव्हाही, जिथे कुठेही, ज्याने कुणीही हे देवी पूजा केली ती पूजा त्याला मुक्तीला नेईल.

यो दुर्गा पूजयेन्नित्यं श्वपचो वा जितेन्द्रियः ।

भावेन च समायुक्तो सोऽपि याति परां गतिम् ।। (२९ देवीपुराणे)

जो इन्द्रियजयी चांडाल जो नेहमी भावपूर्वक दुर्गेची पूजा करतो, तो उत्तम गतीला प्राप्त होतो. (२९ देवीपुराण)

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः स्त्रियः शूद्रान्त्यजातयः ॥

संपूज्य तं सुरश्रेष्ठं भक्त्या सिंहवपुर्धरम् ।

मुच्यंते चाशुभैर्दुःखैर्जन्मकोटिसमुद्भवैः ॥

(वी.मि.पू.प्र.नारसिंहपुराणम्)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया, शूद्र आणि अन्त्यज सिंहाचे शरीर धारण केलेल्या श्रेष्ठ देवाची पूजा करून पूजक कोट्यवधी जन्मांमध्ये निर्माण झालेल्या पापांपासून, दुःखांपासून मुक्त होतो.

एतासां शास्त्रवेत्ता च देवपूजाविधौ शुभः ।

मातृमंडलवेत्ता च ब्राह्मणः क्षत्रियोऽपि वा ।

प्रतिचारोऽ(शूद्रः)थ वैश्यो वाप्यन्यो वा तन्त्रविद्यदि ।

पूजाविधौ भवेच्छ्रेष्ठो नापटुर्न कुशीलवः ॥ (वी.मि. देवीपुराणे)

(ह्यांचा?) शास्त्रवेत्ता, मातृमण्डल जाणणारा, ब्राह्मण किंवा क्षत्रिय देवपूजेच्या विधीत शुभ असतो. शूद्र, वैश्य वा अन्य तंत्रविद् पूजेत श्रेष्ठ असतो. तो अकुशल वा नट नसावा.

भैरवोऽपि चतुर्वर्णैरन्त्यजानां तथा मतः ।

मातरः सर्वलोकैस्तु स्थाणाः पूज्याः सुरोत्तमाः ।

(देवीपुराणे) (निर्णयसिंधु)

चारी वर्णांना आणि अन्त्यजांना भैरव पूज्य/मान्य आहे. सर्व लोकांनी माता, देवांमधील उत्तम देवींच्या प्रतिमा पुजाव्यात. (देवीपुराण/निर्णयसिंधु)

सर्ववर्णैस्तु संपूज्याः प्रतिमाः सर्वदेवताः ।

(निर्णयसिंधु-वराहपुराण शुद्र कमलाकार)

सर्व वर्णियांनी सर्व देवतांच्या प्रतिमांची पूजा करावी.

शिवाय चाण्डाल वर्णान्तर्गत-वर्णांमध्ये समाविष्ट नाही असे म्हणू नये. मनूने **'वर्णान् पञ्चदशैव तु'** - पंधरा वर्णांमध्ये चांडालाचाही वर्णांमध्ये अंतर्भाव केला आहे. चांडालांना भैरवाच्या प्रतिष्ठेचा व पूजेचा अधिकार नाही असे म्हणू नये. अवधारणारूप वचनामुळे तसेच पूर्वी उल्लेखिलेल्या देवी, नृसिंह, शिवलिंगांच्या पूजनासंबंधी वचनांशी विरोध येईल म्हणूनही.

यो यै मानुषमाश्रित्य सुखसंतानकामुकः ।

तेन पूज्यो महादेवः सर्वकामार्थसाधकः । (शि.पु.उ.अ.७)

संतानसुखाची इच्छा करणाऱ्या, मानुषत्व धारण करणाऱ्या (कुणीही) त्याने सर्व कामना मिळवून देणाऱ्या महादेवाची पूजा करावी. (शि.पु.उ.अ.७)

इथे पूजेसाठी अधिकार प्राप्त होण्यासाठी मनुष्यत्व हेच प्रयोजन पुरेसे आहे. शूद्रकमलाकरात हेमाद्रीमध्ये भविष्युराणात सर्वच मानवांना विन्ध्यवासिनी देवीच्या पूजेचा अधिकार सांगितला आहे.

वैश्यैः शूद्रैर्भक्तियुतैम्लेच्छैरन्यैश्च मानवैः ।

एवं नानाम्लेच्छगणैः पूज्यते सर्वदस्युभिः ।

(दस्यवः चंडालादयः चंडालाद्यैश्च दस्युभिः)

भक्तिमान वैश्य, शूद्रांनी, म्लेच्छांनी तसेच अन्य विविध म्लेच्छ समुदायांनी, तसेच दस्यूंनी देवी पूजिली जाते.

(दस्यवः - दस्यु म्हणजे चाण्डाळ. चण्डलैश्चैव दस्युभिः - चांडाळ दस्यूंनी, असे मनूचे वचन आहे). अशाप्रकारे देवाच्या प्रतिमेच्या पूजनाचा अधिकार असेल तर आपोआपच देवालयप्रवेशाचा आणि दर्शनाचा अधिकार ओघानेच प्राप्त होतो. याचे समर्थन करणारी वचने शोधायला हवीत - लक्षात घ्यायला हवीत. पद्मपुराणात नारद भक्तीला म्हणतात -

त्वदन्विताश्च ये जीवा भविष्यंति कलाविह ।
पापिनोऽपि गमिष्यंति निर्भयं कृष्णमंदिरम् ॥

हे भक्ती! तुझ्याशी संबंधित भक्तियुक्त जे पापी लोक कलियुगात निर्भयपणे कृष्णमंदिरात प्रवेश करतील.

शिवपुराणांत अन्त्यजांना ज्योतिर्लिंगाचे दर्शन विहित आहे.

लिंगानि ज्योतिषां चात्र विद्यंते मनुसत्तमाः ।
तान्यहं कथयाम्यद्य श्रुत्वा पापं व्यपोहति ।
सौराष्ट्रे सोमनाथं च श्री-शैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकाराममलेश्वरे ।
केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां च विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।
वैद्यनाथं चिताभूमौ नागेशं दारुकावने ।
सेतुबंधे च रामेशं घुश्मेशं च शिवालये ।
हीनयोनौ यदा जातो ज्योतिर्लिंगं च पश्यति ।
तस्य जन्म भवेतत्र विमले सत्कुले तथा ।

हे मनुश्रेष्ठांनो, ज्योतिर्लिंगे जी उपलब्ध आहेत, ती सांगतो. ती ऐकून पाप नष्ट होते. सौराष्ट्रात सोमनाथ, श्रीशैलावर मल्लिकार्जुन, उज्जयिनीत महाकालेश्वर, अमलेश्वरला ॐकार, हिमालयाच्या पाठीवर केदार, दक्षिणेत भीमाशंकर, वाराणसीत विश्वेश, गौतमीतटावर त्र्यंबकेश्वर, चिताभूमीत वैद्यनाथ, दारुकावनात नागेश, सेतुबंधावर रामेश्वर, शिवालयात घुश्मेश (घृष्णेश्वर?).

हीन योनीत जन्माला आलेल्याने जर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले तर त्याचा चांगल्या शुद्ध कुळाला जन्म होतो.

देवप्रतिमेला स्पर्श करण्याचा, पूजेचा अधिकार अन्य वचनांवरून कळतो.

येऽर्चयन्ति शिवं नित्यं लिङ्गरूपिणमेव च ।

स्त्रियो वाप्यथवा शूद्राः श्वपचा ह्यन्त्यवासिनः।

ते शिवं प्राप्नुवन्त्येव सर्वदुःखोपनाशनम् ॥ (केदारखण्डं अ.८)

शिवाची किंवा शिवलिंगाची पूजा जे स्त्रीजन, शूद्र, चांडाल, अन्त्यवासी करतात. ते सर्व दु:खांचा नाश करणाऱ्या शिवाला प्राप्त होतात.

ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रो वा प्रतिलोमजः।।

पूजयेत्सततं लिङ्गं तत्तन्मंत्रेण सादरम् ॥ (विश्वेश्वरसंहिता २१।३९)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अथवा प्रतिलोमातून निर्माण झालेला यांनी आदरपूर्वक त्या त्या मंत्र्यांसह सतत लिंगांचं पूजन करावं.

(विश्वेश्वर संहिता २१.३९)

तस्मादनेन मन्त्रेण मनोवाक्कायभेदतः ।

आवयोरर्चनं कुर्याज्जेपहोमादिकं तथा ॥

यदा कदापि या भक्त्या यत्र कुत्रापि वा कृता ॥

येन केनापि वा देवि पूजा मुक्तिं नयिष्यति ॥ (शि.पु.उ.)

म्हणून या मंत्राने काया वाचा मनाने आमची पूजा करावी, तसेच जपहोमादी करावे. जेव्हा केव्हा, इथे तिथे, येनकेनापि जनाने देवीची केलेली पूजा मुक्तीला नेते. (शि.पु.उ.)

अनादिभूतभूतेशमहिमा वागगोचरः ।

महापीठे तवार्चायामस्पृश्यस्पर्शदूषणम् ।

विद्यते सुव्रते नैतल्लिंगरूपधरे हरे ॥ (महानिर्वाणतंत्रे)

सुव्रते, अनादिभूत भूतेश अशा शिवाचा महिमा वाणीने वर्णिता येत नाही. महापीठावर तुझ्या अर्चेमध्ये अस्पृश्याच्या स्पर्शाने दोष होतो. पण स्पर्शदोष लिंगरूप धारण केलेल्या शिवाला लागत नाही. (महानिर्वाणतन्त्र)

शिवाय देवमंदिरात देवतादर्शनार्थ न जाण्यामुळे होणारी अडचण-त्रास सर्व माणसांना सारखाच होतो -

यत्र कुत्रापि प्रतिमां वेदधर्मसमन्विताम् ।

न पश्यंति जना गत्वा ते दंड्या यमकिंकरैः ॥ (विष्णुधर्मोत्तरे)

वेद आणि धर्म यांनी सांगितल्याप्रमाणे तयार केलेली (देव) प्रतिमा जिथे कुठे असेल तिथे जाऊन जे लोक पहात नाहीत त्यांना यमाच्या नोकरांनीदूतांनी-शिक्षा करावी.

आता 'चाण्डाळांनी मंदिर प्रवेश केल्यावर मंदिरांची शुद्धि करावी असे विधान करणाऱ्या आगमनवचनांची काय गत' असे विचारू नका. तो संदर्भ भावभक्ति नसलेल्या चांडाळांच्या संदर्भातला होता किंवा दर्शनाच्या इच्छेशिवाय देवळात शिरलेल्याबद्दल तो असू शकेल, नास्तिकाबरोबर हा संदर्भ आहे म्हणून.

तर्कभूषण प्रमथनाथ म्हणतात की तो संदर्भ दीक्षा न घेतलेल्या चांडाळाबद्दल ते वचन असावे. शिवाय आगमग्रंथाचा विषय लाभ, पूजा, प्रसिद्धी असा काम्य असल्यामुळे पांचरात्रादि ग्रंथ प्रमाण मानू नयेत असे मीमांसकधुरीण कुमारीलाचे म्हणणे आहे. एवढ्या संदर्भांनी हे सिद्ध होत आहे की चांडालादि अन्त्यजांना शैव-भागवतधर्मांमध्ये प्रवेश आहे शिवाय सर्व देवताप्रतिमांच्या दर्शन-पूजनाचाही अधिकार निश्चित आहे.

शिवाय जो चाण्डाल 'शिव' असा शब्द बोलेल त्याच्याबरोबर बोलावे, त्याच्याजवळ रहावे. (असे अप्पयदीक्षितांनी केलेल्या श्रीकंठभाष्यटीकेतून) या श्रुतीप्रमाणे अन्यत्र स्मृतींमध्ये चंडाल संभाषण-संवादाच्या निषेधाचा प्रतिवाद (प्रतिप्रसव-निषेधाचा निषेध) केला आहे.

पुल्कसःश्वपचो वापि ये चान्ये म्लेच्छजातयः ।
तेऽपि वंद्या महाभागा हरिपादैकसेवकाः । (पद्म पु.१।५०।१०)

पुल्कस (पुत्कस) किंवा चाण्डाल शिवाय अन्य म्लेछजातीचे जे लोक हरिचरणांचे सेवक असतात ते भाग्यवंत, वंदनीयच होत. याने इतरत्र निषिद्ध मानलेल्या वंदनाचा स्वीकार केला आहे.

वैष्णवो वर्णबाह्योपि पुनाति भुवनत्रयम् ।
न शूद्रा भगवद्भक्तास्ते तु भागवता नराः ॥ (पद्म पु. माघमाहात्म्ये)
जपंति वैष्णवान्मन्त्रान्नरास्ते लोकपावनाः ।
(इति हरिभक्तिविलासोधृतागमवचनम्)

भगवंताचे शूद्र नसतात ते भागवत होतात. जे वैष्णव मंत्राचा जप करतात ते जगाला पवित्र करतात. वर्णांमधून बाहेर असलेला वैष्णव त्रिभुवनाला पवित्र करतो.

याने बाहेरच्या चांडालादींचे अन्यत्र सांगितले दर्शन, स्पर्श, आदि व्यवहारांमधील दूषण दूर करून पावकत्व सांगितले.

स्मृतः संभावितो वापि पूजितो वा द्विजोत्तम ।
पुनाति भगवद्भक्त: चंडालोऽपि यदृच्छया ॥
शूद्रं वा भगवद्भक्तं निषादं श्वपचं तथा ॥
वीक्षतेजातिसामान्यात्सयातिनरकंध्रुवम्।(इतिहाससमुच्चयवचनम्)

हे द्विजश्रेष्ठा, ज्याचं स्मरण केलं जातं, तो सभ्य आहे, पूज्य आहे असा भगवंताचा भक्त असलेला चाण्डालही आपोआप (यदृच्छया) शुद्धपवित्र करतो. भगवंताचा भक्त असलेल्या शूद्र, निषाद किंवा चांडाळाला जो त्या त्या जातीतल्या साधारण माणसाप्रमाणे मानतो, तो निश्चित नरकात जातो.

याने चाण्डालत्वरूप जातिसामान्यांसाठी सांगितलेले अदर्शनीयत्व, अस्पृश्यत्व इत्यादि अव्यवहार्यपणा यांचा निरास करून सदाचरणाचे पूज्यत्व सांगतात - सदाचारणाने चाण्डालही पूज्य, शुद्ध होतो.

न मे भक्तश्चतुर्वेदी मद्भक्तः श्वपचः प्रियः ।
तस्मै देयं ततो ग्राह्यं स च पूज्यो यथा ह्यहम् ।

(जीवगोस्वामिउद्धृतं भगवद्वचनम्)

भक्तिरष्टविधा ह्येषा यस्मिन् म्लेच्छोऽपि वर्तते ।
स विप्रेन्द्रो मुनिश्रेष्ठ स ज्ञानी स च पंडितः ।
तस्मै देयं ततो ग्राह्यं स च पूज्यो यथा हरिः ॥ (गरुडपुराणे)

चारी वेद जाणणारा माझा भक्त नव्हे, चांडाळही माझा भक्त मला प्रिय आहे. त्याला आधी देऊन नंतर घ्यावे. (तीर्थ इ.) माझ्याप्रमाणेच त्याची पूजा करावी. (जीवगोस्वामीउद्धृतं भगवद्वचमन्)

मुनिश्रेष्ठा, या आठ प्रकारच्या भक्तीत म्लेच्छही असतात. तो विप्रांमधील श्रेष्ठ समजावा. तोच ज्ञानी तोच पंडित त्याला देऊन नंतर आपण घ्यावे. तो हरीप्रमाणेच पूज्य आहे.

अशुद्धी, खोटेपणा, चोरी, नास्तिकपणा, रुक्ष शरीर, कामक्रोध, लोभ इ. गोष्टी अन्त्यजांचा स्वभाव त्यामुळे चांडालादी अस्पृश्य इ. ठरतात. वस्तुतः भागवत, शिवपुराणे आदि भक्तिशास्त्राप्रमाणे केवलं जातीने चांडाळ असणे बाधक ठरत नाही. 'मग स्मृतिवचनांचा काय उपयोग/त्यांचं काय करायच' असं म्हणू नका. उत्तम आचरणवाल्या, स्वत:चा व्यवसाय करणाऱ्यांची शुद्धता सांगणाऱ्या, आधी सांगितलेल्या पुढे सांगितल्या जाणाऱ्या वचनांना बाध येऊ नये म्हणून पुराणोक्त वचने विशेष चांडाळांच्या बाबतीत आहेत असे मानून स्मृतिवचनांचा स्वीकार करायला हवा. (सामान्य चाण्डाळांचे अस्पृश्यत्वादि स्मृतींप्रमाणे आहेच!)

वृत्तस्थो योऽपि चंडालस्तं देवा ब्राह्मणं विदुः ।

(पद्मपुराणे, मूकचांडालकथायाम्)

चांगल्या आचरणाचा जो चाण्डाल त्याला देव, ब्राह्मण मानतात. (पद्मपुराणातील, मूकचाण्डालकथेतून)

शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणो भवेत् ।

ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात्प्रत्यवरो भवेत् ॥ (भा.शां. १९१)

चारित्र्यसंपन्न, गुणवंत शूद्रही ब्राह्मण होतो. क्रियाशून्य ब्राह्मण ही शूद्राहून शूद्र समजावा. (महाभारत शांतिपर्व १९१ अ.)

सत्यं दानं क्षमाशीलमानृशंस्यं तपो घृणा ।

दृश्यन्ते यत्र नागेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥ (म.वन.१८०)

सत्य, दान, क्षमाशीलता, अक्रूरता, तप, दया या गोष्टी हे नागेन्द्रा, जेथे दिसतात, तो ब्राह्मण आहे असे जरुर समजावे. (महाभारत, वनपर्व अध्याय १८०)

यस्तु शूद्रो दमे सत्ये धर्मे च सततोऽत्थितः ।

तं ब्राह्मणमहं मन्ये वृत्तेन हि भवेद्विजः ॥ (महा. वन. ७५)

जो शूद्र, दम, सत्य, धर्म या बाबतीत सतत उद्यमशील असतो, त्याला मी ब्राह्मण म्हणतो, कारण वर्तनामुळेच ब्राह्मणत्व येते. (केवळ जन्माने नव्हे.)

म्हणूनच छांदोग्यउपनिषदात सत्यकाम जाबालाच्या सत्यवचनासत्यवर्तनामुळे त्याचे उपनयन होऊन त्याला विद्योपदेश मिळणे योग्य ठरले.

म्हणूनच अन्त्यजाच्या किंवा कृतक संन्याशांची (संन्यासी) होऊन पुन्हा संसारात पडलेल्या विठ्ठलपंतांच्या) निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपान या पतित मुलांचीही तत्कालीन समाजातील शिष्ट लोकांनी पाय धरून पूजा, सेवा केली हे योग्यच होते. भगवंताच्या उपासनेने जातीमुळेच निर्माण झालेले क्षुद्रत्व याच जन्मात नष्ट होते याला दुसरीही वचने प्रमाण आहेत -

क्षत्रियः पंचलक्षेण क्षत्रत्वमपनेष्यति ।

पुनश्च पंचलक्षण क्षत्रियो ब्राह्मणो भवेत् ।

५ लक्ष जपाने क्षत्रिय आपले क्षत्रियत्व दूर करील आणि पुन्हा ५ लक्ष जप करून क्षत्रिय ब्राह्मण होईल.

वैश्यस्तु पंचलक्षेण वैश्यत्वमपनेष्यति ।

पुनश्च पंचलक्षेण मंत्रक्षत्रिय उच्यते ।

५ लक्ष जप केल्याने वैश्य आपले वैश्यत्व सोडून देतो-गमावतो आणि अजून पुन्हा ५ लक्ष जाप जपाने तो 'मन्त्रक्षत्रिय' (=मंत्रामुळे झालेला क्षत्रिय) होतो.

पुनश्च पंचलक्षेण क्षत्रत्वमपनेष्यति ।

पुनश्च पंचलक्षेण मंत्रब्राह्मण उच्यते ॥

अजून ५ लक्ष जप करून त्याचे क्षत्रियत्व नष्ट होते. पुन्हा ५ लक्ष जप करून तो मंत्रब्राह्मण होतो. (=मंत्रामुळे झालेला ब्राह्मण)

शूद्रश्चैव नमोन्तेन पंचविंशतिलक्षतः।

मंत्रविप्रत्वमासाद्य पश्चाच्छुद्धो भवेद् द्विजः ।

(विश्वेश्वरसंहिता, शिवपुराणम् १५)

शूद्र (ॐ नमः शिवाय = शिवाय नमः) नमः (नमो) शेवटी असलेल्या मंत्राच्या २५ लक्ष आवर्तनाने मन्त्रविप्रत्व मिळून नंतर शूद्र, ब्राह्मण होतो.

वर्णान्तरगमनमुत्कर्षापकर्षाभ्यां सप्तमे पंचमे वाऽचार्याः ।

(गौतमः १।४।१८)

अन्य-वरच्या किंवा खालच्या वर्णात प्रवेश पाचव्या किंवा सातव्या पिढीत होतो. (गौतम १।४।१८)

जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः सप्तमे पंचमेऽपि वा ।

कर्मणां व्यत्ययं साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरम् ।। (याज्ञ. १.९६)

याचप्रकारे अंत्यजांचा जात्युत्कर्ष - वरील जातीत प्रवेश मिळणे होते. हाच अर्थ स्मृतींमध्ये वेगळ्या शब्दांत सांगितला आहे.

जातीचा उत्कर्ष (वरच्या जातीत - वर्णात प्रवेश) पाचवा किंवा सातव्या युगात म्हणजेच पिढीत जाणावा. कर्मात अडथळा आला तर तोच वर्ण आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणेच वर किंवा खाली जाणे होते.

तपोबीजप्रभावैस्तु ते गच्छंति युगे युगे ।

उत्कर्षं चापकर्षं च मनुष्येष्विह जन्मतः ॥ (मनु. १०)

तप आणि बीज (पिता?) यांच्या प्रभावामुळेच मनुष्यांतील काही माणसे प्रत्येक युगांत पिढीत जन्मापासून उत्कर्षाला किंवा अवनतीला प्राप्त होतात.

आर्यानार्ययोः कर्मणः व्यतिक्षेपे साम्यम् । (गौतमः २।२।६९)

यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसो वर्णाभिव्यंजकम् ।

यदन्यत्रापि दृश्येत तत्तैनैव विनिर्दिशेत् ॥ (भाग.स्कं. ७)

आर्य आणि अनार्य यांचे कर्माच्या बाबतीत चांगले वाईटपणात साम्यच असते. माणसाच्या वर्णाचे दर्शक जे लक्षण सांगितले आहे ते लक्षण अन्यत्र दिसले तर त्यालाही त्याच वर्णाचा मानावे. (भागवत स्कंद ७)

महाभारतातील आणि पुराणांमधील अन्य जाति प्राप्त होण्यासंबंधीची विधाने आणि

इतिहास हेच सांगतो की याच जन्मात साक्षात् किंवा पुरुषपरंपरेने (वंशपरंपरा) जात बदलू शकते हाच अभिप्राय दिसतो. 'हीन जातीच्या लोकांनी उच्चवर्णीयांना विहित असलेले कर्मे केल्यास त्यांचा उत्कर्ष कुठला व्हायला, त्यांना पापच लागेल' असे म्हणू नये. उच्च जातीचा होऊन त्या जातीचा व्यवसाय करून उपजीविका मिळवण्याचा फक्त निषेध आहे. नाहीतर उपनिषदांमध्ये क्षत्रियांनी केलेला ब्रह्मविद्येचा उपदेश किंवा (क्षत्रिय) भीष्मादींनी केलेला उपदेश कसा योग्य ठरेल? म्हणून निष्कर्ष हा की चांगल्या आचरणाने, भागवतादि धर्मांच्या अनुष्ठानाने (धर्म पाळण्याने) जातीमुळे निर्माण झालेली अशुद्धता याच जन्मात नष्ट होते.

वर्तमानात अस्पृश्यांच्या जन्मसिद्ध अस्पृश्यतेचे निराकरण केले नसतानाही. सार्वजनिक देवालये, पाणवठे, सभागृह इ. ठिकाणी अस्पृश्यता-दोषाचा अभाव सांगणारी - अस्पृश्यता मानू नये सांगणारी - वचनेही आहेतच. उदाहरण

संग्रामे हट्टमार्गे च यात्रादेवगृहेषु च ।

उत्सवक्रतुतीर्थेषु विप्लवे ग्रामदेशयोः ॥

अग्न्युत्पाते महापत्सु स्पृष्टास्पृष्टिर्न दुष्यति ॥ (स्मृत्यर्थसारे)

युद्धात, राजमार्गात, यात्रेत, देवालयात, उत्सव-यज्ञ-तीर्थक्षेत्र या ठिकाणी, गावात देशात आपत्ती/पूर इ. आल्यावर, आगीने थैमान घातल्यावर या आणि अशा महान आपत्तींमध्ये स्पृश्यास्पृश्यता दोषकारक नाही.

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।

उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ (अत्रिः)

देवांच्या जत्रा, विवाहप्रसंग, यज्ञप्रसंग, उत्सव इत्यादींमध्ये अस्पृश्यता दोष लागत नाही.

तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे देशविप्लवे ।

नगरग्रामदाहे च स्पर्शदोषो न विद्यते ॥ (याज्ञवल्क्य)

तीर्थस्थान, विवाह, युद्ध, देशातील उत्पात, गाव किंवा नगरात लागलेली मोठी आग, अशा ठिकाणी स्पर्शदोष नाही.

कुंडे मंचे शिलापृष्ठे नौकायां च गजे तथा ।

संग्रामे संकटे चैव स्पर्शदोषो न विद्यते । (आचारपल्लवे स्मृतिः)

पाणवठा, नाट्यमंच, पाषाणतल, नौका, हत्ती, युद्ध आणि संकट या ठिकाणी स्पर्शदोष नाही.

वापीकूपतडागानि सरांसि सरितस्तथा ।

असंवृतान्यदोषाणि मनुः स्वायंभुवोऽब्रवीत् । (शुद्धिचंद्रालोके उशनाः)

आड, विहिरी, तळी, सरोवरे, नद्या ही बंदिस्त नसलेली ठिकाणे (स्पर्श) दोषापासून मुक्त आहेत असे स्वायंभुव मनूने सांगितले आहे.

अन्त्यैरपि कृते कूपे सेतौ वाप्यादिके तथा ।

तत्र स्नात्वा च पीत्वा च प्रायश्चित्तं न विद्यते। (वि.मि.पराशरः आ.प्र.)

अन्त्यजांनी निर्माण केलेल्या विहीर, सेतु, मोठी, विहीर इत्यादींच्या पाण्याने आंघोळ केल्याने वा पाणी पिण्याने (प्याल्यावर) प्रायश्चित्त घ्यावे लागत नाही.

चाण्डाळाने विकत घेतलेल्या विहिरीतील पाणी प्याल्यास प्रायश्चित्त स्मृतींनी सांगितले आहे. मग 'त्याने स्पर्श केलेल्या कूपजलाला-त्याच्या स्वीकाराला परवानगी कशी काय देता, असे म्हणू नये!' ती वचने चांडाळाच्या मालकीच्या विहिरींबद्दल आहे, सर्व प्राण्यांच्या जीवनासाठी निर्माण केलेल्या विहिरीतळी यांच्याबद्दल नाहीत.

श्वपाकचाण्डालपरिग्रहेषु पीत्वा जलं पञ्चगव्येन शुद्धिः ।

श्वपाकचाण्डाल इत्यादींच्या मालकीच्या विहिरीतलं पाणी प्याल्यास पञ्चगव्याने शुद्ध होते. या वाक्यात परिग्रह शब्दाचा अर्थ 'मालकी' असा आहे म्हणूनच मत्स्यपुराणात वचन आहे. **प्रदद्यात्सर्वभूतेभ्यो जलपूर्ण जलाशयम्** - सर्व प्राणिमात्रांसाठी पाण्याने भरलेला जलाशय/तलाव दान द्यावा.

याच अर्थाने एक मंत्रही आढळतो -

सामान्यं सर्वभूतेभ्यो मया दत्तमिदं जलम् ।

रमन्तु सर्वभूतानि स्नानपानावगाहनैः ।

हे पाणी - हा जलाशय मी सर्व प्राणिमात्रांसाठी दान दिला आहे. पाणी पिणे, स्नान, डुंबणे या सर्व प्रकारांनी सर्व प्राणी त्यामुळे आनंदित होवोत.

शबरस्वामींनी दाखवलेल्या स्मृतिमीमांसारीतीने अस्पृश्यत्व सांगणाऱ्या स्मृतींमधील वचनांचे स्पष्टीकरण करतात. ती वाक्ये अंत्यजांच्या प्रेतावरील वस्त्रे धारण करणे, मलाचा संसर्ग इत्यादींमुळे आलेल्या अपवित्रतेशी संबंधित आहेत. ती वेदमूलक नाहीत, कारण तशी वेदवाक्ये प्रत्यक्ष दिसत नाहीत. ती वेदमूलक आहेत असा गैरसमज दृढ झाला असला तरी ते वेदात न दिसलेल्या कल्पनेवर - वेदावर अन्याय करणारे होईल.

'**कपूयचरणाः** - वाईट पायांचे - आचरणाचे' ही छांदोग्यातील श्रुती किंवा **'न जनमियात्'** - जनांकडे जाऊ नये. ही बृहदारण्यकातील श्रुती तिथे मूळ आहे असेही म्हणू नये. कारण छांदोग्यातील वचनात अस्पृश्यत्वाचे बोधकत्व त्यात नाहीच. 'कपूययाति' हा शब्द 'पापयोनी' या अर्थाचा पर्याय आहे. तो शब्द कर्माचे फळ असलेल्या गरिबी आदि दुःखांचा बोधक/दर्शक आहे.

त्याचा संबंध कर्मविपाकाशी आहे. शंकराचार्यांच्या मते बृहदारण्यकवाक्यातील 'जन' शब्द वैदिक लोकांच्या विरोधी असलेल्या व्यक्तीचा निर्देश करतो. तसा माणूस, तो चाण्डाल नव्हे. वास्तविक तेथे प्रकरणावरुन जनशब्द हा संसर्गाने पापी ठरलेल्यापासून उत्पन्न झालेल्या विषयासक्त माणसाचा वाचक आहे. लोकांत रुढ असलेला आचार कसा मोडीत काढणार असेही म्हणू नये. त्या शास्त्रमूलक प्रमाणाचा आधार नसल्याने तो रुढ असलेला आचार परिवर्तनासच योग्य आहे.

कारणाद् धर्ममन्विच्छेन्न लोकचरितं चरेत् ।

लोकात चालू असलेल्या (अनिष्ट) रुढी पाळू नयेत. समाज धारणेसाठी धर्मतत्त्व शोधून काढावीत. (महाभारत १२२६२) महाभारतातील जाजलिसंवादात कारण म्हणजे समाजसंस्थेची धारणा असा अर्थ हवा हा शिष्टाचार परंपरेने पाळला जातो, स्मृतींमध्ये शिष्टाचार प्रमाण मानला आहे, असा प्रतिवाद करणे योग्य नाही. **सर्वभूतदयावन्तस्ते शिष्टाः शिष्टसंमताः** - सर्व प्राणिमात्राबद्दल जे दयावान - दयाळु असतात, तेच शिष्ट, शिष्टांना योग्य वाटतात. (महाभारत वनपर्व अ. २११) अशाप्रकारे शिष्टसंमत आचार हे निश्चितपणे रुढाचार - रुढ असे आचार, होतातच असे नाही.

निमित्तामुळे येणारे अस्पृश्यत्व तीन प्रकारच आहे. पतन करण्यासारखे पतन घडवणारे, पाप केल्यामुळे येणारे अपवित्र द्रव्याला स्पर्श केल्यामुळे अस्तित्वात येणारे आणि जन्ममरण आदि प्रसंगामुळे निर्माण झालेले त्यातील पहिला प्रकार विवादाचा विषय ठरलेल्या चाण्डालजातीला लागू पडत नाही, व्यक्तिगतत्व असल्याने जातिच्या बाबतीतला विचार निरुपयोगी ठरतो. तशी वैयक्तिक पतनाची कल्पना केल्यास ते प्रायश्चित्त घेऊन दूर करता येते, कारण मनु आपस्तंब यांनी पतिताच्या बाबतीत प्रायश्चित्ताचे विधान सांगितले आहे.

एनस्विर्भिरनिर्णिक्तैर्नार्थं किञ्चित्समाचरेत् ।

कृतनिर्णेजनाश्चैव न जुगुत्सेत कर्हिचित् ।। (मनु. ११.१९०)

पाप ज्यांच्याकडून घडले आहे त्यांनी जर प्रायश्चित्त घेतलं नाही तर त्यांच्याबरोबर व्यवहार करू नये. उलट ज्याने प्रायश्चित्त घेतलेले आहे त्याच्याशी वाईट वागू नये.

चांडाल हे पतितांची संतती नव्हेत, कारण तसे प्रमाण नाही. ते तसे असले तरी ते स्वभावतःच ते शुद्धच असतात 'इन्द्रिययुक्त असतो तो पतित होत नाही. (न ते सेन्द्रियः पतति) अशुद्धत्वकल्पनेबद्दल बौधायनाने प्रायश्चित्त सांगितले आहे. अशुद्ध शुक्रातून निर्माण झालेल्यांना पतितांच्या १/३ प्रायश्चित्त असावे. पतिताचा पुत्र सर्वांच्या मताने जन्मतः शुद्धच असतो. दुसरी गोष्ट त्यांमध्ये कोणाकोणात शक्य आहे. स्मशानातील वस्त्रे वगैरे धारण करणे, प्रेताला स्पर्श केल्यानंतर आंघोळ न करण्यामुळे आलेले अपावित्र्य, स्नानाने आणि शुद्ध स्वच्छ कपडे घातल्यावर दूर होतो. तिसरा पर्याय वाव नसलेला आहे.

शूद्रांचा यज्ञधर्मातील अधिकार श्रुतीच सागते. यज्ञ शब्द पूजायाम् । यज् धातूचा अर्थ यज्ञ, दान, एकत्र आणणे हा आहे.

मित्राय पञ्च येमिरे जनाः अभिष्टिशवसे ।

स देवान् विश्वात् बिभर्ति ।। (क्र. ३.४.६–८)

पञ्चजन - निषाद हा ज्यातला पाचवा आहे असे ४ वर्ण कोशातून हेच मत बादरी आचार्यांनी सांगितले. विजयकारक बल असलेल्या मित्रांच्या हुकूमात पंचजन वागतात. तो सर्व देवांनाही धारण करतो.

यत्पांचजन्यया विशेन्द्रे घोषा असृक्षत । (ऋ. ६।४।४३।७)

निषादपंचामाश्चत्वारो वर्णाः । (सायण)

निमित्तार्थेन बादरिः तस्मात्सर्वाधिकारं स्यात् ।

निमित्तामुळे बादरायण (म्हणतात) म्हणून सर्वाधिकार असावा.

श्रीकेवलानंदयतेश्चरित्रसार:

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

श्रीकेवलानंदयतेश्चरित्रसारः

श्रीकेवलानन्दयतेश्चरित्रसारः

शान्तस्वान्तो योगजादात्मधर्मात्
सिद्धस्तन्त्रं तारयन् जैमिनेर्यः ।
धन्यं धीरं धारिणं मोक्षलक्ष्म्याः
प्राज्ञाचार्यं केवलं तं प्रणौमि ॥

अस्मद्गुरुः श्रीकेवलानन्दस्वामी 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् । यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम् ॥' (भ. गीता ८।१३) इति भागवतं सिद्धान्तमनुसृत्यान्तकाले अपुनरावृत्तिमाकाङ्क्षन् अक्षरं ब्रह्मणोऽभिधानभूतमोङ्कारमुच्चारयन् तल्लक्ष्यं भगवन्तमनुस्मरन् स्वीयं विनश्वरं देहं परित्यज्य पारमेश्वरं परमं पदं प्राणशे शके १८७८ फाल्गुने शुक्लपक्षे सप्तम्याम् । तेन मीमांसाकोषो विरचितः संन्यासाश्रमप्रवेशानन्तरमेव । 'ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत्' इति जाबालश्रुतिमनुसंदधानेन चतुष्पञ्चाशत्तमे वयसि ब्रह्मचर्य समाप्य स्वयंस्थापितसंस्थायाः 'प्राज्ञपाठशाला' इत्यभिख्यायाः कार्याद्विरम्य संन्यासाश्रम आश्रित आसीत् । परिव्रज्याया अङ्गीकरणोत्तरं अन्तिमोच्छ्वासपर्यन्तं त्रय्यर्थचिन्तनपरेण धर्मब्रह्मपरे उभये पूर्वोत्तरमीमांसे विमृश्य विविदिषूणामुपकाराय (१) पदसूची-सूत्रसूचीसहितः अधिकरणसंज्ञाविमर्शयुक्तः पाठभेदचर्चान्वितः जैमिनीयमीमांसासूत्रपाठः (मुद्रितः), (२) मीमांसाकोषः (क्रमशः भुद्रणयन्त्रस्थ), (३) कौषीतकिब्राह्मणारण्यकविषयकोषः (मुद्रितः), (४) ऐतरेयब्राह्मणारण्यकविषयकोशः (मुद्रितः), (५) तैत्तिरीयमन्त्रसूची (अमुद्रिता), (६) तैत्तिरीयशाखाविषयसूची (अमुद्रिता), (७) सत्याषाढसूत्रविषयसूची (अमुद्रिता), (८) शांकरभाष्यपरिभाषाकोषः (अमुद्रितः), (९) अद्वैतसिद्धेर्मराठीभाषान्तरम् (अमुद्रितम्), (१०) नव्यवेदान्तपरमाणुमाला अद्वैतसिद्धयन्तर्गतसिद्धान्तवाक्यकोषात्मिका (अमुद्रिता) इत्येते ग्रन्थाः प्रणीताः । तेन प्रणीतानां अमुद्रितानां ग्रन्थानां हस्तलिखितानि प्राज्ञपाठशालामण्डलसंस्थायाः संग्रहे सुरक्षितानि स्थापितानि सन्ति । तेषां मुद्रणं प्रकाशनं च द्रविणलाभानुकूल्ये सति कर्तुमिच्छामः । एतत् सर्वगृन्थप्रणयनं तेन विनैवान्येषां धनादिरूपं

साहाय्यं निर्वर्तितम्, धनपरिग्रहं वान्तनिगरणमित्र प्रव्रज्याश्रमानुसारेण मत्वा।

कौमारावस्थामारभ्य संन्यासाश्रमस्वीकरणकालपर्यन्तमपि देहधारणमात्रपर्याप्तं भैक्षममृतमिव मत्वा जीवितयात्रा तेन निर्वाहिता । यौवने एव संन्यस्तसंकल्पस्य तस्य बाह्यलक्षणपरिवर्तनरूप एव संन्यासपरिग्रह आसीदिति तस्य ब्रह्मचर्यावस्थाचरित्रं सूचयति। तस्य चरित्रसारकथने नात्रानवसरदोषः प्रसरति इति तत् संक्षिप्य कथयामः।

केवलानन्दसरस्वतीति तस्याभिधा संन्यासाश्रमीया, न पितृकृता । पितृकृतं तन्नाम च नारायण इति । कोङ्कणप्रदेशे कुलाबामण्डले रोहे इति राजकीयोपभागे सुडकोलीग्रामे शके १७९९ मार्गशीर्षशुक्लपक्षे चतुर्थ्यां प्रातः एकादशवादनसमये चित्पावनाख्यायां ब्राह्मणोपजातौ प्रसिद्धे मराठे इत्यभिहिते कुले सदाशिवात्पितुः पार्वत्या मातुश्च नारायणस्य जन्माभूत् । पितुः सदाशिवस्य द्विविधोपजीविकाऽऽसीत् पौरोहित्यं कृषिकर्म चेति । वयसो दशमवर्षपर्यन्तं पितृभ्यां वात्सल्येन परिपाल्यमानो गौरस्तप्तकनकसमकान्तिः सुकुमारो दृढाङ्गश्चायं बालां नारायण: प्राथमिकीं शिक्षां लेखनवाचनगणितरूपां संध्याव-न्दनदेवपूजारुद्राध्यायादिब्रह्मकर्मसहितां पितुरेव प्राप्तवान् । भगवद्भक्तिपरायणौ मातापितरौ ईश्वरभजनप्रणिधानपरं धर्मं भागवतोत्तममुनीनां चरित्रकथनद्वारा बालायैव पुत्रायोपदिदिशतुः। एकादशे वयोवर्षे गुरुकुलवासाय प्रोत्साहितो नारायण: अलीबागनगरं समागमत् । देवोपनाम्नः केशवशास्त्रिणः गृहे वर्षद्वयम् लोण्ढे इत्युपनाम्नः दामोदरशास्त्रिणश्च गहे वर्षषट्कमुषित्वा संस्कृतसाहित्यम्, किञ्चित् पाणिनीयं व्याकरणम्, हरिकीर्तनपद्धतिम्, संगीतं च नारायणोऽधिजगाम । नारायणः अस्मिन्नष्टवर्षात्मके काले गुरुगृहे वसन् गुरोः कृते गृहसंमार्जनम्, पाकनिष्पत्तिः, गोदोहनम्, पाकादिपात्रशोधनम् गुरुतत्पुत्रपत्न्यादीनां वस्त्रधावनम्, गृहोपकरणव्यवस्थापनम्, आपणात् गुरुकुलोपयोगिक्रीतवस्त्वाहरणं इत्यादीनि कर्माणि शरीरायासमपरिगणय्य अकृतज्ञैर्गुरुसंबन्धिभिः परिचर्यान्यूनतान्वेषिभिः कृतमधिक्षेपं चोपेक्ष्य गुरोस्तत्संबन्धिनां चित्तप्रसादनाय निरवर्तयद्ध्ययनमात्रकामः।

दामोदरशास्त्रिणः संनिधौ संस्कृतविद्यामधिगम्याप्यपरितुष्टः उच्चतरशास्त्रस्तरमधिजि गमिषुर्नारायणः सातारामण्डलस्थं वाईनगरं प्रति प्रस्थितः । शके १८२० आश्विने मलमासे प्रथमसप्ताहे कृष्णातीरस्थवाईनगरमागम्य बहूनां गुरूणां संनिधौ वेदान् शास्त्राणि चाधीतवान्। ऋग्वेदो मेणवलीकरोपनाम्नः विष्णुशास्त्रिणः यजुर्वेदो रानडे इत्युपनाम्नः बालम्भट्टात्, व्याकरणं करन्दीकरोपनाम्नः विष्णुशास्त्रिणः नव्यन्यायश्च डेंग्वेकरोपनाम्नः बालशास्त्रिणः अधिगतः । मेणवलीकर: विष्णुशास्त्री पुस्तकमनाश्रित्य ऋग्वेदस्य समग्रस्य साङ्गस्य पदक्रमजटाघनादिविकृतियुतस्य कण्ठत एव पठने समर्थ इति भारते काशीतो रामेश्वरपर्यन्तं विश्रुत आसीत् । रानडे बालम्भट्टः कण्ठतो घनान्तयजुर्वेदाध्यायी श्रौते स्मार्ते च कर्मणि निपुणो धर्मशास्त्रे निष्णातमतिरासीत् । डेंग्वेकर: बालम्भट्टः पुस्तकमनवलम्व्य शिष्येभ्यो व्याकरणं महाभाष्यपर्यन्तम्, न्यायं च गादाधरीपर्यन्तमध्यापयदकुण्ठितमतिः । स खलु

श्रीमद्भागवतपुराणस्य कथासरित्सागरस्य मध्ययुगीनभगवद्भक्तप्रणीतमराठीकाव्यानां च संस्मर्ताऽधिवक्ता चाऽऽसीत् । वेदशास्त्रनिष्णातधिषणो महापण्डितोऽप्यसौ पत्नीदुहितृसहितो गृहाश्रमे वसन्नपि ऐहिककाममुक्तः स्थिरमतिः परित्यक्तसर्वपरिग्रहः असंगृहशीलोऽयाचनेन कस्मादपि दातुरेकाहजीविकां लब्ध्वैव परिसंतुष्टोऽयाचकवृत्त्या जीवन्नायुरत्यवहत् । पण्डितोऽपि बालैः पामरैश्च जनैः सह संलापरुचिर्नित्यस्वाध्यायशीलो भगवद्ध्यानपरायणो जिजीव वयसो व्यधिकसप्ततिवर्षपर्यन्तम् । तत: प्लेगातङ्कनिमित्तेन चेमं लोकं विजहौ ।

शरीरमनोबुद्धिबलसंपन्नोऽव्याजेन धर्माचरणशीलो गुरुपरिचरणपरो भगवच्छरणो नारायणशास्त्रीत्यभिधानेन लोके निर्दिश्यमानो वेदवेदाङ्गान्यधीत्य पाणिनिकणादाक्ष-पादप्रणीतनयानधिगच्छन्नपि सर्वेषा अपराविद्येति मन्वानः ऐहिकामुष्मिकजीवनस्य क्षयिष्णुतां पश्यन् तस्मिन्विरज्यमानो मुमुक्षुः श्रुतविनयसंपन्नं साधुशीलं युवानं योगपट्टाभिषिक्तं संसारादुद्दिधीर्षुं वेदान्तपारंगतं प्रज्ञानन्देति विख्यातं गुरुमुपशिश्रिये त्रयोविंशे वयोवर्षे । नारायणशास्त्री स्वात्मचरित्रलेखे अस्मिन् संदर्भ लिखति .. " इतः परं सद्गुरो: परमहंसस्य प्रज्ञानन्दस्य स्वामिन: संबन्धे किञ्चिल्लेखनीयम् । कथं वा तत्संबन्धे वस्तुतो लेखनं संभवति ? 'यतो वाचो निवर्तन्ते' इति कृत्वा । 'तथापि स्मर्तृणां वरद परम मङ्गल्मसि' इति लेखनीयं किमपि । गुरोः पूर्वाश्रमनाम कृष्णशास्त्रीति । गौरीशंकरपुत्रः परांजपेकुलोत्पन्नः स भ्रातृत्रयसंपन्न आसीत् । विवाहानन्तरमचिरात्तरुण्याः पत्न्याः मरणात्पुनर्विवाहमकृत्वैव स्थितः कृष्णशास्त्री । कृष्णशास्त्रिणः कुले स्वाव्यवहितत्रिपुरुषपर्यन्तं वेदस्य श्रौतयज्ञस्य धर्मादिशास्त्रस्य च प्रावीण्यं अग्निहोत्रानुष्ठानं च प्रावर्तत । स्वयं कृष्णशास्त्रिणा स्ववेदशाखा, श्रौतयाज्ञिकी, ज्योतिष्टोमसामगायनम् संस्कृतभाषाव्युत्पन्नता चाधिगता आसीत् । तदात्वे च वाईनगरे प्रसिद्धयोः संन्यासिनोः भूमानन्दरामानन्दयोः वेदान्तपाठकयोः सविधे शाङ्करं प्रस्थानत्रयभाष्यं कृष्णशास्त्रिणा श्रुतम् । तत्समनन्तरं प्रस्थानत्रयभाष्याध्यापने द्वारकाख्यदेवालये गीताभाष्यमारभ्य कृष्णशास्त्री प्रवृत्तः । पञ्चाधिकत्रिंशत्तमे वयसि शके १८१३ संन्यासाश्रमं प्रविष्टः । रामानन्दशिष्यः ब्रह्मानन्दनामा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजितो महाविरक्त आसीद्वाईक्षेत्रे । तस्मात् संन्यस्तेन कृष्णशास्त्रिणा योगपट्टः स्वीकृतः प्रज्ञानन्देत्यभिधा च प्राप्ता । वाईग्रामविभागे गङ्गापुर्यां कृष्णातीरस्थप्रस्तरावतारसमीपे वर्तमाने मुरलीधरमठे स्थित्वा प्रज्ञानन्दस्वामिना वेदान्तप्रवचनमारब्धम् । व्यतीते कियतिचित्समये प्रज्ञानन्देन दातारमठ आश्रितः । स्वामिना एतत्स्थलं पुनः परित्यज्य दातारमठात् पश्चिमायां दिशि अव्यवहितस्थितस्य भग्नप्रायस्य द्रविडकुप्पशास्त्रिस्वाभिकस्य गृहे वेदान्तप्रवचनं नित्यं पुनः प्रवर्तितम् । ततः पुनः कालान्तरेण तदपि स्थानं त्यक्त्वा दातारमठादाग्नेय्यां दिशि नवीकृतस्य मारुतिमन्दिरस्य द्वितीयतले प्रस्थानत्रयमपाठयद्देहावसानपर्यन्तम् । वयं प्रत्यहं तत्र प्रणामार्थमगच्छाम ।"

"एकदा एकादश्यां तिथौ भाष्यपाठश्रवणेच्छावशात् प्रज्ञानन्दस्वामिनः संनिधावहमगमम् ।

'नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च । यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च ॥' इत्येतत् केनोपनिषद्वचनभाष्यस्य प्रवचनं गुरुणा समापितं पाठान्ते। अध्यात्मानुभवसारभूतं वाक्यमेतत्। ब्रह्मानुभवस्वरूपाविष्कारकरं माहात्म्यमस्मिन्वाक्येऽस्ति । आत्मानुभवानुप्राणिते भाषणे प्रवीण आसीत्प्रज्ञानन्दस्वामी । नारायणशास्त्री तस्य लक्ष्य आसीत् । एतादृशाः श्येना इव अप्रमादेनैव लक्ष्यवेधिनो लक्ष्यान्वेषणे कुशला भवन्ति । विद्धो लक्ष्यः कल्याणमृच्छति । मम स्वामी बहुमानेन मां निर्दिशति स्म । अहं आ शैशवाद्वेदान्तानुकूलचित्तवृत्तिरासम् । तत्केनोपनिषद्वाक्यप्रवचनं श्रुत्वैव नारायणशास्त्रिणः बुद्धिस्तन्मयी* जाता । **'वाक्यादेवापरोक्षधीः' इति सद्गुरुकृपैव फलिता ।"**

"काशीतो रामेश्वरपर्यन्तं मत्स्वामिनः शारीरकभाष्यप्रवचनख्यातिः **प्रसृताऽऽसीत्** । बहवो विद्वांसो वाईनगरमागत्य मत्स्वामिनो दर्शनं तत्प्रवचनश्रवणं च कृत्वैव प्रतिन्यवर्तन्त । रात्रौ एकान्तसमये सामानि गायन् 'विठ्ठल विठ्ठल, जय जय विठ्ठल' इति भगवन्नामसंकीर्तनं वा कुर्वन् मत्स्वामी ईश्वरप्रणिधाने रत आसीत् । **वाईग्रामे प्लेगोपद्रव** उद्भूतः शके १८२६ आश्विने मासि । तस्मिन्नेव मासि शुद्धाष्टम्यां तिथौ प्लेगसंसर्गदोषात् त्रिदोषग्रस्तमिमं देहं हित्वा मम स्वामी ब्रह्मण्यनन्ते लीन। तदनन्तरं शके १८२७ संवत्सरमारभ्य शांकरगीतोपनिष-द्ब्रह्मसूत्रभाष्यप्रवचनायाहं प्रवृत्तः ।"

"स्वाध्यायप्रवचनयोस्तपस्येव च आयुः क्षपणीयं इति अहं निरदीधरं वयसः त्रयोविंशतितमे वर्षे शारीरिकम्, मानसिकम्, बौद्धिकं च बलमनुकूलमिति मत्वा । गृहाश्रमो नावलम्बनीय इत्यपि निरचिनवम् । विना द्रव्यार्जनं न गृहाश्रमः कर्तुं पार्यते, **द्रव्यार्जनं च प्रायः सव्याजपूजया लाङ्गूलचालनेन स्वाभिमानराहित्येन च दोषेण विना** कर्तुं न पार्यते इत्यमदर्शम् | अतिदुःसहं पारतन्त्र्यम्, तस्मिन् स्वोन्नतिर्न शक्येति वारंवारं अमंसि प्रत्यज्ञासि च यावज्जीवं भिक्षया वर्तिष्य इति । **त्रयोविंशतितमं वर्षमारस्य त्रिपञ्चाशद्वर्षपर्यन्तं संन्यासग्रहणक्षणावधि अध्यापनं तप इति मत्वा निरवर्तयम् । स्नानं संध्यां योगाभ्यासं तृतीयप्रहरादौ भिक्षां भोजनं निद्रां च विहाय मम सर्वः कालोऽध्ययनाध्यापनयोर्व्यतीतः ।** मध्ये मध्ये प्रसङ्गानुसारेण सामाजिके राजकीये **चान्दोलनेऽपि किञ्चित्कार्यं मया कृतम् ।"**

अयमंशः अस्मद्गुरोः केवलानन्दस्य मराठीभाषायां लिखितात्स्वात्मचरित्रादुद्धृत्यात्र संस्कृतेऽनूद्य च निवेशितः ।

ईशवीयवत्सरे १९०१ अस्मद्गुरुणा अध्यापनं प्रारब्धं गोडबोलेकुलनाम्नः सखम्भट्टस्य गृहे स्थितिं लब्ध्वा । त्रयश्चत्वारो वा विद्यार्थिनः संस्कृताध्ययनार्थं प्रथममागताः । वर्षपञ्चकादुत्तरं तेन गोडबोले-गृहं त्यक्त्वा गङ्गापुर्यां कृष्णातीरस्थप्रस्तरघट्टसंनिधौ वर्तमाने स्वगुरुस्थाने निवासार्थमेत्य प्राज्ञमठाख्या संस्कृतपाठशाला स्थापिता । अस्यां पाठशालायां सामान्यतस्त्रिंशत्संख्याका विद्यार्थिनो न्यवसन् पञ्चमहाकाव्यानि, वैष्णवभागवतम् व्याकरणम्, वेदान्तम्, न्यायम्, धर्मशास्त्रमन्यानि च दर्शनानि अध्यैषत च। उत्तमश्रेणीप्रविष्टास्ते

---

* ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः । भगद्गीता १७ । २३

प्रथमश्रेणीगतान् विद्यार्थिनः अपाठयन् आचार्यकार्यभागं लघूकर्तुम् । एतेऽध्ययनाध्यापनयोः रता विद्यार्थिनः क्रमशः शिक्षिता अध्यापनकार्यकौशलमपि प्राप्नुवन् । दीपाद्दीपान्तरमिव आचार्यादन्य आचार्योऽनया शिक्षाप्रणाल्या प्रादुरभूत् । भारतीयप्राचीनपद्धतिमनुरुध्यैव प्राज्ञमठे शिक्षाविधिरनुसृतः । परन्तु कण्ठतो दाढ्र्ये पाठधारणस्य महिमा प्राचीनपद्धत्यां यावता आग्रहेण धृत आसीत्तावानाग्रहः अस्मदाचार्येण नावलम्बितः । अतः कण्ठतः कोषधारणं परित्यक्तम् । कोषपाठस्थाने अन्यत्साहित्यं कण्ठतो धारणार्थमध्यापनविषयेषु निवेशितम् । कालिदासादिषूपलभ्यमानोत्तानशृङ्गारोऽपि पाठयविषयक्रमाद्वर्जितः । केचिदाधुनिका अपि विषया इतिहासभूगोललौकिसाहित्यपदार्थविज्ञानादयः पाठ्यक्रमे निवेशिताः । लौकिकव्यवहारे आधुनिकपश्चिमदेशोद्भूतसंस्कृतेश्च ज्ञानमावश्यकमिति हृदि निधाय तद्विषयाणि पुस्तकानि च पाठयक्रमेऽन्तर्भावितानि । शास्त्री धर्मोपदेशकश्च वर्तमानदेशकालपरिस्थितिज्ञो यथा भवेत्तथाविधः शिक्षाक्रमोऽस्मदाचार्येण नारायणशास्त्रिणा स्वसंस्थायाःकृते अङ्गीकृतः ।

प्राज्ञमठः प्राज्ञपाठशालाख्यां यथा प्राप्तस्तदत्रावसरप्राप्तं कथ्यते । 'समर्थविद्यालयः' इति नाम्ना विश्रुता राष्ट्रीयपाठशाला पुण्यपत्तनमण्डलस्थ 'तळेगावदाभाडे' ग्रामसंनिहितवने स्थापिताऽऽसीत् विष्णुं गोविन्दपुत्रं विजापूरकरकुलोद्भवं पुरस्कृत्य कैश्चित् स्वदेशं वैदेशिकपारतन्त्र्यादुद्दिधीर्षुभिराधुनिकशिक्षितैः । ईशवीये १९१० वत्सरे ब्रिटिशप्रभुभिः 'समर्थविद्यालयः आङ्ग्लसम्राजः विरोधं ब्रिटिशप्रभुत्वस्य विद्रोहं च राष्ट्रीयशिक्षामिषेण अध्यापयति' इत्यपराधमारोप्य विध्वंसितः । तत्रत्याः कतिपयाः प्रौढा विद्यार्थिनः प्राज्ञमठमागत्य राष्ट्रीयशिक्षाप्रणाल्याः पुनः प्रवर्तनार्थं वेदान्ताध्ययनार्थं च न्यवसन् । स्वदेशनिर्मितमात्रवस्तुक्रयणं परदेशनिष्पन्नवस्तुबहिष्कारः स्वराज्यार्थप्रयत्नो राष्ट्रीयशिक्षाप्रवर्तनं चेति चतुर्विधं कार्यक्रममादृत्य वर्तितव्यमिति एतेषां विद्यार्थिनां समुद्दिष्टमासीत् । तेषु कानडेकुलनामा दिनकरशास्त्री, दिवेकरकुलनामा महादेवशास्त्री च राष्ट्रीयशिक्षाप्रणाल्या प्राज्ञमठे अध्ययनं प्रवर्तनीयमिति मनसि निधाय मुख्याचार्यं नारायणशास्त्रिणं प्रति साहाय्यमकुरुताम् । ईशवीये १९१६ वत्सरे सप्टेम्बरमासे **शके १८३६ संवत्सरे आश्विने मासि विजयादशम्यां प्राज्ञमठस्य प्राज्ञपाठशाला इति नामकरणं कृतम् ।**

विद्यार्थिनां यत्र विद्याधिगमस्तत्र जीवनम्' न प्रातिस्विके गृहे वासः पाठशालायां च अध्ययनमित्येवं नियमः अस्याः पाठशालायाः कृते विहितः । विद्यार्थिनां वसतिगृहे प्रातरारभ्य रात्रौ शयनपर्यन्तं विद्यार्थिनां विविधाचरणस्य विशिष्टा पद्धतिरप्यनुशासिता । सा यथा - प्रातः उषःकाले प्रबोधनसमनन्तरं प्रातःस्मरणीयस्य वैदिकस्य सूक्तस्य, देवतास्तोत्राणां राष्ट्रभक्तिभावान्वितगीतानां च सर्वैर्विद्यार्थिभिर्नियतसमये उत्थितैरेकत्रावस्थाय पठनम्, दन्तधावनादिशौचक्रिया, शीतोदकस्नानम्, संध्यावन्दनम्, सूर्यनमस्कारादिव्यायामः,

शिक्षकाणां शिष्याणां च सामूहिकी प्रार्थना, मध्याह्नभोजनसमयपर्यन्तं माध्यमिकशिक्षाकार्यक्रमानुसारेण उच्चशिक्षाक्रमानुसारेण च वर्गभेदेन पाठग्रहणम्, सर्वेषां सहभोजनम्, मध्याह्ने भोजनोत्तरं विश्रमः, पुनश्च पाठग्रहणं संध्यासमयपर्यन्तम्, संध्यासमये शारीरव्यायामपरा क्रीडा प्राङ्गणे व्यायामगृहे वा, सायंसंध्यावन्दनम्, रात्रिभोजनम्, स्वाध्यायः, शयनं च इत्येवंप्रकारेण विरामदिवसव्यतिरिक्तेषु दिवसेषु अध्यापकानामध्याप्यानां च कालविभागेन कार्याणि क्रमनियतानि कृतानि।

वैदेशिकाङ्ग्लराज्यपारतन्त्र्येण समुत्पन्ना ये दोषाः स्वात्मविश्वासनाशः, प्रज्ञाहानिः, ऐक्यभावनालोपः, परावलम्बनमित्यादयस्तेषां समूलमुत्खननकरी, भारतीयानां स्वधर्मेषु स्वपरंपरागतसंस्कृतौ शश्वनीतिधर्मेषु च विवेकयुक्तश्रद्धोत्पादिका या सा राष्ट्रीयशिक्षेति व्याख्याता प्राज्ञपाठशालासंस्थापकैः । पारतन्त्र्येण मृतप्रायस्य राष्ट्रस्य संजीवनं यथा स्यात्तथा नवीनानां विचाराणां प्रवर्तका देशकालपरिस्थितिभेदानुसारेण परंपरापरिवर्तनाय विवेचकबुद्धिवादमाश्रिताः भगवद्भक्तेः राष्ट्रभक्तेश्च समन्वयकारिणा दृढशुद्धभावेन समुपबृंहितचित्ताः शीलवन्तोऽन्धपरंपराविध्वंसिनः परंपरागतसंस्कृतिमूलतत्त्वानामेव संरक्षणाय संनद्धाः पण्डिता धर्मोपदेशका नागरिका एव पारतन्त्र्येण विपन्नस्य दुर्बलस्य भारतराष्ट्रस्य समुद्धाराय प्रभवेयुरिति तादृशनागरिकनिर्माणमेव राष्ट्रीयशिक्षोद्देश इति समुद्घोषितो राष्ट्रीयशिक्षासिद्धान्तः प्राज्ञपाठशालासंस्थापकैः । आङ्ग्लप्रणीतशिक्षापद्धति-वैदेशिकराज्यसेवकनिर्माणयन्त्रमिति सा पद्धतिर्हेया, परन्तु आङ्ग्लभाषासाहित्यान्तर्गतज्ञान-विज्ञानकलाः सर्वथा संग्राह्याः, यतः पाश्चात्त्यज्ञानविज्ञानकलानां परिग्रहेणैव बलशालिनो नवजीवनसंपन्नस्य भारतराष्ट्रस्योदयः संभवति, नान्यथा इति तेषां निश्चय आसीत्। किञ्च या हि आधुनिकविद्याकलासंस्कृतिविमुखानां भारतीयपरंपरागतपूर्वतनाचारविचारानेव सारसर्वस्वं मन्यमानानां 'सामाजिकरूढिरेव पवित्रा कल्याणकारिणी, तद्विरोधः पापावहः' इति श्रद्धावतां मार्गेण न भारतः समुन्नतिपथं प्राप्नुयादित्यपि तैर्निर्णीतमासीत्।

प्रथमजागतिकमहायुद्धोत्तरं भारते राष्ट्रस्वातन्त्र्यप्राप्तये परंपरागतसामाजिकरूढि-परिवर्तनाय च आन्दोलने प्रवृत्ते, ययोरान्दोलनयोर्महात्मा गान्धी प्रधाननेताऽभवत् । प्राज्ञपाठशालाशिक्षकाः शिष्याश्च राष्ट्रीयस्वातन्त्र्यान्दोलने सामाजिकधार्मिकपरिवर्तनान्दोलने च साहाय्यं नेतृत्वं चाऽऽचरितवन्तः । नारायणशास्त्रिणा तच्छिष्यमहादेवशास्त्रिलक्ष्मण-शास्त्रिभ्यां च सामाजिकपरिवर्तनान्दोलने मुख्यतः धार्मिकाणां सभासु सामाजिकपरि-वर्तनस्य धर्मशास्त्रगृन्थानालोड्य तर्कपरिबृंहितं समर्थनं कृतमिति परिवर्तनवादिपक्षः अपरिवर्तनवादिरूढिनिष्ठपक्षइतिपक्षद्वयंसंस्कृतपण्डितेषुसमुद्भूतम्।धार्मिकसामाजिकसंस्थासु आचारमार्गे च परिवर्तनं न मूलतो धर्मविघातकम्, प्रत्युत धार्मिकतत्त्वसामर्थ्यवृद्धये एव प्रभवति इत्येवंविधां विचारसरणीमनुसृत्य परिवर्तनवादिपक्षे बहवो विद्वांसो महाराष्ट्रे प्रविष्टाः। धर्मशास्त्रेतिहासकार : काणे इत्युपाह्वः वामनसूनुः पाण्डुरङ्गः, दप्तरीत्युपाह्वः लक्ष्मणपुत्रः

केशवः नागपूरस्थः, पाठक: श्रीधरशास्त्री, चित्रावः सिद्धेश्वरशास्त्री, भिडे सदाशिवशास्त्री, चापेकरेत्युपाह्वो गोविन्दपुत्रो नारायणः कोगजे रघुनाथशास्त्री इत्यादिभिः धर्मशास्त्रविद्भिः पंण्डितैर्नैष्ठिकब्रह्मचारिणस्तपोविद्यावदातचित्तस्य नारायणशास्त्रिणो नेतृत्वं स्वीकृत्य धार्मिकेषु सामाजिकेषु चाचारेषु आधुनिककालमनुसृत्य परिवर्तनमपरिहार्यमादरणीयं चेति उद्घोष्य परिवर्तनान्दोलनं प्रचारितम्। हिन्दुसमाजगतानां जातीनामुपजातीनां च परस्परं सहभोजनं विवाहश्च संमतः कृतोऽनेन परिवर्तनपक्षेण। गान्धीमहात्मना प्रवर्तितास्पृश्यतोच्छेदनान्दोलनोपोद्बलनायैतैः पण्डितैरावेदितम् - अन्त्यजा इति स्मृतिशास्त्रे निर्दिष्टानां जातीनामस्पृश्यता चातुर्वर्ण्येन परम्परया समाचरिता सर्वेण हिन्दुसमाजेनोच्छेद्येति। उपनयनविवाहादिसंस्काराः सर्वैर्हिन्दुभि: वैदिकमन्त्रैः गृह्यसूत्रानुसारेण कार्याः इत्यभ्युपगतमेतेन धर्मपरिवर्तनवादिपक्षेण। तेषां संस्कारकर्मणां दीर्घविस्तारं परिहाय यथा अनुष्ठानं कर्तव्यं तथा संक्षिप्ता पद्धतिरपि नारायणशास्त्रिणा प्रणीता संन्यासाश्रमप्रवेशानन्तरं केवलानन्देत्यभिख्यां प्राप्तेन।

सतातनमतावलम्बिनोऽपरिवर्तनवादपक्षीयाः पण्डिताः स्मृतिषूपलभ्यमानानां जात्याद्याचारधर्माणामदृष्टफलकत्वान्मनुष्यबुद्धया परिवर्तनं न सहन्ते। अदृष्टफलकार्यकारणभावो मनुष्यबुद्धेरगम्य इति निर्धार्य स्मृतिशास्त्रेषूपलब्धानां परस्परविरुद्धवचनानां पूर्वमीमांसोक्तपद्धत्या विरोधपरिहारं भिन्नस्मृतीनां समन्वयं च स्थापयन्ति, सर्वेषां स्मृत्यविरोधिनां कुलधर्मदेशधर्मजात्यादिधर्माणां रूढिस्वीकृतानामपि सनातनत्वमपरिवर्तनीयत्वं च मन्वते। एतद्विरोधेन परिवर्तनवादिपक्षः पूर्वमीमांसोक्तपद्धत्या विरोधपरिहारेऽपरितुष्यन् ऐतिहासिकपद्धतिमङ्गीकरोति, जात्याद्याचारपरिवर्तनं च समर्थयति-- यथा युगे युगे ऋषिभिर्वा शिष्टैर्वा जनैर्वा तत्तद्देशकालपरिस्थितिविशेषानुसारेण लोकहितार्थमनुष्ठातृशक्तिभेदमधिकारभेदं चावेक्ष्य परम्परागता धमाचाराः परिवर्तिताः नवीनाश्च प्रवर्तिताः, तथा अधुनाप्याधुनिकैर्विद्वद्भिः सद्भिः परिवर्तनीयाः प्रवर्तनीयाश्चेति।

अस्मद्गुरुचरणैः परिवर्तनवादपक्षसमर्थनाय ऐतिहासिकपद्धतिरङ्गीकृता। ऐतिहासिकपद्धतिसमर्थनाय धर्मशास्त्रप्रमाणानामन्वेषणप्रवृत्तास्ते वेदस्मृतिपुराणानां वचनसंग्रहः साकल्येन कर्तुमिष्ट इति विचार्य धर्मकोशकार्यालयं प्राज्ञपाठशालामण्डलसंस्थाद्वारा स्थापितवन्तः ईशवीये १९२७ तमे वत्सरे केषाञ्चिदन्तेवासिनां साइकार्येण। ईशवीये १९३१ तमे वत्सरे एतद्धर्मकोशकार्यस्य प्रत्यवायपरिहाराय ऐकाग्र्येण निर्वर्तनाय च संकल्पितम् -- यत् माध्यमिकशिक्षाशाखा प्राज्ञपाठशालाङ्गभूता न रक्षणीया, चित्तविक्षेपहेतुत्वादल्पफलत्वाच्च। अल्पफलत्वं च माध्यमिकशिक्षाया हि य उद्देश: प्राचीनभारतीयसंस्कृतितत्त्वरक्षणानुरोधेन राष्ट्रीयशीलशालिनो नागरिका निर्मातव्याः इति तमुद्देशं श्रद्दधानाः शिक्षका न लभन्ते माध्यमिकशिक्षानिर्वाहार्थमिति। अतः माध्यमिकशिक्षाशाखाकार्यमितः परं नाङ्गीकरणीयमिति। इदं नारायणशास्त्रिपादानां मतं नादृतं तत्सहकारिभिरन्यैः संस्थाकार्यवाहैः। अतः प्राज्ञपाठशालामण्डलसंस्थाया: अध्यक्षपदं सदस्यत्वं च सर्वथा

परित्यक्तमाचार्यचरणै: । ततश्च ते शके १८५३ विजयादशम्यां (ईशवीयाब्दे १९३१ तमे ऑक्टोबरमासे २२ दिनाङ्के) प्रातः परिव्राजकाश्रमं प्रविष्टाः ।

प्राज्ञपाठशालासंस्थाप्रपञ्चान्निवृत्तेषु गुरुचरणेषु संस्थायाः सर्वः कार्यभार: मयि न्यस्तः प्राज्ञपाठशालामण्डलकार्यकर्तृभिस्तदध्यक्षपदं मह्यं दत्त्वा । माध्यमिकशिक्षाशाखा उत्सृष्टव्या इत्येतत् गुरुचरणमतं युक्तमासीदिति मया वर्षत्रयादूर्ध्वं स्वीकृत्य तच्छाखाकार्यं सर्वेषामैकमत्येन विरमितम्, धर्मकोशकार्यं संस्कृतविद्याशिक्षाकार्यं च अनुवर्तितमद्ययावत् । गुरुचरणाश्च तदुत्तरं परिव्राजकावस्थायामैकाग्र्येण जैमिनीयबादरायणीयमीमांसयोर्मनने, तदनुसंधानेन ग्रन्थलेखने, ब्रह्मचिन्तने, ध्यानयोगाभ्यासे च चिरं स्थिताः । प्राप्ते च प्रयाणसमये दीर्घकालं निरन्तरं निरन्तरायं च जपितस्य प्रणवस्यैकाक्षरब्रह्मणो व्याहारमुच्चैः कृत्वा केवले ब्रह्मणि लीनाः । तैः प्रणीतग्रन्थानां मुद्रणप्रकाशनकार्यस्य कर्तव्यता प्राज्ञपाठशालामण्डलसंस्थया गुरुचरणानामृणापाकरणाय स्वीकृताऽस्तीति ।

तस्यैतस्य गुरुचरणचरित्रसारस्य संक्षिप्य निवेदनं परिसमाप्यते ।

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष: प्राज्ञपाठशालामण्डलस्य
वाई नगरी

मराठी भाषांतर

प्रा. डॉ. सौ. आशा रवींद्र गुर्जर,

यति केवलानन्द यांचे संक्षिप्त चरित्र

योगोत्पन्न स्वधर्मामुळे अंत:करण शांत झालेल्या, जैमिनीच्या शास्त्राचा उद्धार करून सिद्ध झालेल्या, धन्य, धैर्यवान, मोक्षश्रीला धारण करणाऱ्या त्या प्राज्ञाचार्य केवलांना मी प्रणाम करतो.

आमचे गुरु श्रीकेवलानंद स्वामी यांनी शके १८७८ फाल्गुन महिना शुक्ल सप्तमी या दिवशी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला.

'ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्।
यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम्' (गीता ८.१३)

माझे स्मरण करून ॐ या एकाक्षर ब्रह्माचा उच्चार करून जो देहत्याग करतो तो परम गतीला प्राप्त होतो, या भागवतसिद्धांताला अनुसरून, पुनर्जन्म घ्यावा लागू नये अशा अपेक्षेने, अक्षर ब्रह्माच्या वाचक ॐकाराचा उच्चार करीत, त्याचे लक्ष्य असलेल्या भगवंताचे स्मरण करीत देहत्याग करून परमपवित्र असे ते परमेश्वर पदाला प्राप्त झाले.

संन्यासाश्रमात प्रवेश केल्यानंतरच त्यांनी मीमांसाकोष रचला. **'ब्रह्मचर्यादेव प्रवजेत्'** ब्रह्मचर्याश्रमातूनच संन्यास घ्यावा या जाबालश्रुतीला अनुसरून वयाच्या चौपन्नाव्या वर्षी ब्रह्मचर्य संपवून स्वतः स्थापन केलेल्या 'प्राज्ञ पाठशाळा' या संस्थेच्या कामाला विराम देऊन निवृत्त होऊन ते संन्यस्त झाले. परिव्राजक झाल्यानंतर शेवटच्या श्वासापर्यंत ते वेदत्रयीचे चिंतन करीत राहिले. धर्मपरायण आणि ब्रह्मविवेचक अशा पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसाचा अभ्यास करून जिज्ञासूंच्या उपकारासाठी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. ते ग्रंथ असे - १) पदसूची-सूत्रसूचीसह, अधिकरणसंज्ञाविमर्शयुक्त पाठभेद-चर्चासहित जैमिनीयमीमांसा सूत्रपाठ (मुद्रित), २) मीमांसाकोश (मुद्रित), ३) कौषीतकिब्राह्मणारण्यक-विषयकोश (मुद्रित) ४) ऐतरेयब्राह्मणारण्यककोश (मुद्रित), ५) तैत्तिरीयमन्त्रसूचि (अमुद्रित) ६) तैत्तिरीयशाखाविषयसूचि (अमुद्रित), ७) सत्याषाढसूत्रविषयसूचि (अमुद्रित) ८)

शांकरभाष्यपरिभाषाकोश (अमुद्रित), ९) अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर (मुद्रित) १०) नव्य वेदांतपरमाणुमाला - अद्वैतसिद्धीमधील सिद्धांत वाक्यांचा कोश (अमुद्रित). त्यांनी रचलेल्या ग्रंथाची हस्तलिखिते प्राज्ञपाठ-शाळेच्या व्यवस्थापनाने सुरक्षित ठेवली आहेत. धन प्राप्त होताच त्यांचे मुद्रण प्रकाशन केले जावे असे आमच्या मनात आहे. संन्यासाश्रमात धनस्वीकार हा ओकलेले गिळण्यासारखा मानून ग्रंथनिर्मितीचे काम त्यांनी कुणाकडूनही धनाचा स्वीकार, मदत न घेताच पार पाडले.

कुमारावस्थेपासून संन्यासस्वीकारापर्यंतचा सर्व काळ केवळ देहधारणेइतकेच भिक्षान्न मिळवून ते अमृताप्रमाणे मानून त्यांनी जीवनयात्रा चालविली. तारुण्यातच संन्यास घ्यायचा त्यांचा संकल्प असल्याने त्यांचे संन्यासग्रहण म्हणजे फक्त बाह्यलक्षणे बदलण्यापुरतेच होते, हे त्यांच्या ब्रह्मचर्याश्रमातील वर्तनावरून दिसून येते. त्यांचे चरित्र सांगणे उचित आहे, न सांगण्यातला दोष टाळण्यासाठी ते थोडक्यात सांगत आहोत.

केवलानंद सरस्वती हे त्यांचं नाव संन्यासी झाल्यावर मिळालेले. त्यांच्या पित्यांने त्यांचं नाव 'नारायण' असं ठेवलं होतं. कोंकण प्रदेशातल्या कुलाबा तालुक्याच्या रोहा भागातल्या सुडकोली गावात शके १७९९ मध्ये मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थीला सकाळी ११ वाजता त्यांचा जन्म झाला. मराठे हे चित्तपावन आडनाव. वडिलांचे नाव सदाशिव, आई पार्वती. कुटुंबाची उपजीविका पौरोहित्य व शेती यावर चाले. दहाव्या वर्षापर्यंत मातापित्यांच्या लाडाकोडात नारायण वाढला. गोरा, तापलेल्या सोन्यासारखी उज्ज्वल कांती. सुदृढ कुमार वडिलांजवळ लेखन, वाचन, गणित या प्राथमिक गोष्टी शिकला. संध्यावंदन, देवपूजा, रुद्राध्याय वगैरे ब्रह्मकर्म वडिलांनीच त्याला शिकविले. ईश्वरभक्तिपरायण आईवडिलांनी, उत्तम भागवत धर्मियांच्या गोष्टी सांगून त्याच्यावर ईश्वरभजनरूप धर्माचा संस्कार केला-उपदेश दिला. अकराव्या वर्षी गुरुकुलात रहाण्यासाठी नारायण अलिबागला गेला. केशवशास्त्री देवांकडे दोन वर्षे आणि नंतर दामोदरशास्त्री लोंढे यांच्याकडे सहा वर्षे तो अध्ययनासाठी राहिला. तेथे संस्कतसाहित्य, थोडे पाणिनीय व्याकरण, हरिकीर्तनाची पद्धत आणि संगीत शिकला. या आठ वर्षांच्या काळात गुरूच्या घरी, घर झाडणे, स्वयंपाक करणे, गाईची धार काढणे, स्वयंपाक इत्यादींची भांडी घासणे, गुरु त्यांचे मुलगे, पत्नी यांची वस्त्रे धुणे, घरातल्या सामानाची व्यवस्था लावणे, घरात लागणारं सर्व सामान खरेदी करून आणणे इत्यादि कामे, शरीराला पडणाऱ्या श्रमांची पर्वा न करता करीत असे. शिक्षणाच्या तीव्र इच्छेमुळे गुरूच्या नातेवाईकांचा कृतघ्नपणा, सेवेतले दोष शोधणे, त्यांनी केलेला अपमान या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून गुरूला प्रसन्न करण्याचा तो प्रयत्न करीत राही.

दामोदरशास्त्रींजवळ शिकूनही समाधान न झाल्यामुळे अधिक वरच्या स्तरावरील शिक्षणासाठी नारायण सातारा जिल्ह्यातल्या वाई गावात आला. अश्विन हा पुरुषोत्तम

मास पहिला सप्ताह. शके १८२० मध्ये कृष्णतीरावर नव्याने अध्ययन सुरू झाले. विष्णुभट्ट मेणवलीकर यांचे कडे ऋग्वेद, बाळंभट्ट रानडेंकडून यजुर्वेद, विष्णुशास्त्री करंदरीकरांकडे व्याकरण आणि बाळशास्त्री डेंग्वेकरांकडून ते नव्यन्याय शिकले. काशीपासून रामेश्वरपर्यंत विष्णुभट्ट मेणवलीकरांचे ऋग्वेदावरचे प्रभुत्व प्रसिद्ध होते. वेदांगांसह ऋग्वेद त्यांना पद, क्रम, जटा व घन आदी विकृतींसह मुखोद्गग होता. बाळंभट्ट रानडे घनान्त यजुर्वेदाचे अध्ययन झालेले होते, श्रौत आणि स्मार्त कर्मकांडात प्रवीण होते. धर्मशास्त्रातही त्यांना उत्तम गती होती. बाळंभट्ट डेंग्वेकर महाभाष्यान्त व्याकरण, पुस्तकाचा आधार न घेता शिकवीत. गादाधरीपर्यंत न्यायशास्त्रही असंच सहजपणे शिकवीत. शिवाय ते भागवत-पुराण, कथासरित्सागर आणि मध्ययुगीन भक्तिमय मराठी काव्यांचे अभ्यासक व भाष्यकार होते. वेद आणि शास्त्र या दोन्हींमध्ये सारखेच निष्णात असलेला हे महापंडित पत्नी आणि कन्या यांनी युक्त संसारी असूनही वृत्तीनं विरक्त होते. म्हणूनच ऐहिक कामनांपासून मुक्त, स्थितप्रज्ञ, सर्वस्वी दानाचा स्वीकार न करणारे, कसलाही ही संग्रह न करणारे, याचना न करणारे, कोणत्याही दात्याकडून एका दिवसाला लागेल तेवढेच स्वीकारणारे, अत्यंत संतुष्ट असे अयाचक वृत्तीने त्यांनी जीवन घालवले. पण्डित असूनही ते लहान मुले, दीन लोक यांच्याशी बोलण्यात रस घेत. ७२ वर्षांचे आयुष्य त्यांनी स्वाध्याय आणि भगवताच्या ध्यानात मग्न राहून व्यतीत केले. प्लेगचे निमित्त होऊन त्यांना मृत्यू आला.

शरीर, मन, बुध्दी या सर्वांनी बलसंपन्न, दंभशून्य, धर्माचरणी, गुरुसेवातत्पर, भगवंताला शरण गेलेल्या नारायण मराठेला लोक नारायणशास्त्री म्हणू लागले. वेदवेदांगे अभ्यासून, पाणिनी, कणाद, अक्षपाद यांच्या शास्त्रग्रंथांचे अध्ययन संपवूनही तो या विद्येला 'अपरा' विद्या मानीत असे. ऐहिक - पारलौकिक जीवनातील नश्वरता पाहून, त्याबद्दल विरक्त होऊन त्याच्या मनात मोक्षेच्छा निर्माण झाली. म्हणून तो वेदवेदांगपरांगत, सच्चरित्र, तरुणपणीच संन्यासदीक्षा घेतलेल्या संसारसागरातून तरून जाऊ इच्छिणाऱ्या प्रज्ञानंद नावाने प्रसिद्ध असलेल्या गुरूंना तेविसाव्या वर्षीच नारायण शरण गेला. नारायणशास्त्री आपल्या आत्मचरित्रात या संदर्भाने लिहितात - "आता सद्गुरु परमहंस प्रज्ञानन्द स्वामींबद्दल काहीतरी लिहायला हवे पण कसे लिहिणार 'यतो वाचो निवर्तन्ते' ज्याचे वर्णन करायला वाणी समर्थ नाही अशी स्थिती आहे तरी लिहायला हवे कारण **'तथापि स्मर्तृणां वरद परमं मङ्गलमसि'**- तसे असले तरी स्मरण करणाऱ्यांना तू वर देणारा, त्यासाठी अत्यंत पवित्र आहेस. गुरूंचे पूर्वाश्रमींचे नाव कृष्णाशास्त्री. परांजपे कुळात जन्म आणि वडिलांचे नाव गौरीशंकर. कृष्णशास्त्रींना तीन भाऊ होते. विवाहानंतर थोडयाच काळाने तरुण पत्नी मरण पावल्यावर कृष्णशास्त्रींनी पुन्हा विवाह केला नाही. शास्त्रींच्या कुळात स्वत:ला धरुन गेल्या तीन पिढ्यांमध्ये वेदाध्ययन, श्रौतयज्ञ, धर्मशास्त्रप्रवीणता आणि अग्निहोत्र संभाळणे या गोष्टी आचरणात होत्या. स्वतः कृष्णशास्त्रींनी स्ववेदशाखाध्ययन, श्रौत याज्ञिकी,

ज्योतिष्टोमसामगायन आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवलेले होते. त्यावेळी वाईनगरात प्रसिद्ध असलेल्या रामानंद आणि भौमानंद या वेदांत शिकवणाऱ्या संन्याशांजवळ बसून कृष्णशास्त्रींनी प्रस्थानत्रयीवरील शांकरभाष्य ऐकलं होतं. नंतर लगेचच ते द्वारकादेवालयात गीताभाष्याने सुरवात करून प्रस्थानत्रयभाष्य शिकवू लागले. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी शके १८१३ मध्ये त्यांनी संन्यासाश्रमात प्रवेश केला. वाईक्षेत्रात रामनंदांचा एक शिष्य ब्रह्मानंद ब्रह्मचर्याश्रमातूनच संन्यासी झालेला महाविरक्त होता. त्यांच्याकडून कृष्णशास्त्रींना संन्यासाची वस्त्रे आणि प्रज्ञानंद हे नाव मिळाले. वाईमध्ये गंगापुरीत कृष्णेच्या घाटावरील मुरलीधर-मठात राहन प्रज्ञानन्दानी वेदान्तप्रवचनाला सुरुवात केली. काही काळ गेल्यावर प्रज्ञानंदांनी दातारमठात आश्रय घेतला. पुन्हा ही जागा सोडून दातारमठाच्या पश्चिमेला जवळ असलेल्या द्रविड कुप्पुशास्त्रींच्या मालकीच्या घरात नियमाने वेदांतप्रवचनांना सुरुवात केली. नंतर काही काळ लोटल्यावर पुन्हा दातारमठाच्या आग्नेय दिशेला जीर्णोद्धार केलेल्या मारुतिमंदिराच्या दुसऱ्या मजल्यावर, देहावसानापर्यंत प्रस्थानत्रय शिकवले. मी तेथे दररोज नमस्कार करण्यासाठी, दर्शनार्थ जात असे. एकदा एकादशीच्या दिवशी भाष्यपाठ ऐकण्यासाठी मी प्रज्ञानन्द स्वामींकडे गेलो. **'नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च। यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च।'** या केनोपनिषदातील वचनावर भाष्य करून गुरूंनी प्रवचन पूर्ण केलं - पाठाचा समारोप केला. अध्यात्माच्या अनुभवाचे तात्पर्य असेच हे वाक्य आहे. 'मला ब्रह्म नीटसे कळले नाही' (असे जेव्हा शिष्य म्हणतो तेव्हा गुरु त्याला म्हणतो - तुला काहीतरी समजले आहे) शिष्य म्हणतो 'मला काही समजले नाही'. आमच्यापैकी जो 'मला ब्रह्म समजले नाही' म्हणतो त्याला ब्रह्म समजले. आत्मानुभवाने भारलेल्या भाषणात प्रज्ञानन्द प्रवीण होते. त्यांच्या त्यावेळच्या भाषणाचे लक्ष्य नारायणशास्त्री होते. अशांसारखे ससाणेच जराही चूक न होऊ देता लक्ष्यवेध घेणारे, लक्ष्याचा शोध घेण्यात तरबेज असतात. त्यांनी वेध घेतलेल्या लक्ष्याचे कल्याण होते. माझे स्वामी माझा आदरपूर्वक निर्देश करीत. मी बालपणापासूनच वेदान्ताला अनुकूल अशा चित्तवृत्तीचा होतो. ते केनोपनिषद् वाक्यावरील प्रवचन ऐकताना नारायणशास्त्रींची जाणीव तन्मय (ब्रह्ममय) झाली. **ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः (गीता १७.२३) ॐ,** तत् आणि सत् या तीन शब्दांनी ब्रह्माचा निर्देश केला जातो. **'वाक्यादेवापरोक्षधीः'** (वचनाबरोबरच प्रत्यक्ष प्रत्यय साक्षात्कार) असे सद्गुरुकृपेचे फळच प्राप्त झाले.

काशीपासून रामेश्वरापर्यंत माझ्या गुरूंची त्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्यप्रवचनांची प्रसिद्धी झाली होती. अनेक विद्वान वाईला येऊन माझ्या स्वामींचे दर्शन घेत. त्यांच्या प्रवचन-श्रवणाचा लाभ घेत असत. रात्री एकांतात सामगायन करीत किंवा 'विठ्ठल विठ्ठल, जय जय विठ्ठल' असा नामाचा गजर करीत ते ईश्वरचरणी लीन होते. अश्विन महिन्यात शके १८२६ मध्ये वाईत प्लेगची साथ आली. अश्विन महिन्याच्या शुक्लाष्टमीला प्लेगाच्या संसर्गाने या तीन

दोषांनी युक्त देह सोडून स्वामी अनंत ब्रह्मात विलीन झाले. त्यानंतर शके १८२७ पासून मी प्रस्थानत्रयीवर शांकरभाष्यसह प्रवचनाना प्रारंभ केला.'

स्वाध्याय प्रवचनरूप तपातच आयुष्य खर्ची घालायचं असा निश्चय वयाच्या तेविसाव्या वर्षीच केला. तेव्हा शारीरिक मानसिक आणि बौद्धिक बळ अनुकूल होतं. गृहस्थाश्रम स्वीकारायचा नाही हेही ठरवून टाकलं. धन न मिळवता गृहस्थ होणे शक्य नाही. धन मिळविण्यासाठी बहुधा दांभिकपणे कुणाचा मानसन्मान करावा लागणे, लांगूलचालन, गोंडा घोळवणे, स्वाभिमान सोडून देणे इ. दोष पत्करावे लागतात हे मी पहात होतो. अत्यंत असह्य असे पारतंत्र्य असेल तर आत्मोन्नती शक्य होत नाही. हे वारंवार मनात ठसवलं. 'भिक्षेवर उपजीविका करायची' अशी प्रतिज्ञा केली. तेविसाव्या वर्षापासून त्रेपन्नाव्या वर्षी संन्यास घेईपर्यंत अध्यापन तप म्हणून आचरलं. स्नान, संध्या, योगाभ्यास, तिसऱ्या प्रहरी भिक्षा मागून भोजन आणि झोप सोडून माझा सर्व वेळ अध्ययन आणि अध्यापनातच कारणी लागत असे. अधूनमधून प्रासंगिकपणे सामाजिक आणि राजकीय आंदोलनांमध्येही मी थोडेफार काम मी केले.''

(हा भाग आमचे गुरु केवलानन्द यांच्या मराठीत लिहिलेल्या आत्मचरित्रातून उद्धृत करून संस्कृत संक्षेपाचे हे भाषांतर)

इ.स.१९०१ मध्ये सखंभट्ट गोडबोल्यांच्या घरी राहून आमच्या गुरूंनी अध्यापनाला प्रारंभ केला. प्रथम संस्कृत शिकण्यासाठी ४/५ विद्यार्थी आले. पाच वर्षानंतर गोडबोल्यांचे घर सोडून गंगापुरीत कृष्णातीरावरील दगडी घाटाजवळील स्वत:च्या गुरूंच्या जागेत रहाण्यासाठी येऊन, 'प्राज्ञमठ' नावाची संस्कृत-पाठशाळा स्थापन केली. या पाठशाळेत सामान्यतः तीस विद्यार्थी रहात असत. पंचमहाकाव्ये, वैष्णव भागवत, व्याकरण, वेदान्त, न्याय, धर्मशास्त्र आणि इतर दर्शने ते शिकत असत. आचार्यांचा कामाचा ताण कमी करण्यासाठी वरच्या वर्गातील विद्यार्थी पहिल्या-प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांना शिकवत. अशाप्रकारे अध्ययन आणि अध्यापन करण्यात मग्न असलेले विद्यार्थी क्रमशः सुशिक्षित आणि शिकवण्यातही तज्ज्ञ होऊन जात. दिव्याने दिवा लावावा त्याप्रमाणे आचार्यांमुळे अन्य दुसऱ्या आचार्यासारखा आचार्य या शिक्षण-पद्धतीमुळे तयार होई. प्राचीन भारतीय शिक्षणप्रणालीला अनुसरूनच प्राज्ञमठातलं शिक्षण चालत होतं. परंतु मौखिक परंपरेने पाठ ग्रहण करण्याचे महत्त्व प्राचीन पद्धतीत फारच होते, त्याचा अत्याग्रह होता. आमच्या गुरूंचा तसा आग्रह नव्हता. त्यांनी कोषपाठांतराचा आग्रह सोडून दिला. कोश पाठांतराऐवजी इतर विषयांचे पाठांतर अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले. कालिदासांच्या कृतींमध्ये असलेला उत्तानशृंगार पाठ्यक्रमातून वगळण्यात आला. इतिहास, भूगोल, लौकिक साहित्य, पदार्थविज्ञान इ. आधुनिक विषयांचा समावेश पाठ्यक्रमात करण्यात आला. लौकिक व्यवहारात नव्या काळातील पाश्चात्य संस्कृतीचा परिचय असणे आवश्यक असा विचार

करून त्यासंबंधीची काही पुस्तके अभ्यासक्रमात अंतर्भूत केली गेली. शास्त्री, धर्मोपदेशक हा वर्तमानकाळ, देश, परिस्थिती यांची जाण असलेला हवा हा हेतु मनात धरून आमच्या गुरूंनी-नारायणशास्त्रींनी-स्वत:च्या संस्थेतील अभ्यासक्रमाची योजना केली.

प्राज्ञमठाचे रूपांतर, नामांतर 'प्राज्ञपाठशाळा' असे का व कसे झाले ते ओघात, सांगायला योग्य वेळ आहे म्हणून सांगतो. भारतीयांना परदेशीयांच्या पारतंत्र्यातून स्वदेशाला बाहेर काढण्याची इच्छा असलेल्या, आधुनिक पद्धतीने शिक्षण घेतलेल्या काही युवकांनी विष्णु गोविंद विजापूरकर यांच्या नेतृत्वाखाली 'समर्थ विद्यालय' ही राष्ट्रीय शिक्षण देणारी राष्ट्रीय-पाठशाळा संस्था पुणे जिल्ह्यातल्या तळेगाव दाभाडे जवळच्या वनात स्थापन केली. इ.स.१९१० साली ब्रिटीश अधिकाऱ्यांनी ही संस्था 'राष्ट्रीय शिक्षणा'च्या नावाखाली आंग्लसाम्राज्याला विरोध आणि ब्रिटीश राज्यसत्तेशी विद्रोह-बंड करीत आहे, असा आरोप ठेवून संस्था बंद पाडली. तेथील काही प्रौढ विद्यार्थी राष्ट्रीय शिक्षण पद्धतीच्या पुनरुज्जीवनासाठी आणि वेदांत शिकण्यासाठी प्राज्ञमठात रहायला आले. फक्त स्वदेशी वस्तुच विकत घेणे, परदेशी वस्तुंवर बहिष्कार घालणे, स्वराज्यार्थ प्रयत्न आणि राष्ट्रीय शिक्षण देणे हे चार उद्देश समोर ठेवून संस्था चालवावी असे त्यांचे मत होते. दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर यांनी प्राज्ञमठात अध्ययन राष्ट्रीय-शिक्षण पद्धतीप्रमाणे चालावे म्हणून अध्यापन साहाय्य केले. इ.स. १९१६ मध्ये सप्टेंबरात (शके १८३६ अश्विन महिना) विजयादशमीच्या मुहूर्तावर प्राज्ञमठाचं प्राज्ञपाठशाळा असे नामकरण झाले.

जिथे विद्यार्थ्यांचा अभ्यास चालतो तेथेच त्यांनी रहावे, स्वगृही राहू नये, असा नियम या पाठशाळेसाठी करण्यात आला. वसतिगृहामध्ये प्रात:काळापासून रात्रीपर्यंतचा कार्यकलापासह दिनक्रम-विशिष्ट आचरणाचे नियम, निश्चित करण्यात आले. सकाळी उठल्याबरोबर उष:काली वैदिक सूक्ते, देवतास्तोत्रे, राष्ट्रभक्तिभावयुक्त स्तोत्रगीतांचे सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सांघिकरीत्या पठण, वैयक्तिक स्वच्छता, थंड पाण्याने आंघोळ, संध्यावंदन, सूर्यनमस्कारासारखा व्यायाम, शिक्षक आणि शिष्य यांची सामूहिक प्रार्थना होई. मध्यान्ह भोजनाच्या वेळेपर्यंत माध्यमिक आणि उच्च शिक्षण क्रमानुसार वेगवेगळ्या वर्गांमध्ये पाठ चालत. सर्वांचे बरोबरच जेवण होई. नंतर थोडी विश्रांती. मग पुन्हा पाठ घेणे संध्याकाळपर्यंत चालू राही. संध्याकाळी शारीरिक व्यायाम होईल असे प्रांगणात खेळ किंवा व्यायामशाळेत मुले व्यायाम करीत. नंतर सायंसंध्यावंदन, रात्रीचे जेवण मग प्रत्येकाचा स्वतंत्र स्वाध्याय आणि निद्रा. असा दिनक्रम, सटीचे दिवस सोडन होता. त्यात विद्यार्थी व शिक्षक यांच्या वेळाचे आणि अपेक्षित कार्याचे नियोजन व्यवस्थितप्रकारे आखलेले होते.

आत्मविश्वासाचा नाश, बुद्धिहीनतागंड, ऐक्यभावनेचा अभाव, परावलंबन इत्यादि दोष भारतीयांमध्ये परदेशीय आंग्लशासनामुळे निर्माण झाले आहेत. त्यांना समूळ उखडून टाकणारी, भारतीयांमध्ये स्वधर्मावर, स्वत:च्या परंपरागत संस्कृतीमध्ये, सनातन

नीतिधर्मावर विवेकयुक्त श्रद्धा निर्माण करू शकेल तीच राष्ट्रीय शिक्षण पद्धती अशी व्याख्या प्राज्ञपाठशाळा संस्थापकांनी केली आहे. पारतंत्र्यानं मृतप्राय झालेल्या राष्ट्राला संजीवनी देण्याची आणि त्याचबरोबर या राष्ट्रात नवीन विचार प्रवर्तित करण्याची गरज आहे. देशकाल आणि परिस्थिती यांचा फरक लक्षात घेऊन परंपरा बदलण्यासाठी विवेचक बुद्धिवादाचा आश्रय करणाऱ्या, भगवद्भक्ति आणि राष्ट्रभक्ति यांचा समन्वय करू शकणाऱ्या, दृढ शुद्धभावाने चित्त विशाल झालेल्या, शीलसंपन्न, अंधपरंपरांचा विध्वंस करणाऱ्या व्यक्तींची आत्ता खूप गरज आहे. परंपरागत संस्कृतीच्या मूलतत्त्वांच्या संरक्षणाला तयार असलेले पंडित, धर्मोपदेशक नागरिकच पारतंत्र्याने विपन्नावस्थेला गेलेल्या, दुबळ्या भारतराष्ट्राच्या समुद्धारासाठी समर्थ होतील. तसे नागरिक निर्माण करणे हाच राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश, राष्ट्रीय शिक्षण सिद्धांत म्हणून प्राज्ञपाठशाळेने घोषित केला होता. इंग्रजाची शिक्षणपद्धती परकीय राज्यसेवकांना निर्माण करणारे यंत्र आहे, म्हणून ती पद्धती त्याज्य, टाकाऊ आहे. पण आंग्ल भाषेतील, साहित्यातील जे ज्ञान, विज्ञान, कला त्यांचा स्वीकार अवश्य करायला हवा कारण पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञान-कलांच्या अंगीकारानेच बलशाली नवजीवनसंपन्न अशा भारत राष्ट्राचा उदय संभवतो, अन्यथा नाही, हा त्यांचा दृढ ग्रह होता. - आधुनिक विद्या-कला-संस्कृती यांच्याकडे पाठ फिरवलेल्या, भारतीय परंपरागत प्राचीन आचारविचारांनाच सारसर्वस्व मानणाऱ्यांच्या 'सामाजिक रुढीच पवित्र, कल्याणकारक, तिचा विरोध पापदायक' अशी (अंध) श्रद्धा असणाऱ्यांच्या मार्गाने भारत सर्वंकष उन्नतीच्या मार्गाने जाऊ शकणार नाही, हे त्यांच्या बुद्धीने त्यांनी निश्चित जाणले होते.

पहिल्या जागतिक महायुद्धानंतर भारतात राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आणि परंपरागत सामाजिक रुढींना बदलण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली दोन आंदोलने उभी राहिली. प्राज्ञपाठशाळेचे शिक्षक आणि शिष्य यांनी स्वातंत्र्यांदोलनात तसेच धार्मिक आणि सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनाला सहकार्य करून नेतृत्वही दिलं.

नारायणशास्त्रींनी आणि त्यांचे शिष्य महादेव आणि लक्ष्मणशास्त्री यांनी सामजिक परिवर्तनाच्या आंदोलनात मुख्यत्वे धार्मिकांच्या सभामध्ये, धर्मशास्त्रावरच्या ग्रंथांचे आलोडन करून सामाजिक परिवर्तनाचं तर्काधिष्ठित समर्थन केलं. त्यामुळे परिवर्तनवादी-पक्ष आणि परिवर्तनविरोधी रुढिनिष्ठ पक्ष असे दोन पक्ष संस्कृतपण्डितांमध्ये पडले. धार्मिक आणि सामाजिक संस्थांमध्ये आचारांमध्ये परिवर्तन हे मुळात धर्मविघातक नाहीच उलट धर्माच्या तत्त्वांचे सामर्थ्य वाढवणारे असेल अशा विचारसरणीचे अनुकरण करणारे अनेक महाराष्ट्रीय विद्वान परिवर्तनवादी पक्षाला येऊन मिळाले. धर्मशास्त्रेतिहासकार पांडुरंग वामन काणे, केशव लक्ष्मण दफ्तरी (नागपुरचे), श्रीधरशास्त्री पाठक, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, सदाशिवशास्त्री भिडे, नारायण गोविंद चापेकर, रघुनाथशास्त्री कोकजे इत्यादी धर्मशास्त्रवेत्त्या पंडितांनी नैष्ठिकब्रह्मचारी, तप आणि विद्या यांनी शुद्ध चित्त झालेल्या नारायणशास्त्रींचे

नेतृत्व स्वीकारले. धार्मिक आणि सामाजिक आचारांमध्ये आधनिककाळाला अनुसरून अपरिहार्य असे परिवर्तन आदराने स्वीकारले पाहिजे, असा उद्घोष करून परिवर्तन-आंदोलन चालविले. हिंद समाजातील जाति-उपजातींमध्ये विवाहाला आणि सहभोजनाला परिवर्तन-पक्षाने मान्यता आणि प्रोत्साहन दिले. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अस्पृश्यता निवारण आंदोलनाला पाठिंबा-समर्थन देण्यासाठी या पंडितांनी प्रतिपादन केले - 'अन्त्यज' या नावाने निर्देशिलेल्या जातींची अस्पृश्यता, चातुर्वर्ण्य मानणाऱ्या हिंदू समाजाने त्वरित सोडून द्यावी, उपनयन विवाह आदि संस्कार, सर्व हिंदूंनी-(ज्यात चौथा वर्ण शूद्रही आला!) वैदिक मंत्रांनी गृह्यसूत्रात निर्देश केल्याप्रमाणे करावेत, असा निर्णय परिवर्तनवाद्यांनी दिला. त्या संस्कारांमधील अनावश्यक विस्तार-लांबण बाजूला सारून अनुष्ठान-ते ते संस्कार करण्याची संक्षिप्त पद्धत, संन्यासाश्रम स्वीकारून केवलानंद झालेल्या नारायणशास्त्रींनी सिद्ध करून दिली.

परिर्वतनाला विरोध करणारे सनातनवादी पंडित स्मृतींमध्ये आढळणाऱ्या जाति इत्यादींच्या आचारधर्माने 'अदृष्ट फलत्व-पुण्य-अदृष्ट फल' निर्माण करण्याची शक्यता वाटून, मनुष्य म्हणून विचार करून परिवर्तन स्वीकारीत नाहीत. अदृष्ट फल या कल्पनेतील कार्यकारणभाव मनुष्याच्या बुद्धीला अनाकलनीय आहे असे ठरवून स्मृतिशास्त्रांमध्ये आढळणाऱ्या, परस्परविरोधी वचनांचा विरोध ते पूर्वमीमांसेच्या पद्धतीने निकालात काढतात आणि भिन्न स्मृतींमध्ये समन्वय स्थापन करतात. स्मृतींमध्ये उपलब्ध असणाऱ्या विरोध नसलेल्या कुलधर्म, देशधर्म आणि जातिधर्मांनी रुढीने स्वीकारले असतील तर त्यांचे सनातनत्व आणि अपरिवर्तनीयत्व अबाधित मानतात. या मताचा विरोध करून परिवर्तनवादी विरोधपरिहारावर संतुष्ट न होऊन ऐतिहासिक पद्धतीचा स्वीकार करतात. जातींमधील आचार बदलाचा आग्रह धरतात. ते म्हणतात प्रत्येक युगात ऋषींनी, शिष्टांनी किंवा सामान्य जनांनीही त्या त्या देश, काल आणि परिस्थितीला अनुसरून लोकहितासाठी, धर्माचरण करणाऱ्याची शक्ति आणि अधिकार (योग्यता) लक्षात घेऊन, त्यातील **भिन्नतेचा** विचार करून परंपरागत धार्मिक आचारांमध्ये बदल केले, नवीन आचार रुजवले तसेच आधुनिक विद्वानांनी, सज्जनांनी धर्माचार बदलून तेच व्यवहारात आणावेत (त्यांना मान्यता द्यावी, त्यांना विरोध मुळीच करू नये.)

आमच्या गुरुजींनी परिवर्तनमताच्या समर्थनासाठी ऐतिहासिक पद्धती स्वीकारली. ऐतिहासिक पद्धतीला बळकटी आणण्यासाठी धर्मशास्त्रातील प्रमाणे शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्यांना वेदस्मृतिपुराणांमधील वचनांचा साकल्याने संग्रह तयार करणे योग्य किंवा गरजेचे वाटले. त्यासाठी त्यांनी प्राज्ञपाठशाळा संस्थेद्वारा धर्मकोशकार्यालयाची स्थापना इ.स. १९२७ मध्ये काही विद्यार्थ्यांच्या सहकार्याने केली. १९३१ साली या धर्मकोशाचं काम इतर गोष्टींच्या व्यत्ययाशिवाय ही शाखा प्राज्ञपाठशाळेपासून वेगळी करावी, असा विचार

गुरुजींनी मांडला. शाळा चालवण्यात वेळ गेल्यामुळे चित्ताला अनेक व्यवधाने सांभाळावी लागतात. शिवाय प्राचीनभारतीय संस्कृतीच्या तत्त्वांचं रक्षण करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण देऊन राष्ट्रप्रेमी नागरीक निर्माण करावेत या विचारावर श्रद्धा असलेले शिक्षक मिळणे ही कठीण होत होते. 'यापुढे माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी नको' हे नारायणशास्त्रींचे मत त्यांच्या सहकारी आणि संस्थेच्या कार्यवाहांना मान्य झाले नाही. म्हणून प्राज्ञपाठशाळा-मंडळाच्या अध्यक्षपद आणि सदस्यत्व आचार्यांनी सोडून दिलं. नंतर त्यांनी शके १८५३ च्या विजयदशमीला (२२ ऑक्टोबर १९३१) संन्यास आश्रमात प्रवेश केला.

प्राज्ञपाठशाळा संस्थेच्या प्रपंचातून गुरुजींनी निवृत्ती स्वीकारल्यावर संस्थेचा सर्व कार्यभार प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी माझ्यावर टाकला. मला संस्थेचं अध्यक्षपद बहाल केलं. 'माध्यमिक शिक्षणाची शाखा बंद करावी' हे गुरुजींचे मत योग्यच होतं. तीन वर्षांनंतर हे स्वीकारून एकमतानं शाळाशाखा बंद करण्यात आली. धर्मकोष कार्य आणि संस्कृतविद्येचे शिक्षण आजपर्यंत चालू आहे.

गुरुजी नंतर संन्यासीपणे एकाग्रपणे जैमिनीय आणि बादराणीय मीमांसांचे मनन, त्याला अनुसरुन ग्रंथलेखन, ब्रह्मचिंतन आणि ध्यानयोगाभ्यासात सर्वकाळ मग्न राहिले. प्रयाणाचा काळ समीप आल्यावर दीर्घकाळ, नियमितपणे, खंड न पडता ज्या एकाक्षर ॐकार जप ते करीत असत तोच ॐकार मोठ्याने उच्चारून ते ब्रह्मात विलीन झाले. त्यांनी सिद्ध केलेल्या ग्रंथांचे मुद्रण आणि प्रकाशन हे कार्य गुरूंच्या ऋणातून अंशतः तरी मुक्त होण्यासाठी प्राज्ञपाठशाळा मंडळ-संस्थेने स्वीकारले आहे.

श्रीगुरुजींच्या चरित्राचा संक्षेप येथे समाप्त करीत आहोत.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई.

मराठी: प्रबंध व चरित्र

आनंदमीमांसा

राष्ट्रीय चरित्रमाला

आनंदमीमांसा

को ह्येवान्यात्कः प्राण्यात्, यदेष आकाश आनन्दो न स्यात् ॥

(आनन्दवली)

लक्ष्मणशास्त्री जोशी

वाय १८४-१७

ॐ

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा

प्राज्ञपाठशाळामंडळपुस्तकमाला - पुष्प ६ वे

आनंदमीमांसा

प्रपंचविषयक दुःखवाद व आनंदवाद यांचे ऐतिहासिक व तात्त्विक
संक्षिप्त समालोचन

लेखक :

लक्ष्मणशास्त्री जोशी.

तर्कतीर्थ, न्यायमार्तंड, दर्शनाध्यापक, प्राज्ञपाठशाळा, वाई

शके १८५७
इ.स. १९२८

मूल्य ६ आणे

प्रकाशक : शं. वि. लेले,
चिटणीस, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

[सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन]

मुद्रक : वासुदेव गोपाळ परांजपे
'आर्यसंस्कृतिमुद्रणालय'
चिमणबाग, टिळकरस्ता, पुणे

आचार्य देवो भव ।

तपःस्वाध्यायनिरत गुरुवर्य

नारायणशास्त्री मराठे

यांचे चरणीं समर्पण

अनुक्रमणिका

१. तत्त्वज्ञान व समाजेतिहास यांचा संबंध २२३
२. तत्त्वज्ञान व समाजविकास २२४
३. तत्त्वज्ञानाचे लक्षण २२४
४. तत्त्वज्ञानाचे दोन प्रकार - १. प्रवर्तक २. निवर्तक २२५
५. जयिष्णु आर्याच्या वेदान्तांतील परम सिद्धान्त २२५
६. तात्त्विक सिध्दान्ताच्या परीक्षणाच्या रिती २२६
७. उदाहरणार्थ काही सिध्दान्त २२६
८. आनन्दसिध्दान्ताचा विचार मुख्यतः दुसऱ्या व तिसऱ्या रीतींनी करावयाचा आहे २२९
९. उपनिषदांतील विचारांच्या स्फुरणाची दिशा २२९
१०. प्राण २२९
११. ज्योती २३०
१२. सत् २३१
१३. चित् २३१
१४. आनन्दसिद्धान्ताची कारणभूत विचार परंपरा कोठे सांपडेल ? २३१
१५. आनंदमीमांसच्या दृष्टीने दार्शनिक वाङमयाची तपासणी:- सांख्य, न्याय, वैशेषिक, योग, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसेचे भाष्यकार, बौद्ध, जैन २३२
१६. संतवाङ्मयातील दुःखवादः -- ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम २३८
१७. सांख्यांच्या दुःखवादाचा महाभारतावर झालेला परिणाम २४२
१८. दुःखमीमांसा : उत्पन्न होण्याची कारणे २४३

१९. उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्मय व वैदिक संस्कृती आनन्दमीमांसेचे उगमस्थान आहे: शरीरविषयक वैदिक विचार, मानसिक उन्नती, वैदिक आर्याची गृहसंस्था सम्राजविषयक भावना, कर्तव्याचरणाचे महत्त्व, देवविषयक व धर्मविषयक विचार, अंतिम ध्येय २४४
२०. उपनिषदांतील आनन्दमीमांसेचे स्वरूप २५५
१. सर्व आनंदांची एकरूपता २६०
२. सर्व आनंदांचा अविरोध अथवा समन्वय २६२
२१. भगवद्गीतेतील सात्त्विक सुखवाद २६२
२२. सुखमीमांसा हा सनातनधर्मशास्त्राचा पाया आहे २६४
२३. सुखवाद - सर्व प्रवृत्तींचा आधार आहे २६६

संक्षेप चिन्हांचा खुलासा.

तै. उ. = तैत्तिरीयोपनिषद्,
न. सू. = ब्रह्मसूत्रे.
ऋ. ऋग्वेद.
न्या. सू. = न्यायसूत्रे.
कठो. = कठोपनिषत्.
छां. उ. = छांदोग्योपनिषत्.
कौ. उ. = कौषीतक्युपनिषत्.
तै. ब्रा. तैत्तिरीयब्राह्मण. -
बृ. उ. = बृहदारण्यकोपनिषत्.
ऐ. उ. ऐतरेयोपनिषत्.
सौ. का. = सांख्यकारिका.
न्या. भा. न्यायभाष्य.
न्या. वा. = न्यायवार्तिक.
यो. सू. = योगसूत्रे.
यो. सू. भा. = योगसूत्रभाष्य.
ऐ. उ. शां. भा. = ऐतरेयोपनिषच्छाङ्करभाष्य.
ब्र. सू. शां. सा. = ब्रह्मसूत्रशांकरभाष्य.
भा. दी. = भावार्थदीपिका.
गा. पं. - गाथापंचक. (इंदिरा प्रेस).
म. भा. शां. प. = महाभारतशान्तिपर्व.
शां. प. = शान्तिपर्व.

गी.शां. भा. = गीता- शांकरभाष्य.

श. बा. = शतपथब्राह्मण.

शु. य. = शुक्लयजुर्वेद,

गौ. ध. सू. = गौतमधर्मसूत्र.

अथर्व. = अथर्ववेद.

तै.उ.शां. भा. = तैत्तिरीयोपनिषच्छाङ्करभाष्य.

भा. स्कं. = भागवत, स्कंध.

अनु. प. == अनुशासनपर्व.

.मनु. = मनुस्मृति.

दक्ष. -- दक्षस्मृति.

लो. वा. = श्लोकवार्तिक (कुमारिल भट्टप्रणित)

पू. मी. मा. - पूर्वमीमांसाभाष्य. -

आप. ध. सू. आपस्तम्बधर्मसूत्र.

ॐ

आनंदमीमांसा

को येवान्यत्कः प्राण्यात्, यदेष आकाश आनन्दो न स्यात् ॥

(तैत्तिरीयोपनिषत्)*

तत्त्वज्ञान व समाजेतिहास यांचा संबंध.

तत्त्वज्ञान हे समाजांतील ज्ञानसंपादनाच्या विविध प्रयत्नाचे फल होय. त्या त्या समाजाचे तत्त्वज्ञान त्या त्या समाजाच्या जीवितयात्रेचे पूर्ण स्पष्टीकरण करीत असते. कोणत्याही समाजाचे तत्त्वज्ञान पहावे म्हणजे त्या समाजाच्या धार्मिक, नैतिक, राजकीय, आर्थिक व वैज्ञानिक इतिहासाचे स्वरूप आपल्या लक्षांत चटकन येईल. अथवा त्या त्या समाजाचा इतिहास पहावा म्हणजे आपणांस त्या समाजाचे तत्त्वज्ञान सहज सांगता येईल. तत्त्वज्ञान हे भवसागरांतील समाजरूपी महानौकेचे होकायंत्र आहे. या होकायंत्राप्रमाणे समाजाच्या गतीची दिशा ठरत असते. तत्वज्ञानी हा कर्णधार असतो, समाजाचे तत्त्वज्ञान बदलले म्हणजे समाजांत क्रांती घडते. किंवा क्रांती घडली म्हणजे समाजाच्या तत्त्वज्ञानांत क्रांती होते. इतिहासाचा तत्त्वज्ञानावर व तत्त्वज्ञानाचा इतिहासावर सारखा परिणाम घडत असतो.

भारतीय आर्यांनी भारतवर्षात जेव्हां वसाहत केली तेव्हां त्या वसाहतींतील साम्राज्यसंस्थापक वीर आक्रमणशील, जयिष्णु, अशा आदर्शपुरुष असलेल्या विवस्वान्, मनु, इक्ष्वाकु, इत्यादी राजर्षींचे, व प्रजापतींचे तत्वज्ञान कोणते होते, हे श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत सांगितले आहे. लंकेवर स्वारी करून आर्याच्या विश्वव्यापनाच्या व संस्कृतिस्थापनेच्या कार्याला स्थैर्य आणि सुरक्षितपणा आणणाऱ्या श्रीरामचंद्रांचे तत्त्वज्ञान योगवासिष्ठांत "अन्तस्त्यागी बहिःसंगी लोके विचर राघव ।' असे सांगितले आहे ! छांदोग्यांत 'असुराणां ह्येषोपनिषत् ।' असुरांचे हे देहात्मवादी तत्त्वज्ञान आहे असे म्हटले

*"हा सर्वव्यापी आनंद नसता तर विश्वाचे श्वसनच चालते ना" !

आहे त्यावरून असुरसंस्कृतींतील सर्व क्रियांचा प्रयत्नांचा व आसुरसंपत्तीचा उलगडा होतो. ग्रीस देशाचा इतिहास व ग्रीक तत्वज्ञान यांचा संबंध कशा तऱ्हेचा होता याचे अनुमान प्लेटोच्या 'सुराज्य' ह्या ग्रंथावरून होते. जगाच्या हालचालीवर चिर परिणाम करून गेलेली फ्रान्सची भेसूर व अस्थिर राज्यक्रांती आणि रूसोचे समतादर्शन ह्यांचा संबंध इतिहासांत जागरूक आहे. २५० वर्षीपूर्वी महाराष्ट्रांत धर्मस्थापनेच्या नरांनीं, व ईश्वरी अवतारांनी जी राष्ट्रीय क्रांती सह्याद्रीच्या आश्रयाने घडवून आणिली, तिच्या मुळाशी सर्व शक्तियुक्तींचा उपदेश करणारे समर्थांचे 'अध्यात्मसार' होते; लोकांच्या मनाचा प्रबोध करणारा रामदासांचा मनोबोध होता; समाजाला आनंदभुवन बनविणारे, विश्वातील व समाजातील रामराज्याचे वर्णन करणारे तुष्टी, पुष्टी व हृष्टी, यांनी युक्त रामदासी ब्रह्मज्ञान होते! समर्थांचे आनंदवन भुवन, रामराज्य व अध्यात्मसार वाचावे म्हणजे त्यांत काय किमया भरली आहे ते दिसून येईल! भारतवर्षातील उत्कर्षाचा नववसंत सूचित करणाऱ्या लोकमान्य टिळकांनी समाजांत नवीन परिवर्तन घडवून आणण्याकरिता कर्मयोगाचे तत्त्वज्ञान गीतारहस्यात प्रतिपादिले. ह्याप्रमाणे समाजेतिहास आणि तत्त्वज्ञान यांचा नित्य संबंध आहे.

तत्त्वज्ञान व समाजविकास

सामाजिक जीवनविकास तत्त्वज्ञानाधीन आहे. तत्त्वज्ञानालाच आर्यलोक वेदान्त म्हणतात, तत्त्वज्ञानाच्या सर्वांग विचारांना 'दर्शन' अशी संज्ञा आहे. दर्शन म्हणजे दृष्टी. दृष्टीतून सृष्टी उत्पन्न होते! ही दृष्टी जितकी निर्मल, निर्दोष, स्थूलसूक्ष्मावगाहिनी, वर्तमानभूतभविष्याचें आकलन करणारी, व सन्निध किंवा दूर असणाऱ्या वस्तुंचे ग्रहण करणारी असेल तितका समाजाचा विकास सुसंबद्ध, केंद्रानुसारी व सर्वांगीण होतो. हा विकास म्हणजेच अभ्युदय होय. या अभ्युदयातून समाजाचे व तदंतर्गत व्यक्तीचे निःश्रेयस निष्पन्न होते. अभ्युदय हा समाजाचा फुलोरा असून निःश्रेयस हे फल आहे! निःश्रेयससंपन्न पुरुष म्हणजे स्थितप्रज्ञ होत. या आदर्शपुरुषांनाच पुरुषोत्तम (Superman) म्हणतात!

तत्त्वज्ञानाचे लक्षण किंवा व्याख्या

ज्ञानाने इच्छा उत्पन्न होऊन प्रयत्न होतो व पुनःप्रयत्नाने ज्ञान होते. समाजात मानवांच्या पोषणाकरिता, जीवनवर्धनाकरिता, आनंदाकरिता, दुःख निवारण्याकरिता, किंवा गुणविकासाकरिता जितके प्रयत्न चालतात तितके सर्व प्रयत्न ज्ञानामुळे होतात; आणि त्या सर्व प्रयत्नांनी ज्ञान प्राप्त होत असते. ते ज्ञान भाषेत तर्कशास्त्रात प्रतिपादिलेल्या नियमानुसाराने मांडले म्हणजे त्यास शास्त्र अशी संज्ञा प्राप्त होते. समाजांत जितके विविध व्यापार किंवा क्रिया चालतात तितकी शास्त्रे असतात. ही शास्त्रे किंवा ज्ञान जितकी परस्परांत सुसंगत असतील त्या मानाने समाजांत चालू असलेले प्रयत्न सुपुष्पित आणि सुफलित होतात! सर्व शास्त्रांचे जे निष्कर्षभूत परम सिद्धांत असतात. त्यांचा साकल्याने विचार करून. वेदांत किंवा

तत्वज्ञान निष्पन्न होते. सर्व शास्त्रांत ग्रथित असलेल्या अनुभवांचें व विचारांचे समुच्चयानें अवलोकन करून वेदांत तयार होतो. मनुष्यप्राण्यांच्या अनुभवांचा, प्रयत्नांचा, सुखदुःखांचा किंवा साफल्यनैष्फल्याचा शेवटचा निर्णय तत्त्वज्ञानात म्हणजे वेदांतात जाहीर झालेला असतो! म्हणून वेदांतशब्दाचे निर्वचन वेदाचा म्हणजे ज्ञानाचा अंत म्हणजे शेवट किंवा फल असे केल्यास चालेल.

आनंदमीमांसा

तत्त्वज्ञानाचे दोन प्रकार - १. प्रवर्तक, २. निवर्तक

तत्त्वज्ञान दोन प्रकारचे असते. एक समाजाच्या चालू सर्व प्रयत्नांना आणि जीवनपोषक व वर्धकक्रियांना व्यर्थ ठरविते; व दुसरे समाजाच्या प्रयत्नांना सार्थ ठरवून त्यांना योग्य दिशा दाखवून उत्तेजन देते आणि सर्व प्रयत्न सर्व मानवसमाजाला हितपरिणामी कसे होतील ह्याचे ध्येयविवेचनद्वारा स्पष्टीकरण करिते! पहिले तत्त्वज्ञान निरोधक असते तर दुसरे प्रवर्तक असते, पहिल्यात विषाद व औदासीन्य उत्पन्न करून सर्व प्रयत्न थांबविण्याचा स्वभाव असतो, तर दुसऱ्यात उत्साहशक्ती निर्माण करून सर्व क्रिया परिपूर्ण, सुसंगत व सुफलित करण्याचा स्वभाव असतो. दोन्ही तत्त्वज्ञाने भूतहिताच्या कळवळ्याने उपदेश करीत असतात! दोन्ही वेदांत जीवाच्या परमशांतीचा विचार करीत असतात!

जयिष्णु आर्याच्या वेदांतांतील परम सिद्धांत!

भारतीय संस्कृतीत वरील दोन्ही प्रकारांतील शेकडो दर्शने उत्पन्न झाली आहेत. त्यांतील औपनिषदिक तत्त्वज्ञान आर्याच्या पूर्ण विकसित विचारांचे फल आहे. ह्या तत्त्वज्ञानाच्या मननाने अश्रुत व अविज्ञात अशा आर्याच्या हालचालींचा व संस्कृतीचा खरा अर्थ आपणांस अवगत होतो. त्यांतच धर्माचा, नीतीचा, व्यवहाराचा, परमार्थाचा, व सर्व मानवप्रवृत्तींचा किंबहुना विश्वाचा आधारभूत सिद्धांत ज्ञात होतो! तो सिद्धांत पुढील वाक्यात प्रतिपादिला आहे:-

आनन्दाद्धयेव खल्विमानि भूतानि जायन्ते आनन्देन जातानि जीवन्ति, आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्मेति । [तै. उ. २]

"आनंदांतून विश्वाची उत्पत्ती होते, आनंदांत विश्वाची स्थिती असते व आनंदातच विश्वाचा लय होत असतो, हे समजून घेण्याची खरी आतुरता उत्पन्न व्हावयास पाहिजे, कारण हा आनंद म्हणजे ब्रह्म होय."

याच सिद्धांताचा सध्या आपणांस विचार कर्तव्य आहे.

तात्त्विक सिद्धांताच्या परीक्षणाच्या तीन रिती

तत्त्वज्ञानातील सिद्धांतांचे अनेक पद्धतीनी विवेचन तत्त्वावचिकित्सक करीत असतात.

आपल्या विवेचनाच्या सोयीकरिता त्या अनेक पद्धतींचा तीन पद्धतीत समावेश करतां येईल.

१. प्रमाणांनी वस्तुची किंवा विषयाची सिद्धी, म्हणजे प्रमाणपद्धती;

२. मानसशास्त्रीय परीक्षण हा. मानसिक पद्धती,

३. नीतिशास्त्रीय परीक्षण हा. नैतिक पद्धती,

या तीन पद्धती केवळ तत्त्वज्ञानांतच अवलंबिलेल्या असतात असे नाहीं; इतर शास्त्रांतही कमीजास्त प्रमाणांत यांचा उपयोग होतो. पैकी पहिली पद्धती सर्व वस्तुंच्या यथार्थज्ञानाला अत्यंत आवश्यक आहे.

प्रमेयसिद्धिः प्रमाणाद्धि । [सांख्यकारिका ३.] 'प्रमाणाशिवाय प्रमेयाची सिद्धी होत नाहीं.' प्रमाण म्हणजे प्रमेचे असाधारण कारण. प्रमा म्हणजे यथार्थ ज्ञान. यथार्थ ज्ञानाच्या असाधारण म्हणजे मुख्य साधनांचा विचार करणारे स्वतंत्र शास्त्र प्राचीन काळी हिंदुस्थानात व ग्रीक देशांत आणि अलीकडे युरोपात निर्माण झाले आहे. यालाच इकडे न्यायशास्त्र किंवा तर्कशास्त्र ह्मणतात. तर्कशास्त्राने सिद्ध झालेल्या नियमांनी कोणत्याही विषयाचें परीक्षण झालें म्हणजे तो विषय श्रद्धेय होतो.

हेतूने [पुराव्याने] कोणताही सिध्दांत सिद्ध होतो की नाही हे पाहिले तरी दुसऱ्याही रीतीने विषयाचे परीक्षण करणे जरूर असते. दुसरी रीती मानसशास्त्रपरीक्षणाची होय. विवक्षित विचार किंवा कल्पना मनुष्याच्या मनात का आली, कोणत्या परिस्थितीच्या प्रभावाने तो विचार उत्पन्न झाला, त्या कल्पनेने कोणकोणत्या मानव समाजात कशी कशी रूपे धारणा केलीं, त्या कल्पनेचा एकंदर इतिहास काय, त्या कल्पनेने कोणकोणत्या मानस विकारांवर व विचारांवर आपला पगडा बसविला, हे प्रश्न ह्या दुसऱ्या पध्दतीत सोडवावयाचे असतात.

तिसरी रीती नीतिशास्त्रतः परीक्षणाची. कोणत्याही विचाराचा मनुष्याच्या आचरणावर काय परिणाम होतो, सदाचरण किंवा दुराचरण या दृष्टीने विचारांच्या योगानें मनुष्यांच्या जीवितांत काय फरक पडणे शक्य आहे, आजपर्यंत त्या विचारांचा काय परिणाम झाला ? या प्रश्नांचे उत्तर द्यावयाचे असते.

वरील तिन्ही पद्धतींचा उपयोग केल्यास कोणत्याही तात्विक विचारांवर चांगला प्रकाश पडतो.

उदाहरणार्थ कांही सिद्धान्त

पहिला ईश्वरविषयक सिद्धान्त. ईश्वराची सिद्धी नैयायिक अनुमान प्रमाणाने करतात. कोणत्याही कार्यास ज्ञान, इच्छा व प्रयत्न यांची अपेक्षा असते. ज्या उपादान कारणप्रभृती साधनांनी कोणतेही कार्य उत्पन्न होते, त्या साधनांची व्यवस्था व योजना विचारपूर्वक किंवा ज्ञानपूर्वक होत असते; पण केवळ ज्ञानाने भागत नाही: पुनः इच्छेची जरूर असते. आणि इच्छेचीच पुढची पायरी प्रयत्न ही होय. असा सिद्धान्त सिद्ध करून त्याच्या आधारे-अत्यंत

सुव्यवस्थित, नियमबद्ध, आश्चर्यमय आणि अचित्य अशा ह्या विश्वरचनेच्या मुळाशी सर्वज्ञता, अनंत इच्छाशक्ती व पूर्ण प्रयत्न असला पाहिजे, असे अनुमान नैयायिकादी तार्किकांनी केले आहे. 'रचनानुपपत्तेश्च नानुमानम् ।' [ब्र. सू.२-२-१] या सूत्रांत वादरायणाचा यांनी हीच उपपत्ती ग्रथित करून निरीश्वर सांख्यांचे खंडन केले आहे. हा झाला ईश्वरविषयक कल्पनेचें तर्कपध्दतीनें स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न.

ईश्वरविषयक कल्पनेचे दुसऱ्या पध्दतीने विवेचन पाश्चात्त्य विद्वानांनी केले आहे. वन्यमानव, अर्धवन्य मानव व संस्कृतिसंपन्न मानव यांच्या धर्मविषयक कल्पनांचा अभ्यास करून देवविषयक कल्पनेच्या विविध रूपांचे निरूपण त्यांच्या ग्रंथांत आढळते. रानटी मनुष्याला देव लहरी व क्रूर आहे असे दिसते. संस्कृतीत प्रवेश करू पाहणाऱ्या मानवांना विश्वातील मेघ, पर्जन्य, प्रकाश, विद्युत, अग्नी इत्यादी विविध शक्ती ह्या देवता वाटतात. संस्कृतिसंपन्न मनुष्याला सदसतांचा निवाडा करणारा, प्रेममय पिता किंवा माता असलेला ईश्वर जगाचे शासन करतो असे वाटते. इत्यादी प्रकारचा देवविषयक विचारक्रम त्यांनी शोधून काढिला. देवविषयक कल्पनेचा हा मानसिक इतिहास झाला. ईश्वरविषयक कल्पनेइतकी भव्य, उदात्त, सुंदर, काव्यमय कल्पना जगांतील कोणत्याही महाकवीच्या प्रतिभेत निर्माण झाली नाही; सौंदर्यविषयक कल्पनांचा रमणीय व पवित्र विकास ईश्वराराधनेने जगांत फार झाला आहे; इत्यादी विविध विचार दुसऱ्या पध्दतीत अंतर्भूत होतात.

तिसरी रीती काही नीतिशास्त्रज्ञांनी ईश्वराच्या बाबतीत अवलंबिली आहे. 'सत्यानृते अवश्यजनानाम्।' [ऋ. ७।१४९।१२] जनांच्या सदाच रणदुराचरणांचा न्यायनिवाडा करणारा धर्माधर्मफलदाता, जर कोणी मानिला नाहीं तर नीतीची उपपत्ती कशी लागणार ? मातेनें मुलाकरिता ख़स्ता खाव्या, देशभक्तांनी देशाकरिता शिरकमले अर्पण करावी, साधुंनी लोकहिताकरिता हाल सोसावे, सत्यनिष्ठांनी सत्याकरिता विषाचे प्याले अमृतासमान मानून प्यावे आणि या श्रेष्ठ कृत्यांची जर कठोर निसर्गात मुळीच कोणास दाद नसेल तर मग नीती कशाकरिता ? म्हणून असे मानिता येत नाही. सदाचरण कधीही निष्फल होणार नाही, त्याची व्यवस्था या विश्वांत असली पाहिजे, कोणीतरी सर्वद्रष्टा न्यायाधीश या विश्वाच्या सिंहासनावर आरूढ असला पाहिजे; असा विचार कांही नीती शास्त्राच्या मनांत येतो; हाच विचार 'फलमत उपपत्तेः ।' [त्र.सू.३-२-३८]

या सूत्रांत मांडिला आहे. ईश्वर तर्कशास्त्रपध्दतीने सिद्ध होवो किंवा न होवो, परंतु ईश्वरविषयक मनोहर कल्पनेचा मनुष्याच्या आचरणावर बलवत्तर परिणाम होतो यात संशय नाहीं.

अशा रीतीने या तिन्ही उपपत्तींनी ईश्वराप्रमाणेच पुनर्जन्म, विकासवाद, अज्ञेयवाद इ. तात्त्विक विचारांचे स्पष्टीकरण करता येते. हर्ष, भय, शोक, काम, क्रोध इत्यादी विकार बाह्य विषयांच्या संसर्गाने वाढत असतात. विषाची भीती विषाच्या दुष्परिणामाच्या

अनुभवाने उत्पन्न होते; पुष्कळशा खाद्यपदार्थाची गोडी सवयीने व अनुभवाने वाढते, देशावर प्रीती विचारानंतर मनुष्य करूं लागतो. बालकांचे ठिकाण तर जन्मतःच हर्ष, मय, शोक, कामक्रोधादी विकार काही बाबतींत कमीजास्त प्रमाणांत आढळून येतात त्यामुळे त्या विकारांच्या मुळाशी पूर्वानुभव किंवा पूर्वाभ्यास असला पाहिजे, अशा अनुमानाने पूर्वजन्माची सिद्धी गौतमांनीं न्यायदर्शनांत केली आहे. 'पूर्वाभ्यस्तस्मृत्यनुबन्धाज्जातस्य हर्षशोकभयसंप्रतिपत्तेः ।' [न्या. सू. ३-१-१९] 'वीतरागजन्मादर्शनात् ।' [न्या. सू. ३-१-२५] या सूत्रांत वरील विषय मांडिला आहे.

पुनर्जन्माचे म्हणजे शरीरभिन्नजीवात्मविषयक कल्पनेचे मानसशास्त्रदृष्ट्या परीक्षण यूरोपातील मनुष्यजातिशास्त्रांत (Anthropology) केले आहे. त्यांत प्रेतपूजक वन्य मानवापासून तो संस्कृतिसंपन्न मनुष्यापर्यंत मरणोत्तर जीविताच्या कल्पनेचा विकास अथवा परिवर्तन दाखविले आहे.

नीतिवाद्यांनी व धार्मिकांनी नीतीच्या संरक्षणाकरिता पूर्वोत्तर जन्मकल्पना केलीच पाहिजे, असे म्हटले आहे; नाहीतर जगांत वैषम्याचे साम्राज्य आहे असे म्हणावे लागेल. जन्मतःच दरिद्री व श्रीमंत, रोगी व आरोग्यसंपन्न, बुद्धिमान् व निर्बुद्ध, शान्त व तापट, सुजन व दुर्जन असे भेद कां पडतात? सदाचरणी मनुष्याला किंवा प्रयत्नशील मनुष्याला या जन्मीतच सुफल मिळते असे नाही. तसेच अधार्मिक दुर्जनांना व आयतोवांना जगांत पुष्कळ वेळा ऐश्वर्य व मान प्रयत्नावांचूनच मिळतो. जगांत न्यायाचे साम्राज्य असले पाहिजे, म्हणून या जन्मी नाहीतर पुढच्या जन्मी सत्कर्माचे फळ मिळाले पाहिजे व दुराचरणाचा दुष्परिणाम भोगावा लागला पाहिजे. ही धार्मिक लोकांची दृष्टी पाहिली म्हणजे पुनर्जन्मकल्पनेचा नैतिक पद्धतीने अर्थ उलगडतो. हीच दृष्टी 'नाकृताभ्यागमप्रसङ्गात्।' (न्या. सू. ३-२-७३) या सूत्रांत मांडिली आहे.

डार्विन, स्पेन्सर, हेगेल इत्यादिकांनीं प्राणिशास्त्रांत व इतर सर्व शास्त्रांत क्रांती करणारा विकासवादाचा सिद्धान्त प्रमाणपद्धतीने शोधून काढिला. त्याचा मानसेतिहास गेल्या दोनशे वर्षीचा पाश्चात्त्य संस्कृतीचा इतिहास पाहिल्यास स्पष्ट कळून येईल. पुनर्जन्माची कल्पना ज्या पायावर उभारली जाते तो पाया विकासवादाने डळमळीत केल्यावर मनुष्याच्या आचरणाची - उपपत्ती, ऐहिक सुखवाद व गुणपरिणामवाद ह्यांच्यावर उभारावी लागली. त्यामुळे नैतिक कल्पना आणि धार्मिक कल्पना यांची ताटातूट झाली; व आतां तर शेवटी मनुष्याच्या आचरणांत मोठी क्रान्ती घडून येण्याचा काळ जवळजवळ येत चालला आहे. वरील तीन पद्धतींचे स्पष्टीकरण करण्याकरिता उपरिनिर्दिष्ट तीन उदाहरणे बस्स होतील.

आनंदसिद्धांताचा विचार मुख्यतः दुसऱ्या व तिसऱ्या पद्धतीने करावयाचा आहे.

उपनिषदामध्ये सर्व विश्वांत आनंदरूपतत्व भरून राहिले आहे असा सिद्धान्त वारंवार प्रतिपादिलेला दिसतो. 'आनन्दमयोऽभ्यासात् ।' (ब्र. सू. १-१-१२) मनुष्याच्या मनांत हा सिद्धान्त कोणत्या कारणरूपरंपरेने उद्भवला ? विश्वांतील प्रत्येक वस्तुच्या आदिमध्यावसानी आनंदाचे -स्फुरण ऋषीच्या प्रतिभेला कसे गोचर झाले ? इतकी गहन पण उदात्त, सुंदर पण गंभीर भावना द्रष्टयाच्या अंतःकरणांत कशी उदय पावली ? असा प्रश्न तत्त्वजिज्ञासूच्या मनात उत्पन्न होतो. हा प्रश्न मानसिक व नैतिक पद्धतीने मुख्यतः सोडवावयाचा आहे. प्रमाणाने किंवा तर्काने आनंदमय तत्त्वाचे परीक्षण करण्याची शक्ती प्रस्तुत लेखकाचे ठायी नाही. 'नैषा तर्केण मतिरापनेया । (कठो. १-२-९) 'तर्काला हे तत्त्व अगम्य आहे.' शब्द ह्या बाबतीत बोबडा होतो ! चंचल व बहिर्मुख मनाची तेथपर्यंत धांव पोंचत नाही !!

उपनिषदांतील विचारांच्या स्फुरणाची दिशा

प्रत्येक परिणत वैदिक विचार शरीर, समाज, जीवसृष्टी व विश्व यांच्या अनुभवांतून उत्पन्न झाला आहे ! वैदिक प्रतिभा भोंवताली पसरलेल्या अफाट विश्वाच्या स्वभावाचे व त्यांच्या अंतस्थ शक्तीचे स्पष्टीकरण करण्याचा सारखा प्रयत्न करीत असते. वैदिक प्रतिभा अनन्ताशीं तन्मय होण्यासाठीं सारखी झटत असते. आर्षप्रतिभा अध्यात्म, अधिभूत व अधिदैव सृष्टींत एकत्वाचा शोध करीत असते. अनेकांत दिसणाऱ्या विविध स्वभावामध्ये एकमात्र किंवा एक तत्त्व शोधून शेवटी ती कृतकृत्य होते! आर्ष विचार प्रथमतः अन्वयीपद्धतीने उत्पन्न होतो आणि शेवटी आवश्यक तेथे व्यतिरेक पद्धतीचा अंगीकार करून तो समाप्त होतो. अध्यात्म, अधिभूत व अधिदेव हे तीन शब्द वैदिक वाङ्मयांत वारंवार येतात. यांचा अर्थ असा आहे. अध्यात्म म्हणजे शरीरसंबंधी, अधिभूत म्हणजे जीवसृष्टीसंबंधीं व अधिदैव म्हणजे सर्वविश्वसंबंधी. अध्यात्मात शरीर, मन, इंद्रिये व विकारविचार यांचा अन्तर्भाव होतो. शरीरात, प्राणिसृष्टीत व विश्वशक्तीत सारखेपणा किंवा समानकार्य जेव्हा ऋषीला दिसते तेव्हा ऋषीच्या प्रतिभेला समानतत्वाचा अनुभव येतो. या पद्धतीला अनुसरून उपनिषदांत विश्वाचे विश्वव्यापी मूलकारण प्राणात्मक, ज्योती: स्वरूप, सत् व चित् आहे, असे प्रतिपादिले आहे. आनंदतत्त्वाचे स्पष्टीकरण करण्यास सुलभ जावे म्हणून दिग्दर्शनार्थ प्राण, ज्योतिः, सत् व चित् या तत्त्वांचे स्पष्टीकरण करू.

प्राण

शरीरांत सर्व अवयवांना सर्व इंद्रियांना व मनोव्यापारांना जीवन देणारी, सामर्थ्य देणारी, उत्साह उत्पन्न करणारी प्राणशक्ती दिसते. प्राणशक्ती म्हणजे क्रियाशक्ती असे श्रीमच्छंकराचार्य उपनिषद्भाष्यांत म्हणतात. भौतिकशास्त्रांत याचा पर्याय Energy, शक्ती असा आहे.

शरीरांतील प्रत्येक वस्तुचे स्फुरण, जीवन, धारण प्राणामुळे होत असते. दररोज नवा उत्साह, तजेला, जोम प्राणाच्या प्रभावाने उत्पन्न होतो. जीवसृष्टीत, औषधीत व वनस्पतीत हरघडी या प्राणशक्तीचा प्रभाव दृष्टीस पडतो. उषा, बालार्क, प्रभात, वनराजी, प्रसन्नजल, शुद्धवायु, चंद्रिका, तारांगण, शरदृतु इत्यादिकात या प्राणशक्तीचा महिमा दृग्गोचर होतो. सर्व इंद्रिये आणि मन थकून निजली असतां प्राण या शरीरांतील क्रिया जागृत राहून चालू ठेवितो. मनाचे उन्मेष व निमेष या शक्तीच्या अधीन आहेत. रथाच्या चाकाच्या तुंब्यात जसे अरे स्थिर राहतात त्याप्रमाणे सर्व इंद्रिये आणि मन प्राणाच्या आश्रयाने राहतात. 'सर्वाणि ह वा इमानि भृतानि प्राणमेवाभिसंविशन्ति प्राणमभ्युज्जिहते। (छां. उ. १-११-४) 'स एष प्राण एवं प्रज्ञात्मानन्दोऽ जरोऽमृतः।' (कौ. उ. ३-८) 'एष लोकाधिपतिरेष लोकेशः। (कौ. उ. ३- ८) इत्यादि उपनिषद्वाक्यांत सर्वात वरिष्ठ लोकाधिपती आणि लोकेश असा एक प्राण जगाला व्यापून आहे, असे प्रतिपादिले आहे. कारण, उपनिषदांतील द्रष्ट्याला शरीरात, प्राणिमात्रात, व विश्वात त्या शक्तीचा विलास दिसत आहे ! 'प्राणो ह पिता प्राणो माता प्राण आचार्यः। (छा. उ. ७-१५-१) असे ब्राह्मी दृष्टीला दिसत आहे. 'अत एव प्राणः।' (ब्र. सू. १-१-२३) 'प्राणस्तथाऽनुगमात्।' (ब्र. सू. १-१-२८) ह्या ब्रह्मसूत्रांत उपनिषद्वाक्यांचा समन्वय करून प्राण म्हणजे सिद्ध केले आहे. परमात्मा असे

ज्योती

विश्वाचे मूलतत्त्व प्रकाश अथवा ज्योती आहे, असा एक सिद्धान्त उपनिषदांत कथन केला आहे. हा विचार देखील वर सांगितलेल्या पद्धतीनेच ऋषीला स्फुरला. प्राणिमात्राचे व्यवहार आणि वनस्पतींचे जीवन सूर्य व चंद्र ह्यांच्या प्रकाशावर अवलंबून असते. मनुष्याचे व्यवहार मनोरूप ज्योतीने सुरळीत चालतात. रात्रीच्या वेळेस काळ्याकुट्ट अंधकारांत कोट्यवधी ज्योती नभोमंडलांत प्रकाशमान दिसतात. मन, चक्षु, सूर्य, चंद्रमा, तारागण इत्यादिकांच्या ठिकाणी आढळणारी ज्योती एक आहे; सूर्याच्या तेजाने ज्याप्रमाणे सर्व रत्नांत तेज चमकते, तसेच ह्या सर्वांच्या ठायी एकच प्रकाश भरून राहिला आहे ! अशी भावना ऋषीच्या मनात उत्पन्न झालेली दिसते. 'अथ यदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते विश्वतःपृष्ठेषु सर्वतः पृष्ठेष्वनुत्तमेषूत्तमेषु लोकेष्विदं वाव तद्यदिदमन्तः पुरुषे ज्योतिः। (छा. उ.३-१३-७) ' येन सूर्यस्तपति तेजसेद्धः। (तै. प्रा. ३-१२ "९-७) 'मनो ज्योतिर्जुषताम्।' (तै. ब्रा. १-६-३-३) 'तमेव भान्तमनुभाति सर्व तस्य भासा सर्वमिदं विभाति।' (कौ. उ. २-५१५) 'तेद्देवा ज्योतिषां ज्योतिरायुर्होपासतेऽमृतम्।' (बृ. उ० ४-४-१६) इत्यादी - वाक्यांचा निर्णय 'ज्योतिश्चरणाभिधानात्।' (ब्र. सू. १-१-२४), ज्योतिर्दर्शनात् [ब्र. सू. १-३-४०] या सूत्रांत केला आहे.

सत्

सत् हे विश्वाच्या सर्वस्वरूपाला व्यापून आहे. जगाच्या उत्पत्तिपेस्थितीलयाचे कारण सत् आहे, असा विचार ऋषीच्या अंतःकरणांत उमटला. विश्वाच्या स्वरूपदर्शनांतच ऋषीला 'सता'चा साक्षात्कार झाला. प्रतिक्षणी प्रत्येक विचारांत सताचा अनुभव प्रत्येकाला येतो. सर्व ज्ञानेद्रिये आणि मन प्रत्येक क्षणी 'सता'ला आलिंगन देत असते ! अभावाची प्रतीतीसुद्धा भावरूप वस्तुच्या अपेक्षेने येते. प्रत्येक कल्पनेत सद्रूप वस्तुचा उल्लेख असतो. हा चमत्कार प्रत्येकाला दररोज प्रत्ययाला येतो. प्रत्येक वस्तु सत् हे जेव्हां दिसते तेव्हां ऋषीची विशाल प्रतिभा विश्व म्हणजे एका सताचाच आविर्भाव आहे असा एकमेवाद्वितीय शोध लाविते. 'सदेव सोम्ये दमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ।' (छां. उ. ६-२) एका शुद्ध अव्यक्त सद्वस्तुचाच हा बहुविध व्यक्त अनन्त प्रपंच आहे. कारण, 'कथमसतः सज्जा येत ।' (छां. उ. ६।२) 'असतांतून सत् कसे निर्माण होईल?' या सद्रूप ब्रह्माच्या विचाराच्या उदयाचा असा खुलासा उपनिषदावरून मिळतो.

चित् किंवा विज्ञान

ज्ञानाशिवाय वस्तुची सिद्धी होत नाही. वाह्य जग व मनोविकार ह्यांचे ज्ञान आपणांस होत असते; पण त्या ज्ञानावांचून त्या ज्ञानाबाहेर त्या वस्तुच्या अस्तित्वाला काय प्रमाण आहे? किंबहुना प्रमाण म्हणजे ज्ञान. ज्ञान होते म्हणून वस्तु आहे. ज्ञानाला जी वस्तु स्पर्श करीत नाही ती नाही असे आपण म्हणतो. सुखाचे ज्ञान होते म्हणून सुखाची एवढी किंमत! किंबहुना हा आकाशाचा घुमट, त्याला हंड्याझुंबराप्रमाणे चिटकून राहिलेला तारांगण, भिंगऱ्यांप्रमाणे गरगर फिरणारे ग्रह, हे भूमंडळ, अफाट दर्या, ही सर्व ह्या विज्ञानाचा खेळ आहे! ज्ञानावांचून संवेदनेच्या बाहेर ह्यांना शून्य किंमत आहे. सर्व जीवव्यापार, मानवव्यवहार, सर्व शास्त्रे आणि वेद प्रज्ञेतून बाहेर येत असतात! 'एष ब्रह्मैष इंद्र एष प्रजापतिरेते सर्वे देवा इमानि च पञ्चमहाभूतानि पृथिवी वायुराकाश आपो ज्योतींषीत्येतानीमानि च क्षुद्रमिश्राणीव बीजानीतराणि चेतराणि चाण्डजानि च जारजानि च स्वेदजानि चोभ्दिजानि चाश्वा गावः पुरुषा हास्तिनो यत्किं चेदं प्राणि जङ्गमं च पतति च यच्च स्थावरं सर्व तत्प्रज्ञानेत्रं प्रज्ञाने प्रतिष्ठितं प्रज्ञानेत्रो लोकः प्रज्ञाप्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ।' (ऐ. उ. ३-३) या वाक्यांत वरील विचार मांडिला आहे.

आनंदसिद्धांताची कारणभूत विचार परंपरा कोठे सापडेल?

औपनिषद् विचार कशा रीतीने उत्पन्न होतो याचे दिग्दर्शन करण्याकरिता प्राण, ज्योती, सत् आणि प्रज्ञान अथवा चित् या पदायचे स्पष्टीकरण केले आहे. उपनिषदांतील विचारांना भारतीय दर्शनांत अग्रस्थान आहे हे लक्षात ठेवून आनंदमय परब्रह्माच्या शोधाच्या मुळाशीं असलेली विचारपरंपरा तपासणे खऱ्या भारतीयाचे कर्तव्य आहे. ह्या तपासण्याने भारतीय

समाजाचा अभ्युदय होणार आहे. सर्व विश्वांत आनंद आहे व परमात्मा आनंदरूप आहे, हा विचार भारतीयांच्या भाग्याने त्यांना लाभला आहे ! ह्या विचाराची मूळ पीठिका कोठे सापडेल ? असा प्रश्न उद्भवतो. शंकराचार्यांच्या ग्रंथांत परमात्मा सच्चिदानंदरूप आहे हा सिद्धांत मेघगर्जनेने उपदेशिला आहे! पण त्याचे मूळ, त्याची आधारभूत विचारपरंपरा शंकराचार्याच्या भाग्यांत आढळत नाही. सर्व विश्वांत आनंदमय ब्रह्म व्यापून आहे, असे का ? कशावरून ? ह्या प्रश्नाचे उत्तर 'शास्त्र असे सांगते म्हणून' असे आचार्यांकडून मिळेल. शास्त्रयोनित्वात्। तत्तु समन्वयात्। (ब्र. सू. १।१।३ - ४) वेदरूप शास्त्र वाचा, वेदवाक्यांचा समन्वय करा म्हणजे ब्रह्म आनंदमय आहे हे कळेल; असे आचार्य म्हणतील. कारण आचार्याच्या सिद्धांताप्रमाणे प्रपंच अनर्थाने भरला आहे; प्रपंच दुःखमूल आहे; मृगाला फसविणारे मृगजल आहे !

आनंदमीमांसेच्या दृष्टीने दार्शनिक वाङ्मयाची तपासणी

दार्शनिक विषयावर शेकडों ग्रंथ संस्कृत वाङ्मयात झाले आहेत. शेकडो दार्शनिक संप्रदाय उत्पन्न झाले आहेत. भारतीय संस्कृतीवर दार्शनिक विचारांचा बलवत्तर परिणाम झाला आहे. म्हणून दार्शनिक विचारांची तपासणी आवश्यक आहे. 'दर्शनानां दर्शनीयतम' असलेल्या सांख्य दर्शनांत प्रपंचाबद्दल निराळी विचारसरणी दिसून येते. सांख्यांना सर्व जग दुःखनयाने पोळलेले दिसते. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक दुःख ही परिभाषा सांख्यांनी मांडिली आहे. दुःखत्रयाभिघाताजिज्ञासा तदपघातके हेतौ । दृष्टे साऽपार्था चैन्नैकान्तात्यन्ततो भावात् ॥ [सांख्यकारिका १] दुःखत्रयांच्या आघातांनी पीडिलेल्या जीवाला एकच एक तरणोपाय म्हणजे तत्त्वज्ञान हे होय. इतर साधने दुःखाचा पूर्ण प्रतिकार करण्यास समर्थ नाहीत. असा या कारिकेचा अभिप्राय आहे. सर्वत्र दुःख ज्या दृष्टीला दिसते त्या दृष्टीला सर्वव्यापी आनंद गोचर व्हावयाचा नाही.

न्यायदर्शनांत मोक्षशास्त्राचे विचारणीय असे १२ विषय सांगितले आहेत. त्यांत दुःख हा प्रधान विषय आहे. आत्मशरीरेंद्रियार्थं बुध्दिमनः प्रेत्यभावफलदुःखापवर्गास्तु प्रमेयम् । [न्या. सू. १।१।९] "आत्मा, शरीर, इंद्रिये, त्यांचे विषय, ज्ञान, मन, प्रवृत्ती दोष, पुनर्जन्म, फल, दुःख व मोक्ष, असे मोक्ष शास्त्राचे बारा विषय होत." दुःख शब्दाचे वात्स्यायनांनी असे व्याख्यान केले आहे- सुखसाधनस्य दुःखानुषङ्गाद् दुःखेनाविप्रयोगाद्विविधबाध नायोगाद् दुःखमिति समाधिभावनमुपदिश्यते । [न्या. भा. १।१।९] "जगांत उपलब्ध होणारीं सुखसाधने दुःखाशीं निरंतर संबद्ध आहेत. त्यांना दुःख सारखे चिकटलेले आहे. विविध अडचणींनीं ती साधने गुरूफटली आहेत म्हणून सर्व सुखसाधने मूर्तिमंत दुःख होय असे एकाग्र चित्ताने चिंतन करण्याचा उपदेश दुःख या शब्दाने गौतमांनी केला आहे." यथा मधुविषसंपृक्तान्नमनादेयमित्येवं सुखं दुःखानुषक्तमनादेयमिति। ऐहिक जगांतील सुखसाधने व ऐहिक सुख मधुरविष कालावलेल्या अन्नाप्रमाणे आहेत." मोक्षाकरिता

खटपट न करणारे जीव कष्टद, पापमय, घोर संसारांत गुरफटलेले आहेत असे वात्स्यायनांनी न्यायभाष्यांत म्हटले आहे. न्यायवार्तिकांत जगात २१ तऱ्हेचीं दुःखे आहेत असे वर्णिले आहे. एकविंशतिप्रभेदभिन्नं पुनर्दुःखं शरीरं षडिंद्रियाणि षड् विषयाः षड् बुद्धयः सुखं दुःखं चेति । शरीरं. दुःखायतनत्वाद् दुःखम् । इन्द्रियाणि विषया बुद्धयश्च तत्साधन भावात् । सुखं दुःखानुषङ्गात् । दुःखं स्वरूपत इति । तस्य हानिर्धर्माधर्मसाधनपरित्यागेन अनुत्पन्नयोर्धर्माधर्मयोरनुत्पादेन उत्पन्नयोश्चोपभेगात् प्रक्षयेणेति । [न्या. वा. १-१-१] तात्पर्य - शरीर, सहा इंद्रिये, त्याचे सहा विषय, त्या विषयांच्या सहा संवेदना, सुख आणि दुःख मिळून एकवीस प्रकारचे दुःख आहे. शरीरास दुःख म्हणण्याचे कारण शरीर हे दुःखाचे माहेरघर आहे ! इंद्रिये, विषय आणि विषयांच्या संवेदना ही दुःखाचीं साधने असल्यामुळे त्यांना दुःख असे म्हटले आहे. सुखसुद्धा दुःखाने व्यापिलेले असल्यामुळे दुःख होय आणि दुःख हे स्वतः दुःख आहेच. ह्या २१ प्रकारच्या दुःखांचा नाश धार्मिक आणि अधार्मिक कर्मीच्या त्यागाने होतो. ह्या दुःखाचे कारण अविद्या आणि तृष्णा होय असे अन्यत्र न्यायवार्तिकांत म्हटले आहे.

न्यायदर्शनाप्रमाणे वैशेषिक दर्शनाची स्थिती आहे. वैशेषिक दर्शन व न्यायदर्शन ह्यांचे अनुयायी एकच आहेत. दोन्ही दर्शनांची जगाबद्दलची विचारसरणी सारखीच आहे. सप्तपदार्थ, परमाणुवाद, आरंभवाद इत्यादी प्रमुख सिद्धांत दोघांचे एकच आहेत त्यामुळे ही दोन्ही दर्शने उत्पन्न झाल्यानंतर कांही काळाने यांचे एक दर्शन बनले. वैशेषिक दर्शनांत विश्वाचा विचार प्रामुख्याने आला आहे व न्यायदर्शनांत प्रमाणांची, विशेषतः तर्काची अधिक छाननी केली आहे. ज्ञानसाधनांचा हे शास्त्र अधिक विचार करते. वैशेषिक दर्शन हे परमाणुवाद्यांची Ontology असून न्यायदर्शन हे Epistemology आहे. पण वैशेषिक सूत्रांत दुःखवादाचा उल्लेख सापडत नाही, कारण हे दर्शन बुद्धकालापूर्वीच सूत्ररूपाने मांडले गेले होते. वस्तुतः षड्दर्शनातील विचारपरंपरा बुद्धकालापूर्वीपासून सतत चालू आहे. बुद्धानंतर षड्दर्शनांत दुःखवाद प्रामुख्याने शिरला. सांख्यशास्त्रदृष्ट्या पाहिले असता प्रपंच दुःखभय मानण्याचे कारण नाही. विश्व द्वंद्वमय असल्याने सुखदुःखांचे द्वंद्व प्रपंचांत आढळून येणारच. सुख सत्त्वगुणाधीन असल्याने समाजांत सात्त्विक आचरण म्हणजे नैतिक आचरण जितके जितके अधिक घडेल तितके सामाजिक दुःख कमी होत जाईल. दारिद्र्य, रोग, दुष्काळ इत्यादिकांस समाजव्यवस्थेतील व्यंगेच प्रमुखतः कारण होतात. बऱ्या प्रापंचिक आपत्तीस समाजव्यवस्था जबाबदार असते. सत्त्वगुणाच्या उत्कर्षांनी सुखाची वाढ होते असा सांख्य सिद्धांत आहे. न्यायवैशेषिक दर्शनांचीही अशीच गोष्ट आहे. नैय्यायिक कट्टे जगत्सत्यत्ववादी आहेत. मायावादाचा किंवा बौद्धांच्या क्षणिकवादाचा स्पर्श देखील या दर्शनांना सहन होत नाही. सुखात्मक स्वतंत्र वृत्ती न्यायदर्शनांत परिगणित केल्यामुळे दुःखाचा एवढा बाऊ करण्याची जरुरी नव्हती. जगांत सुख जरी दुःखाच्या बरोबरीने मानिले असते तरी मोक्षाला कमीपणा येण्याचे कांही कारण नव्हते. योगदर्शनाचीदेखील वरील दर्शनांप्रमाणेच गती आहे.

योगदर्शनांत प्रपंचदुःखाचे वर्णन व सिद्धि साधकाकरिता विस्ताराने केली आहे. 'परिणामतापसंस्कारदुःखैर्गुणवृत्तिविरोधाच्च दुःखमेव सर्व विवोकेनः' (योग सू. २/१५) "प्रपंचांतील सर्व सुखे परिणामी दुःखजनक असतात; त्यांच्या उपार्जनांतही अत्यंत ताप होत असतो आणि त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारामुळे पुनःपुनः वासना उत्पन्न होऊन मनाला अस्वस्थता उत्पन्न होते; म्हणून विवेकी पुरुषाच्या दृष्टीने प्रापंचिक सुर्खे मूर्तिमंत दुःख होत !" योगसूत्रावरील व्यासभाष्यांत प्रपंचाच्या दुःखमयतेची कहाणी वारंवार आलेली आहे. 'विषयसुखं चाविद्या ।' (यो सु.भा.२-१५) सर्व विषयसुख म्हणजे केवळ भ्रम किंवा आभास आहे! 'विषयानुवासितो महति दुःखपङ्के निमग्न इति ।' (यो. भा. २ -१५) 'ऐहिक विषयांची इच्छा करणारा पुरुष दुःखाच्या चिखलात रुतलेला असतो !' दु खबहुलः संसारो हेयः । (यो.सू.भा.२–१५)' 'दुःखाने व्यापिलेला हा संसार झुगारून दिला पाहिजे!' अनित्य, अशुची, दुःखात्मक व अनात्म स्वरूप असलेला हा संसार जीवाला नित्य, शुची, सुखरूप व आत्मस्वरूप वाटतो शरीर खरोखर अत्यंत बीभत्स असून ते पवित्र आहे अशी कल्पना मानव उगीच करीत असतो. 'तथा शुचौ परमबीभत्से काये शुचिख्यातिः । ऊक्तं च स्थानाद्वी-जादुपष्टम्भान्निस्पंदान्निधनादपि। कायमाधेयशौचत्वात् पंडिता ह्यशुचिं विदुरिति।' (यो. सू. भा. २–५) "हे शरीर घाणीत उत्पन्न होते; विटाळाचा गोळा; अस्थिंमांसरक्त ह्यांनी बनलेले; क्षणोक्षणीं स्वेदादिमलोत्सर्ग करणारे आहे. हे नेहमीं स्वच्छ ठेवावे लागते म्हणून तज्ज्ञ लोक शरीरास अपवित्र मानतात.' अशा तऱ्हेची विचारसरणी शरीर व प्रपंच ह्यांच्याबद्दल योगशास्त्रांत मांडिली आहे. पूर्वमीमासेत केवळ वेदवाक्यांच्या अर्थपद्धतीचा मुख्य ऊहापोह असल्यामुळे प्रपंचाबद्दल कांहीच अभिप्राय दिलेला दिसत नाही. ब्रह्मसूत्रानेही ह्या बाबतींत मूकवृत्ती धारण केली आहे. कारण त्यांत उपनिषद्वाक्यांचा समन्वय करण्यापलीकडे दुसरे कार्य नाही.

ब्रह्ममीमांसेचे भाष्यकार प्रपंचाबद्दल सांख्ययोग्यांप्रमाणेच आपला अभिप्राय प्रकट करितात. भगवत् पूज्यपाद शंकराचार्य हे तर जाणून बुजून अंशतः बुद्धमतानुवादी आहेत. 'दुःखं सर्वमनुस्मृत्य कामभोगान्निवर्तयेत्।' ह्या मांडूक्यकारिकेवर त्यांनीं असे लिहिले आहे--'सर्वं द्वैतमविद्या विजृभितं दुःखमेव ।' सर्व प्रपंच अविद्यानिर्मित असून दुःखरूप आहे.

ऐतरेयोपनिषत्-भाग्यात संसारसागराचे वर्णन येणेप्रमाणे केले आहे. "अग्न्यादयो देवता अस्मिन् संसारार्णवे अविद्याकामकर्मप्रभवदुःखोदके तीव्ररोगजरामृत्युमहाग्राहे अनादौ अनंते अपारे निरालम्बे विषयेन्द्रियजनितसुखलवलक्षणविश्रामे पञ्चेन्द्रियार्थतृष्णारुतवि क्षोभोत्थितानर्थशतमहोर्मौ महारौरवाद्यनेकनिरयगतहाहेत्यादिकूजिताक्रोशनोन्द्भूतमहार वे सत्या-र्जवदानदयाहिंसाशमदमधृत्याद्यात्मगुणपाथेयपूर्णज्ञानोडुपे सत्संगसर्वत्यागमार्गे मोक्षतीरे एतस्मिन्महत्त्यर्णवे पतितवत्यः । ' (ऐ. उ. शां. भा. २११). तात्पर्य "संसार हा एक मोठा सागर आहे; अविद्या, कामना आणि कर्म ह्यांच्यापासून उत्पन्न होणारे दुःख हे

यातील अथांग पाणी आहे ! तीव्र रोग, जरा व मृत्यु ही ह्यांतील भयंकर जलचरे असून विषयेंद्रियांच्या संयोगांपासून उत्पन्न होणारी क्षणिक सुखे हीच यांतील विसांव्याची लहानशी ठिकाणे आहेत ! विषयतृष्णेच्या महावासनेने क्षोभ होऊन अनर्थीच्या शेकडों लाटा ह्यांत उत्पन्न होत असतात ! रौरवादिनरकांत पडलेल्या दुःखित जीवांच्या किंकाळ्या हीच ह्याची गर्जना होय ! ज्ञान हे यांमधून तरून जाण्याची होडी असून सत्य, अहिंसा इत्यादि सद्गुण हीच ह्या होडीतील शिदोरी आहे. सत्संगती व सर्व संन्यास हाच या होडीचा मार्ग व मोक्ष हे तीर आहे !" गर्भवास, जन्म, जरा व मृत्यु ह्यांनीं युक्त असे हे जीवित महाअनर्थ रूप आहे. हा अनर्थ अविद्येतून निर्माण होत असल्यामुळे तिच्या नाशाचे साधन म्हणून ब्रह्मविद्या शंकराचार्यांनी सांगितली आहे. 'अस्या नर्थहेतोः प्रहाणायात्मैकत्वविद्याप्रति पत्तये सर्वे वेदान्ता आरभ्यन्ते' (ब्र. सू. शां. भा. १-१-१). मध्वरामानुजादि ब्रह्ममीमांसेचे भाष्यकार प्रपंच दुःखमय आहे असा जरी टाहो फोडीत नसले तरी ते दुःखवादाच्या छायेतून बाहेर पडले नाहीत. मध्वाचार्यांनीं गीताभाष्यांत गृहस्थाश्रमांत अपवित्रता उत्पन्न करणाऱ्या क्रिया मनुष्याच्या हातून घडत असल्यामुळे परमेश्वराला संन्यास अधिक प्रिय आहे, असे म्हटले आहे. रामानुजाचार्यही मनुष्य, देव इत्यादि जीव तापत्रयाने तप्त आहेत, म्हणून त्यांनीं विष्णूला शरण जाऊन तापत्रयांतून मुक्त व्हावे असे म्हणतात.

संसारदुःखाचे भयंकर चित्र पूर्णरूपाने प्रथमतः भगवान् बुद्धाने रेखाटले ! बौद्धदर्शनाचे चार मुख्य सिद्धान्त आहेत; किंबहुना बौद्धदर्शनाची ही चतुःसूत्रीच आहे. 'दुःखं दुःखं, स्वलक्षणं स्वलक्षणं, क्षणिकं क्षणिकं, शून्यं शून्यम् ।' ही तीं ४ सूत्रे होत. जिकडे तिकडे दुःख पसरले आहे; सुखाचा केवळ आभास आहे असा पहिल्या सूत्राचा अभिप्राय आहे. जगांतील कोणत्याही दोन वस्तुंमध्ये सादृश्य किंवा सामान्यतत्त्व असे कांही नाही, असा दुसऱ्या सूत्राचा आशय आहे. प्रत्येक वस्तु क्षणिक आहे, प्रकृती किंवा ब्रह्म खोटे आहे, परमाणु जरी असले तरी ते प्रतिक्षणी नष्ट होतात व नवीन परमाणु उत्पन्न होतात, असे तिसऱ्या सूत्राचे तात्पर्य आहे. मोक्ष म्हणजे सर्वशून्यावस्था. त्यांत आत्मा, ज्ञान, सुख, दुःख, पाप किंवा पुण्य हे कांही नसते. ही शून्यावस्था हेच सर्वांचे परमसाध्य आहे. जीवरूपी दिवा मालवणे हेच परमनिर्वाण होय ! निर्वाण म्हणजे मालवणे असा चवथ्या सूत्राचा अर्थ आहे. या चार सूत्रांचा अर्थ बौद्धदार्शनिकांतील चारी पंथ आपापल्या मताप्रमाणे प्रसंगविशेषी निरनिराळा करतात. पण वर दिलेला अर्थ सामान्यतः चारी पंथांना मान्य आहे. हे जग व जीवित दुःखमय (दुःखं), विशृंखल (स्वलक्षण) व क्षणभंगुर (क्षणिक) आहे; त्याची समाप्ती (शून्य) हे परम साध्य आहे; असे वरील चतुःसूत्रीचे तात्पर्य एका वाक्यांत सांगतां येईल. भगवान् बुद्धाचे जीवितकार्य 'दुःखाचा शोध व त्याच्या नाशाच्या साधनाचा शोध' असे सांगतां येईल. भगवान् बुद्धाचा मुख्य आदेश काय होता हे आपणांस त्यांच्या जीवनांतील महत्त्वाच्या प्रसंगाचा विचार करून ठरविता येईल.

बोधिसत्त्वांचा जन्म चांगल्या खानदानी घराण्यांत झाला होता. प्रापंचिक सुख फारसे कमी नव्हते. एके दिवशीं उद्यानांत जाण्याकरिता रथांत बसून स्वारी निघाली होती. मार्गात एकाएकी जराजर्जर, पलितकेश, दन्तहीन, कुबड निघालेला म्हातारा हळूहळू काठी टेकीत चालला होता. *बोधिसत्त्वाने त्यास पाहिल्याबरोबर सारथ्यास विचारिले- अशी अवस्था ह्या मनुष्यास कशाने प्राप्त झाली? सारथी म्हणाला- प्रत्येक जन्माला आलेल्या प्राण्याला आयुष्याच्या शेवटल्या काळांत ही दशा प्राप्त होत असते. हे ऐकून बोधिसत्त्व अत्यंत खिन्न झाला ! पुनः एकदा उद्यानांत जात असता एक महारोगी दिसला ! तिसऱ्यांदा प्रेत दिसले ! आणि चवथ्यांदा एक संन्यासी दिसला ! जरा, रोग आणि मृत्यु प्रत्येक माणसाचा सारखा पाठलाग करीत असतात; खरोखर जीवित हे असार आहे असा विचार बोधिसत्वाच्या मनांत आला. ही बोधिसत्त्वाच्या वैराग्याची चार कारणे त्याच्या चरित्रांत वर्णिली आहेत. 'चत्तारि पुव्यनिमित्तानि' असे पालीभाषेत यास म्हणतात. या चार निमित्तांमुळे शेवटी बोधिसत्वाने गृहत्याग केला ! ह्या प्रसंगाला 'महाभिनिष्क्रमण' असे नांव आहे.

'कामतण्हा भवतण्हा विभवतण्डा'. कामवासना, प्रापंचिकवासना, वैभवाची वासना ही माणसास भयंकर दुःखाच्या गर्तेत लोटीत आहेत. जन्मदुःखं, जरादुःखं, व्याधिदुःखं, मरणदुःखं, प्रियवियोगदुःखं, अप्रियसंयोग दुःखं इत्यादि अनन्त दुःखे जीवाचा पाठलाग करीत आहेत ! संसारदावाग्रीत जीवपक्षी होरपळून निघत आहेत! दुःखाने दाही दिशा भडकल्या आहेत ! -महामोहरूपी कालसर्पाच्या दंशाने प्राण्यास तृष्णेच्या लहरी येतात! असा अविचार बोधिसत्त्वाच्या मनांत उत्पन्न होऊन तो उद्विग्न झाला ! आणि संसाररूपी -महारोगाची दिव्य औषधी मिळविण्याकरिता त्याने कित्येक वर्षे वनवास पत्करिला ! शेवटीं त्याला दिव्यज्ञान झाले. सात दिवस कडकडित उपवास केल्यानंतर बोधिवृक्षाखालीं त्याला सत्यज्ञान झाले. त्याला साक्षात्कार झाला. त्याला ब्रह्मसाक्षात्कार झाला नाही, ईश्वर दिसला नाही किंवा आत्माही कळला नाही. तर कसले ज्ञान झाले ? (दुःखाचे मूळ सांपडले व त्याच्या शमनाचा उपाय कळला ! त्याला हा जो दुःख व दुःखनाश यांचा कार्यकारणभाव कळला, त्या कार्यकारणभावाच्या मालिकेला पालीभाषेत 'पटिच्चसमुप्पाद' व संस्कृत भाषेत 'प्रतीत्यसमुत्पादः' असे म्हणतात. प्रतीत्यसमुत्पाद म्हणजे कार्यकारणभाव. हा कार्यकारणभाव भगवान् शंकराचार्यांना पूर्ण मान्य आहे. सर्वेषामप्ययमप्रत्याख्येयः [ब्र. सू. शां. भा. २ -२-१९] 'हा कार्यकारणभाव कोणालाही खोडतां येणार नाही !' ती कार्यकारणपरंपरा येणेप्रमाणेः- अविद्या संस्कार: विज्ञानं नामरूपं षडायतनं स्पर्शो वेदना तृष्णा उपादाने भवो जातिः जरा मरणं शोकः परिदेवना दुःखं दुर्मनस्ता इत्येवंजातीयका इतरेतरहेतुकाः,सौगते समये क्वचित्संक्षिप्ता निर्दिष्टाः क्वचित्प्रपञ्चिताः । [त्र. सू. शां. भा. २-२--१९]. भगवान् बुद्धाच्या मताने दुःख, समुदय, निरोध व मार्ग अशी चार श्रेष्ठ सत्ये आहेत. दुःख, दुःखकारण, दुःखनाश व दुःखनाशाचा मार्ग असे यांना दुसऱ्या भाषेत म्हणता येईल. ह्यांना 'आर्यसत्ये'

असे म्हटले आहे. बौद्धदर्शनांत दुःखपदाच्या अर्थात सर्व विश्वात्वा समावेश केला जातो. या बाबतींत अभिधर्मकोशांत व त्याच्या टीकेत सांगितलेल्या गोष्टींचा थोडक्यांत संक्षेप असा आहे:--'तत्र दुःखं रूपस्कन्धो वेदनास्कन्धः संज्ञास्कन्धः संस्कारत्कन्धो विज्ञानस्कन्धश्चेति। तत्रैकादशविधो रूपस्कन्धः चक्षुः श्रोत्रं व्राणं जिह्वा कायः रूपं शब्दो गन्धो रसः स्पर्शः अविज्ञातश्चेति । अथवा इन्द्रियपञ्चकं विषयपञ्चकं भूतचतुष्टयं च । वेदनास्कन्धः सुखदुःखोपेक्षात्मकः संज्ञास्कन्धः नीलत्वादिविषयकः सविकल्पप्रत्ययः । संस्कारस्कन्धः रागद्वेषमानमात्सर्यजातिजरामरणादिरूपः । विज्ञानस्कन्धश्च सर्वविषयज्ञानरूपः । दुःखरूप असलेला हा प्रपंच एक मोठा वृक्ष असून रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, व विज्ञान ह्या त्याच्या मोठमोठ्या फांद्या आहेत. पांच फांद्या असलेला असा हा दुःखरूप प्रपंचाचा विषवृक्ष आहे असा भगवान् बुद्धांचा अभिप्राय त्यांच्या उपदेशांत वेळोवेळीं व्यक्त झाला आहे. 'फेनपिण्डोपमं रूपं वेदना बुद्बुदोपमा। मरीचिसदृशी संज्ञा संस्कारः कदलीनिभाः ॥ मायोपमं च विज्ञानमुक्तमादित्यबन्धुना ॥ [माध्यमकवृत्तिः भाग १ पृ. ४१ राशयन् प्रत] तात्पर्य- इंद्रिये, विषय आणि चार महाभूते ह्यांना रूप अशी संज्ञा आहे. हे रूप नुसता फेस आहे. सुखदुःखात्मक अनुकूल व प्रतिकूल वेदना केवळ बुडबुड्याप्रमाणे आहेत. वस्तुबद्दल होणाऱ्या धर्मधर्मिभावाच्या कल्पना हे मृगजल आहे. जन्म, जरा, मरण, राग, द्वेष, मान, मात्सर्य इत्यादी संस्कार केळीच्या खांबाप्रमाणे असार आहेत; आणि रूपरसादी विषयांचे ज्ञान इंद्रजालाप्रमाणे खोटे आहे, असे भगवान् बुद्धाने संयुत्तनिकायांत [३--१४२] उपदेशिले आहे. भगवान् बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा आणि धर्माचा वैदिक धर्मावर व संस्कृतीवर जबरदस्त परिणाम झाला आहे. संस्कृती निर्माण करणाऱ्या महापुरुषांत बुद्धांची गणना झालेली आहे. नैतिक धर्माची (Ethical Religion) स्थापना प्रथमतः बुद्धाने केली अशी जगांत प्रसिद्धी आहे. ऐहिक विषय हे सर्पाच्या शय्येप्रमाणे आहेत; अशा उपदेशाने विरक्ती निर्माण करून प्रपंचत्याग हाच मोक्षोपाय होय, ह्या विचाराची स्थापना प्रामुख्याने बुद्धाने केली. दुःखवादाचा वैराग्याशीं संबंध आहे व वैराग्याचा अंशतः नीतीशी संबंध आहे, म्हणून अहिंसासंतोषादी नैतिक धर्माचा उपदेश बुद्धाने केला. आणि या दुःखवादानेच बुद्धोत्तरकालीन बहुतेक भारतीय वाङ्मय व्यापिले आहे. वस्तुत: नीतीची उपपत्ती वैराग्याने किंवा दुःखवादाने लागत नाही. पूर्ण नीतीची स्थापना प्रपंचतिरस्काराने होणे शक्य नाही. सकल मानवांच्या परस्परांशी होणाऱ्या आचरणाचा खरा निर्णय नीतिशास्त्रांत करावयाचा असतो.

मनुष्यमात्राच्या हिताशी संबंध असलेले आचरण म्हणजे नीती होय, म्हणून नीतीचे सत्यस्वरूप प्रकट करण्याचे सामर्थ्य दुःखवादांत नाही. कारण नीतींत प्रवृत्तीचे पूर्ण स्वरूप प्रकट झालेले असते; किंबहुना प्रवृत्तिमार्गाचा शुद्ध व परम विकास म्हणजे परमनीती होय! दुःखवाद व प्रवृत्तिमार्ग ह्यांचे हाडवैर आहे! नीतीत प्रवृत्तीचे शुद्ध व सत्यस्वरूप प्रकट व्हावयाचे असते. म्हणून दुःखयाद व नीतिस्थापना यांचा पूर्ण संबंध असणे शक्य नाही! असो.

ऐहिक दुःखवादाचा पुरस्कार जैनदर्शनांतही आढळतो. शरीराच्या पिंजऱ्यांत जीवरूप शुक बद्ध आहे. एकाद्या तळ्याच्या बुडाशी असलेल्या चिखलांत जसा एकादा वाळलेला भोपळा रुतलेला असावा तसा ह्या विश्वांत प्रपंचाच्या चिखलांत जीवात्मा रुतलेला आहे, त्याला सोडविण्याकरिता जैनाचार्यांनीं धर्मोपदेश केला. शरीर हिंसेशिवाय जगत नाही, म्हणून ते पापमय आहे. प्रपंचांतील व्यावहारिक प्रवृत्तींना मिथ्याप्रवृत्ती किंवा आस्रव असे नांव जैनवाङ्मयांत दिलेले आहे. शमदमादिरूप आचरणास संबर व तप्तशिलारोहण, केशलोचनादी प्रवृत्तीस निर्जर अशी संज्ञा आहे. तप्तशिलारोहण म्हणतं खूप तापलेल्या दगडावर उभे राहणे व केशोल्कुंचन म्हणजे चिमट्याने किंवा हाताने डोक्याचे केश उपटणे. संबर व निर्जर आचरणाने जीवपक्षी शरीराच्या पिंजऱ्यांतून व पापपुण्याच्या बंधनांतून मुक्त होऊन अलोकाकाशांत विहार करूं लागतो. अलोकाकाश हे जैनमताने सर्व जगाच्यावर असलेले मोक्षस्थान आहे. प्रपंचाबद्दल प्रत्येक जैनाने पुढील गोष्टी लक्ष्यांत ठेवाव्या असे सांगितले आहे:

१ अनित्यभावना म्हणजे या जगांत नित्य असे कांही नाही असा विचार.

२ अशरणभावना = जगांत आपणांस कशाचाही आसरा नाही असा विचार.

३. संसृतिभावना = पूर्वीच्या, हल्लींच्या व पुढील जन्मांत दुःखच अधिक आहे असा विचार.

४ एकत्वभावना = या जगांत आपण एकटेच आहो असा विचार.

५ अशुचिभावना = हे शरीर अपवित्र आहे असे चिंतन.

बौद्धांचे व जैनांचे दुःखवाद, अहिंसा, संन्यास, निरीश्वरवाद व वेदांचे अप्रामाण्य ह्या बाबतींत अत्यंत साम्य आहे.

भारतीय वाङ्मयावर दुःखवादाचा परिणाम किती खोल झाला आहे ह्याचा विचार केला म्हणजे गेल्या तीन हजार वर्षातील भारतेतिहासाचा अर्थ उलगडण्यास उशीर लागणार नाही ! संस्कृत वाङ्मयांतील अर्धे वाङ्मय दर्शनांनी व्यापिले आहे. दार्शनिक वाङ्मयांत मोक्षाच्या पुरस्काराबरोबर प्रपंचाचा तिरस्कार व्यक्त केला आहे; आणि त्याचा परिणाम प्राकृत भाषेतील सारस्वतावर झाल्यावांचून राहिला नाही.

संतवाङ्मयांतील दुःखवाद

तू तो राम सुमर जग लढवा दे । असा प्रपंचपराङ्मुखतेचा उपदेश संतांनीं केला. त्याच्या मुळाशी दुःखवाद होता. महाराष्ट्र-सारस्वताची विश्वामित्राप्रमाणे नवीन सृष्टी करणाऱ्या ज्ञानदेवाने इहलोकांतील दुःखाचे फार बहारीचे वर्णन केले आहे ! ह्या वर्णनाच्या तोडीचे वर्णन जगाच्या वाङ्मयांत सांपडावयाचे नाही !

बाप दुःखाचें केणे सुटलें । जेथ मरणाचें भरे लोटलें । तिथे मृत्युलोकीचें शेवटिलें । हाटवेळे येणें जाहालें ॥९६॥ आतां सुखेंसि जीवितां। कैंची ग्राहिकी कीजेल पांडुसुता । काय राखोंडी फुंकितां । दीप लागे ॥ ९७ ॥ अगा विषाचे कांदे वाटुनी। जो रस घेइजे पिळुनी । तया नाम अमृत ठेउनी । जैसें अमर होणें ॥ ९८ ॥ तेविं विषयांचें जें सुख । ते केवळ परम दुःख । परि काय कीजे मूर्ख । न सेवितां न सरे ॥ ९९ ॥ कां शीस खांडुनि आपुलें । पायीच्या खतीं बांधिलें । तैसे मृत्युलोकींचे भलें । आहे आघवें ॥ ५०० ॥ म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये श्रवणीं । कैंची सुखनिद्रा आंथरुणीं । इंगळांच्या ॥ १ ॥ जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदय होय अस्तालागीं । दुःख लेऊनि सुखाची आंगी । सळित जगाते ॥ २ ॥ जेथ मंगळाचिया अंकुरी । सवेंचि अमंगळाची पडे पारी । मृत्यु उदराचिया परिवरी। गर्भ गिंवसीं ॥ ३ ॥ जे नाही तयातें चिंतवी । तंव तेंचि नेइजे गंधर्वी ॥ गेलियाची कवणें गांवी । शुद्धी न लगे ॥ ४ ॥ अगा गिंवसितां आघविया वाटीं । परतलें पाउलचि नाही किरीटी | सैंघ निमालियाचिया गोष्टी । तिये पुराणें जेथिंचीं ॥ ५ ॥ जेथीं चिये अनित्यतेची थोरी । करितया ब्रह्मयाचे आयुष्यवेरी । कैसें नाही होणें अवधारीं निपटुनियां ॥ ६ ॥ (भा. दी. ९-३३).

तात्पर्य- या मृत्युलोकच्या बाजारपेठेत दुःखरूपी माल भरला आहे आणि मरणाचे माप सारखे चालले आहे ! बाजार भरला असतां मनुष्यरूपाने येथे येणे झाले आहे, अशा वेळी जीवाला सुख होईल अशी कोणती खरेदी करावी ? नुसती राख फुंकून त्यापासून दिवा लागेल काय ? अरे, विषाचे कांदे वाटून ते पिळावयाचे. त्यांचा रस काढल्यानंतर त्याला अमृत असे म्हणून, त्याचे पान करून ज्याप्रमाणे अमर होण्याची हांव धरावी, त्याप्रमाणे विषयापासून होणारे सुख केवळ महादुःख असूनही अज्ञानी लोक त्याचे सेवन केल्याशिवाय राहत नाही. पायाला झालेल्या जखमेवर आपले डोके तोडून बांधणे जितके चांगले, तितक्याच या मृत्युलोकांतील गोष्टी चांगल्या आहेत ! या मृत्युलोकी सुखाच्या गोष्टी कोणाच्या कानीं पडणार आहेत ! विस्तवाच्या अंथरुणावर निजले असतां सुखाची झोंप येईल काय ? ज्या मृत्युलोकांत चंद्राला देखील क्षय लागतो! जेथे सर्व वस्तु अस्ताला जाण्याकरिता उत्पन्न होतात ! जेथे दुःख हे सुखाच्या वेषाने जगाला छळते ! जेथे कल्याणाचा अंकुर फुटल्यावर लागलींच त्यावर अकल्याणाची कीड पडते ! जेथे मृत्यु हा उदरांतील गर्भाला देखील शोधीत येतो! ज्याचा विचारदेखील मनांत येऊं नये त्यांचे चिंतन मनुष्य करतो व त्या योगाने यमदूत प्राण्याला घेऊन जातात आणि कोणत्या गांवी जातात याचा पत्ता लागत नाही ! सर्व वाटा शोधिल्या असतांही जेथे परत येण्याची गोष्टच नाही ! आणि ज्या ठिकाणीं मृत्यु पावलेल्या लोकांच्या गोष्टी हीच पुराणे ? त्या मृत्युलोकांतील अशाश्वतेचा लौकिक, ब्रह्मदेवाच्या आयुष्यभर जरी वर्णिला तरी पुरा पडणार नाही !

नामदेवमहाराजांचा प्रपंचासंबंधाने असा उपदेश आहे:--

कां रे तूं शिणतोसि घरदारबंधने । वायांचि व्यसने आणितोसी ॥

[गा० पं० पृ. १९४]

मिथ्या माया मृगजळबाधा । लागलासे धंदा संसारी या ॥
आले रे आले रे हाकीत टाकीत । मूढा गिंवसीत काळचक्रीं ॥
बंधनापासूनी बांधलासे पायीं । बुडतों मी डोही निर्जळाये ॥
कोण भरंवसा धरिलासे जीवीं । बळिया सोडवी कदाकाळीं ।।
पुत्र पत्नी बंधु म्हणसील झणीं । धांवुनी निर्वाणी पाव आतां ॥
नामा म्हणे वेगीं सावधान व्हावे । शरणही जावे पांडुरंगा ॥
संसारसागर भरला दुस्तर । विवेकी पोहणार विरळा संत ॥
संसार करिता देव जैं सांपडे। तरि कां झाले वेडे सनकादिक ॥
संसारी असतां जरी देव भेटता । शुकदेव कासया जाता वनालागीं ॥
घराश्रमी जरी जोडे परब्रह्म । तरि कां घराश्रम त्याग केला ||
ज्ञातीच्या आचारे सांपडे जरी सार । तरि कां निरहंकार झाले साधु ॥
नामा म्हणे आतां सकळ सांडोन । आलोंसे शरण विठोबासी ॥

(गा. पं. पृ. १९८.)

मनुष्य बेडकांप्रमाणे विषयाच्या चिखलांत रमतो ! गोचिडाप्रमाणे ब्रह्मानंद सोडून विषयरूपी रुधिराचे सेवन करतो ! हे पाहून नामदेवमहाराज कळवळतात.

'नामा म्हणे ऐसीं चुकलीं बापुडीं । अमृत सेवितां पुढ चवी नेणे ॥'

एकनाथमहाराज म्हणतात:---

अर्थ नाही जयापाशीं । असत्य स्पर्शेना तयासी ॥ १ ॥
अर्थापाशी असत्य जाण । अर्थापाशीं दंभ पूर्ण ॥ २ ॥
अर्थापोटीं नाही परमार्थ । अर्थापोटीं स्वार्थ घडतसे ॥ ३ ॥
अर्थ नको माझे मनीं । म्हणे एका जनार्दनीं ॥ ४ ॥

[संतवचनामृत पृ. १७५].

संसाराचे सुख कोण पैं सांगती । होतसे फजीती लहानथोरां ॥ १ ॥
सर्पे मंडूक धरिलासे मुखीं । तेणे पैं शेखी मक्षिका धरीं ॥ २ ॥
मरती बापुडीं हांव धरिती गोडी । तरी तीं वेडीं नागवतीं ॥ ३ ॥
एका जनार्दनीं न धरी सोय । वायांचि धांवों जाय हांव भरी ॥ ४ ॥

(गा. पं. पृ. २१९)

संसारसागरीं बुडालिया प्राणी । करी सोडवणी कोण त्यांची ॥१॥
अविद्यादि पंच क्लेश हे तरंग । बुडाले सर्वांग प्राणियाचे ॥ २ ॥
भ्रमाच्या आवर्तामाजी सांपडला । सोडवी तयाला कोण आतां ॥४॥
प्रचंड या कामीं पसरिले जाळे । त्यामाजी गुंतले प्राणिजात ॥५॥
एका जनार्दनीं उच्चारील नाम । सुखाचा आराम प्राप्त होय ॥६॥

(गा. पं. पृ. २२०)

दु:खाच्या खडकीं आदळती प्राणी । परी संसाराचा मनीं वीट न ये ॥१॥
कामाचिया लाटीं कर्दमाचे पुरीं । बुडे तरी हांव धरी अधिकाराची ॥२॥
वारितां नायके भ्रमलासे कीर । सांपडे सत्वर पारधियां ॥३॥
एका जनार्दनीं यमाचिया फांसा । पडेल तो सहसा न कळे मूढां ॥४॥

(गा. पं. २१८)

प्रपंच आमिष गुंतशील गळीं । शेवटी तळमळी होईल रया ॥१॥
स्त्रीपुतधन केवळ हे जाळे । गुंतशील बळे यांत रया ॥२॥
पुढील विचार धरी कांही सोय । संतसंग लाहे अरे मूढा ॥३॥
एका जनार्दनीं सत्संगावांचोनी कोण निर्वाणीं तारील तुज ॥४॥

[गा. पं. पृ. २१७ 7

न कळेचि मूढा सुखाची ती गोडी । पायीं पडली बेडी प्रपंचाची ॥१॥
पान लागलिया गूळ न म्हणे गोड । तैसी ते मूढ़ विसरले नाम ॥२॥
शुद्ध वैराग्याचा मानिती कंटाळा । पाळिती अमंगळा प्रपंचासी ॥३॥
एका जनार्दनीं नाही भाव खरा । तया त्या पामरा सांगुनी काय ॥४॥

[गा. पं. पृ. २१७]

अस्थिमांसाचा हा कोथळा । ऐसा देह अमंगळा ॥१॥
असत्याचे मूळ नरदेह साचे । वायां काय याचे कवतुक ॥२॥
सुखावोनी पतंग दीपावरी पडे । परी सेवटी जोडे देह अंत ॥३॥
तैसे प्राणिमात्र संसारीं भुलले । कष्ट ते उगले करिताती ॥४॥

[गा. पं. २२०]

तुकाराममहाराजांनीं परमार्थप्राप्तीकरिता साधकाला खालील उपदेश केला आहे:

नको नको मना गुंतूं मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासावया ॥१॥
काळाची हे उडी पडेल बा जेव्हां । सोडवीना तेव्हां मायबाप ॥२॥
सोडवांना राजा देशिंचा चौधरी । आणिक सोयरी भली भलीं ॥३॥
तुका म्हणे तुला सोडवीना कोणी । एका चक्रपाणी वांचूनीया ॥४॥

[गा. पं. पु. २०]

प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही । एकही निदानीं न घडे त्यास ॥१॥
दोहों पेवावरी ठेवूं जातां हात । होय अपघात शरीराचा ॥२॥
तुका म्हणे तया दोहीकडे धक्का | शेवटीं तो नरकामाजी पडे ॥ ३॥
सुख नाहीं कोठें आलिया संसारी । वायां हांवभरी होऊं नका ॥ १ ॥
दुःखबांदवडी आहे हा संसार । सुखाचा विचार नाही कोठे ॥ २ ॥
चौदा कल्पवरी आयुष्य जयाला । परी तो राहिला ताटीखालीं ॥ ३ ॥
तुका म्हणे वेगीं जाय सुटोनियां । भरूनि हृदयामाजीं हरि ॥ ४ ॥
सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढे ॥ १ ॥
घरी घरी आठवण | मानी संतांचे वचन ॥ २ ॥
नेले रात्रीने ते अर्ध । बालपण जरा व्याध ॥ ३ ॥
तुका म्हणे पुढां । घाणा जुंती जशी मूढा ॥ ४ ॥

प्रपंच व देह अमंगळ आहे. पतंग दीपावर उडी टाकून ज्याप्रमाणे "आत्मनाश करून घेतो, त्याप्रमाणे मनुष्य विषयसुखाला भुलून संसाराग्रीत उडी टाकतो ! स्त्रिया, पुत्र, आप्त, बंधु इ. संबंध जनसंसारसागरांतील पाय ओढणारे मासे आहेत ! प्राणिमात्र संसारसपीच्या मुखांतले मंडूक आहेत ! आमिषाला भुलून जसा मासा गळांत अडकतो, त्याप्रमाणे सामान्यजन प्रपंचांत अडकले आहेत ! शरीर, स्त्री, पुत्र, वित्त व सर्वप्रपंच हे दुःखाचे मूळ आहे. त्याचा त्याग करावा, हरिभजनीं चित्त रमवावे, असा संतांचा उपदेश आहे.

सांख्यांच्या दुःखवादाचा महाभारतावर झालेला परिणाम

आत्मतृप्तीकरिता प्रयत्न करणाऱ्या यतींनीं आणि मुनींनी प्रापंचिक सुखाची किंमत करण्याकरिता व प्रपंचाबद्दल विरक्ती उत्पन्न करण्याकरिता गर्भवासाचे काल्पनिक दुःख, दूषित समाजव्यवस्थेत व बेबंदशाही राज्यकारभारात होणारी कुटुंबाची राळ, जरादुःख, मृत्युदुःख इत्यादि दुःखे हुडकून प्रपंचाचे किंवा संसाराचे भयानक चित्र रेखाटले ! असत्य, दारिद्र्य, चोरी, चहाडी, व्यभिचार, धनयौवनादिकांचा गर्व इत्यादी दोष विषयवासनाजन्य आहेत हे पाहून विषयदुख विषासारखे आहे असे प्रतिपादन केले ! उपनिषत्कालानंतर किंवा उपनिषत्कालाच्या शेवटच्या भागांत सांख्य यती उत्पन्न झाले. सांख्य यतींनी पारमार्थिक कल्याणाचा मार्ग संन्यास किंवा प्रपंचत्याग ठरविला. प्रापंचिक गडबडी, व्यवहारांतील धांदल व इतर व्यवसाय मोक्षसाधनेत आड येतात म्हणून त्या सर्वोच्च त्याग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग ठरला आणि एकदां "त्याग केल्यानंतर पुनः व्यवहारांत साधकाने पडू नये म्हणून ऐहिक जगांतील वस्तुंच्या तिरस्काराचा अभ्यास करण्याकरिता दुःखवाद मांडला. योगशास्त्रांत याच अभ्यासास प्रतिपक्षभावना अशी संज्ञा आहे. सांख्यविचारसरणीत दुःखमीमांसा वाढीला लागली. सांख्यांनी मनुष्याच्या मनाचा एकांगी विकास करण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्यांना विश्वाबद्दल वैराग्य उत्पन्न करणे हा मुख्य उपाय दिसला. त्या उपायाची पूर्ण

सिद्धि होण्याकरिता दृश्य विश्वाचा तिरस्कार उत्पन्न करावा लागला. दुःखमीमांसेच्या द्वारे ही गोष्ट सिद्धीस गेली. वस्तुतः सांख्यशास्त्रदृष्ट्या या जगांत सुख आणि दुःख या दोघांचे मिश्रण आहे असे मानण्यास कोणताही प्रत्यवाय नव्हता सुखं दुःखमिहभयम् (म. भा. शां. प. १९०- १४). किंबहुना समाजांत सात्त्विक आचरणाचा जितका विकास होत जाईल, लोकांची नीतिमत्ता जितकी सुधरेल तितका सुखाचा अधिक आविर्भाव होईल, असे सांख्यशास्त्रदृष्ट्या सिद्ध करतां येते. 'सत्त्वं सुखे संजयति ; सत्वगुणाचे सुख हे कार्य आहे. पण संन्यासाश्रमांत प्रपंचाबद्दल पूर्ण विरक्ती आवश्यक असल्यामुळे त्याकरिता दुःखमीमांसा उदयाला आली. तिचा अधिकारी संन्यासी होय. सांख्यतत्त्व ज्ञानांत प्रपंचनिवृत्त यतींकरिता दुःखवादाचा उद्भव झाला. त्याचा परिणाम सांख्यतत्त्वज्ञानाच्या समकाली उत्पन्न झालेल्या महाभारतादि ग्रंथावर झाला. सुखाद्बहुतरं दुःखं जीविते नास्ति संशयः ॥ (शां. प. २०५--६ ३३० - १६) 'ह्या जीवितांत सुखापेक्षां दुःखच अधिक आहे.' गीतेतही मनुष्याचे जन्म अशाश्वत, दुःखाचे घर आणि पृथ्वीवरील संसार असुख आहे (गीता ८-१५ व ९-३३) असे म्हटले आहे. 'न संसारे सुखस्य गन्धमात्रमप्यस्ति ।' (गी. शां. भा. ५-२२). प्रपंच नेहमीं दुःख पूर्णच असणार असा दुःखवादाचा मथितार्थ आहे.

दुःखमीमांसा : उत्पन्न होण्याचीं कारणे

ऐहिक जीवित दुःखपूर्ण आहे ही कल्पना दशोपनिषदांत नाही. दुःखमीमांसा सांख्यसंन्याशांच्या व नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यांच्या वाङ्मयांत उदयास आली. तिचा पूर्ण मध्याह्न बौद्धक्रांतीच्या वेळीं झाला! बौद्धक्रांतीपूर्वीच उत्पन्न झालेल्या वैशेषिक, नैयायिक, ब्रह्ममीमांसक इत्यादि दार्शनिकांच्या वाङ्मयांत बुद्धोत्तरकाली दुःखमीमांसा पूर्णपणे शिरली. वैदिक धर्मीयांचे बुद्धोत्तरकालीन सर्व वाङ्मय या दुःखमीमांसेने व्यापले. दुःखमीमांसा कां उत्पन्न झाली ? याचे उत्तर अनेक प्रकारांनी देतां येते. (१) सांख्यादिक दार्शनिकांनी साधकाला पूर्ण तत्त्वप्रवण करण्याकरिता संन्यासाश्रम अत्यंत अनुकूल आहे असे पाहून तो टिकण्याकरिता आणि आपला संप्रदाय वाढविण्याकरिता प्रपंचाची दुःखमयता अधिक अट्टाहासाने प्रतिपादिली. (२) पौराणिकांनी व साधुसंतांनी भगवद्भक्ती वाढावी, नीतिमत्ता दृढ व्हावी, स्तेयं, हिंसा, व्याभिचार, अमृत इत्यादी विषयवासनाजन्य पापाचरणास आळा बसावा म्हणून प्रपंचाची दुःखमयता उच्चरवाने प्रतिपादिली. (३) संन्यासी, श्रमण, बौद्धभिक्षु, गोसावी, बैरागी, बुवालोक इत्यादिकांनी प्रपंचोन्मुख, गृहस्थाश्रमी, वर्णधर्माचा पुरस्कार करणाऱ्या, व्यवहारप्रवण प्रवृत्तिपंथाच्या वैदिक आचार्यापेक्षां आपली भूमिका श्रेष्ठ आहे हे सिद्ध करण्याकरिता आपला बडेजाव माजविण्याकरिता दुःखमीमांसेचे ढोंग माजविले आणि भारतीय समाजाच्या व्यावहारिक सुखांत व आध्यात्मिक सुखांत दुःखाचे विष कालविले! (४) दारिद्र्य, रोग, दैवी आपत्ती यांनी पीडिलेले, हिंमत खचलेले, दैवदुर्विलासांत ग्रस्त झालेले व पौरुषहीन झालेले लोक उपरती होऊन संन्यासाश्रमांत किंवा विरक्तीच्या पंथांत

शिरले व त्यांनी प्रपंचाच्या दुःखाचे अधिक भडक चित्र रंगविले !

दुःखमीमांसा भारतीय वाङ्मयांत प्रामुख्याने कशी मांडिली आहे व कां मांडिली आहे याचे थोडक्यांत विवेचन *स्थालीपुलाकन्यायाने आतांपर्यंत केले. संसार दुःखमय आहे या विचाराचा प्रभाव ज्या अंतःकरणावर पडला त्या अंतःकरणांत विश्वव्यापी आनंदतत्त्वाची स्फूर्ती होणे शक्य नाही. सर्व विश्वांत आनंदरूप परमात्मा भरून राहिला आहे या विचाराला कारण होणारी विचारपरंपरा दार्शनिक वाङ्मयांत व बुद्धोत्तर वाङ्मयांत आढळत नाही. हे वाङ्मय दुःखमीमांसेने व्यापिले आहे. पौराणिक वाङ्मयांत, दार्शनिक वाङ्मयांत व साधुसंतांच्या वाङ्मयांत आनंदरूपी परमात्मा प्रतिपादिलेला आहे, ही गोष्ट खरी आहे. पण तो उपनिषद्वाङ्मयाचा केवळ अनुवाद आहे.

उपनिषत्पूर्व वैदिक वाङ्मय व वैदिक संस्कृती : आनंदमीमांसेचे उगमस्थान आहे !

उपनिषत्पूर्व वाङ्मयांत आनंदमीमांसेच्या उदयाचा उषःकाल दिसून येतो. संहिताग्रंथांत व ब्राह्मणग्रंथांत आनंदमय परब्रह्माच्या उदयाचे स्वागत करणाऱ्या उषेचा मंगलमय अरुणवर्ण प्रकाश द्रष्ट्याच्या मनाला रिझवतो! ह्या आनंदमय चित्सूर्याच्या उदयकालीं वाहणारा मंद वायु द्रष्ट्याच्या मानससरोवरांत आनंदाच्या लहरी उठवीत आहे ! धर्म व नीती ह्यांची समाजांत स्थापना करणारे ब्रह्मवेत्ते ऋषी आणि आचार्य त्या आनंदसूर्याला अर्घ्यप्रदान करीत आहेत, असे उपनिषत्पूर्वकालीन वाङ्मय वाचीत असतां वाटते. ह्या वेदकालीन ऋषींना आरोग्यसंपन्न, द्रष्टिष्ठ व बलिष्ठ शरीराच्या ठायी आनंदाची प्रतीती येते! कीर्ती, यश, अन्न, पशु, ब्रह्मवर्चस व शतायुष्य हे भाग्य प्रत्येक पुरुषाला लाधावे, सन्मार्गाने व सत्प्रयत्नाने या वस्तुंचा प्रत्येकास लाभ व्हावा अशा आशावादाने ऋषींचे अंतःकरण भरलेले दिसते. नीती, धर्म, बाह्मतेज व क्षात्रतेज या गुणांनी विलसणाऱ्या समाजांत आनंदाचे निधान ऋषींच्या दृष्टीला गोचर होते! श्रद्धा, सत्य, ब्रह्मचर्य व अन्न यांनी शरीरबल आणि मनोबल यांची वाढ करण्याचा उपदेश ऋषी करतात. निरोग काया, मेधा, प्रजा, पशु, ब्रह्मवर्चस व अन्न ही जीवितरूपी यज्ञाची सामग्री ऋषींपाशीं दृष्टीस पडते. ऋषींच्या मनाला मृत्यूच्या गळफांसाची भीती वाटत नाही. कारण मृत्यु हे एक विश्रान्तिस्थान आहे अशी ऋषींची भावना आहे. ऋषींना अपमृत्यूचा मात्र तिरस्कार येतो. कारण, अपमृत्यु समाजांत स्वापराधाने येत असतो. 'अमृतमित्येवामुत्रोपासीतायुरितीह ।' [श. प्रा. १०-२-२] 'शरीराला शतायुष्य पाहिजे व आत्म्याला मोक्ष पाहिजे !' असे ऋषींचे शास्त्र आहे. प्रपंच नाशिवंत आहे म्हणून स्वतःच्याच हाताने तो बिघडवून टाकणे हे युक्त नाही. सगेसोयरे, बंधु, प्रियजन ह्यांचा वियोग सृष्टीतील खेळ समजून अचल चित्ताने ऋषी त्याकडे पाहतात. प्रत्येक व्यक्तीच्या उत्कर्षाचा मार्ग व

---

* टीप- शितावरून भाताची परीक्षा.'

आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग ऐहिक जीविताच्या प्रदेशांतून जातो. ऐहिक जीवित, कुटुंब व समाज हे मनुष्याच्या परमोन्नतीचे एकच एक साधन आहे. मनुष्याला माणुसकी कुटुंबामुळे व समाजामुळे आली आहे. म्हणून ऐहिक व्यवहार, शरीर, कुटुंब व समाज ही शुद्ध, वलसंपन्न व आनंदमय व्हावीं याकरिता ऋषींचा प्रयत्न चालला आहे असे वैदिक वाङ्मयांत दृष्टी पडते. ब्रह्मवर्चससंपन्न ब्राह्मण, दुष्टांचे निर्दालन करणारा प्रतापी योद्धा, सभा जिंकणारा ज्ञानसंपन्न तरुण, गृहकार्यदक्ष सुशील युवती, सस्यशालिनी पृथ्वी, चपल उमदे घोडे, पुष्ट बैल इत्यादि ऐश्वर्याने नटलेला व संपन्न समाज ऋषींच्या अंतःकरणांत नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेची स्फूर्ती उत्पन्न करतो. -सारी सृष्टी ऋषींना फुललेली दिसते. त्यांत मधु भरलेले पाहून ऋषींचे मन गुंजारव करीत असते. मधुमान् सूर्य विश्वाची प्रदक्षिणा करतो! मधूने युक्त निर्मल जल पाठीवर घेऊन नद्या वाहत आहेत ! उषा आणि रात्री माधुर्याने भरल्या आहेत ! पृथ्वीमातेच्या पोटांत मधु सांठविलेले आहे ! प्रकाशमान पिता द्युलोक मधुने परिपूर्ण भरला आहे! वनस्पतींच्या ठायी -मधु साठविले आहे ! गायींच्या स्तनांतून मधु स्रवत असते !

मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः । माध्वीर्नः सन्त्वोषधीः ॥ १ ॥
मधु नक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः । मधु द्यौरस्तु नः पिता ॥ २ ॥
मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः । माध्वीर्गावो भवन्तु नः ॥ ३ ॥

(ऋ० ११९०१६ - ८)

वैदिक ऋषींत जयिष्णु समाजाच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या आहेत. दुर्जनांच्या दौर्जन्याचा प्रतिकार करण्याचा ऋषींचा बाणा आहे. तप व पराक्रम ही ऐश्वर्याचीं साधने आहेत ! यश, कीर्ती आणि प्रताप हे कल्पनेच्या सीमा ओलांडीत आहेत ! ऋषींच्या हृदयांत आशावाद भरलेला दिसतो. उत्साह व प्रयत्न ह्यांची वाण कोठेही वैदिक वाङ्मयांत भासत नाही. वैदिक वाङ्मय आशावादाने फुलून गेले आहे. वैदिक वाङ्मयांतील आशावादाच्या पाठीमागे सत्कर्म, सामर्थ्य, सत्य, ज्ञान आणि तप यांचे अधिष्ठान आहे ! शुद्ध सौंदर्याचा ऋषींना वीट नाही ! वैदिक वाङ्मयांतून आनंदाची कारंजी बाहेर पडत आहेत. आध्यात्मिक आनंद व आधिभौतिक आनंद यांचे वैदिक वाङ्मयांत संगनमत झालेले आहे. प्रपंच व परमार्थ गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत !

वैदिक वाङ्मयांत आनंदमीमांसेची मुळ पीठिका सांपडते. शरीर, मन, कुटुंब, समाज, धर्म व देवता यांविषयी वैदिक वाङ्मयांत प्रकट झालेल्या विचारांत आनंदमीमांसेचा उदय झालेला आहे. म्हणून आपण संक्षेपतः वरील विषयांसंबंधाने प्रकट झालेल्या वैदिक विचारांचे थोडक्यांत मनन करूं...

शरीरविषयक वैदिक विचार

शरीर हे लाळ, थुंकी आणि मळ यांचे घर आहे, अशी कल्पना वेदांत सांपडत नाही.

शिरो मे श्रीर्यशो मुखं त्विषिः केशाश्च श्मश्रूणि।
राजा मे प्राणो अमृतं सम्राट् चक्षुर्विराट् श्रोत्रम्॥ ५॥
जिह्वा से भद्रं वाङ् महो मनो मन्युः स्वराड् भामः।
मोदाः प्रमोदा अङ्गुलीरङ्गानि मित्रं मे सहः॥ ६॥
बाहू मे बलमिन्द्रियं हस्ती मे कर्म वीर्यमात्मा क्षत्रमुरो मम॥ ७॥

(शु. य. अ. २०)

तात्पर्य — 'माझे शिर साक्षात् लक्ष्मी व प्राण राजा आहे ! चक्षु सम्राट् असून श्रोत्र विराट् आहे ! माझी वाणी मूर्तिमंत कल्याण आहे ! बुद्धी प्रकाशरूप असून क्रोध तेजस्वी राजा आहे ! माझे सर्व अवयव मोद व प्रमोद यांचे अधिष्ठान आहे आणि माझे सामर्थ्य हा मित्र आहे ! माझे बाहु साक्षात् बल होत ! दोन हात साक्षात् कर्तृत्व व सामर्थ्य होत आणि माझी छाती व आत्मा बलाढ्य वीर आहे!' छांदोग्यांत वाङ्मय, मन, संकल्प, चित्त, ध्यान, विज्ञान, बल, अन्न, जल, तेज, आकाश, स्मरणशक्ती, आशा, प्राण, सत्य, आणि सुख यांची उपासना करावयास सांगितली आहे. त्यांत बल, अन्न व प्राण यांचा शरीराशी संबंध असतो ही गोष्ट उघड आहे.

मृत्योः पदं योपयन्तो यदैत द्राघीय आयुः प्रतरं दधानाः !
आप्यायमानाः प्रजया धनेन शुद्धाः पूता भवत यज्ञियासः ॥

(ऋ. १०/१८/२)

तात्पर्य — 'अपमृत्यूला थारा देऊं नका ! मृत्यूचा पाय बाजूला सारून दीर्घ व तेजस्वी आयुष्य प्राप्त करून घ्या !! प्रजा आणि धन यांनी संपन्न व्हा ! पुष्ट व्हा आणि सत्कर्माने शुद्ध व पवित्र बना !' असा उपदेश ऋग्वेदांत केला आहे.

आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतां श्रोत्रं यज्ञेन कल्पतां वाग्यज्ञेन -कल्पतां मनो यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां ब्रह्मा यज्ञेन कल्पतां ज्योतिर्यज्ञेन कल्पतां स्वर्यज्ञेन कल्पतां पृष्ठं यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पताम्॥ २९॥

(शु. य. अ. १८)

तात्पर्य— 'सत्कर्माने आयुष्य, क्रियाशक्ती वाढावी, चक्षु, श्रोत्र, वाणी न मन ही समर्थ व्हावीं; आत्मा शुद्ध व्हावा, तेज वाढावे; स्वर्ग प्राप्त व्हावा; सत्कर्मने वाढावे;' अशी इच्छा यजुर्वेदांत प्रकट झाली आहे.

आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्व ब्रह्मोपनिषदम्।

तात्पर्य — 'माझे सर्व अवयव, वाक्, चक्षु, क्रियाशक्ती, बल ही वाढावी आणि त्या योगाने माझे ज्ञान व ब्रह्मज्ञान वाढावे' अशी प्रार्थना केनोपमनिषदाच्या शान्तिमंत्रांत केली आहे.

पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतं शृणुयाम शरदः शतं प्रब्रवाम शरदः शतमदीनाः स्याम शरदः शतं भूयश्च शरदः शतात् ॥ २४ ॥

[शु. य. ३६]

तात्पर्य——'कर्तृत्वाचं, दैन्यरहित व शक्तिसंपन्न असे शंभर वर्षीचे आयुष्य किंबहुना त्याहूनही अधिक आयुष्य प्राप्त व्हावे' अशी आशा प्रत्येक यज्ञकर्मात वैदिक गृहस्थ प्रकट करीत असे.

मानसिक उन्नती

शरीराच्या वाढीबरोबर मनाचीही वाढ ऋषींस अभिप्रेत आहे; मनाने केलेला प्रत्येक संकल्प सत्यमय, शुभ, धर्मयुक्त असावा, अशी भावना शिवसंकल्पसूत्रात प्रतिबिंबित झाली आहे. त्यांतील एक ऋचा उदाहरणार्थ पुढे दिली आहे.

'यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तरमृतं प्रजासु ॥ यस्मान्न ऋते किंचन कर्म क्रियते तन्मे मनः शिवसंकल्यमस्तु ॥ ३ ॥

(शु. य. ३४)

तात्पर्य:- 'मन हे सर्वज्ञानाचे उत्पत्तिस्थान आहे: धैर्य हा मनाचा मोठा धर्म आहे; जगांत न मालवणारी ज्योती म्हणजे मन होय; मनाच्या प्रेरणेवांचून कोणीतीही क्रिया होत नाही अशा ह्या मनांत, परमेश्वरा, नेहमीं शुभसंकल्पच उत्पन्न कर.' श्रद्धेचे माहात्म्य पारच उत्कृष्ट रीतीने ऋग्वेदांत दहाव्या मंडलांत प्रतिपादिले आहे.

श्रद्धां भगस्य मूर्धनि वचसा वेदयामसि ।

(ऋ. १०-१५१-१)

तात्पर्य:-'श्रद्धा हीच सर्व कल्याणाच्या शिरोभागीं आहे, असे आम्हांला सांगत आले आहेत.' उपनिषदांत सत्याचा महिमा अगाध आहे असे सांगितले आहे.

'सत्येन पन्था विततो देवयानः ।'

तात्पर्य:- 'देव सत्याच्याच मार्गाने गेले आहेत' -

'ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ।

(ऋ. १०-२९०-१)

तात्पर्य:- तपापासून 'सत्कर्म आणि सत्य उत्पन्न झाले; व त्यांपासून विश्वः निर्माण झाले.'

'सत्येनोत्तम्भिता भूमिः ।

(ऋ. १०-८५- १)

तात्पर्य:- सर्व पृथ्वीचा आधार सत्य आहे.

'सुविज्ञानं चिकितुषे जनाय सब्बासम्य वचसी पस्पृधाते ।
तयोर्यत्सत्यं यतरदृजीयस्तदित्सोमोऽवति हन्त्यासत् ॥

(ऋ. ७-१०४-१२)

तात्पर्य:- विवेकशील विद्वान् मनुष्याच्या मनांत सत्य आणि असत्य त्यांचा झगडा सुरू असतो; त्यांपैकी सरलसत्याचे, शांतीचा राजा सोम संरक्षण करतो व असत्याचा नाश करतो.

दृष्ट्वा रूपे व्याकरोत्सत्यानृते प्रजापतिः ।
अश्रद्धामनृतेऽदधच्छ्रद्धां सत्ये प्रजापतिः ॥
ऋतेन सत्यमिन्द्रियं विपानं शुक्रमन्धस इन्द्रस्येन्द्रियं पयोऽमृतं मधु ॥७७॥

[शु. य. १९]

तात्पर्य:- परमेश्वराने विश्वाचीं सत्य व अनृत अशी दोन रूपे निर्माण केली किंवा परमेश्वराने विश्वांत सत्य व असत्य असे दोन प्रकार निर्माण केले. असत्याच्या ठायी अश्रद्धेची स्थापना केली आणि सत्याच्या ठिकाणीं श्रद्धेची योजना केली. सत्कार्माच्या प्रभावाने सत्य, सामर्थ्य, भोग्य पदार्थ, अन्नजन्य वीर्य, आत्मसामर्थ्य, दूध, अमृत व मधु यांची प्राप्ती होते. सर्व जगाकडे आपण प्रेमाने पाहावे व सर्व जगाने आपणांवर प्रेम करावे अशी इच्छा मंत्रद्रष्ट याने व्यक्त केली आहे.

मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम् ।
मित्रस्य चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे ।
मित्रस्य चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षामहे ॥

(शु. य. ३६)

तात्पर्य:-- 'सर्व प्राणिमात्राने माझ्याकडे मैत्रीने पहावे; माझी दृष्टी सर्व प्राण्यांकडे मैत्रीची असावी; आम्ही सर्व मित्रभावाने जगांत नांदावे.'

सर्व धन व ऐश्वर्य केवळ शरीरपोषणार्थ व स्वसुखार्थ नाही. दान हाही धनाचा व ऐश्वर्याचा हेतु आहे.

वाजो नो अद्य प्रसुवाति दानं वाजो देवाँ क्रतुभिः कल्पयाति ।
वाजो हि मा सर्ववीरं जजान विश्वा आशा वाजपतिर्जयेयम् ॥

[शु. य. १८-३३]

तात्पर्य:- 'सर्व ऐश्वर्य आज मला दानाची प्रेरणा करो, संपत्ती मला देवांच्या यजनाची व पूजनाची प्रेरणा करो; धनाच्या योगाने मला पुत्रपौत्रादिक प्राप्त व्हावे; मी ऐश्वर्याचा राजा होऊन सर्व जगांत विजयी व्हावे; दाही दिशांना मला विजय प्राप्त व्हावा.' ऋग्वेदांत अराति शब्द आर्याचे शत्रू ह्या अर्थी आला आहे. अराति म्हणजे दानहीन. राति म्हणजे दान. दानहीन प्रजा आर्याची द्वेष्य असे.

"मोघमन्नं विन्दते अप्रचेताः सत्यं ब्रवीमि वध इत्स तस्य ।
नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी ।।

[ऋ. १०-११७--६]

तात्पर्य:- 'जो मनुष्य देवांचे यजन करीत नाही; मित्रांना मदत करीत नाही, तो खरोखर केवळ खादाड व पापी होय. त्या मूर्खाला विनाकारण घन प्राप्त होते. खरोखर मी असे म्हणतो की, यात त्याचा नाश आहे.'

नीतीच्या मर्यादा कोणीही उल्लंघूं नये असा आर्याचा दंडक असे.

सप्त मर्यादाः कवयस्ततक्षुस्तासामेकामिदभ्यंहुरो गात् ।

[ऋ. १०-५-६]

तात्पर्य- 'ज्ञानी पुरुषांनी नीतीच्या सात मर्यादा घालून दिल्या आहेत त्यांचे अतिक्रमण दुष्ट मनुष्य करतो.' कामक्रोधादि षड्रिपूंना जिंकणे हे अवश्य कर्तव्य आहे; त्या शिवाय मनाचा पूर्ण विकास होत नाही. षड्रिपूंचे गूढ पण खुबीदार भाषेत वर्णन ऋग्वेदांत आले आहे:---

उलूकयातुं शुशुलूकयातुं जहि श्वयातुमुत कोकयातुम् ।
सुपर्णयातुमुत गृध्रयातुं दृषदेव प्र मृण रक्ष इन्द्र ॥

[ऋ० ७-१०४-२२]

वैदिक आर्याची गृहसंस्था

व्यक्तीच्या उत्कर्षाबरोबर गृहसंस्थेचा उत्कर्ष वेदाला पूर्ण अभिप्रेत आहे. वैदिक कर्मकांड व ज्ञानकांड मुख्यतः गृहस्थाश्रमी ऋषींना स्फुरले आहे. गृहस्थाश्रम हा वैदिक धर्माचा मुख्य आधार आहे. वैदिक धर्म गृहस्थाश्रमांतच पूर्ण रूपाने व्यक्त होतो. वैदिक धर्माप्रमाणे ऐहिक सुख, पारलौकिक सुख व आध्यात्मिक सुख गृहस्थाश्रम्यालाच प्राप्त होते. मनुष्याचा सर्वांगीण विकास गृहस्थाश्रमांत होतो. गौतमधर्मसूत्रांत गृहस्थाश्रम हाच मुख्य आश्रम आहे. वानप्रस्थ व संन्यास अंध, पंगु, निर्बल व वृद्ध ह्यांच्या करिता आहे, असे एका आचार्याचे मत दिलेले आहे. या मतास त्या आचार्यानी एक महत्त्वाचा पुरावा दिला आहे.

'ऐकाश्रम्यं' त्वेके आचार्याः प्रत्यक्षावधानान्दार्हस्थ्यस्य गार्हस्थ्यस्य ।

(गौ.ध.सू.१-४)

तात्पर्यः– 'गार्हस्थ्याचे प्रत्यक्ष व प्रामुख्याने वेदांत विधान केले असल्यामुळे गृहस्थाश्रमच मुख्य होय असे एक धर्माचार्य म्हणतात'. गृहस्था श्रमाबद्दल उदात्त विचार वेदांत प्रकट झालेले आहेत.

अनुव्रतः पितुः पुत्रो मात्रा भवतु संमनाः ।
जाया पत्ये मधुमतीं वाचं वदतु शंतमाम् ॥

[अथर्व. ३-३०]

तात्पर्य:- पुत्र पित्राज्ञापरिपालक व मातृभक्त असावा; पतीशी पत्नी नेहमी मधुर व कल्याणकारक भाषण करणारी असावी.' कोणतीही स्त्री पतिगृही जाऊ लागली म्हणजे तिला कशा तऱ्हेचा उपदेश करावा याचा नमुना वेदांत आढळतो.

सुमङ्गली प्रतरणी गृहाणां सुशेवा पत्ये श्वशुराय शंभू ।
स्योना श्वश्वे प्रगृहान्विशेमान् ॥

[अथर्व १२-२-२६]

तात्पर्यः– 'हे स्त्रिये, तुझ्यावर सर्व कुटुंबाचे कल्याण अवलंबून आहे. पतीला तुझ्यापासून परमसुख व्हावे, सासऱ्याचे मन तुझ्या योगाने संतुष्ट असावे; सासूचे मन तुझ्या योगाने प्रसन्न रहावे, तू या घरांत प्रवेश कर.' गृहस्थाश्रम सुखाने व ऐश्वर्याने भरलेला असावा अग्नीची प्रार्थना पुढीलप्रमाणे केली आहे.

'अग्ने अभ्यावर्तन्नभि मा निवर्तस्वायुषा वर्चसा प्रजया धनेन सन्या मेधया रय्या पोषेण ॥

[शु० य० १२-७]

तात्पर्यः- 'हे अग्ने, आयुष्य, तेज, प्रजा, धन, बुद्धि, ऐश्वर्य आणि अन्न ह्यांनी मला संपन्न कर.'

अग्निः सप्तिं वाजं भरं ददात्यग्निवीर श्रुत्यं कर्मनिष्ठाम् ।
अभी रोदसी विचरत्समञ्जन्नग्निर्नारी वीरकुक्षिं पुरन्धिम् ॥

[ऋ. १०--८०--१]

तात्पर्यः- 'चपळ घोडे, आज्ञाधारक पुत्र आणि कर्मनिष्ठा अग्नीच्या कृपेने प्राप्त होतात. पृथ्वी व द्युलोक यांच्यामध्ये शोभायमान दिसणारा अग्नी वीरप्रसू व गृहकार्यदक्ष अशी पत्नी प्राप्त करून देतो.'

इमा नारीरविधवाः सुपत्नीराञ्जनेन सर्पिषा सं विशन्तु ।
अनश्रवोऽनमीवाः सुरत्ना आरोहन्तु जनयो योनिमग्रे ॥

[ऋ० १० -१८--७]

तात्पर्यः-- 'घरामध्ये वैधव्यरहित, अश्रुरहित आनंदी, निरोगी, सुंदर रत्नालंकार व घृतकुंभ धारण करणाऱ्या सुशील स्त्रिया नांदाव्या.'

वैदिक आर्याच्या समाजविषयक भावना

वैदिक कालांत आर्य लोक भारतवर्षात वसाहत स्थापनेचे व समाज संस्थापनेचे कार्य करीत होते. अशा स्थितीत आरोग्यशील, समर्थ, विजिगीषु, पराक्रमी प्रजा निपजावी अशी आशा बाळगणे निसर्गतःच प्राप्त आहे.. प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । (तै० उ०), वंशोच्छेद होऊ देऊ नका, असा उपदेश उपनिषदांत केला आहे. संस्कृतिस्थापनेच्या व समाजसंस्थापनेच्या काळांत ऐहिक सुखे आणि प्रपंच त्याज्य आहे अशी भावना बुद्धिमान् व कर्तृत्वशाली लोकांत जर रूढ झाली असती तर ते कार्यच सिद्ध झाले नसते. आक्रमणशील व महत्त्वाकांक्षी लोकच विजयी वसाहती स्थापन करतात. गतिशील समाजाचे हेच लक्षण

आहे. गतिशील समाजांत सुखबाद निर्माण होतो. सुखमीमांसा रूढ होते. दुःखवाद किंवा दुःखमीमांसा स्थितीशील समाजांत उत्पन्न होते. अथवा दलित व अवनत समाजांत दुःखवाद उत्पन्न होणे शक्य असते. आक्रमणशील समाजांत जर प्रपंचाबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला तर तो समाज संस्कृतीच्या लढयांत व स्पर्धेत पराभूत झाल्याशिवाय राहणार नाही.

समाजविषयक प्रभावशाली विचार वैदिक वाङ्मयांत प्रतिबिंबित झाले आहेत. यजुर्वेदांतील पुरुषमेधाला अत्यंत उन्नत स्वरूप प्राप्त झालेले दिसते. समाजरूपी विराट्पुरुषाच्या अधिष्ठात्री देवतेचे समाजाच्या सर्वांगीण विकासाने पूजन करणे हा त्याचा हेतू आहे. समाजांत चालू असलेल्या समाजविकासाच्या सर्व क्रिया हाच यज्ञ असून त्यांतून ऋग्वेदादी वाङ्मय, कला, गवाश्वादी माणसाळलेले प्राणी, ब्रीहियवादी धान्ये इत्यादिकांची उत्पत्ती होते असा पुरुषमेधांत विनियुक्त असलेल्या पुरुषसूक्ताचा अभिप्राय आहे. ज्ञानविषयक, व्यापारविषयक, राजकारणविषयक, औद्योगिककलाविषयक, नाट्यादिललितकलाविषयक प्रयत्न करणाऱ्या समाजांतील सर्व जातिसमाजाधिष्ठात्र्या सवितृदेवतेला अर्पण करणे हे पुरुषमेधाचे स्वरूप आहे. या पुरुषमेधाची देवता सविता होय. सविता म्हणजे राष्ट्रदेवता. [श. ना.११-३--१). या यज्ञाच्या आरंभी

विश्वानि देव सवितर्दुरितानि परा सुव ।
यद्भद्रं तन्म आ सुव ॥

(शु. य. ३०३)

अशी प्रार्थना करीत असत. ह्या मंत्राचा अर्थ असाः- 'हे राष्ट्रदेवते, -सर्व दुरितांचा म्हणजे असत्यांचा नाश कर आणि सर्व कल्याणांची दृष्टी कर'. . विश्वदेवतेच्या आराधनेकरिता व तद्रूपता प्राप्त होण्याकरिता यजुर्वेदांत -सर्वमेध यज्ञ सांगितला आहे. त्यांत शेवटी अशी प्रार्थना केली आहे-

इदं मे ब्रह्म च क्षत्रं चोभे श्रियमश्नुताम् ।
मयि देवा दधतु श्रियमुत्तमां तस्यै ते स्वाहा ॥

(शु. व. ३२-१६)

'ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्या दोघांना वैभव प्राप्त होवो आणि त्याबरोबर देव मलाही ऐश्वर्य देवो.' चयनादिक सर्व मोठ्या यज्ञांत राष्ट्रभृद्धोम सांगितला आहे. हल्लीं यजुर्वेयांच्या स्मार्तकर्मातही हा राष्ट्रभृद्धोम करीत असतात. ज्या मंत्रांनी हा होम करीत असतात त्या मंत्रांनाही 'राष्ट्रभृत्' अशी संज्ञा आहे. राष्ट्रभृत् म्हणजे राष्ट्राची धारणा करणारे. त्यांत वारंवार

स इदं ब्रह्म क्षत्रं पातु ।

(शु. य. १८-४३)

'तो सर्वात्मक देव ब्राह्मणांचे आणि क्षत्रियांचे संरक्षण करो.' असे पालुपद येत असते व शेवटी

अस्मै ब्रह्मणेऽस्मै क्षत्राय महि शर्म यच्छ ।

(शु. य. १८-४४)

या ब्राह्मणांना आणि क्षत्रियांना मोठे ऐश्वर्य दे.' असे म्हटले आहे. या चयनादिक मोठमोठ्या यज्ञांत सर्व चातुर्वर्ण्याचे संरक्षण व अभिवृद्धी व्हावी अशी आशा व्यक्त केलेली असते.

रुचं नो धेहि ब्राह्मणेषु रूचं राजतु नस्कृधि ।
रुचं विश्येषु शूद्रेषु मयि धेहि रुचा रुचम् ॥

(शु. य १८-४८)

'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र तेजस्वी व्हावे व त्यांच्या तेजाने माझे तेज वाढावे.'

तं लोकं पुण्यं प्रज्ञेषं यत्र सेदिर्न विद्यते ।

(शु. व. २० - १६)

'ज्या समाजांत कोणत्याही व्यक्तीची उपासमार होत नाही तोच पुण्य लोक होय.'

कर्तव्याचरणाचे महत्त्व,

विश्वाच्या घटनेत पर्जन्य, आदित्य इत्यादिकांच्या क्रिया जितक्या आवश्यक आहेत तितकेच समाजाच्या वाढीकरिता प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्यकर्म आवश्यक आहे. ही गोष्ट वैदिक आर्याच्या लक्षात होती.

यन्ति वा आपः । एत्यादित्य एति चन्द्रमा यन्ति नक्षत्राणि यथा ह वा एता देवा नेयुर्न कुर्युरेवं हैव तदहर्ब्राह्मणो भवति यदहः स्वाध्यायं नाधीते तस्मात्स्वाध्यायोऽध्येतव्यस्तस्मादप्यृचं वा यजुर्वा साम वा गाथां वा कुम्ब्यां वाऽभिव्याहेरद्रतस्याव्यवच्छेदाय ।

(श. ब्रा. ११-४-१-१०)

'मेघ, आदित्य, चंद्रमा, नक्षत्रे ह्या देवता सारख्या येतात आणि जातात. ह्या जर आल्या व गेल्या नाहीत तर जशी स्थिती होईल तशी स्थिती ज्या दिवशीं ब्राह्मण ज्ञान संपादन करीत नाही, विद्याभ्यास करीत नाही, त्या दिवशी होत असते; म्हणून व्रतभंग होऊ नये याकरिता ब्राह्मणाने नित्यः कोणत्या तरी विद्येचे अध्ययन केले पाहिजे.'

वैदिक आर्याचे देवविषयक व धर्मविषयक विचार.

ह्या ठिकाणीं धर्मशब्द संकुचित अर्थाने वापरला आहे. धर्म म्हणजे औपासन कर्म. उपासनाविषयक सर्व क्रियांचा धर्मशब्दाच्या अर्थात प्रकृतस्थळी अंतर्भाव केला आहे.

जगञ्चक्र चालविणाऱ्या शक्ती समाजांत व व्यक्तीत देखील कार्य करीत आहेत असा दृढ विश्वास दैनिक आर्यांच्या ठिकाणीं होता. ह्या शक्तींना 'देवता' अशी संज्ञा वैदिक आर्यांनी दिली. व्यक्तिसंवर्धक किंवा समाजसंवर्धक कर्तव्याला त्या त्या शक्तींच्या यथायोग्य

उपासनांची जोड वैदिक ऋषींनी दिली. उदाहरणार्थ- सुप्रजा, सुपुत्र ह्यांची समृद्ध होण्याकरिता गृहस्थाश्रमी आर्य प्रयत्न करीत असत. म्हणून अग्निहोत्रात्मक नित्योपासनेच्या वेळीं वरील समृद्धि प्राप्त व्हावी अशी प्रार्थना अग्निदेवतेपाशीं आर्य करीत असत. देवतेचे सामर्थ्य व गुण आपणांस प्राप्त व्हावे असा प्रत्येक यज्ञकर्माचा हेतू असे. अग्निहोत्रामधील उपस्थानांत आलेला एक मंत्र निदर्शनार्थ पुढे दिला आहे.

इन्धानास्त्वा शतँ हिमा द्युमन्तँ समिधीमहि ।
वयस्वन्तो वयस्कृतं सहस्वन्तः सहस्कृतम् ॥

[शु. य. ३-१८]

'तू प्रकाशयुक्त आहेस, आम्ही शंभर वर्षेपर्यंत प्रकाशमान होऊन तुला प्रदीप्त करावे. तूं अन्नाची समृद्धी करणारा आहेस; आम्हीही अन्नाने समृद्ध होऊन शंभर वर्षेपर्यंत तुझे स्तवन करावे; तूं सामर्थ्य देणारा आहेस; आम्ही सामर्थ्यवान् होऊन तुझे यजन करावे.'

वेदांत अग्न्यादि देवतांचे द्विविध स्वरूप वर्णिलेले असते. एक त्या देवतेचे वैयक्तिक स्वरूप व सामर्थ्य आणि दुसरे ती देवता सर्व विश्वमय व सर्वदेवतामय आहे असे स्वरूप. ऋग्वेदांत अग्नी, इंद्र, विश्वकर्मन् इत्यादी देवतांचे असे द्विविध वर्णन आलेले आहे. अनेक देवतावाद व एक देवतावाद ह्यांचा विरोध वेदामध्ये मिटलेला आहे. वैदिकधर्माचे उदार स्वरूप साक्षात् वेदांतच प्रकट झालेले आहे. अग्नी ही देवता सर्व विश्वरूप आहे अशी भावना अग्निहोत्राच्या वेळीं वैदिक आर्य व्यक्त करीत असे.

भूर्भुवःस्वः सुप्रजाः प्रजाभिः स्याँ सुवीरो वीरैः सुपोषः पोषैः ।
नर्य प्रजां मे पाहि शँस्य पशून्मे पाह्यथर्य पितुं मे पाहि ॥

[शु. य. ३-३७]

'भूलोक, अंतरिक्ष व द्युलोक ह्या तिन्ही रूपांनी नटणाऱ्या हे अग्ने, प्रजा, वीर, अन्न व पशु ह्यांचे संरक्षण कर व वाढ कर.'

ब्राह्मणाने आपल्या उन्नतीकरिता ज्ञानदेवता जी ब्राह्मणस्पती तिच्या आराधनेचा वाजपेय यज्ञ करावा असे वेदांत सांगितले आहे. राजसूययज्ञांत बलदेवता इंद्र व साम्राज्यदेवता वरुण ह्यांची आराधना राजाने करावी असे म्हटले आहे. व्यावहारिक कर्तव्ये, कामना व देवतांचा स्वभाव ह्यांची अनुरूपता लक्षात घेऊन वेदांत यजमानाकरिता यज्ञाचे विधान केलेले असते. उपासकांच्या जशा कामना त्याचप्रमाणे त्यांचे देव वेदांत वर्णिले आहेत. जशी श्रद्धा तसा देव. ज्या गुणांनी युक्त अशा देवतेची उपासना उपासक करतो, त्याच गुणांनीं तो युक्त होतो. कोणत्याही व्यक्तीचे, जातीचे किंवा समाजाचे जे ध्येय असते तीच त्याची देवता असते असे धर्मविषयक तत्त्वज्ञान शतपथब्राह्मणांत स्पष्ट सांगितले आहे.

'तं यथायथोपासते तदेव भवति ।'

[श. ब्रा. १०-३-७]

'त्याची ज्या स्वरूपांत उपासक उपासना करतो तसा तो होतो.'

शंकराचार्यांनी हाच वैदिक सिद्धांत गृहीत धरून उपनिषदांतील सर्व उपासनांची उपपत्ती लाविली आहे.

'यो यदुणकं ब्रह्मोपास्ते स तदुण- भाग्भवतीति ।

[तै. उ. शां. भा. २-३]

असे शंकराचार्यांनी म्हटले आहे.

तत्प्रतिष्ठेत्युपासीत प्रतिष्ठावान्भवति । तन्मह इत्युपासीत महान्भवति ।

[तै. उ. ३]

परमेश्वर श्रेष्ट गुणांनी संपन्न आहे अशी उपासना केल्यास मनुष्य श्रेष्ठ गुणांनी संपन्न होतो. तो सर्वांचा आधार आहे, अशा भावनेने उपासना केल्यास उपासक सर्वांचा आधार होतो. ध्येय व देव एक होत ही गोष्ट वैदिक ऋषींना माहीत होती. गंधर्वना रूप आवडते म्हणून रूप हाच त्यांचा देव. अप्सरांना सुगंध आवडतो म्हणून सुगंध हाच त्यांचा देव. मनुष्य अन्नाकरिता प्रयत्न करतो म्हणून अन्न हा त्याचा देव. अशा तऱ्हेचे शतपथांत वर्णन आले आहे. देवता म्हणजे त्या त्या विशिष्ट गुणांचे उच्चतम अधिष्ठान होय अशी कल्पना कथेच्या रूपाने शतपथांत मांडली आहे.. प्रजापतीने सृष्टी निर्माण करण्याच्या वेळीं उग्र तप आचरिले त्या तपाने श्रान्त झालेल्या प्रजापतीच्या शरीरांतून 'श्री [सर्व ऐश्वर्य] बाहेर आली. अत्यंत देदीप्यमान, प्रकाशमान असलेल्या त्या श्रीला पाहून देवांचे डोळे दिपले ! सर्व देवांना तिचा हेवा वाटला. तिच्याविषयीं असूया उत्पन्न होऊन प्रजापतीकडे देवांनीं 'श्रीला आमच्या स्वाधीन करा' अशी मागणी केली. प्रजापतीला वाटले की, देव मत्सराने श्रीचा वध करतील म्हणून प्रजापतीने देवांना सांगितले की, स्त्री ही अवध्य आहे, याकरिता श्रीला न मारितां तिची वांटणी तुम्ही करून घ्या. तेव्हां अग्नीने अन्न व अन्न पचविण्याचे सामर्थ्य श्रीपासून घेतले, सोमाने राज्य, वरुणाने साम्राज्य, सूर्याने क्षात्रतेज, इंद्राने बल, बृहस्पतीने ज्ञान व शील, सवित्याने पोषणसामर्थ्य व त्वयाने सौंदर्य निर्माण करण्याची शक्ती* किंवा कलाकुशलता श्रीपासून घेतली.

[श. ब्रा. ११-३-१-६]

ह्या गोष्टींचे तात्पर्य उघड आहे. समग्र ऐश्वर्याचे स्वरूप म्हणजे श्री व त्या ऐश्वर्याचा प्रत्येक भाग जेथे उत्कर्षाला गेलेला असतो ती देवता होय.

वैदिक धर्मात प्रत्येक गुणाचा स्वतंत्र उत्कर्ष गृहीत धरून भिन्नभिन्न देवतास्वरूपाची कल्पना जशी मांडली आहे; त्याबरोबरच, सर्व शक्तींचा आणि गुणांचा उत्कर्ष एकाच

तत्त्वापासून होतो, असाही मूळसिद्धान्त मानिला आहे. 'द्वैविध्य व एकत्व हे द्वंद्व मिळून एक अखंड ब्रह्म होय' असा विचार वैदिक धर्मात असल्यामुळे अनेकदेववाद व एकदेववाद ह्यांच्या झगड्यास वैदिक धर्मात वाव नाही.

एक एवाभिर्बहुधा समिद्धः एकः सूर्यो विश्वमनु प्रभूतः ।
एकैवोषाः सर्वमिदं वि भात्येकं वा इदं वि बभूव सर्वम् ॥

(ऋ. ८-५८-२)

इन्द्रं मित्रं वरुणमग्झिमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥

(ऋ. १- १६४-४६)

सर्वमेध नांवाच्या यज्ञांत सर्व विश्वरूप असलेल्या एकाच देवतेचे आराधन विहित आहे. त्यांत प्रारंभीच सर्व देवमय अशा एकाच देवाची कल्पना मांडली आहे. तो मंत्र असा:-

(शु. य. ३२-१)

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तद् चन्द्रमाः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म ता आपः स प्रजापतिः ॥

आर्यांचे अंतिम ध्येय.

सर्वत्र शांती नांदावी, शांतीचा विजय व्हावा असा उदात्त हेतु वैदिक कर्माच्या मुळाशी होता. मग ते क्षात्रकर्म असो की ब्रह्मकर्म असो. सर्व सद्गुणांची यथोचित वाढ होईल अशी समाजव्यवस्था असली तरच शांतीची स्थापना होते ! वैदिक आर्यांच्या दृष्टीने ब्रह्मतेज व क्षात्रतेज ह्या दोघांचीही आवश्यकता शांतीकरिता आहे. देवतोपासन, नीती आणि व्यवहार या तिघांच्या यथोचित संमेलनाने समाजांतील सुख आणि शांती वाढत असते. वैदिक धर्मात या तिन्ही गोष्टींचा पूर्ण समावेश केला आहे. ह्या तिन्ही गोष्टीं परस्पर सुसंगत झाल्या म्हणजे उत्कर्ष दूर राहत नाही. ह्यांपैकी कोणत्याही गोष्टीच्या अतिक्रमणाने किंवा अतिरेकाने समाजाची शांती बिघडते. यज्ञकर्माच्या समाप्तीच्या वेळी म्हणावयाचा शांतिमंत्र पुढील प्रमाण आहे:-

द्यौ शान्तिरन्तरिक्षँ शान्तिः पृथिवी शान्तिराप शान्तिरोषधयः शान्ति ।
वनस्पतयः शान्तिर्विश्वेदेवाः शान्तिर्ब्रह्म शान्तिः सर्व शान्तिः शान्तिरेव शान्तिः सा मा शान्तिरेधि॥

[शु. य. ३६-१७]

उपनिषदांतील आनंदमीमांसेचे स्वरूप

शरीर, मन, कुटुंब, समाज, धर्म व देवता यासंबंधी वैदिक आर्यांचे विचार आपण थोडक्यांत तपासले. आनंदमीमांसेचे उगमस्थान हे वैदिक विचार होय. भगवद्गीतेतील

नीतिशास्त्रविषयक व अध्यात्मविषयक विचार या वैदिक आर्यांच्या आनंदमीमांसक बुद्धींतच निर्माण झाले. मन्वादिकांच्या धर्मशास्त्रांतील समाजशास्त्र, नीतिशास्त्र, उपासनाशास्त्र इत्यादी सर्व शास्त्रे, ह्या वैदिक आर्याचीच करामत आहे ! उपनिषदांतील आनंदमीमांसेची स्फूर्ती वर वर्णिलेल्या विचारांनी युक्त असलेल्या अंतःकरणांत झाली. प्रपंच हा दुःखाने भरला आहे, अशा कल्पनेने घेरलेल्या हृदयांतून आनंदमीमांसेचा उदय होणार नाही. उपनिषदांतील आनंदमीमांसेचे स्वरूप काय आहे हे आपण आतां पाहू.

तैत्तिरीयोपनिषदांत प्राणिमात्राचे जीवन आनंदावर चालते असा सिद्धांत मांडला आहे. त्या सिद्धांताला तात्त्विक व अनुभवसिद्ध अशा दोन बाजू आहेत. तो सिद्धांत असा आहे. 'को ह्येवान्यात्कः प्राण्याद्यदेप आकाश आन- न्दो न स्यात् ।' 'हा सर्वव्यापी आनंद नसता तर कोणाचेच जीवन चालेचना' ! दुःखाच्या अतिरेकाने शरीराचा नाश होतो. दुःख अधिक झाले म्हणजे शरीर खंगते: संतोष व आनंद ह्यांच्या वाढीबरोबर शरीर पुष्ट व तेजस्वी होते; असा सर्वांचा अनुभव आहे. शरीरपोषणाच्या साधनसामग्रीचे जर आनुकूल्य असेल आणि साधनांच्या मानाने जर अपेक्षा परिमित प्रमाणांत असतील तर मनुष्याचे जीवित व्यवस्थित चालते. चरकाचार्यांनी सुख हे शरीराच्या वाढीचे आणि पुष्टीचे श्रेष्ठ साधन आहे म्हणून सांगितले आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक दुःखाला कारण होतो त्याप्रमाणे तृष्णेचा अतिरेकही दुःखाला कारण होईल यांत शंका नाही. पण आकांक्षेचा पूर्ण अभावही असून उपयोग नाही. मनुष्य परिपूर्ण होईपर्यंत त्याला आकांक्षा जर यथायोग्य प्रमाणांत नसतील तर त्याच्या उन्नतीला अवकाश राहणार नाही.

सुखसंपादन करणाचा प्रयत्नही जीवाला आनंद देत असतो. आरोग्यापासून मिळणारा आनंद कसरत किंवा श्रम केल्याशिवाय प्राप्त होत नाही. पण परिमित श्रम किंवा व्यायाम करण्यांतही मनुष्याला आनंद होत असतो. सुंदर चित्र किंवा मूर्ती पाहून सर्वांनाच आनंद होतो; पण सुंदर चित्र काढणारा चित्रकार किंवा सुंदर मूर्ती बनविणारा मूर्तिकार, चित्र किंवा मूर्ती तयार करीत असतांना त्यांत रममाण झालेला असतो. युद्धाने किंवा पराक्रमाने विजय मिळतो व त्यांत परमानंद होतो; पण खऱ्या वीराला ऐन युद्धांत उत्साह आणि वीरश्री यांचे भरते येत असते ! शेतकरी गाणीं गात गात नांगर हाकीत असतो ! विद्यार्थी ज्ञानसंपादन करीत असतां अभ्यासांत तल्लीन झालेला असतो ! संशोधक संशोधनाच्या कार्यात देहभान विसरतो ! मोक्षाकरिता झटणाऱ्या मुमुक्षूंना भजनांत व भगवंतांचे गुणानुवर्णन करण्यांत उत्पन्न होणाऱ्या प्रेमानंदापुढे मोक्षसुखही नीरस वाटते ! जगांत साध्यांतही आनंद व साधनांतही आनंद अनुभवाला येत असतो.

समाजाच्या अपूर्णावस्थेत साधनामध्ये कष्ट अनुभवावे लागतात. पण समाजाचा विकास जितका अधिकाधिक होत जातो, तितके साधनांतील दुःख कमी होत जाते. लहान मुलाला प्रथमतः मूळाक्षरे गिरविण्यास त्रास होतो; पण त्याला एकदा त्यांत कौशल प्राप्त झाले म्हणजे पुढे तो फर्डा लेखक बनतो. अव्यवस्थित मनुष्याला शिस्तीचा काच वाटतो; पण शिस्तीची

सवय झाल्यानंतर बेशिस्तपणाचा उलट तिटकारा वाटू लागतो. सवय व कौशल वाढले म्हणजे साधनांतही आनंद होऊ लागतो. नीती, धर्म, कला, विद्याभ्यास इत्यादि सर्व गोष्टींना हा नियम लागू आहे. साधनांत आनंद उत्पन्न होणे हे पूर्णतेचे लक्षण आहे.

पुष्कळ वेळा व्यक्ती किंवा समाज स्वतःच्या अपराधानेच दुःख ओढवून घेतात. परस्परांच्या शांतीचा, संतोषाचा, समाधानाचा अथवा आनंदाचा भंग करणारे आचरण जोपर्यंत व्यक्तीच्या हातून समाजांत वसत असते, तोपर्यंत शुद्ध सुखाचा अनुभव समाजात येत नाही. स्वतःच्या हिताला किंवा इतरांच्या हिताला विरोध करणारे आचरण म्हणजेच अनीती होय. नीती म्हणजे सर्वांच्या योग्यतेचा व गुणोत्कर्षाचा विचार करून कोणाच्याही उत्कर्षाला आड न येणारे, व्यक्तीच्या, समाजाच्या अथवा प्राणिमात्राच्या सुखास कारणीभूत होणारे आचरण होय. समाजाची नीतिमत्ता जितकी वाढेल, राजसंस्था जितकी न्याययुक्त होईल, स्पर्धेपेक्षां सहकारिता जसजशी वाढेल, तसतसे मानवजातीचे सुखही वाढत जाईल. सुखापेक्षां जीवितांत दुःखच अधिक आहे असा सिद्धांत करणे युक्त नाही.

खरोखर ऐहिक जीवित जर दुःखपूर्ण असेल, समाजाचा किंवा व्यक्तीचा दुःखरूप व्याधी जर असाध्य असेल, प्रपंच हा दुःखरूपी कालसर्पाचे बीळच जर असेल, तर मग समाजोन्नतीचे, राजधर्माचे, गृहस्थाश्रमाचे, आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, अर्थशास्त्र, वास्तुविद्या व शिल्पादिक कला यांचे प्रयोजन तरी काय उरणार ? समाजसंस्थेची तरी काय जरूर ? पराक्रमाला काय किंमत ? परोपकाराची काय आवश्यकता ? संपत्ती जर दुःखाचे मूळ आहे तर संपत्तीचे दान करण्यापेक्षां ती समुद्रास्तृप्यन्तु का करू नये ? कारण, दुसऱ्याला दिल्याने त्याच्या पदरीं आपण निखारेच बांधणार कीं नाही ? विष जसे आपणांस तसे दुसऱ्यासही मारक होय. 'अप्रतिसमाधेयव्याधीनां जलप्रवेशेनात्मत्यागः।' ह्या स्मृतिशास्त्राप्रमाणे प्रपंचातील दुःखव्याधी जर प्रपंच -त्यागाशिवाय शमणार नसेल तर प्रपंचाला व समाजाला बुडविण्याची चळवळ का करू नये ? संततिनियमनापेक्षां संततिप्रतिबंधच का करू नये ? यावर प्रपंचदुःखवादी लोक परलोकाकडे किंवा मोक्षाकडे बोट दाखवून त्याचे साधन या नात्याने या जगाचा उपयोग आहे म्हणून दुःख रूप प्रपंचच कडू गोळी समजून कसाबसा सहन करावयाचा, असे म्हणतील. पण एकंदरीत मोक्षाकडे किंवा परलोकाकडे डोळे लावून बसावयाचे. नाहीतर इहलोक म्हणजे केवळ श्मशानच होय !

दुःखवाद नेटका प्रपंच करावयास शिकवीत नाही. इहलोकी दुःखवादी मनुष्य धर्मशाळेतल्या पांथस्थाप्रमाणे वागत असतो. दुःखवाद्याला गृहस्थाश्रम अडगळीसारखा वाटतो. दुश्चित्त, दुर्मुखलेली, दिङ्मूढ प्रजा दुःखवादाच्या साम्राज्यांत वाढते. दुःखवाद अनैसर्गिक असल्यामुळे 'इदं च नास्ति परं च न लभ्यते' अशी मध्येच लोंबकळणारी प्रजा उत्पन्न होते. प्रपंच चालवितां येत नाही व परमार्थ पचत नाही. दंभ व मिथ्याचार यांचे स्तोम माजते. कोणताच नेटाने व महत्त्वाकांक्षेने होत नाही व दैववादाला जोर येतो.

प्रपंचदुःखवादाने नीतिसंस्थापना होत नाही; झाल्यास संन्याश्यांच्या एकांगी नीतीची स्थापना होते; अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादिक परमधर्माची स्थापना होते ! पण नीती ही केवळ संन्याश्यांकरिता नसते; समाजाचा मुख्य घटक गृहस्थाश्रमी हा आहे. समाजामध्ये सुप्रजेच्या वाढीची आवश्यकता असते. समाजाला न्याय्यमार्गाने संपत्तीच्या प्राप्तीची अपेक्षा असते. सृष्टीचे विविध ज्ञान, सत्कला, ममता, प्रेम, सौंदर्याची अभिरुची व ऐश्वर्य यांची जरुरी असते. समाजांतील प्रत्येक घटकव्यक्तीच्या वाढीकरिता शारीरिक सौख्याची व मानसिक सौख्याची आवश्यकता असते. विविध प्रकृतींच्या व गुणांच्या व्यक्तींनी व जातींनी भरलेल्या समाजांतील सर्व शक्तींचा व सद्गुणांचा यथायोग्य विकास करण्यास जे आचरण कारण होते, तीच पूर्ण नीती होय ! या नीतीचे स्वरूप प्रवृत्तिमय असते. प्रवृत्तिमार्गाचा व प्रपंचदुःखवादाचा विरोध आहे. पूर्ण नीतीच्या योगाने समाजाचे प्रापंचिकसुख व आध्यात्मिक सुख या दोघांचीही पूर्ण सिद्धी होत असते. किंबहुना समाजाचे प्रापंचिक सुख व अध्यात्मिक सुख ज्याच्या योगाने साधते तीच पूर्ण नीती होय. दुःखवाद्याला प्रपंचात सुख दिसत नसल्यामुळे केवळ आध्यात्मिक सुखाकडेच त्याची दृष्टी असते म्हणून त्याने ठरविलेली नीती एकांगी ठरते. समाज अथवा व्यक्ती केवळ आध्यात्मिक सुखावर जगत नसते, आधिभौतिक सुखही ऐहिक जीविताचा मुख्यभाग आहे ! पूर्ण नीतीत समाजाच्या किंवा व्यक्तीच्या ऐहिक जीविताची उपेक्षा असणे शक्य नाही. म्हणून दुःखवादाने पूर्ण नीतीची स्थापना होत नाही !

दुःखवादाने पूर्ण नीतीची स्थापना होत नाही म्हणून समाजव्यवस्थादी रहात नाही. निरनिराळे व्यवसाय व धंदे हे एक समाजाचे मुख्य स्वरूप आहे. दुःखवादी 'अर्थमनर्थं भावय नित्यं' असा नित्य उपदेश करीत असल्यामुळे त्याला समाजाच्या आर्थिक व्यवस्थेची व उत्कर्षाची पर्वा नसते..

समाजव्यवस्थेच्या अनेक अंगांपैकी अर्थ हे प्रधान अंग आहे. पण अर्थालाच अनर्थ ठरविल्यामुळे अर्थप्राप्तीची सर्व साधने त्याच्यादृष्टीने भयावह असतात. इंद्रियनियंत्रणापेक्षां इंद्रियांना कोंडणे हाच दुःखवाद्यांना पुरुषार्थ वाटतो. घरापेक्षा वन प्रिय वाटते. अत्याहाराची निंदा करून अनाहाराचे महत्त्व वर्णिले जाते. मिताहारापेक्षा उपवास श्रेष्ठ ठरतो. गृहस्थाश्रम तुच्छ ठरल्यामुळे संन्यासाश्रमास वरिष्ठत्व प्राप्त होते. घर बसते व मठाच्या उठाठेवी सुरू होतात. जाती, सभा, समाज यांचे ऐवजी भिक्षुसंघ व गोसाव्या-बैराग्यांचे तांडे उत्पन्न होतात. गृहस्थाश्रम दुःखपूर्ण व अनास्थेचा होतो. प्रपंचाला भरभराट येत नाही व परमार्थही तेजस्वी होत नाही. दांभिक संन्यासी आणि निष्प्रभ व पौरुषहीन गृहस्थ समाजात वावरू लागतात. विद्या व कला निस्तेज होतात. ब्रह्मविद्येचा केवळ शाब्दिक काथ्याकूट सुरू होतो. मठस्थापनेकरिताच कर्मयोगाला महत्त्व येते.

दुःखवादाने हिंदुस्थानांत गेल्या दोन हजार वर्षांत भारतीयांच्या प्रपंचाची अनास्था झाली. परलोक व मोक्ष ह्यांची विद्या आणि प्रपंच व समाज यांच्या उत्कर्षाची विद्या ह्यांत विरोध

आहे असा ग्रह समाजातील बुद्धिमान लोकांत रूढ झाला. परमेश्वराच्या कृपेने भारतीयांना सर्व ऐश्वर्याची जननी भारतभूमी प्राप्त झाली. महासागर व नगराज हिमालय ह्यांनी संरक्षणाची जबाबदारी घेतली. पण भारतवर्षात दुःखवादाच्या व ऐकान्तिक परलोकवादाच्या प्रभावामुळे दुर्दैवाचे साम्राज्य पसरले ! ज्यांच्यावर समाजधारणेची जबाबदारी तेच शास्त्रसंपन्न लोक प्रपंचाला तुच्छ लेखूं लागल्यामुळे सामान्य जनतेचा प्रपंच बिघडला ! समाजाच्या ऐहिक कल्याणाचे साधन असे जे आचरण तेच मनुष्याच्या पारलौकिक कल्याणाचे असाधारण कारण असा सिद्धान्त राजर्षींनी व ब्रह्मर्षींनी सिद्ध केला होता. तदनुरोधाने समाजाच्या उत्कर्षाचे शास्त्र जे धर्मशास्त्र ते निर्माण केले. पण दुःखवादी, एकलकोंड्या, व बेसावध अशा प्रतिष्ठित लोकांनी तेच साधन केवळ परलोकाचे साधन मानिले. ऐहिक उत्कर्षापकर्षाचा विचार सोडला. शास्त्रांतील ज्ञानाचा जिवंत झरा आटून सांठीव पाण्याप्रमाणे ज्ञान झाले. चौकसपणा व निरीक्षण सुटले. शब्दांचा कीस पडूं लागला. काल्पनिक जंजाल वाढले. प्रपंचाच्या व समाजाच्या उन्नतीची शास्त्रे अपरा विद्या समजून, त्यांची उपेक्षा झाली. अनधिकारी लोकांच्या हातांत खरी ब्रह्मविद्या किंवा पराविद्या गेली. आणि समाजाची पराकाष्ठेची अवनती झाली !

सामान्यतः कोणताही मनुष्य मनापासून दुःखवादी नसतो. ही गोष्ट दुःखवादी शास्त्रकारांनाही मान्य आहे. म्हणून सामान्य जनतेच्या अनुभवाचा पुरावा दुःखवादाच्या समर्थनाला उपयोगी पडणार नाही.

दुःखवादाने लोकांची नीतिमत्ता सुधारते; लोक संयमी बनतात; असे कित्येकांचं म्हणणे आहे. पण संयमाने व नीतीने मनुष्याच्या सुखांत भर पडते असे लोकांस पटविल्यास दुराचरणापासून लोक निवृत्त होतील, शुद्ध व नेटका प्रपंच करण्यास शिकतील. पण दुःखवादाने प्रपंच न सुधारतां प्रपंचाची अनास्था होते.

जग दुःखमय आहे ह्या विचाराने बद्ध लोक परामार्थाच्या मार्गाला लागतात; आणि मोक्ष हे जर प्रत्येक जीवाचे परमसाध्य आहे तर त्याकडे प्रवृत्त करण्याकरिता दुःखवादाची जरूरी आहे, असे कित्येकाचे म्हणणे आहे; पण हे बरोबर नाही. जगांतील अनित्य सुखापेक्षां मोक्षसुखाची किंमत अधिक आहे; अशा विचाराने मनुष्य मोक्षाकडे प्रवृत्त होईल; त्याकरिता दुःखवादाची जरूरी नाही. आत्मानंद अविनाशी आहे हे जर सत्य आहे तर विवेकी पुरुषाला ऐहिक सुखापेक्षां अनंत आत्मसुख श्रेष्ठतम वाटेल. ऐहिक सुख नाशिवंत आहे म्हणून त्यांत परमशांति नाही. आत्मतृप्तीनेच मनुष्य शोकांतीत होतो. शम आणि संतोष यांत सर्वश्रेष्ठ सुखाचा लाभ होतो. 'सन्तो षादनुत्तमसुखलाभः' (यो. सू. २-४२). ऐहिकविषयांत सुखाची इच्छा पूर्ण तृप्त करण्याचे सामर्थ्य नाही. 'यत्पृथिव्यां व्रीहियवं हिरण्यं पशवः स्त्रियः । एकस्यापि न पर्याप्तमेतन्मत्वा शमं व्रजेत् ॥' [भा. स्कं. ९] 'जगांतील सर्व विषय एका माणसाला देखील पुरणार नाहीत, असा विचार करून निष्कामता वरिली पाहिजे.' आत्मानंद सर्व जगांत श्रेष्ठ आहे म्हणून विचारशील मनुष्य त्याच्या प्राप्तीकरिता प्रयत्न करील.

बौद्ध, जैन, संन्यासी व साधुसंत ह्यांनीं गेलीं दोन हजार वर्षे दुःखवादाचा पुरस्कार केला. प्रपंचदुःखवादाने अहिंसेची, इंद्रियसंयमाची वाढ होते; पण समाजाची शक्ती खुरटते. दुःखवादाने परमार्थप्रवणता उत्पन्न होते; पण प्रपंचाची दैना होते. सात्त्विक सुखवादाने अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादी 'परधर्माचा उत्कर्ष होतो. पण त्याबरोबरच समाज बलवान व जयिष्णु होतो. सात्विक सुखवादाने प्रपंच वाढीला लागतो व त्यांतच परमार्थ सिद्ध होतो.

सर्व आनंदांची एकरूपता

व्यक्तीला आरोग्य, शक्ती व संपत्ती यांनी सुख होते. कुटुंबांत पतिपत्नी, माता पुत्र, बंधुभगिनी ह्यांच्या परस्पर प्रेमाने आनंद नांदत असतो. मत्सररहित, स्पर्धारहित, प्रयत्नशील, पराक्रमी व ज्ञानी लोकांच्या समाजांत सुख निवास करते. नियमबद्ध, अनन्त व अचिन्त्य अशा विश्वाच्या ठायी आनंदाची प्रतीति येते. काव्यांत, वाङ्मयांत, कलेत, सत्कर्मात आनंदाचा अनुभव येतो. समाधींत आनंदाच्या प्रकाशांत योगी तन्मय झालेला असतो. हे सर्व आनंद एकाच परमानंदाचे तुषार आहेत, असे उपनिषदांत कंठरवाने सांगितले आहे. एकच सूर्यमंडळ विश्वाला प्रकाशित करते. एकाच वायुने प्राणिमात्राची जीवनक्रिया चालते. एक वीणा सर्वांची मन रिझविते. त्याप्रमाणे एकच आत्मरूप आनंद त्या त्या विषयरूप उपाधींत सर्वांना आनंदवीत असतो. 'एतस्यैवानन्दस्यान्यानि भूतानि मात्नामुपजीवन्ति [बृ.उ. ४-३-२२] 'प्राणिमात्राच्या जीवनाला कारणीभूत होणारे सुख या परमानंदाचाच अंश आहे.'

संस्कृत साहित्यशास्त्रांत नवरसांची उपपत्ती उपनिषदांतील या आनंदसिद्धांतानुसार लाविली आहे. रसाचे लक्षण रसगंगाधरांत जगन्नाथ पंडितांनी याच दृष्टीने सांगितले आहे. 'वस्तुतस्तु वक्ष्यमाणश्रुतिस्वारस्येन रत्याद्यवच्छिन्ना भग्नावरणा चिदेव रसः ।'

'रसो वै सः रस ह्येवायं लब्ध्वाऽनन्दी भवति। [तै. उ. २-७]' मनुष्याच्या जीवितांतील सर्व रस आत्मरूप आहे. बृहदारण्यकोपनिषदांत प्रेममीमांसा मांडिली आहे. तेथे जगावर मनुष्य प्रेम का करतो याचे उत्तर दिले आहे. पती, जाया, पुत्र, वित्त, पशु, समाज, देव, प्राणिमात्र अथवा सर्व जग यांबद्दल प्रेम कां वाटते ? या प्रश्नाचे उत्तर 'या सर्वात एकच एक आत्मा भरून राहिला आहे. तो आत्मा आनंदरूप आहे ! तो सर्वांत प्रियतम आहे ! म्हणून ह्या सर्वांवर मनुष्य प्रेम करतो !' असे दिले आहे. समाज, प्राणिमात्र व सर्व जग ह्यांबद्दल जर आत्मभाव नसेल तर मनुष्याला दुःख प्राप्त होते असे त्यात पुढे म्हटले आहे. 'ब्रह्म तं परादाद्योऽन्यत्रात्मनो ब्रह्म वेद क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः क्षत्रं वेद लोकास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो लोकान्वेद ।' [बृ. उ. ४-५ -७] 'ब्राह्मण क्षत्रिय व सर्व लोक हे आत्मरूप नाही असे जो समजतो त्याचा अधःपात होतो !' बृहदारण्यकांतील याज्ञ वल्क्य व मैत्रेयी ह्यांचा संवाद वैदिकवाङ्मयवलीचे अत्यंत सुगंधी पुष्प आहे हा ! पतिपत्नींमधील प्रेममय संवाद आहे ! यात विश्वातील प्रेमाची मीमांसा वरीलप्रमाणे केली आहे. याच उपनिषदांत अन्यत्र मधुविद्या आली आहे. मधु म्हणजे जीवनरस, पोषकरस सर्व विश्वांत पोष्यपोषकभाव आहे. पृथ्वी, जल, अग्नी, वायु,

आदित्य, दिशा, चंद्र, विद्युत्, मेघ, आकाश, धर्म, सत्य, वित्त व प्राण ह्यांच्यापासून प्राण्यांचे जीवन चालते. त्यांतील जीवनदायी शक्ति म्हणजे मधु हे मधु एक आत्मरूप आहे. असा विचार मधुविद्येत आला आहे. प्रेमविद्या, मधुविद्या किंवा आनंदविद्या आत्मानंद व इतर आनंद ह्यांच्यांत अविरोधाची स्थापना करतात; त्यांची एकरूपता सिद्ध करतात. त्यामुळे आध्यात्मिक जीवन व अधिभौतिक जीवन यांची अखंडता सिद्ध होते. ह्यांचा समन्वय सिद्ध होतो. प्रपंचाचा व परमार्थाचा लढा मिटतो. प्रपंचाच्या मांडवावर परमार्थाची आनंदवल्ली फोफावते ! सुपुष्पित होते ! आनंदाने त्रिभुवन दरवळते ! व 'अवघाच संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिही लोक ॥' असे आत्मप्रतीतीचे उद्गार बाहेर पडतात !

आत्मानंदाच्या इच्छेने सर्व व्यवहाराचा परित्याग करून गिरिगुहादिकांचा आश्रय कांही लोक करतील, त्याला उपनिषदांची सम्मति आहे. काही लोक व्यवहारांतच यज्ञ, दान व तप यांच्या योगाने आत्मानंदाच्या प्राप्तीची खटपट करितील : 'तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति वज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन । एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्त प्रव्रजन्ति' (वृ.उ. ४-४-२२). प्रपंचत्याग किंवा प्रपंचस्वीकार या गोष्टी ज्याच्या त्याच्या स्वभावाप्रमाणे होतील. शुक, शंकराचार्य व ज्ञानेश्वर ह्यांच्यासारखे जन्मतःच आत्मतृप्त प्रकृतिस्वभावाप्रमाणे प्रपंचापासून दूर राहतील किंवा श्रीकृष्ण, याज्ञवल्क्य, अजातशत्रु, रैक व जनक ह्यांच्यासारखे प्रवृत्तिमय स्वभावाचे पुरुष द्वंद्वातीत आत्मानंदांत राहूनही सहज लीलेने व्यवहारांतील उलाढाली करितील. ज्याला व्यावहारिक प्रयत्नांची अनुकूलता नसेल अथवा ज्याचे मन व्यवहारापासून स्वभावतः निवृत्त असेल तो प्रपंच टाकील व ज्याच्या ठिकाणी व्यवहाराची धमक असेल तो प्रपंचाची उलाढाल करूनही परमार्थ प्राप्त करून घेईल! याज्ञवल्क्य ब्रह्मज्ञानी होते. पण त्याबरोबर त्यांचा गृहस्थाश्रमही संपन्न होता. सम्राट् जनकाने भरविलेल्या ब्रह्मवाद्यांच्या सभेत त्यांनी विजय मिळविला ! सुवर्णाचा ढीग याज्ञवल्क्यांच्या आश्रमांत पडला ! रैक्वाने ब्रह्मसाक्षात्कारानंतर जानश्रुतिराजाला उपदेश करून गृहस्थाश्रम स्वीकारला. अजातशत्रू साम्राज्य चालवीत असतां गार्ग्यासारख्या ऋषींना ब्रह्मोपदेश करीत होता. कोणताही आश्रम अथवा कोणतीही अवस्था आत्मप्राप्तीला आडवी येत नाही.

द्वंद्वसहिष्णु व द्वंद्वातीत पुरुष जे जे कर्म आचरितो त्यापासून फलप्राप्ती होवो अथवा न होवो, त्याच्या आनंदांत अंतर पडत नाही. इतर विनाशी आनंद व परमानंद ह्यांचा झगडा येथे मिटलेला असतो. ऐहिक जीवित ऐहिक आनंदापासून वाढते, त्याचा विरोध परमानंदाशी नाही. जर ऐहिक जीवित परमानंदाशीं विरुद्ध असेल तर परमानंदाकरिता ऐहिक जीविताचा त्यागच केला पाहिजे. पण असा विरोधच असणे शक्य नाही. ऐहिक आनंद परमानंदाचा अंश आहे या विचाराला त्यामुळे किंमत राहणार नाही. तसेच 'इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।' या सिद्धांताची वाट काय लागेल ? ऐहिक जीवित, ऐहिक जीवनानुकूल क्रिया यांचा व परमार्थाचा पूर्ण अविरोध आहे, असा गीतेचा सिद्धांत आहे. म्हणूनच द्वंद्वातीत

व त्रिगुणातीत पुरुषांच्या ऐहिक जीविताचे स्वरूप परम सात्त्विक असते, असे गीतेवरून निश्चित करतां येते. गीतेत सांगितलेले सात्त्विक कर्म, सात्त्विक धृती, सात्त्विक ज्ञान, सात्त्विक आहार इत्यादी सर्व सात्त्विक प्रकार द्वंद्वातीत पुरुषाच्या ऐहिक जीविताचे भाग आहेत; म्हणून परमानंद व ऐहिक आनंद यांचा अविरोध सिद्ध होतो.

आनंदविद्येचे माहात्म्य तैत्तिरीयोपनिषदांत असे वर्णिले आहे:-

आनन्दो ब्रह्मेति व्यजानात् । आनन्दाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते ॥ आनन्देन जातानि जीवन्ति ॥ आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति ॥ सैषा भार्गवी वारुणी विद्या ॥ परमे व्योमन्प्रतिष्ठिता ॥ य एवं वेद प्रतितिष्ठति ॥ अन्नवानन्नादो भवति ॥ महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन ॥ महान्कीर्त्या ॥

सर्व आनंदाचा अविरोध अथवा समन्वय

(तै० १० उ० ३-६)

'सर्व आनंदरूप आहे, असे ज्ञान झाले पाहिजे. प्राणिमात्राची उत्पत्ती, स्थिती व लय आनंदांत होतो! हे भृगूने ऐकिलेले व वरुणाने सांगितलेले ज्ञान आहे. ही विद्या शुद्ध व सूक्ष्म बुद्धीत आरूढ होते. ही विद्या ज्याला प्राप्त झाली, त्याला स्थैर्य प्राप्त होते, संपत्ती मिळते, संपत्तीचा खरा भोक्ता तो होतो, त्याची प्रजा वाढते, गवाश्वादी पशूंचा ज्याला लाभ होतो, ज्ञानाने व शीलाने जगांत तो चमकतो आणि कीर्तीने सारे भूमंडळ भरून जाते!' हे तत्त्वज्ञान ज्या समाजांत रूढ होते, तो समाज परिपूर्ण व विजयी होतो ! या तत्त्वज्ञानाचा प्रभाव फार मोठा आहे.

एतं ह वाव न तपति किमहं साधुनाकरवम् ॥ किमहं पापमकरव मिति ॥

(तै. उ. २-९)

'हे तत्त्वज्ञान ज्याला होते त्याला प्राप्त 'माझ्या हातून पुण्याचरण कां घडत नाही, पापाकडे माझी प्रवृत्ती कां होते ?' असा प्रश्न ताप देत नाही.'

हा आनंदसिद्धांत सर्व धार्मिक प्रवृत्तींचा आधार आहे.

भगवद्गीतेतील सात्त्विक सुखवाद

भगवद्गीता नीतिशास्त्र आहे म्हणजे भगवद्गीता समाजाच्या वाह्य व आध्यात्मिक सुखाला साधनीभूत असलेले आचरण सांगणारे शास्त्र आहे. भगवद्गीतेत कर्म, बुद्धी, धृती, तप, दान, आहार इत्यादिकांचे सात्विक, राजस आणि तामस असे विभाग केले आहेत. सत्त्वापासून सुखाची उत्पत्ती होते. सात्त्विक म्हणजे शुद्धसुखोत्पादक. ज्या साधनापासून किंवा कर्मापासून सुख उत्पन्न होते, त्या कर्माचा किंवा साधनाचा साक्षात् किंवा परंपरेने व्यक्ती, कुटुंब, जाती किंवा राष्ट्र यांवर केव्हांही दुष्परिणाम जर होत नसेल तर ते व्यक्ती, कुटुंब, इत्यादिकांस प्राप्त होणारे सुख शुद्ध होय. सात्त्विक कर्मासच.. दिव्य कर्म म्हणतात. हेच यज्ञार्थ कर्म होय. दुष्परिणाम, शक्तिक्षय, सामर्थ्य इत्यादिकांच्या विचार न करतां केले जाणारे कर्म दुःखाला

कारण होते म्हणून त्यास तामस कर्म असे गीतेत म्हटले आहे. कर्तव्याकर्तव्य, भयाभय, बंधमोक्ष इत्यादिकांचा विचार उरून धैर्याने व उत्साहाने केलेले निष्काम कर्म सात्त्विक कर्म होय. कारण, ह्या कर्माच्या आदी व अंती सुख असते. कर्माच्या सुखदुःखात्मक परिणामाचा विचार न करतां केले जाणारे कर्म असत्कर्म होय. सुखात्मक सत्परिणाम ही सत्कर्माची कसोटी आहे.

सत्परिणामाप्रमाणेच शुद्ध बुद्धी ही एक सत्कर्माची कसोटी आहे. द्वंद्वातीत, आसक्तिरहित बुद्धी हा शुद्धबुद्धीचा परम विकास होय. ह्या परमशुद्ध बुद्धींतच आत्मतृप्तिरूप सुख व्यक्तीला प्राप्त होते. कर्त्याच्या बुद्धीला सनातन धर्मशास्त्रांत फार महत्त्व दिले आहे. कर्त्याच्या हेतुची तपासणी जर केली नाही, कर्माकर्माची किंमत कर्त्याच्या बुद्धीवरून केली नाही, तर कर्त्याच्या अंतःकरणाची खरी उन्नती होणार नाही; कर्त्याच्या बुद्धीला शिक्षण व वळण प्राप्त होणार नाही. कोणतीही क्रिया यथासांग होण्यास कर्त्याला कर्माच्या सर्व अंगोपांगांचे ज्ञान जसे आवश्यक आहे, त्याप्रमाणे मनाच्या उन्नतीची आवश्यकता आहे. केवळ कर्माच्या दिसणाऱ्या परिणामावरून कर्माची परीक्षा केली तर समाजांतील बुद्धीला शुद्ध वळण न मिळाल्याने कर्माचे परिणाम देखील पुष्कळ वेळां समाजाला घातक होतील. सत्परिणामाच्या निष्पत्तीला सद्बुद्धीची आवश्यकता आहे.

शुद्धबुद्धी व सत्परिणाम या दोन सत्कर्माच्या कसोटी आहेत. दोन्ही कसोटींना जे कर्म उतरते ते सात्त्विक कर्म होय. कोणतीही उच्चक्रिया समाजांत सतत घडावयाची असल्यास उच्चबुद्धीची जरूरी आहे. कारण, बुद्धी हे कर्माचे असाधारण कारण आहे. भगवद्गीतेत ज्या सात्विक कोटी सांगितल्या आहेत त्यांचा अंतिम हेतू शुद्ध आनंदाची प्राप्ती हा आहे. कर्त्याच्या बुद्धीची उन्नती गीतेत सांगितल्याप्रमाणे झाल्यास सात्विक सुखाची 'यत्तदग्रे विषमिव।' हीही स्थिती राहणार नाही. प्रारंभापासून शेवटपर्यंत ते सुख अत्यंत गोडच होईल.

आत्मतृप्त पुरुषाला भगवान् लोकसंग्रहाकरिता कर्म करावयास सांगतात. लोकसंग्रह म्हणजे समाजाची उन्नती. समाजाच्या उन्नतींत समाजाला शांत आणि सुख यांचा लाभ होतो. खरोखर प्रपंचांत समाजाला शांती व सुख यांचा लाभ होणार नसेल तर भगवद्गीता लोकसंग्रहार्थ तरी कर्म करण्याला कां सांगते ? लोकांना स्वर्ग किंवा मोक्ष मिळावा एवढाच जर कर्मयोगाचा उद्देश असेल तर लोकांच्या प्रत्यक्ष जीविताची वाट काय ? अतींद्रिय व बुद्धीला अग्राह्य अशा मरणोत्तर जीविताकरिताच गीता व भारतीय शास्त्रे खटपट करतात, असे मानिले तर भग प्रत्यक्ष दिसणाऱ्या जीविताकरिता भगवद्गीतेचा संदेश काय आहे याचा उलगडा मुळींच होणार नाही. परलोकाच्या विवंचनेत पडून ऐहिक जीवित विसरणे हाच जर सनातन धर्माचा अर्थ असेल तर भारतीय संस्कृती व समाज ह्यांची वाट काय ? वास्तविक इहलोक आणि परलोक यांची संगती भगवद्गीतेला मान्य आहे. समाजाचा उत्छाद होऊं नये म्हणून भगवद्गीतेत कर्मयोगाचा उपदेश केलेला आहे.

सुखमीमांसा हा सनातन धर्मशास्त्राचा पाया आहे !

भगवद्गीतेप्रमाणेच सर्व सनातन धर्मशास्त्र समाजाच्या बाह्य व आध्यात्मिक उच्चतर सुखाकरिता निर्माण झालेले आहे.

ततो धर्मसमायुक्तः स जीवः सुखमेधते ।
इहलोके परे चैव...

(अनु. प. १११ - २६)

'धर्मात्म्या जीवाला इहलोकीं व परलोकीं सुख मिळते.'

अधर्मप्रभवं चैव दुःखयोगं शरीरिणाम् ।
धर्मार्थप्रभवं चैव सुखसंयोगमक्षयम् ॥

(मनु० ६-६४)

'जीवांना अधर्मापासून दुःखाची प्राप्ति होते आणि अक्षय सुख धर्मापासून प्राप्त होते.'

सुखं वाञ्छन्ति सर्वे हि तच्च धर्मसमुद्भवम् ।
तस्माद्धर्मः सदा कार्यः सर्ववर्णैः प्रयत्नतः ॥

(दक्ष. ३)

'सर्वांना सुखाची इच्छा असते. सुख हे वर्मापासून उत्पन्न होते. म्हणून सर्व मानवांनीं धर्माचे अवलंबन करावे.'

यदि येनेष्टसिद्धिः स्यादनिष्टाननुबन्धिनी ।
तस्य धर्मत्वमुच्येत...

[श्लो. वार्तिक १-१-२]

अनिष्टाननुबन्धीष्टसाधनत्वं धर्मत्वम् ।

'परिणामीं दुःखकारक नसणारे, दुःखापेक्षां अधिक सुख प्रसवणारे कर्म म्हणजे धर्म' अशी व्याख्या मीमांसक, नैयायिक व इतर धर्मनिबंधकार करतात

फलतोऽपि च यत्कर्म नानर्थेनानुबध्यते ।
केवलप्रीतिहेतुत्वात्तद्धर्मत्वेन हीष्यते ॥

[श्लो० वा० १-१-२]

'ज्या कर्मापासून केव्हांही अनर्थ उत्पन्न होत नाही व शुद्ध सुख प्राप्त होते ते कर्म धर्म होय.'

य एव श्रेयस्करः स एव धर्मशब्देनोच्यते ॥ (पू. मी. भा.१-१-१)

सुख व दुःखनाश हा सर्व धर्माचा हेतू आहे. इहलोकीं म्हणजे या जगांत धर्माचरणापासून सुख मिळते असे शांती व अनुशासन या पर्वात भीष्मांनी वारंवार सांगितले आहे. अव्यवस्थित समाजव्यवस्थेत व बेबंदशाही राज्यकारभारांत व्यक्तीला धर्माचरणापासून दुःख प्राप्त होण्याचा संभव असतो, म्हणून शास्त्रकार पारलौकिक सुख व्यक्तीला प्राप्त होते, असे सांगून आपत्कालींही धर्माचरणास प्रवृत्त करतात.

आम्रे फलार्थे निर्मिते छायागन्धावनूत्पद्येते ।
एवं धर्म चर्यमाणमर्थ कामावनूत्पद्येते ॥

(आप० घ० सू०)

'आम्रवृक्ष लाविला म्हणजे ज्याप्रमाणे छाया व सुगंध ही सहज प्राप्त होतात, त्याप्रमाणे धर्माचरणापासून अर्थ व काम यांची प्राप्ती होते.' समाजाच्या अपूर्णावस्थेत धर्माचरणापासून नेहमीं व्यक्तीला सुख प्राप्त होईलच असे नाही. धर्माचरणाचा संबंध केवळ वैयक्तिक सुखाशी नसतो. कुटुंब, जाती, मानवसमाज व प्राणिमात्र ह्यांच्या शांतीशीं व सुखाशीं धर्माचा संबंध आहे. पण धर्माचरणापासून व्यक्तीचे अर्थकार्यही सिद्ध होतात, असे शास्त्रकार स्पष्ट सांगतात.

धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ।

'धर्मापासून अर्थप्राप्ती व कामनापरिपूर्ती होते, असे असतां तुम्ही धर्माचरण कां करीत नाही ? असा प्रश्न व्यासांनी कळवळयाने विचारिला आहे. वैयक्तिक स्वार्थ म्हणजे अर्थकाम होत. समाजाच्या पूर्ण स्थितींत व्यक्तीचा स्वार्थ व परार्थ यांचा झगडा मिटतो. परार्थही व्यक्तीचा स्वार्थच होतो.

सनातन धर्मशास्त्र केवळ परलोकाकडे पाहून धर्मानुशासन करीत नाही. समाजाच्या ऐहिक कल्याणांतच व्यक्तीचा परमार्थ सिद्ध व्हावा असा भारतीय धर्मशास्त्राचा हेतू आहे. राजसंस्था जेव्हा न्याययुक्त असते तेव्हां समाजांत सुख नांदते, लोकांची उन्नती होते, समाजांत कृतयुग सुरू होते, समाज स्वर्ग बनतो, असे महाभारतांत भीष्मांनी व मनुस्मृतींत मनुनी म्हटले आहे. प्रपंच दुःखमय असा जर धर्मशास्त्राकारांचा सिद्धांत असता तर राजधर्माचे अनुशासन कशाकरिता केले असते ? स्त्रिया, पुत्र, वित्त ही जर दुःखद असती तर गृहस्थाश्रमाचे विधान धर्मशास्त्रांत केले नसते. अध्ययन केल्याशिवाय व प्रजा निर्माण केल्याशिवाय संन्यासाश्रम जो स्वीकारतो, त्याचा अधःपात होतो असे मनुस्मृतीत म्हटले आहे.

अनधीत्य द्विजो वेदाननुत्पाद्य तथा प्रजाम् ।
अनिष्ट्वा चैव यज्ञैश्च मोक्षमिच्छन्व्रजत्यधः ॥

(मनु. ६-३७)

गृहस्थाश्रम करून थकलेल्या मनुष्याने संन्यासाश्रम स्वीकारावा अशी मनुची आज्ञा आहे. प्रपंच जर असार असेल तर संतती कशाकरिता ? संतुष्ट पतिव्रता स्त्रिया, आज्ञाधारक पुत्र व न्यायार्जित चित्त यांनी गृहस्थाश्रमांत आनंदाची आणि कल्याणाची वृष्टी होते असा धर्मशास्त्राचा अभिप्राय आहे. नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, मनुष्यजातिशास्त्र, सुप्रजननशास्त्र इत्यादिकांचा विचार करून चातुवर्ण्यव्यवस्था धर्मशास्त्रकारांनीं समाजाचा योगक्षेम उत्तम चालावा म्हणून वर्णिली आहे. व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म, आश्रमधर्म, वर्णधर्म,

राजधर्म, साधारणधर्म, मोक्षधर्म, औपासनधर्म हे सर्व केवळ परलोकाकरिताच आहे असे एकांगी व दुराग्रही मनुष्याशिवाय कोणीही म्हणणार नाही. प्रपंचाबद्दलचा ऐकान्तिक दुःखवाद धर्मशास्त्रकारांना मान्य नाही. कारण अधर्मीपासूनच दुःख उत्पन्न होते असा धर्मशास्त्रकारांचा निश्चय आहे. धर्माच्या स्थापनेत ऐश्वर्य व सुख समाजाला प्राप्त होते असा विश्वास शास्त्रकारांच्या हृदयांत वसत आहे. दुःखपूर्ण आहे हा सिद्धांत मानिल्यास भारतीय धर्मशास्त्राची उपपत्ति लागणार नाही.

सुखवाद सर्व प्रवृत्तींचा आधार आहे.

यथा वै सुखं लभतेऽथ करोति नासुखं लब्ध्वा करोति सुखमेव लब्ध्वा करोति सुखं त्वेव विजिज्ञासितव्यम्।

(छां. उ. ७).

सुखाकरिता मनुष्य प्रवृत्त होतो, सुख न मिळाल्यास अथवा दुःख झाल्यास प्रवृत्ती थांबते, म्हणून सुखाचा विचारच मुख्य केला पाहिजे.' मनुष्याच्या सर्व प्रवृत्ती सुखाकरिता व दुःखनिवारणाकरिता आहेत. ज्या कर्मापासून मनुष्याला दुःखच अधिक अनुभवास येईल, त्या कर्माकडे सामान्य कोणताही मनुष्य प्रवृत्त होणार नाही. जे लोक संवयीमुळे अथवा इंद्रियांच्या ओढीमुळे दुःखद विषयांकडे प्रवृत्त होतात त्यांचा किंवा त्यांच्या कुटुंबाचा अथवा त्यांच्या जातीचा त्यामुळे नाश होण्याचा संभव असतो. मद्यपान, व्यभिचार इत्यादी दुराचरणाचे दुष्परिणाम माहीत असून, किंबहुना अनुभवित असूनही स्वैराचरणी लोक वरील दुराचरण करण्यास प्रवृत्त होतात, पण त्या प्रवृत्तीच्या मुळाशीं देखील तात्पुरती क्षणिक सुखाची अभिलाषा असते. ज्या व्यक्तींची भविष्यकालीन स्वतःच्या आयुष्यांतील चिरसुखाकडे अथवा शांतीकडे नजर असते त्या व्यक्ति दुराचरण टाळतात. ज्यांचे स्वतःच्या संततीकडे, जातीकडे अथवा समाजाकडे लक्ष्य असते, त्या व्यक्तींची संतती, जात अथवा समाज निसर्गात अधिक टिकाव धरतात. संयमी व्यक्तींचे स्वतःचे आयुष्य, जाती व समाज आनंदी व विजयी होतात. पुष्कळशा चांगल्या कृती मनुष्याच्या हातून बुद्धिपूर्वक घडत नसल्या, केवळ सवयीमुळे घडत असल्या, तरी त्या परिणामी सुखद होतात, म्हणून त्यांना 'सत्' हे विशेषण लाभते.

व्यक्तीच्या किंवा समाजाच्या ऐहिक सुखाशी ज्या धर्मशास्त्राचा मुळींच संबंध नसेल ते धर्मशास्त्र लवकरच नष्ट होईल. समाजांतील दुःख कमी करून सुखाची आणि शांतीची हळू हळू वाढ व्हावी; जगांतील झगडा मिटावा; व्यक्ती किंवा समाज अधिक जीवनक्षम, संरक्षणक्षम आणि पराक्रमी व्हावा, व्यक्तीच्या, जातीच्या व समाजाच्या सद्गुणांची योग्य प्रमाणांत बाद व्हावी; असा ज्या धर्मशास्त्राचा हेतु असेल तेच जगाच्या व्यवहारांत टिकेल. ज्या कमीना ऐहिक दृष्टीने कांहीच सार्थक्य नाही अशा कर्माचे विधान करणारे धर्मशास्त्र

बुडेल! सनातनधर्मशास्त्र व्यक्तीच्या अथवा समाजाच्या आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाकरिता व शांतीकरिता निर्माण झाले आहे. सनातनधर्मशास्त्र समाजाच्या उत्कर्षांचे शास्त्र आहे. त्यांतील कांही विचार तात्पुरत्या परिस्थितीच्या परिणामाने उत्पन्न झाले व दुसऱ्या परिस्थितींत व्यर्थ ठरले, तरी त्या धर्मशास्त्रांतील कांही मुख्य सिध्दांत भारतीय समाजाला उत्कर्षप्रद आहेत.

सनातन धर्मशास्त्राचा उदय वैदिक वाङ्मयांत झाला. ह्याची वाढ वैदिक आर्यांनीं केली. वैदिक आर्य आनंदवादी होते. ह्या धर्मशास्त्राच्या मुळाशीं ऐकान्तिक दुःखवाद नव्हता, तर धृत्युत्साहसमन्वित असा आनंदवाद होता. हे धर्मशास्त्र दुःखवादी व दैववादी लोकांनी मलिन केले. केवळ परलोकवादी लोकांनीं ह्या धर्मशास्त्राची कार्यक्षमता घालविली. भारतीय धर्मशास्त्र म्हणजे जीविताचे शास्त्र होय. ही गोष्ट विसरल्यामुळे चांगल्या व वाईट गोष्टींची सरभेसळ त्या शास्त्रांत झाली. सनातनधर्मशास्त्र हे भारतीयांच्या प्रपंचाचे सच्छास्त्र आहे. आधिभौतिक व आध्यात्मिक सुखवाद हा त्याचा पाया आहे.

परिशिष्ट

दुःखमीमांसा व आनंदमीमांसा ह्यांची तुलना

प्रपंचदुःखवाद

१ अहिंसा, ब्रह्मचर्यादिरूप नीतीच्या एकांगाची स्थापना.

२ समाज प्रमुखांच्या ठायी समाजविषयक औदासीन्य व अर्थविषयक तिरस्कार तज्जन्य सामान्यजनतेच्या प्रपंचाची अनास्था !

३ अधिकारानधिकाराचा विवेक न ठेविता पराविद्येचा प्रसार व यामुळे अपराविद्येचा अथवा भौतिकशास्त्रांचा, औद्योगिक व ललित कलांचा अपकर्ष! आणि काल्पनिक शब्दजंजालाची वाढ!

४ सहिष्णु, अज्ञ, प्रतिकारशून्य अनुकंपनीय व निष्प्रभ प्रजा निपजते !

५ संन्यासवादास प्राधान्य येते.

६ मिथ्याचारी तरुणसंन्याशांचे पीक.

७ मठसंस्थापक कर्मयोगी.

साचिकसुखवाद

१ प्रपंचपोषक व समाजधारक पूर्ण नीतीची स्थापना.

२ समाजाची आर्थिक व नैतिक धारणा. तज्जन्य सामान्य जनतेच्या प्रपंचाची सुव्यवस्था व भरमराट.

३ अधिकारसंपन्न पुरुषांच्या हातांत पराविद्या राहते.

४ धैर्यशील, जयिष्णु, उदार, उदात्तभावनासंपन्न व प्राज्ञ सुप्रजा वाढते.

५ कर्मयोगास वैशिष्ट्य येते.

६ अपवादभूत अधिकारयुक्त तरुण संन्यासी व मनुस्मृत्यनुरूप वृद्ध संन्यासी.

७ कुटुंब, जाती, समाज, राज्य व मठ यांची सम्यक स्थापना करणारे कर्मयोगी.

निवेदन

सनातन धर्मशास्त्राला मुख्य आधारभूत (Fundamental Principle) सात्त्विक आनंदसिद्धांत आहे म्हणून प्रथमतः प्रस्तुत लेखकाने या निबंधांत तो आनंदसिद्धांत अभिव्यक्त करण्याचा अल्प प्रयत्न केला आहे. आनंदाचे उपयुक्ततावाद, सौंदर्यमीमांसा, प्रेम, सत्य, इत्यादी विविध दृष्टींनी परीक्षण करावयाचे राहिले आहे. ते यथावसर करण्याचा संकल्प आहे. तसेच हे अवलोकन अत्यंत संक्षिप्त झाले आहे. पुढील आवृत्ती काढण्याचा योग येणे दुर्घटच आहे. पण आल्यास या निबंधांस अधिक नेटके व विस्तृत रूप द्यावयाचे आहे. यापुढे भारतीय धर्मशास्त्राचे विचार या आनंदसिद्धांताशी कसे सुसंगत आहेत, हे प्रस्तुत लेखकास दाखवावयाचे आहे. ते करीत असतांना सनातन धर्मशास्त्रांतील परमसत्य व नित्य असे सिध्दांत कोणते, परिस्थित्यनुरूप उत्पन्न झालेले युगानुरूप, अर्थात् अनित्य, असे सिध्दांत कोणते, याचे परीक्षण व विवेचन करावयाचे म्हणजे निदान १५/१६ शे पानांचे लिखाण तयार करावे लागेल. तसे ते तयार करण्याचे ठरविले आहे. हैद्राबाद [द.] येथील कार्यनिष्ठ देशभक्त वामनराव नाईक व प्राज्ञपाठशाळा यांच्या साह्याने या लेखकाच्या हातून हे कार्य पूर्ण होवो अशी ईश्वर चरणी प्रार्थना आहे.

जडवाद अर्थात् अनीश्वरवाद

वादविवेचनमाला

पुष्प - ११

जडवाद अर्थात् अनीश्वरवाद

लेखक :

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

प्रथमावृत्ती

२०।१०।४१

किंमत १। रुपया

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी.
६२३|१५ सदाशिव पेठ, पुणे.

[सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन]

संपादक
श्री. पां. वा. गाडगीळ

मुद्रक
शंकर विठ्ठल लेले.
दी प्राज्ञप्रेस
३१५, गंगापुरी, वाई (सातारा.)

प्रस्तावना

श्री. य. गो. जोशी यांनी मला 'वादविवेचन मालेत' 'अनीश्वरवाद' लिहिण्याची विनंती केली होती, मी त्यांस म्हटले की, अनीश्वरवादाला 'जडवादा' वाचून मुळीच महत्व नाही. एकाच वादाच्या जडवाद व अनीश्वरवाद या दोन बाजू आहेत. जडवाद ही विधायक (Positive) बाजू असून अनीश्वरवाद ही अभावात्मक (Negative) बाजू आहे. म्हणून जडवादाचे अंग म्हणूनच अनीश्वरवाद मी लिहू शकेन. त्याप्रमाणे त्यांनी मान्यता दिली. विधायक कल्पनेवरच अभावात्मक कल्पना अवलंबून असते. जडवादाची विधायक विचारसरणी बरोवर व निश्चित लक्षात घेतली म्हणजे त्यांतून अनीश्वरवाद आपोआप सिद्ध होतो. जडवादाची किंवा विज्ञानाची (Science) बौद्धिक भूमिका ज्याच्या नीट लक्षांत येईल, त्याच्या बुद्धीत ईश्वराला भूमी मिळूच शकत नाही. मिळाल्यास ती एक बाकीच्या व्यवस्थित विचारसरणीशी विसंगत असलेली व परंपरागत श्रद्धेने राखून ठेवलेली कल्पना होय, असेच म्हणावे लागेल.

तत्त्वज्ञानाची व आधुनिक विज्ञानाची मूलभूत पद्धती व त्यांची प्राथमिक तत्त्वे माहीत असल्याशिवाय प्रस्तुत निबंध वाचकांस नीट रीतीने समजणार नाही. उदाहरणार्थ पहिल्या ३० पृष्ठांतील ज्ञानमीमांसा पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील प्रमाणमीमांसा (Epistemology and Logic) ज्यांस अंशत: ही अवगत नसेल त्यास् उत्तम रीतीने समजणार नाही; व तिचे महत्त्वमापन करता येणार नाही. तसेच पृष्ठ ३४ पासून ४३ पर्यंत केलेले विषयविवेचन जीवशास्त्रावर व इंद्रियविज्ञानावर आधारलेले आहे.

'अनीश्वरवाद या प्रकरणांत पाश्चात्यांच्या व पौर्वात्यांच्या ईश्वराचें समर्थन करणाऱ्या सगळ्या युक्तींचे (Arguments) आठ विभागांत संकलन करून परामर्श घेतला आहे. यापेक्षा अधिक किंवा कमी विभागांत त्या युक्तींचा समावेश करता येईल. त्याचप्रमाणे ज्या

संज्ञांनी त्यांचा निर्देश केला आहे त्यापेक्षां निराळ्या संज्ञांनी त्याच युक्तींचा संग्रह भिन्न भिन्न दार्शनिकांनी केला आहे.

हा निबंध तात्त्विक जडवादाची एक लहानशी प्रस्तावनाच आहे. जडवादाचा व्याप फार मोठा आहे. जड (Matter-Energy) जीव (Life) आणि चेतन (Mind or Soul) यांचे परस्परसंबद्ध असे सिद्धान्त संक्षेपाने जरी मांडावयाचे झाले तरी त्याकरिता मनुष्याने संपादन केलेल्या सगळ्या विद्यांचा परामर्श घ्यावा लागेल. तितकी ताकत असलेल्या व्यक्तीनी अद्याप भारतीय बोलभाषेत या विषयाचे विवरण करण्यास सुरवात केली नाही. या गोष्टीने आपले अज्ञान किती अमर्याद व गाढ आहे, हे सूचित होते.

आपली प्रगती जडवादावाचून अडून राहिली आहे, जड़वादाने आपल्या विचारक्षेत्रात व वाङ्मयक्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय आपल्या बुद्धीचे जाड्य नष्ट होणार नाही. ज्या बुद्धीस जडवादाचे आकलनः होत नाही, ती जड असते. आपल्या सामाजिक बुद्धीतील व कर्मातील मांद्य व आंध्य नष्ट करण्यास तात्त्विक जडवादच समर्थ आहे. तात्त्विक जडवाद हा कलात्मक कर्म व ज्ञान - रूप विचार यांचा बलवान् असा आधार आहे. त्याच्याशिवाय, ईश्वरवादाच्या सोनेरी व सुंदर आवरणाखाली दडलेल्या सामाजिक अन्यायाचा व मानवी दास्याचा शुद्ध बुद्धीच्या न्यायासनासमोर निकाल लागणार नाही.

- लक्ष्मणशास्त्री जोशी.

अनुक्रमणिका

(अ) जडवादाचे सामान्य स्वरूप

१. जडवाद व विज्ञान यांचा संबंध २७९
२. तत्त्वज्ञान व विज्ञान २८०
३. ज्ञान व ज्ञेय यांच्या संबंधाची मीमांसा २८०
४. संवेदनांच्या बाहेर स्वतंत्रपणे जगत् आहे २८१
५. बौद्ध आचार्य, बर्क्ले, ह्यूम, कँट व हेगेल यांची विचारसरणी २८२
६. जगत् सत्य आहे व त्याचे ज्ञानही होत असते..... २८३
७. ज्ञात सत्य व अज्ञात सत्य २८४
८. सर्व सत्याचे संपूर्ण ज्ञान अथवा ब्रह्मज्ञान अशक्य आहे २८४
९. ज्ञान हे वस्तुतंत्र आहे २८५
१०. प्रत्यक्ष प्रत्यय हाच सर्व प्रकारच्या ज्ञानांत श्रेष्ठ २८७
११. ज्ञानप्रामाण्य ठरविण्याचे साधन २८७
१२. ज्ञान व वस्तू यांची अविभाज्यता (Unity) २८९
१३. व्यक्त वस्तू, प्रत्यक्ष अनुभव, व्यवहार व तात्त्विक विचारसरणी यांची संगती . २९१
१४. ज्ञानाचा परिणतिक्रम २९४
१५. 'जड' या शब्दाचा अर्थ २९७
१६. जडवादाचा मुख्य सिद्धांतः- द्रव्याच्या जड जीव व चेतन अशा तीन श्रेणी .. २९७
१७. देहच आत्मा २९९
१८. जीवपिण्डाची तीन वैशिष्ट्ये ३०३
१९. देहात्मप्रत्यय व देहात्मवाद ३०४
२०. देहभिन्न आत्म्याचे समर्थन करणाऱ्या प्रमाणांची मीमांसा ३०६

२१. द्रव्याचा स्वभाव व त्याची रचना ३१२
२२. द्रव्याची रचना व भिन्न भिन्न नियमपद्धती..... ३१५

(ब) अनीश्वरवाद

२३. ईश्वर शब्दाची व्याख्या ३१६
२४. ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न ३१८
२५. ईश्वराच्या अस्तित्वाची तार्किकप्रमाणे व त्यांची समीक्षा ३२०
२६. विज्ञान व ईश्वर ३३५

जडवाद

अ) जडवादाचे सामान्य स्वरूप

जडवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानात विश्वविषयक व समाजविषयक अशा दोन्ही तत्त्वांचा विचार केलेला असतो. जीवन व जगत् यांच्या वास्तविक स्वरूपाचा परामर्श घेणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. प्राचीन परिभाषेत जीव व जगत् किंवा आत्मा व सृष्टिप्रपंच यांच्या संबंधी विचारांस तत्त्वज्ञान किंवा दर्शन म्हणतात. परमार्थ, वस्तू, सत्य किंवा तत्त्व यांच्या बोधास तत्त्वज्ञान असे [१]अध्यात्मवादी दर्शनांत म्हटले आहे. प्रमाणांच्या द्वारे सर्वांगीण परीक्षण करून जे अबाधित ठरते ते [२]तत्त्व होय. तत्त्व म्हणजेच परमार्थ, वस्तू, किंवा सत्य होय. परमार्थाच्या या व्यापक अर्थाप्रमाणे जडवादी तत्त्ववेत्ते पर मार्थाचाच शोध करीत असतात.

१. जडवाद व विज्ञान यांचा संबंध.

विज्ञानांस (Sciences) आवश्यक असणारे ज्ञानसंबंधी सिद्धान्त किंवा प्रमितिशास्त्र (Epistemology) आणि विज्ञानास आवश्यक असणारे व वस्तूसंशोधनास मदत करणारे वस्तूंचे सामान्य सिद्धांन्त (Ontology) म्हणजेच जडवाद होय. जडवाद हा जगताच्या व जीवनाच्या वास्तविक स्वरूपाचा, विश्वांतील वैविध्याचा, एकरूपतेचा व संगतीचा अर्थ उलगडण्याच्या यशस्त्री प्रयत्नांचा आढावा होय. जडवाद हा निसर्गातील शक्तींवर विजय मिळविण्यांत यशस्वी झालेल्या मानवी प्रयत्नाचे रहस्य होय. जडवाद हा विज्ञानांचा निष्कर्ष आहे व तो विज्ञानाचे साधनही आहे. विज्ञानांच्या सामान्य मर्यादा व विज्ञानास आधारभूत असलेली सामान्य तत्त्वे विज्ञानांच्याच समीक्षणाने सिद्ध करून विज्ञानास प्रेरक असलेले व

---

*(१) न्यायसूत्र १।१।१ वैशेषिकसूत्र १।१।१.

*(२) न्यायभाष्य १।१।१.

त्याच्या प्रगतीस मदत करणारे एकमेव तत्त्वज्ञान म्हणजे जडवाद होय. हे तत्त्वज्ञान विज्ञानाचे पूरक शास्त्र आहे, ते विज्ञानापेक्षा वरिष्ठ नाही.

२. तत्वज्ञान व विज्ञान

विज्ञानाच्या शाखोपशाखांना जितका बहर येत जातो, तितके तत्त्वज्ञानांचे[१] प्रयोजन संपत जाते. जितकी विज्ञानाच्या शाखोपशाखांची वाढ होते त्या मानाने परंपरागत तत्त्वज्ञानांची गरज दिवसेदिवस संपत जाते. जेव्हां प्रत्येक विज्ञान आपआपल्या क्षेत्रांतील वस्तुंच्या विशेष व सामान्य स्वरूपांचे, तपशीलवार पर्यालोचन करून त्या वस्तूंचे रहस्य सांगते, आणि सर्व विज्ञाने एकत्रितपणे आपआपल्या वर्ण्य वस्तूंचे संकलित व सुसंगत असे विवरण करतात, तेव्हां केवळ कल्पनांच्या साहाय्याने घटपटांची खटपट करणारी दर्शने किंवा तत्त्वज्ञाने कमाक्रमाने निरर्थक ठरू लागतात. मग तत्त्वज्ञान हे विचारांचे सामान्य सिद्धान्त सांगणाऱ्या विज्ञानास जन्म देऊन विराम पावू लागते. जे तत्त्वज्ञान विज्ञानापेक्षा आपल्या श्रेष्ठतेचा बहाणा करते, त्या तत्त्वज्ञानात एकतर गहन पण शुष्क कल्पनांचे जंजाल तरी असते. किंवा त्यांत लोकभ्रमांचे सूक्ष्म समर्थन व फसवे पांडित्य तरी असते.

३. ज्ञान व ज्ञेय यांच्या संबंधाची मीमांसा

सगळ्या प्रकारच्या तत्त्वज्ञानांत जगांतील महान् दार्शनिकांनी अथवा तत्त्ववेत्त्यांनी महत्वाचा व मूलभूत प्रश्न जर कोणता उपस्थित केला असेल तर तो ज्ञान व ज्ञेय, संवित्ती व संवेद्य यांच्या परस्परं संबंधांबद्दलचा होय. आद्य शंकराचार्यांनी तत्त्वज्ञानाच्या प्रारंभी याच प्रश्नाला पहिल्यांदा हात घातली. संवित् व संवेद्य, विषय (Object) व विषयी (Subject) यांचा परस्परांशी काय संबंध आहे याचेच विवरण त्यांनी अभ्यासभाष्यात[२] केले आहे. न्यायभाष्याच्या प्रस्तावनेत[३] वात्स्यायन मुनीने प्रमाण प्रमेय प्रमिती व प्रमाता हेच तत्त्वज्ञानांतील चिंतनीय व सर्वव्यापी विभाग होत, असे विधान केले आहे, आणि याच मुद्याला अग्रस्थान दिले आहे. पाश्चात्यांच्या आधुनिक तत्त्वज्ञानात[४] याच प्रश्नाला मुख्यस्थान आहे.

संवित् व सवेद्य या शब्दांचा अर्थ असा आहे. संवित् म्हणजे ज्ञान किंवा भान (Consciousness) होय. संवेद्य म्हणजे ज्याचे ज्ञान किंवा भान होते ते. संवेद्यासच विषय किंवा ज्ञेय म्हणतात. विषयी, चित्, चैतन्य, भान, भास, अनुभव, अनुभूती, संवेदना, संवित्ती हे सर्व संवित्वेच पर्याय आहेत. 'अंगणात आम्रवृक्ष आहे' असे अंगणात दृष्टिक्षेप केल्यावर मला ज्ञान होते. हे ज्ञान 'अंगणातील वृक्षा' ची, संवित् होय. 'अंगणांतील आम्रवृक्ष' हा

---

(1) Anti Duhring, Introduction p. 32.

(२) शारीरभाष्य १।१।२

(३) न्यायभाष्य १।१।१

(4) Ludwig Feuerbach, p. 30 by Engels.

संवेद्य किंवा सवितूचा विषय होय. बाह्येंद्रियांनी व मनाने, किंवा ज्ञानेंद्रियसंस्थेच्या द्वारे, जे जे कळते तो विषय होय.

प्रत्यक्ष, अनुमान, काम, क्रोध, प्रीती, द्वेष, इच्छा, इत्यादी सर्व मनोवृत्तीत कोणत्या तरी विषयाचे भान असतेच. सगळ्या मनोवृत्ती संवेदनात्मक असतात. सगळ्या विचारविकारात संवित्त्वा किंवा अनुभूतीचा धागा गोवलेला असतो. सुख, दुःख, काम, क्रोध इत्यादी मनोवृत्ती म्हणजे निरनिराळ्या रंगाच्या संवेदना किंवा अनुभवच होत.

संवेदनेचे बाह्य व अंतर्गत असे दोन तऱ्हेचे विषय आहेतः शरीर व शरीराभोवतालचे विश्व हे बाह्य विषय होत, तहान, भूक, कामक्रोध, सुख, दुःख इत्यादी सर्व मनोवृत्ती अंतर्गत विषय होत. सुख, दुःख, तहान, भूक, काम, क्रोध इत्यादी मनःस्थितींची (States of Mind) प्रतीती ज्याची त्यालाच येते. एका व्यक्तीच्या मानसिक स्थितीचा दुसऱ्या व्यक्तीस प्रत्यक्ष प्रत्यय येऊ शकत नाही. दुसऱ्यास त्यांचे केवळ अनुमान होऊ शकते. एका व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीच्या मनोविकारांचा किंवा विचारांचा कयास, त्या व्यक्तीच्या वर्तनावरून, शरीरावर विकार विचारांचे जे परिणाम घडतात त्यांवरून किंवा त्या व्यक्तीच्या सांगण्यावरूनच करता येतो. म्हणून अंतर्गत विषयांस खाजगी किंवा वैयक्तिक विषय म्हणता येईल. त्याच बाह्य विषयांचा अनुभव अनेक व्यक्तींना येऊ शकतो म्हणून, बरट्रेड रसेलच्या भाषेत सांगावयाचे तर, बाह्य विषयांस सार्वजनिक (Public) असे म्हणता येईल. तोच सूर्य, तोच समुद्र, तोच चंद्र, तोच वृक्ष, तोच घोडा किंवा तोच मुलगा अनेक लोकांच्या प्रत्यक्ष प्रतीतीस येतो. मनोवृत्तींचे तसे नसते. त्या ज्याच्या त्यालाच प्रत्यक्ष कळू शकतात[१].

४. संवेदनांच्या बाहेर स्वतंत्रपणे जगत् आहे

जडवादाचा (Materialism) पहिला सिद्धांत असा आहे की, संवेद्य वस्तू (Being), संवित्तीच्या बाहेर, स्वतंत्रपणे अस्तित्वांत असतात. संवेद्य वस्तू किंवा विषय म्हणजेच जगत् होय. जगत् हे सत्य आहे; मिथ्या, मायामय किंवा काल्पनिक नाही. मी जो आम्रवृक्ष पहात आहे तो मला किंवा कोणासही माहीत नसला तरी असतोच. 'मी भूगोलावर उभा आहे' अशी मला प्रचीती येते; मी, इतर मनुष्ये, व जीवसृष्टी नव्हती, तेव्हांपासून हा भूगोल आहे. त्याच्या अस्तित्वांचा प्रत्यय घेणारा मी किंवा इतर कोणीही नसले तरी त्या भूगोलाच्या स्वतंत्र अस्तित्वाला काहीच बाधा नसते. म्हातारीने कोंबडा झाकला तरी सूर्य उगवल्याशिवाय राहात नाही, त्याचप्रमाणे विश्वातील वस्तुंच्या विविध घडामोडी ज्ञात्यावाचून सुरूच असतात. कोणाच्याही संवेदनेवर, प्रतीतिवर किंवा अनुभवावर त्या अवलंबून नसतात. ज्ञाता नसला तरी ज्ञेय असतेच, नाक नसले म्हणजे वास नसतो किंवा डोळे नसते म्हणजे रूप नसते असे थोडेच आहे. स्वार नसेल तर घोडा नाही, असे कोण म्हणेल?

---

(1) Scientific thought, by C. D. Broad.

५. बौद्ध आचार्य, बर्क्ले, ह्यूम, कँट व हेगेल यांची विचारसरणी

अनुभव संवित्ती किंवा ज्ञानच खरे आहे व अनुभवाचा संवित्तीचा किंवा ज्ञानाचा विषय खोटा आहे, असे सांगणारे काही तत्त्ववेत्ते आहेत. ज्ञेयांला ज्ञानाच्या बाहेर, ज्ञानाच्या शिवाय, स्वतंत्र अस्तित्वच नाही, असे सांगणारे बौद्ध आचार्य हिंदुस्थानात प्राचीनकाळी होते. धर्मकीर्ती हे सातव्या शतकातील महान् पंडित या मताचे[१] पुरस्कर्ते होते. सवेदनांच्या प्रवाहाशिवाय संवेद्य म्हणून स्वतंत्र असे काहीच नाही, असे बिशप बर्क्ले प्रभृती आधुनिक पाश्चात्त्य तत्त्ववेत्तेही सांगतात. जागृती म्हणजे एक भले मोठे स्वप्न होय. ज्यास आपण स्वप्न म्हणतो ते अल्पकाल टिकते एवढाच जागृतीपेक्षा त्यात फरक आहे. स्वप्न हे खरे असते पण स्वप्नात दिसणारा हत्ती खोटा असतो, त्याचप्रमाणे संवेदना किंवा मनोवृत्ती (States of Mind) खऱ्या आहेत, त्यांच्या खोटेपणाबद्दल कधीच शंका असत नाही; परंतु त्यांचा विषय मिथ्या असतो. असे बर्क्ले म्हणतो.

ज्ञान किंवा संवेदना यांच्या बाहेर स्वतंत्र असे विश्व नाही असे म्हणणारे तत्त्वज्ञ जगात फार थोडेच झाले आहेत. बिशप बर्क्ले याने संवेदनाच खऱ्या आहेत व संवेदनेचा विषय खरा नाही असे म्हटले; तरी त्याने ही गोष्ट सांगितली की, संवेदनाशील अनंत जीवव्यक्ती आहेत व संवेदनाशील जीव व्यक्तीहून निराळा वासनात्मक परमेश्वर आहे. परमेश्वरी वासना शाश्वत असून त्यांच्या शासनशक्तीमुळे जीवसंवेदनांचे प्रवाह प्रवृत्त झाले आहेत. दिव्य परमेश्वरी वासना (Volition of God) म्हणजे जीवसंवेदनांच्या बाहेर असणारी स्वतंत्र वस्तुच होय. म्हणून स्वसंवेदनांच्या बाहेर स्वतंत्र काही आहे, यास प्रमाण नाही, हे म्हणणेच बरोबर नाही, हे बर्ल्केच्या सिद्धान्तावरूनच सिद्ध होते. या बाबतीत बर्ल्केपेक्षा हिंदुस्थानातील धर्मकीर्ती प्रभृती प्राचीन बौद्ध आचार्यच अधिक सुसंगत विचार सांगत होते. त्यांनी जीवसवेदनांचेच अस्तित्व मानले आहे.

ह्यूम प्रभृती तत्त्ववेत्ते असे म्हणतात की, संवेदनांच्या किंवा अनुभूतीच्या अस्तित्वाबद्दल शंका असण्याचे मुळींच कारण नाही. परंतु संवेद्य वस्तू (Objects) जशाच्या तशा, अनुभूतीच्या बाहेर, अनुभूतीच्या शिवाय, अलगपणे आहेत की नाहीत यास काहींच प्रमाण नाही. हे तत्वज्ञ बाह्य जगाच्या सत्यत्वाबद्दल संशयच प्रकट करतात. या तत्त्ववेत्यांनी अज्ञेयवाद (Agnosticism) नावाची विचारसरणी निर्माण केली.

वरील दोन्ही मते जडवादी तत्त्वज्ञ मान्य करीत नाहीत. कँटने वास्तविक जगत् (The thing in itself) आणि बुद्धिगम्य जगत् (Phenomenon) असे जगताचे दोन विभाग केले आहेत. वास्तविक जगत् म्हणजेच परमार्थ वस्तू किंवा सत्य होय. 'हे सत्य (Objective Reality) मनुष्याच्या आटोक्याबाहेर आहे, असे कँट म्हणतो. बुद्धिगम्य जगत् हे

---

(१) प्रमाणवार्तिक

सत्यवस्तुचा मिथ्या देखावा आहे. या देखाव्याने सत्य झाकून गेले आहे. कँटने केलेले हे जगताचे विभाजन जडवाद मान्य करीत नाही. बौद्धांपैकी वैभाषिक पक्षाचे आचार्य असे म्हणत असत कीं, बाह्यार्थांची साक्षात् अवगती जरी होणे शक्य नाही, तरी अंतःकरणांत त्यांचे जे वृत्तिरूप परिणाम घडतात त्यावरून बाह्यार्थांच्या अस्तित्वाचे अनुमान करता येते. हेगेल (Hegel) ने कँटचे मत संपूर्णपणे खोडून काढले आहे. ज्ञान किंवा अनुभव हा कशाचा तरी असतोच. ज्याचे ज्ञान होते किंवा ज्याचा अनुभव येतो, ते जर मुळींच नसेल तर ज्ञानांला व अनुभवालाही अस्तित्व येणार नाही. ज्याला विषय नाही असे ज्ञान किंवा असा अनुभव आहे, या म्हणण्याला काही अर्थ नाही. 'बिनआईचे मूल' या वाक्याइतकेच वरील वाक्य निरर्थक आहे.

६. जगत् सत्य आहे व त्याचे ज्ञान ही होत असते

वास्तविक जगत् जर आपल्या आवाक्याबाहेर असेल, ते आपल्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा विषय होत नसेल, तर अमुक ज्ञान किंवा अमुक अनुभव खरा व अमुक ज्ञान किंवा अमुक अनुभव खोटा, असा फरकच आपणास करता येणार नाही. कोणाच्याही व कोणत्याही ज्ञानात खरे जगत् कंळू शकत नसल्यामुळे सगळीच ज्ञाने खोटी ठरतील; सगळेच लोक सारखेच मूर्ख वा भ्रांतिष्ठ ठरतील; सगळेच वेडे ठरतील आणि आपल्या अनुभवातले सगळे जग वेड्यांचा बाजार ठरेल; सदसद्विवेक, खऱ्याखोट्याचा न्याय, इत्यादी कल्पना व्यर्थ ठरतील.

जे तत्त्ववेत्ते असे सांगतात की, या बाह्य देखाव्याच्या पाठीमागे सत्यवस्तू असून त्या वस्तुची अवगती होऊ शकत नाही, त्यांना उलट असा प्रश्न विचारावासा वाटतो कीं, जी सत्यवस्तू कळू शकत नाही, त्या वस्तुची संवेदना होत नाही हे तरी तुम्हास कसे समजले ? त्या सत्य वस्तुचे (the thing in itself) अस्तित्व कळल्याशिवाय तिच्या बद्दल कोणतेही विधान करणे कसे शक्य आहे ? ती वस्तू कोणत्याही रीतीने कळली असेल तर तिचे ज्ञान होऊ शकत नाही, हे म्हणणे वदतोव्याघातच होय.

बाह्य स्वतंत्र विश्व अस्तित्वात आहे आणि त्या विश्वाचे यथार्थ ज्ञान होऊ शकते, हे ज्यांना मान्य नाही, त्यांस कोणतेच विज्ञान प्रमाण म्हणून मान्य नाही, असे म्हटले पाहिजे. कारण सगळीं विज्ञाने (Sciences) विश्वाचे स्वतंत्र अस्तित्व गृहीत धरून आणि त्याच्या यथार्थ ज्ञानाची शक्यता वरूनच प्रवृत्त झाली आहेत. तसे नसते तर दुर्बिणी लावून नव्या नव्या ताऱ्यांचे शोध करण्याचा प्रयत्न ज्योतिषज्ञांनी कसे केले असते ? पदार्थविज्ञानाच्या व जीवशास्त्राच्या पंडितांना सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या आश्रयाने सूक्ष्म वस्तू धुंडाळण्याचा ध्यास कसा लागला असता ? गणितशास्त्र सुद्धा ज्ञेय वस्तुंच्या संख्यांचे व परिमाणाचे शास्त्र आहे. बाह्य वस्तुचा माणसास पत्ताच लागणे शक्य नसेल तर त्या वस्तुच्या संख्येचा व परिणामाचा विचार करण्याची काय गरज आहे ? वस्तू व वस्तुधर्म असत्यच असतील तर सगळींच

विज्ञाने अप्रमाण ठरतील. विज्ञाने म्हणजे सत्याचा शोध करणाऱ्या अगणित मानवांच्या अपरिमित परिश्रमांचे अमृततुल्य फल होय. तेच फल नेहमीच नीरस व नासलेले आहे, असे म्हणणारी विचारसरणी केवळ वितंडवादच होय, या तऱ्हेची विचारसरणी सांगणारे तत्त्वज्ञान म्हणजे शुष्क पांडित्य होय, ते तत्त्वज्ञान मनुष्याच्या प्रगतीस मारक आहे, आणि मनुष्यास दौर्बल्य व क्लैव्य आणणारे आहे असेच म्हटले पाहिजे.

७. ज्ञात सत्य व अज्ञात सत्य

जगाचा बाह्य मायिक देखावा आणि असंवेद्य सत्य वस्तू असे कायमचे दोन विभाग काही तत्त्ववेत्ते मानतात; परंतु जडवादास ही विचारसरणी मान्य नाही. आतापर्यंत कळलेले जगत, व आतापर्यंत न कळलेले. जगत् एवढाच फरक जडवादी तत्त्वज्ञ मानतात. ज्ञानाची प्रगती सारखी करता येते. जी वस्तूस्वरूपे आतापर्यंत अज्ञात असतात. ती प्रयत्नाने नंतर ज्ञात होतात. अज्ञात हा ज्ञाताशीच संलग्न असलेला विश्वाचा भाग आहे. ज्ञाताचे क्षेत्र विस्तृत होऊ शकते व अज्ञाताच्या क्षेत्राचा संकोच होऊ शकतो. विज्ञानाची आतापर्यंत झालेली वाढ किंवा विज्ञानेन्तिहास हेच सांगतो. वस्तुची अज्ञात अंशी अगणित स्वरूपे विज्ञानाच्या प्रकाशात येऊ शकतात; हेच विज्ञानेतिहासाचे रहस्य आहे.

मनुष्याचे कोणतेही ज्ञान कायमचे संपूर्ण सत्य असत नाही. अल्प सत्याकडून महान् सत्याकडे जाणे, हेच ज्ञानाच्या प्रगतीचे लक्षण आहे. आतापर्यंत अज्ञात असलेले विश्वच प्रयत्नाने ज्ञात होऊ शकते, असा विश्वास शास्त्रप्रगतीच्या मुळाशी असतो. नवसंपादित ज्ञानाची पूर्वसंपादित ज्ञानाच्या निधीत सारखी भर पडत जाते; त्यामुळे सर्व प्रकारच्या ज्ञानांची पुनः पुन शुद्धी होत असते.

८. सर्व सत्याचे संपूर्ण ज्ञान अथवा ब्रह्मज्ञान अशक्य आहे

काही तत्त्ववेत्ते असे मानतात की, जगाच्या मुळाशी एक शाश्वत पूर्ण व परमार्थरूप सत्य आहे व त्याचे ज्ञान झाले म्हणजे कृतार्थता किंवा निःश्रेयस प्राप्त होते; एक महान् संपूर्ण सत्य (Absolute Truth) सांगणारे अध्यात्मशास्त्र किंवा ब्रह्मविद्या आहे, तीच सर्व विद्येत श्रेष्ठ व पूर्ण विद्या आहे. जगांतील अध्यात्मवादी तत्त्ववेत्त्यांचे हे सांगणे आहे. या त्यांच्या विधानाला त्यांच्या सांगण्यापेक्षा दुसरे काहीच प्रमाण नाही. मनुष्यांना सतत प्रयत्न करीत असता, या विश्वाचे सापेक्ष सत्य असलेले स्वरूप व स्वतःचे स्वरूप, क्रमाक्रमाने समजत आहे. हे ज्ञान विकासशील आहे. सापेक्ष सत्याचे प्रतिपादन विज्ञान (Positive Science) करीत असते[१]. त्या सत्यापेक्षां निराळे पूर्ण सत्य आहे, ही समजूत स्वतःची व दुसऱ्याची वंचना करण्याकरिताच निर्माण झाली आहे. सापेक्ष सत्य म्हणजे एका दृष्टीने खरे व दुसऱ्या दृष्टीने खोटे, असे नव्हे; तर ज्यात नव्या नव्या सत्याची भर सारखी पडण्याची शक्यता असते,

---

(1) Ludwig Fenerbach, p. 25.

ज्याची नवी नवी अज्ञात अंगे व उपांगे ज्ञात होण्याची संभावना असते ते. ज्ञानाचा इतिहास हेच सिद्ध करीत आहे. उदाहरणार्थ रसायनशास्त्रात नवीं नवीं संयुक्त द्रव्ये (Compounds) उघडकीस येत आहेत. पूर्वी अज्ञात असलेलीं निसर्गातील द्रव्ये जशी सापडतात, त्याप्रमाणे मनुष्य प्रयोगाने नवी नवी द्रव्ये निर्माण करीत आहे. यंत्रशास्त्रात नवी नवी यंत्रे मनुष्यास ज्ञात होत आहेत. ती यंत्रे पूर्वी नव्हती व ज्ञातही नव्हती. पूर्वी असलेले व नसलेले असे द्विविध सत्य मनुष्यांना प्रयोगाने व प्रयत्नाने सापडत असते.

हिंदुस्थानातील वेदान्त व युरोपांतील हेगेलची ब्रह्मविद्या संपूर्ण सत्य सांगण्याकरिता अवतरली आहे; असे वेदांती व हेगेल हे दोघे सांगतात. वेदान्त्यांचे व हेगेलचे संपूर्ण सत्य ही मनुष्याच्या कल्पनातरंगांची निर्मिती आहे. त्याचा मनुष्यांच्या नित्य व्यवहाराशी, जीवनव्यवहाराशी, काही मेळ नाही. मनुष्याचे सर्व व्यवहार संपूर्ण सत्य सापडले तर समाप्त व्हावयास पाहिजेत. परंतु वेदान्ती व हेगेल यांचे व्यवहार सपूर्ण सत्याचा शोध लागल्यावर चालूच असतात. प्रवृत्ती कां उत्पन्न होते ? काही तरी मिळविण्याकरिता. ज्यांना संपूर्ण सत्य गवसले त्यांच्या हालचाली व चळवळी विराम कां पावत नाहीत ? कारण एकदा संपूर्ण सत्य सापडल्यावर धडपड करण्याचे कारण नाही. जे खोटे आहे ते मिळविण्याकरितां समजून उमजून कोण प्रयत्न करील? संपूर्ण सत्य सांपडल्यावर जे शिल्लक राहते ते सर्व खोटे होय. त्या खोट्या गोष्टीकरिता कोण प्रयत्न करील? ज्यांचे प्रयत्न चाललेले दिसतात त्यांना संपूर्ण सत्य सापडले नाही हे खाधीने समजावे. जाणीव असलेला प्रत्येक जीवपिंड समजून उमजून जे प्रयत्न करीत असतो, ते प्रयत्न न सापडलेल्या सत्याकरिता असतात. उपनिषदे व शंकराचार्य यांनी असे म्हटले[१] आहे कीं, संपूर्ण सत्य सांपडल्यावर सर्व कर्मे विराम पावतात. सत्य अनंत आहे, ते संपूर्णपणे सापडत नाही. त्याचे ज्ञान अंशाअंशानेच वाढत असते.

९. ज्ञान हे वस्तुतंत्र आहे

ज्ञानाच्या किंवा संवेदनेच्या बाहेर विषयास अथवा सत्वस्तूस स्वतंत्र अस्तित्व असते या सिद्धांताशी संलग्न असा दुसरा सिद्धान्त असा आहे कीं, ज्ञान वस्तूवर अवलंबून आहे. वस्तू ज्ञानावर अवलंबून नाही. वस्तुचे अस्तित्व ज्ञानाच्या किंवा संवेदनेच्या पूर्वी असते आणि ज्ञान किंवा संवेदना यांचे अस्तित्वच सत् वस्तुच्या अस्तित्वावर अवलंबून असते. वस्तू अगोदर असते की ज्ञान किंवा संवेदना अगोदर असते याचे उत्तर असे आहे कीं वस्तू अगोदर असते आणि ज्ञान हे वस्तुनंतर असते व ज्ञान हे वस्तुवर अबलंबून असते. ज्ञान वस्तू - तंत्र [१]आहे. हा सिद्धान्त सगळ्याच ज्ञानांना एव संवेदनांना लागू आहे. प्रत्यक्षात्मक अनुभव (Direct Aprehension) वस्तू अगोदर असल्याशिवाय येत नसतो. माझ्या अंगणांत आम्रवृक्ष अगोदर असतो म्हणून त्याचे मला दर्शन होते. नष्ट वस्तुचे स्मरण, भविष्यकालीन

---

(१) ब्रह्मसूत्रभाष्य, शंकराचार्य १।१।४.

घडामोडींचे अनुमान, भूत किंवा भविष्यविषयक कल्पना, असत् अथवा मिथ्या पदार्थांची भ्रांती इत्यादी संवित्तीचे प्रकार वस्तूपरतंत्र कोठे आहेत ? असा प्रश्न उपस्थित होतो. दूरवर विचार केल्यास या प्रश्नाचे उत्तर मिळते. स्मरण अनुभवावर अवलबून असते. पिता जेव्हां जिवंत होता त्यावेळच्या अनुभवाच्या संस्कारामुळे मृतपित्याचे स्मरण घडते. 'आज पौर्णिमा असल्यामुळे संध्याकाळीं पूर्ण चंद्रोदय होईल' हे भविष्यकालीन वस्तुचे अनुमान आहे. या अनुमानाच्या मुळाशी मागील पौर्णिमेच्या पूर्णचंद्रोदयाचे दर्शन आहे. 'समुद्रांत प्रवासास निघालेल्या प्रिय व्यक्तीची नौका वादळात सापडून बुडेल की काय' अशी भयरूप कल्पना सुद्धा 'वादळांत नौका बुडते' या प्रत्यक्ष अनुभवामुळेच उत्पन्न झाली. स्वप्नातील दहा मस्तकांच्या सात ताड उंच राक्षसाची भ्रांतिसुद्धा त्या भ्रांतीतील विषयांचे पृथक्करण केल्यास पूर्वानुभूत वस्तूवर अवलंबून आहे असे दिसेल. मस्तक, सात ताड उंची, इत्यादी प्रत्येक पृथक् भाग सत्य आहे. परंतु त्याची विपर्यस्त जुळणी झाल्यामुळे त्या स्वप्नास आपण भ्रांती म्हणतो.

ज्ञान किंवा संवेदना यांची वस्तूपरतंत्रता दोन तऱ्हेने वर्णन करतां येते. एक प्रत्यक्ष व दुसरी अप्रत्यक्ष. ज्ञानांत भासमान होणाऱ्या विषयांचे (Contents) त्यांच्या घटक भागाचे किंवा तत्समान वस्तुंचे पूर्वास्तित्व हा वस्तुतंत्रतेचा पुरावा आहे. अप्रत्यक्षपणे वस्तुतंत्रता अशी आहे; ज्ञात्याचे शरीर हवा, पाणी, अन्न इत्यादीकांशिवाय जगूं शकत नाही; म्हणून त्या शरीराच्या धारणेस लागणाऱ्या वस्तू अप्रत्यक्षपणे ज्ञानास किंवा संवेदनेस कारण होतात. विद्युत्, विद्युत्जनक यंत्र, पडदा, रंगभूमी इत्यादीकांचे अस्तित्व जसे चित्रपटाच्या दर्शनास अप्रत्यक्षपणे कारण होते, त्याचप्रमाणे संवेदनेस अप्रत्यक्ष कारण होणाऱ्या वस्तू पुष्कळ आहेत. रुधिराभिसरण बंद झाले किंवा श्वासोच्छवासास उपयोगी पडणारी हवाच बंद झाली तर संवेदना बंदच पडते.

सुसंस्कृत मनुष्याच्या ज्ञानाच्या स्वरूपांत आणि असंस्कृत वन्य मानवाच्या ज्ञानाच्या स्वरूपांत जे महान अंतर आहे, त्याचे कारण सामाजिक परिस्थिति हे आहे. नुसत्या भाषा या साधनाचाच ज्ञानाच्या घटनेवर व स्वरूपावर कितीतरी परिणाम झाला आहे. धर्मसंस्थेचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते कीं, प्राथमिक समाजस्थितीतील विश्वविषयक कल्पना व सुधारलेल्या समाजांतील विश्वविषयक कल्पना यांच्यांत महदंतर पडले आहे; याचे कारण परिस्थितीत पडणारे अंतर हेच होय. मनुष्य, समाजात ज्या संस्था उत्पन्न करतो आणि निसर्गांत जे प्रयत्न करतो, त्यांचाही त्याच्या विचारांवर परिणाम घडत असतो.

मंत्र ज्ञान हे वस्तुतंत्र असते म्हणून ज्ञानाचे प्रामाण्य किंवा अप्रामाण्य ठरविता येते. ज्ञान व वस्तू यांच्यांत मेळ किंवा संवादित्व असले तर ते ज्ञान प्रमाण किंवा सत्य म्हणता येते, आणि ज्ञान व वस्तू यांचा विसंवाद असला तर ते ज्ञान अप्रमाण अथवा भ्रांतिरूप ठरते. ज्ञानाचे प्रामाण्य व अप्रामाण्य वस्तूवर म्हणजे अर्थावर अवलंबून आहे. प्रमाणभूत ज्ञानास यथार्थ

असे म्हणतात. अर्थ म्हणजे ज्ञानाचा विषय (Object), यथार्थ म्हणजे अर्थाशी संवादी किंवा अनुरूप, अयथार्थ ज्ञान ह्याच्या उलट असते..

प्रत्यक्ष प्रतीतीत इंद्रियांचा अर्थाशी सबंध फार निकटचा असतो. इंद्रियार्थसंनिकर्ष म्हणजे इंद्रिय व अर्थ यांचा संनिकर्ष[१]. हाच - प्रत्यक्ष प्रतीतीचे असाधारण कारण असतो.

इंद्रिय म्हणजे शरीरांतील ज्ञानतंतूंची संस्था होय. मेदू आणि चक्षुत्वक् श्रोत्र, घ्राण, रसना, इत्यादीकांचे ठिकाणी असलेले ज्ञानतंतू यांच्यामुळेच -ज्ञान किंवा संवेदना उत्पन्न होते. ज्ञान-तंतुचा वस्तूशी संयोग घडला म्हणजे प्रत्यक्ष प्रत्यय येतो. डोळ्यांतील ज्ञानतंतुंशी वस्तुतील प्रकाशाचा संयोग होऊनंच वस्तूंचे दर्शन घडते, तापलेले भांडे किंवा बर्फ यांच्याशीं संसर्ग घडला म्हणजे उष्ण व शीत अशी प्रतीती येते.

१०. प्रत्यक्ष प्रत्यय हाच सर्व प्रकारच्या ज्ञानात श्रेष्ठ

प्रत्यक्ष प्रत्ययांत वस्तूंचा निकट संबंध असतो म्हणूनच प्रत्यक्ष अनुभेव सर्व प्रकारच्या ज्ञानांमध्ये श्रेष्ठ[२] आहे. प्रत्यक्ष अनुभव सर्व प्रकारच्या ज्ञानांचा पाया आहे. मनुष्याची जिज्ञासातृप्ती प्रत्यक्ष अनुभवाने जशी होते तशी कोणत्याच ज्ञानप्रकाराने होत नाही. प्रत्यक्ष प्रत्यय हेच मनुष्याचे मुख्य साध्य आहे व मुख्य साधन आहे. म्हणूनच वेदांतात श्रवण मनन व निदिध्यासन यांपेक्षां साक्षात्काराची महती अधिक आहे. त्याच वस्तुचा एका इंद्रियापेक्षां अधिक इंद्रियांनी प्रत्यय येऊ शकला तर ते अधिकच इष्ट असते.

११. ज्ञानप्रामाण्य ठरविण्याचे साधन

कोणतेही ज्ञान खरे किंवा खोटे, प्रमाण किंवा अप्रमाण; ठरविण्याचे साधन कोणते, हा एक विवाद्य प्रश्न तत्त्वचिंतकांमध्ये मानला जातो. भारतीय तत्त्वज्ञानांत या प्रश्नाच्या चर्चेस प्रामाण्यवाद[३] असे म्हणतात. प्रयोग (Experiment) किंवा प्रयत्न (Practice) हीच ज्ञानाच्या प्रामाण्याची कसोटी होय[४]. आपल्या ज्ञानाची व विचाराची सत्यता ठरविण्यास एकच उपाय आहे, तो म्हणजे निसर्गातील कोणतीही घटना (A Natural Process) आपल्या स्वाधीन करून घेणे. त्या-त्या वस्तूंची निर्मिती करणे, त्या वस्तूंचा आपल्या व्यवहारांत उपयोग करणे. उसाच्या कांडीतूना साखर निर्माण करून तिचा आपण उपयोग करूं लागलो म्हणजे 'उसाच्या कांडीत साखर आहे' ही कल्पना सत्य आहे. हे सिद्ध होते. माझ्या ज्ञानाचे प्रामाण्य माझ्या सफल प्रयत्नाने सिद्ध होते. माझ्या हातात असलेले फळ हे अन्न, औषध व विषय यापैकी काय आहे याची खात्री मला त्या फळाचा उपयोग केल्यानेच

---

(१) न्यायदर्शन १॥१॥४ पूर्वमीमांसा १॥१॥४

(२) न्यायभाष्य १।१।१

(३) तत्वचिंतामणि, प्रत्यक्षखंड

(4) Ludwig Feuerbach, by Engels pp. 32 33:

म्हणजे प्रयोग केल्यानेच होते. मृगजळाची कल्पना किंवा शिंपल्यावर होणारा 'हे रुपे आहे' हा भास, याचे अप्रामाण्यः प्रयत्नानेच सिद्ध होते. मी ज्या समजुतीने व्यवहार करतो, त्या व्यवहारात त्या समजुतीमुळे अडथळे आले व प्रयत्न फुकट गेले तर ती समजूत खोटी ठरते. कर्म हीच ज्ञानाच्या प्रामाण्याची कसोटी होय. बौद्ध, नैयायिक वा वैशेषिक या दार्शनिकांनी, सफल प्रयत्नच ज्ञानाच्या प्रामाण्याचे गमक होय, असे सांगितले आहे.

जीवपिंडाची सतत धडपड चाललेली असते, त्या धडपडीत म्हणजेच व्यवहारात जीवपिंडावर बाह्याभ्यन्तर वस्तूंचा आघात प्रत्याघात होत असतो. या चिरंतन आघातप्रत्याघातांचे पर्यवसान म्हणून जीवपिंडात जो एक जीवनानुकूल गुण उत्पन्न होतो, त्यास ज्ञान असे म्हणतात. जीवपिंडाच्या प्रयत्नातचं ज्ञानाच्या प्रामाण्याप्रामाण्याचा निर्णय लागतो. जे खरे ज्ञान आहे असे निश्चितपणे वाटत असते, त्या ज्ञानाच्या अनुसारानेच मनुष्याचे व्यवहार किंवा प्रवृत्ती घडत असते. अरुंद गल्लीतून मी जात असता 'एक हत्ती गल्लीत धावत सुटला आहे' असे ज्ञान झाल्याबरोबर मी एकदम त्या गल्लीतून परत फिरतो. 'हत्ती धावत सुटला आहे' हे ज्ञान खरे की खोटे याची खात्री झाली आहे की नाही हे प्रवृत्तीवरूनच समजते. ज्यास ते ज्ञान खोटे आहे असे वाटेल तो त्या गल्लीतून परत फिरणार नाही. जो परत फिरतो त्यास आपल्या ज्ञानाच्या प्रामाण्याचा निश्चय झालेलाच असतो. कोणाच्याही क्रियेवरून त्याच्या समजुतीचा अर्थ निश्चित करता येतो.

प्रयोग व प्रयत्न यांच्या योगाने ज्ञानाचे प्रामाण्य किंवा अप्रामाण्य सिद्ध होते, या विधानाचा अर्थ असा आहे. प्रयोगाने व प्रयत्नाने मनुष्य आपल्या प्रत्यक्षं अनुभवाचे किंवा इंद्रियजन्य ज्ञानाचे क्षेत्र विस्तृत करतो. वारंवार अनेक तऱ्हेचे अनुभव घेतो, सगळ्या अनुभवाची योग्य जुळणी करतो. अनुभवांचा विस्तार व जुळणी योग्य तऱ्हेची झाली म्हणजे आपल्या विचारांच्या प्रामाण्याची पारख होऊ लागते, उदाहरणार्थ पटकीचा रोग देवीच्या कोपामुळे होतो, अशी एका काळी शहाण्या लोकांची समजूत होती. ही समजूत मनुष्यांच्या अनुभवाचे क्षेत्र वाढल्यावर ढासळली. प्रयत्नांती असे कळून आले की, महामारीची किंवा पटकीची साथ उत्पन्न करणारी विषारी द्रव्ये किंवा जंतू आहेत, त्यामुळे पटकीची साथ उत्पन्न होते, देवतेच्या कोपाचा त्यात काही संबध नाही. देवतेच्या आराधनेने ती साथ कमी होत नाही व आराधना न केल्यास वाढत नाही. त्या विषारी द्रव्यांचा स्वीकार केल्यास ती साथ वाढते आणि त्या द्रव्यांचा निरास केल्यास ती साथ कमी होते व नष्ट होते. रोगज्ञानाचा इतिहास असे सांगतो की, रानटी समाजांत रोगांच्या कार्यकारणभावाची दैवी उपपत्ती शास्त्रपदवीस पोचली होती. रोगांची भौतिक उपपत्ती सांगणारा आयुर्वेद अनुभवाची संपत्ती वाढल्यावर उत्पन्न झाला. त्या जुन्या काल्पनिक दैवी उपपत्तीच्या ऐवजी प्रयोगजन्य भौतिक उपपत्तीवरच आधुनिक वैद्यक उभारलेले आहे. अनुभव व्यापक व खोल झाला, हे त्याचे कारण होय.

१२. ज्ञान व वस्तू यांची अविभाज्यता (Unity)

ज्ञान व वस्तू किंवा विचार व विषय यांच्यात मेळ मिलाफ, संगती किंवा अविभाज्यता असते. ही अविभाज्यता मानवी प्रयत्नातच सिद्ध होते. ज्ञानाचा किंवा विचारांचा वस्तुस्थितीशी मेळ आहे कीं नाही हे सिद्ध करण्यास कर्म किंवा प्रयत्न हाच एक मुख्य उपाय आहे. निसर्गात भोवतालंच्या विश्वात किंवा समाजात मनुष्य जे प्रयत्न करीत असतो, जे व्यवहार करतो, त्यातच ज्ञानाची, व अनुभवाची किंवा विचारांची वाढ होत असते आणि त्या प्रयत्नात किंवा व्यवहारातच ज्ञानाची वस्तुस्थितीशी खरी संगती निश्चित करता येते. मुख्यतः उत्पादक प्रयत्नांनीच ज्ञान व वस्तुस्थिती यांचा मिलाफ आहे की नाही, हे अधिक चांगल्या रीतीने ठरविता येते. उत्पादक प्रयत्न म्हणजे वस्तूंची निर्मिती ज्याच्यामुळे होते असे प्रयत्न. मी गुलाबाच्या झाडाचे कलम जमिनीत लावतो; कांही दिवसांनी त्या कलमाला अंकुर फुटून पालवी येते. 'गुलाबाच्या कलमाचे रोप तयार होते' ह्या माझ्या समजुतीचा वस्तुस्थितीशी मेळ आहे, हे ह्या प्रयत्नात सिद्ध झाले.

कोणत्याही समाजातील ज्ञानाचे माप त्या समाजातील कलांच्या मापानेच करता येते. कला म्हणजे निसर्गाचे व सृष्टीचे उत्पादन किंवा रूपांतर करण्यात यशस्वी झालेला मानवी प्रयत्न, बैलगाडी तयार करण्यास लागणारे गणितज्ञान व वस्तूज्ञान आणि आगगाडी तयार करण्यास लागणारे गणितज्ञान व वस्तूज्ञान यांच्यातील फरक व तफावत बैलगाडीवरून व आगगाडीवरूनच कळून येते. बैलगाडी व आगगाडी त्या ज्ञानाची बाहेर असलेली एक बाजू होय. भाटघरचे नीरेवरील प्रचंड धरण तयार करण्यास लागणारे जलज्ञान शेताच्या कडेस असलेल्या ओढ्याच्या पाण्यापासून शेतांचा बचाव करण्याकरितां बांधलेला बांध तयार करणाऱ्या कोंकणी शेतकऱ्याच्या जलज्ञानापेक्षा किती महान् आहे हे ते प्रचंड धरण व तो लहानसा बांधच सिद्ध करतो. मनुष्य ज्या भौतिक साधनांनी ज्या भौतिक वस्तू पैदा करतो त्या साधनांच्या व उत्पन्न केलेल्या त्या वस्तुंच्या स्वरूपावरून व वैशिष्ट्यावरून मनुष्याच्या ज्ञानाचा आढावा घेता येतो. तांबे, लोखंड, जस्त, सोने इत्यादी खनिज वस्तूंचे उत्पादन ज्या समाजांत मोठ्या प्रमाणात होऊ लागले त्याच समाजात भूस्तर विज्ञान तयार झाले. खाणी व खनिज वस्तू यांचा उपयोग अधिक प्रमाणात करणाऱ्या समाजातच भूस्तर विज्ञानाचा विस्तार होऊ शकतो. भूस्तरात काम करणाऱ्या मनुष्यांनाच भूस्तरांचे योग्य ज्ञान होत असते. मानवी प्रयत्नच वस्तू व ज्ञान यांचा मेळ घालतो व मेळ सिद्ध करतो.

भौतिक ज्ञानाचा वस्तूशी मेळ ज्या रीतीने सिद्ध होतो त्याच रीतीने आत्मविद्येचा वस्तूशी मेळ सिद्ध होतो. आत्मा म्हणजे मनुष्याची चैतन्य शक्ती. समाजरचनेवर त्या चैतन्य शक्तीचा विकास अवलंबून असतो. सामाजिक संस्था आत्मशक्तीच्या विकासाची साधने होत. विशिष्ट समाजरचनेत व विशिष्ट सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन किंवा क्रांती करण्याच्या प्रयत्नात आत्मविकासाचा उद्देश असतो. समाजरचनेच्या व सामाजिक संस्थांच्या विशिष्ट

स्वरूपावरून ती रचना किंवा त्या संस्था समाजघटकांच्या आत्मविकासास कितपत समर्थ आहेत, हे निश्चित करता येते. उदाहरणार्थ फ्रेच राज्यक्रांती पहा. सरंजामदारी समाजरचना आणि सरंजामदारी सामाजिक संस्था नष्ट करून त्यापेक्षा उच्च दर्जाची समाजरचना व श्रेष्ठ सामाजिक संस्था निर्माण करण्याचा तो प्रयत्न होता. त्या क्रांतीच्या चळवळीच्या मुळाशी जी आत्मविद्या होती ती परंपरागत ख्रिश्चन धर्मातील आत्मविद्येपेक्षा अधिक उन्नत होती. ख्रिश्चन धर्मातील आत्मविद्येने जुन्या सरंजामदारी समाजरचनेची कड घेऊन नव्या प्रयत्नांना विरोध केला. फ्रेच राज्यक्रांतीने शेतकऱ्यांना सरंजामदारी व जमिनदारी यांच्या दास्यांतून मुक्त केले. शेतकरी व इतर सामान्य जनता यांच्या आत्म्यांचा त्या गुलामगिरीत अधःपातच झाला होता. ज्यांनी त्या संस्थांचे समर्थन केले त्याचे आत्मज्ञान कोते होते. ज्या क्रांतिकारक वर्गानी सरंजामदारी समाजरचना उलथून टाकण्याचे उद्योग केले त्यांचे ऐहिक दृष्टीचे, परलोकरहित व जडवादी आत्मज्ञान अधिक उच्च होते. त्या आत्मज्ञानाने लोकसत्ताक राज्यसंस्थेला जन्माला घातले. त्या संस्थेच्या मुळाशी जनतेच्या सार्वभौमत्वाचा सिद्धान्त (The Principle of Sovereignty of the People) होता. त्या चळवळीच्या मुळाशी भगवंताचे अधिष्ठान नव्हते तर लोकांच्या सार्वभौमत्वाच्या सिद्धान्तांचे अधिष्ठान होते. भगवंताचे अधिष्ठान असलेल्या चळवळीनी सरंजामदारी व्यवस्थेच्या समर्थनार्थ शक्तिसर्वस्व खर्च केले. ते जनतेच्या दास्याचे समर्थन करणारे भगवद्भक्तीचे तत्त्वज्ञान आत्मशक्तींचा विकास करण्याचे ऐवजी त्या शक्तीना दडपण्याचेच कार्य अधिक कुशलतेने करते. कोणत्याही समाजरचनेवरून व सामाजिक संस्थेच्या विशिष्ट स्वरूपावरून त्या-त्या रचनेच्या व संस्थेच्या पाठीशी असलेले आत्मज्ञान पारखता येते. लोकसत्तात्मक राज्यसंस्थेला जन्म देणाऱ्या फ्रेच राज्यक्रांतिपासून सगळ्या मानवसमाजात जनतेच्या ज्या-ज्या चळवळी अस्तित्वांत येत आहेत त्यांच्यात जनतेला अधिक स्वातंत्र्य मिळून प्रत्येकास आत्मविकासास अधिक अवसर मिळावा याच उद्देशाची प्रेरणा असते. ह्या उद्देशाचे साफल्य त्या चळवळीतून जन्मास येणाऱ्या सामाजिक संस्थांच्या विशिष्ट स्वरूपावरूनच निश्चित करता येते. विचाराचा किंवा ज्ञानाचा वस्तूशी मेळ असतो. वस्तुच्या स्वरूपावरून विचाराचे स्वरूप निश्चित करता येते. ज्या विचारांतून विशिष्ट संस्था जन्मास येते त्या संस्थेवरून त्या विचारांचा अर्थ कळून चुकतो.

सामाजिक संस्थांच्या स्वरूपावरून त्या समाजांतील आत्मविद्येचा आढावा जसा घेता येतो त्याप्रमाणे त्या समाजातील इतर विद्यांचा किंवा भौतिक विद्यांचाही आढावा घेता येतो. गणरूप (Tribal) भटके समाज पाहिले की त्यांच्यापाशी जमीन व शेती यांचे ज्ञान नाही, हे सहज कळते. जमीन व शेती यांची विद्या ज्यांस प्राप्त होते, ते समाज भटकेपणा सोडून स्थिर होतात, आणि त्यांची रचनाही तदनुरूप बदलते. ज्या समाजात युद्धाची संस्था असते व क्षात्र वर्गास उच्च स्थान प्राप्त झालेले असते तो समाज दुसऱ्या समाजाच्या आर्थिक लुटीवर जगू इच्छितो अथवा दुसरा कोणता तरी समाज त्याच्यावर हल्ला करून जगू इच्छितो ही गोष्ट

सहज समजून येते, त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं अजून मानवसमाजात समाजसत्तावादी तत्त्वज्ञान रूढ व दृढमूल झाले नाही. सगळा मानवसमाज आपसात लूट न करता, कोणत्याही वर्गास दास्यात न ठेवता नीट रीतीने आपला योगक्षेम चालवू शकतो आणि वर्गरहित समाजसंस्थेची स्थापना करून विज्ञानांच्या व यंत्रांच्या साहाय्याने सृष्टीतील अनंत शक्तींचा उपयोग करून सगळ्या समाजघटकांच्या भौतिक व आध्यात्मिक गरजा भागविण्याइतके अर्थोत्पादन करू शकतो; असे आश्वासन मार्क्सवादी समाजसत्तावादच देऊ शकतो.

समाजरचनेच्या व सामाजिक संस्थांच्या स्वरूपावरून, समाजातील वर्गसंबंधांवरून आणि विशेषतः समाजांतील उत्पादक साधनांच्या गुणावगुणावरून त्या-त्या समाजातील ज्ञानाची व विद्येची पारख करतो येते. कारण ज्ञानाचे व विद्येचे सार मानवी उद्योगात व उत्पादक सामग्रीत उतरलेले असते. समाजातील अवजारांच्या, हत्यारांच्या किंवा भौतिक साधनांच्या कार्यक्षमतेवरून ज्ञानाचे सामर्थ्य व विद्येचे तेज ओळखता येते. समाजरचनां उत्पादक साधनसामग्रीवर व उत्पादन पद्धतीवर अवलंबून असते आणि साधनांच्या पाठीशी ऐतिहासिक परंपरेने प्राप्त झालेला विज्ञानाचा निधी असतो. हल्लीचा यांत्रिक उद्योगधंद्यांचा महान् विस्तार त्याच्या पाठीशी असलेल्या विद्यांच्या विस्ताराचा सूचक आहे.

१३. व्यक्त वस्तू, प्रत्यक्ष अनुभव, व्यवहार व तात्त्विक विचारसरणी यांची संगती

मूर्त किंवा व्यक्त वस्तू (Concrete Reality) हेच प्रत्यक्ष अनुभवाचे आणि मानवी व्यवहाराचे क्षेत्र आहे. इन्द्रियजन्य ज्ञान किंवा अनुभव व्यक्त किंवा मूर्त वस्तूस सोडून होऊ शकत नाही व मनुष्याचे सगळे व्यापार व्यक्त किंवा मूर्त वस्तूस अनुलक्षूनच घडतात. व्यवहारजन्य अनुभव हाच सगळ्या तात्त्विक विचारसरणीचा पाया असला पाहिजे. व्यवहार म्हणजे मानवी प्रयत्नं किंवा व्यापार. व्यक्त वस्तू, प्रत्यक्ष अनुभव व व्यवहार (Practice) या त्रयीशी जुळणारी तात्त्विक विचारसरणीच मनुष्यांच्या जीवनाचे सामर्थ्यशाली साधन होय. व्यक्त वस्तूस गौण लेखणारी व मानवी प्रयत्नास ज्ञानमीमांसेतून वगळणारी तात्त्विक विचारसरणी मनुष्यांच्या प्रगतीस मोठाच धोका उत्पन्न[1] करते. व्यक्त वस्तू, व्यवहार आणि प्रत्यक्ष अनुभव यांची साखळी ज्या तत्त्वज्ञानात अविच्छिन्न असते तेच तत्त्वज्ञान प्रगतीचे साधन बनते.

विचार व वस्तू यांचा संबंध दृढ करण्याचे कार्य मानवी प्रयत्न वे तज्जन्य अनुभवच करतो; म्हणून कोणत्याही तत्त्वज्ञानाची यथार्थता प्रत्यक्ष आचरणातच सिद्ध होते. कोणतीही विचारसरणी केवळ तर्कशास्त्रदृष्ट्या सुसंगत आहे किंवा मनाला समाधान प्राप्त करून देते,

---

(1) There is no more fatal enemy than theories which are not also facts-Bradlay

एवढ्यावरूनच तिचे प्रामाण्यं निश्चित होऊ शकत नाही, तर ती व्यवहारात उतरली पाहिजे. ती त्यात यशस्वी झाली पाहिजे. त्यात अपयश आले तर ती मिथ्याग्रहाने दूषित आहे, असे निश्चित समजले पाहिजे. व्यवहार हाच तिचा पाया व कसोटी होय.

कोणत्याही विचारसरणीचा प्रत्यक्ष प्रयोग व अनुभव हाच उगम व कसोटी होय; या तत्त्वावर एक महत्त्वाचा आक्षेप येतो तो असा. ज्याच्या विषयाशी मानवी व्यापाराचा व प्रत्यक्ष अनुभवाचा साक्षात् संबंध पोचत नाही अशी अनेक विज्ञाने आहेत. आकाशातील तारकांच्या स्वरूपासंबंधी व अंतरासंबंधी विचार करणाऱ्या ज्योतिषविद्येची पारख प्रत्यक्ष प्रयोगाने कशी करता येईल ? चंद्रावरील किंवा मंगळावरील परिस्थितीशी मानवी प्रयत्नांचा काय संबंध पोचतो ? उच्च गणिनातील अनेक गहन कल्पनांचा प्रत्यक्ष व्यवहाराशी काही संबंध नाही. भूस्तरशास्त्राने वर्णिलेल्या वर भूगर्भात लक्षावधी वर्षापूर्वी घडलेल्या घडामोडी प्रत्यक्ष प्रयोगाचा विषय होऊ शकत नाहीत. मग वरील विज्ञानातील बरीच तत्त्वे व्यर्थ होत, असे म्हणावे लागेल, यावर असे उत्तर आहे कीं, प्रत्यक्ष प्रयोगाशी व अनुभवाशी साक्षात् संबंध ज्या तात्त्विक विचारांचा नसतो, त्यांना ज्ञानाच्या क्षेत्रात प्रत्यक्ष प्रयोगांशी व अनुभवांशी संबंध असलेल्या विचारांपेक्षा गौण किंवा द्वितीय स्थान आहे. दुसरे असे कीं, अनुभवाशी ज्या विचारांचा साक्षात् संबंध नसतो त्यांची परंपरेने प्रयोगजन्य किंवा अनुभवजन्य विचारसरणीवरच उभारणी झालेली असते. त्यांचा प्रत्यक्षाशी अप्रत्यक्ष संबंध असतोच. प्रत्यक्ष अनुभवाशी जिचा काही लागाबांधा नाही, अशी तात्त्विक विचारसरणी असूच शकत नाही. मग ती कितीही सूक्ष्म असो अथवा प्रत्यक्ष प्रयोगापासून कितीही दूर असो. प्रत्यक्ष प्रयोग व अनुभव हा सर्व तत्त्वज्ञानात वरिष्ठ होय. कारण सामान्य सिद्धान्तांचा व वस्तुस्थितीचा तो मध्यस्थ असतो[१].

अनुभवजन्य ज्ञान (Experience) हे सामाजिक प्रयत्नांचे (Social Practice) फलित किंवा सार असते. सतत व दीर्घकालीन अनुभवाच्या आधारावरच सृष्टीतील अनेक सत्यांचा आविष्कार होत असतो. वाऱ्यांची नियतकालिक गती व समुद्रांतील जलप्रवाह (Periodic Winds and Sea Currents) यांचे ज्ञान शेकडो किंवा हजारो वर्षांच्या नौकानयनाच्या व्यवहाराने प्राप्त झाले. मनुष्यजातीच्या अस्तित्वापूर्वी अगणित वर्षे ज्यांचे अस्तित्व असते, त्याच वस्तूंचे ज्ञान हजारो वर्षांच्या अव्याहत प्रयत्नानेच प्राप्त होत असते. फिनिशन, ग्रीक व अलेक्झांडिअन लोकांनी अनेक शतके नौकानयनात घालविली परंतु त्यांना वाऱ्याचे नियत कालिक झोत व समुद्राचे प्रवाह यांचे सम्यक् ज्ञान झाले नाही. १५ व्या व १६ व्या शतकांतील व्यापारी भांडवलदारांच्या सुधारलेल्या व व्यापक नौकानयनातील अनुभवामुळेच ते ज्ञान प्रगल्भ दशेस आले. मागील युगांतील नौकानयनांच्या अनुभवाची जोड मिळाल्यामुळेच हे ज्ञान वाढले. प्रत्येक युगांतील ज्ञाननिधी पाठी मागच्या ऐतिहासिक प्रयत्नांचेच सार असते.

---

(1) Practice is higher than theoretical knowledge, because it has not only the virtue of generality, but also immediate actuality- Lenin

जडवाद प्रयत्नजन्य अनुभवांस किंवा प्रयोगांस ज्ञानशास्त्रात (Theory of Knowledge) प्रमुखस्थान देतो. त्यामुळे कँटच्या अज्ञेय परमार्थ वस्तूला किंवा वस्तू स्वरूपाला (Thing in itself) कसलेही स्थान रहात नाही. कॅटने मानलेले वस्तूस्वरूप गूढ, इंद्रियांस अगम्य व मनास अगोचर आहे. मनुष्य आपल्या बुद्धिजन्य प्रयत्नांनी वस्तूंची निर्मिती जेव्हां करतो तेव्हां तो वस्तूरूप (Thing in itself) गूढ व कायमचे अज्ञेय नाही हेच धादांत शाबित करतो. औद्योगिक निर्मिती हाच वस्तुच्या ज्ञेयत्वाचा खरा खुरा पुरावा आहे. मनुष्य निसर्गामध्ये अगाऊच असलेल्या वस्तूंची हुबेहूब प्रतिकृतीच निर्माण करून थांबत नाही, तर त्या वस्तूंना नवी नवी रूपे देतो, त्या वस्तूंचे वस्त्वन्तर करतो. १९ व्या शतकातील पूर्वार्धात शरीरांतील सेद्रिय द्रव्ये (Organic Compounds) अज्ञेय होती, आतां तीच द्रव्ये शरीरव्यापाराच्या (Organic Processes) आश्रयावाचूनच स्वतंत्रपणे निर्माण करता येतात. सामाजिक विकासाच्या क्रमांत पूर्वी अज्ञात असलेला वस्तूस्वभाव व वस्तूक्रम प्रयोगजन्य ज्ञानाचा विषय बनतो. उष्णतेचे गतिशास्त्र, रसायनशास्त्र आणि विद्युतशास्त्र म्हणजे आधुनिक सामाजिक विकासक्रमांत आविर्भूत झालेले नवे वस्तूनियमच होत.

मनुष्याच्या ज्ञानाला किंवा विचाराला सद्वस्तू (Objective Truth) गोचर होते की नाही, हा तत्त्वज्ञानांतील प्रश्न नुसत्या कल्पनेचा किंवा तात्विक चर्चेचा खरोखर विषय नाही. या प्रश्नाच्या पोटात मानवींव्यवहाराचा संबंध सूचित केलेला असतो. तत्त्वज्ञानांच्या संप्रदायात हा प्रश्न मूलभूत म्हणून उपस्थित केलेला असतो. पण या प्रश्नाचा प्रत्यक्ष मानवी व्यवहाराशी संबंध असतो, हे अनेक महान् तत्त्ववेत्यांच्याही लक्षांत येत नाही[१]. शिकार करणारे, मासे धरणारे, खाणींचा शोध करणारे, किंवा गुन्हेगार पकडणारे व्यवसायी व उद्यमी लोक न सांपडलेल्या वस्तूंचा शोध करीत असतात. त्यांच्या प्रयत्नांत त्यांच्या प्रश्नांचे उत्तर मिळते; अगोदर न गवसलेली सत् वस्तू त्यांना गवसते. प्रयत्नसाफल्य करण्याची शक्ती, कार्यकारित्व, हेच वस्तूसत्तेचे स्वरूप होय[२]. तत्त्वज्ञानांत नुसत्या कल्पना पिंजणाऱ्या केवळ घटपटाची खटपट करणाऱ्या तत्त्ववेत्त्याना हा प्रश्न कधीही सुटावयाचा नाही. कारण त्यांना ह्या प्रश्नाचा व्यवहाराशी (Practice) प्रत्यक्ष संबंध आहे हे कळलेले नसते. ह्यूम आणि कँट यांचा अज्ञेयवाद हा अनेक काल्पनिक शुष्क तत्त्वज्ञानांचाच सहोदर बन्धु आहे. प्रयत्नसाफल्य हेच आपल्या विचारांना गोचर असलेल्या वस्तुंच्या सत्यत्वाचे परम प्रमाण होय. आपले ज्ञानच प्रयोगद्वारे वस्तूस्वरूपात परिणत होते. आपण उत्पादक प्रयत्नांच्या

---

(1) The question whether objective truth can be attributed to human thinking is not a question of theory but is a practical question. The dispute over the reality or non reality of thinking which is isolated from practice is a purely scholastic question- Karl Marx,

(२) अर्थक्रियासु शक्तिश्च विद्यमानस्वलक्षणम्। ३४७ तत्वसंग्रह

द्वारे प्रत्यक्ष वस्तूलाच साक्षात् आलिंगन देत असतो. मानवी प्रयत्न जेव्हा बाह्य विश्वाशी सलगी करतात व बाह्य विश्वाचे स्वरूपही क्रमाक्रमाने बदलून टाकतात, तेव्हाच सत्याची गांठ पडली व भेट झाली असे सिद्ध होते, असे जडवाद सांगतो. तेव्हा सत्य हे (Objective Truth) स्वतःच्या गूढत्वाचा बुरखा बाजूला सारून मनुष्याच्या ज्ञानात प्रतिबिंबित होते.

आपल्या सगळ्या विचारांचे व कल्पनांचे स्पष्ट व निश्चित स्वरूप म्हणजेच सत्य होय, असे डेकार्टने (Descartes) सत्याचे लक्षण सांगितले. सर्वव्यापी (Universal) आणि अपरिहार्य (Necessary) अशी ज्ञानलक्षणे (Character of knowledge) हे सत्याचे स्वरूप होय, असे कँट म्हणतो. आधुनिक गणितनिष्ठ तर्कशास्त्रांच्या संप्रदायात तर्कदृष्ट्या सुसंगत आणि व्यापक अशी गणितशुद्ध सिद्धान्तमाला हीच सत्याची कसोटी होय, असे रसेल (Russel) कँटर (Cantor) आणि इतर गणिती म्हणतात. हे सगळे तत्त्वज्ञ सत्याचा बाहेरच्या विश्वांत शोध न करिता नुसत्या बौद्धिक कल्पनासमुच्चयातच त्यांस शोधतात.

१४. ज्ञानाचा परिणतिक्रम

मनुष्याचे ज्ञान प्रत्यक्ष अनुभव व तार्किक बुद्धी अशा दोन स्वरूपात परिणत होते. प्रत्यक्ष अनुभव ही पहिली अवस्था व तार्किक बुद्धी किंवा विचारशक्ती ही पहिल्याच अवस्थेच्या आधारावर निर्माण झालेली दुसरी उच्च अवस्था आहे. प्रत्यक्ष अनुभवात बाह्य विषयांची व सुखदुःखादी मनोवृत्तींची संवेदना अंतर्भूत होते; प्रत्यक्ष अनुभवास साक्षात्कार असे म्हणतात.

प्रत्यक्ष अनुभवही परिणतीच्या बहुविध क्रमातून जात असतो. त्याच वस्तुचा प्राकृत मनुष्यास व सुसंस्कृत मनुष्यास येणाऱ्या अनुभवात फरक असतो. उत्तम गावयाचे गाणे ऐकून विंध्य पर्वतातील किंवा मध्य ऑस्ट्रेलियातील जंगली मनुष्यास व दिल्लीच्या किंवा पुण्याच्या शिक्षित नागरिकांस येणाऱ्या अनुभवात फार फरक असतो. जंगली मनुष्यास ते गाणे म्हणजे नुसता कलकलाट वाटतो. त्याच्या कर्णेंद्रियास निरनिराळ्या सुरांची व आलापांची व्यवस्थाच अवगत होत नाही, भाजीबाजारातून भाजी घेऊन येणाऱ्या नोकराच्या चक्षुस मोती, माणिक किंवा इतर रत्ने, यांच्यातील निरनिराळ्या छटा कळत नाहीत. मानवजातीशास्त्र (Anthropology) असे सांगते की अनेक रानटी जातींना गंध व रंग यांचे सूक्ष्म फरक मुळीच कळत नाहीत. प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभवाची प्रत्येक सामाजिक अवस्थेत निरनिराळी परिणती होत असते. अनुभवाच्या पटुत्वाला किंवा कुशलतेला तार्किक बुद्धी व पूर्वअनुभव कारण झालेला असतो.

सामाजिक स्थिती जितकी उच्च व उच्चतर होत जाते, त्या मानाने मनुष्याचे मनही उच्च व उच्चतर अशा अवस्थेतून जाते. त्याची प्रत्यक्ष अनुभवाची शक्ती किंवा ग्रहणक्षमता वाढत जाते. त्या-त्या सामाजिक युगानुसार मनुष्याची ग्रहणशक्ती व मन शक्ती असते. प्रत्येक नवीन अनुभवाला जितकी पूर्व संस्काराची जोड अधिक तितका तो प्रगल्भ होत जातो. अनुभवाची स्पष्टता, विवेचकता आणि संपन्नता सामाजिक विकासक्रमातच वाढत जाते. कारण वाढीस लागलेल्या समाजात मनुष्याच्या मनाचे शिक्षणही वाढत जाते.

विषयाची प्रचीती हीनोच्च सामाजिक स्थितीत जशी बदलत जाते व वाढत जाते; त्याप्रमाणे सुख, दुःख, प्रेम, द्वेष, विषाद इत्यादी मनोद्वृत्तींचे स्वरूप व त्याचा अनुभव बदलत जातो. सुधारलेल्या समाजातील अन्तः संवेदनाचे वैशिष्ट्य व विस्तार यांचे स्वरूप मागासलेल्या समाजातील शिक्षित मनालाही कळणे शक्य नसते. बाह्य अनुभव व मानसिक अनुभव यांचे स्वरूप निरनिराळ्या संस्कृतीत व निरनिराळ्या सामाजिक वर्गात व निरनिराळ्या सामाजिक श्रेणीत भिन्न भिन्न असते.

साधा अनुभव म्हणजे वस्तुचे आकलन (Perception) होय. पूर्वीच्या अनुभवांच्या संस्कारांचे बळ मिळालेल्या अनुभवास समीक्षण परीक्षण प्रत्यय प्रतीती किंवा प्रत्यभिज्ञान (Apperception) असे म्हणतात. वस्तुची प्रचीती किंवा समक्षणच (Sensed knowledge) तार्किक ज्ञानाचा किंवा बुद्धीचा (Logical knowledge) पाया होय. हा पाया जसा बदलतो तसे बुद्धीचे तर्काचे किंवा विचाराचे स्वरूपही बदलते.

सृष्टीतील कोणतीही घटना पाहिली की त्याचे काहीतरी कारण असले पाहिजे असे मन सांगत असते. बगीचा पाहिला व त्यातील वृक्ष व लता फुलानीं व फळांनी बहरलेल्या दिसल्या की त्यांचे कारणही मनात येते. सुपीक जमीन, उत्तम खत, चांगले हवा पाणी, प्रकाश, उष्णता यांचा कार्यकारणभाव मनांत येतो. जमीन, पाणी, उष्णता आणि बीज हे कारण व बाग हे कार्य असे बुद्धी ठरविते. बुद्धी (Reason) प्रत्येक घटनेस कार्यकारणभावीच्या (Causality) साच्यात बसविते. भूमितीतील किंवा गणितातील कल्पनांचे परस्पर संबंध अत्यंत अबाधित आहेत. नियम, नियति, किंवा अपरिहार्यता (Necessity) हा त्या संबधांचा स्वभाव आहे. कार्यकारणभावाचा सर्व व्यापकपणा (Universality) व नियती हे बुद्धीचे विषय आहेत. तर्कशास्त्रातील भाव व अभाव यांचा विरोध बुद्धीनेच अबाधित ठरविला आहे. "घट अघट नव्हे" ''पट अपट नव्हे" "मनुष्य अमनुष्य नाही" ही या नियमाची उदाहरणे होत. पाश्चात्य तर्कशास्त्रात यास तादात्म्याचा नियम (Law of Identity) असे म्हणतात, कार्यकारणभाव (Causality) नियती (Necessity) आणि तादात्म्याचा नियम (Haw of Identity) हे बुद्धीचे किंवा विचाराचे मूलभूत नियम होत. ह्या नियमांना कोठेही अपवाद नाही असा बुद्धीत निश्चय आहे. जेव्हा वस्तूमात्राचे किंवा प्रत्येक वस्तुचे बुद्धी आकलन करते तेव्हां वरील मूलभूत आकारात (Category) किंवा साच्यात त्या वस्तूला घालूनच पाहते. त्याशिवाय बुद्धी पाहू शकत नाही.

डेकार्ट (Descartes), लीब्नीट्झ (Leibnitz), कँट, हेगेल या पाश्चात्य तर्कशास्त्रज्ञांच्या मते बुद्धीचे वरील नियम म्हणजे इत्यादी सत्याचे मूलभूत स्वरूप होय. त्यांच्या मते बुद्धीचे शुद्ध स्वरूप त्या नियमातच प्रगट झाले आहे. इंद्रियगोचर जगत् व त्याचा अनुभव हा कँट प्रभृती तत्त्ववेत्यांच्या मते गौण होय. त्यांच्यामते ही बौद्धिक सामान्य तत्त्वेच परमार्थ होय. या तत्त्वांच्या आधारानेच इंद्रियगोचर, चंचल, विचित्र, अनंतप्रकारच्या वस्तुंच्या अनुभवांचा अर्थ बुद्धी ठरविते.

कँटचे मत या संबंधी विचारात घेण्यासारखे आहे. तो म्हणतो-ही बौद्धिक तत्त्वे मनुष्याच्या मनाचीच स्वभावसिद्ध व्यवस्था आहे, मनुष्याच्या मनाचीच ती रचना आहे. वस्तुचा विचार करण्याची मनाने नेहमी वापरलेली ती पद्धती आहे. मनुष्याचे मन या नियमांना उल्लंघू शकत नाही म्हणूनच विज्ञानाचा विस्तार झाला आहे. विज्ञानाचा जन्म या नियमानी बद्ध असलेल्या मनातूनच झाला आहे. हे नियम बाह्य जगात आहेत की नाहीत हे कोण सांगणार ? मन म्हणते, हे नियम सर्वव्यापी आहेत, पण जग कोणत्याही मनास केव्हांही सांपडणे शक्य नाही. ते नियम मनाचेच नियम आहेत एवढेच सिद्ध होते.

जडवादास कँट प्रभृतींचे हे म्हणणे मान्य नाही. मनाला विचारांची किंवा बुद्धीची सगळी सामग्री प्रत्यक्ष अनुभवांतून किंवा इन्द्रियजन्य ज्ञानातूनच प्राप्त झालेली असते. बाह्य विश्वातील अनंत घटनांचा अनंत वेळां आलेला अनुभवच कार्यकारणभावाची नियतीची व तादात्म्याची शिकवण मनास देतात, वारंवार एकाच तऱ्हेच्या आलेल्या अनुभवाने कार्यकारणभावाची सामान्य कल्पना तयार होते. पहिल्यांदा अ आणि ब यांचा क्रम कळतो. 'सूर्योदयानन्तर पद्मपुष्प उमलते' या अनुभवात सूर्य व पद्मपुष्पाचा विकास यांचा क्रम कळतो. हा अनुभव वारंवार आला म्हणजे हा क्रम अबाधित आहे असे कळते आणि शेवटी कार्यकारणभावाच्या नियमांची कल्पना तयार होते. विशेष घटनेची (Actuality) वारंवार आवृत्ति प्रत्यक्ष अनुभवांत आली म्हणजे त्याच अनुभवांच्या असंख्य संस्कारातून सामान्य कल्पना (Generality) तयार होते. प्रत्यक्ष अनुभवच (Sense Experience) वारंवार उत्पन्न झाला म्हणजे त्यातून सामान्य कल्पना (Logical Thought) तयार होते. कँट म्हणतो त्याप्रमाणे मनाची तर्कात्मक रचना ही मूलभूत स्वयंसिद्ध किंवा पूर्वसिद्ध (A Priori) नाही तर ती युगानुयुगे भोवतालच्या विश्वात जीवनार्थ प्रयत्न करणाऱ्या व झगडणाऱ्या मानवी जीवपिंडाला अनंत प्रत्यक्ष अनुभवांच्या परंपरेने मिळालेली देणगी होय. तार्किक मन (Reason) अनुभवातून परिणत झालेली (A Posteriori) वस्तू आहे. आजकालच्या सुसंस्कृत समाजातील मनुष्यांच्या अनुभवांच्या व विचाराच्या मुळाशी मात्र ती तार्किक बुद्धि असते. त्या तार्किक बुद्धीतील व्यापक नियमांच्या साहाय्यानेच बिनरानटी समाजांतील मनुष्यांचे मन प्रत्यक्ष अनुभव घेते व विचार करते. सुसंस्कृत समाजातील मनात तार्किक बुद्धीचे नियम हे स्वतःसिद्ध (A Priori) असतात असे म्हणावयास हरकत नाही. कँटची शुद्धबुद्धी (Pure Reason) हा एका ऐतिहासिक परिणतीतील मनाचा भाग आहे. निसर्गातच ठोकरा खात खात मनुष्याच्या मनाने, मिळविलेले, निवडलेले व आत्मसात केलेले निसर्गाचे नियम म्हणजेच शुद्धबुद्धी होय. निसर्गात प्रयत्न करणाऱ्या मनुष्याला निसर्गाने शिकविलेला स्वतःचा सामान्य अर्थ म्हणजेच शुद्धबुद्धीचे किंवा तार्किक बुद्धीचे नियम होत. अनंत वेळा खोलपणे प्रतिबिंबित झालेल्या विविध व विचित्र विश्वाचे वास्तविक रहस्य म्हणजे ते नियम होत. अनंत व विविध अनुभवांचा तो सामान्यरूप निष्कर्ष आहे.

प्रत्यक्ष अनुभव व तार्किक बुद्धी अशा ज्ञानाच्या दोन मुख्य अवस्था आहेत. तार्किक बुद्धी ही प्रत्यक्ष अनुभवाचेच कार्य असले तरी तार्किक बुद्धी प्रत्यक्ष अनुभवाला अधिक कुशल, सूक्ष्म व व्यवस्थित आकार देत असते. तार्किक बुद्धी जितकी प्रगल्भ बनत जाते तितका प्रत्यक्ष अनुभवही स्पष्ट, व्यापक, सूक्ष्म व व्यवस्थित होतो; वस्तुचे किंवा सत्याचे आकलन अधिक करू शकतो. त्याच्या उलट अनुभवही तार्किक बुद्धीच्या वाढीस व कुशलतेस कारण होतो. अनुभवाची संपत्ती म्हणजे विज्ञान होय. विज्ञानाच्या सूक्ष्मतेबरोबर व विस्ताराबरोबर तर्कशास्त्रही सूक्ष्म व विस्तृत होत जाते. विज्ञानात क्रांती झाली म्हणजे तर्कशास्त्रांत क्रांति होते.

आतापर्यंत जडवादातील ज्ञानसिद्धान्त (Theory of Knowledge) संक्षेपाने वर्णिले. हे सिद्धान्त समजून घेतल्याशिवाय जडवादाची उपपत्ती समजणे शक्य नाही. प्रत्येक तात्त्विक विचारसरणी ज्ञानशास्त्राच्या एका विशिष्ट सिद्धान्तसरणीवर अवलंबून असते. जडवादाच्या ज्ञानविषयक सगळ्या सिद्धान्तांचे उपपादन करण्यास आपणास येथे जागा नाही, म्हणून काही मूलभूत सिद्धान्त निवडून त्यांचे वर उपपादन केले. आतां प्रत्यक्ष जडवादाच्या सामान्य सिद्धान्ताचाच परामर्श घेऊ.

१५. 'जड' या शब्दाचा अर्थ

जड म्हणजे ज्ञानरूप नसलेली किंवा जीस संवेदना अथवा जाणीव नाही अशी वस्तू. जड शब्दाचा प्रतियोगी शब्द चेतन हा होय. चेतन म्हणजे ज्ञाता; जीस ज्ञान अथवा जाणीव आहे किंवा जी ज्ञानरूप आहे अशी वस्तू, अचेतन म्हणजे जड होय. (१) जी वस्तू कोणत्याही ज्ञात्याच्या जाणीवेत नसतानाही स्वतंत्रपणे अस्तित्वात असते (२) जिला स्वतःला जाणीव नसते (३) आणि जी स्वतः ज्ञानरूप किंवा चैतन्यरूप नसते, त्या वस्तूस 'जड' असे म्हणतात. उदाहरणार्थ खाणीत नैसर्गिक स्थितीत पडून असलेला हिरा. तो अचेतन किंवा जड आहे. (१) कोणालाही माहीत नाही अशा स्थितीत तो लक्षावधी वर्षे पडून असतो, (२) त्याला जाणीव नसते व (३) तो स्वतः ज्ञानरूप नाही.

१६. जडवादाचा मुख्य सिद्धान्तः- द्रव्याच्या जड, जीव व चेतन अशा तीन श्रेणी

चेतनवस्तू व जीववस्तू अस्तित्वात येण्याच्या अगोदरच अचेतन व अजीव असा निसर्ग अस्तित्वात होता; आणि चेतनवस्तू व जीववस्तू हा निसर्गाचा एक भाग असून तो निसर्गात एका विशिष्ट परिस्थितीत उत्पन्न झाला आहे; जीव व चेतन ही एक निसर्गातील विशिष्ट घटना आहे आणि ती अचेतन व अजीव सृष्टीतूनच निष्पन्न झाली आहे; अगोदर अजीव व अचेतन असलेले द्रव्यच जीव व चेतन बनते; असा जडवादाचा मुख्य सिद्धान्त आहे. एका स्थितीत जे जड, अचेतन व अजीव असते तेच दुसऱ्या स्थितीत चेतन व जीव बनते. व

चेतन ही जडाचीच एक परिणती आहे. मुळात जे जड असते तेच अजड बनते. वनस्पती व प्राणी ही जीवसृष्टी होय. कीटक, सरीसृप, पशुपक्षी, मनुष्य, इत्यादी चेतन सृष्टी होय. चेतन म्हणजे जाणीव किंवा ज्ञान असलेले द्रव्य, ज्ञानशाली चेतन सृष्टीत मनुष्य हा वरिष्ट आहे. ज्ञान किंवा बुद्धी असलेली, वस्तुचा विचार करणारी अशी वस्तू शाश्वत नाही, सर्वव्यापी नाही, सर्व वस्तुंच्या मुळाशी नाही; तर ती एक अशाश्वत, कार्यरूप, कारणाने निर्माण झालेली देशकालपरिछिन्न व एकदेशी अशी वस्तू आहे.

अचेतन व अजीव द्रव्य पहिल्यांदा असते. उष्णता, विद्युत्, वायुरूप, द्रवरूप आणि घनरूप ही वस्तुची जीव व चेतन स्वरूपे अस्तित्वात येण्याच्या पूर्वीची अवस्था आहे. त्यातून जीवरूप द्रव्ये निर्माण झाली. जीव म्हणजे स्वयसंचलनशील, अन्न पचवून जगणारी, उत्सर्ग करणारी आणि स्वजातीय वस्तुंना जन्म देणारी वस्तू. वनस्पतीचे स्वरूप अशाच तऱ्हेचे आहे. जीवसृष्टीच्या पुढची पायरी चेतनसृष्टी होय. चेतन म्हणजे जिच्या ठिकाणी बुद्धी किंवा जाणीव आहे अशी वस्तू. पशुपक्षी मनुष्य इत्यादी प्राणि चेतन होत. अजीब, जीव आणि चेतन अशा द्रव्याच्या एकापेक्षा एक उच्च आणि उच्चतर श्रेणी होत. अजीव व अचेतन द्रव्यच (Matter) अतिशय परिणत व उच्च दर्जाच्या रचनेने युक्त बनून जीवस्वरूप व चेतनस्वरूप धारण करते. द्रव्यातच जीवधर्म प्रकट होतात आणि मानसिक गुण विकसित होतात. जे भौतिक असते तेच आत्मरूप बनते. आध्यात्मिक स्थिति ही भौतिक स्थितीचीच परिणति आहे. जडच शेवटी जीव बनते[१].

कोणताही जीवपिंड किंवा चेतन पिंड तपासावा. म्हणजे तो विविध व सूक्ष्म रचनेने युक्त अशा जडद्रव्यांचा मेळावा होय, असे दिसून येईल. त्यात मूलतत्त्वे (Elements), व संयुक्त द्रव्ये (Chemical Compounds) प्रामुख्याने आढळतात. मूलतत्त्वे व संयुक्त द्रव्ये यांनी बनलेल्या जीवपेशी (Cells) विशिष्ट रचनेत एकमेकात गुंतलेल्या अशा दिसतात. या जीवपेशीच्या रचनायुक्त समुदायाने बनलेल्या व निरनिराळी कार्ये करणाऱ्या संस्था आढळतात. या सगळ्या संस्थाच्यामध्ये ज्ञानतंतूची संस्था सापडते. ही संस्थाच चेतनरूप व मनोरूप धारण करते. ज्यास शरीर असे म्हणतात तोच आत्मा किंवा मन (Soul or Mind) होय. शरीर व जीवात्मा हे एक रूप आहे. जीवशक्ति किंवा आत्मशक्ती शरीराहून भिन्न व व्यतिरिक्त नाही. जीव व चेतन ही शरीर द्रव्याची एक बाजू (Aspect) आहे. एका दृष्टीने जे शरीर आहे तेच दुसऱ्या दृष्टीने आत्मा किंवा मन होय[२].

वस्तुचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, विचार करणे, कल्पना करणे, संकल्प, विकल्प, इच्छा, द्वेष, काम, क्रोध, प्रीती, स्मरण, अहंकार इत्यादी सगळे मनोधर्म किंवा आत्मधर्म हे शरीरधर्मच होत. कारण शरीरच आत्मा किंवा मन आहे. शरीरात निराळा आत्मा किंवा मन नाही.

---

(1) The Stream of Life p. 36 by Julian Huxley.

(2) Perhaps we treat body and mind as opposites in kind, when in fact each is one face of a single two faced reality-The Science of Life, P. 761 by I, G, Wells, Huxley.

शरीर हाच आत्मा असल्यामुळे शरीरनाशानंतर व शरीरोत्पत्ती पूर्वी आत्मा राहात नाही. शरीरनाशांबरोबरच चैतन्याचा व प्राणाचा नाश होतो. शरीर नाश झाल्यानंतर आत्मा व प्राण शिल्लक राहात नसल्यामुळे पूर्वजन्म व पुनर्जन्म धारण करणारा किंवा अनेक योनीतून प्रवास करणारा असा जीवात्मा आहे या कल्पनेला अवसरच राहात नाही. मेल्यानंतर कर्मानुसाराने जीवात्मा निरनिराळ्या योनीत जन्म घेतो किंवा पुण्याने स्वर्गात जातो आणि पापाने नरकात जातो या कल्पनाच मिथ्या आहेत. कारण असा स्वतंत्र जीवात्मा अस्तित्त्वातच नाही. निरनिराळ्या धर्मग्रंथात निरनिराळ्या रीतीने वर्णिलेल्या नाना प्रकारच्या स्वर्गामध्ये व नरकामध्ये प्रवास करणारा, चवन्याशी लक्ष योनीत परिभ्रमण करणारा, अज्ञानामुळे जन्ममरणाच्या शृंखलेत बद्ध असलेला, ज्ञानाने मुक्त होणारा आणि प्रत्येक जन्मात मागे भोगलेल्या वैचित्र्यपूर्ण व चमत्कृतिपूर्ण अनेक स्वर्गनरकांना व अनंत योनींना विसरणारा विसरभोळा संसारी जीवात्मा शरीराहून पृथक् आहे, याला पुराणातील व धर्मशास्त्रातील कल्पित व निराधार कथा आणि स्वतःची अथवा दुसऱ्याची वंचना करणाऱ्या लोकांची भ्रामक समर्थने यांच्याशिवाय कसलाही पुरावा नाही. अनेक तत्त्ववेत्ते तर्कशास्त्राच्या आधारे स्वतंत्र जीवात्म्याची सिद्धी करणाऱ्या अनेक युक्ती सांगतात, परंतु त्या हेत्वाभासानी दूषित आहेत. परंपरागत लोकभ्रमांचे समर्थन करणे एवढेच त्या युक्तींचे कार्य आहे.

१७. देहच आत्मा

वनस्पती, प्राणी व मनुष्य यांच्या देहात स्वतंत्र जीवशक्ती (Vital Force) किंवा चेतनशक्ती (Conscious Entity) नाही. देह ही घटनाच जीवरूप किंवा चेतनरूप आहे. अध्यात्मवादी लोक असे म्हणतात की, रथाला जसा सारथी लागतो, त्याप्रमाणे देहाला अन्तर्बाह्य प्रेरणा देणारा व त्यांचे नियंत्रण करणारा अन्तस्थ पुरुष किंवा आत्मा आहे. अनेक मुखवटे धारण करणारा जसा बहुरूपी नट असतो, त्याप्रमाणे ही स्वतंत्र जीवशक्ती आहे. घरात ज्याप्रमाणे दीप असतो व त्याच्या प्रकाशात जसे घरातील सगळे व्यवहार चालतात, त्याप्रमाणे चेतनज्योती देहरूपी घरात बसते व तिच्या प्रकाशात देहव्यवहार चालतात. लाल तापलेल्या पहारीत जसा अग्नी असतो, तारायंत्राच्या किंवा टेलिफोनच्या तांब्याच्या तारेतून जसा विद्युत्संचार होतो, त्याप्रमाणे कमीजास्त प्रमाणांत व्यक्त होणारी चैतन्यशक्ती अथवा जीवात्मा वनस्पती, प्राणी व मनुष्य यांच्या देहात संचारलेला आहे. आगगाडीला चालविणारी वाफ ज्याप्रमाणे एका पोलादी पेटीत कोंडलेली असते, त्याप्रमाणे जीवपिण्डात जीवशक्ती कोंडलेली आहे. जडद्रव्यापेक्षा अगदी पृथक् असे हे द्रव्यआहे.

जीवपिण्डाचे मुख्य लक्षण असे आहे की, त्या पिंडात जी नादुरुस्ती होते, जे बिघाड (Disturbances) होतात. ते नाहीसा करण्याचा प्रयत्न करून मूळ समधात स्थितीमध्ये देहपिण्डाला आणण्याचा त्यांत प्रयत्न असतो. इतर कोणत्याही जडद्रव्यांत अशी व्यवस्था

नसते. जखम झाली असताना ती ताबडतोब भरून आणण्याचा प्रयत्न देहात चालतो. विषे, रोगजंतू किंवा शरीरास अहितकारक असलेल्या इतर गोष्टी यांचा प्रतिकार करून त्याचा कमिजास्त प्रमाणांत बचाव करण्याची व्यवस्था जीवपिण्डात असते. प्रत्येक जीवपिण्डामध्ये व्यक्तित्व (Individuality) असते. यंत्राचे निरनिराळे भाग काढून ठेवता येतात, त्यातला नादुरुस्त झालेला भाग टाकून देऊन नवा भाग जोडता येतो, तसे देहाचे नाही. देहाचे अवयव जरी वरवर भिन्न दिसत असले, तरी त्यात सर्वव्यापी अखंडपणा आहे. एक हृदय काढून दुसरे बसवता येत नाही याचे कारण शरीर हे केवळ जड यंत्र नसून त्या शरीरांत भिन्न भिन्न अवयवांना व इंद्रियांना एकत्र जोडून घेणारी अशी अविभाज्य शक्ती आहे. ही अविभाज्य शक्ति म्हणजेच जीवात्मा होय. श्वासोच्छवासाची क्रिया याच तत्त्वामुळे चालते. शरीराला दुरुस्त करण्याची क्रिया याच तत्त्वाचे कार्य आहे. संवेदना, अनुभव, ज्ञान, स्मरण, इच्छा, द्वेष, क्रोध इत्यादी वृत्ती याच वस्तुचे गुण होत[१]. बालपणापासून तो म्हातारपणापर्यंत 'तोच मी आहे' ही भावना याच अविनाशी वस्तुंच्या सतत एकरूपतेच्या जाणिवेमुळे उत्पन्न होते.

अध्यात्मवादी लोकांचे वरील विचार अधिक खोलवर विचार केला असता टिकत नाहीत. सजीव पिण्ड अद्याप प्रयोगशालेत निर्माण करता येत नाहीत, ही गोष्ट जरी खरी असली, तरी पदार्थविज्ञान (Physics) व रसायन (Chemistry) यांच्या आधारावर इंद्रिय विज्ञान (Physiology) आणि जीवशास्त्र (Biology) जी प्रगती करीत आहेत आणि जीवपिंडातील आजपर्यंत गूढ असलेल्या कित्येक घटनांचा जो उलगडा करीत आहेत, त्यावरून असा निश्चित पुरावा मिळतो, कीं जीवात्मा देहापेक्षा स्वतंत्र अस्तित्वात नाही.

सजीव देहपिण्ड हा भोवतालच्या अजीव अशा सृष्टीतूनच उत्पन्न झाला व विकसित झाला आहे. भोवतालच्या परिस्थितीवरच तो अवलंबून आहे. त्या परिस्थितीचाच जीवापाड हा एक भाग आहे. दीडशे अंशापेक्षा कमी असलेल्या व शून्यापेक्षा वर असलेल्या उष्णतेतच हा अस्तित्वात राहू शकतो. पृथ्वीपासून पाच मैलापेक्षा उंच असलेल्या वातावरणांत तो जगू शकत नाही किंवा वाढू शकत नाही. कार्बन प्रधान असे प्रोटीन हे संयुक्त द्रव्य ज्यात उत्पन्न होऊ शकत नाही, अशा परिस्थितीत त्याला अस्तित्त्व नसते. जाळणाऱ्या उष्णतेवर कसलाच जीवपिण्ड टिकाव धरू शकत नाही. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीतच विशिष्ट जातीचे जीवपिण्ड उत्पन्न होतात व वाढतात. ती भौगोलिक परिस्थिती बदलल्यावर त्यांच्या जातीच्या जाती नष्ट होऊन जातात. भूपृष्ठावरचे जे खडकांचे व जमिनीचे एकांवर एक रचलेले थर शास्त्रज्ञांनी तपासून पाहिले आहेत, त्यात असे आढळले कीं, निरनिराळ्या थरामध्ये निरनिराळ्या जातीचे प्राणी जगत होते.

---

१ प्राणापाननिमेषोन्मेषजीवनमनोगतीन्द्रियान्तर विकारा: सुखदु:खेच्छाद्वेषप्रयत्नाश् चात्मनो लिङ्गानि ॥ (वैशेषिकसूत्र ३।२।४) 'श्वासोच्छवास, डोळ्यांची उघडझाप, जगणे, मानसिक क्रिया, निरनिराळ्या इंद्रियांच्या विकारांची व्यवस्था, सुखदु:ख, इच्छा, द्वेष आणि प्रवृत्ती ही आत्म्याची लक्षणे होत.'

उत्पाताने उलथापालथ होऊन नवा थर आला कीं त्यावर नवी प्राणिसृष्टी निमार्ण होत असे; पृथ्वीचे एकावर एक रचलेले हे थर म्हणजे वनस्पती, प्राणी व खनिज पदार्थ यांच्या इतिहासाचे निसर्गाने जपून ठेवलेले अत्यंत विश्वसनीय पुस्तकच होय. हे पुस्तक व त्यातील आज उघडलेले पान अवलोकिले तर असे दिसते की, अजीव निसर्गाचाच सजीव सृष्टी हा भाग आहे. त्याच अजीव सृष्टीत रूपांतर घडून तीच श्वासोच्छवास करू लागली, तिलाच डोळे व कान आले, त्याच सृष्टीला स्वतःची जाणीव होऊ लागली. अनादी कालापासून अज्ञानाच्या महाघोर निद्रेत झोपी गेलेला हा निसर्ग जीवपिण्डाचे रूप धारण करून जागा झाला व स्वतःचे अवलोकन करू लागला.

या जीवपिण्डाचे परीक्षण केल्यास त्याच्या घटनेत अजीव व अचेतन द्रव्यच सापडतात. त्याच्या धारणार्थ व पोषणार्थ भौतिक द्रव्यच लागतात. ती द्रव्ये न मिळाल्यास तो नष्ट होतो. जीवात्म्यावर विषांचा, रोगांचा व औषधांचा परिणाम होत असतो. जीवात्मा ही जर देहापेक्षा निराळी अशी वस्तू असती, तर अन्नाचा, रोगांचा व विषांचा तिच्यावर परिणाम झाला नसता, अन्न, रोग व विष यांचा जिच्यावर परिणाम होतो, ती भौतिक व विकार पावणारीच वस्तू असली पाहिजे, स्मरणशक्ती, विचारं करण्याची प्रवृत्ती, कामक्रोधादी विकार, उत्साह, धैर्य, कल्पनाशक्ती हे देहधर्मच आहेत. थायराईड, (Thyroyd) पिच्यूएटरी, (Pituitary) इत्यादी ग्रंथी आणि आतडी यातून उत्पन्न होणारी हार्मोन (Hormone) नांवाची संयुक्त द्रव्ये कमी पडली तर वरील गुणावर त्याचा परिणाम होतो. हीं द्रव्ये देहाबाहेर स्वतंत्र निर्माण करता येतात. थायराईड हार्मोन योग्य प्रमाणांत निर्माण झाले नाहीत तर निरुत्साह, चिडखोरपणा वगैरे उत्पन्न होतात. त्यामुळे स्मरणशक्ती व तर्कशक्ती कमी होऊन विचाराची साखळी तुटू लागते. पिच्युएटरी ग्रंथीमधील हार्मोन योग्य प्रमाणात उत्पन्न न झाल्यास लैंगिक मनोधर्म विकृत होतात. हार्मोनचे कार्य शरीरातील निरनिराळ्या इंद्रियांच्या कार्याला मदत करणे हे आहे. खरोखर स्मरण, विचार, इच्छा, द्वेषादी धर्म देहाचे नाहीत व निराळ्या आत्म्याचेच आहेत, असे मानले तर या हार्मोन नावाच्या द्रव्याचा काहींच परिणाम होण्याचे कारण नाही[१].

देहाची रचना ज्या मानाने वैविध्यपूर्ण विकसित व अंगोपांगानी संपूर्ण असते, त्या मानानेच अनुभव व बुद्धी विविध, विकसित व प्रगल्भ स्वरूप धारण करतात. ज्ञानविकास हा देहविकासावर अवलंबून आहे. देह जितका अविकसित स्वरूपाचा त्या मानाने ज्ञानही अविकसित असते. सगळ्याच संवेदनाना व मनोधर्मांना हा नियम लागूं आहे. मेदू व ज्ञानेंद्रिय संस्था उत्पन्न झाल्याशिवाय व विकसित झाल्याशिवाय ज्ञान (Consciousness) उत्पन्न व विकसित होत नाही. सगळ्या मनोवृत्ती (States of Mind) ज्ञानेन्द्रियसंस्थेवरच आश्रित आहेत.

या देहाच्या विकासाचे प्रारंभस्थान एक-पेशी (Single cell) जीवपिंड होय. पहिल्यांदा प्रोटोझा (Protozoa) सारखे जीवपिण्ड असतात. पुढे त्यांचे संयुक्त संघ बनतात. मधमाशांच्या

(1) Man the slave and the master,-p 118. by Mark Graubard,

पोवळ्यासारखी त्यांची रचना असते. पुढे जलसंचारी असणारे माशासारखे पिण्ड उत्पन्न होतात. त्यातून सरपटणारे प्राणि तयार होतात. नंतर स्तनपायी (Mammalian) उद्भवतात. मर्कटसदृश अवस्थातून ते जातात. पाठीचा कणा ताठ झाल्यावर वामनमूर्ती मानवपिण्ड अवतरतो. ह्या सोपानपरंपरेत संवेदनेचीही उच्च व उच्चतर अशी सोपानपरंपरा असते. ज्ञानतंतुच्या संस्थेसह शरीरयंत्र (Bodily Machinery) जितकी पूर्णतेकडे जाते त्यामानाने मन, आत्मा किंवा ज्ञानशक्ती पूर्णत्वाकडे जाते. ही गोष्ट खरी की, भूतलावर पूर्वी एकदा असा काळ होता की, जीवद्रव्य नव्हते, अजीव द्रव्यच होते. अंधळ्या निसर्गशक्तीच्या झगड्यातच प्रगतीचे बीज म्हणजेच जीवबीज तयार झाले[१]. जीवपिण्डाच्या दृष्टीने क्रूर व विध्वंसक निसर्गातच जीवपिण्ड तग धरू लागला. संहाराच्या अनंत परंपरेतून, घातक शक्तींच्या कचाट्यातून व कचाकचीच्या संग्रामातून थोडे थोडे जीव जगत व वाट काढत शांतीच्या व समाधानाच्या परिस्थितीत प्रवेश करू लागले आहेत. कोट्यवधी व अब्जावधी जीव नष्ट होतात व त्यांत एखादा जगतो. हे प्रमाण या निसर्गातील युद्धास लागू आहे.

अशी कांही द्रव्ये आहेत की, ती अजीव आहेत असेही म्हणता येते किंवा जीव आहेत असेहि म्हणता येते. ती द्रव्ये जीव व अजीव यांच्यातील दुवा होय. सूक्ष्म रोगजंतूचा नाश करणारी जंतुविरुद्ध (Bacteriophage) द्रव्ये आणि सजीव शरीराला किंवा वनस्पतीला बाधणारी व त्यावर वाढणारी विषारी द्रव्ये (Virus) जीव व अजीव यांना जोडणारा मधला दुवा होय. ही रसायनिक संयुक्त द्रव्येच होत, असे निश्चित करता येते प्रोटीन (Protein) आणि त्याच्याशी संयोग पावलेले न्यूक्लीक् ॲसिड (Nucleic Acid) मिळून बनलेले न्युक्ल्युओप्रोटीन (Nucleoprotein) म्हणजेच वरील जीवपिण्ड होत. वनस्पतीवर व शरीरावर त्यांचा एक कण पडला की, त्यांची संख्या अनंत पटीने वाढते, ही जननशक्ती त्यांच्या जीवत्वाचे प्रमाण होय.

मानवशरीर ही जडद्रव्यातून निर्माण झालेली अत्यंत गुंतागुंतीची घटना आहे. सगळ्याच जीवपिण्डांच्या घटनेचे काही प्रश्न अद्याप सुटले नाहीत, ते मानवपिण्डाच्याही बाबतीत उद्भवतात. परंतु पदार्थ विज्ञान आणि रसायनविद्या यांच्याद्वारे अनेक प्रश्न सुटले आहेत; व जे प्रश्न सुटावयाचे आहेत, ते याच शास्त्रांच्या मार्गाने सुटावयाचे आहेत. मानवशरीर हे एक यंत्र आहे या दृष्टीने शरीरातील पुष्कळ गोष्टींचा उलगडा होतो आणि रासायनिक द्रव्यांचे नियम देहातील अनेक घडामोडींचा अर्थ लावण्यास उपयोगी पडतात. स्नायूंचे आकुंचन व प्रसारण यांचा नियम रासायनिक द्रव्यांच्या परिणामावरून ठरविता येतो. शरीर ही एक रसायनशाळा आहे. त्यात इन्सुलिन् (Insulin) द्रव्य पॅक्रियातून (Pancrea) तयार होते. हेमोग्लोबिन्, ग्लूकोझ, हार्मोन् इत्यादी द्रव्ये यकृत, ग्रंथी इत्यादी अवयवातून निर्माण होत असतात. यंत्र या दृष्टीने शरीरातील पुष्कळच घटनांचा अर्थ कळतो. मेंदुची, ज्ञानतंतुची व क्रियातंतूची व्यवस्था

---

(1) The stream of life p. 36 by julian Euxley.

मोठ्या शहरातील टेलिफोनच्या संघटनेपेक्षा व्यवस्थित चालते. हृदय हा एक पंप आहे या दृष्टीने पाहिले तरच रुधिराभिसरणांचा नियम नीट रीतीने कळतो. डोळा हा एक उच्च दर्जाचा कॅमेरा आहे, असे दिसून येते. स्वतःची स्वतः दुरुस्ती करणारे व स्वतःचेच नियंत्रण करणारे (Self-Repairing and Self-Regulating Machine) यंत्र या दृष्टीने देह हे एक उत्तम यंत्र ठरते. जोपर्यंत रक्तातील रासायनिक संयुक्त द्रव्यांचे कार्य नीट रीतीने चालते तोपर्यंत या यंत्राचे काम सुरळीत चालते. कार्बन डायॉक्साईडचा व प्राणवायूचा (Oxygen) नीट पुरवठा जोपर्यंत होतो तोपर्यंत रक्तातील रसायने व्यवस्थित तयार होत असतात. त्यामुळे रक्ताच्या दाबाचे कार्य नीट चालते. फुफ्फुसांची क्रिया रक्ताच्या कार्याला मदत करते. फुफ्फुसांचे कार्य नीट चालण्याकरितां मूत्रपिंडातील (Kidneys) रासायनिक द्रव्योत्पत्ती व्यवस्थित चालावी लागते. त्याकरिता ॲड्रेनल (Adrenal) ग्रंथींना अड्रेनल द्रव्य फाजील पैदा होऊ नये याची काळजी घ्यावी लागते, नाहीतर रक्ताच्या दाबावर त्याचा परिणाम होतो. मूत्रपिण्डाचे काम योग्य रीतीने चालावे म्हणून पिच्युटरी (Pituitary) ग्रंथींला व्यवस्थित प्रमाणांतच पिट्रिसिन तयार करावे लागते. अशा रीतीने या यंत्रातील कार्ये परस्पराश्रयाने चालतात[१].

१८. जीवपिण्डाची तीन वैशिष्ट्ये

या जीवयंत्राची इतर यंत्रांच्यापेक्षां अधिक उच्च अशी तीन वैशिष्टये आहेत. एक या जीवयंत्राची घटक असलेली महत्त्वाची द्रव्ये या यंत्रातच तयार होतात. त्याच्यापासून हे यंत्र सारखे बनत असते (Anabolism) आणि त्या घटक द्रव्यांचा नाश करण्याची क्रिया (Catabolism) या यंत्रातच सारखी चाललेली असते. दुसरे वैशिष्ट्य असे की, यांच्यातील अंगोपांगांची उत्पत्ती, विकास विस्तार करण्यास अनुकूल अशी व्यवस्था अगोदरच त्यांच्या जनक द्रव्यांत असते. यासच बीजसंस्था किंवा गर्भसंस्था (Embryological Organisation) म्हणतात. बीजावस्थेत किंवा गर्भावस्थेत भविष्यकाली घडून येणाऱ्या अंगप्रत्यंगांच्या उद्भवाची तरतूद असते. घडीचा पंखा ज्याप्रमाणे उकलावा त्याप्रमाणे शरीराचा बीजातून किंवा गर्भावस्थेतून उलगडा होत जातो. याचे तिसरे वैशिष्टय हे आहे की, 'अधिकाधिक विकसित जीवपिण्डात उत्तरोत्तर जाणीव वाढत जाते. जाणीव ही या पिण्डातील सर्व कार्याकरिता निर्माण होत नाही. उदाहरणार्थ रुधिराभिसरण होण्याकरिता, अन्न पचनाकरिता, रोग-बीजांचा संहार करण्याकरिता, पेशींच्या व घटक धातूच्या निर्मितीकरिता, शरीरातील विविध सेद्रियसंयुक्त द्रव्यांच्या उत्पादनाकरिता जाणिवेची मदत हा पिण्ड घेत नाही. अन्नसंपादन, शत्रुनाश इत्यादी काही थोड्या क्रियांकरिता जाणीव हे साधन देहात उत्पन्न झाले आहे. कालांतराने शरीरातील बहुतेक कार्यावर नियंत्रण ठेवण्याचे

---

(1) Marxist Philosophy and the Sciences-p. 103 by J. B. S. Haldane.

Life and Mechanism,-chapter I by J. S. Haldane. Concerning man's origin, pp. 16-20 by Sir Arthur Keith, here

कार्य करण्याइतकी समर्थ जाणीव मनुष्यात उत्पन्न होण्याचा संभव आहे. शरीरातील काही क्रियांमध्ये जाणिवेची गरज कित्येकदा लागते. उदाहरणार्थ, श्वासोच्छवास क्रियेला नेहमी जाणिवेची प्रेरणा नसते, नकळत ती चालू असते; परंतु त्या क्रियेत काही अडथळा आला किंवा ती क्रिया फाजील जोरात चालण्यास भाग पाडणारी द्रव्ये शरीरांत उत्पन्न झालीं म्हणजे या क्रियेची जाणीव उत्पन्न होते. मफलर विणण्याची क्रिया फारसा विचार न करितां किंवा दुसराच विचार मनांत चालला असताना घडत असते. पण मध्येच गुंतागुंत झाली तर जाणीव उत्पन्न होते. जाणीव, ज्ञान, विचार किंवा संवेदना, (Consciousness) जीवाच्या विशिष्ट प्रयोजनाकरिताच अस्तित्वात आली आहे. ही जीवपिण्डातील विशिष्ट सुधारणा आहे. महत्त्वाच्या साधनाची जोड जीवपिण्डास लाभली आहे. यंत्रामध्ये ज्याप्रमाणे पुनः पुनः सुधारणेची भर पडत असते, त्याप्रमाणे ही महत्त्वाची भर जीवयंत्रात पडली आहे. म्हणून जीवपिण्ड हा यंत्र नसून त्यापेक्षा उच्चतर अशी वस्तू आहे.

शरीरात असणारी व शरीर निर्माण करणारी जी बीजसंस्था तिचा गाभा बीजमणिमाला (Chromosomes) होय. बीजमणिमाला हा सगळ्या जीवधर्मांचा भौतिक पाया आहे व सगळ्या आनुवंशिक गुणांचे अधिष्ठान आहे. या मालेत पुष्कळ बीजमणी (Genes) असतात. प्रत्येक बीजमणी एका किंवा अनेक गुणधर्माचा साठा असतो. प्रत्येक बीजमणी विशिष्ट गुणधर्माची सारभूत शक्ती धारण करतो. या बीजमणीत आनुवंशिक गुण भरलेला असतो. या बीजमणीत जर फरक झाला तर त्यातून उत्पन्न झालेल्या देहातही फरक होतो. आनुवंशिक गुणांत जे बदल होतात, एकाच वंशात कालांतराने जे अनेक फरक घडून येतात, त्याचे कारण बीजमणीत घडून येणारा फरक होय. त्याच वंशात दुसऱ्या वंशाचे मिश्रण न होताही विलक्षण प्राणी जन्माला येतो, असे क्वचित प्रसंगी आढळते. हे जे आकस्मिक परिवर्तन (Mutation) घडते, त्यास बीजमणीतील परिवर्तन हे कारण आहे. बीजमणीत परिवर्तन कृत्रिम साधनांनीसुद्धा करता येते. एक्स रेजच्या प्रयोगाने बीजमणीत फरक घडवून आणता येतात, असे शास्त्रज्ञांनी सिद्धं केले आहे[१]. जीवपिण्डाच्या निरनिराळ्या रचनांचे व भिन्न भिन्न कार्याचे उपादानकारण बीजमणीच होय. बीजमणी हे एक संयुक्त द्रव्य (Chemical Aggregate) आहे. ते मूलद्रव्यापेक्षा (Molecule) मोठे असते. एक्स रेजची शक्ती या द्रव्यात प्रवेश करते आणि त्यांच्यात अनेक प्रकारची परिवर्तने करते. एकदा हे परिवर्तन झाले की ते हजारों पिढ्यांपर्यंत टिकते. पुनः बीजद्रव्यांत काही भानगड झाली अथवा काही स्थित्यंतर झाले, तर वंशात किंवा पिढीत पुनः फरक पडतो.

१९. देहात्मप्रत्यय व देहात्मवाद

ज्या वस्तुची सिद्धी करण्याची जरूरी नाही अशी जर कोणती वस्तू असेल तर ती आत्मा हीच होय. आत्म्याचे म्हणजेच स्वतःचे अस्तित्व कोणं नाकारील ? 'मी नाही' असे कोण

---

(1) Man the Slave and the Master,-p 136-142 by Mark, Graubard

म्हणेल? समजा एखाद्याने असे म्हणण्याचे धाष्टर्य केले, तर त्यांस असे विचारावे की हे विधान कोण करतो. तो म्हणेल 'मी'. त्याला स्वतःच्या अस्तित्वाचा नाही-नाही म्हणता, निर्वाळा द्यावाच लागतो. आत्मा आहे की नाही, हा वादाचा मुद्दाच नाही. तो आत्मा कसा आहे ? देहच की देहाहून निराळा ? हाच महत्वाचा प्रश्न आहे. सगळ्या भारतीय तत्त्ववेत्यांनी या संबंधी एक फार महत्वाची कबुली दिली आहे. ते म्हणतात प्रत्येक जाणीव असलेला जीव, देहच आत्मा आहे, अशा बुद्धीनेच व्यवहार करतो. आद्य शंकराचार्यांनी या मुद्यांचे जे स्पष्टीकरण केले आहे, ते जगातील कोणत्याही तत्त्ववेत्त्यापेक्षां या बाबतींत अत्यंत वरच्या दर्जाचे आहे. जीवशास्त्राचे व मानसशास्त्राचे ते एक गंभीर रहस्य आहे. शारीरभाष्याच्या प्रस्तावनेत व समन्वयसूत्राच्या भाष्याच्या अखेरीस त्यांनी अर्से सांगितले आहे की, देहच आत्मा आहे, हा प्रत्यय सगळ्या जीवव्यापारांच्या मुळाशी आहे. आत्मा देहापेक्षा भिन्न आहे, असे मानणारे तत्त्ववेत्तेदेखील व्यवहारकाली देहात्मवादीच असतात, असे आचार्य निश्चयपूर्वक सांगतात[१]. देहात्मप्रत्यय ही स्वाभाविक जन्मसिद्ध जाणीव (Intuitive Consciousness) आहे. असे सगळे भारतीय तत्त्ववेत्ते सांगतात.

चार्वाकाशिवाय बाकी सगळे भारतीय तत्त्ववेत्ते देहाहून आत्मवस्तू निराळी आहे असे सिद्ध करण्याकरिता प्रवृत्त झाले आहेत. ते म्हणतात, देह हाच आत्मा आहे ही जाणीव स्वाभाविक आहे, हे जरी खरे असले तरी ती एक मानवाच्या ठायी वसत असलेली जन्मसिद्ध भ्रांति आहे; म्हणून त्या भ्रांतीच्या निरासार्थ व देहव्यतिरिक्त शुद्ध आत्म्याच्या दर्शनार्थ तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. देहव्यतिरिक्त शुद्ध आत्माच्या दर्शनानेच मुक्ति प्राप्त होते, असा त्यांचा सिद्धान्त आहे. याठिकाणी त्या तत्त्ववेत्यांचे या एका मुद्याबद्दल ऐकमत्य आहे, देहात्मप्रत्यय हा स्वाभाविक व सार्वत्रिक आहे. हा, तो मुद्दा होय. हा प्रत्यय मिथ्या किंवा खोटा आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्या तत्त्ववेत्त्यांवर पडते. स्वाभाविक अनुभवाचा पुरावा या अध्यात्मवादी तत्त्ववेत्त्यांच्या विरुद्ध जातो. त्यांनीं ही गोष्ट स्पष्ट रीतीने सांगितली आहे की, देहाहून आत्मा निराळा आहे, अशी खोल जाणीव निर्माण करणे अत्यंत कठिण आहे. त्या करिता फार मोठी तपश्चर्या करावी लागते. याचा अर्थ असा की देहव्यतिरिक्त आत्मा आहे, ही जाणीव फार मोठ्या प्रयासानेच मनावर लादता येते, आणि ती कितीही लादली व दृढमूल केली तरी जन्मसिद्ध देहात्मप्रत्यय मधूनमधून वर तोंड काढतोच. महान् ज्ञानी देखील प्रसंगी ढळतात, असे सगळे धर्मग्रंथ उच्च कंठरवाने बजावून सांगतात. याचे हेच तात्पर्य निघते कीं, देहव्यतिरिक्त आत्म्याची कल्पना फार प्रयासाने निर्माण करतां येते; स्वाभाविक अनुभव जडवादाच्या बाजूचा आहे; निराळ्या आत्म्याची कल्पना मनुष्याने मोठ्या प्रयासाने काढली आहे.

---

(१) नच अनध्यस्तात्मभावेन देहेन कश्चित् व्याप्रियते । शारीरभाष्य १।१।१

२०. देहभिन्न आत्म्याचे समर्थन करणाऱ्या प्रमाणांची मीमांसा

आत्मा देहाहून निराळा आहे, यास दोन तऱ्हेची प्रमाणे अध्यात्मवादी तत्त्ववेत्ते देतात. एक तार्किक प्रमाण (Rational Evidence) आणि दुसरे शब्दप्रमाण (Dogma). शब्दप्रमाणांत धर्मग्रंथ व अलौकिक व्यक्तींचा आत्मानुभव हीं दोन प्रमाणे अन्तर्भूत होतात. तार्किक प्रमाणासंबंधी आद्य शंकराचार्यांनी बृहदारण्यक भाष्याच्या प्रस्तावनेत महत्त्वाची सूचना देऊन ठेविली आहे. त्यांनी असे म्हटले आहे कीं, आत्मसिद्धी करणारा तार्किक पुरावा अगदी लंगडा आहे; जे नैयायिक इत्यादी दार्शनिक तर्काने आत्मसिद्धी करू पाहतात, त्यांना त्या तर्काचे दुर्बलस्थान कळलेले नाही; शब्दप्रमाणच शेवटी आत्मप्रतीतीचे अबाधित साधन होय. आतां महत्त्वाची तार्किकप्रमाणे कोणती यांची चौकशी करून मग अलौकिक अनुभवाचा समाचार घेऊ.

अध्यात्मवादी तत्त्ववेत्ते म्हणतात कीं, बालपणापासून तो वृद्धावस्थेपर्यंत "तोच मी आहे" असा जो अनुभव (अनुवृत्ती प्रत्यय) येतो त्या अनुभवावरून, देहाहून मी निराळा आहे, असा गर्भित अभिप्राय निघतो. कारण बालपणाचा देह, आणि म्हातारा देह, यांतील सगळी घटकद्रव्ये बदललेली असतात. म्हणजे सगळा देह म्हातारपणी निराळा झालेला असतो. यावर अगदी साधे उत्तर आहे. बालपणापासून मरेपर्यंत अविछिन्न अशी द्रव्यपरंपरा किंवा एक तऱ्हेचा वस्तूप्रवाह असतो. त्यामुळे 'तोच तो' असा प्रत्यय येतो. दिव्याच्या ज्योतीत अविरत बदल होतो पण तीच ही असे वाटत असते. जुन्या इमारतीत बराच फरक झाला, तरी "तीच पूर्वीची ही इमारत" असे आपण म्हणतो. शेकडो वर्षांपूर्वी लावलेल्या झाडास "तेच शंभर वर्षांपूर्वीचे झाड" असे आपण म्हणतो. घटकावयव जरी वारंवार बदलत असले तरी त्याची संतत परंपरा व सामान्य आराखडा जोपर्यंत तोच असतो तोपर्यंत वस्तुचे व्यक्तित्व एकच आहे, असे आपण समजतो. अजीव वस्तूस जो व्यक्तिचा नियम आपण लागू करतो, तोच सजीव वस्तूसही लागू आहे. त्यावरून निराळा आत्मा सिद्ध होत नाही.

अध्यात्मवादी म्हणतात कीं, प्रत्येक इंद्रियाने निरनिराळा अनुभव येत असतो व प्रत्येक इंद्रिय निराळे असते, परंतु जो मी डोळ्याने वस्तुचे दर्शन घेत आहे, तोच मी स्पर्शाने वस्तुचा अनुभव घेत आहे. या प्रत्ययात अनेक इंद्रियांच्या व्यापारांत मध्यस्थ असलेला कोणीतरी स्वतंत्र 'मी' दिसतो. ज्ञानेंद्रिय संस्थेची जी व्यवस्था व संघटना आहे, त्यावरून या प्रश्नाचे नीट उत्तर मिळते, प्रत्येक इंद्रिय अगदी एकमेकापासून विलग नाही, तर सगळी इंद्रिये एकाच ज्ञानेंद्रिय संस्थेचे अवयव आहेत; त्यांची एकमेकात संगती आहे, त्यामुंळे सगळे अनुभव घेणारा एकच आहे, असा प्रत्यय येतो.

गौतमाने न्यायसूत्रात देहाहून भिन्न असलेल्या आत्म्याच्या सिद्धीचे महत्त्वाचे प्रमाण दाखविले आहे[१]. जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्याच्या स्वाभाविक आवडी-निवडी असतात. आवड-निवड अनेक अनुभवांच्या संस्काराने निर्माण होते. जन्मसिद्ध आवडी

निवडी पाहिल्या म्हणजे असे सिद्ध होते की, या जन्माच्या अगोदरच्या अनुभवांनी या जन्मातल्या आवडी-निवडी बनल्या आहेत; पूर्वजन्मीच्या वासना या जन्मात प्रकट होतात, असे जन्मसिद्ध आवडी-निवडी वरून म्हणावे लागते. जन्मसिद्ध आवड-निवड नाही, असा मनुष्यच सापडणार नाही. या प्रश्नाचे उत्तर वंशशास्त्र (Law of Heredity) आणि इंद्रियविज्ञान यांच्या योगाने आता मिळू लागले आहे. आईबाप ज्या वंशाचे असतात, त्या वंशाचा स्वभाव आपल्यात उतरतो. वंशस्वभावाचे अधिष्ठान भौतिक द्रव्यच आहे, ही गोष्ट बीजमणिमालेचे संशोधन जितके पुढे जात आहे तितके अधिक प्रमाणात सिद्ध होत आहे. प्रत्येक व्यक्तीची जन्मसिद्ध भिन्न भिन्न आवड-निवड त्या-त्या व्यक्तीच्या देहपिंडाच्या विशिष्ट बनावावर व परिस्थितीवर अवलंबून आहे. आवड-निवड अनुभवांच्या पूर्वसंस्कारावरच अवलंबून असते, हे सर्वांशी खरे नाही. बाह्य परिस्थिती व शरीरातील संयुक्त द्रव्ये (Organic Chemical Compounds) यांच्यात फरक पडला म्हणजे आवडी-निवडीत सुद्धा फरक पडतो. आयुर्वेदात, आधुनिक इंद्रियविज्ञानात आणि रोगशास्त्रांत (Pathology) वरील विधानास पुष्टी देणारी विधाने व तदनुकूल सिद्धान्त सांगितले आहेत. रोगांचे परिणाम आवडी-निवडीवर होतात याचा सामान्य मनुष्यांनाही अनुभव येतोच. पूर्वानुभवाचा किंवा तज्ज्यन्य संस्काराचा त्या आवडी-निवडीशी काही संबंध नसतो.

भौतिक विज्ञानाशी ज्या मुद्यांचा संबध पोहोचतो त्यांचे वर विवरण केले. आत्म्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे एक नैतिक प्रमाण भारतीय तत्त्ववेत्ते सांगतात. काही व्यक्तीस जन्मतःच श्रीमंती, वैभव व इतर चांगल्या गोष्टी प्राप्त होतात व काही व्यक्ती जन्मतःच दारिद्र्य व इतर विपत्ती यांच्या फेऱ्यात सापडतात. पूर्वजन्मीचे त्यांचे कर्म या त्यांच्या सुस्थितीस किंवा दुःस्थितीस कारण आहे, असे जर म्हटले नाही, तर त्यांनी काही सत्कर्म किंवा दुष्कर्म न करिता, त्याना सुस्थिती किंवा दुःस्थिती मिळाली असे म्हणावे लागेल. तसेच या जगात जन्मभर चांगल्या मार्गाने जाणारे पुष्कळ लोक कष्टात दिवस काढून इहलोकची यात्रा संपवतात. त्यांना जन्म नसेल तर त्यांच्या सत्कार्माचे फळ त्यांना मिळत नाही, असे म्हणावे लागेल. सत्कर्मापासून व दुष्कर्मापासून कर्म करणाऱ्या व्यक्तीस योग्य फळ जर नियमाने मिळत नसेल तर सत्कर्म फुकट जाते आणि दुष्कर्माचे वाईट परिणाम होतातच असा नियम नाही, असे सिद्ध होते. यामुळे व्यक्तीने नीतीनेच कां वागावे व अनीतीने का वागू नये याचे उत्तर मिळत नाही. पुनर्जन्म मानला म्हणजे पुनर्जन्म घेणारे स्वतंत्र आत्मतत्त्व सिद्ध होते, व पापपुण्य, सुकृतदुष्कृत, नीती अनीती, यांची योग्य उपपत्ती लागते[१].

हे नैतिक प्रमाण शुद्ध अशा तार्किक चिकित्सेत टिकणार नाही. नीती ही सामाजिक वस्तू आहे, नीतिसंस्थेला इतिहास आहे; नीती सामाजिक गरजेतून उत्पन्न होते; मनुष्यामनुष्यांच्या परस्पर संबंधांमध्ये सुव्यवस्था राखण्याकरिता मनुष्यजातीनेच नीतिसंस्था उत्पन्न केली

---

(१) वीतरागजन्मादर्शनात्। न्यायदर्शन

आहे. जितका जितका समाज विकसित होत जातो, तितक्या प्रमाणांत त्याच्या नैतिक कल्पनाही प्रगल्भ होत जातात. जन्मापूर्वीच्या व मरणानंतरच्या काल्पनिक जीविताशी नीती अनीतीचा संबंध जोडण्याची कांही जरूरी नाही. नीतीवाचून समाजाचे जीवनच बिघडून जाते. नीती हा विश्वाचा किंवा प्राणिसृष्टीचा नियम नाही. नीती हा मानवनिर्मित कायदा आहे. निरनिराळ्या सामाजिक परिस्थितीत निरनिराळे नैतिक नियम असतात. भारतीय धर्मशास्त्रात शूद्रदास्याची संस्था नैतिकदृष्ट्या पवित्र मानली आहे. अस्पृश्यतेची संस्था नैतिकदृष्ट्या धर्मशास्त्रानी उच्चदर्जाची मानली आहे. स्मृतीच्या दृष्टीने अस्पृश्यता निवारण करणारे लोक पातकाचे धनी होतात व मरणोत्तर स्थितीत नरकावस्था भोगतात. जातिसंस्थेचे नियम मोडणाऱ्यांस स्मृतींच्या नियमाप्रमाणे मरणोत्तर अधोगतीलाच जावे लागते. अहिंसा सत्य इत्यादी व्यापक नैतिक नियमच मरणोत्तर गतीस कारण होतात. देशकालपरिस्थितीप्रमाणे बदलणाऱ्या सामाजिक आचारांचा परलोकगतीशी संबंध नाही, असे कोणी म्हणेल. परंतु तेही बरोबर नाही. सत्य, अहिंसा इत्यादी व्यापक नैतिक नियम तत्त्वत:संपूर्ण आहेत यास काही प्रमाण नाही. त्याचप्रमाणे त्यांचा परलोकगतीशी संबंध आहे, यालाही परंपरागत अंधळ्या श्रद्धेशिवाय दुसरे कसलेही प्रमाण नाही. प्रत्येक व्यक्ती समाजघटक असल्यामुळे त्या-त्या सामाजिक परंपरेत ज्या-ज्या पावित्र्यापावित्र्याच्या कल्पना रूढ असतात त्याच त्या-त्या व्यक्तीच्या भावनेत दृढमूल झालेल्या असतात. मद्यपान धार्मिक विधीचे अंग म्हणून अत्यंत पवित्र कर्म आहे, असे कांही जमातीत समजले जाते. परंतु ब्राह्मणांच्या स्मृतिशास्त्रांत कोणत्याही प्रसंगी मद्यपान हे महापातक मानले आहे. यज्ञात गोहत्या करणे प्राचीन वैदिक आर्यास पवित्र कर्म वाटत होते. सामाजिक परिस्थितीत बदल झाल्याबरोबर बदलणारे नैतिक नियम विश्वव्यापी नियमांच्या सदरात बसत नाहीत. नीती ही एक सामाजिक जबाबदारी आहे. परंपरागत संस्कारामुळे ही जबाबदारीची भावना खोल रुजते व वैयक्तिक सद्सद्विवेक बुद्धी असे तिचे रूप बनते. जन्मतः दारिद्र्य व दु:स्थिती आणि जन्मतः श्रीमंती व सुस्थिती याचा कार्यकारणभाव केवळ त्या-त्या व्यक्तीच्या कर्माशी बांधलेला नाही. त्याचा आर्थिक व सामाजिक व्यवस्थेशी संबंध आहे.

दारिद्र्याशी व श्रीमंतीशी पूर्वजन्मीच्या कर्माचा काही संबंध नाही. उच्च वर्गातील सत्ताधारी लोकांनी आपल्या स्वार्थाचे व श्रेष्ठ पदवीचे समर्थन व रक्षण करण्याकरिता पुनर्जन्म कल्पनेला महत्व दिले आहे. हीन स्थितीतल्या दीन जनतेला चालू गुलामगिरीत आणि पतित स्थितीत डांबून ठेवण्याकरिता कर्मविपाकाच्या सिद्धान्ताचा उपयोग आजपर्यंत वरिष्ठ वर्ग करीत आले आहेत. कर्मविपाकाचा सिद्धान्त म्हणजे समाजातील हीन बहुजन समाजाला दुर्दैवाच्या बंधनात शाश्वतकालपर्यंत डांबून ठेवण्याकरितां घडविलेले अमोघ शस्त्र होय. त्याच्या योगाने त्यांच्या दु:स्थितीच्या ऐहिक सामाजिक कारणांचा त्यांना बोधच होत

"(१) कृतप्रणाशाकृताभ्यागमप्रसङ्गः" "केलेल्या कर्माचे फळ न मिळणें व न केलेल्या कर्माचें फळ मिळणें, हें योग्य नाही" असा सिद्धांत भारतीय अध्यात्मवादी दर्शने सांगतात,

नाही. त्यांची दुःस्थिती अत्यंत गूढ अशा कारणांनी घडविली आहे; त्यांच्या स्वतःच्याच पूर्वजन्मीच्या कर्माने ती परिस्थिती निर्माण झाली आहे; ते स्वतःच त्या परिस्थितीला जबाबदार आहेत; असा भ्रम किंवा अंशी आत्मवंचना दृढमूल करण्याचे कार्य हा आत्मवाद, कर्म विपाकवाद आणि पुनर्जन्मवाद करतो. त्याचा परिणाम असा होतो की, त्यांच्या दुःस्थितीस जबाबदार असलेली सामाजिक रचना व त्यांचा अधःपात करणारे सामाजिक कायदे यांच्याविरुद्ध प्रतिकार करण्याची भावनाच त्याच्यामध्ये उत्पन्न होऊ शकत नाही. पारलौकिक कल्पनांनी व या कर्मसिद्धान्तरूपी दैववादाने प्रतिकार-भावनेची बीजेच दग्ध होतात. पुनर्जन्म मानणाऱ्या आत्मवादी विचारसरणीने मनुष्य जातीचा जितका अधःपात केला आहे तितका दुसऱ्या कोणत्याच विचारसरणीने केला नसेल; कारण भोवतालच्या जीवनविरोधी परिस्थितीचे व घातकी वस्तुस्थितीचे अवलोकन करणारा विवेकचक्षूच या विचारसरणीने अंधळा केला आहे. बुद्धिभ्रंश करणाऱ्या विचारसरणीस अध्यात्मवाद हे अभिधान तरी कसे द्यावे ? कारण ही विचारसरणी आत्म्याचे ज्ञानस्वरूपच मलिन करून टाकते.

नीती ही सामाजिक गरज आहे आणि मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, एवढा विचार नीतीचे समर्थन करण्यास पूर्ण समर्थ आहे. त्याकरिता देहव्यतिरिक्त आत्मा, पुनर्जन्म, पापपुण्य आणि जीवांचे नियंत्रण करणारा ईश्वर मानण्याची जरूर नाही. हे मानल्यामुळे नीतीचा पाया खंबीर होत नाही. उलट नीती जेव्हा अनीतीचे रूप धारण करते व मनुष्याच्या माणुसकीचा घात करण्याकरितां पुढे सरसावते, तेव्हा या घातकी आत्मनाशक परिस्थितीला सांभाळण्याचे काम या कल्पना करतात. कारण या कल्पना देशकाल परिस्थितीप्रमाणे बदलणाऱ्या आचारांना शाश्वत मूल्य देतात. अशाश्वताला शाश्वत आहे असे दाखविणारी कल्पनाच सगळ्यात मोठी भ्रांती होय. या भ्रांतीतून मुक्त होणे हाच आजचा खरा मोक्ष होय.

कँटने व्यावहारिक बुद्धीची मीमांसा (Critique of Practical Reason) करीत असता, अमरआत्मा व संपूर्ण परमेश्वर आहे, असे सिद्ध करणारी विचारसरणी मांडली आहे. त्या विचारसरणीचे पडसाद पाश्चात्त्य देशातील व हिंदुस्तानातील विचारामध्ये उमटलेले दिसतात. येथे ही एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. कँटने असे स्वच्छ सांगितले आहे की, अमर आत्मा व ईश्वर यांच्या कल्पना शुद्ध विचारांच्या कसोटीला उतरत नाहीत. मनुष्य बुद्धीवर आजपर्यंत जे संस्कार झाले आहेत आणि ज्या भावना दृढमूल झाल्या आहेत. त्यांच्यावरून निघणारी काही अनुमाने त्याने मांडली आहेत व त्यावरून अमरआत्मा व ईश्वर यांच्यासंबंधी आपला अंदाज सांगितला आहे. तो म्हणतो-

मनुष्याला अनंत आनंद (Happiness) आणि अनंत सद्गुणांची (Virtues) वासना असते. ही त्याची वासना त्याच्या जीवात पूर्ण मुरली आहे. ही वासना हा त्याचा स्वभावधर्मच आहे. ही वासना म्हणजे आत्म्याच्या ठिकाणी वसलेली अपरिहार्य व अमर्याद अशी प्रेरणाशक्तीच

(Categorical Imperative) आहे. एका जन्मातच अनंत सद्गुण व अनंत आनंद यांचा अनुभव कोणत्याही जीवात्म्यास येणे शक्य नाही. म्हणून अनंत आनंदाचा व सद्गुणांचा अनुभव घेण्याकरिता जीवात्मा अनंतकाल टिकत असला पाहिजे. म्हणजे जीवात्मा अमरच असला पाहिजे, हे सहजगत्या सिद्ध होते. आनंद व सद्गुण अनंत आहे, या कल्पनेस व भावनेस अनुसरून विचार केल्यास ईश्वरविषयक अनुमानही निघते. जेथे आनंद परमावधीस गेला आहे व सद्गुणांची ज्या ठिकाणी पराकाष्ठा झाली आहे असे सत्तत्त्व असलेच पाहिजे. त्याशिवाय अमर्याद आनंद व सद्गुण यांची कल्पनाच येणे शक्य नाही. हे सत्तत्त्व म्हणजेच परमात्मा होय. वासनाबद्ध जीवात्म्याची पूर्णता म्हणजेच परमात्मा. पूर्ण आनंद व पूर्ण सद्गुण यांचेच ते निधान होय. म्हणूनच तो परममंगल व परमसुंदर आहे. आनंदाची व सद्गुणाची पूर्णता म्हणजेच सौंदर्य व सांगल्य यांची परमावधी.

जीवाच्या वेड्या वासनेच्या दुबळ्या आधारावर कँटने हे उंच तर्कशास्त्र उभारले आहे. पण याचा पाया अगदीच ढिला आहे. मनुष्याला शाश्वत तारुण्य पाहिजे असते; आपला हा देह शाश्वतकालपर्यंत राहावा, असे पुष्कळांना वाटते; सुंदर कोमल फुले कधीच कोमेजू नयेत व सुकू नयेत, असे वाटत असते. म्हणून या देहापेक्षा निराळा व शाश्वत कालपर्यंत तारुण्यांत राहणारा देह असला पाहिजे, आणि कधीच न कोमेजणारी व न सुकणारी कोमल फुले असली पाहिजेत, असली अनुमाने करणारा भाबडा जीव व कँटचा आत्मा यांच्यात फारसे अंतर नाही. वासनांचे मानसशास्त्र असे सांगते की, मनुष्याच्या अंतर्गत मनांत अजाणपणे किती तरी वेड्यावाकड्या व खुळ्या वासना दीर्घकालपर्यंत दडून असतात. त्या वासनांच्यामध्ये भरमसाट उच्छृङ्खल, अव्यवस्थित व मिथ्या कल्पनांच्या आवारांनी बनलेल्या कितीतरी वासना असतात. सावधानपणे बनविलेल्या व व्यवस्थित विचारावर अधिष्ठित असलेल्या वासनांचे प्रमाण धर्मसंस्थेच्या प्रचारामुळे पुष्कळांच्या ठिकाणी कमी झालेले असते. अमरत्वाची वासना असंतुष्ट जीवाच्या भाबड्या कल्पनेवर आधारलेली आहे. जे पाहिजे असे वाटते, ते असतेच असे नाही. विपर्यस्त, अतिशयोक्तिपूर्ण व विसंगत कल्पनांच्या (Imagination) आधारे उत्पन्न झालेल्या कितीतरी भावना मनुष्याच्या मनांत रुजलेल्या आहेत. त्यांच्यापैकी अनंत आनंद व अनंत सद्गुण यांची कल्पना आहे. त्यातून तथ्य काढण्याचा कँटने केलेला प्रयत्न अगदी व्यर्थ आहे. असे कित्येक लोक आहेत की, ज्यांना अनंत सद्गुण व अनंत आनंद याचा अर्थ उलगडून सांगितला तर, या कल्पना म्हणजे वस्तुस्थितीला सोडून असलेले एक कल्पनाजाल आहे, अशी त्यांची खात्री पटते. खंबीर मनाचे असे कित्येक लोक सापडतात की, ज्यांना अमरत्वाची वासना नसते. अनंत सद्गुण, अमर्याद आनंद आणि अमरत्व यांची वासना नसलेले व मर्यादित प्रमाणात जीवनाचा अर्थ समजून घेतलेले निरोगी मनाचे कितीतरी जीव या मानव समाजात सापडतात. सगळेच जीव अतिशयोक्तीने सुजलेले व अफाट कल्पनानी फुगलेले नसतात. निरोगी अंतःकरणही या जगात आहे. या परिमित जीवनाचा व्यवस्थित व परिमित असा अर्थ समजून संयमपूर्ण

सोज्वळ व विनयशील जीवन घालविणारे निर्मळ मनाचे जीव जगात आहेत हे कँट व त्याचे अनुयायी यांनी समजून घेतले पाहिजे, कँट हा तत्त्वज्ञानात शककर्ता, नव्हे युगकर्ता झाला. त्याच्या उज्ज्वल विचारसंपत्तीने जगाचे विचारदारिद्र्य कमी झाले आहे. त्याने शुद्धबुद्धीच्या मीमांसेत अमरआत्मा व ईश्वर यांस स्थान दिले नाही. यात त्याच्या बुद्धांची सत्यनिष्ठाच दिसून येते.

आत्म्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची तार्किक प्रमाणे वर तपासली. आतां शब्दप्रमाणाची परीक्षा करू. या संधी शब्दप्रमाण दोन तऱ्हेचे आहे. एक, वेद, गीता, बायबल, कुराण इत्यादी धर्मग्रंथ आणि दुसरे, अलौकिक साक्षात्कार ज्यांना झाला आहे अशा महात्म्यांचे शब्द, धर्मग्रंथांचे प्रामाण्य रूढीनेच सिद्ध होते. लोक परंपरेने मानत आले आहेत म्हणूनच धर्मग्रंथ प्रमाण होत. धर्मग्रथांत अलौकिक सामर्थ्य आहे हे कशाने सिद्ध करणार ? याला श्रद्धेशिवाय दुसरा कोणताही आधार सापडणार नाही. धर्मग्रंथातील पारलौकिक कल्पना आणि आत्मा व ईश्वर यांच्या बद्दलंच्या कल्पना निराधार आहेत, असे जर कोणी म्हटले, तर त्यावर योग्य उत्तर मिळणे शक्य नाही. महात्म्याचा अंतःप्रत्यय किंवा आत्मानुभव वस्तुस्थितीवर आधारलेला असतो, असे म्हणण्यापेक्षा खोल श्रद्धेमुळे महात्म्यांना तसा भास होतो, असे म्हणता येते. रानटी लोकांतील व वन्य समाजांतील अडाणी समजुतींचा वारसा शहाणी सुरती माणसेसुद्धा कित्येक वेळा चालविताना दिसतात. त्यातलाच हा एक प्रकार आहे. झाड, दगड, नदी, ओढा, जनावर इत्यादी पदार्थात एक एक भूत असते, तसेच माणसातही ते असते, अशी भ्रांती अनेक रानटी समाजात रूढ असलेली दिसते. या भ्रांतीस सर टायलरने पिशाच्चवाद किंवा मिमूर्तपुरुषवाद (Animism) असे म्हटले आहे. मूर्त वस्तुंच्यामध्ये पुरुष वसत असतो, जीवंत माणसातही तो असंतो; तो पुरुष निघून गेला, स्थान सोडून गेला, म्हणजे माणूस मरतो, अशी समजूत रानटी लोकांच्या ठिकाणी असते. मृतांची भुते पछाडतात, अशी त्यांची समजूत असते मेलेल्या माणसांचे स्वप्न पडते, म्हणून मेलेल्या माणसांचे आत्मे स्वप्नात दिसतात, असे त्यांना वाटते. ह्या भुताखेतांच्या भ्रांतीची सुधारलेली आवृत्ती म्हणजे अध्यात्मवाद होय.

रानटी अवस्थेपासून आजपर्यंत चालत आलेल्या कल्पनांच्या खोल संस्कारामुळे आत्मदर्शन होते. आत्मदर्शनाकरिता सारखा ध्यास घ्यावा लागतो. दीर्घकालपर्यंत श्रद्धापूर्वक चिंतन केल्याशिवाय, निरंतर ध्यान केल्याशिवाय, त्या तऱ्हेची नित्य उपासना केल्याशिवाय, आत्मदर्शन होत नाही. आत्मा देहाहून पृथक् आहे, या भावनेचा निरंतर अत्म्यास करण्याचा उपदेश धर्मग्रंथ करीत असतात. हीच भावना सारखी मनांत बिंबविली, तर त्या भावनेतून त्या तऱ्हेचा अनुभव उत्पन्न होणारच. अशा तऱ्हेचा अनुभव वस्तूवर अवलंबून नसतो. भावनेच्या अभ्यासाने वस्तू नसूनही वस्तुत्वा अनुभव किंवा प्रत्यक्ष प्रत्यय येत असतो. मानसशास्त्रात विशेषतः मनोविकृतिशास्त्रात याची उदाहरणे पुष्कळ सापडतात. महात्मे यास

अपवाद नाहीत. महात्म्यांच्याही मनात अनेक विकृती उत्पन्न होतात, याची साक्ष अनेक महात्म्यांची चरित्रे देतात. आत्मसाक्षात्कार अशाच विकृतींपैकी एक विकृती आहे.

२१. द्रव्याचा स्वभाव व त्याची रचना

या विश्वाच्या स्वरूपाचा अर्थ समजून घेत असता पुढील चार सिद्धांतांचा निर्णय जडवाद्यांनी केला आहे.

(१) ज्ञाता आणि ज्ञेय अथवा सगळी सद्वस्तू नित्य परिवर्तनशील आहे, हा पहिला सिद्धान्त जडवादी सांगतात. वस्तूंचे स्थान (Position) बदलत असते, घटक (Composition) बदलत असतात आणि गुणधर्म (Qualities) बदलत असतात. हा भूगोल प्रतिक्षणी अविरत स्थलांतर करित असतो. ही गोष्ट मनुष्याला अहोरात्राचे व षड्ऋतुंचे चक्र नित्य शिकवीत आहे. पृथ्वीचा व भूपृष्ठांचा इतिहास असे सांगतो की, वायुमय (Gaseous) द्रवमय आणि घनरूप या तीन अवस्थातून पृथ्वी गेली आहे आणि या पृथ्वीवर अगोदर वनस्पती नव्हत्या; त्या उगवल्या. प्राणी नव्हते; ते जन्माला आले. मनुष्य नव्हता; तो अवतरला. मनुष्याने या सृष्टीमध्ये कितीतरी फरक घडवून आणिला आहे. माणसाळलेली जनावरे मूळच्या नैसर्गिक स्वरूपात आज नाहीत. त्यांत मनुष्याने बदल केला आहे. मनुष्य ज्या धान्य, फळे इत्यादी वनस्पतिजन्य वस्तूंचा उपयोग करतो त्या बहुतेक वनस्पती मूळच्या नैसर्गिक स्वरूपात आज राहिल्या नसून त्यात मनुष्याने कितीतरी फरक घडवून आणला आहे. मनुष्यांच्या स्वभावात व समाज रचनेत कितीतरी बदल झाले आहेत. त्यांच्या विचारसरणीत, संस्कारांत व भावनांमध्ये महान् स्थित्यंतरे वारंवार घडून आली आहेत. आणि हा अविरत परिवर्तन क्रम नित्य दृग्गोचर होत आहे. परिवर्तनाचा अखंड प्रवाह सुरू आहे. या पृथ्वीच्या बाहेरचे विश्व किती गतिमान आहे. याचे प्रत्यंतर ज्योतिष शास्त्रात मिळते; हा सूर्य नित्य प्रकाशाचा व उष्णतेचा अपरिमित त्याग करीत असतो. त्यामुळे त्याच्या घटनेत व गुणधर्मात फरक पडत आहे.

(२) दुसरा सिद्धान्त [१]-सद्वस्तुचा संपूर्ण विनाश होत नसतो व संपूर्ण अभावातून सद्वस्तुचा उत्पन्न होत नाही. एक सद्वस्तु कोणत्यातरी दुसऱ्या सद्वस्तुतूनच निर्माण होते, सद्वस्तुचीच ती बनलेली असते; कोणतीही सद्वस्तु नष्ट झाली तर तेथे दुसरी सद्वस्तु निर्माण होते; असा नित्यक्रम अबाधित सुरू असतो. कपडा कापसाचा बनतो; घडा मातीचा बनतो; घर दगड, विटा, लाकूड इत्यादीकांचे बनते, बी, खत आणि पाणी यातून वनस्पती निर्माण होते, ऑक्सिजन व हायड्रोजन यांचे पाणी बनते; ऑक्सिजन हायड्रोजन$_2$ यांचे अणू (Molecules) विद्युत कणांचे बनतात; विद्युतकण शक्तिद्रव्यात्मक (Energetic matter) आहेत; शून्यातून काहीच बनत नाही. तसे नसते तर मनोरथमात्रेकरून सगळे दरिद्री एकदम श्रीमंत झाले असते. नवे जग जुन्या जगातून निर्माण होत असते.

---

(1) Where is Science going, ex nihilo nihil fit, pt 117 by Max planck.
नासतो विद्यते भावः । नाभावो विद्यते सतः ॥ गीता

ज्या एका वस्तुतून दुसरी वस्तू उत्पन्न होते, त्यास द्रव्य असे म्हणतात. ज्याची वस्तू बनते, ज्यास गुणधर्म असतात, ते द्रव्य (Substance) होय. जग म्हणजे द्रव्य (Substance) व गुण (Qualities) यांचा समुच्चय होय.

हे जगत् म्हणजे कार्यकारणांची अविरत परंपराच होय. प्रत्येक वस्तू कशाचे तरी कार्य असते व कशाचे तरी कारण असते. प्रत्येक विद्यमान वस्तू (Event) त्याच्या अगोदर असलेल्या वस्तुचे कार्य असते. प्रत्येक घटना कार्यकारणभावाच्या अनादी व अनंत मालिकेतील एक दुवा असतो. कार्यकारणभावाच्या विशिष्ट नियमाने प्रत्येक घटनाबद्ध असते.

(३) तिसरा सिद्धांत - प्रत्येक वस्तुत स्वभावसिद्ध गतिशक्ती किंवा परिवर्तनशक्ती असतेच. अणुरूप द्रव्यांचे जगत् बनत असते, त्या अणूंना जी संयोग पावण्याकरिता व विभक्त होण्याकरिता गती (Motion) प्राप्त होत असते, ती गती त्या अणूंचा स्वभावधर्म आहे. ती गती देणारा, त्या अणूंना चालविणारा, त्या अणूंना गोळा करणारा आणि फेकणारा दुसरा कोणीही नाही. या विश्वात जी प्रेरणा आहे, गती आहे, ती वस्तूमात्राच्या स्वभावातून निर्माण होत असते. यंत्रातील एक चाक फिरले म्हणजे दुसरे आपोआप फिरते आणि पहिल्या गतीच्या मागून दुसरी गती आपोआप उत्पन्न होते; त्याचप्रमाणे या सगळ्या विश्वाची चक्रे स्वभावसिद्ध गतीमुळे अनादी कालापासून फिरत आहेत. मनुष्यकृत यंत्रात मनुष्याच्या प्रेरणेची आवश्यकता असते, तसे या विश्वयंत्राचे नाही. एका पाठीमागून दुसरे अशी गतीची अनादी परंपरा या विश्वांत आहे. पहिल्यांदा या विश्वांत कोणी गती उत्पन्न केली, हा चुकीचा आहे. पहिल्यांदा म्हणजे जेव्हा गती नव्हती किंवा कसलेही परिवर्तन नव्हते. असा काळच तर्कशुद्ध कल्पनेत येऊ शकत नाही की, जेव्हा कसलेही परिवर्तन नव्हते. कारण असा काळ कल्पिणे म्हणजे एकदा सर्वशून्यता होती, असे मानणे होय. कोणतीही वस्तू आहे, म्हणजे ती वस्तू कार्यकारणभावबद्ध असल्यामुळे गती व बदल त्यावेळी असलाच पाहिजे. सर्वशून्य स्थितीतून काहीच उत्पन्न होऊ शकत नाही.

अडाणी मनुष्याला पाऊस कसा पडतो हे माहीत नसल्यामुळे पाऊस कोणीतरी आणतो व पाडतो असे तो अडाणी मनुष्य मानतो. त्या अडाणी माणसाने पाऊस पाडणारा इंद्रदेव कल्पिला. सूर्यप्रकाशाचे व उष्णतेचे समुद्रावर कार्य घडून् वाऱ्यांच्या गतिनियमानुसाराने मेघ तयार होऊन पाऊस पडतो, हे कळल्याबरोबर पावसास व मेघास आणणाऱ्या देवाची गरज संपली. मनुष्यजीवनाशी संबद्ध असलेल्या सृष्टीतील महत्त्वाच्या घडामोडींचा कार्यकारणभाव जेव्हा कळत नव्हता, तेव्हां देवतांच्या कल्पना अस्तित्वात आल्या होत्या. सूर्यचंद्राचे उदयास्त, ऋतुचक्र, समुद्राच्या भरती ओहोटी, तारकांच्या गती इत्यादीकांचा भौतिक कार्यकारणभाव जेव्हा कळत नव्हता, तेव्हा वैदिक व अवैदिक देवता मनुष्याच्या कल्पनेतून जन्मल्या. आता या घटनांची यांत्रिक उपपत्ती आणि त्यांच्या गतीचे शास्त्र सापडल्यामुळे त्या शास्त्ररूपी शस्त्राने त्या देवतांची कत्तल उडाली.

प्रत्येक वस्तुच्या घटनेत दोन मार्गाने बदल होतो. एक त्या वस्तुच्या आत स्वाभाविकपणे परिवर्तन घडत असते त्यामुळे; आणि दुसरे, त्या वस्तूवर भोवतालच्या वस्तूंचा परिणाम घडत असतो त्यामुळे. प्रत्येक वस्तू दुसऱ्या वस्तूशी संलग्न असते. हा संलग्नपणा तीन तऱ्हेचा असतो. एक, त्या वस्तुचा भोवतालच्या वस्तूंशी संबंध असतो. दुसरा, ती वस्तू ज्या वस्तुतून उत्पन्न झाली त्या वस्तूशी असलेला कार्यकारण संबंध; आणि तिसरा, त्या वस्तुच्या घटनेच्या पोटात दुसरी घटना असते आणि ती वस्तू तिसऱ्या एका घटनेच्या पोटात असते, अशा तऱ्हेचा संबंध असतो. हे जे सगळे वस्तूंचे सबंध आहेत, त्यांची ओळख पटली म्हणजे वस्तुंच्या गतीला किंवा क्रियेला पहिला प्रवर्तक (Prime Mover) पाहिजे, ही कल्पना चुकीची आहे, हेही पटते. कोणतीही क्रिया पहिली नसते. प्रत्येक गतीच्या किंवा क्रियेच्या अगोदर दुसरी गती किंवा क्रिया असते.

या क्रियेचे स्वरूप एका स्थलातून दुसऱ्या स्थली जाणे एवढेच नसते. क्रियाशक्तीचे स्थलांतर करणे किंवा फिरणे (Motion) एवढेच एक स्वरूप नाही. बीजाचा अंकूर होतो व अंकुराचा वृक्ष होतो; ऑक्सिजन हायड्रोजनचे पाणी बनते; प्रकाशाचे अणू बनतात किंवा लहरी बनतात; हे सगळे बनणे आणि होणे ही देखील क्रियाच होय. अशा तऱ्हेची क्रिया वस्तुचा मूलभूत स्वभाव आहे. तो नसता तर जो पहिल्यांदा गती देतो त्यालासुद्धा वस्तुत गति उत्पन्न करता येणार नाही. विश्व हे स्वयंप्रेरित आहे. त्याला बाह्य प्रेरकाची जरूर नाही. आत्मप्रेरणा हाच त्याचा स्वभाव त्याला दुसरे कोणीही ढकलत नाही. उतारास पाणी आपोआप वाहते, दिव्यातून प्रकाश स्वतःच वाहतो, सूर्यातून किरणांचे झोत सहज स्वभावाने जगाची अंतरे त्वरेने व्यापतात, पृथ्वी कोणी न फिरविताच गरगर फिरत असते, सूर्यमाला व तारका कोणी चालना न देताच आकाश क्षेत्रांत परिभ्रमण करतात आणि विद्युत् प्रवाह दशदिशांना निमिषमात्रात व्यापत असतात. अशी अंतःप्रेरणेची अनंत उदाहरणे विज्ञान दाखविण्यास तयार आहे.

(४) चौथा सिद्धान्त - रचना, योजना (Design), - व्यवस्था, नियमबद्धता किंवा सुसंगती हा वस्तूंचा मूलभूत स्वभाव आहे. कोणत्याही वस्तुचे किंवा वस्तूसमुदायाचे वर्णन जेव्हा आपण करतो, तेव्हा वस्तुंच्या रचनेचे किंवा व्यवस्थेचेच वर्णन करीत असतो. वस्तुत योजना. किंवा व्यवस्था नाही, याचा अर्थ, वस्तुच नाही, असा होतो. जेव्हा आपण सूर्यमालेचे वर्णन करतो, तेव्हां आपण सूर्यमालेची योजना किंवा व्यवस्थाच वर्णितो. सूर्यमालेची जी योजना किंवा व्यवस्था आपण सांगतो, ती नाही, म्हणजे सूर्यमालाच नाही, असा अर्थ होतो. रासायनिक संयुक्त द्रव्यांची वर्णने म्हणजेच रसायनशास्त्र (Chemistry) होय. संख्या व परिमाण (Quantities) यांचा गुणांशी (Qualities) संबंध दाखविणे हेच प्रत्येक विज्ञानाचे मुख्य उद्दिष्ट असते. संख्या, परिमाण व गुणधर्म यांचे संबंध वगळल्यास शेवटी शून्य शिल्लक राहते. वस्तू आहे म्हणजेच विशिष्ट तऱ्हेची योजना आहे आणि विशिष्ट व्यवस्था आहे, असा अर्थबोध होतो. वस्तुची योजना कळणे म्हणजेच वस्तू स्वरूप कळणे होय.

विश्वाची रचना किंवा योजना कोणी दुसऱ्याने निर्माण केली नाही. उष्णतेचा जाळणे हा स्वभावधर्म आहे. ही एक व्यवस्था किंवा योजना आहे. ही व्यवस्था किंवा योजना उष्णतेत कोणी दुसऱ्याने आणली नसून उष्णतेच्या अस्तित्वाचीच ती एक बाजू आहे. H_2O ही जलाच्या मूलद्रव्याची रचना आहे. हा जलाचा स्वभावच आहे. तो कोणी जलावर लादलेला नाही. पार्थिव किंवा भौतिक द्रव्यांत निरनिराळे आकार, गंध व रंग असतात; हे निरनिराळे आकार, गंध वा रंग द्रव्यात कोणी चित्रकाराने भरलेले नसतात. द्रव्यांचा तो स्वभाव आहे. गणिती व्यवस्था व कार्यकारणभावाचा नियम सर्वाच्या मुळाशी आहे. गणिती व्यवस्था व कार्यकारणभाव हे बाहेरून कोणी लादलेले नाहीत. संख्या, परिमाण व कार्यकारणभाव हे वस्तूस्वरूपाचे भाग आहेत. आपण वस्तुत संख्या उत्पन्न करू शकत नाही; ती वस्तुत असतेच. वस्तूंचा कार्यकारणभाव ओळखता येतो पण निर्माण करता येत नाही. कुशल वैद्य औषध व रोगनाश यांचा कार्यकारणभाव उत्पन्न करत नाही, तर ओळखतो. बीज व वनस्पती यांचा कार्यकारणभाव ओळखण्याचेच कार्य कुशल शेतकरी किंवा बागवान करीत असतो. तो बीज व वनस्पती यांचा कार्यकारणभाव निर्माण करीत नाही. ज्याला आपण योजक, व्यवस्थापक किंवा कारागीर असे म्हणतो तो योजक, व्यवस्थापक किंवा कारागीर वस्तुंच्या स्वभावात असलेली योजना किंवा व्यवस्था लक्षांत घेऊनच वागत असतो. तो योजना व व्यवस्था उत्पन्न करीत नाही.

२२. द्रव्याची रचना व भिन्न भिन्न नियमपद्धती

द्रव्याची रचना (Structure of Matter) बदलली की, तिचे नियमही बदलतात. विद्युत्कण (Electrons and Protons), तेजःकण इत्यादी अणू हे सगळ्यात तळाचे द्रव्यघटक मनुष्यास सापडले आहेत. या अणूंच्या स्वभावाचे नियम पदार्थविज्ञान शोधून काढते. या अणुंच्या रचनेतून ऑक्सिजन, हायड्रोजन, कार्बन, रेडियम् इत्यादी ९२ मूलद्रव्ये (Elements) तयार झाली आहेत. या मूलद्रव्यांच्या कणांचे (Molecules) स्वभाव, नियम अणूंच्या नियमापेक्षां निराळे आहेत. अणुंची शक्ती व मूलद्रव्यांच्या कणांची शक्ती यांचे प्रमाण (Energy Levels) अगदी व्यस्त असते. मूलद्रव्यांच्या कणांपेक्षा संयुक्त रासायनिक द्रव्यांचे नियम निराळे असतात. पदार्थविज्ञान (Physics) ज्या नियमांचे स्पष्टीकरण करते, त्यापेक्षा रसायनविद्या (Chemistry) निराळ्या नियमांचे विवरण करते. अजीव सृष्टीचे नियम व जीवसृष्टीचे नियम निराळे का दिसतात, याचा अर्थ या उदाहरणावरून उलगडता येतो. जीवसृष्टीचे नियम अजीव सृष्टीपेक्षा काही बाबतीत भिन्न आहेत म्हणून जीवतत्त्व (Vital Force) द्रव्यापेक्षा (Matter) अगदीं पृथक् किंवा स्वतंत्र आहे, असे मानण्याचे मुळीच कारण नाही. द्रव्याची रचना बदलून नव्या गुणधर्माचे द्रव्य निर्माण झाले म्हणजे या नवनिर्मितीतील सृष्टीचे नियमही नवे असतात. वनस्पतिजीवनाच्या नियमांपेक्षा प्राणिजीवनाचे नियम पृथक् आहेत. प्राणिजीवनापेक्षा मानवीजीवनाचे नियम निराळे आहेत.

द्रव्याच्या प्रत्येक नवीन अवस्थेत नव्या नियमांची नवी व्यवस्था (System of Laws) असते. रसायनशास्त्रात देखील निरिन्द्रिय संयुक्त द्रव्ये (Inorganic Compounds) आणि सेद्रिय संयुक्त द्रव्ये (Organic Compounds) अशा दोन शाखा आहेत, याचे कारण द्रव्याच्या दोन भिन्न अवस्थेशी संबद्ध अशा भिन्न नियमपद्धती आहेत. मनुष्याच्या जीवनाचे नियम ठरवीत असता अध्यात्मवादी तत्त्ववेत्ते मनुष्याच्या देहात वसणारा अमरआत्मा या संज्ञेची स्वतंत्र चेतन वस्तू मानतात. परंतु मनुष्य हा विशिष्ट द्रव्यकार्य : (Specific Material Structure) आहे, म्हणूनच त्याचे, निराळे गुणधर्म आहेत. नुसते अजीवसृष्टीचे सगळे नियम लक्षात घेऊन जीवसृष्टी व मनुष्य या वस्तूंचे स्वरूप पूर्णपणे लक्षात येणार नाही, कारण सजीवपिण्ड व मनुष्य ही द्रव्याची एक विशिष्ट अवस्था (A New Phase of Matter) आहे. त्यामुळे त्या विशिष्ट अवस्थेचे निराळे चित्र व चरित्र आहे. त्याकरिता पृथक् आत्मतत्त्य (Spiritual Entity) गृहीत धरण्याची काहीच जरूरी नाही. देहात पृथक् आत्मतत्त्व नाही, म्हणून विश्वाच्या अंतर्यामी परमात्मतत्त्व नाही, हे सहज सिद्ध होते. कारण देहात पृथक् आत्मा सिद्ध झाला, तरच, विश्वाचा निराळा एक आत्मा आहे, हे सिद्ध होते. विश्वाच्या गतिस्थितीला परमात्म्याची गरज नाही. कारण प्राण्याच्या व मनुष्याच्या देहात पृथक् चैतन्यवस्तु आहे याला कोणतेच प्रमाण उपलब्ध होत नाही; या चैतन्यवस्तुवरूनच विश्वचैतन्याची उत्पत्ती होते.

ब) अनीश्वरवाद

जगाच्या उत्पत्तीला, स्थितीला व लयाला ईश्वराची गरज नाही, असे जडवाद मानतो. स्वभावसिद्ध कार्यकारणभावाच्या नियमानीच जगातील प्रत्येक वस्तुचा उत्पत्तिस्थितिलयांचा क्रम उत्पन्न होतो. विश्वाच्या अंतर्यामी किंवा बाहेर ईश्वर नांवाचे तत्त्व गृहीत धरण्याची जरूरी नाही. जगातील कोणतीही घटना आणि सगळे जग यांचा अर्थ समजून घेण्याकरिता ईश्वरकल्पनेची मुळीच आवश्यकता नाही.

२३. ईश्वर शब्दाची व्याख्या

ईश्वर म्हणजे विलक्षण व अचिन्त्य असलेली शक्ती किंवा जगाचे मूलभूत तत्त्व, असा कित्येक लोक अर्थ करतात. परंतु विश्वात कार्य करणारी शक्ती किंवा तत्त्व एवढाच ईश्वर या शब्दाचा अर्थ नाही. जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांना कारण होणारी अशी सर्वज्ञ वस्तू म्हणजे ईश्वर होय. चैतन्य किंवा ज्ञान हे त्या वस्तुचे मुख्य वैशिष्ट्य आहे. विश्वातील प्रत्येक घडामोड या परमेश्वरी ज्ञानात ठरलेली असते, ईशसंकल्पाशिवाय कोणत्याच वस्तूला सत्ता नाही, असे ईश्वरवादी समजतो. वस्तूमात्राची योजना ईश्वराच्या बुद्धीत ठरलेली असते. ईश्वर शब्दाच्या या अर्थाच्या बाबतीत सगळ्या धर्मग्रंथांचे पूर्ण ऐक्यमत्य आहे. मतभेद जो आहे तो, ईश्वराचा जगाशी संबंध कशा प्रकारचा आहे, या संबंधी आहे. सर्व विश्वास कारण होणारी सत्ता

म्हणजेच ईश्वर, असे जे समजतात, त्यांना ईश्वरवादाचा अर्थ समजलेला नसतो. त्या सत्तेला एक महत्त्वाचे विशेषण जोडावे लागते. ते म्हणजे चिन्मय. ती सत्ता (Reality) चिन्मय म्हणजे ज्ञानमय आहे. जाणीव हे विशेषण वगळल्यास, जडवादी या कल्पनेस विरोध करणार नाही. ती कारणभूत वस्तू संवेदनारहित व संकल्पशून्य असेल आणि ज्ञानमय किंवा ज्ञातृरूप नसेल, तर ती ईश्वरच नव्हे. अशा वस्तुच्या अस्तित्वाबद्दल जडवादी विशेष तक्रार करणार नाही. कारण तेच जाड होय, तेच जगत् होय. ईश्वर म्हणजे विचारांची व ज्ञानाची पूर्णता, असे सगळे ईश्वरवादी मानतात. याच ईश्वराची भक्ती करण्यास सगळे धर्मग्रंथ मनुष्यास प्रवृत्त करतात.

ईश्वरवाद्यांमध्ये जे मतभेद आहेत ते या ईश्वराचा जगत्वस्तूशी काय संबंध आहे, या बद्दल आहेत. कित्येक म्हणतात[१], ईश्वर विश्वाहून मूलतः निराळा असून तो विश्वाचा प्रेरक आहे. रथाचा सारथी रथाहून वेगळा असतो, किंवा यंत्राला प्रेरणा देणारा यंत्राहून भिन्न असतो, तसा तो आहे. मातीचा घडा करावा, सुताचे कापड विणावे, लाकडाचा रथ तयार करावा, त्याप्रमाणे मूलभूत व शाश्वत जडद्रव्याचे तो विश्व बनवितो; तो विश्वाचा कर्ता, स्वामी किंवा नियंता आहे. त्याला पिता किंवा माता म्हणतात. याचे कारण तो जगाचा कर्ता आहे. दुसरे ईश्वरवादी म्हणतात[२] की, परमेश्वराने विश्व संकल्पमात्रेकरून जादूगारासारखे निर्माण केले आहे. ते शून्यातून निर्माण केले आहे. विश्व अस्तित्वात आले, हा त्याच्या इच्छाशक्तीचा प्रभाव आहे. त्याला जसे विश्व उत्पन्न व्हावे असे वाटले, तसेच ते जन्माला आले; म्हणूनच त्याला सत्यसंकल्प म्हणतात. तिसरे ईश्वरवादी असे म्हणतात[३] की, ईश्वराने जग स्वतःतून निर्माण केले आहे. तो स्वतःच विश्वरूप बनला आहे. व्यक्त (Actuality) व अव्यक्त (Potentiality) असे दोन्ही तऱ्हेचे विश्व तो स्वतःच आहे. शून्यातून त्याने जग निर्माण केले नाही, तर आत्मरूप सत्तेतून ते निर्माण केले आहे. चौथे ईश्वरवादी म्हणतात[४], हे व्यक्त व दृश्य जडविश्व अव्यक्त व अदृश्य जड (अचित) द्रव्याचेन बनलेले आहे; परंतु अव्यक्त मूलकारण जडद्रव्य परमेश्वराचे शरीर आहे; परमेश्वराहून ते विलग नाही; त्याच्याशी ते नित्य सयुक्त आहे; परमेश्वराच्याच ठिकाणी ते आहे. परमेश्वर हाच त्या मूल जडद्रव्याचा नित्य आश्रय आहे. हे दृश्य व अदृश्य विश्व परमेश्वराचे शरीर आहे व त्या शरीराचा प्राण, जीव किंवा आत्मा म्हणजेच परमेश्वर होय. विश्वच देह व तो देही, असा त्याचा संबंध आहे. पांचवे ईश्वरवादी असे म्हणतात[५] की, परमेश्वरसत्ताच पूर्ण सत्य आहे व विश्व हा एक आभास (Illusion) किंवा वरवरचा देखावा (Appearance) आहे. शिंपल्यावर रुप्याचा,

---

(१) हिंदुस्थानांतील द्वैतवादी वैष्णव इ.

(२) मुसलमानांचे धर्माचे प्रवर्तक वल्लभाचार्य इ. व इतर एकेश्वरवादी (Monotheist).

(३) हिंदुस्थानांतील शैव व उपनिषद आणि पाश्चात्य देशातील विश्वात्म-देववादी (pantheist) स्पिनोझा वगैरे तत्त्ववेत्ते.

दोरीवर सापाचा व वाळवटांतील उन्हावर मृगजळाचा जसा भ्रम होतो, त्याचप्रमाणे चिन्मय सद्वस्तूवर विश्वाभास होतो. विश्व हे स्वप्न आहे. सहावे ईश्वरवादी असे म्हणतात[३] की, विश्व म्हणजे परमेश्वराचे विचार. गणिती पंडिताच्या ठिकाणी जशा गणिताच्या कल्पना असतात, त्याचप्रमाणे परमेश्वराच्या ठिकाणी ज्या कल्पना (Ideas) आहेत त्यांचा व्यवस्थित, सुसंगत व संपूर्ण संग्रह म्हणजेच जगत् होय. याच तत्त्ववेत्यांपैकी काहींचे म्हणणे असे आहे की, विश्व म्हणजे परमेश्वराचे वासनामय विचार (Volition) होत. सातवे ईश्वरवादी असे म्हणतीत[४] की, परमेश्वरी तत्त्वावरच जगताची सत्ता अवलंबून आहे. पण जगताचा परमेश्वराशी जो संबंध आहे, त्याचे स्वरूप अचिन्त्य व गूढ (Mystic) आहे. ईश्वर व जगत् यांचा संबंध कशा तऱ्हेचा आहे या संबंधी तत्त्ववेत्यांमध्ये मतभेद दिसतात, हे जरी खरे असले, तरी प्रत्येक भिन्न मत अंशतः सत्य आहे. त्या मतांची तार्किक संगती जरी दाखविता आली नाही, तरी हरकत नाही. तार्किक विसंगती दिव्य अनुभवात विरून जाते.

ईश्वरवादी तत्त्ववेत्यांचे मुख्य संप्रदाय वर सांगितले. याशिवाय अवांतर अनेक संप्रदाय आहेत, परंतु वरील सात गटांपैकी कोणत्यातरी गटात त्यांचा अंतर्भाव करता येतो. या सगळ्या संप्रदायांत एका मुद्याचे मुख्य साम्य आहे. ईशसत्ता चिन्मय आहे किंवा ज्ञानमय आहे, हे ते साम्य होय. हेच ईश्वराचे विशिष्ट लक्षण होय.

२४. ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न

ईश्वर हा मनुष्यांच्या सामान्य अनुभवाचा विषय नाही. सूर्य, चंद्र, - तारका, मेघ, विद्युत्, पृथ्वी, जल, तेज, वायु, रूप, रस, गंध, स्पर्श, शब्द इत्यादीकांचा अनुभव मनुष्यास येत असतो, तसा ईश्वराचा प्रत्यय मनुष्यास येत नाही. तहान, भूक, सुख, दुःख, राग, द्वेष, संकल्प, विकल्प अनुभूती, स्मृती, अहंकार, विचार, इत्यादी मनःस्थितींचा जसा प्रत्यय येतो, तसाही ईश्वराचा प्रत्यय येत नाही. आई, बाप, बंधु, पुत्र, कन्या, पत्नी, मित्र, शत्रु इत्यादीकांच्या जशा भेटी होतात, तशा काही ईश्वराच्या भेटी होत नाही. द्रव्य – गुण-क्रियांचा आपण नित्य अनुभव घेत असतो. तसा त्याचा अनुभव येत नाही; अभ्यन्तर व बाह्य विषयांची नित्य प्रचीती येत असते, तशी काही याची येत नाही; म्हणून ईश्वर आहे कीं नाही व असल्यास तो कसा आहे, याबद्दल अतिप्राचीन कालापासून मनुष्यजात चिकित्सा करीत आहे. पायाखालची पृथ्वी व मस्तकावरील नभोमंडल (द्यावापृथिवी) यांच्याकडे पाहून ऋग्वेदांतील ऋषीला हा एक विशाल महाल आहे, असे वाटले. त्याबद्दल त्याने असा प्रश्न विचारला कीं, कोणत्या

---

(१) रामानुज, नीलकंठाचार्य इ. भारतीय विशिष्टाद्वैसा वेदान्ती.

(२) आद्यशंकराचार्य इ. मायावादी.

(३) Idealists- Plato, Hegel, Berkeley, Sir J, Jeans, etc.

(4) Mysticism. गौरांगप्रभु इ.

वनातील कोणत्या वृक्षांना तासून हा विश्वाचा महान् प्रासाद निर्माण केला आहे ? दुसरा ऋषि विचारतो की, उंच आकाशांत बसून सगळ्या जगाला जो पाहू शकत असेल, त्याला तरी माहीत असेल काय, की, हे विश्व कोठून आले आणि कोणी निर्माण केले ? (कुत आजाता कुत इयं विसृष्टिः । ऋग्वेद) अति प्राचीन काळच्या वैदिक ऋषीला जो प्रश्न पडला, तोच जगातील सगळ्या संस्कृतीतील विचारशील मनुष्यांच्या सुद्धा पुढे होता. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल संदेह उत्पन्न होण्याचे कारण असे आहे की, त्याचा इतर वस्तूंप्रमाणे अनुभव येत नाही. म्हणून त्याची चर्चा साधक व बाधक अशा दोन्ही बाजूने मनुष्यजात करीत आली आहे.

ईश्वराच्या एकंदरीत स्वरूपाबद्दल ईश्वरास्तित्व मानणाऱ्यांमध्ये अतिशय मतवैचित्र्य आहे. सामान्य लोकांचा देव निराळा, तत्त्ववेत्त्यांचा निराळा आणि ईश्वर-साक्षात्कारी लोकांचा निराळा. सामान्य लोकांचेसुद्धा देव एकसारखे नाहीत. एकाचा देव हत्तीसारखा, दुसऱ्याचा सिंहासारखा, तिसऱ्याचा माकडासारखा, चौथ्याचा माणसासारखा, पाचव्याचा स्त्रीरूप, सहाव्याचा पुरुषरूप असे अंगणित प्रकारचे देव निरनिराळ्या मानवगटाने आपआपल्या कल्पनेप्रमाणे कल्पिले आहेत. कित्येकांचे देव उग्र आहेत तर कित्येकांचे सौम्य आहेत. कित्येकांचे ब्रह्मचारी व कित्येकांचे संसारी, काही संसारी देवांना एकेकास हजारो बायका असतात, तर कित्येक एकपत्नीव्रत पाळतात. काही जमाती एकच देव मानतात, तर काही अनेक प्रकारचे देव मानतात. त्या देवांना मनुष्याप्रमाणेच सगळे विकार असतात. ते लहरी, मनात डाव धरणारे, स्तुतिप्रिय, लोभी, रागीट विषयलोलुप, प्रार्थना ऐकून खूष होणारे व हांजीहांजीखोर लोकांवर मेहेरनजर राखणारे असतात. दूध, तूप, मांस, अंडी, कोंबडी, पक्वाने, फळे इत्यादी पदार्थांवर माणसांप्रमाणेच ताव मारतात. त्यांना वस्त्र, पात्र, अलंकार, शय्या इत्यादी नजराणे द्यावे लागतात. अनियंत्रित राजा, सुलतान किंवा बादशहा यांच्या प्रमाणेच सामान्य लोकांचा देव असतो. सामान्य लोकच कशाला ? धर्मग्रंथातलासुद्धा देव असाच आहे. प्रार्थना, मंत्र, पूजा, जप इत्यादिकांनी तो संतुष्ट होतो. त्याला अनन्यभावाने शरण गेल्याशिवाय तो कृपा करीत नाही. अनन्यभावानेच तो प्रसन्न होतो, इतका तो मत्सरी आहे. दुसरी कोणाचीही भक्ती केलेली मला चालत नाही, माझीच भक्ती कराल, तर तुमची धडगत आहे. नाहीतर संसारयातनांच्या खाईत कायमचे रडत रहा. वरे, अनन्यभक्तीसुद्धां काही सोपी नाही. इंद्रियांचा असा काही स्वभाव त्या देवाने घडविला आहे की, त्यामुळे इंद्रियांची धाव सारखी विषयांकडे असते. उन्मत्त हत्तीप्रमाणे तीं अनावर असतात. जोपर्यंत देह आहे, तोपर्यंत कितीही प्रयत्न केला तरी, कितीही संयम केला तरी मोठमोठ्यांनासुद्धा इंद्रियेप्रसंगी दगा दिल्याशिवाय रहात नाहीत. गळ्यात दोन मणाची बोट बांधून हिमालयाची यात्रा करावयास एखाद्या माणसास भाग पाडावे, त्याप्रमाणे मनुष्यास देवाने जगाची यात्रा करावयास भाग पाडले आहे, असाच या परिस्थितीचा अर्थ आहे. सज्जन लोक दुःखी

लोकांचे दुःख पाहून कृपाळूपणे स्वतःच मदतीकरिता धाऊन जातात. देवाचे याहून उलटे आहे. त्याला सारखी हाक मारावी लागते. त्याची निरंतर प्रार्थना करावी लागते. तरी तो पावेलच असा नियम नाही. साधा दुबळा मनुष्यप्राणीसुद्धा थोडेसे सामर्थ्य असल्याबरोबर दुसऱ्यास मदत करण्यास सहज तयार होतो; ; दुसऱ्याच्या घराला आग लागली असता, दुष्ट लोकांच्यासुद्धा मनात परोपकाराची वृत्ती जागृत होते; अगदी साध्यासुध्या माणसात जितका सज्जनपणा आहे तितका सुद्धा धर्मग्रंथातल्या देवात नाही, तो भक्ती केल्याशिवाय येतच नाही.

तत्त्ववेत्त्यांच्या देवाचे स्वरूप कसे आहे, ते अगोदरच थोडक्यांत सांगितले आहे. ढोबळपणे सात प्रकार त्यांच्यात आहेत हे वर सांगितलेच आहे. दिव्य अलौकिक दृष्टीच्या साक्षात्कारी पुरुषांतसुद्धां कितीतरी मतभेद दिसतो.

सामान्य लोक, तत्त्ववेत्ते आणि साक्षात्कारी महात्मे यांच्या देवाबद्दलच्या कल्पना भिन्न प्रकारच्या आहेत. सामान्य लोकांचा देव त्यांच्या अशिक्षित मनाने निर्माण केला आहे. पाऊस कसा पडतो, वारे कसे वाहतात, सूर्यचंद्रतारकांचे उदयास्त कसे होतात, ग्रहण कसे लागते, रोगराई कशाने उत्पन्न होते, वादळे, अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ, दारिद्र्य व श्रीमंती, व्यापारातील तेजी व मंदी इत्यादी घटनांचा अर्थ नीट माहीत नसल्यामुळे त्या घटनांच्या मुळाशी देव आहे, असे सामान्य मनुष्य कल्पितो. भोवताली चाललेल्या घडामोडींचा वास्तविक कार्यकारणभाव न समजल्यामुळे भ्यायलेला, गांगरलेला व आश्चर्यचकित झालेला अज्ञ मनुष्य त्या घडामोडींच्या मुळाशी देवाची कल्पना करतो. साध्या कार्यकारणभावाचे अज्ञान किंवा अविद्या हीच सामान्य मनुष्याच्या देवाची जननी आहे. तत्त्ववेत्त्यांचा ईश्वर इतक्या साध्यासुध्या मूर्खपणातून जन्मला नाही. त्यांचा ईश्वर मोठ्या प्रशस्त तार्किक युक्तिवादाच्या आसनावर विराजमान झाला आहे. विश्वाच्या स्वभावासंबंधी व रचनेसंबंधी उत्पन्न झालेल्या प्रश्नांचे उत्तर देण्याकरिता त्यांनी ईश्वर कल्पिला आहे. जगांतील ज्या गोष्टींचा उलगडा होत नाही, नीट अर्थ समजत नाही, तेथे तत्त्ववेत्त्यांचा ईश्वर शिरला आहे. त्यांनी चिंतनशील व चिकित्सक मनुष्याची मती जेथे कुंठीत होते, तेथे ईश्वर कल्पिला आहे. ह्मणजे एकंदरीत अज्ञान हीच ईश्वरकल्पनेची जन्मभूमि आहे, असे म्हणावयास हरकत नाही. अज्ञेय व गूढ अशा परिस्थितीत ईश्वरतत्व राहते. महात्म्यांना दिव्यदृष्टीने ईश्वराचे दर्शन होते, असे म्हणतात. ज्यांस तसे दर्शन झाले नाही, त्यांनी दिव्यदर्शन होते, हे केवळ अंध:श्रद्धेनेच मानावयास पाहिजे. या विवरणावरून ईश्वराचा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे याची कल्पना येईल.

२५. ईश्वराच्या अस्तित्वाची तार्किक प्रमाणे व त्यांची समीक्षा

तत्त्ववेत्यांनी एकंदर आठ तार्किक प्रमाणे ईश्वरसिद्धीकरिता सांगितली आहेत. त्यापैकी पहिले प्रमाण[१] विश्वातील व्यवस्था किंवा रचना (Disign) हे होय. ही व्यवस्था किंवा रचना

(१) रचनानुपपत्तेश्च नानुमानम्। ब्रह्मसूत्रम्

अत्यंत कुशल अशा बुद्धीतून अस्तित्वात आली असली पाहिजे. ती ज्याचे ठिकाणी आहे तोच ईश्वर. जगामध्ये सगळीकडे नियमबद्धतेचे किंवा कायद्याचे साम्राज्य दिसते. व्यवस्था, सुसंगति किंवा रचना हा वस्तूमात्राचा स्वभाव आहे. सूर्य, तारका व ग्रह यांच्या गतीचे नियम किती निरपपवाद व सूक्ष्म आहेत, याची साक्ष ज्योतिषशास्त्र देते. ग्रहांचे गतीत काहीतरी चूक आहे, अव्यवस्था आहे, अशी जर कोणास शंका आली, तर खुशाल समजावे की, त्या मनुष्याच्या समजुतीतच कोठेतरी चूक आहे. पदार्थविज्ञानातील शक्तिसातत्याचा किंवा शक्तीच्या रूपांतराचा नियम (Law of Conservation and Transformation of Energy) अणुरेणुपासून तो सूर्यमालेपर्यंत आणि गवताच्या काडीपासून तो प्रज्ञावंत मानवापर्यंत सगळ्यांना सारखा व्यापून आहे. गणितातील नियम अत्यंत अबाधित असतात, असे आपण समजतो. गणितातील कल्पनांची रचना व संगती अत्यंत शुद्ध आहे, अशी आपली ख्याती आहे. सृष्टीचे ज्ञान जितके वाढत आहे, तितक्या प्रमाणात सृष्टीतील घटनांची आणि घडामोडीची गणितबद्धता प्रकट होत आहे. गणिताच्या परिभाषेत सांगितल्याशिवाय वस्तुच्या विचाराला पाहिजे तितकी स्पष्टता येत नाही, असे विज्ञान (Science) सांगत असते. कार्यकारणभावाच्या साच्यात प्रत्येक वस्तू वसलेली आहे असेच दिसते. सगळे विश्व अगदी यंत्रासारखे आहे. ही रचना, नियमबद्धता किंवा व्यवस्था त्या तऱ्हेची योजक बुद्धी असल्याशिवाय अस्तित्वात येणे शक्य नाही. यंत्र, मंदिर इत्यादी वस्तू प्रमाणबद्ध रीतीने तयार करावयास योजक बुद्धीची गरज असते. ती नसेल, तर अव्यवस्था होते व घोटाळा माजतो. जगांत कोठेही अव्यवस्था नाही व घोटाळाही नाही; म्हणून जग हे अत्यंत विचारपूर्वक कोणीतरी निर्माण केले आहे, असे दिसते.

हा युक्तिवाद सकृतदर्शनीच खरा आहे. बुद्धी, जाणीव किंवा ज्ञान या साधनांची गरज अगदी एकदेशी आहे. काही विशिष्ट जातीच्या जीवपिंडांच्या जीवनात या साधनांची आवश्यकता असते. मनुष्यासारख्या प्राण्याच्या व्यवहारात बुद्धीची गरज असते, ही गोष्ट खरी आहे; परंतु तेवढ्यावरून विश्वाच्या सगळ्या उभारणी - संहारणीला, स्थितिगतीला बुद्धीची गरज आहे, असे म्हणता येत नाही. मनुष्यासारख्या जीवपिंडाच्यासुद्धा सगळ्याच व्यवस्थित व्यापारांत बुद्धीची आवश्यकता नसते. जीवाच्या शरीरात अजाणपणे कितीतरी व्यापार सुरळीतपणे चालतात. पचनक्रिया, रुधिराभिसरण, गर्भपोषण इत्यादी गोष्टी अतिशय गुंतागुंतीच्या असूनही त्यांच्यात कितीतरी नियमबद्धता आहे. उन्नत अशा जीवजातींच्या काही विशिष्ट व्यापारांकरिताच बुद्धी किंवा मन हे साधन उत्पन्न झाले आहे. घर बांधावयास व कपडा विणावयास बुद्धीची गरज आहे, तशी मेदूची, ज्ञानतंतूचीही गरज आहे. म्हणून जगांतील सगळ्या घडामोडीस मेदू व ज्ञानततूंची गरज आहे, असे म्हणावे लागेल. कारण मेदूशिवाय व ज्ञानतंतुंशिवाय बुद्धी किंवा विचार या गुणाचे अस्तित्वच असू शकत नाही.

वनस्पतींची वाढ होते, निरंतर अनंत जडद्रव्ये जगात उत्पन्न होत असतात, त्या सगळ्या ठिकाणी मेदू व ज्ञानतंतू असतात काय ? तेथे जशी मेदूची व ज्ञानतंतुंची गरज नसते, तशीच बुद्धीची किंवा विचाराचीही गरज नसते.

"विचार चुकला किंवा लक्ष नसले म्हणजे अव्यवस्था होते व घोटाळा होतो आणि विचार बिनचूक असला व चित्त सावध असले, म्हणजे घोटाळा किंवा अव्यवस्था होत नाही." या विधानाचा अर्थ तपासून पाहिला म्हणजे ईश्वरसिद्धीचे पहिले प्रमाण चुकीचे कसे हे सहज कळून येईल. "स्वयंपाक बिघडला कारण लक्ष नव्हते किंवा ज्ञान नव्हते." याच्यातील बिघाड किंवा अव्यवस्था म्हणजे विज्ञानदृष्ट्या ज्यास अव्यवस्था म्हणतात, ती नव्हे. मनुष्यास इष्ट नसलेली स्थिती, असा तेथील घोटाळा किंवा अव्यवस्था याचा अर्थ आहे. विज्ञानदृष्टीने बिघडलेल्या स्वयंपाकात तत्त्वतः काहीच अव्यवस्था नसते. कार्यकारणभावाच्या अबाधित नियमानेच बिघडलेला स्वयंपाक तयार झालेला असतो. ती अव्यवस्था व्यवस्थाच आहे.

व्यवस्था किंवा नियमबद्धता जगताचा स्वभाव आहे. तो बाहेरून लादलेला धर्म नाही. तो धर्म जर वस्तुत नसेल, तर वस्तुच नाही असे म्हणावे लागेल.

(२) ईश्वरविषयक दुसरे प्रमाण, प्रेरणेला प्रेरकाची अपेक्षा असते, हे होय. जगामध्ये अणुरेणुमध्ये, सर्वत्र गती दिसते. त्या गतीस पहिल्यांदा ज्याने प्रारंभ केला, तोच ईश्वर होय. सारथी ज्याप्रमाणे घोड्यांना हाकतो त्याप्रमाणे मूलद्रव्यांना देव चालना देत असतो.

हेही प्रमाण विचाराच्या कसोटीस उतरणारे नाही. प्रत्येक गतीला स्वतंत्र प्रेरकाची गरज नसते. याची कारणे दोन आहेत. एक तर, प्रत्येक वस्तुत स्वयंगतिशक्ती असते आणि दुसरी गोष्ट, एक वस्तू दुसऱ्या वस्तुच्या गतीला कारण होते. त्याकरिता स्वतंत्र प्रेरकाची गरज नसते. आगगाडीचे डबे जेव्हा एकामागून एक आदळत जातात तेव्हा एक डबा दुसऱ्या डब्यावर आदळतो, दुसरा तिसऱ्यावर जगातील गतीचा कार्यकारणभाव अशाच तऱ्हेचा असतो मूलद्रव्याला पहिल्यांदा ज्याने प्रेरणा दिली तोच ईश्वर होय, असे काही शास्त्रज्ञ म्हणतात. 'पहिल्यांदा' ही कालमर्यादाच चुकीची आहे. विश्वाला आरंभ असा नाहीच. विश्व हे अनादिपरंपरेने चालत आले आहे. ते प्रतिक्षणी बदलत आहे. कधीकाळी बदल होत नव्हता, व पूर्ण स्थैर्य होते, अशी कल्पनाच तर्कदुष्ट आहे.

(३) उद्देश, संकल्प किंवा हेतू हे तिसरे प्रमाण होय - उद्देश (Purpose) असल्याशिवाय जगातील कोणतीच गोष्ट घडणे शक्य नाही. प्रत्येक गोष्ट विशिष्ट उद्देशानेच निर्माण होत असली पाहिजे, म्हणून हा उद्देश ज्याच्या मनात आहे, तोच ईश्वर होय. हे ईश्वरसिद्धीचे तिसरे प्रमाण होय. पाणी नसेल तेथे प्राणी किंवा वनस्पती उत्पन्न होत नाही. प्राणी व पाणी यांचा संबंध ही हेतुपूर्वकच योजना दिसते. हृदयांतील रुधिराभिसरणातील व्यवस्था अशीच आहे. रक्त शुद्ध होऊन शरीरांत फिरावे, शरीरांत आवश्यक असलेल्या पोषकद्रव्यांचा पुरवठा करावा आणि अशुद्धता उत्पन्न झाल्याबरोबर पुनः परत शुद्ध होण्याकरिता रक्ताने परतावे,

ही व्यवस्था हेतू शिवाय शक्य नाही. प्राण्यांना अन्न पाहिजे असते म्हणून अन्न उत्पन्न होते. ते अन्न सापडावे म्हणून प्राण्याना डोळे मिळाले. डोळे मिळाले नसते तर अन्नाचा शोध करण्यात अडचणी येऊन प्राण्यांचा संहारच झाला असता; म्हणून डोळ्यांची योजना हेतुपूर्वक झाली आहे, असे मानावे लागते. अशारीतीने शरीराच्या रचनेतील प्रत्येक भाग हेतुपूर्वक निर्माण झालेला आहे, असे म्हणण्यास पुष्कळच जागा आहे. जी शरीररचनेची गोष्ट तीच विश्वाच्या रचनेची.

या मुद्याचे खंडण सहज करता येते; ते असे. उद्देश किंवा हेतू अंतःकरणाचा धर्म आहे. उद्देश म्हणजे इच्छा. अमुक एक गोष्ट अमक्याकरिता अमुक रीतीने घडावी अशी इच्छा म्हणजे उद्देश. ईश्वराला इच्छा आहे, ह्यावरून ईश्वर अतृप्त व अपूर्ण आहे, असे सिद्ध होते. मग तो अनीश्वर आहे असेच म्हणावे लागते. कारण जे आपल्या पाशी नाही, त्याची इच्छा होते; आणि ती इच्छा त्या दुसऱ्या वस्तूने पूर्ण होते. म्हणजे ती वस्तू ईश्वराच्या पूर्ण आधीन नाही व ईश्वराच्या ठिकाणी जे नाही, ते त्या वस्तुत आहे, असे म्हणावे लागते. म्हणजे ईश्वर पूर्ण समर्थ नाही, असे सिद्ध होते. आपणास अन्नाची व स्त्रीची इच्छा होते. म्हणजे अन्नाची व स्त्रीची पहिल्यांदा वाण असते व ती वाण अन्न व स्त्री भरून काढते. अन्न व स्त्री आपणापेक्षां स्वतंत्र व आपणाठायी नसलेल्या शक्तीने युक्त आहे म्हणून आपण अन्नाची व स्त्रीची वासना बाळगतो. एतंच ईश्वरात इच्छा आहे म्हणजे ईश्वर अपूर्ण व अंशतः असमर्थ आहे, असेच मानावे लागते. त्याला जर इच्छा नसेल तर त्याच्या ठायी संकल्प, उद्देश किंवा हेतू नाही, असेच म्हणावे लागेल.

शरीरात व जगात जी व्यवस्था व संगती आहे तिच्या मुळाशी संकल्पच आहे, असे म्हणण्याचे काही कारण नाही. प्राण्याच्या व मनुष्याच्या जीवनांतील एक तऱ्हेच्या एकदेशी व्यवस्थेस व सुसंगतीस संकल्प कारण आहे, हे खरे, परंतु विश्वरचनेत कार्यकारणभाव आहे, एवढेच दाखविता येते.

इष्टस्थिती म्हणजे व्यवस्था, असा अर्थ होतो. इष्टता मनुष्याच्या अपेक्षेवर ठरते. जगाची रचना मनुष्यास व प्राण्यास इष्ट अशीच आहे, असे मुळीच म्हणता येत नाही. भूगर्भाचा व भूस्तरांचा इतिहास आणि जीवजातीच्या जीवनाचा इतिहास पाहिला तर अशी खात्री पटेल की अनंत जीवजातींना या जगाच्या संग्रामात नष्ट व्हावे लागले. अनंत आपत्तींच्या व घोर यातनांच्या खाईत भस्म व्हावे लागले. जीवजातीच्या संहाराचे प्रमाण जगण्याच्या प्रमाणापेक्षा अनंत पटीने मोठे आहे. विश्वातील परस्पर विरोधी शक्तींच्या कचाकचीत कसा बसा तग धरूनच जीवजातीस रहावे लागले आहे. कसली व्यवस्था व संगती घेऊन बसलात? म्हणूनच प्राचीन भारतीय तत्ववेत्ते संसारास असार व दुःखाचा बाजार म्हणून संबोधितात. स्वर्ग व मोक्ष जर असेल तर तो कल्पनेतच आहे. "सुख पाहता जवा पाडे दुःख पर्वता एवढे" ही वस्तुस्थिती आहे. मनुष्य झगडता झगडता नुकताच कोठे अंधुक पण दूर दिसत

असलेल्या प्रगतीचे क्षितिज पाहूं लागला आहे. ऐहिक जीवनाला रमणीय बनविता येईल अशी त्याला अस्पष्ट अशा उत्पन्न होत आहे. अव्यवस्थेतून व्यवस्थेकडे व विसंगतीतून सुसंगतीकडे त्याचा प्रवास होत आहे. तो सुद्धा हजार वेळा वाट चुकतो व क्वचित सरळ मार्गावर जातो. हा प्रवास वळणाचा, अडचणीचा व आडरानाचा आहे. परंतु प्रगती होत आहे, एवढे मात्र खास. याचा असा अर्थ नव्हे की जगतात सुव्यवस्था व सुसंगती आहे. जगांत जी व्यवस्था व संगती आहे, ती तार्किक किंवा शास्त्रीय कार्यकारणभावात्मक व गणितात्मक आहे. तिचा उद्देशाशी व संकल्पाशी संबंध नाही. तिच्यावरून उद्देश व संकल्प यांचे अनुमान होत नाही. तर उद्देशाच्या व संकल्पाच्या अभावाचेच अनुमान होते. कारण ती व्यवस्था व संगती यांत्रिक व भौतिक आहे. प्राणी व वनस्पती यांच्या शरीरांतील योजना त्याच यांत्रिक व भौतिक नियमांचा परिपाक आहे. त्या भौतिक व यांत्रिक नियमांना ईश्वराची गरज नाही एवढेच नव्हे तर त्या नियमांचे अस्तित्वच ईश्वराचे नास्तित्व सिद्ध करते.

भूगर्भात असे शेकडो प्राणी सांपडतात की, त्यांच्या शरीराची रचनाच शिंगे अडकून पारण्यास बळी पडलेल्या सांबराप्रमाणे पुष्काळ वेळी त्यांच्या विनाशास कारण झाली. परिस्थितीशी पूर्णपणे जुळेल अशीच शरीररचना असती तर भयंकर रोगांच्या व जंतूच्या हल्ल्यांत प्राणिशरीर नष्ट झाले नसते. प्लेग, कॉलरा, मॅनेजाइटिस, कॅन्सर इत्यादी रोगांचा प्राणघातक आघात सहन करून उत्तर्ण होणारी शरीरे किती थोडी आहेत ! शरीराची रचना ईशसंकल्पकृत आहे या म्हणण्यापेक्षा ईशसंकल्पकृत नाही, यासच प्रमाणे फार आहेत.

(४) चवथे प्रमाण हे की, जे जे आपणास दिसते, इंद्रियास गोचर होते, बुद्धीस कळते किंवा कल्पनेचा विषय बनते, ते ते द्रष्ट्यावर अवलंबून असते. प्रत्येक ज्ञेय वस्तुचे अस्तित्व ज्ञात्याच्या अधीन आहे. ज्ञाताच नसेल तर ज्ञेय कसे असणार ? ज्ञाता आहे म्हणून ज्ञेय आहे. 'घोडा पांढरा आहे' असे आपण म्हणतो. घोड्याचे सर्व गुणधर्म आपल्या पाहण्यावरच अवलंबून आहेत. आपला डोळा नसेल तर घोडा 'पांढरा' हे कसे म्हणता येईल ? चक्षु नसेल तर घोडा उंच आहे असे कसे म्हणता येईल ? आपली इंद्रियेसुद्धा, 'आहेत,' हे आपल्या अनुभवावरूनच सिद्ध होते; त्यांचा अनुभव नसेल तर ती इंद्रिये 'आहेत' हे कसे म्हणता येईल? तसेच या सर्व विश्वाचे आहे. आपण असे म्हणतो की, सर्व प्राणिमात्र झोपी गेले तरी हे विश्व असतेच; म्हणजे जेव्हा आपण कोणीही या विश्वाचा अनुभव घेत नाही, तेव्हाही ते असतेच. परंतु 'तेव्हा ते असते.' असे ज्या तऱ्हेच्या विश्वाबद्दल आपण बोलतो, त्याचे सर्व गुणधर्म ज्ञात्याच्या अनुभवावर अवलंबून आहेत; अर्थात आपण कोणीही ज्या वेळी त्याचा अनुभव घेत नाही, तेव्हा त्याचा अनुभव ज्यास आहे, त्याची प्रतीती किंवा भान ज्यास आहे, असा कोणीतरी त्यावेळी असलाच पाहिजे, तोच ईश्वर होय. सगळे जीव ज्या वेळी विश्वाचा अनुभव घेत नाहीत, अशा वेळी त्याचा अनुभव घेणारा व ज्याच्या अनुभवावर ते अवलंबून आहे, असा जो पुरुष तोच पुरुषोत्तम व परमेश्वर होय.

या युक्तिवादाचे उत्तर अगदी सोपे आहे. कोणतीही वस्तू तिच्या ज्ञानावर अवलंबून असते, हेच मुळी खरे नाही. उलट असेच म्हटले पाहिजे की, वस्तुवर ज्ञान अवलंबून आहे. कोणतीही वस्तू खरी आहे, म्हणजे ती वस्तू कोणीही जाणत नसता असते; कारण वस्तुचे अस्तित्व दुसऱ्याच्या जाणिवेवर अवलंबून आहे, असे म्हटले म्हणजे, ती वस्तू खरी नाही, तर तो केवळ भास आहे, असेच म्हणावे लागेल. जी वस्तू जाणीव असेल तरच असते व जाणीव नसेल तर नसते, ती काल्पनिकच असते, खरी नसते. कोणत्याही खऱ्या वस्तुच्या अस्तित्वाला जाणिवेची गरज लागत नाही. त्या वस्तुच्या अस्तित्वाचा पुरावा म्हणजे जाणीव होय. पुराव्यावर वस्तुचे अस्तित्व अवलंबून नसते. धूम हा अग्नीचा पुरावा आहे. म्हणून धूम नसेल तर अग्नी नसतो, असे मुळीच सिद्ध होत नाही. माझ्यासमोर दिसणारा पर्वत माझ्या जाणिवेमुळे अस्तित्वात आला नाही; माझी जाणीव त्याचे कारण नाही; तो अगोदर असतो व त्याचा अनुभव नंतर येतो; वस्तू अगोदर असते व अनुभव नंतर येतो, अनुभवामुळे वस्तू अस्तित्वात येत नाही; तसेच सगळ्या विश्वाचे आहे. ह्या विश्वाचा अनुभव घेणारा कोणीही नसला तरी ते असणारच. म्हणून त्याचा अनुभव घेणारा ईश्वर नसला तरी त्याच्या अस्तित्वाला काहीच धक्का लागणार नाही. मी माझे घर ज्यावेळी अनुभवत नाही, त्यावेळी माझ्या घरास काडीमात्र धक्का पोचत नाही; केवळ अनुभवाने त्यांत काही फरक होत नाही. अनुभव वस्तूवर अवलंबून असतो; ज्ञानास वस्तू कारण असते, वस्तूस ज्ञान कारण नसते.

(५) कोणी म्हणतात की, जगात जे मोहक, मंगलमय, अमर्याद व विस्मयजनक सौंदर्य निरंतर प्रतीतीस येते, त्याच्या मुळाशी विशाल, विशुद्ध, रुचिर, अगाध व अनंतकलाविलासिनी अशीं प्रतिभा असलीच पाहिजे असे अनुमान केल्याशिवाय राहवतच नाही; नव्हे अशी खात्री पटते की, जगातील महान कवी, चित्रविशारद, शिल्पचतुर व विविधकलाकुशल अशा मानवांच्या कल्पनाशक्तीस व प्रतिभेस स्फूर्ती देणारी विश्वव्यापी दैवी प्रतिभा असलीच पाहिजे. ह्या प्रतिभेने जे जे काही निर्मिले आहे, त्याचे अत्यंत अल्पसे अनुकरण जरी एखाद्या माणसाने केले तरी तो सर्व मानवजातीत कलाकुशलतेच्या श्रेष्ठ पदवीस पोचतो. त्या दैवी प्रतिभेच्या चैतन्यसागरांतील एका लहानशा चित्कणाचा प्रसाद ज्या-ज्या मानवास लाभतो तो-तो मानवजातीत दिगंत कीर्ती मिळवितो. किंबहुना आपण व्यास कुरूप, निंद्य, त्याज्य, घृणास्पद किंवा अमंगळ म्हणतो, ज्यामुळे आपणास विषाद व दुःख यांचाच अनुभव येतो, ज्याच्यापासून आपणास महत् भय उत्पन्न होते, ते ते सुद्धा सर्व चमत्कृतिजनक अशा परिस्थितीचेच अंशभूत आहे असे साहित्यिक प्रतिभेस दिसते. जीवनाचा व जगाचा असा कोणता हीन, कुरूप व विद्रूप भाग आहे की जो कलेने रमणीय करून दाखविला नाही ? संसारातील व विश्वातील असा कोणता प्रसंग आहे की जो सरस अशा कलाकृतीस विसंगत आहे ! तत्त्ववेत्ते ज्ञेय व अज्ञेय अशा वस्तूमात्राचे चिंतन करतात, असे म्हणतात; तत्त्वज्ञान सर्वव्यापी असते असे सांगतात; परंतु तत्त्ववेत्ते किंवा तत्त्वज्ञान ज्या-ज्या तत्त्वांचे मनन करते,

ते ते सर्व कलात्मक बुद्धीस गोचर होते. कलात्मक बुद्धीचा विषय अखिल विश्व आहे. अखिल विश्व जर कलामय आहे, तर, ही अलौकिक कलामय विश्वात्मक कृती ज्याच्या प्रतिभेचा विलास होय तो कोणीतरी असलाच पाहिजे, तो कोणीतरी खरोखर अचिंत्य व अप्रमेय अशा अनंत कल्याण गुणांचा आधार आहे.

हे सौंदर्यमूलक ईश्वरविषयक अनुमानही बरोबर नाही. कारण विश्व हे वस्तुत: केवळ सौंदर्यरूपच आहे असे म्हणता येत नाही; व तसे असले तरी ते सौंदर्य कोणीतरी विचारमय व प्रतिभासंपन्न अशा शक्तीने रचले आहे, यासही काही आधार नाही. विश्वात सुंदरता किंवा कुरूपता विश्वाचा भोग भोगणारा जो मानवप्राणी त्याच्या अनुभवावरून ठरते. मनुष्यास दोन्ही तऱ्हेचा अनुभव येतो. हे विश्व दु:खाग्नीने पेटलेली व निरंतर जाळणारी अशी खाई आहे, असे अनेक सज्जनांनी म्हणून ठेविले आहे. संसाराची असारता आणि जगताची दु:खमयता सांगणारे तत्त्ववेत्ते व कवि काही थोडे नाहीत! बुद्ध, कपिल, कणाद, व्यास इत्यादी महान् ज्ञानी, अनुभवी आणि मानवजातीचे पथप्रदर्शक नेते असेच सांगून गेले आहेत; त्याच्या उलटही प्रतिपादन काहीनी केले आहे. या दोन्ही पक्षांच्या म्हणण्यातील सार असे आहे की, जगात सौंदर्य व आनंद किंवा त्याच्या उलट कुरूपता व दु:ख यांचा अनुभव मनुष्यांच्या परिस्थितीवर व प्रयत्नांवर अवलंबून आहे. जेव्हा मनुष्यांची सामाजिक परिस्थिती बिघडलेली असते आणि जेव्हा समाजांत विषमता व बेबंदशाही माजते, तेव्हां जीवन व विश्व कुरूप, दु:खमय व बंधनरूप वाटते आणि त्यांतून सुटका (म्हणजे मोक्ष) हो परमपुरुषार्थ वाटतो. जेव्हा समाजात व्यवस्था आणि सर्वांच्या प्रगतीची व योगक्षेमाची शक्यता उत्पन्न होते तेव्हा संसारांत सार व विश्वांत रसमयता प्रतीत होऊ लागते, जीवनांत अभ्युदय व मरणानंतर नि:श्रेयस यांची आशा व अपेक्षा उत्पन्न होते; सौंदर्याचा अनुभव परिस्थितिसापेक्ष आहे. त्यावरून विश्व वस्तुत सौंदर्यमयच आहे असे निरपेक्ष विधान करता येत नाही. मनुष्यांच्या परिस्थितीस वगळून विचार केल्यास विश्व सुंदरही नाही व कुरूपही नाही, असेच सिद्ध होते. मनुष्यांचा भावनात्मक अनुभव व विश्वांतील परिस्थिति या दोन वस्तुंच्या तुलनेत सौंदर्य किंवा त्याविरुद्ध असलेली कुरूपता यांचा निर्णय करता येतो. सौंदर्य नुसते वस्तूनिष्ठ नाही किंवा केवळ आत्मनिष्ठ नाही. भोक्ता आत्मा व भोग्य विश्व यांच्या परस्परांवर होणाऱ्या क्रियाप्रतिक्रियेत सौंदर्याची किंवा कुरूपतेची सिद्ध होते.

समजा की, विश्व सुंदरच आहे, परंतु त्यावरून सौंदर्य निर्माण करणारी प्रतिभाशक्ती असलीच पाहिजे, असे अनुमान करण्यास जागा नाही. कारण सौंदर्य हा विश्वाचा स्वभाव आहे, तो स्वभाव शाश्वत आहे; तो कोणीतरी निर्माण केला आहे, असे म्हणण्याचे काही कारण नाही.. कारण तसे मानल्यास ते सौंदर्य निर्माण करण्याच्या पूर्वी विश्व कुरूप होते, असे म्हणावे लागेल. तशा कुरूप विश्वाच्या अस्तित्वास काय प्रमाण आहे ? दुसरे असे की, ज्याने सुंदर विश्व किंवा विश्वसौंदर्य निर्माण केले तो सुंदर आहे की नाही ? तो सुंदर असल्यास

त्याचे सौंदर्य कोणी निर्माण केले ? तो सुंदर आहे, असे सगळे ईश्वरभक्त सांगतात. ते त्याचे अनंत सौंदर्य कोणी निर्माण केले! बरे ज्याने ईश्वराचे सौंदर्य निर्माण केले, त्याचे सौंदर्य कोणी निर्माण केले ? अशा प्रश्नांची मालिका कधीच संपणार नाही; म्हणून असे जर म्हटले की ईश्वराचे सौंदर्य स्वाभाविक आहे व ते कोणीही निर्माण केले नाही; तर मग विश्वाचेच सौंदर्य स्वाभाविक आहे व ते कोणीही निर्माण केले नाही, असे म्हणण्यात अधिक तर्कशुद्धता आहे. विश्वकर्ता ईश्वर सुंदर नाही असे म्हटले तर वस्तूमात्र सुंदर आहे, हे मुख्य विधान खोटे ठरते. ते खोटे असल्यास म्हणजे काही वस्तू असुंदर आहेत असे म्हटल्यास, असुंदर वस्तू ईश्वर निर्माण करीत नाही असे म्हणावे लागेल. सर्व वस्तू ईश्वराने निर्माण केल्या आहेत असे जर म्हटले; तर ईश्वर ही एक वस्तू असल्यामुळे तीही कोणीतरी निर्माण केली आहे असे म्हणावे लागेल. तसे म्हटल्यास ही निर्माण करण्याची परंपरा कधीच संपणार नाही. त्यापेक्षा विश्व किंवा वस्तूमात्र कोणीच निर्माण केले नाही; हेच म्हणणे अधिक सयुक्तिक दिसेल.

(६) सर्व मनुष्यांकरिता किंवा सर्वजीवांकरिता नीती व अनीती, सत्कर्म व दुष्कर्म, शुभ व अशुभ आचरण यांचे नियम ठरविणारा आणि त्याप्रमाणे निर्णय देणारा सर्वात वरिष्ठ प्रमादरहित असा न्यायकर्ता व न्यायाधीश या जगात असला पाहिजे; तो नसल्यास सगळी नैतिक मूल्ये आणि शुभाशुभ किंवा मांगल्यामांगल्य यांचा विचार निराधार ठरेल. मनुष्य तर प्रमादशील व पक्षपाती असतो; प्रमादरहित व निःपक्षपाती असे नीतीचे सर्वंकष अधिष्ठान न मानल्यास नीतीची व्यवस्था न राहिल्यामुळे या जगात बेबंदशाही आणि गुन्हेगारी माजून ताळतंत्र काही राहणार नाही. विवेक, विचार व साधुत्व यांचे निर्णायक प्रमाण न सापडल्यामुळे या विश्वांत दुष्टावा आणि दुर्जनता यांचीच निर्घृण, कठोर व भयानक सत्ता अबाधित राहील. परंतु या जगात विवेक व साधुत्व यांस सर्ववरिष्ठ स्थान आहे असे मनुष्यप्राणी समजून चालतात; सत्याचा अखेर विजयच होतो, आणि असत्याचा पराभव होतो असे आश्वासन कोठून तरी मनुष्याच्या हृदयास मिळालेले आहे; म्हणूनच कसल्याही महान् प्रलोभनांना व सुखाच्या ठेव्याला लाथाडून दुःखांच्या आपत्तींच्या भडकलेल्या ज्वाळा ज्या ठिकाणी नभोमंडळाचा ठाव घेत असतात आणि मृत्यू अनंत वेदनांचा भडिमार करून जीवांचा संहार करीत असतो, अशा घोर परिस्थितीत अनेक सज्जन जीव हिमालयासारख्या अचल धैर्याने व गगनासारख्या गंभीर हृदयाने झगडत असतात. हे धैर्य व गांभीर्य ज्यां नैतिक श्रद्धेने प्राप्त होते आणि त्या अमर श्रद्धेचा उगम जेथे होतो, तोच अमृतरूप मंगलमूर्ती प्रभु होय. केलेल्या सत्कर्माचे सुंदर फळ केव्हा तरी निळवून देणारा व दुष्कर्माचे शासन करणारा या विश्वात कोणीतरी असलाच पाहिजे; तसेच अमुक सत्कर्म होय व अमुक दुष्कर्म होय हे निश्चित करणारी चेतन शक्ती असलीच पाहिजे; नाहीतर मी पुण्यच का करावे व पाप का करू नये याचा निर्वाळा माणसास कसा मिळेल? तसेच अमुक एक सत्कर्म व अमुक एक दुष्कर्म होय हे तरी मनुष्यास निश्चितपणे कोण सांगेल? प्रत्येक मनुष्याच्या हृदयात सत्कर्माचा स्वीकार व

असत्कर्माचा परिहार करावा अशी निश्चयात्मक भावना सतत वसत असते, ती निश्चयात्मक भावना माणसाच्या आधीन नाही. ह्या भावनेचे बंधन मनुष्याने स्वतःच निर्माण केले नाही. ते बंधन त्याच्यावर, त्याच्या बुद्धीवर व अंतःकरणावर कोणीतरी कायमचे बांधले आहे; ज्याने ते बंधन बांधले आहे, त्यासच परमेश्वर म्हणतात तोच सर्वांचा बंधु होय. सगळी नैतिक नाती ज्याने निर्माण केली आहेत असा तो सगळ्यांचा सर्वांत जवळचा नातेवाईक आहे; म्हणजे तो सगळ्यांचा पिता, माता व मित्र आहे. तो सर्वांच्या आत्म्यांस आतून नैतिक प्रेरणा देतो म्हणून तो परमात्मा आहे.

हे नीतिमूलक ईश्वरविषयक अनुमानही चुकीचे आहे. यांत ईश्वर दोन कारणास्तव गृहीत धरला आहे. एक, नीतीचे नियम ठरविण्याकरिता व दुसरे नीतीचे फळ देण्याकरिता. ही दोन्ही कारणे ईश्वराची सिद्धी करू शकत नाहीत. नीतीचे नियम मनुष्यांनीच ठरविलेले असतात. व्यवहार सुरळीत चालण्याकरितांच नीतीचे नियम किंवा सदाचरणाचे नियम निर्माण केले आहेत. नीतीच्या नियमांवाचून मनुष्यांचे वैयक्तिक व सार्वजनिक जीवन एकंदरीत अयशस्वी, निष्फळ व अनिष्टपर्यवसायी होते, असा प्रत्यय मनुष्यजातीस निरंतर येत असतो. चांगला प्रकाश, स्वच्छ हवा, निर्मळ पाणी व पौष्टिक अन्न यांची जशी मनुष्यांना जरूर असते व त्यांच्या बद्दलचे नियम जसे अवगत करून घ्यावे लागतात, त्याचप्रमाणे सदाचरण व दुराचरण यांचा विवेकही मनुष्यांना आवश्यक असतो. भौतिक वस्तूंचा कार्यकारणभाव जसा अनुभवाने व बुद्धीने निश्चित करता येतो, त्याचप्रमाणे आचरणाचा कार्यकारणभावही मनुष्यांना महत् प्रयत्नांती अनुभव व बुद्धी यांच्या साहाय्याने निश्चित करता येतो. विद्रोह व हिंसा यांचे दुष्परिणाम याच जगात अनुभवावयास मिळतात. परस्पर सहकार्य, सहानुभूती व प्रेम यांच्या योगाने जीवनांत श्रेयाची प्राप्ती होते, ही गोष्ट नित्य प्रतीतीचा विषय आहे. असत्य किंवा खोटेपणा सर्व व्यवहारात माजला तर सर्व व्यवहार नासेल हे सांगण्यास ईश्वराची गरज नाही. सर्वांच्याच जीविताची व वित्ताची सुरक्षितता नीतीवर अवलंबून असते, हे सांगण्याकरिता दिव्यदृष्टीची, दिव्यश्रद्धेची किंवा दिव्यप्रेरणेची काय आवश्यकता आहे ?

यावर असा आक्षेप येईल की, नीती व अनीती यांच्याबद्दल असलेल्या श्रद्धेत असा विचार पुष्कळ वेळा नसतो. फूल सुंदर आहे हे जसे डोळ्याने कळते तसे निर्विकार मनाने अमुक एक आचरण सत् व अमुक असत् असे कळते; त्याकरिता वैयक्तिक व सार्वजनिक व आचरणाच्या कार्यकारणभावाचा विचार करावा लागत नाही. यावर असे उत्तर आहे कीं, बालपणापासून मिळालेल्या शिक्षणाने आणि निरंतर चाललेल्या व्यवहाराच्या अनुभवांच्या संस्कारांनी हा सद्सद्विवेक करता येतो. नैतिक श्रद्धा मनुष्यांना फार मोठ्या प्रयत्नांनी प्राप्त झाली आहे. नीती व अनीती कोऱ्या मनास कळणे शक्य नाही; कोरे मनही या जगात दुर्लभ आहे. इतकेच नव्हे तर तसे मन कोणाचेही नसते. वडील माणसे, सामाजिक व्यवहार, सामाजिक संस्था व धर्मसंस्था यांच्या परिवारात मनुष्य जन्मास येतो; त्यांच्यापासून विशिष्ट

भाषा, विशिष्ट विचार, आवडीनिवडी आणि सर्वतऱ्हेचे वर्तणुकीचे नियम शिकतो; नैतिक मूल्येही याच परिवारापासून तो शिकतो. नैतिक नियम समाजांतील प्रत्येक घटकाने मनापासून पाळावे व त्यांचे उल्लंघन करू नये म्हणून धर्मसंस्था त्या नैतिक नियमांच्या मुळाशी ईश्वर किंवा अलौकिक शासनशक्ती आहे, अशा तऱ्हेची भावना निर्माण करण्याचा सारखा प्रयत्न करीत असते. ह्याच प्रयत्नांच्या योगाने नैतिक श्रद्धा खोल रुजत जाते. ही श्रद्धा इतकी दृढ होते की, त्या श्रद्धेला काही इतिहास आहे व ती मूलभूत नसते किंवा उपजत प्राप्त होत नसते, हेही मनुष्यांना समजेनासे होते. त्यामुळे आपणास असे वाटू लागते की, सत् व असत् हे समजण्यास केवळ निर्विकार अंतःकरणाचीच साक्ष पुरेशी आहे; परंतु वस्तुस्थिती तशी नाही. नीतीचे स्वरूप व नीतीचे नियम सर्वत्र सारखे व शाश्वत नाहीत. कारण नैतिक श्रद्धेचे स्वरूप सर्वांच्या अतं:करणात सारखे नसते. निरनिराळ्या सामाजिक परिस्थितीतील नैतिक श्रद्धेचे स्वरूप निरनिराळे असते. नैतिक मूल्यांना फार मोठा इतिहास आहे. नैतिक कल्पना सर्वकाली व सर्व तऱ्हेच्या मनुष्यसमाजात सारख्याच नसतात. सर्व मनुष्यांच्या सर्वकाली व सर्वदेशी सारख्याच नीतिकल्पना असत्या तर त्या ईश्वराने मनुष्यास दिल्या आहेत व त्या मनुष्यनिर्मित नाहीत असे म्हणता आले असते. यज्ञांत पशु मारणे वैदिक आर्यास धर्म्य वाटते व तेच चार्वाकास, जैनास आणि बौद्धास अधर्म्य व अनीतीमय वाटते. सनातनधर्मीय लोकांना मांग महार इत्यादी लोकांस स्पर्श करणे व त्यांचा स्पर्श होईल अशा तऱ्हेचे व्यवहार त्यांच्याशी करणे अत्यंत अधर्म्य व अमंगल वाटते, तर आधुनिक सुधारकांस अस्पृश्यता मानणे हेच अनितीरूप व पापकर्म वाटते. एकाकाळी मनुष्यांना यज्ञात मनुष्य बळी देण्याची चाल पवित्र वाटत होती, असे मनुष्यजातीचा इतिहास सांगतो. हिटलरचे अनुयायी असलेले जर्मन लोक, ज्यू, स्लाव, हिंदू, चिनी व मुसलमान इत्यादी बिनजर्मन जातींना शाश्वतगुलामगिरीत टाकणे, जर्मनहिताकरिता बिनजर्मन मानवजातींची लूट करणे, त्यांना फसविणे व त्यांच्याशी बदमाषी करणे हा सद्गुण मानतात. तर त्याच्या बरोबर उलट रशियन समाजवादी लोक हाच दुर्गुण समजतात आणि सगळ्या मानववंशांना व मनुष्यवर्गांना सारखेच स्वातंत्र्य प्राप्त करून देणे हाच सद्गुण समजतात. हिटलरच्या लोकांना जे ईश्वरप्रेरित कृत्य वाटते तेच मार्क्स व लेनिन यांच्या लोकांना अधर्म्य, गर्ह्य व राक्षसी वाटते. ईश्वरानेच जर नीती व अनीती ठरविली असती तर नैतिक व श्रद्धेत फरक कसा पडला असता ? तोच जर नैतिक श्रद्धेचा प्रेरक असता तर भिन्न देशकालपरिस्थितीप्रमाणे व भिन्न सामाजिकस्थितीप्रमाणे नीती व अनीती निराळी ठरली नसती.

आता नीतीचे फळ आज नाही तर पुढे केव्हा तरी व्यक्तीस मिळतेच, या श्रद्धेचा विचार करू. ही श्रद्धा सर्व मनुष्यजातीत सारख्याच तऱ्हेची नाही. पुष्कळशा रानटी जातींच्या धर्मात पारलौकिक जीवनाची कल्पना नाही; त्यामुळे या जन्मी केलेल्या कर्माचे फळ या नाही तर पुढच्या जन्मी व्यक्तीस मिळेलच, अशा श्रद्धेचा अभाव त्या जमातींच्या ठिकाणी असतो. ज्या

लोकांत पारलौकिक जीवनाची कल्पना असते, ती सुद्धा त्यांच्यात एकसारखी नसते. ख्रिश्चन व मुसलमान लोक अनेक जन्मांचे फेरे मानीत नाहीत. त्यांच्या धर्माप्रमाणे मनुष्यजन्मानंतर शेवटचा दिवस येईपर्यंत, जीव तसेच मुग्धावस्थेत पुकारा होईपर्यंत पडून राहतात व निर्णयाच्या दिवशी कर्माप्रमाणे स्वर्गात किंवा नरकांत पोंचविले जातात. हिंदुधर्माप्रमाणे जीव अनादिकालापासून विविध योनीतून फिरत फिरत स्वर्गनरकांच्या अनेक यात्रा करीत, केव्हातरी भाग्यवशात् ब्रह्मज्ञान होऊन मुक्त होत असतात. ख्रिश्चनधर्माप्रमाणे व मुसलमान धर्माप्रमाणे त्या-त्या व्यक्तीस मिळणारी जन्मसिद्ध परिस्थिती स्वकर्माने प्राप्त होत नाही. म्हणजे आपण जन्मसिद्ध. परिस्थितीस जबाबदार नसतो. हिंदुधर्माप्रमाणे मात्र सर्वच परिस्थिती स्वकर्मानुसारे प्राप्त होते. गेल्या दोन शतकांचा मनुष्येतिहास पाहिला तर असे आढळते की, "व्यक्तीस तिच्या कर्माचे फळ केव्हातरी मिळालेच पाहिजे" या भावनेशिवायच मोठमोठ्या उलाढाली किंवा महान् प्रयत्न अनंते मानवव्यक्तींनी केले आहेत. राष्ट्रीयस्वातंत्र्य, लोकसत्ता आणि समाजवाद या ध्येयांच्या सिध्यर्थ अगणित मनुष्यांनी अपरिमित हालअपेष्टा सोसल्या आहेत व अजूनही सोसत आहेत, त्यांत पारलौकिक श्रद्धेचा किंवा वर सांगितलेल्या नैतिक श्रद्धेचा काही संबंध नसतो. असंख्य व्यक्ती गेली दोनशे वर्षे वरील ध्येयार्थ अहर्निश झटत असतात, त्यांत त्या व्यक्तींना अशी श्रद्धा नसते की, त्या सत्कमांचे फळ त्या-त्या व्यक्तींना स्वतःलाच प्राप्त होईल.

नीतीचा विजय होतोच व अनीतीचा पराभवच होतो, असा कार्यकारण भाव पुष्कळांच्या विचारांत नसतो, तरी ते नीतीने वागतात व अनीतीचा परित्याग करतात. आपण ठरविलेल्या सत्कर्माचा विजय व्हावा व असत्कर्माचा पराभव व्हावा अशी उत्कट व बलवान् इच्छा मात्र त्या सत्कर्माचरणात असावी लागते. तात्पर्य असे की, व्यक्तीस स्वतःच्या कर्माचे फळ मिळतेच अशी मनुष्यमात्रांची खात्री आहे, म्हणून ते फळ देणारा ईश्वर असलाच पाहिजे, असा युक्तिवाद विवेचक बुद्धीपुढे टिकाव धरू शकत नाही.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, ईश्वर, आत्म्याचे अमरत्व व कर्मविपाकवाद यांच्या कल्पनांना मानवी जीवनांत काही मूल्य आहे. सर्वज्ञ सर्वशक्तिमान् सर्वगुणसंपन्न परमकल्याणमय ईश्वर बुद्धीने सिद्ध होवो वा न होवो, आत्म्याचे अमरत्व तर्कशुद्धबुद्धीने पटविता येवो अथवा न येवो; किंवा व्यक्तीने केलेल्या कर्माचे फळ केव्हां तरी त्याच व्यक्तीला भोगावेच लागते ही गोष्ट प्रमाणांनी शाबित होवो वा न होवो; ह्या वस्तूंचे अस्तित्व गृहीत धरल्याशिवाय मनुष्यांस संसारांत समाजधारणेसंबंधी कर्मे किंवा सत्कर्मे धीराने करता येत नाहीत, म्हणून त्या वस्तूंचे अस्तित्व गृहीत धरलेच पाहिजे. ह्या मानवबुद्धीच्या पलीकडच्या वस्तुंच्या अस्तित्वकल्पनेने मनुष्यास कर्माची व जीवनाची कृतार्थता वाटते, हेच त्या वस्तुंच्या कल्पनांचे मूल्य होय. समाजधारणेस किंवा समाजअवस्थेस ईश्वर, वर्ग, नरक, आत्मा, पारलौकिक जीवन इत्यादी वस्तुंच्या कल्पनेची आवश्यकता आहे.

या कल्पनेत अनेक दोष आहेत. पहिला दोष असा की, ईश्वरश्रद्धा व अमरत्वभावना या अलौकिक व पारलौकिक मूल्यांपेक्षां अगदी निराळ्या मूल्यांच्या म्हणजे केवळ ऐहिक मूल्यांच्या योगाने इतिहासांतील फार मोठ्या घटना घडून आल्या आहेत व येत आहेत. कला, विद्या, त्याग, शौर्य, पराक्रम इत्यादी मानवी गुण पराकाष्ठेला पोचविण्याचे सामर्थ्य ऐहिक बुद्धिगम्य मूल्यांत आहे. फ्रेंचराज्यक्रांती ज्या वर्गांनी केली, त्यांच्या जीवनाला व पराक्रमाला स्वातंत्र्य, लोकसत्ता व बंधुत्व इत्यादी सामाजिक मूल्यांचाच पाठिंबा होता. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत, लोकसत्ता व मानवी मूलभूत हक्कांची स्थापना या ध्येयाने अमेरिकेतील लोक लढले. स्पेनच्या गेल्या अयशस्वी व प्रतिक्रांतिपर्यवसायी यादवी युद्धांत लोकसत्ता, मानवीहक्क, आर्थिक गुलामगिरीचा नाश आणि समाजवाद या ध्येयांनी प्रेरित झालेल्या आंतरराष्ट्रीय शूरांनी धारातीर्थी देह ठेविले आहेत. हिंदुस्थानात फासावर गेलेले भगतसिंगासारखे लोक राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयानींच देहार्पण करून गेले. जीवन-मरणाचीच ज्या ठिकाणी कसोटी असते, त्या ठिकाणीसुद्धा अमरत्व व ईश्वर या भावनांचा नुसता स्पर्शही नसतांना महान् कार्ये सामान्य जनसुद्धा पार पाडतात. ही गोष्ट सामाजिक मानसशास्त्रास मान्य आहे. ईश्वरावर व अमरत्वावर श्रद्धा नसलेले मोठमोठे विज्ञानसंशोधक भौतिकशास्त्रांत अहोरात्र जीवापाड मेहनत करीत असतात. संशोधक माणसे केवळ ज्ञानलालसेने, व्यवसायप्रीतीने, उपजीविकेचा धंदा म्हणून किंवा समाजप्रीतीने प्रेरित होऊन व जीव धोक्यांत घालून धाडसी कृत्ये करीत असतात. आई मुलाकरिता खस्ता खाते, ती स्वर्गाकरिता किंवा ईश्वरांकरिता नव्हे. तिचा जीव मुलाच्या जीवांत मिळून गेलेला असतो; तिच्या भावना मुलाच्या हितालाच परमार्थ समजतात. केवळ माझे एका व्यक्तीचे भवितव्य काय आहे, याचीच चिंता ज्यांना असते, असे सामाजिक प्राणी फार थोडे असतात. सामाजिक क्रिया व्यापक अहंभावानेच घडत असतात. समाजात जन्माला आलेल्या मानवाचा अहंभाव सामाजिक इतिहासाच्या विशिष्ट युगानुरूप संकुचित किंवा व्यापक झालेला असतो. त्याच्या व्यापकतेची मर्यादा विशिष्ट ऐतिहासिक परिणतीवर अवलंबून असते. कुटुंबाच्या हितांकरिता उसंत न घेता खपणारी प्रजा समाजाच्या आरंभापासून आहे. तिला ईश्वर व अमरत्व नाही हे कळले तरी ती तशीच खपेल जमातीचा कायदा पारलौकिक भीतीवाचून मनापासून पाळण्याची वृत्ती रानटी लोकांतही आढळते. धार्मिक ध्येयार्थ झटणाऱ्या व्यक्तीला स्वत: च्या पावित्र्याची व पारलौकिक जीवनाचीच फार काळजी असते, व त्याकरिता तिची नीती असते. तिची ही भावना अत्यंत स्वार्थी असते. हा स्वार्थ अगदीच विकृत असतो. कारण तो केवळ भ्रामक कल्पनेवर आधारलेला असतो. समाजाची प्रगमनयुक्त धारणा, राष्ट्रवाद, समाजाचा व मानव्याचा उत्कर्ष, इत्यादी ऐहिक बुद्धिगम्य ध्येये समाजनिष्ठ आहेत, वैयक्तिक नाहीत. तेथे वैयक्तिक साध्य गौण ठरते, कारण त्या व्यापक ध्येयांत वर्तमान व भावी अनंत व्यक्तींचे हित, समाजस्थैर्य व समाजकल्याण साठविलेले

असते. ऐहिक सामाजिक मूल्यांची तरफदारी करणारा भौतिकवाद, व्यक्तीच्या काल्पनिक-पारलौकिक ध्येयांचा पुरस्कार करणाऱ्या अध्यात्मवादापेक्षा अधिक सत्य व श्रेष्ट आहे. कारण ह्या भौतिकवादांत समाजांतील सर्व व्यक्तींच्या योगक्षेमाचा अंतर्भाव होतो. धार्मिक मूल्यांतील दुसरा दोष असा की, विशिष्ट देशकालमर्यादेत महत्त्व पावलेल्या विधिनिषेधांस, भावनांस, आचारांस, विचारांस किंवा संस्थांस धर्मवाद शाश्वतमूल्य अर्पण करतो, त्यांना शाश्वत-अलौकिक शक्तींचा पाठिंबा निर्माण करतो, हाच परमेश्वरी आदेश किंवा संकेत असे सांगतो, हे ऋषीला वा महात्म्याला दिसलेले महान सत्य आहे, असे दाखवितो. त्याचा परिणाम असा होतो की, विशिष्ट देशकाली व विशिष्ट परिस्थितीतच काही आचारविचारांना जे महत्व असते ते परिस्थिति बदलल्यावर नष्ट होते आणि त्यांची अडगळ बनते. धर्ममूल्यांमुळे ही अडगळ प्रगतीच्या मार्गात अडथळा उत्पन्न करते. अपौरुषेयता, ईश्वरसंकेत, कर्मविपाक इत्यादी शाश्वतमूल्येच सामाजिक परिवर्तन करण्यास अडथळा करून प्रगतीचे वैरी बनतात. हीच धार्मिक शाश्वत मूल्ये मानवांच्या अधोगतीचीं द्वारे बनतात, असे मानवेतिहास बजावून सांगत आहे. धर्मत्व किंवा पारलौकिक मूल्य असलेली विशिष्ट ध्येये, भावना, आचार व संस्था याच प्रगतीच्या शृंखला बनतात; मनुष्यानेच जन्माला घातलेला व राखलेला धर्म व ईश्वर मनुष्यावर कुरघोडी करून त्याचा अधःपित करतो. म्हणून बुद्धिवादावर आधारलेली व गरज संपताच बदलता येणारी ध्येये व मूल्ये यापुढे पाहिजेत. धर्ममूल्यास रजा दिली पाहिजे. धर्ममूल्यांचा तिसरा दोष असा की, धर्मसंस्थेवर सत्ताधारी वर्गाच्या लोकांचा प्रभाव पडतो व ते त्या धर्ममूल्यांचा व धार्मिक विचारसरणीचा उपयोग जनतेला गुलामगिरीत व अज्ञानात ठेवण्याकडे करतात. ईश्वरवाद, अमरत्व, पापपुण्य व कर्मविपाक यांचा उपयोग आपला सामाजिक दर्जा, सत्ता व भोगसाधने कायम करण्याकडेच सत्ताधारी वर्गाने केला आहे, असे सगळ्याच धर्मांचा इतिहास सांगतो. जातिभेदातील विषम कायदे व अस्पृश्यतेची संस्था धर्ममूल्यांनीच हजारो वर्षे जगविली. ग्राम्य भौतिक स्वार्थ साधण्यास गूढ अध्यात्मवादाचा चांगला उपयोग होतो.

भौतिकवाद हा अनैतिक असतो व गूढ अध्यात्मवाद हा नैतिक असतो, असा मेळच चुकीचा आहे. गूढ अध्यात्मवादाच्या पोटीं ग्राम्य व घृणित भौतिकवाद समावलेला असतो, आणि तात्त्विक भौतिकवादाच्या पोटांत अत्यंत उच्च दर्जाचा अध्यात्मवाद साठविलेला असतो. मनुष्याची बौद्धिक व मानसिक उन्नती हाच मानवी जीवनातील अध्यात्मवाद होय. समाजातील सगळ्या घटकांचा नित्य योगक्षेम नीट चालविण्याची तरतूद केल्याशिवाय, विद्या व कला यांची द्वारे सगळ्या मानवांस पूर्णपणे उघडी केल्याशिवाय, प्रगतीची सगळी साधने सगळ्या समाजघटकांस प्राप्त होऊ शकतील, अशी व्यवस्था केल्याशिवाय, समाजांत श्रेष्ठ अध्यात्मवाद अवतरणारच नाही. आत्म्याच्या म्हणजे मनुष्यांच्या शक्तींचा विकास करणे हाच मानवी जीवनातील अध्यात्मवाद होय, ह्या विकासाकरितां सृष्टीतील सगळ्या शक्तींचे

साहाय्य विज्ञान व कला यांच्याद्वारे घेणे यास तात्त्विक भौतिकवाद म्हणतात. सामाजिक उच्च ध्येयांची साधना म्हणजे अध्यात्मवाद होय.*

(७) ईश्वरीसत्तेच्या सिद्धीकरिता काही प्राचीन व आधुनिक चिकित्सक असे सांगतात कीं, मनुष्यजातीचा धार्मिक अनुभव हाच ईश्वरीसत्तेचा पुरावा आहे. ज्यांत धर्मसंस्था नाही अशी एकही मानवी जमात किंवा असा एकही मनुष्यसमाज नाही. रानटी समाजापासून सुधारणेच्या शिखरावर पोचलेल्या समाजापर्यंत सर्वत्र धर्मसंस्थेचे अस्तित्व आहे. याचा अर्थ असा आहे की, मनुष्याला ज्याप्रमाणे अंतरबाह्य इंद्रियांनीं विश्वाचा नित्य अनुभव येत असतो, त्याप्रमाणे ईश्वरी अलौकिक सत्तेचाही अनुभव येत असतो. काही मनुष्ये धार्मिक नसतात, म्हणजे काही मनुष्यांना धार्मिक श्रद्धा नसते, हे खरे आहे. काही लोक जन्मांध असतात, त्यांना प्रकाश व रंग म्हणजे काय हे समजत नाही, त्याप्रमाणे या नास्तिकांना ईश्वरी सत्तेचा अर्थ समजत नाही. परंतु साधारणपणे धार्मिक श्रद्धा असलेले लोकच पुष्कळ असतात. म्हणजे कोणत्याना कोणत्या स्वरूपात तरी अलौकिक दिव्यशक्तीची संवेदना असंख्य मानवांच्या ठायी असतेच. ही संवेदना सर्वांच्या ठायींसारख्या स्वरूपात नसते. रानटी लोकांच्या धार्मिक कल्पना व सुधारलेल्या समाजांतील तत्त्वज्ञ साधूंच्या धार्मिक कल्पना यांच्यामध्ये फार तफावत असते. परंतु त्यांत अलौकिक शक्तीच्या अस्तित्वाचा प्रत्यय, हे साम्य असतेच. त्या प्रत्ययांत त्यांच्या त्या-त्या सामाजिक परिस्थितीतील हीनोच्च कल्पनांची मिसळ झालेली असते, त्यामुळे त्यांच्यात तफावत दिसत असते. हीन समाजसंस्थेतील असस्कृत मनुष्यांचा धार्मिक अनुभव अधिक मलीन व अस्पष्ट असतो व उच्च सामाजिक स्थितीतील मनुष्यांचा विशेषतः साधुंचा धार्मिक अनुभव अधिक शुद्ध व स्पष्ट असतो. हा सार्वत्रिक स्वरूपाचा धार्मिक अनुभवच ईश्वरीसत्तेचे मुख्य प्रमाण होय.

यावर उत्तर असे आहे – धार्मिक अनुभव म्हणून ज्या भावनेचा उल्लेख केला आहे, ती भावना "वस्तुस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव" या सदरांत पडत नाही. धार्मिक भावना "वस्तुस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव" या स्वरूपाची असती तर ती प्रमाण मानल्याशिवाय कोणासही गत्यंतर नव्हते. कारण मनुष्याच्या बुद्धिवादाचा प्रत्यक्ष अनुभव हाच खरा आधार आहे. धार्मिक भावना ही श्रद्धात्मक असते. श्रद्धा म्हणजे प्रत्यक्ष अनुभव नव्हे. ती अनेक कारणास्तव उत्पन्न होत असते. वडील माणसे बालपणापासून ज्या तऱ्हेच्या कल्पना लहान मुलांच्या ठायी बिंबवीत असतात, त्या कल्पनाच दृढमूल होऊन श्रद्धेचे स्वरूप धारण करीत असतात. मनुष्यजातीच्या श्रद्धेचा इतिहास असे सांगतो की, मनुष्यजातीने आजपर्यंत कितीतरी खोट्या किंवा मिथ्या कल्पनांनी निर्मिलेल्या अंधश्रद्धा हृदयाशी बाळगल्या आहेत. खोल अंधश्रद्धेमुळे अनेक प्रकारचे प्रत्यक्ष आभास तयार होतात व भ्रांती उत्पन्न होत असते. लोक धार्मिक श्रद्धा खोल रुजविण्याकरिता ज्या साधनांचा उपयोग करतात तीं

* · हिंदुधर्माची समीक्षा पृष्ठ २२३ ते २२७.

साधने ईश्वराचा वस्तूस्थितिमूलक अनुभवासारखा प्रत्यक्ष अनुभव उत्पन्न करीत नाहीत. धार्मिक प्रवचने, पुराणे, कथा, कीर्तने, उत्सवसमारंभ, श्राद्ध, पूजा, भजन इत्यादी साधनांच्या योगाने धार्मिक कल्पनाच लोकांच्या ठायी बिंबविण्याचा प्रयत्न धर्मसंस्था करीत असते. त्या कल्पना उत्पन्न करण्याकरितां धर्मसंस्थेस फार मोठा अट्टाहास करावा लागतो. त्या कल्पना म्हणजे प्रत्यक्ष अनुभव नव्हे. त्या कल्पना कविकल्पनेसारख्या असतात; आणि कविकल्पना ज्याप्रमाणे रागद्वेषादी भावना निर्माण करतात, त्याप्रमाणे ह्याही कल्पना भावनांना उत्तेजित करतात. कविकल्पनांचा विषय सत्यसृष्टीत अस्तित्वांत नसतो अशी खात्री कविकल्पनांचा अनुभव घेत असता आपल्या मनात सुप्त किंवा जागृत स्वरूपांत जशी असते तशी धार्मिक कल्पनांचा अनुभव घेता येत नसतो. उलट धार्मिक मनुष्यास धार्मिक कल्पनांचा विषय सत्यच आहे, अशी खात्री असते. त्यामुळे धार्मिक कल्पनांमध्ये भावनोत्पत्तीचे सामर्थ्य कविकल्पनेपेक्षा फार मोठे असते. हे सामर्थ्य धार्मिक आचरणामुळे व धार्मिक संस्थेचे घटक बनल्यामुळे इतके वाढते कीं, सत्यसृष्टी असत्य व गौण वाटूं लागते आणि काल्पनिक सृष्टीच सत्य व मुख्य वाटू लागते. काही काळाने आपण धार्मिक संस्कार अविरतपणे सारखे खोल व दृढ बनवीत जातो त्यामुळे नसती धार्मिक सृष्टी किंवा असत्य असलेले धार्मिक जगत् नुसत्या कल्पनेचाच विषय न राहता, प्रत्यक्ष अनुभवाचा विषय बनते. हा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे मनुष्याने दीर्घ प्रयत्नाने निर्माण केलेली व स्वतःवर लादून घेतलेली भ्रांतिच होय. ही धार्मिक सृष्टि किंवा धार्मिक जगत् म्हणजे ईश्वर, जीवात्मे, अदृश्यपणे संचार करणारे सूक्ष्मशरीरधारी महात्मे, देवता, स्वर्ग, सप्तलोक, इत्यादी वस्तू होत. ह्या वस्तू वस्तुतः केवळ काल्पनिक अतएव मिथ्या असूनही धर्मशील अंतःकरणाला किंवा दुर्बल परंतु भावनाशील मनाला निरंतर श्रवण, मनन व निदिध्यास केल्यामुळे खऱ्या वाटू लागतात, व अत्यंत भावनावश स्थितीत प्रत्यक्ष प्रत्ययास येतात; हा प्रत्यय पूर्वसंस्कारामुळे, सारखा ध्यास घेतल्यामुळे व भावनांच्या आवेशामुळे येतो. तो केवळ कल्पनेचाच खेळ असतो. तो बनावट असतो. ते वस्तूदर्शन नसते.

(८) ईश्वरी सत्तेचे साधूंचा किंवा ऋषींचा दिव्य व अलौकिक अनुभव हे एक महत्त्वाचे प्रमाण आहे, असे धार्मिक लोक सांगत असतात. साधुंना अंत:करणांत ईश्वरी सत्तेचे स्फुरण अनुभवास येते, हे स्फुरण सामान्य लोकांच्या अनुभवास येत नसल्यामुळे ईश्वरी सत्तेबद्दल संशय उत्पन्न होतो. धार्मिक लोक असे सांगतात की, इंद्रियजन्य अनुभवापेक्षा हा अनुभव अत्यंत श्रेष्ठ असतो. म्हणून साधुंच्या या अनुभवास इतर लोकांनी मान्यता दिली पाहिजे. हिमालयांतील मानस सरोवर ज्यांनी पाहिले त्यांच्या शब्दास जसे मानस सरोवरास भेट देणे ज्यांना अशक्य आहे, असे लोक प्रमाण मानतात; आपला जन्म ह्या आईपासून झाला, हे जसे आपण त्या आईच्या सांगण्यावरूनच खरे मानतो; त्याप्रमाणे साधुचे शब्द आपण खरेच मानले पाहिजेत.

यावर एक महत्त्वाचे उत्तर असे आहे की, सगळ्या साधुंच्या ईश्वरविषयक अनुभवांमध्ये ऐकमत्य व सारखेपणा नाही. एकाच वस्तूबद्दल परस्पर विसंगत अनुभव येत असतील तर, त्या अनुभवांपैकी कोणता अनुभव खरा, हे आपणास तर्कशास्त्राच्या नियमांच्या अनुसाराने ठरवावे लागते. ते सगळेच अनुभव खरे, असे म्हणणे अयोग्य होय. ईश्वराबद्दल निरनिराळे साधू निरनिराळा व परस्परविरोधी अनुभव सांगतात, हे निरनिराळ्या धर्मग्रंथांवरून समजून येते. काही साधू म्हणतात की, विश्व व ईश्वर भिन्न आहेत; कोणी म्हणतात, ईश्वर विश्वरूपच आहे; कोणी म्हणतात, विश्व मिथ्या व ईश्वरच सत्य आहे; कोणी म्हणतात, ईश्वर सगुणच आहे; कोणी म्हणतात, निर्गुणच आहे, कपिल, बुद्ध, महावीर, चार्वाक इत्यादी साधु सांगतात कीं, ईश्वर नाहीच. असे हे परस्परविरुद्ध अनुभव विचारात घेतल्यास त्यांपैकी एकच अनुभव खरा आहे व इतर खोटे आहेत, असेच तर्कशास्त्रदृष्ट्या सिद्ध केले पाहिजे. ईश्वराचे सत्यत्व तर्कदृष्ट्या सिद्धच होत नाही; म्हणून कपिल, बुद्ध, महावीर व चार्वाक यांचा ईश्वराच्या नास्तिक्याचा अनुभवच खरा, असे म्हणणे भाग आहे. ईश्वरानुभव येतो असे ज्या साधुंस वाटते, त्या साधुंना तो अनुभव भावनाच्या बळामुळे, श्रद्धेमुळे किंवा निरंतर ध्यास घेतल्यामुळे येतो. तो अनुभव ईश्वर या वस्तुच्या जबरदस्तीमुळे येत नाही, किंवा ईश्वर या वस्तुच्या संनिकर्षामुळे येत नाही, किंवा ईश्वर ही वस्तू हुडकून काढल्यामुळे किंवा ईश्वर ही वस्तू निर्मिल्यामुळे येत नाही. मला शीतोष्णांचा अनुभव त्या वस्तुंच्या जबरदस्तीमुळे माझी इच्छा नसताना व अगोदर त्यांच्या कल्पनांचा लेशही नसतानाच येतो; मला डोळ्याने आम्रवृक्ष दिसतो, तो प्रकाशात चक्षुशी वृक्षाचा संनिकर्ष घडला म्हणून दिसतो; मला लपलेला चोर हुडकून काढल्यामुळे दिसतो, मला आगगाडीचे एंजिन दिसते, ते मी (म्हणजे मनुष्यजातीने) निर्मिले म्हणूनच दिसते; यापैकी कोणत्यांच प्रकाराने ईश्वराचा अनुभव येत नाही. तो केवळ भावनांच्या बळामुळे दिसतो, तो अकल्पित रीतीने कोणास कळत नाही. वस्तुस्थितीचे सामर्थ्य असे असते की, ती अकल्पित रीतीने व भावनांच्या बळाचा काही उपयोग न करताच, मनुष्याच्या अनुभवास येते. ईश्वर ही वस्तू अशी नाही. म्हणून ती वस्तू नाहीच असे म्हणणे प्राप्त होते.

२६. विज्ञान व ईश्वर

अलीकडे पाश्चात्य देशांत ईश्वर, जीवशक्ती, चैतन्यवस्तु किंवा स्वतंत्र बुद्धितत्त्व यांचे अस्तित्व सिद्ध करण्यास अनुकूल अशी प्रवृत्ति कांही विज्ञानसंशोधकाच्या ठिकाणीं उत्पन्न होऊ लागली आहे. याचा अर्थ हिंदुस्तानांतील धर्मभोळे शिक्षित लोक असा करतात की, आधुनिक विज्ञानांचा जुना जडवादी पाया गडगडू लागला असून आता विज्ञाने अध्यात्मवादाकडे दीनदृष्टीने धाव घेऊ लागली आहेत. विज्ञाने वैचारिक संकटांत सापडली असून त्यांना ईश्वरवाद, आत्मवाद, इत्यादी धार्मिक तत्त्वांचा आश्रय केल्याशिवाय गत्यन्तर

राहिले नाही. इतकेच नव्हे तर (अ) पदार्थविज्ञानात व विकासवादांत शास्त्रज्ञ लोक ईशसत्तेचा स्वीकार करावयास लागले आहेत, (आ) वनस्पतिशास्त्राचा व जीवशास्त्राचा स्वतंत्र स्वयंभू जीवतत्त्व मानल्याशिवाय निर्वाह लागत नाही, (इ) आणि आधुनिक मानसशास्त्रास तर देहभिन्न गूढमनांचा सुगावाच लागला आहे.

वरील मताचा परामर्श घेऊन चालं विषयाची समाप्ती करू. आधुनिक विज्ञानांचा ईशसत्तेस, स्वतंत्र अशा आत्मसत्तेस किंवा स्वतंत्र अशा जीवसत्तेस पाठिंबा मिळू लागला आहे, अशी जी आस्तिक लोकांची समजूत होऊ लागली आहे, त्यांत गैरसमजाचाच भाग फार मोठा आहे. पहिल्यांदा या संबंधी एक गोष्ट निश्चितपणे ध्यानांत घेतली पाहिजे. ती ही कीं, आधुनिक विज्ञानांपैकी कोणत्याही विज्ञानाने ईशसत्ता किंवा स्वतंत्र जीवसत्ता कोणत्याही पक्क्या प्रमाणाने सिद्ध केली नाही. विज्ञानदृष्ट्या कोणतीही गोष्ट सिद्ध करावयास जो व ज्या तऱ्हेचा भरपूर पुरावा लागतो तो व त्या तऱ्हेचा पुरावा या विषयांत मिळाला आहे, असे कोणतेही विज्ञान ठासून सांगू शकत नाही. विज्ञानांत वस्तूकल्पनेच्या किंवा वस्तूविचाराच्या तारतम्याने तीन श्रेणी सांगितलेल्या असतात; त्यापैकी कोणत्याही श्रेणीत ईश्वरकल्पना वसत नाही. (१) तावून सुलाखून अनुभवाने व प्रयोगाने गणिताच्या आश्रयाने सिद्ध केलेल्या वस्तुंच्या कल्पना (Demonstrated Truth) पहिल्या श्रेणीत येतात; उदा. पदार्थ विज्ञानांतील ९२ द्रव्ये (Elements) व रसायनांतील संयुक्त द्रव्ये (Chemical Compounds) पहिल्या श्रेणीत येतात. ईश्वराच्या गुणधर्माचे मोजमाप दाखविणारी प्रयोगशाळा अजून कोणत्याही शास्त्रज्ञाला स्थापिता आली नाही. (२) आवश्यक व योग्य असलेल्या परंतु प्रयोगाने किंवा अनुभवाने सिद्ध न झालेल्या कल्पना अथवा अनुमाने (Hypothesis) दुसऱ्या श्रेणीत येतात. उदा. जीवशास्त्रातील विकासवाद, पदार्थविज्ञानातील आकर्षणशक्ती (Force of Gravity) व ज्योतिषशास्त्रांतील (Astronomy) तेजोमेघाची (Primordial Nebula) कल्पना दुसऱ्या श्रेणीतील कल्पना होत. त्या प्रयोगाने व अनुभवाने सिद्ध झालेल्या पहिल्या श्रेणीतील कल्पनांना पोषक असतात; व पहिल्या श्रेणीतील कल्पनांच्या मदतीनेच या कल्पनांची रचना शाखज्ञाची बुद्धी करीत असते. कित्येक वेळा अशा तऱ्हेच्या कल्पना भरपूर पुरावा मिळाल्यानंतर पहिल्या श्रेणीत सुद्धा समाविष्ट होतात; किंवा त्याच्या उलट विरुद्ध पुरावा मिळून त्या खोट्या ठरून त्याज्य ठरतात. हर्षल व नेपच्यून हे तारे पहिल्यांदा नुसत्या अनुमानाने अवगत झाले होते. कालांतराने त्यांची प्रत्यक्ष सिद्धी झाल्यावर पहिल्या श्रेणीत त्यांचा प्रवेश झाला. पदार्थविज्ञानातील ईथरची कल्पना आइन्स्टिनच्या आकाशकल्पनेने अनावश्यक ठरू लागली आहे. ईथरची कल्पना चुकीची आहे, असे लवकरच सिद्ध होण्याचा संभव आहे. तिसऱ्या श्रेणीत संभाव्य कल्पनांचा समावेश होतो. उदाहरणार्थ आधुनिक मानसशास्त्रातील दोन मनांची कल्पना होय. जागृत व स्पष्ट आणि गूढ व सुप्त अशी दोन मने मनुष्याच्या ठिकाणी असावीत, असा कयास काही मानसशास्त्रज्ञ करतात. पुष्कळशा

मानसशास्त्रज्ञांना अशा दोन मनांच्या कल्पनांची आवश्यकता वाटत नाही. जीवशास्त्रातील स्वतंत्र जीवशक्तीची (Vital Force) कल्पना या तिसऱ्या श्रेणीतच मोडते. प्रत्येक शास्त्रात अशा अनेक कल्पना असतात की, त्या शास्त्रातील अनेक तज्ज्ञास संपूर्णपणे मान्य नसतात. काहीं शास्त्रज्ञ त्या कल्पना सुचवीत असतात, परंतु त्या कल्पनांची स्वीकार्यता शाबीत करणे अत्यंत कठिण असते. दोन मनांच्या अस्तित्वाची व जीवशक्तीच्या स्वतंत्र अस्तित्वाची कल्पना अशीच अत्यंत विवाद्य आहे. जुन्या पिढीतील जीवशास्त्रज्ञ जीवशक्तीचे स्वतंत्र अस्तित्व कल्पू लागले होते, परंतु नवी पिढी आता त्या कल्पनेवर भरवसा ठेवण्यास मुळींच तयार नाही.

वरील तीन श्रेणीत ईश्वरकल्पना मुळीच बसत नाही. एडिटन, जेम्स जीन्स, व्हाइट हेड इत्यादी आधुनिक विज्ञानपंडित ईश्वरकल्पनेचे सत्यत्व सिद्ध करू पहात आहेत, ही गोष्ट खरी आहे, तरी विज्ञानाचा पाठिंबा ईश्वरकल्पनेस आहे असे यावरून सिद्ध होत नाही. कारण वरील पंडितांनी जे ग्रंथ लिहिले आहेत त्यात सांगितलेली ईशसत्तेचीं प्रमाणे तर्कशास्त्राच्या कसोटीस उतरणारीं नाहीत. भावनेच्या भरामुळे त्यांना ईश्वर असावा असे वाटते. धार्मिक संस्कार त्यांना ईश्वरसत्तेवर श्रद्धा ठेवण्यास प्रवृत्त करतात.

ही गोष्ट खरी आहे की, हल्ली विज्ञानाचे मूलभूत तार्किक सिद्धांतच बरोबर आहेत, की नाहीत, असा प्रश्न विज्ञानपंडित उत्पन्न करीत आहेत. असे प्रश्न पदार्थविज्ञानातील ज्या शोधांमुळे उत्पन्न झाले आहेत, त्या शोधांच्या संशोधकांचे मॅक्स प्लांक व आइन्स्टिन हे दोन अग्रणी होत. या दोघांचे म्हणणे मात्र असे आहे कीं, विज्ञानांच्या मुळाशी असलेले तार्किक सिद्धान्त डळमळू लागले आहेत, असे जे समजतात, त्यांचा कांहीतरी गैरसमज झालेला दिसतो. मॅक्स प्लांक याने "विज्ञान दिग्भ्रमात सापडले आहे काय ?" (Where is Science Going) या ग्रंथांत स्पष्टपणे बजावले आहे की, कार्यकारणभावाचा नियम व बाह्य विश्वाचे अस्तित्व या दोन तार्किक सिद्धांतांच्या आश्रयांशिवाय विज्ञानाची प्रगतीच अशक्य आहे. या पुस्तकाच्या शेवटी त्या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीच्या संपादकाने आइन्स्टिन व मॅक्स प्लांक यांच्याशी झालेली या विषयाची चर्चा दिली आहे. त्या चर्चेत आइन्स्टिन असे म्हणतो की, एडिंग्टन, जेम्स जीन्स वगैरे लेखक जरी चांगले पंडित असले तरी त्यांनी ईश्वरसंबंधी लिहिलेले ग्रंथ वाङ्मयदृष्ट्याच चांगले आहेत. त्या ग्रंथांना विज्ञानदृष्ट्या काही किंमत देता येत नाही. आधुनिक शास्त्रज्ञांनी केलेले ईशसत्तेचे समर्थन आइन्स्टिनने म्हटल्याप्रमाणे केवळ वाङ्मायिक कल्पनांचा विलासच होय. विचाराच्या शुद्ध कसोटीस त्यातील एकही कल्पना उतरत नाही. स्वतंत्र जीवशक्तीच्या सिद्धीस जीवशास्त्र पाठिंबा देत नाही, (पृष्ठ ३४ ते ५५ पहा) आणि ईश्वरकल्पनेस विज्ञानातील कार्यकारणभावाचे नियम उचलून धरीत नाहीत (पृष्ठ ७० ते ९० पहा) हे मी मागे दाखविले आहेच.

मॅक्स प्लांकचा प्रमाणबध्दतेचा सिध्दान्त (Quantum Theory) आणि आइन्स्टिनचा

सापेक्षतेचा सिध्दान्त (Theory of Relativity) यांनी विज्ञानात मौलिक फरक घडवून आणल्यामुळे आता विज्ञानात मूळभूत मानलेल्या तत्त्वांची फेरतपासणी करून पुन्हा निराळी मांडणी करण्याची आवश्यकता भासू लागली आहे, असे एडिंटन "The Philosophy of Physicists" या पुस्तकाच्या प्रारंभी सांगतो; व याच दोन सिध्दान्तांच्या आधारावर स्वतःची ईशसत्तेची कल्पना सिध्द करण्याचा प्रयत्न करतो; म्हणून वर प्लांक व आइन्स्टिन यांचेच स्वसिद्धान्तविषयक मत सांगितले. वरील दोन सिद्धान्तात हाइसेनबर्ग, श्लिक इत्यादी पंडितांनी अनियमवादाची (Indeterminism) भर टाकली आहे. अणूंच्या वास्तविक स्थितिगतींचा (Position and Speed of Electrons) निश्चय करण्यास मनुष्याला कायमची अडचण राहणार आहे असे हाइसेनबर्गने सिध्द केले आहे. अनियमवादावरून एडिंटन असे अनुमान काढतो की, अणूंच्या गतीस प्रेरणा देणारी एक स्वतंत्र इच्छाशक्तीअसली पाहिजे. अणूंच्या गतीत जो लहरीपणा दिसतो तो इच्छाशक्तीचा द्योतक आहे.

आपल्या इच्छेमध्ये जे स्वातंत्र्य असते, ते अणूंच्या गतीच्या मुळाशी असलेल्या इच्छेतही असलेच पाहिजे. लहान मुले खेळ मांडता मांडता लहर फिरली तर एकदम मोडून टाकतात. आपणसुद्धा काही दिवस चालविलेले कार्यक्रम बदलून टाकतो. तसेच विश्वांतील घडामोडीत लहरीप्रमाणे काम करणारी शक्ती आहे, असे वाटते. हे एडिटनचे अनुमान दुर्बल आहे; कारण हाइसेनबर्गचा अनियमवाद म्हणजे अणूंच्या स्थितिगतींचा अनिश्चय, हा अणूंची गति कार्यकारणभावाच्या नियमांनी बद्ध नाही, असे सूचित करीत नाही, तर मनुष्याला नियम बध्दतेचे तपशीलवार संशोधन करण्यास लागणाऱ्या साधनांतच दोष आहे, एवढेच दाखवितो. अनियमवादाने मानवी दौर्बल्य प्रकट झाले आहे एवढेच फार झाले तर म्हणता येईल.

ईश्वरकल्पनेवर विज्ञानदृष्ट्या मूलभूत आक्षेप असा आहे. ज्ञान, इच्छा व भावना यांनी संपन्न असा आत्मा म्हणजेच ईश्वर होय. परंतु आत्मा देहाहून निराळा आहे, हेच अगोदर सिद्ध होऊ शकत नाही. देहामध्ये देहभिन्न स्वतंत्र आत्मा आहे, हे तत्त्व सिद्ध झाले तरच विश्वाच्या मुळाशी परमात्मा (परम-आत्मा) आहे, हे सिद्ध करण्यास थोडासा आधार मिळेल. येथे थोडासा म्हणण्याचे कारण सांख्यांनी स्वतंत्र जीवात्मा मानूनही परमात्मा मानिला नाही. या जीवात्म्याच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या कल्पनेवरच परमात्म्याची कल्पना मनुष्यास सुचली आहे. एवढेच नाही, तर देहातील ज्ञाता असा आत्मा स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे ही कल्पना खोटी आहे, असे सिद्ध झाल्यास परमात्म्याची कल्पना आपोआपच खोटी ठरते. ईश्वरकल्पना आत्म्याच्या कल्पनेवरच अवलंबून आहे. देहात आत्मा निराळा आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास समर्थ असा अनुभवाचा व तर्काचा पुरावा नाही हे मागे सांगितले आहेच.

पिण्डातील व ब्रह्मांडातील गूढ व अनिश्चित प्रश्नांचा नीट उलगडा करण्याकरिता ईश्वराची कल्पना चिकित्सक दृष्टीच्या मनुष्याने उत्पन्न केली आहे. परंतु यांत मोठा तार्किक किंवा

बौद्धिक प्रमाद ईश्वरवादी करतो, हे त्याला स्वत:ला समजत नाही; हेच मोठे आश्चर्य आहे. तो प्रमाद असा आहे की, एक गूढ उकलण्याकरिता दुसऱ्या अतिगूढ कल्पनेचा आश्रय ईश्वरवाद्याने केला आहे. तर्कशास्त्राचा असा एक महत्वाचा नियम आहे की, अनिश्चित व गूढ परिस्थितीचा उलगडा निश्चित व स्पष्ट कल्पनेनेच केला पाहिजे. नाहीतर ज्यास अंधुक व अस्पष्ट दिसते अशा मनुष्यास जन्मांधाने मार्ग दाखविण्यासारखे होईल, ज्ञानेच्छासंपन्न असा देहभिन्न आत्मा असू शकतो या कल्पनेचा नीट अर्थच करता येत नाही. अशा स्थितीत ब्रह्माडाच्या मुळाशी असलेल्या सर्वज्ञ आत्म्याची कल्पनाही असमर्थनीय ठरते. मानवी अनुभव व तर्क या वस्तूंचा नीट उलगडा करू शकत नाही, असा कबुलीजबाब आद्य शंकराचार्यांसारख्या महान् दार्शनिकानी याचकरिता देऊन ठेविला आहे.

ज्ञान, इच्छा व भावना यांचा उदयास्त विषयसंसर्गावर अवलंबून असतो. विषयसंसर्गावर अवलंबून नसलेल्या ज्ञान, इच्छा व भावना यांचे ईश्वराच्या ठिकाणी अस्तित्व आहे, अशी कल्पनाच अर्थहीन आहे. रूपरसगंध इत्यादी विषय ईश्वराने निर्माण केले आहेत, असे म्हणतात. या विषयांच्या अस्तित्वावर ईश्वराच्या ज्ञानेच्छाभावनांचे अस्तित्व अवलंबून नाही, असे म्हणावे लागते. परंतु ज्ञान, इच्छा किंवा भावना या विषयाधीन असतात, या तत्त्वाशी वरील कल्पना विसंगत ठरते. ईश्वराच्या ठिकाणी असलेल्या ज्ञान, इच्छा व भावना शाश्वत आहेत की, अशाश्वत आहेत ? शाश्वत ज्ञान इच्छा किंवा भावना कशा असू शकतात हे कोणासही उलगडता येणार नाही. त्या अशाश्वत असल्यास त्यांचे अस्तित्व विषयांच्या आधीन आहे, हे आपोआपच सिद्ध होते. आणि विषयांच्या आधीन असलेल्या ज्ञानाने, इच्छेने व भावनेने युक्त असलेला ईश्वर मनुष्याच्या आत्म्यासारखाच विषयाने वद्ध आहे, असे सिद्ध होते. ज्या तऱ्हेचा ईश्वर ईश्वरवाद्यांस सिद्ध करावयाचा आहे तो असा विषयबंधनांत सापडलेला ईश्वर नाही. त्यांचा ईश्वर मुक्त आहे. ईश्वर हा विषयबद्ध आहे, असे सिद्ध झाल्यास त्या ईश्वराकडे मोक्षाची याचना कोणताही समंजस मनुष्य करणार नाही. स्वतःच जो बद्ध असतो तो दुसऱ्यास बंधमुक्त करू शकत नाही. बंधमुक्त अशा ईश्वराची कल्पनाच अर्थहीन, विसंगत व बाधित आहे. ईश्वरकल्पनेचे विवरण केल्यास ती शुद्ध व व्यवस्थित विचारांच्या मर्यादेत बसू शकत नाही. असंबद्ध, अव्यवस्थित, अस्पष्ट आणि विसंगत कल्पनांच्या समूहाने ईश्वरास जन्म दिला आहे. तत्त्वज्ञांचा व महात्म्यांचा ईश्वर सूक्ष्म परंतु विसंगत अशा कल्पनातून जन्मला आहे. सामान्य व भाबड्या भक्तांच्या ईश्वराची मूर्ती निदान आपल्या मनःचक्षुपुढे नीट उभी राहू शकते. कविकल्पनांनी रचलेले चित्र जरी खोटे असले, तरी ते आपल्या बुद्धीस व अंतःकरणास खेचून घेते व मोहून टाकते. तसेच सहृदय भक्तांच्या ईश्वराचे चित्र व चरित्र असते. मात्र ते केवळ काल्पनिक असते. तत्त्ववेत्त्यांचा महात्म्यांचा व महंतांचा सूक्ष्म ईश्वर विवरण करून पाहिल्यास काल्पनिक व शून्यरूप ठरतो आणि त्याच्या अभावाची सिद्धी होते. तो नाही अशी खात्री करणारी प्रमाणेच बुद्धिवाद्यांच्या

सेवेस हजर राहतात.

म्हणूनच कणाद, कपिल, बुद्ध व चार्वाक हे सत्त्वशील, शुद्ध चारित्र्याचे आदर्श बनलेले तत्त्वज्ञ व मनुष्यजातीचे मार्गदर्शक ईश्वराच्या वाटेस गेले नाहीत व त्या वाटेस जाऊ नका असा संदेश देऊन गेले. मनुष्याच्या शुद्ध चारित्र्यास व वर्तनास ईश्वराच्या कल्पनेची आवश्यकता नाहीत, हे त्यांच्या पवित्र चारित्र्याने व उदात्त विचारसरणीने आपोआप सिद्ध झाले आहे. ईश्वरकल्पनेचा उपयोग करून मनुष्य जातीला अधोगतीला नेणाऱ्या स्वार्थी लोकांची जगात व जगाच्या इतिहासांत मुळीच वाव नाही. मनुष्याच्या सामाजिक व वैयक्तिक उन्नतीला पारलौकिक,अलौकिक व गूढ अशा ईश्वरविषयक कल्पनांची यापुढे मदत होणार नाही, तर अडथळाच होणार आहे.

श्री गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती

(संक्षिप्त चरित्र)

वाय १८४-२५

श्री गुरुवर्य स्वामी केवलानन्द सरस्वती

आधुनिक कालांतील प्राचीन आचार्याचा आदर्श

संक्षिप्त चरित्र

लेखक -- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.

कृष्णा पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. वाई हा गांव उगमापासून पंधरा मैलांचे अंतरावर कृष्णेच्या कांठी पश्चिमेकडून पूर्वेकडे असा लांबट, मुख्यतः उत्तर तीरावर वसला आहे. दक्षिण तीरावरील बरीचशी वस्ती नवी आहे; वाड्या मात्र जुन्या आहेत. कृष्णा नदी वाईमधून सरळ रेषेत पश्चिमेकडून पूर्वेस वाहत आहे. येथे कृष्णेच्या उत्तर तीरावर सात आळींचे मजबूत बांधलेले चिरेबंदी घाट एका ओळीत लागले आहेत. गुरुवर्यांचे वसतिस्थान गंगापुरीच्या घाटावर आहे. ते येथे गेली पन्नास वर्षे निरंतर वास करीत आहेत, हा घाट रुंद व कांतीव दगडांचा बांधला आहे. ज्याला चौदा पायऱ्यांची सुगम, सुरेख व सम उतरंड आहे. या सरळ, मजबूत व विस्तृत घाटावरून पावसाळ्यांतील प्रवाह तुफानी वेगाने वाहत असतो. या घाटाच्या दोन्ही टोकांना पिंपळ व वड यांचे मोठे वृक्ष चिरेबंदी पारांच्या पक्क्या अधिष्ठानावर उभे आहेत. वाईच्या भोंवताली सर्व बाजूंनी वेढणारे लांबलचक पसरलेले सह्याद्रीचे फाटे नभोमंडळाला भिडलेले दिसतात. उत्तर व दक्षिण बाजूंचे पर्वत दीडदोन मैलांच्या अंतरावर आहेत. पूर्व व पश्चिम बाजूंच्या पर्वतांचे अंतर यापेक्षा पुष्कळ आहे. पूर्वेस चंदन व वंदन किल्ल्यांचे दुरून दर्शन घडते. या किल्ल्यांच्या पाठीमागूनच उषा मंगलरूप धारण करून प्रकट होत असते. उंच पर्वतांच्या परिसरांतच उषा, संध्या, मध्यान्ह इत्यादी दिवसरात्रींचे विभाग, छाया-प्रकाशांचीं वैचित्र्यपूर्ण वैभवे अधिक चांगल्या रीतीने प्रकट करतात; एकाच वेळी देखील भिन्न स्थलांवरून भोवताली पसरलेले एकाच प्रकारचे विश्व भिन्न प्रकारचे दिसते. सपाट प्रदेशांत स्थलकालांचे हे मायामय विविध स्वरूप अनुभवास येत नाही. वाईच्या परिसरांतील निसर्गदेवता वैदिक मंत्रांच्या प्रतिभेने उत्तेजित झाल्यासारख्या दिसतात. शाश्वत वेद मंत्रांनी हा भाग भारून टाकला आहे; असा पुष्कळ वेळा भास होतो. आकाश, प्रकाश, वायु, जल व पृथ्वी या देवता आपल्या अनंत शक्तींना दृष्टीच्या व प्रत्यक्ष अनुभवाच्या मर्यादेत येथे आविष्कृत करतात. येथे समुद्र नसला तरी पर्वतांच्या रांगा उल्लंघून येणारे

प्रचंड मेघ अनंत जलदेवतेचे वैभव दाखविल्याशिवाय राहात नाहीत. पूर्वेच्या व पश्चिमेच्या पर्वतांचे उंच माथे तर सूर्यकिरणांच्या सप्तरंगी क्रीडेचे रंगमहालच बनतात; पूर्वेस व पश्चिमेस सकाळी व संध्याकाळी मेघ व किरण संगत होऊन गंधर्वनगरे येथेच घडवितात; सूर्य पूर्ण उगवला किंवा पूर्ण अस्ताला गेला म्हणजे ही गंधर्वनगरे गडप होतात; हे सर्व निसर्ग- दर्शन वाईच्या घाटारून नित्य होत असते. येथील हवा पाणी जोमदार; येथील माणूस कणखर पण रूक्ष स्वभावाचा आहे. निसर्गलक्ष्मी माणसाला केवळ दर्शन देते, अर्थसंपादनाकरिता येथून पाय काढावा लागतो. येथेच राहिलेलीं माणसें तुसडी, मत्सरी व भांडखोर बनण्याचा संभव असतो, सुसंस्कृतपणामुळेच प्रत्यक्ष मारामारी क्वचित होते.

आचार्यदर्शन -

संस्कृत विद्येचे शिक्षणकेंद्र म्हणून वाई कित्येक शतके प्रसिद्ध आहे. विद्यावंतांची घरे याच येथील मुख्यतः पाठशाळा होत. स्वतंत्र पाठशाळा म्हणून थोड्याच. गुरुकुल पद्धतीचे शिक्षण घ्यावे अशी माझी बालपणी मनीषा होती, हरिद्वार येथील कांगडीच्या गुरुकुलाचा मार्ग धरण्याचे प्रथम मनात होते. परंतु योगायोगाने वाईस आलो. पूर्वाश्रमी श्री. नारायणशास्त्री मराठे म्हणून, स्वामीजी ओळखले जात होते. प्राचीन ब्रह्मचर्य-संपन्न ऋषीचा वर्तमान काळातील अवतार म्हणून त्यांची कीर्ती त्यांच्या मित्राने गाइलेली मी ऐकली होती. माझ्या मनांवर धार्मिक ग्रंथांचा खोल संस्कार असल्यामुळे या कीर्तीच्या श्रवणाने प्रथम त्यांच्याच चरणापाशी विद्याग्रहण करावे, अशी उत्कट इच्छा उत्पन्न झाली. सन १९१४ साली २ फेब्रुवारीस मी वाईस आलो. सकाळी अकरा वाजता वाठार मार्गे बैलगाडीतून वाईस येऊन पोचलो, माझ्या वडिलांच्या मित्राकडे गंगापुरीत उतरलो. कृष्णेवर स्नानाकरिता आलो. दिवसा बारा वाजण्याची वेळ होती. थंडीचे दिवस, त्यामुळे वातावरण शांत व स्वच्छ होते. आकाश निळेनिळे दिसत होते मध्यान्हीचा सूर्य तळपत होता. सूर्याची दीप्ती चित्तास उत्तेजित करीत होती. कृष्णेच्या प्रवाहात तीनदा बुडी देऊन आदित्याकडे पाहिले, याज्ञवल्क्यास आदित्याकडून दिवसा बारा वाजता वेद प्राप्त झाले, याची आठवण झाली. तप, तेज व त्याग याचे विश्वांतील प्रतीक म्हणजे आदित्य होय; आदित्यासारखा आचार्य; अशा आचार्यांची परंपरा अस्ताला जाऊन युगे लोटली आहेत; असा एखादा अजून असेल काय अशी कल्पना मनाला उत्सुक व साशंक करीत होती. घाटावर स्नान करणाऱ्या दुसऱ्या एका गृहस्थांनी त्याचवेळी चौकशी केली आणि म्हटले की, ज्या गुरुजींच्यापाशी तू शिकण्याकरता आला आहेस, ते येथेच जवळ राहातात. मी माझ्या वडिलांना सांगितले की, आताच संध्या व अग्निकार्य झाल्याबरोबर गुरूंचे प्रथम दर्शन घ्यावे. ते म्हणाले, उद्या प्रातःकाळी दर्शनार्थ नेईन.

गंगापुरीच्या घाटावर उंच अश्वत्थ वृक्षाच्या छायेत लहानसे दुमदार दुमजली घर आहे. त्याच्या तळमजल्यात मारुतीची मूर्ती आहे. त्या घरकुलाला बाहेरून वरच्या मजल्यावर

नेणारा बारीकसा जिना आहे. हा मजला म्हणजे लहानसे दालन. या लहानशा दालनातच गेली पन्नास वर्षे स्वामीजींनी काढली आहेत. हीच त्यांची तपोभूमी येथेच त्यांचे सद्गुरु ब्रह्मीभूत स्वामी प्रज्ञानंद सरस्वती हे अखेरीस मुनिवृत्तीने तप आचरीत होते. या वरच्या दालनांत सूर्यप्रकाश किंवा त्याची प्रभा दिवसभर असते. सर्व बाजूंनी खिडक्या आहेत. घाटावर डोकावणाऱ्या खिडक्या काचेच्या तावदानाच्या असून त्या कायम बंद असतात. फक्त प्रकाश यावा परंतु आवाज येऊ नये म्हणून अशी तरतूद केलेली आहे. येथून कृष्णेचे सतत दर्शन होत असते आणि नदीपलीकडचा सोनजाईचा डोंगर दृष्टीस पडतो. प्रातःकाळीं प्रथम मी या ठिकाणी आलो, संध्या इ. ब्रह्मकर्म समाप्त करून प्रसन्न व समचित्त झालेले आचार्य आपल्या ऊर्णासनावर सिद्धासन मांडून विराजमान झाले होते. भव्य, गौरकाय, आरोग्याचे निधान असलेली मंगलमूर्ती पाहून आपोआपच दंडवत् प्रणाम घडला. त्यांच्यासमोर एक लहानसे फलक होते. त्यावर निवडक पुस्तके व लेखनसाहित्य होते. वेद, षडंगे व षट्दर्शने यांचे निवडक ग्रन्थ डाव्या उजव्या हातास रचलेले होते. किंचित् अंतरावर भिंतींना लागून पुस्तकसंग्रह असलेल्या उघड्या शिड्या होत्या. डाव्या बाजूस किंचित् अंतरावर मृगासन मांडलेले होते. संध्यावंदनाची आणि ब्रह्मयज्ञतर्पणाची ती जागा आहे असे तेथील सामग्रीवरून सहज लक्षात भरले. तांब्याचा स्वच्छ चमकणारा कृष्णेच्या पाण्याने भरलेला गडवा, संध्येचे ताम्हन, पळी, पंचपात्री, कुंडा आणि भस्म ही ती सामग्री. स्वतः आचार्यांकडे पाहिल्याबरोबर आंतरबाह्य शुचित्व दृष्टोत्पत्तीस आले. अंगावर एक शुभ्र व स्वच्छ उत्तरीय आणि अत्यंत शुभ्र व स्वच्छ नेसलेले धोतर; एवढाच कायमचा पोषाख असल्यामुळे ती अपरिग्रह वृत्तीची महत्त्वाची खूण दिसून आली. त्यांनी मला दोनतीन साधे प्रश्न विचारले, आणि जवळच असलेल्या मठांत राहाण्याची आज्ञा केली. प्रथम दर्शनीच माझे मन प्रसन्न झाले. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मी बरोबर दिली किंवा नाही हे आठवत नाही. परंतु जिना परत उतरत असतांना मनाला समाधान वाटत होते. कदाचित् प्रश्नांची उत्तरे चुकली असली तरी त्याची कसलीही खोचक जाणीव क्षमावृत्तीमुळे त्यांनी दिली नसेल, जिना उतरल्याबरोबर आंगणांत एक बेलाचे झाड लागते; त्याच्या भोंवतालीं अनेक संन्याशांच्या समाधीचे चबुतरे पसरलेले होते; तेथे जरासा थांबलो, कारण त्याचवेळीं आचार्याच्याकडे अध्ययनार्थ प्रौढ विद्यार्थी आले. उंच बांध्याचे, दृढ शरीराचे, धूत वस्त्र नेसलेले, उत्तरीय व धोतर एवढेच परिधान केलेले, तेजस्वी आणि आत्मविश्वाससंपन्न असे ते दिसत होते. काखेस एक मोठा जाडा ग्रंथ, प्रत्येकाच्या जवळ होता. डोक्यास लांब पण गांठ दिलेली शेंडी, हातांत पळीपंचपात्री, मस्तकास व अंगास त्रिपुंड् भस्म चर्चिले होते. त्यांतील कांही हसरे, कांही साधे, कांही ढुक्के व कांही गंभीर दिसत होते. त्यांत कोण कोण होते हे आतां नक्की आठवत नाही. परंतु श्री. दिनकरशास्त्री कानडे, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, कै.गंगाधरशास्त्री सोहोनी, विष्णुशास्त्री परांजपे, भालचंद्रशास्त्री नेने इत्यादी मंडळी असावीत,

बेलाच्या झाडाखाली मुद्दाम कांही वेळ कानोसा घेण्याकरितां थांबलो. अध्ययनाच्या प्रारंभी मध्यम स्वरांत सर्वांनी म्हटलेला वैदिक शांतीपाठ कानी पडला, त्यांतील एका श्लोकांत आचार्यपरंपरा सांगितलेली होती. नारायण, ब्रह्मा, वशिष्ठ, शक्ती, पराशर, व्यास, शुक, गौडपाद, गोविंदयोगींद्र, श्रीशंकराचार्य आणि त्यांचे चार शिष्य, असा हा आचार्यवंश त्यांत वर्णिलेला होता. मी नंतर फारवेळ थांबलो नाही. मनांत आले की, आपलाही ह्याच वंशांत जन्म होणार आहे.

आचार्यवंश हा पितृ-मातृ-वंशापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. पितृमातृवंशाचे महत्त्वसुद्धा संपादित संस्कृतीची परंपरा राखण्याकरितांच आहे. अनंत नैतिक इच्छाशक्ती माणसात सुप्त आहे. ही अनंत इच्छाशक्ती प्रबुद्ध व प्रदीप्त करणारी परंपरा टिकविणे हेच संस्कृतीचे मुख्य कार्य आहे. इच्छाशक्तीचा प्रयोध न झालेली अगणित मनुष्ये, जनावरांप्रमाणे ओझी वाहून वाया जात असतात. आचार्यवंश ज्यांना लाभतो त्यांची माणुसकी प्रकट होते. केवळ शरीर आणि बीज यांचे महत्त्व दर्शित करणे असाच मातृपितृवंशाचा अर्थ असेल, तर रानटी मनुष्ये देखील थोर ठरतील. वंशाचे महत्त्व मानसिक संस्कृतीच्या रक्षणांतच आहे. आचार्यवंश हा मानस वंश असतो. संस्कृतींचे दिग्विजय सांगणारे इतिहास सुप्त इच्छाशक्ती, प्रदीप्त करणाऱ्या आचार्यांच्या मानसिक वंशप्रसाराचा इतिहास आहे. अतिप्राचीनकाळी ब्राह्मण्याच्या दीक्षेने दिग्विजय केले; नंतर बुद्ध भिक्षुंनी केले; तदनंतर खिश्चन धर्मोपदेशकांनी धार्मिक दिग्विजय केले. मानसिक संस्कृतीचा विजय हेच आचार्यवंशाचे कार्य असतें.

गुरुवर्यांचा दैनंदिन जीवितक्रम

गुरुवर्यांचा नेहमीचा दैनंदिन जीवितक्रम अगदीं लोकविलक्षण आहे, म्हणजे व्रतस्थ तपस्वी मनुष्याचा आहे. एकान्तवास, मौन, विद्याव्यासंग आणि नित्य ब्रह्मकर्म ही त्याची कधी न चुकणारी मुख्य अंगे होत. चार मंडळीत बसले आहेत, खेळण्यांत, गाण्यांत, गप्पाष्टकांत किंवा सामान्य व्यावहारिक चर्चेत रमले आहेत, असे कधीही कोणांसही आढळावयाचे नाही. जीविताच्या धार्मिक व पारमार्थिक ध्येयांची इतकी खोल जाणीव फार थोड्या माणसांच्या ठिकाण आढळून येते. या ठिकाणी संन्यासाश्रमांतला गुरुवर्यांचा नित्यक्रम सांगावयाचा नाही. संन्यासाश्रमाच्या पूर्वीचा म्हणजे ब्रह्मचर्याश्रमांतला सांगावयाचा आहे, आणि त्यांतल्या त्यांत प्राज्ञपाठशाळा ही संस्था स्थापन होण्यापूर्वीचा प्रथम सांगावयाचा आहे. विद्यार्थीदशा चालूं असतांच प्रौढावस्थेत गुरुवर्यांनी अध्यापनकार्य सुरू केले. हळूहळू बाहेरगावचे आणि वाईतील पुष्कळ विद्यार्थी त्यांच्या भोवतीं जमा झाले. यावेळीं प्राज्ञमठ अशी संज्ञा त्यांच्या या खाजगी विद्यालयास देण्यांत आली तेव्हापासून म्हणजे सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वीपासून त्यांचा दैनंदिन जीवनक्रमाचा ठसा एकच एक ठरून गेला आहे, सूर्योदयाच्या अगोदर दोन तास म्हणजे मोठ्या पहाटेस उठून प्रातःस्मरण गुणगुणण्यास सुरवात होते. पूर्वी ब्रह्मचर्याश्रमांत आचार्यदशेमध्ये ऋग्वेद सूक्ताने प्रातः

मरणास प्रारंभ होत असे. संन्यासानंतर काय म्हणत असतात, हे माहीत नाही. कारण अलीकडे हे वाङ्मय-तप मध्यमा वाणीत बहुतेक चालत असते. प्रात:स्नान सूर्योदयाच्या आंत कृष्णेच्या शीत प्रवाहांत आटपून व स्वतःची नित्य परिधानीय वस्त्रे स्वतःच धुऊन प्रातःसंध्येस सुरवात होते. सूर्योदयाच्या वेळी जपांत किंवा ध्यानांत निमग्न होतात. पूर्वी ब्रह्मचर्याश्रमांत, शुभ्र वस्त्र परिधान करून ध्यानग्न होत असत. तेव्हा अंगकांती गुलाबी व वस्त्र शुभ्र यामुळे तांबूस आणि शुभ्र कमळे यांची राशी वाहिलेल्या महादेवाप्रमाणे ध्यानस्थ स्थितीत दिसत. आता संन्यासामध्ये सगळाच तांबूस कमळांचा राशी वाहिलेला महादेव दिसतो. सूर्योदयानंतर किंचित् काल अध्यापनाच्या विषयांचे पूर्वावलोकन चालत असें, हल्लीं अध्यापन बंद केलेले असल्यामुळे लेखन, चिंतन व पठन यांस सुरवात होते. तेव्हा प्रौढ, मध्यम व बाल विद्यार्थी यांचे अध्ययनाचे तास सकाळी ७ वाजेपासून क्रमाने दिवसभर चालावयाचे. कित्येक वेळा मोठ्या पहाटेस व रात्रीं दहा वाजेपर्यंत अध्यापन चालत असे, ऋग्वेदाचे, षड्दर्शनांचे व व्याकरणाचे भाष्यवार्तिकांचे पाठ मोठ्या उत्साहाने जसे शिकवत तसेच प्राथमिक विद्यार्थ्यास रूपावलीपासूनचे विषय शिकवत. अध्यापनाची एक स्वतंत्र शैली त्यांनी निर्माण केली; जुन्या पद्धतींतील दोष टाकले; व नव्या पद्धतींतील कांही गुण घेतले. त्यांच्या अध्यापनपद्धतीचे वैशिष्ट्य पुढे योग्य प्रसंगीं सांगावयाचे आहे. हे अध्यापनाचे दैनंदिन चक्र सतत चाळीस वर्षे अविरतपणे चालले. अनध्यायाच्या दिवशी विद्यालयाची किंवा मठाची दर साता दिवसांनीं स्वच्छता व्हावयाची, झाडणे, सारवणे, लिंपणे, केराच्या टोपल्या वाहणे इत्यादि सगळी आंगमेहनतीची कामे गुरुवर्य स्वतः करीत व इतर सहकारी आणि विद्यार्थी त्यांत भाग घेत. अध्ययन-अध्यापना-व्यतिरिक्त फारसा वेळ सुटीशिवाय राहातच नसे. सकाळीं अकरा वाजता अध्यापन संपवून ब्रह्मयज्ञ व तर्पण हे ब्रह्मकर्म व्हावयाचे. ब्रह्मयज्ञात ऋग्वेदाचा अध्याय म्हणत. नंतर मधुकरीस निघत. गुरुवर्य वाईस आल्यापासून मधुकरीवरच जीवननिर्वाह करीत आहेत. कसलाच अर्थसंग्रह केला नाही. कारण तशी वासनाच मुळापासून नव्हती. एका हातात उदकपात्र व दुसऱ्या हातांत भिक्षापात्र घेऊन दिवसा बारा वाजता पाच घरी हिंडून शिजलेल्या अन्नाची भिक्षा आणावयाची लोक मोठ्या आदराने व नम्र बुद्धीने भिक्षा घालत. विद्येचे आणि तपाचे तेजाने तळपणारा सहा फूट उंचीचा महापुरुष भिक्षापात्र घेऊन ज्याचा उंबरठा चढे, त्यास आपली गृहभूमी त्याच्या चरणधूलीने पवित्र होत आहे असे वाटल्याशिवाय राहात नसे. स्वत:च्या मठामध्ये मुनिवृत्तीनेच त्यांची सगळींच कार्ये चालत व अजून चालू आहेत. भोजनही असेच एकटेच बसून व्हावयाचे प्रपंचांत आयुष्य काढणाऱ्या सर्व सामान्य माणसांना या ऐकांतिक वृत्तीची खरी कल्पना येणार नाही भोजनोत्तर स्वतःचे भिक्षापात्र नदीमध्ये प्रक्षाळून आणावयाचे, भोजनस्थल स्वतः हाताने लगेच सारवून टाकावयाचे. विद्यार्थी अशा बारक्या सारक्या बाबतींत सेवा करण्यास पुढे येत. त्यांच्याकडून त्यांची उत्कट इच्छा दिसल्यास सेवा नाकारत

नसत. परंतु प्रत्येक वेळीं प्रथम नकार देत असत. नकार दिल्यानंतर सेवेची इच्छा उत्कट आहे असे दिसल्यास सेवेची अनुमती देत. परंतु स्वतःच्या कोणत्याही कामाच्या बाबतींत दुसऱ्यावर विसंबावयाचे नाही, असा कायमचा बाणा आहे. विद्यार्थ्याने पत्करलेली सेवा नियमित वेळीं केली नाही तर त्याबद्दल कांही बोलावयाचे नाही. तो विसरला तरी त्याची आठवण द्यावयाची नाही. आळस, विसर, अळंटळं करण्याची प्रवृत्ती जर दिसली तर त्याबद्दल रोष उत्पन्न झालेला केव्हा केव्हा दिसून येई. हा रोष बेशिस्तपणाबद्दलचा असे. विद्यार्थ्याच्या चारित्र्याची घडण करणाऱ्या आचार्यास अशा रोषाची आवश्यकता आहे; नाहीतर विद्यार्थी सैल सुटतात; त्यांच्यांत दक्षता व नियमितपणा सर्वप्रकारच्या कर्तबगारीस अवश्य असलेले मूलभूत गुण रुजत नाहीत. भोजनोत्तर किंचित् विश्रांतीनंतर पर्यायाने विद्यार्थ्यांचे पाठ सुरू होत, असा हा क्रम सायंसंध्येपर्यंत चाले. दोन पाठांच्या मधल्या वेळांत विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या निवासस्थानीं जाऊन साधारण त्यांच्या अभ्यासावर आणि इतर वागणुकीवर देखरेख करीत. विद्यार्थ्यावर गुरुवर्याच्या व्यक्तित्वाचा खोल प्रभाव असल्यामुळे चाहूल लागताच दांडगाई आपआपल्या जागी थांबवून नीटनेटके बसून आपापले काम करू लागत. विद्यार्थी व गुरुवर्य यांच्यांत खेळीमेळीचेही प्रसंग पुष्कळ वेळां उत्पन्न होत. गुरुवर्योचा स्वभाव प्रेमळ व मोकळा असल्यामुळे हसत खेळतही बोलणेचालणे होत असे. परंतु सामान्यतः आदर आणि दरारा यांचेच वातावरण मुख्यपणे राही. गुरुवर्यांच्या वयाचे विद्यार्थी देखील एका परीने मित्रत्वाचे नाते राखूनही त्यांच्यापुढे भिऊन व नमून वागत. संध्याकाळच्या वेळी उघड्या हवेतले खेळ व कुस्ती, मलखांब, दंड, जोर, बैठका, जोड्या इत्यादी व्यायाम विद्यार्थी करीत. परंतु गुरुवर्यांचा स्वत:चा नित्य व्यायाम म्हणजे प्रातःकाळीं सूर्यनमस्कार आणि सायंकाळी करेला किंवा जोडी फिरविण्याचा. पावसाळ्यांत कृष्णेस पूर आल्यावर अर्ध्या नदींत हात मारून पोहत जात असत. त्यांचे विद्यार्थी महापुरांतही नदीपार जाण्याचा विक्रम करीत. बांधीव, सुरेख व बळकट शरीराची गुरुवर्य नेहमी प्रशंसा करतात. आहार भरपूर घेण्याचे महत्त्व पटवितात. स्वच्छ, ताजे, रुचिकर व सुग्रणपणे केलेले पदार्थ आवडीने सेवितात. संत, तपस्वी, ब्रह्मचारी व संन्याशी यांच्या परिपाठापेक्षां आहाराच्या बाबतींत गुरुवर्याची दृष्टी निराळी आहे. रसनेंद्रियावर त्यांचा ताबा आहे. परंतु सुदृढ आणि कार्यक्षम शरीर बनण्याचा आणि आहाराचा कार्यकारणभाव त्यांच्या नीट ध्यानांत असल्यामुळे त्यासंबंधी विरक्तीचा देखावा करणे त्यांस मान्य नाही. निराहाराचे वा उपवास व्रताचे माहात्म्य त्यांनी कधीही सांगितले नाही. मात्र त्या बाबतींत विरोधी मतही त्यांनी प्रकट केलेले नाही. परंतु त्यांच्या वर्तनावरून अशी कल्पना येते की, उपवासाचे इतके माहात्म्य त्यांस मान्य नाही. नियमित मिताहार हेच व्रत उद्योगी मनुष्याने पाळावे असाच त्यांच्या मताचा अंदाज सांगता येतो. जप व धर्मग्रंथपारायण हीच महत्त्वाची किंवा मूलभूत धार्मिक आराधना ते करीत असतात. आतां संन्यासांत ध्यान व समाधी यांस प्राधान्य दिलेले

दिसतें, भजन व मूर्तिपूजन या प्रकारच्या आराधनेस त्यांच्या नित्यक्रमांत स्थान आहे, असे कधी दिसले नाही. सांयकाळी स्तोत्र-पाठ मात्र त्यांच्या नित्यक्रमांत आहे. स्तोत्रपठन व जप यासही भजन या सदरांत घालता येते. मूर्तिपूजन व हरिकीर्तन या प्रकारच्या धार्मिक आराधनेस अनेक बाह्य साधनांची जुळवाजुळव करावी लागते; त्यास संच लागतो; केवळ स्वाधीन अशी, बाह्य साधनसामग्री वाचूनच समाधान देणारी धार्मिक उपासना म्हणजे जप, नामसंकीर्तन व ग्रंथपारायण होय. गुरुवर्यांना भजन व हरिसंकीर्तन करण्याची कला पहिल्या विद्यार्थीदशेतच म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षीच अवगत झाली. गायनवादनाची कलाही शास्त्रीय रीतीने त्यांनी चांगली संपादन केली. परंतु एकंदर आयुष्क्रमांत विशेषत: आचार्य या नात्याने जीवित व्यतीत करीत असता, या ललित कलेचा धार्मिक आराधनेत उपयोग त्यांनी केला नाही. त्यामुळे स्वतः संत असूनही भक्तगण झाला नाही; त्यांना भजनाची व हरिकीर्तनाची खूप गोडी आहे. गोळा त्याचा मांड मांडण्याची योग्यताही संपादन केली परंतु आपल्या धार्मिक आराधनेपासून त्यांनी ललित कलेस दूर ठेवले. व्यवसाय म्हणून तर तिचा अंगिकार मुळींच केला नाही. भजन व हरिकीर्तन यांत ललितकला सरसता उत्पन्न करते, परंतु त्याबरोबरच मानमान्यता आणि प्रतिष्ठा यांचे साधन बनते. ईश्वरभक्तीचा बाजारभाव वाढतो, ईश्वरावरची आसक्ती सुटून ईश्वर भक्तीच्या प्रदर्शनावर लोभ जडतो, भक्तिबळाने देवाऐवजीं भोवतालच्या लोकांना वश करण्याचे रोमांच, अश्रू, इत्यादी अष्टभाव साधन बनतात. ईश्वरभक्तीच्या सर्व बाह्य खुणा आणि आविष्कार बाजूस ठेवणारा व आपल्या देवभक्तीच्या गाढ दिव्य प्रेमाचे गुपित न फुटण्याची दक्षता बाळगणारा ईश्वर भक्त क्वचितच सांपडेल; सांपडणारही नाही. कारण ज्या भक्तीला लोकांत भाव नाही अशी निरपेक्ष भक्ती माणसास मान्य आहे काय ? असा महत्त्वाचा सवाल साधुसंत महंतांचे जीवन पाहून उत्पन्न होतो. दुसऱ्याकडून आपल्या ईश्वरभक्तीची मान्यता मिळवण्याचा गूढ हेतू जोपर्यंत असतो तोपर्यंत नास्तिक्य हृदयाच्या खोल गाभ्यांत दडून बसले आहे असें समजावें काय ? परंतु हा प्रश्न एवढ्याने निकालांत निघत नाही. ईश्वरभक्तीचे भजन-कीर्तनाच्या रूपाने प्रदर्शन केले नाही तर इतरांस भक्तिधर्म शिकवण्याचे साधनच राहणार नाही. दुसरे असे की, हृदयांत खरीखुरी भक्ती वसत असेल तर प्रदर्शन व्हावयासच पाहिजे. त्यांत सर्व जनांना भागीदार बनविले पाहिजे. त्या अलौकिक आनंदाचे वाटेकरी सर्व जग व्हावे अशी तळमळ संतांना लागते. केवळ एकांतांतच नव्हे तर जनातही जे शुभ, मंगल, कल्याणकर आणि आनंदमय आहे, ते उघडे करावे, एकांतात भोगावे आणि जनात मिरवावे; यांत संकोच करण्याचे मुळींच कारण नाही.

गुरुवर्यांच्या नित्य धार्मिक जीवनक्रमात भजन व कीर्तन यांस का स्थान मिळाले नाही हा प्रश्न फारसा सुटत नाही. इतकेच म्हणता येते की, रामदासी, वारकरी किंवा इतर सांप्रदायिक भक्तिमार्गातले संत-महंत ईश्वरभक्तीची बाह्य बतावणी करण्यांत दक्ष असतात,

स्वतःचा अंत रंगीचा शोध करत नाहीत; देहावर आसक्ती आणि लोकेषणेवर सारखी नजर असूनही वैराग्याची आणि ईश्वराधीनतेची उठल्या बसल्या पोपटपंची करीत सुटतात. एकप्रकारची आत्ममतारणा आणि बाजारीपणा यांची घाण या सांप्रदायिकांच्या मठांत, मंदिरात आणि भजनी अड्यांत वसंवसत असते. हे लक्षात बाळगून गुरुवर्यांनी भजनी संपदायाचे कर्मकांड स्वीकारले नसावे. आणखी एक असे कारण संभवते की, वेदविद्या आणि संस्कृत पांडित्य ज्या वैदिक, शास्त्री व पंडितांच्या सानिध्यात गुरुवर्यांनी हस्तगत केले त्यांच्यांत भक्तिसांप्रदायिकांच्या बद्दल एकप्रकारची परंपरागत अमान्यता असते, गौण भाव बाळगलेला असतो. स्वतःचे स्थान ते अधिक उच्च समजतात; ही फार जुनी स्पर्धा आहे. ते एकमेक परस्परांवर थोतांड आणि ढोंग यांचा आरोप करीत आले आहेत. भक्तिमार्गीयांनी वैदिक-शास्त्री - पंडित यांना रूक्ष, वैचारिक काथ्याकूट करणारे, घमेंडखोर, दांभिक व कर्मठ ठरविले आणि उलट भक्तिमार्गीयांना वैदिक-शास्त्री- पंडितांनी सैल, भोंगळ, ढोंगी व नाचरे ठरविले. तत्त्वनिष्ठा आणि बाह्यात्कारी देखावा यांच्या सीमा विभागून अलग करणे जवळ जवळ अशक्य आहे. परमार्थाचे सर्वच मार्ग क्षुरधारेसारखे आरूढ होण्यास अशक्य वा दुर्धर आहेत.

गुरुवर्याचा स्वतःचा विद्याव्यासंग पहाटेस आणि रात्री चालत असे. हल्ली सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या कालांत ते वाचन करीत नाहीत. रात्री व पहाटेस जेव्हा विद्याव्यासंग करीत तेव्हा विद्याव्यासंगाचे दोन भाग असत. एक भाग म्हणजे अध्यापनाचा विषय आणि दुसरा भाग म्हणजे इतर विविध विषयांचे वाचन. मराठी आणि संस्कृत या दोन भाषांतील ग्रंथसंपत्ती हाच त्यांचा वाचनाचा विषय होय. ते इंग्रजी शिकले नाहीत. वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत इंग्रजीकडे कल नव्हता. नंतर इच्छा उत्पन्न झाली परंतु संस्कृत अध्यापनामध्येच दिवसाचा महत्त्वाचा भाग जात असल्यामुळे आणि उरलेल्या वेळांत आवश्यक असे संस्कृत व मराठी वाचन करावे लागत असल्यामुळे इच्छा असूनही फुरसत मिळाली नाही. जुन्या शास्त्री पंडितांच्याप्रमाणे नव्या बदलत्या देशकालपरिस्थितीचा अर्थच न समजणारे त्यांचे मन नव्हते. व्यवहार जुनाट वळणाच्या वैदिक-शास्त्री- पंडितांच्या मध्ये, परंतु दृष्टी चौफेर; पाश्चात्यांचे वैज्ञानिक जग, वेदशास्त्रपुराणांशी ज्याचा कांही संबंध नाही, असे आहे; परंतु त्याचे वैशिष्ट्य आणि महत्त्व समजून घेतलेच पाहिजे; त्याची उपेक्षा करणे अयोग्य होय; असा दृष्टिकोण असल्यामुळे ते पदार्थविज्ञान, जीवविज्ञान, आणि सामाजिक विज्ञाने यासंबंधी मराठीत प्रसिद्ध झालेले विद्वानांचे ग्रंथ मननपूर्वक वाचू लागले. पदार्थविज्ञानांतील कांही ग्रंथांचा त्यांनी विद्यार्थी म्हणून अभ्यास केला. दाभोळकरमाला, ग्रंथमाला इत्यादी गंभीर विषयांवरील पाश्चात्त्य ग्रंथांचे व शास्त्रांचे अनुवाद करणाऱ्या माला त्यांनी अभ्यसिल्या हिंदुस्थानचा व जगाचा इतिहास अद्ययावत वाचून टाकला. आधुनिक भूगोल व खगोल यांची उत्कृष्ट माहिती मिळविली. नव्या सुशिक्षिताला साजेशी बहुश्रुतता संपादन केली.

वृत्तपत्रे, मासिके आणि इतर प्रकारची नियतकालिके यासंबंधी त्यांचे वाचन आजपर्यंत चालू आहे. देशकाल परिस्थितीबद्दल अशाप्रकारचा सावधपणा त्यांच्या ठिकाणीं बिंबल्यामुळे नव्या जमान्यांतील धार्मिक, सामाजिक व राजकीय आंदोलनांचे समग्र स्वरूप त्यांच्या विचारांच्या कक्षेत समावले गेले.

सर्व गोष्टी घड्याळ लावून वक्तशीरपणे करणे असा त्यांचा स्वभाव बनला आहे. रात्री १० वाजण्याच्या पुढे ते क्वचित अपवाद सोडता कधीही जागत असलेले दिसावयाचे नाहीत; आणि पहाट झाल्यावर अंथरुणांत पडलेले आढळावयाचे नाहीत. रात्री आठ व नऊ याच्यां दरम्यान तरुणपणी व मध्यम वयांत थोडासा आहार घेत असत. त्यांत दुधाची दशमी, लोणी व शाकभाजी असावयाची. लोण्याचा गोळा मोठा असे, परंतु त्याचे वाटेकरी लहान विद्यार्थी दुसरे दिवशी सकाळी होत असत. गुरूचे उच्छिष्ट सेवन करण्याने देह पावन होतो व मेधा जागृत होते अशी जुन्या परंपरेत श्रद्धा आहे. हे उच्छिष्ट आमच्या गुरुजींनी आपल्या पात्रांतून सेवन करण्यापूर्वीच बहुधा बाजूला ठेवलेले असे, जो विद्यार्थी प्रातःकाली गुरुप्रणामार्थ जाई, तोच तेथील रात्रीचे ताट खाली आणीत असे. तो एकटाच अवशेषाचा भागीदार न होता मित्रमंडळीत वाटून घेई. गुरूंच्या या लोण्याच्या गोळ्यावर अनेक चिकित्साखोर प्रौढ विद्यार्थ्यांनी टीकाही केलेली लेखकास आठवते. टीका करणारे हुषार होते; परंतु दुसऱ्याच्या आहारावर लक्ष ठेऊ नये आणि लक्ष गेले तरी त्याबद्दल अत्यंत सहानुभूतीची सद्भावना असावी असा विचार लहानपणीच ते शिकले नव्हते. वडील माणसांनी प्रत्येक अपत्यास असा विचार शिकवावयाचा असतो. अत्यंत दरिद्री घराणे जरी असले तरी ते सत्कुल असेल तर दुसऱ्याच्या आहाराबद्दल अशी सद्भावना अपत्यांना शिकविली जाते. मनाचे औदार्य हे सर्व नैतिक सद्गुणांची जन्मभूमी होय. दुसऱ्याच्या आहाराबद्दलची सद्भावना हे औदार्याचे प्रथम बीज होय. कोणाचीही दृष्ट अन्नावर पडू नये, असे म्हणतात. ज्याची दृष्ट अन्नाला वा शरीराला वा वस्तुला लागते तो दुष्ट मनुष्य होय. दुसरा काय खातो व किती खातो याची चर्चा करणे हा क्षुद्रपणाचा अस्सल मासला होय.

सर्व गोष्टी घड्याळ लावून करावयाच्या यावर जसा गुरुजींचा प्रथमपासून कटाक्ष आहे, तसाच टापटीप व स्वच्छता यावरही आहे. वाणींतही ही स्वच्छता दिसून येते. कितीही क्रोध आला तरी त्यांच्या तोंडून कधीही अपशब्द निघाला नाही. त्यांचा स्वभाव जसा प्रेमळ, तसाच जमदग्नीसारखा तापटही आहे; तापट नसलेला ब्रह्मचारी बहुधा सांपडत नाही; परंतु हा ताप क्षणांत निवणारा. धार्मिक साधनेची यावज्जीव दीक्षा घेतलेली असल्यामुळे त्याचा निग्रह करून शमन करण्याचा सतत प्रयत्न करावाच लागतो. हल्ली तापटपणाही जिंकलेला दिसतो. त्यांच्यावर अन्यथा आरोप करणारांच्या बद्दलही निंदेचा एकही शब्द ऐकला नाही. एवढेच नव्हे तर त्या सर्व मंडळींशी त्यांचे संबंध पूर्ववत् सलोख्याचे राहिले. निर्वैरवृत्ती मुसमुसणाऱ्या तारुण्यांतच साधली. हीच संन्यासाची पूर्व तयारी होय. स्वतःच्या वैराग्याची व ईश्वरभक्तीची बढाई दर्शित करणारे वाक्य त्यांच्या तोंडून कधीही निघाले नाही.

नैष्ठिक ब्रह्मचर्य हे असिधाराव्रत आहे; ते व्रत मनुष्यास अखंड व संपूर्ण साधणे अशक्यच आहे. साधकाची श्रद्धाच त्या अशक्याला शक्य समजते. साधक अशी आत्मवंचना करतो म्हणूनच साधक बनतो. तो शक्यतेच्या भ्रमात राहतो म्हणूनच महातप आचरू शकतो. परंतु संशय उत्पन्न झालेला प्रामाणिक मनुष्य नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या व्रताचा नाद सोडून व्यवहाराचा धोपट मार्ग धरतो. कांही अहंमन्य तसेच हट्टाने राहतात. आमचे गुरु फार समंजस आल्यामुळे नैष्ठिक ब्रह्मचर्याचे व्रताचा संकल्प करू इच्छिणाऱ्या साधकास सावध करीत, परावृत्तही करीत व व्यवहाराला लावीत. या व्रतांत प्रथम बरेच अपयश असते; नेट धरला तर यश दिसू लागते. हे व्रत चालविण्याच्या संकल्पाने गुरुवर्यांनी आपल्या दैनंदिन नित्यक्रमाची आखणी केली. त्याच्यांत गेल्या पन्नास वर्षात आजपर्यंत बदल झाला नाही. गेली १० वर्षे अध्यापन मात्र बंद ठेवले आहे. कारण ४० वर्षे अध्यापन केल्यामुळे कंठ दुर्बल झाला आहे. नित्य शीतस्नान, नदीतीरावरील चिरकाल वास, आणि कफकारक प्रकृती या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून घसा बिघडून बोलण्याची शक्ती खूप मंदावली आहे. परंतु अजून पंच्याहात्तराव्या वर्षीही तपस्वी-नित्यक्रम अबाधित चालू आहे. प्रातःकाळीं सात वाजता आसन- मांडी घातल्या नंतर ती अकरा वाजता हालते; पुनः दुपारी भोजनोत्तर दीड वाजता मांडी घातल्यावर संध्याकाळीं साडेपाच वाजता पुनः हालते. दृढ व स्थिर आसन हे योग्याचे बाह्य लक्षण आम्ही गेली चाळीस वर्षे पहात आलो आहोत.

बालपण, शेतकऱ्याची झोपडी-

अशा प्रकारे दैनंदिन नित्यक्रमांत तपस्वी, विद्याव्यासंगी आणि समाधियुक्त जीवितक्रम चालविणाऱ्या या व्यक्तीचे बालपण व विद्यार्थीदशा यांची सामान्य रेखा थोडक्यांत दाखविणे जरूर आहे. आदर्श आचार्य म्हणून जे व्यक्तित्व निर्माण झाले त्याची पूर्वपीठिका, बालपणांत व विद्यार्थीदशेत तयार झाली.

गुरुवर्यांचे पूर्वाश्रमीचे संपूर्ण नांव नारायण सदाशिव मराठे; जन्म (ता. ८ डिसेंबर १८७७ शनिवार) शके १७९९ मार्गशीर्ष शु. ४ वेळ सकाळीं अकरा वाजता, कुलाबा जिल्ह्यांतील रोहे तालुक्यांतील सुडकोली गावी झाला. वडील सदाशिवपंत, रत्नागिरी जिल्ह्यांतील (तालुका देवगड) पडेल या गावचे; यांच्या घराण्याकडे पंचक्रोशीचा मुख्य उपाध्येपणा आणि धर्माधिकारीपणा असे. त्यामुळे उपाध्ये याच उपनांवाने ओळखत. थोडी भातशेती, कांही वरकस आणि आंबे, फणस, काजू यांची झाडे; उत्पन्न थोडे वडील बंधूशी न जमल्यामुळे सदाशिवपंतांनी पत्नी व प्रथम पुत्र मोरू यांसह पडेल गांव कायमचा सोडला. पत्नीचे माहेर पडेल गावाजवळच वाडे ह्या गावी. नाव पार्वती. वडिलांचे नांव नारायणभट अनंतभट केळकर. पढिक वैदिकाचे घराणे; आध्यात्मिक वातावरण, वैराग्याच्या दीक्षेबद्दल सर्वांच्या हृदयांत पूर्ण श्रद्धा. सौ. पार्वतीबाईच्या मनावर या वातावरणाचा उत्कृष्ट संस्कार झाला होता.

कपिल महामुनीसारखा मुलगा व्हावा अशी वासना व पतीवर संपूर्ण निष्ठा होती. पतीची बाणेदार व निरपेक्ष वृत्ती, या पत्नीच्या निष्ठेमुळे निभावू शकली.

दुसरीकडे कोठेच जमेना. मग ते सुडकोली (तालुका रोहे जिल्हा कुलाबा) येथे आले. खेडेगाव; ब्राह्मणांची घरे पांच; मराठ्यांची मुख्य वस्ती; काही मुसलमान घरे; भावे यांची दोन घरे श्रीमंत, त्यांच्यांत भाऊबंदकी, चढाओढ व ईर्षा. सदाशिवपंतांनी थोरल्या भाव्यांच्याकडे कारकुनी पतकरली. पूजाअर्चा, श्राद्धपक्ष, अशी थोडीशी भिक्षुकीही करीत होते. स्वभाव तिखट व बाणेदार, भोवतालचीं माणसें भिऊन वागत, कारकुनी फार दिवस मानवली नाही. ती सोडून स्वतंत्रपणे कृषीवल बनले जमीनदारांची शेते खंडाने घेतली. चणेऱ्याच्या सरदारांची शेते, सदाशिवपंत व पत्नी पार्वतीबाई दोघेही पक्के शेतकरी बनून शेतांत राबत. इतर शेतकरी जेथे वीस मण भात पिकवीत, तेथे यांचे पंचवीस मणापर्यंत जाई. राब तयार करणे, भाताचे भारे वाहणे, रानांतून कवळाचे भारे आणणे इत्यादी शेत मजुराची कामेही करण्यांत त्यांना कमीपणा वाटत नसे. एका शेतांत एक चौपाखी खोपट बांधले; त्यास पडवी व आंगण. आंगणाखालच्या शेतांत वांगी, मुळे, मिरची, कोथिंबीर आणि मुख्य ऊस करीत. प्रथम दूरचीही शेते करीत. पुढे ती कमी केली आणि शेवटी सोडली, न्यायबुद्धी, विचारशीलता आणि दूरदर्शीपणा असल्यामुळे श्रीमंत व सरदारही सल्लामसलतीस येत असत.

पांच मुलगे व एक मुलगी इतकी अपत्ये जगली. मुले हुशार आणि तरतरीत. दारिद्र्य असले तरी विवेक आणि श्रम यांचा महिमा मुख्य मानला होता. सात आठ वर्षेपर्यंत सर्व मुलांना घरपेच शिक्षण मिळाले. लिहिणे, वाचणे, परवचा, तोंडचे हिशेब, थोडे अंकगणित इतके वडिलांनी शिकविले. सदाशिवपंत व पार्वतीबाई दोघेही शिकवत. प्राकृत संस्कृत, धार्मिक पठनाचे भाग मुलांकडून पाठ करून घेतले. संध्या, पुरुषसूक्त, पूजा, रुद्र, वैश्वदेव, स्तोत्रें, ध्यानाचे श्लोक, आर्या, अभंग, पदे; हे सर्व आठ ते नऊ वर्षीच्या वयापर्यंत म्हणवून घेतले जाई.

दारिद्र्य हे तप आहे आणि शापही आहे. श्रम, शिक्षण, आणि शील यांची संपादणी दारिद्र्यांत जर केली तर अग्निपरीक्षेतून शुद्ध झालेल्या सुवर्णाप्रमाणे चोख व्यक्तित्व तयार होते. त्या दारिद्र्यांत विवेक, ध्येयवाद व श्रमाची नितान्त आवड नसली तर जीवन पापाचे आगर बनते. मराठेशास्त्री यांचे बालपणचे दरिद्री जीवन घोर तपश्चर्या करणाऱ्या पौराणिक ऋषीच्या आश्रमांतील जीवन होते. पोटांत भुकेची आग प्रदीप्त झाली तरी तिचे निवारण लगेच होत नसे. योग्य वेळेची वाट पाहावी लागे. परंतु मातापिता श्रमिक असल्यामुळे लहानपणी सगळ्या भावंडांचे यथायोग्य संगोपन करू शकले. वयाच्या नऊ-दहा वर्षांच्या सुमाराला मुलगे रोहे व तळे येथे शिकविण्यास पाठविले. तेथे मधुकरी मागावयाची व शाळेंत शिकावयाचे. सर्वांत वडील मुलगा मोरोबा, याने मराठी ६ वी पर्यंत शिक्षण पुरे करून भाईंदर

(जि. ठाणे) येथे मिठागरांत निमसरकारी नोकरी धरली. मोरोबांनी कसोशीने आणि नेकीने कामे करून सावकार, व्यापारी, कामगार व शेतकरी या सर्वांचा विश्वास संपादन केला. मोरोचा काटकसरीने प्रपंच चालवून प्रतिवर्षी १०० रु, वडलांना पाठवू लागले. म्हातारपणीं वडिलांनी शेती सोडली व खुद्द सुडकोली गांवांत एक कुडांचे घर बांधले. त्या घरांत एक वाण जिनसांचे दुकान घातले ते साधारण बरे चालले. मग पुढे दुकानही बंद केले आणि मोरोबांकडे राई भाईंदर येथे राहू लागले. लवकरच कैलासवासी झाले. मोरोपंतांनी नोकरी करीत असतां विद्याव्यासंग खूप वाढविला. संस्कृत ग्रंथही वाचले. बी. ए. इतके गणित तयार होते. ग्रंथसंग्रहाची आवड होती. सार्वजनिक कामाची हौस होती. त्यांच्या सहवासाचा उत्कृष्ट परिणाम त्यांच्या कनिष्ठ बंधुंवर म्हणजे गुरुवर्य नारायण शास्त्री मराठे यांच्यावर झाला. वडील बंधूंची आपल्या अनेक गुरूंमध्ये ते गणना करतात.

सगळ्यांत धाकटे नारायणशास्त्री यांचे ८-९ वर्षांपर्यंत लहानपणचे शिक्षण माता आणि पिता यांनीच केले. शेतकऱ्याच्या मुलांप्रमाणें गाई व वासरे चारावयाच आणि मधून मधून प्राथमिक शिक्षण घ्यावयाचे. माता-पिता शेतावर कामास जात आणि घरांत भाकरी पातेल्याखालीं झाकून ठेवीत असत. धाकटे चिरंजीव एकटेच झोपडीच्या आवारांत हिंडून खेळून राहात असत. मोत्या कुत्रा आणि मनी मांजर यांची सोचत असे. बागेत विहीर खणली होती व पायराहाट घातला होता. वडील पाणी लाटीत आणि आई खोरे घेऊन शेतांतील वाफ्यांना पाणी पाजीत असे. धाकटे चिरंजीव नाना आध्यात्मिक पदे गुणगुणत भोवतालीं खेळत. नदीच्या एका तीरावर सुडकोली आणि दुसऱ्या तीरावर चणेरे ही गांवे. चातुर्मासात चणेऱ्याच्या विठोबाच्या देवळांत आई पुराणास जात असे. आईबरोबर धाकटे चिरंजीवही जात. अशा साध्या, सात्त्विक व गरीबीच्या वातावरणांत बालपण गेले.

गुरुगृहवास व सेवेतील शिक्षण-

दहा अकराव्या वर्षी नाना (नारायण) यास अलीबागेस शिक्षणाकरिता पाठविले. श्री. केशवशास्त्री देव यांजकडे संस्कृतचे अध्ययन सुरू झाले. मधुकरी मागून आणावयाची; दोनच वेळ जेवण मिळे; त्या लहान वयांत सकाळी आणि तिसरे प्रहरी भूक लागे; शरीर उफाड्याने वाढू लागलेले; सवयीने व संयमाने सकाळी आणि तिसरे प्रहरी भूक लागेनाशी झाली. देवशास्त्र्यांच्या घरी अध्ययन बेताचेच झाले. बहुतेक सगळा वेळ घरकाम करणाऱ्या नोकराप्रमाणे देवशास्त्र्यांची मुले सांभाळणे, त्यांची सर्व प्रकारची स्वच्छता राखणे, सुतार आणि गवंडी यांच्या, हाताखाली काम करणे, यातच गेला. गुरुवर्यांनी आत्मचरित्रविषयक जें टिप्पण केले आहे, त्यांत म्हटले आहे की, 'संसारांत पडलेल्या मनुष्याला या सर्व गोष्टी चांगल्याच साधलेल्या असाव्या लागतात. मी संसारांत पडलो नाही हे खरे. खरे पाहिले तर पुढे जो संसारांत न पडण्याचा निश्रय झाला त्याच्या विशेष कारणांतच देवशास्त्र्यांकडील अनुभव कारण आहे, यांत मुळीच शंका नाही. संसाराच्या खस्ता खाल्ल्यावाचून संसाराचे

तत्त्व कळणे कठीण आहे.... प्राज्ञपाठशाळेचा संसार करीत असता देवशास्त्र्यांकडील अनुभवाचा पुष्कळच उपयोग झाला आहे.... सर्व कामे वयाप्रमाणे करीत होतो. पण जेव्हा घरचा समवयस्क मुलगा आणि लहान वयाची मुले देखील आपल्या आईच्या देखत म्हणू लागली की, तुला आम्ही घरकामाकरतांच ठेवला आहे, अभ्यासाकरिता नव्हे. तेव्हा मात्र मला ते सर्व असह्य झाले. आणि मग घरी वडिलांना न कळवतांच अलीबागेस देवांच्या समोरच्याच कुलाबकरांच्या घरी नवीन आलेल्या नागांवच्या दामोदरशास्त्री लोंढे या तरुण, तरतरीत विद्वान् शास्त्रीबुवांकडे मी गेलो नी माझी थोडक्यांत परिस्थिती सांगितली आणि शिकवण्याची विनंती केली. तत्काल त्यांनी मला सामानासह निघून येण्यास सांगितले. त्यांनी माझी कुलाबकर जोशीबुवांकडे सोय लावून दिली आणि मला शिकविण्यासही आरंभ केला. ... कुलाबकरांच्या घराला एक चाळ होती, त्यांत चार बिऱ्हाडे होती, दोन खोल्यांत लोंढे शास्त्रीब्रुवांचे बिऱ्हाड होते.'' ''नागांवच्या हाटाळ्यावरील वैशंपायनांच्यापैकीं एका घरांतील तीन बंधूंपैकी हे मध्य.....नागांवचे लोंढे घराण्यांत तक दिले. तेथील महाजनांची मुलगी शास्त्रीबुवांची पत्नी... श्वसुर ग्वाल्हेरला असत. श्वशुरगृही सुखाने राहून व्याकरणशास्त्र आणि गायन या दोन विद्या हस्तगत केल्या. प्रसिद्ध सखाराम महाराजांचे शिष्य असलेल्या पिलुशास्त्री पटवर्धन यांचेजवळ पंचमहाकाव्य आणि श्रीमद्भागवत यांचे उत्तम अध्ययन झालेले होते. दामुशास्त्री यांची वक्तृत्वशक्ती आणि वक्त्याला लागणारे सर्व गुण चांगले होते. त्यांच्याकडे मी शिकावयास गेलो.'' ''माझ्या अध्ययनाला पद्धतशीर आरंभ येथूनच झाला. पोयनाडचा लक्ष्मण रिजबूडही... लोंढेशास्त्रीबुवांच्या कडे आला. आम्ही दोघे तेथे सहाध्यायी.'' ''घरांत चार माणसे झाली, आणि पुढे एक अपत्य मुलगी. एकटी गुरुपत्नी किती काम उरकणार ! आम्ही साहाय्य करीत असू. थोड्यांच दिवसांत दहा माणसांचा स्वयंपाक करता येऊ लागला. दूधदुभत्याची व्यवस्था, ताक करणे, लोणी काढणे, चूलसारवण करणे इत्यादी चट् सारी कामे आम्हाला करतां येऊ लागली. रोजच सकाळ संध्याकाळची खरकटी स्वच्छ घासण्यामध्ये तर आमचा पहिला नंबर गुरुपत्नीनीच मुळी मान्य केला होता. आमच्या दोघा सहाध्यायांमध्ये कोणते काम कोणी करावे याविषयी कधी प्रश्नच निघाला नाही. दोघांनी मिळून कामचुकारपणा न करतां ते करावयाचे गुरुपत्नी एकटी आणि पांच सहा माणसे जेवणार, मग आम्ही घरांतील मुलांनी जर हे काम न करावयाचे तर कोणी करावयाचे! हे काम करण्यांत आम्हाला कधीच कांही वाटले नाही. अलीबागला प्लेग झाला. मग नागांवला हाटाळ्यावरच राहावयास गेलो तेथेही प्लेग झाला. एक मैलावर तळयाच्या कांठीं झोपड्या घातल्या. तेथे एक वर्ष काढले.''

''आमची इच्छा मोठे विद्वान् होण्याची. दामूशास्त्री यांच्याकडे व्युत्पत्ती आणि थोडी सिद्धान्तकौमुदी झाली. गातां येऊ लागले. पेटी वाजविता येऊ लागली. पूर्वरंग, आख्यानें ३०-३५ पाठ येऊ लागली; परंतु आम्ही विद्वान् झालो नाही. ७ ८ वर्षे झालीं... येथे यापुढे अधिक अध्ययन होणे शक्य नाही. कोठेतरी दुसरीकडे जावे. सांगलीस जावे किंवा इंदूरला.

आमच्या माहितीचा टप्पा इतकाच होता. असा एकदा निर्णय झाला.''

''आमच्या दोघांच्या स्वाऱ्या निघाल्या, वाटेत समजले की, सांगलीस प्लेग झाला आहे. आतां !! कोणी म्हणाले मिरजेस जा. आम्ही मिरजेस गेलो. तेथे दहा दिवसांचे क्वारंटाइन होतें. स्टेशनपासून क्वारंटाइन दोन कोस होते. बोजे डोक्यावर घेऊन जावे लागले. जीव अगदी रडकुंडीला आला. क्वारंटाइनचे १० दिवस झाल्यावर मिरजेतील कृष्णेश्वराच्या देवळांत रहावयाला गेलो, तेथील थोर विद्वान् विष्णुशास्त्री देवधर यांचेकडे अध्ययन चालू झाले. आम्ही ५।६ महिने मिरजेस होतो. गुरुवर्य विष्णुशास्त्री देवधर यांचे नातू दत्तुशास्त्री देवधर यांचे वाईस माझेजवळ वेदान्ताचे अध्ययन नंतर झाले. त्यांचा आमचा घरोबा अजूनही कायमच आहे. मिरजेसही प्लेगाचा धिंगाणा सुरू झाला. आमच्या तोंडचे पाणी पळाले, आता काय करावे ! स्टेशनवर गेलो, तिकीट काढावयाचे ते कोणच्या स्टेशनचे? कल्याणला जाऊन इंदुरला जावे काय? पण पैसे? पैसे पुरेसे नव्हते; इतक्यांत परमेश्वर भेटला, एक कोरडी भिक्षा मागून निर्वाह करणारा गरीब ब्राह्मण, तो वाईस जाणार होता; 'वाई विद्यापीठ आहे तेथे चला, मी तुम्हाला वाईस घेऊन जातो' म्हणाला, वाठारचे तिकीट काढले; वाठारास ३ दिवस क्वारंटाइन मध्ये राहून पुनः वाईच्या क्वारटाईन मध्ये ७ दिवस राहिल्यावर वाईमध्ये प्रवेश झाला. वाईमध्ये शके १८२० अधिक अश्विनारंभी आलो. ''

विद्वान् व अध्यात्मसंपन्न आचार्याचा अन्तेवासी--

''येथून आमच्या उच्च जीवनक्रमाला सुरवात झाली. वाईतील आमचे पहिले गुरु श्री, विष्णुशास्त्री करंदीकर, यांचे घर गंगापुरीतील रास्त्यांच्या वाड्याजवळ बाभुळवनांत होते. व्याकरणाचे अध्ययन त्यांच्याकडे झाले. वेदमूर्ती विष्णुशास्त्री मेणवलीकर हे ऋग्वेदाचे गुरु; काशीपासून रामेश्वरापर्यंत वैदिकांमध्ये यांची मोठी ख्याती होती. संहिता, ब्राह्मण, आरण्यक, षडंगे, निविद् अध्याय, सर्वानुक्रम आणि चरणव्यूह यांचे अध्ययन यांचे जवळ झाले. अध्ययन म्हणजे नुसतें गुरुमुख; तोंडपाठ नव्हे. मी सर्व शाकल शाखा विद्यार्थ्यांना पढविली आणि ब्राह्मणभाष्य विद्यार्थ्यांना पढविले, यजुर्वेदाचे गुरु बाळंभटजी तात्या रानडे, ते घनान्त वैदिक, श्रौती, स्मार्त याज्ञिक, धर्मशास्त्री, व चांगले संस्कृत कवी होते, यांच्यापाशी माझे तैत्तिरीय शाखेचे अध्ययन झाले. यांच्याकडे माझी जा ये पुष्कळच होती. त्यांच्या घरी वेद, श्रौत व स्मार्त या विषयांची शाळा होती. त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांचा आणि इतर विद्वानांचा त्यांच्याविषयीं फार आदर असे. का. वा. तथा भाऊशास्त्री लेले चांडाळचौकडीचे नाईक. त्यांनी तात्यांची बरीच टवाळी आपल्या धर्म मासिकांत छापली आहे. परंतु तात्या रानडे हे थोर पुरुष होते हे निश्चित.''

''न्यायशास्त्राचे किंवा तर्कशास्त्राचे गुरु बाळशास्त्री डेंगवेकर महाविद्वान व व महातपस्वी; अयाचित वृत्तीने सर्व आयुष्य गेले; कोणाकडे दक्षिणा घेण्याला हात पसरायला गेलेच नाहीत; जवळ कांही नव्हते, कोणी कांही घरी आणून दिले तर स्वीकार करावयाचा; धान्य,

कपडा, पैसा जे कोणी घरी आणून देईल तेवढ्यावर निर्वाह त्यांचे तीन पुत्र पुण्यास निवर्तले; मग ते कृष्णाकांठीं राहावयास आले. रा. रामकृष्णपंत म्हणजे बुवा देशपांडे त्यांची व्यवस्था ठेवीत. पत्नी, विधवा मुलगी आणि मुलीचा मुलगा अशी चार माणसें होतीं, 'केसरी'मध्ये 'संस्कृत विद्येचे पुनरुज्जीवन' नांवाची लेखमाला आली होती, त्यामध्ये बाळशास्त्र्यांचे वडील धोंडशास्त्री यांचे नांव आले होते आणि बाळशास्त्र्यांचेही नांव आले होते. धोंडशास्त्री व्याकरण न्याय या उभय शास्त्रात पंडित; विश्रामबाग वाड्यांतील सरकारी संस्कृत पाठशाळेत कांही वर्षे उपगुरु होते. ती लेखमाला जेव्हा स्वतंत्र पुस्तक रूपाने छापली तेव्हा घोंडशास्त्री आणि बाळशास्त्री यांची नावे अजिबात गळली, 'रामः रामौ शास्त्री' लोकांची देखील कांही नांवे त्या पुस्तकांत आली. पण डेंगवेकरांसारख्या महाविद्वानांची नांवे गळलीं, सरळच आहे. समाजामध्ये न वावरणाऱ्या कधी कोणाजवळ कसलीच याचना न करणाऱ्या आणि ईश्वरावाचून कोणाचीच कदर न बाळगणाऱ्या बाळशास्त्र्यांची आठवण संपादकांना न झाली व असलेले प्रकरण गळले तर कांही आश्चर्य नाही."

"यांचेपाशी माझे न्यायशास्त्राचे अध्ययन झाले: मुक्तावली, दिनकरीपर्यंत रामकृष्णपंत देशपांडे आणि लक्ष्मणशास्त्री कालगांवकर हे सहाध्यायी होते. शास्त्रीबुवा मला संबंध न्यायशास्त्र शिकवीत आहेत, हे पाहून बाळशास्त्री डेंगवेकरांचे वडील बंधु 'भाऊ' म्हणजे शंकरशास्त्री डेंगवेकर, मु. पंढरपूर, एकदा म्हणाले की, 'बाळशास्त्री तुला शिकवतो आहे, म्हणजे आश्चर्यच आहे.' शंकरशास्त्री डेंगवेकरही महातपस्वी आणि अयाचित, व व्याकरणामध्ये तसेच परिनिष्ठित होते."

"बाळशास्त्री डेंगवेकरांना ऋग्वेद संहिता, ऐतरेय ब्राह्मण, आरण्यक, वेदांगे, धर्मशास्त्र, आणि न्यायशास्त्र हे सारे संपूर्ण उपस्थित होते, श्रीमद्भागवत जवळ जवळ तोंडपाठ होतें, कथासरित्सागर आणि अरबी सुरस गोष्टी, सगळ्या येत होत्या. शेकडो अभंग व आर्या मुखोद्गत होत्या. वाटेल तसल्या मनुष्यापाशी आणि पोरांच्यापाशी देखील तासन्तास बोलत बसत. ते गर्विष्ठ अहंकारी आहेत, असे पुष्कळांना वाटे. मलाही तसे वाटले. पण मग तो माझा भ्रम आहे असे ठरले. माझ्या ज्येष्ठ बंधुंच्यापाशी त्यांनी जे कांही सांगितले होते त्यामुळेच माझ्या ज्येष्ठ बंधूंनी माझ्या ब्रह्मचर्यानेच आयुर्मान व्यतीत करण्याच्या निश्चयाला मान्यता दिली होती. त्यांनी कधी कोणास चांगले म्हटले नाही; मत्सराने नव्हे मात्र. माझी तीन चार प्रवचने शास्त्रीबुवांनी ऐकली होतीं त्यांतील एका प्रवचनाला गुरुवर्य तात्या रानडेही होते. प्रवचन संपल्यावर त्या दोघांनी प्रशंसोद्गार काढले. शास्त्रीबुवा म्हणाले, काय तात्या ! नारायणाचे प्रवचन कसं काय झालं "तो काय समुद्र आहे ! तात्या म्हणाले,"

आरंभी हार्दिक संबंध जडला नाही. पण मग मात्र घनिष्ठ असा संबंध उत्पन्न झाला. शास्त्रीबुवांच्या अंतकाळी मी सन्निध नव्हतो. एका प्लेगमध्ये शास्त्रीबुवांचा नातू मजकडेच शिकत होता. त्याला प्लेग टोचून घेतला. नंतर शास्त्रीबुवांच्या विधवा मुलीबद्दल विचारले

की, ताईंना टोचायचे ना ! शास्त्रीबुवा म्हणाले. 'तूं नको तिची काळजी करायला'. त्यांच्या बोलण्याचा अभिप्राय असा होता की, आतां ती विधवा असून अनाथ आहे. जर प्लेगने कदाचित् वारली तरी कांही वाईट नाही. हा अभिप्राय ऐकून मी दचकलो. नातवाला मात्र टोचण्याचा रुकार म्हणण्याबरोबर दिला. शास्त्रीबुवांच्या अंतकालानंतर दोन वर्षांनी विधवा गुरुकन्या प्लेगामुळे राममय झाली. तिचं शरीर दृढ होतं. पण एका दिवसांत प्लेगच्या आहारी गेलं. मरणकाली रामपंचायतनाची तसबीर २-३ हातांवर दिसेल अशी मीच ठेवली होती. तीव्र यातना होत अती महत्त्वाचे वाक्य, श्री प्रज्ञानंदस्वामीजी आत्मानुभवाने ठासून बोलणारे होते. नारायण शास्त्र्यावर लक्ष होतें, हे श्वानासारखे लक्ष्यवेधी असतात, हे नेमके लक्ष्य हुडकतात. लक्ष्याचा वेध करून लक्ष्याचे कल्याणच होते. स्वामीजी मला नारायणशास्त्री म्हणत आणि अहोजाहो करीत. उलट नारायणशास्त्र्याची लहानपणापासून वेदांतानुकूल वृत्ती. स्वामींच्या त्या प्रवचनामुळे नारायणशास्त्र्याची बुद्धी तन्मय झाली. 'वाक्यादेव अपरोक्षधी:' सद्गुरुकृपा झाली. आम्ही म्हणजे मी, लक्ष्मणशास्त्री रिसबुड, आचार्य विष्णुशास्त्री बापट, अयनीमेट्याचे विनायकबुवा पेंडसे, पारकरशास्त्री, नारायणबुवा द्रवीड, पावगीशास्त्री अशा सर्वांनी शारीरक भाष्य प्रारंभण्याविषयीं विनंती केली. रत्नप्रभाटीकेसह शारीरक भाष्याला दोन अडीच वर्षे लागली. शारीरक भाष्यानंतर बृहदारण्यकभाष्य झाले. कोकणांतील पाली सिद्धेश्वरचे गोविंद शास्त्री कोनकर वेदान्तग्रंथांचे अध्ययन करण्याकरितां आले. कोनकरांना पंचदशी सटीक सांगण्याचे काम स्वामीजींनी मजकडेच दिले. शिवरामबापू करंदीकर इत्यादी कांही मित्रजन आणि कांही विद्यार्थी मिळून आम्ही रोज गीतेचे सहा अध्याय व चार शंकराचार्यांची स्तोत्रें रात्रौ संध्येनंतर म्हणत असू. तसा गुरुपरंपराप्राप्त आचार होता. त्याच आमच्या मंडळींत गीतेची शंकरानन्दी टीका मी सांगू लागलो. स्वामीजींच्या पाठाचीच बरोबर पद्धती मी घेतली होती. एक महिनाभर तरी सद्गुरु स्वामी माझ्या प्रवचन श्रवणाला हळूच येऊन बसत असत. मुकाट्याने येऊन बसत आणि शेवटी परत जात. त्यांचे समाधान झाले."

"स्वामीजींच्या शारीरक भाष्यप्रवचनाची ख्याती काशी रामेश्वरापर्यंत झाली होती. वाईस आलेला बाहेरचा विद्वान् एक दोनदा तरी श्रवणाला व दर्शनाला येऊन जात असे. कधी कधी रात्रौ निवांत वेळी सारे गुणगुणत असत, 'विठ्ठल विठ्ठल जयजय विठ्ठल' चे भजनही चालत असे."

"सद्गुरु स्वामी शके १८२६ आश्विन शुद्ध ८ रात्रौ ठीक चारा वाजता समाधिस्थ झाले. प्लेग झाला होता. नारायणबुवा द्रवीड (यांसच द्रविडस्वामी, संन्यासानंतर म्हणत.) आणि मी संदिग्ध होतो. सद्गुरूंचे बृहदारण्यकभाष्याचे शेवटचे राहिलेले तीन पाठ पुरे करून सर्व प्रस्थानत्रयीचे नित्य प्रवचन करावयास शके १८२७ च्या आरंभापासून मी प्रारंभ केला."

"अध्ययन-अध्यापनामध्ये आपले सर्व आयुष्य वेचावयाचे असे वयाच्या २३ साव्या वर्षी निश्चित झाले. शारीरिक, मानसिक, व बौद्धिक बल पूर्णपणे अनुकूल होते. संसार करावयाचा

नाही, असे ठरविले, द्रव्यार्जनावाचून संसार करताच येत नाही; आणि द्रव्यार्जन करावयाचे तर प्रायः तोंडपूजेपणा, लांगुलचालन, स्वाभिमानशून्यता इत्यादी दुर्गुणांवाचून शक्य दिसत नाही असे दिसून आले. पारतंत्र्य अतिदुःसह आहे त्यामुळे स्वोन्नती करता येत नाही, असे वाटू लागले. विचार करू लागलो. कोणाच्याच ताब्यांत जावयाचे नाही. भिक्षा मागावी लागेल, पण आजही आपण भिक्षा मागतोच आहो. तशीच आजन्म मागू. पण, एक भिक्षा म्हणजे मधुकरी सोड- असता तोंडी राननाम आणि दृष्टी रामावर, अशा स्थितीतच श्वास थांबला. नंतर दोन वर्षांनी गुरुपत्नीही प्लेगनेच वैकुंठवासी झाल्या. आदर्श स्त्री होती; परमार्थनिष्ठ व सुखदुःखातीत होती. मुलगे तीन गेले, पती गेले, विधवा तरुण मुलगी गेली. आता फक्त १४ वर्षाचा दौहित्र उरला, तोही नारायणशास्त्र्यांच्या जवळच शिकतो आहे, तेव्हा काळजी नाही, अशा स्थितीत शांत चित्ताने व्यवहार चालले होते. त्यांच्या आजारामध्ये मीच सन्निध होतो, और्ध्वदेहिक झाल्यावर चीजवस्तु सर्व नारायणशास्त्र्यानेच आपल्या पाठशाळेत नेऊन ठेवले आणि नातवाला पाठशाळेच्या विद्यार्थीगृहांत ठेऊन घेतले. तो जरा मोठा झाल्यावर त्याचे सर्वस्व त्याच्या स्वाधीन केले. तो आपल्या इच्छेने अन्यत्र गेला.''

''आता सद्गुरु परमहंस प्रज्ञानंद सरस्वती स्वामी यांच्या संबंधाने लिहावयाचे. वास्तविक त्यांच्यासंबंधी कसे लिहावयाचे ? कारण 'यतो वाचो निवर्तन्ते' तथापि 'स्मर्तृणां वरद परमं मङ्गलमसि'.''

पूर्वाश्रमीचे नांव कृष्णशास्त्री गौरीशंकर परांजपे, रामशास्त्री, वासुदेवभट व नानुभट असे तीन बंधु होते. कृष्णशास्त्र्यांचे लग्न झाले होते पण पत्नी लवकरच वारली. पुनः लग्न केलेच नाही. कृष्णशास्त्र्यांच्या घराण्यांत वेद, श्रौत याज्ञिक, शास्त्र आणि अग्निहोत्र दोन तीन पिढ्यांचे होते. त्यांचे स्वतःचे वेदशाखा, श्रौत याज्ञिकी, ज्योतिष्टोमाचे सामगायन व संस्कृत व्युत्पत्ती इतके अध्ययन झाले होते. वाईतील त्यावेळचे प्रसिद्ध संन्यासी श्री. भूमानंद व रामानंद यांच्या वेदांतपाठाच्या श्रवणाला कृष्णशास्त्री जात असत. प्रस्थानत्रयभाष्याचे श्रवण झाल्यावर स्वतः प्रवचन करण्यास प्रारंभ केला. द्वारकेच्या देवालयामध्ये प्रथम गीताभाष्यापासून सुरवात झाली. वयाच्या ३५ व्या वर्षी (शके १८१३,१४ मध्ये) संन्यास झाला. श्री. रामानंदांचे शिष्य श्री. ब्रह्मानंद हे बह्मचर्याश्रमांतून तरुणपणींच संन्यास घेतलेले महाविरक्त होते. त्यांच्याजवळ संन्यस्त कृष्णशास्त्र्यांचा योगपट्ट झाला; व प्रशानंद असे नामाभिधान झाले. गंगापुरीच्या घाटावरील मुरलीधराच्या मठामध्ये राहणे नी प्रवचन सुरू झाले. त्यानंतर दातारमठांत आले आणि पंचायतनाच्या देवळामागील कुप्पुशास्त्री द्रविड यांच्या पडक्या घरांत प्रवचन सुरू झाले. पुढे नानासाहेब रिजबूड यांनी दातारमठाखालील मारुतीचे पडके देऊळ नीट केले. देवळावर लहानशी सुंदर माडी बांधली. योगाभ्यास करण्याला एक छोटी खोली आणि तीन खणी चौरस दालन व सहा खिडक्या अशी ती माडी बांधली. स्वामींच्या प्रस्थानत्रयाचा पाठ येथे सुरू झाला. अखेरपर्यंत तेथेच चालू होता.

दातारमठातून जाता येता स्वामीजींना आम्ही दंडवत घालीत असू. ''

''एकदा एकादशीच्या दिवशीं स्वामींच्या भाष्यपाठाला जाण्याची आम्हाला इच्छा झाली. केनोपनिषद्भाष्य चालू होते. 'नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च। यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च ॥'' यावर पाठ संपला. मुद्याचे वाक्य; ब्रह्मानुभवाच्या दृष्टीने त्यास इतर गोष्टींत कोणाच्याही ताब्यांत जाण्याचा प्रसंग येऊ द्यावयाचा नाही. सुदैवाने पुढे तसेच घडून आले. २३ साव्या वर्षापासून ५३ व्या वर्षापर्यंत-संन्यास होईपर्यंत-अध्यापनाचे कार्य तप म्हणून केले. मधुकरी, भोजन, थोडी स्नानसंध्या, योगाभ्यास, थोडी झोप यांखेरीज सर्व काळ अध्ययन-अध्यापनांत गेला. कांही काळ सामाजिक, राजकीय चळवळीमध्येही गेला.''

गुरुवर्यांनी स्वतःच आपली आत्मचरित्रविषयक टिप्पणी लिहिली आहे. त्यांतील त्यांच्याच शब्दांत त्यांच्या पंडित व साधु गुरूंच्या सहवासाचे हे चित्र दाखविले.[१]

आचार्यत्वाची दीक्षा व प्राज्ञमठाचा प्रारंभ -

गंगापुरींतील द्वारकेच्या देवळाजवळ सखभट गोडबोले राहात होते. त्यांच्या घरीं बाहेरच्या पडवीच्या खोलीमध्ये गुरुवर्य व त्यांचे सहाध्यायी लक्ष्मणशास्त्री[१] रिजबूड एका जीवाने राहून अभ्यास करीत. प्रथम गोडबोले यांच्या घरींच प्राज्ञपाठशाळा सुरू झाली असें म्हटले तरी चालेल. कै. विष्णुशास्त्री बापट इत्यादी मंडळी येथेच सहाध्यायी या नात्याने गुरुवर्याबरोबर चिंतनिकेस येत होते. सर्व भारतवर्षात संस्कृत वक्तृत्वाने आणि संस्कृत लेखनशैलीने अप्रतिम यश मिळविलेले विद्यावाचस्पती अप्पाशास्त्री राशिवडेकरही याच सुमारास वाईहून संस्कृतचन्द्रिका ही संस्कृत मासिकपत्रिका प्रसिद्ध करीत होते. अप्पाशास्त्री राशिवडेकरांसारखा प्रचलित व्यावहारिक विषयांवर आणि परंपरागत धार्मिक आणि तात्त्विक विषयांवर संस्कृत भाषेत लालित्य आणि प्रसाद या गुणांनी संपन्न, विविध लेखन करणारा, प्रतिभासंपन्न कवि- पंडित गेल्या दीडशे वर्षात झाला नाही अप्पाशास्त्री राशिवडेकर यांचा व गुरुवर्याचा एकत्र न्यायशास्त्राच्या अध्ययनाचा योगायोग जमून आला होता. परंतु थोडे दिवस न्यायमुक्तावलीची एकत्र चिंतनिका झाल्यावर अप्पाशास्त्री यांना त्या विषयाची आवड उत्पन्न न झाल्यामुळे त्यांनी तो विषय सोडून दिला. काशिनाथशास्त्री लेले यांची कारकीर्द यावेळीं भरभराटीस आली होती. सुधारकांच्या विरुद्ध कंबर कसून उभा राहिलेला वाग्वीर पंडित म्हणून लेलेशास्त्री यांची ख्याती देशांत दुमदुमत होती. इ. स. १८९८ ते १९१४ यांमधला हा काळ आहे. लेलेशास्त्री 'धर्म' मासिक स्वतःच्या मोदवृत्त छापखान्यांत छापून प्रसिद्ध

---

(१) गु. स्वामींनी आत्मचरित्रात्मक केलेल्या टिप्पणीच्या आधारावरून- माझे 'अथ प्रजानां ' पासून वेदान्तभाष्यान्त अध्ययनाचा सहाध्यायी (मु. पोयनाड जि. कुलाबा) होता. १४ वर्षे रात्रंदिवस सहवास, बंधुत्वाचे नाते, मी थोरला, तो धाकटा, सच्छील, अति कष्टाळू, प्राय: कोर्ट कचेरीकडे न फिरकणारा. आल्यागेल्याचा सत्कार करणारा. मरणान्त बंधुभाव.

करीत होते. लेलेशास्त्री यांचे शांकर वेदान्ताचे अध्ययन सद्गुरु ब्रह्मीभूत प्रज्ञानंद सरस्वती यांच्यापाशी झाले होते. गीताभाष्याचे व ब्रह्मसूत्रभाष्याचे भाषांतर लेलेशास्त्री यांनी प्रसिद्ध केले आहे. प्रज्ञानंद स्वामींच्याकडे गीताभाष्य ऐकल्यानंतरच लेलेशास्त्री यांनी गीताभाष्याचे भाषांतर लिहिले. आमचे गुरुवर्य श्री. नारायणशास्त्री मराठे जेव्हा ब्रह्मसूत्रभाष्याचा पाठ प्रज्ञानंद स्वामीच्या पाशी घेत होते, तेव्हा लेलेशास्त्री यांनी ब्रह्मसूत्रभाष्याचे भाषांतर सुरू केले. अशी आख्यायिका सांगतात की, लेलेशास्त्री यांस समन्वयसूत्रावरील शांकरभाष्याच्या कांही ओळींचा नीट उलगडा झाला नव्हता. परंतु त्यावेळी ते प्रज्ञानंद स्वामींच्या पाशी नित्य पाठ घेत नव्हते. अडलेल्या ओळींचा उलगडा करवून घेण्याकरतां समन्वयसूत्राचा पाठ त्यांनी कोणास न कळत स्वामींच्या जिन्यांत बसून ऐकला. ही आख्यायिका मला कै. रामकृष्णपंत देशपांडे (पुणे-विद्यापीठाचे प्राध्यापक नारायण रघुनाथ देशपांडे यांचे अाजोबा) यांच्याकडून ऐकावयास मिळाली. वाईत या वेळीं शास्त्री, पंडित, पुराणिक, कीर्तनकार, वैदिक, याज्ञिक, संन्यासी, नैष्ठिक ब्रह्मचारी, जीवन्मुक्त साधु, अशांचा चांगला भरणा होता, अनेक गृहकार्यरत स्त्रियांना सुद्धा वेदशास्त्रपुराणांच्यामध्ये बहुश्रुतपणा प्राप्त झाला होता. वाईची संस्कृतविद्येचे विद्यापीठ अशी ख्याती याच कारणास्तव देशभर होती.

गेली चारशे वर्षे वाई संस्कृतविद्येच्या परंपरेचे अधिष्ठान म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु जेव्हा रास्ते सरदार यांनी दीडशे वर्षापूर्वी वाईला नव्या मोठ्या वसाहतीची जोड दिली, चार नव्या पेठा वसविल्या, मुख्यतः ब्राह्मणी वसाहत वसविली; तेव्हा त्या योगाने ब्राह्मणी-विद्या विशेष भरभराटीस आली. तीर्थविधीचे क्षेत्र म्हणून मात्र वाईस माहात्म्य कधीच प्राप्त झाले नाही. त्यामुळे हातात पूर्वजांच्या नोंदी असलेल्या चोपड्या घेऊन यजमानांच्या पाठीमागे लागणारा लोचट व गयावया करणारा गयावळी भिक्षुकाचा वर्ग येथे उत्पन्न झाला नाही. प्रतिष्ठित व स्वाभिमानी पुरोहितांचा गड्ढा या ठिकाणी तयार झाला. रास्त्यांनी दिलेल्या नियमित उत्पन्नावर जगणारा आणि सावकारी व सावकारीमुळे कब्जा मिळविलेल्या तारण गहाण जमिनी यांच्यावर निर्वाह करणारा ब्राह्मणवर्ग या ठिकाणी सर्वात मातब्बर झाला. मध्यम प्रतीचे स्वाथ्य असलेले पांढरपेशे तयार झाले. त्यांचे व्यायामाचे व कुस्तीचे आखाडेही चांगले भरभराटीस आले. तीन चार पिढ्या असा काळ गेला. पांढरपेशांची विशेषतः ब्राह्मणांची नवी पिढी शिकून तयार झाल्यावर येथे निर्वाहाचे पुरेसे साधन नसल्यामुळे अन्यत्र उद्योगधंद्यास व नोकरीस आतां जाऊ लागली आहे; असा क्रम गेलीं पन्नास वर्षे सुरू आहे.

५० वर्षापूर्वी म्हणजे १९०१ सालच्या सुमारास गुरुवर्यांनी अध्यापनास सुरुवात केली. जुन्या शिक्षणपद्धतींत अध्यापन करण्याची योग्यता प्रत्यक्ष अध्ययन चालू असतानाच प्राप्त होते. काव्यव्युत्पत्तीचे व शास्त्रव्युत्पत्तीचे पाठ घेणारे विद्यार्थी जेव्हा घेतलेला पाठ तयार करतात, तेव्हा तो पाठ स्वतःच एकटे बसून जसा तयार करतात, तसा एकाच वर्गात अनेक विद्यार्थी असल्यास गुरुजींच्याकडून पाठ ऐकल्यावर तो पाठ आळीपाळीने

एकमेकास सांगतात. अधिक बुद्धीचा व अधिक तयारीचा विद्यार्थी गुरूकडून ऐकलेला पाठ सहाध्यायांस सांगतो. या क्रियेस चिंतनिका सांगणे, असे म्हणतात, ज्या विद्यार्थ्यांची तयारी कमी असते, त्यांसही दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रामाण्य बाजूस सारून अनुभव, निरीक्षण व चिकित्सकता या तीन अंगांची सम प्रमाणांत वाढ होत नाही. परंपरेवरील अंधश्रद्धेमुळे ज्ञानाची अनुभवनिष्ठ प्रगती होत नाही, पांडित्याला वस्तुनिरीक्षणाची आणि अनुभवाची जोड देण्याची वासना नसते. त्यामुळे परंपरेचे समर्थन करतांना शुष्क पांडित्याची आणि छलवादाची खोड जडते. तिसरे असे की, धार्मिक परंपरेवर निष्ठा असूनही उच्च दर्जाची धार्मिकता आणि जड व भोळसट रूढींतील कर्मठपणा यांच्यातला विवेकपूर्ण फरक समजत नेसल्यामुळे उदार, व्यापक व सहानुभूतिपूर्ण धार्मिक भावना वाढीस लागलेल्या नसतात. खराखुरा धार्मिक जिव्हाळा आणि मानवी सहानुभूती यांचा ओलावा हृदयांत उत्पन्न होत नाही. हे दोष परंपरागत पंडिती पद्धतीचे आहेत. या परंपरागत पद्धतीतील कांही परंपरा धार्मिक दृष्टीने व्यापक, निष्ठापूर्ण आणि आध्यात्मिक वृत्तीस प्राधान्य देणाऱ्या आणि पढिक पांडित्यास मर्यादित महत्त्व देणाऱ्या आहेत. त्यांत वरील दोष उत्पन्न होत नाहीत. विशेषतः वावदूकपणाला आणि रूक्ष शब्दपांडित्याला अनर्गल समजतात.

आमच्या गुरुवर्यांना लाभलेली परंपरा पांडित्यापेक्षा आध्यात्मिक निष्ठेला महत्त्व देणारी होती. शब्दप्रामाण्यापेक्षा सारासारविचाराचे अधिक मूल्य मानणारी होती, अपरिग्रहवृत्ती, तप, ध्यान व तत्त्वचिंतन यांत आयुष्य व्यतीत करून परमार्थाची साधना करणे, हा ध्येयवाद होता. या परंपरेला अध्यापन किंवा लोकशिक्षण या कर्मयोगाच्या अंगाची जोड गुरुवर्यांनी दिली. विद्यार्थ्याने गुरूची सेवा करीत अध्ययन करावे, या विद्यार्थीधर्माबरोबर विद्यार्थ्याची पिलाप्रमाणे गुरूने काळजी घ्यावी, त्याच्या विद्यार्थीदशेंतील योगक्षेमासही हातभार लावावा, दैनंदिन सर्व प्रकारच्या जीवनक्रमावर देखरेख ठेवून शील आणि सदाचार उत्पन्न करून उज्वल चारित्र्याचा विद्यार्थी निर्माण करावा, अशा आचार्यधर्माचा अंगीकार गुरुवर्यांनी केला. या अंगीकारिलेल्या आचार्यधर्माप्रमाणे त्यांनी इ. स. १९०१ (शके १८२३) पासून अध्यापनाच्या कार्यास प्रारंभ केला.

प्रथम तीन चार विद्यार्थी शिकत असत संख्या हळू हळू वाढत चालली. केवळ शिकवून मोकळे व्हावयाचे नाही. शिकविलेले समजले की नाही आणि समजलेले टिकाऊ झाले की नाही, हेही ते नित्य तपासू लागले. अभ्यास करवून घेत. विद्यार्थ्यांचा विषयांत किंचित् प्रवेश झाल्यावर, त्यांच्याकडूनच वर्गातही त्यांना खत:च समजू शकेल तो विषय लावून घेत. अर्थात् ही पद्धती थोड्या नियमित संख्येच्या विद्यार्थ्यासच लागू करता येते. या पद्धतीने विद्यार्थ्यांचे अध्ययन पक्के होते. त्यांना मननशक्ती प्राप्त होऊन स्वतंत्रपणे विषय शिकण्याची योग्यता व गुरूवाचून अनेक विषयांत पारंगत होण्याची हातोटी प्राप्त होते.

अशा पद्धतीने शिकलेले विद्यार्थी आत्मविश्वाससंपन्न होऊन बाहेर पडू लागले. बहुश्रुतपणाच्या योगाने समाजावर हुकमी छाप पाडू लागले. गुरुवर्यांच्या आचार्यत्वाचा लौकिक वाढू लागला; विद्यार्थ्यांची संख्या वृद्धिंगत होऊ लागली. ब्रह्मीभूत प्रज्ञानंद सरस्वतींचे एक शिष्य कै. केशव वासुदेव ऊर्फ शंभुराव करंदीकर, वकील यांनी स्वामिजींच्या समाधीवर मठ बांधला; आणि त्यांत गुरुवर्याचे विद्यार्थी राहू लागले. दातारमठ, करंदीकरांचा मठ आणि मुरलीधरमठ यांत २०ते२५ विद्यार्थी शिकू लागले. पंचमहाकाव्य, भागवत, व्याकरण, वेदान्त, न्याय इत्यादी विषयांचे शिक्षण होऊ लागले. विशेष प्रगती झालेल्या विद्यार्थ्यांच्या हाताखालीं प्राथमिक विद्यार्थ्यांचे काही वर्ग चालत. त्यामुळे दुहेरी फायदा होई. तयार होणाऱ्या विद्यार्थ्याला अध्यापनाची सवय होई आणि मुख्य आचार्यांच्या कार्याचा भाग हलका होई. एका आचार्याचे अनेक आचार्य बनू लागून 'प्राज्ञमठ' ही संस्था आकारास आली.

आचार्यानी प्राचीन परंपरा धरून शिक्षणपद्धती आखली होती. परंतु त्या परंपरेतील कांही वैगुण्ये व दोषस्थळे लक्षांत घेऊन त्यांत बदल केला. प्राचीन पद्धतींत पाठांतरास फाजील महत्त्व दिलेले असते; पाठांतराचा एकदम बोजा बालविद्यार्थ्यावर टाकलेला असतो. बालविद्यार्थी संस्कृत शिकू लागल्याबरोबर प्रथमच नामरूपावली, समासचक्र, धातुरूपावली आणि संबंध अमरकोश, हे पाठ करून घेत असतात. गुरुवर्यांनी यांत सुधारणा केली. नामरूपावली, धातुरूपावली व समासचक्र हे एकदम पाठ करवून न घेता संस्कृत भाषा पायरी पायरीने शिकवत असत. हेही क्रमाक्रमाने विभागून शिकविण्याची पद्धती काढली. अमरकोश पाठ करावयाचा नाही. त्याऐवजी निवडक संस्कृत वाङ्मयाचे पाठांतर ठेवले. अमरकोश कसा पाहावा, एवढेच शिकविले. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, जुन्या पद्धतींत, वयांत येत चाललेल्या विद्यार्थ्यास शिकविण्याच्या विषयांत उत्तान शृंगाराचे कालिदासदिकांचे भाग असत, ते गुरुवर्यांनी गाळून टाकले. तिसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, जुन्या शास्त्री - पंडितांच्या शिक्षणांत नव्या व्यावहारिक शिक्षणाचा इतिहास, भूगोल इत्यादिकांचा आणि नव्या गद्याचा समावेश होत नव्हता, तो गुरुवर्यांनी केला. देशकालास अनुरूप विचार करणारे व्यवहारज्ञ शास्त्री व धर्मोपदेशक तयार करणे, असे प्राज्ञमठाच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय ठरले, पढिकपणा व कर्मठता यापेक्षा सार व विचार यांचे सरसपणे ग्रहण करणारा सनातनी शास्त्री व धर्मोपदेशक निर्माण करणे हे ध्येय ठरले. प्राज्ञमठ हे नांव प्रज्ञानंद सरस्वतींच्या स्मरणार्थ दिले गेले.

प्राज्ञपाठशाळेची स्थापना-

स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीयशिक्षण या चतुःसूत्रीच्या आधारावर १९०५ सालच्या सुमारास आपल्या देशांत जी चळवळ निर्माण झाली, तिच्यामुळे पांढरपेशा वर्गात नवजागृती उत्पन्न झाली होती. स्वराज्याच्या राजकारणाभोवती पावित्र्याचे आणि

धार्मिकतेचे तेजोवलय तयार होऊ लागले होते. राष्ट्रीयत्वाची व भारतीय संस्कृतीची भावना एकरूप होऊ लागली होती. राष्ट्राची अस्मिता धार्मिक व आध्यात्मिक भावनेने पुनीत होऊन उजळू लागली होती. या धार्मिकतेने उजळलेल्या राष्ट्रीयत्वाचे स्पंदन व स्फुरण, जुन्या परंपरेत वाढलेल्या शास्त्रीपंडितवर्गास मात्र स्पर्श करू शकले नाही, त्यास जे कांही अपवाद देशांत उत्पन्न झाले, त्यांत प्राशमठ व त्याचे आचार्य यांची गणना करता येते. धार्मिक पावित्र्य आणि राष्ट्रीयत्व यांचा उचित संगम होऊन राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ निर्माण झाली. बंगाल व महाराष्ट्र पुढे होता. त्या चळवळीचे मूर्तिमंत स्वरूप तळेगांव येथील समर्थ विद्यालय होय. त्यावेळीं देशांत मोठमोठी विश्वविद्यालये होती. शहरामध्ये लक्षावधी विद्यार्थी इंग्रजी शिक्षण घेत होते. त्या इंग्रज सरकारने निर्माण केलेल्या शिक्षणसंस्थांच्या विस्ताराशी तुलना करता ही राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ फार अल्प होती. पर्वत आणि राई यांच्याइतके अंतर होते. परंतु त्याचे महत्त्व मात्र उलट होते. या राईएवढ्या राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याची ही विलक्षण महत्त्वपूर्णता अत्यंत विचक्षण अशा ब्रिटिश सरकारला देशांतील मोठ्या बुद्धिमंतापेक्षा अधिक चांगली समजली. वाऱ्याची दिशा बदलण्याची ती खूण होती. दर्यावर्दी इंग्रज लोकांना वादळाच्या अगोदरच वादळाची पूर्वचिन्हे समजत होती, म्हणून दिसायला अत्यंत अल्प असलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीला वेळीच दडपून टाकावे, असे भारतमंत्र्याने इंग्लंडमध्ये ठरविले, समर्थ विद्यालय ही संस्था स. १९१० साली इंग्रज सरकारने बेकायदेशीर ठरवून बंद पाडली. सुमारे दीडशे विद्यार्थी आणि पंधरावीस शिक्षक व चालक एवढेच या विद्यालयाचे स्वरूप होते; परंतु त्यांत ध्येयवादाचे चैतन्य होते; राष्ट्राच्या स्वातंत्र्याची स्वप्ने त्यांना दिसत होती; बंडाने स्वातंत्र्य मिळणार नाही, असे बुद्धिवाद सांगत होता; तरी स्वातंत्र्यप्राप्तीचे सर्व उपाय पवित्र होत अशा जिवंत श्रद्धेने ध्येयप्राप्तीबद्दल निश्चय उत्पन्न केला होता. कारण उन्नती व अवनती, विजय व पराजय, चिरकाल दैन्य आणि दीर्घकालीन वैभव अशा अवस्थांमधून गेलेल्या, अगणित युगे पाहिलेल्या भारत वर्षाची अहंता हे लोक अनुभवत होते स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांचा अभिमान हे त्यांचे ब्रीद होते. समर्थ विद्यालयांतील अध्यापक कार्यकर्ते आणि प्रौढ विद्यार्थी विद्यालय बंद झाल्याबरोबर वाट फुटेल तिकडे निघून गेले. परंतु त्यांतील अनेकजण स्फूर्तिसंपन्न आणि या ध्येयाने प्रज्वलित असल्यामुळे जेथे गेले तेथे या ध्येयाच्या प्रेरणेचे केंद्र बनले. त्यांच्यांत दूरत्व जरी आले तरी एका ध्येयामुळे निर्माण झालेले ममत्व दृढ राहिले. त्यांना आत्मीयत्वाने ओळखणारे राष्ट्रीय चळवळीचे लहानमोठे कार्यकर्ते देशांत विखुरले होते. ते एकमेकांना मदत करू लागले. या समर्थ विद्यालयांतील कांही मंडळी प्राज्ञमठांत आली. संवादी भावना आणि संवादी विचार असल्यामुळेच गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या आधिपत्याखालीं सुरू झालेल्या प्राज्ञमठांत ही मंडळी आश्रय घेऊन राहिली, यांत पंडित दिनकरशास्त्री कानडे आणि महादेवशास्त्री दिवेकर हे प्रमुख होत.

गुरुवर्यांच्या हाताखाली तयार झालेले अनेक प्रौढ विद्यार्थी समर्थविद्यालयाची मंडळी आली तेव्हा, त्यांच्याकडे आकर्षिले गेले. गुरुवर्य स्वतः विष्णुशास्त्री चिपळुणकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचासरणीचे आणि राजकारणाचे पुरस्कर्ते बनले होते. इतर ठिकाणच्या पाठशाळांतील विद्यार्थी सुद्धा प्राज्ञमठांत शिक्षणार्थं येऊ लागले होते. सांगली येथील व्यंकटरमणाचार्य या महावैयाकरणाच्या हाताखालीं शिकलेले पाली-सिद्धेश्वरचे कोनकर बंधु, निजामशाहींतील अंजनवतीचे केशवशास्त्री विप्र इत्यादी प्रौढ विद्यार्थी वेदान्तशास्त्र शिकण्याकरतां आले. याशिवाय टेंभूचे आठल्ये, पेणचे विष्णु विनायक परांजपे, मिरजेचे दत्तूशास्त्री देवधर इत्यादी विद्यार्थी त्याचवेळी शिकत होते. वाईतील गंगाधरशास्त्री सोहनी, भालचंद्रशास्त्री नेने व रघुनाथ रामकृष्ण देशपांडे इत्यादि तरुण, संस्कृत - व्युत्पत्ती संपवून शास्त्राध्ययन करीत होते. पंचवीस ते तीस विद्यार्थी एकाच वेळी शास्त्रे आणि पुराणे यांचा अभ्यास करीत होते. व्याख्यान, प्रवचन, लेखन यांमध्ये झळकणारे हे विद्यार्थी होते. शंभुराव करंदीकर यांनी बांधलेल्या प्राज्ञमठांत ही प्राज्ञपाठशाळा मुख्यतः चालू झाली. आचार्य आणि विद्यार्थी यांच्यांत समरसता उत्पन्न झाली. तरुण आचार्य व त्याच अवस्थेतील शिष्य यांच्यांत समसंवेदना निर्माण झाली. अकिंचनता होती; बहुतेक विद्यार्थी व आचार्य मधुकरी वृत्तीनेच राहात होते. परंतु धार्मिक भावनेने आणि राष्ट्रीयत्वाच्या आकांक्षेने अंत:करणे आशावादी आणि उत्साहसंपन्न होती; उमेद व दमदारपणा होता; खेळाडू वृत्ती होती; ऐहिक सुखसोयीच्या विषयीं उपेक्षात्मक वृत्ती होती; संतोष आणि संयम यांच्यामुळे चित्तवृत्ती उल्हसित होत्या; उंच आणि गंभीर प्राचीन तत्त्वदर्शनांच्या चर्चेने प्रतिष्ठा आणि मोठेपणा अनुभवणारी बुद्धी होती.

अनध्यायाच्या दिवशी प्रातःकालापासून स्वच्छतेचा कार्यक्रम सामुदायिक रीतीने होत असे. तिसऱ्या प्रहरी पंचायतनांतील विष्णूच्या देवळांत चक्रीपुराणे आणि प्रवचने व्हावयाची. त्रयोदशीला स्मृतिशास्त्राची चर्चा आणि प्रत्येक सोमवारी रात्री मंत्रपुष्प, शास्त्रीय चर्चा आणि विद्यार्थ्यांची आगाऊ तयार केलेली भाषणे व्हावयाची. यांत मराठी गद्यपद्यवाङ्मयाचे पाठांतराची परीक्षा होत असे. प्रत्येक प्रतिपदेस प्रातिपदिक नांवाचे लिखित पाक्षिक नियमितपणे निघे. चिपळुणकरांच्या निबंधमालेचा प्रभाव सर्वांच्या विचारावर पडला होता. निबंधमालेचे अध्ययन मोठ्या साक्षेपाने होत असे. सुटीच्या दिवशी कित्येक वेळा बौद्धिक कार्यक्रमाला फाटा देऊन भोवतालची प्रेक्षणीय स्थळें पाहाण्याकरितां विद्यार्थी व शिक्षक जात असत. आठवड्याभर सुटी असल्यास प्रत्येक वर्षी ४०-४५ मैलांचा पायी प्रवास विद्यार्थी व शिक्षक करीत. मधुकरीचे अन्नास पुरवठा म्हणून कालवण दूध इत्यादि पदार्थाची तरतूद मित्रमंडळींत वर्गणी करून गुरुवर्यांनी केली होती. प्रतिवर्षी चारपाचशे रुपये जमत. सर्व कामे विद्यार्थी स्वतःच करीत. श्री. दिनकरशास्त्री कानडे हे आंगमेहनतीच्या कामापासून तो बौद्धिक विषयाच्या कार्यापर्यंत निरलसपणे पुढाकार घेत. गुरुवर्य वर्गणी कमी पडल्यास

भागवतसप्ताह करून दीडशे दोनशे रुपये मिळवीत. त्यांनी काटकसर करून संस्कृत, मराठी पुस्तके विकत घेतली. वाईतील जुन्या घराण्यांतील हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह करून मध्यम प्रतीचे पण निवडक पुस्तकाचे उत्कृष्ट ग्रंथालय निर्माण केले. गुरु आणि शिष्य यांपैकी कोणालाच कसलेहि व्यसन नसे; नाटक पहावयाचे नसे, आणि सिनेमा त्यावेळी वाईत नव्हताच. अत्यंत शुद्ध वातावरणांत प्राज्ञमठांतील पाठशाळा १० वर्षे चालली.

सन १९१४, १५ व १६ या साली (शके १८३५, ३६ व ३७) माजी व विद्यमान् विद्यार्थांची संमेलने माघ महिन्याच्या शेवटी व फाल्गुनाच्या पहिल्या आठवडयांत भरली. १ ले संमेलन वाईत, २ रे कुलाबा जिल्ह्यांतील जांभुळपाडयांत आणि ३ रे पाली-सिद्धेश्वर येथे भरले. या संमेलनांत व्युत्पन्नता, बहुश्रुतता, पांडित्य व वक्तृत्व या गुणांचे आविष्करण झाले. विप्र, कोनकरबंधु व केरुशास्त्री यांची संस्कृत व्युत्पत्ती प्रत्ययास आली. विष्णुशास्त्री परांजपे व भालचंद्रशास्त्री नेने हे चतुरस्र पौराणिक म्हणून, गंगाधरशास्त्री सोहोनी व दिनकरशास्त्री कानडे हे प्रभावी वक्ते म्हणून निदर्शनास आले. नंतर दिनकरशास्त्री कानडे हे महाराष्ट्रांतील एक पहिल्या दर्जाचे धार्मिक, तात्त्विक व राजकीय विषयांचे प्रवक्ते, पंडित म्हणून गाजले. त्यांचे वक्तृत्व अकृत्रिम, उत्साहजनक, निष्ठावंत आणि विचारप्रवण असते; कोटिक्रम सूक्ष्म व अचुक आणि वादचातुर्य प्रगल्भ असतें, उथळ कोटिक्रम आणि बालिश विनोद ते गर्दय समजतात. सर्व आयुष्य शुद्ध ध्येयवादीपणाने त्यांनी व्यतीत केले आहे.

प्राज्ञमठांत तयार झालेल्या विद्यार्थ्यांनी धार्मिक संस्कृत पाठशाळा काढाव्या असा चालकांचा संकेत होता. त्याप्रमाणे वऱ्हाडांत उमरखेड येथे १९१५ साली गंगाधरशास्त्री सोहनी हे पाठशाळा स्थापन करण्याकरितां गेले. भालचंद्रशास्त्री नेने हे मुंबई येथे निघालेल्या सर भालचंद्र भाटवडेकर इत्यादिकांच्या नेतृत्वाखाली चालू झालेल्या पाठशाळेवर संचालक म्हणून गेले. श्री. दिनकरशास्त्री कानडे, श्री. महादेवशास्त्री दिवेकर इत्यादी मंडळींच्या मनांत प्राज्ञमठास पहिल्या समर्थ विद्यालयासारखे मोठे स्वरूप देऊन महाराष्ट्रांतले आदर्श गुरुकुल बनवावे अशी उत्कट इच्छा उत्पन्न झाली. जुन्या शास्त्री पंडितांच्या परंपरेमध्ये, परंपरेबद्दल दृढ श्रद्धा असते; हे जरी खरे असले तरी लोकांच्या बदलत्या आयुष्यक्रमामध्ये नवे मार्गदर्शन करण्याची व्यापक त्यांच्यांत नसते किंवा समय ओळखून योग्य बदल करण्याइतकी प्रज्ञा नसते, किंवा राष्ट्रीयत्व व राजकारण याच्या उत्पन्न झालेल्या नव्या ध्येयनिष्ठेची तळमळ नसते. याचे कारण त्यांचे लहानपणापासूनचे शिक्षणच एकांगी असते. त्यामुळे जुनी परंपरा त्यांना उत्तम अवगत असली तरी वर्तमानकाळाशी असलेली तिची विसंगती त्यांना समजत नाही या शास्त्री पंडितांच्या गटामध्ये नवे संस्कार घेतलेले, विशिष्ट शास्त्रांत पंडित तयार करण्याकरिता आणि बहुश्रुत धर्मोपदेशक, शिक्षक, पुरोहित, गृहस्थी पेशाचा नागरिक तयार करण्याकरिता, प्राचीन गुरुकुलांच्या कल्पनेस अनुसरून प्राज्ञपाठशाळा स्थापन करावी अशी स्फूर्ती श्री, कानडे श्री. दिवेकर व त्यांच्या बरोबरीचे दुसरे सहाध्यायी सोहनीशास्त्री,

नेनेशास्त्री इत्यादी मंडळींना झाली. अशा कार्याचे मुख्य अधिष्ठान द्रव्य, भूमी, गृह इत्यादी बाह्य साधनांच्या पेक्षा ज्ञानवैराग्यसंपन्न व्यक्तीच होऊ शकते. केवळ पांडित्य किंवा केवळ वैराग्य असलेली व्यक्ती, गुरु कुलाच्या मुख्य आचार्यपदास पात्र होऊ शकत नाही. पांडित्य आणि शील यांची संयुक्त संपदा हाच गुरुकुलाच्या आदर्शाचा आधार होय. असा आधार या मंडळींच्या डोळ्यासमोर असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र-गुरुकुलाचे स्वप्न खरे करण्याची आशा उत्पन्न झाली. त्यांनी सन १९१६ सप्टेंबरमध्ये प्राज्ञपाठशाळा स्थापन केली. पं. दिनकरशास्त्री कानडे यांनी स. १९१७ मार्च २४ ला (शके १८३९ वर्षप्रतिपदा) या संबंधीं महाराष्ट्रांत एक पत्रक प्रसिद्ध केले. त्यांत ते म्हणतात:

"ब्रह्मीभूत श्री प्रज्ञानंद स्वामी यांचे एकनिष्ठ शिष्य तपःस्वाध्यायनिरत ब्रह्मचारी गुरुवर्य नारायणशास्त्रीबुवा मराठे हे पुण्य पुरुष वाईक्षेत्रीं कृष्णाकांठी एका मठांत मधुकरवृत्तीने राहून केवळ अध्ययन-अध्यापनांत काल घालवीत असतात. फार प्रसिद्धी न करता ही पाठशाळा दहा वर्षे चालली आहे. या पाठशाळेस स्वधर्माचे व स्वसंस्कृतीचे शिक्षण देणारी नमुनेदार संस्था बनवावी; देश काल परिस्थितीला अनुसरून व जरूर अशा शिक्षणाची भविष्यकाळाकडे नजर देऊन जोड द्यावी; असा गुरुजींचा विचार ठरला, त्यांचे हाताखालीं शिकून तयार झालेल्या कांही शिष्यांनी या पाठशाळेची पूर्ण निरपेक्षसेवा निदान दहा वर्षे करण्याचे ठरविल्यावरून गेल्या विजया दशमीस (इ. स. ६ ऑक्टोबर १९१६) प्राज्ञपाठशाळेस संस्थेचे स्वरूप दिले गेले. महाराष्ट्रांत स्वधर्म शिक्षणाची एक नमुनेदार संस्था चालवावी व पुढेमागे ब्रह्मचर्याश्रम किंवा महाराष्ट्र गुरुकुलाचे पूर्ण स्वरूप तिला प्राप्त व्हावे अशी इच्छा आहे. स्वधर्माचे व स्वसंस्कृतीचे शान होऊन सच्छील, एकनिष्ठ व व्यवहारज्ञ विद्यार्थी तयार व्हावे, हा या संस्थेचा उद्देश आहे. संस्था पूर्णपणे त्यागाचे तत्त्वावर चालविली आहे व चालविली जाईल."

"संस्कृत पाठशाळा व धर्मशिक्षण या विषयांवर वर्तमानपत्रे, मासिके व व्याख्याने यांतून झालेल्या चर्चेचा व सूचनांचा पूर्ण विचार करून व देशांतील कांही संस्था प्रत्यक्ष पाहून संस्थेचा अभ्यासक्रम आखलेला आहे. अभ्यासक्रम मन सुसंस्कृत होऊन, स्वधर्मज्ञान होऊन बहुश्रुतपणा अंगी यावा अशी इच्छा असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यास उपयोगी आहे. महाराष्ट्रांतील धर्माभिमानी सुखवस्तु लोकांस या पाठशाळेचा लाभ आपल्या मुलांस करून देता येईल."

"अभ्यासक्रमाचे मुख्य दोन वर्ग आहेत. (१) विशिष्ट शास्त्रांत निष्णात पंडित होणे. (२) बहुश्रुत धर्मोपदेशक, शिक्षक व नागरिक होणे. काळ व बुद्धी अनुकूल असून इच्छा असेल तर पहिल्या वर्गात प्रवेश होईल, याचा अभ्यासकाल दहाबारा वर्षांचा आहे."

"मध्यम वर्गाचा अभ्यासक्रमः - (१) संस्कृत - नित्यब्रह्मकर्म व इतर धार्मिक कृत्यांची सामान्य माहिती. निवडक वेदभाग, मन्वादी स्मृती व निरुक्तादी वेदांगे यांतील विशेष भाग,

सार्थ पाठ भगवद्गीता व उपनिषदे, भारत रामायण व पुराणे यांतील कांही भाग, संस्कृत वाङ्मय व काव्य साहित्यादिकांचे चांगले ज्ञान, मीमांसा, वेदान्त, धर्मशास्त्र यांचे सिद्धान्त नीट समजणे. (२) मराठी - वक्ता व लेखक होण्यास आवश्यक इतके मराठी गद्य पद्य वाङ्मयांतील निवडक ग्रंथांचे वाचन, (३) इंग्रजी- मॅट्रिक इतके. (४) इतर विषय - आपल्या देशाचा इतिहास व इंग्लंड वगैरे युरोपीय देशांच्या प्रचलित राज्यपद्धतीचे ज्ञान; आपल्या देशाच्या प्रचलित राज्यपद्धतीचे मध्यम ज्ञान, गणित, जमाखर्च, भूगोल वगैरेचे व्यवहारास जरूर इतके ज्ञान.''

''वरील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर तो विद्यार्थी एकंदरीत बी. ए. इतका शहाणा होऊन कोणतेही धार्मिक किंवा सामाजिक कार्य करण्यास समर्थ होईल. गाण्यास अनुकूल आवाज असलेल्या विद्यार्थ्यास गायन शिकण्याची सोय आहे. त्यास उत्तम हरिदास होता येईल.''

''पाठशाळेचे कांही नियमः सर्व विद्यार्थी गुरुजींचे देखरेखीखाली अखंड राहातील, विद्यार्थ्यांची जेवण्याची व राहण्याची सोय विद्यार्थीगृहांत होईल. मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांचा तीन वर्षीचा अभ्यासक्रम ठरविला आहे. अभ्यासक्रमांत नसलेल्या परंतु जरूर अशा विविध विषयांचे ज्ञान व्याख्यानरूपाने करून दिले जाते. मुलांचे अंगीं अवश्य असलेले सर्व गुण येण्याकरितां शक्य ते प्रयत्न केले जातात.''

''युवा स्यात् साधुयुवाऽध्यायकः । आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः ।'' हे उत्तम विद्यार्थ्याचे चित्र डोळ्यांपुढे ठेवून शिक्षकांनी आपण होऊन स्वकर्तव्यबुद्धीने, स्वधर्मसेवा म्हणून, यांतच पुण्य आहे या भावनेने हे कार्य आरंभिले आहे, यापेक्षा कांहीच ज्यास्त सांगणे योग्य होणार नाही. सर्व व्यवस्था गुरुवर्य नारायणशास्त्री बोवा यांचे आज्ञेत व त्यांचे देखरेखीखाली चालते.''

संस्था स्थापन झाल्याबरोबर कै. सीताराम विश्वनाथ पटवर्धन, वऱ्हाड मध्यप्रांतांतील (सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी) यांनी तीन हजार रुपयांस अनगळांचा मोठा वाडा विकत घेऊन संस्था असेपर्यंत कायम वहिवाटीकरिता अर्पण केला. हा भव्य वाडा कृष्णेच्या तीरावर गंगापुरीत आहे. कै. सीतारामपंत यांचे वारस, प्रसिद्ध समाजवादी अच्युतराव पटवर्धन होत. गुरुवर्यांचे एक बहुश्रुत संस्कृतज्ज्ञ शिष्य के, गंगाधरशास्त्री सोहनी हे उमरखेड येथील पाठशाळेचा राजीनामा देऊन संस्थेचे संवर्धक कार्यकर्ते या नात्याने काम करू लागले. त्यांनी संस्थेची १२ वर्षे स्वार्थत्यागाने सेवा केली.

पहिल्या वर्षी म्हणजे स. १९९६ च्या आक्टोबरमध्ये संस्थेत ६० विद्यार्थी होते. यांतील २२ विद्यार्थी शास्त्रशाखेत व बाकीचे मध्यम वर्गात शिकत होते. समर्थ विद्यालयांतील क्रांतिकारक वृत्तीच्या मंडळींनी संस्था काढली आहे अशी कल्पना येऊन राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीने प्रेरित झालेले विद्यार्थीही यावेळी संस्थेत येऊन दाखल झाले. वयाने प्रौढ, इंग्रजी राज्याविरुद्ध असलेली त्वेषाची भावना खोल रुजलेले, अध्यात्मवादाची उदात्त भावना हृदयाशी बाळगणारे हे विद्यार्थी होते. जुन्या पद्धतीची ही संस्कृत पाठशाळा नव्हे. येथले वातावरण व उद्देश कांही निराळेच; परंतु उच्च ध्येयाने भारलेले आहेत, अशी

गूढ भावना महाराष्ट्रांत अनेकांच्या मनांत डोकावली, आधुनिकपणा आहे परंतु धार्मिकतेला पारखे नसणारे आणि इंग्रजी नोकऱ्यांचे व्यावहारिक क्षुद्र ध्येय बाजूला सारणारें हे विद्यालय आहे; अशा कल्पनेचा प्रसार हळुहळु होऊ लागला होता. नागपूरपासून बेळगांवपर्यंतच्या राष्ट्रीय चळवळींतल्या नेत्यांना या संस्थेबद्दल आत्मीयत्व वाटू लागले, नागपूरचे महाराष्ट्राचे संपादक ओगले, यवतमाळचे माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे, अमरावतीचे खापर्डे पितापुत्र, अकोल्याचे प्रसिद्ध वकील गोळे, हैदराबादचे वामनराव नाईक व न्यायमूर्ती केशवराव कोरटकर, बेळगांवचे गंगाधरराव देशपांडे व गोविंदराव याळगी, समर्थ विद्यालयाचे माजी व मुख्य कार्यकर्ते विष्णु गोविंद विजापूरकर, जनार्दन विनायक ओक, ज. स. करंदीकर, चित्रशाळेचे वासुकाका जोशी इत्यादी राष्ट्रीय वृत्तीच्या नेत्यांना या संस्थेबद्दल विशेष आशा वाटू लागली. या मंडळींपैकी अनेकांनी प्रौढ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय कार्याची धार्मिक दीक्षा घेण्याकरितां संस्थेत पाठविले.

श्री. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी संस्थेत स. १८९६ साली भेट दिली आणि सद्भाव व्यक्त केला. श्री. दिनकरशास्त्री कानडे यांच्या देशभक्तीच्या गूढ संकल्पाचा अर्थ न बोलतां अनेक पुढाऱ्यांच्या मनाला उमगून जिव्हाळा उत्पन्न झाला. कानडे यांनी प्रसिद्ध केलेल्या उद्देश पत्रकांत एक फार महत्त्वाचे वाक्य आहे- "यापेक्षा कांहीच ज्यास्त सांगणे योग्य होणार नाही." या ठिकाणी प्रसंगाने आठवण झाली, ते नमूद करून पुढील मुद्यावर जाऊ. लोकमान्य टिळक वाईस आले तेव्हा त्यांना नागरिकांतर्फे जे मानपत्र झाले ते अखिल भारतीय कीर्तीचे काशीनाथशास्त्री लेले यांच्या हातून द्यावयाच्या ऐवजी गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या हातूनच देण्यांत आले. कारण, टिळकांच्या ध्येयवादाशी लेले यांच्या विचारांपेक्षा गुरुवर्य मराठेशास्त्री यांच्या विचारांची संगती अधिक जुळती होती, हे कानडे यांच्या शिष्यत्वावरून लोकांना समजून चुकले होते. दुसरे असे की, त्यावेळी गीतारहस्य प्रसिद्ध होऊन त्या संबंध वाद चांगला रंगला होता. गुरुवर्य मराठेशास्त्री आणि श्री. कानडेशास्त्री हे गीतारहस्याचे समर्थक होते व लेलेशास्त्री विरोधी होते. लेलेशास्त्री यांनी प्रथम गीतारहस्याशी ऐकमत्य आहे, असे लोकमान्य टिळकांस सांगून थोड्याच दिवसांत कांही लाभ न दिसल्यामुळे पगडी बदलली, असा बभ्रा झाला होता. श्री. कानडेशास्त्री यांनी याचवेळी महाराष्ट्र व विशेषतः वऱ्हाड नागपूर या भागांत गीतारहस्याच्या बाजूने दौरा काढून व्याख्याने आणि प्रवचने यांच्या द्वारा सगळा महाराष्ट्र दुमदुमून टाकला. नागपूर येथे श्री. लेलेशास्त्री व श्री. कानडेशास्त्री यांचा एका सभेत मोठा वैचारिक सामना होऊन लेलेशास्त्री यांचा पराभव झाला. या महत्त्वाच्या घटनेने प्राज्ञपाठशाळेचे स्थापनेच्या वर्षीच महाराष्ट्रांत नांव झाले.

नागपूरचे राजकीय सभेत भाग घेतला म्हणून कॉलेजच्या विद्यार्थी पटावरून नांव काढून टाकलेले श्री. गजानन अनंत घैसास, श्री कृष्णानंद स्वामी या राष्ट्रीय संतांचे शिष्य

श्री. का. वा. सहस्रबुद्धे, शिवनामे, पोतदार, साबरमतीच्या आश्रमांतील विनोबा भावे इत्यादी प्रौढ विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेत गुरुवर्यांच्याकडे उच्च शिक्षणार्थ आले. श्री. विनोबा भावे हे सहा महिने राहून शांकरभाष्याचे आवश्यक तितके श्रवण करून परत गेले. श्री. सहस्रबुद्धे व श्री. शिव नामे यांनी अकोला येथे जाऊन "सरस्वती मंदीर" म्हणून एक राष्ट्रीय शिक्षणसंस्था आपल्या अनेक सहकाऱ्यांच्या साहाय्याने काढली. श्री. घैसास बेळगांव येथे टिळक विद्यालयाला जाऊन मिळाले.

रीतसर स्थापलेल्या संस्थेला आकार देण्याकरिता चालक मंडळ आणि कार्यकारी मंडळ असे विभाग पाडले. चालक मंडळांत गु. नारायणशास्त्री मराठे, श्री. केशव वासुदेव ऊर्फ शंभुकाका करंदीकर, श्री. कृ. गं. अभ्यंकर वकील हे सभासद होते. कार्यकारी मंडळ हे गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे, श्री. दिनकर लक्ष्मण कानडे, श्री. गंगाधर केशव सोहोनी व श्री. महादेव वासुदेव दिवेकर यांचे बनविले. श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांचेकडे संस्थेचा प्रचार करून देशांतून द्रव्यसाहाय्य मिळविण्याचे काम दिले. पहिल्याच वर्षी ५६२५ रु. जमा झाले. श्री. दिवेकरशास्त्री यांच्या ठिकाण उमेद, प्रचारचातुर्य, कार्यतत्परता, त्यागवृत्ती आणि वक्तृत्व हे गुण प्रचाराच्या प्रसंगाने प्रगट झाले. १८९७ सालच्या जून महिन्यांत म्हणजे संस्था स्थापनेच्या दुसऱ्या वर्षीच श्री. दिनकरशास्त्री कानडे यांनी एका वर्षाने आपला निश्चय बदलला. प्राज्ञपाठशाळेत एका दिलाचे इंग्रजी राज्य उलथून टाकण्यास सज्ज क्रांतिवीर मिळतील की नाही अशी शंका उत्पन्न झाली. त्यांनी संस्था सोडली अमेरिकेस प्रयाण केले. ते अकस्मात् निघून गेल्यामुळे श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांच्यावरच संस्थेच्या व्यवहाराचा भार मुख्यतः पडला. गुरुवर्यांचे अधिष्ठान पक्के असल्यामुळे एक मोठे सहकारी निघून गेले तरी त्यांनी हिमतीने संस्था चालविण्याचा निश्चय केला. दुसऱ्याच वर्षाच्या अखेरीस संस्थेचा प्रपंच चांगल्या रीतीने विस्तारून दाखविला. नवीन नवीन कर्तबगार माणसे जुळविली. समाजांतील प्रतिष्ठित गृहस्थांना संस्थेच्या व्यवहाराशी निगडित केले. योगी अरविंदांचे भक्त श्री नारायण कृष्ण गोगटे बी. ए. व उगारचे श्री. शंकर विठ्ठल लेले या दोन अधिक सहकाऱ्यांची भर टाकली. वाई, सातारा, पुणे, सांगली, इंदूर, नागपूर इत्यादी ठिकाणचे नाणावलेले सद्गृहस्थ चालक मंडळ व सल्लागार मंडळ यांत घेतले. विशेषतः वाईतील रा. ब. मनोहर विष्णु काथवटे, श्री. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर वकील व श्रीमंत बाळासाहेब साठे[१] यांचा विश्वस्त व चालक मंडळांत समावेश केल्यामुळे संस्थेच्या कार्यकर्त्यांबद्दलचा विश्वास बाहेरगांव वाढला. संस्थेची मिळकत व निधीही वाढत चालला. स्वतः दिवेकरशास्त्री सहा हजार रुपयांपर्यंत द्रव्यसाहाय्य प्रतिवर्षी मिळवून आणीत. चालक व कार्यकारी मंडळाच्या

१. गुरुवर्य स्वामींनी आत्मचरित्रात्मक केलेल्या टिप्पणीच्या आधारावरून - वाईमध्ये प्रत्येक सार्वजनिक कामामध्ये भाग घेऊन चोख रीतीने ते ते करण्याचा यांचा स्वभाव. प्रत्येक कामांत बारकाईने लक्ष देऊन ते काम व्यवस्थित कसे होईल या विषयी हे नेहमी दक्ष असतात.

(पुढील पानावर...)

नियमित वेळी बैठका होत. १९२० जुलै २१ ला प्राज्ञपाठशाळामंडळ स्थापून प्राज्ञपाठशाळा ही, त्याची शाखा म्हणून चालविण्याचे ठरले. प्राज्ञपाठशाळामंडळ रजिस्टर्ड करण्यांत आले.

संस्थेला माध्यमिक शिक्षणाची जोड देण्याचे संपादकांनी पहिल्या उद्देश पत्रकांतच प्रसिद्ध केले होते. शास्त्रशिक्षण किंवा संस्कृतचे उच्च शिक्षण देण्याची महत्वाची जबाबदारी गुरुवर्यांनी जरी उचलली होती तरी माध्यमिक शिक्षणाला योग्य संच जुळविणे प्राप्त होते. मॅट्रिक इतके इंग्रजी व बी. ए. इतके मराठी शिकविण्याकरिता नवीन माणसे आणणे भाग पडले, श्री. ना. कृ. गोगटे हे अनुभवी गृहस्थ त्याकरिता आणिले. माध्यमिक शिक्षणाकरितां आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८५ पेक्षा अधिक झाली. त्याकरितां विद्यार्थीगृहाच्या व्यवस्थेचे कामही खूप वाढले. बाहेर राहून शिक्षण घेणारे विद्यार्थी अगदी थोडे होते. श्री. शंकर विठ्ठल लेले हे अंग मोडून पडेल ते काम करण्यास तयार असल्यामुळे त्यांच्यावर विद्यार्थी गृहव्यवस्था सोपविली. श्री. ना. कृ. गोगटे स्वभावाने शांत व विचारशील होते. विद्यार्थ्यांच्या संबंधी देखरेख ठेवतांना शिस्तीला किती महत्त्व असावे या संबंधी तात्त्विक मतभेद होऊन त्यांनी संस्थेच्या चौथ्या वर्षीच राजिनामा दिला. कै. शंकर विष्णु जोशी, एम्. ए., हे गृहस्थ दीडशे रुपये पगाराची नोकरी सोडून ३० रु. घेऊन संस्थेची सेवा करू लागले. कै. दत्तात्रय वासुदेव परचुरे, श्री. गणेश विष्णु कौजलगी, श्री. शिवराम गोविंद जोग व श्री. शंकर विठ्ठल लेले यांनी माध्यमिक शिक्षणाची धुरा उचलली. कै. लक्ष्मणशास्त्री गोडखिंडीकर यांची व्याकरणशास्त्र शिकविण्याकरितां नेमणूक झाली.

राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ व प्राज्ञपाठशाळा-

असहकारितेची चळवळ देशांत फैलावून राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था सन १९२० व २१ च्या सुमारास सगळीकडे स्थापन होऊ लागल्या. प्राज्ञपाठशाळेच्या माध्यमिक शिक्षणास राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप अगोदरच होते. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींत प्राज्ञपाठशाळेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. परंतु त्यांत वैगुण्य एकच होते. त्यांत सर्व जातींना प्रवेश नव्हता. या वैगुण्याची किंचित् खंत त्यावेळी चालकांना वाटत होती, याची निदर्शक नोंद संस्थेच्या चतुर्थ वार्षिक वृत्तांत केलेली आढळते. "प्राज्ञपाठशाळामंडळाचा उद्देश सर्वांस मोफत शिक्षण देण्याचा आहे हे विसरू नये. तूर्त ब्राह्मणांवर प्रयोग चालविला आहे. तो यशस्वी झाल्यास पुढे मंडळ सर्वांस ज्ञानदान करणार आहे." इ. स. १९४२ सालापासून संस्थेत सर्व जातींचे विद्यार्थी घेण्याची प्रथा सुरू झाली.

असहकारितेच्या चळवळींत इंग्रज सरकारने चालविलेल्या शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांनी

सार्वजनिक कामामध्येच यांचा आमचा प्रथम संबंध आला. प्राज्ञपाठशाळा स्थापन झाल्यावर तिच्या चालक मंडळांत हे होते. तेव्हापासून यांचा आमचा घनिष्ठ संबंध जडला. सच्छील, कार्यपर, निश्चयी, उदार व बहुश्रुत असे हे थोर गृहस्थ आहेत. हे आमचे एक सुहृद् आहेत.

सोडाव्या हा एक भाग होता. त्याप्रमाणे सरकारी संस्था सोडून गेलेले अनेक विद्यार्थी प्राज्ञपाठशाळेंत शिकावयास आले. १९२० साली आश्विन महिन्यांत महात्मा गांधींनी प्राज्ञपाठ शाळेस भेट दिली. त्यांना समाधान वाटले. 'नवजीवन' मध्ये त्यांनी लिहिले आहे की, "पूज्यपाद प्रौढ ब्रह्मचारी नारायणशास्त्री महाराज का ऋष्याश्रम देखकर हम बहुत प्रसन्न हुवे". १९२१ साली संस्थेच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या व्यवस्थेला अधिक व्यवस्थित रूप देण्यांत आले. इयत्तावारीने सात वर्ग पाडले. टिळक विद्यापीठाला संस्था जोडण्यांत आली.

असहकारितेच्या वातावरणांत पुनरुज्जीवनाची इच्छा सळसळू लागली. भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणारे व लोकसेवेची दीक्षा घेतलेले लोकच जनतेच्या ठिकाणी खराज्याच्या लढाईची तयारी करू शकतील, अशी भावना या चळवळींत अंकुरित झाली, इंग्रज सरकारने चालविलेल्या शाळा- कॉलेजांतून असहकारिता करून बाहेर पडलेले तरुण या भावनेने भारले होते. स्वराज्याचे ध्येय एकदा जवळ दिसायचे व एकदा दूर दिसायचे. परंतु त्याची साधना करणे म्हणजेच राष्ट्रांत धर्माचे व संस्कृतीचे पुनरुज्जीवन करून लोकांना स्वावलंबनाचा मार्ग दर्शविणे होय, असा विचार या पुनरुज्जीवनाच्या चळवळींत होता. राष्ट्रीय शाळा व राष्ट्रीय सेवेची दीक्षा घेतलेल्यांचे आश्रम देशांत पसरू लागले; या पुनरुज्जीवनाच्या खुणा होत. राजकारण, स्वावलंबन आणि तदर्थ शिक्षण, अशा तीन बाजू राष्ट्रीय शाळांच्या आणि आश्रमांच्या जीवनांत दिसू लागल्या, महात्मा गांधींच्या पूर्वी लोकमान्य टिळकांच्या कारकीर्दीत इंग्रजी राज्याबद्दलचा दरारा होता; परंतु त्याच्या पोटांत त्या राजवटीबद्दल तिरस्कार; असे वातावरण होते. लो. टिळकांनी स्वतःच्या आचरणाने नैतिक धैर्याची जोड त्या तिरस्काराला दिली. महात्मा गांधींनी दरारा घालविला व धीरोदात्त उघड प्रतिक्रिया उत्पन्न केली. या प्रतिक्रियेस सार्वजनिक स्वरूप आणले, हे या राजकारणाचे स्वरूप होय. राजकारणाच्या ध्येयाची दीक्षा घेतलेल्या कार्यकर्त्यांना स्वावलंबन व शिक्षण हा कार्यक्रम मिळाला. विणकाम, कृषी व इतर स्वदेशी उद्योग यांचा अवलंब करण्याचा प्रयत्न म्हणजेच स्वावलंबन होय. स्वावलंबनाचे प्रयोग राष्ट्रीय शाळांमध्ये सुरू केले इंग्रज सरकारने चालविलेल्या शिक्षण संस्थांतील विद्येमध्ये व अध्यापनामध्ये देशाभिमानाची कळकळ आणि राष्ट्रीय दृष्टिकोण होता. इतिहास व वाङ्मय यांचे, उत्कट देशप्रीतीची व भावनांची स्पंदने निर्माण करणारे शिक्षण देणे ही राष्ट्रीय शिक्षणाची एक प्रेरक बाजू होती. इंग्रज नियंत्रित संस्थांमधल्या शिक्षकांत कांही शिक्षक अशा प्रेरणेचे होते; परंतु ती प्रेरणा दबून कार्य करीत होती. राष्ट्रीय शाळांमध्ये ही प्रेरणा बंधनमुक्त झाली. राष्ट्रीय शाळा व स्वराज्याश्रम ही देशाभिमानाची धगधगित केंद्रे बनली.

गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांच्या अध्यक्षतेखालीं चाललेल्या प्राज्ञपाठशाळेत जसें संस्कृतविद्येच्या खोल अभ्यासाचे कार्य चालू होते; त्याचप्रमाणे या पुनरुज्जीवनालाही मूर्तिमंत रूप देण्याचा प्रयत्न सुरू होता. धार्मिक व्यवसायाची जोड घेणारे धार्मिक पेशाचे

कीर्तनकार, पुराणिक व शास्त्री यांनाही या पुनरुज्जीवनाची प्रेरणा गुरुवर्यांनी दिली. देशकालज्ञ, सुधारक व देशभक्त पंडित महाराष्ट्रांत तरी याच संस्थेने निर्माण केले. राष्ट्रीय कीर्तनाच्या चळवळीला मुख्य वळण गुरुवर्यांनीच दिले. गुरुवर्योंच्या आशीर्वादाने संस्थेचे कार्यकर्ते शास्त्री, पंडितांच्या परंपरेस माहीत नसलेल्या उद्योगधंद्याच्या शिक्षणाची देखील जोड देण्याची ईर्षा बाळगू लागले. विणकाम व सूत कातण्याचे वर्ग प्राज्ञपाठशाळेत सुरू केले. कृषिकर्म व देशी वैद्यक शिकवून देशसेवा करणारे धर्मप्रचारक उत्पन्न करण्याची कल्पना प्राज्ञपाठशाळेला आली. त्या कल्पनेला व्यवहार्य रूप देण्याचा प्रयत्न मात्र यशस्वी झाला नाही. पुनरुज्जीवनाची कल्पना किती खोल व व्यापक होती आणि शिक्षणाची कल्पना किती शुद्ध होती, याचा अंदाज प्राज्ञपाठशाळेच्या वार्षिक इतिवृत्तांवरून चांगला बांधता येतो. अंगमेहनतीचे उद्योग करणारे, राष्ट्रभक्तीने भरलेले धर्मशिक्षक व धर्मप्रचारक निर्माण करणे ही कल्पना अजून कोणासही एक भव्य व उदात्त शैक्षणिक ध्येयाचे स्वप्न वाटेल. हे स्वप्न खरे करण्याकरिता गुरुवर्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आयुष्यांतील ऐन उमेदीच वर्षे घालविली. यश आले नाही. बाह्य साधने मिळाली नाहीत, हे अपयशाचे कारण होय राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण देण्यांत मात्र मित यश प्राप्त झाले. त्याचे विवरण केल्याशिवाय गुरुवर्यांच्या आचार्यत्वाचे चित्र अपुरे राहील. ते असे.

प्राज्ञपाठशाळेतील माध्यमिक राष्ट्रीय शिक्षण-

माध्यमिक राष्ट्रीय शिक्षण देण्याचा कार्यक्रम संस्थेच्या स्थापनेपासूनच चालकांनी आखला होता. त्याला अधिक संघटित व तपशीलवार स्वरूप असहकारितेची चळवळ उतारास लागल्यानंतर आले. सन १९२२ च्या प्रारंभापासून तो १९३० सालाच्या अखेर पर्यंत माध्यमिक राष्ट्रीय शिक्षणास, संस्कृत उच्च शिक्षणाच्या शाखेप्रमाणेच महत्त्व दिले. श्री. महादेवशास्त्री दिवेकर आणि गंगाधरशास्त्री सोहोनी यांनी माध्यमिक शिक्षणाला प्राधान्य दिले. कै. गंगाधरशास्त्री सोहोनी यांनी षष्ठ वार्षिक वृत्तामध्ये राष्ट्रीय शिक्षणविषयक फार महत्त्वाचे निवेदन प्रसिद्ध केले. हे निवेदन महादेवशास्त्री दिवेकर व गंगाधरशास्त्री सोहोनी या दोघांनी तयार केले. राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीचे सार व प्राज्ञपाठशाळेचा विशिष्ट दृष्टिकोण त्यांत व्यक्त झाला आहे. त्यांतील कांही अर्थपूर्ण वाक्यसंदर्भ वाचकांस येथे सादर करितो.

जगांतील आजपर्यंतच्या राष्ट्रांच्या उदयास्तांचे इतिहास पाहिले तर त्यांत जाज्वल्य धर्मनिष्ठा, ईश्वरभक्ती, राष्ट्राभिमान, स्वावलंबन, स्वार्थत्याग, उद्योगप्रियता, धैर्य, चिकाटी, साइस, आत्मविश्वास, श्रद्धा वगैरे सद्गुणांचे ताजे रक्त जोपर्यंत तरुण पिढीच्या अंगामध्ये सळसळत असते तोपर्यंतच ते राष्ट्र स्वातंत्र्यदेवीच्या मांडीवर लोळून वैभवसुखाचा अनुभव घेत असते. परंतु पुढे ते सद्गुणांचे रक्त थंडावले म्हणजे राष्ट्र मृतप्राय होते, असा सर्वसामान्य सिद्धान्त दिसून येतो. कोणत्याही राष्ट्राचा उत्कर्ष होण्यास या राष्ट्राच्या अंगी एकप्रकारचा

राष्ट्रीय जोम यावा लागतो. हा जोम उत्पन्न करण्याचा उपक्रम जेव्हा परतंत्र राष्ट्राला करावा लागतो तेव्हा त्याला आपल्या जुन्या ठेव्याकडे म्हणजे आनुवंशिक संस्कारांकडे वळावे लागते. भस्माच्छादित अग्नीप्रमाणे या आनुवंशिक संस्कारांवर पारतंत्र्यमूलक अनेक दुर्गुणांची राख बसलेली असते. ही राख झाडून आंतील शुद्ध संस्काररूपी अग्नी प्रज्वलित करण्याकरिता जिवंत शिक्षणाच्या फुंकणीचा अंगीकार करावा लागतो. आमची संस्था हेच कार्य आजवर करीत आहे. हा प्रज्ञाहितपणा इंग्रजी शिक्षणामुळे आपल्यामध्ये येत असून हिंदुस्थान हे राष्ट्र राष्ट्रीयपणाला मुकत आहे, अशी जेव्हा राष्ट्रीयसभेची समजूत झाली तेव्हा तिने राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव पास केला. शिक्षण हे राष्ट्राची राष्ट्रबुद्धी म्हणजे आत्मबुद्धी शाबूत ठेवण्याकरितांच द्यावयाचे असते. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे आपल्या धर्माचे, आपल्या परंपरेचे, आपल्या संस्कृतीचे, आपल्या नीतितत्त्वांचे, आपल्या उच्च भावनांचे, आपल्या आचार विचारांचे व शिष्टाचाराचे आपल्या गुरुजनांकडून आत्मीय भावनेने मिळालेले शिक्षण होय. बुद्धिमत्ता हे राष्ट्राचे भांडवल असून प्राज्ञपाठशाळेचा पंडितवर्ग या भांडवलामध्ये भर टाकणारा असा होईल राष्ट्रामध्ये नवे नवे जिवंत विचार उत्पन्न झाले आणि राष्ट्राची उत्पादक शक्ती वाढली म्हणजे ते राष्ट्र जगाला ललामभूत होते. संस्थेचा पंडितवर्ग आजपर्यंतच्या जुन्या पंडितवर्गावरचे सर्व आक्षेप नाहीसे करणारा, अंधपरंपरेने केवळ मागचेच लोण पुढे न पोचवितां चिकित्सक बुद्धी आणि श्रद्धा यांचा मिलाफ करून तत्व शोधणारा आणि त्याची सद्यःस्थितीशी योग्य जोड घालून देणारा असा होत आहे हे तयार झालेल्या विद्यार्थ्यांवरून साक्षात् कळून येईल. जनतेची हृदये हालवून सोडणारे, जनतेमध्ये राष्ट्रकार्यपोषक वृत्ती उत्पन्न करणारे आणि भगवद्भक्तीच्या द्वारे शीलसंवर्धन करणारे, देशाभिमानी, ईश्वरभक्त उपदेशक आज पाहिजे आहेत. हे उपदेशक कोनाकोपऱ्यांपर्यंत जागृती करू शकतात. असल्या लायक प्रचारकांच्या अभावी राष्ट्राची कितीतरी कामे अडली आहेत. संस्थेचा उपदेशक वर्ग ही अडचण नाहीशी करील. नागरिक वर्ग हा राष्ट्रपुरुषाच्या हृदयस्थानी आहे, असे म्हटल्यास शोभेल, हिंदुस्थानचे हृदय हे खेड्यापाड्यांत आहे. राष्ट्राचे हृदय, राष्ट्राचा आत्मा आणि राष्ट्राचे अन्न हे सर्व खेड्यांतच असते. या खेड्यापाड्यांकडे म्हणजे खऱ्या जनतात्म्याकडे अलीकडे राष्ट्राचे व सुशिक्षितांचे लक्ष वेधले आहे. सुशिक्षित लोकांना खेड्यापाड्यांमध्ये राहून लोकेषणेची बिलकुल इच्छा न करिता संथपणे खऱ्या कार्याचा पाया घालण्याचे काम लवकरच करावे लागणार आहे. आज या कार्याची तीव्र जिज्ञासा उत्पन्न झालेली आहे. परंतु सुशिक्षितांचा मनोरचना व जनतेची संस्कृती वेगवेगळी पडल्यामुळे नुसत्या जिज्ञासेने काम होत नाही, असा अनुभव येत आहे. उलट गोऱ्या इंग्रजांप्रमाणे या काळ्या इंग्रजांची नोकरशाही दुःसह भासत असून जनता व सुशिक्षित वर्ग यांच्यामध्ये सांधा घालून देणारा एक वर्ग हवा आहे. प्राज्ञपाठशाळेच्या नागरिक वर्गाला नव्याजुन्या संस्कृतीचे शिक्षण मिळाल्यामुळे, हा वर्ग हे संधिकार्य फार उत्तम

करू शकेल. जनतेला हाच नागरिकवर्ग आपला खरा पुढारी व विश्वासनिधी वाटल्यावाचून राहणार नाही. तात्पर्य, राष्ट्रपुरुषाची बुद्धी, मुख व हृदय रक्षणाचे आणि विकसनाचे कार्य संस्था आपल्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणे करीत आहे.''

कै. गंगाधरशास्त्री सोहोनी व श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी, या ध्येयाप्रमाणे नागरिकांस अवश्य असलेले माध्यमिक शिक्षण हायस्कूलच्या पद्धतीने देण्याकरिता, त्यास अनुरूप असलेल्या अधिक शिक्षकांचा भरणा केला. असहकारितेच्या चळवळीत कॉलेज सोडून आलेले श्री. श्रीपाद शंकर नवरे हे चतुरस्र बुद्धीचे तरुण, संस्कृतच्या उच्च शिक्षणाकरिता १९२१ सालाच्या अखेर प्राज्ञपाठशाळेत आले. त्यांचे बी. ए. पर्यंत शिक्षण झाले होते. परीक्षेस न बसतां असहकारितेच्या लाटेत बाहेर पडले होते. त्यांनी माध्यमिक शिक्षणाची उत्कृष्ट संघटना केली. पोक्त अनुभवी पदवीधर पाहिजे म्हणून सन १९२२ च्या अखेरीस माजी समर्थ विद्यालयाचे संचालक श्री. राजारामबापु देसाई, 'संस्कृतप्रवेश'कर्ते यांना कै. सोहोनी शास्त्री यांनी आग्रह करून आणले. सेवानिवृत्त होऊन वाईस जन्मगांवीं राहावयास आलेले कै. रा. ब. गणेश रामकृष्ण दातार, उपन्यायाधीश, यांनी माध्यमिक शिक्षणाच्या कार्योत विनामूल्य सेवा देण्याचे ठरविले. पुणे लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. ज. र. घारपुरे[१] हे चालक मंडळाचे सभासद झाले. कालांतराने श्री. रा. ग. सोमण वकील व कऱ्हाडचे श्री. पां. के. शिराळकर हेही चालक मंडळाचे सभासद झाले. माध्यमिक शिक्षणाला जोमदार स्वरूप या मंडळींच्या मुळे आले. प्रिं. ज. र. घारपुरे यांनी प्रसिद्धीची कसलीही अपेक्षा न धरता गुरुवर्यांच्या आदरयुक्त प्रेमामुळे द्रव्यसाहाय्य केले व वेळोवेळी सल्ला दिला.

श्री. बापू देसाई व श्री. श्रीपाद शंकर नवरे यांनी माध्यमिक शिक्षणाचा दर्जा वाढविला. गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे यांचा व श्री. बापू देसाई यांचा संस्कृतच्या माध्यमिक शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोण एक होता. कालिदास, भवभूती, भट्टचार्य इत्यादि मध्ययुगीन कवींची काव्ये शिकविण्याला जुन्या शास्त्री पंडितांच्या परंपरेत जसे महत्त्व दिले जाते, तसे व्यास, वाल्मिकी इत्यादिकांच्या संस्कृतास दिले जात नाही. दुसरे असे की, भारतीय संस्कृतीचे विचारवैभव, शीलाचे आदर्श आणि व्यावहारिक शहाणपणाचे उत्कृष्ट नमुने या सर्वांचे सुलभ व प्रसन्न विवरण, रामायण, महाभारत इत्यादी ऋषिवाङ्मयांत अधिक चांगले सांपडते. त्याची उपेक्षा जुन्या माध्यमिक शिक्षणांत केलेली असते. गुरुवर्यांनी ऋषिकालीन वाङ्मयाला संस्कृतच्या माध्यमिक शिक्षणांत किंवा प्राथमिक व्युत्पत्तीच्या शिक्षणांत फार महत्त्वाचे स्थान दिले. त्याकरिता वैदिक वाङ्मय, भारत व रामायण यांतील उत्कृष्ट विवेचने,

---

(१) गुरुवर्य स्वामीजींनी आत्मचरित्रात्मक लिहिलेल्या टिप्पणाच्या आधारावरून— नानासाहेब घारपुरे म्हणजे नानासाहेब घारपुरे. कडक शिस्त. खोटे मुळीच सोसायचे नाही. ताड्दिशी बोलतील, पण हृदयाने अती मृदु प्राज्ञपाठशाळेच्या स्थापनेपासून आतांपर्यंत (म्हणजे ३३।३४ वर्षे) माझे परम सुहृत्.

वर्णने व चित्रणे निवडून काढलीं. भारतीय संस्कृतीचीं शाश्वत मूल्यें, शीलसंपदा, कलेचे वैभव आणि विचाररत्ने माध्यमिक शिक्षणांतच विद्यार्थ्यांच्या स्वाधीन करण्यास योग्य, अशी ही निवड होती. मराठी वाङ्मयाचे व इतिहासाचे शिक्षणास विवेचकता, ध्येयवादीपणा व रसिकता श्री. श्रीपाद शंकर नवरे आणि श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी आणली. मराठी वाङ्मयांतील जिव्हाळा, कल्पनांची उंची व वैचित्र्य, आधुनिक भावकवितेतील सौष्ठव, विद्यार्थ्याच्या प्रत्ययास आणण्याची हातोटी श्री. नवरे यांच्या ठिकाणी अप्रतिम दिसली. श्री. नवरे व श्री. दिवेकर यांनी माध्यमिक शिक्षणांत सातव्या इयत्तेपर्यंत चिकित्सापूर्ण इतिहास शिकविला.

अशी चिकित्सा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाच शिकविली जाते व ग्रहण करता येते हे खरे, परंतु शिक्षणाचे माध्यम मराठी असल्यामुळे आणि वरील दोघाही शिक्षकांची प्रतिपादनपद्धती सुलभ व परिणामकारक असल्यामुळे विद्यार्थी थोड्या परिश्रमांत उत्कृष्ट गुण मिळवू शकले.* मराठी माध्यमाचा प्रभाव अत्यंत विलक्षण दिसून आला. हे माध्यम वापरणारे शिक्षक मात्र आपल्या विषयांशी तन्मय व तज्ञ असावे लागतात. मातृभाषेच्या माध्यमाच्या साहाय्याने द्विगुण विद्या तेवढ्या वेळांत साध्य करिता येते, असा प्राज्ञपाठशाळेतील मराठी माध्यमाच्या प्रयोगाचा इत्यर्थ आहे. शिक्षकांत विषयाची तयारी आणि अध्यापनाबद्दल जिव्हाळा मात्र असावा लागतो.

---

* **परीक्षकांचे अभिप्राय - श्री. गो. स. सरदेसाई, इतिहासकर्ते** - ". .. शिक्षण मोठ्या काळजीने दिलेले व्यक्त होत असून विद्यार्थ्यांस स्वतः विचार करण्याची सवय लावलेली दिसते." " इतिहासाचा अभ्यास आपल्या संस्थेइतक्या मार्मिक व पूर्ण तऱ्हेने दुसऱ्या कोठेही होत नाहीं. आपल्या कनिष्ठ योग्यतेच्या विद्यार्थ्यांइतकीसुद्धा उत्तरे मुंबई - विश्वविद्यालयांतील प्रवेश परीक्षेचे विद्यार्थी देऊ शकत नाहींत....."

श्री. द. वि. आपटे (पुणे) - "धर्म व राजकारण यांसारख्या तात्त्विक विषयांतील मुद्दे समजून घेऊन ते सुबोध व सफाईदार मराठी भाषेत लिहिण्याची विद्यार्थ्यांची शैली पाहून आनंद वाटला ....."

प्रो. वि. स. गोगटे (नाशिक कॉलेज) "विद्यार्थ्यांची नीतिशास्त्रावरील प्रश्नांच्या उत्तरांतील विचारसरणी प्रौढ असून स्वतंत्र विचार करण्याचा प्रयत्नही त्यांचे ठिकाण दिसून येतो."

प्रो. वा. म. जोशी (हिंगणे) - "... नीतिशास्त्राच्या परीक्षतील कोणत्याही विद्यार्थ्याचा पेपर कॉलेजांतील एकाद्या बी. ए. मधील विद्यार्थ्याने वाचावयास घेतला तर आपण नीतिशास्त्राच्या वर्गात ऐकतो, तशासारखेच नैतिक विवेचन या शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या समोर करण्यांत येते, ते त्यांना समजते व ते ते कागदावर उतरू शकतात हे पाहून त्याला कौतुक वाटेल व मातृभाषेच्या द्वारे शिक्षण घेतल्यापासून कसा फायदा होतो हे त्याला विशेष युक्तिवाद न करतां क्षणार्धात समजेल व पटेल,

श्री. शंकरराव देव (धुळे) - "मला वाटत नाही, श्री समर्थ वाङ्मयाचा अभ्यास इतक्या आस्थेने महाराष्ट्रांत दुसरीकडे कोठे होत असेल ..... समर्थ वाङ्मयाची शिकवण राष्ट्रीय वृत्तीने शाळेत दिली जाते. ..."

बहुतेक विद्यार्थी छात्रालयांतच राहात असत. ८० ते १०० विद्यार्थी छात्रालयांत राहात. सगळ्या कार्यक्रमावर चोवीस तास कांही शिक्षक व विद्यार्थीगृहव्यवस्थापक देखरेख ठेवत असत. श्री. विठ्ठल गणेश जोशी हे संस्कृत शिक्षक, विद्यार्थीगृहव्यवस्थेचा व्यवहार सर्व प्रकारची मेहनत घेऊन करीत असत संस्थेचे कार्यवाह या नात्याने श्री. नवरे हेही विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि व्यायाम या कार्यक्रमांची अम्मलबजावणी जातीने उपस्थित राहून करून घेत. सूर्योदयाच्या सुमारास लहान मोठ्या सर्व विद्यार्थ्यांची प्रातः स्नाने उरकत. ५ ते ५० च्या दरम्यान ऋतुमानाने सर्व विद्यार्थी उठून प्रातःस्मरण म्हणत. बॅ. सावरकरांची स्वातंत्र्याची भूपाळी आणि कै. गोविंद कवीची स्वरस्वतीची भूपाळी, ऋग्वेदांतील एक सूक्त म्हटल्यानंतर सामुदायिक रीतीने गाइली जात असे. या प्रातःकालच्या वातावरणांत उत्साह खेळू लागला. स्नानसंध्या, नमस्कार, आसने इत्यादी प्रात:कर्मे आटोपल्यावर शिक्षणाचे वर्ग प्रारंभ होण्याच्या अगोदर सकाळीं सात वाजतां सामुदायिक वैदिक प्रार्थना व्हावयाची. या प्रार्थनेला गुरुवर्य नियमितपणे उपस्थित होत असत. या वेळच्या उपस्थितीवरून गुरुवर्यांना किती विद्यार्थ्यांनी प्रातःकाळचीं नित्यकर्मे वेळच्या वेळी उरकली याचा अंदाज येत असे. अनुपस्थित असलेल्यांची ते जातीने चौकशी करीत. सर्वच विद्यार्थी व कार्यकर्ते यांच्यावर नैतिक वजन असल्यामुळे त्यांचा धाक वाटत असे. थोडेच विद्यार्थी आळशी राहात. खमंग आळशांना थोडीशी खंत वाटे. गुरुवर्यांचा स्वभाव सहनशील असल्यामुळे थोडासा समाचार घेऊन सोडून देत. कामचुकारांच्या मनांत सुद्धा त्यांच्याबद्दल भक्तिभाव वसत असे. भोजनासह सर्व महत्त्वाच्या कार्यक्रमांत गुरुवर्यांची उपस्थिती नियमितपणे असावयाची. त्यांचा वर्षानुवर्षे चाललेला वक्तशीरपणा त्यांच्या दृढनिश्चयी स्वभावाची खात्री पटवीत असे. छात्रालयांतील स्वयंपाक पगारी आचारी करीत असे, परंतु बाकी सर्व कामे विद्यार्थी करीत. छात्रालयांत विद्यार्थी ऋतुपालट होत असतांना, श्रावण भाद्रपद महिन्यांत किंवा साथीच्या रोगाच्या वेळी आजारी पडत. या आजारी पडलेल्या विद्यार्थ्यांची व इतर माणसांची सेवा करण्यास गुरुवर्य स्वतः पुढे येत. आजाऱ्याची शुश्रूषा हे सर्वांत मोठे कर्तव्य ते समजत. अंगमेहनतीचे कोणतेही काम झाडणे, सारवणे, केर उचलणे, मोरी व शौचकूप साफ करणे यांत ते जसा पुढाकार घेत, तसाच आजाऱ्यांच्या शुश्रूषेतही घेत. टायफाइड व कॉलरा यांत ते आपल्या सहकाऱ्यांसह चोवीस तास आजाऱ्याजवळ राहून झटत. आजाऱ्याचे मलमूत्र स्वच्छ करणे, अंग स्वच्छ पुसणे, इत्यादि काम सहानुभूतीने करीत. आपल्या देशांतील धार्मिक परंपरेत रुग्णशुश्रूषा हे श्रेष्ठ कर्तव्य आहे ही कल्पना रूढ नाही; खिश्चन धर्मात ती तशी आहे. गुरुवर्यांच्या आचरणांत त्या कर्तव्याचा महिमा प्रतिबिंबित झालेला दिसला. श्री. नवरे आणि गुरुवर्य यांनी संस्थेच्या विद्यार्थ्यांचे सेवादल निर्माण केले. श्री. नवरे नित्य संचलन घेत. या सेवादलाचा उपयोग लोकोपकाराची अनेक कामे करण्यांत येऊ लागला. वाईत व अन्यत्र शेजारच्या खेडेगांवात अनेक वेळा लागलेल्या आगी या सेवादलाने पुढाकार विझविल्या आहेत. विद्यार्थ्यांना व

इतरांना संकट कालाचा इशारा देण्याकरिता भयसूचक घंटा वाजविण्यात येई. रात्री अपरात्रीं सुद्धा संस्थेतल्या सगळ्या व्यक्ती इशारा मिळाल्याबरोबर एकत्र जमा होत. गुरुवर्य, इतर शिक्षक व प्रौढ विद्यार्थी काँग्रेसच्या सेवादलात दाखल झाले होते.

छात्रालयांत अशा रीतीने वास करणारे विद्यार्थी व शिक्षक यांच्यांत कौटुंबिक जिव्हाळा, ममत्व किंवा बंधुत्व निर्माण झाले. कुटुंबसंस्था वगळल्यास असे ममत्व व बंधुत्व उच्च ध्येयवादाने प्रेरित होऊन चालविलेल्या शिक्षणसंस्थेत व आश्रमांतच निर्माण होऊ शकते. कौटुंबिक जीवनांतील ममत्वापेक्षा याचे महत्त्व, सामाजिक सेवेची कार्ये व्यापक व आध्यात्मिक उद्देशाने पार पाडण्याकरिता फार आहे. व्यापक सामाजिक ध्येये हृदयाशी धरून कार्य करणाऱ्यांचे आश्रम आपल्या देशांत फार थोडे आहेत. महात्मा गांधींचे आश्रम, रामकृष्ण परमहंस सेवाश्रम अशासारख्या संस्था सर्व देशांत सर्वत्र पसरल्या पाहिजेत. या संबंधाचा छोटेखानी परंतु बोधप्रद प्रयोग गुरुवर्यांनी आपल्या आयुष्यांत करून दाखविला.

श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांना कांही वर्षीनंतर माध्यमिक शिक्षण किंवा पंडित शिक्षण या दोन्ही शाखांच्या साफल्याबद्दल व यशाबद्दल निराशा वाटू लागली. गुरुवर्यांनासुद्धा कांहीसे तसेच वाटू लागले. विशेषतः माध्यमिक शिक्षणसंस्था आवरावी असे त्यांना अधिक वाटू लागले. कै. वामनराव नाईक, हैदराबादकर यांच्या उदार आश्रयाखाली धर्मकोशाचे काम सन १९२५ सालीं नुकतेच श्री. गुरुवर्यांनी सुरू केले होते. तेवढेच कार्य ठेवावे, असे दोघांचे मत झाले. परंतु संस्थेत अनेक शिक्षित माणसें दोन्ही शाखांच्या कार्याकरितां समाविष्ट झाली होती. त्यांचेही बूड स्थिरावले होते. त्यांना हा विचार पसंत नव्हता म्हणून हा विचार मागे पडला. परंतु श्री. दिवेकरशास्त्री यांचा हा विचार पाहून इतर सहकारी मंडळी विचारांत पडली. श्री. दिवेकरशास्त्री हे आपल्या कर्तबगारीने संस्थेत सर्वांत अधिकारसंपन्न बनले होते. त्यांचा तो अधिकार त्यांनी आपल्या योग्यतेनेच मिळविला होता. परंतु इतरांच्या अहंकारांना केव्हाहि इजा होणार नाही इतक्या सावध व हळुवार रीतीने त्यांना अधिकार वापरता आला नाही. त्यांच्याविरुद्ध झालेल्या भावना खाजगी रीतीने एकमेकांत व्यक्त होऊ लागल्या. उच्च कार्यात पडलेल्या माणसांची मने उत्कट भावनांची, संवेदनशील किंवा तल्लख असतात, विशेषतः नेहमीच्या चाकोरीत नसलेली व लोकांत विशेष मानमान्यता पावणारी कार्ये अंगावर घेणारी चांगलीं माणसे बहुधा अधिक अहंकारी असतात. महत्त्वाकांक्षी माणसेच बहुधा धर्मकारण, राजकारण यांत देशभक्ती, देवभक्ती, शौर्य, त्याग, योग इत्यादि सद्गुणांनी झळकण्याकरितां पराकाष्ठा करतात. सामान्य माणसांपेक्षा त्यांच्यांत अहंवादीपणा जबरदस्त असण्याची फारच शक्यता असते. आत्मगुणांचा पराभव करणारी या जगाची अहंकार ही शक्ती आहे; म्हणून अधिक जपून वागावे लागते. श्री. दिवेकरशास्त्र्यांच्या विरुद्ध झालेल्यांनी ऐकमत्य करून त्यांच्याकडून संस्थेच्या दहाव्या वर्षी, म्हणजे १९२६ सालीं राजीनामा

घेतला. देशभक्त, बहुश्रुत व मोठा कार्यकर्ता संस्थेने घालविला. या विरोधी मंडळींत मी होतो असे श्री. दिवेकरशास्त्री म्हणतात. त्यामुळे मला ते 'चाणक्य' म्हणूनही संबोधितात. मिरजेच्या एका सभेत गेल्या वर्षी 'हे बुद्धीने कौटिल्य आहेत' असा अनेकार्थी निर्देश त्यांनी, मी उपस्थित असता केला; त्याचे हेच कारण होय. मी स्वतःस बराच ओळखतो. 'कौटिल्य' होण्यास भावनांवर विजय मिळवावा लागतो. यांत दोन्ही प्रकारच्या सद्भावना व असत् भावना, वश कराव्या लागतात. असत् भावनांचा माझ्यावर पगडा कमी आहे, सद्भावनांचा अधिक आहे. राजकारणांत महामुत्सद्दी म्हणून कौटिल्य प्रसिद्ध आहे. राजकीय सत्तेचे ध्येय साध्य करून घेणारा मनुष्य चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या भावनांच्या बंधनांच्या बाहेर असावा लागतो. यासच श्रेष्ठ राजकीय मुत्सद्दी म्हणतात. परमार्थातही यशस्वी होण्याकरिता दोन्ही प्रकारच्या भावनांच्या वर स्वामित्व प्राप्त करून घ्यावे लागते. राजकारणांत सत्ता व परमार्थात सत्य, ही मुख्य साध्ये असतात. साध्यानुसारी सर्व कार्यकारणभाव ओळखणारी बुद्धी, हेच राजकारणाचे आणि परमार्थाचे यशस्वी साधन होय. राजकारणांत माझा विजय अजून झाला नाही. परमार्थ अंधुकपणे क्षितिजावर दिसत आहे. श्री. दिवेकरशास्त्री यांनी माझ्या बद्दलचे मत नीट तपासून बनविलेले दिसत नाही.

श्री. दिवेकरशास्त्री हे संस्थेतून गेल्यानंतर गुरुवर्यांनी संस्थेच्या प्रचाराकरितां हरिकीर्तनकार श्री. गोविंदबुवा देव व हिंदी शिक्षक म्हणून अलीकडे प्रसिद्ध झालेले श्री. महादेवशास्त्री वाटवे यांची निवड केली. आणि माध्यमिक शिक्षणाचा मुख्य कार्यभाग हळूहळू गणित शिक्षक कै. विष्णु गोपाळ आपटे यांच्यावर टाकला. अनेक वर्षे कार्य सुरळीत चालले. श्री. महादेवशास्त्री वाटवे हे संस्थेची लहानमोठी कामे निष्ठेने करीत, राष्ट्रीय शिक्षणांतील देशभक्ती व स्वातंत्र्यसाधने या दोन्ही मुख्य तत्त्वांची आराधना करण्यांत त्यांनी आपली निष्ठा प्रकट केली. प्रचारकार्याचा भार अखेरीस श्री. शंकर रामचंद्र जोशी, वाङ्मयविशारद आणि श्री. वासुदेवशास्त्री कोनकर यांनी उचलला. या दोन प्रचारकांवरच आजपर्यंत संस्थेचा व्यवहार चालला आहे. हे दीर्घकाल निष्ठेने प्रचारकार्य करीत असल्यामुळेच संस्था आजपर्यंत टिकून राहिली आहे.

धार्मिकता व राष्ट्रीयत्व यांचे खोल भावनात्मक अधिष्ठान मुख्यतः गुरुवर्यांच्या मुळेच प्राज्ञपाठशाळेस लाभले. त्यामुळे राष्ट्रांत राजकीय चळवळीला जेव्हा जेव्हा बहर आला तेव्हा तेव्हा संस्थेतील कार्यकर्ते, शिक्षक व विद्यार्थी यांनी मोठ्या धडाडीने त्या चळवळींत भाग घेतला, अहमदाबाद येथे स. १९३० सालीं फेब्रुवारी महिन्यांत अखिल भारतीय राष्ट्रीयशिक्षण परिषद भरली होती, तेथे देशांतील राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचा आढावा घेऊन इत्यर्थ काढण्यांत आला. अध्यक्षपदी श्री. काकासाहेब कालेलकर होते. त्यांनी इत्यर्थ असा सांगितला की, राष्ट्रीय शिक्षणसंस्था या भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या स्फूर्तीची केंद्रस्थाने व स्वातंत्र्याच्या रणवीरांची खरीखुरी शिबिरेच होत. कार्यपर शिक्षण, या तत्त्वाची

अंमलबजावणी, देशाच्या सद्य:स्थितीत स्वातंत्र्याच्या लढाईचे शिपाई तयार करण्यानेच होईल. स. १९३० व ३२ सालच्या कायदे भंगाच्या चळवळींत प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी व कार्यकर्ते हे बिनीचे स्वार बनले. राष्ट्रीय शिक्षण संस्था या नात्याने ही संस्था कारणी लागली.

धार्मिक व सामाजिक सुधारणा -

धार्मिक व सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांचे केंद्र म्हणून प्राज्ञपाठशाळा ही संस्था गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखालीं प्रथमपासून महत्त्वाची कामगिरी करीत आहे. पंडित परिषदा, ब्राह्मण-परिषदा व हिंदुधर्म-परिषदा यांचीं अनेक अधिवेशनें गेल्या तीस वर्षांत महाराष्ट्रांत व हिंदुस्थानांत भरलीं. त्यांत वैचारिक नेतृत्व गुरुवर्यांनी व त्यांच्या शिष्यांनी प्रभावीरीतीने केले आहे. सन १९२६ जानेवारीत (शके १८४७ माघ) खानदेशांत सोनगीर येथे वै. केशवदत्त महाराज यांनी ह. भ. संतोजी महाराजांच्या नेतृत्वाखालीं गोविंद महाराजांच्या अर्चा महोत्सवाच्या निमित्ताने एक पंडित परिषद भरविली होती. त्यांत हिंदुस्थानांतील मोठमोठे पंडित उपस्थित होते. भारती कृष्णतीर्थ, श्री. कुर्तकोटी, श्री. गोकुलनाथ महाराज हे निरनिराळ्या जगद्गुरु पीठाचे आचार्य उपस्थित होते. यांत पंडितांचे दोन पक्ष पडले. पं. लक्ष्मणशास्त्री द्रवीड, राजेश्वरशास्त्री द्रवीड, अनंतकृष्णशास्त्री, काशीशेषव्येंकटाचलशास्त्री इत्यादी पंडितांचा पक्ष स्मृत्युक्त धर्मशास्त्रांत आणि चालू रुढींत कसलाही फेरबदल न करतां सामाजिक व धार्मिक आचार हिंदूंनी चालवावेत या मताचा होता. श्री. गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे आणि त्यांचे श्री. महादेवशास्त्री दिवेकर इत्यादी शिष्य, यांचा पक्ष परिवर्तनवादी होता. महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक, कै. गीतावाचस्पती सदाशिव शास्त्री भिडे, विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव इत्यादि थोर महाराष्ट्रीय पंडितांचा या पक्षास पाठिंबा होता. परिवर्तनवादी पक्षातर्फे मुख्यतः खालील सिद्धान्त मांडले गेले- (१) देशकालपरिस्थितीप्रमाणे निरनिराळ्या युगांत धर्माचे स्वरूप बदलत आले आहे, मूलभूत तत्त्वे बदलत नाहीत; त्यांचे नवे संशोधन होते व नवा प्रकाश पडतो. त्या मूलभूत नैतिक तत्त्वांच्या अनुसाराने वेळोवेळी परिस्थितीस धरून आचारांचे नियमन आणि संस्काराचा विधि ठरविला जातो. (२) ऐतिहासिक दृष्टीने धर्मशास्त्राचा व धर्मग्रंथांचा अर्थ लावणे योग्य आहे. वेद हे पौरुषेय आहेत. स्मृती व पुराणे यांच्यामध्ये वेळोवेळी परिवर्तने झाली आहेत. (३) धर्मभ्रष्टांचे शुद्धीकरण धर्मशास्त्रांत प्रत्यक्ष विहित नसले तरी केले पाहिजे; देवल स्मृतींत त्यास कांहीसा आधार मिळतो. (४) ब्राह्मण व शूद्र या दोनच वर्णांचे कलियुगांत अथवा वर्तमान कालांत अस्तित्व आहे, असें मत अनादरणीय होय. चारही वर्ण म्हणजे क्षत्रिय व वैश्य सुद्धा अस्तित्वांत आहेत. ज्या क्षत्रिय वैश्यांत संस्कारलोप झाला आहे, त्यांचा व्रात्यसंस्कार करून उपनयनादी संस्कार करावेत. (५) युरोपादी परदेशांत जाऊन आलेल्या कोणत्याही वर्णातील हिंदूंचा बहिष्कार करू नये. या मुद्यांवर फार खळचळीची चर्चा झाली. जगद्गुरु भारती कृष्णतीर्थांनी तीव्र उद्गार काढले. त्यामुळे गुरुवर्यही अत्यंत तप्त होऊन बोलले.

सभा मोडण्याच्या बेतांत आली. अखेरीस शांतता स्थापित होऊन पंडितपरिषद समाप्त झाली. श्री. भगवद्भक्त संतोजी महाराज कुकुरमुंडेकर यांच्या चातुर्याला यश आले. या नंतर हैद्राबाद येथे स. १९२७ सालीं हिंदुधर्मपरिषदेचे अधिवेशन झाले. त्यांत वरील विचारांचाच सविस्तर परामर्श घेतला गेला. कै. वामनराव नाईक यांनी ही परिषद भरवून आणली.

वरील दोन्ही विद्वत्सभांमध्ये असे अनुभवास आले की, प्राचीन पद्धतीने अध्ययन केलेल्या पंडितांनाही धर्मशास्त्र सांगोपांग उपस्थित नसते. नित्य व्यवहारोपयोगी कालनिर्णय व आशौचादी विचार यांच्याहून व्यतिरिक्त विषय निघाल्यास न्याय व्याकरणादी शास्त्रांच्या बलावर जुने पंडित वाद जिंकतात. स्मृतींचा व पुराणांचा समग्र अभ्यास त्यांनी केलेला नसतो; याचे प्रत्यंतर दोन मुद्यांवर चांगले मिळाले, सोनगीर येथील पंडित परिषदेंत लक्ष्मणशास्त्री द्रवीड, राजेश्वरशास्त्री द्रवीड व अनंतकृष्णशास्त्री इत्यादी सनातनी पंडितांनी धर्मभ्रष्टांचे शुद्धीकरण केव्हाही अयुक्त म्हणून प्रतिपादिले. देवल स्मृती निबंधोद्धृत नाही, म्हणून अप्रमाण मानली. परंतु या पंडितांनी नंतर प्रसिद्ध केलेल्या 'सनातनधर्मप्रदीपां'त धर्मभ्रष्टांची एक वर्षापर्यंत किंवा चार वर्षांपर्यंत शुद्धी होऊ शकतें, असे मान्य केले; कारण शूलपाणी या बंगाली धर्मशास्त्रकाराच्या निबंधांत देवलस्मृती प्रमाण म्हणून उद्धृत केलेली सापडली. बनारस येथील ब्राह्मणमहासंमेलनांत एका पिढीनंतर व्रात्यसंस्कार होऊ शकत नाही, असा निर्णय घेतला. परंतु कै. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी आनंदाश्रमांत छापलेल्या 'धर्मतत्त्वनिर्णय' या पुस्तकांत तीन पिढ्यांपर्यंत व्रात्य. संस्कार होऊ शकतो असा आपस्तंत्रब धर्मसूत्रावरून निर्णय घेतला. जुन्या कसलेल्या पंडिताची ही गत तर नव्या पंडितांची काय असेल असा विचार मनांत आणून श्री. वामनराव नाईक यांच्याशी विचार विनिमय करून त्यांच्या आर्थिक साहाय्याच्या आश्वासनावर धर्मशास्त्रसंग्रह किंवा धर्मकोश करण्याचे योजिले. मुख्य हेतू धर्मपरिवर्तनाच्या विचारसरणीस पोषक असे धर्मशास्त्राचे स्वरूप मांडता यावे हा होता.

गुरुवर्यांचा धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतींतला दृष्टिकोण मध्यम किंवा अगदी सौम्य असा आहे. अकोला येथे स. १९२७ डिसेंबर मध्ये भरलेल्या ब्राह्मण[१] परिषदेचे गुरुवर्य अध्यक्ष होते. त्यांत ब्राह्मण म्हणवून घेणाऱ्या सर्व पोटजातींचा परस्पर अन्नोदक व्यवहार व विवाहसंबंध व्हावा, या संबंधाचा त्यांनी पुरस्कार केला. आणि विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, त्यांनी अध्यक्ष पदावरून असे उद्घोषित केले की, सर्व जाती जन्मतः समान आहेत. वैचारिकदृष्टीने ही समानतेची घोषणा ब्राह्मणांतील आधुनिक सुशिक्षितांनासुद्धा

---

१. गुरूवर्य स्वामीजी आत्मचरित्रात्मक केलेल्या टिप्पणीत लिहितात - ब्राह्मण परिषदेचे पुढील अधिवेशन अकोला येथे झाले. ते अधिवेशन मोठे भव्य आणि नव्या विचारांच्या

(पुढील पानावर...)

फार थोड्यांना पचनीं पाडता येईल. वेदोक्त प्रश्नांच्या बाबतींत त्यांनी असा निर्णय घेतला की, महाराष्ट्रांतील मराठे, माळी वगैरे लोक हे खरेखुरे क्षत्रिय असून त्यांचे वेदोक्त संस्कार अवश्यमेव व्हावयास पाहिजेत. श्री. वासुदेवशास्त्री कोनकर यांना गुरुवर्यांनी मध्यप्रान्तांतील चांदा वगैरे ठिकाण असलेल्या वैश्यांच्या वेदोक्त संस्काराकरितां मुद्दाम पाठविले. श्री. कोनकरशास्त्री यांनी कोकणांतील वैश्यांची वेदोक्त उपनयनें व विवाह पुष्कळ लावले आहेत. गुरुवर्यांचे स्नेही श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट यांनी महाराष्ट्रांतील मराठे, माळी वगैरे क्षत्रिय जमातींना वेद शिकविण्याकरितां व त्यांच्या वेदोक्त संस्कारांकरितां 'स्वाध्याय मंदिर' या नांवाची संस्था काढली. त्या संस्थेच्या वतीने श्रौताचार्य बापट व गुरुवर्य यांनी भुईंज येथील इनामदार जाधवांकडे वेदोक्त उपनयन संस्काराचा समारंभ केला आहे. महात्मा गांधींनी सन १९३३ सालीं येरवडा जेल मध्यें अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीवर विचार विनिमयार्थ हिंदुस्थानांतील संस्कृत पंडित बोलाविले होते. त्यांत गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती यांनी महात्मा गांधींच्या मतास पुष्टी दिली, त्यानंतर गुरुवर्यांच्या नेतृत्वाखाली धर्मनिर्णय मंडळ ही संस्था स्थापन झाली. या मंडळाचे पहिले नाव 'तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद्' असे होते. या मंडळांत डॉ. पां. वा. काणे, श्री. ना. गो. चापेकर, डॉ. के. ल. दप्तरी इत्यादी महाराष्ट्रांतील नामवंत विचारवंत आहेत. या मंडळाने धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतींत मोठी भरीव कामगिरी केली आहे. या मंडळाच्या वतीने होणाऱ्या संस्कारांचे प्रयोग स्वतः गुरुवर्यांनीच प्रामुख्याने तयार आहेत. नव्या हिंदुसंहितेच्या (हिंदुकोडाच्या) कल्पनेचा प्रसार करण्यांत धर्मनिर्णय मंडळ सर्वांच्या आघाडीवर आहे. या धर्मनिर्णय मंडळाच्या कार्याचे सर्व प्रकारचे संघटन प्रामुख्याने गुरुवर्यांचे शिष्य तर्क-सांख्यतीर्थ रघुनाथशास्त्री[2] कोकजे हेच करीत असतात. श्री. ग. रा. परांजपे हे गृहस्थही या मंडळाचे कार्य मोठ्या आस्थेने व निरपेक्ष बुद्धीने करीत असतात.

पायावरच उभारले गेले होते. महादेवशास्त्री दिवेकरांनी अकोला परिषदेकरता फार मोठे कार्य केले. ब्राह्मणांच्या २८।३० पोटशाखांची सविस्तर माहिती गोळा केली. पुस्तके छापली. पोटशाखांच्या एकीकरणाचा खूपच प्रचार केला. नरहरशास्त्री खरशीकर आणि ब्राह्मणपत्रिकेचे संपादक इस्लामपूरचे वासुदेवराव मुंडले यांच्या प्रचाराचाही या अधिवेशनाला फार उपयोग झाला. अकोला ब्राह्मणपरिषदेचे अध्यक्ष मराठेशास्त्री होते. बापूजी अणे, डॉ. मुंजे, आठले वकील इ. अकोल्याचे पुढारी, हैद्राबादचे वामनराव नाईक, काणे, श्रीघरशास्त्री पाठक इत्यादी थोरथोर मंडळी उपस्थित होती. आमचे कानडेशास्त्री दिवेकरशास्त्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादि मंडळी तर होतीच, हे सांगायलाच नको. अधिवेशनामध्ये पोट शाखाचें एकीकरण, सर्वांना वेदाधिकार, अस्पृश्यता निवारण इ. महत्त्वाचे पुष्कळ निर्णय झाले.

२. पुढील पानावर

संस्थात्याग व संन्यासदीक्षा

गुरुवर्यांनी संन्यासदीक्षा सन २२ ऑक्टोबर १९३१ (आश्विन शुद्ध ११ शके./ १८५३) या दिवशीं घेतली. संन्यासाचा संकल्प वयाच्या २३ व्या वर्षीच झाला होता. अध्यापनाचा वीट आल्यानंतर संन्यास घेऊ असे ठरविले होते; निमित्त निराळे झाले. कटु प्रसंग उद्भवला. स्वत: स्थापन केलेल्या व सर्वस्व अर्पण करून मायेने वाढविलेल्या संस्थेचा मतभेदास्तव संबंध तोडून संन्यास घेतला. ही एक मोठी खेदकारक घटना झाली. ज्यांनी संन्यास घेतला, त्यांनी मोक्षपदवी गाठली. परंतु संस्थेच्या कार्यकर्त्यांना दोष लागला. असा दोष कधीही लागू नये. असे उदाहरण कधीही घडू नये. पापाचा प्रहार माणसाला कित्येक वेळा चुकविता येत नाही.

माध्यमिक शिक्षणाची शाखा बंद करावी; ही शाखा संस्थेच्या मुख्य ध्येयाला म्हणजे उच्च संस्कृत शिक्षणाला बाधक ठरत आहे; आणि ती शाखा राष्ट्रीय शिक्षण या दृष्टीने यशस्वी होत नसून इंग्रजांनी चालविलेल्या शाळांप्रमाणे बनत आहे, म्हणून हा व्यर्थ खटाटोप बंद केला पाहिजे; असे गुरुवर्यांचे फार दिवसांचे अनुभवाने बनलेले मत होते. संस्थेतील बरेच कार्यकर्ते गुरुवर्यांशी सहमत नव्हते. गुरुवर्य आपली मते सहकाऱ्यांवर कधींच लादत नसत. सौम्य स्वभावाचे असल्यामुळे भिडस्त आहेत; त्यामुळे मतभेद असूनही वेळ निभावून नेत. गुरुवर्यांचे धर्मकोश रचनेचे कार्य यावेळी आकारास येऊन त्यांत पुष्कळ प्रगती झाली होती. त्यांचे त्यांतील एक सहकारी माध्यमिक शिक्षणाची शाखा बंद पाडलीच पाहिजे, असें ठासून बोलू लागले. या गृहस्थाबद्दल संस्थेतील स्थिरसेवकांच्या मनांत वैषम्य वाटू लागले, कारण ते गृहस्थ नवीनच आले होते. संस्थेत रीतसर असे त्यांना कोणतेच स्थान नव्हते, हे गृहस्थ इतके ठासून आपला अधिकार दर्शित करीत असतील, अशी कल्पना गुरुवर्यांना असेल असें वाटत नाही. इतर स्थिरसेवक कुटुंबी असल्यामुळे आणि संस्था सोडून अन्यत्र जाणे कठिण वाटत असल्यामुळे मनांत साशंक झाले. त्यांनी माध्यमिक शिक्षणाच्या बाजूने संस्थेच्या कार्यकर्त्यांत, गुरुवर्यांच्या अलिप्तपणाचा फायदा घेऊन, त्यांच्या संमतिवाचून, बहुमत करून घेतले. सन २० ऑक्टोबर १९३१ रोजीं संस्थेच्या वार्षिक साधारण सभेत माध्यमिक शिक्षणाच्या बाजूचा ठराव मान्य करून घेतला. हे सगळे कृत्य अयोग्य व अस्थानी झाले. यांत बहुमत करवून घेणाऱ्या संस्थेतील कार्यकर्त्यांच्या बुद्धीत तारतम्यविचार राहिला नाही. वस्तुतः गुरुवर्यांनी मतभेद असूनही अनेक वर्षे माध्यमिक शिक्षण चालू ठेवले. पुढेही

---

(२) गुरूवर्य स्वामीजी आत्मचरित्रात्मक लिहिलेल्या टिप्पणीत लिहितात -- तत्त्वनिष्ठ परिवर्तनवाद महाराष्ट्रामध्ये जो उत्पन्न होऊन वाढीस लागला त्याचे श्रेय नारायणशास्त्री व त्यांचे सहकारी यांच्याकडेच आहे. सध्या त्याचा सर्व भार रघुनाथशास्त्री कोकजे यांचेवरच आहे. आणि त्यांच्याकडून तो उत्तम रीतीने भागविला जात आहे.

त्यांनी तसेच ठेवले असते. परंतु मधला सात आठ महिन्यांचा काळ संशयपिशाचिकेच्या बाधेत गेला; त्यामुळे मानसिक दूरत्व उत्पन्न झाले. गुरुवर्यांनी हे दूरत्व ओळखले व संस्थेचा त्याग केला. त्यामुळे संस्थेच्या नैतिक सामर्थ्यावर मोठा आघात झाला.

गुरुवर्यांनी विजयादशमीच्या दिवशीं २१ ऑक्टोबर १९३१ ला मुनिवृत्तीने कोणासही जाणीव न देता, सीमोल्लंघन केले व संसारावर विजय मिळविला. ते आपल्या आत्मचरित्राच्या टिप्पणीत लिहितात- "तो मंगल निश्चय वयाच्या ५४ व्या वर्षी सफल झाला. पूर्व निश्चयाप्रमाणे संन्यास क्रमप्राप्त होता, तो केला आमचे सुहृद् श्री. बाबा आठल्ये कऱ्हाडजवळ कृष्णा काठी टेंबू या गांवीं राहात असत, त्यांच्याकडे गेलो. वाईस बराच त्रास झाला असता म्हणून टेंबुला गेलो. श्री. बाबा आठल्यांना सांगितले की, मी ज्याकरिता येथे आलो आहे ते, हो नाही न म्हणतां, माझ्या आज्ञेप्रमाणे कर; आणि ते तुला केलेच पाहिजे. मी अयोग्य काम करण्यास सांगणार नाही हे निश्चित अर्थात् त्याने 'ॐतथा' म्हटल्यावर माझ्या संन्यासाची तयारी करावयास सांगितले. संन्यासाचे योग्य व सत्य तेंच कारणही सांगितले; त्याला रडुच कोसळले; जरा हळव्या मनाचा आहे. मला सर्व विधी मुखोद्गत होताच. माझ्या गुरु, परम गुरूंच्या जवळ कोणा कोणा संन्यासेच्छूने संन्यास- योगपट्ट केला, त्या वेळी सगळे काम माझ्याकडेच असें. मला दुसऱ्या कोणा याज्ञिकाची किंवा संन्याशाची आवश्यकताच नव्हती. आश्विन शु. ११ ला कांही पूर्वविधी करून द्वादशीला प्रातःकाळीं प्रैषोच्चार केला, संन्यास झाल्यावर तेथेच दोन तीन महिने राहिलो. आनंदमय वातावरण निर्माण झाले. पुढे सहृद् श्री. नानासाहेब घारपुरे यांच्याबरोबर श्री बद्रीनाथाचे दर्शन घेतले 'उत्तरस्यां दिशि देवतात्मा' नगाधिराज हिमालयाचे दर्शन घेतले. श्री गंगामातेच्या लहरी कल्लोळांचे नितांत श्रवण केले. दर्शन, स्नान, पान झाले. उखीमठ आणि साक्षात् बदरी येथे कायमचे राहावे, असे मनात आले. उखीमठाच्या रावळांनी सर्व सोयी करून देतो, असें सांगितलेही होतें. पण अन्न हाताने करणे अयोग्य आणि रावळाच्या ब्राह्मण शिपायाने सिद्ध केलेले अन्न पोटांत जाईना. बदरीला ही अडचण नव्हती. कारण तेथील मुख्य रावळांनी नैवेद्यामधील अन्न नित्य देण्याचे कबूल केले होते. माझ्या मनाला ते मान्य होते; पण बुद्धीला मान्य होईना. महाराष्ट्रांत परतलो, ज्याच्या जवळ स्वतःचे परमार्थाचे भांडवल असेल त्याला कोठेही गेले तरी क्षेत्रतुल्यताच असते. आणि तसें स्वतःचे भांडवल नसेल त्याला बदरी झाली तरी ती काय करणार ? कल्याण-भिवंडी जवळ कवाड हे लहानसे गांव आहे. तेथे चिध्दन स्वामींची समाधी आहे. यांचे शिष्य पटवर्धनशास्त्री, पटवर्धनांचे शिष्य दामोदरशास्त्री लोंढे आणि लोंढ्यांचे शिष्य नारायण मराठे, असे चिद्धन स्वामी यांच्याशी माझे नाते असल्यामुळे शके १८५४ चा पहिला चातुर्मास्य मी कवाडास राहिलो. एक तास नित्य योगवासिष्ठावर प्रवचन, मुलामुलींना तिथी, वार, नक्षत्रे, मनाचे श्लोक, कांही स्तोत्रे, खेळ, नमस्कार, लाठीकाठी, कवायत, पंचांग पाहणे इत्यादी शिकविणे असा दिनक्रम होता. हा दोन तीन तासांचा कार्यक्रम आणि इतर वेळी

स्वतःचे उपनिषद्, गीता पठनादिक आणि योगाभ्यास चाले. आबाल वृद्ध स्त्रीपुरुषं या सर्वांचे माझ्यावर प्रेम बसले. शके १८५४ च्या मार्गशीर्षापासून ज्येष्ठ अखेर पनवेल जवळच्या पळस्पे या गांवी राहिलो. शके १८५५ चा चातुर्मास्य वाईस येऊन केला. पुन: मुंबईच्या जवळ असलेल्या खार या गांवी रामकृष्णाश्रमामध्ये आठ महिने होतो. तेथील मुख्य गुणातीतानंद यांना अद्वैतसिद्धी वाचावयाची होती. तेथील सर्वच संन्यासी फार प्रेमळ आणि निरलस कार्यकर्ते आहेत. शके १८५६ पासून कृष्णा कांठींच रहाण्याचे निश्चित केले. गुरुस्थान म्हणून वाईलाच रहावयाचे असे ठरले, वाईला सोय चांगली. कृष्णामातेचा नित्य संबंध, प्रशस्त घाट, मधुकरीची चांगली सोय, ग्रंथालय, असे सर्वच येथे उत्तम आहे. योगाभ्यासही पुष्कळ करतां आला. वाईलाच रहावयाचे ठरल्यावर पूर्ववत् एक तास प्रस्थानत्रयी आणि इतरही अनेक वेदान्तग्रंथ यांचा नित्य पाठ चालू ठेवला. न्याय, व्याकरण, वेदान्त, मीमांसा यांचे अध्यापनही नित्य तीन तास होत असे. शके १८६२ पासून वाक्शक्ती कमी झाली, म्हणून अध्यापन एक तासावर आणले. आता तर शके १८६६ पासून अध्यापन सर्वथा थांबविले. आता लिहिण्यावर भर आहे.* जैमिनिमीमांसासूत्रपदसूची, सूत्रपाठ - टिप्पणीसह मिळून, एक ग्रंथ लिहून तयार होता. तो आता छापूनही पुरा होत आहे. मीमांसाकोश नांवाच्या ग्रंथाची मुद्रणमत लिहिण्याचे काम चालू आहे. अद्वैतसिद्धीचे सविवरण भाषांतर पूर्ण करून त्याची मुद्रणप्रत लिहून ठेविली आहे. 'नव्यवेदान्तपरमाणुमाला' हे प्रकरण लिहिले आहे. यामध्ये अद्वैतसिद्धीमधील सर्व सिद्धांतवाक्यांचा संग्रह वर्णक्रमाने केला आहे. शांकर शारीरिक भाष्यातील सिद्धान्तबोधक वाक्ये काढून प्रकरणे बांधली आहेत."

"फुकटचे खाऊ नये, असे पितृवाक्य आहे. आम्ही जन्माचेच भिक्षेवर निर्वाह करणारे. आणि आता तर सरळच संन्यासी, वाई गंगापुरीतील सर्व लोक आदराने भिक्षान्न वाढतात. अर्थात् मी पण माझ्याजवळ असलेले विद्याधन देता येईल तसे द्यावे असे समजतो आणि ते देहपातापर्यंत यावत् शक्ती चालेल. आतां सद्गुरुकृपाप्राप्त अध्यात्माच्या आसनावर स्थिर बसून लेखनव्यवसाय करीत केवलानंद सरस्वती यावत् प्रारब्ध रहाणार आहे. न्याय, व्याकरण, मीमांसा, वेदान्त इत्यादी शास्त्रार्थाचे मोठे घबाड जवळ असल्याने 'आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिमेति कुतश्चन."

श्री गुरुवर्य स्वामी केवलानन्द सरस्वतींचे ग्रंथ--

(१) मीमांसादर्शनम् - संशोधन पूर्वक तयार केलेली आवृत्ती, अकारादी वर्णानुक्रमाने पदसूची, सूत्रसूची व अधिकरणसंज्ञांची चर्चा (प्रकाशित.) (२) अद्वैतसिद्धीचें मराठी भाषांतर, (३) ऐतेरय विषयसूची (प्रकाशनाचे मार्गावर) (४) कौषीतकी ब्राह्मणाची विषयसूची. (५) तैत्तिरीय मंत्रसूची. (६) तैत्तिरीय शाखेची विषयसूची. (७) सत्याषाढ सूत्र विषयसूची, (८) अद्वैतवेदान्तकोश. (९) मीमांसाकोश. (प्रकाशन चालू).

भारतर्षाच्या प्राचीन शिक्षणपद्धतीवर संशोधनात्मक निबंध व संग्रहात्मक ग्रंथ अनेक आधुनिक पंडितांनी लिहिले आहेत. श्रुती स्मृती पुराणांमध्ये वर्णिलेली शिक्षणपद्धती व चित्रित केलेले आचार्य यांची अविच्छिन्न परंपरा आपल्या देशांत आतांपर्यंत कोणत्याना कोणत्या स्वरूपांत तरी टिकून आहे; परंतु ती आतां झपाट्याने लोप पावत आहे. वेदशास्त्रांचे आचार्य थोडेसे तीर्थक्षेत्रांमध्ये शिल्लक आहेत. औद्योगिक व ललितकला आणि आयुर्वेद धनुर्वेदादी प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनाशी संबद्ध लौकिक शास्त्रे यांच्या आचार्यांची परंपरा पुष्कळ विषयांत खंडित झाली आहे. एकंदरीत ही प्राचीन शिक्षणपद्धती डबघाईस येऊन विनष्टप्राय झाली आहे. विद्यार्थ्यांपासून मूल्य न घेता विद्याप्रदान पिढ्यानपिढ्या करणाऱ्या आचार्यांची परंपरा हे प्राचीन शिक्षणपद्धतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य होते. पराश्रित नसलेला आचार्यवर्ग त्यांमध्ये होता. अशा तऱ्हेचे आचार्यांचे आदर्श प्राचीन काळींही अपवादात्मकच असतील; असेच कोणासही वाटेल. विनामूल्य विद्याप्रदान निरंतर जन्मभर करणारा आणि परोपजीवी व मिंधा न झालेला, केवळ देहधारणेपुरताच प्रतिग्रह करणारा, उद्याकरिता देखील कसलाही संग्रह न करणारा आचार्यवर्ग या देशांत होता, असे जर म्हटले, तर त्यास चिकित्सक कल्पितकथेत घालतील. परंतु असे आचार्य या देशाला यापुढे मिळालेच पाहिजेत. जर मिळाले नाहीत तर सत्याचा शुद्धबुद्धीने शोध करणारा माणूस उत्पन्न होणार नाही. असा माणूस उत्पन्न करणे हे शिक्षणाचे एक मुख्य ध्येय आहे. प्राचीन आचार्यसंस्थेचे प्रतीक, या नव्या जगांत आकस्मिक रीतीने जिवंत असलेले पहाण्याचे भाग्य मला लाभले ते म्हणजे गुरुवर्य श्री. केवलानंद सरस्वती होत. मी शिक्षणशास्त्राचा विद्यार्थी आहे. मी भारत वर्षाला सांस्कृतिक नवजीवनाचा लाभ करून देणारे शिक्षक कसे पाहिजेत, याचे एक आदर्श चित्र मनांत निर्माण केले आहे. ते सत्यसृष्टीत येईल, अशी आशा बाळगत आहे; कारण अशा अपरिग्रही आचार्यांचे जीवन मी डोळ्यांनी पाहिले आहे, ते प्रखर तार्किक समीक्षा करून तपासले आहे. ते आचार्य म्हणजे श्री. केवलानंद सरस्वती होत. त्यांना प्रणाम करून ही अल्प सेवा समाप्त करतो.

जोतिचरित्र

जोतिचरित्र

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

वाय १८४-२८

ISBN 81-237-2617-1

पहिली आवृत्ती 1992 (शके 1914)
दुसरी सुधारित आवृत्ती 1999 (शके 1920)
© लक्ष्मणशास्त्री जोशी, 1992
Jyoticharitra (Marathi)
रु. 30.00
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110016 यांनी प्रकाशित केले

पहिल्या आवृत्तीचे निवेदन

गेले १९९०हे वर्ष महात्मा जोतीराव फुले यांच्या मृत्युशताब्दीचे वर्ष होते. यंदाचे वर्ष १९९१ डॉ. बाबासाहेब यांच्या जन्मशताब्दीचे आहे. जातीयतेच्या शापातून भारतातल्या सगळ्या हिंदुंना मुक्त करण्याच्या कार्यात या दोन महापुरुषांचा वाटा मोठा आहे.

जोतीरावांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने दिल्ली येथील नॅशनल बुक ट्रस्टने त्यांचे चरित्र प्रकाशित करायचे ठरविले. ट्रस्टने मला हे चरित्र लिहिण्याची १९९० साली विनंती केली. मी ती विनंती मान्य केली. जोतिरावांचे संक्षिप्त चरित्र मी बाबासाहेबांच्या जन्मशताब्दी साली म्हणजे यंदा १९९१ साली पूर्ण करून वाचकांना सादर करीत आहे.

या चरित्राला आधारभूत मुख्यतः दोन ग्रंथ. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने प्रसिद्ध झालेले हे ग्रंथ आहेत. हे ग्रंथ म्हणजे महात्मा जोतीराव फुले : समग्र वाङ्मय (संशोधित आवृत्ती : संपादक : य. दि. फडके) आणि महात्मा जोतीराव फुले (लेखक : धनंजय कीर).

२६ सप्टेंबर १९९१ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

अनुक्रमणिका

भाग पहिला

१. जोतीरावांचा जन्म आणि बालपण ३९५
२. स्त्रिया आणि शूद्र यांचे शिक्षण ४०२
३. सामाजिक सुधारणेचे कार्यक्रम ४०९
४. ब्राह्मण्य आणि अस्पृश्यता यांना विरोध ४१३
५. शेतकरी आणि कामगार यांसाठी लढा ४२२
६. हंटर कमिशनला निवेदन ४२८
७. शेतकऱ्यांचा आसूड ४३६
८. सार्वजनिक सत्यधर्माचा आग्रह ४४१
९. शेवटची सात वर्षे ४४५
१०. निर्मिक म्हणजे ईश्वर ४५५
११. सत्यवर्तन म्हणजेच धर्म ४६१
१२. जोतिरावांचा मृत्यू ४६५
१३. आता धार्मिक यादवी ४६८
१४. उपसंहार ४७२

जोतीरावांचा जन्म आणि बालपण

जोतीराव फुले हे भारताच्या आधुनिक मानवतावादी संस्कृतीचे एक आद्यप्रवर्तक होत. असे आद्यप्रवर्तक अनेक आहेत. उदाहरणार्थ : बंगालमध्ये राजा राममोहन रॉय, गुजरातमध्ये दयानंद स्वामी इत्यादी. परंपरेमध्ये समाजपरिवर्तन घडवण्याची शक्ती नाही; समाज स्थिर, थंड गोळ्यासारखा पडून आहे; त्याच्यात गती, तेज आणि उष्णता नाही; त्याची कारणे शोधून नवा एकात्म भारतीय समाज निर्माण करणारा ध्येयवाद सांगणारे हे आद्यप्रवर्तक होऊन गेले. परंपरागत बंधनांना, श्रद्धांना आव्हान देणारी जीवनमूल्ये आधुनिक शिक्षणामुळे तरुण पिढीला दिसू लागली. अशा तरुण पिढीमध्ये जोतीराव सारखे धीरगंभीर जे थोडे झाले, त्यांना आधुनिक संस्कृतीची प्रेरणा मिळाली. हे आधुनिक मानवतावादी युग भारतावर प्रभाव गाजवू लागले. फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या जीवनमूल्यांचा प्रथम सामर्थ्यशाली आविष्कार ज्यांनी केला, त्यांच्यापैकी जोतीराव फुले होत. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मूल्यांशी विरुद्ध असलेल्या भारतीय परंपरेला जोतीरावांनी 'गुलामगिरी' ही संज्ञा दिली. भारतांमध्ये प्राचीन समाजसंस्थेतील गुलामगिरी कधीच नांदली नाही. गुलामाच्या देहावर मालकाची वैयक्तिक सत्ता म्हणजे मालकाचे दास्य, हे प्राचीन समाजसंस्थेचे लक्षण होते. असे लक्षण भारतीय समाजसंस्थेच्या इतिहासात आढळत नाही; परंतु दुसरे एक सामाजिक प्रगती आणि विकासाला वाव न देणारे लक्षण म्हणजे जन्मसिद्ध उच्च-नीच जातिसंस्था होय. उच्चतम जात म्हणजे ब्राह्मण आणि नीचतम जात म्हणजे अस्पृश्य, महार, मांग, चांभार, धेड इ. होत. ब्राह्मण हा पुरोहितवर्ग. प्राचीन भारतीय समाज हा धार्मिक असल्याने त्याची धार्मिक कर्तव्ये काय काय आहेत, हे धर्मग्रंथांच्या आधारे ब्राह्मण सांगत आलेला आहे. त्या धर्मग्रंथांना श्रुती, स्मृती आणि पुराणे अशी संज्ञा आहे. ब्राह्मण हा अत्यंत पवित्र मानला गेला. इतर जाती पवित्र व अपवित्र या दोन टोकांच्यामध्ये नांदणाऱ्या होत. जोतीरावांच्या मताप्रमाणे ब्राह्मणांनी 'हम करेसो कायदा' या न्यायाने आपल्याकडे

समाजशासनाचा अधिकार घेतला. या अधिकाराखाली समाज नांदला. त्या अधिकाराला आव्हान जोतीरावांनी 'गुलामगिरी' या संज्ञेने दिले. या गुलामगिरीच्या बंधनातून भारतीय मन मुक्त झाले, तरच त्याची सर्वांगीण प्रगती होऊ शकेल असा इशारा जोतीराव आपल्या ग्रंथांतून व निबंधांतून देतात. जोतीरावांचे चरित्र हे एका महान् कृतिशील पुरुषाचे चरित्र होय.

शेटीबा हा त्यांचा ज्ञात असलेला मूळ पुरुष. पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील खानवली गाव हा त्यांच्या पूर्वजांचा मूळ गाव होय. शेटीबाला राणोजी, गोविंदा व कृष्णा असे तीन मुलगे झाले. त्यांचे मूळचे आडनाव गोऱ्हे. ते फुलमाळ्याचा धंदा करू लागले. त्यामुळे फुले झाले. उत्तर पेशवाईत त्यांचे पूर्वज फुले आणि फुलांच्या निरनिराळ्या वस्तु, गोंडस व सुवासिक सुंदर फुलांचेच विविध आकार आणि प्रकार ते पेशव्यांना पुरवत. पेशव्यांसाठी फुलांच्या गाद्या, उशा व अन्य प्रकारचे पोशाख बनवीत. पेशव्यांनी त्यांना बाग सोपवला व पस्तीस एकर जमीन इनाम दिली. तेव्हापासून त्यांचे गोऱ्हे हे नाव जाऊन फुले हे नाव आले. पेशवाईत त्यांचे पूर्वज भाजीपाल्याचा धंदा करीत. फुल्यांचे वडील गोविंद. त्यांचे पूर्वज मळ्यात काम करीत होते आणि भाजीपाला विकण्यासाठी पुण्यात दुकान चालवू लागले. त्या दुकानावर त्यांचा योगक्षेम चांगला चालू लागला. गोविंदरावांचा चिमणा नावाच्या मुलीशी विवाह झाला. पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडे पाटील यांची ती मुलगी. त्यांना दोन पुत्र झाले. त्यापैकी एक जोती. जोतीचा जन्म १८२७ साली झाला.

जोतीरावांचे वडील गोविंदराव यांनी पेशवाईतल्या अनेक घटना प्रत्यक्ष पाहिल्या होत्या व पेशवाईचे वैभव व सत्ता नंतर लुप्त झालेली पाहिली. उत्तर पेशवाईत राज्यकर्ते योग्य पद्धतीने शासनसंस्था न चालविता जातीय पक्षपाताने चालवू लागले. ब्राह्मणांना उच्च पदे देण्यात योग्यतेचा विचार विशेष नव्हता. दुसऱ्या बाजीरावाची ही राजवट होय. ब्राह्मणाला अनेक गुन्ह्यांच्या बाबतीत कायदेशीर कडक शिक्षा न देता, त्या शिक्षा अधिक मऊ करत. सरकारी सारा आकारणीत ब्राह्मणाला भरमसाट सूट मिळे. ब्राह्मण लोक आपल्या जमिनीचा सारा निमफ्ट व त्याहूनही कमी करून घेत. ब्राह्मणांवर दानधर्माचा वर्षाव रावबाजीच्या काळी अधिक होऊ लागला. ब्राह्मणांच्या जेवणावळीत लाखो रुपयांचा चुराडा होऊ लागला. ब्राह्मणांना दक्षिणा देण्यात लाखो रुपये उधळले जात. शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत केविलवाणी झाली होती. ते सावकारांच्या पेचात सापडले होते. सावकारापायी-गुरेढोरे, शेतीपोती गहाण ठेवावी लागत. मूळ रकमेवरचे व्याज फिटत नसे; कारण शेतकरी निरक्षर होता. बरीचशी सावकारी लिहिता-वाचता येणाऱ्या पांढरपेशांकडे, विशेषतः ब्राह्मणांकडेच होती. जातीय अंधश्रद्धेमुळे ब्राह्मणांचे वर्चस्व होते. पाप केल्यावर ब्राह्मणाला दक्षिणा दिली की पापमोचन होते; तसेच ब्राह्मणाच्या अंगठ्याचे तीर्थ घेतले की पाप धुवून निघते, अशी समजूत होती. अजूनही काही प्रदेशांत ब्राह्मणाच्या अंगठ्याचे पाणी पवित्र तीर्थ म्हणून

घेण्याची पद्धत आहे. महाराष्ट्रातही ही पद्धत पन्नास वर्षापूर्वी होती. महारामांगाची सावलीही अंगावर पडू नये अशा तऱ्हेने अंधश्रद्धेचा भाव पक्का होता.

स्त्रियांना अशिक्षित व निरक्षर ठेवण्यामध्ये ब्राह्मणांनी विशेष पुढाकार घेतला होता. पेशवाईच्या अखेरच्या काळात धर्मश्रद्धासुद्धा दुराचारी बनली होती. शाक्त पंथ पुण्यातील प्रतिष्ठित ब्राह्मणांमध्ये दृढमूल झाला होता. राजबाजीच्या उच्च अधिकारी वर्गामध्ये ब्राह्मणांचा भरणा जास्त होता व त्यांच्यात शाक्तपंथ पूजा प्रतिष्ठित मानली जात होती. या पूजेत पंच 'म' कार होते. मद्य, मांस, मत्स्य, मैथुन आणि मुद्रा असे हे पाच 'म' कार होत. हांजीहांजीखोर, हुशार, चौकस ब्राह्मणांना खटाटोप करून वरच्या जागा पटकावता येत होत्या. हे भयानक पतनाचे हिडिस दृश्य त्या वेळच्या इंग्रज अधिकाऱ्यानी लिहून ठेवले आहे. तो कालखंड भारतीय संस्कृतीच्या बौद्धिक, शारीरिक व सांस्कृतिक थकव्याचा दर्शक दिसतो. इंग्रजी राज्य आल्याबरोबर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा न्यायबुद्धीचा, उदार उच्च अधिकारी लोकांना आवडू लागला त्याला मानपत्र देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, "तुम्ही राज्य घेतले हे बरे झाले." शिवाजी महाराजांनी स्थापलेले मराठी राज्य पहिल्या चार पेशव्यांच्या नेतृत्वाखाली विस्तार पावले. परंतु शाहूंच्या मृत्यूनंतर उत्तर पेशवाईत ते ब्राह्मणी राज्य झाले. शिवाजीचे न्यायप्रधान व गुणप्रधान राज्यतंत्र मोडून पडले. कारभारात न्याय व दक्षता राहिली नाही. इंग्रजी राज्य आल्यावर जे सुशिक्षित तयार झाले, त्यात लोकहितवादी यांचे स्थान फार महत्त्वाचे आहे; त्यांनी पेशवाई व इंग्रजशाही यांची उत्कृष्ट तुलना आपल्या 'शतपत्रे' या ग्रंथात केली आहे.

नव्या आधुनिक शिक्षण संस्थेची इंग्रजी राज्यात स्थापना झाली त्याचे स्वागत आधुनिक विद्येचे साधक राजा राममोहन रॉय यांनी केले आहे. काही इंग्रज अधिकारी संस्कृत पाठशाळा येथील परंपरेने चालवाव्या अशा मताचे होते. परंतु राममोहन रॉय यांनी "संस्कृत तुम्ही शिकवायला नको, आम्ही आपले पाहून घेऊ. परंतु आधुनिक शिक्षण देणाऱ्या संस्था तुम्ही स्थापा," असे इंग्रजांना सांगितले. या आधुनिक शिक्षणाचे फळ म्हणजे आधुनिक समाजसुधारक व धर्मसुधारक होत. त्यात जोतीराव फुले यांचे स्थान महत्त्वाचे आहे. जोतीरावांची आई चिमणाबाई त्यांच्या बालपणीच निवर्तली. पत्नीच्या निधनामुळे गोविंदराव अत्यंत दुःखी झाले; परंतु दुसरे लग्न न करता जोतीच्या संगोपनार्थ एक दाई नेमली. तिने जोतीचे आणि भाऊ राजाराम यांचे निष्ठेने संगोपन केले. गोविंदराव बागेत काम करीत व शिवाय फुलांचे दुकान चालवीत. स्वतःच्या जातीत एक प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून त्यांचा आदर होत असे. ते शांत व सरळमार्गी होते. परंपरा व चालीरीती यांच्यावर त्यांची श्रद्धा होती. जोती सहा वर्षाचा झाला. हाडापेराने मजबूत, प्रकृतीने सुदृढ आणि देखणा होता. त्या काळात वरच्या वर्गातसुद्धा आधुनिक शिक्षणाची महती स्थापित झाली नव्हती. शास्त्री मंडळी खाजगी पाठशाळा चालवीत. त्यात संस्कृत, व्याकरण, न्याय, वेदान्त,

ज्योतिष, अलंकार, धर्मशास्त्र इ. विषय शिकविले जात. व्यापारी व श्रीमंतांची मुले लेखन-वाचन शिकत.

१८३८ साली इंग्रेज सरकारने पुणे जिल्ह्यात काही ठिकाणी ग्रामशाळा सुरू केल्या. त्यात लेखन, वाचन व अंकगणित हे विषय शिकवीत. इंग्रजी राज्य येण्यापूर्वी प्रजेला शिक्षण देणे, ही सरकारी जबाबदारी नव्हती. १८१३ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यात सर्वांना खुले शिक्षण सुरू झाले.

एकोणिसाव्या शतकाचा इतिहास हा जगावर पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचा प्रारंभ होण्याचा इतिहास आहे. समाजसुधारणेची प्रेरणा या प्रभावाखाली निर्माण झाली. इंग्रजी भाषेचे ज्ञान देणाऱ्या शाळा सुरू झाल्या. त्यांचा हेतू जनता शिक्षित करणे हा नव्हता, तर इंग्रजांचे राज्य चालवायला उपयुक्त कर्मचारी मिळावे हा होता. लोक शिक्षित करणे हा हेतू ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या ठिकाणी असल्याने त्यांनी १८२४ साली साली पुण्यात मराठी शाळा काढली. या संक्रमणाच्या काळात सर्व जनतेला जरी शिक्षणाचे दरवाजे खुले होते, तरी सर्वसामान्य जनतेला शिक्षणाचा महिमा अवगत नव्हता. हे जरी खरे असले, तरी जोतीचे वडील गोविंदराव यांनी आपल्या मुलाला वयाच्या सातव्या वर्षी प्राथमिक मराठी शाळेत घातले. त्या काळची परिस्थिती शिक्षणाची उपेक्षा करणारी जरी होती, तरी काही थोड्या चाणाक्ष व्यक्तींना आधुनिक शिक्षणाचा महिमा पटला होता. गोविंदरावांनी जोतीला शाळेत घातले, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे शिक्षणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल होत होता, हे सूचित होते. बुद्धिमान, तरतरीत व उत्साही विद्यार्थी अभ्यासात प्रगती दाखवीत; परंतु ब्राह्मणवर्ग सामान्यपणे इतरांनी शिक्षणाच्या भानगडीत पडू नये, अशाच मताचा होता. गोविंदरावांच्या दुकानातील ब्राह्मण कारकुनाने जोतीना शाळेतून काढावे, असा सल्ला दिला. जोतीने प्राथमिक शाळेतला अभ्यास पूर्ण केला. त्याला चांगले लिहिता-वाचता येऊ लागले, हिशेबही येऊ लागले. लोकहितवादी गोपाळराव देशमुख १८५० साली 'शतपत्रा'त लिहितात, "एखादा मराठा व इतर जातीचा कारकून ब्राह्मणाने पाहिला, की त्याच्या अंगाचा तिळपापड होतो." ब्राह्मण "कलियुग आले, विद्या शूद्राघरी गेली" असे म्हणत. ब्राह्मण कारकुनाच्या सल्ल्यामुळे गोविंदरावांनी जोतीला शाळेतून काढले आणि त्याला भाजीपाल्याच्या मळ्यात कामाला लावले. तेही काम मन लावून जोती करत होता. आपला मुलगा इतका प्रामाणिक व उत्साही पाहून गोविंदरावांना फार समाधान वाटले.

त्या काळी बालविवाहाची प्रथा होती. आठव्या दहाव्या वर्षी मुलींची लग्ने होत व बाराव्या-चौदाव्या वर्षी मुलांची लग्ने होत. जोतीरावाचे लग्न तेराव्या वर्षी झाले. पुण्याजवळील धनकवडी गावातील झगडे पाटील यांची मुलगी निवडली गेली. ती आठ वर्षाची होती. लग्नं मोठ्या थाटात झाले. विवाहाच्या वेळी इतके लहान वय असे की लग्न कशासाठी करतात, हे मुलामुलींना कळत नसे. जोतीरावांचे मित्र केशवराव भवाळकर यांनी

आत्मवृत्तात लिहिले की- "माझे लग्न ठरल्याची वार्ता कानावर आली तेव्हा मी आईस माझ्या लग्नाला मला नेशील का ?" असे विचारले. जोतीरावांचे दुसरे समकालीन लोकहितवादी यांचे लग्न वयाच्या नवव्या वर्षी झाले. त्यांची पत्नी चार वर्षांची होती.

प्राथमिक शिक्षण उत्तम झाल्याने जोतीरावांना वाचनाचा नाद लागला. मळ्यात विश्रांती घेताना व रात्री झोपण्यापूर्वी मिणमिणत्या समईजवळ ते वाचत. त्यांच्या शेजाऱ्यात दोनं विद्वान होते. एकाचे नाव गफवार बेग मुन्शी, हे फारशी भाषेचे पंतोजी होते. दुसऱ्याचे नाव लिजिट्. ते ख्रिस्ती धर्मोपदेशक होते. त्यांनी जोतीला अधिक शिक्षणाची आवश्यकता असल्याचे गोविंदरावांना सांगितले. त्याप्रमाणे गोविंदरावांनी १८४१ मध्ये जोतीला एका स्कॉटिश मिशनच्या शाळेत घातले. त्यावेळी त्याचे वय चौदा होते. त्याला परीक्षेत प्रथम श्रेणीचे गुण मिळत. आपल्या विद्यार्थीकाळात जोतीने सदाशिव बल्लाळ गोवंडे यांच्याशी मैत्री जोडली. गोवंडे हे ब्राह्मण. बुधवार वाड्यातील सरकारी शाळेत जोती व गोवंडे एकत्र शिकत असताना त्यांचा स्नेह दृढ झाला. जोतीच्या मित्रमंडळीत शेजारी राहणारे मुसलमान मुलगेही होते. त्यांच्याशी हिंदुधर्म व मुसलमान धर्म यात तुलनात्मक चर्चा होत होती. त्यामुळे जातिभेद व धार्मिक श्रद्धा हे हिंदू व मुसलमान मित्रात चर्चेचा विषय झाले. स्कॉटिश मिशनच्या शाळेत जोतीला मानवी हक्क व कर्तव्यासंबंधी विचार प्राप्त झाले. शिवाजी, वॉशिंग्टन यांची चरित्रे त्यांनी वाचली. त्यामुळे वीरवृत्ती व स्वदेश प्रेम वाढीस लागले. जोती व गोवंडे यांच्या मनावर उदात्त भावना निर्माण करणारा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'राइट्स ऑफ मॅन' हा होय. हा ग्रंथ युरोप व अमेरिकेत विचारप्रवर्तक ठरला. थॉमस पेन यांचा हा ग्रंथ होय.

ध्येयसिद्धीसाठी आणि उच्चतम जीवन जगण्यासाठी शारीरिक सामर्थ्य आवश्यक असते हे लक्षात घेऊन, हे दोघे मित्र मर्दानी खेळ खेळत. दांडपट्टा, तलवार, नेमबाजी यात ते प्रवीण झाले. लहुजीबुवा मांग हे अस्पृश्य समाजातील गृहस्थ या दोघांचे या विषयातील गुरू होते. त्यांच्या हाताखाली क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी सैनिकी शिक्षण घेतले होते. जोती दांडपट्टा चालविण्यात अत्यंत कुशल ठरले. त्यांचा दांडपट्ट्याचा खेळ पाहण्याकरिता लोकांची झुंबड उडत असे. त्यांची शरीरयष्टी रेखीव, उत्तम होती. स्कॉटिश मिशन शाळेमध्ये मोरो विठ्ठल वाळवेकर आणि सखाराम परांजपे या दोन ब्राह्मण मित्रांशी जोतीची मैत्री जमली. इंग्रजी ग्रंथ समजण्याएवढ्या प्रगल्भ बुद्धीचे जोती व त्यांचे मित्र झाले होते. त्यामुळे एक नवीन विचाराचे जग त्यांच्यापुढे खुले झाले. वाळवेकरांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले की, "विद्यार्थी असताना आमची हिंदू धर्मावरील श्रद्धा उडून ख्रिस्ती धर्माकडे वळली. तथापी आम्ही सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून सार काढले, की प्रत्येक धर्मात अशी काही तत्त्वे आहेत, की ती केवळ श्रद्धेनेच मानावयाची असतात. म्हणून सर्व धर्मात काही समान तत्त्वे आहेत. त्याचेच अनुकरण करावे." या विचाराने या मित्रांचा धर्मांतराचा बेत रहित झाला. देव एक आहे; त्याची पूजा करावी; मुख्य सिद्धान्त असा की

परोपकार हे पुण्य व परपीडा हे पाप होय. ख्रिस्ती मिशन-यांनी, लोकसेवेचा आदर्श आणि सार्वत्रिक शिक्षणप्रसार करण्यासाठी परिश्रम करणे या गोष्टीवर भर दिला होता तो या मित्रांना पटला.

जोतीने १८४७ साली इंग्रजी शाळेतील अभ्यास पूर्ण केला. अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीपासून जोतीला स्फूर्ती मिळाली. त्यामुळे मानवी समता व मानवी स्वातंत्र्य ही आधुनिक मानवतावादाची मूल्ये जोतीला अस्वस्थ करू लागली. ब्रिटिशांना हिंदुस्थानातून घालवून देण्याच्या कल्पनांनी जोतीराव अगोदरच अस्वस्थ झाले. जोतीच्या विद्यार्थीदशेत महाराष्ट्रात व भारतात ब्रिटिश सत्तेविरुद्ध अनेक लहानमोठी बंडे झाली. उमाजी नाईकांचे १८२६ मध्ये; पुणे जिल्ह्यातील कोळ्यांचे १८३० मध्ये; भाऊ खरे, चिमणाजी जाधव, नाना दरबारे यांचे १८३९ ते १८४६; बापू मांगरे व राघोजी मांगरे याचे १८४८ साली, अशी बंडे उद्भवली व ब्रिटिशांनी ती यशस्वी रीतीने दडपून टाकली. आपल्या मित्रांच्या साहाय्याने ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्याचे व देश स्वतंत्र व बलवान करण्याचे ध्येय पहिल्या उमेदीत जोतीरावांच्या मनात खोलवर रुजले. "स्वातंत्र्याच्या विचारांची बीजे ब्राह्मण मित्रांनी व शिक्षकांनी आपल्या मनात पेरली," असे जोतीरावांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथात नमूद केले आहे. पेशवाई बुडाली तेव्हापासून ब्राह्मणवर्गाचा एक गट ब्रिटिशांचे राज्य उलथून टाकण्याच्याच विचाराने कायम भारला गेला. मुंबईचे ब्रिटिश गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल हे भारताच्या वरिष्ठ ब्रिटिश सत्ताधारी राज्यपालांना लिहितात- "शिक्षण, वेतन किंवा सरकारी नोकरीतील बढती इत्यादी काहीही सुविधा दिल्या, तरी चित्पावनांना मुळीच समाधान होत नाही. पश्चिम भारतातील ब्राह्मणांइतकी राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा इतरत्र आढळत नाही."

जोतीरावांनी आपले शिक्षण संपविले आणि आपला वंशपरंपरागत फुलमाळ्याचा धंदा सुरू केला. याच सुमारास जोतीच्या जीवनाला नव्या विचारांची कलाटणी मिळाली. ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्याच्या विचाराचे प्राधान्य कमी झाले. तो प्रसंग असा : एका ब्राह्मण स्नेह्याच्या लग्नाचे आमंत्रण आले. जोती त्या लग्नास गेला. नवरा मुलगा नवरीकडे वऱ्हाडी मंडळीसहित मिरवत जात होता. त्या मिरवणुकीत दुसऱ्या जातीचे लोक नव्हते. असा हा जातिभेद निरनिराळ्या प्रसंगी हिंदुंच्या निरनिराळ्या समारंभात आतापर्यंत प्रकट होत होता. काही ब्राह्मणांच्या ही गोष्ट लक्षात आली की एक ब्राह्मणेतर व्यक्ती मिरवणुकीत चालला आहे. एक गर्विष्ठ ब्राह्मण जोतीवर खेकसून म्हणाला, "अरे, तू आमच्या बरोबरीने या मिरवणुकीत कसा सामील झालास ? तू बाजूला हो." या इशाऱ्याने जोतीचा भयंकर पाणउतारा झाला. हे अपमानकारक शब्द जिव्हारी झोंबले. तो घरी परतला. वडिलांच्या कानावर त्याने ही अपमानास्पद घटना घातली. तेव्हा जोतीचे वडील म्हणाले, "अरे, ही गोष्ट मनाला लावून घेऊ नये. प्रत्येक जातीने आपापला दर्जा ओळखून वागावे." त्या काळच्या सामाजिक जीवनाचा आणि हिंदू समाजरचनेचा अर्थ जोतीरावांच्या अंतःचक्षुपुढे प्रकट

झाला. सगळे हिंदू जरी एकाच धर्माचे असले, तरी धार्मिक जीवन निर्माण करण्यात हिंदुत्व हे असमर्थ ठरले आहे. एकात्मता या हिंदुत्वाने निर्माण केली नाही. अशा तऱ्हेचे सामाजिक विषमता व उच्चनीचता जोपासणारे हे हिंदुत्व. ब्राह्मणेतर वर्गाच्या लोकांना ज्ञानाचे दरवाजे खुले झाले; परंतु या उत्कृष्ट संधीचा फायदा ब्राह्मणेतर उत्साहाने घेत नव्हते. आधुनिक शिक्षणाच्या प्रभावाखाली समाजपरिवर्तन होऊ शकेल, या विचाराने जोतीराव मात्र भारावून गेले होते.

दोन

स्त्रिया आणि शूद्र यांचे शिक्षण

जोतीरावांनी पहिला महत्त्वाचा कार्यक्रम ठरविला तो म्हणजे शिक्षण. हिंदू समाजातील स्त्रिया व शूद्र या दोघांनाही आधुनिक ज्ञान प्राप्त व्हावयास पाहिजे याची त्यांना निश्चिती झाली. त्या वेळी ब्राह्मणसुद्धा स्त्रीशिक्षणाच्या विरुद्ध होते. मुलींकरता एक शाळा काढावी असे जोतीरावांनी ठरविले. स्त्री शिक्षित झाली, तर घर हे शाळा बनते; कारण आई ही मुलांची गुरू बनते. मुलींची शाळा उघडण्याच्या विचारात असता त्यांचे परमस्नेही सदाशिवराव गोवंडे यांनी आपल्याबरोबर जोतीरावांना अहमदनगर येथे नेले. अहमदनगर हे ख्रिस्ती मिशनऱ्यांचे शिक्षण केंद्र होते. तेथे गेल्यावर गोवंडे व जोतीराव यांनी फॅरारबाईंच्या मिशन शाळेला भेट दिली. हिंदुस्थानात स्त्रीशिक्षणाकडे दुर्लक्ष होते याबद्दल फॅरारबाईंनी दुःख व्यक्त केले. प्रत्येकाने आपल्या पत्नीस शिक्षण देऊन शिक्षणप्रसारात तिने पतीला मदत करावी, अरो फॅरारबाईचे मत होते. त्याप्रमाणे जोतीराव पुण्यास परत आल्यावर त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण घ्यावयाची प्रेरणा दिली. त्या शिकल्या व कनिष्ठ वर्गातील मुलींसाठी त्यांनी शाळा उघडली. जोतीबांची शाळा बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ऑगस्ट १८४८ मध्ये सुरू झाली. जोतीरावांचे सहकारी परांजपे, हाटे व गोवंडे यांनी शाळा चालविण्यासाठी आर्थिक साहाय्य दिले. ही शाळा महार मांग चाभारादी अस्पृश्यांच्या मुलींनाही प्रवेश देत होती. सगळा हिंदू समाजच परंपरेच्या अंधश्रद्धेत जखडला गेलेला. अशा अंधश्रद्ध हिंदू नेत्यांचा एक बालेकिल्ला म्हणजे पुणे शहर. शूद्र व अतिशूद्र जातीतील स्त्रियांना शिक्षण देणारी संस्था म्हणजे या वरिष्ठ नेत्यांना भ्रष्टाचार वाटला. देव, धर्म व समाज यांच्याविरुद्ध हे वर्तन वाटले. स्त्रिया व शूद्र यांना विद्येचा अधिकार नाही, असा हिंदू धर्माचा सिद्धान्त आहे असे वरिष्ठांना वाटत होते. वास्तविक हिंदू धर्मशास्त्राने स्त्री व शूद्रांना फक्त वेद शिकण्याचा अधिकार नाकारला आहे. स्त्रिया व खालचे वर्ग यांना विद्या नाकारली नाही. पण धर्मशास्त्राने विद्या नाकारली नसली तरी त्या वर्गाच्या पुढाऱ्यांनी नाकारली. स्त्रिया

शिकल्या तर उच्चनीच जातींची समाजसंस्था डळमळीत होईल, अशी भीती ब्राह्मणांना व जातिप्रमुखांना वाटत होती. स्त्री शिकली की कुमार्गास लागून सुखाचे वाटोळे करील, असे वाटत होते. त्या वेळी स्त्रियांनी पायात पादत्राणे घालणे, छत्री वापरणे, नवऱ्याशी इतरांदेखत बोलणे, नव्या जोडप्याने वडीलधाऱ्यांदेखत गप्पा मारणे अशा तऱ्हेच्या गोष्टी होऊ देत नसत. स्त्रीने स्वतःच्या नवऱ्याच्या पंक्तीत बसणे अपमानकारक मानत. स्त्रीला शिक्षण देणे म्हणजे वेड्याच्या हाती कोलीत देण्यासारखे आहे, असे वाटे. शिक्षणाच्या योगाने कौटुंबिक जीवनात एकमेकांच्या मर्यादा पाळण्याची प्रवृत्ती राहणार नाही; सासरा व सासू यांचा अधिकार राहणार नाही असे वाटत होते. अशी ही विचारपद्धती जीवनाला बंधनाने जखडून टाकणारी होती.

जोतीबांनी बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात १८४८ च्या ऑगस्ट महिन्यात मुलींची शाळा काढली. त्यात अस्पृश्यांच्या महार-मांगांच्या मुलींनाही प्रवेश मिळाला. ही गोष्ट ब्राह्मणांनाच नव्हे; तर इतर जातींच्या पुढाऱ्यांनाही नापसंत होती. जोतीरावांचे पिता गोविंदराव फुले हे जोतीरावांच्या या कृतीने अस्वस्थ झाले. ते श्रद्धाळू होते. सामाजिक चालीरीती आणि परंपरा यांच्यातील योग्य काय व अयोग्य काय, याचा विवेक दुर्लभ होता. फुलमाळी समाजाने गोविंदरावांना हे पटविले, की जोतीराव धर्माविरुद्ध आचरण करीत आहेत; जोतीरावांनी पित्याशी वादविवाद केला; परंतु पित्याचे मन वळले नाही. गोविंदरावच म्हणाले की, "तुझा मार्ग मोकळा आहे. तू माझ्या घरात राहू नकोस. तू आपल्या बायकोला घेऊन जा." सावित्रीबाईसुद्धा जोतीरावांच्या मताची बनली होती. पतीबरोबर, वनवास भोगण्याची तयारी तिने केली होती. जोतीरावांनी पत्नीसह पित्याच्या घराला रामराम ठोकला. स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे जोतीराव हेच पहिले भारतीय होत. जोतीरावांनी काढलेली शाळा प्रथम काही काळ आवश्यक तितकी मदत न मिळाल्याने बंद पडली. आर्थिक परिस्थिती थोडी सुधारल्यावर जोतीरावांनी जुन्या गंज पेठेत गोवंडे या मित्राने दिलेल्या जागेत पुन्हा शाळा सुरू केली. शाळेत मुलींची संख्या वाढत गेली. त्या शाळेत मुलींची संख्या आणखी वाढल्यावर मोठी जागा शोधली. एका मुसलमानाची जागा शाळेसाठी भाड्याने घेतली. मेजर कँडी शाळेला पुस्तके पुरवीत. थोड्या काळात बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात ३ जुलै १८५१ रोजी जोतीरावांनी मुलींची शाळा काढली.

चिपळूणकर हे एक श्रीमंत गृहस्थ होते. त्या शाळेत विनावेतन दिवसातून चार तास जोतीराव शिकवीत असत. त्यांनी एक कार्यकारी मंडळ स्थापले. मंडळाच्या स्वाधीन ती शाळा केली. त्या मंडळात केशव शिवराम भवाळकर, अण्णा सहस्रबुद्धे, बापूरावजी मांडे, विष्णु भिडे, कृष्णशास्त्री चिपळूणकर व विष्णुशास्त्री पंडित होते. विष्णुशास्त्री पंडित पुढे विधवा विवाहांचे कैवारी म्हणून गाजले. बुधवार पेठेतील चिपळूणकरांच्या वाड्यात

शाळा सुरू झाली. त्याच्या पहिल्या दिवशी पटावर आठ मुली होत्या. त्यांची संख्या लवकरच ४८ झाली. कार्यकारी मंडळाची आर्थिक स्थिती बरी नसल्याने जोतीरावांच्या पत्नी विनावेतन अध्यापनाचे काम करू लागल्या. मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले झाल्या. जाता-येताना त्यांची थट्टामस्करी होई. म्हणून घरातून शाळेत आणण्यासाठी व परत पोचवण्यासाठी शिपायाची नेमणूक झाली. संस्थेच्या विद्यमाने जोतीरावांनी १७ सप्टेंबर १८५१ला रास्ता पेठेत दुसरी शाळा काढली व १५ मार्च १८५२ ला वेताळ पेठेत तिसरी शाळा काढली. वाचन, व्याकरण, अंकगणित, भूगोल, इतिहास, नकाशा इत्यादी विषयांचा अभ्यासक्रम ठेवला होता. विद्यालयाचे पर्यवेक्षक मेजर कँडी यांनी आपल्या वृत्तान्तात म्हटले, "मुलींची बुद्धिमत्ता व प्रगती पाहून मला फार समाधान झाले." १७ फेब्रुवारी १८५२ रोजी जोतीरावांच्या एका शाळेची परीक्षा झाली. परीक्षेनंतर भाऊसाहेब मांडे यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, "आपल्या देशातील नागरिकांना अजून स्त्रियांच्या शिक्षणाचे महत्त्व कळले नाही, याबद्दल वाईट वाटते." त्या समारंभास ब्राऊन हे न्यायाधीश उपस्थित होते. त्यांनी भाषणात इंग्रज महाकवी मिल्टनचे उद्गार सांगितले आणि म्हटले, "घरातील सुख व गृहसंस्थेची उपयुक्तता स्त्रियांच्या शिक्षणाने वृद्धिंगत होईल."

भारतातील स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणारी एक मोठी शक्ती म्हणून जोतीरावांचा लौकिक झाला. त्या काळी भारतात प्राथमिक शाळांची स्थिती मुळीच समाधानकारक नव्हती. स्थापन झालेल्या प्राथमिक शाळांना लवकरच अवकळा प्राप्त होत असे. आपल्या कार्यासाठी जोतीराव आटोकाट प्रयत्न करत. ते दानशूर व्यक्तींना भेटत, सरकारी उच्चपदस्थांची गाठ घेत असत. जोतीरावांची बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी नावाची शिक्षण मंडळी स्थापन झाली. नाना शंकरशेट हे श्रीमंत गृहस्थ, डॉ. भाऊ दाजी लाड हे विद्वान गृहस्थ हे या शिक्षणप्रसाराच्या कार्यात उत्साहाने भाग घेत. जोतीरावांनी काढलेल्या वेताळ पेठेतील शाळेत महार-मांगांची मुलेसुद्धा शिकण्यास येत. दक्षिणा पारितोषिक समितीकडे अनुदान मागण्यात आले. त्याचा सहानुभूतीने विचार झाला. मेजर कँडी हे त्या समितीचे प्रमुख होते. दक्षिणा पारितोषिक समितीकडून मासिक देणगी मिळू लागल्याने कित्येकांना आनंद झाला, कित्येक मत्सराने पछाडले गेले. जोतीरावांनी वेताळ पेठेत दोन शाळा काढल्या. एक अस्पृश्यांच्या मुलांसाठी व दुसरी मुलींसाठी. त्या शाळेत ब्राह्मण शिक्षकही शिकवण्यासाठी येत.

महार-मांग मुलींच्या शाळेतील एका १४ वर्षांच्या मुलीने निबंध लिहिला. त्यात ती म्हणते, "ब्राह्मण लोक म्हणतात, की इतर जातीने वेद वाचू नयेत. याचा अर्थ आम्हास धर्मपुस्तक नाही. मग आम्ही धर्मरहित आहोत का ? तर हे भगवान, आम्हाला आमचा धर्म कोणता ते सांग. भागवंता, आम्हावर कृपा करून येथे दयाळू इंग्रजी सरकार पाठवलेस. त्यामुळे आमचा वंशही वाढत चालला. उच्च वर्गातील लोकांचा अपराध केला असता,

इंग्रजी राज्यापूर्वी महार व मांगाचे डोके मारीत असत. गुलटेकडीच्या बाजारात फिरण्याची मोकळीक नव्हती, ती आता मिळाली.'' जोतीरावांच्या शाळेत तयार झालेली ही मुलगी. यावरून शाळेची प्रगती दिसून येते. एकोणिसाव्या शतकात भारतातील शिक्षण प्रसारांचे जे कार्य झाले, जो इतिहास घडला; त्यात राममोहन रॉय, विल्यम कॅरी, डेव्हिड हॅरी यांच्याबरोबरच जोतीरावांचा निर्देश अटळ आहे.

दादोबा पांडुरंग तर्खडकर हे त्या काळी सरकारी देशी शाळांचे पर्यवेक्षक होते. जोतीरावांनी स्थापलेल्या पहिल्या शाळेची परीक्षा १६ ऑक्टोबर १८५१ रोजी बुधवार पेठेत त्यांनी घेतली. इतक्या थोड्या अवधीत शाळेने चांगली क्रांती केली, हे त्या चालकांना भूषणावह आहे, असा त्यांनी अभिप्राय लिहून ठेवला. जोतीबाच्या एका शाळेतील १७ फेब्रुवारी १८५२ रोजी जेव्हा प्रकटपणे परीक्षा घेण्यात आली, तो समारंभ पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी जमली. स्त्रीशिक्षण आणि कनिष्ठ वर्ग यांचा कैवारी म्हणून जोतीरावांचे नाव सर्व महाराष्ट्रात गर्जू लागले. शाळा काढल्यानंतर शाळांतील विद्यार्थ्यांनी आपणासाठी वाचनालय असावे, अशी इच्छा दर्शविली. जोतीरावांनी वाचनालय स्थापण्याच्या कार्यातही यश मिळवले. वाचनालय हे शिक्षण देण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. जोतीबांच्या शाळेतील मुलांची पटसंख्या सरकारी शाळातील पटसंख्येपेक्षा दहा पटींनी मोठी झाली. हा जो आश्चर्यकारक बदल झाला याचे कारण, शिकवण्यासाठी आवश्यक असलेली उत्तम व्यवस्था जोतीरावांच्या शाळेत होती. जोतीरावांच्या गौरवार्थ विश्रामबागवाड्यात १६ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सरदार व प्रमुख लोक यांची सभा बोलावली होती. सरकारच्या वतीने जोतीबांना दोनशे रुपयाची एक शालजोडी सन्मानपूर्वक अर्पण करण्यात आली. या समारंभात बापूरावजी मांडे व पुणे महाविद्यालयाचे मुख्य पंडित मोरेश्वरशास्त्री यांनी भाषणे केली. शालजोडीने सन्मान घेण्याचा अधिकार विद्वान ब्राह्मणांचाच होय, अशी तोपर्यंत समजूत होती.

स्त्रीशिक्षणाची ही चळवळ भारताच्या सगळ्या प्रांतात त्यावेळी पसरू लागली. 'स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' ही संस्था मुंबईत स्थापन झाली. पहिले चार अध्यक्ष युरोपीय होते. एका शाळेत दादाभाई नवरोजी हे शिक्षक होते. मुंबईत या संस्थेतर्फे आठ शाळा १ ऑक्टोबर १८४९ रोजी स्थापन झाल्या. अशा शाळा सर्व जातीच्या मुलांना प्रवेश देत. इंग्रज राज्यपाल व न्यायाधीश अशा शाळांना भेटी देत असत. त्या काळच्या परिस्थितीचे वर्णन करताना लोकहितवादींनी म्हटले आहे, ''ब्राह्मणांनी युक्तीने आपल्या स्वाधीन विद्या ठेवली. इतरांस शिकवू नये, असा धर्म लावून दिला. हल्ली बहुधा सर्व रोजगार ब्राह्मणांनी बळकावले. जर कोणी शूद्र कारकून झाला, तर सर्व ब्राह्मण त्याच्याकडे डोळे वटारून पाहतात. ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत ही पवित्र भाषा शिकवण्यापेक्षा आम्ही राजीनामा देऊ, अशी ब्राह्मण पंडितांनी धमकी दिली आहे.'' तेव्हा 'ज्ञानोदय' पत्राने लिहिले की,

"ब्राह्मणांनी अशा विचित्र कल्पनेत रममाण होण्याचे दिवस गेले आहेत." गंगाधर फडके नावाचे ब्राह्मण पंडित मुंबईत १८२० ते १८२५ पर्यंत युरोपीय लोकांना संस्कृत शिकवून उदरनिर्वाह करीत. ते पुण्याचे होते. पुण्यास परत गेल्यावर त्यांच्यावर ब्राह्मणांनी बहिष्कार टाकला. नीलकंठशास्त्री भट व दुसरे पाच पंडित हे ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवण्यास तयार नव्हते तेव्हा त्यांची कमी पगारावर 'ओरिएंटल रिसर्च' मध्ये बदली करण्यात आली. धोंडोशास्त्री डेंग्वेकर, कृष्णशास्त्री राजवाडे या पंडितांनी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवले, म्हणून पुण्यातील ब्राह्मणांनी त्यांचा अत्यंत छळ केला.

जोतीरावांचे समकालीन दादोबा पांडुरंग हे सामाजिक समतेच्या विचारांचे प्रवर्तक. त्यांची बायबलवर भक्ती होती. दादोबांनी गुजराथी शिक्षकांच्या साहाय्याने १८४४ साली सुरत येथे मानवधर्मसभा स्थापन केली व त्यांनीच १८४८ साली परमहंस सभा स्थापन केली. राम बाळकृष्ण जयकर हे तिचे अध्यक्ष होते. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात परमहंस सभेची चळवळ महत्त्वाची आहे. या सभेचे सभासद शेणवी, सोनार, प्रभु, भंडारी इ. जातींचे असत. त्यांचा भरणा सरकारी कचेऱ्यांतून होता. मनुष्याचे बंधुत्व व देवाचे पितृत्व या सिद्धांतावर त्यांचा विश्वास होता. या संस्थेची वाढ झाली. तिचे हजार सभासद होते. जातिनिर्मूलन, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला चालना देणे व हिंदू धर्मात सामाजिक सुधारणांचा प्रसार करणे ही या संस्थेची उद्दिष्टये होती. या संस्थेच्या शाखा पुणे, नगर, सातारा, धारवाड, बेळगांव व कलकत्ता येथे होत्या. तिचे सभासद युरोपीयांनी केलेला पाव खात. जातीबंधने पाळीत नसत. ही संस्था १८६०च्या सुमारास बंद झाली.

जोतीराव शाळांच्या सभेच्या शेवटी प्रार्थना करीत असत. केशवराव भवाळकर यांसारख्या परमहंस सभेच्या सभासदाशी त्यांचे निकटचे संबंध होते. पुढे जोतीरावांनी आपला शिवाजीवरील पोवाडा परमहंस सभेचे अध्यक्ष राम बाळकृष्ण जयकर यांना अर्पण केला.

मुंबईत समाजसुधारकांचे नेते बाळशास्त्री जांभेकर व नाना शंकरशेट हे होते. ख्रिस्ती मिशनरी व खिश्चन धर्म यांचा प्रभाव मुंबई-पुण्यासारख्या शहरांत सर्व जातींच्या व्यक्तींवर पडत असे. नवविचाराचा, पाश्चात्य नवज्ञानाचा व ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या आक्रमक विचारांचा प्रभाव पहिल्या नवशिक्षित पिढीवर होऊ लागला. काहींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. धर्मांतर केलेल्यांना परत धर्मात घेण्याविषयी विशेष चर्चा समाजात सुरू झाली. धर्मांतराने मोठी खळबळ उडाली. धर्मांतर केलेल्यांना परत घेण्याचे प्रयत्न बाळशास्त्री जांभेकर व नाना शंकरशेट यांनी केले व ते पुष्कळ अंशी सफल झाले.

या धर्मांतराच्या मुळाशी म्हणजे पतित परिवर्तनाच्या कल्पनेशी जोतीरावांनी आपला संबंध येऊ दिला नाही. व्यक्ती कोणत्या धर्माची आहे, याकडे जोतीराव अतिशय उपेक्षेने

पहात होते, एकाच कुटुंबात हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म, मुसलमान धर्म, यहुदी धर्म पाळणारे स्त्री-पुरुष असले तरी काही बिघडत नाही, अशा मताचे ते होते.

बहुजन समाजातील शिक्षणाची चळवळ यशस्वी होण्याकडे त्यांचे सगळे लक्ष केंद्रित झाले होते. त्यामुळे त्यांच्या शाळांमधील मुलामुलींचा अभ्यास मोठ्या आस्थेने घेतला जात असे. जोतीरावांच्या शाळांची परीक्षा २१ मार्च १८५३ रोजी झाली. मोठा समारंभ झाला. अनेक कुलीन स्त्रिया व गृहस्थ उपस्थित होते. वाचन, लेखन, व्याकरण, भूगोल, इतिहास इत्यादी विषय कसोशीने या महार-मांगांच्या शाळांमध्ये शिकवले जात. लहुजी मांग व राणोजी महार या शाळेचे प्रचारक बनले. त्यांनी शाळेच्या पटावर मुलांची मोठी भरती केली. देणग्या व वर्गण्या गोळा केल्या. जोतीरावांचे काही सहकारी ब्राह्मण होते. त्यांनी धैर्याने व निःस्वार्थी बुद्धीने त्यांच्या कार्यास पाठिंबा दिला. अस्पृश्यांच्या मुलांना प्रवेश देण्याच्या बाबतीत काही शाळा संचालक कुचराई करत. सरकारच्या कायद्याने असा पक्षपात गुन्हा होता; परंतु या बाबतीत मोठी कोंडी उभारली गेली होती. सरकारने कायदा केला, पण त्यांच्या अमंलबजावणीत कुचराई होती. वरिष्ठ वर्गातील संकुचित वृत्तीचे लोक सहानुभूतिशून्य होते. पण जोतीरावांनी ही कोंडी फोडली. जोतीरावांचे मत असे होते की, कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण दिल्याने, मानवी मूलभूत हक्कांसाठी झगडण्यास ते तयार होतील. उदरनिर्वाहाचा प्रश्न जोतीरावांना भेडसावत असला तरी ते नि:स्वार्थपणे शाळांच्या कार्यात मग्न झाले होते. पत्नीने निष्ठेने साथ दिली; पण वडलांचे घर त्यांना सोडावे लागले होते.

देवाच्या नावे जे समज पसरवलेले होते व ज्या अंधश्रद्धा होत्या, त्या १८५५ साली जोतीरावांनी उजेडात आणल्पा. काही सुशिक्षित हिंदुंना या नवविचारांकरता अंधश्रद्धांना तोंड द्यावे लागले. जोतीरावांचे आचरण व शिकवणूक ही ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाला धक्का लावणारी एवढेच नव्हे, तर हिंदुधर्माच्या मुळाला जाळून टाकणारी आहे असे लक्षात येऊ लागले. यामुळे काही माथेफिरू अस्वस्थ झाले. पैसे देऊन जोतीरावांना या जगातून नाहीसे करण्याकरता मारेकरी तयार केले. पण ते मारेकरी जोतीरावांच्या घरात घुसल्यावर जोतीरावांशी बातचीत करू लागले. जोतीरावांनी त्यांना विचारले, "मला कशाकरता तुम्ही ठार मारता ? मी तुमचा काही अपराध केला काय ?"

ते मारेकरी म्हणाले, "होय. आम्हाला प्रत्येकी हजार रुपये मिळणार आहेत."

जोतीबा म्हणाले, "ठीक आहे. हे घ्या माझे डोके. तुम्ही गरीब आहात, नाहीतर असे कृत्य करण्यास तयार झाला नसता." जोतीरावांची क्षमाशील वृत्ती पाहून मारेकऱ्यांना ते देवपुरुष वाटले. ते मारेकरी जोतीरावांच्या पाया पडले, त्यांचे सेवक बनले. त्यांपैकी धोंडीराम कुंभार उत्तम शिकला व सत्यशोधक समाजाचा आधारस्तंभ बनला. त्याचे 'वेदाचार' नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. (लेखक : पंडितराव धोंडीराम नामदेव - सन १८९६)

भारतातील इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्यासाठी १० मे १८५७ रोजी मोठे बंड सुरू झाले. त्या क्रांतियुद्धाची रणक्षेत्रे महाराष्ट्राबाहेर होती; परंतु नेते महाराष्ट्रीय होते. या क्रांतियुद्धाने पेट घेण्यास कारण वेगळेच घडले. बंदुकीच्या काडतुसांना गोमातांची व डुकरांची चरबी लावण्यात येई. हिंदी सैनिकांना ख्रिस्ती करण्याचा हा डाव इंग्रज कार्यकर्ते करत आहेत, अशी भावना सैनिकांची झाली. ते असंघटित क्रांतियुद्ध इंग्रजी सैन्याच्या शिस्तीपुढे अपयशी झाले. इंग्रजांना कसाबसा जय मिळाला. जोतीरावांची मते या बाबतीत वेगळी होती. या क्रांतियुद्धाविषयी ते अत्यंत उदासीन होते. देवाने शूद्रांवर दया करून इंग्रज बहाद्दरांच्या हातून भट नानाचे बंड मोडले ते बरे झाले, असे जोतीराव म्हणाले. ते म्हणत, "इंग्रज आज आहेत, उद्या नाहीत. या लोकांचे राज्य आहे तोवर सर्व शूद्रांनी जलदी करून भटांच्या बंधनातून सुटका करून घ्यावी." इंग्रजांचे राज्य लयास जाणार या विषयी जोतीरावांची खात्री होती. पण इंग्रज राजवटीचा काळ सामाजिक सुधारणेला पोषक आहे असा त्यांना विश्वास होता. पुढे काही वर्षांनी समाजसुधारक आगरकरांनी हेच म्हटले.

महार - मांग मुलांच्या पुण्यातील शाळांची एक परीक्षा २ फेब्रुवारी, १८५८ रोजी सायंकाळी झाली. प्रतिष्ठित हिंदी व युरोपीयांचा समुदाय त्या वेळी उपस्थित होता. त्या वेळी शाळेचा वृत्तान्त वाचून दाखवण्यात आला. त्यात म्हटले आहे की- कित्येक एतद्देशीय व युरोपीय सद्गृहस्थांनी शाळांना द्यावयाची देणगी व वर्गणी थांबवल्याने संस्थेची आर्थिक स्थिती खालावली आहे. जोतीरावांना शाळागृह बांधता आले नाही; कारण सरकारने संमत केलेली रक्कम मिळाली नाही. महार-मांगांची एक शाळा सरकारी जमिनीवरच्या झोपडीत चाले. १८५९ सालच्या प्रतिवृत्तांत दिसते की सरकारी शिक्षणखात्यांच्या संचालकानी दिलेल्या दक्षिणानिधीतून पुण्यातील मुलींच्या चार शाळांना अनुदान गेले होते. शाळा १८६९ पर्यंत चालू होत्या.

तीन

सामाजिक सुधारणेचे कार्यक्रम

जोतीरावांचे लक्ष शिक्षणसंस्था स्थापल्यावर शिक्षणसंस्थापेक्षा सामाजिक सुधारणेकडे अधिक ओढले गेले. परंपरागत सामाजिक रूढींवर प्रहार करावयास त्यांनी प्रारंभ केला. त्यांच्या अगोदरच बंगालमध्ये राममोहन रॉय यांनी सतीची चाल बंद करण्यासाठी साहाय्य केले. ती चाल १८२९ मध्ये बंद झाली. त्या काळी अनेक वेडगळ व निष्ठुर रूढींनी लोकांना ग्रासले होते. परंतु लोहमार्गासारखे दळणवळणाचे नवीन मार्ग, पाश्चात्य शिक्षण व सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या यांमुळे हिंदी अंधश्रद्धांवरील आधारलेल्या चालीरीतींना धक्का बसला. एकत्र कुटुंबपद्धतीला जोराचा धक्का बसला. नोकरीच्या गावी पत्नीला घेऊन जावे असे सुशिक्षितांना वाटू लागले. मुलींनी शिक्षणास सुरवात केल्याने लग्नाचे वय वाढू लागले. मुलींच्या लग्नाच्या वयोमर्यादेचा विचार होऊ लागला. तरुण विधवांना केशवपन करावे लागे. तिने आपले पुढचे आयुष्य ब्रह्मचर्यावस्थेत कंठावे अशी अपेक्षा होती. प्राचीन काळी हजार-बाराशे वर्षांपूर्वी बालविधवांचे विवाह होत होते. त्यांच्यानंतरच्या काळात ब्राह्मण विधवांचे केशवपन करू लागले. पुढे ती चाल सर्व वरिष्ठ वर्गात पसरली. विधवांचा अमानुष छळ पाहून सरकारने १८२९ ला सतीच्या चालीला बंदी केली. विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न ब्राह्मण व तत्सम जातींशी निगडीत होता. ही त्यांची अवस्था पाहून जोतीरावांचे मन गहिवरले. त्यांनी १८६४ साली एका शेणवी विधुराचा पुनर्विवाह केला. तरुण विधवा मोहाला बळी पडत. विधवांना गुप्तपणे बाळंत होण्यासाठी व आपली मुले ठेवण्यासाठी एक बालहत्याप्रतिबंधगृह जोतीरावांनी स्थापन केले. त्यांची ही अशा स्वरूपाची पहिली संस्था होय. ब्राह्मण विधवांना भ्रूणहत्या व दुष्कीर्ती यांपासून वाचवण्यासाठी ही संस्था होती. त्याचा चांगला परिणाम म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे अशी जी अनाथ मुले जात, ती जाणे बंद झाले.

जोतीरावांचे लग्न होऊन बरीच वर्षे झाली, परंतु मूलबाळ नव्हते. त्यासाठी दुसरे लग्न करावे, असा त्यांच्या सासऱ्यानेच उपदेश केला. जोतीरावांने त्यांचे ऐकले नाही. उलट त्यांनी म्हटले की, "एखाद्या स्त्रीला पहिल्या नवऱ्यापासून मूल झाले नाही, तर तिने दुसरा नवरा करावा काय ? पुरुषाने पहिल्या पत्नीपासून मूल नाही म्हणून दुसरा विवाह करावा, ही अत्यंत निष्ठूर चाल आहे." जोतीरावांनी आपल्या वडिलांचे अंत्यसंस्कार केले, पण परंपरागत पद्धतीने केले नाहीत. त्यांनी अनाथ-अपंगांना भोजन दिले. वर्षश्राद्धाच्या दिवशी गरिबांना भोजन व विद्यार्थ्यांना पुस्तके वाटली. त्यांच्या पत्नी बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांची वात्सल्याने सेवा करीत. त्यांना स्वत:ला अपत्य नव्हते; पण विधवांनी टाकलेल्या बालकांचे त्या वात्सल्याने संगोपन करीत.

वडिलांच्या मृत्युनंतर निर्वाहासाठी वस्तुत: त्यांनी सरकारी नोकरी केली असती तर त्यात बढती मिळाली असती; पण लोकसेवा व लोकजागृती हेच कार्य त्यांनी नैतिक जबाबदारी म्हणून पत्करले. काही खाजगी उद्योग करून कुटुंबाकरता ते मिळवीत. खडकवासल्याची बांधकाम योजना सरकारने तयार केली. जोतीरावांनी त्यासाठी दगड पुरवण्याचा ठेका मिळवला. त्यांचे मित्र सखाराम परांजपे हे त्यात भागीदार झाले. उदरनिर्वाहासाठी प्रामाणिकपणे उद्योगधंदा करणे भाग पडले. दगड पुरवण्याचा सरकारशी करार केल्याने जोतीरावांचा संबंध कामगार, सरकारी अधिकारी व विशेषतः अभियंते यांच्याशी आला. कामगारांच्या हिताविषयी कळकळ बाळगणारे जोतीराव हे कामगारांच्या हितार्थ झगडू लागले. कामगारांच्या मनावर असे बिंबवण्याचा प्रयत्न केला की त्यांनी मुलांना शिक्षण द्यावे. कामगारांपुढे ते व्याख्याने देत. जोतीरावांना सरकारी नोकरीतील लबाडीचे व्यवहार दिसत असत. कामगारांना अधिकारी लुबाडतात व सरकारला ठकवतात. अशा अधिकाऱ्यांचे जोतीराव मोठे टीकाकार होते. अधिकाऱ्यांच्या दुर्गुणांवर त्यांनी हल्ले चढविले. युरोपीय अधिकाऱ्यांवरही ते कठोरपणे हल्ला करीत. त्यात केवळ ब्राह्मण समाजाचे लोक नव्हते. या ठेकेदारीच्या धंद्यात संसार चालविण्यात जोतीरावांना पुरेसा पैसा मिळाला. मग त्यांनी आणखी कामे घेतली. येरवडा पुलाच्या बांधकामासाठी चुना पुरविण्याचा ठेका घेतला. तरी ते या कामात काव्ये, ख्रिस्ती मिशनऱ्यांचे हिंदी इतिहासावरील ग्रंथ आवडीने वाचत.

१८६५ साली 'जातिभेदविवेकसार' हा खळबळ उडवणारा ग्रंथ जोतीरावांनी प्रकाशित केला. त्याचे लेखक जोतीरावाचे स्नेही तुकाराम तात्या पडवळ होत. त्याच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ग्रंथकर्त्याने म्हटले की, "हिंदुशास्त्रात जे जातिभेदाचे स्वरूप वर्णिले आहे, त्यामध्ये विपर्यस्त स्वरूपाचा जातिभेदाचा प्रकार आढळतो. तो या हिंदुजनांच्या मनास बांधून टाकतो. जातिभेदाने प्राप्त झालेल्पा नीचत्त्वापासून मुक्त करण्यापेक्षा दुसरे कार्य महत्त्वाचे नाही."

विद्या, ज्ञान व पवित्र आचरण यांचा लेश नसला तरीही ब्राह्मणांनी वंशपरपरेने श्रेष्ठत्व मिळविले. लोकांना अंकित करून आपली सर्व प्रकारे सेवा होण्यासाठी त्यास परलोकसुखाची आशा दाखवणारी पुराणे ब्राह्मणाने लिहिली, हे पडवळांनी पुस्तकात लिहिले. शूद्र जरी जितेंद्रिय वा सदाचारी असला तरी तो श्रेष्ठ नाही, या ब्राह्मणी तत्त्वाचे स्वरूप जातिभेदात आहे. सर्व जग देवांच्या स्वाधीन, ते देव मंत्राच्या स्वाधीन, ते मंत्र ब्राह्मणांच्या व ब्राह्मण हे माझे दैवत असे देव म्हणतो. पृथ्वीतील सर्व तीर्थे समुद्रात व समुद्रातील तीर्थे ब्राह्मणाच्या उजव्या पायात, अशी श्रद्धा जातिभेदाच्या श्रद्धेचा भाग होता. एवं विश्लेषणयुक्त पडवळांच्या ग्रंथांची पहिली आवृत्ती ऑगस्ट १८६१ मध्ये झाली. त्याचे प्रकाशक वासुदेव नवरंगे होते. ते सज्जन गृहस्थ होते. ते प्रथम इंग्लंडमध्ये व्यापार करीत होते. त्यांची पेढी होती. तिचे दिवाळे निघाले. परदेशी व्यापाऱ्यांचे सर्व पैसे चुकते करून ते मुंबईस आले. इथे आल्यावर प्रार्थना समाजाच्या कार्यात उत्साहाने त्यांनी भाग घेतला. १८७० साली त्यांनी एका विधवेशी लग्न केले. नवरंगेंनी जोतीरावांना मुशीच्या धंद्याची आडत लावून दिला. त्यात जोतीरावांना चांगला नफा झाला. सामाजिक समता प्रस्थापनेसाठी महाराष्ट्रात जी सामाजिक व वैचारिक चळवळ झाली त्यात पडवळांनी भाग घेतला. त्यात काही परमहंससभेचे सभासद होते. जातिभेदनिर्मूलनाखेरीज कनिष्ठ वर्गाची दु:खे नाहीशी होणार नाहीत, अशी या लोकांची खात्री होती.

आपल्या ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेत पडवळ म्हणतात, "प्रिय स्वदेशबंधूंनो, हा लहानसा ग्रंथ तुम्हास उपयोगी पडेल म्हणून सादर करतो. मुक्काम मुंबई ता. १ ऑगस्ट १८६१, आपला नम्र एक हिंदू." 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथाला जोतीरावांनी प्रकाशक म्हणून नाव मान्य केले कारण त्या ग्रंथात ब्राह्मणांनी जातिभेदाची तटंबंदी उभारून, हिंदुधर्माचे कसे तुकडे तुकडे केले, याचे वर्णन आहे. जातिभेद हा सामाजिक समता, स्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य ह्या तत्त्वांशी विसंगत म्हणून त्याचे विसर्जन होणे आवश्यक आहे, या विचाराचे महत्त्व या ग्रंथात विस्ताराने वर्णिले आहे.

बालहत्याप्रतिबंधकगृहात १८७३ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेस मुलगा झाला. सावित्रीबाईने त्या मुलाची नाळ कापली. मुलाचे नाव यशवंत ठेवले. त्याचे संगोपन सावित्रीबाईने केले. त्याला त्यांनी आपला मुलगा मानला. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत उत्साहाने भाग घेणारे सुधारक लोकहितवादी, भांडारकर, मदन श्रीकृष्ण, मामा परमानंद, तुकाराम पडवळ इत्यादीनी जोतीरावांना या कृतीसाठी विशेष धन्यवाद देऊन आदर व्यक्त केला.

१८७१ ला माधवराव रानडे जोतीबांचे चाहते बनले. जोतीरावांनी अर्भकालय चालवण्यात मिळवलेले यश पाहून रानडे व त्यांचे स्नेही लालशंकर त्रिवेदी यांनी १८७५ साली पंढरपूर येथे अर्भकालय सुरू केले. विधवाविवाहाच्या प्रश्नाला चालना देण्याचा

जोतीरावांनी आता विचार सुरू केला. विष्णुशास्त्री पंडित यांनी त्यांच्या शिक्षण संस्थेचे सभासद होऊन हातभार लावला व विधवा विवाह संबंधीचे लेख इंदुप्रकाशमध्ये प्रसिद्ध केले. २८ जानेवारी १८६६ ला पुनर्विवाहोत्तेजक संस्था विष्णुशास्त्र्यांनी काढली. तिच्या शाखा निघाल्याः पांडुरंग विनायक करमरकर व वेणुबाई यांच्या विवाहाचे आमंत्रण सात ऋषींच्या सहीने पाठवण्यात आले. त्यात समाजसुधारकांचे कैवारी गोपाळ हरि देशमुख, म. गो. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, विष्णु परशुराम इत्यादी होते. रा. विष्णुशास्त्री हे महाराष्ट्राचे ईश्वरचंद्र विद्यासागर म्हणून ओळखले जात. ते बोलघेवडे सुधारक नव्हते. करमरकर व वेणुबाई यांच्या विवाहाने महाराष्ट्रात दोन तट पडले. या प्रश्नासंबंधी मोठा विवाद झाला. पण विवाहाच्या बाजूचे बहुमत कमी पडले. प्रतिगामी व परंपरावादी हे नेहमी बहुसंख्यच असतात.

जोतीरावांनी अस्पृश्यता निवारणावरचा विश्वास आत्मकृतीने प्रकट केला. सर्वच समाज त्या वेळी परंपरेच्या बंधनात मनाने सापडला होता. त्याची पर्वा न करता १८६८ साली घराजवळील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. त्यांच्यासाठी नगरपालिकेनेही पाण्याची सोय केली नव्हती. उन्हाळयात लांबून कोसांवरून पाणी आणावे लागे. आपला हौद अस्पृश्यांसाठी खुला करून जोतीरावांनी मोठे धैर्य दाखवले. त्यामुळे त्यांच्या ज्ञातिबंधूंनी त्यांना वाळीत टाकण्याची धमकी दिली. "ते ख्रिस्ती झाले," असा प्रचार सुरू झाला. फक्त ख्रिस्ती पाद्री अस्पृश्यता विटाळ मानीत नसत. जोतीरावांच्या अंगी इतिहास घडवणाऱ्या पुरुषाचे अपार धैर्य होते. त्यांचा असा विश्वास होती की, आपल्या पाठीशी सत्य उभे आहे.

चार

ब्राह्मण आणि अस्पृश्यता यांना विरोध

जोतीराव कवी होते. कवितेला लागणारी शब्दशक्ती त्यांना वश होती. त्यांनी एक पोवाड्याचे पुस्तक प्रसिद्ध केले. त्या पोवाड्यावर 'विविध ज्ञानविस्तार' या मासिकात विरोधी अभिप्राय आला. त्यातील माहिती संशोधकांच्या दृष्टीने चुकीची वाटल्याने त्या मासिकाने जोतीरावांची निंदा केली. जोतीरावांच्या मते ब्राह्मण हेच खरे आर्य, हे आर्य बाहेरून इराणातून येथे भारतात आले; मग येथील मूळ रहिवाशांना म्हणजेच क्षत्रियांना त्यांनी विपन्नावस्थेत लोटले व शूद्र मानले. त्या काळच्या सामाजिक परिस्थितीचे हुबेहूब चित्रण त्यांच्या पुस्तकात होते. सरकारला कर शेतकऱ्यांकडून मिळे. पण सरकारी शाळांत शेतकऱ्यांची मुले जात नसत. ब्राह्मण शिक्षक राजद्रोहाचा प्रचार करीत.जोतीरावांनी आपल्या पोवाड्यात व्हिक्टोरिया राणीला प्रार्थना केली की, "ब्राह्मणांच्या छळापासून शेतकऱ्यांना वाचवावे. कारकून, शिक्षक यांची इतर जातींच्या लोकातून नेमणूक करावी." त्या काळी शिक्षणाच्या बाबतीत ब्राह्मणेतर तरुण शिक्षण घेऊन सरकारी नोकरीत जागा मिळवू लागले. जोतीरावांच्या पोवाड्याचा रोख वरिष्ठ वर्गाच्या विरुद्ध मुख्यतः ब्राह्मणांविरुद्ध होता. जोतीरावांचे या पोवाड्यातील इतिहासाचे विवरण काल्पनिक आहे. ते पुढील पिढ्यांना पटले नाही. त्यांचा पोवाडा आज उपलब्ध नाही. जोतीरावांनी शिवाजी महाराजांवर पोवाडा केला, तो १८६९ मध्ये प्रसिद्ध झाला. हा पोवाडा ४५ पृष्ठांचा आहे. पोवाडेकर्त्या जोतीरावांनी आपले स्वत:चे वर्णन कुळवाडीभूषण असे केले आहे. या पोवाड्यात जोतीराव गरजतात - शिवाजी महाराजांनी आईच्या प्रेरणेने व निर्भय, एकनिष्ठ शौर्यशाली सहकाऱ्यांच्या साहाय्याने "रोविला झेंडा हिंदूंचा." "शिवाजी महाराजांनी रामदासाला गुरू केले' असेही

जोतीराव म्हणतात व शेवटच्या कडव्यात सांगतात-

जिजाबाईचा बाळ काळ झाला यवनाचा
पोवाडा गातो शिवाजीचा
कुळवाडीभूषण पोवाडा गातो भोसल्याचा
छत्रपती शिवाजीचा.

'ब्राह्मणांचे कसब' या संज्ञेच्या काव्यसंग्रहात जोतीरावांनी म्हटले की अडाणी व देवभोळे शेतकरी भटा-भिक्षुकांच्या सांगण्याप्रमाणे आपली कौटुंबिक धार्मिक कर्मे करीत असतात. त्यात शेतकऱ्यांची पिळवणूक होते. त्या धर्मभोळेपणावर, चालीरीतींवर जोतीरावांनी त्वेषाने हल्ला केला. अलीकडे त्या चालीरीती पुष्कळ कमी झाल्या आहेत. शेतकऱ्याची बायको प्रसूत झाल्यावर भटजी त्याला धार्मिक विधी करण्यास सांगतो. त्यामुळे अपमृत्यू टळेल असे तो म्हणतो. प्रत्येक पोथीत भटाला धनलाभ असतो. सामान्य जनातील लग्ने जुळवणे व मोडणे याची किल्ली भटांच्याच हाती असते. लग्न ठरण्यापूर्वी ज्योतिष पाहिले जाते. अनिष्ट ग्रहशांती करावी लागते. मुलींची बाल्यावस्थेत लग्ने होतात. लग्नानांतर ऋतू प्राप्त झाल्यावर भटजी व इष्ट मित्रांना मेजवानी द्यावी लागते. घर बांधल्यावर गृहप्रवेशाचा समारंभ असतो. त्यात ब्राह्मणाला भोजन व दक्षिणा द्यावी लागते. सुतार, गवंडी हेही मेजवानीला निमंत्रित असतात. निरनिराळ्या ऋतूंमध्ये व निरनिराळ्या धार्मिक व सांस्कृतिक समारंभात देवाची कृपा भटजीतर्फे प्राप्त होते म्हणून पूजाअर्चा करावी लागते. शेतकरी व सामान्य माणूस आजारी पडल्यास वैद्याबरोबर भटजीचेही चालते. शिवलीलामृत, पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय यांसारखे ग्रंथ आजाऱ्याशेजारी बसून भटजी वाचतो व दक्षिणा उपटतो. घरात कोणी आजारी पडले की जपमंत्राचे पारायण, निरनिराळे होम, अभिषेक वगैरे भटजीकडून सामान्यजन करवून घेतात. कोणी मेल्यानंतर दहाबारा दिवस धार्मिक विधी चालतात. त्यात ब्राह्मणांना दक्षिणा व जातभाईंना भोजन देतात. नवीन करकरीत जोडे, छत्री, वस्तुंचे दान करावे लागते. निरनिराळ्या दानाच्या वेळेस भटजी कर्ज देतो व दस्तऐवज करून घेतो. ग्रहण, संक्रांत व श्राद्धाच्या वेळी भटजी लागतो, इत्यादी माहिती 'ब्राह्मणाचे कसब' ह्या काव्यात जोतीरावांनी सांगितली. हे काव्य त्यांनी स्वतः छापून प्रसिद्ध केले. शिक्षण खात्याकडे त्याच्या प्रती घेण्याची विनंती केली. पण असे पुस्तक वाचनासाठी कोण घेणार? आणि अभ्यासासाठी तर कोणी घेणारच नाही.

वैचारिक धक्का देण्यासाठी जोतीराव नेहमीच पुढे सरसावलेले असत. सात्विक, सौम्य असे सुधारणेचे विचार प्रसृत करणारा प्रार्थनासमाज ३१ मार्च १८६७ रोजी मुंबईत स्थापन झाला. बंगालमधील ब्राह्मण समाजाचीच ही प्रतिकृती होती. प्रार्थनासमाजच्या स्थापनेत डॉ. आत्माराम तर्खडकर, वामन आबाजी मोडक, म. गो. रानडे व रामकृष्ण गोपाळ भांडारकर ही विद्वान मंडळी होती. पहिल्यांदा सामाजिक सुधारणेच्या बाबतीत त्यांचा विचार-विनिमय

होई. परंतु नंतर धार्मिक चिंतनाकडे ते अधिक वळले. प्रार्थना समाज एकेश्वरवादी आणि त्याचे सदस्य जोतीरावांचे चाहते होते. जोतीरावांनी मात्र प्रार्थना समाजाकडे पाठ वळवली.

८ एप्रिल १८७० रोजी उदारमतवादी मंडळींनी 'सार्वजनिक सभा' स्थापन केली. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका आणि सदाशिव गोवंडे हे या सभेचे मुख्य होते. जनतेची वृत्तपत्रातून गाऱ्हाणी जाहीर करणे व सरकारकडे मांडणे हा उद्देश होता. मोरो विठ्ठल वाळवेकर आणि सखाराम यशवंत परांजपे हे जोतीरावांचे स्नेही कामधंद्याच्या निमित्ताने मुंबईस जाऊन राहिले. लोकांची गाऱ्हाणी व दुःखे सरकारपुढे मांडून ती सरकारकडून निवारण्यासाठी सार्वजनिक सभेच्या वतीने ही मंडळी प्रयत्न करीत. लॉर्ड लिटन याने वृत्तपत्रांची गळचेपी करण्यास काढलेल्या निर्बंधाविरुद्ध भारतीय वृत्तपत्रांची मोठी संघटना या मंडळीने केली. त्याबरोबर परदेशी वस्तुऐवजी स्वदेशी वस्तु वापराव्यात, अशा प्रचारास प्रारंभ केला.

सार्वजनिक सभा ही पुण्यातील पहिली राजकीय संस्था नव्हती. १८५२ सालच्या पूर्वार्धात डेक्कन असोसिएशन ही राजकीय संस्था पुण्यात स्थापन झाली. ही महाराष्ट्रातील पहिली राजकीय संस्था. आधुनिक सुशिक्षित त्यात भाग घेत व इंग्लंडातील राज्यकर्त्यांकडे लोकांची गाऱ्हाणी मांडत होते. पूना असोसिएशन नावाची दुसरी एक राजकीय संस्था पुण्यात १८६७ च्या दरम्यान स्थापण्यात आली होती. जोतीरावांच्या काळातील अशा सभांवर जोतीरावांचा काडीचाही विश्वास नव्हता. कारण त्या संस्था वरिष्ठ वर्गाच्या गाऱ्हाण्यांच्या बाबतीतच लक्ष घालताना आढळत. कनिष्ठ वर्गाची दुःखे समजावून घेऊन ती सरकारपुढे मांडण्याचे अगत्य कोणीही दाखवत नसे.

श्री. म. गो. रानडे हे मोठे विचारवंत आणि दूरदृष्टीचे नेते त्या काळी उदयास आले होते. तत्कालीन भारतीय विचारवंत व सुधारक यांचे ते अग्रणी होते. जोतीरावांच्या घरी रानडे जात येत असत व जोतीरावही त्यांचे आदरातिथ्य करीत. रानडे जोतीरावांच्या कार्याविषयी विशेष उत्साह दाखवत. ते दोघेही धर्मसुधारणा व समाजसुधारणा यांचे प्रमुख पुरस्कर्ते होते. समाजातील परंपरेला दृढ चिकटून राहण्याची प्रवृत्ती आत्मविकासाला प्रतिबंध करते म्हणून समाजाची नवीन पायावर उभारणी करणे आवश्यक आहे हे दोघांचे मत होते. जोतीरावांचे मुख्य उद्दिष्ट समाजाचा जीर्ण पाया उखडणे हे होते.

कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता, दूषित पूर्वग्रह आणि जातिविषयक दृढबंधने ही दूर करून परंपरेच्या मानसिक गुलामगिरीतून व ब्राह्मणांच्या प्रभावातून कनिष्ठ वर्गाला मुक्त करावे असा त्यांचा विचार होता. त्यासाठी त्यांनी लेखन केले व पुस्तिका लिहिल्या. १८७२ त्यांनी 'गुलामगिरी' हा आपला ग्रंथ लिहिला. त्यातील पहिल्या भागात परशुरामाला आवाहन केले. कारण ब्राह्मणनिर्मित ग्रंथांत व पुराणात तो चिरंजीव मानण्यात आला. त्याला त्यांनी लोकांसमोर पुन्हा येऊन उभे राहण्याविषयी आवाहन केले. जोतीरावांनी

आव्हान देणारे दोन जाहीरनामे प्रसिद्ध केले. ते जाहीरनामे (ब्राम्हणी धर्माच्या आडपडद्यात) 'गुलामगिरी' ग्रंथात प्रसिद्ध झाले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूलभूत मानवी मूल्यांचा म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीने जाहीर केलेल्या आदर्शांचा त्यात पुरस्कार केला आहे. अब्राहम लिंकन याने अमेरिकन गुलामगिरी १८६३ साली नष्ट केली. या थोर मानवी स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यापासून स्फूर्ती घेऊन जोतीरावांनी आपला ग्रंथ अमेरिकेतील निग्रोंना अर्पण केला.

'गुलामगिरी' या ग्रंथाचा प्रारंभ होमरच्या प्रसिद्ध वाक्याने झाला तो असा, "ज्या दिवशी मनुष्य दास होतो, त्या दिवशी त्याचा अर्धा सद्गुण जातो." हा ग्रंथ प्रश्नोत्तररूपात आहे. त्यात सोळा प्रकरणे आहेत. पहिल्या नऊ प्रकरणात भारतातील ब्राह्मणी वर्चस्वाचा इतिहास आहे. जोतीराव आत्मविश्वासपूर्वक त्यात म्हणतात- "शूद्र लोक हेच या देशाचे जीवन आहे. आर्थिक व राजकीय संकटांच्या वेळी सरकारने त्यांच्यावर अवलबूंन राहावे, ब्राह्मणांवर नव्हे. जर शूद्रांच्या मनात सुख, समाधान निर्माण केले; तर त्यांच्या निष्ठे विषयी सरकार साशंक राहणार नाही." यास्तव जोतीरावांनी सार्वजनिक शिक्षणाविषयी मागणी केली.

जोतीरावांनी जो ब्राह्मणांचा व आर्यांचा इतिहास लिहिला, तो काल्पनिक आहे ! ते संशोधक नव्हते; भाषाशास्त्रज्ञ नव्हते; परंतु सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते होते.

जोतीरावांनी 'गुलामगिरी' या ग्रंथात आपल्या ग्रंथाचे प्रयोजन सांगितले आहे ते असे की— "ब्राह्मण लोक तुम्हाला लुटून खात आहेत, हे माझ्या शूद्र बांधवांना सांगण्याच्या हेतुने मी हा प्रस्तुत ग्रंथ लिहीत आहे." अमेरिकन संस्थानातील निग्रो लोकांच्या स्वातंत्र्यासाठी जो मोठा लढा झाला, त्यापासून सामाजिक न्यायासाठी झगडण्याची स्फूर्ती जोतीरावांनी घेतली. लोकहितवादींवरही अमेरिकन स्वातंत्र्य समराचा परिणाम झालेला दिसतो. जेव्हा हिंदू स्वतःचे राज्य करण्यास पात्र होतील, तेव्हा ब्रिटिशांनी त्यांना सत्ता दिली नाही तर, जसे अमेरिकेत घडले तसे हिंदुस्थानात घडेल, असे त्यांनी भाकीत केले होते. अमेरिकेच्या स्वातंत्र्य समराचा व गुलामगिरी नष्ट करण्याच्या जाहीरनाम्याचा जोतीरावांच्या पिढीवर फार मोठा परिणाम झाला होता.

'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून झाल्यावर जोतीरावांनी सार्वजनिक चळवळीस आरंभ करण्याचा निर्धार केला. ग्रंथ पुरा होण्यापूर्वी जाहीर सभा, पत्रके व पुस्तिका याद्वारे ते आपले विचार व्यक्त करीत होत. आपली चळवळ संघटित करून आपला संदेश सर्व ठिकाणी पोचवावा, अशा निर्धाराने व ध्येयाने त्यांनी सत्यशोधक समाज स्थापला. समाजसुधारणेची महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ. या समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून जोतिराव ठरले. नारायणराव गोविंदराव कडलग यांची कार्यवाह म्हणून निवड झाली. शूद्रांना व अतिशूद्रांना नागरी हक्क जाणीव व अधिकारांची शिकवणूक व ब्राह्मणी शास्त्रांच्या धार्मिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्तता हे सत्यशोधकाचे ध्येय होते. या समाजाचे सभासद होताना शपथ घ्यावी लागे. खंडेराव या दैवतापुढे बेलपत्र उचलावे लागे. इंग्रज सत्तेशी निष्ठेने

वागेन, अशी शपथ घ्यावी लागे. सत्यशोधक समाजानंतर बत्तीस वर्षांनी स्थापन झालेल्या गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजाने ब्रिटिशांचा हिंदुस्थानशी आलेला संबंध हा देवाच्या अतर्क्य कृपेमुळे आला असे मानले. त्या काळी शहरातील पाश्चात्य शिक्षण घेतलेले मूठभर लोक राजकीयदृष्ट्या विचार करीत. १९११ साली सत्यशोधक समाजाचे ठराव प्रसिद्ध झाले. त्यात सत्यशोधक समाजप्रणीत महत्त्वाची तीन तत्त्वे सांगितली आहेत. ती अशी: "(अ) सर्व माणसे एकाच देवांची लेकरे आहेत. (ब) आईला भेटण्यास वा बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थाची गरज नसते, त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित वा गुरूची आवश्यकता नाही. सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहेत, सबब माझी भावंडे आहेत अशा बुद्धीने मी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती वा ध्यानधारणा करतेवेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. दुसऱ्यांनाही तसेच वागवण्याबद्दल उपदेश करीन. आणि (क) मुलामुलींना सुशिक्षित करीन. परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करतो. या प्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल अशा प्रकारे आयुष्यक्रम गुदरण्यास परमेश्वर सामर्थ्य देवो."

'समाजाचे' सभासदत्व सर्व जातीतील लोकांना मोकळे होते. ब्राह्मण, महार, मांग इ. त्या आरंभी समाजाचे सभासद होते. ज्या ठिकाणी समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या तेथे दर आठवड्यात सभा होत. पुण्यात सोमवार पेठेत डॉ. गावडे यांच्याकडे सभा होई. तेथे दारूबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तु वापरणे, ब्राह्मणांची पुरोहितगिरी झुगारून देणे, लग्न अल्प खर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भुते, समंध यांच्या भीतीपासून लोकांना मुक्त करणे इ. वर चर्चा होई. परमेश्वराचे जनकत्व व मनुष्याचे बंधुत्व यावर भर देण्यात येई.

प्रार्थना समाज व ब्राह्मोसमाज हे एकेश्वरी पंथ होते. तसा सत्यशोधक समाजही होता. या तिन्ही संस्थांच्या मते सर्व मानव एकाच देवाची बालके होत. या तिन्ही संस्था दर आठवड्यास सांघिक प्रार्थना व सभा घेत. राममोहन रॉय यांनी ब्रह्मतत्त्व घेतले. प्रार्थना समाजाने प्रार्थना व जोतीरावांनी सत्य तत्त्व घेऊन कार्याचा पुरस्कार केला. यानंतर दोन वर्षांनी दयानंद सरस्वतींनी आर्य तत्त्वाचा पुरस्कार केला. ब्राह्म व प्रार्थना समाजवादी आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रार्थना करीत. जोतीरावांचा भर प्रार्थनेवर वा आध्यात्मिक उन्नतीवर नव्हता.

जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाचा जातिव्यवस्थेवर तसाच चातुर्वण्यावरही विश्वास नव्हता. आवश्यक असे धार्मिक विधी ठेवून मध्यस्थाची उचलबांगडी त्याने केली. ब्राह्म समाजही जातिभेद पाळत नसे. प्रार्थना समाजाची तत्त्वे एकूण ब्राह्म समाजासारखी होती. या तिन्ही समाजांनी मूर्तिपूजा त्याज्य ठरवली होती. ब्राह्म समाजात ब्राह्मणानेच प्रार्थना सांगण्यांचा प्रथम अलिखित नियम होता. त्या मक्तेदारीला केशवचंद्र सेन यांनी धक्का दिला. ते उत्साही व पक्के सुधारणावादी होते. त्यांनी ब्राह्म समाजाला ब्राह्मणी चिन्हांपासून मुक्त केले. म्हणजे यज्ञोपवीतादींचा त्याग केला.

१८६७च्या जून महिन्यात भिकोबा दादा चव्हाण या भंडारी शिक्षकाने मुंबईतील प्रार्थना समाजात पुरोहित म्हणून काम केले. ते साधे व धार्मिक होते. प्रार्थना समाज, आर्य समाज व सत्यशोधक समाज या तिन्ही समाजांनी एक मोठी ऐतिहासिक कामगिरी केली. त्या काळी हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती वाढू लागली होती. तिला आळा पाडला.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यावर त्याची ध्येये व उद्दिष्टे कृतीत उतरवण्यासाठी जोतीरावांनी प्रत्यक्ष कृतीस आरंभ केला. विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवले व दहा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. याविषयी ब्राह्मणेतर लोकांनी त्यांची प्रशंसा केली. जोतीराव ब्राह्मणांना बोलावल्याशिवाय अनेकांची लग्ने लावू लागले. हे विवाह सत्यशोधक समाजाच्या वतीने होत. वधुवरांना एकमेकांशी निष्ठेने वागण्याच्या शपथा द्यावयाच्या व वऱ्हाडी मंडळींनी वधुवरांना एका सुरात आशीर्वाद द्यायचा. ब्राह्मण भिक्षुकाशिवायुं हिंदू विवाह सुरू झाला ही एक आश्चर्यकारक घटना झाली. अशा तऱ्हेचा दुसरा विवाह ग्यानोबा ससाणे या मित्राचा केला. त्याबाबतीत फार धावपळ करावी लागली. या विवाहाने फार खळबळ उडाली. अनेक वृत्तपत्रात "ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू विवाह" असा मथळा आला. कृष्णराव पांडुरंग भालेकर (१८५०-१९१०) हे त्या काळचे जोतीरावांच्या पद्धतीने विचार करणारे धीट तरुण पुढारी. ते जातीने फुलमाळी होते. ते सत्यशोधक समाजाच्या चळवळीत सामील झाले व कडवे निर्भय नेते बनले. ते कवी, संपादक व उत्तम वक्ते होते. त्यामुळे या समाजाचा प्रभाव अनेक गावात पसरू लागला व सभासदांची संख्या वाढली. या समाजाच्या कार्यासाठी मुंबईस गेले असता व्यंकू बाळाजी कालेवार व जाया कराडी लिंगू हे त्यांचे भक्त बनले. नरसू सायबू या ठेकेदाराने समाजाला मदत करण्याचे ठरवले. कामाठीपुऱ्यात राहणाऱ्या व्यंकू बाळाजी काळेवार याने समाजास सुमारे बाराशे रुपयांचा कारखाना देणगी म्हणून दिला. कनिष्ठ जातीतील श्रीमंत व वजनदार लोक त्यांच्या ध्वजाखाली गोळा झाले.

पोलसानी राजण्णा लिंगू हे त्या काळी असेच वजनदार गृहस्थ होते. ते तेलुगू माळी समाजातील होते. मुंबईत तेलुगू समाजातील माळी लोकांना कामाठी म्हणतात. व्यंकप्पा अय्यावारू नावाचे दुसरे वजनदार गृहस्थ सत्यशोधक समाजात सामील झाले. पुण्यातील सुप्रसिद्ध धनाढ्य गृहस्थ रामशेट बापूशेट उरवणे हे जोतीरावांना येऊन मिळाले. डॉ. अण्णा नवले यांचे सहाय्यक मारुतराव नवले हे समाजाचे मोठे आधारस्तंभ झाले. या सर्व समाजाच्या चळवळीतील मदतगारांत डॉ. विश्रामजी घोले हे फार महत्वाचे ठरले. ते त्या वेळच्या व्हाइसरॉयचे मानसेवी चिकित्सक म्हणून नेमले गेले होते.

सत्यशोधक समाजाचा पहिला वार्षिक समारंभ थाटाने साजरा करण्यात आला. नारायण तुकाराम नगरकर यांची कार्यवाह म्हणून निवड झाली. भालेकर व उरवणे यांची

कार्यकारी मंडळावर निवड झाली. त्यात रामचंद्रराव धामणसकर, संतूजी रामजी लाड व नारायण मेघाजी लोखंडे प्रगुख होते. नारायण लोखंडे हे कामगार चळवळीचे संघटक बनले. ते कामगार चळवळीचे आद्य जनक झाले. संतूजी लाड (१८४१-१९१६रोजी) हे धनगर समाजातील आधुनिक काळातील पहिले थोर पुरुष होत.

सत्यशोधक समाजाच्या कार्याने आणि चळवळीने अनेक विचारवंतांचे लक्ष वेधून घेऊन त्यांना कार्यतत्पर केले. परंतु धडाडीने सुधारणेचा कार्यक्रम अमंलात आणणारे सुशिक्षित विरळ होते. सुशिक्षितांचे अग्रणी महादेवराव रानडे भित्रे व पडखाऊ ठरले. त्यांची बहीण विधवा झाली. त्यावर रानडे म्हणाले, "जर विधवा बहिणीचा पुनर्विवाह केला, तर माझ्या वडिलांना अपार दु:ख होईल व पुण्यातील ब्राह्मण माझ्यावर बहिष्कार टाकतील." त्यावर जोतीराव म्हणाले, "मग सुधारक म्हणून मिरवू नका." १८७३ च्या ऑक्टोबरात रानड्यांची प्रथम पत्नी वारली. तिच्या निधनानंतर वयाच्या बत्तिसाव्या वर्षी एका बारा वर्षाच्या मुलीशी रानड्यांनी विवाह केला. या देशातील व महाराष्ट्रातील सुधारक मंडळी या घटनेने खजील झाली. जोतीरावांनी रानडे यांची खरडपट्टी काढली. 'विविधज्ञानविस्तारा'त रानड्यांवर घणाघाती लेख आला. दुसरे मोठे समाजसुधारक लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांनीही पुराणमतवाद्यांना शरण जाऊन प्रायश्चित घेतले, कारण त्यांनी आपला मुलगा इंग्लंडला पाठवून धर्मबाह्य वर्तन केले, असा त्यांच्यावर ठपका आला होता. धर्मशास्त्रात समुद्रपर्यटन निषिद्ध मानले आहे. अशी ही लोकहितवादींसारख्या अनेक सुधारकांची घसरगुंडी होत होती. 'बोले तैसा चाले' असे सुधारक थोडे होते. परंतु काहींची नावे 'उक्ती तशी कृती करणारे' म्हणून समाज सुधारणेच्या इतिहासात नोंदण्यासारखी दिसतात. उदा. वासुदेव नवरंगे, सदाशिव पांडुरंग केळकर; विष्णुशास्त्री पंडित हे विद्वान चारित्र्यसंपन्न होते. १८७४ डिसेंबरमध्ये पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी पुनर्विवाह केला.

महादेवराव रानडे यांच्या आमंत्रणावरून दयानंद सरस्वती जुलै १८७५ मध्ये मुंबईहून पुण्यास गेले होते. त्यांनी मुंबईस आर्य समाजाची स्थापना केली. या द्रष्ट्या पुरुषाने उत्तर हिंदुस्थान व बंगालमध्ये विजयी दौरे काढले. अनेक संस्था व व्यक्तींवर त्यांची छाप पडली. सुधारकांना न मानवणारा दयानंद सरस्वतींचा एकच सिद्धांत होता. तो असा की 'वेदात सर्व काही ज्ञान आहे, पण वेदात जातिभेद सांगितलेला नाही.' जातिभेदाची बंधने महाराष्ट्रात अधिक कसोशीने त्यावेळी पाळत होते. त्यामुळे दयानंदांचा आर्य समाज महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोचला नाही. पुण्यात दयानंदांची अनेक व्याख्याने झाली. नंतर ते सातारलाही गेले. व्याख्याने झाल्यावर पुण्यात दयानंदांची समारंभपूर्वक मिरवणूक निघाली. ती मिरवणूक पुराणमतवादी मंडळीनी उधळून लावण्याचा प्रयत्न केला. सुधारकांनी जोतीरावांचे साहाय्य घेतले होते. सुशोभित केलेल्या हत्तीवर दयानंदांना बसवण्यात आले. पालखीत पवित्र ग्रंथ ठेवण्यात आले. ताशे, वाजंत्री, शंख मिरवणुकीच्या अग्रभागी वाजत होती. जोतीरावांनी

त्या मिरवणुकीत भाग घेतला होतो. अनुयायांसह जोतीराव, रानडे व इतर समाजसुधारक मिरवणुकीत सामील झाले होते. बहुजन समाजातील लोक मिरवणुकीत सामील झाले होते. पुण्यातील पुराणमतवाद्यांनी व गुंडांनी एक गाढव शृंगारून त्याची मिरवणूक काढली. दयानंदांच्या मिरवणुकीबरोबर ती मिरवणूक निघाली व मारामारी सुरू झाली. पण पोलिस बंदोबस्तामुळे लोकांची पांगापांग झाली. दयानंद सरस्वतींचे जीवितकार्य आणि धार्मिक तत्त्वज्ञान विशाल होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी या मिरवणुकीची थट्टा केली, कारण त्यांना समाजसुधारणेच्या प्रश्नाचे आकलनच झाले नव्हते.

मध्यंतरीच्या काळात रामचंद्र हरी शिंदे व कृष्णराव भालेकर यांच्या सहकार्याने जोतीरावांनी पुण्यात 'पूना कमर्शियल अँड कन्स्ट्रक्टिंग' ही कंपनी काढली. या कंपनीने पुण्याजवळील खडकवासला कालव्याच्या उजव्या बाजूच्या कामाला दगड पुरवण्याचा ठेका मिळवला. यात त्यांना बराच नफा झाला.

१८७५ साली सत्यशोधक समाजाचा दुसरा वार्षिक समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षपद रामशेट उरवणे यांना दिले गेले. इलय्या सालोमन नावाच्या ज्यूला कार्यकारी मंडळाचा सभासद करून घेतले. या समाजाचे सभासद प्रत्येक रविवारी संध्याकाळी जमत. प्रत्येक पंधरवड्यात एका शनिवारी तत्त्वविषयक व्याख्याने दिली जात. भाषणे करण्याचे कार्यकर्त्यांना वळण लावत. त्याच वर्षी नोव्हेंबर महिन्यात इंग्लंडच्या राजपुत्राने पुण्यास भेट दिली. त्या वेळी सत्यशोधक समाजाच्या एका सभेत धोंडीराम कुंभार व कृष्णराव भालेकर यांनी राजपुत्राच्या सन्मानार्थ गीते गायली. सत्यशोधक समाजात भट - पुरोहितावाचून लग्ने लावीत. ती कायदेशीर होत, असा ज्या वकिलांनी सल्ला दिला, त्यांचे नाव राघवेंद्र राव. सत्यशोधक समाजातर्फे अनेक निबंधस्पर्धा घेतल्या जात. त्यात पहिला विषय 'मूर्तिपूजा उपयुक्त आहे काय ?' व दुसरा विषय 'जातिभेद आवश्यक आहे का ?' स्पर्धकांना बक्षिसे वाटत. ग्रामीण शिक्षण प्रसाराकरता समाजाचे कार्यकर्ते प्रयत्न करत. त्यांनी हडपसरला एक शाळा काढली. हडपसर हे समाजाचे मोठे केंद्र बनले. सत्यशोधक समाजाने चालवलेल्या शिक्षणाच्या प्रसार कार्यासाठी अनेकांनी साहाय्य केले. समाजाच्या सभासदांची संख्या तीनशेपर्यंत गेली. पुणे नगरपालिकेच्या मंडळावर कनिष्ठ वर्गाचे प्रतिनिधी नसल्याने त्यांच्या गाऱ्हाण्यांकडे नगरपालिका लक्ष देत नाही, ही गोष्ट जोतीरावांनी समाजाच्या १८७६च्या वार्षिक वृत्तांत नोंदली. वृत्तपत्राकडे, प्रमुख मासिके व नियतकालिकांकडे हा वृत्तांत पाठवला. सत्यशोधक समाजाच्या वृत्तान्तावर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'निबंधमाले'त खरमरीत टीका केली आहे. हिंदू धर्मावर, परंपरेवर, संस्कृतीवर टीका करणाऱ्यांवर चिपळूणकर त्वेषाने तुटून पडत. चिपळूणकरांना या देशातील लोकांचे गेलेल राज्य मिळवायचे होते. उलट सुधारकांना सामाजिक समता, न्याय, वैज्ञानिक दृष्टिकोण यांवर आधारलेले स्वराज्य मिळवायचे होते. ब्राह्म समाज, प्रार्थना समाज, आर्य

समाज व सत्यशोधक समाज यांवर चिपळूणकरांनी प्रखर टीका केली. लोकहितवादींवर एक वर्षभर त्यांनी टीकास्त्र चालू ठेवले. चिपळूणकरांचे भाषेवर प्रभुत्व होते. परंतु सामाजिक विकासाची दृष्टी नव्हती. त्यामुळे जोतीरावांच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रश्नाला ते हात घालू शकले नाहीत. चिपळूणकरांच्या लक्षात आले नाही की, त्यांच्या विचारांना भविष्यकाळाची साथ मिळणार नाही. त्यांना वाटले की, सत्यशोधक समाज ही तात्पुरती प्रतिक्रिया आहे. वरिष्ठ जातीच्या प्रभावाचा काळ संपत आला आहे हे त्यांना कळले नाही. जोतीरावांवर टीका करताना ते म्हणतात, "ब्राह्मण कितीही लबाड व दुष्ट असले तरी ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कमरेस आहेत. त्यांच्या साहाय्याशिवाय इतर जातींना ज्ञानाचा लाभ शक्य नाही." ते 'समाजा' बद्दल म्हणतात, "जोतिबांचा समाज अद्याप बाल्यावस्थेत आहे. एकीकडे हडपसर व दुसरीकडे भांबुर्डे या त्यांच्या सीमा होत. असल्या क्षुद्र समाजावर हत्यार उचलण्यास आम्हास उत्साह नाही. स्वामींच्या समाजाप्रमाणे या समाजाचा जेव्हा विस्तार होईल व जोतीरावांचा पुतळा अग्रभागी शुभ्रयशाचा स्मारक म्हणून स्थापला जाईल, तेव्हा त्यांचा विचार करता येईल." जोतीरावांचा भविष्यकाळ चिपळूणकरांनी जसा रेखला, तसाच तो खरा ठरला आहे. जोतीरावांचे शुभ्र यश आता दशदिशेला पसरले आहे. चिपळूणकरांच्या ठायी सामाजिक परिवर्तनाची दृष्टी नव्हती. समता व बंधुभाव ही आधुनिक मूल्ये त्यांना ग्रहण झाली नाहीत. चिपळूणकरांनी समाज सुधारकांवर व विशेषतः सत्यशोधक समाजावर कठोरपणे हल्ला केल्याने महाराष्ट्रातील स्वातंत्र्याची चळवळ वाढत असताना, बहुजनसमाजाचे नेते या चळवळीपासून अलिप्त राहिले. १९३० मध्ये महात्मा गांधींनी काँग्रेसचे स्वरूप शेतकरी व अस्पृश्यांना पोषक ठरविल्याने, जोतीरावांचे बहुजनसमाजातील अनुयायी काँग्रेसचे काम करू लागले.

पाच

शेतकरी आणि कामगार यांसाठी लढा

१८७७ सालच्या पूर्वार्धात सत्यशोधक समाजाच्या अनुयायांना बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक दृष्टीकोन प्राप्त व्हावा म्हणून, विचारप्रवर्तक व्याख्याने पुणे येथे वेताळ पेठेतील सत्यशोधक समाजगृहात देण्यात आली. चंद्र-सूर्य ग्रहणासंबंधी लोकांचे अंधश्रद्धामय ग्रह नष्ट करण्याकरता ही व्याख्याने झाली. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या प्रश्नावरही व्याख्यान सुरू झाले. निबंध-स्पर्धा व भाषणे यासाठी पारितोषिके होती. वक्तृत्वस्पर्धेसाठी जे विषय ठेवले जात, त्याचा सामाजिक परिवर्तनाशी व बहुजनसमाजाच्या हिताशी जिव्हाळ्याचा संबंध लक्षात घेतलेला दिसतो. १८७७ मध्ये जोतीरावांनी सभासदांना एक निवेदन पाठवले. 'समाजा' चे मार्फत व्हिक्टोरिया बालाश्रम स्थापन केला आहे, असे त्या निवेदनात म्हटले. दुष्काळाच्या या दिवसांमध्ये दुष्काळपीडित लोक कुटुंबपोषण करण्यात असमर्थ झाल्याने, मुलांना सोडून जात. मध्यम प्रतीच्या इंदापूर, मिरज, तासगाव यासारख्या गावांमध्ये दुष्काळपीडित मुले मोठ्या प्रमाणात जमू लागली. त्यांना उपास पडले होते, वस्त्रे नव्हती ही गोष्ट जोतीरावांनी निवेदनात सांगितली. १८६० सालापासून दुष्काळ पडत होते. १८७५ साली अहमदाबाद, पुणे, सातारा, सोलापूर इत्यादी ठिकाणी शेतकऱ्यांनी बंडे केली. शेतकरी व सावकार यांचे संबंध बिघडल्याने हे दंगे झाले. भवितव्य कठीण दिसू लागले. सावकार लोक शेतकऱ्यांना कर्ज देताना दिलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेचा दस्ताऐवज करून घेत. ही ठकबाजी लोकांनी पचू दिली नाही. अनेक वेळा ओरड केली. सरकारने चौकशी मंडळ नेमले. या मंडळाच्या सूचनेप्रमाणे डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट सरकारने संमत केला. सावकार व शेतकरी यांचे संबंध सुधारावे या उद्देशाने या ॲक्टमध्ये अनेक निर्बंध घातले. खतपत्रे प्रामाणिक असावी, शेतकऱ्यांच्या हक्काचे रक्षण व्हावे याकरता तरतुदी होत्या. जोतीरांवांचे 'दीनबंधू' नावाचे साप्ताहिक होते. त्याने हे निर्बंध उचलून धरले. शेतकऱ्यांच्या जमिनीस सावकाराने धक्का लावू नये, असे निर्बंध सरकारने घातले होते.

अशिक्षितपणा व अज्ञान यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होई. अवर्षण वा योग्य वेळी पाऊस न पडणे ही गोष्ट कोणत्या वर्षी घडेल हे सांगता येत नव्हते. महाराष्ट्रात अनेकवार दुष्काळाने कहर उडविला. जोतीरावांनी दुष्काळपीडितांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. अनेक लहान मुलांचे भूकबळी पडत. धनकवडी कँपमध्ये जोतीरावांनी दोन हजार मुलांची सोय केली. दोन ते बारा वयाच्या मुलांना रोज भाकरी देण्यात येई. उरवणे, हरि रावजी चिपळूणकर व पुणे नगरपालिकेचे मुख्य अधिकारी सिनप्पा यांनी साहाय्य केले. १८७९च्या अखेरपर्यंत हे काम चालू होते.

१८७८च्या फेब्रुवारीत जोतीरावांनी निबंधाची स्पर्धा जाहीर केली. निबंधाचा विषय मजेदार होता. "ज्या शूद्र समाजाने शिवाजी महाराज, शिंदे, होळकर, गायकवाड यासारखे राजे निर्माण केले, तो समाज इतका हतबल झाला की, तो केवळ ब्राह्मणांच्या वस्त्रांचीच निगा राखतो, असे नव्हे, तर त्यांच्या स्त्रियांच्या वस्त्रांचीही निगा राखतो. उलट ब्राह्मण दारिद्र्याने कितीही गांजला, तरी असले हीन दर्जाचे काम स्वीकारवयास तयार होत नाही."

जोतीरावांच्या पूना कमर्शिअल ॲंड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनीने दगड पुरवण्याचे काम घेतले होते. परंतु त्यांचे सहकारी रामशेट उरवणे, दीनबंधूकार कृष्णराव भालेकर व शिंदे यांनी त्यांच्या कंपनीची भागीदारी काही काळाने सोडली. जोतीरावांनी ग्यानोबा ससाणे यांना आपल्या धंद्यात येऊन मिळण्याचा आग्रह केला. ग्यानोबांनी सरकारी नोकरी सोडली व ते जोतीरावांना येऊन मिळाले. ग्यानोबांना मोडी, मराठी लिहिता येत असे. ते वक्तशीर व मेहनती होते.

पुणे नगरपालिकेच्या कामकाजात जोतीराव अत्यंत उत्साहाने भाग घेत. सभासदांच्या हक्कांविषयी जोतीराव अत्यंत जागरूक असत. डॉ. घोले व जोतीराव फुले यांचे नगरपालिकेवर विशेष वजन होते.

त्या काळी पुणे शहर एका मोठ्या वादळात सापडले होते. वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड केले. लहुजी मांग यांच्याकडे फडकेंनी १८४७ साली सैनिकी शिक्षण घेतले. १८७९पर्यंत सर्व महाराष्ट्र या बंडाने हलवून सोडला. देशी व परदेशी वृत्तपत्रे त्या बातमीने थरारली. वासुदेव फडक्यांवर खटला होऊन त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. १७ फेब्रुवारी १८८३ ला एडन येथील तुरुंगात त्यांचा मृत्यू झाला.

फडक्यांच्या सैनिकांना जोतीरावांनी भाकऱ्या पुरवल्या असे लोक म्हणत, पण जोतीरावांनी सार्वजनिक धर्मपुस्तकात फडक्यांचा उल्लेख तिरस्काराने केला आहे. चिपळूणकरांनी त्यांना दरोडेखोर तर रानड्यांनी त्यांना माथेफिरू देशभक्त म्हटले. फडके व जोतीराव यांनी एकाच गुरूपाशी लष्करी शिक्षण घेतले. त्या दोघांचा दाट परिचय होता.

सक्तीचे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सरकारने सुरू करावे अशी मागणी 'दीनबंधू' मधून १८७९ च्या शेवटी जोतीरावांनी सतत सुरू केली. सरकारने, १८७० मध्ये इंग्लंडमध्ये अशा

प्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या. त्याचा प्रतिध्वनी हिंदुस्थानात उठत राहिला. जोतीरावांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी सतत सुरू केली; पण त्याला सरकारकडून प्रतिसाद मिळाला नाही. १८९० साली स्कॉटलंडमध्ये व १८८९मध्ये आयर्लंडमध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले.

खडकवासला येथील कालव्याचे काम झाल्यावर पाणी शेतीसाठी खुले करण्यात आले. शेतकरी त्या पाण्याचा उपयोग करण्यास उत्सुक नव्हते. शेतकऱ्यांना अज्ञानामुळे खत, बियाणे पुरवावे म्हणून जोतीबा मागणी करू लागले. पुण्याजवळील मांजरी येथे जोतीरावांनी आंबराई लावली. जोतीराव नवीन प्रयोगांकडे आकर्षिले जात.

नारायणराव लोखंडे यांचा जन्म ठाणे येथे १८४८ साली झाला. माध्यमिक शिक्षण झाल्यावर त्यांनी काही काळ रेल्वे खात्यात व नंतर टपाल खात्यात कारकुनाची नोकरी केली व तीही सोडून मांडवी येथे नंतर कापडगिरणीत ते काम करू लागले. कामगारांच्या अडचणी व कष्ट यांचा त्यांनी अभ्यास केला. जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली गिरणी कामगारांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांचे नेतृत्व ते करू लागले. मुंबईत ७ जुलै १८५४ रोजी स्पिनिंग अँड विव्हिंग ही पहिली कंपनी कावसजी दादर या पारशी गृहस्थाने स्थापन केली. काही आठवड्यानंतर माणिकजी पेटिट यांनीही एक गिरणी काढली. अशा रीतीने हा धंदा वाढू लागला. सोराबजी शापूरजी बंगाली हे विद्धान व समाजसुधारक होते. ते गिरणी कामगारांच्या बाजूने मालकांची सहानुभूती जागृत करण्याचा प्रयत्न करत. मार्च १८७५ मध्ये कामगारांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सरकारने मंडळ नेमले. त्यांचे सर्व प्रमुख सभासद गिरणीमालक होते. बाल्यावस्थेत असलेल्या कापडधंद्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादू नयेत असे त्यांचे मत पडले. लहान मुलांना दिवसभर कष्टाची कामे पडत. स्त्रियांना दिवसभर राबावे लागे. या गोष्टीची या मंडळाने दखल घेतली नाही. यावेळी हिंदुस्थानात एकंदर त्रेपन्न गिरण्या होत्या.

'दीनबंधू'चे संपादक जोतीराव झाले. लोखंड्यांनी दीनबंधूतून कामगार प्रश्नाला वाचा फोडली. पण गिरणीमालकांच्या मंडळाला ते विरोध करीत नसत. लोखंड्यांनी पुढे गिरणी कामगारांच्या चळवळीचे कार्य हाती घेतले आणि भालेकरांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले.

दिवसाचे चौदा तास कामगारांना हाडाची काडे करून काम करावे लागे. 'दीनबंधू'त या गोष्टीला महत्त्व दिले गेले. कामगारांना एकाच स्थितीत अनेक तास काम करावे लागते ही गोष्ट वारंवार सांगण्यात आली. पण कामगारांना आळीपाळीने मोकळ्या हवेत आम्ही सोडतो असे गिरणीमालक म्हणत. त्यावर 'दीनबंधू' ने उत्तर दिले, कामगारांना गिरणीच्या बाहेर आल्यास प्रत्येकी चार आणे दंड होतो. विश्रांती मिळत नाही. लहान मुले गिरण्यात सर्व वेळ काम करतात. हे सर्व तपासण्यासाठी १८७५ साली सरकारने मंडळ नेमले. पण त्या मंडळाने हे सर्व अमान्य केले.

'दीनबंधू' हे एकच नियतकालिक कामगारांच्या प्रश्नावर लढत राहिले होत. विष्णूशास्त्री चिपळूणकरसारख्यांनाही समाजातील कष्ट सोसणाऱ्यांची बाजू लक्षातच आली नाही. 'दीनबंधू' हे कामगारांचे भारतातील पहिले वृत्तपत्र होय. त्या काळी मुंबईतील कामगार बहुतेक सर्व मराठी भाषक होते.

नारायण लोखंडे हिंदुस्थानातील कामगार संघटनेचे आद्य जनक. त्यांनी १८८०च्या प्रारंभी 'मिल हँड असो. सोसायटी' स्थापन केली. ती भारतातील कामगारांची पहिली संस्था. लोखंडे तिचे अध्यक्ष होते. गिरणी मालकांनी तिला विरोध केला नाही. फॅक्टरी कमिशन नावाचे मंडळ सरकारने कामगारांची परिस्थिती पाहण्यासाठी नेमले. त्या वेळी लोखंड्यांनी कमिशनवर कामगारांचा प्रतिनिधी नेमण्यासाठी परिषद बोलावली. परिषदेने लोखंड्यांनाच कामगारांचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिले.

पुणे नगरपालिकेतील जोतीरावांचे कार्य सुरळीतपणे चालले होते. जून १८८० मध्ये हरी रावजी चिपळूणकर यांनी असा ठराव मांडला की, "नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक दरवर्षी कामकाजाचे वर्ष सुरू होण्यापूर्वी सर्व सभासदांच्या मताने व्हावी." या ठरावाला जोतीबांनी पाठिंबा दिला. जोतीराव हे जनहितदक्ष असल्याने या सूचनेने सत्ता एखाद्या कंपुच्या हाती जाणार नाही; हे त्यांनी लक्षात घेतले. जोतीराव निर्भय व निःस्पृह होते. हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड लिटन हे पुण्याला भेट देणार होते. त्यानिमित्त सर्व शहर सुशोभित करायचे होते. नगरपालिका त्यासाठी पैसा खर्च करणार होती. लिटनसाहेब अरेरावी होते. त्यांनी हिंदुस्थानातील वृत्तपत्राची मुद्रण कायदा जारी करून मुस्कटदाबी केली होती. लोकमत त्यांच्याविरुद्ध क्षुब्ध झाले होते. लिटनसाहेबांच्या सत्काराकरता करावयाच्या शहर शोभेमध्ये एक सहस्र रुपये खर्च करण्यात आले. ३२ सभासदांपैकी पैसे खर्च करण्यास ३१ सभासदांनी होकार दिला. एकट्या जोतीबांनी खर्चास विरोध केला. व्हाइसरॉयच्या मानपत्रासाठी खर्च करण्याऐवजी गरीब नागरिकांसाठी ती रक्कम खर्च करावी, असे जोतीराव म्हणाले. लार्ड लिटनने पुण्यास भेट दिली. त्यांचा सन्मान करण्यात आला. लोकहितविरोधी सूचना धुडकावून लावण्याचा सभासदांना हक्क आहे, हे जोतीरावांनी दाखवून दिले.

दारूच्या व्यसनाला जोतीरावांचा विरोध होता. पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष प्लँकेट यांना १८ जुलै १८८० रोजी जोतीरावांनी एक कडक भाषेत पत्र लिहिले. त्यात म्हणतात, "नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या उद्देशाने नोकरवर्ग नेमला व आरोग्य खाते चालविले. पुणे शहराला दारूचे गुत्ते परिचित नव्हते. आता भर वस्तीत दारूचे गुत्ते उघडल्याने लोकांच्या नैतिक अध:पाताची बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे आरोग्य सांभाळणे या नगरपालिकेच्या उद्देशाला बाध येतो. दारूचे गुत्ते उघडल्यापासून दारूबाजी इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे, की त्यामुळे अनेक कुटुंबाचा नाश झाला व या दुर्गुणाला शहरात सराईतपणा आला आहे. या व्यसनाच्या प्रचाराला काही

प्रमाणात आळा बसावा, म्हणून मी नगरपालिकेला सूचना करतो की, नगरपालिकेने त्यावर ते ज्या प्रमाणात हानी करतात, त्या प्रमाणात कर बसवावा. मला असे कळते की कुठल्याही नगरपालिकेने असा कर बसवला नाही. मात्र त्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो. या बाबतीत नगरपालिकेने चौकशी करावी. माझा हा ठराव सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आभारी होईन.'' या पत्राने खळबळ उडाली. 'ज्ञानप्रकाश' ने जोतीरावांची प्रशंसा केली व त्यांच्या म्हणण्याला पाठिंबा दिला. ज्ञानप्रकाश वृत्तपत्र म्हणते की, ''जोतीरावांनी प्रथमच नगरपालिकेचे लक्ष ज्या विषयाकडे जोराने वेधले तो महत्त्वाचा आहे. त्यांच्या या कृत्याने फुले हे अभिनंदनास पात्र ठरले.'' जोतीरावांना पत्राची पोच अध्यक्ष प्लँकेटकडून मिळाली. पहिल्याच सभेत पत्र ठेवण्यात आले व पुढील ठराव आला, ''हा विषय सभेपुढे ठेवावा की काय, याचा विचार अध्यक्षांनी करावा. मध्यवर्ती सरकारच्या २२ ऑक्टोबर १८७७च्या ठरावाने दारूवर कर बसवता येत नाही. सभा अशी आशा व्यक्त करते की, पुण्यातील गुत्त्यांची संख्या कमी करता येणे शक्य होईल.'' कार्यकारी मंडळाचा ठराव व मूळ पत्र नगरपालिकेचे अध्यक्ष रिचेल यांच्या स्वाधीन करण्यात आले. त्यांनी ठराव व पत्र २७ जुलैस हेन्री डिक्सन या अबकारी अधिकाऱ्याकडे अभिप्रायार्थ पाठवले.

डिक्सन यांनी ३० जुलैस शेरा मारून हे प्रकरण परत पाठवले. आपल्या शेऱ्यात ते अबकारी अधिकारी म्हणाले, ''आम्ही नम्रपणे निवेदन करतो की १८७३-७७ पुणे शहरात चार दारूगुत्ते होते. १३७७-७८ पासून सहा दारूगुत्ते राहिल्याने त्यांची संख्या दहा झाली आहे. हे नवे गुत्ते वाढविण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना दिली, कारण शहरात ज्या ठिकाणी गुत्ते आहेत, त्या ठिकाणी चोरटा दारूचा सुळसुळाट झाला. चोरट्या दारूला उत्तेजन मिळू नये या उद्देशाने ही गोष्ट करण्यात आली. पुण्याला आलेली चोरटी दारू अशुद्ध व अपायकारक होती. १८७४ साली दारूचा खप १५,६१७ गॅलन होता. तो १८७९मध्ये २२,९१२ गॅलनपर्यंत वाढला.'' दारूचे व्यसन पुणे शहरात अत्यंत झपाट्याने वाढत होते, हे जिल्हाधिकाऱ्यांना पटले. रिचेल यांनी ८ ऑगस्ट १८८० रोजी पोलिस पर्यवेक्षकाकडे हे प्रकरण धाडले. त्या पोलिस अधिकाऱ्याने २७ ऑगस्ट १८८० रोजी उत्तर धाडले की, ''लोकांमध्ये दारूचे व्यसन वाढत आहे, याचे कारण असे की, पूर्वी श्रीमंत लोक दारू पीत नसावेत व आता त्यांच्यात दारूचे व्यसन शिरले आहे. पण ते गावठी दारू यथेच्छ झोकतात, असे नाही.'' सर्व पत्रव्यवहार जिल्हाधिकारी रिचेल यांनी पुणे नगरपालिकेकडे पाठवला, व त्यावर शेरा मारला की, ''दारूचे गुत्ते वाढविल्याने व्यसन वाढले, असे म्हणता येणार नाही. या व्यसनाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी उपाययोजना करता येईल की नाही, हा प्रश्न आहे.'' जोतीरावांच्या पत्रावरील आपल्या ठरावात नगरपालिकेने अशी इच्छा प्रदर्शित केली की भविष्यकाळात हे व्यसन कमी होण्यासाठी प्रयत्न करावेत.

ब्रिटिश राज्यकर्त्यांचे म्हणणे असे की शुद्ध दारूचे व्यसन हे अशुद्ध, गावठी, चोरट्या दारूपेक्षा आरोग्याला कमी धोक्याचे व अपायकारक आहे. दारूचे व्यसन फैलावू नये

अशी जोतीरावांची इच्छा होती. वेदकालापासून दारू गाळण्यात येत असे, याविषयी शंका बाळगण्याचे कारण नाही. दारूच्या व्यसनाविरुद्ध ओरड करणारे जोतीराव हे पहिले महाराष्ट्रीय आहेत, असे नाही. १८५२ साली साताऱ्यातील लोकांनी दारूचे गुत्ते बंद करण्यासाठी सरकारकडे अर्ज धाडला होता. सी. डब्ल्यू. बेल या अधिकाऱ्याने १८६९ साली सरकारच्या अबकारी धोरणाविषयी एक प्रतिवृत्त दिले. त्यात त्याने म्हटले आहे, "पेशव्यांच्या राजवटीत शेवटी दारूचे व्यसन वाढले होते. त्यापासून उत्पन्न होणारा कर वाढत होता. गुन्हेगारांना कडक शिक्षा ठेवल्या होत्या."

कोणत्याही धर्मग्रंथात अथपासून इतिपर्यंत संपूर्ण सत्य सांगितलेले नाही. अशी जरी जोतीरावांची धारणा होती, तरी ज्याप्रमाणे ते परंपरागत हिंदू धर्मावर तुटून पडत त्याप्रमाणे ते ख्रिस्ती धर्मावर टीका करीत नसत. त्यांच्या सहकाऱ्यांनी मात्र ख्रिस्ती धर्मावर व ख्रिश्चनांवर टीका केली. ख्रिस्ती पाद्र्यांच्या सेवाभावाचा जोतीरावांच्या मनावर काही काळ पगडा होता; पण तो कालांतराने कमी झाला. जोतीरावांच्या सहकाऱ्यांनी सरकारवर टीका केली. भालेकर व लोखंडे यांनी गिरणी कामगार व शेतकरी यांची जमीनदार, गिरणीमालक व इंग्रजांकडून जी पिळवणूक झाली त्याविरुद्ध ओरड केली. विशेषत: भालेकर यांनी आपल्या पोवाड्यात व काव्यात या अन्यायाविरुद्ध टीका केली आहे.

जोतीरावांचे कार्य व नेतृत्व यांची छाप महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दिसू लागली. फलटणमधील कार्यकर्त्यांनी त्यांना व्याख्यानास बोलावले. त्यांच्या मुखातून दलितांची दु:खे व गाऱ्हाणी व्यक्त होत. सामाजिक विषमता व जन्मजात प्रतिष्ठा याविरुद्ध त्यांनी त्वेषाने ओरड केली. त्यांच्या काळात असा नेता नव्हता. सामाजिक कार्यकर्त्यांना नवीन युगाची कल्पना देऊन, त्यांची उदासीनता दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जोतीरावांची चळवळ समाजात मूळ धरू लागलेली पाहताच जमीनदार, सावकार व वरिष्ठ ब्राह्मणवर्ग त्यांच्यावर टीका करू लागले.

सहा

हंटर कमिशनला निवेदन

धर्मभोळ्या समजुती व सुस्तपणा यांपासून जनतेची मुक्तता करण्यासाठी महाराष्ट्रात दौरे काढणारे पहिले नामवंत नेते म्हणजे जोतीराव. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी टिळकचरित्रात म्हटले आहे की, "१८८० साली न्यू इंग्लिश स्कूलचा जन्म होण्यापूर्वी महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ सुरू झाली. वरवर पाहता सत्यशोधक समाजाचे स्वरूप ब्राह्मणेतर असे दिसले. समाजसुधारणेची खेड्यात पोचलेली अशी सत्यशोधक समाजाची चळवळ ही पहिलीच चळवळ होय."

विष्णुशास्त्री चिपळूणकर हे वडिलांच्या मृत्यूनंतर रत्नागिरी येथील नोकरी सोडून पुण्यास परत आले. ती सरकारी नोकरी होती. पुण्यात आल्यावर त्यांनी टिळक, आगरकर यांच्या सहकार्याने न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा १८८० साली सुरू केली. १८८१ साली तिघांनी 'केसरी' हे मराठी व 'मराठा' हे इंग्रजी अशी दोन साप्ताहिके सुरू केली. केसरीचे संपादक आगरकर व मराठ्याचे टिळक होते. विष्णुशास्त्री यांनी 'किताबखाना', 'निबंधमाला' यांकडे लक्ष पुरवले. केसरी व मराठ्याचे संपादक आडपडदा न ठेवता जनतेच्या बाजूने लिहीत.

केसरी सुरू झाल्यावर एक नवे प्रकरण उपस्थित झाले. कोल्हापूर संस्थानच्या गादीसाठी दत्तकपुत्र शिवाजीराजे यांना वेड लागण्याचे काही कारण नसता, वेड लागले अशी शंका उत्पन्न झाली. महाराणींना हाताशी धरून दिवाण माधवराव बर्वे यांनी कारवाई सुरू केली. कोल्हापूर व पुणे येथे याविषयी ओरड झाली. राजपुत्राला नवीन पालकाच्या स्वाधीन करावे अशी मागणी झाली. केसरी व मराठी यांनी या कारस्थानात बर्वे हेच खलपुरुष असे प्रतिपादन केले. बर्व्यांनी या पत्रकावर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. त्या वेळी जोतीरावांच्या सांगण्यावरून टिळकांना जामीन राहण्यासाठी उरवणे पुढे झाले. टिळकांची बाजू रास्त आहे असे जोतीरावांचे मत होते.

कोल्हापूरच्या खटल्याचा निकाल टिळक-आगरकर यांच्याविरुद्ध लागला. बर्व्यांची त्यांनी माफी मागितली. परंतु बर्व्यांनी माफी अमान्य केली. दोघांना १२० दिवस डोंगरी तुरुंगात कारावास भोगावा लागला. त्यांची सुटका झाल्यावर नारायण लोखंडे व दामोदर यंदे या दोघांनी त्या तरुण नेत्यांचा मुंबईत जयजयकार केला. जोतीरावांनी टिळक- आगरकर यांच्या स्वागत- समारंभात भाग घेतला, याचे कारण दोघांनी शिवाजीच्या वंशजाची बाजू घेतली. त्यामुळे जोतीरावांना त्याच्याविषयी अभिमान वाटला. आगरकरांनी जोतीरावांचे 'केसरी' तून जाहीररीत्या आभार मानून आपल्याला संकटात साहाय्य केले म्हणून धन्यवाद दिले. सत्यशोधकाचे मुखपत्र 'दीनबंधू' याने टिळक व आगरकर यांच्या सत्काराला उचलून धरले.

जोतीराव व लोखंडे यांनी महाराष्ट्राचे लक्ष रायगडावरील शिवाजी महाराजांच्या समाधीकडे वेधले. ती मोडकळीस आली होती. जोतीरावांनी शिवाजीचा पोवाडा रचला. शिवाजी महाराजांच्या समाधीकडे महाराष्ट्राचे खूप दुर्लक्ष झाले होते. १८८५ सालच्या प्रारंभी पुण्यातील हिराबागेत चाफळकर स्वामींच्या अध्यक्षतेखाली सभा भरली. त्या सभेत जोतीराव व पुण्यातील नामांकितांनी भाषणे केली. सिंक्लेअर या जिल्हाधिकाऱ्याने शिवाजी महाराजांची समाधी स्वखर्चाने दुरुस्त केली.

हिंदुस्थानातील शिक्षणविषयक प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी सरकारने १८८२ साली सर विल्यम हंटर या गृहस्थांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठी मंडळ नेमले. आपल्या उद्देशानुसार सार्वजनिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींच्या भेटीगाठीसाठी हंटर देशभर हिंडत होते. या मंडळास साहाय्य करण्यासाठी ब्रिटिश भारतातील सर्व प्रांतांत एकेक समिती स्थापण्यात आली. या शिक्षण मंडळाने प्रत्येक प्रांतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा उलगडा करण्याकरता तज्ज्ञांच्या साक्षी घेतल्या. काहींनी लेखी निवेदनाद्वारे आपले विचार समितीला कळवले. अशा निवेदकांपैकी जोतीराव हे एक होते.

न्यू इंग्लिश स्कूलचे पर्यवेक्षक वामन शिवराम आपटे यांनी शिक्षण समितीला सादर केलेल्या निवेदनात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी लोकांवर सोपवावी अशी मागणी केली. आपल्या निवेदनात ते म्हणतात, "ख्रिस्ती धर्मोपदेशकाचे शाळा स्थापण्याचे प्रयत्न हे अस्सल स्वदेशी प्रयत्न नाहीत. त्यांचे ध्येयही शुद्ध शैक्षणिक स्वरूपाचे नाही." अनेक विद्वान व प्रसिद्ध व्यक्तींनी या समितीपुढे साक्षी दिल्या. त्या साक्षींवरून निष्पन्न होते, की साक्ष देणारांचा मुख्य उद्देश समाजातील बुद्धिमान वर्गाची मिरासदारी उत्पन्न व्हावी हा होता. गरीब ग्रामीण लोकांच्या हिताशी त्यांचा काडीमात्र संबंध नव्हता. वरिष्ठ वर्गांना शिक्षित करणे एवढाच समितीपुढे आलेल्या साक्षीदारांचा उद्देश दिसतो. त्याला अपवाद जोतीराव होते. सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली, असे जोतीरावांनी स्पष्ट सांगितले. जोतीरावांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी सादर केलेल्या निवेदनात स्वतःचे वर्णन

एक व्यापारी, शेतकरी, नगरपिता असे केले आहे. आपल्या निवेदनात त्यांनी स्वतः स्थापन केलेल्या शाळांची व शैक्षणिक कार्याची सविस्तर हकीकत दिली आहे. किती वर्षे आपण शिक्षक म्हणून कार्य केले व आपले शिक्षणविषयक अनुभव त्यांनी आपल्या निवेदनात दिले. 'गुलामगिरी' या ग्रंथातील काही उतारे देऊन त्यांनी आपल्या निवेदनास प्रारंभ केला.

निवेदनात फुले म्हणतात, "सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की, वरिष्ठ वर्गातील लोक हे कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करतील. हे सुखस्वप्न उराशी बाळगून. गरीब शेतकऱ्यांकडून सरकार जो सारा गोळा करते, त्या सर्व वसुलाचे उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते. विद्यापीठे श्रीमंताच्या मुलांना शिक्षण देतात व ऐहिक उन्नती साधण्यासाठी साहाय्य करतात. परंतु त्या विद्यापीठातून आलेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांच्या उन्नतीच्या कार्यात काही भर घातली नाही.

"विद्यापीठातून पदव्या घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांनी सर्वसाधारण जनतेसाठी काय केले ? आपल्या आयुष्याक्रमाच्या योगे त्यांनी तिच्यावर कोणता परिणाम घडवून आणला ? अभागी व अज्ञानी अशा बांधवांच्या शिक्षणासाठी, स्वतः आपल्या घरी व दुसरीकडे शाळा सुरू केल्या काय ? मग कोणत्या कारणाने असे सांगण्यात येते, की जर लोकांची नैतिक व बौद्धिक पातळी वाढवावयाची तर वरिष्ठ वर्गाचे शिक्षण महत्त्वाचे ठरते ? राष्ट्राच्या कल्याणाची वृद्धी झाली आहे वा नाही हे समजण्याचे एकच साधन, ते म्हणजे महाविद्यालयात किती विद्यार्थी शिक्षण घेतात आणि विश्वविद्यालयीन शिक्षणाचा विस्तार कसा होतो. ज्याप्रमाणे जंगलातील शिकारीविषयक कायदा केल्याने किंवा १० पौंड कर भरणाऱ्यांना मतदानाचा हक्क दिल्याने घटनेची कल्याणकारकता सिद्ध होत नाही; त्याप्रमाणे विद्यापीठातून रँग्लर बाहेर पडल्याने वा तेथे देशी व्यक्तींची डीन वा प्राक्टर म्हणून नेमणूक केल्याने, ते सारे देशहिताचे आहे असे सिद्ध होत नाही.

"उच्च वर्गाच्या सरकारी शिक्षणपद्धतीची एक ढळढळीत अशी प्रवृत्ती दिसून येते की, सर्व सरकारी वरिष्ठ जागा या ब्राह्मणवर्गाची मक्तेदारी झाल्या आहेत. सरकारला जर जनतेच्या कल्याणाची खरी कळकळ असेल, तर हे अनेक दोष दूर करणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. दुसऱ्या जातीच्या काही थोड्या लोकांची नेमणूक करून दिवसेंदिवस ही ब्राह्मणांची मक्तेदारी मर्यादित केली पाहिजे. हे आता शक्य नाही असे लोक म्हणतील. त्यावर आमचे उत्तर असे की, जर सरकारने उच्च शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले, तर नीतीने व वागणुकीने चांगले लोक तयार करण्यात अडचण पडणार नाही. वरिष्ठ लोक उच्च शिक्षणाची सोय स्वतःच करतील," असे जोतीरावांनी निवेदनात म्हटले.

जोतीरावांनी पुढे म्हटले की, "मुंबई इलाख्यात प्राथमिक शिक्षणाची आबाळ झाली आहे. प्राथमिक शाळांना योग्य ती उपकरणे पुरवण्यात येत नाहीत. सरकार शिक्षणासाठी शेतकऱ्यांकडून कर घेते व तो पैसा ज्या कामासाठी उभा केला जातो, त्या कामासाठी मात्र

खर्च होत नाही. या प्रांतातील जवळजवळ नऊ दहा गावे म्हणजे जवळजवळ दहा लाख मुले यांची प्राथमिक शिक्षणाची काही सोय नाही. शेतकऱ्यांचे दारिद्र्य, त्यांच्या ठायी असलेल्या स्वावलंबनाचा अभाव, सुशिक्षित वर्गावर सर्वस्वी अवलंबून राहण्याची सवय, याला कारण शेतकऱ्यांमधील शिक्षणाची दुःस्थिती. शेतकरी व इतर कनिष्ठ गरीब वर्ग शिक्षणाचा फायदा घेऊ शकत नाहीत. त्यांच्यापैकी थोडीच मुले प्राथमिक व माध्यमिक शाळांत आढळतात. पण ती फार काळ शाळेत टिकत नाहीत; कारण पालक दारिद्र्याने गांजलेले असतात. शेतकरी व गरीब यांना मुले गुरे राखणे व शेतीच्या कामासाठी हवी असतात. त्यांना शाळेत टिकून धरण्यासाठी शिष्यवृत्त्या वा बक्षिसे यांचे प्रलोभन सरकारने ठेवले नाही,'' यासाठी जोतीराव म्हणतात, ''माझे असे मत आहे की, जनतेत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. मराठी व इंग्रजी यांची आवड नसल्याने मुसलमानही शिक्षणापासून दूर राहिले. जेथे त्यांची भाषा शिकवली जाते अशा तुरळक शाळा आहेत.''

''महार, मांग व अतिशूद्र जातींना जातिभेदाच्या दूषित पूर्वग्रहामुळे शाळेतून वगळण्यात आले. वरिष्ठ वर्गातील मुलांशेजारी त्यांना बसवण्यात येत नसे. त्यांच्यासाठी वेगळ्या शाळा काढल्या. परंतु त्या फक्त मोठ्या शहरांतून आहेत. महारमांगांची पाच हजारांवर वस्ती असलेल्या पुण्यात फक्त एकच शाळा आहे व त्या शाळेत फक्त तीस मुले उपस्थित असतात. शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्यांना ही गोष्ट भूषणावह नाही. म्हणून मी सरकारला विनंती करतो, की ज्या गावात कनिष्ठ जातीची वस्ती असेल, तेथे वेगळ्या स्वतंत्र शाळा चालू कराव्यात. कारण दूषित पूर्वग्रहाने त्यांना इतर जातीच्या मुलांशेजारी बसता येत नाही.

''शिक्षणाच्या प्रचलित परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या यशावर शिक्षकाचे वेतन ठरविणे ही गोष्ट गरीब अज्ञानी लोकांत शिक्षणप्रसार करण्याच्या दृष्टीने योग्य नव्हे; कारण खालच्या वर्गात शिक्षणाची आवड निर्माण करण्यात आली नाही. या विद्यार्थ्यांसाठी कुठलाही शिक्षक स्वतःच्या दायित्वावर शाळा चालविणार नाही असे वाटते. कारण त्याला पोटापुरती मिळकत होणार नाही. त्यांच्यासाठी शाळा सुरू करून विशेष प्रलोभने ठेवावीत.

''सरकारी शाळांतून जे शिक्षण देण्यात येते ते पक्क्या पायावर उभारले पाहिजे. विद्यार्थी भावी आयुष्यात व्यवहारोपयोगी ठरले पाहिजेत. अभ्यासक्रम व शिक्षणयंत्रणा यांची आमूलाग्र सुधारणा व्हावयास हवी. शिक्षकांच्या नोकरीचे नियम व अटी सोयीच्या व स्वास्थ्यदायी पाहिजेत. त्यांच्या पगारात व दर्जात वाढ केली पाहिजे. अध्यापनशास्त्राची परीक्षा दिलेल्या शिक्षकांच्याच नेमणुका शाळांत व्हाव्यात.

''प्राथमिक शाळात सध्या जे शिक्षक नेमले आहेत ते बहुतेक ब्राह्मण आहेत. त्यांच्यापैकी काही शिक्षक विद्यालयातून उत्तीर्ण झाले आहेत. काही शिक्षक साधे आहेत. त्यांचे वेतन अगदी निकृष्ट आहे. त्यामुळे त्यांची कामगिरीही तशीच तोकडी व असमाधानकारक होते. सर्वसाधारणपणे ते शिक्षक निरुपयोगी असतात व त्यांच्या हाताखाली शिकणाऱ्या

विद्यार्थ्यांची वृत्तीही आळशी बनते. आपले घरगुती धंदे वा मेहनतीचे काम करण्याचे टाळून ते नोकरीच्या शोधात राहतात.

"माझे असे मत झाले की, प्राथमिक शाळांतील शिक्षक शक्यतो अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण झालेले पाहिजेत व ते शेतकरी वर्गातील असावेत; कारण ते गरीब मुलांच्या भावना, गरजा लीलेने समजून घेऊन त्यांच्यात सहजपणे मिसळतील. ब्राह्मण शिक्षक धार्मिक पूर्वग्रहांनी त्या मुलांशी मिसळू शकत नाहीत. कनिष्ठ वर्गातील शिक्षक नेमल्याने मुलांवर नैतिक व हितकर असा परिणाम होईल. तसे वरिष्ठ वर्गातील शिक्षक नेमल्याने घडणार नाही. कनिष्ठ वर्गातील शिक्षकांना नांगर धरण्यास व सुताराचे हत्यार चालवण्यास कमीपणाचे वाटत नाही. महार-मांगादी कनिष्ठ वर्गातील लोकांशी हे शिक्षक सहज समरस होतील. त्यांना शेतीचे व आरोग्याचे शिक्षण घ्यावयास हवे.

"जे शिक्षक लायक आहेत, ते अध्यापनाची परीक्षा उत्तीर्ण नसले तरी त्यांना ठेवून घ्यावे. अधिक परीक्षा उत्तीर्ण नसले तरी त्यांना ठेवून घ्यावे. अधिक चांगले शिक्षक मिळविण्यासाठी अधिक वेतन देऊन सुधारणा केली पाहिजे. बारा रुपयांपेक्षा वेतन कमी नसावे. कुलकर्ण्याचे हिशोब तपासण्याचे काम त्यांना द्यावे किंवा दस्तऐवज तयार करण्याचे वा खेड्यातील पोस्टमास्तराचे वा स्टँप विकण्याचे काम देऊन त्यांचा दर्जा वाढवावा. ज्या लोकांमध्ये ते राहतात, त्यांवर ते हितकर वजन पाडतील असा त्यांचा दर्जा वाढवावा. ज्यांच्या शाळेत अधिक मुले उत्तीर्ण होतील, त्यांना उत्तेजन म्हणून मासिक वेतनाशिवाय अधिक विशेष वेतन द्यावे.

"शहरातील अभ्यासक्रमापेक्षा ग्रामीण भागातील अभ्यासक्रम सोपा व सुटसुटीत असावा, पण दैनंदिन व्यवहाराला सोडून नसावा. शेतीचे शास्त्रशुद्ध ज्ञान देण्यासाठी आदर्श शेतीची योजना व्हावी. जर ते आदर्श शेत नीट चालवले, तर देशाचे कल्याण होईल. प्राथमिक व अँग्लो-व्हरनॅक्युलर शाळांत जी पुस्तके आहेत त्यांची पुनर्रचना केली पाहिजे. तांत्रिक, नैतिक, काही उपयुक्त अशा कलांविषयी मधूनमधून वाढत्या प्रमाणात पाठ देण्याची योजना व्हायला हवी.

"उपशिक्षण तपासनीस शाळेला एकदा भेट देतो. ग्रामीण भागातील शाळांची तपासणी वर्षातून चार वेळा वा अधिक वेळा व्हावयास हवी. शाळेच्या तपासणीविषयी पूर्वसूचना न देता, अचानक भेट देणे ही गोष्ट उपयुक्त ठरेल. त्यासाठी जिल्ह्यातील वा खेड्यातील अधिकाऱ्यांवर अवलंबून राहून चालणार नाही. त्यांनी केलेली शाळेची तपासणी बहुधा उथळ व अपूर्ण असते. युरोपीय अधिकाऱ्यांची देखरेख आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांवर वजन पडते.

"(१) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी. त्यासाठी ज्या देशी शाळांतून प्रमाणपत्र असलेले शिक्षक आहेत, त्यांना अनुदान द्यावे. (२) शेतकऱ्यांच्या साऱ्याचा अर्धा भाग

प्राथमिक शिक्षणावर खर्च व्हावा. (३) नगरपालिकांच्या हद्दीतील शाळा सरकारने स्वखर्चाने चालवाव्या व त्यासाठी योग्य कायदा करावा. (४) सरकारने प्रांतिक वा मध्यवर्ती निधीतून नगरपालिकांना अनुदान देऊन, त्यांनी स्वखर्चाने आपल्या हद्दीतील शाळा चालवाव्यात असे करावे. परंतु शाळांचा कारभार नगरपालिकांच्या हाती सोपवू नये. प्राथमिक व खाजगी इंग्रजी शाळा सरकारी खात्याच्या नियमाप्रमाणे चालतात, त्यांना पैसे असतील तर अनुदान द्यावे. मात्र ते प्रमाण उत्तीर्ण होणाऱ्या मुलांच्या संख्येच्या प्रमाणावर ठेवावे. नगरपालिकांनी शाळांना असे अनुदान देण्यास कायदा करून भाग पाडावे, शिक्षणावर खर्च होणाऱ्या निधीवर शिक्षण संचालकाचे नियंत्रण असावे. जर मंडळावर सुशिक्षितांची नेमणूक झाली, तर त्यांच्या शिक्षणाचा निधी त्यांना द्यावा. सांप्रत मंडळावर पाटील, इनामदार वा दुसऱ्या व्यक्ती निवडल्या जातात, त्यांना निधीवर योग्य नियंत्रण ठेवता येणार नाही.

"प्राथमिक शाळा जुन्या वळणाप्रमाणे ब्राह्मण समाजातील टाकाऊ लोकांनी चालविलेल्या असतात. त्यांना साधे लेखन, वाचन, त्रैराशिक येत नाही. देशी शाळांकरता शिक्षक तयार करण्यासाठी ग्रामीण भागात सोय नाही. जर खेड्यातील शाळांत अध्यापन प्रमाणपत्र मिळवलेले व अध्यापनाचे कार्य पार पाडण्यास लायक शिक्षक असतील, तरच त्या शाळांना अनुदान द्यावे." जोतीराव आपल्या निवेदनात पुढे असे म्हणतात : "अनेक वर्षेपर्यंत शिक्षण खात्यावर सर्व प्रकारे सरकारचेच संपूर्ण नियंत्रण असले पाहिजे. खाजगी माध्यमिक शाळा काढणाऱ्यांना उदरनिर्वाह होईल एवढे उत्पन्न मिळत नाही. त्यांचे प्रयत्न हे शाश्वत स्वरूपाचे होऊ शकत नाहीत. विष्णुशास्त्री चिपळूणकर किंवा भावे यांच्यासारख्यांच्या खाजगी शाळांना भरपूर अनुदान दिले तर त्या शाळा भरीव कार्य करतील. तथापि सरकारी माध्यमिक शाळांची आवश्यकता भासू नये, एवढी त्यांची कार्यशक्ती वाढण्याचा संभव नाही.

"प्रचलित माध्यमिक शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे. कारकून व शिक्षक निर्माण करणे एवढाच काय तो त्याचा उपयोग. शिक्षक आणि विद्यार्थी हे मॅट्रिक परीक्षेत उगाच गढून जातात. त्या अभ्यासक्रमाला व्यावहारिक स्वरूप नाही. विद्यार्थ्यांना भावी स्वतंत्र जीवनात समर्थ करील, असे ते शिक्षण नसते. जरी प्रवेश परीक्षेकरता बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशातील ज्ञानप्रसाराची मर्यादा लक्षात घेता मुळीच मोठी नाही, तरी ती संख्या सरकारी नोकऱ्यातील आवश्यकता लक्षात घेता मोठी आहे असे दिसते. जर शिक्षण सर्वांना सक्तीचे असून सर्वांच्या आवाक्यात असते, तर ही संख्या आणखी मोठी झाली असती. तशी ती होईल, अशी मला आशा आहे.

"उच्च शिक्षणाची व्यवस्था अशा रीतीने करावी की, ते घेणे सर्वांना सहज शक्य होईल आणि मॅट्रिक परीक्षेकरता नेमलेल्या विषयांची पुस्तके जशी मद्रास व बंगाल येथे सरकारी गॅझेटमध्ये छापतात, तशी मुंबई सरकारने गॅझेटमध्ये प्रसिद्ध करावीत. असे करण्याने खासगी विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळेल आणि ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने देशाला अधिक साह्य होईल."

मुंबई विद्यापीठाचा गौरव करून जोतीराव म्हणाले, "मुंबई विद्यापीठ खाजगी रीतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षांना बसावयास देते, हे एक लोकांना मोठे वरदान आहे. उच्च शिक्षणाचेही बाबतीत विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांकडून असेच वरदान लाभेल, अशी मी आशा करतो बी. ए. एम्. ए. या पदव्यांकरिता खाजगीरीत्या केलेला अभ्यास विद्यापीठाने मान्य केला, तर खरेच तरुण लोक खाजगीरीत्या अभ्यास करावयास झटतील. त्यांनी असे केले तर शिक्षण प्रसाराचे पाऊल अधिक पुढे पडेल." शिष्यवृत्ती देण्याच्या पद्धतीविषयी जोतीराव म्हणाले की, "शिष्यवृत्ती देण्याची पद्धत ही अशा रीतीची बनवावी की जिच्या योगाने ज्या वर्गात शिक्षणाची प्रगती झाली नाही, त्या वर्गातील मुलांना काही शिष्यवृत्त्या मिळतील. शिष्यवृत्तीकरिता चढाओढ ठेवून शिष्यवृत्ती देण्याची पद्धत जरी तत्वतः न्याय्य असली, तरी त्यामुळे खालच्या वर्गात शिक्षणप्रसाराला हातभार लागणार नाही. ज्या सुशिक्षित लोकांना सरकारी नोकरी मिळत नाही, त्यांना तांत्रिक किंवा व्यावहारिक अशा तऱ्हेचे शिक्षण न मिळाल्यामुळे हाताने कष्ट करण्याचे किंवा दुसरे रोजगाराचे काम करण्यास त्यांचे मन घेत नाही. म्हणून ज्या सुशिक्षित लोकांना नोकरी नाही अशा सुशिक्षित लोकांची भाऊगर्दी बाजारात झाली आहे. देशातील लोकसंख्या पाहता सांप्रत सुशिक्षित लोकांची संख्या अगदी लहान आहे आणि ही सुशिक्षितांची संख्या शेकडो पटींनी वाढेल, असा काळ दूर नाही आणि ते सर्व उपयुक्त धंदे करण्याच्या वृत्तीचे होतील आणि नोकरीच्या पाठीमागे कोणी जाणार नाही, असा आपण विश्वास बाळगू या. शेवटी मला या शिक्षणविषयक चौकशी समितीपुढे एकच विनंती करायची आहे की त्यांनी मुलींचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यासाठी कृपया काही उपाय योजावेत."

'शेतकऱ्याचा आसूड' या आपल्या पुस्तकात जोतीरावांनी म्हटले की, "हंटर शिक्षण मंडळाने शेतकऱ्याच्या साक्षी घेतल्या नाहीत. त्यांनी पारशी, खिश्चन व ब्राह्मण यांच्या साक्षीवर सारा भरवसा ठेवला आणि त्या समितीने या वर्गांनी दिलेली मानपत्रे स्वीकारली. म्हणून त्या मंडळाचे प्रतिवृत्त अशिक्षित व गरीब लोक यांना उपयुक्त होणार नाही. "

पुणे नगरपलिकेच्या समितीपुढे ३० ऑक्टोबर १८८२ रोजी पशुवैद्यक महाविद्यालय काढण्याविषयी एक ठराव आला जोतीरावांनी या विषयाच्या संदर्भात अशी सूचना केली की अशा तऱ्हेचे महाविद्यालय मद्रास नगरपालिका चालवीत असल्यामुळे त्या नगरपालिकेकडे अशा महाविद्यालयासाठी किती खर्च येतो याची चौकशी करावी. जोतीरावांचा ठराव संमत झाला. नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची संख्या वाढवावी असा दुसरा ठराव नगरपालिकेपुढे चर्चेस आला. जोतीरावांनी त्यात अशी दुरुस्ती सुचवली की, सरकार आपल्याकडून प्राथमिक शाळा काढून दुसऱ्या संस्थांच्या स्वाधीन करणार किंवा काय याविषयी निर्णय करीपर्यंत तो ठराव अनिर्णीत ठेवावा. मूळ ठराव संमत झाला.

बाजारासाठी एक इमारत बांधावी असा एक ठराव ४ डिसेंबर १८८२ रोजी नगरपालिकेकडे चर्चेस आला. त्या ठरावाला अनुकूल असलेले सभासद व अधिकारी तो ठराव विद्यमान सभासदांकडून मान्य करून घेण्याची घाई करीत होते. कारण स्थानिक स्वराज्याच्या कायद्याप्रमाणे नवीन निवडणुकीनंतर नवीन सभासद यावयाचे होते. ३ लक्ष २५ हजार एवढी मोठी रक्कम बाजाराच्या इमारतीसाठी खर्च करू नये असे जोतीराव व हरी रावजी चिपळूणकर यांचे मत होते. इमारतीसाठी १ लक्ष रु. खर्च करावेत अशी मूळ कल्पना होती जोतीरावांचे मत असे की तो सर्व पैसा गरीबांच्या शिक्षणासाठी खर्च करावा दुसऱ्याही तीन उपसूचना मांडण्यात आल्या. परंतु बहुसंख्य मतांनी असा ठराव झाला २ लक्ष किंमतीची व दोनशे दुकाने ज्यात असतील अशी एक इमारत बांधावी. खाजगीवाले व चिमण्या यांच्या मालकीची मोठी बाग बाजारच्या इमारतीसाठी निश्चित करण्यात आली. केसरीने या ठरावाला जोराचा विरोध केला. अशी महागडी इमारत बाजाराकरिता नको, असे त्या पत्राने मत दिले. सर्व विरोध बाजूला सारून इमारत बांधणीचे काम सुरू करण्यात आले व त्या काळच्या हिंदुस्थानातील 'लॉर्ड रे मंडई' नावाची एक प्रचंड इमारत १८८५ साली बांधून पूर्ण झाली.

सात

शेतकऱ्याचा आसूड

माणसाच्या भौतिक जीवनाचा अन्न वस्त्र उत्पादन हा आधार आहे. म्हणून मानवी समाजातील शेतकरी समाज निरोगी व बळकट असला पाहिजे. आधुनिक समाज हा औद्योगिक क्रांतीच्या आधारावर उभारलेला असतो, परंतु शेतकरी समाजाचे बळ त्याला आवश्यक असते. हा समाजशास्त्रीय तात्विक दृष्टिकोण जोतीरावांनी ध्यानात धरून 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहिला व प्रसिद्ध केला. तो ग्रंथ लिहीत असताना त्याची हस्तलिखित प्रकरणे प्रवासात असताना ते आपल्या चाहत्यांना वाचून दाखवीत असत. सामाजिक कार्यकर्त्यांना व वजनदार व्यक्तिंनाही त्यांनी ती वाचून दाखवली. एप्रिल १८८३ मध्ये त्यांनी तो ग्रंथ मुंबईत संपूर्ण वाचून दाखविला. याच सुमारास ते बडोद्यास गेले. बडोद्याचे तरुण महाराज श्री. सयाजीराव गादीवर आल्यानंतर एक तरुण कर्ते पुरुष व मोठे जनहितपरायण म्हणून त्यांची ख्याती पसरत होती. 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाची हस्तलिखित प्रकरणे जोतीरावांनी त्यांना वाचून दाखवली. महाराजांनी जोतीरावांना आर्थिक साह्य केले व त्यांना शाल-पागोटे देऊन त्यांचा बहुमान केला. त्यावेळचे व्हाइसरॉय सर फ्रेडरिक हॅमिल्टन टेम्पल, अर्ल ऑफ डफरिन, यांना २८ जुलै १८८३ रोजी जोतीरावांनी हस्तलिखित प्रत पाठवली. या ग्रंथाच्या उपोद्धातात जोतीराव म्हणतात

विद्येविना मति गेली, मतिविना नीती गेली,
नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.

उपोद्धातात पुढे म्हटले आहे की- "सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यामध्ये तीन भेद आहेत— शूद्र शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर, मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करू लागले, ते कुळवाडी किंवा कुणबी जे लोक आपले शेतकीचे काम

संभाळून बागायती करू लागले, ते माळी. जे हे दोन्ही धंदे करून मेंढरे, बकरी यांचे कळप बाळगू लागले, ते धनगर. या तीन जातींचा सांप्रत आपसात बेटी व्यवहार होत नाही. बाकी अन्य सर्व काही होते. यावरून या तीन जाती पूर्वी एका शूद्र जातीच्या असाव्यात. पुढे या तिन्ही जातींचे लोक आपला मूळचा शेतीचा धंदा निरूपागाने सोडून उदरनिर्वाहाकरिता नाना तऱ्हेचे धंदे करू लागले. पण बहुतेक अक्षरशून्य, देवभोळे व भुकेकंगाल आहेत.

"शिपाईगिरीच्या व शहाणपणाच्या जोरावर काहींनी जहागिरी व इनामे कमावली. ते शिंदे होळकरांसारखे प्रतिराजेच बनून गेले. परंतु हल्ली त्यांचे वंशज अज्ञानी, अक्षरशून्य असल्यामुळे आपापल्या जहागिरी व इनामे गहाण टाकून, कर्जबाजारी होऊन अन्नासही मोताद झाले आहेत. बहुतेक इनामदार जहागिरदारांना आपल्या पूर्वजांनी कसे केले, कसकशी संकटे भोगली, याची कल्पना नसल्यामुळे ते आयत्या पिठावर रेघा ओढतात. ते अशिक्षित असल्यामुळे दुष्ट व व्यसनी लोकांच्या संगतीत ऐषारामात गुंग होऊन कर्जबाजारी होतात. त्यांच्या आसपासचे लोक ब्राह्मण कारभारी इतके मतलबी, धूर्त, धोरणी असतात, की ते आमच्या राजे राजवाड्यांना विद्येची व सदभिरूचीची गोडी चाखू देत नाहीत. यामुळे आपल्या खऱ्या वैभवाचे स्वरूप न ओळखून आपल्या पूर्वजांनी केवळ आमच्या चैनीकरताच राज्यसंपादन केले असे मानून धर्माच्या योगाने अंध झालेले, राज्यकारभार स्वतंत्र रीतीने पाहण्याचे अंगी सामर्थ्य नसल्यामुळे केवळ देवावर भार टाकून, ब्राह्मण कारभाऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिऊन, ते दिवसा गोप्रदाने व रात्री प्रजोत्पादन करीत स्वस्थ बसतात. राजेरजवाड्यांच्या हातून आपल्या शूद्र बांधवांचे कल्याण होण्याचा संभव विशेष. परंतु त्यांच्या मनात तो विचार कधीही आला नाही व जोपर्यंत 'ब्राह्मणो मम दैवतम्' हे वेड त्यांच्या डोक्यातून निघाले नाही, तोपर्यंत कितीही कपाळकूट केली तरी ती व्यर्थच ठरणार. इतके करून तसे करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास, बालपणापासून मनावर झालेल्या दृढ संस्कारांमुळे या मतलबी धर्माविरुद्ध चार गोष्टी ऐकून, त्यांचा विचार त्यास कोठून रुचणार ? व जवळचे कारभारी अगोदर अशा निःस्पृह व जात्याभिमान्यांची डाळच शिजू देणार नाहीत."

'शेतकऱ्याचा आसूडा' च्या पहिल्या प्रकरणात ब्राह्मण शूद्रांना पाळण्यापासून स्मशानापर्यंत, गर्भाधानापासून तीर्थयात्रेपर्यंत धर्माच्या नावाखाली कसा छळतो व त्याने शूद्रांवर लादलेले धार्मिक संस्कार व विधी कसे अखंडपणे चालू असतात याविषयी साद्यंत माहिती दिली आहे. ज्या ब्राह्मणांना उच्च शिक्षण घेता येत नाही, ते संन्याशाचे सोंग घेऊन समाजातील अज्ञानी आणि अशिक्षित लोकांवर कसे वर्चस्व गाजवतात व त्यांची पिळवणूक करतात, हे दाखविले आहे.

"मुलांना शिक्षण देण्यासाठी शेतकऱ्याजवळ पैसा नसतो. मजा मारीत फिरणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष द्यावयास वेळ मिळत नाही. ते आपल्या

हातांखालील ब्राह्मण नोकरांच्या सल्ल्यानुसार काम करतात. शेतकऱ्यांच्या संग्रही कुटुंबाला पुरेल इतके धान्य नसते. अंगावर वस्त्र नसते. इंग्रजांचे राज्य हे भरमसाठ पगार मिळवणाऱ्या अधिकाऱ्यांनी चालवलेले एक अत्यंत महागडे सरकार आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांना देण्यात येणाऱ्या मोठमोठ्या वेतनांच्या अप्रत्यक्ष बोजाखाली शेतकरी साफ साफ चिरडून गेले आहेत,'' असे इंग्रज राज्याबाबत जोतीराव म्हणतात.

जोतीरावांच्या मते शेतकऱ्याच्या आत्यंतिक दारिद्र्याची अनेक कारणे होती. ब्रिटिश राज्य येण्यापूर्वी राजे लोकांनी व संस्थानिकांनी पदरी मोठी सैन्ये ठेवली होती. त्यात मोठ्या संख्येने लोक नोकरी करीत. त्यामुळे शेतजमिनीवर मोठा भार पडत नसे. पेशव्यांचे राज्य लयास गेल्यावर मराठ्यांच्या सैन्यातील लोक घरी बसले. ब्रिटिशांचे राज्य आल्याने देशात शांतता प्रस्थापित झाली. त्यामुळे बेकारी प्रचंड प्रमाणावर वाढली. सैन्यातील लोक घरी आल्यामुळे शेतजमिनीवर त्यांचा भार पडला. शांततेच्या काळी लोकसंख्याही वाढली. कुटुंबातील वाटपामुळे शेतजमिनीचे लहान लहान तुकडे पडले. त्यांची गती थांबेना. तुकडे झालेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नावर आपल्या कुटुंबाची आणि गुराढोरांची गुजराण करताना शेतकऱ्यांच्या नाकी नऊ येऊ लागले. जंगलखात्याने ग्रामीण भागातील कुरणे घशात घातली. त्यामुळे शेळ्या-मेंढ्यांना चरावयास जागा राहिला नाही. शेतकऱ्यांना आधारासाठी पडीक जमीन उरली नाही. जमीन धुपून गेली त्यामुळे तिचा सुपीकपणा कमी झाला. शेतजमिनीचे जे तुकडे पडले ते ज्या मोठ्या शेतकऱ्यांजवळ नांगर आणि बैल होते, त्यांना कसावयास वा विकत देण्यात आले आणि भूमिहीन झालेले शेतकरी कोष्ट्यांकडे, सुतारांकडे, लोहारांकडे, उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून फिरू लागले.

परंतु लहानलहान धंदे करणारे कोष्टी, सुतार आणि लोहार यांच्याकडेही पूर्वीसारखे काम चालेना, कारण ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या मालाशी ते स्पर्धा करू शकत नव्हते. चाकू, कात्र्या, सुऱ्या, शिवणकामाची यंत्रे, दोरा, कुलुपे, चाव्या, लोखंडी पत्रे, डांबर, भाते, निरनिराळ्या तऱ्हेच्या गाड्या व कपडा ही ब्रिटनमधून जकातीशिवाय हिंदुस्थानात आयात होत. त्याचा परिणाम असा झाला, की एतद्देशीय व्यापाऱ्यांचा धंदा अतिशय खालावला. कोष्टी, लोहार, सुतार यांना विपन्नावस्था प्राप्त झाली. आपल्याजवळील कच्चा माल ते सावकारांना विकू लागले व वाट फुटेल तिथे जाऊ लागले. ते लपून छपून दिवस काढू लागले. गव्हाच्या वा तांदुळाच्या कोंड्यावर व आंब्याच्या कोयांवर कशीबशी प्राणधारणा करून राहू लागले रिकाम्या पोटात कावळे ओरडू लागले की ते ताडी व माडी पिऊन आपली भूक शमन करीत. त्यांचा आत्मा त्यांच्या स्वाधीन राहिला नाही आणि इंग्रज नोकरांचे जीवन पहावे तर ते निरनिराळ्या प्रकारची उत्कृष्ट दारू, पाव, बिस्किटे, गरम कपडे यांचा उपयोग घेऊन मजेत रहात. हिंदी शेतकरी मात्र दारिद्र्यात पिचत विव्हळत पडलेला असे.

'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात त्यांनी केवळ शेतकऱ्यांच्याच प्रश्नाची चर्चा केली

नाही. त्यांच्या जीवनाच्या दु:खकारक परिस्थितीचाच केवळ आढावा घेतला नाही तर अनेक भारतीय समूहांचे निर्बंध तपासले व विकासाला पायबंद घालणाऱ्या निर्बंधांची चर्चा केली. परदेशात जाऊ नये; अशी जी बंधने आहेत त्याला जबाबदार ब्राह्मण आहेत असे या ग्रंथात विधान आहे. हिंदू संकुचित दृष्टीने झाले याच्या अनेक कारणांपैकी परदेशगमननिषेध हे एक होय. बाहेरच्या जगाचा संबंध तुटला व स्वतःला ते उच्च प्रतीचे मानू लागले. यात ब्राह्मणांचा हेतू सफल झाला. त्यांना शूद्र सेवा करावयास, शेतीवर राबण्यास व कपडे विणण्यास गुलाम म्हणून लाभले. तथापि जोतीरावांच्या काळातील ब्राह्मणांना ही घोडचूक आहे हे कळले आणि आपल्या चुका सुधारण्याचे सोग करून ते म्हणू लागले की आपण आपल्या चालीरीतींची, रूढींची सुधारणा करू या. त्यावर जोतीराव म्हणतात, ते निव्वळ ढोंग होते.

जे ब्राह्मण शिक्षक खेड्यातील शाळांत शिक्षकाचे काम करीत, ते शिक्षकाची परीक्षा उत्तीर्ण झालेले नव्हते, ते अशिक्षित होते. ते शिकवण्याची कला कशी साधेल याची काळजी करण्यापेक्षा आपल्या सोवळ्या- ओवळ्याचीच जास्त काळजी घेत असत. ते स्वार्थी व ज्ञानशून्य होते. जर अब्राह्मण मुले शिकली व शासन यंत्रणेत घुसली, तर ब्राह्मणांना त्यांच्या दारी भीक मागावी लागेल, असे ते शेतकऱ्यांच्या मुलांना सांगत. ब्राह्मण इंग्रज अधिकाऱ्यांची खुशामत करीत. त्यांना मानपत्रे देत, त्यावर अज्ञानामुळे मूर्ख बनवलेले शूद्र सह्या करीत. या बहुमानाची परतफेड करण्यासाठी ब्राह्मणांना 'रावबहादूर' वा 'रावसाहेब' अशा पदव्या देत. यावरून जोतीरावांनी निष्कर्ष काढला, की या देशाला टोळधाड व दुष्काळ यांपासून वाचवणे शक्य होईल, पण ब्राह्मण नोकर जो कहर करत आहेत, त्यापासून कोणी वाचवू शकणार नाही.

जोतीरावांनी 'शेतकऱ्याचा आसूड' याच्या दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी म्हटले की, आपण सरकारी खात्यांतील ब्राह्मण नोकरांविरुद्ध जे आरोप केले, त्याची शहानिशा करायची असल्यास सरकारी न्यायालयाने दिलेले जे निर्णय प्रसिद्ध झाले आहेत त्यात किती ब्राह्मणांना शिक्षा झाली हे पहावे, म्हणजे खात्री पटेल. या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात त्यांनी एक महत्वाचा विचार मांडला. त्यात त्यांनी प्रजासत्ताक राज्याचे महत्व गायले आहे. शूद्रांनी प्रजासत्ताक पद्धती तोडली म्हणून त्यांना पापाचे प्रायश्चित्त म्हणून गुलामगिरी प्राप्त झाली. ग्रीकांनी आपली प्रजासत्ताक राज्ये टिकवून धरली. हे त्यांनी शूद्रांच्या निदर्शनास आणून दिले. जोतीरावांनी स्पार्टातील वीरांची स्तुती केली. इराणी सैन्याची त्यांची उडविलेली दाणादाण याचे वर्णन ग्रंथात आहे. रोमनांनी ग्रीकांपासून स्फूर्ती घेऊन हनीबॉलचा पराभव केला. जूलियस सीझर याने लोकराज्य बळकावून आपल्या हाती सर्व सत्ता केंद्रित केली. यास्तव जोतीरावांनी सीझरचा धिक्कार केला. सीझर हा प्रजासत्ताक राज्याच्या ध्येयापासून च्युत झाला होता, खुशामत करणारे सरदार त्याचे दास बनले होते. पण ब्रूटसने सीझरला ठार

मारून, अनियंत्रित कारभाराने लोकांवर जी संकटे कोसळतात त्यांपासून त्यांना वाचवले. यास्तव जोतीरावांनी ब्रूटसचे वर्णन 'महापवित्र स्वदेशाभिमानी' असे करून ब्रूटसचा गौरव केला आहे.

भारतातील परंपरागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष म्हणजे जोतिबा फुले होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली ? भारतातील परंपरावादी समाज संस्थांची व या समाजसंस्थांच्या नियमधर्माची पकड हजारो वर्षे येथील जनमानसात पक्की बसलेली होती. या ठिकाणी सामाजिक जन्मसिद्ध उच्चनीच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसांच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत, म्हणून यांच्या विरुद्ध प्रयत्न करणे, हे महापाप आहे अशी समजूत होती. या महापापाची म्हणजे अपवित्रतेची भीती येथील जनमानसात कायम घर करून बसली होती. ही खोलपणे सहस्रावधी वर्षे रुजलेली भीती घालवणारी जबरदस्त प्रेरणा जोतिबा फुले यांना कुठून मिळाली ? जोतिबा फुले यांच्या महात्मतेचे रहस्य जाणण्याकरता या प्रश्नाचा उलगडा करणे, ही आज अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. जोतिबा फुले यांना जी भयंकर सामाजिक बंधने दिसली, ते तोडण्याचे जबरदस्त शिक्षण त्यांना कुठून प्राप्त झाले, यांचे उत्तर शोधणे म्हणजेच त्यांच्या महात्मतेच्या रहस्याचा शोध घेणे होय. नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय, परंपरागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही. केवळ विनाशाकरता विनाश, म्हणून विनाशाकरिता प्रवृत्त होणे हे विध्वंसक अतएव विकृत मनोवृत्तीचे लक्षण आहे. जोतीबा फुले यांची मनोरचना अत्यंत निरामय होती, शाश्वत नैतिक सत्याच्या आधारावर त्यांची विचारसरणी अधिष्ठित होती. त्यांना उच्चतर सामाजिक विकासाला कारणीभूत होणाऱ्या चिरंतन मूल्यांचा प्रत्यय आला होता. जोतीबा हे 'सत्यशोधक' होते. हे सत्य मानवी जीवनाचे नैतिक सत्य होते. त्या चिरंतन सत्याचे स्वरूप म्हणजे विश्वमानवाच्या मुक्ततेचा सिद्धान्त. हा सिद्धान्त त्यांना आधुनिक पश्चिमी संस्कृतीने दिला व तो त्यांच्या काळी त्यांच्यासारख्या थोड्यांनाच घेता आला, इतरांना नाही.

आठ

सार्वजनिक सत्यधर्माचा आग्रह

सत्यशोधक जोतिबा यांनी अनेक पुस्तके व निबंध लिहिले. सत्यशोधक समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचा प्रयत्न केला. या आंदोलनाच्या मुळाशी काही विधायक स्वरूपाच्या ध्येयाचा विचार होता. हा विचार म्हणजेच मूलभूत मानवी हक्कांचा विचार होय. समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय. 'गुलामगिरी' व 'सार्वजनिक सत्यधर्म' दोन मूलभूत पुस्तके एकत्र वाचली म्हणजेच त्यांच्या वैचारिक मूल्यांची जाणीव होते. 'गुलामगिरी' मधील विचार हे मुख्यतः विध्वंसक होते. या विध्वंसक विचारातून उत्पन्न झालेल्या प्रश्नांचे उत्तर त्यांच्या विधायक विचारांत, म्हणजेच 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात मिळते. 'गुलामगिरी' हे पुस्तक वाचले म्हणजे सत्याचा अर्धा भाग मिळतो. अर्धसत्य हे नेहमीच धोकादायक असते. 'गुलामगिरी'तील संदेश आपणास भारतातील परंपरागत, ब्राह्मण- प्रधान, धार्मिक व सामाजिक संस्कृतीच्या विरुद्ध उठाव करण्यास प्रेरीत करतो परंतु समोर असलेल्या परंपरागत समाजसंस्था नष्ट करून त्या जागी स्थानापत्र करावयाच्या सामाजिक संस्था ह्या ज्या तत्वांवर आधारलेल्या असल्या पाहिजेत, ती तत्वे त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात विशद करून सांगितली आहेत. ती तत्वे म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही होत. ही तत्वे गृहीत धरली म्हणजे जोतिबांना दिसलेल्या सत्यांचे पूर्ण स्वरूप दृष्टीसमोर येते.

'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाचे योग्य व आवश्यक तितके मूल्यमापन केल्याशिवाय, जीवनातले जे सत्य शोधण्यासाठी जोतीबा जीवनसंग्राम चालवीत होते त्याचा खराखुरा अर्थ कळणे अशक्य आहे. हे पुस्तक जोतीरावांनी अर्धांगाचा झटका आल्पानंतर उजवा हात लुळा झाल्यावर, शरीरातील व्यथा सहन करीत, डाव्या हाताने लिहून पुरे केले आहे. 'गुलामगिरी'

मध्ये जे सत्य दाखविले आहे ते अर्धसत्य आहे, त्याची दुसरी बाजू लक्षात घेतली नाही तर ते भयानक ठरेल, अशी त्यांची भूमिका होती. म्हणून शारीरिक व्यथा सहन करीत त्यांनी हे पुस्तक लिहून काढले. जोतीबांच्या विश्वकुटुंबवादाचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विशद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' मध्ये जोतीबांच्या महात्मतेचे तेजोवलय पूर्ण प्रकट झाले आहे. या तेजोवलयाचे तीन भाग आपल्या दृष्टीसमोर पडतात. ते म्हणजे मूलभूत मानवी हक्क, त्यांवर आधारलेला विश्वकुटुंबवाद आणि जीवनाचे व विश्वाचे सत्यस्वरूप प्रकट करणारा बुद्धिवाद हे होत. पश्चिमेकडून म्हणजे आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीकडून जोतीबांना या तीन प्रेरणा मिळाल्या. या तीन प्रेरणांतच त्यांची लोकशाही जीवनदृष्टी सिद्ध होते.

मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व कशा प्रकारची वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे यासंबंधी 'सार्वजनिक सत्यधर्मा'त तेहेतीस कलमी नियम मांडले आहेत. या कलमांचा सारांश शक्यतो जोतीबांच्या शब्दात असा :

"एकंदर सर्व गावांच्या, प्रांतांच्या, देशाच्या व खंडाच्यासंबंधाने अथवा कोणत्याही धर्मांतील मताच्या संबंधाने, स्त्री आणि पुरुष या उभयतांनी अथवा सर्व स्त्रियांनी अथवा पुरुषांनी, एकमेकांत एकमेकांची कोणत्याही प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून रहावे.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने, एकंदर सर्व प्राण्यांना उत्पन्न करते वेळी, मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यांस आपापसांत सारख्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.

"आपणा सर्वाच्या निर्माणकर्त्याने, एकंदर सर्व स्त्रियांस अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्कांविषयी आपल्यास पाहिजे तशी मते बोलून दाखवण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु त्या विचारांपासून व मतांपासून कोणत्याही प्रकारे नुकसान मात्र होऊ नये अशी खबरदारी ठेवावी. त्यास सत्य वर्तन म्हणतात.

"आपणा सर्वाच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व स्त्री-पुरुषांस, एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवाची टोळी, एखाद्या व्यक्तींवर जबर करू शकत नाही व त्याप्रमाणे जबर न करणाऱ्यास सत्य वर्तन करणारे म्हणतात.

"आपणा सर्वाच्या निर्माणकर्त्याने, सर्व मानव स्त्री-पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखाद्यास कोणत्याही तऱ्हेचे नुकसान देत नाही अथवा जो कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देता नाही, त्याला सत्यवर्तन करणारा म्हणतात.

"आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्यांस संतोष देण्यासाठी केलेले वर्तन याला सार्वजनिक सत्य म्हणतात. जो कोणी इतर मानव बंधूंबरोबर सत्य आचरण करील नीती म्हणावी. मग ती स्त्री असो पुरुष असो, तो कोणीही मानव असो, सत्यशोधक समाजसेवक असो अथवा एखादा गावडेकर असो

"या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी पुस्तके लिहिली आहेत त्यापैकी काही ग्रंथात आरंभापासून शेवटपर्यंत सार्वजनिक सत्य होय, असे प्रत्येक धर्मपुस्तकात म्हटले आहे. पण काही व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगास अनुसरून प्राण्यांना सारखे हितकारक न होता सहाजिकच माणसांमध्ये अनेक भेद निर्माण करून ठेवले. ते एकमेकांचे मनापासून हेवा व द्वेष करतात. प्रत्येक व्यक्तीस मानवी अधिकारांचा यथायोग्य उपभोग घेता यायलाच हवा.

"आपल्या या सूर्यमंडळासहित पृथ्वीचा निर्माणकर्ता जर एक आहे तर तिजवरील अनेक देशांतील लोकांनी एकमेकांशी वैरभाव माजवून प्रत्येकामध्ये देशाभिमान व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजविले आहे ? त्याचप्रमाणे पृथ्वीवरील अनेक देशांतील सर्व नद्या या महासागरात मिळत असतात. त्यापैकी एका देशातील नदी तेवढी पवित्र कशी होऊ शकेल? या पृथ्वीच्या पृष्ठभागावर एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून त्यापैकी काही लोक पिढीजात पवित्र बनतात, ते श्रेष्ठ कसे होऊ शकतील? सर्वांना सारखे जन्म- मरण असून ते सर्वाप्रमाणे सद्गुणाने व दुर्गुणाने निपुण नाहीत का ? कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता एकंदर सर्व मानवांपैकी जे कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करताना जगाच्या कल्याणासाठी सतत कर्म करीत असतात, ते आर्य असो अथवा अमेरिकेतील असो, अथवा ज्याला तुम्ही नीच मानता, असा एखादा (चांडाळ) मृतप असो, ते अन्नदान घेण्यास पात्र आहेत. त्यालाच अन्नदान केल्याने निर्मिकाला आनंद होणार आहे."

वरील विचार वाचले म्हणजे विचक्षण वाचकांच्या ध्यानात येते, की हे विचार भारतातील लोकशाही क्रांतीच्या अग्रदूताचे विचार होत. सर्व मानवांचे जे जीवन व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता यांनी भरले आहे, ते सामाजिक जीवन हेच पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य होय. अशा तऱ्हेचा निर्वाळा जोतीबा अनेक ठिकाणी देतात. पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य ही कल्पना जोतीबांना खिश्चन धर्मापासून मिळाली असावी असे स्पष्ट दिसते. आदर्श लोकशाही जीवनपद्धती आणि विश्वकुटुंब यांस पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य असे जोतीबा म्हणतात. ख्रिश्चन धर्माच्या कल्पनेहून निराळे पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य आदर्श म्हणून आपल्यापुढे ठेवले आहे. जोतीबा राष्ट्रवादी नव्हते. परंतु 'राष्ट्र' म्हणून संबोधन करताना त्यांच्या मताप्रमाणे "स्वातंत्र्य आणि समता यांच्यावर आधारलेला प्रादेशिक समाज" असा राष्ट्र याचा अर्थ होतो. जातीजातीत व धर्माधर्मात निबद्ध झालेल्या समाजांची गाठोडी म्हणजे राष्ट्र नव्हे असे ते अनेक ठिकाणी सांगतात. त्यांच्या मताने कोणताही प्रादेशिक समाज हा विश्वसमाजाचा एक घटक म्हणूनच राहिला पाहिजे. मानवांना धर्मसंस्थांनी एकमेकांपासून विभक्त व एकमेकांचे शत्रू बनवून

ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी भेद पाडले आहेत, हे भेद भयानक धर्मकल्पनांवर आधारलेले आहेत, असे ते वारंवार सांगतात. धर्मग्रंथ हे ईश्वरप्रणीत किंवा ईश्वरी प्रेरणेने निर्माण केले आहेत, असे म्हणणाऱ्या धर्मसंस्थांचा त्यांनी निषेध केला. धर्मात जे जे काही सांगितलेले असते ते सत्य होय, ही अंधश्रद्धा नाहीशी झाली पाहिजे, असाही ते वारंवार इशारा देतात. जगतात सर्व धर्म हे गैरसमजांवर व अंधश्रद्धेवर उभारले आहेत, यांच्यामध्ये जे जे काही सांगितले आहे ते सत्य आहे असे आपण म्हणता कामा नये, असे ते म्हणतात.

'निर्मिक म्हणजे ईश्वर.' जोतिबांनी विश्वनिर्माणकर्त्यास 'निर्मिक' हा नवीन शब्द वापरला आहे. याचे कारण जगातील सर्व ईश्वरवाचक जे जे प्रचलित शब्द आहेत, त्या शब्दांच्या पाठीमागे आराधना, भक्ती किंवा पूजा करण्याचे एक निरनिराळे कर्मकांड आहे. ते सर्व कर्मकांड व्यर्थ व मानवांच्यामध्ये सामाजिक फूट पाडणारे आहे असे त्यांचे मत आहे. म्हणून त्यांनी ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म इत्यादि ईश्वरवाचक रूढ शब्द काढून टाकले. मानवाची सेवा किंवा मानवी समतेचे व स्वातंत्र्याचे रक्षण ही खरी ईश्वराची पूजा होय असे ते म्हणतात.

जोतीरावांचा 'निर्मिक' एक मोठा विषय आहे. दहावे प्रकरण 'निर्मिक म्हणजे ईश्वर' या जोतीरावांच्या संकल्पनेला दिलेले आहे.

नऊ

शेवटची सात वर्षे

जोतीरावांच्या झेंड्याखाली ब्राह्मणेतर जनता मोठ्या संख्येने जमू लागली. सत्यशोधक समाजाचा एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे पुरोहितावाचून धार्मिक विधी, लग्नसंस्कार, घरभरणी इत्यादी कार्ये समारंभरूपाने करणे. बाळाजी कुसाजी पाटील नावाच्या गृहस्थाने आपल्या मुलाचे लग्न सत्यशोधक समाजाच्या नियमाप्रमाणे ब्राह्मणावाचून संस्कार करून केले. ब्राह्मण पुरोहिताच्या अनुपस्थितीमुळे विवाह यथाविधी झाला, असे म्हणता यावयाचे नाही, असे ब्राह्मण म्हणू लागले. पुणे जिल्ह्यातील ओतूर या खेडेगावात भोवतालच्या गावातील ब्राह्मणांची एक सभा भरली. 'ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्न लावणे हे ब्राह्मण पुरोहितांच्या हक्कावर आक्रमण होय,' असा ठराव त्यांनी केला. ओतूरच्या ग्रामपुरोहितांनी बाळाजी कुसाजी यांच्याविरुद्ध न्यायलयात खटला चालवला. ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्नसंस्कार करणे – विशेषतः ग्रामपुरोहिताशिवाय लग्न करणे—अयोग्य होय. ग्रामपुरोहिताला बोलवा, नका बोलवू, दक्षिणा मात्र पोचलीच पाहिजे असा निवाडा न्यायाधीश महादेव गोविंद रानडे यांनी केला. या निवाड्यामध्ये दोन महत्त्वाच्या गोष्टी न्याय्य ठरल्या. (१) संस्कार करण्याचा ब्राह्मण पुरोहिताला अधिकार आहे आणि (२) ग्रामपुरोहिताला बोलवा वा नका बोलवू, यजमानाने ग्रामपुरोहिताला दक्षिणा दिलीच पाहिजे.

हा महादेव रानडे यांचा निवाडा अखेर अमान्य झाला. बाळाजी पाटील याच्या बाजूने जोतीराव उभे राहिले. खालच्या न्यायालयात विरुद्ध निकाल लागला तरी वरच्या न्यायालयात पाटलांच्या बाजूने निकाल लागला. या खटल्याची महाराष्ट्रभर चर्चा झाली.

जोतीरावांनी शेतकऱ्यांची एक नवीनच चळवळ उभारली. शेतकऱ्यांनी एक वर्षभर जमिनी तशाच पाडून ठेवल्या. शेवटी सरकारी अधिकारी, सावकार व जमीनदार यांनी शेतकऱ्यांचे पुढारी जोतीराव यांच्याशी तडजोड केली. जोतीरावांनी असे दाखवून दिले, की

शेतकऱ्याचे दारिद्र हा सावकारांच्या लबाडीचा परिणाम आहे. सरकारने त्याकरता रिलीफ ॲक्ट केला. 'डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट' असे त्याचे नाव होते. कमी व्याजात शेतकऱ्याला कर्ज मिळणे त्यामुळे शक्य झाले आणि मुख्यतः कर्जापायी जमिनीची मालकी गमावण्याची आपत्ती टळली.

देशी संस्थानांमध्ये आपल्या चळवळीचे लोण पोचावे अशी जोतीरावांनी अपेक्षा बाळगली. त्याकरिता तरुण, लोकहितदक्ष, नुकतेच गादीवर आलेले सयाजीराव गायकवाड यांच्याशी जोतीरावांनी १८८४ मध्ये भेट घेतली. जोतीरावांची नि:स्वार्थ बुद्धी आणि शुद्ध चारित्र्य या गुणांमुळे तरुण महाराजांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. जोतीरावांनी बडोद्यात काही प्रमुख ठिकाणी व्याख्याने दिली, सयाजीराव महाराजांच्या समोर काही ठिकाणी व्याख्याने दिली. बडोद्याला ते अनेक वेळा गेले. दुसऱ्या भेटीत 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथाची प्रकरणे महाराजांना वाचून दाखविली. महाराजांवर या व्याख्यानांचा परिणाम झालाच. त्यांनी ब्राह्मणांना खिचडी देण्याची संस्थानाची प्रथा या व्याख्यानानंतर बंद पाडली.

सत्यशोधक समाजाच्या नेत्यांनी एप्रिल १८८५ मध्ये पुणे येथे गुढीपाडव्याच्या दिवशी एक मोठी मिरवणूक काढली. कार्यकर्त्यांचा आणि वजनदार व्यक्तींचा मोठा समुदाय या मिरवणुकीत जमला होता. हिरव्या-पिवळ्या रंगांचे ध्वज या मिरवणुकीत फडफडत होते. मिरवणुकीच्या अग्रभागी बँड लावला होता. मागाहून महार वाद्ये वाजवीत व गीते गात चालले होते. महारांच्या मागून ताशे वाजंत्री वाजत होती. त्यांच्या मागून ढोल व तुतारी वाजवणाऱ्यांचा ताफा चालला ओता. मिरवणुकीमध्ये लोकांचा मोठा समुदाय आणि समाजात मानमान्यता असलेल्या प्रतिष्ठित व्यक्ती दिसत होत्या. स्वतः जोतीराव, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, महादेव गोविंद रानडे, कृष्णराव भालेकर, डॉ. सदोबा गावडे, एल्. के घोरपडे, देवराव ठोसर, एच्. एल्. नवलकर प्रभृती व्यक्ती सामील झाल्यामुळे या मिरवणुकीला मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. भवानी पेठेतील विठोबाच्या देवळापासून सायंकाळी चार वाजता निघालेली ही मिरवणूक डॉ. सदोबा गावडे यांच्या घराजवळ रात्री नऊ वाजता पोचली. लगेच जोतीराव, रानडे, अय्यावारू इत्यादींची भाषणे झाली.

मराठी साहित्यिकांची दुसरी वार्षिक परिषद २४ मे, १८८५ रोजी पुण्यातील सार्वजनिक हॉलमध्ये कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. सुमारे तीनशे साहित्यिक उपस्थित होते. उपस्थित राहू न शकणाऱ्यांची पत्रे वाचण्यात आली. अशी त्रेचाळीस पत्रे होती. त्यात जोतीरावांचे पत्र प्रथम वाचण्यात आले. जोतीरावांचे पत्र त्यांच्या आयुष्यातील ध्येयवादाची थोडक्यात, खणखणीत शब्दांत मांडणी करणारे आहे. गरीब, बहुसंख्य जनतेच्या प्रश्नांना तोपर्यंत मराठी साहित्यात महत्त्वाचे क्वचितच दिले जात होते.

१८८५ सालच्या पावसाळ्यात सयाजी महाराज गायकवाड पुण्यात दोन महिने राहिले

होते. जोतीरावांनी महाराजांच्या सन्मानार्थ एक मोठा समारंभ घडविला. या समारंभात महादेव गोविंद रानडे, डॉ. भांडारकर, जोतीराव फुले यांची भाषणे झाली. महादेव गोविंद रानडे यांचे एक महत्त्वाचे भाषण झाले. ज्ञानप्रकाश पत्रामध्ये रानडे यांच्या भाषणाची प्रशंसा करण्यात आली व जोतीरावाच्या भाषणाबद्दल नाखुषी व्यक्त करण्यात आली. ज्ञानप्रकाशातील टीकेला उत्तर म्हणून जोतीरावानी १८८५ जून महिन्यात 'इशारा' नावाची पुस्तिका लिहिली. त्यात रानड्यांच्या विचारांचे खंडन मुख्यतः आहे. आहे. त्यातील अनेक मुद्दे सद्यस्थितीत लागू नसले, तरी तत्कालीन परिस्थितीचा अर्थ समजण्यास उपयुक्त ठरतील. त्यात इंग्रज सरकारच्या अमलाचे स्वागत केले आहे.

'इशारा' या पुस्तिकेत दुसऱ्या बाजीरावाच्या राज्यात शेतकऱ्यांचे जे अनन्वित हाल झाले, त्याचे हृदयद्रावक वर्णन केले आहे. त्याचे राज्य परमेश्वराने हरण करून शूद्रादी-अतिशूद्र प्रजेस परमन्यायी हितावह, सौख्यकारक, सदाचारी आणि शांत असे राज्य इंग्रज सरकारच्या अंमलाखाली प्राप्त करून दिले. सबब ती प्रजा ईश्वरास रात्रंदिवस अशी प्रार्थना करीत आहे, की हे प्रभो, हे राज्य चिरकाल असू देत; कारण हे राज्य झाल्यामुळे पूर्वीच्या राज्यात भटशाहीमध्ये जुलूम होत असत, त्या सर्वातून प्रजा सुटली.

ह्या पुस्तिकेत जोतीरावांनी एका ब्राह्मण सावकाराची गोष्ट दिली आहे. ती वाचून अंगावर शहारे येतात. ब्राह्मण सावकार, मारवाडी आणि दुसरे सावकार शेतकऱ्यांची जमीन कशी लुबाडीत, गोड बोलून खोटे दस्तऐवज बनवून त्यांना कसे भिकेस लावीत, यांचे हृदयद्रावक वर्णन केले आहे.

जोतीरावांनी 'सत्सार' नावाची एक पुस्तिका जून १८८५ मध्ये प्रसिद्ध केली. या पुस्तिकेमध्ये संवाद आहेत. पहिल्या प्रकरणात पंडिता रमाबाईच्या धर्मांतरासंबंधी उल्लेख आहे. रमाबाईंविषयी आदरपूर्वक चर्चा आहे. ब्राह्मण संख्येने लहान असताना त्यांच्या दसपट संख्येने असणाऱ्या ब्राह्मणेतरांवर त्यांनी प्रभुत्व आणि सत्ता कशी गाजवली ? असा प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर जोतीरावांनी प्रतिप्रश्न विचारून दिले. मूठभर महंमदी व इंग्रज कोट्यवधी हिंदूंचे भूपती कसे झाले ? तसेच हे घडले. ब्राह्मण धर्माने देवांस फसविले व शूद्रांवर गुलामगिरी लादली.

या पुस्तिकेच्या दोन हजार अंकांपैकी जोतीरावांच्या मित्रांनी १०५० प्रती विकत घेऊन निरनिराळ्या गावी वाटल्या. या पुस्तिकेच्या शेवटच्या भागात जोतीराव आणि एक ब्राह्मण यांतील एक संवाद दिला आहे. ब्राह्मणांशी ते नेहमी काहीसे कडवटपणे व खरमरीत सुरात बोलत असत. तरी जोतीरावांचे जिवश्चकंठश्च मित्र ब्राह्मण जातीतले होते.

जोतीरावांनी सत्सारचा दुसरा अंक ऑक्टोबर १८८५ मध्ये प्रसिद्ध केला. इंग्रजी राज्यात स्त्रियांचा सर्वतोपरी छळ झाला व होत आहे ही सर्व पुरुषांची ठकबाजी स्त्रियांच्या डोळ्यांपुढे मांडावी म्हणून या अंकात थोडासा प्रयत्न केला आहे. हिंदू धर्मशास्त्रात स्त्रियांविषयी जे

अन्यायी, जुलमी व पक्षपाती धोरण आखले, त्याविषयी जोतीरावानी त्यांच्यावर कडाडून हल्ला केला. स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली. स्त्री- शिक्षणाचा व त्यांच्या उद्धाराचा इतिहास लिहिणाऱ्या प्रामाणिक इतिहासकारांनी नोंद घ्यावी, इतका तो चांगला आहे. दोन अंकांनंतर सत्सारचा अंक निघाला नाही. त्यानंतर 'अस्पृश्यांची कैफियत' नावाची एक पुस्तिका त्यांनी लिहिली. कल्पना केली आहे, की एक महार आणि एक मांग हे भारताच्या दौऱ्यावर निघालेल्या महाराणी व्हिक्टोरियाला आपल्या वस्तीत येण्याचा आग्रह् करीत आहेत. ते म्हणतात की तुमच्या राज्यात आमची काही सुधारणा झाली आहे का, ते पहा. महाराणी त्यांच्या वस्तीला भेट देते. तिला ते म्हणतात, की पेशव्यांच्या राज्यात अस्पृश्यांना फार निर्दयतेने वागवीत असत, त्यांना कुत्र्यामांजराचे जीवन जगावे लागे, त्या काळी त्यांना इमारतीच्या पायाखालीसुद्धा जिवंत गाडीत असत. जबरदस्तीने वेठीस धरीत असत. ब्रिटिश राजवटीत त्यांचे जीवन सुरक्षित झाले. परंतु रस्त्यातून त्यांना अजून मोकळेपणाने चालता येत नाही. बाजारात ते मोकळेपणाने फिरू शकत नाहीत. दारिद्र्यामुळे ते आपली मुले शाळेत पाठवू शकत नाहीत. महाराणीने असे आश्वासन दिले, की तुमच्या गाऱ्हाण्यांची चौकशी माझे सरकार करील.

अस्पृश्यांचे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने जोतीरावांनी एक महत्त्वाची कामगिरी केली. त्यांनी प्रत्यक्ष अस्पृश्य समाजातच कार्यकर्ते निर्माण केले. अस्पृश्य वस्त्यांना ते नेहमी भेट देत आणि त्यातील उत्साही व बुद्धिमान तरुणांनी अस्पृश्यांच्या कल्याणासाठी झटावे म्हणून उत्तेजन देत. त्यांना लिहायला व भाषणे करायला शिकवीत. समाजकार्य कसे करावे याचे मार्गदर्शन करीत.

अशा कार्यकर्त्यांपैकी गोपाळबाबा वलंगकर हे आद्य व प्रमुख होते. ते जोतीरावांचे विद्यार्थी. शिकवणीने व मार्गदर्शनाने ते लेखक झाले, पट्टीचे प्रचारक झाले; उत्तम वक्ते बनले. लष्करातील पायदळ विभागात त्यांची नोकरी होती. ती कालांतराने सोडली. अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले. दीनबंधू आणि सुधारक या साप्ताहिकांमध्ये त्यांनी बरेच जळजळीत लेख लिहिले. गावोगावी फिरून महारमांगांमध्ये व्याख्याने देऊन जागृती निर्माण केली. अस्पृश्यता ही मानवनिर्मित आहे; देवनिर्मित नाही, असा विचार वलंगकर चांगला विस्तृत युक्तिवादावर आधारून जनतेला पटवून देत. वलंगकरांनी या संदर्भात १८८८ मध्ये एक पुस्तिका लिहिली. त्यात अस्पृश्यता देवनिर्मित कशी आहे हे सिद्ध करा, असे सनातनी जातिभेदांवर श्रद्धा असलेल्या हिंदुंना आव्हान दिले. त्यांनी अनेक संस्था स्थापल्या. १८९५ च्या 'सामाजिक परिषदेमध्ये' स्फूर्तिदायक भाषण केले.

जोतीरावांनी अनेक गद्यग्रंथ लिहिले. त्याबरोबरच ठसकेदार, खडबडून जागे करणाऱ्या मराठी शैलीत अभंग लिहिले. स्वतःच्या अभंगाला त्यांनी 'अखंड' अशी संज्ञा दिली. जोतीरावांनी सत्यशोधक समाजाच्या सभासदाकडे होणाऱ्या विवाहाच्या वेळी, सुरेल

आवाजात म्हणता येतील अशी मंगलाष्टके रचली. ती 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात दिली आहेत. या मंगलाष्टकांचे वैशिष्ट्य असे, की वधू आणि वर यांनी आळीपाळीने स्वतः मंगलाष्टके म्हणायची आणि उपस्थित पाहुणे मंडळींना त्या नूतन वधुवरांस एका पद्यात आशीर्वाद द्यावयाचा.

सत्यशोधक समाज आणि प्रार्थनासमाज या दोन्ही संस्था धर्मसुधारकांनी स्थापलेल्या, परंतु त्यांच्यामध्ये एकमेकांबद्दल सहानुभूतीची भावना नव्हती. कनिष्ठ वर्गाच्या उद्धाराचे कार्य हा सत्यशोधक समाजाचा विचारविषयक होय. प्रार्थना समाजाच्या मंडळीचे धर्मसुधारणेचे व समाजसुधारणेचे विचार एक महत्त्वाची चळवळ निर्माण करू शकतील, अशा रीतीने मांडले जात नव्हते. सत्यशोधक समाज ब्राह्मणांविरुद्ध प्रखर लेखन आपल्या 'दीनबंधू' सारख्या नियकालिकात चालवीत असे. जोतीरावांचे अनेक भागीदार होते. ते हळूहळू या ना त्या कारणास्तव त्यांच्यापासून वेगळे झाले हे या पुस्तकात पहिल्या प्रकरणात सांगितलेच आहे. 'पूना कमर्शिअल अँड कॉंट्रॅक्टिंग' कंपनी जोतीरावांनी सुरू केली. मुंबईच्या बाजारात पुण्याहून भाजी पाठवण्याचे काम ही कंपनी करीत असे. जोतीरावांना हा धंदा फायदेशीर ठरला नाही.

पुणे नगरपालिकेच्या कामकाजात जोतीराव अत्यंत उत्साहाने भाग घेत असत. शहरातील कचरा गोळा करून एकत्र कोठे टाकायचा यासंबंधी जागा ठरविण्याकरिता नगरपालिकेने १८७९ मध्ये जोतीरावांची निवड केली. त्या काळी पुणे शहर एका मोठ्या वादळात सापडले होते. वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडाने पुण्यासह सर्व महाराष्ट्र गदगदा हादरून सोडला. या विषयी पूर्वी आम्ही लिहिले आहेच. पण येथेही पुन्हा लिहीत आहोत ते जोतिरावांच्या एका स्वभावपैलूचे दर्शन देण्यासाठी. फडक्यांच्या बंडानंतर दहा वर्षांनी जोतीरावांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहिले. त्यात फडक्यांचा उल्लेख अनादराने केला आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी फडक्यांना 'यः कश्चित दरोडेखोर' म्हणून तिरस्काराने निर्दिष्ट केले. महादेव रानड्यांनी 'माथेफिरू देशभक्त' म्हटले. वासुदेव बळवंत आणि जोतीराव यांचा चांगला परिचय होता. दोघांनीही लहुजीबुवा मांग यांच्याकडे शस्त्राचे शिक्षण घेतले होते. फडके या सहाध्यायाला जोतीरावांनी तात्त्विक विरोध असतानाही बंडात गुप्तपणे थोडी मदत केली ! कोणी म्हणतील याला पुरावा नाही. पण जोतीरावांच्या माणुसकीशी मात्र हे आम्ही सुसंगत मानतो.

ब्रिटिश सरकारने १८७० सालच्या शिक्षणविषयक कायद्याप्रमाणे इंग्लंडमध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा निर्माण करण्यास सुरवात केली. त्याचा प्रतिध्वनी भारतात जोतीरावांनी उमटविला. शेतकऱ्यांबद्दल कळवळा असणारे जोतीराव नवीन सुधारणा शेतकरी लवकर मान्य करीत नाहीत हे जाणून होते. अज्ञान आणि भोळेपणा यांच्यामुळे प्रत्यक्ष उदाहरण दाखवल्याशिवाय शेतकरी नवीन कार्यक्रम स्वीकारत नाहीत, हे जोतीरावांना माहीत

होते. म्हणून २०० एकर जमीन खरेदी करून नवीन पद्धतीची शेती करण्यास जोतीरावांनी प्रारंभ केला. कालव्याचे पाणीही घेण्यास शेतकरी उत्सुक नसत. जोतीरावांनी कालव्याचे पाणी घेतले व पुण्याजवळील माजरी जंगलात त्यांनी आंबराई तयार केली.

कामगारांची संघटना करून कामगारांना आत्मउद्धार करण्याचा कार्यक्रम आणि विचार देण्यास, सत्यशोधक समाजाच्या नेतृत्वाखाली व जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली आरंभ झाला. मुंबईत गिरण्यांचा धंदा सुरू करावा ही कल्पना १८५० साली डॉ. भाऊ दाजी लाड यांनी प्रथम मांडली. गिरण्यांचा धंदा सुरू झाला, वाढला. नारायणराव लोखंडे आणि रामजी संतूजी आवटे यांनी कृष्णराव भालेकर यांना संपादक करून पुणे येथे प्रकाशित करण्यास सुरवात केलेला 'दीनबंधू' मुंबईत प्रसिद्ध होऊ लागला. दामोदर सावळाराम यंदे या बहुश्रुत, तडफदार, मधूरभाषी, लोकसंग्रही आणि योजनाकुशल व्यक्तीकडे दीनबंधूचे प्रमुख संपादकत्व आले.

१८७५ च्या मार्चमध्ये गिरणी कामगारांच्या परिस्थितीचा विचार करण्यासाठी सरकारने मंडळ नेमले. त्यांचे सर्व समासद गिरणीमालकच होते. तरुण मुले आणि स्त्रिया यांना दिवसभर गिरण्यांमध्ये कष्ट करावे लागत. त्यावेळी मुंबईत ४१ गिरण्या निघाल्या. नारायणराव लोखंडे दीनबंधूमधून कामगारांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे कार्य करू लागले. पण दृष्टिकोन तडजोडीवादी ठेवावा लागे. त्यामुळे गिरणीमालक कामगार संघटनेच्या विरोधी नव्हते. परंतु कामगारांना अपरंपार कष्ट पडत. बहुतेकांना १४ तास काम करावे लागे. मोकळी हवाच मिळत नसे. लहान मुलांनाही गिरण्यांमध्ये शक्ती पिळून टाकणारी कामे करावी लागत.

कामगारांचा प्रश्न हा गरीब जनतेचा प्रश्न असल्यामुळे दीनबंधू नियतकालिक कामगारांचे प्रश्न परखडपणे मांडत असे. हे एकच पत्र कामगारांची बाजू मांडणारे होते. कामगारांच्या उद्धारार्थ वाहिलेले सत्यशोधकांचे मुखपत्र दीनबंधू हेच होते. जोतीराव आणि लोखंडे मुंबईत कामगारांच्या सभांतून भाषणे करीत. नारायणराव लोखंडे हे हिंदुस्थानातील कामगार संघटनेचे आद्य जनक म्हणून मानले जातात, याचे कारण १८८० साली त्यांनी आपली 'मिल-हॅण्ड असोशिएशन सोसायटी' स्थापन केली. त्याच सुमाराला सरकारने 'फॅक्टरी कमिशन' नावाचे एक मंडळ कामगारांची परिस्थिती पाहण्याकरिता नेमले. त्यावेळी लोखंडे यांनी 'फॅक्टरी कमिशन' वर कामगारांचा प्रतिनिधी निवडण्यासाठी परिषद बोलावली. त्या परिषदेने लोखंड्यांनाच प्रतिनिधी म्हणून निवडले. २५ जुलै १८८० रोजी भारतातील स्वदेशीचे आद्य पुरस्कर्ते पुण्यातील गणेश वासुदेव जोशी तथा सार्वजनिक काका निधन पावले. लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक काकांना श्रद्धांजली वाहणारी शोकसभा पुण्यात भरवण्यात आली. त्या सभेत जोतीरावांनी भावनाप्रधान भाषण केले. पुणे नगरपालिकेची जनहितदक्ष हालचाल जोतीराव फुल्यांमुळे अधिक तत्परतेने होऊ लागली. नगरपालिकेत काम करताना गरीब शेतकरी-दुकानदाराला

स्वस्त भाड्यात दुकान चालविण्याकरता जागा प्राप्त व्हावी याबद्दल जोतीरावांची खटपट असे.

जोतीराव १८८५ सालच्या सप्टेंबरात मुंबईस गेले होते, त्या वेळी कामगार वस्तीत निरनिराळ्या ठिकाणी त्यांनी व्याख्याने दिली, त्यांच्या व्याख्यानाचा विषय 'सामाजिक तत्त्वज्ञान' हा होता. जोतीराव ठाणे येथे सत्यशोधक समाजाच्या वार्षिक उत्सवालाही गेले. सत्यशोधक समाजाचे अनुयायी, कार्यकर्ते आणि नेते आपल्या नेत्याला मानाचा मुजरा करण्यासाठी तेथे प्रचंड संख्येने जमा झाले. त्यांचा उत्साह अमर्याद होता. या वार्षिक समारंभामध्ये असे ठरले, की 'सत्यशोधक निबंधमाला' नावाची पुस्तकमाला नारायणराव लोखंडे यांनी प्रसिद्ध करावी. त्याप्रमाणे लोखंडे यांनी निबंधमाला प्रसिद्ध करून, त्यात ब्राह्मणशाहीवर मोठा हल्ला केला.

इंग्रज राजवटीच्या विरुद्ध काही महत्त्वाचे प्रश्न जोतीरावांनी उपस्थित केले. १८८५ साली 'इंडियन नॅशनल काँग्रेस' ची स्थापना झाली. ती सामान्य गरीब बहुजन समाजाची दुखणी लक्षात घेईल, असा विश्वास जोतीरावांमध्ये नव्हता. काही काळाने लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारून सर्वसाधारण जनतेत जागृती केली. जोतीराव आपले टीकात्मक लेख 'दीनबंधू' पत्रात प्रसिद्ध करीत असत. जोतीरावांचे सार्वजनिक कार्य आणि ग्रंथ याच्यांकडे मामा परमानंद या मुंबईतील नेत्याचे लक्ष वेधले गेले. मामा परमानंद हे रानडे, तेलंग आणि भांडारकर यांनाही वैचारिक सल्ला देत असत. मामा परमानंद यांना जोतीरावांकडून मराठीतील पोवाडे वाङ्मयावरील रचना माहीत करून घेण्याची इच्छा झाली. जोतीरावांनी शिवाजीवर पोवाडा लिहिला होता. परंतु मराठीतील शिवाजीवरील प्रसिद्ध झालेले इतरांचे पोवाडे ब्राह्मणांना अकारण महत्त्व देत आहेत, असे जोतीरावांना वाटत होते. संत रामदासांचा मोठेपणा त्यांना मान्य नव्हता.

१८८५ साली पुण्यात नवीन मार्केट इमारत बांधून पूर्ण झाली. त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे यांचे नाव त्या इमारतीस देण्यात आले. व्यापारी मात्र त्यातील दुकाने भाड्याने घेईनात; कारण भाडे न परवडणारे होते. परंतु इमारत बांधण्याकरिता लाखो रुपये खर्च झाला. तो लक्षात घेऊन भाडे ठेवण्यात आले. असे महागडे मार्केट बांधण्यास जोतीरावांचा विरोध होता. या मंडईच्या इमारतीला मुंबईच्या गव्हर्नरांचे नाव दिले, तरी जोतीरावांचा विरोध चालूच राहिला. योगायोग असा, की या 'रे मार्केट' ला अलीकडे 'फुले मार्केट' हे नाव पडले आहे.

सत्यशोधक समाजाच्या ब्राह्मणविरोधी कार्यक्रमांप्रमाणे ब्राह्मणांवाचून लग्ने लावण्याची चळवळ सुरू झाली. जुन्नर तालुक्यातील तळवणे गावी गुणाजी बापूजी पाटील यांनी ब्राह्मण भटावाचून आपल्या घरचे लग्न केले. त्यामुळे ब्राह्मणाला दक्षिणा कपडे, इतर देणग्या आणि मेजवानी देण्यात जो पैसा खर्च व्हायचा, तो वाचत असे. जून १८८७ मध्ये या चळवळीचा

वेगाने विस्तार होऊ लागला. जोतीराव व त्यांचे अनुयायी यांनी ब्राह्मणांवाचूनचे लग्न-समारंभ निर्धाराने पार पाडण्याचा सपाटा चालविला. एका न्हाव्याचे लग्न अशाच पद्धतीने पार पाडण्यात आले. न्हावी आणि ब्राह्मण यांच्यामध्ये तेढ उत्पन्न झाली. ब्राह्मणांनी न्हाव्यांवर बहिष्कार टाकला व ब्राह्मणांनी एकमेकांच्या हजामती सुरू केल्या अशी हूल उठली. हा लढा दूरवर पसरला. ब्राह्मणांनी वेद टाकून वस्तरा हाती घेतला, अशी टीका सुरू झाली. वेदशाळेबरोबरच हजामतीचे तंत्र शिकविणाऱ्या शाळा ब्राह्मणांनी काढाव्या व ही नवीन विद्या शिकून घ्यावी, अशा तऱ्हेची टीका सुरू झाली.

जोतीरावांनी १० जुलै १८८७ रोजी आपले इच्छापत्र (मृत्युपत्र) केले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "मी निपुत्रिक असल्यामुळे एका विधवेचा यशवंत नावाचा मुलगा आम्ही पतीपत्नींनी मुलगा म्हणून स्वीकारला आहे. त्याच्या आईचे नाव काशी. आमच्या पश्चात स्थावर जंगम व इतर प्रकारची मालमिळकत याचा यशवंत मालक म्हणून राहील. आमच्या इतर कोणत्याही भाऊबंदांचा या मिळकतीवर मालकी हक्क नाही. यशवंत आज तेरा वर्षांचा आहे. तो वयात आल्यावर शूद्रातिशूद्र बांधवांचे आर्यभट ब्राह्मणांच्या कचाट्यापासून सुटका करण्याच्या चळवळीमध्ये आपले आयुष्य आणि आपले सर्वस्व खर्च करून जन्माचे सार्थक करील. आमचा अंत्यविधी करण्याचा यशवंतास मात्र अधिकार आहे. आम्हा उभयतांच्या शवास वडिलोपार्जित रिवाजाप्रमाणे मिठात घालून पुरावे. माझ्या शवावर आर्यभट ब्राह्मणजातीसह त्यांच्या अनुयायांचीसुद्धा सावली पडू देऊ नये.'

जोतीरावांना सर्व लोक 'तात्यासाहेब' म्हणून संबोधित. त्यांची देहयष्टी बळकट आणि आकर्षक होती. त्यांचा वचक लगेच बसत असे. अनेक लोक त्यांना प्रक्षोभक प्रश्न विचारीत. त्यांची उत्तरे ते शांतपणे देत. आपल्या अनुयायांनी विरोधी माणसांवर हात उगारू नये म्हणून ते आपल्या अनुयायांना शांत राहण्याची आज्ञा करीत. अस्पृश्यांच्या वस्तीत ते फेरी मारत. आईबाप कामावर गेलेल्या शेंबड्या मुलांना त्यांचे तोंड पुसून ते कुरवाळत. कित्येक वेळा खाऊ विकत घेऊन देत. घाणेरड्या शेंबड्या मुलांना ते जवळ बसवीत. जोतीरावांच्या ओळखीची मंडळी त्यांना याबाबतीत खोचून विचारत, तेव्हा गरिबीमुळे गलिच्छ कपडे आणि राहणी असते, आपले मन स्वच्छ धुतले पाहिजे; म्हणजे सहानुभूती आणि करुणा या आपल्याला गरीबांच्या जगात राहण्यास प्रवृत्त करील, असे उत्तर मिळे. एका फाटके कपडे घातलेल्या भिकाऱ्याला जोतीरावांनी आपल्या खांद्यावरील उपरणेच एकदा देऊन टाकले. जोतीराव ज्ञानदेवादिक संतांना मानीत नव्हते. तरी आळंदीला जात असत. कोणी हटकले तर, आळंदीला सुद्धा देव आहेत, असे उत्तर देत. आळंदीच्या यात्रेत यात्रेकरूंच्या घोळक्यात एक म्हातारा घेरी पेऊन पडला. त्यांनी त्याला जवळ घेऊन शुद्धीवर आणले; पाणी पाजले व भाकरी दिली.

जोतीरावांचे सहकारी नारायणराव लोखंडे आणि कृष्णराव भालेकर मतभेदांमुळे

दूर झाले हे मागे सांगितलेले आहे. जोतीरावांचा स्वभाव कडक होता. त्यांच्या करड्या वागणुकीमुळे अनेक मित्रांची मने दुखावली जात. जोतीराव अति कठोर भाषेत हल्ला करीत. व्याख्यानांमधून टीकेची आग ओतीत. त्यांच्याच मताचे, सत्यशोधक समाजाविषयी सहानुभूती बाळगणारे राजारामशास्त्र्यांसारखे जोतीरावांना संयमाची भाषा बोलण्याची वारंवार सूचना देत. ब्राह्मण जातीचा धिक्कार करणे आणि जाती-जातीमध्ये फूट पाडणे योग्य नाही, असे राजारामशास्त्र्यांसारखे समाजसुधारक त्यांना सांगत असत.

सन १८८८ हे वर्ष संकटाचे ठरले. चाळीस वर्षे समाजसुधारणेची आणि धर्मसुधारणेची चळवळ अखंडपणे चालविली. त्यांचा त्यांच्या प्रकृतीवर फारच ताण पडला. यावेळीच जोतीरावांच्या अनुयायांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता दाखवून त्याचा सत्कार करण्याचे ठरविले. जोतीरावांची वयाची साठ वर्षे पूर्ण झाली होती. त्यांचा जाहीर सत्कार करण्याचे सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांनी ठरविले. गावोगावच्या कार्यकर्त्यांना आमंत्रणे पाठविली. ११ मे १८८८ या दिवशी सत्कार झाला. सयाजीराव महाराज यांनाही आमंत्रण देण्यात आले. जोतीरावांना 'हिंदुस्थानचे बुकर टी वॉशिंग्टन' अशी पदवी द्यावी, असा निरोप दामोदर सावळाराम यंदे यांच्याकरवी सयाजीरावांनी पाठविला होता. मांडवी येथील कोळीवाज सभागृहामध्ये ११ मे १८८८ रोजी दुपारी भव्य समारंभ पार पडला. सभागृहात सामान्य जनतेची गर्दी उसळली. सभागृहात आणि बाहेरही लोक जमा झाले. सर्व नेत्यांनी भावनेने भरलेली भाषणे केली. दलित समाजाची चाळीस वर्षे दीर्घकाळ केलेल्या सेवेचे मोठ्या आदराने वर्णन करून भाषणे पार पडली. टाळ्यांच्या कडकडाटात 'महात्मा' ही पदवी अर्पण करण्यात आली. अमर्याद प्रेमभक्ती, कृतज्ञता कार्यकर्त्यांच्या भाषणांतून व्यक्त झाली. त्यामुळे जोतीराव गहिवरले. जोतीरावांनी उत्तरादाखल भाषण केले. त्यात सत्यशोधक समाजाच्या कार्यक्रमांचा आणि फतव्यांचा उहापोह जोतीरावांनी केला. कार्यकर्त्यांना जोतीरावांनी धन्यवाद दिले. 'महात्मा' ही पदवी त्यानंतर अनेकांना मिळाली. फुल्यांनंतरचे महात्मे म्हणजे गांधीजी होत.

जोतीरावांनी अंगिकारलेला, एका अर्थी दत्तक मुलगा यशवंत सोळा वर्षांचा झाला. त्या काळच्या रिवाजाप्रमाणे त्याच्या लग्नाला थोडासा उशीरच झाला होता. जोतीराव आणि सावित्रीबाई यांनी ग्यानोबा ससाणे या आपल्या मित्राकडे प्रश्न काढला. त्यांची मुलगी यशवंताला त्यांनी द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ग्यानोबा ससाण्यांनी त्वरित रुकार दिला. ससाण्यांची मुलगी राधा भावी सून म्हणून जोतीरावांनी घरी आणली व तिला अभ्यास करण्यास सवड दिली. जुलै १८८८ मध्ये जोतीरावाना अर्धांगवायुचा झटका आला. सयाजी महाराजांना बडोदे येथे ही अनिष्ट वार्ता मिळाली. सयाजीरावांनी ताबडतोब आर्थिक प्रश्न सोडविला. सप्टेंबर ते डिसेंबर १८८८ हे चार महिने जोतीराव अंथरूणास खिळले होते. त्या मुदतीत ग्यानोबा ससाणे यांच्याशी त्यांचा बराच पत्रव्यवहार झाला. आपल्या पत्रांवर

'सत्यमेव जयते' हे ब्रीदवाक्य ते लिहीत असत, ही गोष्ट त्या पत्रव्यवहारावरून लक्षात येते. हेच ब्रीदवाक्य स्वातंत्र्यानंतर भारताचे राष्ट्रीय बोधवाक्य झाले. ग्यानोबा ससाण्यांची मुलगी त्यांच्या घरी काही महिने राहिली. ही भावी सून बुद्धिवान आहे, तिची स्मरणशक्तीही चांगली आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. डिसेंबर १८८८ शेवटचा आठवडा संकटमय ठरला; अर्धांगवायूचा दुसरा झटका जोतीरावांना आला. त्या वेळी राधेने प्रेमळपणे व कर्तव्यनिष्ठेने जोतीरावांची सेवा केली.

'दीनमित्र' पत्रामधून भालेकर मोठ्या धडाडीने सत्यशोधक समाजाचा प्रचार करीत होते. 'सोवळ्या वर्तमानपत्रांचे कसब' या शीर्षकाखाली असलेल्या लेखात दीनमित्रकार म्हणतात, "आपल्या महाराष्ट्र देशात वर्तमानपत्रांचे पीक चढत्या मानाने येत आहे; परंतु शेतकरी, कारागीर वगैरे लोकांच्या सुधारणेसाठी बिलकूल प्रयत्न करीत नाहीत. लाखो रुपये दरसाल लोकल फंड घेत असता, सामान्यजनांची मुले ढ राहिली आहेत. दहा गावांस एकदेखील शाळा नाही. शेतकऱ्यांच्या नवीन कायद्यापासून सावकार ठार बुडाले, असे लिहितात; पण शेतकऱ्यांच्या झोपड्यांचे वासेसुद्धा सावकारांनी ठेवले नाहीत."

फेब्रुवारी १८८९ च्या पूर्वार्धात यशवंताचा विवाह झाला. सत्यशोधक समाजाच्या नियमांप्रमाणे मंगलाष्टके वधुवर आणि वऱ्हाडी मंडळी यांनी म्हटली. वऱ्हाडी मंडळींनी वधूवरांस आशीर्वाद दिला. १८८९ च्या नोव्हेंबरमध्ये जोतीराव अंथरुणास खिळले असता ब्रिटिश राजपुत्राचे आगमन झाले. पुणेकरांनी त्यांचा स्वागतसमारंभ मोठ्या गौरवाने केला.

या स्वागतसमारंभाची एक हकीकत अशी आहे: दीनबंधू सार्वजनिक सभेने कनिष्ठ वर्गातील मुलांना फुकट शिक्षण देणारी शाळा चालविली होती. राजपुत्र ज्या मार्गाने जाणार होते, त्या मार्गावर एके ठिकाणी या शाळेची मुले खालील वाक्ये लिहिलेल्या लाल आलवानाच्या पाट्या हाती धरून उभी होती. "आपल्या आजीला सांगा (महाराणी व्हिक्टोरियाला) आम्ही सुखी राष्ट्र आहोत; तथापि एकोणीस कोटी शिक्षणाशिवाय आहोत." ही वाक्ये वाचून राजपुत्र ड्यूक ऑफ कॅनॉट व गव्हर्नर यांना कळवळा आला. हिंदुस्थानातील ९५ टक्के जनता निरक्षर आहे, हे निदर्शनास आणण्याकरिता वरील वाक्ये उपयोगी पडली. कृष्णराव भालेकर या निदर्शनामागे होते. शेतकरी आणि अन्य गरीब ग्रामीणजन यांना फुकट सक्तीचे शिक्षण देणे आवश्यक आहे, हे यातून सुचवले जात होते. मुंबई येथे १८८९ डिसेंबरमध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसचे अधिवेशन भरले. तेथे सत्यशोधक कार्यकर्त्यांनी गवताचा पेंढा भरलेला शेतकऱ्याचा एक पुतळा उभारून काँग्रेसच्या मंडपापुढे लोंबत ठेवला. शेतकऱ्यांचे दारिद्र्य आणि दुःख यांची जाणीव राष्ट्रीय पुढाऱ्यांना व्हावी, असा त्याच्या पाठीमागे हेतू होता.

दहा

निर्मिक म्हणजे ईश्वर

जोतीरावांनी मृत्यूपूर्वी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथ लिहिला; पण तो त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत जोतीराव म्हणतात, "या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्ये निर्मिकाने अनंत सूर्यमंडळासह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित तत्संबंधी एकंदर सर्व प्राणीमात्रास उत्पन्न केले आहे. त्यापैकी आपण सर्व मानव- स्त्रीपुरुषांनी त्याचे स्मरण मनी जागृत ठेवून एकमेकांशी कोणत्या तऱ्हेचे आचरण केल्यामुळे त्यास आनंद होणार आहे; यास्तव मी त्यांच्या कृपेने एकंदर सर्व मानव- स्त्रीपुरुषांच्या हितासाठी हा लहानसा ग्रंथ रचिला आहे. तो सर्वांस ग्राह्य होऊन आम्ही सर्वांनी निर्मिकाच्या सत्यमय राज्याचा सारखा उपभोग घेऊ लागावे म्हणून माझी त्यापाशी मागणी आहे."

जोतीरावांनी जरी ब्राह्मण धर्मग्रंथांविरुद्ध बंड केले तरी ते हिंदू तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्वाला चिकटूनच राहिलेले दिसतात. देवाच्या राज्याची ह्या भूतलावर स्थापना व्हावी, ऐहिक साम्राज्याची नव्हे, हाच त्या तत्त्वाचा प्राण आहे.

जोतीरावांनी हिंदूंच्या भोळ्या समजुती, चालीरीती, कर्मठ नि तर्कदुष्ट संस्कार, धार्मिक विधी व धर्मतत्त्वे ह्यांचा त्याग केला आणि इतर हिंदू संस्कारांना साधे नि संक्षिप्त रूप दिले, हे सत्यशोधक समाजाच्या बहुतेक नेत्यांनी मान्य केले आहे.

डॉ. विश्राम रामजी घोले हे १८८८ सालच्या एप्रिल महिन्यात नोकरीतून निवृत्त झाले. त्यांनी जोतीरावांच्या या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते म्हणतात: "असत्य धर्म, मूर्तिपूजा व जातिभेद यांच्या योगाने हिंदुस्थानात किती गोंधळ व हानी झाली आहे, त्याचे ह्यात उत्तम रीतीने दिग्दर्शन केले आहे. परमेश्वर कसा आहे, त्याची आकृती कशी आहे, त्याला कोणी पाहिले नाही, असे असता त्याची मूर्ती कशी करिता येईल ? जातिभेद ज्या रीतीने हल्ली प्रचारात आहेत त्यापासून अनेक तोटे होत आहेत, हे सर्वांच्या लक्षात घेऊन चुकले आहे. त्याविषयी येथे आम्ही इतकेच म्हणतो की, हिंदुस्थानास निकृष्टदशा

प्राप्त होण्याला, परस्पर द्वेष वाढण्याला, अनेक तंटे उपस्थित होण्याला व आपणास दास्य येण्याला हे एक प्रखर कारण आहे.''

''सुमारे गेल्या चाळीस वर्षात,'' डॉ. घोले पुढे म्हणतात, ''रा. रा. जोतीराव गोविंदराव फुले यांनी धार्मिक व व्यावहारिक विषयांवर अनेक व्याख्याने दिली. स्वबांधवांशी वादविवाद करून लोकांच्या मनावरील भ्रम उडविला. काही ग्रंथ व पोथ्या लिहून लोकांस अर्पण केल्या. वर्तमानपत्रांत या विषयावर चर्चा करीत आले व करीत आहेत, अनेक कवने करून लोकांस उपदेश केला. इत्यादि कामे करून आपला देह लोकसेवेत झिजविला व अजून लोकसेवा करीत आहेत. त्यांनी धर्मप्रकरणी सत्यासत्य व कार्यकारण भाव यांचा शोध लावण्यास लोकांस संवयी लावल्या. अमूक चाली बऱ्या किंवा वाईट यांचा न्याय त्यांपुढे मांडला. मूर्तिपूजेचे खंडन केले. एकेश्वरी धर्माचे मंडन केले.''

''धर्म, कर्म व व्यवहार यांत लोक नाडले जाऊ नयेत म्हणून त्यांच्या समजुती पाडल्या, इत्यादि कार्ये करून त्यांनी लोकांवर सदुपकार केले. ह्यांच्या बहुत वर्षांच्या मेहनतीचे वृक्ष जिकडे तिकडे वाढून त्यांस आता फळे येऊ लागली आहेत व पुष्कळ लोक हळूहळू एका परमेश्वरास मानू लागले आहेत. असत्य धर्माचा भोपळा फुटत चालला आहे व त्यांतील मर्मे लोकांस समजू लागली आहेत. पुराणे ही केवल कादंबऱ्या व कल्पित गोष्टी आहेत असा लोकांचा समज होत चालला आहे.'' डॉ. घोले यांनी जोती- तत्त्व- प्रणालीचा निष्कर्ष काढला तो असा : ''एका ईश्वरास भजावे. सद्वर्तनाने वागावे. सर्वांनी बहिणभावंडांप्रमाणे वर्तावे. सर्व मनुष्यांना सारखेच हक्क असावेत. जातिभेद नसावा. स्त्रियांना व पुरुषांना सारखेच हक्क असावे. व हल्लीच्या अनेक वाईट चाली ज्यांचा संबंध धर्माशी लावला आहे, त्या सोडाव्या ह्या ग्रंथातील भाषा सुलभ आहे. ह्यातील हितोपदेश चांगला आहे. धर्मभोळेपणा व धर्मवेड, हा ग्रंथ वाचल्याने जाईल अशी आमची खात्री आहे. हा ग्रंथ यहुदी, ख्रिस्ती व मुसलमान वगैरे सर्व धर्मातील लोकांनी संग्रहास ठेवावा अशी आम्ही शिफारस करितो.''

जोतीरावांनी ''सत्यवर्तन केल्याशिवाय मानवप्राणी जगात सुखी होणार नाही'' ह्या तत्त्वाने सार्वजनिक 'सत्यधर्म पुस्तक' ग्रंथाला आरंभ केला आहे.

सत्य सर्वांचे घर ॥ सर्व धर्माचे माहेर ॥
जगांमाजी सुख सारे ॥ खास सत्याची ती पोरे ॥ १ ॥
सत्य सूखाला आधार ॥ बाकी सर्व अंधकार ॥
आहे सत्याचा बा जोर ॥ काढी भंडाचा नीर ॥ २ ॥
सत्य आहे ज्यांचे मूळ | करी धूर्तांची बा राळ ॥
बळ सत्याचें पाहूनी ॥ बहुरूपी जळे मनी ॥ ३ ॥
खरे सुख नटा नोव्हे || सत्य ईशा वर्जू पाहे ॥
जोती प्रार्थी सर्व लोकां ॥ व्यर्थ दंभा पेटूं नका ॥ ४ ॥

आपल्या ग्रंथात जोतीराव पुढे म्हणतात: "ह्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत, त्यांपैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे 'सार्वजनिक' सत्प नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काहीएक व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगास अनुसरून हेकटपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यांस सारखे हितकारक न होता, सहजच त्यांमध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात."

संबंध ग्रंथाचा सारांश शक्यतो जोतीरावांच्या शब्दांत थोडा पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही पुढीलप्रमाणे आम्ही देत आहोत: "जर निर्माणकर्ता आपण सर्व मानवांचा निर्मिक आहे तर एकंदर सर्व मानवी प्राण्यापैकी प्रत्येक व्यक्तीस त्याने कृपाळू होऊन एकंदर सर्व उत्पन्न केलेल्या मानवी अधिकारांचा यथायोग्य उपभोग घेता यावा असे घडून येत नसल्यामुळे त्यास अनेक प्रकारच्या दुःसह अडचणी सोसाव्या लागतात. पृथ्वीवरील अनेक देशांतील लोकांचा एकमेकांशी वैरभाव माजून प्रत्येकामध्ये देशाभिमानाचे व धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ माजले आहे. पृथ्वीवरील अनेक देशातील नद्या महासागरास मिळतात. त्यापैकी एकाच देशांतील नदी पवित्र कशी असेल ? कारण ती महापवित्र नदी श्वानाचे मलमूत्र पोटात घेऊन समुद्रात वाहून नेते. एकंदर सर्व मानवी प्राणी अवयवाने व बुद्धिकौशल्याने एकसारखे असून, त्यापैकी काही लोक पिढीजात पवित्र बनून श्रेष्ठ कसे होऊ शकतील ? सर्वासारखे त्यांस जन्ममरण व सर्वांप्रमाणे सद्गुणांत व दुर्गुणांत ते निपुण असतात.

"निर्माणकर्ता कसा नि कुठे आहे, हे जाणण्याची मनुष्याने इच्छा न केलेली बरी. विश्वाची पोकळी अथांग, अनंत आहे. एकाही दिशेचा मनुष्यास शोध लावणे अशक्य आहे. तेव्हा यत्किंचित मानवास निर्मात्याचा शोध लावणे अशक्य आहे. तो अज्ञेय आहे. कल्पित विष्णूच्या नाभिकमळातून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवांनाही निर्मात्याचे दर्शन झालेले नाही.

"पृथ्वीवरील पुष्पे नि सुवासिक पदार्थ मानवाच्या उपभोगासाठी निर्माणकर्त्याने उत्पन्न केले आहेत, तर ते त्याला वाहून त्याची पूजा करण्यात अर्थ नाही. स्वपरिश्रमाने आपल्या कुटुंबांचे पोषण करून रात्रंदिवस जगाच्या कल्याणासाठी झटणारे म्हणजे अज्ञानी मानव बांधवांस आपमतलबी व स्वकार्यसाधू लोकांच्या जाळ्यांतून मुक्त करणारे अशा सत्पुरुषांस फुलांच्या माळा करून ईश्वराच्या नावाने अर्पण कराव्यात म्हणजे पुष्पांचे सार्थक होईल.

"दगडाच्या मूर्तीवर पुष्पे वाहून नामस्मरण केल्यास मनुष्यास काही फायदा नाही. पीतांबर नेसून धूप घालून, नाक धरून, डोळे मिटून निर्मिकाचे दर्शन होत नाही. निर्मिकाच्या नामघोषाने आपल्या मात्यापित्यांचे पालनपोषण होणार नाही. आपल्या परिश्रमाने उदरनिर्वाह न करिता अथवा जगाच्या हितासाठी न झटता आपल पोट जाळण्याप्रीत्यर्थ बहुरूप्यासारखे ढोगी बैराग्याचे सोंग घेऊन सर्वकाळ भांग पिऊन तिच्या अमलांत अज्ञानी भोळ्या जगाचे मिष्टान्नावर नित्य ताव मारून जे निरर्थक नामस्मरण करितात ते विचारवंताच्या उपहासास

पात्र होतात. ईश्वराचे आभार मनात बाळगून सर्वांनी बहिणभावंडांसारखे वागले असता, एकंदर सर्व मानवप्राणी सुखी होऊन साक्षात निर्मिकाचा अंमल बसून त्याचे राज्य होणार आहे.

"निर्मिकाला नैवेद्याची जरुरी नाही. साधुपुरुषांना विपत्काल आला, तर त्यांना किंवा पंगु माणसांना साहाय्य केले तर निर्मिकास नैवेद्य अर्पण केल्याचे श्रेय मिळेल. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता एकंदर सर्व मानवांपैकी जो कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करून जगाच्या कल्याणासाठी सतत रात्रंदिवस झटतो, मग तो भटभिक्षुक असो किंवा रेडइंडियन असो किंवा मृतप असो, त्याला साहाय्य केले तर तो निर्मिकासच नैवेद्य अर्पण होणार आहे.

"स्वर्ग हे एक बुजगावणे आहे. सर्व धर्मपुस्तकात स्वर्ग वर्णिला आहे. तो कल्पित आहे. पृथ्वीवर असा स्वर्ग नावाचा भूभाग नाही.

"स्त्री आणि पुरुष ह्या उभयतांमध्ये स्त्री श्रेष्ठ आहे. सर्वांचे उपकार फिटतील, परंतु आपल्या जन्मदात्या मातु:श्रीचे उपकार फिटणार नाहीत. स्त्री घरात असल्याशिवाय घर शोभत नाही. ती निरपेक्षपणे सर्वांचा पाठिराखेपणा करते. स्त्री अबला असते. पुरुष लोभी नि धाडसी, तिला त्यांनी दडपून ठेविले. तिला मानवी हक्क समजू नये म्हणून तीस विद्या शिकविण्याचा प्रतिबंध केला.

"बहुपत्निकत्वाची चाल वाईट आहे. पुरुषाच्या लोभामुळे हेवा, द्वेष, नाना तऱ्हेचे निर्माण झाले. व्यसनी पुरुष स्वस्त्रीशी प्रतारणा करून अनेक बायका करितात आणि त्यांजबरोबर मन: कामना तृप्त करण्याचे नादात पडल्यामुळे नाना प्रकारचे घाणेरडे रोग निर्माण होऊन ते सर्व ठिकाणी पसरतात. मदोन्मत्त पुरुषाने रजस्वला स्त्रीबरोबर संग केल्यामुळे महारोग होतो. तो संततीतसुद्धा पसरतो. विधुर लावण्यवती अज्ञानी मुलीशी लग्न करून त्या अबलांच्या तारुण्यांत माती कालवितात. परंतु त्या मुली विधवा झाल्या म्हणजे त्यांना द्वितीय संबंध करावयास देत नाहीत. त्या गर्भपात, बालहत्या करतात. आर्यभटांनी विधवा विवाहास बंदी केली. भोळसर अज्ञानी कुळवाडी, सोनार वगैरे जातींतील लोकांनी त्यांचे अनुकरण केले. वैदिक काळी आर्य ब्राह्मणाला भावजयीशी संभोग करून मुले निर्माण करण्यास परवानगी होती.

"लोभी पुरुष दोन तीन लग्नाच्या बायका करून नांदतात. त्यासाठी धर्मग्रंथाचा आधार दाखवितात. दोन तीन नवरे करून एक एक स्त्री एका घरात नांदू लागली तर कसे होईल ? स्त्रियांस एक नियम व पुरुषांनी स्वार्थासाठी बनावट मतलबी धर्मपुस्तकांत स्त्रियांविषयी असे आपमतलबी लेख करून ठेविले आहेत.

"एकंदर सर्व मानवी प्राण्यांस कायिक व मानसिक पीडा दिली नाही म्हणजे त्यासच पुण्य म्हणावे. परोपकार पुण्याय पापाय परपीडनम्. धर्माच्या नावावर गरिबांची फसवणूक करून ब्राह्मणांना भोजन देणे म्हणजे पुण्य नव्हे. वेश्यागमन करणे, मटण दारू यांवर चैन करणे आणि ते झाल्यावर अस्पृश्यता पाळणे हे पुण्य नव्हे.

"जातिभेद पाळणे हा धर्म नव्हे. मानवी प्राण्यात मुळात जातिभेद आहेत हे थोतांड आहे. ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी हे जातिभेद निर्माण केले. जर हलाल खोरिणीची जात नीच मानली तर आपली माता त्याच वर्गाची ठरवावी लागेल आणि आपल्या आईला नीच म्हणणारा असा निर्दय, कृतघ्न कोणी मनुष्य नसेल. मानवप्राण्यांत त्यांच्या गुणावरून जातिभेद ठरविता येणार नाहीत. सद्गुण व दुर्गुण हे काही पिढीजात स्वभाव नाहीत. ब्राह्मणांची मुले स्वभावाने नेहमी शंकराचार्याच्या तोलाची सद्गुणी निपजत नाहीत. अतिशूद्र चांभाराची मुले सद्गुणी निपजल्यास शंकराचार्याच्या तोलाचे महामुनी होणार नाहीत, असे न्यायी पुरुषाच्याने म्हणवणार नाही.

"पशुपक्षी नि मानव यांत स्वाभाविक भेद आहे. तो भेद म्हणजे निर्मिकाने मानवप्राण्यास सारासार विचार करण्याची बुद्धी दिली आहे. बुद्धीहीन पशुपक्ष्यादी प्राणी या लोभी मानवांपेक्षा फार मोठे आहेत.

"धंदा म्हणजे धर्म नव्हे. हजामत करणे हा न्हाव्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. कपडे धुणे धोब्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. तो धंद्याने धोबी आहे. जातीने किंवा धर्माने नव्हे. अज्ञानी जनापासून लाच खाणे हा सरकारी कामगाराचा धर्म नव्हे, हे त्याचे सरकारशी दगेबाजी करण्याचे कसब होय. मेहनत न करिता अज्ञानी जनांस लुटून आयते खावे हा आर्यभटाचा धर्म नव्हे, ही उघड ठकबाजी होय. वेश्यांचा मुखरस पिऊन घरी आल्पाबरोबर सोवळेचार करणे हा सज्जन मानवांचा धर्म नव्हे. ही अपवित्रता होय. निर्वाहाकरिता पडझड जनावरे खाणे हा मांगमहार यांचा धर्म नव्हे. हा त्यांचा लाचारपणा, निरुपाय होय. रयतेचे संरक्षण करण्यासाठी रयतेकडून करपट्टी घेणे हे राजाचे कर्तव्यकर्म होय, धर्म नव्हे. बैरागी, गोसावी हे समाजाच्या जिवावर आपला निर्वाह करतात, ते आईतखाऊ होत.

"निर्मिकाने सर्वमानवी स्त्रीपुरुषांच्या सुखासाठी अन्न, फळे, फुले, पाणी निर्माण केली. परंतु मानव स्त्रीपुरुषांनी एकमेकांविषयी बहिणभावंडपणाची पवित्रवृत्ती जागृत न ठेविल्यामुळे जगामध्ये सत्याचा ऱ्हास होत गेला व त्यामुळे एकंदर सर्व जगात असंतोष होऊन दुःखाचे प्राबल्य झाले. सत्यास स्मरून वागल्याशिवाय त्यांमध्ये निर्मळ भाऊपणा जागृत होणार नाही.

"मानवांनी आपली माता, भगिनी, कन्या, सुना ह्यांना दासीसारखे वागविले. जर त्यांच्या मानवी हक्कांच्या आड ते आले नसते, तर जगामध्ये निर्मिकाचे राज्य होऊन एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुष संतोषी होऊन सुखी झाले असते. जसे माणसांनी तुम्हांसी वर्तावे आहे म्हणून तुमची इच्छा आहे, तसेच तुम्हीही त्यांशी वर्ता, असे महासत्पुरुषांचे वचन आहे.

"आर्याच्या धर्मात भट्टब्राह्मणांखेरीज बाकीच्या एकंदर सर्व लोकांस नीतीचा सारखा उपभोग घेण्यासारखी मुळीच मोकळीक नाही. रामायण व भागवत यांच्या इतिहासात एकंदर सर्व नीती खरी व विश्वसनीय नाही. जर रावण हा मानवाव्यतिरिक्त राक्षसाच्या जातीचा

होता, तर जनक राजाने या परजातीच्या रावणास आपल्या मुलीच्या स्वयंवराच्या समारंभास येण्याचे आमंत्रण दिले नसते. रामायणातील इतिहास खरा नाही. त्या वेळच्या गप्पाड्या नाटक्यांनी केवळ लोकांची मते रिझविण्याकरिता हा ग्रंथ कल्पून रचिला असावा. या सर्वांत नीतीचा गंध नाही.

"महंमदी धर्मात खुदाने निर्माण केलेल्या मानवास एकमेक भावंडाप्रमाणे मानितात. त्याचप्रमाणे एकंदर सर्व मानवांस त्याचे पवित्र कुराण वाचून पाहण्याची व त्याप्रमाणे आचरण करण्याची मोकळीक आहे. सर्वास बरोबरीचे हक्क देऊन त्याचबरोबर रोटी व बेटीव्यवहार सुरू करण्याची मोकळीक आहे.

"आपल्या सर्वांच्या निर्मिकास संतोष देण्यासाठी सार्वजनिक सत्याचे भय मनी धरून जो कोणी इतर मानवबांधवांबरोबर आचरण करील त्यास नीती म्हणावी. मग तो ख्रिस्ती असो, महंमदी असो, सत्यशोधक समाजीय असो, अथवा एखादा गावडेकरी अज्ञानी असो." राम आणि श्रीकृष्ण यांची काही बाबतीतली वागणूक देवाला शोभण्यासारखी नव्हती, असे जोतीरावांनी म्हटले आहे. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या बाराव्या नि तेराव्या अध्यायांवर कडक टीका केली आहे.

"देव, ब्रह्मलिखित, पूर्वसंचित, नशीब, प्रारब्ध, प्राक्तन, सुकृत, ललाटरेषा हे सर्व कल्पित धोरणाने मानलेले कर्म आहे. ते सर्व मिथ्या आहे. मना त्वाचि रे पूर्वसंचित केले, तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ॥ हे रामदासांचे म्हणणे चुकीचे आहे. स्वभावत: विद्या शिकण्याची गोडी नसेल तो मुलगा नापास झाला तर लोक म्हणतात, विद्या शिकणे त्याच्या दैवात नव्हते. एखाद्याने आपण होऊन अभ्यास केला, तर त्याच्या नशिबात विद्या होती असे म्हणतात. धंद्याची पूर्ण माहिती नसल्यामुळे व पूर्वतयारी न केल्यामुळे आणि अज्ञानामुळे अपयश येते.

"बायबल सर्वांना वाचण्याची मोकळीक आहे. कुराण सर्वांना खुले आहे. वेद सर्वांना खुले नाहीत. बायबल आणि कुराण ह्यांवर विश्वास असणाऱ्या लोकांना दुसरी कसली भीती वाटत नाही; वेदावर विश्वास असणारे भितात. कारण त्यांतली लबाडी उघडकीस येईल असे त्यांना वाटते. ब्राह्मणी ग्रंथ हे बाह्यातकारी धर्मसंबंधी, परंतु आतून ते शुद्ध राजकीय आहेत. वेद हे सार्वजनिक ईश्वरप्रणीत सत्याच्या नावाला बिलकूल शोभण्यासारखे नाहीत.

अकरा

सत्यवर्तन म्हणजेच धर्म

जोतीरावांनी धर्मासंबंधी आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकांत केली. सत्यवर्तन करणारे कोणास म्हणावे ? हा तो प्रश्न. जोतीरावांचे याबाबतचे म्हणणे आम्ही सारांश रूपाने आता सादर करत आहोत. "स्त्री पुरुषे हे उभयत: जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकाराचा उपभोग घेण्यास पात्र केल आहेत. असे कबूल करणारे त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. जे तारे, दगड यांची पूजा करिता विश्वाच्या निर्मिकास मान देतात, ते सत्यवर्तन करतात असे म्हणावे. निर्माणकर्त्याने निर्माण केलेल्या सर्व वस्तुंच्या यच्चयावत प्राणीमात्रास उपभोग घेऊ न देता ते निर्मिकास अर्पण करून जे त्याचे पोकळ नामस्मरण करतात ते सत्यवर्तन करत नाहीत.

"जे प्राणीमात्रांस कोणत्याही प्रकारचा निरर्थक त्रास देत नाहीत, ते सत्यवर्तन करतात. जे दुसऱ्यांस मानवी अधिकार उपभोगून देतात, त्यांना व्यक्तिश: वा सांधिकरित्या विरोध करीत नाहीत ते सत्यवर्तन करतात.

"सर्व स्त्रीपुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता आहे. जो दुसऱ्याचे हक्क समजून घेऊन इतरांस पीडा देत नाही, त्यांचे नुकसान करीत नाही तो सत्यवर्तन करणारा म्हणाल. पुरुषाने आपली पत्नी, स्त्रीने आपला पती ह्यांखेरीज इतर स्त्रीपुरुष बंधुभगिनी आहेत, असे जे विचार ठेवतात त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"सर्व स्त्रीपुरुषांस सर्व मानवी हक्कांविषयी आपले विचार, मते, बोलून दाखविण्यास अथवा लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे, परंतु त्या विचारांपासून व मतांपासून दुसऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून जे खबरदारी घेतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. दुसऱ्यांच्या मतांवरून किंवा राजकीय मतांवरून जे त्यास नीच मानून त्याचा छळ करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. गावकी किंवा मुलकी अधिकाराच्या जागा स्त्रीपुरुषांच्या योग्यतेनुरूप व सामर्थ्यानुरूप मिळाव्यात असे मान्य करतात, त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"धर्म, गावकी व मुलकी यासंबंधाचा प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, संरक्षण आणि त्याच्या जुलमाणसून बचाव करण्याविषयी जे कोणी बाधा आणीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे मानव वृद्ध शिष्टांस सन्मान देतात वृद्ध मातापित्यांचा परामर्श घेतात त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे. स्त्री अथवा पुरुष जे वैद्याच्या आज्ञेवाचून अफू, भांग, मद्य वगैरे अमली पदार्थांचे सेवन करून नाना तऱ्हेचे अन्याय करण्यास प्रवृत्त होत नाहीत अथवा ते सेवन करणारास आश्रय देत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"पिसू, ढेकूण, ऊ वगैरे कीटक, विंचू, सरपटणारे सर्प, सिंह, वाघ, लांडगे वगैरे आणि त्याप्रमाणे लोभी मानव दुसऱ्या मानव- प्राण्यांचा वध करतात.

"ह्यांखेरीज दुसऱ्या प्राण्यांची वा मानवांची जे हत्या करीत नाहीत अथवा हत्या करणारास मदत देत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे आपल्या हितासाठी दुसऱ्यांचे नुकसान करण्याकरिता लबाड बोलत नाहीत अथवा तसे बोलणारास मदत करीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे व्यभिचार करीत नाहीत अथवा चोरीस मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे स्वत: च्या हितासाठी न्यायाने राज्य करणाऱ्या संस्थानिकांवर अथवा राज्यावर अथवा एकंदर सर्व प्रजेने मुख्य केलेल्या प्रतिनिधीवर बंड करून लक्षावधी लोकांची कुटुंबे उघडी पाडीत नाहीत अथवा बंड करणारास मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. जगाच्या हितासाठी धर्मपुस्तक तयार केले आहे अशी बढाईने वाचाळपणा करणारे, परंतु ते धर्मपुस्तक स्वत: च्या बगलेत मारून इतर मानवांस न दाखविणारे अशा कपटी बढाईखोरांवर जे स्त्रीपुरुष विश्वास ठेवीत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे आपल्या कुटुंबासह आपल्या भाऊबंदास, आपल्या सोयऱ्याधाऱ्यांस आणि इष्टमित्र साथी यास मोठ्या तोऱ्याने पिढीजात श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र या मानीत नाहीत आणि दुसऱ्या मानवांना पिढीजाद कपटाने अपवित्र मानून त्यांस नीच मानीत नाहीत त्यांस सत्पवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे पूर्वी कपटाने लिहिलेल्या ग्रंथांच्या वहिवाटीवरून काही मानवास इतर लोकांच्या मुलांविषयी दुजाभाव बाळगीत नाहीत अथवा शाळेत शिकविताना दुजाभाव करणाऱ्यांचा धि:क्कार करितात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे. स्त्री अथवा पुरुष जे न्यायाधिशाचा हुद्दा चालवताना अन्यायी लोकांना त्यांच्या अन्यायानुसार योग्य शिक्षा करण्याच्या कामी कधीही पक्षपात करीत नाहीत, अन्यायाने पक्षपात करणाऱ्यांचा धिक्कार करतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"जे स्त्री अथवा पुरुष जे स्वत: काही उद्यागेधंदा न करिता निरर्थक धार्मिकपणा डौल घालून अज्ञानी जनांस नवग्रहांची पीडा दाखवून त्यांस भोदाडून खात नाहीत अथवा तत्संबंधी पुस्तके करून आपली पोटे जाळीत नाहीत त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे भाविक मूढांस फसवून खाण्याकरता ब्राह्मणांचे सोग घेऊन त्यांस अंगारा, धुपारा देत नाहीत, अथवा तत्संबंधी मदत करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे आपली पोटे जाळण्याकरिता अज्ञानी जगात उपस्थिती करीत नाहीत अथवा तत्संबंधी मदत करणाऱ्यांच्या सावलीदेखील उभे राहत नाहीत त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"स्त्री अथवा पुरुष जे स्त्रीपुरुषांमध्ये कोणत्याच तऱ्हेची आवडनिवड न करिता त्याचे खाणेपिणे, लेणे व नेसणे याविषयी कोणत्याच प्रकारचा विधिनिषेध न करिता त्यांच्याबरोबर शुद्ध अंत: करणाने आचरण करितात त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे. सर्व मानव स्त्रीपुरुषांपैकी कोणाची आवडनिवड न करिता त्यांतील महारोग्यांस, पंगूंस व पोरक्या मुलांस आपल्या शक्तीनुसार मदत करितात अथवा त्याला मदत करणाऱ्यांस सन्मान देतात त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावे.

"भूमंडळावर महासत्पुरुषांनी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत. त्या सर्वात त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तो धर्म स्विकारावा. तिच्या पतीने बायबल वाचून त्याच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने महंमद धर्मी व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. कोणी कोणाचा द्वेष न करिता सर्वाना निर्मिकाच्या कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांनी वर्तन करावे म्हणजे ते आपल्या सर्वाच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होईल.

"आकाशातील ग्रहांशी मानवाचे भवितव्य निगडित नाही. ग्रह महान व्यक्तींस पीडा देत नाहीत. ही पोटबाबू आर्य जोशांची लबाडी आहे.

"मनुष्यास कन्या व पुत्र झाल्याबरोबर आनंद होतो. कन्येच्या नावाचा संस्कार बाराव्या दिवशी, पुत्राच्या नावाचा तेराव्या दिवशी करावा. मातेच्या स्तनात दूध पुर्ते असल्यास मुलास सहा महिन्याच्या आत कोणत्याही प्रकारचा अन्नसंस्कार करू नये. मुलांस अथवा मुलीस बोलता येऊ लागल्याबरोबर आईने त्यास लहान वाक्ये बोलावयास लावून त्याच्याकडून मुळाक्षरे खेळता खेळता पाठ करून घ्यावीत. पाचवे वर्ष लागताच त्याला शाळेत घालावे.

"कन्यापुत्रांनी आपल्या मात्यापित्यासह वडील इष्टमित्रांचा सल्ला घेऊन त्यांनी मागेपुढे पाहून सारासार विचार करावा आणि लग्न जुळवावे. लग्नाच्या वेळी सद्वर्तनाने वागण्याविषयी प्रतिज्ञा करावी. नंतर गरिबांस, अंधपंगूस जातपातधर्मनिरपेक्ष दानधर्म करावा.

"जे अनीतीने वागलेले असतात त्यांना मरणकाळी पश्चात्ताप झाल्यामुळे क्लेश होतात. मानव स्त्रीपुरुष आपली लग्ने झाल्यावर जे निर्मळ अंतःकरणाने सत्यास स्मरून एकमेकांशी जेव्हा सर्वकाळ स्वकामी सत्य आचरतात, आपले सर्व आयुष्य घालवितात, यास्तव मरण आले की ते शांतपणे आपले प्राण सोडतात.

"मनुष्याने मरणापूर्वी शुद्धीवर असता आपल्या कन्यापुत्रांसह कुटुंबातील एकंदर सर्व तरुणांस त्यांविषयी बोध करून एकंदर सर्व सोयरेधायेरे, इष्टमित्र वगैरेचा निरोप घ्यावा आणि शांतपणे प्रार्थना करावी, ती अशी :

'मला निर्माण करून मला सदसद्विचार करण्याची बुद्धी दिलीस व तुझ्या आज्ञेप्रमाणे सत्यास स्मरून मी या जगात वर्तन केले, हे तू जाणतोस. यास्तव तू माझा अंगीकार करशील अशी माझी पूर्ण खात्री आहे आणि त्याचप्रमाणे माझ्या बाकी एकंदर सर्व मानव बहिणभावंडांनी सत्यास स्मरून आचरण केल्याबरोबर, त्यांचाही अंगीकार निःसंशय करशील. तुझी सत्यसत्ता वाढो.'

"प्रेतास स्नान घालून अंगास तेल लावावे. त्यास वस्त्रे नेसवावीत. त्यावर पुष्पांच्या माळा घालाव्यात. प्रेताची गती लावण्यापूर्वी अंगावरची वस्त्रे काढू नयेत.

"स्मशानातून घरी जाण्यापूर्वी एखाद्या सत्यपालक वृद्धाने प्रार्थना करावी. तेराव्या दिवशी शक्यतेनुसार सखेसोयरे, भाऊबंद, इष्टमित्र यांना भोजन देऊन सर्वांच्या गळ्यात पुष्पांच्या माळा घालाव्यात. शक्यतेनुसार काही द्रव्य देऊन शाळेत जाणाऱ्या त्यांच्या मुलांमुलींना मोठ्या उत्साहाने गाई बक्षीस कराव्यात. वर्षश्राद्धाच्या दिवशी तसेच भोजन द्यावे. निराश्रित मुलांमुलींना त्या दिवशी साहाय्य करावे."

असा हा जोतीरावप्रणीत धर्म आहे. ज्याच्यायोगे सर्व समाजाचे धारण होते तो धर्म म्हणूनच त्यांनी आपल्या धर्मास 'सार्वजनिक सत्यधर्म' म्हटले आहे.

बारा

जोतीरावांचा मृत्यू

जोतीराव अर्धांगवायूशी झगडत असताना त्या आजारीपणात जानेवारी 1890 मध्ये त्यांना एक मोठा विजय मिळाला. ओतूर या गावच्या बाळाजी कुसाजी पाटील या गृहस्थाने ब्राह्मण पुरोहिताला न बोलाविता आपल्या घरचे लग्न लावले. सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने ते लग्न लागले. वधूवरांनी एकमेकांच्या गळ्यात हार घालण्यापलीकडे कोणताच संस्कार केलेला नव्हता. त्या वेळी ग्रामपुरोहिताचा दक्षिणेवर हक्क चालू शकत नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सर चार्लस सार्जंट यांनी दिला व ग्रामपुरोहिताचा लग्न-संस्कारातील दक्षिणेचा हक्क अमान्य केला. सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा हा महत्त्वाचा विजय ठरला. मुंबई नगरपालिकेतील भंगी १८८९ साली आपली गाऱ्हाणी दूर करण्याकरिता जून आणि जुलैमध्ये संपावर गेले. त्यांनाही विजय मिळाला.

वरिष्ठ जातीतील विधवांचे केशवपन जबरदस्तीने होत होते. त्याविरुद्ध जोतीरावांच्या अनुयायांनी खळबळ उडवून देणारी चळवळ सुरू केली. 'ज्ञानप्रकाश' सारख्या वृत्तपत्राने या चालीचा वारंवार धिक्कार चालविला. हे केशवपनाचे प्रकरण सगळीकडे पसरू लागले. 'दीनबंधू' कारांनी या चालीच्या विरुद्ध लेखमाला लिहिली आणि न्हाव्यांना विनंती केली, की त्यांनी हे केशवपन करू नये. मुंबईतील थोर पुढारी मामा परमानंद यांनी हे प्रकरण धसास लावले. त्यामुळे मोठीच खळबळ उडाली. 'इंदुप्रकाश' या पत्रामध्ये (२४ फेब्रुवारी १८९०) एक जाहिरात आली. तीत म्हटले, की केशवपनाची जबरदस्ती हिंदी दंड-संहितेच्या ३५२ कलमाप्रमाणे गुन्हा आहे. त्याप्रमाणे कोणी खटला केल्यास त्याचा योग्य खर्च देण्यात येईल. याबाबतीत 'सुबोधपत्रिका' किंवा 'इंदुप्रकाश' यांच्याकडे अर्ज पाठवावा. मामा परमानंदांनी या जाहिरातदारांचे अभिनंदन केले. या केशवपन विरोधी चळवळीमध्ये प्रत्यक्ष न्हावी समाजच पुढाकार घेऊ लागला. मुंबई येथे १४ एप्रिल १८९० रोजी न्हावी समाजाची विराट सभा भरली. सदोबा कृष्णाजी न्हावी गृहस्थ त्या सभेचे अध्यक्ष होते. या चळवळीची

वार्ता इंग्लडपर्यंत पोहोचली. लंडनमधील महिलांना हिंदू विधवांविषयी सहानुभूती वाटली. सुधारलेल्या इंग्रज महिलांनी भारतीय महिलांना सहानुभूती दाखविली. जोतीरावांनी सतत चाळीस वर्षे मागासलेले वर्ग आणि स्त्रिया यांच्या हक्कांविषयी जिवापाड मेहनत घेतली होती.

जोतीरावांचा आजार अधिक विकोपास गेला. त्यांना समजून चुकले, की इहलोकीची यात्रा संपत आली आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी बोलावून घेतले. शांतपणे उपदेश केला. अनेकांना हुंदके आले. त्यांनी दुःख आवरा म्हणून कळकळीने आदेश दिला. "सावित्रीबाई आणि यशवंत यांना सांभाळा. हे माझे कार्य पुढे चालू ठेवतील," असे ते म्हणाले. लोखंडे समाचारास वारंवार येऊ लागले. भालेकर आले आणि त्यांनी प्रणाम केला. ससाणे, डॉ. लाड, रामय्या व्यंकय्या अय्यावारू आणि मोरो विठ्ठल वाळवेकर दर्शन घेऊन गेले. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक लिहून झाले होते. परंतु छापण्याचा खर्च हा प्रश्न सुटला नव्हता. वाळवेकरांनी ते पुस्तक आम्ही छापू असे आश्वासन दिले. जोतीरावांच्या मनावरचे एक ओझे कमी झाले.

गुरुवार २७ नोव्हेंबर १८९० या दिवशी जोतीरावांची प्रकृती चिंताजनक होऊन त्यांचा अंत समीप आला आहे, असे दिसू लागले. आपल्या पत्नीस बोलावून तिला धीरगंभीरपणे आपला चिर-विरह सहन करावा, असे उपदेशिले. यशवंतास ईश्वराची प्रार्थना करावयास सांगितले. स्वत: मंद स्वरात प्रार्थना म्हटली. अखेरपर्यंत ते शुद्धीत होते. मुख प्रसन्न आणि प्रशांत होते. २८ नोव्हेंबर १८९० रोजी रात्री दोन वाजून वीस मिनिटांनी या नरश्रेष्ठाने इहलोकाची यात्रा संपविली.

जोतीरावांच्या मृत्यूची वार्ता सर्वत्र वाऱ्यासारखी पसरू लागली. पहाटेस त्या महात्म्याच्या दर्शनासाठी गर्दी वाढू लागली. पुण्याजवळील खेड्यातील सत्यशोधकांचे थवे शहराकडे लोटू लागले, त्यांच्या अंत्यदर्शनाकरिता फार मोठी गर्दी जमली. लोकांचा शोक अमर्याद झाली. सकाळी दहा वाजता जोतीरावांच्या देहाला स्नान घालण्यात आले. मग पोषाख चढविला गेला पुष्पहारांच्या मोठ्या राशी त्यांच्या देहावर जमल्या. नातलग आणि सहकारी यांनी खांदा दिला. हिंदू, मुसलमान, ब्राह्मण, महार, मांग इत्यादी सर्वधर्मी लोक आणि स्त्रियाही सामील झाल्या. आपले प्रेत पुरावे, असे जोतीरावांनी आपल्या अखेरच्या इच्छापत्रात लिहिले होते; पण त्यांचे शव चितेवर गेले. जोतीरावांचे अनेक सहकारी खांदा द्यावयास आले होते. भाऊ कोंडाजी पाटील यांचे भावनोत्कट भाषण झाले. यशवंताने जोतीरावांच्या देहास अग्नी दिला. नंतर लोकसमुदाय माघारी फिरला. उभा महाराष्ट्र हळहळला. वृत्तपत्रांमध्ये जोतीरावांच्या जीवनाचे आणि ध्येयवादाचे उत्कटपणे, विविध शैलींमध्ये श्रद्धांजलीच्या रूपात वर्णन आले. कित्येकांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे ज्वलंत पुरस्कर्ते म्हणून त्यांचा निर्देश आग्रहाने केला.

त्या काळाचे महान सुधारक मामा परमानंद हे जोतीरावांचे जिव्हाळ्याचे हितचिंतक व स्नेही होते. त्यांनी बडोद्याचे राजे सयाजीराव महाराज याचे मन वळवून साध्वी सावित्रीबाई आणि दत्तकपुत्र यशवंतराव यांच्याकरिता मदत मिळविली. सयाजी महाराजांनी १८९२ च्या फेब्रुवारीत एक हजार रुपयांची हुंडी मामा परमानंदांकडे पाठविली. त्या रकमेतून प्रत्येक तिमाहीस पन्नास रुपये सावित्रीबाईंना मिळत. जोतीरावांच्या स्मारकासाठी मामा परमानंदांनी निधी गोळा केला. परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे जोतीरावांचा दत्तक मुलगा यशवंत आणि सावित्रीबाई १८९७ साली पुणे येथील प्लेगाच्या साथीत मृत्यू पावले.

तेरा

आता धार्मिक यादवी

जोतिबांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीचे रूपांतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात झाले. त्यांना जोतीबांच्या बुद्धिवादाचा व विश्वमानवतावादाचा स्पर्श झालेला नव्हता. सत्यशोधक चळवळीचा विपर्यास म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होय. भारतीय लोकशाहीच्या पन्नास वर्षांच्या अमदानीनंतर हा विपर्यास हळूहळू कमी होत आहे. परकीय आक्रमणापेक्षा आता धार्मिक यादवीचा अधिक धोका आहे. नकारात्मक आंदोलन कायम राखल्यास धार्मिक संघर्ष यादवी युद्धाचे तीव्र स्वरूप धारण करील.

जोतीबांनी सांगितलेले अर्धसत्य हिंदू-मुसलमान आणि हिंदू-शीख संघर्षामध्ये प्रभाव गाजवीत आहे. यामध्ये ब्राह्मणप्रधान जातिवाद जाऊन त्या ठिकाणी नवे धर्मवाद उभे रहात आहेत. जोतीबांनी सांगितलेले विचार जातिभेदातीत व धर्मभेदातीत होते. हे लक्षात घेतले तरच जोतीबांच्या सत्याचे संपूर्ण स्वरूप लक्षात आले असे होईल.

पृथ्वीवर देवाचे राज्य यावे याकरिता एखादा द्रष्टा एकदम प्रकट होतो व तो एका मंगल सत्याचे बीज देऊन जातो. त्या सत्याचे ते संपूर्ण बीज रोवले तर त्यातून देवाचे राज्य पृथ्वीवर निर्माण होऊ शकते. परंतु असे कधी झाले नाही. कारण अनुयायी त्या सत्याचा अर्धाच भाग स्वीकारतात व नरकाचा धोका निर्माण होतो. अंतर्गत यादवी हा सामाजिक नरक होय.

'गुलामगिरी' किंवा 'सार्वजनिक सत्यधर्म' या दोन पुस्तकातील जोतीराव फुले यांची भारताच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक इतिहासाची उपपत्ती ही एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील युरोपीय व इंग्लिश इतिहासकारांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या आधारे जोतीबांनी सांगितली आहे हे त्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या निबंधाच्या तळातील टिपण्यांवरून उघडकीस येते. इंग्रजी शिक्षण बेताबाताचे होते तरी ते इंग्लिश लिहू शकत होते व महत्त्वाचे उच्च दर्जाचे ग्रंथ समजून वाचू शकत होते ही गोष्टही यावरून निदर्शनास येते. अलीकडे गेल्या शंभर वर्षात प्राचीन भारतीय इतिहासाचे जे मौलिक संशोधन झाले आहे, त्या संशोधनाने

पूर्वीच्या संशोधकांचे बरेचसे निर्णय काही बाबतीत चुकीचे ठरले आहेत व काही बाबतीत अंशतः काल्पनिक ठरले आहेत. मत्स्यावतारापासून परशुराम अवतारापर्यंतच्या अवतारांचा जोतीरावांनी केलेला ऐतिहासिक अर्थ वामन व परशुराम वगळल्यास केवळ काल्पनिक आहे असे मानावे लागते. विशेषत: भारतीय विषम ब्राह्मणप्रधान समाजरचनेस बाहेरून आलेले ऋग्वेदिक आर्य हे मूलतःच कारण होत, या विधानाला आता विशेष पुष्टी मिळू शकत नाही. ऋग्वेदिक आर्य संख्येने अत्यल्प होते व कायम पगडा बसवतील इतके बलवानही नव्हते. विषम समाजरचनेची निर्मिती ही समाजाच्या आंतरिक सामाजिक शक्तींच्या आर्थिक व राजकीय बलामुळे निर्माण होते व ती परिवर्तन पावत असते हा सामाजिक विकासाचा सिद्धान्त मान्य करावा लागतो.

आर्यपूर्व अवैदिक भारत हा विकसित अशा द्रविडी संस्कृतीने व्यापला होता व वर्तमान हिंदू धर्म हा त्याच संस्कृतीचा परिवर्तित आविष्कार आहे, ही उपपत्ती आता सर्वमान्य झाली आहे. काही विद्यमान आधुनिक संस्कृतिशास्त्रज्ञ तर जातिभेद हा आर्यपूर्व संस्कृतीत भारताच्या दक्षिण प्रदेशाला वाढीस लागला व तो वैदिक आर्यांना स्वीकारावा लागला असेही म्हणू लागले आहेत. जोतीरावांनी 'गुलामगिरी' या पुस्तकात दाखवलेल्या आर्यपूर्व जोतीबा, खंडोबा, म्हसोबा, बहिरोबा, बाणासुर इ. देवता व त्याचे पूजा संप्रदाय हे आर्यपूर्व लोकांचे होते हे जोतीरावांनी स्वतःच सांगितले आहे. येथील द्राविडी संस्कृतीला आसुरी असे म्हणता येते. ही गोष्ट जोतीरावांनीही सुचविली आहे व त्यात बरेच तथ्य आहे. त्याच संस्कृतीतील मोठा व मूळचा पुरोहितवर्ग हाच विद्यमान भारतातील बहुसंख्य ब्राह्मणवर्ग, ही गोष्टही जोतीरावांना मान्य झाली असती असे 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकाच्या (पृ. ३९७) टिपणीवरून लक्षात येते. येथील देशस्थ ब्राह्मण हे शूद्र व अतिशूद्र यांच्यापैकीच आर्षीकरण झालेले ब्राह्मण होत, असे जे विधान त्यांनी केले आहे त्यावरून हे सूचित होते.

सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पनेवर जोतीरावांनी कडाडून हल्ला केला आहे. सोवळ्या-ओवळ्याची ही कल्पना आर्यांनी वर्चस्व प्रस्थापित करण्याकरिता आर्येतरांवर लादली व ती त्यांनी भुलून पत्करली असे जे जोतीरावांनी जागोजागी विधान केले आहे, ते आधुनिक मानवजातिशास्त्रज्ञांना मान्य नाही. सोवळ्या- ओवळ्यांची कल्पना प्राथमिक मानवसमाजांमध्ये जगात सर्वत्र होती व वर्तमान कालापर्यंत कमीजास्त प्रमाणात अद्ययावत किंवा आधुनिक पश्चिमी समाज सोडल्यास सर्वत्र कमीजास्त प्रमाणात आहे हे शास्त्रज्ञांच्या गेल्या दीडशे वर्षातील जागतिक संशोधनावरून सिद्ध होते. 'टाबू' (Taboo) आणि 'माना' (Mana) या मौलिक अशा मानवजातिशास्त्रज्ञांनी स्वीकारलेल्या कल्पना आहेत. त्या जादूटोणा व विविध धार्मिक विधी यांचा अर्थ उमगण्यास उपयोगी पडतात. प्राथमिक व मध्ययुगीन सर्व मानवसमाजांच्या धार्मिक चालीरीती, मंत्रतंत्र, जादूटोणा इत्यादी व्यवहारांचा 'टाबू' व 'माना' या कल्पनांच्या साहाय्याने मानवजाती शास्त्रज्ञांना अर्थ करता येतो.

'टाबू' म्हणजे निषिद्ध पाप शक्ती व 'माना' म्हणजे विधायक पुण्यशक्ती होय. उदा. गोमांस भक्षण हे महापाप मानणे, मृताच्या नातेवाइकांना अस्पृश्य मानणे म्हणजे सुतक पाळणे, प्रेताला अपवित्र मानणे, डुकरांचे मांस निषिद्ध मानणे इत्यादी प्रकारच्या निषेधात्मक चालीरीती आर्य व आर्येतर या सर्वांच्याचमध्ये पडतात. गोमांस भक्षण हे पाप आहे ही कल्पना मूळची आर्याची नव्हे. ती आर्येतरांची आहे व ती कालांतराने आर्यांनी स्वीकारली ही कल्पना जोतीरावांनाही मान्य झाली असती. हे वैदिक आर्य गोमांसभक्षक होते असे त्यांनी वारंवार केलेल्या विधानांवरून स्पष्ट होते. मृतांच्या नातेवाइकांची अस्पृश्यता म्हणजे सुतक पाळण्याची चाल ही आर्येतरांपांसून आर्यांनी स्वीकारली ही गोष्ट स्मृतींवरून अनुमानता येते. शूद्रांनी सुतक एक महिना पाळावे असे विधान स्मृतीत आढळते. स्मृतींमध्ये भक्ष्याभक्ष्यविषयक किंवा स्पृश्यास्पृश्याविषयक सांगितलेल्या चालीरीती या परंपरागत असलेल्या त्या त्या जमातींच्या चालीरीती होत, नव्या कायद्याने निर्माण केलेल्या चालीरीती नव्हेत, ही गोष्ट स्मृतींच्या आधुनिक अभ्यासकांना नव्याने सांगण्याची गरज नाही.

बऱ्याचशा अनुयायांना व चाहत्यांना न मानवणारे असे अनेक विचार जोतीरावांनी मांडले आहेत. उदा. ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी' व अन्य संतप्रणित ग्रंथ शूद्र अतिशूद्रांना फसविण्याकरिता, ब्राह्मणांचे आधिपत्य दृढ करण्याकरिता निर्माण केलेले कारस्थान आहे असे जोतीराव अनेक ठिकाणी बजावतात. विष्णू व पंढरीचा विठ्ठल यांची जोतीरावांनी खूप थट्टा उडविली आहे हे महाराष्ट्रातील त्यांच्या चाहत्यांना व अनुयायांना कितपत पटले असेल याची शंका आहे. हिंदुधर्मातील मूर्तिपूजा हे ब्राह्मणांनी पोट भरण्याकरिता काढलेले थोतांड आहे; तीर्थयात्रा, श्राद्ध इत्यादी विधी हा लबाडपणाचा धंदा आहे; एकेश्वरवादी ख्रिस्ती धर्म व मुसलमान धर्म हे हिंदुधर्मापेक्षा अधिक श्रेष्ठ धर्म आहेत; इत्यादी जोतीरावांची विधाने चाहत्यांनी व अनुयायांनी विशेषकरून लक्षात घ्यावीत, अशी आहेत. महंमदावर एक उत्कृष्ट प्रशंसापर कविता जोतीरावांनी लिहिली आहे. ती या संदर्भात वाचावी. ख्रिस्ती व मुसलमान लोकांनी येथील हिंदूंना बाटविण्याचे पूर्वी केलेले प्रयत्न जोतीरावांस स्वागतार्ह वाटतात. त्याबद्दलची पोटदुखी केवळ ऐतखाऊ ब्राह्मणांनाच बाधते, असे त्यांनी वारंवार म्हटले आहे. उदा. पंडिता रमाबाई यांनी ख्रिस्ती धर्म पत्करून केलेल्या ख्रिस्ती धर्मप्रसाराची जोतीबांनी प्रशंसा केली आहे. (सत्सार : पृ. २८६). मात्र याचा अर्थ असा नव्हे की, हिंदूंनी मुसलमान वा ख्रिस्ती व्हावे असे जोतीरावांचे मत होते.

पवित्र ग्रंथनिष्ठ सर्वच धर्म हे मानवामानवात फूट पाडणारे असल्यामुळे अयोग्य होत, असा त्यांचा अंतिम निर्णय होता. तुलनात्मक दृष्टीने विचार करता, प्रचलित हिंदू धर्मापेक्षा मुसलमान वा ख्रिश्चन धर्म कैक पटीने श्रेष्ठ होत, एवढेच त्यांना सांगावयाचे होते. खरा धर्म सर्व मानवांचा एकच आहे. सर्व धर्मनिष्ठ सामाजिक भेद हे मिथ्या भेद होत, असा त्यांनी काढलेला अंतिम निष्कर्ष होता.

हिंदू धर्मावरील विशेषत: ब्राह्मणप्रधान हिंदू समाजरचनेवरील व ब्राह्मणप्रधान

संस्कृतीवरील त्यांचा हल्ला एका तत्कालीन ऐतिहासिक विशिष्ट सामाजिक व राजकीय परिस्थितीची तीव्र प्रतिक्रिया होती व ती तीव्र प्रतिक्रिया तटस्थ रीतीने पाहणाऱ्या आधुनिक विचारवंतांस मर्यादित अर्थाने समर्थनीयच वाटेल यात शंका नाही व ती समर्थनीय आहेच. अव्यवस्थित व बेजबाबदार अशा उत्तर पेशवाईत व अव्वल इंग्रजीमध्ये ब्राह्मणांचे महाराष्ट्रात प्रस्थ वाढले व सामाजिक विषमतेची धार अधिक तीक्ष्ण झाली. ही गोष्ट लोकहितवादी, न्या. रानडे, आगरकर, इत्यादी आधुनिक विचारवंतांना देखील खंत व उद्वेग उत्पन्न करणारी बाब वाटत होती, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. उत्तर पेशवाई बेजबाबदार व हीन दर्जाची होती असेच लोकमान्य टिळकांचे मत होते.

लोकहितवादींची 'शतपत्रे' ही या गोष्टीची साक्ष देतात. ही शतपत्रे म्हणजे ब्राह्मणी विद्यांवर व ब्राह्मणी संस्कृतीवर उगारलेली बुद्धिवादी शतशस्त्रेच होत. ती अजूनपर्यंत गंजलेली नाहीत, त्यांचे तेज अजूनही तळपत आहे. वर्तमान परंपरावादी विद्यापीठीय अनेक सुशिक्षितांना— विशेषतः मराठी प्राध्यापकांना— त्यांच्यापासून इशारा अजूनही लक्षात आलेला नाही. परंतु आता स्वातंत्र्योत्तर काळात ब्राह्मणेतर वाद हा जीर्ण झाला असून त्यातील अभिनिवेश कमी झाला आहे. ब्राह्मणेतरांच्या हातात लोकशाहीने कठोर संघर्षाशिवाय सत्तांतर केले आहे.

भारताचे यांत्रिकीकरण त्वरित होत आहे. सर्व जाती, जमाती व धर्म यांची एक बाजारपेठ होत आहे. शिक्षणात त्या सर्वांना दरवाजे खुले होत आहेत. नोकऱ्यात पारंपरिक अस्पृश्य व तत्सम जमातींना सवलती आहेत. अप्रगत जमातींना सरकारी नोकऱ्यांमध्ये जास्त वाव मिळावा यासाठी चळवळी चालू आहेत. लोकशाहीमुळे हिंदुंमधील यादवीचा धोका फार कमी झाला आहे. पण याच सुमारास भारतातील मुसलमान, शीख व हिंदू यांच्यातले संघर्ष जोरदार वाढत आहेत. हिंदू व शिखांमध्ये यादवी आली आहे. हिंदू-मुसलमानांमधली यादवी आता दूर नाही.

हिंदू व शीख आणि हिंदू व मुसलमान यांच्या दहशती संघर्षातून भारतीय प्रजासत्ताकाच्या ऐक्याला व स्थैर्याला धोका आला आहे. जोतीरावांचे तत्त्वज्ञान या धोक्यातून आपल्याला बाहेर काढण्यास समर्थ आहे. जोतीरावांचा निर्मिक ईश्वर या संघर्षाची आच कमी करू शकतो. जोतिरावांचा सत्पवर्तन हाच धर्म हा संदेश बहुसंख्य हिंदूंना विचारप्रवर्तक करून हा संघर्ष विझवू शकतो. आगामी धार्मिक यादवी अटळ नाही. सत्यशोधक महात्मा जोतीबा फुले महाराष्ट्राप्रमाणेच सबंध भारताला कायमची मार्गदर्शक मशाल आहे.

टीप: धनंजय कीर व सं. ग. मालशे: महात्मा फुले- समग्र वाड्मय, (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशित, १९६९) या ग्रंथातील प्रस्तावनेवर आधारीत हे प्रकरण लिहिले आहे.

उपसंहार

जोतीराव फुले हे भारतातील आधुनिक समताप्रधान समाजनिर्मितीच्या ध्येयवादाचे प्रवक्ते होते. गरीबांचे प्रश्न त्यांनी मोठ्या कळकळीने समाजापुढे मांडले. सामान्य जनतेची सामाजिक गुलामगिरी नष्ट करून, सामाजिक न्याय मिळवून देण्याकरिता त्यांनी चळवळ सुरू केली. मानवी प्रतिष्ठा आणि मानवी स्वातंत्र्य हे सगळ्या भारतीयांना जात आणि धर्म विसरून भोगता आले पाहिजे, हे उद्दिष्ट धरून ही चळवळ सुरू झाली. ती अजून पूर्ण सफल झाली नाही. परंपरावाद आणि सनातनी प्रतिगामी धोरण यांवर त्यांचा हल्ला होता. एकाच कुटुंबात हिंदुधर्मी, मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू आणि निधर्मी निकटचे नातेवाईक सौख्याने नांदावे असे, ते आग्रहाने प्रतिपादित. त्याकरिता ते झुंज देत होते. कोणतीही सामाजिक मूलगामी परिवर्तनाची चळवळ समतावादाच्या कल्पनेने झपाटलेली असावी लागते. आपल्या ध्येयपूर्तीसाठी जोतीरावांनी सारी सुखे आणि मानाची स्थाने नाकारली. नवी जडणघडण करू पाहणारे, नवसमाज निर्माणकर्ते जोतीरावांसारखे महापुरुष भारताला मिळाले. त्यांची परंपरा चालवणारे नवेनवे नेते उदयाला आले. त्यामुळे जोतीरांवासारख्या महापुरुषांच्या कार्यावर विस्मृतीचा पडदा पडला नाही. जोतीराव हे अग्रदूत होते. जोतीरावांच्या जीवनातील विशेष गोष्ट म्हणजे त्यांची पत्नी सावित्रीबाई ही त्यांच्या कार्यात सहभागी राहिली. सामाजिक समता, बुद्धिप्रामाण्यवाद आणि मानवी एकता या आधुनिक विश्वमानवी समाजाला एकरूपता देणाऱ्या मूल्यांचा महामेरू जोतीराव फुले होते.

ooo

प्रबंध व चरित्रांची संदर्भ सूची

१) **शुद्धिसर्वस्वम्** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संस्कृत प्रबंध), प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई, मुद्रक - आर्यसंस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे, प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे, पृष्ठे - ३

२) **भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संस्कृत प्रबंध), प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई, मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई, प्रथमावृत्ती - १९३३. पृष्ठे - १६.

३) **अस्पृश्यतत्त्वमीमांसा** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संस्कृत प्रबंध), श्री भगवानराव - गौरव ग्रंथ (औंध अधिपती भगवानराव श्रीनिवासराव ऊर्फ बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधी यांच्या कारकिर्दीच्या रौप्यमहोत्सवाप्रित्यर्थ) (४ नोव्हेंबर, १९०९ ते ३ नोव्हेंबर, १९३४) त्यांच्या प्रागतिक व यशस्वी कारभाराच्या सन्मानार्थ प्रकाशित), प्रस्तावना - नारायण गोविंद चाफेकर अध्यक्ष, गौरव-ग्रंथ मंडळ, औंध. संपादक - प्रो. रा. द. रानडे, अनंत वि. पटवर्धन पं. श्री. दा. सातवळेकर, शं. वा. किर्लोस्कर,१५ नोव्हेंबर, १९३४, मूल्य - रू. २२-००/

४) **श्रीकेवलानंदयतेश्चरित्रसार** : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (संस्कृत चरित्रम्), श्री ब्रह्मीभूत केवलानंदसरस्वती स्मारक मंदिर का समारोह (पुण्यस्मरण पुस्तिका), संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६०, मूल्य - १ रूपया, पृष्ठे -२५

५) **आनंदमीमांसा** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (मराठी प्रबंध), प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, पुस्तकमाला - पुष्प ५ वे, मुद्रक - आर्यसंस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे, प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ६ आणे, पृष्ठे - ७०

६) **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (मराठी प्रबंध), प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३/१५, सदाशिव पेठ, पुणे, वादविवेचनमाला - संपा. पां. वा. गाडगीळ, मुद्रक - दि प्रज्ञा प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा, प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर, १९४१, किंमत - सव्वा रूपया, पृष्ठे -१३

७) **केवलानंद संक्षिप्त चरित्र** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्रग्रंथ), श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ, संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, मुद्रक - दि प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, प्रकाशन - मार्गशीर्ष शु. ४, शके-१८७४ (इसवी सन १९४२), पृष्ठे - २७२.

८) **जोतिचरित्र** - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, ए - ५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली-१६ प्रथमावृत्ती - शके १९१४ (इ. स. १९९२), किं. १० रू. / पृष्ठे १०

ooo

परिशिष्ट

परिशिष्ट - १

ऋणनिर्देश

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कन्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा डॉ प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ सौ आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.
* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.

* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, जि सातारा.
* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद
* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.

* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर.
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर
* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोधे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरुण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

ooo

परिशिष्ट - २

परिचय

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधवशास्त्री आयुर्वेदाचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय-वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञ पाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञ पाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञ पाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक-सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोषाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची ग्रंथसंपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्वम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने, १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे' या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या प्रबंधाचे

इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते. असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचारप्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्वप्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉडस्' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण

केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एलएल्.डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

(मराठी विश्वकोश खंड-६, पृ. ६०७, ६०८)

(**टीप :** वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)

ooo

परिशिष्ट - ३

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा

१) **आनंदमीमांसा** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई/पुस्तकमाला, पुष्प ६वे
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०) मूल्य ६ आणे / पृष्ठे - ७०

२) **शुद्धिसर्वस्वम्** (संस्कृत प्रबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

३) **भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्** (संस्कृत निबंध)
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

४) **जडवाद अर्थात् अनीश्वरवाद** (मराठी प्रबंध)
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)
प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर, १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

५) **हिंदुधर्माची समीक्षा** (भाषणसंग्रह)
श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ,
नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर १९४१
प्रकाशक - प्राज्ञशाळामंडळ, वाई
द्वितीय आवृत्ती, १ मे, १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे - १४०

६) **ज्योति - निबंध**
भाषण / प्रस्तावना - रा. ना. चव्हाण
मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे - ३५

७) **वैदिक संस्कृतीचा विकास** (भाषणसंग्रह)
श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)
पुणे विद्यापीठ, पुणे
प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमाला
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा
प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध ६, शके १८७३ (१९५१), मूल्य ६ रुपये / पृष्ठे - २८६

८) **भारतस्य संविधानम्**
भारतीय राज्यघटना (१९५२) - संस्कृत भाषांतर.
प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

९) **राजवाडे - लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती १९५८/मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

१०) **लोकमान्य टिळक लेखसंग्रह** (लेखसंग्रह)
प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

11) Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 717 / Price - 50/-

12) Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II)
(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by - Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1 st June 1970, Pages - 720-1361 / Price - 50/-

१३) आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत (भाषणसंग्रह)
व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२
प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ - क, शनिवार पेठ, पुणे - ३०
मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे - ९
पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य ६ रुपये / पृष्ठे - ११८

१४) सर्वधर्मसमीक्षा (भाषणसंग्रह)
सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १
प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५/- / पृष्ठे - ८८

१५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १)
लेखसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/- / पृष्ठे - ५९०

१६) शिखांचा पंथ व इतिहास (भाषणसंग्रह)

कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४

प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे - ३०

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा

प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०

१७) जोतिचरित्र (चरित्र)

प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १

मुद्रक -

प्रथमावृत्ती - शके-१९१४ (१९९२) / किं. ३० रु. / पृष्ठे - १०७

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : संपादन कार्य

१८) धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)

व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)

उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४)

संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६)

राजनीतिकाण्डम् (भाग १ ते ६)

वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

१९) मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५ - १९८०)

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

२०) श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव)

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)

प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध ४ शके-१८७४ / पृष्ठे - २७२

२१) श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

२२) श्री यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ

प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर

(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ)

मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

२३) मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४
प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

२४) मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे - १
प्रथमावृत्ती - २००३ / मूल्य-रु.१५०/- / पृष्ठे - २५८

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे

25) A critique of Hinduism

By tarkteerth Laxmanshastri Joshi
Translated by G. D. Parikh
Publisher - Modern Age Publication Navasari Chembers,
Outram Road, Fort, Bombay-1
Printer - N. E. Chinwalla, Manager,
British India Press, Mazagaon, Bombay
First Edition - Market, 1948 / Price.Rs.5/- / Pages-131

26) हिंदू धर्म की समीक्षा

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - नथूराम प्रेमी
प्रकाशक - नथूराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,
हिराबाग, गिरगाँव, बम्बई -4
पहली बार - दिसंबर 1948 / पृष्ठ संख्या - 172

27) जडवाद और अनीश्वरवाद

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी
अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार
प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगाँव,
बम्बई - 4
मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4
पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

28) वैदिक संस्कृति का विकास

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर

प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली - 110001

प्रथम संस्करण - 1957. / पृष्ठ संख्या - 360.

मूल्य 200 रु.

29) राजवाडे लेखसंग्रह

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादक - वसंत देव

प्रकाशक - साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा

मुद्रक - युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा

प्रथम संस्करण - 1964 / मूल्य 12 रु.50 पै. / पृष्ठ संख्या - 224.

30) Jotirao Phule

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translator - Daya Agrawal

Publisher - National Book Trust, India

First Edition - 1996 / Price - Rs. 75/- / Pages - 94

31) Critique of Hinduism And Other Religions

Tarkteerth Laxmanshastri Joshi.

Translated by Suman Oak.

Publisher - Popular Prakashan, 35, C,

Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building, Tardeo, Bombay - 400 034 First Published - 1996 / pages - 205

32) Development of Indian Culture : Vedas to Gandhi

Tarkteerth Laxmanshatri Joshi

Translated by - S. R. Nene

Published by - Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan, 85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai - 400 025

Printed by - New Age Printing Press, Mumbai - 2

First Edition - 2001/ Price - 200 Rs. / Pages - 555

33) Spiritual Materialism

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - Arundhati Khandkar

Publisher - Lokvangmay Griha, Mumbai - 2

Printer - New Age Printing Press, Mumbai - First Edition - November 2004 / Price - 250 Rs. / Pages - 171

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ

३४) विचारशिल्प (निबंधसंग्रह)

संपादक - प्रा. रा. ग. जाधव

प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे - ३

मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत ५० रु. / पृष्ठे - १४८

३५) आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार (भाषणसंग्रह)

संपादक - डॉ. अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेडकर मार्ग, मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृ. - ९५

३६) साहित्याचे तर्कशास्त्र (साहित्यिक भाषणांचा संग्रह)

संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई.

प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य-७५० रु. / पृष्ठे - ४३७

संदर्भ ग्रंथ सूची

१. श्री सोमनाथ तीर्थ

लेखक - त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक

प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)

मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा

प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत ५ रु. / पृष्ठे - १७२

२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक, नवभारत मासिक**
फेब्रुवारी-मार्च, १९८१
प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५ रु. / पृष्ठे - ९५

३. **प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३
मुद्रक - कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे
प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - सौ. मालती देशपांडे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रथमावृत्ती - जानेवारी, १९९२ / किं. ५० रु. / पृष्ठे - ७५

५. **प्रज्ञानंद : अमृत महोत्सव स्मरणिका**
संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई
प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे - ९८

६. **शास्त्रीजी (चरित्र)**
लेखक - रा. ग. जाधव
प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २
प्रथमावृत्ती - २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७० रु. / पृष्ठे - १५६

७. **तर्कतीर्थ : एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**
लेखिका - अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे
मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई
प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत - २७० रु. / पृष्ठे - २६०

८. **तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**
कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक - गो. न. कुलकर्णी, 'दवबिंदू', वाई
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१०, रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
संपादन - वसंत पळशीकर
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६ / किं. २०० रु./ पृष्ठे - १६४

१०. **प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**
संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे - २३८

११. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने**
लेखक - अशोक भट
प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,
मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई
प्रकाशन - १३ ऑक्टोबर १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

१२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**
कार्यकारी संपादक - यशवंत कळमकर
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे - ४११०३०
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी २००१ / मूल्य - २०० रु. / पृष्ठे - ८४

१३. **संवाद : तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - २६ मे २००१ / किं-१५० रु. / पृष्ठे - १५८

१४. **महाराष्ट्राचे शिल्पकार : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**
लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर.
प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई
प्रथमावृत्ती - एप्रिल २००३/ किं.४० रु./ पृष्ठे - ८४

१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : परंपरा, प्रबोधन व परिवर्तन
रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण
प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे
मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे
प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)
अरुंधती खंडकर
प्रकाशक - श्री. गंधर्व - वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे
मुद्रक - एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर, २०१० / किं. - १८०रु. / पृष्ठे - १७८

१७. प्राज्ञप्रबोध (प्राज्ञपाठशाळामंडळ शताब्दी ग्रंथ)
संपादक - श्री. मा. भावे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई
प्रथमावृत्ती - डिसेंबर, २०१६ / किं. २५० रु. / पृष्ठे - २४७

१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : आठवणी आणि विचार
लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे - ४११००१
मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई
प्रथमावृत्ती - ९ मार्च, २०१९ / किं.-२०० रु. / पृष्ठे - १७१

१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास
संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / • मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे
संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
जुलै, २०१९, पृष्ठे- ३१७

20. Swimming Upstream (Biography)
Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar
Publisher - Oxford University Press, India.
Printer - Nutech Print Services, New Delhi
First Edition - 2019 / Price-Rs.-1,195/- / Pages - 193

२१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : सर्वंकष आकलन
लेखक / संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे
प्रकाशक - अक्षरदालन, २१४१ बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर - ४१६ ०१२
प्रथमावृत्ती - २७ जानेवारी, २०२३, पृष्ठे- ३२६, किं. ५०० रु.

ooo

परिचय

डॉ. सुनीलकुमार लवटे

(जन्म ११ एप्रिल, १९५०, पंढरपूर)

जन्म ११ एप्रिल, १९५०ला वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे. बालपण व इयत्ता ३री पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्री मौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस (एज्युकेशन)' ही बी.ए.,बी.एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए., पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम.ए., एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्त्या, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व योजना विकास कार्य याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका

खंडांतील १६ देशांचे अभ्यास दौरे. (१९९० ते २०११)

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभराहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार/प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि.स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि.स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यालय कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.

विविध सामाजिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारककार' गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादी पोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

○○○

वाय १८४-११०० पु.-आर ८-८.२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

''तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मूलतः संस्कृत पंडित. अध्ययन, अध्यापन, संशोधन, संपादन, कोशनिर्मिती, भाषांतरादि कार्य संस्कृतमध्ये अस्खलित करणारे वाचस्पती. धर्मसभा, पंडित परिषदा, प्राच्य विद्या आंतरराष्ट्रीय परिषदा यांतील त्यांचा नित्य, नूतन, निरंतर वावर, संचार, वादविवाद, खण्डनमण्डन यातून त्यांचे पांडित्य अनेकदा सिद्ध झाले आहे. अनेक खंडांमध्ये 'धर्मकोश' संपादून प्राच्य विश्वात ते वैश्विक प्रतिभावान गणले गेले आहेत. अशा पंडिताने संस्कृतमध्ये निबंध, प्रबंध लिहिणे ही काही आश्चर्यकारक गोष्ट नव्हे. पण तसंच लेखन मराठीत करून त्यांनी दोन्ही भाषांवरील आपली हुकूमत सिद्ध केली हे खरे! 'शुद्धिसर्वस्वम्', 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम', 'अस्पृश्यत्वमीमांसा' इतकेच त्यांच्या 'आनंदमीमांसा', 'जडवाद अर्थात् अनीश्वरवाद' या प्रबंधांचे मोल कोण नाकारेल? शिवाय 'श्री केवलानन्दयतेश्चरित्रसारः' 'ज्योतिचरित्र' आहेच. प्रज्ञा नि प्रतिभेचा सुरेख संगम अनुभवायचा तर 'मंत्रब्राह्मणोपनिषद्' शीर्षक प्रस्तावना वाचण्यास पर्याय नाही. संस्कृत, मराठीत समान न्यायाने विद्वत-प्रचुर लेखनाची प्रचिती म्हणजे हा 'संस्कृत-मराठी प्रबंध व चरित्रसंग्रह'उपक्रम !''

– डॉ. सुनीलकुमार लवटे

('प्रस्तावना' मधून)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई